ती० कै० वासुदेव वामनशास्त्री खरे यांच्या स्मरणार्थ
प्रसिद्ध केलेला—ग्रंथ पांचवा

# ऐतिहासिक-लेख-संग्रह

## भाग चौदावा

( जुलै १८०२-जुलै १८०४ पर्यंत )

## बाजीरावसाहेबांची कारकीर्द

संपादकः—यशवंत वासुदेवशास्त्री खरे, मिरज.

शके १८५२-इ. स. १९३०

किंमत चार रुपये.

( टपालखर्च निराळा पडेल. )

वी० कै० वासुदेव वामनशास्त्री खरे यांच्या स्मरणार्थ
प्रसिद्ध केलेला—ग्रंथ पांचवा.

---

# ऐतिहासिक-लेख-संग्रह
# भाग चौदावा.

( जुलै १८०२–जुलै १८०४ पर्यंत )

---

## बाजीरावसाहेबांची कारकीर्द

संपादकः—यशवंत वासुदेवशास्त्री खरे, मिरज.

---

शके १८५२–इ. स. १९३०

---

किंमत चार रुपये.

---

( टपाल खर्च निराळा पडेल. )

# अनुक्रमणिका.


पृष्ठें.

१ श्रीमंतांचा स्वतंत्र कारभार–सारांश— ७३९३–७३९९

२ होळकराची दक्षिणेवरील स्वारी–पूर्वार्ध.

प्रस्तावना— ७३९९–७४७१

पत्रें— ७४७२–७७३३

३ होळकराची दक्षिणेवरील स्वारी–उत्तरार्ध.

प्रस्तावना— ७६३४–७६८५

पत्रें— ७६८५–७८०७

४ इंग्रजांचें शिंदे–भोसल्यांशीं युद्ध.

प्रस्तावना— ७८०८–७८५०

पत्रें— ७८५१–७९७६

# संपादकीय चार शब्द.

ऐतिहासिक-लेख-संग्रहाचा तेरावा भाग इ. स. १९२६ च्या जून महिन्यांत प्रसिद्ध झाला. त्यानंतर इतर निरनिराळ्या स्वरूपाचीं कामें उद्भवत गेलीं आणि त्या गर्दीत आम्हाला या उद्योगाकडे लक्ष देण्यास बरेच दिवस फुरसतच सांपडली नाहीं. तेराव्या भागानंतर आम्ही पुस्तकें छापिलीं त्यांची माहिती—१ सांगलीकरांचा बांका—पेशवाईतील प्रसिद्ध सरदार कै० आपासाहेब सांगलीकर यांनीं लिहून ठेवलेलें आत्मचरित्र तेराव्या भागाच्या अखेरीस छापलें आहे. असा हा बहुमोल चरित्र ग्रंथ सामान्य वाचकांच्या-विशेषत: विद्यार्थ्यांच्या हातीं जावा या उद्देशानें आम्ही हा बाका स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध केला आहे. २ मराठी राज्याचा उत्तरार्ध-खंड पहिला-ऐ. ले. संग्रहाचे पहिले चार भाग आज बरींच वर्षे विक्रीसाठीं शिल्लक नाहींत. त्या भागांतून कै० तीर्थरूपांनीं प्रकरणवारीनें प्रस्तावना लिहून ठेविल्या आहेत त्या एकत्र करून पुस्तकरूपानें छापाव्या अशी आम्हांस इतिहासप्रेमी मित्रमंडळींकडून सूचना मिळाली तीस अनुसरून माधवराव बल्लाळ आणि नारायणराव बल्लाळ या पेशव्यांच्या कारकीर्दीतलि सर्व प्रस्तावना एकत्र करून आणि त्यांची इतिहासाच्या दृष्टीनें नीट मांडणी करून आणि जागोजाग नवीन माहितीची भर घालून आम्ही हें पुस्तक छापिलें आहे. हें पुस्तक म्हणजे कै० तीर्थरूपांनीं लिहून ठेवलेला पानिपतानंतरचा तेरा वर्षांचा इतिहासच होय. ३ नाना फडनवीसांचें चरित्र-सुधारलेली आ. तिसरी-कै० तीर्थरूपांनीं हें पुस्तक प्रथम ग्रांट डफ व थोडीशीं ऐतिहासिक पत्रें यांच्या आधारानें तयार केलें होतें. हें पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर ऐ. ले. संग्रहांतून आणि इतरत्र नानासंबंधीं पुष्कळच नवीन माहिती उपलब्ध झाली. या माहितीच्या आधारानें हें चरित्र नवीन लिहून काढून त्याची नवीन आवृत्ति प्रसिद्ध करावी असा कै० तीर्थरूपांचा संकल्प होता. त्यांच्या पश्चात् आम्ही हें काम हातीं घेतलें आणि सर्व

उपलब्ध माहिती जमेस धरून आम्ही हा चरित्रग्रंथ नवीन तयार करून प्रसिद्ध केला आहे. ४ गुणोत्कर्ष नाटक सातवी आवृत्ति. ५ संगीत देशकंटक नाटक--हें कै० तीर्थरूपांच्या प्रतिभासंपन्न लेखणींतून बाहेर पडलेलें शेवटचें नाटक होय. आम्ही हें नुकतेंच छापून प्रसिद्ध केलें आहे. असा हा ग्रंथप्रकाशनाचा व्याप दिवसेंदिवस वाढत गेला त्यामुळेंच हा चवदावा भाग इतक्या उशीरानें प्रसिद्ध होत आहे.

कै० तीर्थरूपांच्या संग्रहापैकीं तेरा आणि चवदा या दोन भागांत मिळून सुमारें हजार अकराशें पत्रें आतांपर्यंत छापून निघालीं आहेत. कै० तीर्थरूपांनीं वसईच्या तहापर्यंत पत्रांची जुळणी बहुतांशीं करून ठेविली होती. परंतु हा चवदावा भाग आम्हीं प्रत्यक्ष त्याहावयास घेतला तेव्हां त्यांनीं जुळविलेली माहिती वेळोवेळ अपुरी पडूं लागली. ऐ. ले. संग्रहांत प्रकरणांच्या प्रारंभीं प्रस्तावना लिहिलेल्या असतात त्या सर्व तत्कालीन पत्रव्यवहाराच्या आधारावरच लिहिलेल्या असतात. स. १८०२ सालच्या एखाद्या प्रकरणाची प्रस्तावना लिहावयाची तर त्यापूर्वींच्या दहा वर्षांचा आणि त्यापुढील पांच चार वर्षांचा सर्व पत्रव्यवहार डोळ्यापुढें उभा असावा तेव्हांच ती गोष्ट करतां येते. हजारों पत्रें वाचावीं आणि त्यापैकीं शेपन्नास निवडून काढावीं आणि निवडलेल्या शंभर पत्रांपैकीं शेंकडों पांच दहाच छापावीं असा या कामाचा व्याप आहे. इतका हा व्याप केल्याशिवाय पत्रांतील सर्व मजकूर नीट समजत नाहीं आणि त्यांतील हकीकतींचे पूर्वापार संबंध आणि कार्यकारणभाव हे नीट लक्षांत येत नाहींत. संपादकाला स्वतःला जर सर्व गोष्टी नीट समजल्या नाहींत तर तो त्या दुसऱ्यांना समजून कशा सांगणार? कै. तीर्थरूपांच्या संग्रहांत स. १८०२ सालापुढील फारशी पत्रें नाहींत त्यामुळें आम्ही गेल्या वर्षी मिरजमळा संस्थानच्या रेकार्डापैकीं स. १८०३--१८०६ अशीं चार वर्षांचीं चिटणिशी दप्तरें पाहिलीं आणि पांच सहाशें महत्त्वाच्या पत्रांच्या नकला करून घेतल्या. या नवीन पत्रांपैकीं सुमारें १००।१२५ पत्रें 'इंग्रजांचें शिंदे-भोसल्याशीं युद्ध' या प्रकरणीं या पुस्तकांत आम्ही छापलीं आहेत. कै० तीर्थरूपांच्या पश्चात् मिरजमळा

संस्थानच्या रेकार्डांत आमचा प्रवेश होऊं शकला याचें श्रेय सर्वस्वीं रा. ब. बा. भि. सरदेसाई स्टेट कारभारी आणि मिरजमळा संस्थानचे इतिहासप्रेमी प्रभु श्रीमंत बाबासाहेब सरकार यांच्या कृपेलाच दिलें पाहिजे.

रावबाजी पेशव्यांच्या कारकीर्दींत हिंदी राजकीय क्षेत्रांत मराठी राजकारणाला अगदींच दुय्यम दर्जाचें स्थान प्राप्त झालें होतें. शिवाय पुणें दरबारांत नाना फडनवीस आणि पटवर्धनांसारखे जुने खानदानी सरदार हे त्यावेळीं पेशव्यांच्या अवकृपेखालीं सांपडले होते त्यामुळें पुणें दरबाराच्या राजकीय धोरणाविषयीं खात्रीलायक बातम्या पटवर्धनी दप्तरांत विशेषशा सांपडत नाहींत. यासंबंधीं दहा वर्षांपूर्वी दहाव्या भागांच्या प्रारंभीं के० तीर्थरूपांनीं आगाऊच इशारा देऊन ठेविला आहे तो असा—"आतांपर्यंत ऐ. ले. संग्रहाच्या नऊ भागांत आलेलीं पत्रें आणि या दहाव्या भागापासून पुढें येणारीं पत्रें यांत एक वैलक्षण्य आहे तें येथें प्रथम नमूद केलें पाहिजे. आजपर्यंत छापिलेल्या पत्रांत पेशवे व त्यांचे मुत्सद्दी व सरदार यांनीं स्वतः पाहिलेल्या व अनुभविलेल्या गोष्टी वर्णिल्या आहेत. सबब त्या पूर्णपणें प्रमाणभूत होत. प्रत्येक स्वारींतल्या कारकून वगैरे लोकांनीं आणि पटवर्धनांचे वकील पुणें दरबारीं होते त्यांनीं लिहिलेल्या गोष्टींचेंही प्रामाण्य निर्विवाद आहे. कारण की, स्वारींत ज्यानें जें पाहिलें तें लिहिलें; व वकीलांनींमुद्दां नानाप्रकारच्या मसलतींचीं धोरणें व तपशील आपापल्या धन्यास नक्की समजावे म्हणून ते मुख्य कारभारी नाना फडनवीस यांजकडूनच प्रत्यक्ष समजून घेऊन पत्रें लिहिलेलीं आहेत. त्यापुढें तसल्या प्रकारचीं पत्रें पटवर्धनी दप्तरांत पुष्कळशीं सांपडण्याचा संभव कमी! बाजीरावींत पटवर्धनांचें व न.नांचें प्राधान्य नाहींसें होऊन कारभार भलत्याच लोकांच्या हातीं गेला. त्या कारभाराची इत्थंभूत हकीगत पटवर्धनांच्या दप्तरांत कुठून सांपडणार! पुण्यांतल्या कारकुनांनीं पत्रें लिहिलेलीं यापुढें छापलीं जातील त्यांत लेखकांच्या डोळ्यासमोर घडत असलेल्या गोष्टींचा उल्लेख जेथें येईल तेथें त्या गोष्टी खऱ्या मानण्यास प्रत्यवाय नाहीं. बाजार बातम्या म्हणून ज्या लिहिलेल्या आहेत त्यांतलें सत्य तारतम्यानेंच निवडून घेतलें पाहिजे!"

रावबाजी पेशव्यांच्या नादानपणामुळें मराठी राजकारणाला आगाऊ दुय्यम दर्जाचें स्थान प्राप्त झालें होतेंच आणि हा दुय्यम दर्जाही वसईच्या तहानंतर टिकूं शकला नाहीं. वसईच्या तहानें हिंदी राजकीय क्षेत्रांत मोठी क्रांति घडून आली आणि हिंदी राजकारणाचा केंद्रबिंदु एकाएकीं जो पुण्याहून गुप्त झाला तो थेट कलकत्यास: प्रकट झाला आणि पुढें तेथेंच कायमचा स्थिरावला. वसईच्या तहानंतर हिंदी राजकारणांत कल. गव्ह-र्नर जनरल इन् कौन्सिल आणि त्यावर हुकमत चालविणारें ईस्ट इंडिया कंपनीचें तें बोर्ड ऑफ डायरेक्टर्स आणि त्या बोर्डावर अंमल गाजविणारें तें इंग्रजी पार्लमेंट यांनाच सर्वाध्यक्षता प्राप्त झाली. त्यामुळें यापुढें मराठी दप्तरांतून पत्रें आढळतात त्यांत राजकीय घडामोडी आणि राजकीय धोरणें यांचे उल्लेख फारसे आढळत नाहींत. उलट बहुतेक पत्रांतून आप-सांतील मारामाऱ्या आणि हमरीतुमरी—दंगे, बंडें आणि लुटालूट—भाऊ-बंदी वांटण्या आणि कर्जेदलाली असल्या क्षुद्र गोष्टींचाच भरपूर तपशील दिलेला आढळतो. असलीं हीं खरकटीं छापणें हा केवळ द्रव्याचा आणि बुद्धीचा अपव्यय होय. सबब मराठी इतिहासाच्या दृष्टीनें अत्यंत जरूरीचीं अशीं थोडीशीं पत्रें आणि त्या त्या प्रकरणांच्या संक्षिप्त प्रस्तावना एवढेंच आम्ही यापुढें छापणार आहों आणि आणखी दोन फार तर तीन भागांत ऐ. ले. संग्रहाची मजल पेशवाई अखेरपर्यंत नेऊन हा ग्रंथ पुरा करणार आहों.

मराठी राज्याच्या उत्तरकालीन इतिहासाबद्दल ऐ. ले. संग्रह हा ग्रंथ प्रमाणभूत समजला जातो. या चवदाव्या भागांतसुद्धां ही उज्ज्वल परंपरा अजून कायम राहिली आहे असें दिसून येईल. या भागांत आलेला सर्वच मजकूर नवीन आणि अत्यंत महत्वाचा असा आहे. आतांपर्यंत होळकराचें दक्षिणेंत आगमन—हडपसराची लढाई—पेशव्यांचें पलायन—वस-ईचा तह अशा चार दोन ठळक गोष्टींचा अत्यंत त्रोटक आणि विपर्यस्त आणि ओझरता उल्लेख आणि दहा पांच व्यक्तींची नावें एवढाच इतिहास उपलब्ध होता. खुद्द यशवंतराव होळकर आणि त्याची दक्षिणेवरील स्वारी यासंबंधी साद्यंत, सोपपत्तिक, साधार आणि वास्तविक माहिती आतांपर्यंत

कोणत्याही इतिहासग्रंथांत छापली गेली नाहीं. उलट होळकर हा बडा बंडखोर होता असें दर्शविण्याकडेच बहुतेक इतिहासलेखकांचा कल दिसतो. आतां या चवदाव्या भागाच्या द्वारें नवीन माहिती पुढें येत आहे तिच्या योगानें होळकरासंबंधीं पसरलेले सर्व गैरसमज दूर केले जातील. शिवाय त्यावेळच्या मराठी राजकारणांत भाग घेणाऱ्या पेशवे, शिंदे, इंग्रज आणि अनेक मराठी मुत्सद्दी व सरदार यांच्या राजकीय उलाढालींवरही या ग्रंथानें सर्वस्वीं नवीन प्रकाश पडणार आहे.

या चवदाव्या भागांत स. १८०२ जुलै. १८०४ जुलै अखेर दोन वर्षांचा इतिहास छापला गेला आहे. हा काळ मराठी इतिहासांत अतिशय चमत्कारिक आणि गुंतागुंतीचा आहे. या वेळीं विवेकशून्य चळवळ–कर्तृत्वशून्य आवेश–निराशाजन्य औदासिन्य वगैरे अनेक अनिष्ट गोष्टींची झांपड मराठी लोकनायकांवर बसली होती. मराठी राष्ट्राचा आत्मा अजून बराचसा जागृत होता, परंतु नाउमेद आणि अविश्वास यायोगानें सर्व मराठी राजकीय वातावरण अगदीं अस्थिर बनून गेलें होतें. आत्मा जागृत होता त्यामुळें एखाद्या चलचित्रपटाप्रमाणें दररोज नवीन मसलती, नवे रंग, नवे ढंग आणि नवे डाव निर्माण होत. परंतु नाउमेद आणि अविश्वास यामुळें त्या सर्व गोष्टी दुसऱ्याच क्षणीं कायमच्या विराम पावत! असल्या या गोष्टींचा ग्रंथ लावण्याचें काम अतिशय त्रासाचें असतें. तथापि संपादनाचे बाबतींत आम्ही शक्य ती काळजी घेतली आहे. या भागांत आलेल्या सर्व हकीगतींचे पूर्वापरसंबंध आणि आणि कार्यकारणभाव नीट समजून घेऊनच आम्ही सर्व मजकुराची जुळणी केली आहे आणि आमच्या दृष्टीनें यांत कोणतेंही वैगुण्य राहूं दिलेलें नाहीं. आम्ही कितीही मेहनत घेतली तरी अस्सल आणि नक्कल यांमधील भेद केव्हांही कायमच रहाणार या गोष्टीची जाणीव आम्हाला पूर्णपणें आहे. वसईच्या तहापर्यंत ऐ. ले. संग्रहाचें सर्व संपादन स्वतःच्या हातून व्हावें असा कै० तीर्थरूपांनीं शेवटीं शेवटीं अगदीं ध्यास घेतला होता. तसें घडून येऊन वसईच्या तहासंबं-

धीचा हा चवदावा भाग त्यांच्याच प्रतिभासंपन्न लेखणींतून बाहेर पडला असता तर किती चांगलें झालें असतें ही गोष्ट आमच्या वारंवार मनांत येते. परंतु जो मुळीं मानवी यत्नाचा विषयच नव्हे त्या ठिकाणीं केवळ हळहळण्याशिवाय कोणी झालें तरी दुसरें काय करणार ?

आमच्या इतर पुस्तकांप्रमाणें हें पुस्तक छापवितांनाही श्रीसिद्धेश्वर प्रेसचे उत्साही मालक रा. वासुदेव नारायण ठकार यांजकडून आम्हाला वेळोवेळ अतिशय मदत मिळाली आहे आणि ती गोष्ट आम्ही येथें साभार नमूद करतों.

कै. तीर्थरूपांचा पुण्यात्मा या अल्पसेवेनें संतोष पावो.

मिरज,
ता. २८ आगष्ट १९३० इ.

यशवंत वासुदेवशास्त्री खरे.

# ऐतिहासिक लेख-संग्रह

## भाग चौदावा.

## श्रीमंतांचा स्वतंत्र कारभार-सारांश.

( सन १८०१ जाने.-सन १८०२ जूनपर्यंत. )

या प्रकरणाची हकीगत मागच्या तेराव्या भागाच्या प्रारंभीं देण्यांत आली आहे. तो भाग प्रसिद्ध झाल्यास जवळ जवळ चार वर्षे होत आलीं, त्यामुळें ती हकीगत वाचकांच्या स्मरणांत राहिली नसेल आणि या पुस्तकाच्या नवीन वाचकांनीं तर ती मुळींच वाचली नसेल. जुन्या वाचकांचें स्मरण ताजें व्हावें आणि नवीन वाचकांना कथानुसंधान कळावें या हेतूनें त्या हकीगतीचा सारांश येथें संक्षेपानें नमूद करतों.

बाजीराव साहेबांना राज्यांतील जुने मुत्सद्दी व सरदार यांबद्दल अतिशय द्वेष वाटत असे आणि ते गादीवर बसल्यापासून या जुन्या लोकांचें समूळ उच्चाटण करावें असा त्यांचा संकल्प ठरलेला होता. श्रीमंतांनीं हा राक्षसी संकल्प दौलतराव शिंदे व त्यांचा पाषाणहृदयी कारभारी सर्जेराव घाटगे यांच्या सहाय्यानें सिद्धीस नेला आणि त्यांच्या विरुद्ध नाना फडनवीस, परशुरामभाऊ पटवर्धन अशा सारख्यांचेंसुद्धां कांहीं चाललें नाहीं. इ. स. १८०० च्या मार्च महिन्यांत नाना फडनवीस मृत्यु पावले आणि उत्तरेकडे

१ तेराव्या भागाच्या प्रारंभीं आम्ही सारांश दिला आहे त्याला श्रीमंतांचा स्वतंत्र कारभार-पूर्वार्ध असें नांव चुकीनें दिलें गेलें आहे. त्याऐवजीं श्रीमंतांचा स्वतंत्र कारभार एवढेंच नांव त्या प्रकरणाला देणें वाजवी आहे. पुढील प्रकरणाला श्री. स्व. कारभार-उत्तरार्ध असें नांव न देतां त्याला आम्ही 'होळकराची दक्षिणेवर स्वारी' असें दुसरें अन्वर्थक नांव दिलें आहे. पत्रव्यवहारांत ज्या प्रमुख गोष्टीची हकीगत आली असेल तेंच नांव प्रकरणाला द्यावें या वहिवाटीस अनुसरूनच आम्ही या चुकीची दुरुस्ती केली आहे.

यशवंतराव होळकर व शिंदेबाया यांनीं भयंकर धामधूम उडविल्यामुळें शिंदेही त्या वर्षाच्या अखेरीस पुण्याहून कूच करून उत्तरकडे निघाले, त्यामुळें पेशव्यांच्या स्वैर वर्तनास आळा घालणारें कोणीच शिल्लक राहिलें नाहीं. शिंद्यांच्या सोटेशाहीच्या तडाख्यांत बहुतेक जुने प्रतिष्ठित लोक यापूर्वीच मेले होते किंवा कैदेंत पडले होते आणि कांहीं थोडे शिल्लक राहिले होते त्यांवरच आतां श्रीमंतांनीं हत्यार उपसलें! अनेक दुर्दैवी सुखवस्तु लोक यावेळीं श्रीमंतांच्या रोषास बळी पडले. श्रीमंतांच्या रोषाची सर्वांत जास्त बाधा रास्त्यांना लागली. त्या घराण्यांतील पुरुष, स्त्रिया व मुलें या सर्वांना कैद करून त्यांना निरनिराळ्या किल्ल्यावर पाठविण्यांत आलें आणि रास्त्यांची सर्व चीजवस्त सरकारजप्तींत पडली. रास्त्यांचा सरंजामी मुलूख ताब्यांत घेण्याचा श्रीमंतांनीं यत्न केला तो मात्र साधला नाहीं. सरकारची रास्ते घराण्यावर वक्रदृष्टि झालेली पाहतांच रास्त्यांचे किल्लेदार, ठाणेदार आणि मामलेदार यांनीं एकजूट करून श्रीमंताविरुद्ध बंड केलें. याचवेळीं पटवर्धनांचे सावनूरचे महाल ताब्यांत घेण्याबद्दल श्रीमंतांनीं बापू गोखल्याला हुकूम केला त्यामुळें कर्नाटकांत गोखले व पटवर्धन यांचें मोठेंच युद्ध जुंपलें. कर्नाटकांतील रास्ते व पटवर्धन या बंडखोर सरदारांना वठणीवर आणण्याकरितां श्रीमंतांनीं यशवंतराव पानशे, आबाजी शंकर, पांडोजी कुंजर, यशवंतराव पाटणकर वगैरे अनेक सरदार त्या प्रांतांत पाठविले आणि त्याच हेतूनें करवीर महाराजाशीं सख्य जोडलें. परंतु श्रीमंतांचे सर्व प्रयत्न फोल ठरून त्या प्रांतांत लूट व लढाया यांची दंगल चालून राहिली!

नानांच्या मृत्यूनंतर पुणें दरबारांतील जुन्या मुत्सद्यांचें पुढारीपण पेशव्यांचे थोरले बंधु अमृतराव यांनीं स्वीकारलें. पेशव्यांच्या पोरकटपणामुळें पुणें दरबारांत हलकट लोकांचें प्राबल्य वाढलें आहे तें नाहींसें करावें आणि पेशव्यांच्या मनावर शिंद्याच्या वर्चस्वाची बेसुमार छाप बसली आहे ती दूर करावी असा अमृतरावांचा हेतु होता. शिंद्याच्या जुलमानें गांजलेले पेशव्यांच्या दरबारांतील मुत्सुद्दी व सरदार आणि घाटग्याच्या जुलमाखालीं भरडून निघालेले शिंद्याच्या दरबारांतील मराठे व शेणवी सरदार यांचा अमृतरावाला मनःपूर्वक पाठिंबा होता. शिंदे आपल्या जिवास अपाय

करतील या भयानें अमृतराव हे यापूर्वीच वसईस जाऊन राहिले होते. तथापि त्यांच्या नांवावर जिवाजी यशवंत, यशवंतराव शिवाजी, बाजीबा मोदी, येसाजी रामकृष्ण, मालजी गावडे वगैरे सरदार श्रीमंत व शिंदे यांविरुद्ध जागोजाग बंडें उत्पन्न करीत होते. या लोकांनाच बारभाई असें म्हणत. शिंद्यांच्या वर्चस्वाविरुद्ध अमृतरावांच्या प्रेरणेवरून दक्षिणेंत ही बारभाईची धामधूम सुरू होती, तिचा पुढारीपणा विठोजी होळकराकडे होता. वस्तुतः अमृतराव व बारभाई यांचा रोख शिंद्याविरुद्ध होता; परंतु श्रीमंतांचा मात्र ठाम ग्रह झाला होता कीं, ही सर्व धामधूम म्हणजे आपणाविरुद्ध उघड उघड बंडच होय आणि बाईट बऱ्या उपायांनीं या बंडाचा बीमोड केलाच पाहिजे! यशवंतराव पानसे, नाना पुरंदरे, बापू गोखले या सरदारांच्या मदतीनें श्रीमंतांनीं बारभाईची दाणादाण केली आणि विठोजी होळकराला पकडून पुण्यास आणविलें आणि त्याचा स्वतः समक्ष निर्दयपणानें खून करविला! या खुनानंतरही बारभाईचा बंडावा जागोजाग थोडाबहुत चालूच होता.

अमृतरावांच्या तर्फे सर्वांत मोठें बंड यशवंतराव होळकरानें केलें. तुकोजीराव होळकरांच्या मृत्यूनंतर शिंद्यांनीं वेडसर काशीरावाला सरदारीचीं वस्त्रें देवविलीं आणि त्याच्या नांवावर होळकरांचा सर्व मुलूख हाताखालीं घातला त्यामुळें होळकरांची सरदारी आतां अगदीं नामशेष झाली होती. शिंद्यांच्या या दडपेलीविरुद्ध मल्हारराव, विठोजी व यशवंतराव या तिघा भावांनीं शिंद्यांविरुद्ध हत्यार उपसलें. शिंद्यांनीं ता. १४ सप्टें. १७९७ रोजीं भरदिवसां छापा घालून मल्हाररावाचा खून केला आणि त्याची बायको व अल्पवयी मुलगा खंडेराव यांना कैदेंत टाकिलें. या खुनानंतर विठोजी व यशवंतराव हे जिवाच्या भयानें दोन वर्षेंपर्यंत अज्ञातवासांतच फिरत होते. स. १८००च्या प्रारंभीं विठोजी दक्षिणेंत प्रकट झाला आणि बारभाईचा पुढारी बनला आणि त्याच वेळीं उत्तरेकडे यशवंतरावानें मल्हाररावाचा अल्पवयी मुलगा खंडेराव हाच आमच्या सरदारीचा खरा वारस आहे असें जाहीर केलें आणि पन्नास साठ हजार फौज जमवून त्यानें आपला मुलूख ताब्यांत घेतला आणि नंतर शिंद्यांच्या मुलखांत लूटमार सुरू केली. होळ-

कराखेरीज महादजी शिंद्यांच्या बायकाही यावेळीं शिंद्यांच्या सरंजामांत लुटा-लूट करीत होत्या. यांनाच शिंदेबाया असें म्हणत. शिंद्यांच्या दरबारांत सर्जेराव घाटग्याचें प्राबल्य झाल्यामुळें या शिंदेबाया दौलतराबावर बिथरल्या होत्या आणि दोन तीन वर्षें दक्षिणेंत धामधूम करून त्यांचा मोर्चा आतां उत्तरेकडे वळला होता. स. १८००च्या प्रारंभीं शिंदेबाया माळवाप्रांतीं पोंचल्या आणि त्यांना महादजी शिंद्याचा प्रसिद्ध सेनापति लखबा लाड हा सामील झाला. होळकर व शिंदेबाया यांशीं कसा तरी समेट करून आपल्या मुलखाचा बचाव करावा असा शिंद्यांचा मनोदय होता. स. १८००च्या एप्रिल महिन्यांत शिंदे बऱ्हाणपुरास पोंचले आणि तेथून त्यांनीं होळकराकडे समेटाचें बोलणें लाविलें. हें समेटाचें बोलणें रंगास येऊन आतां उभयतांचा समेट होणार तोंच इकडे दक्षिणेंत श्रीमंतांनीं विठोजीचा खून करविला त्यामुळें हा समेटाचा डोलारा कोसळून जमीनदोस्त झाला ! भावाच्या वधाची बातमी समजतांच यशवंतराव रागानें बेफाम झाला आणि त्यानें शिंद्यांची राजधानी उज्जनी ही जाळून लुटून फस्त केली आणि शिंदे नर्मदेपलीकडे जातात तोंच, त्यांच्या तोंडावर होळकर साठ हजार फौजेसह लढाईच्या इराद्यानें ठांसून उभा राहिला. दोन तीन लढायांतच होळकरानें शत्रूची फौज व पलटणें तुडवून असा मार दिला कीं, शिंदे किंकर्तव्यतामूढ होऊन जागच्या जागींच थंड पडले !

शिंदे पुण्याहून उत्तरेकडे निघाले तेव्हां त्यांना सत्तेचाळीस लाख रुपये देण्याचें श्रीमंतानीं कबूल केलें होतें आणि त्या रुपयांच्या वसुलीसाठीं शिंद्यांनीं चार पलटणें व सर्जेराव घाटगे यांना दक्षिणेंत ठेविलें होतें. राज्यांतील जुन्या लोकांचें निसंतान करवितांना श्रीमंतांना शिंदे व घाटगे यांबद्दल अतिशय प्रेम वाटत होतें परंतु त्यांचा स्वभाव पराकाष्ठेचा कृतघ्न असल्यामुळें, आपलें काम होतांच त्यांना आतां ते दोघे डोळ्यांसमोरसुद्धां नकोसे झाले होते ! घाटग्यानें द्रव्याबद्दल कितीही तगादे केले तरी श्रीमंतांनीं त्याला फुटकी कवडीसुद्धां दिली नाहीं, उलट त्याचा जीव घेण्याचा प्रयत्नच त्यांनीं एकदां करून पाहिला ! शेवटीं श्रीमंतांकडून द्रव्य मिळण्याची अगदीं निराशा वाटल्यामुळें घाटगे स. १८०१ च्या जून महि-

त्यांत शिंद्यांच्या मदतीसाठीं उत्तरेकडे निघाला. घाटगे पुण्याहून हालल्यावर त्याचा दोस्त आपा देसाई निपाणकर व मुलगा हिंदुराव घाटगे हेही पुण्याहून कर्नाटकांत गेले आणि तिकडेच स्वतंत्रपणें स्वाऱ्याशिकाऱ्या करूं लागले. सप्टेंबर महिन्यांत घाटगे नर्मदेपलीकडे शिंद्यांच्या लष्करांत पोचला आणि नंतर त्यानें फौजेची नीट जुळवाजुळव करून होळकरावर चढाई केली. दोन महिनेपर्यंत शिंदे होळकरांची गनिमीकाव्याची मारामारी होऊन घाटग्यानें होळकरास इंदूरपर्यंत मागें रेटीत नेलें आणि तेथें एका लढाईत त्यानें शत्रूची दाणादाण केली. या विजयानंतर होळकरांचे माळवा, रामपुरा, भूम हे परगणे घाटग्यानें काबीज केलें आणि होळकरांची राजधानी इंदूर शहर हें तर त्यानें जाळून लुटून बेचिराख केलें!

या पराजयानें होळकराची हिंमत बिलकूल खचली नाहीं. महिनाभरांत त्यानें पुन: पन्नास हजार फौज गोळा केली आणि शिंदे बाया व लखबा लाड यांना सामील करून घेऊन तो शिंद्यांशीं पुन: नेटानें टक्कर देऊं लागला. सन १८०२ च्या जाने. महिन्यांत होळकरानें शिंद्याचा एक दोन लढायांत पराजय केला आणि त्याला इंदुराहून मागें सारीत सारीत उज्जनींत नेऊन कोंडलें. फेब्रु. व मार्च हे दोन महिने शिंदे हताश होऊन उज्जनींत स्वस्थ बसून होते आणि त्या मुदतींत होळकर त्यांच्याभोंवतीं सारख्या घिरट्या घालीत होता आणि त्यांच्याचदेखत त्यांचा मुलूख लुटीत होता! शिंद्याला मैदानांत ओढून त्याचा फन्ना पाडावा असा होळकराचा डाव होता. परंतु पराजयानें नाउमेद झालेले शिंदे कांहीं केल्या मैदानांत येईनात आणि होळकराचा हेतु पूर्ण होईना! शेवटीं दिल्लीदरबारांतून उचाटण करण्याचें भय दाखवावें म्हणजे आपल्या पाठलागावर शिंदे आपोआपच मैदानांत येतील असा अंदाज बांधून होळकराची स्वारी एप्रिल महिन्यांत दिल्लीकडे वळली. या स्वारींत होळकराला अमूप लूट मिळाली, परंतु शिंद्याला मैदानांत ओढण्याचा त्याचा डाव मात्र साधला नाहीं. आपल्या मुलखाची राखरांगोळी झालेली पहात शिंदे उज्जनींतच स्वस्थ पडून राहिले! याप्रमाणें हा डाव फसतांच होळकरानें दक्षिणेंत येऊन पेशव्यांना ताब्यांत घेण्याचा नव नकाशा ठरविला. पुणें दरबारांतील आपलें वर्चस्व कायम राखण्याकरितां

आणि पेशव्यांचें रक्षण करण्याकरितां शिंदे आपल्या पाठोपाठ खात्रीनें दक्षिणेंत येतील असा त्याचा अजमास होता. शिंदे दक्षिणेंत आल्यावर संधि साधून त्यांच्यावर झडप घालून आपला सूड घेण्याची इच्छा तृप्त करावी असा होळकराचा अंतस्थ हेतु होता. बाह्यतः मात्र त्यानें जाहीर केलें कीं, शिंद्याच्या जुलमाविरुद्ध दाद मागण्याकरितांच आपण पुण्यास श्रीमंताच्या पायाशीं जात आहों! माळव्यांत शिंद्याच्या तोंडावर थोडीशी फौज ठेवून होळकरानें आपल्या फौजेच्या तीन टोळ्या केल्या आणि त्या तिनी टोळ्या जून महिन्यांत तापी उतरून खानदेशांत शिरल्या.

सन १८०२ च्या जाने. महिन्यांत होळकरानें आपला दिवाण पाराशरपंत दादाजी याला आपल्या मागण्यांची लांबच लांब याद बरोबर देऊन पुण्यास पेशव्यांकडे शिष्टाईसाठीं पाठविलें. फेब्रुवारी महिन्यांत पाराजीपंत खानदेशांत आला आणि त्याला बारभाईपैकीं जिवाजी यशवंत बावनपागे हा सामील झाला. नर्मदेअलीकडील होळकरांचा सरंजाम श्रीमंतांनीं यापूर्वीच जप्त केला होता. पाराजीपंतानें सरकारची ही जप्ती जबरदस्तीनें उठविली. होळकरांच्या फौजेशीं लढण्याकरितां श्रीमंतांनीं धोंडोपंत गोडबोल्याला खानदेशांत पाठविलें. परंतु शत्रूच्या फौजेशीं गांठ पडतांच धोंडोपंतानें एकाच लढाईत सर्वस्व गमावलें आणि तो एकटा जीव बचावून पुण्यास पळून आला! नंतर जिवाजी यशवंत हा शिंद्याचा सरदार गोपाळराव चिटणीस याशीं लढण्याकरितां बऱ्हाणपुराकडे वळला आणि पाराजीपंत पुण्यास आला. श्रीमंतांची होळकर घराण्यावर इतकी गैरमर्जी होती कीं, त्यांनीं पाराजीपंताची धड भेटमुद्रा घेतली नाहीं. मग त्याचें म्हणणें ऐकून घेण्याचें दूरच राहिलें!

होळकर दक्षिणेंत जाणार असें पाहतांच शिंदेही थोडेसे हातपाय हालवूं लागले. स. १८०२ च्या मार्च महिन्यांत लखवा दादा मृत्यु पावला त्यामुळें त्यांचा एक शत्रू आपोआपच नाहींसा झाला. यशवंतरावाचें तोंड दक्षिणेकडे वळतांच शिंद्यांनीं त्याच्या मालकाची म्हणजे खंडेराव होळकराची कैद आणखीच सक्तीची केली. नंतर त्यांनीं अंबोजी इंगळ्याला मध्यस्थ घालून शिंदे बायांशीं सख्य जोडलें आणि सर्जेराव घाटग्याला कार-

भारांतून काढून टाकिलें. यादवराव भास्कर बक्षी हा आतां त्यांचा दिवाण झाला. शिंद्यांनीं दिल्ली प्रांतांतली आपली फौज उज्जनीस बोलाविली आणि बऱ्हाणपुरास गोपाळराव चिटणीस होते त्यांना होळकरावर चालून जाण्याचा हुकूम दिला. एकंदरींत होळकराच्या पाठोपाठ शिंदेही दक्षिणेंत येणार असा रंग दिसूं लागला.

होळकर दक्षिणेंत येणार असें पाहतांच श्रीमंतांनीं आपलें कर्नाटकांतील राजकारण अगदींच आंवरून धरलें. कुंजर, पाटणकर वगैरे सरदारांस त्यांनीं पुण्यास बोलाविलें आणि पटवर्धनांशीं घाईघाईनें सख्य जोडलें. अलीकडे तीन चार वर्षें श्रीमंतांना बाळोजी कुंजर हा प्यारे दोस्त वाटत होता आणि ते सर्वस्वीं त्याच्याच ओंजळीनें पाणी पीत असत. कुंजराची अक्कल आणि शिंद्याची तरवार यांच्या जोरावर आपण होळकराच्या स्वारीच्या गंडांतरांतून पार पडूं असा श्रीमंतांना भरंवसा वाटत होता आणि होळकर खानदेशांत आल्याची बातमी कळतांच केव्हां एकदां शिंदा पुण्यास येईल असा त्यांना अगदीं ध्यास लागून राहिला!

# होळकरांची दक्षिणेवर स्वारी-पूर्वार्ध.

( स. १८०२ जून ते डिसेंबर अखेर )

दक्षिणेवर स्वारी करण्याचा बेत ठरवितांना यशवंतराव होळकराच्या मनांत शिंद्याविषयीं कोणते विचार घोळत होते याचें दिग्दर्शन पूर्वीं करण्यांत आलेंच आहे. उत्तर हिंदुस्थानांत शिंद्याविरुद्ध होळकरांची धडपड चालू असतां त्याच वेळीं दक्षिणेंतही शिंद्याविरुद्ध एक मोठेंच कारस्थान शिजत होतें. त्या कारस्थानाचा आणि होळकराच्या दक्षिणेवरील मोहिमेचा बऱ्याच अंशीं कार्यकारणभावाचा संबंध आहे, त्यामुळें त्या कारस्थानाचीं कारणें, त्यांतील व्यक्ति आणि त्यांचे हेतु यासंबंधीं या ठिकाणीं थोडीशी विस्तारपूर्वक चर्चा केली पाहिजे.

सवाई रावसाहेब यांच्या मृत्यूनंतर नाना फडणिसाचीं बंडें, फासवंडें आणि शिंदे निर्माण होऊन बाजीराव पेशवे, दौलतराव शिंदे आणि सर्जेराव

घाटगे या त्रिवर्गाच्या राक्षसी लीलांनीं मराठी राज्यांत कसा धुमाकूळ घातला आणि पेशव्यांची खुनशी वक्रदृष्टि आणि शिंद्यांची आंधळी सोटेशाही यांच्या तडाख्याखालीं राज्यांतील जुने मुत्सद्दी, सरदार व सावकार यांची कशी दाणादाण झाली याचें वर्णन आतांपर्यंत ऐ. ले. संग्रहांतून भरपूर आलेलेंच आहे. मराठी राजकारणांत पुरोगामी स्वरूपाचें असें कोणतेंच धोरण शिल्लक राहिलें नव्हतें त्यामुळें राज्याच्या संवर्धनास आणि पोषणास जरूर असलेल्या सर्व सद्‌गुणांचा क्रमाक्रमानें नाश होत जाऊन त्यांच्या जागीं आतां फितूर, विश्वासघात, अंगचोरपणा आणि लब्धप्रतिष्ठितपणा यांचा फैलावा उजळमाथ्यानें होत होता आणि आपापसांतील द्वेष व मारामाऱ्या यांना तर अगदीं ऊतच आला होता! याप्रमाणें राज्यनाशाची पूर्वतयारी आपल्या डोळ्यासमोर चालू असतांही श्रीमंतांची स्वारी मात्र अगदीं खूष मर्जीत कलक्रमणा करीत होती! निरंकुश सत्ता आणि मनमुराद सुखोपभोग हेंच त्यांच्या राजकारणाचें ध्येय होतें, त्यामुळें शिंद्यांच्या जिवावर त्यांचा राज्यकारभार अगदीं मनसोक्त आणि आबादीआबाद चालला होता! श्रीमंतांचा हा राज्यकारभार वरवर कितीही आबादीआबाद दिसला तरी आंतून मात्र त्याबद्दल असंतोषाच्या ज्वाळा सारख्या धुमसत राहिल्या होत्या. नाना फडनवीस आणि बाळोबा तात्या पागनीस यांचे हजारों अनुयायी जागोजाग पसरले होते त्यांना हा राज्यनाश उघड्या डोळ्यानीं स्वस्थपणानें पहावत नव्हता आणि त्यांची पेशवे व शिंदे यांविरुद्ध आंतून आंतून सारखी धडपड सुरू होती. अशा लोकांपैकीं कांहीं पेशव्यांची मर्जी संभाळून त्यांच्याच पंगतीस भोजन करीत आणि संधि सांपडेल तेव्हां त्यांचा दुर्लौकिक पसरवीत तर कांहीं धीटपणा करून एखादा फितूर निर्माण करीत आणि तो उघडकीस येऊन कैदेंत पडत आणि कांहीं तर धटाई करून श्रीमंतांविरुद्ध उघड बंडच पुकारीत! अशा या सार्वत्रिक असंतोषाचा मोठा स्फोट होत नसे; त्याचीं कारणें—एक तर या असंतुष्टांना कोणी वजनदार पुढारी मिळत नव्हता, त्यामुळें त्यांच्या चळवळीला भारदस्त स्वरूप प्राप्त होण्यासारखें नव्हतें. दुसरें कारण असें कीं, त्यांना शिंद्यांच्या लष्करी सामर्थ्याचें अतिशय भय वाटत होतें. शिंद्यांच्या तोडीचा दुसरा एखादा

फौजबंद पराक्रमी सरदार त्यांना पाठीराखा मिळता तर मात्र श्रीमंत व शिंदे यांविरुद्ध दंड थोपटण्याची या लोकांची केव्हांही तयारीच होती !

मराठी परंपरेचा जो हा भयंकर विध्वंस करण्यांत आला, त्याचें कारण शिंद्यांचें पुणें दरबारांत बेसुमार वर्चस्व वाढलें होतें हेंच होय. या वर्चस्वाविरुद्ध नाना फडनवीस, बाळोबा तात्या पागनीस आणि इतर शेंकडों देशाभिमानी गृहस्थांनीं मरेपर्यंत तनमनधनाचा होम करून प्रतिकार चालू ठेविला होता आणि ही पिढी कालवश झाली तरीही ही प्रतिकाराची चळवळ बंद पडली नव्हती. अजूनही अमृतराव पेशवे, यशवंतराव होळकर, शिंदेबाया, लखबा लाड, जिवाजी यशवंत बावनपागे वगैरे बारभाई शेणवी सरदार, धोंडोपंत नित्सुरे वगैरे सद्‌गृहस्थांचा शिंद्याविरुद्ध बंडावा उघडपणें चालूच होता. नानांच्या वेळचे नारोपंत चक्रदेव, बजाबा शिराळेकर, दादा गद्रे वगैरे पुष्कळ मुत्सद्दी कैदेंत पडले होते तरी त्यांचीही आंतून शिंद्याविरुद्ध कारस्थानें सुरूच होतीं. पटवर्धन, रास्ते व इतर लहानमोठे सरदार आणि हुजरातींतील शेंकडों पागे व पथके हे सर्व शिंद्यांचा मनापासून द्वेष करणारेच होते. तात्पर्य बाळोजी कुंजर, निंबाजी भास्कर यांसारखे श्रीमंतांच्या प्रीतींतले पोरकट मुत्सद्दी आणि सर्जेराव घाटगे, व फकीरजी गाढवे यासारखे शिंद्यांचे हलकट लेही यांशिवाय सर्वच राज्य श्रीमंत व शिंदे यांच्या नांवानें सारखें जळफळत होतें ! अशा या असंतुष्ट लोकांच्या चळवळीचे दोन विशेष मात्र या ठिकाणीं नमूद केले पाहिजेत. ते असे—

पाहिला विशेष असा कीं, या असंतुष्ट लोकांना स्वकीयांविरुद्ध परकीयांची मदत घेणें बिलकूल पसंत नव्हतें. मराठी राजकारणांत आपणाला चंचुप्रवेश करावयास सांपडावा याविषयीं इंग्रजांची बरींच वर्षें धडपड चालू होती. या असंतुष्ट लोकांतर्फे अमृतरावानें त्यांची मदत मागितली असती तर इंग्रजांनी ती मोठ्या आनंदानें दिली असती. परंतु अमृतराव आणि त्याच्या पक्षाचे होळकर वगैरे सरदार यांना मराठी परंपरेचा मोठा अभिमान वाटत होता. गेल्या दहा वर्षांत इंग्रजी सत्तेची जी अकल्पित भरभराट होत गेली ती मराठी राज्याच्या चिरस्थायित्वास विघातक आहे ही गोष्ट त्यांस स्पष्टपणें दिसत होती. गेल्या प्रकरणाच्या शेवटीं इंग्रजांच्या हाल-

चालीसंबंधें पटवर्धनांच्या वकिलाच्या पत्रांतलि काहीं उतारे छापले आहेत त्यांतून—" इंग्रजांचा मुख्य स्थानापर्यंत ( पुण्यापर्यंत ) मजल गांठण्याचा विचार आहे " " सारांश इंग्रजांचा कलह स्वराज्यांत मोठाच उत्पन्न जाला आहे. " " चहूंकडे चहूं राज्यावर इंग्रजांचा गलफ जाला ! पुढें ईश्वर काय घडवील तें खरें. गायकवाड यांचे संस्थानीं इंग्रज यांणीं मदतीच्या निमित्तें प्रवेश केला व कुल ( सर्व ) हिंदुस्थानांतही इंग्रजच जाहले ! " " ताम्रमुख यांणीं अष्टदिशा स्वराज्याच्या दाबीत चालले ! " अशा प्रकारचे अर्थपूर्ण असे बरेच उल्लेख आहेत त्यावरून इंग्रजांचे हेतु काय आहेत याविषयीं महाराष्ट्रांतील सामान्य लोकांतही आतां फारसें अज्ञान शिल्लक राहिलें नव्हतें असें स्पष्ट दिसतें. अशा स्थितींत इंग्रजांची मदत घेण्याची गोष्ट या असंतुष्ट देशभक्तांच्या मनांत येणें शक्यच नव्हतें. उलट इंग्रजांच्या या सर्वव्यापी चढाईपासून मराठी राज्याचा बचाव व्हावा हें एक त्यांच्या चळवळीचें मुख्य उद्दिष्ट होतें. पुणें दरबारांतील शिंद्यांचें वर्चस्व कमी करून मराठी राज्यांत चोहोंकडे अव्यवस्था माजली होती ती नाहींशी करावी आणि मराठमंडळांत पुनः एकजूट उत्पन्न करावी हें त्यांच्या चळवळीचें दुसरें उद्दिष्ट होतें.

दुसरा विशेष असा कीं—या असंतुष्ट लोकांना पेशव्यांच्या व्यक्तीबद्दल प्रेम किंवा द्वेष असें कांहींच वाटत नव्हतें. बाजीराव पेशवे हें एक अजागळ, दुर्वृत्त आणि पोरबुद्धीचें माणूस आहे असाच सर्वांचा ठाम ग्रह झाला होता! श्रीमंतांना गादीवरून काढून त्याच्या जागीं नव्या पेशव्यांची स्थापना करावी ही कल्पना मात्र कोणाच्या मनाला शिवत नव्हती. कारण ही राज्यक्रांतीची मसलत तडीला नेण्याइतकें अवसान या असंतुष्टांपैकीं कोणालाच नव्हतें. त्यामुळें राज्यकारभारांत सुधारणा करण्यापलीकडे त्यांच्या कल्पनाशक्तीची धांव जात नव्हती. मराठी परंपरेच्या नाशाला पेशवे हें निमित्त कारण असून खरें प्रभावी कारण शिंद्यांचें वर्चस्व हेंच आहे आणि एकदां पुणें दरबारांतून शिंद्यांचें उच्चाटण झालें म्हणजे पेशव्यांचा आणि राज्याचा बंदोबस्त कसा तरी करतां येईल असा सर्वांचा समज होता त्यामुळें प्रत्येकाची शिंद्यांविरुद्ध धडपड चालली होती.

एकूण या असंतुष्टांपैकीं कोणाला मोठासा पराक्रम करण्याची हिंमत नव्हती आणि परक्याची मदत तर त्यांना घ्यावयाचीच नव्हती. त्यामुळें या लोकांची सर्व भिस्त यशवंतराव होळकराच्या पराक्रमावर होती. या त्यांच्या आशांकुराला मात्र कल्पनेबाहेर लवकरच पालवी फुटली आणि त्याचा हां हां म्हणतां मोठाच वृक्ष बनला! माळवा प्रांतांत होळकरानें शिंद्याविरुद्ध मोठमोठे विजय मिळविले, त्यामुळें पुणें दरबारांत एकाएकीं मोठीच गडबड उडून गेली! शिंद्याच्या जिवावर लाल असणारे श्रीमंत व त्यांचे पोरकट मुत्सद्दी यांचे पाय भीतीनें लटपटूं लागले आणि अमृतराव व त्यांचे पक्षपाती यांना नवीन अवसान चढून त्यांना शिंद्यांसारख्या अव्वल दर्जाच्या फौजबंद सरदाराचें पारिपत्य करण्याचें कामही शक्य वाटूं लागलें. अमृतराव पेशवे, मोरोबादादा फडनवीस आणि बाबा फडके यांनीं आतां पुढाकार घेऊन पुणें दरबाराच्या बंदोबस्ताकरितां होळकरास दक्षिणेंत आणण्याचा नवीन व्यूह रचला. या त्यांच्या बेतास होळकराची मान्यता मिळावी अशीच यावेळीं होळकराची स्थिति होती.

यशवंतराव होळकराच्या मनांत शिंद्यांविषयीं पराकाष्ठेचा द्वेष नांदत होता. मल्हारराव व विठोजीराव यांचे खून झाले ते शिंद्यामुळें—बेडसर काशीरावाला सरदारीचीं वस्त्रें देववून त्याच्या नांवावर होळकरांची सर्वच दौलत गिळंकृत करण्याची हांव धरली ती शिंद्यांनीं—अज्ञातवासांत यशवंतरावाला नानास्वरूपाच्या हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या त्याला कारणही सर्वस्वीं शिंदेच होते. अजूनही होळकराचा समूळ उच्छेद करण्याचें धोरणच शिंद्यांनीं जाहीरपणें स्वीकारलेलें स्पष्टपणें दिसत होतें. शिंदे—होळकरांत भयंकर तेढ माजली होती, तिची कारणपरंपरा अशा भयंकर स्वरूपाची होती. होळकरानें स्वपराक्रमानें फौज उभी करून माळवाप्रांतांत शिंद्यांचा काय सूड घ्यावयाचा होता तो घेतलाच. परंतु एवढ्यानेंच या तंट्याचा कायमचा निकाल लागण्यासारखा नव्हता.

होळकरानें कितीही पराक्रम केले तरी पुणें दरबार त्याला सामान्य बंडखोरच समजत होतें आणि पुणें दरबाराची ही दृष्टि कायम असेपर्यंत शिंद्यांची होळकराविरुद्ध चढाई कधींच थांबली नसती आणि शिंदे होळ-

करामध्यें जयापजयाचें हें पारडें असेंच हेलकावे खात झुकत राहिलें असतें! पेशव्यांनीं मनांत आणिलें असतें तर मात्र त्यांना शिंद्यांची चढाई थांबवितां आली असती आणि होळकराच्या मर्जीप्रमाणें त्याच्या सरदारीची उभारणी करतां आली असती. श्रीमंतांनीं ही गोष्ट केली असती तर शिंदे—होळकरांमधील तंट्याचें बीज नष्ट होऊन मराठी राज्याचें कायमचें कल्याण झालें असतें. परंतु शिंद्याच्या तर्फेचा सर्व गोतावळा श्रीमंतांभोंवतीं जमला होता त्यामुळें पुणें दरबारांत होळकराला अनुकूल असा शब्द बोलण्याची कोणाला छातीच होत नव्हती! अशा स्थितींत पुणें दरबाराच्या बंदोबस्ताकरितां दक्षिणेंत येण्याविषयीं अमृतरावाचें होळकराकडे सूत्र लागलें आणि आपल्या तंट्याचा कांहीं तरी बरा वाईट सोक्षमोक्ष लावून घ्यावा या उद्देशानें होळकरानें या गोष्टीस मान्यता दिली. अमृतराव, दादा फडनवीस आणि बाबा फडके यांमध्यें आणि होळकरांमध्यें बरीच वाटाघाट होऊन एक करार ठरला त्याचें स्वरूप अशा प्रकारचें होतें.—

१ पुणें दरबारांत बाळोजी कुंजर, निंबाजी भास्कर, दाजी देशमुख अशासारख्या पोरकट लोकांचें प्रस्थ माजलें होतें तें होळकरानें दक्षिणेंत येऊन मोडून टाकावें. शिवाय होळकरानें पेशव्यास दपटशा दाखवून त्यांचे वेडगळ चाळे बंद पाडावेत आणि पेशव्यांचा राज्यकारभार यापुढें अमृतराव आणि नानांच्या वेळचे जुने मुत्सद्दी यांच्या सल्ल्याप्रमाणेंच चालेल—विशेषतः राज्यकारभारांत अमृतरावाचें प्राबल्य राहील अशी व्यवस्था करावी.

२ शिंदे पुणें दरबारांतील आपलें वर्चस्व खुशामुखीं सोडणार नाहींत आणि त्यांच्याशीं लढण्याचा प्रसंग येईल. शिंद्याशीं लढून त्यांचा बंदोबस्त करण्याचें जोखीम होळकरानें आपल्या शिरावर घ्यावें.

३ होळकराच्या हातून इतक्या गोष्टी पार पडल्यावर पुणें दरबारानें होळकरांच्या सरदारीचीं वस्त्रें मल्हाररावाचा अल्पवयी मुलगा खंडेराव याला द्यावींत आणि त्याच्या मुतालिकीचीं वस्त्रें यशवंतरावाला द्यावींत.

४ पुणें दरबारानें होळकराला फौजेच्या खर्चाबद्दल एक कोट रुपये द्यावेत.

याप्रमाणें कराराची रूपरेषा निश्चित ठरल्यावर होळकरानें दक्षिणेंत जाण्याचा बेत कायम ठरविला. आपल्या या बेताची प्रास्ताविक सूचना

म्हणून त्यानें सन १८०२च्या जानेवारींत आपला दिवाण पाराशरपंत दादाजी याबरोबर आपल्या मागण्यांची लांबच लांब याद देऊन त्याला पेशव्यांकडे पुण्यास शिष्टाईसाठीं पाठविलें. पाराजीपंतामार्फत होळकरानें श्रीमंतांस आपल्या मागण्या व तक्रारी कळविल्या त्या अशा—

१* दौलतराव शिंद्याच्या चिथावणीवरून पेशवे सरकारची होळकर घराण्यावर विनाकारण वक्रदृष्टी झाली आहे. सरकारच्या या वक्रदृष्टीमुळेंच मल्हारराव व विठोजीराव यांचे खून करण्यांत आले आहेत आणि वेडसर काशीरावाला सरदारीचीं वस्त्रें मिळून त्याच्या नांवावर होळकरांची सर्व दौलत शिंद्यांनीं गिळंकृत केली आहे. याप्रमाणें शिंद्यांकडून होळकर घराण्यावर जो गहजब चालू आहे त्याचें परिमार्जन सरकारांतून व्हावें. शिंद्यांच्या घराण्याप्रमाणेंच होळकरांच्या घराण्यानेंही आज तीन पिढ्या पेशवे सरकारची एकनिष्ठेनें सेवा केली आहे. दुसऱ्याच्या चिथावणीवरून सरकारच्या हातून होळकर घराण्याचें नुकसान झालें तें होऊन गेलें. यापुढें तरी श्रीमंतांनीं होळकर घराण्यावर कृपादृष्टि ठेवावी. माझ्या घराण्याच्या उज्वल परंपरेस साजेल अशा रीतीनें आपली सेवा करावी अशी माझी इच्छा आहे. श्रीमंतानीं माझी ही विनंती मान्य करून मजकडून सेवा घ्यावी.

२ शिंद्यांच्या जुलमाचा प्रतिकार मी आतांपर्यंत शक्त्यनुसार केला आहे आणि यापुढेंही करीन. परंतु शिंदे होळकरांच्या या भांडणामुळें बिचारी रयत नाडली जात आहे—प्रांतचे प्रांत उध्वस्त होत आहेत आणि राज्याचें वाटोळें होत आहे! ही स्थिति अशीच कांहीं काळ चालू राहिली तर सर्व मराठी दौलत इंग्रजांच्या घरांत जाण्याचा संभव दिसत आहे. श्रीमंतांनीं दूरवर विचार करून माझा व शिंद्यांचा समेट करून द्यावा. शिंद्यांच्या वर्च-

* होळकर दक्षिणेंत आल्यावर त्यानें लढविलेले डावपेंच, त्याच्या हालचाली, त्याचे उद्गार यांवरून त्यानें पेशव्यांपाशीं कोणत्या मागण्या मागितल्या असाव्या याचें नक्की अनुमान बांधतां येण्यासारखें आहे. वाचकांनीं या बाबतींत Selections from Bombay State Papers p.p. 591-92 हीं पृष्ठें जरूर पहावींत.

त्याची झांपड श्रीमंतांच्या डोळ्यावर आली आहे ती क्षणभर दूर सारून श्रीमंत मला जो न्याय देतील तो मला कबूल आहे.

३ शिंद्यानें मल्हाररावाचा खून केल्यावर त्याचा अल्पवयी मुलगा खंडेराव आणि बायको जईबाई यांना श्रीमंतांनीं संरक्षण करण्याचें आश्वासन देऊन आपल्याजवळ सरकारवाड्यांत ठेवून घेतलें. आणि नंतर बेइमानी करून त्या दोघांना शिंद्यांच्या हवालीं केलें; हल्लीं तीं दोघें असीरगडावर कैदेंत कुजत पडलीं आहेत. त्या दोघांना तावडतोब मुक्त करण्यांत यावें.

४ होळकर घराण्यांत आतां मल्हाररावाचा अल्पवयी मुलगा खंडेराव हा एकच कायदेशीर वारस शिल्लक राहिला आहे. सबब त्याच्या नांवानें सरकारांतून सरदारीचीं वस्त्रें मिळावींत आणि मला त्याच्या मुतालिकीचीं वस्त्रें मिळावींत. काशीरावाला पूर्वी वस्त्रें मिळालीं आहेत तीं रद्द करण्यांत यावींत.

५ शिंद्यानें व इतरांनीं काशीरावापासून वाटेल तशीं करारपत्रें व कर्जखतें लिहून घेतलीं आहेत तीं होळकरांच्या दौलतीला बंधनकारक असूं नयेत.

६ शिंद्यांच्या ताब्यांत आमचा मुलूख आहे तो आमचा आम्हांला परत मिळावा. शिंद्याचा मुलूख माझ्या ताब्यांत आहे तो मी त्याला परत देईन.

७ नर्मदेपलीकडील मराठी राज्याच्या पेशवे, शिंदे आणि होळकर अशा तीन वांटण्या मराठी राज्यांत पूर्वापार चालत होत्या. परंतु अलीकडे आपली खुशामत करून शिंद्यानें सर्वच मुलूख आपल्या हाताखालीं दडपला आहे. आतां पूर्वीप्रमाणें मुलखाच्या तीन वाटण्या पुन: कराव्या आणि प्रत्येक वाटणीचा उपभोग ज्याचा त्यानें स्वतंत्रपणानें घ्यावा. निदान होळकरांची वाटणी तरी मला शिंद्यांकडून मिळावी.

८ गेल्या सहा वर्षांत शिंद्यांच्या हातून राज्याची सेवा कोणतीच झाली नाहीं. उलट या मुदतींत त्याच्या हातून जे स्वेच्छाचार घडले आहेत त्यामुळें राज्याचें कायमचें नुकसान झालें आहे. असें असतांही त्याला अलीकडे अहंमदनगरचा किल्ला आणि नवीन दहा लक्षांची जहागीर सरकारांतून देण्यांत आली आहे! आतांपर्यंत सरकारची इमानानें सेवा करणाऱ्या होळकर घराण्याच्या नशीबीं मात्र खून, जाळपोळ आणि सरकारची जप्ती आणि

राज्यनाशास प्रवृत्त होणाऱ्या शिंद्याच्या बांटणीला मात्र बहुमान आणि नवीन जहागीर असा सरकारांतून उलटा न्याय झाला आहे! वस्तुतः शिंदे व होळकर दोघेही सरकारचे नोकर आणि बरोबरीचे सरदार असें असतां एकाला विनाकारण वाढवून दुसऱ्याला विनाकारण बुडविण्यांत परिणामीं सरकारचेंच नुकसान आहे. असो. आतांपर्यंत झालें तें झालें. शिंद्यांप्रमाणें होळकरांनाही नवीन दहा लक्षांची जहागीर व एक किल्ला सरकारांतून मिळावा कारण शिंदे व होळकर हे बरोबरीचे सरदार आहेत. तसें करणें श्रीमंतांना शक्य वाटत नसेल तर शिंद्याला किल्ला व जहागीर देण्यांत आली आहे ती पुनः सरकारांत घेण्यांत यावी.

९ उत्तर हिंदुस्थानांतील राजेरजवाडे यांपासून खंडणी वसूल करण्याचा हक्क शिंदे व होळकर या दोघांनाही पूर्वापार चालत आहे. अलीकडे शिंदे हे एकटेच सर्व खंडण्या वसूल करतात आणि पेशवे व होळकर यांच्या बांटण्या बुडवून सर्व पैसा एकटेच गिळंकृत करतात. शिवाय शिंदे राजेरजवाड्यांना चिथावणी देऊन त्यांची आम्हांविरुद्ध उठावणी करतात. या दोन्ही गोष्टी न करण्याबद्दल सरकारांतून शिंद्यांना ताकीद मिळावी.

१० श्रीमंतांनीं दूरंदेशी विचार करून माझा व शिंद्यांचा समेट करून द्यावा. श्रीमंतांचे या बाबतींत सर्व प्रयत्न फोल ठरले आणि आमचा तंटा असाच चालू राहिला तर श्रीमंतानीं शिंद्याला कोणतीही मदत करूं नये. सरकारच्या पाठिंब्यामुळेंच शिंदा इतका शेफारून गेला आहे! त्याला वठणीवर आणण्याचें काम माझें मी पाहून घेतों! आमच्या तंट्यांत श्रीमंतानीं मात्र अगदीं तटस्थ रहावें.

११ मुख्य गोष्ट—श्रीमंतांनीं आतांपर्यंत शिंद्याच्या नादीं लागून राज्यांतील जुने सरदार व मुत्सद्दी यांचा नाश करण्याचें धोरण चालू ठेविलें आहे. त्यामुळें जुन्या सरदाऱ्यांचीं दिवाळीं वाजलीं—शिलेदार बेकार होऊन भीक मागूं लागले—जुने मुत्सद्दी व सावकार कैदेंत पडले, मेले किंवा नापत्ता झाले—बंडखोर माजले आणि शत्रु बळावले! पेशवे हे राज्याचे सर्वसत्ताधीश खावंद, त्यांनीं जर या गोष्टीचा विचार करावयाचा नाहीं तर कोणी करावयाचा! नाना फडनवीसांच्या वेळेला मराठी राज्याचें सामर्थ्य व दरारा

कसा होता व हल्लीं कसा आहे ? आपण काय करतों आणि त्याचे परिणाम काय होतील हें श्रीमंतांनीं जाणलें पाहिजे. याउप्पर तरी श्रीमंतांनीं शिंद्यांचें ऐकूं नये आणि राज्यांत जुने मुत्सद्दी व सरदार आहेत त्यांच्या सल्लयानेंच राज्यकारभार चालवावा. मराठी राज्याचें भव्य साम्राज्यमंदिर उभारलें गेलें आहे तें केवळ या जुन्या घराणदार लोकांच्या रक्तानें आणि स्वार्थत्यागानेंच उभारलें गेलें आहे. चढती कमान आणि वाढती दौलत आहे तोंपर्यंत खावयास आणि लब्धप्रतिष्ठितपणानें सल्ला द्यावयास पुष्कळ मिळतील. परंतु परिणामीं मात्र यांपैकीं कोणीही श्रीमंतांच्या उपयोगी पड-णार नाहीं. श्रीमंतांनीं यापुढें या उपटसुंभांचें ऐकूं नये.

१२ शेवटची गोष्ट हीच कीं— मी दक्षिणेंत येत आहें तो केवळ आपणाकडे दाद मागावी याच हेतूनें येत आहें. आपल्या भोंवतालचा सर्व परिवार शिंद्यांचा पक्षपाती आहे. माझी खरी बाजू आपणापुढें मांडण्यास तेथें आपणाजवळ कोणीच नाहीं. त्यामुळें लोकांच्या चिथावणीवरून आपली होळकर घराण्यावर मर्जी खप्पा झाली आहे. आपला गैरसमज दूर करावा याच हेतूनें मी आपल्या पायांशीं येत आहें. मराठी राज्याबद्दल उत्कट अभिमान आणि पेशव्यांच्या घराण्याबद्दल राजनिष्ठा हें माझ्या घराण्याचें ब्रीदच आहे. माझा तंटा आहे फक्त शिंद्यांशीं. आपल्याला उपमर्दकारक वाटणारें कोणतेंही कृत्य मजकडून होणार नाहीं ही खात्री बाळगावी. आपण खुशाल पुण्यास स्वस्थ असावें. माझ्या येण्याचा भलताच अर्थ करूं नये आणि पोरकट लोकांच्या नादीं लागून भलतेंच करूं नये!

बाजीराव पेशवे आणि पेशवाईचा राज्यकारभार याविषयीं होळकरानें कोणतें धोरण ठरविलें होतें आणि शिंदे होळकरांच्या तंट्याचें वास्तविक स्वरूप काय होतें या दोन गोष्टींचा जास्त स्पष्ट खुलासा व्हावा यासाठीं होळकराच्या मागण्या व तक्रारी यांचा थोडासा पूर्वापर संबंध दाखवून आम्ही जास्त तपशील मुद्दामच दिलेला आहे. होळकराच्या या मागण्यांत गैर असें कांहींच नव्हतें. परंतु श्रीमंतांना मात्र तो उपदेश विषासारखा कडू वाटत होता! राज्यांतील जुने मुत्सद्दी व सरदार यांविषयीं त्यांना अत्यंत द्वेष वाटत होता आणि होळकराला तर ते उघड उघड बंडखोरच

समजत असत. पुणें दरबाराची सर्वाध्यक्षता तूर्त बाळोजी कुंजराकडे होती. तो आणि त्याच्या बगलेंतील इतर मुत्सद्दी हे सर्व शिंद्याचे पक्षपाती असून होळकराचे पक्के द्वेष्टे होते. शिवाय पेशवे व कुंजर यांना 'कसचा होळकर, कसच्या त्याच्या मागण्या आणि कसचा त्याचा वकील पाराशरपंत' अशी अजून घमेंड वाटत होती. या घमेंडीमुळेच पेशवे व कुंजर यांनीं पाराजीपंत पुण्यास आल्यावर त्याशीं सभ्यपणानें वागण्याचा सामान्य शिष्टाचारसुद्धां धडपणें पाळला नाहीं. असो. होळकराच्या स्वारीचीं कारणें आणि होळकर व त्याचे प्रतिस्पर्धी यांच्या रागलोभाचे धागेदोरे आतां नीट उलगडून सांगितल्यामुळें त्याच्या दक्षिणेवरील मोहिमेच्या पुढील वृत्तान्ताकडे लक्ष देणें जास्त सोईचें झालें आहे.

स. १८०२ च्या मे महिन्यांत होळकरानें आपल्या दक्षिणेवरील मोहिमेची खरीखुरी सुरवात केली हें पूर्वी सांगितलेंच आहे. होळकर उज्जनी प्रांतांतून निघाला तो भिकनगांवावरून थाल्नेरास आला. तेथें त्यानें अचीबीसिंग नांवाच्या बंडखोराला वठणीवर आणून त्याला आपल्या फौजेंत सामील करून घेतलें आणि नंतर त्यानें आपल्या सर्व फौजेचा मुक्काम तापी दक्षिणतीरास खानदेशांत बेटावर येथें आणला. या ठिकाणीं थोडासा मुक्काम करून त्याची स्वारी कासारबारीखालीं चाळीसगांव येथें आली. जून, जुलै आगस्ट हे तीन महिने होळकराचा मुक्काम खानदेशप्रांतींच होता आणि त्याच्या या स्वारीमुळें त्या प्रांताचें मात्र मोठेंच दुर्दैव ओढवलें ! नागो जिवाजी, गणपतराव नारायण, जिवाजी यशवंत, लखबादादांचे चिरंजीव आबाजी लक्ष्मण लाड, फत्तेसिंग माने, शामतखान पठाण, मीरखान पठाण वगैरे त्याचे अनेक सरदार सर्व प्रांतभर पसरले आणि त्यांनीं लूटमार करून अगदी कहर उडवून दिला! एकट्या पारोळ्यापासून होळकरानें दोन लक्ष रु. खंडणी उकळली! एरंडोल गांव तर जाळून लुटून फस्त करण्यांत आलें! होळकराच्या सर्व सरदारांत शामतखान पठाण आणि फत्तेसिंग माने यांचीच चळवळ विशेष दिसत होती. अघाडीचा मान तर नेहमीं मान्याकडे असे. असो. खानदेश प्रांताचा विध्वंस केल्यावर शामतखान पठाण आणि गणपतराव नारायण हे कासारबारी चढून नाशिकप्रांतीं आले

आणि त्यांनीं गांडापूर बैजापूर प्रांतास शिलशिला लाविला. नाशिक प्रांतीं विंचूरकर, राजेबहादर, बोढेकर वगैरे फौजबंद सरदार होते त्यांनीं घरादारांची आशा सोडून त्रिंबकच्या किल्ल्याबर पलायन केलें, त्यामुळें होळकराच्या फौजेनें तो प्रांत बिनहरकत लुटून फस्त केला. पठाणानें खुद्द नाशिकास तळ दिला आणि क्षेत्रस्थ ब्राह्मणांस मारझोड करून त्यानें त्यांजपासून हजारों रुपये उकळले. गणपतराव नारायण यानें धोडप किल्ल्याखालचीं पांच सात ठाणीं घेतलीं आणि त्या किल्ल्यास वेढा घातला. याप्रमाणें नाशीक प्रांतीं धामधूम चालू असतां फत्तेसिंग माने आणि आबाजी लक्ष्मण यांनीं अहंमदनगर प्रांतावर स्वारी केली. त्या प्रांतीं नगरचा किल्ला आणि नवीन दहा लक्षांचा मुलख श्रीमंतांकडून शिंद्यांना नुकताच मिळाला होता. त्या मुलखावर होळकराचा विशेष दांत होता. त्यामुळें त्याची नासाडी करण्यांत होळकराच्या फौजेनें बिलकूल दया माया दाखविली नाहीं. महिना पंधरा दिवसांतच आमदाबाज, शिकरापूर, जांबगांव, पेडगांव, चांभारगोंदे, सिद्धटेकपर्यंत शिंद्यांचा सर्व मुलूख मान्यांनीं लुटून जाळून बेचिराख केला. बळवंतराव नागनाथ, रायाजी पाटील, निंबाजी भास्कर या शिंदेपक्षीय मुत्सद्यांचे वाडे अनुक्रमें बामोरी, बारिशिंगवें, राजोरी येथें होते ते सर्व अग्नीच्या भक्ष्यस्थानीं पडले! शिंद्याच्या पदरचे दुसरे एक मुत्सद्दी रामजी पाटील आणि त्यांचा आवडता हुजऱ्या बाणाजी शेव्या यांच्या वाड्यांचीही तीच दुर्दशा करण्यांत आली. याशिवाय कुंजर व शिंदे यांच्या पक्षीयांचीं घरेंदारें नाशीक नगर प्रांतीं होतीं त्यांचाही माग लावलावून असाच नाश करण्यांत आला. जांबगांव हें शिंद्यांचें आवडतें मुक्काम करण्याचें ठिकाण होतें. आबाजी लक्ष्मण यानें तो गांव जाळून

जून–आगष्ट १८०२

बेचिराख केलाच, शिवाय त्या गांवास खणत्या लावून त्यानें त्या गांवाच्या गांवठाणांचा मागमूसमुद्धां शिल्लक ठेविला नाहीं! फत्तेसिंग मान्यांनीं आपल्या फौजेचा मुख्य तळ नगरजवळ फुऱ्याबागेवर ठेविला होता. नगरच्या किल्ल्यांत शिंद्यांचा फौज, पायदळ, तोफा वगैरे जय्यत लढाऊ सरंजाम होता. शिवाय शिंद्यांनीं किल्ल्याच्या पायथ्याशीं कवाइती पलटणेंही

संरक्षणार्थ ठेविलीं होतीं. अशा या बळकट स्थळास वेढा घालण्याच्या भानगडींत माने पडले नाहींत. त्यांनीं भोवतीं घिरट्या घालून नगरची पेठ झोडपली आणि किल्ल्याबाहेर पलटणें होतीं यांवर हल्ला करून त्यांची अगदीं दाणादाण उडवून दिली. होळकरी फौजेच्या अघाडीच्या टोळ्यांनीं आणि पेंढाऱ्यांनीं तर पुण्यानजीक वाफगांव जुन्नरपर्यंत प्रवेश केला आणि दिवसाढवळ्या रस्तेलूट सुरू केली! याप्रमाणें होळकराच्या फौजेचा धिंगाणा स्वराज्यांत तीन महिनेपर्यंत चालू होता. परंतु त्याचा प्रतिकार श्रीमंतांच्या हातून कांहींच होऊं शकला नाहीं. होळकराच्या या स्वारीमुळें खानदेश, नाशीक, नगर या प्रांतांचें विशेषतः खानदेश प्रांताचें जें नुकसान झालें तें पुढें पन्नास वर्षेपर्यंत भरून निघालें नाहीं. असो. आगष्ट अखेरीस होळकराचा मुक्काम नामपुरास आणि पठाणाचा मुक्काम बाळापुरावर पडला. फत्तेसिंग माने मात्र अघाडी मारून नगर प्रांतांतून पुढें सरकले आणि त्यांनीं भीमातीरीं गारदोंडेवर तळ दिला.

असो. यावेळीं होळकराच्या पारिपत्याची पेशवे सरकारांतून काय तजवीज चालली होती इकडे आतां लक्ष दिलें पाहिजे. त्यापूर्वीं या प्रकरणाच्या शेवटीं पत्रव्यवहार छापला आहे त्यांत कांहीं किरकोळ राजकीय उल्लेख आले आहेत त्यांचा परामर्श आम्हीं येथें एकत्रच घेतों.

श्रीमंतांनीं पुणें शहरचा कारभार व कोतवालीचीं वस्त्रें आपले माऊसभाऊ गोविंदराव परांजपे यांस दिलीं. बाळोजी कुंजराकडे हुजरातीचा कारभार होता, तो त्यास झेपेना सबब श्रीमंतांनीं तें काम नाना पुरंदऱ्याच्या गळ्यांत बांधिलें. रायगड, महाड व पुरंदर या तीन मामलतीही याच वेळीं कुंजराकडून काढून घेण्यांत आल्या. सातारा संस्थानचे वहिवाटदार बाळाजी माणकेश्वर यांना रायगड व महाड या दोन मामलती मिळाल्या आणि पुरंदरची वहिवाट गोविंदपंत नाना जोशी नि. हुजूरपागा याजकडे देण्यांत आली. कृष्णराव मुनशीकडे इंग्रजांच्या वकिलीचें काम होतें परंतु त्यावर श्रीमंतांची एकाएकी गैरमर्जी झाली आणि त्यांनीं तें काम माधवराव जाधवराव यांच्या नातवास सांगितलें. बाजीराव दव्यांकडे कर्नाटकच्या सुभेदारीचें काम दुरुस्ती सांगण्यांत आलें होतें. परंतु त्याच्या हातून त्या प्रांताचा कांहींच

बंदोबस्त झाला नाहीं सबब श्रीमंतांनीं या वर्षी त्या प्रांताच्या सुभेदारीचीं वस्त्रें धोंडोपंत बाबा गोडबोले यास दिलीं. अलीबहादर आणि गोविंद बाळाजी बुंदेले हे अनुक्रमें ता. २३ आगष्ट व ता. २९ आगष्ट रोजीं बुंदेलखंडांत मृत्यु पावले. त्यांच्या मृत्यूनंतर पेशव्यांनीं नीळकंठराव रामचंद्र परभू पागे यांना बुंदेलखंडाच्या बंदोबस्ताचें काम सांगितलें. बळवंतराव रास्ते यांस पेशव्यांनीं शनवारवाड्यांत आपल्याजवळ सक्त नजरकैदेंत बाळगिलें होतें. परंतु रास्ते ता. १८ आगष्ट रोजीं एकाएकीं कैदेंतून निसटले आणि पटवर्धनांच्या सहाय्यानें कर्नाटकांतील आपल्या जहागिरींत जाऊन पोचले.

कित्तूरकर देसाई आणि करवीरकर छत्रपति यांचे कर्नाटकांत आणि जंजिरेकर हबशाचे कोंकणांत दंगे चालू होते, तिकडे लक्ष देण्यास पेशव्यांस फुरसतच सांपडली नाहीं. रास्त्यांच्या सरंजामापैकीं वांई व पांडवगड यांच्या बंदोबस्ताकरितां श्रमिंतांनीं आपला विश्वासू कारकून केसोपंत साठे यास पांचशे आरब बरोबर देऊन पाठविले होतें. या केसोपंताची पुढील माहिती येथें नमूद करण्यासारखी आहे. ती अशी—

( १७ सप्टेंबर )– " पांडवगडास सरकारांतून आरब व केसोपंत पाठविला होता त्यांणीं वांई क्षेत्रांत उपद्रव केला तो अमर्याद ! ब्राह्मण्याचा विषय ठेविला नाहीं. त्यावरून आरबांस बोलावून घेतलें. ते जेजुरी व सासवड येथें कारकून व आरब येऊन दोही ठिकाणीं अमर्याद वर्तणूक करून जेजुरीमध्यें वीस हजार रुपये आरबांनीं घेतले. त्यावरून केसोपंत कारकून व आरब यांस श्रीमंतांनीं जलद बोलावून आणलें सरकारांतून ताकीद शहरापासून लांब तफावतीनें राहणेविशीं जाली असतां रा. मालोजी राजे घोरपडे यांचे वाड्यालगत पूर्वेस राहिले. ताकिदीस आले त्याशी खटला करून मारामार केली. तेव्हां सरकारांतून कांहीं पायदळ शहरचे चौकीस आलें त्यांजवर आरबांनीं गोळ्या मारल्या ! पायदळांस रेटून आरब शमीरखान पठाण याचे वाड्यांत वेताळपेठेंत शिरले. सरकारांतून वाड्यावर तोफा लाविल्या. फौज व फलटणें तयार होऊन चहूंकडून घेरलें. गोळागोळी जाहली. गुरुवारीं प्रातःकाळीं पलटणच्या लोकांनीं हल्ला

करून आरब मारून काढिले. कांहीं थापले आपलेंत तोडून मेले. दोन तीन जमातदार ब पांच चार आरब जिवंत सांपडले ते धरून डोचकीं मारविली. केसोपंतास कैदेंत ठेविलें आहे."

असो. श्रीमंतांच्या या किरकोळ घालमेलींकडे आतां दुर्लक्ष करून त्यांनीं होळकराच्या पारिपत्याविषयीं काय तजविजी चालविल्या होत्या त्या आतां सांगितल्या पाहिजेत. होळकराची स्वारी खरोखरीच दक्षिणेंत येईल अशी त्यांची अपेक्षा नव्हती आणि यदाकदाचित् तो आलाच तर कांहीं तरी एखादी युक्ति निघून त्याचा फडशा सहज परभारें पाडतां येईल असा त्यांचा अजमास होता. असले हे, कांहीं तरी होईल कसें तरी होईल या आधारावर बांधलेले अजमास नेहमीं व्यवहारांत चुकीचे ठरत असतात आणि तोच अनुभव श्रीमंतांस आला. होळकर खरोखरीच दक्षिणेंत आला आणि त्यानें हां हां म्हणतां जवळ जवळ पुण्यापर्यंत पल्ला गांठला तेव्हां मात्र त्यांचें धाबें दणाणलें आणि ते घाईघाईनें उद्योगास लागले. पहिली गोष्ट त्यांच्या हातून घडली ती अशी कीं, त्यांना पाराजीपंताबद्दल एकाएकीं प्रेमाचा पान्हा फुटलेला दिसूं लागला! आतांपर्यंत होळकराच्या घरचें कुत्रें आढळलें तरीसुद्धां त्याला ठार मारावें असा श्रीमंतांचा कटाक्ष होता. परंतु आतां मात्र श्रीमंत. कुंजर व पाराजीपंत यांची दररोज प्रेमाचीं खलबतें होऊं लागलीं. या पाराजीपंतामार्फत श्रीमंतांनीं होळकरास पुष्कळ पत्रें पाठविलीं कीं, 'तुम्ही पुढें न येतां परत जावें आणि तापी उतरून नंदुरबारास मुक्काम करून रहावें. तुम्ही आपल्या सरदारीसंबंधें ज्या मागण्या मागितल्या आहेत त्या सर्व आम्ही मंजूर करणार आहों आणि तुमच्या सरंजामावरील जप्तीही उठविणार आहों. शिवाय तुमच्या म्हणण्याप्रमाणें खंडेराव होळकरालाच सरदारीचीं वस्त्रें देण्यांत येतील. यासंबंधीं जरूर तीं सर्व सनदापत्रें तयार करून येथें पाराजीपंतांच्या हवालीं करण्यांत येतील. शिवाय तुमचा व शिंद्यांचा समेट करून देण्यासाठीं आम्ही बाळोजी कुंजराची रवानगी करून देत आहों. तो माळव्यांत येईल आणि तुम्हा उभयतांचा समेट करून देईल. तुम्ही अतिप्रसंग करून पुढें याल तर मात्र काम नासेल. सबब परत जावें.' अशीं पत्रें पाठविण्यांत श्रीमंतांचे

दोन हेतु होते. एक हेतु असा, कीं, होळकर या पत्रांवरून हुरळून माळ-व्यांत परत गेला तर बरेंच झालें. त्या प्रांतीं शिंद्यांकडून त्याचें पारिपत्य केव्हां तरी होईलच. होळकराबद्दल त्याच्या मनांत अढी बसली होती, ती कायमच होती आणि त्याचा नाश व्हावा अशीच त्यांची इच्छा होती. मात्र तो नाश स्वतःस कोणतीही तोशीस न लागतां परभारें केला जावा एवढ्या-बद्दल काय ती खबरदारी त्यांना घ्यावयाची होती. श्रीमंतांचा दुसरा हेतु कालहरणाचा होता. शिंद्यांची फौज त्यांनीं दक्षिणेंत बोलाविली होती ती पुण्यास येईपर्यंत तरी होळकराला आशेस गुंतवून खानदेशांतच अडक-वून पाडावें असा त्यांचा डाव होता. प्रसंग कसाही बिकट असो, श्रीमं-तांचें धोरण नेहमीं डळमळीत आणि दुटप्पी असे. प्रत्येक प्रसंगीं ते दुस-ऱ्यास फसविण्याचा यत्न करीत आणि त्या प्रयत्नांत त्यांची स्वतःचीच नेहमीं फसवणूक होत असे! होळकर हा काय दर्जाचा मनुष्य आहे आणि त्याच्या मोहिमेचें वास्तविक स्वरूप काय आहे हें श्रीमंतांस शेवटपर्यंत कळ-लेंच नाहीं! त्यांच्या असल्या लटपटी सामान्य माणसांना भुरळ पाडण्याला समर्थ होत्या परंतु त्यांची मात्रा होळकराबर कसची चालते? श्रीमंतांच्या स्वभावाचीं सर्व मर्मस्थानें होळकर जाणून होता आणि थोडासा चवदाव्या रत्नाचा प्रयोग करण्याकरितांच तो दक्षिणेंत आला होता आणि त्याच अनुरोधानें त्याच्या सर्व हालचाली चालल्या होत्या. असो. आपल्या तक्रारींची पुणें दरबारांत कांहींच दाद लागत नाहीं असें पाहून पाराजी-पंतानें ता० २ जुलै रोजीं श्रीमंतास खडसून अर्ज केला कीं, 'मी येथें येऊन पांच महिने झाले. अजून आमचा एकही जाबसाल उलगडण्यांत येत नाहीं. अजूनही पुणें दरबारांत लुंग्यासुंग्याचेंच प्राबल्य आहे. एकी-कडे आमच्याशीं सख्य जोडण्याचा प्रयत्न चालू आहे आणि त्याचवेळीं आमचा नाश करण्याकरितां शिंद्याची फौजही दक्षिणेंत आणण्यांत येत आहे! अशा स्थितींत आम्हांविषयीं सरकारचें काय धोरण आहे हें स्पष्ट दिसतेंच आहे. आम्हाकडे सरकारचा कोणताही गुन्हा नाहीं. आमच्या जाबसालांचें काय तें उत्तर मला स्पष्ट सांगावें आणि मला निरोप द्यावा. मी माझ्या मालकाकडे परत जातों.' भोसल्याचे कारभारी यावेळीं पुण्यास

आले होते त्यांनींही पाराशरपंताच्या म्हणण्याला दुजोरा दिला आणि होळकराशीं सख्य जोडण्याविषयीं श्रीमंतापाशीं सख्य रदबदल चालविली. परंतु बाळोजी कुंजराशिवाय श्रीमंतांना कोणाचेंच ऐकावयाचें नव्हतें.

ता. ३० जून रोजीं सायंकाळच्या प्रहर दिवसापासून मध्यरात्रपर्यंत श्रीमंताच्या हुकमावरून पुण्यांत एकाएकीं धरपकड सुरू झाली. त्यामुळें सर्व शहर आश्चर्यानें आणि भीतीनें गडबडून गेलें! या धरपकडींत खालील गृहस्थ गिरफदार करण्यांत आले.

२ मोरोबादादा फडनवीस व चिरंजीव धाकटे नाना.
१० बाबा, अन्या, आत्या, पांडोबा वगैरे फडके बंधु ५ व चिरंजीव ५
२ यशवंतराव नगरकर. राघोपंत फरासखाने.
४ गोपाळराव व कृष्णराव मुनशी व चिरंजीव २.
२ रंगोपंत नि. राघोपंत गोडबोले. नीळकंठ गोविंदराव खासगीवाले.
२ कुंजर असामी १. नारायणराव वैद्य वकील नि. भोसले.
२ निंबाजी भास्कराचा चिरंजीव नि० शिंदे. बिनीवाले असामी १.
३ नाना व बाबा पुरंदरे. खंडेराव रास्ते.
२ अंतोबा शेट्ये. रघुनाथ चिंतामण नि० मुनशी.
१ बापू चिंतामण फडके.

---

३०

या मंडळीपैकीं निंबाजी भास्कराचा चिरंजीव, खंडेराव रास्ते, नाना व बाबा पुरंदरे आणि नारायणराव वैद्य या पांच असामींची दुसरे दिवशीं सुटका करण्यांत आली. बाकी सर्वांच्या पायांत बेड्या पडून त्यांची निरनिराळ्या किल्ल्यावर रवानगी करण्यांत आली. अशी ही धरपकड करविण्यांत बाळोजी कुंजरानेंच विशेष पुढाकार घेतला होता. या सर्व गृहस्थांनीं होळकराशीं कांहीं तरी गुप्त कारस्थान केलें आहे असा श्रीमंतास पक्का संशय आला होता. आणि होळकराच्या स्वारीचें निवारण झाल्यावर स्वस्थपणानें या मंडळीचीं पुरतीं पारिपत्यें करावीं असा त्यांचा विचार होता.

स. १८०२ च्या मे महिन्यांत महाराष्ट्रांतील सर्व सरदारांस तांतडीनें पुण्यास येण्याविषयीं श्रीमंतांचीं आज्ञापत्रें गेलीं होतीं. जून–जुलै या महिन्यांत यशवंतराव पाटणकर, पांडोजी कुंजर, पंतप्रतिनिधींचे कारभारी बळवंतराव फडणीस हे कर्नाटकांतून, बाबूराव आंगरे कुलाब्याहून, विंचूरकर, राजेबहाद्दर, घोंडोपंत बाबा गोडबोले हे नाशिक प्रांतांतून पुण्यास दाखल झाले. पुरंदरे, पानसे, आबा काळे, रूपराम चौधरी, मनोहरगीर गोसावी वगैरे सरदार पुण्याच्या आसपासच होते. या सर्व सरदारांच्या फौजेची संख्या सात आठ हजारापेक्षां जास्त नव्हती. महाराष्ट्रांत पटवर्धन, रास्ते, आपा देसाई निपाणकर आणि बापू गोखले हे चौघे मोठे फौजबंद सरदार होते. या चौघांची मिळून जवळ जवळ वीस हजार फौजेची भरती होती. त्यांपैकीं बापू गोखले हा सावनूर प्रांतांत बंडखोरांशीं लढण्यांत गुंतला होता त्यामुळें त्याचें पुण्यास जाणें झालें नाहीं. बाकीचे तिघे तर श्रीमंतांचे प्रत्यक्ष शत्रूच होते ! श्रीमंतांचा फारच तगादा लागला तेव्हां चिंतामणराव आपा पटवर्धन हे आगष्ट अखेरीस सडेच पुण्यास गेले आणि त्यांनीं श्रीमंतांची भेट घेऊन आणि थोडीशी चळवळ केलीसें दाखवून निसटून जाण्याची पहिलीच संधि साधली! पटवर्धन, रास्ते अशासारख्या जवानमर्द आणि फौजबंद सरदारांचें शत्रुत्व श्रीमंतांनीं जर संपादिलें नसतें तर ते त्यांच्या हाकेबरोबर वीस पंचवीस हजार फौज जमवून त्यांच्या सहाय्यार्थ पुण्यास तावडतोब धांवून गेले असते. परंतु श्रीमंत आणि जुने सरदार व मुत्सद्दी यामध्यें जें वितुष्ट वाढलें होतें तें आतां दुरुस्त होण्याजोगें नव्हतें. जुन्या सरदारापैकीं आपणांस या प्रसंगीं कोणी उपयोगी पडतील अशी श्रीमंतांची पण अपेक्षा नव्हती. त्यामुळें त्यांनीं या वेळीं नवे सरदार बनविण्याचा कारखाना जारी केला होता ! त्यांच्या या उद्योगाची माहिती—

( ५ जून )— " श्रीमंतांनीं स्वार चाकरी ठेवावयास सांगून नव्याकडून पांच सात जणांकडून स्वार ठेवविले. चाकरीचा जो सरदार त्याचें नांव पुढा असें ठेविलें. असे पांच सात पुढे तयार जाहले. "

जून प. पंधरवडा – " हुजूर फौजेची तजवीज ठरली जे—पन्नास साठ

हजार फौज जमा करावी. त्यावरून कुल (सर्व) लहान मोठे नवे सरदार यांस फौज ठेवावी म्हणून रबरू (समक्ष) आज्ञा जाली. मुरारजी येवले यास २००० स्वार २००० गाडद व धोंडू खंडोजी यास ५००० स्वार व २००० गाडद व चतुरसिंग भोसले यास ५००० स्वार व बाबा पाटणकर यास ५००० स्वार व १५००० गाडद व गोविंदराव परांजपे यास ५००० स्वार व कुल तोफखाना याप्रमाणें आज्ञा जाहली. कादरखान नगरकर कसाई हा पूर्वी वडिलापाशीं बारगीर होता म्हणोन हल्लीं त्यावर कृपाळु होऊन त्यास दहा हजार स्वार ठेवावयास सांगितले आहेत. पैकीं पांच हजार पठाण ठेवावयास सांगितले आहेत. सरंजाम नेवासें, दाभाडी व पाटोदें व कुंभारी व देपूर व कुरखेड व आणखी किरकोळ दोन तीन महाल मिळून विसालक्षांच्या जहागिरीच्या सनदा करून दिल्या आहेत. सदरहूप्रमाणें फौजेचा जमाव करून होळकराचें पारिपत्य करावें म्हणोन सिद्धांत जाला आहे."

२ जुलै—"कुंजर, निंबाजी भास्कर यांचा मानस कीं, होळकर तापी उतरून माघारे गेल्यास उत्तम. नाहीं तर पारिपत्य करावें. ही सल्ला खाशास देऊन फौजेचा जमाव करावा म्हणोन नवे सरदार केले आहेत त्यांस ताकिदी केल्या जे स्वार व गाडद ठेवणें. त्यावरून चतुरसिंग व बाबा पाटणकर व धोंडोपंत गोडबोले व विठोजी नाईक व हरजीनाईक व कुंजर असामी पांच व गोविंदराव परांजपे व नाना पुरंदरे व रूपराम चौधरी व मनोहरगीर गोसावी व खंडेराव रास्ते यांस आज्ञा जाली जे—पांच हजार स्वार व दोन हजार गाडद ठेवणें. गोविंदराव परांजपे यास नव्या तोफा करण्याविशीं आज्ञा जाली. त्यावरून परांजपे यांणीं पर्वतीखालीं रमण्यांत तोफा डाळण्याविशीं कारखाना जारी केला आहे. त्यास श्रीमंतांची मर्जी जे—पुण्याच्या वगैरे कारखान्यांत जुन्या जरबा (तोफा) आहेत त्यांचे घाट बदसुरत आहेत व प्राचीन आहेत. त्या जरबा फोडून घाटसुंदर खुबसुरत मर्जीमाफक तयार कराव्या हा बेत ठरून कारखाना सुरू केला आहे."

वरील उताऱ्यांतून नव्या सरदारांचीं नावें आलीं आहेत त्यांपैकीं चतुर-

सिंग भोसले, यशवंतराव पाटणकर वगैरे चार दोन गृहस्थ चांगले शिपाई होते. रूपराम चौधरी, आबा काळे, मनोहरगीर गोसावी हीं माणसें शिपाईगिरींत अगदींच सामान्य होतीं. कादरखान हा आपल्या वडिलापाशीं बारगीर होता सबब श्रीमंतांनीं वीस लक्षांची जहागीर देऊन बारगीर कादरखानाचा सरदार कादरखानसाहेब बनविला होता! परांजपे हा पेशव्याचा माऊसभाऊ सबब त्यास सरदारी प्राप्त झाली होती. बाकीच्या सरदारांपैकीं विठोजी नाईक व हरजी नाईक हे जासूद होते आणि मुरारजी येवले व घोंडु खंडोजी हे दोघे तर पेशव्याचे निव्वळ खिजमतगार—हुजरे होते! असले हे लटपटे सरदार आणि परांजप्याच्या कारखान्यांत तयार होणाऱ्या 'खूबसुरत' तोफा यांच्याच सहाय्यानें होळकराशीं लढाई मारण्याचा श्रीमंतांचा विचार होता म्हणावयाचा! पेशव्यांच्या फौजेच्या तयारीचा इत्यर्थ पटवर्धनाच्या वकिलानें मिरजेस लिहून कळविला तो अतिशय मार्मिक आहे! तो असा—

२ जून—"होळकर इकडे आले असतां त्यांचे पारिपत्यास प्राचीन सरदार व पागे पथके व हुजरात वगैरे गाडद आदिकरून श्रीमंतांचे हुकमाप्रमाणें सर्व हजर आहेत. श्रीमंतांचा प्रताप व दैव मोठें आहे. आयास न करतां प्रतापेंकरूनच पारिपत्य होईल असा बेत आहे! होळकराचा नेट देण्याचा जसा दिसेल त्यासारखे पश्चिमेस (कोंकणांत, पळून) जावयाची तजवीज होईलसें दिसतें!"

७ जून—"हल्लीं हुजूर सरदार, रूपराम चौधरी व गोसावी व काळे याप्रमाणें फलटणेंहुद्धा तयार आहेत. हुजरातीची खातरजमा जाहल्यावर तेही दोन तीन हजार स्वार आहेत. विंचूरकर राजेबहादर हे तर होळकराच्या भयानें मुलेंमाणसेंसुद्धां त्रिंबक किल्ल्याच्या पिछाडीस गेले आहेत. सरकारच्या बावन पागा आहेत त्या महादजीपंत पाठक यांजबरोबर अथणीस आहेत. तोफखाना जाग्यावर तय्यार आहे! बैल व बारुद (दारु) व गोळे व शिबंदीस पोटास मिळालें म्हणजे तोफखानाही सिद्ध आहे! त्यास श्रीमंतांचा प्रताप मोठा आहे. जें होणें तें दैवानें होईल असें म्हणणें आहे!!"

स. १८०२ च्या जूनपासून श्रीमंत व कुंजर यांनीं फौज जमविण्याचा आटोकाट यत्न चालविला होता. पेशवे हे किती झाले तरी राज्याचे खावंद असल्यामुळें कोणी अभिमानानें तर कोणी लोभानें असे दररोज थोडे थोडे शिलेदार सरकारी निशाणाभोंवतीं गोळा होत होते. सरकारी पागे, पथके आणि हुजरातींतील मानकरी हेही सरकारी आमंत्रणास मान देऊन सरकारी फौजेंत सामील झाले. सरकारी फौजेंत नवे जुने सरदार जमले होते, त्यापैकीं धोंडोपंत गोडबोले, बाबूराव आंगरे, विंचूरकर, बाबूराव कात्रे, चाफेकर बक्षी वगैरे सरदार पुण्याच्या आणि श्रीमंतांच्या रक्षणार्थ पुण्याच्या आसपास राहिले. नाना पुरंदरे, यशवंतराव पानसे, पांडोजी कुंजर, चौधरी व गोसावी यांचीं पलटणें, प्रतिनिधींचें पथक, चिंतामणराव सांगलीकर, पांडुरंगराव बारामतीकर अशी सुमारें आठ दहा हजार फौज मान्यांच्या पारिपत्याकरितां गारदौंडच्या रोखें निघाली. या फौजेच्या अघाडीस पांडोजी कुंजर होता. कऱ्हाड प्रांतीं करवीरकरांचा दंगा सुरू झाला या सबबीवर प्रतिनिधींचें पथक या फौजेंतून उठून गेलें आणि मंगळवेढें, पंढरपूर या बाजूस होळकरी फौजेचा उपद्रव होऊं लागला या सबबीवर चिंतामणराव सांगलीकर यांनींही तोच कित्ता गिरविला! बाकीची फौज शिल्लक राहिली तिजमध्येंही उत्साह बेताचाच होता. फौजेंतील सरदार किंवा शिलेदार यांपैकीं कोणासही श्रीमंतांकडून द्रव्यदर्शन झालें नव्हतें त्यामुळें दररोज दंगे होत आणि शिलेदार बैतागून उठून जात! असो. सप्टेंबरअखेरीस बारामतीनजीक जळगांव येथें पुरंदरे व पानसे यांचा मुक्काम आला. पांडोजी कुंजर हा अघाडीस दोन तीन कोस पुढें भिवरेच्या पाण्यावर मुक्काम करून राहिला.

होळकराचें पारिपत्य करण्याचा भार पेशव्यांनीं सर्वस्वीं दौलतराव शिंद्यावर सोंपविला होता आणि शिंदा केव्हां एकदां दक्षिणेंत येईल इकडे त्यांचे डोळे लागले होते. स. १८०२ च्या जून महिन्यांत शिंद्यांच्या फौजेची स्थिति अशाप्रकारची होती. खुद्द शिंद्यांचा मुक्काम उज्जनीस होता. त्यांचा सरसेनापति मुसा पिरू हा दिल्ली प्रांतांत होता आणि त्यानें पंजाबांतील शिखांस मिळवून घेऊन त्या प्रांताचा उत्तम बंदोबस्त राखिला होता.

अंबोजी इंगळे आणि शिंदेबाया आठ दहा हजार फौजेनिशी झाशी प्रांतीं होत्या. फकीरजी गाढवे आणि यशवंतराव घोरपडे हे थोडीशी फौज घेऊन खंडणीच्या वसुलीसाठीं कोट्याकडे गेले होते. नागो राम हा चार पांच हजार फौजेसह डोंगरपूर बस्तवाडा या प्रांतीं होता. धारचे पवार हे या नागो रामाच्या फौजेंत सामील झाले होते. फैसल फिरंगीचा भाऊ जान बत्तीस यास कांहीं फौज देऊन रामपुरा, भानपुरा या बाजूस पाठविण्यांत आलें होतें. गोपाळराव चिटणीस हे आठ दहा हजार फौजेसह बऱ्हाणपुरास मुक्काम करून होते. तात्पर्य उज्जनीस खुद्द शिंद्याजवळ फौज फारशी नव्हती. शिंदे बायांना खूष ठेवण्याकरितां सर्जेराव घाटग्यास यापूर्वीच कारभारांतून काढून टाकण्यांत आलें होतें. त्याच्या जागीं शिंद्यांनीं यादवराव भास्कर बक्षी यांस आतां दिवाण नेमिलें होते. यादवरावांचें बंधु रामचंद्र भास्कर आणि सदाशिव भास्कर हेही शिंद्यांच्या दरबारांत प्रामुख्यानें वावरत असत. होळकरांचें तोंड दक्षिणेकडे वळतांच पेशव्यांचीं तातडतोब पुण्यास निघून येण्याविषयीं शिंद्यांना सारखीं पत्रावर पत्रें येऊं लागलीं. होळकर व शिंदेबाया यांशीं त्यांच्या नुकत्याच लढाया झाल्या होत्या त्यांतून त्यांची बहुतेक दौलत गारद झाली होती आणि द्रव्यदृष्ट्या तर शिंद्यांचें यावेळीं बहुतेक दिवाळेंच वाजलें होतें. तथापि त्यांची स्थिति कशीही असली तरी पुणें दरबारांतील आपलें वर्चस्व राखण्याकरितां त्यांना दक्षिणेंत फौज पाठविणें नाप्राप्तच होतें. श्रीमंतांचा फारच तगादा लागला तेव्हां त्यांनीं मुकुंदशेट सावकार यापासून दहा लक्ष रु. कर्ज काढून फौजेच्या देण्याची थोडीशी तोडजोड केली आणि नंतर सदाशिवराव भास्कर बक्षी यांजबरोबर दहा पलटणें आणि दहा हजार स्वार असा सरंजाम देऊन त्यांची पुण्याकडे रवानगी करून दिली. बक्षी उज्जनी प्रांतांतून निघाले ते नर्मदा उतरून पहिल्यानें बऱ्हाणपुरास आले. तेथें त्यांची व गोपाळराव चिटणीस यांची भेट झाली. या मुक्कामीं त्यांच्या फौजेंतील शिपाई द्रव्यासाठीं अडून बसले. बक्षी व चिटणीस यांनीं आठ पंधरा दिवस बहुत खटपट करून फौजेची कशीबशी समजूत पाडली. नंतर बक्षी आगष्ट अखेरीस जालनापूर व देऊळगांव यामध्यें बहुलेचे घाटास मुक्कामास आले. तेथून

त्यांचा मुक्काम पैठणास आला. तेथून कायगांव टोक्याजवळ गोदावरी उतरून नगरास जाण्याचा त्यांचा विचार होता. शिंद्याची फौज नगरास पोंचण्यापूर्वीच तिच्याशीं लढाई देण्याचा होळकराचा विचार एकाएकीं ठरला आणि तो स्वतः नादपूर मोरोणें येथून निघून चांदवडास आला. पठाण, माने आणि शेणवी सरदार हे चांभारगोंदें, पेडगांव, गारदोंड इकडे पसरले होते. त्यांनाही सूचना मिळून ते सर्व सपटेंबरच्या प्रारंभीं मूळ नदीवर राहोरीजवळ एकत्र झाले. आतां होळकराच्या सपाट्यांत सांपडून बक्षी फौजमुद्धां मधल्यामध्येंच गारद होणार असा रंग दिसूं लागला. परंतु होळकरानें हा लढाईचा बेत एकाएकीं तहकूब केला आणि तो चांदवडाहून कूच करून नाशिकास गेला. मानें आणि शेणवी सरदार हेही

सपटेंबर
१८०२

पुनः दक्षिणेकडे परत फिरले आणे त्यांनीं बारशी पानगांवाकडे मोर्चा वळविला. पठाण मात्र पंधरा हजार फौजेनिशीं शिंद्यांच्या फौजेच्या तोंडावर वाट आडवून उभा राहिला. बक्षी टोक्याजवळ गंगा उतरले आणि मोंगलाई सरहद्दीच्या आसऱ्यानें नगराकडे निघाले. वाटेंत त्यांनीं औरंगाबाद, बीड, पैठण या मोंगलाई महालापासून तीन लक्ष रुपये घासदाणा वसूल केला आणि नंतर पठाणाच्या फौजेशीं लढत लढत त्यांनीं शिरसवाडीच्या घाटानें नगरपर्यंत पल्ला गांठला. बक्षी ता. ८ रोजीं नगरास पोंचले आणि दुसरे दिवशीं त्यांची आणि नगरच्या किल्लेदाराची भेट झाली. दारूगोळा व धान्यसामुग्री यांच्या भरतीसाठीं या ठिकाणीं कांहीं दिवस मुक्काम करावा असा बक्षीचा विचार होता, परंतु श्रीमंत व कुंजर यांचीं अत्यंत निकडीचीं पत्रें आल्यामुळें ते ता. १० सपटें. रोजीं नगराहून निघून कात्राबाद मांडवगण येथें मुक्कामास आले आणि तेथून त्यांनीं आपल्या फौजेचें तोंड पुण्याकडे वळविलें.

जुलै महिन्यांत शामतखान पठाणानें नाशिक क्षेत्रांत लुटालूट करून बहुत नुकसान केलेंच होतें. त्याच ठिकाणीं होळकराची स्वारी पुनः सपटें. महिन्यांत आली, त्यामुळें त्या गांवाची अगदींच दुर्दशा झाली. " होळकर फौजमुद्धां येऊन क्षेत्रास वेढा घालून शहरची कुल नाकेबंदी करून लहान मोठे गृहस्थ व भटभिक्षुक व उदमी व जमीदार यांच्या घरोघर चौकशा

बसवून प्राणिमात्रास गंगादर्शन नाहीं व जनावरांस तृणपाणी नाहीं याप्रमाणें बंदी करून क्षेत्रास चाळीस लाख रु. खंडणी मागतात. यावरून क्षेत्रांतील लहानमोठे गृहस्थ व भटभिक्षुक व जमीदार मिळोन पांचशे जमा होऊन यशवंतराव जकातेच्या वाड्यांत राहिले आहेत तेथें रुबरू जाऊन खंडाचें तोडजोडीचें बोलणें बोलून चार लाख रु. देतों म्हणोन सर्वांनीं सांगितलें. त्यावरून यशवंतराव याणीं एकच उत्तर केलें जे चाळीस लाख रु. घेऊं नाहीं तर क्षेत्र लुटून अग्न देऊं! त्यावरून समस्त ग्रामकरानीं उत्तर केलें जे, आम्ही आपलेजवळ आहों. मुलें मनुष्यें व घरें व शहरसुद्धां आपले स्वाधीन आहेत. चित्तास येईल तें करावें. त्यावरोन समस्त ग्रामस्थांस होळकर यागीं गोऱ्या रामचंद्र यांचे वाड्यांत कोंडून ठेवून त्रिंबकराव पेठे व पटवर्धन दीक्षित व राजेबहादर व मोठे मोठे गृहस्थ यांच्या वाड्यांवर तोफा रोखल्या आहेत." नाशिकप्रांतांतील विंचूरकर राजेबहादर वगैरे लहान मोठे सरदार व जमीदार हे सर्व श्रीमंत व कुंजर यांना अनुकूळ होते सबब या प्रांतांवर होळकराचा विशेष गैरमर्जी झाला होता आणि त्यानें या प्रसंगीं लुटालूट व जाळपोळ करून लाखो रुपयांचें नुकसान केलें.

इकडे फत्तेसिंग माने बारशी पानगांवाकडे आले आणि त्यांनीं तो प्रांत लुटून फस्त केला. नंतर ते गुरसाळ्याजवळ भीमा उतरून पंढरपूर प्रांतीं आले आणि त्यांनीं मंगळवेढें करकंब या पटवर्धनी महालांपासून ऐंशी हजार रु. खंडणी वसूल केली. पंढरपूर क्षेत्रास मात्र त्यांनीं बिलकूल उपद्रव न देतां श्रीदेवास एक घोडा व एक हत्ती अर्पण करून समाराधना केली. तेथून माने गोपाळपुरावरून बारामती व फलटण यांमध्यें नीरा तीरीं शिराटीच्या मुक्कामास आले. पुरंदरे वगैरे सरदार त्यांच्या पारिपत्याकरितां बारामतीच्या आसपास आगाऊच तळ देऊन राहिले होते. आश्विन शु.१२ शुक्रवार ता. ८ आक्टोबर रोजीं प्रातःकाळीं प्रहर दिवसास उभयपक्षांची बारामतीजवळ मोठी लढाई झाली. लढाईच्या प्रारंभीं मान्यांनीं पुरंदरे वगैरे सरदारांस सांगून पाठविलें कीं, 'आमचा पेशवे सरकारशीं वांकडेपणा कोणताच नाहीं. जरीपटका हा तुम्हाप्रमाणें आमचाही खावंद आहे. तुम्हांप्रमाणेंच मीही पेशव्यांचा नोकरच आहें. सरकारी फौजेशीं न लढ-

ज्याबद्दल आम्हाला होळकराचा सक्त हुकूम आहे. अशा स्थितींत तुमची आमची विनाकारण लढाई कां व्हावी ? आम्हास जेजुरीस श्रींचें दर्शन घ्यावयास जावयाचें आहे. तुम्ही आम्हाला राजीखुषीनें वाट द्या.' यावर पुरंदऱ्यांचा उलट निरोप गेला कीं, 'तुम्ही बंडखोरी करून सरकारी हुकमास न जुमानतां इकडे आलां आहां. तुम्ही सांपडाल तेथें तुमचें पारिपत्य करण्याचा आम्हांस पेशवे सरकारचा हुकूम आहे.' असा निरोप पाठवून पुरंदऱ्यांनीं मान्यांवर तोफा सुरू करून लढाईस प्रथम सुरवात केली. सरकारी फौजेंतून पन्नास गोळे सुटेपर्यंत मान्यांनीं सबूर केली. आणि नंतर त्यांनींही तोफा सुरू केल्या. शत्रूच्या तोफा सुरू होतांच कुंजर अघाडीस होता त्याचा गोट उधळला आणि तो घाईघाईनें पुरंदऱ्यांच्या फौजेंत येऊन सामील झाला. घटका दोन घटका तोफातोफी झाल्यावर मान्यांनीं आपलीं पलटणें पुढें घालून जरीपटक्यावर बेजरब चालून घेतलें. मुत्सद्दी बाळोजी कुंजराचे चिरंजीव सरदार पांडोजी कुंजर यांनीं लढाईच्या प्रारंभीच पलायन केलें! पुरंदरे पानशे यांनीं मात्र दोन घटकापर्यंत शत्रूशीं शौर्यानें लढाई दिली. परंतु शेवटीं त्यांच्या फौजेचीही दाणादाण झाली आणि त्यांचा डेरे, राहुट्या, हत्ती, घोडे, तोफा वगैरे सर्व गोटचा गोट मान्यांनीं लुटून घेतला. जरीपटक्याजवळ मोठी हातघाई होऊन मालोजी राजे घोरपडे या हुजरातीतील वृद्ध मानकऱ्यानें बहुत जवामर्दी करून सरकारी निशाणाचा बराच वेळ बचाव केला. शेवटी घोरपडे घायाळ होऊन शत्रूकडे पाडाव गेले आणि जरीपटक्याचें निशाण मान्यांच्या हातीं सांपडलें. लढाईनंतर मान्यांनीं बारामती गांव लुटून जाळून बेचिराख केलें. नंतर ते शंभूमहादेवानजीक कुरकुंभ येथें आले. तेथून माने सडेच जेजुरीस जाऊन श्रींचें दर्शन घेऊन परत आपल्या लष्करांत दाखल झाले. घोरपडे पाडाव सांपडले होते त्यांच्या जखमांची उत्तम बरदास्त ठेवण्यांत आली आणि ते बरे झाल्यावर वांई देशांत कुमठें म्हणून त्यांचें इनामगांव होतें तेथें त्यांची रवानगी करून देण्यांत आली. मान्यांनीं जरीपटक्याचें निशाण पेशव्यांकडे बहुत सन्मानपूर्वक परत पाठवून दिलें.

८ आक्टोबर १८०२

या लढाईत यशवंतराव पानशे आणि पांडुरंगराव बारामतीकर यांस भयंकर जखमा लागल्या. त्यापैकीं बारामतीकर हे एक घोड्यानिशीं मोंगलाईंत औरंगाबादेस पळून गेले. पुरंदरे, पानशे हे मात्र जीव बचावून सासवडास आले आणि तेथें पांडोजी कुंजर आणि त्यांच्या फौजेपैकीं बरेचसे पळपुटे त्यांजभोंवतीं पुनः गोळा झाले. पेशव्यांनींही आणखी नवीन फौज सासवडास पुरंदऱ्यांच्या कुमकेस पाठविली.

होळकराचा मुक्काम जसजसा पुण्याकडे येऊं लागला तसतशी पुणें शहरांत एकच धांदल उडून गेली आणि प्रत्येकजण आपला वित्तविषय घेऊन वाट फुटेल तिकडे पळूं लागला ! "सरकारचें जवाहीर-जामदारखाना सिंहगडास गेला. शहरासभोंवत्या नाक्यानाक्यांनीं तोफा ठेविल्या. नाकेबंदीही जाहली. मग मोकळे रस्ते तीन रोज केले. पुणें फुटलें ! ज्याला जिकडे मार्ग फुटतो तिकडे जातात. तट्टू व डोल्या मिळत नाहींत. कोशास रुपया एक भाडें मागतात परंतु मिळत नाहीं. चारी रस्ते पेठा बाहेर जात आहेत. शहर अवघें गडबडलें !" पळून जाण्याची सर्वांत जास्त घाई खुद्द पेशव्यांना सुटली होती ! विठोजीच्या खुनाचा सूड घेण्यासाठींच यशवंतरावाची स्वारी दक्षिणेंत आली आहे आणि आपण त्याच्या हातीं सांपडलों तर तो हाल हाल करून आपला प्राण घेईल असें त्यांस भय पडलें होतें. ता॰ २७ सप्टेंबर रोजीं "श्रीमंतांनीं रायगडास जावयास स्वारी तयार करून स्वार व गाडद यांची डांक बसवून कुटुंबांसुद्धां येसवदाबाईस घेऊन जावें म्हणून तयारी केली. ज्याहेरीज कीं, श्रीमहाबळेश्वरास स्वारी जाणार, त्यांस शिंद्यांकडील वकील व कुंजर यांनीं विनंति केली जे—खासा स्वारी गेली असतां चहुंकडे अखबारांत लिहिली जाईल जे, होळकराच्या दहशतीमुळें स्वारी किल्ल्यास गेली. याजमुळें बदलौकिक होईल व येश्वदाबाईचें निघणें कठिण असे कित्येक अंदेशे करोन स्वारी तहकूब करोन डांक उठविली." याप्रमाणें श्रीमंतानीं स्वतः निघून जाण्याचा बेत तहकूब केला. तथापि ता. ८ आक्टोबर रोजीं श्री. सौ. ताईसाहेब व सौ. सीताबाई व श्री. मा. यशोदाबाई अशा खाशा स्त्रियांची मात्र त्यांनीं

१ बाजीरावाचें कुटुंब. २ चिमाजी आपांची स्त्री.

रायगडास रवानगी करून दिली. यशोदाबाई ही कै. सवाई रावसाहेब पेशवे यांची स्त्री. हिच्या मांडीवर दत्तक बसवून त्याच्या नांवें पेशवाईची गादी चालविण्याचा प्रयत्न यापूर्वी बरेच वेळां झाला होता आणि यापुढेंही तसे आणखी प्रयत्न होण्याचा संभव दिसत होता. त्यामुळें पेशव्यांची तिजवर भयंकर वक्रदृष्टि झाली होती, आणि त्यांनीं तिला आपल्याजवळ सक्त नजरबंदींत बाळगिली होती. ही स्त्री कांहीं केल्या पुण्याहून हालण्याचें कबूल करीना त्यामुळें बराच घोंटाळा पडला. शेवटीं तिला जबरदस्तीनें बाहेर काढण्यांत आलें! या पेशव्यांच्या स्त्रियांबरोबर नाना फडनवीसांच्या स्त्रीलाही रायगडास पाठविण्याचा श्रीमंतांचा विचार होता परंतु ती आयत्या वेळीं अस्पर्श झाली, त्यामुळें तो त्यांचा विचार अंमलांत येऊं शकला नाहीं.

नगरास शिंद्यांचीं फौज पलटणें आलीं होतीं त्यांच्या जोरावर श्रीमंतांनीं आपला पळून जाण्याचा बेत तहकूब ठेविला होता. पुण्याच्या आसपास आतां सरकारी पंधरा वीस हजार फौज जमली होती. ही सरकारी फौज आणि शिंद्यांची फौज एकत्र करून होळकराला हां हां म्हणतां उडवून देतों अशा प्रकारची फुशारकी कुंजर आणि त्यांच्या बगलेंतील मुत्सद्दी श्रीमंतांजवळ दररोज मारीत होते आणि खुद्द श्रीमंतांनाही तशी थोडीशी आशा अजून वाटत होती. सदाशिवराव बक्षी यांस तांतडीनें पुण्यास येण्याविषयीं श्रीमंतांचीं दररोज पत्रें जात होतीं परंतु नगरापासून पुण्यापर्यंत बक्षींचा सर्व मार्ग शामतखान पठाणाच्या फौजेनें अडवून धरला होता त्यामुळें त्यांना प्रत्यहीं अडचणी येत होत्या. ‘ पठाण पिंपळवाडीस आला. त्यानें नारायणगड घेतला. तेथें गुळें बहुत होतें. झाडून लुटलें. खेडें भीमातीरी आहे तेथें पठाणाचे लोक आले त्याणें नाश बहुत करून ब्राह्मण एक व बायको एक मृत्यु पावली. निघोज येथें किरकोळी लुटलें. बारूण कित्यानजीक आले. दोन रोज किल्ल्यावरून मारागिरी होत होती. सामान आंतील सरलें. रा. धोंडोपंत पागे रावसाहेबांकडून पुण्यास येत होते. त्यांस निघोज येथें लुटून मृत्यु पावले. शंभर घोडे नेले. धन्दाशा राहतेकर हुजरपागे यांजकडे किल्ला हडसर आहे त्याजवर

चक्रदेव, शिराळेकर आहेत सबब किल्लेचे बंदोबस्तास येथून पंचवीस स्वार घेऊन जात होते ते हुन्नराअलीकडे लुटले गेले. ओळख यांची पुरती न पडली सबब राहतेकर [ बचावून ] एक वस्त्रानिशीं बुधवारीं रात्रीं आले. घोडीं वगैरे गेलीं. खडकीचे पुलापर्यंत लोक लुटले गेले." अशा या पठाणी फौजेशीं लढत लढत बक्षी पुण्याकडे मार्ग आक्रमूं लागले आणि ता. ३ आक्टो. पासून पुढें दहा बारा दिवस त्याजवर पठाणांनीं एकच गर्दी केली. गणपतीच्या ओझरापासून ब्रम्हवाड्याच्या घाटापर्यंत ही मारामार अशीच चालू होती. घाटांत शिंद्यांच्या फौजेनें पठाणांचा चांगलाच मोड केला त्यामुळें बक्षींचा पुढील मार्ग बराच सुरक्षित झाला.

ता. २२ आक्टो. रोजीं सदाशिवराव भाऊ बक्षी यांचा मुक्काम बानवडीवर आला. बक्षीबरोबर शिंद्यांचीं दहा पलटणें, पंधरा हजार घोडेस्वार व तोफखान्याचा जय्यत सरंजाम होता. त्याच तळावर पेशव्यांची सर्व फौजही एकत्र जमली होती. पेशवाई फौजेंत विंचूरकर, राजेबहादर, नाना पुरंदरे, यशवंतराव व गणपतराव पानशे, पांडोजी कुंजर, यशवंतराव पाटणकर, रूपराम चौधरी, मनोहरगीर गोसावी, आबा काळे वगैरे अनेक सरदार होते. जरीपटक्याचीं वस्त्रें पुरंदऱ्यांना मिळालीं होतीं. या सर्वां मिळून पंचवीस तीस हजार फौजेचा भरणा होता. याप्रमाणें बानवडीच्या तळावर शिंदे व पेशवे मिळून सुमारें पन्नास साठ हजार फौजेचा जथ जमला होता. या तळावर येण्यापूर्वी दोन दिवस आधीं "शिंद्याचे फौजेंतील सरदार सदाशिवराव व ताम्रमुख (कॅ. डेवीस?) छ० २२ रोजीं येऊन श्रीमंतांस भेटून उभयतांनीं विनंती केली जे, स्वामींचे प्रतापेंकरून लढाई देऊन छऱ्याचे, जंबुऱ्याचे, व कुलपी गोळ्याचे मार देऊन पलटणाचे मार देऊन पलटणांचे कवाइतीनें होळकरास उडवून

आक्टोबर १८०२

देतों! खावंदांनीं फक्त लढाईचा तमाशा पहावा. याप्रमाणें विनंती करून खर्चाची सरभरा व्हावी म्हणोन अर्ज केला. त्यावरोन दारूगोळा व वीस तोफा लांब पल्ल्याच्या देऊन तीन लाख रुपये बाळोजी कुंजर यांणीं दिले आणि रुकसत केलें." याचवेळीं विंचूरकर वगैरे सरदारांसही श्रीमंतांचा हुकूम झाला कीं, पडेल तो खर्च

करून लढाऊ सरंजामाची आणि फौजेची जय्यत तयारी ठेवावी आणि लढाईंत जवामर्दीची शर्त करून होळकराच्या बंडाचा बीमोड करावा.

उलटपक्षीं यशवंतराव होळकरही याबेळीं शत्रूच्या सर्व हालचालींचें मर्म ओळखून त्या अनुरोधानें आपल्या बाजूची लढाईची तयारी करीत होता. बारामतीच्या आसपास फत्तेसिंग माने, शामतखान व मीरखान पठाण, नागो जिवाजी, जिवाजी यशवंत, गणपतराव नारायण, आबाजी लक्ष्मण वगैरे त्याचे सर्व सरदार आपापल्या फौजासह एकत्र झाले. जेजुरीस श्रींचें दर्शन घेऊन स्वतः होळकरही आपल्या फौजेंत लवकरच सामील झाला. होळकराच्या फौजेंत चौदा पलटणें, अलीगोल म्हणजे बिनकवाइती पायदळ, पंचवीस तीस हजार स्वार असा सरंजाम होता. पेशवे व शिंदे यांची फौज व होळकराची फौज संख्येनें जवळ जवळ सारखीच होती. शिंद्याच्या तोफखान्याप्रमाणें होळकराचा तोफखानाही उत्कृष्ट स्थितींत होता. पेशवे व शिंदे यांच्या फौजांचा त्यानें अनेक वेळां पराजय केला होता त्यामुळें स्वतः होळकर आणि त्याच्या हाताखालचे शूर सैनिक यांना एक प्रकारचा आत्मविश्वास वाटत होता. आपल्या पाठोपाठ दौलतराव शिंदे दक्षिणेंत येतील आणि आपली सूड घेण्याची इच्छा तृप्त होईल अशी आशा मात्र आतां त्यास वाटत नव्हती. त्याला यापुढें दोन गोष्टी साधावयाच्या होत्या. वानवडीवर शिंदे व कुंजर यांची फौज जमली आहे तिचें पारिपत्य करावयाचें आणि नंतर पेशव्यांना ताब्यांत घेऊन पेशवाईच्या दिवाणगिरीवर अमृतरावाची स्थापना करावयाची या त्या दोन गोष्टी होत. एकदां पेशवे ताब्यांत सांपडल्यावर पुणें दरबाराच्या राज्यकारभारासंबंधीं आणि होळकरांच्या सरदारीसंबंधीं जरूर त्या सर्व गोष्टी त्यांजकडून कबूल करवून घ्यावयाच्या असा अमृतराव आणि होळकर यांनीं आगाऊच संकेत ठरविला होता. होळकरानें शिंद्याचा पराजय केल्यावर होळकरास काय मिळावयाचें आणि अमृतराव आणि त्यांचे सहकारी जुने मुत्सद्दी यांना काय मिळावयाचें याची सर्व वांटणी आगाऊच ठरविण्यांत आली होती, आणि सर्व गोष्टी अगदीं ठाकठीक जुळवून ठेवण्यांत आल्या होत्या. परंतु या सर्व कार्यक्रमास एक मोठेंच व्यंग होतें. तें असें कीं, लढाईच्या गर्दींत श्रीमंत

घाबरून कोंकणांत पळाले आणि नंतर स्वार्थी व भ्याड लोकांच्या नादीं लागून त्यांनी इंग्रजांचा आश्रय पतकरला तर काय करावयाचें हें त्यांच्या कार्यक्रमांत कोठेंच नमूद केलेलें नव्हतें! मराठी राजकारणांत इंग्रजांचा एकदां प्रवेश झाल्यावर मग त्यांजपुढें होळकर किंवा अमृतराव यांपैकीं कोणाचाच निभाव लागला नसता आणि त्यामुळें कुठली अमृतरावाची दिवाणगिरी आणि कसची होळकरांची सरदारी, अशी स्थिति प्राप्त होऊन कार्यक्रमाचा सर्वच डोलारा कोलमडून खालीं पडला असता! ही आपत्ति टळावी आणि आपल्या आगमनाविषयीं पेशव्यांना निश्चितपणा वाटावा या हेतूनें होळकरानें बारामतीहून पेशव्यांस सामोपचाराचा आणि निर्वाणीचा निरोप पाठविला त्याचें तात्पर्य असें—[१] आपल्या आज्ञेप्रमाणें मी येथें मुक्काम करून राहिलों आहें. गोष्टी विकोपाला जाऊन युद्धप्रसंग व्हावा अशी माझी इच्छा नाहीं. शिंद्यानें आणि त्याच्या प्रेरणेवरून आपण आतां-पर्यंत होळकर घराण्याचें जें नुकसान आणि अपमान केले आहेत ते सर्व केवळ राज्याच्या कल्याणावर नजर देऊन मी विसरून जावयास तयार आहें. अजूनही आपण मध्यस्थी करून माझा व शिंद्यांचा समेट करून द्यावा. आम्हां दोघांचा समेट झाला तर त्या गोष्टीचा इंग्रजासारख्या शत्रूवर दाब बसेल आणि राज्याचा बचाव होईल. [२] सर्व गोष्टी शेवटच्या थराला गेल्या आहेत त्याअर्थी समेटाच्या बोलण्यासाठीं कोणी लुंगा सुंगा मुत्सद्दी मजकडे पाठवूं नये. आपल्यातर्फे बाळोजी कुंजर आणि दाजी देशमुख आणि शिंद्याच्यातर्फे निंबाजी भास्कर व बापूराव आंगरे या चौघांना मज-कडे पाठवावें. हे चौघे गृहस्थ हातीं आल्याशिवाय मी समेटाचा एकही शब्द बोलणार नाहीं. [३] समेटाचें बोलणें बिसकटून लढाई झाली तर तींत आपण कोणताही भाग घेऊं नये. तथापि आपण भाग घेतलाच आणि नंतर लढाई बिघडली तरीमुद्दां आपण पुणें सोडूं नये. आपणांला किंवा आपल्या माणसांस मजकडून तिलमात्र उपसर्ग पोचणार नाहीं. माझ्या पूर्वजांप्रमाणें मीही आपला एकनिष्ठ सेवक आहें. [४] आपणां-कडून शिंद्याला "जंगी सरंजामाची आणि खर्चाची सरभरा होत आहे" ती बंद व्हावी. शिंद्याशीं माझें भांडण आहे त्यांत आपला अर्थाअर्थी कांहींच

संबंध नाहीं. सबब आपण कोणालाही प्रत्यक्ष मदत करूं नये. तथापि शिंद्याला मदत देण्याची आपली इच्छाच असली तर तशी मदत मलाही आपणांकडून मिळावी. कारण शिंद्याप्रमाणें मीही आपला एकनिष्ठ सेवक आहे. [५] मुख्य गोष्ट—आपण गादीनशीन झाल्यापासून सर्व गोष्टी शिंद्यांच्या तंत्रानें होत आहेत. आपण खावंद आणि शिंदा हा आपला नोकर आहे. परंतु आपण नोकराच्या आहारीं सांपडला आहां त्यामुळें राज्याचें वाटोळें झालें आणि शत्रु बळावले! शिंद्यानें आतांपर्यंत बहुत अमर्यादा करून आपलाही वेळोवेळ अपमान केलेला आहे. शिंद्याच्या वर्चस्वाचें जोखड आपण मानेवर बाळगलें आहे तें दूर फेंकून द्यावें आणि त्याला वठणीवर आणण्याचें काम मजवर सोंपवावें. एकाच लढाईंत त्याला रेशमासारखा मऊ करून सोडतों आणि सेवकपणाचीं कर्तव्यें व मर्यादा यांचा त्याला या जन्मांत विसर पडणार नाहीं अशी तजवीज करतों! याप्रमाणें निरोप पाठवून होळकरानें आपल्या फौजेचा तळ बारामतीहून हालवून पुण्याच्या रोखें कवडीस आणला.

होळकराचा हा निरोप श्रीमंतांना ता. २३ आक्टोबर रोजीं सकाळीं पोंचला आणि त्या निरोपांत जी गर्भित धमकी होती तिच्या योगानें त्यांच्या मनाला अतिशय अस्वास्थ्य प्राप्त झालें. होळकराची राजनिष्ठेची भाषा ही केवळ मायावी असून तो दक्षिणेंत आपल्या भावाच्या खुनाचा सूड घेण्यासाठींच आला आहे असा त्यांचा ठाम ग्रह झाला होता. पाप हें स्वतःच्या सावलीलासुद्धां भीत असतें या न्यायानें होळकराची राजनिष्ठेची भाषा, सरकारी फौजेशीं त्याचें मर्यादायुक्त आचरण, राज्यकल्याणाची त्याची धडपड, स्वार्थत्यागाची त्याची तयारी या सर्व गोष्टींत श्रीमंतांना 'सूड सूड' एवढा एकच सूर ऐकूं येऊं लागला! श्रीमंतांचा स्वभाव पराकाष्ठेचा भ्याड होता हें प्रसिद्धच आहे. होळकर दूर होता तोंपर्यंत त्याचा समूळ उच्छेद करावा असेंच त्यांचें धोरण होतें परंतु त्याचा मुक्काम पुण्यानजीक येऊन आणीबाणीचा समय येऊन ठेपला तेव्हां त्यांचे पाय भीतीनें लटपटूं लागले! तुटला होळकर आणि फसचा त्याचा वकील ही त्यांची घमेंड पार जिरली आणि त्याशीं अतिप्रसंग करावा तर आपली स्वतःचीच गठडी वळणार असा

संभव त्यांस दिसूं लागला. होळकराचा नाश करण्याची त्यांची इच्छा अजू प्रबळ होती परंतु स्वतःची चामडी बचावून तो नाश परभारें करविण्याचं एखादी अजब युक्ति त्यांस सुचत नव्हती त्यामुळें त्यांचा निरुपाय झाल होता. बाळोजी कुंजर आणि शिंद्याचा वकील निंबाजी भास्कर यांनीं वीर भरल्यामुळें त्यांची बाह्यतः युद्धाची तयारी जोरांत चालू होती; परंतु आंतून मात्र त्यांचें अवसान अगदींच गळालें होतें आणि होळकराशीं तूर्तातूर्त कसें तरी सख्य जोडून या प्रसंगांतून जीव बचावून पार पडावें हाच विचार त्यांच्या मनांत प्रामुख्यानें घोळत होता. परंतु होळकराशीं सख्य जोडा-वयाचें कसें? बाळोजी कुंजर, निंबाजी भास्कर वगैरे चौघा गृहस्थांस प्रथम हवालीं करावें ही होळकराची प्रमुख अट होती आणि ही अट अंमलांत येणें अशक्यप्रायच होतें. कारण श्रीमंत होळकरास एकपट भीत होते तर कुंजर दसपट भीत होता! विठोजीचा खून करविण्यांत बाळोजी कुंजर, निंबाजी भास्कर हे दोघे अव्वल दर्जाचे गुन्हेगार होते. पेशवे हे राज्याचे खावंद असल्यामुळें त्यांच्या गुन्ह्याकडे होळकर कदाचित् डोळेझांक करील. पण आपण त्याच्या तावडींत सांपडलों तर मात्र तो हाल हाल करून आप-णाला ठार मारल्याशिवाय सोडणार नाहीं असें त्या उभयतांस भय पडलें होतें. असो. पुणें दरबारांत बरीच वाटाघाट होऊन ता. २४ आक्टो. रोजीं पेशव्यांचा मेहुणा रघुनाथ घोंडदेव भागवत, कुंजराचा कारभारी आबाजी शंकर, पुण्यांतील एक सावकार भिवाजी नाईक कोलते, भोस-ल्यांचा वकील नारायणराव वैद्य या चार असामींची होळकराकडे समे-टाच्या बोलण्यासाठीं रवानगी करण्यांत आली. पाराशरपंत दादाजी हाही श्रीमंतांच्या हुकमावरून या मंडळीबरोबर मुद्दाम गेला होता. परंतु होळकरानें या चौघा गृहस्थांची घड भेटसुद्धां घेतली नाहीं. त्याचें एकच म्हणणें पडलें कीं, 'मी पूर्वी विनंती केल्याप्रमाणें श्रीमंतांनीं बाळोजी कुंजर वगैरेस न पाठवितां तुम्हांस कां पाठविलें? खुद्द श्रीमंतांना किंवा पुणें दरबाराला मजबद्दल अविश्वास वाटतो कीं काय? कुंजर वगैरे मंड-ळींच्या जिवाला मजकडून अपाय पोचेल असें भय वाटत असेल तर माझ्या पदरीं फत्तेसिंग माने वगैरे अनेक सरदार आहेत त्यांपैकीं कोणीही त्यांच्या

जिवाबद्दल हमीदारी पतकरण्यास तयार आहे. इतक्याही उपर श्रीमंतांना मजविषयीं अविश्वास वाटत असेल तर ते मध्यस्थी तरी कसची करतात आणि माझा शिंद्यांशीं समेट तरी कसचा होतो ! समेटाची गुरुकिल्ली हीच आहे कीं, बाळोजी कुंजर, निंबाजी भास्कर वगैरे गृहस्थ प्रथम माझ्या हातीं आले पाहिजेत. नंतरच समेटाची बाटाघाट सुरू होईल. तसें न घडेल तर हा समेटाच्या बोलण्याचा पोरखेळ पुरे झाला. शिंद्यांशीं माझा तंटा आहे त्याचा सोक्षमोक्ष उदईक रणांगणावरच होईल. श्रीमंतांनीं मात्र आपल्या जागीं स्वस्थ असावें. माझ्या हातून त्यांची बेअदबी कधींही होणार नाहीं. त्यांच्या बुद्धीला शिंद्यांच्या वर्चस्वाची मगरमिठी बसली आहे तिची वज्रगांठ मात्र उदईक माझ्या तरवारीनें तुटणार आहे.' याप्रमाणें होळकराचा निग्रह पाहताच शिष्टाईला आलेले शिष्ट मुकाट्यानें परत गेले आणि त्यांनीं सर्व मजकूर श्रीमंतास श्रुत केला. आतां शिंदे होळकरांच्या समेटाचें प्रकरण कुंजर वगैरे मंडळींच्या जाण्यामुळेंच रुटलें आहे ही गोष्ट ज्यास्तच स्पष्ट झाली, त्यामुळें श्रीमंतांनीं कुंजराची बहुत मनधरणी सुरू केली; परंतु होळकराच्या दपटशामुळें भयभीत झालेला कुंजर त्यांना कसची दाद देतो ! तो उलट श्रीमंताजवळ गुरगुरूं लागला कीं— होळकराच्या बंडाचें सरकारला एवढें कां भय वाटतें हेंच मला समजत नाहीं. "स्वामींनीं दुरून लढाईचा तमाशा पहावा. स्वामींच्या प्रतापेंकरून त्याची लढाई देऊन उडावून देतों."

होळकरानें लढाईचें आव्हान दिलें होतें त्याचा स्वीकार शिंद्यांचे सेनापति सदाशिवराव बक्षी यांनीं मात्र मोठ्या आनंदानें केला. त्यांच्या मनांतही लढाईची खुमखुम कमी नव्हती. होळकराचा पराजय होऊन शिंद्यांच्या मर्दुमकीला काळिमा लागला आहे तो पुसला जावा आणि पुणें दरबारांत आपल्या धन्याचें वर्चस्व कायम रहावें अशीच त्यांची इच्छा होती. ता० २२ आक्टोबरपासून पुढें दोन तीन दिवस शनवारवाड्यांत खलबतांची मोठीच धामधूम उडाली ! याप्रसंगीं शिंद्यांच्या फौजेंतील मोठमोठे सरदार आणि कुंजराच्या टोळ्यांतील मुत्सद्दी यांनीं पेशव्याजवळ एकच गिल्ला केला कीं, 'होळकर बंडखोर असूनसुद्धां बडा मगरूर आहे ! आपले हुकूम

धाब्यावर बसवून उलट आपल्यालाच अक्कल शिकविण्याचा आव त्यानें आणला आहे ! अशा या अधम राजद्रोह्यावर श्रीमंतांनीं बिलकूल दया दाखवूं नये. त्याचा पुरता नायनाटच केला पाहिजे ! याच वेळीं होळकरातर्फे पाराशरपंत आणि त्यांचे कारकून गोपाळराव गानू आणि निंबाजी फडतरे हेही पेशव्यांजवळ ठासून विनंति करीत होते कीं, ' आम्हांकडे सरकारचा कोणताही गुन्हा नाहीं. आमच्या मागण्यांत किंवा वागण्यांत गैर काय आहे याची एकदां श्रीमंतांनीं निर्विकार मनानें चवकशी करावी. खरा राजद्रोही शिंदा आहे. अपराध शिंद्यांचा आणि शिक्षा मात्र होळकरांना असा सरकारच्या हातून उलटा न्याय होत आहे ! ' भोंसल्यांचे कारभारी यावेळीं पुण्यांत होते त्यांनींहि सर्वस्वीं पाराजीपंतांच्या म्हणण्यालाच दुजोरा दिला.

या वेळीं शिंदे आणि होळकर दोघेही स्वार्थानें अंध होऊन एकमेकांचे गळे सोडविण्यास उद्युक्त झाले होते आणि दोघेही मन मानेल तशी वागणूक ठेवीत होते. दोघेही पेशव्यांचे सर्व हुकूम धाब्यावर बसवीत होते आणि त्याचवेळीं दोघांनींहि आपल्याभोंवतीं राजनिष्ठेच्या भाषेचा असा जाड बुरखा घेतला होता कीं, यापुढें त्यांचें युद्ध जुंपणार आहे तें केवळ एकमेकांना राजनिष्ठेचें शिक्षण देण्याकरितांच जुंपणार आहे असा सर्वांना भास उत्पन्न व्हावा ! आतांपर्यंत शिंद्यांच्या जबरदस्तीमुळें पुणें दरबारांत अस्ताव्यस्त कां होईना, पण थोडासा एकसूत्रीपणा आणि बेअकलीपणाचें कां होईना, पण एक विशिष्ट धोरण दिसून येत होतें. मुख्य गोष्ट, श्रीमंतांच्या बऱ्या वाईट हुकमांची तावडतोब अंमलबजावणी करणारी एक लष्करी सत्ता त्यांजपुढें सदैव हात जोडून उभी असे. त्यामुळें पुणें दरबाराचा थोडासा तरी वचक शिल्लक राहिला होता. परंतु होळकराच्या अकल्पित उदयामुळें मराठी राजकारणांत शिंदे त्या मानानें निस्तेज पडले आणि पुणें दरबारांत बजबजपुरी माजली. अशा या बिकट प्रसंगीं श्रीमंतांमध्यें सामान्य अक्कल आणि सामान्य धैर्य असतें तरीसुद्धां मोठाच अनर्थ टळला असता. परंतु कोणत्या गोष्टींत आपलें हित आहे हेंच त्यांस धडपणें समजत नव्हतें. आणि एखादी गोष्ट दरडावून सांगण्याइतकीसुद्धां धमक त्यांजमध्यें नव्हती. त्या-

मुळें बलिष्ठ राजनिष्ठांच्या तावडींत सांपडून श्रीमंतांची आतां अगदीं त्रेधा उडाली होती! शेवटीं निरुपाय होऊन त्यांनीं कुंजर आणि निंबाजी भास्कर यांस सांगितलें कीं, "उत्तम तुमचे चित्तास येईल तसें करावें. माझे चित्तास येईल तसें मी करीन." याप्रमाणें पेशव्यांची लढाईला गर्भित संमति मिळतांच कुंजर व शिंदे यांच्या पक्षीयांची ता. २४ आक्टो. रोजीं रात्रीं जंगी मजलस भरून तींत होळकराशीं लढाई मारून त्याला उडवून देण्याची मसलत सर्वानुमतें मुकरर करण्यांत आली! या मसलतीचा अंमल अर्थात् दुसरे दिवशीं व्हावयाचा होता.

ता० २५ आक्टो. सोमवार हा दिवस उजाडला. या दिवशीं वानवडी व हडपसर यांमधील माळावर शिंदे होळकरांचें तुंबळ युद्ध होऊन राज्यक्रांति होण्यांत त्याचें पर्यवसान झालें. प्रातःकालपासूनच उभयपक्षीं सैन्याच्या हालचाली चालू होत्या. सरकारी फौजेच्या तीन टोळ्या करण्यांत आल्या होत्या. मध्यभागीं शिंद्याची फौज व पलटणें उभीं राहिलीं आणि त्या फौजेच्या एका बाजूस जरीपटका आणि दुसऱ्या बाजूस हुजरात अशा सरकारी फौजेच्या दोन टोळ्या उभ्या राहिल्या. शिंद्याच्या फौजेच्या आघाडीस तोफखाना सज्ज करून ठेवण्यांत आला होता. उलटपक्षीं होळकरानेंही आपल्या फौजेच्या तीन टोळ्या केल्या होत्या. जरीपटक्यासमोर शामतखान पठाण आणि हुजरातीसमोर फत्तेसिंग माने अशा दोन टोळ्या उभ्या राहिल्या. मध्यभागीं शिंद्याच्या फौजेच्या तोंडावर स्वतः यशवंतराव होळकर आपलीं पलटणें व तोफखाना पुढें घालून उभा राहिला. होळकरानें आपल्या फौजेंत सक्त ताकीद फिरविली होती कीं, जरीपटका आमचा खावंद, सबब शत्रूकडून पंचवीस गोळे सुटेपर्यंत कोणीही हत्यार उचलूं नये. जरीपटक्याजवळ कुंजर उभा होता त्यानें प्रहर दिवसास होळकरावर तोफा सुरू करून लढाईस सुरवात केली. मागोमाग शिंदे होळकरांचा एकमेकांवर तोफांचा भडिमार सुरू झाला. "प्रहर दिवसास उभयतांकडील तोफांची मारगिरी होऊं लागली ते दोनप्रहरपर्यंत एकसारखा मार मारिला. तोफांचे बारांची गणती एक दोन असें केल्यास सांपडावयाची नाहीं. सात आठ हजारपर्यंत गोळा उडाला इतका अज-

मास आहे." यानंतर होळकराच्या फौजेंत हल्ल्याची तयारी होऊन शामतखान पठाण व फत्तेसिंग माने यानीं शत्रूवर चालून जाऊन हातघाई सुरू केली. याप्रमाणें दोही बाजूनीं लढाईचें तोंड लागलेलें पाहतांच होळकराच्या पलटणांनीं शिंद्याच्या पलटणांवर बेज़रब चालून घेतलें. नंतर "चार घटकापर्यंत कंपु कपूंची लढाई मातबर जाहली. नंतर खासे होळकरानीं आपले कंपूंत मिसळून चालून घेतलें. उपरांत

२५ आक्टोबर १८०२

तरवारा तरवारी चांगली जाहली. त्या संधींत खासे होळकर घोडेखालीं उतरून शिंदे यांजकडील कंपूवाले इंग्रज दोन तीन आंत तोफेजवळ होते त्याचीं डोकीं कापलीं. त्या गलबलींत यशवंतराव यास तीन जखमा लागल्या. त्यांत उजवे हाताचे बोटावर मातबर जखम आहे." याप्रमाणें लढाईच्या ऐन गर्दींत होळकरानें घोड्याखालीं उडी टाकून जीव धोक्यांत घातलेला पाहतांच त्याच्या फौजेंतील हजारों मराठे व पठाण शिलेदारानीं आपापल्या घोड्याखालीं उड्या टाकल्या आणि ते त्याच्या संरक्षणार्थ त्याच्या भोंवतीं गोळा झाले. नंतर ही टोळी तशीच मारामार करीत शिंद्याच्या पलटणांच्या व्यूहांत शिरली. अघाडीस चार पलटणें होतीं तीं बहुतेक जागच्या जागींच कापलीं गेलीं आणि बाकीचीं पलटणें कचकरून मागें हटूं लागलीं. शिंद्याचीं पांच चार पलटणें बानवडीस महादर्जी शिंद्याच्या छत्रीच्या आसऱ्यानें बराच वेळपर्यंत मोठ्या शौर्यानें आणि शिस्तीनें शत्रूचे हल्ले परतवीत होतीं. परंतु होळकरानें हल्ल्यावर हल्ले चढवून शेवटीं तीं पलटणेंही गारद केलीं. होळकरानें या लढाईंत शिपाईगेरीची शर्थ केली. सर्व रणांगणावर त्याची सारखी नजर असे. फौजेची प्रत्येक हालचाल खुद्द त्याच्याच हुकमानें होत असे आणि प्रत्येक हल्ला खुद्द त्याच्याच नेतृत्वाखालीं केला जात असे. कोठेंही आणीबाणीचा प्रसंग दिसला तर तो सर्वांच्या अघाडीस जाऊन उभा रहात असे! होळकराच्या या अविश्रांत परिश्रमाचा आणि अचाट शौर्याचा फायदाही त्याला या लढाईंत पुरेपूर मिळाला! होळकराच्या हल्ल्यापुढें त्या दिवशीं शत्रूची फौज पलटणें किंवा तोफखाना यांपैकीं कोणाचाच टिकाव लागला नाहीं आणि सर्व रणक्षेत्र होळकराच्या फौजेनें

हं हं म्हणतां कार्बीज केलें. शिंदे होळकरांची ही लढाई इतक्या चुरशी-ची झाली कीं, लढाईत ठार व जखमी झाले त्यांची संख्या जवळ जवळ आठ दहा हजारांपर्यंत होती !

पेशवाई फौजेवर लढाईचा मारा विशेषसा पडला नाहीं त्यामुळें ती फौज बराच वेळपर्यंत टिकाव धरून उभी राहिली होती परंतु शिंद्यांच्या फौजेंत पळापळ सुरू होतांच त्या फौजेचेही अवसान गळालें आणि नंतर शिंदे व पेशवे यांच्या फौजेंतील पळपुट्यांची एकच गल्लत होऊन त्यांची सरसकट कत्तल सुरू झाली ! " इतका विचार होतांच शिंदेच्या फौजेचा आणि सरकारी जरीपटक्याचा पळ जाला. सरकारची व शिंदे यांची खराबी बहुत जाली. एक विंचूरकर तीनशे ठार व तीनशे जखमी या-प्रमाणें एकाच पथकाची खराबी जाली. बाबूराव आंगरे जखमा लागून कुलाब्याकडे पळून गेले. सदाशिवराव बक्षी जखमी जाहले त्यांचें ठिकाणच नाहीं ! होळकर यांजकडील बरडीज कंपूचा सरदार गोळा लागून ठार जाहाला. विकट ( कॅ. विकर्स ? ) कंपूचा सरदार यास छऱ्याच्या जखमा लागल्या. उभयतांकडील ठार व जखमी बहुत जाले. नंतर लूट जहाली ती कोठवर ल्याहावी ! शिंदे कडील तोफा बावन पाडाव आल्या. पेट्या छकडे यांस गणती नाहीं ! हत्ती सहा-त्यांत नौबतीचा एक, अंबारीचा एक, गुळे चार—असे आले. उंटे बैल घोडे यांची संख्या नाहीं ! डेरे-राहुट्यासुद्धां गोटचा गोट लूटून फस्त जाला ! शिंदेचा कांहीं पळ पुण्यांत गेला तो पुणेकरांनीं लूटुन घेतला. भवानी पेठेच्या शिव्यापासून आदित-वारचे शिव्यापर्यंत तीन हजार मनुष्य ठार पडलें. " श्रीमंतांचे अनेक लहानमोठे मुत्सद्दी व सरदार या लढाईत हजर होते ते सर्व या प्रसंगांतून सुरक्षित बाहेर पडले.. कारण त्यांजवर विशेष लगट कोणी केलीच नाहीं. सरकारी फौजेशीं होळकरानें मारामार केली ती केवळ कारणापुरती. त्याचा मुख्य रोख होता शिंद्यांच्या फौजेवर. लढाईत आणि त्यानंतरही त्या फौजेची कत्तल करण्यांत मात्र होळकरानें बिलकुल दया दाखविली नाहीं. ही कत्तल दुसरे दिवशींही थोडीबहुत चालू होती. शिंद्याची एवढी मोठी दौलत परंतु त्या प्रसंगीं शिंद्याच्या माणसांना दक्षिणेंत कोणी त्राता उरला

नाहीं. शिंद्याचा माणूस दिसला तर कोणीही त्यास लुटावें-थोबाडावें-लाथाडावें किंवा मारावें! त्याबद्दल ना दाद ना फिर्याद अशी स्थिति प्राप्त झाली! या लढाईनें शिंद्यांच्या दक्षिणेंतील वर्चस्वाचा ग्रंथ समाप्तीस गेला तो कायमचाच गेला! ही हडपसरची लढाई झाली तो दिवस आश्विन व. चतुर्दशी म्हणजे दिवाळीचा प्रथम दिवस. या दिवाळीच्या दिवसानें श्रीमंतांच्या राज्यलक्ष्मीचें कायमचेंच दिवाळें वाजविलें! पुण्यांतील सुख-वस्तु लोकांना हा दिवाळीचा सण मोठ्या आनंदाचा गेला! प्रत्येक जण इतका घाबरून गेला होता कीं, कोणाला पाणी पिण्याचेंसुद्धां धड भान राहिलें नाहीं!

याप्रमाणें कुंजर, निंबाजी भास्कर, शिंद्याचे सेनापति सदाशिवराव बक्षी यांनीं मोठ्या चातुर्यानें होळकराला उडवून देण्याची मसलत ठरविली होती. तिचा हा असा बोजवारा झाला! या लढाईत होळकराला जें अपूर्व यश आलें त्याचें श्रेय सर्वस्वीं त्याच्या पराक्रमालाच दिलें पाहिजे. यशवंतराव होळकर हा मराठी परंपरेंतील शेवटचा योद्धा होय. इंग्रज व फ्रेंच अंमल-दारांनीं तयार केलेल्या पलटणांनीं सर्व हिंदुस्थानांत चिकाटी, शिस्त आणि पराक्रम यांबद्दल मोठाच लौकिक संपादन केला होता. अशीं हीं पलटणें म्हणजे चालता बोलता अग्नीचा गोळा; त्याच्याशीं लढणें म्हणजे पतंगानें अग्नीवर झडप घालणेंच होय असा सार्वत्रिक समज झाला होता. परंतु होळकरांच्या शिंद्याशीं पांच-चार लढाया झाल्या त्यांत त्यानें असलीं दहा वीस पलटणें तुडवून टाकल्यामुळें हा भ्रम बहुतांशीं कमी झाला. माधवराव पेशव्यांच्या मरणानंतर मराठी फौजेंत शिस्त, धडाडी आणि उत्साह हे गुण पुनः दिसूं लागले, ते फक्त होळकराच्या फौजेंतच दिसूं लागले. त्या वेळीं या सद्गु-णांचा उपयोग राज्यवृद्धीकडे झाला, परंतु आतां मात्र आपसांतील यादवी-मुळें हेच सद्गुण राज्यनाशास पोषकच होऊन बसले! हा केवळ काल-महिमा होय. प्रतिकूळ परिस्थितीमुळें होळकराचें अनुकरण करणारा किंवा त्याच्या अनुभवाचा फायदा घेऊन त्याच्या युद्धकौशल्याची सुधारलेली नवी आवृत्ति काढणारा कोणीही वीर पुढें सरसावला नाहीं. तो मात्र एकटा नामर्दपणाच्या अंधःकारांत धूमकेतूप्रमाणें उदय पावला-दिपविणाऱ्या तेजानें

चमकला–आणि शेवटी त्याच अंधःकारांत अंतर्धान पावला!

असो. ज्यांना ताब्यांत घेण्यासाठीं होळकरानें इतका खटाटोप चालविला होता ते बाजीराव पेशवे यावेळीं काय करीत होते इकडे आतां लक्ष दिलें पाहिजे. होळकराविषयीं त्यांना पराकाष्ठेचें भय वाटत होतें हें पूर्वी सांगितलेंच आहे. त्याचा मुक्काम जसजसा पुण्याजवळ येत चालला तसतसा त्यांचा धीर सुटत चालला. होळकराचा मुकाम कवडिवर येतांच त्यांची अगदींच त्रेधा उडाली! बाह्यतः त्यांच्या युद्धाच्या आणि समेटाच्या खटपटी आणि वाटाघाटी संथपणानें चालू होत्या. परंतु लढाईपूर्वी तीन दिवस त्यांनीं आंतून कोंकणांत पळून जाण्याची तयारी अगदीं सज्ज करून ठेविली होती! उघडपणें पलायन करणें मात्र त्यांना सोईचें वाटत नव्हतें. एक तर त्यांच्या हालचालींवर कुंजराची सक्त देखरेख होती. दुसरी गोष्ट लढाईत होळकराचाच पराजय होईल अशी अंधुकशी आशा त्यांना अजूनही वाटत होती. शेवटीं कुंजर आणि शिंद्यांचे सरदार यांच्या प्रोत्साहनानें हुरूप चढून त्यांनीं लढाईचा निर्णय ठरेपर्यंत पुण्यांतच रहाण्याचा निश्चय ठरविला. लढाईच्या दिवशीं सरकारवाड्यांत स्वयंपाकाची मोठी धांदल उडून गेली होती! दिवाळीचें सुग्रास भोजन करून नंतर ते कुंजराच्या विनंतीप्रमाणें लढाईचा तमाशा पाहण्याकरितां बाहेर पडले. परंतु दुरून लढाईचा तमाशा पाहण्याचेंमुद्धां त्यांच्या नशीबीं नव्हतें! भवानी पेठेंत कोतवालचावडीपाशीं श्रीमंत येतात तोंच त्यांस लढाई बिघडल्याचें वर्तमान समजलें. हें वर्तमान येतांच श्रीमंत शनवारवाड्याकडे परत न येतां तसेंच पुढें सरकून पर्वतीच्या माळावर जाऊन उभे राहिले. चार-दोन घटकांत कुंजर, निंबाजी भास्कर वगैरे त्यांचे मुत्सद्दी मंडळ लढाईतून निभावून त्यांना सामील झाले. लढाईच्या पळापैकीं हजार पांचशें स्वारही त्यांजभोंवतीं गोळा झाले. इतक्यांत देवाचें चिंचवड येथें हरजी होळकर होता त्यास पेशव्यांच्या पलायनाची बातमी लागली आणि तो त्यांची वाट अडविण्याकरितां आरंभपाषाणमार्गें येऊं लागला. त्याच्या अघाडीच्या टोळ्या दिसूं लागतांच श्रीमंत पर्वतीहून वडगांवास गेले आणि

तेथील बागांत त्यांनीं रात्रीं थोडीशी विश्रांति घेतली. दुसरे दिवशीं मंगळवारीं श्रीमंत सिंहगडाच्या पायथ्याशीं डोणजे म्हणून गांव आहे तेथें मुक्काम गेले. या मुक्कामीं पुरंदरे, पानशे, पाटणकर वगैरे त्यांचे अनेक सरदार लढाईतून बचावून त्यांना येऊन मिळाले. त्या दिवशीं दोनप्रहरीं होळकरानें श्रीमंतांकडे मुदबखाचा कारखाना पाठविला. तिसरे प्रहरीं श्रीमंत व त्यांचे मुत्सद्दी यांचें भोजन झालें. ज्यांची कोठें भोजनाची सोय झाली नाहीं त्यांनीं त्या दिवशीं हुरड्यावरच कालक्षेप केला आणि ज्यांना हुरडाही मिळाला नाहीं त्यांनीं तो दिवाळीचा दिवस थंडया फराळानेंच साजरा केला!

मंगळवार बुधवार हे दोन दिवस श्रीमंत डोणज्यासच राहिले. या दोन दिवसांत 'कसें करूं काय करूं' हा महामंत्र त्यांच्या मनांत सतत घोळत होता. या प्रसंगीं कुंजर, निंबाजी भास्कर यांचा श्रीमंतांना एकच सल्ला मिळाला कीं, अमृतराव व होळकर यांचा विश्वास किंमपि धरूं नये. विठोजीच्या खुनाचा सूड घेण्यासाठीं होळकर आमचा प्राण घेतल्याशिवाय सोडणार नाहीं. येथून तावडतोब महाडास पळून जावें आणि कोंकणांत गेल्यावर ' जलचराशीं ' मैत्री जोडावी. तूर्त इंग्रजाशिवाय होळकराचें पारिपत्य करणारा दुसरा कोणी समर्थ दिसत नाहीं. सबब इंग्रजानें यावेळीं कोणत्याही अटी घातल्या तरी त्या कबूल करून त्याशीं सख्य जोडावें. एक वेळ सर्व राज्य इंग्रजाच्या घशांत जाण्याचा संभव पुरवला. परंतु यावेळीं होळकराचें पारिपत्य केलें तरच तरणोपाय आहे! उलटपक्षीं होळकराचे त्यांना सारखे निरोप येत होते कीं, श्रीमंतानीं विनाकारण घाबरून कोठेंही भडकून जाऊं नये. सरकाराशीं माझा वांकडेपणा कोणताही नाहीं. शिंद्याशी माझा तंटा आहे तो माझा मी पाहून घेतों. शिंद्याला नरम पाडण्याचें सामर्थ्य माझ्या मनगटांत भरपूर आहे! आपण खुशाल पुण्यांत परत यावें आणि राज्यांत जुने मुत्सद्दी व सरदार आहेत त्यांच्या सल्ल्यानें राज्यकारभार करावा. मजकडून आपणास कोणताही त्रास पोचणार नाहीं ही खात्री बाळगावी. विनाकारण भयभीत होऊन श्रीमंतांनीं भ्याड व स्वार्थी लोकांच्या नादीं लागूं नये आणि एखाद्या खोड्यांत सांपडून राज्य-

नाशास प्रवृत्त होऊं नये.' श्रीमंताभोंवती पानशे पुरंदरे वगैरे सरदार जमले होते त्यांनीं होळकराच्याच म्हणण्याला पाठिंबा दिला आणि अमृतराव व होळकर यांशीं वाटाघाट करून पुण्यास परत येण्याबद्दल—निदान कोंकणांत पळून न जातां आहे तेथेंच मुक्काम करून राहण्याबद्दल त्यांनीं श्रीमंतापाशीं सक्त रदबदल चालविली. या सरदार मंडळींच्या समजुतीसाठीं श्रीमंतांनीं बुधवारीं जुन्नरास अमृतरावाकडे सदाशिवपंत ओगले आणि पुण्यास होळकराकडे वैजनाथभट मामा भागवत आणि चिंतोपंत देशमुख असे गृहस्थ वाटाघाटीसाठीं रवाना केले. परंतु श्रीमंतांचें हें अवसान केवळ वरपांगी होतें. त्यांना आंतून कुंजरचा सल्लाच पूर्णपणें मानवला होता. कुंजराच्या शहाणपणावर आणि अकलेवर त्यांची तशीच अलोट श्रद्धा होती! शेवटीं सर्व जण नको म्हणत असतांही श्रीमंत गुरुवारीं सकाळीं मढें घाटानें खालीं उतरून परशुरामक्षेत्रीं अवतीर्ण झाले!!

श्रीमंतांच्या या अकल्पित पलायनानें त्यांच्या फौजेची अगदींच वाताहत झाली आणि त्या फौजेंतील शिलेदार आपापल्या सोईप्रमाणें वाट फुटेल तिकडे निघून गेले. बड्या मंडळींपैकीं कै॰ रघुनाथराव पेशवे यांचे दासीपुत्र कृष्णसिंग आणि भैरवसिंग, अलीबहादराचा मुलगा समशेरबहाद्दर आणि त्रिंबकराव पेठे हे पुण्यास अमृतरावाकडे परत आले. आबा पुरंदरे हा जरीपटका घेऊन आश्रयासाठीं सातारच्याच्या किल्ल्यावर जाऊन बसला. गोविंदराव पराजपे हा सिंहगडावर लपला. गणपतराव व यशवंतराव पानशे, विंचूरकर, रघुनाथराव कायगांवकर, यशवंतराव पाटणकर हे कुंभारल्याचे घाटानें कऱ्हाडास आले आणि तेथून करवीराकडे पळाले. इतर सरदारही असेच आपापल्या सोईप्रमाणें ठिकठिकाणीं दडून बसले. पेशवे मढें घाटानें खालीं उतरले तेव्हां त्यांचेबरोबर फक्त हजार पांचशे फौज पायदळ मिळून सरंजाम होता. पुण्याहून कोंकणांत जाणाऱ्या घाटांच्या चांगल्या नाकेबंद्या करवून श्रीमंत पाहिल्यानें रायगडास गेले. तेथें पांच चार मुक्काम करून नंतर त्यांची स्वारी महाडाजवळ विरवाडी येथें आली आणि तेथेंच कायमची मुक्काम करून राहिली. विरवाडीस पेशव्यांचा मुक्काम वे॰ गोविंदभट जोशी यांचे घरीं पडला होता. या मुक्कामीं कोंकणचे सरसुभेदार खंडेराव रास्ते हे

पांच सहाशे जमाव बरोबर घेऊन श्रीमंतांना लवकरच सामील झाले. पेशव्यांचें मुत्सद्दी मंडळ त्यांबरोबर महाडास गेलें त्याची नांवनिशी—१ बाळोजी कुंजर मंडळीसह. २,३ दिनकरपंत व बाळाजीपंत पटवर्धन. ४ निंबाजी भास्कर. ५ आपाजीपंत सहस्रबुद्धे. ६ धोंडोपंत गोडबोले. ७ विठ्ठलपंत वाकनीस. ८ गोविंदराव खासगीवाले. ९ रूपराम चौधरी. १० मनोहरगीर गोसावी ११ रामचंद्र गोसावी गवई. १२ राघोपंत भागवत. १३ नारायणराव वैद्य. १४ बळवंतराव नागनाथ. १५ दाजी देशमुख. पेशव्यांच्या प्रमुख प्रेमपात्रांपैकीं चिंतोपंत देशमुख आणि बैजनाथ-भट मामा भागवत या दोन गृहस्थांना पेशव्यांनीं कोंकणांत जाण्याच्या आदल्या दिवशींच पुण्यास होळकराकडे पाठविलें होतें. ते गृहस्थ मात्र तिकडेच अडकून पडले आणि आयतेच शत्रूच्या तावडींत सांपडले! बाकीचें त्यांचें सर्व मुत्सद्दीमंडळ त्यांच्या सेवेला महाडास हजर होतें. तात्पर्य, पेशव्यांच्या दरबारांत तूर्त मुत्सद्यांची गर्दी भरपूर होती. फौज आणि द्रव्य या बाजूनें मात्र त्यांची अगदींच दुर्दशा होती! लक्षावधि तरवारी म्यानांतून बाहेर निघाव्या अशी ज्यांची सत्ता—कोट्यावधींच्या जहागिरी इतरांना द्याव्या असें ज्यांचें सामर्थ्य—मोठमोठ्या सत्ताधीशांचीं सिंहासनें कंपित व्हावीं असा ज्यांचा दरारा, ते पेशवे आतां अन्नाला महाग होऊन एका भिक्षुकाच्या घरांत लपले होते आणि आपल्या कर्मदशेचें फळ भोगीत 'कसें करूं, काय करूं' हा महामंत्र तोंडानें घोकत होते! देवानें दिलें आणि कर्मानें नेलें ही म्हण रावबाजी पेशव्यांच्या बाबतींत शब्दशः खरी आहे!

लढाईनंतर होळकर वानवडीस शिंद्यांच्या वाड्यांत रहावयास आला आणि त्याचें लष्कर वानवडी, गुलटेकडी, गारपीर, पर्वती याप्रमाणें पुण्याच्या भोंवतीं तळ देऊन राहिलें. शिंदे आणि पेशवे यांचा पळ पुण्यांत आला त्यावेळीं त्याच्या पाठलागावर होळकराचें लष्कर पुण्यांत शिरलें असतें तर एका दिवसांतच त्या शहराचा विध्वंस झाला असता. परंतु होळकरानें राजधानीचा पूर्ण अभिमान धरून लढाईच्या प्रसंगीं असा कडेकोट बंदोबस्त ठेविला होता कीं, एवढी मोठी लढाई शेजारीं झाली परंतु त्या शहराला

तिचा बिलकूल उपसर्ग लागला नाहीं. कांही चोरटे पठाण पुण्यांत शिरून लूटमार करतांना आढळले त्यांची धिंड काढून होळकरानें त्यांचे जाहीररीत्या हातपाय तोडविले. त्यामुळें वचक बसून लढाईनंतरही पुण्याचा पूर्ण बचाव झाला. लढाईनंतर एक दोन दिवस सर्व बाजार बंदच होते. होळकराकडून नागो जिवाजी, हरनाथ आणि शेखजी हे तीन अंमलदार शहरच्या बंदोबस्तास आले. त्यांनीं बहुत खटपट करून आणि सर्वांना आश्वासनें देऊन सर्व बाजारपेठा खुल्या केल्या आणि सर्व व्यवहार चार आठ दिवसांतच पूर्व स्थितीस आणला.

कुंजर व शिंदे यांच्या पक्षीयांवर होळकराचा मनस्वी राग होता आणि त्यांना पळून जावयास अवसर सापडूं नये म्हणून पुणें शहराची पूर्ण नाकेबंदी करण्यांत आली होती. खुद्द पुणें शहरांत आणि प्रांतांत अशा लोकांचीं घरेदारें होतीं त्यांचा माग लावलावून नाश करण्यांत आला. महाळुंग्यास अंबोजी इंगळ्याचा वाडा होता तो लुटून जाळून भस्मसात् करण्यांत आला! त्याचप्रमाणें बाळाजीपंत करंदीकर, आपाजीपंत सदावर्ती, बाजीराव बर्वे, महादाजीपंत फाटक, खंडेराव रास्ते, ढमढेरे, बळवंतराव नागनाथ, आप्पाजीपंत सहस्रबुद्धे, नारायणराव वैद्य या गृहस्थांचीं घरें दरोबस्त लुटण्यांत आलीं. धोंडोपंत नेने, चिंतोपंत देशमुख, बैजनाथ भट मामा भागवत, आबा काळे, अंतोबा मूळ, बापू कुंटे, जिवाजीपंत नेने, अन्याबा अभ्यंकर, अन्याबा रहातेकर, केसोपंत साठे, बळवंतराव बाकडे, धोंडोपंत भागवत, या गृहस्थांचीं घरेंदारें लुटलीं जाऊन शिवाय त्यांना कोरड्याच्या माराखालीं यथेच्छ झोडपण्यांत आलें! दुल्लभदास हा कुंजराच्या मर्जीतला सावकार सबब त्याला कैदेंत ठेवून पंधरा दिवसपर्यंत त्याजकडून दररोज आठ हजार रुपये दंड वसूल करण्यांत येत होता! आबा काळे, चौधरी आणि गोसावी या पेशव्यांच्या तीन आवडत्या सरदारांचे पलटणी लोक पूर्वी शनवारवाड्याच्या रक्षणार्थ ठेवण्यांत आले होते. परंतु नागो जिवाजीनें त्यांचीं हत्यारें पातयारें आणि अंगावरचीं वस्त्रें हिसकून घेऊन त्यांना तशा स्थितींतच उधळून लाविलें! चिंतोपंत देशमुख आणि मामा भागवत या पेशव्यांच्या प्रेमपात्रांची तर होळकरानें इतकी अप्रतिष्ठा आणि हालहाल केले कीं, त्यांचें

वर्णन या ठिकाणीं नमूद न केलेलेंच बरें! आतांपर्यंत शिंद्यांनीं पुण्यास राहून राज्यांतील जुन्या लोकांचें वाटोळें करण्याचें महत्कृत्य केलें आणि आतां होळकराच्या तावडींत सांपडून नव्या लोकांचीही जवळ जवळ तीच दुर्दशा झाली. तात्पर्य, शिंदे होळकरांच्या सपाट्यांत जुने आणि नवे या दोघांचाही उच्छेद झाला आणि परकीयांच्या प्रवेशाला आयतेंच अनुकूल वातवरण निर्माण झालें!

शिंद्यांच्या पराजयामुळें पुणें दरबाराच्या वातावरणांत यक्षिणीची कांडी फिरल्याप्रमाणें चमत्कार घडून आला आणि जुने लोक निर्भयपणानें समाजांत वावरूं लागले. राघोपंत गोडबोले, जनोबा म्हैसकर, नारोबा शिराळेकर, भाऊ कावरे, धोंडोपंत नित्सुरे हे नानांच्या वेळचे मुत्सद्दी होळकराच्या दरबारांत शिरून त्याला उघडपणानें सल्लामसलत देऊं लागले. मार्जी पेशव्यांची स्त्री यशोदाबाई हिची रायगडाहून मुक्तता करावी याबद्दल होळकरानें बहुत खटपट केली. परंतु पेशव्यांनीं त्या स्थळाचा उत्तम बंदोबस्त ठेविला होता त्यामुळें त्याचा इलाज चालला नाहीं. जुन्या लोकांपैकीं मोरोबादादा फडके, मोरोपंत दामले (चिमाजी आप्पांचे सासरे) आणि मोरोबादादा फडनवीस हे विजापूरच्या किल्ल्यावर; बाबा, आत्या, पांडोबा, परशुरामभाऊ वगैरे फडके मंडळी पुरंदरच्या किल्ल्यावर; शामराव, काशीराव वगैरे रास्ते मंडळ सिंहगडच्या किल्ल्यावर; नारोपंत चक्रदेव, बजाबा शिराळेकर हे इडसरच्या किल्ल्यावर याप्रमाणें नानांच्या वेळची बहुतेक मंडळी निरनिराळ्या किल्ल्यावरून कैदेंत पडली होती. परंतु होळकराच्या दपटशामुळें या सर्व लोकांची लवकरच मुक्तता झाली. शिंद्यांच्या पराजयामुळें ही सर्व मंडळी बहुत खूप होऊन पुण्यास होळकराच्या आश्रयाखालीं एकत्र झाली आणि त्यांना क्षणभर रामराज्य जवळ आल्याचा भास झाला! परंतु हा त्यांचा आनंद फार वेळ टिकण्यासारखा नव्हता. कारण या मंडळींना तूर्त नुसतें दूधच दिसत होतें, परंतु त्यामागें उभा असलेला होळकराचा बडगा त्यांना अजून दिसावयाचा होता!

होळकराला दक्षिणेंत आणण्यांत अमृतरावांनीं विशेष पुढाकार घेतला होता त्यामुळें होळकरानें त्यांचा मोठाच बडेजाव ठेविला. आनंदराव

होळकर हा त्यांना सन्मानानें पुण्यास आणण्याकरितां मुद्दाम जुन्नरास गेला होता आणि त्यांची स्वारी पुण्यास आली तेव्हां यशवंतरावानें त्यांना वीस हजार फौजेनिशीं सामोरे जाऊन त्यांचा बहुत गौरव केला आणि या प्रसंगा-निमित्त खुशालीच्या शंभर तोफा मारिल्या. अमृतराव, दादा फडनवीस आणि बाबा फडके ही सर्व मंडळी बांबवड्यास पेठे यांचे वाड्यांत राहिली होती आणि तेथून त्यांच्या स्वाऱ्या दररोज कामकाजानिमित्त पुण्यास येत. अमृतरावानें पुण्यास येतांच सर्व राज्यकारभार हातीं घेतला आणि त्यांच्या हाताखालीं सर्व जुने अंमलदार आपापल्या कामावर रुजू झाले. होळकराच्या धाकामुळें पुणें दरबाराचा लवकरच असा कडेकोट बंदोबस्त झाला कीं, अमृतरावाच्या हुकमाखेरीज इकडचें पान तिकडे हालूं नये! ता २३ नोव्हें. रोजीं होळकरानें जलमेचें पाणी घेतलें त्यावेळींही मोठाच समारंभ करण्यांत येऊन खैरेच्या बावन तोफा मारण्यांत आल्या आणि त्याच्या पदरच्या सरदारांनीं आणि मानकऱ्यांनीं त्याला नजरा केल्या. अमृतरावांनीं या प्रसंगानिमित्त होळकरास बहुमानाचीं वस्त्रें, कंठी, शिरपेंच, मोत्याचा तुरा आणि रुप्याच्या अंबारीचा हत्ती दिला. तात्पर्य, अमृतराव आणि होळकर यांनीं परस्परांचे बाह्यतः काय बहुमान करावयाचे ते सर्व केले. परंतु आंतून मात्र त्यांची थोडीबहुत धुसफूस चालू होती. कारण पेशव्यांच्या पलायना-मुळें त्यांच्या कारस्थानाचा जम प्रथमपासूनच विस्कळित झाला होता आणि 'किमतः परम्' पुढें काय? हा मोठाच प्रश्न त्यांच्यापुढें दत्त म्हणून उभा राहिला होता! अमृतराव, दादा फडनवीस, बाबा फडके आणि होळकर यांच्या शनवारवाड्यांत दररोज बैठकी होत आणि त्यांमधून निरनिराळ्या मसलतींची सांगोपांग चर्चा होऊन त्यांचे निर्णय लावण्यांत आले. त्या मसलती अशा—

नोव्हेंबर–डिसेंबर १८०२

१ अठाईस लागलेल्या जलमा बऱ्या झाल्यावर स्नान करीत त्यास 'जलमेचें पाणी घेणें' असें पूर्वी म्हणत. या प्रसंगीं प्रत्येक जण आपापल्या शक्तीप्रमाणें लहान मोठा समारंभ करी.

१. पहिली महत्वाची बाब चर्चेस निघाली ती होळकरास द्यावयाच्या द्रव्याची. होळकर दक्षिणेंत आला तो फौज, पायदळ, तोफा, पलटणें अशा जंगी सरंजामानिशीं आला होता आणि त्यापायीं त्याला कोट्यावधि रुपयांचें कर्ज उभारावें लागलें होतें. अमृतराव पुण्यास येतांच त्यांजकडे होळकरानें सक्त तगादा बसविला कीं, ' पूर्वी करारांत ठरल्याप्रमाणें मी शिंद्याचा पराजय करून तुम्हां सर्वांस निर्धास्त केलें आहे. यापुढेंही तुम्हांस शिंद्याचा उपसर्ग लागणार नाहीं, याबद्दलची हमीदारी मी माझ्या शिरावर घेतों. आतां तुम्ही राज्याचा वाटेल तसा बंदोबस्त करा. मुख्य गोष्ट—तुम्ही या कामगिरीबद्दल मला एक कोट रुपये द्यावयाचे कबूल केलें आहे. ते रुपये तुम्ही मला ताबडतोब आत्तांच्या आत्तां द्या. फौजेच्या देण्यामुळें माझी कशी हैराणगत झाली आहे हें तुम्हांस दिसतच आहे. ' होळकराच्या या मागणीवर अमृतरावांना कांहींच उत्तर देतां येण्याजोगें नव्हतें त्यांनीं होळकरास एक कोट रुपये द्यावयाचें कबूल केलें होतें हें खरें, परंतु ते आणि त्यांचे सहकारी फडनवीस आणि फडके हे सर्व अगदीं निष्कांचन असल्यामुळें या ' देणें ' प्रकरणाची कशी वासलात लावावी आणि रुपये कोठून आणि कसे उत्पन्न करावे याचा निर्णय लावण्याची फारशी भानगड पडली नाहीं. कारण मुत्सद्यांनीं बसून वाटेल तशीं कारस्थानें करावीं आणि सरदारांनीं आपापसांत मारामाऱ्या कराव्या आणि दोघांनीं मिळून बिचाऱ्या रयतेला नाहक लुबाडावें असा रावबाजी पेशव्यांच्या कारकीर्दीत दंडकच पडून गेला होता! त्यास अनुसरून पुणें शहरापासून पंचवीस लक्षांची पट्टी वसूल करावी आणि त्या द्रव्यानें होळकराची तूर्तची नड भागवावी असा ठराव पुणें दरबारांत सर्वानुमतें पसार झाला! या पट्टीच्या वसुलाची सर्वाध्यक्षता हरीपंत भावे या गृहस्थाकडे देण्यांत आली आणि त्याच्या मदतीस नागो जिवाजी, हरनाथसिंग आणि शेळजी या तीन होळकराच्या सरदारांचें सल्लागारमंडळ नेमण्यांत आलें. होळकराची थोडीशी पठाणी फौजही भाव्यांच्या दिंमतीस हजर होती. हरीपंत भावे आणि त्याचे सल्लागार आणि त्यांच्या हाताखालचीं बुभुक्षित पठाणी मर्कटें यांनीं द्रव्यासाठीं पुणेंशहरांत मारझोड करून लवकरच अशी दंगल उडवून दिली

कीं, तेथील रहिवाशांस साक्षात् यमपुरींत वास्तव्य केल्याचा अनुभव क्षणो-क्षणीं येऊं लागला ! या हकिगतीचा जास्त तपशील पुढील प्रकरणांत देणें जास्त सोईचें असल्यामुळें तेथेंच तो देण्यांत येईल.

२. दुसरी महत्वाची बाब चर्चेस निघाली ती 'नवी मुद्रा' करण्याची. या बाबतींत होळकराचें म्हणणें पडलें कीं, 'श्रीमंतांनीं पुण्यास रहावें या बद्दल आम्ही शिकस्तीचे प्रयत्न केले परंतु आम्हां सर्वांचा अविश्वास मानून त्यांनीं कोंकणांत पलायन केलें आहे. यापुढें ते इंग्रजांच्या आश्रयास जाणार ही गोष्ट स्पष्ट दिसत आहे. अशा या पळपुट्या पेशव्याच्या नादीं लागण्यांत काय अर्थ ? त्यांच्या पलायनाचा अर्थ त्यांनीं पेशवे पदावरचा हक्क सोडला असाच आपण घेतला पाहिजे. अमृतरावांचा मुलगा विनायक-राव हा कै. सवाई रावसाहेब यांचा दत्तक पुत्र आहे असें समजून आपण 'बाळाजी माधवराव' या नांवानें राज्यकारभार चालवावा. बाजीरावाला पदभ्रष्ट केलें म्हणजे सर्वांना संतोष वाटेल आणि इंग्रजांशीं लढण्याचा प्रसंग पडला तरी सर्व मराठ-मंडळाचें आम्हांला सहाय्य मिळेल. मराठी राज-कारणांत आज बरींच वर्षें कोणतेंच चढाईचें धोरण शिल्लक राहिलेलें नाहीं. त्यामुळें आपआपसांत द्वेष, फितूर आणि मारामाऱ्या यांना ऊत आला आहे. लष्करी सामर्थ्य ही एक विपारी तरवार आहे. ही तरवार उद्योगी राष्ट्राच्या हातांत पडली तर त्या राष्ट्राचा अभ्युदय होऊन शत्रूंचा नाश होतो आणि निरुद्योगी राष्ट्राच्या हातांत गेली तर मात्र ती त्या राष्ट्रावरच उलटून पडते आणि त्याच्या नाशास प्रवृत्त होते. यासाठींच दरवर्षीं कोठें तरी मुलुखगिरी-वर जावयाची आम्हां मराठ्यांची पूर्वापार वहिवाट आहे. या नव्या मुद्रेच्या मसलतीनें इंग्रजांशीं लढण्याचा प्रसंग आला तर ती एक इष्टापत्तीच आहे. तसें न जुळेल तर आपण कोठें तरी मुलुखगिरीवर जाऊं या. होळकराचा हा सल्ला अमृतराव वगैरे मंडळीस मानवला नाहीं. त्यांचें म्हणणें पडलें कीं, श्रीमंत पळून गेले एवढ्यावरूनच त्यांनीं पेशवेपदावरचा वारसा सोडला असें होत नाहीं. ते पुण्यास परत कधींच येणार नाहींत ! शिवाय ही 'नव्या मुद्रे'ची मसलत वाटते तितकी सोपी नाहीं. केवळ अनिर्वाह पक्ष म्हणूनच शेवटीं ती अंमलांत आणावी.' याप्रमाणें बरीच चर्चा होऊन ही

मसलत बाजीराव प्रत्यक्ष इंग्रजांच्या आश्रयास जाईतोंपर्यंत तहकूब ठेवण्यांत आली.

३. तिसरा महत्वाचा मुद्दा निर्णयास आला तो पेशव्यांची समजूत करून त्यांस पुण्यास परत आणण्याचा. श्रीमंत पुण्याहून हालल्यापासून त्यांजकडे होळकर व अमृतराव यांचे सारखे निरोप व पत्रें जात होतीं कीं, 'तुम्ही उगीच घाबरून कोठें तरी भडकून जाऊं नये. खुद्द तुमच्याशीं आमचें वैर कोणतेंच नाहीं. आमचें तुम्हांला कां भय वाटतें हेंच आम्हांला समजत नाहीं. तुम्ही खुशाल पुण्यास परत यावें आणि पूर्वीप्रमाणें राज्याचा उपभोग घ्यावा ' पेशव्यांची समजूत करून त्यांना पुण्यास परत आणण्याकरितां सर्वांच्या आग्रहावरून खुद्द पाराशरपंत महाडास जाणार होता. परंतु चार आठ दिवस ताप येऊन तो ता. १३ नोव्हें. रोजीं एकाएकीं मृत्यु पावला त्यामुळें तो बेत तितकाच राहिला. अमृतरावांच्या बहुतेक पत्रांचीं उत्तरें श्रीमंतांकडून आलीं त्यांतून एकच मजकूर होता कीं, होळकरासारख्या उपटसुंभाच्या नादीं लागण्यांत तुमचा परिणाम लागणार नाहीं. तुम्ही इकडे आम्हांजवळ महाडास यावें. तुम्ही आम्ही मिळून एखादी मसलत उभी करून होळकराचा नाश करूं या. होळकरानें पेशव्यांना पुष्कळ पत्रें पाठविलीं आणि त्यालाही शेवटीं श्रीमंतांकडून उत्तर मिळालें. त्या उत्तरांत असा मजकूर होता कीं, 'तुमच्याकडे आम्ही बाटाघाटीसाठीं चिंतोपंत देशमुख आणि मामा भागवत या दोन गृहस्थांना पाठविलें त्यांची तुम्ही चांगलीच संभावना केलीत ! तुमचे काय हेतु आहेत हें आम्ही पूर्णपणें जाणून आहों. तुम्हास याउप्पर काय सांगावयाचें असेल तें देशमुख व भागवत या उभयतांस समजून सांगावें आणि त्यांची कशी ती समजूत करून त्यांना आम्हांकडे पाठवावें. हे दोन गृहस्थ आम्हांकडे परत आल्याशिवाय आम्हांला तुमच्याशीं कोणत्याही बाबतींत बोलावयाचें नाहीं. तात्पर्य, श्रीमंत सुखेपणानें पुण्यास परत येतील असा संभव अमृतराव व होळकर यांना विशेषसा दिसत नव्हता.

शेवटची महत्वाची बाब चर्चेस निघाली ती मराठमंडळांत पुनः एकजूट उत्पन्न करण्याची. ही बाब मात्र सर्वांत ज्यास्त महत्वाची आणि सर्वांत

ज्यास्त भानगडीची होती. मराठी राज्यांत शिंदे, होळकर, गायकवाड भोसले, पटवर्धन आणि रास्ते हे महत्वानें मोठे आणि फौजबंद सरदार होते. त्यांपैकीं गायकवाड हे आगाऊच इंग्रजांच्या आहारीं सांपडले होते. बाकीच्या सरदारांपैकीं पटवर्धन व रास्ते यांची अनुकूलता होळकरास सहज मिळण्यासारखी होती. भोसल्यांची अनुकूलता होळकरानें आगाऊच मिळविली होती. बाकी राहिले शिंदे व होळकर. त्या दोघांचें सख्य कसें जोडावें हाच मोठा भानगडीचा विषय होता. या बाबतींत होळकरानें आपल्या तर्फेचा खुलासा तावडतोब आणि मोठ्या आनंदानें केला. श्रीमंत पुण्याहून हालल्याबरोबर त्यानें शिंद्यांस पत्रें पाठविलीं कीं, ' पेशवे विनाकारण घाबरून कोंकणांत पळून गेले आहेत. तेथून ते इंग्रजांच्या आश्रयास जाणार ही गोष्ट आतां स्पष्टपणें दिसत आहे. एकदां इंग्रजांचा पाय मराठी दौलतींत शिरल्यावर मग कुठले शिंदे आणि कसचे होळकर अशी स्थिति प्राप्त होईल. प्रसंग आणीबाणीचा आहे. पूर्वीच्या सर्व गोष्टी विसरून आतां तरी तुमचें व माझें सख्य होऊं द्या. आम्हां दोघांचा समेट झाला तरच मराठी राज्याचा तरणोपाय आहे. मुख्य गोष्ट—पेशवे इंग्रजांच्या आश्रयास न जातील असे उपाय तुम्ही तावडतोब अमलांत आणा. ' तात्पर्य होळकरानें आपल्या तर्फेनें शिंद्यासमोर समेटाचा हात पुढें केला परंतु तो हात स्वीकारण्याची शिंद्यांची तयारी नव्हती. लढाईत होळकरांचा नाश करण्याची त्यांना अजूनही खुमखुम वाटत होती!

नोव्हेंबरच्या दुसऱ्या तारखेस शिंद्याना या भयंकर पराजयाचें आणि पेशव्यांच्या पलायनाचें वर्तमान समजलें आणि त्यामुळें ते तत्काळ खडबडून जागे झाले. आतापर्यंत त्यांचा सर्व कारभार यादवराव भास्कर बक्षी दिवाण यांच्या तंत्रानें चालला होता. परंतु या पराजयानें बक्षी निस्तेज पडला आणि त्यांच्या दरबारांत पुन: सर्जेराव घाटग्याचें प्राबल्य वाढलें. घाटगे हा होळकर आणि इंग्रज या दोघांचाही पक्का द्वेष्टा होता. घाटग्याच्या प्रेरणेवरून शिंद्यांनीं पेशव्यांस तावडतोब पत्रें पाठविलीं कीं, आपण महाडास जाऊन जीव बचावलांत हें ठीकच केलेंत. यापुढें आपला इंग्रजांच्या आश्रयास जाण्याचा विचार आहे असें दिसतें. हा आपला विचार

अगदींच वाईट आहे. तो कदापि अंमलांत आणूं नये. एकदां आपण इंग्रजांच्या जाळ्यांत गुरफटलां म्हणजे त्यांतून आपली सुटका केव्हांही व्हावयाची नाहीं. होळकराच्या पारिपत्याची एवढी काय मातब्बरी आहे कीं, ज्यासाठीं आपण सर्वस्वावर लाथ मारून परकीयांचा आश्रय पतकरावा! होळकराचा नाश करण्याचें काम आमच्या हातून अजूनही होण्यासारखें आहे. आतां आम्ही त्या कामासाठीं मुद्दाम दक्षिणेत येत आहों. आम्ही येईतोंपर्यंत तरी आपण धीर धरावा आणि इंग्रजांकडे जाऊं नये.' शिंदे अशीं पत्रें पाठवूनच थांबले नाहींत तर ते खरोखरीच उद्योगास लागले. त्यांच्या हुकमावरून त्यांच्या सरंजामांत ठिकठिकाणीं (कलमजारी लष्करभरती) सुरू झाली. यशवंतराव घोरपडे, अंबोजी इंगळे, तालभूपाळकर पठाण, उमरावगीर गोसावी, जयपूर, जोधपूर येथील रजपूत राजे आणि धारकर, पवार या सर्वांस शिंद्यांनीं उज्जनीस बोलावून घेतलें. त्यांचा सरसेनापति मुसा पिरू हा दिल्ली प्रांतांत होता त्यास आणि हाशी प्रांतीं लोई फिरंगी होता त्यास उज्जनीकडे तांतडीनें येण्याविषयीं शिंद्यांचा तगादा बसला. नोव्हेंबरच्या दुसऱ्या पंधरवड्यांत शिंद्यांनीं रामचंद्र भास्कर बक्षी यांबरोबर पांच पलटणें आणि पांच हजार फौज असा सरंजाम देऊन त्याची सत्वा-सच्या घाटानें चिटणिसाकडे बऱ्हाणपुरास रवानगी करून दिली. या फौजेच्या मागोमाग सुमरूच्या बेगमेचीं पांच पलटणें आणि अव्वल कंपूपैकीं पांच पलटणें अशीं आणखीं दहा पलटणें त्यांच्या हुकमावरून त्याच मार्गानें बऱ्हाणपूरची वाट चालूं लागली. डिसेंबर महिन्यांत खुद्द शिंद्यां-चाही तळ उज्जनीहून हालला आणि ते दक्षिणेस अलीकडे चार मजली आले आणि नंतर त्यांनीं आपला मोर्चा थेट बऱ्हाणपुराकडे वळविला.

याप्रमाणें शिंद्यांनीं होळकराशीं लढाई चालू ठेवल्याचें धोरण स्पष्टपणें जाहीर केलें आणि तें धोरण ओळखून गोपाळराव चिटणीस बऱ्हाणपुरास होते त्यांनीं होळकराच्या मुलखांत आगाऊच धामधूम सुरू केली होती. लढाईतून शिंद्यांचे सेनापति सदाशिवराव बक्षी आणि कांहीं सैनिक जीव बचावून पळाले ते आणि शिंद्यांचीं पांच पलटणें सदाशिवराव बक्षीच्या साहाय्यार्थ नगरास पूर्वीं आलीं होतीं तीं आणि रामचंद्र भास्कर यांनीं उज्ज-

नींहून नवी फौज आणली ती अशी सर्व फौज नोव्हें. अखेरीस चिटणिसांच्या हाताखालीं ब-हाणपुरास एकत्र झाली. या फौजेच्या बळावर चिटणिसांनीं खानदेशावर स्वारी केली आणि धुळें सोनगीर पर्यंत शत्रूचा अंमल उठवून लाविला आणि ब-हाडाच्या बाजूस आजंठ्याच्या घाटापर्यंत होळकराचा मुलूख मारून ताराज केला. चिटणिसाशीं तोंड देण्याकरितां जिवाजी यशवंत आणि हरजी होळकर हे दोघे खानदेशप्रांतीं आले. परंतु त्यांची फौज थोडी होती, त्यामुळें त्यांच्या हातून शिंद्यांच्या फौजेचा प्रतिकार विशेषसा होऊं शकला नाहीं. सबब डिसेंबरच्या दुसऱ्या पंधरवड्यांत शामतखान पठाणाला वीस हजार फौजेनिशीं खानदेश-नगर प्रांतीं पाटवावें अशी चर्चा पुणें दरबारांत सुरू झाली.

होळकर दक्षिणेंत आला तो मुख्यत्वें आपला शिंद्याशीं तंटा आहे त्याचा बराबाईट सोक्षमोक्ष पुणें दरबाराकडून लावून घ्यावा याच उद्देशानें आली होता. परंतु त्याच्या या येण्यानें त्या तंट्याचा उपशम न होता तो दिवसेंदिवस ज्यास्तच भडकत चालला आहे असें दिसूं लागलें. शिंद्यांचें सामर्थ्य अफाट होतें तर होळकराचा पराक्रम अचाट होता! असे हे अफाट सामर्थ्याचे आणि अचाट पराक्रमाचे दोघे मराठी रणमल्ल स्वार्थ आणि अहंकार यांच्या अभिनिवेशानें उद्दीपित होऊन परस्परासमोर दंड थोपटून उभे ठाकले होते आणि त्यांच्या रणगर्जनेनें मराठ्यांचें राजकीय वातावरण प्रत्यही दुमदुमून जात होतें आणि त्यांच्या सामर्थ्याच्या धक्क्यानें प्रांतचे प्रांत उध्वस्त होत होते! इकडे मराठी राज्यांत असा धिंगाणा चालू असतां मराठी राज्याचे सर्वाधिकारी—खावंद रावबाजी पेशवे हे कोंकराप्रमाणें भयभीत होऊन विरवाडीस एका भिक्षुकाच्या घरीं लपले होते आणि 'कसें करूं काय करूं' हा महामंत्र तोंडानें घोळत होते! आतां हें कोंकरूं आश्रयासाठीं नेमकें खाटिकाच्या घरांत शिरणार ही गोष्ट सर्वांस स्पष्टपणें दिसत होती. शिंदे—होळकरांचें आपापसांत वैर कितीही तीव्र असलें तरी पेशव्यांनीं इंग्रजांच्या घरीं जाऊं नये याबद्दल मात्र दोघांचें ऐकमत्यच होतें आणि त्या दृष्टीनें दोघांचेही प्रयत्न सतत सुरू होते. इंग्रजांच्या भावी वर्चस्वाचें दोघांनाही मनस्वी दुःख होत होतें, परंतु त्याचीं कारणें मात्र वेग-

वेगळीं होतीं. शिंद्यांना दुःख वाटत होतें, आपलें पुणें दरबारांतील वर्चस्व नाहींसें होणार म्हणून आणि होळकराला वाईट वाटत होतें मराठी राज्य बुडणार म्हणून !

असो. आतांपर्यंत शिंदे होळकर आणि पेशवे यांचे रागलोभाचे धागे-दोरे आणि हर्षामर्षाचे प्रसंग आम्ही तपशीलवार उलगडून सांगितले आहेत. आतां त्यांचे प्रतिस्पर्धी जे इंग्रज त्यांचा यावेळीं काय उद्योग चालला होता इकडे थोडेसें लक्ष दिलें पाहिजे.

आतांपर्यंत मराठे लोक इंग्रजांना शत्रु किंवा मित्र या नात्यानें तुच्छच समजत होते. इंग्रजांच्या सामर्थ्याची त्यांना पूर्णपणें जाणीव होती. परंतु इंग्रज लोक दगाबाज आहेत—त्यांच्या बोलण्यांत, लिहिण्यांत आणि वागण्यांत फार पाचपेंच असतात.—स्वार्थासाठीं ते लोक कोणत्याही कर्मास चुकणार नाहींत—त्यांच्याशीं व्यवहार करायचा तर तो शक्य तेवढ्या दूर अंतरावरूनच केला पाहिजे, असा नाना फडनवीसांचा ठाम ग्रह झाला होता आणि तोच ग्रह बहुतेक सर्व जबाबदार मराठ्यांमध्यें तंतोतंत उतरला होता. त्यामुळें मराठमंडळांत एवढी भयंकर यादवी माजली. परंतु तिचा आतांपर्यंत इंग्रजांना विशेषसा फायदा घेतां आला नाहीं. परंतु त्यांचें नशीब सवाई शिकंदर, त्यामुळें आतां असा बनाव घडून आला होता कीं, सर्व मराठ्यांच्या विरोधास न जुमानतां खुद्द मराठी राज्याच्या खावंदानें मराठी राज्याच्या पुण्याईचें उदक इंग्रजांच्या हातावर आपखुषीनें सोडावें ! असा हा दैवघटित बनाव बनत असतांना स्वतः इंग्रजांनीं त्याप्रीत्यर्थ काय काय प्रयत्न केले त्यांचें मर्म नीट समजण्याकरितां त्यांचीं कारस्थानें आणि त्यांच्या चळवळी यांची थोडीबहुत माहिती येथें नमूद केली पाहिजे.

युरोपियन राष्ट्रांपैकीं इंग्रज व फ्रेंच या दोन राष्ट्रांचा संबंध हिंदी राजकारणाशीं विशेष प्रामुख्यानें येतो. हीं दोन्हीं राष्ट्रें हिंदी साम्राज्य काबीज करण्याविषयीं झटत होतीं आणि त्यांचें आपापसांत अतिशय वैर होतें. युरोपियन लोकांचा हिंदी राजकारणांत प्रवेश झाल्यापासून त्या राजकारणाचें स्थानिक महत्व कमी होऊन त्याला एक प्रकारचें आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झालें होतें. इंग्रज काय आणि फ्रेंच काय—दोघांचाही पराक्रम आणि व्याप फार मोठा

—व्यापारानिमित्त सर्व जगभर त्यांचा संचार चालू होता. कोणत्याही देशांत त्यांनीं प्रवेश केला तरी त्या ठिकाणीं ते केवळ परकी म्हणून वास्तव्य करीत आणि त्यांचें लक्ष नेहमीं स्वदेशाकडे असे आणि स्वदेशांत ज्या चळवळी होत आणि जीं राजकीय धोरणें ठरविलीं जात त्यांचाच प्रतिध्वनि त्यांच्यामार्फत सर्व जगभर उमटत असे. स. १७८९ सालीं फ्रान्समध्यें प्रसिद्ध राज्यक्रांति झाली आणि त्यानंतर लवकरच नेपोलियन् बोनापार्टचा उदय होऊन त्याच्या नेतृत्वाखालीं फ्रेंचांची युरोपखंडांत अकल्पित भरभराट झाली आणि त्यामुळें इंग्रज व फ्रेंच यांच्या वितुष्टाला सर्व जगभर जास्तच जोर चढला. स. १७९० पासून इंग्रजांनीं भगीरथ प्रयत्न करून निरनिराळ्या हिंदी दरबारांतील फ्रेंचांचें उच्चाटण चालविलें होतें आणि जो राजा फ्रेंचांबद्दल पक्षपात दाखवी त्यावर इंग्रजांची पराकाष्टेची अवकृपा होत असे. स. १७९९ सालीं जेव्हां इंग्रजांनीं टिपूवर स्वारी केली, त्यावेळीं गरीब बिचाऱ्या नायर लोकांवर टिपूनें नाहक जुलूम चालविला आहे आणि जणु काय त्यांच्या संरक्षणाकरितांच इंग्रज टिपूवर स्वारी करीत आहेत असा सार्वत्रिक देखावा दाखविण्यांत येत होता. परंतु हा देखावा म्हणजे एकप्रकारची राजकीय धूळफेंक होती. वस्तुतः टिपूनें नायर लोकांवर जुलूम केले किंवा नायर लोकांनीं टिपूवर जुलूम केले तरी त्याचें सोहेर सुतक इंग्रजांना थोडेंच होतें ! टिपूनें नेपोलियनशीं संधान बांधून इंग्रजांच्या नाशाकरितां त्याची स्वारी हिंदुस्थानांत आणण्याचा प्रयत्न चालविला होता त्यामुळेंच त्यावर इंग्रजांची भयंकर इतराजी झाली होती आणि त्या गोष्टीचें प्रायश्चित्त म्हणून त्यांनी त्यावर स्वारी करून आणि त्याला ठार मारून त्याचा समूळ उच्छेद केला ! फ्रेंच लोक हें एक अत्यंत अनीतिमान राष्ट्र आहे—त्यांची समाजरचना, त्यांचीं नीतितत्त्वें, त्यांचीं राजकीय धोरणें हीं सर्व मानवजातीला कलंक लावणारीं आहेत अशी घोषणा इंग्रजांनीं सर्व हिंदी दरबारांतून यावेळीं चालू ठेविली होती.

यापुढें फ्रेंचांना हिंदुस्थानांत कोठें पाऊल ठेवायलासुद्धां जागा राहूं नये या हेतूनें सर्व हिंदुस्थान आपल्या आधिराज्याखालीं आणावें अशी महत्वाकांक्षा यावेळीं इंग्रजांच्या मनांत उद्भवली होती आणि त्या हेतूची प्रास्ताविक

तयारी म्हणून 'सब्सिडियरी अलायन्स' 'पगारी मैत्री' नांवाची नवीन टूम काढून त्या जाळ्यांत एकेक हिंदी सावज पकडण्याचा त्यांचा क्रम चालू होता. या पगारी मैत्रीची सामान्य कल्पना अशा स्वरूपाची होती—

१ हिंदी राजानें आपल्या संरक्षणार्थ इंग्रजांचीं कांहीं पलटणें आपल्या राजधानींत कायमचीं ठेवून घ्यावीं आणि त्यांच्या खर्चासाठीं आपल्या राज्यांपैकीं इंग्रजांना मुलूख तोडून द्यावा. या पलटणांवरची सर्व मालकी इंग्रजांकडे असावी आणि तोडून दिलेला मुलूख हाही इंग्रजी राज्याचा भाग समजावा.

२ हिंदी राजानें इंग्रजांच्या दोस्तीवर नजर देऊन आपले सर्व राजकीय संबंध त्यांच्या तंत्रानें चालवावेत आणि स्वतःच्या मांडलिकांविरुद्ध किंवा परकीय राजाविरुद्ध कोणतीही गोष्ट करावयाची तर ती त्यानें इंग्रजांच्या सल्ल्याप्रमाणेंच करावी.

३ इंग्रजांची दोस्ती पतकरल्यावर हिंदी राजानें त्या दोस्तीचा अर्थ असा समजावा कीं, जे इंग्रजाचे दोस्त आहेत ते आपलेही दोस्त आहेत आणि जे इंग्रजाचे शत्रु तेच आपलेही शत्रु आहेत आणि त्या अनुरोधानें त्यानें आपली वागणूक ठेवावी. इंग्रजांना प्रतिकूल असणाऱ्या कोणाही मनुष्यास त्यानें आपल्या राज्यांत राहूंसुद्धां देऊं नये.

४ लढाईच्या प्रसंगीं हिंदी राजानें आपलें सर्व सैन्य आणि लढाऊ सामान इंग्रजांच्या दिमतीस द्यावें आणि तशीच जरूर पडेल तर त्यानें दोस्तीखातर आपली सर्व दौलत तात्पुरती इंग्रजांच्या सेवेला सादर करावी.

५ एकदां इंग्रजांची दोस्ती पतकरल्यावर एखादा भानगडीचा प्रश्न उपस्थित झाला तर त्या बाबतींत हिंदी राजानें इंग्रजांचा निर्णय बिनशर्त मान्य करावा.

इतक्या गोष्टी हिंदी राजानें मान्य केल्यावर इंग्रज आपल्यातर्फे जाहीर करीत कीं, हा राजा आमचा दोस्त आहे आणि अंतःस्थ आणि बहिःस्थ शत्रूंपासून त्याचें संरक्षण करण्याची सर्व जबाबदारी आम्ही आपल्या शिरावर घेतली आहे.

असले हे दोस्तीचे तह ठरवितांना अधूनमधून न्याय, सत्यप्रियता, करारांचें पावित्र्य असले बरेच दरबारी अर्थशून्य शब्द उपयोगांत आणलेले आहेत आणि ते शब्द वजा जातां जो तात्पर्यार्थ शिल्लक राहतो तो वर दिला आहे. या पगारी मैत्रीच्या मिषानें इंग्रजांचे अनेक फायदे झाले. दुसऱ्यांच्या राज्यांत राजरोसपणें संचार करतां येऊन तेथील जुनीं भांडणें उकरून काढून किंवा नवीन कलागती निर्माण करून त्यांना स्वतःचा फायदा करून घेतां आला—दुसऱ्याच्या राज्यावर देखरेख ठेवण्याच्या निमित्तानें त्यांचें राजकीय महत्व वाढलें—त्यांचा मुलूख आणि लष्कर यांची आपोआपच वाढ होत गेली—आणि त्यांचे शत्रु जे फ्रेंच त्यांचे हिंदुस्थानांतून परभारेंच उच्चाटण झालें! मुख्य गोष्ट—स्वतःला दमडीचीसुद्धां तोशीस न लागतां सर्व फायदे इंग्रजांच्या पदरांत पडावेत आणि सर्व खर्चमात्र हिंदी राजांच्या वांटणीला जावा अशी या पगारी मैत्रींत मोठीच सोय होती! एखादा गांवढळ राजा या मैत्रीविरुद्ध हालचाल करील तर त्याच्या संरक्षणार्थ हजर असलेल्या इंग्रजी पलटणांच्या संगिनी त्याच्या डोळ्यासमोर उभ्या रहात! असली ही अजब कल्पना लढविल्याबद्दल इंग्रज इतिहासकारांनीं लॉर्ड कॉर्नवालिस आणि लॉर्ड वेलस्ली यांची पाठ थोपटून त्यांचा बहुत गौरव केला आहे आणि योग्य वेळीं योग्य कल्पना त्यांनीं लढविली एवढ्या पुरता हा गौरव यथायोग्यच आहे. या कल्पनेच्या जनकत्वाचा मान मात्र इंग्रजांकडे विशेषसा येत नाहीं. मराठी राज्याचे संस्थापक 'थोरले महाराज' यांनीं मूळ 'चौथ सरदेशमुखीची' कल्पना बसविली आणि नंतर पेशव्यांनीं त्या कल्पनेची यथायोग्य मांडणी करून तिच्या जोरावर सर्व मोंगली साम्राज्य पादाक्रांत केलें. मराठ्यांची 'चौथ सरदेशमुखी' आणि इंग्रजांची 'सब्सिडियरी अलायन्स' यांत हेतु, मूलभूत कल्पना आणि तपशील या दृष्टीनें कांहींच फरक नाहीं. इंग्रजांची ही कल्पना मराठ्यांच्या कल्पनेची अस्सल बरहुकूम नक्कलच होय. मराठे शत्रूच्या घरांत नोकर म्हणून शिरत आणि नंतर संधि साधून सर्वच राज्य कार्बीज करीत. त्यामुळें सर्वांना ही नोकरी भयप्रद वाटे. सबब इंग्रजांनीं तीच कल्पना घेऊन तिला नोकरी न म्हणतां दोस्ती म्हणतां येईल एवढा फरक तींत

घडवून आणला हेंच काय तें त्यांचें कर्तृत्व ! तात्पर्य, ' सब्सिडियरी अलायन्स ' या कल्पनेच्या जनकत्वाचा मान इंग्रजांच्या मुत्सद्दीपणाला न देतां मराठ्यांच्या कल्पकतेलाच तो मान मिळणें वाजवी आहे.

या पगारी मैत्रीच्या कल्पनेची जी अकल्पित भरभराट झाली तिचें श्रेयही अप्रत्यक्षपणें मराठ्यांच्या वर्चस्वालाच दिलें पाहिजे. या कल्पनेचा वर तपशील दिला आहे त्यावरून हें ध्यानांत येईल कीं, कोणीही राजा चहूंबाजूंनीं सर्वस्वीं नाडल्याशिवाय असली ही आत्मघातकी मैत्री पतकरणार नाहीं.। हिंदुस्थानाच्या अफाट क्षेत्रांत मराठे आणि इंग्रज या दोन लष्करी सत्ता सार्वभौमत्वाकरितां धडपडत होत्या आणि त्यांच्या तावडींत सांपडून हिंदी राजे रजवाडे आणि बादशाही अमीर उमराव यांची एखाद्या कोंकराप्रमाणें केविलवाणी स्थिति झाली होती. जंगलांत जाऊन वाघाच्या गुहेंत शिरावयाचें किंवा गांवांत राहून खाटकाच्या घरांत जावयाचें याचाच फक्त निर्णय करणें या कोंकरांच्या हातीं होतें. मराठे हे राजे असल्यामुळें वरचेवर मानापमानाचे प्रसंग उद्भवत आणि गरजेप्रमाणें त्यांच्या मागण्या वारंवार बेमुमार वाढत त्यामुळें त्यांचा डाव फसला. इंग्रज हे व्यापारी असल्यामुळें स्वतः अपमान सोसूनही दुसऱ्याचा मान ठेवण्यांत त्यांचा स्वार्थच होता. हिंदी राजांच्या दरबारीं इग्रजी वकील होते त्यांना यावेळीं लॉर्ड वेलस्लीकडून सक्त हुकूम मिळाले होते कीं, हिंदी राजांशीं तुम्ही अत्यंत अदबीनें वागा आणि आपल्या सामर्थ्याचें प्रदर्शन करूं नका. आपल्या कार्यावर नजर देऊन तुम्ही सर्वांशीं सलोखा ठेवा, परंतु सलगी कोणाशींही करूं नका आणि आपल्या सामर्थ्याचा नाजूक उपयोग करा. शिवाय इंग्रजांच्या मागण्या कितीही बेमुमार वाढल्या तरी त्यांचा कांहीं तरी बराबाईट ––खराखोटा जमाखर्च दाखविण्याची ते खबरदारी घेत असत. सारांश, फासे हाड न होतां जीव जावयाची या पगारी मैत्रींत मोठी सोय होती त्यामुळें निजाम, अयोध्येचा नवाब अशासारखे मोठमोठे उमराव मराठ्यांची धास्त खाऊन इंग्रजांच्या जाळ्यांत सांपडले आणि मराठ्यांशिवाय इंग्रजांना कोणीच शत्रु शिल्लक राहिला नाहीं.

सवाई रावसाहेब यांच्या मृत्यूनंतर मराठी राज्यांत बेबंदशाही माजली त्यामुळें त्या राज्याबरही आपल्या पगारी मैत्रांचें खोगीर लादतां येईल असा भरंवसा वाटून इंग्रजांनीं त्या दृष्टीनें पुष्कळ यत्न करून पाहिले. या बाबतींत त्यांना काय काय अनुभव आले याचें सामान्य दिग्दर्शन येथें केलें पाहिजे.

फितूर आणि बुद्धिभेद हीं इंग्रजांच्या संग्रहांतील अत्यंत जालीम शस्त्रें होतीं. इंग्रजांमध्यें पराक्रम आणि धाडस हे गुण विशेष प्रामुख्यानें वसत होते हें निर्विवाद आहे. परंतु केवळ या गुणांच्या बळावरच मूठभर इंग्रजांना हिंदुस्थानासारखा प्रचंड देश काबीज करता आला नसता. शत्रुपक्षांतील फितूर आणि बुद्धिभेद यांचाच त्यांना खराखुरा उपयोग झाला आणि हिंदी राज्यें एकामागून एक आपमरणानेंच मेलीं. इंग्रजांनीं बंगालच्या नवाबाला मारलें तें फितुरानें—त्यांनीं टिपूला बुडविलें तेंही केवळ फितुरानेंच—फार काय, हीं थोरामोठ्यांचीं उदाहरणें सोडलीं तरी धोंडजी वाघासारख्या सामान्य बंडखोराचा नाश करतांना सुद्धां इंग्रजांचीं सर्व शस्त्रें बोथट ठरलीं आणि शेवटीं त्यांना आयत्या वेळीं फितूरच उपयोगी पडला! परंतु मराठी इतिहासांत अभिमानानें नमूद करण्यासारखी गोष्ट ही आहे कीं, वसईच्या तहापूर्वी कोणीही जबाबदार मराठी मुत्सद्दी किंवा सरदार इंग्रजांच्या फितुराला बळी पडला नाहीं आणि या बाबतींत त्यांचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. इंग्रजांचें दुसरें शस्त्र होतें बुद्धिभेदाचें. या बुद्धिभेदाची क्रिया अशी होती कीं, राज्यांत ज्या व्यक्तीचें वर्चस्व असेल तिच्याविरुद्ध नानाप्रकारच्या कंड्या उठवावयाच्या—वास्तविक किंवा काल्पनिक जुलमाचें त्याच्या माथीं खापर फोडावयाचें—ही व्यक्ति अगदीं अप्रिय होईल अशी सर्व बाजूंनीं खटपट करावयाची आणि राज्यांतील असंतुष्टांना हातीं धरून त्यांच्यामार्फत बंडें उत्पन्न करावयाचीं. अशा या राजनीतीमुळें त्या राज्यांत पराकाष्ठेची अव्यवस्था माजून कोणीतरी इंग्रजांकडे मदतीची याचना करी आणि त्या निमित्तानें सर्व राज्यावर इंग्रजी वर्चस्वाचें खोगीर लादण्यांत येई. मराठी राज्यांत नाना फडनवीस प्रबळ होते तोंपर्यंत त्यांची निंदा करण्यांत आणि त्यांच्या शत्रूंमार्फत असंतोष पसरविण्यांत इंग्रजांनीं कधींही आळस

केला नाहीं. पुढें नाना निस्तेज होऊन शिंद्यांचें प्राबल्य वाढलें तेव्हां तेंच इंग्रज नानांची स्तुति करूं लागले आणि शिंद्याविरुद्ध होणाऱ्या प्रत्येक चळवळीला पाठिंबा देऊं लागले! परंतु मराठ्यांशीं वागतांना इंग्रजाचें हें बुद्धिभेदाचें शस्त्रही बोथटच ठरलें. शिंदे व पेशवे हे सर्वसत्ताधीश असल्यामुळें त्यांना इंग्रजांच्या मैत्रीची जरूरच नव्हती. नाना फडनवीसासारख्या प्रतिस्पर्ध्यांना त्यांच्या मैत्रीची जरूर होती, परंतु जाज्वल्य देशाभिमानामुळें त्यांनीं असल्या मैत्रीला भीक न घालतां सर्वस्वाचा होम शांतपणें पतकरला. शिंद्यांच्या सोटेशाहीखालीं शेकडो ठार मेले आणि हजारों नाहक बुडाले; परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं, इंग्रजांच्या बुद्धिभेदाला कोणीही बळी पडला नाहीं. पेशव्यापासून तहत लुंग्यासुंग्यापर्यंत सर्वांशीं इंग्रजानीं सलगी करून पाहिली परंतु त्यांची डाळ कोठेंही शिजली नाहीं. इंग्रज आपल्या जागीं आश्चर्य करीत कीं, काय हे मराठे लोक वेडे आहेत! शिंदा सर्वांवर अनन्वित जुलूम करीत आहे आणि हे लोक त्याच्या लाथा मुकाट्यानें खात आहेत! यापेक्षां आमची पगारी मैत्री कबूल करून हे लोक निश्चिंत कां होत नाहींत? मराठ्यांची ही देशाभिमानाची भूमिका लक्षांत न आल्यामुळें इंग्रजांची वेळोवेळीं अतिशय निराशा झाली आणि त्यामुळें सर्वच मराठ्यांवर त्यांची खफा मर्जी झाली होती.

सारांश–मराठी राज्यापैकीं समर्थ किंवा असमर्थ, मार देणारे किंवा मार खाणारे, संतुष्ट किंवा असंतुष्ट यांपैकीं कोणीही इंग्रजांच्या आमिषाला बळी पडेना त्यामुळें तें राज्य आपल्या कावूत कसें आणावें हें एक इंग्रजांना मोठें कोडेंच पडलें! कोणतेंही कारण न दाखवितां मराठी राज्यावर सरळ स्वारी करावी हा एक गांवढळ मार्ग शिल्लक होता, परंतु इंग्रजांस तो पसंत नव्हता. इंग्रजी पडले व्यापारी आणि मुत्सद्दी त्यामुळें त्यांचा या बाबतींतला मार्ग जास्त सुधारलेला होता. दुसऱ्याच्या घरांत शिरण्यापूर्वी न्याय, भूतदया, शांतता, विश्वबंधुत्व, कराराचें पावित्र्य असलें कांहीं तरी एखादे खेकटें बगलेंत मारून नंतरच ते अशा उद्योगांत पडत. आपली स्वारी ही केवळ शत्रूच्या हिताकरितांच आहे—अनाथांचें संरक्षण आणि जुल्माचा प्रतिकार यासाठींच केवळ आपली तरवार उपसली जात आहे—

केवळ निरुपाय म्हणून आपणाला युद्धाचा आश्रय करावा लागत आहे असा देखावा दाखवून शत्रुपक्षापैकीं बऱ्याच लोकांचा आपल्या आगमनाला नैतिक पाठिंबा मिळेल अशी तजवीज ठेवणें हें एक त्यांच्या युद्धनीतीचें प्रधान अंग होतें. हें अंग निश्चित झाल्यावर नंतरच ते इतर साधनांच्या उद्योगास लागत. अशी ही त्यांची राजनीति असल्यामुळें अनुकूल परिस्थिति निर्माण होईपर्यंत स्वस्थ बसण्याशिवाय इंग्रजांना गत्यंतर उरलें नाहीं. परंतु त्यांच्या सुदैवानें त्यांना या बाबतींत फार वेळ तिष्ठत बसावें लागलें नाहीं. होळकराच्या उदयामुळें शिंद्याचें पुणें दरबारांतील वर्चस्व समाप्त झालें आणि त्यामुळें पेशवे आपल्या कक्षेंतून पदभ्रष्ट होऊन त्यांची इंग्रजाकडे जावयाची तयारी दिसूं लागली. फाटके तुटके लोक तरी आपणाला अनुकूळ होतील अशी आशा करतां करतां सुदैवानें खुद्द मालकाचें घबाडच इंग्रजांच्या हातीं आणून दिलें!

'पगारी मैत्री' बद्दल इंग्रजांनीं मराठ्यांच्या दरबारांतून काय काय लट-पटी आणि खटपटी केल्या यांचें सविस्तर वर्णन द्यावयाचें तर तो एक स्वतंत्र ग्रंथच होईल. परंतु त्यांच्या या चळवळीला मराठ्यांच्या इतिहासांत विशेष महत्वाचें स्थान देण्याचें कारण नाहीं. सबब यापुढील मराठी इतिहास समजण्यास उपयोगी पडेल एवढ्यापुरतें सामान्य विवेचन आम्ही या ठिकाणीं नमूद केलें आहे. यापुढें इंग्रजांचा मराठी राजकारणाशीं अत्यंत निकट संबंध येत असल्यामुळें त्यांचीं राजकीय धोरणें आणि त्यांची राजकीय नीतिमत्ता यांसंबंधीं आम्ही मजकूर लिहिला आहे त्याचें प्रत्यंतर-पुरावे वाचकांना यापुढील प्रत्येक प्रकरणांतून वाचावयास सांपडणार आहेत.

होळकराच्या उदयामुळें पेशव्यांच्या मनांत इंग्रजांशीं मैत्री जोडण्याचा विचार घोळूं लागला हें वर सांगितलेंच आहे. परंतु होळकराच्या भया-मुळेंसुद्धां त्यांना इंग्रजांच्या सर्वच अटी कबूल करवेनात. पहिल्यानें त्यांनीं इंग्रजांशीं बोलणें लाविलें कीं, तुमची कांहीं पलटणें आम्ही थोड्या मुदती-पर्यंत चाकरीस ठेवून घेऊं आणि त्यांचा खर्च रोखीनें देऊं. आमचें काम होतांच तुम्ही आपलीं पलटणें परत न्यावीं. या बोलण्याला नकार मिळ-तांच पेशवे थोडेसे मऊ पडून बोलूं लागले कीं, आम्ही इंग्रजांचीं पलटणें

कायमची ठेवून घेऊं, परंतु त्यांच्या खर्चाकरितां मुलूख मात्र तोडून देणार नाहीं. होळकर दूर होता तोंपर्यंत श्रीमंतांची ही चाळवाचाळव चालली होती. पुण्याहून पळून जातांना अगदीं निरुपाय होऊन श्रीमंतांनीं आपली शेवटची अट इंग्रजांना कळविली कीं, आम्ही तुमचीं पलटणें कायमचीं ठेवून घेऊं आणि त्यांच्या खर्चाकरितां स्वतंत्र मुलूखही तोडून देऊं. हीं पलटणें आमच्या हद्दींत कायमचीं ठेवून घेण्याची गोष्ट मात्र आम्हाला कबूल करवत नाहीं. आम्हीं सांगूं तेव्हां मात्र त्यांनीं आमच्या हद्दींत यावें. श्रीमंताच्या या म्हणण्याला इंग्रजी वकीलानें कांहीच उत्तर दिलें नाहीं. त्यानें त्यांस एवढाच इशारा केला कीं, तुम्ही जलदी करून महाडास निघून जावें आणि समुद्राशीं दळणवळणाचा मार्ग सुरक्षित ठेवावा. पुढची सर्व तजवीज मी करीत आहें! या सल्ल्याप्रमाणें श्रीमंत महाडास गेले आणि तेथून त्यांनीं आश्रय मिळण्याकरितां मुंबईच्या गव्हर्नराकडे वकील पाठविले. पेशव्यांच्या अपेक्षेप्रमाणें इंग्रजांचीं लढाऊ जहाजें त्यांच्या स्वागताकरितां लवकरच बाणकोटाच्या खाडींत आलीं आणि त्यामुळें त्यांचा पळून जावयाचा मार्ग अगदीं निर्वेध आणि सुरक्षित झाला. श्रीमंताच्या मनांत यावेळीं दोन मसलती घोळत होत्या. इंग्रजांच्या साह्यानें महाडाहून शिंद्यांच्या ताब्यांत असलेल्या भडोच या बंदरीं जावें आणि नंतर तेथून शिंद्याकडे जावें ही एक मसलत. इंग्रजांकडे जाऊन त्यांची पगारी मैत्री संपादावी ही त्यांची दुसरी मसलत होती. श्रीमंतांची पहिली मसलत बाळोजी कुंजर वगैरे त्यांच्या मुत्सद्यांस बिलकूल पसंत नव्हती. त्यांचा याप्रसंगीं पेशव्यांस एकच सल्ला मिळत होता कीं, यावेळीं मागें पुढें न पाहतां 'जलचराशीं' मैत्री जोडावी. जलचरांच्या साह्याशिवाय होळकरांचें पारिपत्य होणार नाहीं आणि होळकरांचें पारिपत्य झाल्याशिवाय आम्हां सर्वांचे जीव जगणार नाहींत!

पेशव्यांचे सर्व उपाय थकल्याशिवाय ते पूर्णपणें मऊ पडणार नाहींत आणि ते पुरते मऊ पडल्याशिवाय त्यांजकडून आपल्या सर्व अटींस बिनशर्त मान्यता मिळणार नाहीं हें इंग्रजांस पूर्णपणें ठाऊक होतें. त्यामुळें त्यांनीं बाह्यतः पेशव्यांच्या आगमनाविषयीं विशेषशी उत्सुकता दाखविली नाहीं. पेशवे असहाय होऊन केव्हां तरी आपोआपच आमच्या घरीं येत आहेत,

अशा स्थितींत त्यांना आमंत्रण द्यावें तर त्यांचा मानसन्मान ठेवण्याची आणि त्यांच्याशीं वागतांना कठोरपणा न धरण्याची जबाबदारी इंग्रजांच्या शिरावर पडणार होती. परंतु ही क्षुद्र जबाबदारीसुद्धां त्यांना आतां नकोशी वाटत होती! त्यामुळें पेशव्यांच्या आगमनाविषयीं अनास्था किंवा उत्सुकता कांहींच न दाखविण्याची इंग्रजांनीं खबरदारी घेतली होती. श्रीमंत महाडास पोंचल्यावर त्यांना इंग्रजांचीं पत्रें व निरोप आले कीं, तुमचा व आमचा पुरातन घरोबा, त्यामुळें तुमच्या दुःस्थितिबद्दल आम्हांला अतिशय वाईट वाटत आहे. हीं आपसांतील भांडणें अगदीं वाईट! तुम्हां सर्वांची आपपसांत समजूत होऊन तुमचीं भांडणें मिटलीं जावींत हें फार चांगलें. आम्हींही तुम्हांस या कामीं यथाशक्ति साह्य करूं. तुमचे सर्व उपाय थकले तर मात्र तुम्ही आमचेकडे खुशाल यावें. तुम्ही येथें आल्यावर तुमच्या म्हणण्याचा आमचे गव्हर्नरजनरलसाहेब सहानुभूतिपूर्वक विचार करतील. सारांश, मराठे व इंग्रज यावेळीं निरनिराळ्या हेतूंनीं प्रेरित होऊन पेशव्यांस एकच मजकूर एकाच भावेंत समजून सांगत होते!

मराठ्यांशीं पगारी मैत्रीच्या तहाची वाटाघाट करून त्या तहाच्या अटी ठरविण्याची आणि कंपनीतर्फें त्यावर सही शिक्का करण्याची कुलअखत्यारी पुण्याचा इंग्रजी वकील कर्नल पालमर यास हिंदुस्थानसरकाराकडून मिळाली होती. पेशवे कोंकणांत पळाल्यावर क. पालमर हाही मुंबईस जावयाची घाई करूं लागला. परंतु तहाच्या बाबतींतला त्याचा सर्वाधिकार होळकर व अमृतराव यांना आगाऊच कळला होता त्यामुळें भेटी, परतभेटी, खलबतें आणि मुलाखती अशीं नानाप्रकारचीं निमित्तें करून त्यांनीं त्याच्या जाण्याला शक्य तेवढा अडथळा केला. इंग्रजी वकिलाला अटकाव करावा तर तो एक शिष्टाचाराचा असामान्य भंग समजला जाईल आणि त्या निमित्तानें इंग्रजांशीं तावडतोब युद्ध सुरू होईल; सबब तेवढी गोष्ट वगळून बाकी सर्व गोष्टी त्यांनीं करून पाहिल्या. परंतु त्यांच्या खटपटीस यश न येतां क. पालमर हा नोव्हें. अखेरीस पुण्याहून कूच करून मुंबईस जावयास निघाला. आतां महाडाहून पेशवे आणि पुण्याहून क. पालमर यांच्या स्वाऱ्या मुंबईस एकत्र होणार आणि तेथें त्यांचें पगारी मैत्रीचें

मेतकूट जमणार ही गोष्ट स्पष्ट दिसूं लागली. अशा स्थितींत पेशवे महाडाहून हालण्यापूर्वींच त्यांना जबरदस्तीनें ताब्यांत घ्यावयाचें एवढा एकच मार्ग शिल्लक राहिला आणि निरुपायानें त्याचाच अवलंब होळकरानें केला. क. पालमर हा मुंबईस जावयाची घाई करूं लागतांच पुढील भविष्य ओळखून होळकराच्या फौजा त्याच्या हुकमावरून चार पांच घांटांनीं कोंकणांत उतरल्या. कावळ्याच्या घाटांत पेशव्यांच्या फौजेशीं होळकराच्या फौजेची बरीच मारामार होऊन ती फौज थोडीशी मागें हटली. बाकीच्या घांटांतून होळकरी फौजा विशेष त्रास न पडतां खालीं उतरल्या आणि ठिकठिकाणीं श्रीमंतांची वाट अडवून उभ्या राहिल्या. नंतर मीरखान पठाण पांच सहा हजार फौजेनिशीं महाडच्या रोखें बेगानें चालून जाऊं लागला.

या सर्व बातम्या ऐकून पेशवे घाईघाईनें रायगडावर गेले. तेथें यशोदाबाई कैदेंत होती सबब त्या किल्ल्याच्या विशेष बंदोबस्ताकारितां पेशव्यानीं गोपाळपंत कुंजर आणि नारोबा आवटी या दोन सरदारांची नेमणूक केली. रायगडावर माधवराव रास्ते कैदेंत होते त्यांची पेशव्यानीं बिनशर्त मुक्तता केली आणि कर्नाटकांत जाऊन त्या प्रांतांत होळकराचा फैलावा होऊं न देण्याची कामगिरी त्यांना सांगण्यांत आली. इतक्या गोष्टी केल्यावर श्रीमंत बिरवाडीस पुन: परत आले आणि तेथें त्यांनीं आपल्या जवळच्या सर्व लोकांस निरोप दिला आणि इंग्रजाकडे जावयाची जलदी चालविली. पेशव्यांचा हा विचार कोणासच पसंत नव्हता. विशेषतः चिमाजी आपांनीं या गोष्टीचा विशेष निषेध केला. त्यांनीं पेशव्यांजवळ हट्ट धरला कीं, आम्ही इंग्रजांच्या किंवा अमृतरावांच्या कैदेंत पडावें असा समय प्राप्त झाला आहे. अशा स्थितींत अमृतरावांची कैद काय वाईट? इंग्रजांच्या कैदेचा स्वीकार केला तर त्या योगें आमचें स्वातंत्र्य आणि अब्रू ही दोन्हीं जातील. उलटपक्षीं, अमृतराव व होळकर हे आपलेच माणसें आहेत. त्यांच्या कैदेंत राहिलों तर त्यायोगें आमचें स्वातंत्र्य जाईल परंतु आमची अब्रू तरी आम्हांजवळ शिल्लक राहील. आपल्या धाकट्या भावाचा हा सल्ला श्रीमंतांस क्षणभर मानवला. परंतु

कुंजराच्या हट्टामुळें त्यांचा हा सुविचार फार वेळ टिकला नाहीं. पेशव्यांची स्थिति या वेळीं भुतानें पछाडल्यासारखी झाली होती. होळकराच्या फौजा जवळ आल्याची वर्दी येतांच श्रीमंत घाईघाईनें सुवर्णदुर्गास गेले. तेथेंही फार वेळ मुक्काम करण्याचें धारिष्ट त्यांना होईना. शामतखान पठाणाचे लोक आसपास आले आहेत अशी बातमी लागतांच श्रीमंतांनीं आपलीं बायकामुलें सुवर्णदुर्गावर ठेविलीं आणि ते चिमाजी आपांस घेऊन रेवदंड्यास गेले आणि तेथून इंग्रजी तारवांत बसून वसईकडे निघाले. पेशव्यांचे सर्व लोक यापूर्वींच वाट फुटेल तिकडे निघून गेलेच होते. पेशवे वसईस निघाले तेव्हां बाळोजी कुंजर, निंबाजी भास्कर, दाजी देशमुख, नारायणराव वैद्य, खंडेराव रास्ते वगैरे त्यांची आवडती प्रभावळ आणि किरकोळ दासदासी एवढाच लवाजमा त्यांबरोबर होता. दिसेंबरच्या सहाव्या तारखेस श्रीमंत अशा विपन्न स्थितींत वसईस पोंचले आणि त्यामुळें इंग्रजांच्या मनाप्रमाणें सर्व गोष्टी अगदीं ठाकठीक जुळून आल्या.

पेशवे वसईस येतांच त्यांचा इंग्रजांनीं मोठाच बडेजाव ठेविला आणि त्यांना एकवीस तोफांची सलामी देण्यांत येऊन त्यांच्या रक्षणार्थ चार पांच इंग्रजी पलटणें त्यांच्याजवळ देऊन राहिलीं. सातव्या तारखेस क. पालमर हा पेशव्यांस येऊन भेटला आणि नंतर तहाच्या कलमांची वाटाघाट सुरू झाली. ता. ३१ दिसें. रोजीं 'हिज हायनेस बाजीराव राव पंडत प्रधान बहादूर' यांनीं 'सरकार कुंपणी इंग्रज बहादूर' यांच्याशीं वसईचा तह केला. हा तह सुप्रसिद्ध असून तो पुष्कळ ठिकाणीं समग्र छापून गेला आहे. सबब तो आम्ही येथें तपशीलवार देत नाहीं. या तहाच्या भाषेंत दिलजमाई, दिलसफाई, ऐक्य, शांतता, सुव्यवस्था अशा बड्या बड्या आणि कर्णमधुर परंतु अर्थशून्य शब्दांची अगदीं रेलचेल उडून गेली आहे आणि सर्वच तहनामा भपकेबाज दरबारी भाषेंत लिहिला गेला आहे. हे भाषेचे सर्व अलंकार वजा करून केवळ शब्दार्थ शिल्लक राहतो त्यवरून या तहांत पेशव्यांनीं आणि इंग्रजांनीं आपापल्यातर्फे काय काय गोष्टी कबूल केल्या त्याच फक्त आम्ही येथें संक्षेपानें नमूद करतों. त्या गोष्टी अशा—

पेशव्यांनीं कबूल केलेल्या गोष्टी—

१ आम्ही आमच्या रक्षणार्थ सहा इंग्रजी पलटणें कायमचीं जवळ बाळगण्याचें कबूल करतों. या पलटणांबरोबर जरूर तितक्या तोफा, इंग्रज अंमलदार, दारू गोळा व इतर लढाऊ सामान वगैरे सर्व सरंजाम कंपनी सरकारच्या पसंती प्रमाणें आम्ही बाळगीत जाऊं. शिवाय ही इंग्रजी फौज कायमची आमच्या हद्दींत ठेवून घेण्याचेंही आम्ही मान्य करतों. ( कलम ३ ).

या पलटणांचा सर्व खर्च आम्ही सोसावयाचा आहे. पलटणांच्या खर्चाबद्दल रोख रकम न मिळतां तितक्या आकाराचा मुलूख आपणास कायमचा मिळावा हें इंग्रजांचें म्हणणेंही आम्हांस मान्य आहे. पलटणांचा सरसालचा नित्य खर्च अदमासें पंचवीस लक्ष रु. होईल. परंतु इंग्रजांचें व्यर्थ नुकसान न व्हावें या हेतूनें आम्ही पंचवीसांऐवजीं सव्वीस लक्ष रु. चा मुलूख आज तारखेपासून इंग्रजांच्या कायमचा हवालीं केला आहे. आम्ही मुलूख दिला आहे तो सर्व इंग्रजांच्या सोईचा आणि त्यांनींच पसंत केलेला असा आहे. तथापि आणखी सोईच्या दृष्टीनें यापैकीं कांहीं मुलखाची अदलाबदल करावी अशी इंग्रजांना इच्छा झाल्यास त्या गोष्टीसही आमची कांहीं हरकत नाहीं. अशी अदलाबदल करण्यांत आम्ही सर्वस्वीं इंग्रजांची सोय पहात जाऊं आणि या कामीं इंग्रज जें जें म्हणतील त्यास आम्ही विनशर्त मान्यता देत जाऊं.

३ आम्ही कंपनी सरकारला मुलूख दिला आहे त्यावर इंग्रजांची मालकी आज तारखेपासून सुरू झाली ही गोष्ट आम्हांस मान्य आहे. कंपनी सरकारच्या सोईप्रमाणें हा मुलूख इंग्रजी अंमलदारांच्या हवालीं करण्यांत येईल. आज तारखेपासून मुलूख इंग्रजांच्या ताब्यांत जाईपर्यंत मध्यंतरीं या मुलखाचा जो वसूल आम्हाकडे येईल तो सर्व इंग्रजांच्या तिजोरींत भरणा केला जाईल. या मुलखांत आमचे किल्ले व ठाणीं आहेत तीं सर्व तोफा दारूगोळा व धान्यसामुग्री यांसह कोणतीही मोडतोड न करतां आम्ही इंग्रजी अंमलदारांच्या स्वाधीन करूं. या मुलखांत आमचें वसूलबाकीचें येणें व इतर हकसंबंध असतील ते सर्व आज तारखेपासून रद्द समजावे. (कलम ४–८).

४ आम्हांजवळ इंग्रजी पलटणें रहातील त्यांचा उपयोग आम्हांवर प्राण-संकट प्राप्त होईल तेव्हांच फक्त आम्ही करूं. मराठी राज्यांत लहान मोठे सरदार आहेत त्यांविरुद्ध किंवा आमच्या मांडलिकांकडून खंडणी वसूल करण्याचे कामीं किंवा राज्यवृद्धीसाठीं आम्हाला एखादी मोहीम करावी लागेल तर त्या कामीं आम्ही या इंग्रजी फौजेचा उपयोग करणार नाहीं. आमच्या पदरीं इतर शिबंदी पायदळी फौज आहे त्यापेक्षां ही इंग्रजी पलटणें श्रेष्ठ दर्जाचीं आहेत असें आम्ही समजत जाऊं. या इंग्रजी फौजेला धान्य-सामुग्री व इतर मालमसाला लागेल त्यावर आम्ही जकात किंवा इतर कोणताही कर घेणार नाहीं. या फौजेवर इंग्रज सेनापतिसाहेब असतील त्यांची नेहमीं खुषमर्जी राहील अशीच आम्ही त्यांची बरदास्त ठेवीत जाऊं. ( कलम ९ ).

५ सुरत शहरावर आमचा चौथ सरदेशमुखीचा हक्क आहे आणि सुरतेजवळच्या चौऱ्याशी व चिखली या तालुक्यांतून आम्हाला नगबंदीचा वसूल मिळत असतो. आपल्या हद्दी शेजारीं हे मराठ्यांचे हक्कसंबंध कायम राहिल्यामुळें आतांपर्यंत कंपनीसरकारला बहुत अडचण सोसावी लागली आहे. आतां इंग्रजांशीं आमची प्रेमळ दोस्ती झाली आहे तिवर नजर देऊन आम्ही आज तारखेपासून या हक्कसंबंधावरचा वारसा सोडून दिला आहे. आमच्या या हक्कसंबंधाच्या मोबदल्यांत कंपनी सरकारकडून आम्हाला जी भरपाई मिळेल तिवरच आम्ही संतोष मानूं. कारण इंग्रजांच्या इमानी-पणावर आमचा पूर्ण विश्वास आहे. ( कलम १० ).

६ इंग्रजांना शत्रुस्थानीं असणाऱ्या कोणाही युरोपियन् मनुष्यास आम्ही नोकरींत ठेवून घेणार नाहीं. इतकेंच नव्हे, तर अशा मनुष्यास आम्ही आमच्या राज्यांत राहूंसुद्धां देणार नाहीं. (कलम ११).

७ इंग्रजांशीं आमचा प्रेमळ दोस्तीचा तह झाला आहे त्याअर्थी इंग्रजांचे दोस्त जे निजाम वगैरे आहेत त्यांविरुद्ध आणि इंग्रजांच्या ताब्यांत अनेक मांडलिक आहेत त्यांविरुद्ध आणि मराठी राज्यांत मोठमोठे सरदार आहेत त्यांविरुद्ध आम्ही कोणतेंही शत्रुत्वाचें कृत्य करणार नाहीं. इतकेंच नव्हे, तर आम्ही यापुढें कोणावरही चढाई करणार नाहीं. आमचा कोणाशीं

तंटा निर्माण झाला तर त्याचा निर्णय इंग्रज कंपनी करील त्यास आम्ही मनापासून मान्यता देऊं. कारण इंग्रजांचा सत्याभिमान आणि न्यायप्रियता यांवर आमचा पूर्ण विश्वास आहे. (कलम १२).

८ निजामाच्या राज्यांत आमचे चौथसरदेशमुखीचे हक्क आहेत त्यांची वसुली आज बरेच वर्षांत झाली नाहीं आणि त्यामुळें आमचें निजामाकडे कोट्यावधी रुपयाचें येणें तुंबलें आहे. हल्लीं आमचा इंग्रजांशीं दोस्तीचा तह झाला आहे आणि निजाम हा आम्हांप्रमाणेंच इंग्रजांचा दोस्त आहे. या गोष्टींवर नजर देऊन पूर्वीं नाना फडनवीसांनीं निजामाशीं महाडचा करार केला होता त्या करारास आम्ही या प्रसंगीं मान्यता देत आहों. आपणास चौथ सरदेशमुखीची माफी मिळावी असें निजामाचें आतां म्हणणें पडलें आहे. या त्याच्या म्हणण्याचा निर्णय करण्याचें काम आम्हीं इंग्रजांवरच सोंपवितों. निजामाला चौथसरदेशमुखीची माफी मिळावी या दृष्टीनें आणि निजामाकडे आमचें येणें निघेल त्याचा वसूल व्हावा या दृष्टीनें कंपनी सरकार जी व्यवस्था सुचवील ती आम्ही बिनशर्त कबूल करूं. यापुढें आमचा निजामाशीं तंटा उद्भवला तर त्याचा निर्णयही इंग्रजांनींच करावा. आम्ही तो निर्णय बिलकूल कांकूं न करतां आणि कोणतीही सबब किंवा वायदे न सांगतां बिनतकरार राजीखुषीनें मान्य करूं. (कलम १३).

९ आनंदराव गायकवाडानें आमच्या परवानगीशिवाय इंग्रजांस मुलूख देऊन त्याशीं मैत्रीचा तह केला आहे. आतां आमचा स्वतःचा इंग्रजाशीं दोस्तीचा तह झाला आहे त्यावर नजर देऊन गायकवाड व इंग्रज यांमध्यें पूर्वीं झालेल्या तहास आम्ही या प्रसंगीं मान्यता देत आहों. आमचें गायकवाडाकडे नजराणा वगैरेबद्दल बरेंच येणें तुंबलें आहे. या येण्याबद्दल पेशवे सरकारची गायकवाडाशीं बरींच वर्षें घासाघीस चालू आहे. या तंट्याचा निर्णय कंपनी सरकारनें करावा. इंग्रजांचा निःपक्षपातीपणा सत्याभिमान आणि न्यायप्रियता यांवर आमचा पूर्ण विश्वास आहे त्यामुळें तो निर्णय आम्ही राजीखुषीनें मान्य करूं. (कलम १४).

१० सर्वत्र शांतता आणि प्रेमळपणा नांदावा आणि युद्धाची आपत्ति

टळावी या दृष्टीनें कंपनीसरकार जी जी व्यवस्था सुचवील तीस आम्ही संतोषपूर्वक मान्यता देऊं. शांतता राखण्याचे सर्व प्रयत्न फसून इंग्रजांना एखाद्याशीं युद्ध करावें लागलेंच तर आम्हांजवळच्या सहा इंग्रजी पलटणा-पैकीं फक्त दोन पलटणें आमच्या रक्षणार्थ ठेवून घेऊन बाकीचीं चार पलटणें आणि शिवाय आमचें स्वतःचें सहा हजार पायदळ व दहा हजार घोडेस्वार इतकी फौज आम्ही तावडतोब इंग्रजांच्या दिमतीस देऊं. त्याशिवाय तोफखान्याचा जय्यत सरंजाम, दारूगोळा आणि इतर लष्करी सामान आणि इंग्रजी लष्कराच्या उपयोगासाठीं धान्यसामुग्री आणि धान्याचा व्यापार करणारे वणजारी या सर्वांचा भरपूर पुरवठा आम्ही इंग्रजांना वेळेवर करूं. त्याशिवाय इंग्रज सांगतील त्या ठिकाणीं त्यांच्या उपयोगासाठीं आम्ही धान्याचा सांठा करून ठेवूं. तसाच आणीबाणीचा प्रसंग गुदरेल तर आमचें सर्व लष्करी सामर्थ्य आणि युद्धोपयोगी सर्व दौलत आम्ही कंपनी सरकारच्या सेवेला सादर करूं. आम्हांवर एखादें अरिष्ट आलें तर इंग्र-जांनींही आम्हाला यथाशक्ति साह्य करावें. ( कलम १५।१६ ).

११ या तहानें इंग्रजांची व आमची दोस्ती इतकी दृढ झाली आहे कीं, यापुढें कंपनी सरकारचा मुलूख आणि पेशवाई मुलूख अगदीं एकसंध आणि एकजीव झालेला आहे आणि त्यांत विभक्तपणा बिलकूल राहिला नाहीं त्यामुळें इंग्रजांचें व आमचें राजकीय धोरण यापुढें एकच राहील. इंग्रजाना विचारल्याशिवाय आम्ही याउपर कोणाशींही राजकीय बाबतींत बोलणें करणार नाहीं. ( कलम १७ ).

पेशव्यांकडून इतक्या कबुल्या मिळाल्यावर इंग्रजांनीं आपल्या तर्फे खालील गोष्टी जाहीर केल्या—

१ पेशवाई राज्यांत जो कोणी सरकारी वसुलास अडथळा करील किंवा धटाई करून बंड करील त्याचें आम्ही पारिपत्य करूं.

२ पेशवाई राज्य आणि इंग्रजी राज्य यांत आतां बिलकूल परकीपणा राहिलेला नाहीं, त्यामुळें जो कोणी पेशवाई दौलतीकडे विनाकारण वक्रदृष्टीनें पाहील तो आमचा शत्रु समजून आम्ही त्याचें बेमुर्वत पारिपत्य करूं.

३ श्रीमंतांच्या पदरीं त्यांचीं मुलेंबाळें व भाऊबंद मंडळी आहेत त्यांना

आणि श्रीमंतांचे प्रजाजन व नोकर आहेत त्यांना पेशव्यांनीं वाटेल तसें वागवावें. आम्ही त्यांत मन घालणार नाहीं.

४ या तहाच्या कलमांना बाध न येईल अशा रीतीनें पेशव्यांना अंतर्गत राज्यकारभारांत पूर्ण स्वातंत्र्य आहे. आम्ही त्यांच्या कारभारांत विनाकारण ढवळाढवळ करणार नाहीं.

या वसईच्या तहांत एकंदर एकोणीस कलमें आहेत. त्यांपैकीं एक, दोन आणि अठरा हीं तीन कलमें विशेष महत्वाचीं नाहींत, सबब तीं वजा करून बाकी पंधरा कलमांचा सारांश वर दिला आहे. शेवटच्या एकोणिसाव्या कलमांत फारच खुबीदार मजकूर आहे. तो असा— बाजीराव पेशवे यांच्या सरकाराला पाठिंबा मिळून त्याची अब्रू वाढावी आणि नुकसान व क्षय यांपासून बचाव होऊन तें राज्य चंद्र सूर्य असेपर्यंत चिरकाल टिकावें या हेतूनें हा तहनामा करण्यांत येत आहे !!

वसईच्या तहांत नमूद केलेल्या या मैत्रीचें स्वरूप इतकें स्पष्ट आहे कीं, त्याचें निराळें विवेचन करण्याचें कांहींच प्रयोजन दिसत नाहीं. असली ही आचरट मैत्री राजकीय व्यवहारांत तर राहोच, परंतु सामान्य व्यवहारांतसुद्धां कोणी पतकरणार नाहीं. या तहानें श्रीमंतांनीं सर्वस्वाचें दान करून मिळविलें काय ? तर होळकरापासून संरक्षण ! पेशव्यांनीं आपल्या राजकीय स्वातंत्र्याचा होम केला, आणि बौद्धिक पारतंत्र्य स्वीकारलें आणि त्याच्या मोबदल्यांत त्यांनीं काय मिळविलें ? तर आपल्या ताब्यांतील जुन्या लोकांवर सूड घेण्याची मोकळीक आणि विशिष्ट मर्यादेपर्यंत मनमुराद सुखोपभोग घेण्याची संधि ! असल्या या तहाच्या वास्तविक स्वरूपाचें वर्णन करावयाचें तर पेशव्यांनीं इंग्रजांस शरणचिठी लिहून दिली असेंच त्याचें वर्णन करावें लागेल !

निर्विकार मन, निःपक्षपाती दृष्टि आणि निर्णयाचा समतोलपणा हे गुण इतिहासलेखकामध्यें जरूर असावे लागतात. परंतु मनुष्यानें कितीही निर्विकारी आणि निःपक्षपाती बनण्याचा प्रयत्न केला, तरी तो केव्हांही स्वतःला विसरूं शकत नाहीं, आणि चराचराला व्यापून राहिलेल्या अहंकारापासून त्याची केव्हांही सुटका होत नाहीं. या अहंकाराचा परिणाम त्याच्या लिखा-

णावर न होईल, परंतु या अहंकाराला प्रतिकूल असणारी एखादी गोष्ट नमूद करतांना अहंकारजन्य विकारांची त्यांच्या मनांत क्षणभर खळबळ उडणारच! ऐ. ले. संग्रहांतून आतांपर्यंत पानिपतानंतरचा इतिहास छापला गेला आहे. मराठी राज्याच्या चढत्या काळाचें वर्णन करण्याचें भाग्य त्याला केव्हांही लाभलेलें नाहीं. परंतु या पहल्या काळांतसुद्धां मराठी दरबाराचें वैभव एवढें मोठें होतें कीं, तें पाहतांच परकीयांनीं आश्चर्यमूढच व्हावें! या अवधींत मराठ्यांनीं राज्यविस्ताराच्या मोठमोठ्या मसलती पार पाडल्या—निजाम, हैदर, इंग्रज अशासारख्या प्रबळ शत्रूंच्या फौजा वेळोवेळ तुडवून धुळीस मिळविल्या—त्यांच्या रणदुंदुभीच्या गर्जनेनें मोठमोठ्या सत्ताधीशांचीं सिंहासनें पुनः कंपित होऊं लागलीं—आणि दिल्ली दरबारांत त्यांचें पुनः वर्चस्व होऊन त्या योगानें हिंद सार्वभौमत्वाचा मान त्यांना प्राप्त होणार असा संभव पुनः दिसूं लागला! अशा या अनेकविध आणि अभिमानास्पद प्रसंगांचीं विस्तारपूर्वक वर्णनें ज्या ग्रंथांत पूर्वीं देण्यांत आलीं आहेत त्याच ग्रंथांत आतां वसईच्या तहाच्या या अत्यंत अपमानास्पद प्रसंगाचें वर्णन करण्याचें आमच्या नशीबीं आलें आहे त्यामुळें आमच्या मनांत संताप आणि विषाद यांचे अनेक तरंग उदय पावतात! तथापि आमच्या मनाची ही अस्वस्थता क्षणभर बाजूस ठेवून कै० तीर्थरूपांनीं या प्रसंगासंबंधानें एके ठिकाणी म्हटलें आहे तेंच फक्त आम्ही येथें उद्धृत करतों "स. १८०२ सालच्या शेवटच्या दिवसानें स्वराज्याच्या स्वातंत्र्याचा शेवट पाहिला! सर्व स्वतंत्र मराठी राज्यास पूर्वीपासून 'शिवशाही' हें नांव चालत आलें आहे. हा शब्द कसाही धेंडगुजरी असला तरी तो व्यापक व अर्थपूर्ण आहे! या शिवशाहीला हुकमतींत वागवून तिचें स्वस्तिक्षेम संभाळण्याचा ज्याचा परंपरागत अधिकार त्या बाजीराव पेशव्यानें स. १८०२ च्या डिसेंबर महिन्याच्या ३१व्या तारखेस इंग्रजांशीं वसईचा तह करून त्यांचा आश्रय व ताबेदारी संपादन केली! शिवशाहीच्या स्वातंत्र्यसौभाग्याचा कुंकुमातिलक तिच्याच त्या नादान पोरानें त्या तहाच्या चिटोऱ्यानें पुसून टाकला!"

---

१ केळकरकृत 'मराठे व इंग्रज' उपोद्घात पृ. १

असला हा नामुष्कीचा तह करण्याचा प्रसंग पेशव्यांवर कां आला त्याचीं कारणें आता संक्षेपानें नमूद केलीं पाहिजेत.. तीं अशीं—

१ कर्त्या पुरुषांची वाण आणि जुन्या परंपरेचा संहार—स. १७९२ पासून मराठी राज्यावर दैवाची विशेष अवकृपा दिसूं लागली आणि त्या योगानें अनेक अनिष्ट गोष्टी घडून आल्या. महादजी शिंदे, हरीपंत फडके परशराभाऊ पटवर्धन, नाना फडनवीस हे मराठी राष्ट्रीय पुरुष यापुढील आठ वर्षांत एकामागून एक मृत्यु पावले त्यामुळें राज्याचें अपरिमित नुकसान झालें. विशेषत: शिंदे व फडनवीस या जोडीच्या मरणानें मराठी रियासतींत कर्त्या पुरुषांची जी वाण पडली ती पुढें कधीं भरून निघालीच नाहीं. दुर्दैवाचा सर्वांत मोठा घाला म्हणजे बाजीराव हे पेशवे पदावर आरूढ झाले हा होय! राव बाजींचा जन्मगुण असा विलक्षण होता कीं, प्रत्येक मराठी मनुष्य त्यांना पेशवेपद मिळण्याविरुद्ध होता. परंतु शिंद्यांच्या जोरावर त्यांनीं सर्वांचे विरोध हाणून पाडून शेवटीं पेशवेपद मिळविलें आणि नंतर बाजी–दौलत–सर्जेराव या तीन कलिपुरुषांच्या राक्षसी लीला सुरू होऊन पेशव्यांना विरोध करणाऱ्या जुन्या परंपरेचा पुरा विध्वंस झाला! या विध्वंसाची करुणकहाणी आतांपर्यंत ऐ.ले. सं. भाग १०–१३ या चार भागांतून यथास्थित देण्यांत आली आहे. कर्त्या पुरुषांची वाण आणि जुन्या परंपरेचा विध्वंस यामुळें मराठी राज्य निर्बळ झालें आणि त्या गोष्टीचा परकीयांनीं पुरेपूर फायदा घेतला!

२ शिंद्यांचें पुणेंदरबारांतील बेसुमार वर्चस्व—पेशवे गादीवर बसल्यावर शिंद्यांच्या सामर्थ्यापुढें मोठमोठे अतिरथि महारथि आणि मोठमोठे मुत्सुद्दी हे उलथून पडतात असा त्यांना अनुभव येऊं लागला त्यामुळें त्यांच्याठायीं शिंद्यांच्या सामर्थ्याविषयीं बेसुमार विश्वास उत्पन्न झाला होता आणि शिंद्यांच्या जिवावर त्यांना कोणत्याही संकटाची पर्वा वाटत नसे. दौलतराव शिंदा हा एक भूलोकावरचा अजिंक्य योद्धा आहे असाच भ्रम त्यांना वाटत होता! परंतु होळकरानें पांच चार लढायांत शिंद्यांना बेदम मार दिला त्यामुळें श्रीमंतांच्या या भ्रमाला एकाएकीं मोठा धक्का बसला आणि ते घाबरून आश्रयासाठीं इंग्रजांकडे धांवत गेले!

३ शिंदे होळकरांमधील भयंकर द्वेष—या दोन कारणापेक्षां ज्यास्त महत्त्वाचें कारण म्हणजे शिंदे होळकरांत माजलेला भयंकर द्वेष हें होय. हा द्वेष फार पुरातनचा असून त्याची समग्र हकीगत द्यावयाची तर तो एक स्वतंत्र ग्रंथच होईल ! मध्यवर्ती पेशवाई सत्ता शिरजोर होती तोंपर्यंत शिंदे व होळकर दोघेही बचकून वागत असत. परंतु रावबाजी गादीवर आल्यामुळें ती सत्ता कमजोर झाली आणि नंतर शिंद्यांनीं पेशव्यांना घरांत टाकून होळकर घराण्याचा कसा नाहक छळ केला आणि त्या गोष्टीचा यशवंतराव होळकरानें कसा सूड घेतला ही सर्व हकीगत आतांपर्यंत देण्यांत आलीच आहे. शिंदे होळकरांच्या या दुहीमुळेंच सर्व मराठी राज्य खिळखिळें झालें आणि परकीयांना त्या राज्यांत प्रवेश करण्यास संधि सांपडली.

४ पेशव्यांचा भ्याडपणा आणि नादानपणा—या तहाचें सर्वांत महत्त्वाचें कारण म्हणजे पेशव्यांचा भ्याडपणा आणि नादानपणा हें होय. श्रीमंतांच्या या दुर्गुणांना सीमाच नव्हती ! होळकरापासून त्यांनीं भय मानलें ही त्यांची पहिली चूक—नंतर ते महाडास पळाले ही त्यांची दुसरी चूक. या दोनी चुका एक वेळ क्षम्य मानतां येतील परंतु यानंतर श्रीमंत महाडाहून इंग्रजांकडे कां गेले ? तेथें गेल्यावर अनुकूल परिस्थितीची चार सहा महिने वाट न पाहातां त्यांनीं एकाएकीं इंग्रजाशीं असला हा अत्यंत अपमानास्पद तह कां ठरविला ! होळकरानें तात्पुरतें पुणें दरबारांत वर्चस्व मिळविलें होतें हें खरें. परंतु त्यांच्या मार्गांतील पुढील अडचणी पेशव्यांस कशा दिसल्या नाहींत ? होळकर पराकाष्ठेचा शूर आणि कर्तृत्ववान होता हेंही खरें, परंतु त्याचे प्रतिस्पर्धी जे शिंदे त्यांनीही कांहीं हातांत बांगड्या भरल्या नव्हत्या ! जोडीदार सोबत्यांचा नामर्दपणा—द्रव्याचा अभाव आणि शिंद्याचा विरोध यापुढें होळकरानें केव्हां तरी हात टेकले असते आणि तो माळव्यांत परत गेला असता आणि नंतर पेशव्यांना आयतेंच मोकळें रान सांपडलें असतें ! पेशवे आपल्या सर्व अटी मान्य करतील अशी खुद्द इंग्रजांनाही आशा वाटत नव्हती. गव्हर्नर जनरल लॉर्ड वेलस्ली यांचा क. पामर यास इशारा आला होता कीं, तुम्ही शक्य तेवढी ओढाताण करा परंतु आग्रहास पडूं नका. या प्रसंगीं पेशव्यांकडून

मिळतील त्या सवलती पदरांत घेऊन त्यांच्याशीं पगारी मैत्रीचा तह ठरवा. परंतु क. पालमर यास या बाबतींत विशेष ओढाताण करावी लागलीच नाहीं. पेशवे या प्रसंगीं इतके घाबरून गेले होते कीं, त्यांनीं कांहींहीं कांकूं न करतां इंग्रजांच्या सर्व अटी विनशर्त मान्य केल्या आणि त्यांना सपशेल शरणचिठी लिहून दिली![1]

असो. या तहाची बातमी पुण्यास तिसरेच दिवशीं म्हणजे ता. २ दिसें. रोजीं समजली आणि लागलीच अमृतराव, फडणवीस, फडके आणि होळकर यांची खास बैठक भरून तींत पुढील कर्तव्यतेविषयीं चर्चा सुरू झाली. त्याप्रसंगीं होळकरानें उद्गार काढले ते लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. ते असे—" बाजीरावांनीं मराठी राज्याचा नाश केला आहे. त्यांनीं इंग्रजांचें कर्ज घेऊन त्यांना मुलूख दिला आहे. इंग्रजांच्या जोरावर श्रीमंत आतां आम्हांवर राज्य करूं पहात आहेत. अशा स्थितींत म्हैसूरप्रमाणेंच मराठी राज्याची गति होणार आणि सर्व मराठी दौलत इंग्रजांच्या घशाखालीं उतरणार हें स्पष्ट दिसत आहे. शिंद्याची संमति असल्या या तहाला असेल काय? शिंद्याचा व माझा तंटा मिटला तरच इंग्रजांशीं तोंड देण्याचा कांहीं तरी मार्ग काढतां येईल." होळकराच्या या उद्गारांत या तहाचें वास्तविक स्वरूप आणि त्यावरची उपाययोजना या दोनी गोष्टींचें मर्म उत्तम प्रकारें समाविष्ट झालें आहे. होळकराच्या या मसलतीचें पुढें काय झालें आणि वसईच्या तहामुळें कोणतीं कारस्थानें निर्माण झालीं यांचें विवेचन यापुढें क्रमशः करण्यांत यावयाचें आहे.

झालें. 'होळकराची दक्षिणेवर स्वारी–पूर्वार्ध' हें प्रकरण येथें संपलें. आम्ही वर विवेचन केलें आहे त्यावरून मराठी राज्याचा नाश करण्यांत वसईच्या तहानें केवढा मोठा भाग घेतला होता हें आतां वाचकांच्या ध्यानांत येईल. हा तह ज्या तारखेस झाला ( ३१ दिसें. १८०२ ) ती तारीख मराठी राज्याची खरी मृत्युतिथि होय असें पुष्कळ इतिहासलेखकांचें

१ Selections from State papers Bombay p.p. 583 पहा. हें प्रकरण तयार करतांना आम्हाला या ग्रंथाचा पुष्कळ ठिकाणीं उपयोग करून घ्यावा लागला आहे.

मत आहे आणि तें बहुतांशीं बरोबरही आहे. परंतु या बाबतींत आम्हाला एक गोष्ट येथें नमूद केली पाहिजे. ती अशी कीं—केवळ वसईच्या तहामुळेंच मराठी राज्याचा नाश झाला असा कोणी गैरसमज करून घेऊं नये कारण राष्ट्राचा उत्कर्षापकर्ष केवळ तहाच्या चिटोऱ्यांनींच होत नसतो! त्याप्रमाणेंच एकाच व्यक्तीच्या कर्तृत्वामुळें साम्राज्याची उभारणी होत नसते आणि एकाच व्यक्तीच्या नादानपणामुळें उभारलेलें साम्राज्य नाशही पावत नसतं! राष्ट्रांच्या घडामोडी दैवी कृपा आणि अनेक मानवी प्रयत्न यांच्या मिलाफानें होत असतात. अनेक राष्ट्रीय सद्गुण समूहरूपानें कार्य करूं लागले म्हणजे त्या राष्ट्राचा अभ्युदय होतो आणि अनेक दुर्गुणांचें समूहरूपानें प्राबल्य वाढलें तर त्या राष्ट्राचा नाश होतो, असा इतिहासाचा ठाम सिद्धांत आहे. मराठी साम्राज्याच्या उत्कर्षापकर्षाची मीमांसा अतिशय मनोरंजक आणि बोधप्रद आहे. परंतु या स्थळीं ती चर्चा करणें अप्रस्तुत असल्यामुळें आम्ही फक्त वसईच्या तहापुरतेंच विवेचन केलें आहे. ऐ. ले. संग्रहाचा उपसंहार लिहिण्याचा प्रसंग आम्हाला कधींकाळीं येईल तेव्हां त्याठिकाणी आम्ही याविषयीं सांगोपांग प्रपंच करणार आहों.

नं. ६३८७ श्री. (ज्येष्ठ शु० २—२ जून.)

पौ॥ छ. १ सफर.

विज्ञापना ऐसी जे. रा॥ येशवंतराव होळकर फौजसुद्धां भिकनगांवें कूच करून थालनेरास येऊन तेथें अर्चीसिंग याचें पारपत्य करून कैद केला. तेथून कूच करून तापी दक्षिणतीरास बेटावरास आले. तेथून कूच करून कासारबारीखालीं चाळीसगांवनजीक मुक्काम करून आहेत. रा॥ गणपतराव नारायण व शामतखान व आबाजी लक्ष्मण यांजबरोबर दहा बारा हजार फौज देऊन पाठविले ते कासारबारी चढून मालेगांव वगैरे महालांत येऊन गांडापूर, बैजापूर वगैरे या प्रांतांत खंडणीचा व लुटीचा दंगा मांडला आहे. त्यावरून टोकें, नासिक वगैरे प्रांत उध्वस्त जाहला आहे. राजेबहादर व विंचूरकर व वोढेकर हे कुटुंबसुद्धां निघोन त्रिंबकच्या किल्ल्याच्या पिछाडीस गेले. शिंदेबहादर यांची फौज होळकराच्या पिछाडीवर आहे ती बराणपुरास दाखल होऊन गोपाळराव चिटणीससुद्धां एकत्र जाहले आहेत. शिंदे बहादूर यांची ताकीद जे, बराणपुरींच मुक्काम करून असावें. होळकराचे पीछावर जाऊं नये व लढाईचा मोहरा देऊं नये. याप्रों ताकीद आहे. होळकर याणीं शिंदे बहादूर यांच्या फौजेच्या तोंडावर जिवाजी येशवंत व मीरखान पठाण व फत्तेसिंग माने याप्रों वीस हजार फौज थालनेरावर ठेऊन फौजेस ताकीद केली जे, शिंदे बहादर याचे फौजेवर चालून जाऊन लढाई देऊ नये. शह राखून मजबुतीनें असावें याप्रों ताकीद होऊन होळकर चाळीसगांवानजीक आले आहेत. पुढें जमावसुद्धां गंगेवर येऊन खावंदाच्या भेटीस यावें हा विचार पक्का आहे. येविशीं जलदी देण्याची फार आहे. येशवंतराव होळकर याणीं श्रीमंतांस

१ पत्र पुण्याहून धोंडो बापूजी जोशी याचें मिरजेस. या पुस्तकांत पत्रें छापलीं आहेत त्यापैकी ज्या पत्रांखालीं स्पष्ट नामनिर्देश टीपेंत केला नसेल तीं सर्व पत्रें पटवर्धनांच्या कारकुनानें पुण्याहून मिरजेस गंगाधरराव गोविंद ऊर्फ बाळासाहेब मिरजकर यांस लिहिलीं आहेत असें समजावें.

दोन हत्ती व दोन घोडे नजराणा पाठविले आहेत ते एका दों दिवसांनीं दाखल होतील. होळकरानीं इकडे न यावें म्हणोन होळकराकडील वकील गोपाळराव व श्रीमंत मिळोन होळकरास पत्र लिहिलें जे, तुम्ही इकडे येऊं नये. तुमचा व शिंदे यांचा समेट करण्याविशीं बाळोजीची रवानगी जाहली आहे. याप्रों पत्रें गेलीं आहेत. छ. २३ रोजीं पांडोजी कुंजर व येशवंतराव पाटणकर हे उभयतां शंभर सवाशें स्वार व दोन पागेचीं निशाणें व एक उंटावरील नगारा याप्रमाणें येऊन श्रीमंतांस भेटले व श्रीमंत सौ॥ ताईसाहेब[1] बाळाजीपंत पटवर्धनमुद्धां छ० २३ रोजीं पुण्यास येऊन दाखल जाली. खासा स्वारी मोहरीस व सासवडास जावयाची होती ती तहकूब जाहली. कुंजर नेहमीं सरकार वाड्यांतच मुक्काम करून आहेत. श्री॥ रा॥ रामचंद्रपंत आपा व चिंतामणराव आपा व त्रिंबकराव यांस सरकारांतून पत्रें गेलीं जे, पोलादजंगाचे[2] रोखावर जाऊन मुक्काम करावा. रा॥ बाजीराव[3] बर्वे हे आपल्या कारभारास दिवाण पाहत आहेत. दिवाण मिळाल्यास पुढें जरीपटक्यासुद्धां कर्नाटकांत जावयाची तजवीज कालानरूप घडेल. होळकर हिकडे आले असतां त्यांचे पारिपत्यास प्राचीन सरदार व पागे पथकें व हुजुरात वगैरे गारद आदिकरून श्रीमंतांचे हुकुमाप्रों सर्व हजर आहेत. श्रीमंतांचा प्रताप व दैव मोठें आहे. आयास न करितां प्रतापेंकरूनच पारपत्य होईल असा बेत आहे. पुढें होईल तें लिहून पाठवूं. हे विज्ञापना. होळकराचा नेट येण्याचा जसा दिसेल त्यासारखे पश्चमेस प्रतापगड वगैरे इकडे जावयाची तजवीज होईलसें दिसतें ! पुढें घडेल तें खरें. हे विज्ञापना.

---

नंबर. ६१८८ श्री. (३ जून)

दे॥ छ. ९ सफर सुरु सन सलास मया तैन व आलफ.

---

१ ही पेशव्यांची स्त्री. २ हा निजामअलीचा थोरला मुलगा. हा यावेळीं सुरापूर संस्थानावर स्वारी करून आला होता. ३ हे पेशव्यांचे मामा. यांना यावेळीं कर्नाटक प्रांताची सुभेदारी पेशवे सरकारांतून मिळाली होती.

पे. द. ६

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी त्रिकाल चरणांवर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना ता॥ जेष्ठ शु॥ ३ पावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. दुकान पेठ बुधवार त्यांतील हलवाई पळोन गेला आहे तो अद्यापि आला नाहीं. दुसरा कोणी ठेवूं म्हटल्यास वाणी उदमी सराफ कोणी मिळत नाहीं. घरें दुकानें हजारों हजार रिकामीं पडलीं आहेत. नगारखान्यानजीक सोनाराचीं दुकानें बगैरे जागा रिकाम्या आहेत वडिलास कळावें. मद्रास शहर चेनापट्टणचे नजीक मोठें शाहार याजमध्यें अग्नि लागून चारशे हवेल्या जळाल्या. ज्या दिवशीं मुंबईस दुसऱ्यानें आग लागली त्याच दिवशीं तेथें लागली. नाश फार जाहला. प्रथम मुंबईस आग लागली त्यामध्यें नाश जाहला. त्याजपेक्षां चतुरगुणित नाश जाहला. दहा कोटीपर्यंत नाश जाहला. इंग्रजांच्या वखारा व मातबर सावकार यांचे माल जळाले याजप्रमाणें चेनापट्टणचें लिहून डाकेचें लिहिलें इंग्रजांचें आलें त्याजबरोबर बोहरी यांचें आलें व मुंबईहून ही आलें. चार रोज जाहले. वडिलांस कळावें. श्रीमंत राजश्री त्रिंबकराव आपासाहेब यांजला पत्र लिहून लाखोटा पाठविला आहे. कुरुंदवाडास पावता करण्यास आज्ञा करावी. राजश्री आबाजी हरि किबे याचीं पत्रें दिल्लीहून आलीं ते तेथें यजमानांनीं पाहिलीं. नंतर लाखोटा करून वर नांव आबाचें लिहून पाठविलीं आहेत. वैशाख व॥ आमावास्या जाहल्यावर पुण्यास येतों असें आबानीं लिहिलें होतें. त्यास वडिलापाशीं पत्रें आलीं आणि मशारनिल्हे इकडे निघोन अगोदर आले असल्यास लाखोटा फोडून पहावा. दोन पत्रें आंत मोकळीं आहेत तीं पहावीं. मागती एकंदर लाखोटा करून वांईस गेले असल्यास तिकडे पाठविण्यास आज्ञा करावी. इकडे आले असल्यास इकडे पाठवणेस आज्ञा करावी. दिल्लीचीं पत्रें आहेत. वडिलांस कळावें, बहुत काय लिहिणें, सेवेशी श्रुत होय. हे विज्ञापना.

---

ले. ६३८९ श्री. (५ जून.)

पै॥ छ० ६ सफर सन सलास मयातेन.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी. शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ज्येष्ठ शु॥ ५ वर्तमान यालकाचें यथास्थित असे विशेष. लक्ष्मणासिंग चोपदार विजापुरास गेला आहे. श्री॥ सौ॥ कुशा अक्का यांची कन्या सौ॥ बहिणाबाई श्रीगंगास्नानास गेली होती असें पेशजी लिहून पाठविलें होतें. त्यास सौ॥ बहिणाबाई गंगेहून आली. लक्ष्मणसिंग याजबरोबर चोळ्या तीन व लाखोटा पाठविला तो त्याजला देऊन पत्र घेऊन सौ॥ अक्काचे नांवें लखोटा करून दिल्हा तो पाठविला आहे. वेदशास्त्रसंपन्न रा॥ रा॥ शामभट्ट बोवांस पत्र पाठविलें तें देऊन त्यांणीं पत्र लखोटा करून दिल्हा तो पाठविला आहे. लवंगा दोन शेर व कापूर दोन शेर व पिस्ते नवे पाहून तीन शेर पाठवणें. बुधल्या दोन व पोते पिशवी पिस्त्यांस पाठविले आहे यांत घालून पाठवणें व नारायणगांवी पासोड्या दोन किंमत नऊ दहा रुपये मध्यें दोन घेऊन पाठवणेविसीं पत्रीं आज्ञा. त्यास लवंगा व कापूर चांगला पाहून घेतला व पिस्ते नवे पाहून घेतले. एकूण तीन जिन्नस, पासोड्या दोन नारायणगांवी पासोड्या लिहिल्या. किंमतीपेक्षां जास्ती रुहा आणे जास्ती पडले परंतु दोन पाठविल्या आहेत. पोही आंगें राजारामी तऱ्हा आहे, लवंगा, कापूर, पिस्ते, पासोड्या मिळोन याद अलाहिदा आहे. श्री॥ रा॥ माधवराव व नानासाहेब यांचीं सनगें रंगवण्यास दिल्हीं तीं तयार होऊन दहा बारा दिवसीं देतील. आल्यावर वडिलांस लिहून मागाहून पाठवितों. तवे व तांदूळ पोथी व जिन्नस श्री॥ सौ॥ मातुश्री सत्यभामाबाईस चिरड्या खण वगैरे जिन्नस रवानगी मी केले. अजमास साडेतिनशें. शिवाय रंगारी याची मजूरी देणें आहे त्यास मागाहून शें-दीडशे रुपयेची चिठ्ठी करतों. केशर सतर रुपये पाव आहे. कमी जाहले-वर लिहून पाठविणेंविसीं आज्ञा. त्यास तूर्त ऐशी रुपये केशर जाहलें. रूपमात्र पावणें तीन शेर चांगलें, रोली तीन शेरही मिळतें. आठ रोज जाहला आहे. पर्जन्य लागतो यास्तव बुरणूस घेऊन दिल्हा आहे. (हिरे व माणकें) कामदार याजला दाखवून बांधून दिल्हीं आहेत. बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

———

नं. ६३९०                श्री.                ( ५ जून.)

पै.॥ छ. ६ सफर. सन सलास मया तेन.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी. दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता॥ जेष्ठ शु॥ ५ पावेतों वर्तमान यथास्थित असे विशेष. रा॥ धोंडोपंत बाबा गोडबोले यांजला सरकारचें बोलावणें गेलें होतें. मशार-निल्हेनीं जमाव अवघा दोन हजारपर्यंत घोडपच्या किल्ल्याखालीं जमाव ठेवून पुण्यास चार रोजानें ते येथें आले. त्याचे आगोदर स्वारी सरकारची सासवडास गेली. मशारनिल्हे पुण्यांतच आहेत. बाबा पाटणकर व पांडूजी कुंजर पुण्यास पांचशें जमावानिशीं आले. बारा तेरा रोज जाहले. चतुरसिंग घाटावर आहे. सरकारांत त्यास बोलवायाचा ठराव जाहल्यावर चारशेंनिशीं आहे तो येईल. श्रीमंताची स्वारी सासबडास गेली. तेथून पुरंधराखालीं महाकाळी तोफ आहे तिचे दोनचार बार काढून मग बनेश्वरा-जवळ आली. तेथें रा॥ नारायणराव वैद्य यांचे घरीं मेजवानी करून जेजुरीस जाणार. पुरंधरास जाऊन येणार अशी बोलवा आहे. स्वारी जाऊन पांच रोज जाहले. श्रीमंतानीं स्वार चारशें ठेवावयास सांगून नव्याकडून पांच सात जणाकडून स्वार ठेवविले. चारशेंचा जो सरदार त्याचें नांव पुढा असें ठेविलें. असे पांच सात पुढे तयार जाहले. पुण्यांत दरवडा बुधवारांत तीन घटका रात्रीस चावडीनजीक पडला. दोन ब्राह्मण सराफ मृत्यु पावले. एक गडी कठिण आहे. सांपडले नाहींत. गेले. पुण्यांतील कारभाराचीं वस्त्रें रा॥ गोविंदराव परांजपे सरकारचे मावसभाऊ यांस दिल्ह्याचें पेशजी लिहिलें आहे. त्यास ते कारभार मृग सालापासून करणार. कोतवालीचाही करणार. श्री॥ सौ॥ मातुश्री ताईसाहेब, काकू-साहेब श्रीगंगास्नानास गेलीं तीं पुण्यास आलीं. पांच रोज कोथरूडचे बागांत होतीं. काल वाड्यांत आलीं. नारायणजी कुंजर यांहून आल्यावर पागा पंधरापर्यंत तेथें होत्या त्याही पुण्यास कालच आल्या. त्या प्रमाणें दाट बोलवा आहे. बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६३९१. श्री. (ज्येष्ठ शु. ७–७जून )

पै॥ छ. ६ सफर सुरु सन सलास मया तेन व आलफ.

विज्ञापना ऐसीजे. येथील वर्तमान तरी रा॥ यशवंतराव होळकर फौज-मु॥ चाळीसगांवावर आले. पुढें फौजा पाठवून गंगातीरप्रांतीं खंडण्याचा व लुटीचा दंगा करीत आहेत. व खासाही येण्याविसीं जलदी फार आहे. म्हणोन श्रीमंत व मुनसी व पारोजीपंत मिळोन विचार केला जे, होळकरा-कडे कारकून व पत्रें पाठवून त्यांचें येणें न होय ते करावें. त्यावरून आबाजी शंकर कारकून शिलेदार याजबरोबर पत्रें होळकरास देऊन होळ-कराकडे रवाना केलें. नंतर कारभारी यांवर श्रीमंत रुष्ट होऊन बोलले जे, तुम्ही जाऊन शिंदे होळकरांचा सन्ट करून द्यावा. तें न करितां येथें राहून कोणता बंदोबस्तही होत नाहीं व राज्याची खराबीही तुम्ही केली. अशीं कित्येक बोलणीं रुबरु बोलोन उठले. त्यास होळकर इकडे येतात त्याजमुळें बहुत आंदेशे उत्पन्न होऊन ज्येष्ठ शु॥ १ देस स्वारी सासवडास निघोन गेली. तेथून मोहरीस रा॥ नारायणराव वैद्य याचे घरास भोरा-नजीक मेजवानीस जाणार. तेथून कोणीकडे स्वारी जाईल हें न कळे. सध्यां बेत याप्रमाणें आहे. हुजुरातीचे लोकांचा कारभार कुंजर यांणीं सोडला. सध्यां रा॥ नाना पुरंधरे याचे गळां घातलें आहे. ते कारभार हुजुरातीच्या लोकांचा करितात. हुजुरातीच्या लोकांचा बंदोबस्त हा कालमर्याद जाहला नाहीं. स्वारीसमागमें कुंजर, मुनसी व दीक्षित कोणी कारभारी गेले नाहींत. रा॥ बाळाजीपंत पटवर्धन गेले आहेत. पुरंधरे लोकांची खातरजमा करून खर्चा-

---

१ या पत्रावर इंग्रजी तारीख व मराठी मिति पैवस्तीची आहे. पैवस्ती =दाखल तारीख. मूळ पत्रांत मुसल.तारीख किंवा मराठी मिति नसेल तर पैव-स्तीच्या तारखेवरून पत्रावर इंग्रजी तारीख व मराठी मिति घालावी अशी ऐ. ले. सं. ची पूर्वीची वहिवाट आहे आणि तीच आम्ही कायम ठेविली आहे. सबब यापुढें पत्रें छापलीं आहेत त्यांमध्यें ज्या पत्रांत पोटीं तारीख किंवा मिति लिहिली नसेल त्या सर्व पत्रांच्या तारखा व मित्या पैवस्तीच्या आहेत असें समजावें. मराठी मिति आणि मुसलमानी तारीख यांचा वारंवार मेळ नसेल तर आम्ही वारालाच प्राधान्य दिलें आहे.

खर्चाचा बंदोबस्त जाहला म्हणजे मागाहून जाणार. गायकवाड्याच्या संस्थानामध्यें परस्परें बंधूंचा कलह लागून रावजी आपाजी याणीं इंग्रजी पलटणें कुमकेस आणोन लढाया होऊन उभयतांची खराबी जाहली. नंतर परस्परें समजूत विचार करून इंग्रज व रावजी आपाजी उभयतां गायकवाड मिळोन परस्परें विचार करून तह केला. कोणें त्न्हेनें तह जाहला हें मागाहून लिहून पाठवितों. होळकर इकडे येतात म्हणोन श्री॥ रा॥ चिंतामणराव आपा व रामचंद्रपंत आपा यांस फौजसुद्धां येणें म्हणोन सरकारचीं पत्रें गेलीं आहेत. हल्लीं हुजूर सरदार रूपराम चौधरी व गोसावी व काळे याप्रमाणें पलटणेंसुद्धां तयार आहेत. हुजुरातीची खातरजमा जाहाल्यावर तेही दोन तीन हजार स्वार आहेत. विंचूरकर व राजेबहादर वगैरे हे तर होळकराच्या भयानें मुलेंमाणसेंसुद्धां त्रिंबकच्या पिछाडीस गेले आहेत. सरकारच्या बावन पागा आहेत त्या महादजीपंत फाटक याच्या बराबर अथणीस आहेत. तोफखाना जाग्यावर तयार आहे. बैल व बारूद (दारु) गोळा व शिबंदीस पोटास मिळालें म्हणजे तोफखानाही सिद्ध आहे. त्यास श्रीमंतांचा प्रताप मोठा आहे. जें होणें तें दैवानें होईल असें म्हणणें आहे! वरकड अधिकोत्तर ल्याहावें असें नाहीं. जें असेल तें सेवेशीं लिहूं हे विज्ञापना. ता॥ खासा होळकर पारोळ्यास दाखल होऊन तोफाकडील दोन लाख रुपये याचा ठराव केला. पुढें येण्याची जलदी आहे याजकरितां होळकराच्या महालच्या सोडचिठ्या त्याजकडे पाठवून इकडे न येण्याचा बंदोबस्त करीत आहेत. श्री॥ सौ॥ ताईसाहेब यांचा जवाहिराचा डबा वस्तांचा चोरीस नाशिकास गेला. सरासरी दीड लाख रुपयेचा ऐवज गेला. गोखले याणीं सावनूरचे शिबंदीबद्दल[2] कुशावा मुनशी यास तगादा केला म्हणोन गोपाळराव याणीं सरकारांतून सावनुर तालुक्याच्या

---

१ स. १८०१ सप्टेंबर ते १८०२ मार्च हे सात महिने बापू गोखल्यानें नवी फौज ठेवून पेशव्यांच्या हुकमावरून पटवर्धनाशीं युद्ध सुरू ठेविलें होतें. या नव्या फौजेच्या पगारबाकीबद्दल हा तगादा. कृष्णराव व गोपाळराव मुनशी हे भाऊभाऊ. २ फौज. या ठिकाणीं फौजेची पगारबाकी.

ऐवजीं कुंजर याच्या नांवें एक लाख नव्वद हजारांच्या वराता घेऊन गोखले यांच्या वकिलाच्या स्वाधीन केल्या. गोखले यांणीं शिबंदीविसी कुशाबास तगादा करूं नये याप्रमाणें ठरलें हे विज्ञापना.

---

नं० ६३९२ श्री. (ज्येष्ठ शु० १२—१३ जून.)

पै ॥ छ० १७ सफर सन सलास मया तैन व अलफ.

सेवेशीं दिनकर रघुनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता॥ छ० १२ सफर पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री येशवंतराव होळकर याची नजर सरकाराशीं बांकडी दिसण्यांत त्याच्या करण्यावरून वाटते. त्यास आपल्या पथकापे॥ राजश्री चिंतामणराव आपा याचे पथक सुरापुरचे सरहद्देवर जाईल. तेथें आपलेकडील पांचशें स्वार पाठवावे. बाकीचें पथक बरोबर शहाणा माणूस देऊन हुजूर पुण्यास पाठवावें म्हणोन सरकारची आज्ञा जाहली आहे त्यावरून लिहिलें आहे. श्रीमंत राजश्री चिंतामणराव आपा यांस हुजूर येण्याविसीं आज्ञापत्र गेलें आहे तें पत्र पावतांच येतील. त्याजबरोबर आपलेंही येणें जाहलें असतां चांगलें पडेल. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

---

नं० ६३९३ (ज्येष्ठ ब० २—१७ जून.)

उतारा— पत्र धोंडो बापूजी जोशी यांचें पुण्याहून मिरजेस.

"रायगड व महाड किल्ला कुंजर याजकडे मामलत होती ते त्याजकडून दूर करून राजश्री गोपाळजी कुंजर वाड्यांतील कोठीवर असतो त्याचे तीर्थरूप राजश्री बाळाजी माणकेश्वर हल्लीं कुंजराकडून सातारियाचा कारभार करितात, त्याजकडे दोनही मामलती सांगितल्या. नारोबा आवटी याजकडील सिंहगड राजश्री गोविंदराव परांजपे याजकडे सांगितला."

---

नं. ६३९४ (जेष्ठ व २ – १७ जून.)

उतारा— पत्र धोंडो बापूजी जोशी यांचें पुण्याहून मिरजेस.

---

१ पत्र पुण्याहून जमखिंडीस रामचंद्रपंत आपांस

"होळकर पारोळ्यानजीक आहे. पारोळ्याची खंडणी लाख रुपये घेतली. मालेगांव वगैरे खंडण्या घेतल्या. श्री. नाशीकास रोखा आला. त्याजवरून मावधर व सावकारा वगैरे लोक पळाले. दोन हजार ब्राह्मण श्रीगंगेवर बसले आहेत. धोडप किल्याखालीं ठाणीं पाच सात होतीं त्याजपैकीं दोन तीन होळकर याणीं घेतलीं. राजश्री गोपाळराव भाऊ बऱ्हाणपुरास होते ते पुढे सात हजार फौज व एक कंपू दोन मजली आले. त्याजवरून होळकर याणीं राजश्री जिवाजी येशवंत याजबरोबर दहा हजार जमाव देऊन त्याजवर पुढें पाठविले. आपण तेथेंच आहे. प्रांतांत दिवा नाहीं अशी अवस्था आहे याजप्रमाणें बोलतात. सरकारांत फौज जमाव करीत आहेत. सर्वांस बोलवणीं गेलीं. चत्रसिंग घांटावर होते ते येऊन भेटले. चार रोज जाले. शंभर लोक बरोबर होते. चत्रसिंग व आंगरेमामा व बाबा पाटणकर व पांडूजी कुंजीर व बाईप्रांतीं जागा होत्या त्या ऐशा पुण्यास आल्या. शंभर दोनशेंपर्यंत जमाव बरोबर आहे. पंतप्रतिनिधिकडील बळवंतराव दोनशे लोकानिशीं पुण्यास आले. आंगरेमामाजवळ दोन हजार जमाव आहे. गोखले व श्री॥ राजश्री चिंतामणराव आपा व श्री॥ राजश्री रामचंद्रपंत आपास बोलावणें गेलें याजप्रमाणें बोलतात. बाळोजी कुंजर याणीं डेरे बाहेर शिंदे याजकडे जाण्यास्तव दिल्हे. जाऊन होळकर याचा व त्याचा तह करून द्यावा या बेतावर जात आहेत. कुंजर पुण्यांत आहेत. कधीं निघतील पाहावें."

---

नं. ६३९५ श्रीगजानन. (ज्येष्ठ व. ११—२६ जून.)

पै॥ छ० ४ रबिलावल सल्लास मय्या तैन आषाढमास.

सेवेसीं विसाजी राम गोखले शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ० २५ सफरपर्यंत स्वामीचे कृपेंकरून मुक्काम लष्करनजीक धारवाड येक कोस सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. यानंतर इकडील मजकूर चिरंजीव रा॥ बापू बरोबर जमाव आज पांच हजार स्वार व पांच हजार पायदळ दोन पलटणें सुद्धां आहेत. पांच तोफा शिवाय दोन अडीचशे बेदे

१ बेद = कर्नाटकी प्यादा.

येणे प्रमाणें सामान आहे. किनूर तालुक्याकडे जाणार. आज कूच होऊन गरगचे मुक्कामास जाणार. कित्तूरकर यांचे बोलणेंचा नाद लागला आहे. श्रीमंताकडून सांडणी स्वार आला आहे. फौजसुद्धां हुजूर बलावणं जालें आहे. सावनुरीं मसलत पडली सबब फौजेचे खर्चाची अडचण आहे. याजकरितां किनूरचा जाबसाल उरकण्यांत आलेवर पुढें मसलत हुजूर जावयाची होईल. काल छ० २४ सफरीं धारवाडकर रा० बापू शिंदे यांणीं मेजवानी केली. भेटी होऊन समारंभ चांगला जाला. स्वार व पायदळ मिळोन दोन हजार सुमार नवीन सरंजाम ठेवणार. सर्व प्रकारें सेवकावर कृपा असली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

न० ६३९६　　श्री.　　(२८ जून.)

पै।। छ० १ रबिलावल सुरु सन सलास मया तैन व आलफ

सेवेसीं धोंडो बापूजी जोशी शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ता।। ज्येष्ठ वद्य १४ पावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. सरकारचे डेरे गारपिरावर जाहले. बरा रोज जाले. राजश्री पागे नि।। कुंजर डेऱ्यास जाऊन उतरले. राजश्री बाजीराव बर्वे सरसुभा कर्नाटक हे व राजश्री बळवंतराव नि।। पंतप्रतिनिधी व पाग्ये व मनोहर गिरी गोसावी व रूपराम चवधरी व आबा काळे यांचे लोक व मुळरा (?) यवन हजार लोक वगैरे जाऊन गारपिराबर उतरले. पागे वगैरे याजला सत्वर येणेविशीं पत्रें गेलीं. गारपिरावर तूर्त जमाव झाडून स्वार पायदळ पांच हजार जमा आहे. बाबूराव आंगरे औंधावर आहेत. हजार जमाव त्याचा आहे. फौजेंत कारभारी राजश्री नाना पुरंदरे व पांडूजी कुंजर याची नेमणूक होणार आहे. राजश्री गोविंदपंत परांजपे याजला तोफखान्याचा कारभार आहे. त्याजला दहा हजार गारद ठेवणेविसीं आज्ञा जाली व गोपाळराव नळेगांवकर याजला पांच हजार फौज ठेवणेंस आज्ञा जाली. फौजेची योजना रात्रंदिवस तयार करावयाची चालली आहे. याजप्रे।। मजकूर बोलतात. होळकर याची फौज नगरासमीप आल्याची बोलवा बोलतात. इकडे मृग नक्षत्राचा व

आर्द्राचे नक्षत्राचा परजन्य नाहीं. माबळांत पांच सहा कोशांवर लागत आहे. दाणा व किराणा जिन्नस वैरण याजला दोन तीन रुपये हजारी पल्ला चढ आहे. श्रीपाषाणेश्वरास अनुष्ठानास प्रज्यन्यास्तव ब्राम्हण साळाबादाप्रमाणें लाविले आहेत. पुण्यांतील बंदोबस्त राजश्री गोविंदराव परांजपे यांजकडे आहे. याजप्रों प्रकार आहे. बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६३९७. श्री. [ ज्येष्ठ वा। १४-२८ जून. ]

छ. २० रबिलावल सन सलास मया तेन, आषाढ.

ता। छ. २७ सफर मुक्काम श्रीआवंतिकापुरी[1]. इकडील वर्तमान तर खुद्द मुकाम मजकुरीं सैन्य शिकार करून आहेत. कारभारी काल प्रातःकाळीं येऊन मसलत दोनप्रहरपर्यंत खाशाशीं करून मग ते आपले घरीं गेले. खासे शिकारीस गेले. कालचे मसलतीचा भाव सदाशिव महादेव हे ब्राह्मणपुरी[2] फौजसुद्धां आहेत त्यास मशारनिल्हेस येथून पत्रें गेलीं आहेत कीं, फौज राजश्री गोपाळराव रघुनाथ याचे हवाला करून तुम्ही येणें. सारांश गोपाळराव व सदाशिव महादेव याचे आपणांमध्यें बनत नाहीं, एका म्यानांत दोन सुऱ्या कशास पाहिजेत, याजकरितां बोलावलें आहे. काल येथून पांच-सातशें लोक उठोन गेले. भक्षावयास न मिळे म्हणोन उठोन गेले. काशीराव होळकर याजकडे आत्माराम बावांची रवानगी होत आहे समेटीच्या बोलण्याकरितां. काशीरायाकडे जाऊन, मग यशवंतरायाकडे जाणार. एका दों रोजां बावा येथून निघणार आहेत फकीरजी, घोरपडे हे कोस्याकडे कांहीं नवी फौज ठेवून आणावी व यशवंतराव शिवाजी, जिवबादादांचे चिरंजीव हे बासवाडा, डोंगरपूर येथें आहेत त्यासही आणावें या बेतावर पाठवितात. तेही एका दों रोजांत निघणार आहेत. नारो हरी पहिले वकील जिवबादादा यांजकडील कारकून आंबडकर यास देशीं पाठवावें आणि

---

१ हें आबाजी हरि किबे यांचें बातमीपत्र. किबे हा मोठा सावकार होता त्यामुळें दिल्ली, लखनौ व काशी अशा दूरदूरच्या ठिकाणाहून त्याजकडे बातमीपत्रें येत असत. २ उज्जनी. ३ बऱ्हाणपुरी.

नवी फौज ठेवून आणावी असे बेत आहेत. दुसरें [वर्तमान] मुकुंदशेट सावकार याचे गुमास्ते धनजी शेट यास बोलावून दहा लक्ष ऐवज त्याजकडे ठराऊन पैकीं चार लक्ष येथील लोक मोंगल व मराठे यास खर्चास द्यावे. लाख रुपये नागोराम हे डोंगरपूर बासवाडा इकडे रवाना केले आहेत. त्यास लक्ष रुपये देऊन त्यास बिदा करावें. पेशजी तेही मुहूर्तानें राणे खानभाई याचे बागाजवळ धारकर पवारसुद्धां उतरले आहेत त्यास रवाना करावें. दोन लक्ष चिटणिसाकडे बराणपुरीं खर्चास पाठवून द्यावे. दोन लक्ष येथें खर्चास खासगीकडे ठेवावे. लाख रुपये मोघ्यास द्यावे. येणेंप्रमाणें दहा लक्ष वेरीज ठराविली आहे. फैलस फिरंगी याचा भाऊ जानबातिशी कंपूसुद्धा रामपुरा भानपुरा येथील बंदोबस्तास पाठवावे. आणीक काल गौरीशंकर जोशी याचे पुत्रानें अनुष्ठानास बसविले होते त्यास सत्कारपूर्वक याणें जोशी मजकूर यास बसविलें आहे, कशाचें अनुष्ठान करविलें हें सांगावें. इकडे मुख्य कारभारी याणीं एक दोघे रांगडे ब्राह्मण धरिले आहेत त्यांणींही अनुष्ठान मांडलें होतें त्यासही फुरसत होत आहे कशाचें अनुष्ठान मांडलें आहे. परस्पर एकमेकांचें चित्त शुद्ध नाहीं. कैलासवासी नानाकडील आपाजीराव दाभुळकर याजकडील फडणिशी काढून विठ्ठल महादेव यांजकडे सांगितली. त्याजकडे कांहीं शब्द ठेविला आहे व पैकाही मागतात. त्याजकडून सरबरा होत नाहीं. सबब त्याजकडून काढून विठ्ठलपंताकडे सांगितली. फकीरजी गाढवे याजकडील कारकून एक नामें राघोपंत धरिला आहे. त्यास एक मारही दिला. दहा हजार रु. मागतात. कालच्या मसलतींतील भाव येणेंप्रमाणें जाला. शिकारीस स्वारी गेली होती. प्रहर रात्रीस आली. आंबोजी इंगळे कौलेस जाऊन पीरनची भेट घेऊन गंगास्नानास गेले. गंगास्नान करून इकडे येणार. बाया व इंगळ्याची फौज असे पोहेरीस आहेत. झांशीच्या अलीकडे तीन मजलांवर आहेत. आंबोजी इंगळे तिकडून आले म्हणजे इकडे घेऊन येणार. बरकड मजकूर होळकर प्रकरणीं तर सारांश समेट करावी हा विचार बहुत आहे. शिकारीचे निमित्यें इंदुरास जाऊन फौज जमा करून पुढें महेश्वरास जावें हा बेत होऊन फौजेस व बाजारास ताकीद जाली आहे. राजश्री कृष्णराव चिटणीस यांस भोसल्याकडे पाठ-

बावयास सिद्धता जाली होती परंतु तूर्त ती मसलत राहिली. पुढें होईल मजकूर तो लिहूं. हे विनंती.

---

नं. ६३१८ श्री. [ आषाढ शु० २—२ जुलै. ]

पै॥ छ १ रबिलावल सलास मया तैन.

विज्ञापना ऐसी जे-पुरंदरचा किल्ला कुंजराकडून काढून गोविंदपंत नाना जोशी निसबत हुजूरपागा याजकडेस सांगितला. होळकराची अघाडीची फौज शामतखान पठाण व फत्तेसिंग माने उभयतां पंधरा हजार फौजसुद्धां डोंगरगणावर मुक्काम करून आहेत. नगरच्या किल्ल्यावर तलावे होऊन परस्परें गोळागोळी चालली आहे. जामगांवासही स्वार जाऊन होळकराचे पोचले आहेत. सारांश नगरास होळकरांच्या फौजा दाखल जाल्या. बाबूराव आंगरे यास श्रीमंतानीं कुलाब्याहून बोलावून आणून त्यास आज्ञा केली जे, फौज धरून नगर व जामगांवचा बंदोबस्त राखणें. त्यास अद्यापपावेतों आंगऱ्यास खर्चास देऊन रवानगी जाहली नाहीं. व पुण्यांत येऊन खर्चाखालीं खराब जाले. त्यावरून छ २४ रोजीं आंगरे प्रातःकाळीं सरकारवाड्यांत येऊन अडोन बैसोन बोलों लागले जे, आम्हास खर्चास देऊन नगराकडे रवानगी करावी. तिकडे जाऊन बंदोबस्त राखूं. होळकरानीं किल्ला घेतल्यावर दौलतरायाचा शब्द लागेल. नाहींतर आम्हास निरोप देणें. आम्ही कुलाब्यास जाऊं. त्यावरून श्रीमंतांनीं आज्ञा केली जे, उदईक तुम्हास काय तें सांगूं. रा॥ पाराजीपंत यांणींही श्रीमंतास विनंति केली जे, सेवेशीं येऊन चार महिने जाहले. अद्यापपावेतों कांहीं एक समेटाचा बगैर बंदोबस्त होत नाहीं. त्यास मला आज्ञा द्यावी कीं यशवंतरायाकडे माघारा जातों. पुढें स्वामीची मर्जी असेल तसें करावें. आम्हाकडे हरेकविसींचा गुन्हा सरकारचा नाहीं. सर्वा गोष्टींची विनंति केलीच आहे. त्यावरून त्यासही आज्ञा जाली जे, एका दों दिवसांनीं तुम्हासही निश्चयाचा जाब सांगतों. याजप्रमाणें वर्तमान आहे. पुढें निदर्शनास येईल तें लिहूं. हे विनंती. सरंजामपट्टीचा तगादा सर्वास येथें चालला आहे. हे विनंति.

नं. ६३९९ श्री ( आषाढ शु. १३-१३ जुलै ).

पै॥ छ. १२ रबिलावल. सन सलास मया तेन. आषाढ मास.

विज्ञापना ऐसीजे. येथील वर्तमान तरी ज्येष्ठ ब॥ १२ स हुजरातीच्या लोकांतील हैबतसिंग खासे व मानाजी मोरे वगैरे पांचसात असामी यांणीं वाड्यांत येऊन निरोप देणें म्हणोन आग्रह केला. त्यावरून श्रीमंतांनीं दर असामीस हजार हजार रुपये खर्चास देऊन रुबरू विडे देऊन निरोप दिल्हा. नंतर कुल हुजरात लहानमोठे मिळोन पस्तीस स्वार उठोन गेले. त्याचा मुक्काम शिकरापूर पार होऊन तेथूनही आपल्या मकाणास गेले. नंतर ज्येष्ठ वद्य अमावास्येस सायंकाळच्या प्रहर दिवसापासून मधेरात्रपावेतों येणे-प्रमाणें असाम्या वाड्यांत कोंडोन ठेविल्या आहेत तपशील—

२ मोरोबादादा व चिरंजीव

१० फडके बंधु ५ चिरंजीव

१ यशवंतराव नगरकर

१ राघोपंत फरासखाने

४ गोपाळराव मुनशी बंधु व चिरंजीवसुद्धां.

१ रंगोपंत निसबत राघोपंत गडबोले

१ निळकंठराव गोविंद खासगीवाले

१ कुंजर

१ नारायणराव वैद्य वकील भोसले

२ निंबाजी भास्कर चिरंजीव नि. शिंदे

१ बिनीवाले

२ पुरंदरे असामी नाना व बाबा

१ खंडेराव रास्ते

१ अंतोबा शेटे

१ रघुनाथ चिंतामण निसबत मुनशी

१ बापू चिंतामण फडके

येणेंप्रमाणें असामी वाड्यांत कोंडून ठेविल्या आहेत. यांपैकीं फडके व मोरोबादादा यांच्या घरीं चौक्या आहेत. सरकारवाड्याच्या दोंही दरवाजावर चौकी पाहऱ्याचा बंदोबस्त फार असून कोणासही बाहेर येऊं देत नाहींत व बाहेरून आंत लहान मोठ्यास हरकोणास जाऊं देत नाहींत. याजमुळें वाड्यांत काय मजकूर आहे हा कळत नाहीं. मनस्वी वर्तमान बोलतात परंतु खचित समजत नाहीं. त्यास मंडळीचें पक्कें वर्तमान समजलें म्हणजे मागाहून तपशीलवार लिहून पाठवितों. निळकंठराव रामचंद्र पागे हे आपल्या घरीं आहेत. त्यांचे घरीं चौकी सरकारी आहे. गणपतराव पानसे हे एक दिवस वाड्यांत होते. दुसरे दिवशीं परवानगी घेऊन

आपल्या घरास गेले. सारांश, फडके याजवर रोष विशेष आहे. मोरोबा-दादा वगैरे सर्व कफल्लक आहेत. पुढें सदरहू असामींची चौकशी होऊन निर्णय होऊन काय शेवट होईल तो मागाहून लिहून पाठवितों. या गलबलीमुळें होळकराचें प्रकर्ण वगैरे कांहीं एक होत नाहीं. तूर्त सर्व बंद आहे. श्रीमंतांचे मर्जीचा भरंवसा बालाग्र कोणास येत नाहीं. मागाहून सविस्तर लिहून पाठवितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं ६४०० श्री. (आषाढ व. १-१६ जुलै.)

पै ॥ छ १५ रबिलावर सलास मया तेन. आषाढ मास.

विज्ञापना ऐसी जे. येथील वर्तमान तरी नवे जुने मुत्सद्दी वाड्यांत नेऊन बसविले आहेत. त्यांपैकीं गोपाळराव मुनशी याची चौकशी होऊन त्याजकडे इंग्रजाकडील व होळकराकडील फितुराचे दोष लागू होऊन आषाढ शु॥ १ स रात्रीं खासा व बंधु व चिरंजीव कैद होऊन घरास कुटुंबमुद्धा चौक्या बसल्या. येविशींचा मजकूर सरकारांतून श्री॥ रा॥ चिंतामणराव आपा यांस पत्र ज्येष्ठ व॥ ३० स प्रहर रात्रीं सरकारचे सांडणी स्वाराबरोबर गेलें आहे त्यावरून सर्व कळलेंच असेल. हुजुरांतील लोक किरकोळ शेंदोनशें येथें देणेवेणेचे अडचणीमुळें राहिले होते. त्यांपैकीं शेंपन्नासाची जमेत रास्ते यांचे पेठेंत राहिले होते. त्याजवर सरकारांतून गारदी पाठवून लुटून आणले. बजाबा शिरोळेकर याजकडील गोपाळपंत व नाना फडणिसाकडील कारकून असाम्या तीन एकूण असाम्या चार पुण्यांत शिरोळकर याच्या वाड्यांत कैदेंत होत्या त्या आषाढ शु। १ स रात्रीं पळोन गेल्या. त्यावरून मुरारजी येवले यावर मर्जी रुष्ट आहे. त्यावरून येवले यागें शोध करितां बाबूराव आंगरे याचे गोटांत गोपाळपंताचा शोध लागून तेथून धरून आणून पुनः कैद केलें. मुनशी याजकडील इंग्रजाचे वकिलीचें कामकाज माधवराव जाधव याचे नातवास सांगितलें. होळकराची छावणी मुलतानपुरावर जाली. फडके यास ऐवजाचा तगादा फार आहे. घरांतील मोजदाज चालली आहे. दादा व फडके व मुनशी व किरकोळ दोन चार मंडळी वाड्यांत आहेत. बाकी निंबाजी भस्कर आदिकरून यास आपलेले घरास लावून दिल्हें. याप्रमाणें आहे. पुढें होईल तें लिहूं. बाया-

जवळ जगन्नाथ राम वगैरे शेणवी मंडळ होतें तें यशवंतराव होळकर याजपाशीं आलें. होळकरांनीं आठ हजार फौज जगन्नाथ राम शेणवी याजबरोबर देऊन नगरावर रवाना केलें. पुढें होईल मजकूर तो लिहूं. हे विज्ञापना.

नं० ६४०१          ( आषाढ व० ३— १८ जुलै. )

पै ॥ छ० १७ रबिलावल आषाढ सन सल्लास मय्यातैन.

ह[१]कीगत अजम रुस्तुमखां वजीरबहादूर बहादूर महाबली नजबखां वजीरबहादूर तख्त दिल्ली येथें तख्तावर काईम होते. यासमयीं अठरा लक्ष स्वार व पायदळ सलाम करीत होते. व बावन्न नबाब व अडीच हजार हत्ती स्वारीबरोबर चालत होते. व बावन्न नौबता झडत होत्या. ईश्वरानें हरयेकविशीं कांहीं कमी केलें नव्हतें. दुस्मान चोहों मुलखांत कोणी नव्हता. कर्नाटकांतही कोणी नव्हता. अर्काटांत महंमदअली नबाब होते त्यांणीं आपला चाबूकस्वार दिल्लीस पाठविला तो येऊन हुजुरपागेंत चाकरीस राहिला. वजिराची खुशामत करून येकत्यार जाहला. त्याणें एक दिवशीं घोडा सोडावयाचें निमित्य करून आम्हांस घोड्यावर देऊन तेथून निघाला तो महंमदअली याजवळ आला. त्याणीं बहुमान करून आपलेजवळ ठेवून घेतलें. तेवीस वर्षें तेथेंच होतों. नंतर महंमदअली पैगंबर जाले तेव्हां तेथून बाच्छाई सुलतानत व दौलत घेऊन टिपू सुलतान याजकडे आलों. त्याणीं बहुमान करून अठरा लक्ष होनचा मुलुख देऊन ठेऊन घेतलें. टिपूचा व इंग्रजांचा बेबनाव जाला आणि सारे राज्यांत फितूर होऊन लढाई लागली. फितुरामुळें टिपू बुडाला. तेव्हां आम्ही इंग्रजांचे हातीं सांपडलों. त्याणें आम्हांस कैदेंत ठेविलें. खासा महाल व दौलत झाडून बुडविली. आणि साहेब जादा धरून किल्ले कुदापूर येथें कैदेंत ठेविला आहे त्यास तीन वर्षें जाहलीं. आम्ही नगरच्या किल्ल्यावर होतों. आमचे मुलखांतील कलर (?) पांच चार असामी येऊन चाकरीस राहिले. त्याणीं आम्हांस काढून तीन मजला आणून सोडून दिल्हें. या मुलखांत

१ टिपु बुडाल्यावर त्याच्या फौजेपैकीं कांहीं प्रांतोप्रांतीं थापा मारून पोट भरूं लागले. अशा एका थापाड्यानें हें पत्र मिरजेस पाठविलें आहे.

आमचा सांभाळ करणारा कोणी नाहीं. आपलें नांव मोठें चोहों मुलखांत आहे. टिपूचा लेक आपलेजवळ आला. त्यास आपण कृपावंत होऊन कुमक केली ती सारे मुलखांत जाहीर जाहली. ऐसे आम्ही बाच्छाई नाहीं. आमचे मिय्याचा व आपला घरोबा समजून आलों आहों. तुम्ही व आम्ही दिल्लीचे शिक्के सनदवाले आहों. दुसऱ्याकडे जावयाचें नाहीं. आपण बाच्छाईवर नजर देऊन आमचे गळ्यांतील कफनी काढावी. आपलें नांव थोर आहे. दौलत कोणाची नाहीं ऐसें ध्यानांत आणून आह्मांस चौघांत बसवावें म्हणजे आह्मांवर फार उपकार होतील. व आपले नांव रुमशामपावेतों होईल. श्रीमंतांचे राज्यांत आपणाशिवाय थोर कोणी राहिला नाहीं ऐसें समजून आपले घरीं आलों. कफनी काढून हुरमत देऊन रवाना करावें म्हणजे साहेबजाद्याचा बदला (सूड) घेतों. हकीगत सर्व विदित व्हावी म्हणून इतके लिहिणें हे कितावतहू.

---

नं. ६४०२ श्री. (आषाढ व. ७–२१ जुलै.)

छ. २० रबिलावल सन सल्लास मय्यातैन आषाढ.

सेवेसी साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तरी होळकराकडील फौजा शामतखान पठाण व फत्तेशिंग मान्ये व आबाजी लक्ष्मण ऐसे फौजमुद्दां गंगादक्षणतीरीं आले. शामतखान पठाण नायकाहून शिन्नरास आठ हजार पठाणानिशीं दाखल जाले. फत्तेशिंग मान्ये दाहा हजार फौजेनिशीं नगरानजीक फुऱ्या बागावर मुक्काम करून किल्ल्याचे दोन चारशे आरब साफ करून अर्धे शहर नगरचें लुटलें. घोडनदीवर सोमवंशी याच्या जवळ्यावर फौजा आल्या. जामगांवांत आबाजी लक्ष्मण शिंद्याच्या वाड्यांत राहून गावांतील घरास खणत्या लावल्या आहेत. पुढें शिंद्याच्या वाड्याची काय व्यवस्था होईल ती पाहावी. येथील विचार म्हणावा तरी वीस बावीस आसामी कैद होती त्यापैकीं छ० १२ रबिलावलीं प्रातःकाळीं आकरा असाम्या डोलींत बसवून पुलापार रवाना केल्या. बरोबर बाळाजीपंत पटवर्धन व विठोजी नाईक देऊन कुबारीच्या किल्यास पालच्या किल्यास व रायगडास वगैरे रवाना केले.

६ फडक्यापैकीं.

४ फडके खासा

१ बाबा

१ अन्याबा

१ आत्या

१ पांडोबा

———

४

२ कारकून

१ परशरामपंत

१ मामा

———

२

१ मोरोबा दादा

१ रास्ते यांजकडील कारकून आठवले कुवारीचे

२ घाटग्याकडील

१ बापू फणसळकर

१ वासुदेवपंत

———

२

१ कारकून निसबत दादा

———

५

——

६

येणेप्रमाणें तूर्त रवाना केले. बाकी राहिले आहेत तेही लौकरच रवाना होतील. सदरहू नावानिशी लिहिली आहे. परंतु याचाही शोध पक्का लाऊन खर्चात आकरा असामी कोणकोणत्या गेल्या आहेत त्या लिहूं. सर्व मुखत्यार तूर्त कुंजर आहेत. ते सांगतात त्याप्रमाणें घडतें. बरकड मागाहून लिहूं. होळकराची फौज नजीक आली आहे त्याच्या पारपत्यास फौजेची तरतूद चालली आहे. गारदोंडच्या सुमारास होळकराची तीन हजार फौज भिवरेपार आली आहे म्हणोन वदंता आहे. पक्कें समजल्यावर लिहूं. रा॥ बळवंतराव नागनाथ यांचा वाडा वामोरींत होता तो मान्ये यार्णे खणोन चीजवस्त लुटून गांवही लुटला. हे विज्ञापना.

———

नं ६४०३ श्री. (आषाढ व. ७–२१ जुलै)

पै॥ छ.२१ रबिलावल आषाढ सन सलास मय्या तैन गुरुवार अस्तमान.

सेवेसीं नारो हरी करंदीकर दोनी कर जोडून शिर साष्टांग नमस्कार

विनंती विज्ञापना. ता॥ छ २० राबिलावल पावेतों यथास्थित असे. विशेष. रा. फत्तेसिंगराव माने फौजसुद्धां नगरानजीक आहेत. तेथून बुणगें व हजार दोन हजार फौज गारदबंडेस रवाना केली. यास नगरवाले यांणीं मार्गास दिक्कत केली. याजमुळें माने पांच सात हजार सडी फौज तयार होऊन गेले. त्यांची यांची लढाई जाहली. नगरवाले यांचा मोड जाहला. नगरवाले यांजकडील पांचचारशें माणूस जायां जखमी जाहलें. नंतर बुणगें रवाना जाहलें. गारदबंडीस येऊन पोहोंचलें. शामतखान पठाण शिंदे बायाजवळ होता तो पांच सात हजार जमावानिशीं माने यास येऊन सामील जाहला पठाण सुद्धां फौज व पायदळ मिळोन माने याजवळ पंचवीस हजारांचा अजमास जाहला. तीस चाळीस तोफा बरोबर आहेत. शिंद्याकडील फौज नगरास पांच चार हजार आहे. त्याचें आणखी येक वेळ लढाई देऊन पारपत्य करून मग आपण गारदबंडीस येणार. दोन चार नावाडी भींमेस नेल्या आहेत; गारदबंडीस आल्यावर तेथून पुढें जेजुरीच्या सुमारें यावें असाही बेत आहे. शिंदे उज्यनीस आहेत. कांहीं फौज बराणपुरावर रा. गोपाळराव चिटणीस याजबरोबर आहे. परंतु होळकराचे फौजेवर यावें हा दम नाहीं. शिंदेही दसरा जालेशिवाय उज्यनी सोडीत नाहींत. होळकरांचा व शिंदे यांचा आंतर्याम एक असेंही बोलतात. परंतु नगरवाले याजवळ होळकर खटला करितात तेव्हां एक असें भासत नाहीं. याचें कारण खटला न करावा तर श्रीमंतांची खातरजमा शिंद्याविषयीं होत नाहीं. याजकरितां खटलाही थोडाबहुत करितात. श्रीमंत रा. अमृतरावसाहेब जोरवें येथें आहेत. त्यांचें होळकरांचें संधान एक आहे. पुढें काय होतें पहावें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६४०४ श्री (आषाढ व. ३०–२९ जुलै.)

पै. छ. २८ रबिलावल सन सलास मय्या तैन आषाढ व॥ ३० गुरुवार इज्जत रफातपन्हा यकूकत व हषमत दस्तगाः गंगाधरराव गोविंद सलमुल्लाहुताला.

आंकी येथील खैरसल्ला जागोन आपली खैरखुषालीस हमेशा कलमी करीत आली पाहिजे. यानंतर विशेष. पुणेंकडून कागदपत्र राजश्री छत्रसिंग राजेकडे येऊन छत्रसिंग राजे यांनीं आह्मास बोलाऊन पाठविलें. करितां कुडचीहून कूच करून लष्करास येऊन दाखल जालों. आह्मांस फारप्रकार सन्मान करून आपले फौजेकडे दोन हजार स्वार अजबाबमुद्धां देऊन पाठविला. तरी लोकांस कळावें करितां त्यांचें आमचें बिघाड जाहलेसारखें करून आह्मी कूच करून एक मजल आलेनंतर लोकांस बरतरफी केलेसारिखें करून आंतेरा आम्हांकडे दोनी हजार स्वारास उतरले. मोकामास पाठवून दिला. आपण दोस्तदार जाहले-करितां कळावें म्हणोन लिहिलें असें पुढें आपणाकडून कार्य कुमक करून पाठविले तरीही लवकीक तुमचा आहे. हे कारखाना दवलतमुद्धां आपले आहे. हे दिवस राहणार नाहींत. नेकनामी एक रहातील. तुम्ही समजदार आहां. विशेष उपचार करून लिहिणें काय असे. आमचे[२] काम करून देयाचा भार आपणांस मिळाले आहे. विशेष लिहिणें काय असे हे किताबतहू.

---

नं. ६४०५                    श्री                    (ज्येष्ठ-जून प. पंधवराडा.)

विज्ञापना ऐशीजे. येथील वर्तमान तरी दिल्लीची व उज्जनीची अखबार आली नाहीं. खानदेशांतील वर्तमान तरी, शिंदे बहादूर यांजकडील रा. गोपाळराव व सदाशिवराव ऐसे फौज व कंपूसुद्धां बऱ्हाणपुराहून कूच करून चांगदेवानजिक आले म्हणोन रा. यशवंतराव होळकर यांनीं पारोळ्याची खंडणी दोन लाख घेऊन तेथून कूच करून माघारे एरंडोलास शिंदे यांच्या फौजेच्या मोहऱ्यावर गेले. एरंडोलीं आठ चार रोज मुक्काम करून तेथील खंडणी घेऊन कसबा लुटून घरें खाणून टाकून तेथून हल्लीं कूच करून फौजमुद्धां मालेगांवानजिक आठा कोशांवर खासा होळकर आले आहेत. आघाडीस गंगा उत्तरतीरास शामतखान व फत्तेसिंग माने व

१ टिपूचा मुलगा करीमसाहेब इंग्रजांच्या कैदेंतून पळून पटवर्धनांकडे यावेळीं आश्रयासाठीं आला होता त्याचें हें पत्र. हडपसरच्या लढाईनंतर पुढें तो होळकराकडे गेला. २ येथून अक्षर निराळें आहे. वाक्यरचना कारकुनाची दिसत नाहीं.

गणपतराव नारायण वीस हजार फौजमुद्रां आहेत. त्यांनीं उत्तरतीरच्या खंडण्या घेऊन यावत् पूर्व—पश्चिम लुटून बाकी कांहीं ठेविली नाहीं. हल्लीं फत्तेसिंग माने गंगा दक्षिणतीरीं बारोलिगव्यावर मुक्काम करून रायाजी पाटील याचा वाडा जाळून खाणून टाकिला. निंबाजी भास्कर याचें घर राजोरीस होतें तें शामतखान पठाण याणें जाळून खाणून टाकिलें. आणि तेथून पठाण मजकूर कूच करून नाशिकानजीक येऊन क्षेत्रास वेढा घालून दहा लाख रुपये खंडणी मागत आहे. गणपतराव नारायण यांनीं एक दोन लहान किल्ले होते ते घेऊन हल्लीं घोडपेस तोफा सुरू केल्या आहेत. सारांश होळकराच्या दहशतीमुळें जांबगाव नगर वगैरे स्वराज्याचे लहान मोठे गांव पळोन जात आहेत. सरकारची पागा बाघमोरे याचे निसबतीची पन्नास साठ घोडे होते ते जुन्नराहून होळकरांचे चारशे राऊत येऊन घेऊन गेले. पुण्यानजीक होळकरांचें बाफगांव आहे तेथें सरकारची जप्ती होती त्यास होळकराचे चारशे राऊत येऊन बाफगांवीं ठाणें बसविलें. होळकर [१]बेकैदी म्हणोन सरकारांतून बाळोजी कुंजर व बाबुराव आंग्रे यांस शिंद्याकडे उज्यनीस पाठवून परस्परें शिंदे होळकरांचा समेट करावा म्हणोन मुहूर्तेंकरून जेष्ठ शुद्ध ८ डेरे बाहेर दिल्हे. व होळकराच्या कुलसरंजामाच्या सोडचिठ्या पाराजीपंत याजपाशीं देऊन होळकराकडे पाठवावें म्हणोन बेत ठरला होता. हल्लीं होळकराचो लबाडी किंवा बेकैदी आज्ञेशिवाय स्वराज्यांत खंडण्या व उपद्रव करून पुण्यास येण्याचा इरादा आहे म्हणोन पूर्वीं कारकून व पत्रें सरकारांतून इकडे येऊं नये म्हणोन गेलीं असतां लबाडी करून इकडे येत आहे त्यावरून सर्वांच्या विचारें ठरलें जे. होळकरांचें पारिपत्य करावें. त्यास शिंद्याकडील फौज चांगदेवीं आहे व हुजूर फौजेची तजवीज ठरली जे, पन्नास साठ हजार फौज जमा करावी. त्यावरून कुल लहान मोठे नवे सरदार यांस फौज ठेवावी म्हणोन रुबरू आज्ञा जाली. मुरारजी येवले यांस दोन हजार स्वार दोन हजार गारद व धोंडो खंडोजी यांस पांच हजार स्वार व दोन हजार गारद व कुंजर लहान थोर असामीस पांच पांच हजार स्वार व दोन दोन हजार गारद व चवासिंग भोसले यांस पांच हजार स्वार व दावा पाटण-

---

१ उद्धट, अमर्याद वर्तनाचा.

कर यांस पांच हजार स्वार व पंधरा हजार गारद व गोविंदराव परांजपे यांस पांच हजार स्वार व कुल[1] तोफखाना या प्रमाणें व कादरखान नगरकर कसाई हा पूर्वी वडिलांशीं[2] बारगीर होता म्हणोन हल्लीं त्यावर कृपाळु होऊन त्यास दहा हजार स्वार ठेवावयास सांगितले आहेत. पैकीं पांच हजार पठाण ठेवावयास सांगितले आहेत. सरंजाम नेवासें व दाभाडी व पाटोदें व कुंभारी व देपूर व कुरखेड व आणखी किरकोळ दोन तीन महाल मिळोन विसा लक्षांची जहागिरीच्या सनदा करून दिल्या आहेत. सदरहू प्रमाणें फौजेचा जमाव करून होळकरांचें पारिपत्य करावें म्हणोन सिद्धांत जाहला आहे. पुढें होईल तें लिहूं. हे विज्ञापना.

---

नं. ६४०६　　श्री　　( आषाढ शु. २–२ जुलै. )

पो छ १ रबिलावल सल्लास मया तैन

विज्ञापना ऐसीजे. खानदेशांतील वर्तमान तरी राजश्री यशवंतराव होळकर फौजसुद्धां कासारबारी नजीक मालेगांवाबर मुक्काम करून आहेत. जिवाजी यशवंत व मीरखान पठाण मिळोन पंधरा हजार फौज शिंदे बहादूर यांच्या फौजेच्या तोंडावर ठेऊन कुल प्रांताच्या खंडण्या घेऊन लुटून बेचिराख केला. आघाडीस राजश्री गणपतराव नारायण व शामतखान पठाण व फत्तेसिंग माने हे त्रीवर्ग मिळोन गंगा उत्तर तीरीं कुल[3] प्रांताच्या खंडण्या घेऊन मुलूख बेचिराख केला. गणपतराव नारायण पांच सात हजार फौजेसुद्धां पुर्वेस धोडपच्या किल्ल्यास शह देऊन आंबडवा रोख धरून आहेत. शामतखान पांच सात हजार फौजसुद्धां नाशिक त्रिंबक वगैरे पश्चिमेकडील प्रांतांत खंडण्या घेत आहेत. व प्रांतही बेचिराख करतात. नाशकास पठाणाकडील लोकांनीं वेढा घालोन क्षेत्रांतील ब्राह्मण धरून दहा लक्ष रुपये खंडणी मागत आहेत. फत्तेसिंग माने यांणीं उत्तर तीरच्या खंडण्या घेऊन गांव लुटून व रामजी पाटील व रायाजी पाटील व बाणाजी घोटे व निंबाजी भास्कर वगैरे शिंद्या-

---

१ कुल = सर्व. २ पेशव्यांचे वडील रघु. दादा यापाशीं. ३ कुल = सर्व

कडील लहान मोठे गृहस्थ यांची घरें जाळोन खणून टाकितात. जामगांव, नगर, पेडगांव, चांभारगोंदें वगैरे शिंद्याकडील गांव उज्याड होऊन जात आहेत. याप्रमाणें होळकराकडील फौजेचा दंगा आहे. खासा होळकर यांचाही येण्याचा इरादा आहे. परंतु गंगा भीमा भरल्यानंतर छावणीस ठिकाणा व घास लकडी वगैरे रसद पोहचून लष्करांत आबादानी राहे यांच्या विचारांत आहेत. आंबड अथवा चांदवड अगर नाशिक येथें छावणीस यावें हा बेत आहे. सरकारांतून वरचेवर पत्र यशवंतराव यांस जातात जे, तुम्ही स्वराज्यांत येऊन दंगा करून मुलूख लुटतां तर हे ठीक नाहीं. तुमच्या सरंजामाच्या सोडचिठ्या पाराशर दादाजी यांच्या स्वाधीन केल्या आहेत. तुम्ही मागें फिरोन तापीपार होऊन नंदुरबारास मुक्काम करणें. तुमच्या व शिंदे बहादूर यांचा समेट करण्याविशीं बाळोजीची रवानगी केली आहे. ते उज्जनीस येऊन पोचल्यावर परस्परें समेट करून घ्यावी. म्हणोन पत्रें वरचेवर जातात. कुंजर व निंबाजी भास्कर यांचा मानस कीं, होळकर तापी उतरून माघारे गेल्यास उत्तम. नाहीं तर पारपत्य करावें, ही सल्ला खाशास देऊन फौजेचा जमाव करावा म्हणोन नवे सरदार केले आहेत त्यांस ताकिदी केल्या जे, स्वार व गारद ठेवणें. त्यावरून चत्रसिंग व बाबा पाटणकर व धोंडोपंत गोडबोले व विठोजी नाईक, हरजी नाईक व कुंजर असामी पांच व गोविंदराव परांजपे व नाना पुरंदरे व रूपराम चौधरी व मनोहरगीर गोसावी व खंडेराव रास्ते यांस आज्ञा जाली जे. पांच पांच हजार स्वार व दोन दोन हजार गारद ठेवणें. त्यावरून पांडोजी कुंजर यांचे डेरे गारपिरावर होऊन डेरेदाखल जाहले. पुढें सदरहू प्रमाणें फौजेचा जमाव होऊन होळकराचें पारपत्य करावें हेही बेत आहेत. गोविंदरांव परांजपे यांस नव्या तोफा करण्याविशीं आज्ञा जाली. त्याजवरून परांजपे यांनीं पर्वतीखालीं रमण्यांत तोफा ढाळण्याविशीं कारखाना जारी केला आहे. त्यास श्रीमंतांची मर्जी जे, पुण्याच्या वगैरे कारखान्यांत जुन्या जरबा आहेत त्यांचे घांट बदसुरत आहेत व प्राचीन आहेत. त्या जरबा फोडून घांट सुंदर खुबसुरत मर्जीमाफक जरबा तयार कराव्या, हा बेत ठरून कारखाना सुरू केला

आहे, जरबा तयार करून होळकर वगैरे शत्रूंची पारपत्यें करावीं हा बेत आहे. सेवेशीं श्रुत होय, हे विज्ञापना.

---

नं. ६४०७ श्री. ( श्रावण शु० १०—९ आगस्ट. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसी. विनंती.

सेवक नारो हरी करंदीकर दोनी कर जोडून शिर सां. नमस्कार विनंती. विज्ञापना. रहिमतपूरच्या रसदेचा ऐवज सन सल्लास मय्यातैनचा सरकारांत द्यावयाचा त्यास वांई देशांत व रहिमतपूर आसमंतभागीं कराडप्रांतांत रहिमतपुरी रुपया चालतो तोच रुपया गांवच्या वसुलाच्या पोत्यांस[1] घेतों. त्या रुपायास मिरजेंत नकली रहिमतपुरी म्हणतात. याप्रों. रुपयाची वहिवाट आहे. शिंद्याच्या अमलांत रहिमतपुरी रुपया पडला होता. तो रुपयाची चाल हल्लीं प्रांतांत नाहीं. जो रुपया प्रांतांत चालतो तोच रसदेस द्यावयाचा. जुनें रहिमतपुरी शिंद्याच्या अमलांत पडले ते आडीच मासे जळीचे. अलीकडे तिस्सा पासून रुपया पडला याचा आयाज ज्याजती आहे. जुना रुपया फार करून मोडून नवाच पडला, जुना घेऊन नकली दिले. असें जाहल्यास जुन्याचा भार पडेल तो पडो. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. छ. ९ रबिलाखर सन सलास मय्यातैन व अलफ.

---

नंबर ६४०८ ( श्रावण शु० ११–१० आगष्ट. )

उतारा—पत्र धोंडो बापूजी जोशी याचें पुण्याहून मिरजेस.[2]

" सरकारची फौज गारदवंड येथें कांहीं गेली आहे. कांहीं येवतावर आहे. रा. बाबूराव काळे यास दोन हजार फौज ठेवावयास सांगितली. आजपावेतों हजाराची भरती जाली. पुढें दररोज हजिरी चालली आहे. होळकराची फौज चांदवडापासून नगर जांवगांव पावेतों पन्नास हजार जमाव आहे. शिंद्याची फौज कांहीं उज्जनीपासून अलीकडे चार मजलीवर आली व बऱ्हाणपुरावर गोपाळराव भाऊ याची दहा हजार आहे. वांई देशांत सरकारचा कारकून गेला आहे त्याणें मोठी धूम केली आहे.

---

१ पोतें = सरकारी खजिना. २ पत्र रहिमतपुराहून मिरजेस.

व चोरांनीं वाटेनें दंगा भारी मांडला आहे ! काल पुण्याहून चार ब्राह्मण सातारियास जात होते ते किकवीचे रानांत लुटले गेले. जिवानिशीं जगले."

नं. ६४०९ श्रीगणराज. (श्रावण शु. १३–११ आगष्ट.)

पै॥ छ. ११ रबिलाखर श्रावण सन सल्लास मय्यातैन मंदवार

वडिलांचे सेवेसीं विज्ञापना. सोलापुरापलीकडे चौदा कोसावर यशवंत रामकृष्ण यांणीं फौजेचा जमाव हजार दोन हजार केला आहे. सरकारचे तालुक्यांत उपद्रव करणार. होळकराचें नांव सांगतात याप्रमाणें वर्तमान आहे. वडिलांस कळावें म्हणोन विनंती लिहिली आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ६४१० श्री (श्रावण व. १– १४ आगस्ट.)

उतारा– पत्र आबाजी हरि किवे यांचें पुण्याहून मिरजेस.

" होळकराकडील हजार पांचशें स्वार कोरेगांव शिखरापूर, जुन्नर पिंपळवाडी वगैरे रोखे घेऊन येऊन दंगा बहुत मांडला आहे! वाघोलीकर जाधव कुटुंबसुद्धां वाघोलीहून निघून येथें आले. बाबूराव गणेश काळे वगैरे यांणीं लोक ठेविले आहेत त्यांचे नजरपाहणीस खासा स्वारी (पेशव्यांची) हडपसरपावेतों जाऊन दोही कतार (?) स्वार उभे करून पहात जाऊन पहात माघारे आली. स्वार दोन हजारापर्यंत सारे मिळोन जमा जाहले आहेत."

नं. ६४११ श्री (श्रावण व. १—१४ आगष्ट.)

पै॥. छ. १४ रा॥. खर, सलास मय्यातैन अस्तमान श्रावणमास. सेवेसी विज्ञापना. येथील वर्तमान तरी खासा यशवंतराव होळकर चांदवडास दाखल होऊन मीरखान पठाण व लक्ष्मण अनंत याचे चिरंजीव यांबरोबर फौज व पेंढार देऊन गंगादक्षणतीरास रवाना केलें; ते गंगा उतरत आहेत. चवाडीस फत्तेसिंग मान्ये व शामतखान व आबाजी लक्ष्मण

१ पंढरपूरच्या कमावीसदाराचें पत्र मिरजेस.

फौज सुद्धां येऊन नगर जांबगांव वगैरे येथें मुकाम करून आमदाबाद, शिकरापूर, चांभारगोंदें, पेडगांव, सिद्धटेकपर्यंत भिंवरा उत्तरतीरीं खंडण्या घेऊन प्रांत बेचिराख केला. पुढें भिंवरादक्षणतीरास उतरून यावें तरी पाऊस व नदीस पाणी फार; याजकरितां मात्र अनमान आहे. नदीचें पाणी कमी जाहल्यास भिवरा दक्षणतीरासही येतील; व सरकारांतून होळकराच्या फौजेच्या पारपत्यास पांडोजी कुंजर वगैरे नवे लहान मोठे सरदार व पागा कुल मिळोन आडीच हजार तीन हजारपर्यंत फौजेचा भरणा प्रतीनिधीचे पथकासुद्धां गारदौंडेस मुक्काम करून आहेत. त्यास पावसामुळें व पोटाच्या तंगचाईमुळें लोक उठोनही माघारे येतात. राजश्री नाना पुरंधरे यास जरीपटका देऊन घोरपडे वगैरे मानकरी बरोबर देऊन कौडीवर मुक्काम करून फौजेचा जमाव करीत आहेत. पुरंधरेही फौजसुद्धां गारदौंडेस पोंचल्यावर बंडाची फौज भिवरा उत्तर तीरीं आली आहे. तिचें पारपत्य सरकार आज्ञेप्रों. करणार. सरकारची ताकीद कुल फौजेस निक्षून आहे जे, जलद पार उतरून होळकराचे फौजेचें पारपत्य करणें. त्यास श्रीमंताचे प्रतापेंकरून बंडाचें पारपत्य लौकरच होईल. श्रीमंत राजश्री चिंतामणराव आपा व रामचंद्रपंत आपा यांस येण्याविशीं सरकारचीं पत्रें बरबेवर जात आहेत. येथें सरकार पदरचे नवीन लहान मोठे गृहस्थ यांसही फौज ठेवण्याविशीं आज्ञा होऊन स्वाराचा दरमहा पंधरा रुपये ठरावून दिल्हा आहे. त्यास स्वारांची हजिरी पाहून हजार दोन हजार तूर्त खर्चासही दिल्हें आहे. याप्रों येथील मजकूर आहे. पुढें स्वारीही पुरंधरच्या रोखें सासवडास जाणार. हे विज्ञापना.

---

नं. ६४१२ श्री. ( १६ आगष्ट )

पै॥ छ. १८ रबिलाखर सलास मया तेन.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता॥ श्रावण व॥ ३ पावेतों बालकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. मला बायगोळा उठला आहे. आज सात रोज जाहले. मध्यें तीन रोज मल बंद

जाहला होता. काढे घेऊन ढाळ झाले. मोठ्या शरावर आहे. यास्तव सांडणीस्वार याजला पांच रोज बैठी पडली. अद्यापि गुण नाहीं. औषध घेत आहें, वडिलांचे पुण्येंकरून आरोग्य होईल. श्री देवाचे जवाहिराविशीं लिहिलें. त्यास दंग्यामुळें संजाईत देण्यास दिकत धरितात. लोकही चित्तीं चिंतातुर जाहले आहेत. पेशजी जिन्नस पाठविली त्याची किंमत आज्ञेप्रमाणें लिहून पाठविली आहे. श्रीमंत रा। श्रीमंतराव भाऊ यांचा जिन्नस रा। दाजीबा गोळे यांणीं दिल्हा तो पाठविला आहे. त्यांजला पावता करावयास आज्ञा करावी. गोळे जिन्नस देतील तो पाठविणेविर्सी मला पत्र भाऊनीं लिहिलें होतें. वडिलांस कळावें. सरकारच्या फौजा गारदौंडेजवळ आहेत. पुरंधरे जरीपटका व पठाण व कात्रे व घोंडोपंत गोडबोले व मानकरी वगैरे बाहेर निघाले. रा। गणपतराव पानसेही निघाले. श्रीमंतांनीं खडी हजरी थेवरास जाऊन घेतली. पांचसांत हजार तूर्त जमाव आहे असें बोलतात. तहही होईल असेंही बोलतात. गारदौंड पलीकडे दहा कोशावर मान्या उतरला आहे. पिंपळवाडीस भिल्ल व कांहीं स्वार होळकराकडील आले होते. येऊन खंडणी करून पेठ लुटून नेली. पठाणाकडील लोक, असा दंगा आहे. कोंकणांत शामलानें बहुत दंगा मांडला आहे. बाईचा दंगा आरबांचा ऐकण्यात वडिलांचें येत आहे. बाजारांत कोणी घडीचा भरसा धरीत नाहीं. किरकोळ देणें आहे. लोकांची मागणी मोठी निकड. परंतु मी निजलों आहे यास्तव पाहून जातात. हिंडों लागलों म्हणजे येऊन निकड करितील. दिवसकाळ पाहून त्यांच्या हिमतीस हवालदील उत्पन्न जाहलें. ऐवज कर्ज कोणी देत नाहीं. वडिलांकडे हिशेब आकारून पाठविला. रा। केसोपंतदादाकडे पाठविली आहे. वडिलांस विनंति करतील. श्रावणमासचे ब्राह्मणांचा ऐवज मिळाला तर हुंडणावळ न पडतां किरकोळ चिठ्या करतों. चिटणिसाचे गांवचे पत्राविर्सी पत्रें रा। दिनकरपंत यांजला दिल्हीं. जासूद दोन वेळां मशारनिल्हेकडे जाऊन मजुरा करून सनदा गांवच्या मागत आहे. घेऊन देतों ऐसें नाना म्हणतात. चिरंजीव रा। विठलपंत याजलाही पाठवीत आहे. मी बरा जाह-

त्यावर नेहमीं खेपा घालून पत्रें आल्यावर जासुदाची रवानगी करतों. बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६४१३ श्रीगजानन. (१६ आगस्ट.)

पै॥ छ. २८ राबिलाखर मंदवार सल्लास मय्या तैन.

आपत्यें हरी त्रिंबक परचुरे शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. येथील क्षेम श्रावण कृष्ण त्रितीया इंदुवारपर्यंत मुक्काम कुसेगल येथें वडिलांचे आशिर्वादें करून सुखरूप आहों विशेष. वडिलांची आज्ञा घेऊन आलों ते जमखंडीस जाऊन रामदुर्ग नरगुंद वरून कुसेगलास श्रावण शु॥ ७ सुलग्नीं आलों. वेदशास्त्र संपन्न राजमान्य राजश्री दिक्षित[2]बावांचें सुमुहूर्ते दर्शन घेतलें. आपण पत्र व पुस्तक स्मृतीचें व चित्र उमामहेश्वर व सांब पंचायतनाचें दिलें होतें. श्रीस प्रविष्ट केलें. वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री दिवाकर दिक्षित यांस पत्र होतें तें प्रविष्ट केलें व स्मृतीचें पुस्तकहि दिलें. त्यांनीं श्रीदीक्षितबावांस दाखविलें. तेणेंकरून बहुत संतोष पावले. श्रीमंत राजश्री प्रभुवर्य आमचे रिणी आहेत. बरवेबर पुस्तकें पाठवितात. याप्रमाणें बोलत होते. स्मृतीचीं समग्र पुस्तकें लिहून पाठवावीं. आणखी श्रीदीक्षित बावांची आज्ञा जाली आहे, बाईत कात्यायेन सूत्राचें भाष्याचें पुस्तक आहे त्याचा शोध वे. शा. सं. रा. रा. गणेशभट राजवाडे यांनीं कात्यायेन सूत्राचे भाष्याचे चार अध्याय लिहून आणून दिले आहेत. यास्तव बाईत वे॥ राजश्री गणेशभट राजवाडे यांजकडे पुस्तकाचा शोध करवून समग्र सूत्र भाष्याचें पुस्तक लिहून पाठवावें. तेणेंकरून बहुत संतोष होईल. वरकड सर्व वृत्त आज्ञेनसार सर्व विनाति श्रीस केली. आज्ञा जाली कीं, दिनमेक मर्यादेंकरून उत्तम प्रकारें सर्व नीटच होईल. राजश्री देवराव देशपांडे यास दशमी रविवारीं निरोप देणार आहेत. त्याजबरोबर बाळोजीस पत्राचीं उत्तरें देऊन पाठवितात याप्रमाणें आहे. पत्राचें उत्तरास बहुत दिवस जाले हा आशय लिहून पाठवावा म्हणोन आज्ञा केली होती त्यास विनंती केली. आंतील रहस्य कोणी मजकडे आपलें कार्यानिमित्य येईल. त्यास साहित्य पत्रें देऊन येत ऐसा आशय

---

१ पत्र कुसेगलाहून मिरजेस. २ चिदंबर दीक्षित.

दिसला तो विनंती लिहिली आहे. मजला दशमी रविवारीं परगणे लक्ष्मेश्वर येथें जाणें सुमुहूर्ताची आज्ञा जाली आहे. निरोप घेऊन जातों. वाडिलाविसीं श्रीस प्रार्थना बरचेवर करितों. सदैव आशीर्वाद पत्र पाठवून बाळकाचा सांभाळ केला पाहिजे. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६४१४ श्री. ( श्रावण व. ४--१७ आगष्ट.)

पै॥. छ. १९ ज० वल सन सलास मय्या तैन. भाद्रपद.

तागायत[1]. छ. १७ र. खर. मु॥. दिल्ली. इकडील वर्तमान तरी, जनरेल पिरू कोलेंत छावणी करून आहेत. आगऱ्याचे किल्याची मरामत होते. जखीरा[2] वगैरे सरंजामाची भरती हरयेक किल्यांत होत आहे. रा. शिंदे बहादूर यांणीं दाजी म्हणोन खासगी दिवाण यास हिंदुस्तानची दिवाणगिरी व फौजेचें हाजरीचें काम सांगोन पिरूकडे पाठविलें आहे. मा. निल्हे कोलेस पावून भेट घेऊन शुक्का[3] दिल्हा. त्यावरून जनरेल यांनीं येकच उत्तर केले कीं, आमचीं पत्रें सरकारांत गेलीं आहेत. तेथून लिहिलें येईल त्याअन्वयें बंदोबस्त करून देऊं. खासगीवाले याचें स्वरूप कांहीं राहिलें नाहीं. हजार रुपये दरमहा मात्र खर्चास नेमून दिल्हा असे. सारांश, सरकार संबंधी लोकांची दर हिंदुस्तानी लोकांप्रमाणेंही नाहीं. रा. शिंदे बाहादूर बरचेवर फडनिशीवर कारकून व कृष्णगड मेवाड प्रांतीं आहे; त्याची किल्लेदारी दुसऱ्यास सांगून पाठविला आहे. परंतु ताम्रमुख कोणासही मानीत नाहीं. दसऱ्यानंतर प्रत्यास आल्याप्रमाणें लिहूं. भागसिंग वगैरे पट्याळेकर सीख यांनीं पांचलक्ष रुपये नजराणा व खंडणी दाहा लक्ष लोईस देऊन हल्लीं पिरूकडे येऊन भेटले. त्याचे विचारें लाहोर प्रांतीं इरादा करणार. सांप्रत जाहिरींत ममता[4] दाखवून आखेर आपला कावू त्या प्रांतीं करणार. पूर्वेकर इंग्रज यासी खुपियो कागदपत्रांचा शिलशिला याचा आहे. सध्यां जाहिरींत सरकार चाकरींत तत्पर; परंतु, बेळ-

---

१ आबाजी हरि किवे याचें बातमीपत्र. २ दारू गोळा, धान्य वगैरे बेगमी. ३ शुका= आज्ञाचिठी. ( Ordar ) ४ गुंत (?) ५ अयोध्येच्या नवाबास.

प्रसंगीं सर्व येकच आहेत. नबाब वजिरास निमे मुलुख गवरनरानीं बाकीचा लावून दिला होता. त्यास कलकत्तेकराची मर्जी आहे कीं, त्यांतहीं कंपनीचा बंदोबस्त व इंग्रेजी फौज असावी. येविशीं वासली साहेबांस अंतस्थ लिहिलें आलें आहे. तात्पर्य, युक्तीनें बाकीचे मुलुखांतही दखल कारितील. वजिरास कांहीं कार्याकारण खर्चाची नेमणूक करून देणार. मुंबईहून बडा साहेब आल्यावर सर्व विचार ठरण्यांत येणार. कलन फिरंगी फरुकाबादेंत छावणींत आहे. पामर फिरंगी कलकत्यास दाखल जाला. तेथून हिंदुस्थानास लौकरच येणार आहे. जैपूरकरांनीं हासी फिरंगी यांस चाकर ठेवून कंपूची तयारी केल्यामुळें पिरूची बेमर्जी फार फार आहे. सबब राजे मा। नि। नीं आपल्या वकिलास बोलावून घेतलें. जोधपूरकर राजे भीमसिंग यांसी सरदार व फौज व कारभारी सर्व फुटून राजे जालीमसिंगास सामील जाले. यास्तव, तेथेंही बापलेकांत फितूर उत्पन्न जाहाला असे. सांप्रत काळीं जनरेल मा।. हजरताचे ताबेदारींत विशेष राहातात. पांच हत्ती, पंचवीस घोडे हुजुरांत नजर पाठविणार. व दीड हजार रुपये दरमाहा नवे शाहाजादे उत्पन्न जाले त्यास नेमणूक करून देणार. हजरतही राजी आहेत. वेळप्रसंगीं मिर्जा अकबरशा (हा) स बरोबर घेऊन कांहीं मसलत उत्पन्न करावी ऐसाही विचार जनरेलचा अंतस्थ ठरण्यांत आहे. रा. आंबाजी इंगळे ग्वालेर प्रांतीं आहेत. हरयेक गढीशीं मसलत उत्पन्न करून कालहरण कारितात. शिंदे बाहादूर यांची ताकीद बरचेवर येते कीं, जलद येणें. परंतु याचें जाणें घडतां दिसत नाहीं. पांच सात लक्ष रुपये मात्र खर्चास पाठविणार आहे. खावंदाचा विश्वास कोणासही नाहीं. कळावें हे विनंती.

---

नं. ६४१५  श्रीगणराज.  (श्रावण व. ९--२१ आगष्ट.)

पै॥ छ. २१ रबिलाखर सन सलास मय्यातैन व अलफ. श्रावण.

हीं ॥ राजश्री काकासाहेब वडिलांचे सेवेशीं अपत्यें विठोबानें दोनी कर जोडून शिरसा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ माहे रबिलाखर पावेतों

१ पत्र सांगलीहून मिरजेस विठ्ठलराव पांडुरंग पटवर्धन यांचें.

यथास्थित असे. विशेष. श्रीगणपतीची मुहूर्ते नवी पाषाणाची करवावयाची आहे. येथें कारागीर मोकाबेला दाखवाल त्याप्रमाणें करूं म्हणतात. यास्तव वे॥ राजश्री कृष्णाचार्य यास आणावयास घोडें माणूस पाठविलें आहे. तर वडिलीं भटजीस सांगून पाठवून दिलें पाहिजे. किल्ल्याचे पूर्वेस खंदकांत जुनी विहीर निघाली ती आडादाखल होती परंतु पाणी फार. गावांतील लोकांची पाण्याकरितां बहुत अडचण. किल्यांतील पाणी न्यावयाची नेहमीं वाग बहुत, याजकरितां गाळा सतरा हाताचा धरून पूर्वेस पायऱ्या करवण्याची योजना केली. पश्चिमेस श्रीगणपतीची मुहूर्ते स्थापना करावी ऐसें मनांत आलें त्याप्रमाणें करतों. त्यास पूर्वी वडिलांनीं उद्यापनें करविलीं आहेत त्याचे दाखलें आहेत ते काढवून त्यांतील कार्याकारण कालानरूप वडिलांचे विचारें लौकिकांत चांगलें दिसे असें पाहून पुराणिकबावा व आणखी शिष्ट मेळवून सर्वांचे संमते चांगलें दिसेल तें पाहून ब्राह्मणभोजनासुद्धां आज्ञा लिहून पाठवावी. वे॥ राजश्री दीक्षितबावा यांचे विचारें जालें म्हणजे चांगलें म्हणोन वडिलांस विनंती लिहिली आहे. आज्ञा येईल त्याप्रमाणें करीन. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६४१६ श्री गणपतिर्जयति. (श्रावण १३ –२६आग.)

वै॥ छ० ६ जमादिलावल मंदवार भाद्रपद मास सन सल्लास मय्यातैन.

तीर्थस्वरूप राजश्री काकासाहेब वडिलांचे सेवेसीं—

अपत्यें चिंतामणीनें साष्टांगनमस्कार. विज्ञापना. ता. छ० २६ रविलाखर पर्यंत वडीलांचे आशीर्वादें मुक्काम कवडी येथें वर्तमान क्षेम असे. विशेष कुरवड्याहून निघालों ते दर मजल नवमी मंदवारीं जेजुरीनजीक बेलसरेच्या मुक्कामीं येऊन श्रीमंतास विनंती लिहिली. इतक्यांत आज्ञापत्र आलें जे, होळकर याजकडील माने यांणीं सरकारच्या फौजा दौंडेवर कुंजर वगैरे आहेत त्याजवर गोळे टाकिले. फौजा आवळून निघाल्या आहेत, म्हणोन आखवार आली, त्यास तुम्हीं दौंडेस जाऊन माने यांजकडील लोक आली-

---

१ नमुना.

कडे उतरूं देऊं नये व तुम्ही पलीकडे जाऊं नये म्हणोन. त्याजवरून आज्ञा पत्राची विनंती लिहिली जे, स्वामीचीं पत्रें जितकी जमयेत जवळ असेल तितक्यानिशींच येणें. पुण्यास येऊन पोहोचल्यावर मागाहून लोक येऊन जमतील अशी आज्ञा येत गेल्यावरोन सडेच निघोन आलों. हालीं दौंड कडे जाण्याची आज्ञा आल्याप्रमाणें जातों, असें लेहून कूच दौंडच्या रोखें करून चार कोश नाझऱ्याचे मुक्कामास आलों. तेथें भोमवारीं आज्ञापत्र आलें जें, पुढें जाऊं नये. फौजसुद्धां कवडीच्या मुक्कामीं राहावें आणि सरकारांत विनंतीपत्र पाठवावें. म्हणोन त्यावरून बुधवारीं कूच करून भोरघाटानजीक राजेवाडीस मुक्काम करून गुरुवारीं मुकाम मजकुरीं आलों. माने वगैरे भीमा उत्तर तीरींच आहेत. सरकारच्या फौजा कुंजर वगैरे दौंडवर दक्षण तीरीं—पाणी पिऊन होते त्याजवर माने यांणीं पलीकडून गोळे टाकिल्यावर दोन कोश मागे सरोन पाटसावर मुकाम करून आहेत. नदीस हत्तीचा उतार जाला होता परंतु फिरून पाणी चढत आहे. बरकड विशेष नाहीं. होईल तें सेवेसी लेहून पाठवीन. सदैव आशीर्वादपत्र पाठवून बालकाचा सांभाळ करावा. सरकारची फौज थोडी. सेवेसी विदीत होय हे विज्ञापना.

---

नं. ६४१७ श्री (भाद्रपद शु. २–३० आगष्ट)

बाबाजीपंत बापट यांचीं पत्रें चिरंजीव राजश्री रामचंद्रपंत अप्पांस आलीं त्या पत्रांची नकल. (पत्रें पुण्याहून जमखिंडीस)

यादी पुण्याहून.

याजकडून पत्रें छ. १ जमादिलवलीं आलीं.

१ राजश्री बाजीराव बर्वे यांस कर्नाटकचा सुभा सांगोन जरीपटका व चौघडा दिल्हा होता. त्यास त्याचे हातून कर्नाटकांतील बंदोबस्त न जाला म्हणून त्याजकडून सुभा दूर करून रा॥ घोंडोपंत बाबा गोडबोले याजकडे सांगितला. यांचा सुभा स्वस्थ बसला. लाख पन्नास हजार रुपयांचे पेचांत मात्र आले. विदित.

१ मुनशीचा बंदोबस्त चांगला करावा म्हणून पेशर्जी लिहिलें आहे. त्याप्रमाणें चांगले चौकीपहारे ठेवण्याची आज्ञा असावी. विश्वास धरूं नये. सिदापुरास गेले असतां चांगलें. बंदोबस्त चांगला राहील.

१ रास्ते यांचे पुत्र वाड्यांतून गेले. पांडवगडास दाखल जाले. तिकडून तालुक्यांत जातील अथवा किल्ल्यास कुमक येईल याचा पक्केपणें बंदोबस्त राखावा म्हणोन सरकारचीं पत्रें सांडणी स्वाराबरोबर गेलीं आहेत. त्यास आज्ञेप्रमाणें बंदोबस्त बातमी राखून स्वामींवर अपशब्द न येतां सरकार काम जालें पाहिजे. येथें अनेक प्रकारची समजविणार बहुत आहेत. यास्तव विनंती लिहिली आहे

१ शिंदे याजकडील फौज दहा हजार व एक कंपू घेऊन रा॥ गोपाळराव चिटणीस व सदाशिवराव बक्षी जालनापुराचे सुमारें आल्याची बातमी आहे. कृष्णराव चिटणीस छ. १९ रबिलावलीं देवाधीन जाले म्हणून पत्रें आलीं. शिंदे अलिजा बहादूर उज्जनीस आहेत. इंगळे व बाया एकत्र आहेत.

१ चि॥ रा॥ चिंतामणराव आपा याजबरोबर चि॥ रा॥ दाजीसाहेब याची रवानगी करतों म्हणून आज्ञा जाली होती. त्याप्रों माझें बोलणें पडलें. कालचे पत्रीं तूर्त रवानगी करूं नये म्हणून मीं लिहिलें. ऐसियास आपा दाखल जाले. कुरुंदवाडकर यांचेही पथक चालतें जालें म्हणून पत्रें आलीं. तेव्हां दाजीसाहेब यांची रवानगी फौज देऊन जालीं असतां होळकर यांचा नेट या प्रसंगीं पोचली असतां श्रीमंतास संतोष वाटेल. तरी रवानगी करण्याची तरतूद जाली पाहिजे. दाजीसाहेब आले असतां मर्जी प्रसन्न होईल. रवानगीस दिवसगत लागों नये. त्यांत जसें मसलतीस येईल तसेंच व्हावें. प्रसंग पाहून मी लिहितों.

१ रा॥ निळकंठराव रामचंद्रे याची रवानगी हिंदुस्थानांत होत आहे. अली बहादर याजकडे जातात. तेथील बंदोबस्त मशारनिल्हे याणीं करावा. अली बहादर यांस समाधान नाहीं. कोणी अनेक प्रकारचें

---

१ कृष्णराव मुनशी याला पेशव्याच्या हुकमावरून पटवर्धनांनीं कैदेंत ठेविलें होतें त्याचा. २ उपनाम पागे जात प्रभु.

बोलतात. परंतु तहकीक नाहीं. आठचार दिवसांनीं पक्के खरें लटकें समजेल. होळकर याची फौज गुजराथचे सुमारें गेली. गाइकवाड यांणीं रावजी अपाजी यास कैद केलें म्हणून बातमी आहे. निळकंठराव याजबरोबर बाळकृष्ण गंगाधर याजपाशीं सदाशिवपंत चितळे होते ते आजपावेतों कैदेंतच होते. त्याजवर कृपा होऊन बंदोबस्त करून सरकारांतून दिल्हा.

१. श्रीमंतांचें दर्शन रा॥ दिनकरपंत यांचे विद्यमानें घेतलें. प्रस्तुत काळीं प्रमुख दिनकरपंत व रा॥ नारायणराव वैद्य. याजकरितां उभयतांस पत्रें वरचेवर यावीं. दिनकरपंत यांस बहुत ममतेनें ल्याहावें. रा॥ नारायणराव यांजकडे जाणार होतों परंतु पत्र नाहीं यास्तव न गेलों. तरी बाबाजीपंत वरचेवर बोलतील त्या अन्वयें इकडे लक्ष असोन कामकार्जे ठरावीं असें आलें म्हणजे भेट घेईन. वडिलांकडील ओढ ममतेची श्रीमंताजवळ दिनकरपंत बहुत बोलत असतात.

१ आल्यापासून रा॥ विनायकपंत दादा याचे घरीं आहें. वाड्यांत गेलों नाहीं. द्वितीयेस वाड्यांत जाईन. घोडीं माणसें वाड्यांत आहेत. आजपर्यंत वाड्यांतील खोल्यांत बिऱ्हाडें ब्राह्मणांचीं होतीं. यास्तव रामभटबाबाच्या मर्जीनुरूप रिकामीं केलीं. याजउपर जातों. मला पाठविलें तेव्हां खर्चाचा बंदोबस्त करून दिल्हा होता तो मजकूर पेशजी लिहिला आहे. त्यास येथील खर्चाची तरतूद जाली पाहिजे. येथें एक रुपया समयास मिळावयाचा नाहीं याजकरितां विनंती लिहिली आहे. स्वामींनीं आणोन बंदोबस्त व्हावा.

१ होळकर याजकडील फौजेनें सरकारची फौज पांडोजी कुंजर याजबरोबर आहे. त्यास भृगुवारचे रात्रीं गंगा उत्तर तीराहून गोळे टाकून गोट उधळिला. नंतर प्रातःकाळीं कांहीं पेंढारी अलीकडील तळावरील तट्टें थोडीबहुत वगैरे जिन्नस हातास लागला तो नेला. सरकारची फौज पांच कोस माघारी आली हें वर्तमान आल्यावरून पांडवगडाकडे फौजेची रवानगी होत होती ती मसलत तूर्त महकूब करून होळकराकडे ××××× राजश्री नाना पुरंधरे याचे वानवडीवरून कूच होऊन हडपसरास गेले. व नानपदराव पानसेही हडपसरास तोफखानासुद्धां गेले. इकडून पथकास

ताकीद जाली. रूपराम चौधरी व गोसावी याजकडील पायदळ, पलटणें व गाडद मिळोन सात हजार पावेतों बीरोज ठरून रवानगी जाली. सुमारें तीनचार कदाचित् भरतील. आज श्रीमंतांची स्वारी हडपसरास पुरंदरे याजकडे सायंकाळीं सहा घटका दिवसास गेली. श्री॥ रा॥ आपा- साहेब स्वारीबरोबर गेले नाहींत. चि॥ रा॥ चिंतामणराव आपा यांचा मुक्काम सासवडास आहे. आज लोणीच्या मुक्कामास यावयाचा बेत होता. होळकराकडील कांहीं फौज सिद्धटेकास नदी उतरली म्हणोन बाजार- आवाई आहे.

---

नं. ६४१८ श्रीगणपतिर्जयति. [ भाद्र० शु० ३–३१ आग.]

पै॥ छ० ८ जमादिलावल भाद्रपद सल्लास मय्यातैन.

तीर्थस्वरूप राजश्री काकासाहेब वडीलांचे सेवेसीं.

अपत्यें[1] चिंतामणीनें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ० २ जमादिलावलपावेतों वडीलांचे आशीर्वादें वर्तमान यथास्थित असे. विशेष. कवडिच्या मुक्कामास आल्याचें विनंतीपत्र सेवेसीं पाठविलेलें होतें तें पावलेंच असेल. काल इंदुवारीं भोजनोत्तर पुण्यास जाऊन श्रीमंतांची भेट घेऊन सायंकाळीं गोटास आलों. वडीलांस कळावें. होळकर पैलीकडेच[2] आहेत. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६४१९ श्री. ( श्रावण--आगष्ट. )

पु॥ सां. नमस्कार विनंती. येथील विचार नानाप्रकारचे आहेत हे जाणोन नांव न घालतांच पत्रें लिहिलीं आहेत. आपणांस कळावें म्हणोन सूचना लिहिली आहे. इतःपर आपणाकडेस पत्रें पाठवीत जाऊं तीं नांव न घालतां नोघमच हल्लीं पाठविलीं आहेत त्याप्रमाणें पाठवीत जाऊं. कळावें, हे विनंती.

---

१ पत्र पुण्याहून मिरजेस चिंता. आपा सांगलीकर यांचें. २ भीमेपलीकडे.

नं. ६४२० श्री. ( १ सप्टेंबर. )

पौ॥ छ. ८ जमादिलावल सुरू सन सलास मयातेन व आलफ.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ भाद्रपद शु. ४ सौम्यवार पावेतों स्वामींचे कृपेकरून सुखरूप असों. विशेष. श्रीमंत रा. चिंतामणराव आपासाहेब यांची स्वारी श्रावण बा॥ १३ गुरुवारीं मौजे कवडी येथें येऊन मुक्काम जाहला. नंतर भाद्रपद शु. २ चंद्रवारीं सडे फौज सु॥ पुण्यास आले. आपले वाड्यांत येऊन दोन घटका बसोन नंतर श्रीमंतांच्या वाड्यांत भेटीस गेले. बीस घटका दिवसास भेटी जाहल्या. दोन घटका सरकारचे वाड्यांत होते, नंतर मागती आपल्या वाड्यांत आले. चार घटका बसोन बोलत होते, तों वे॥ राजमान्य रा॥ शामभट बाबा आले. त्याजपाशीं बसोन निरोप घेऊन रा॥ आपा खासगीवाले याचे घरीं जाऊन वाड्यांत येऊन मागती कवडीचे मुक्कामीं गोटास गेले. सतमीचे सुमारें श्रीमंतांचे वाड्यांत श्रीच्या उत्साहास येणार आहेत. श्रीमंतांची मर्जी गांवांत येऊन आठ चार दिवस रहावें नंतर पुढील रंग पाहोन रवानगी करावी. त्यास आप्पासाहेब यांची मर्जी गोट सोडून गांवांत येऊन राहण्याची दिसत नाहीं. बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६४२१ श्री. ( १ सप्टेंबर. )

पौ॥ छ. ८ जमादिलावल सन सल्लास मयातैन व आलफ.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी दोन्ही कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ भाद्रपद शु. चतोर्थी सौम्यवार यथास्थित असे. विशेष. शिंद्याकडील फौज दहा हजार व पलटणें दहा ऐसी जालनापुराचे अलीकडे देऊळगांवचे पलीकडे बुलढ्याचे घाटास आली. होळकर खासा नामपुरास आहेत. मीरखान पठाण वगैरे बाळापुरावर आहेत म्हणोन बाजारी वर्तता आहे. गारदोंडवरून नदीवर पलीकडे भीमातीरीं माने आहेत. श्रीमंतांची फौज जरीपटका मौजे लोणी कालभोराची नजीक थेऊर येथें आहे. पांडोजी कुंजर पुढें गेले होते ते कसबे पाडसावर आहेत. व बुराव कात्रे

व धोंडोपंत गडबोले व बाजीराव बर्वे यांचें पथक घासीराम कोतवाल यांचे तळ्याचे पाण्यावर आहेत. विंचूरकर यांची फौज खडकीचे पुलाचे पलीकडे राहिले आहेत. याप्रमाणें वर्तमान लोक बोलतात. होळकराकडे वकीलीस सदाशिवपंत आंगले गेले होते. त्यास ते तेथून पुढें शिंद्याकडे वकीलीस गेले म्हणोन वदंता आहे. शिंदे उज्जयनीस गोकुळ अष्टमीच्या उत्साहामुळें तेथेंच आहेत असें लोक म्हणतात. पानसे तोफखान्यासह जरीपटक्याबरोबर आहेत. या प्रांतीं पर्जन्य बहुत पडला परंतु लष्कर जमलें यामुळें वैरणीचा तोटा पडला. पंचवीस तीस रुपयास हजार जाहले. एके जागां हजार दोन हजार घेऊं गेल्यास मिळत नाहीं. मिळाले तर तीही सोडपेंडी कडबा दर शेंकडा रुपये साहा आहेत. पांच साहा रोजांपलीकडे बाजारांत धारण दर रुपयास हरभरे ९।१ चार पाइली, बाजरी ९।१।-, जोरी ९।१, तांदूळ आंबे मोहोर दर पह्या १२, १२॥ व तूप सव्वा दोन शेर होतें. हल्लीं भाव, हरभरे ९।-, बाजरी ९।-॥=, जोरी ९।-॥।- गहूं ९९=॥।, तांदूळ पह्या १४, तूप ९९=, गूळ ९९४ याप्रमाणें भाव आहे. वरकड जिन्नसही महाग जाहले. सरकारची ताकीद जाहली कीं, महागाई करूं नये. वाणी यांचें बोलणें कीं, बाहेरून जिन्नस येत नाहीं. संग्रहीं जिन्नस होता तो उडाला. बाहेरून खेप येत नाहीं काय करावें? महर्गता करूं नये ह्मणोन सरकारची ताकीद होत आहे. ओले गवताचे भारे विकावयास येतात. कोंकणांत शामलाचा उपद्रव बहुत जाहला. बंद धरितो, माणसें जीवें मारितो, घरास अग्न लावितो, फार उपद्रव केला आहे. सरकारांत बोभाट येतात. खंडेराव रास्ते यांजकडील हजार दोन हजार लोक खालीं गेले. आमचे गांवचे बाडीस घरें जाहलीं. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

---

नं. ६४२२ श्री. (भाद्रपद शु० ७—४ सप्टें.)

वै॥ छ० ७ जमादिलावल भाद्रपदमास मुक्काम मयातैन व अल्लफ.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधरराव स्वामींचे सेवेशीं.

पोष्य नारायणराव त्र्यंकटेश सा।। नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ० ६ जमादिलावल जाणून स्वकीय कुशल लेखन करावें विशेष. इकडील वर्तमान तर राजश्री रत्नाकरपंत वगैरे फौजसुद्धां नदी उतरोन श्री-देवाच्या डोंगरानजीक उतरले आहेत. पांच सहाशें स्वार दीडहजार पर्यंत पायदळ इतके उतरले. काल भृगुवारीं करवीराजवळच उतरले. आणि बराबर जमा होतच आहेत. याप्रमाणें येथील बातमीचा गडी गेला होता तो आतांच आला. जबानीनें मसलतीचा रोख इकडेच दिसतो. परंतु आवई मात्र शिराळ्यास जाणार याप्रमाणें घातली आहे. येथील सर्व अर्थ आपल्या ध्यानांतच आहे. तरी या स्थळाच्या बचावाविशीं हरीपुरास, जमखिंडीस व कुरुंदवाडास पत्रें पाठवून येथील बचाव होय तें करावें. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

---

नं. ६४२३ श्री. (५ सपटेंबर.)

पै।। छ ११ जमादिलावल सन सलास मयातेन.

सेवेशी धोंडो बापूजी जोशी. दोन्ही कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत भाद्रपद शु।। ८ रविवार पावेतों स्वामीचे कृपेंकरून सुखरूप असों. विशेष. इकडील मजकूर.

श्री।। रा।। चिंतामणराव आपाची स्वारी आली व भेटी जाल्याचा मजकूर पेशजी चिटणिसाकडील जासूद गांवचे कामाकरितां आला होता तो मिरजेस गेला त्यास मोघम लिहिलें आहे त्यावरून कळलें असेल. त्यास अलीकडे शुक्रवारीं वीस घटका दिवसास कवडीहून स्वारी भिडे यांचे घरास येऊन आपले वाड्यांत आले. नंतरीं रा।। दिनकरपंत यासी बोलावून आणिलें ते सरकार वाड्यांत गेले. नंतरीं दोन घटकेनें स्वारी श्रीमंताकडे गेली. आरसे महालांत श्रीमंत होते. एक घटका तेथें बसले. श्रीमंतांनीं सांगितलें कीं, डेऱ्यास जाऊं नये. उद्याहास यावें. त्यावर घरास आले. सा घटका रात्रीं सरकारवाड्यांत भोजनास गेले. श्रीमंतानीं वस्त्रें कंदी तिवट—व दुपेटा कंदी रंगाचा दिल्हा. कीर्तन श्रवण

---

१ घोरपडे इचलकरंजीकर. पत्र मिरजेस.

करून आपले वाड्यांत येऊन अकरा घटका रात्रीं डेऱ्यास गेले. याप्रमाणें जाहलें. कलम १.

शिंदे यांची फौजपलटणें श्रीगंगातीरास बहुलेचे घाटास फौजमुद्धां आली म्हणोन वदंता आहे. कलम १.

माने याची फौज गारदोंडावर होती. कूच करून चांभारगोंद्यावर गेली. पुढें बारशी पानगांवकडे जाणार ऐसे बोलतात. कलम १.

मरिखान पठाण क्षेत्र टोकेवर होता. त्यानें क्षेत्रीं अनुचित वर्तणूक करून ब्राह्मणांस व ब्राह्मण स्त्रियांस त्रास बहुतच देऊन कांहीं ऐवज घेतला व बोली धरून कूच करून तेथून पुढें गेला ऐसें वर्तमान आहे.

खासा होळकर नामपुराहून कूच करून चांदवडास जाणार म्हणोन बोलतात. १.

सरकारची फौज जरीपटका लोणीचे मुक्कामींच आहे. बरकड फुट पथकें गोडबोले व कात्रे वगैरे शहराबाहेर आहेत. कलम १.

होळकराची समजूत होऊन सलुखांत यावें ऐसा रंग आहे. कलम १.

येणेंप्रमाणें मजकूर आहे. बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६४२४ श्रीगणपति. ( भाद्र० शु० ९ – ६ सपटेंबर )

पै॥ छ० २९ जमादिलावल सन सल्लास मयातैन. आश्विन.

अपत्यें रामचंद्रानें शिरसा॥ नमस्कार विज्ञापना ता।गायत छ० ८ जमादिलावलपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष राजश्री नारो नीळकंठ मजमदार नि. सरकार यांचा सालाबादी ऐवज दरबारखर्चाचा द्यावयाचा राहिला आहे त्यास ई॥ सन अर्बा तिसैन ता॥ ता॥ सन इसन्ने मयातैन अखेरपर्यंत नऊ सालें तिनी पथकाचा आकार करून यादी मागील वहिवाटीप्रमाणें करून राजश्री यशवंतराव काकाजी निसबत मजमदार यांजकडे द्यावयास आज्ञा व्हावी म्हणजे आम्हो आपल्याकडील ऐवजाचा उलगडा करावयास येईल. विदित होय हे विज्ञापना.

---

१ पत्र राम. आपांचें जमखिंडीहून मिरजेस. २ इस्तकबील=जमेस धरून ( Including )

नं. ६४२५ श्री. (भाद्र० शु० १२ – ९सप्टें.)

पै॥ छ० ११ जमादिलावल सलास मयातेन.

विज्ञापना ऐसीजे, दिल्लीकडील व उज्जनीकडील आखबर आली नाहीं. गंगातीराकडील वर्तमान तरी शिंदे बहादर याची फौज सात आठ हजार व सात आठ पलटणें जालनापुरास दाखल होऊन तेथून पैठणास येऊन टोंक्या-जवळ गंगा उतरून नगरास येणार व सरकारचीं पत्रें व शिंद्यांकडील वकि-लाचीं पत्रें जातात जे, जलदीनें नगरास येऊन दाखल होणें म्हणजे होळक-राकडील फौजेचें पारपत्य लौकर करावयास येईल. म्हणून नित्यानित्य पत्रें जातात. त्यास ही बातमी रा॥ यशवंतराव होळकर यास कळल्यानंतर खासा होळकर नादपूर मोरणें येथून कूच करून चांदवडास दाखल होऊन तेथून पठाण व माने व नागो जिवाजी व शेणवी मंडळ व आबाजी शंकर वगैरे सरदार फौजसुद्धां गंगा दक्षिणतीरास आहेत त्यांस होळकरांनीं पत्रें पाठविलीं जे, तुम्ही तमाम फौजसु॥ राहोरीपासून पूर्वेस दाहा कोशांवर सारे एक ठिकाणीं जमा होऊन मजबुतीनें असावें. शिंद्यांकडील फौज व पल-टणा गंगा उतरून नगरास जाणार आहेत त्यांस जाऊं न देणें, लढाई देणें म्हणोन पत्रें आलीं व खासा यशवंतराव भाद्रपद शु॥ १५ सुमारास नासि-कास दाखल होऊन पुढें आपल्या फौजेंत यावें हा बेत आहे. यावरून माने व नागो जिवाजी वगैरे सरदार चांभारगोंदें व गारदोंड व पेडगाव येथें होते ते भाद्रपद शु॥ ३ कूच करून करमाळ्याच्या सुमारास गेले. पुढें शिंद्याच्या व होळकराच्या फौजेचा काय नकशा होईल तो सेवेशीं लिहूं. होळकराच्या फौजेनें गारदोंडच्या मुक्कामीं सरकारचे सरदार कुंजर वगैरे यांसीं बेकैदी करून, गोळे सुरू करून, गोट लुटून नेला म्हणोन सरकारांतून होळकराकडील गोपाळराव गानू व निंबाजी फडतरे यांस ताकीद होऊन माने व नागो जिवाजी यांजकडे पाठविले कीं, तुम्ही कूच करून मागें हटून जाणें. सरका-रच्या फौजेशीं बेकैदी न करणें. त्यावरून उभयतां मान्याकडे जाऊन सर-कार आज्ञा सांगितली व तदांत होळकराचेंही पत्र मान्यास आलें जे, कूच करून राहोरीच्या सुमारास यावें. त्यावरून माने व नागो जिवाजी कूच करून गेले. त्यावरून सरकार व कारभारी व नवीन सरदार हे आपल्या

ठिकाणीं बहुत संतोष जाहले. होळकराची फौज हटून माघारी गेली. त्यावरून नवी फौज होळकराच्या मसलतीकरितां ठेविली आहे तिची तारीख बंद करावी असा विचार आहे. श्रीमंत रा॥ चिंतामणराव आपा जेजुरीनजीक बेलसरावर आले. तेथें सरकारचें पत्र गेलें जे, तसेच परभारें गारदौंडच्या मुक्कामास जाणें. त्यावरून आपासाहेब कूच करून मोरेश्वरच्या मुक्कामास गेले. तों तेथें सरकारचें पत्र आणखी गेलें जे, पुढें न जावें. माघारें कौडीच्या मुक्कामास येणें. त्यावरून मोरेश्वराहून कौडीस श्रावण व॥१४सायंकाळीं आले. नंतर भाद्रपद व॥ १ सोमवारीं सात आठशें स्वारां सु॥ श्रीमंताचे भेटीस आले. भेटी वाड्यांत होऊन निरोपाचें पानदान जाहलें. नंतर श्रीमंत व आपासाहेब उठले. श्रीमंत थोरल्या हौदाच्या चौकांत जाऊन पुन्हां आपासाहेब यांस एकट्यास बोलावलें. त्यावरून आपासाहेब एकटे श्रीमंताजवळ गेले. श्रीमंतांनीं तारीफ केली जे, तुम्ही समयास येऊन दाखल जाहलां. नंतर आपासाहेब यांणीं विनंती केली जे, आम्ही स्वामी सेवेंत हजर झालों. मिरजप्रांतीं कोणी नाहीं हें जाणोन करवीरकर यांजकडील फौज पंचगंगेनजीक आली आहे, पुढें दगा करावा हा बेत आहे. म्हणोन विनंती केली. त्यावरून श्रीमतांनीं आज्ञा केली जे, रा॥ रामचंद्र परशराम त्या प्रांतीं आहेत ते करवीरकरांचा बंदोबस्त राखतील. येविसीं सरकारांतूनही मशारनिल्हेस पत्रें पाठवूं. त्यावरून सरकारचीं पत्रें श्रीमंत रा॥ रामचंद्रपंतआपा यांस गेलीं जे, करवीरकरांचा बंदोबस्त राखणें व बाळोजी कुंजर यासही श्रीमंतांनीं रुबरु आज्ञा केली जे, सरजेराव घाटगे याचे पुत्र करवीरकरांच्या फौजेंत आहेत त्यांसही ताकीद करणें व देणवी मंडळ यांणीं दोन चार हजार फौज जमा करुन करकंब भोंसें इकडे उपद्रव मांडला आहे म्हणोन आपासाहेब यांणीं श्रीमंतास विनंति केली. त्यावरुन श्रीमंतानीं आज्ञा केली जे, हजार पांचशें स्वार पाठवून पारपत्य करणें. याप्रमाणें परस्परें रुबरु बोलणें होऊन नंतर आज्ञा घेऊन गोटास कौडीचे मुक्कामास गेले. नंतर पुन्हां भाद्रपद शु॥ ६ शुक्रवारीं श्रीमंतांनीं आपासाहेब यांस बोलावलें. त्यावरुन दोनप्रहरां पुण्यांत आपल्या वाड्यांत आले. श्रीमंतास वर्तमान कळल्यानंतर बोलावणें चोपदार आला. नंतर संध्याकाळच्या चार घटका दिवस राहतां

वाड्यांत गेले तों श्रीमंत गणपतीच्या दिवाणखान्यांत बसले होते. तेथेंच आपासाहेब गेले. अस्तमानपावेतों श्रीमंतसुां॥ नाच पहात होते. नंतर श्रीमंत उठोन संध्येस गेले. आपासाहेब उठोन आपल्या वाड्यांत आले. नंतर श्रीमंतांनीं आपासाहेबांस सांगून पाठविलें जे, रात्रीं भोजनास वाड्यांत येणें. त्यावरून आपासाहेब यांणीं स्नानसंध्या करून प्रहर रातौ एकटे वाड्यांत आपासाहेब मात्र गेले. गणपतराव वगैरे कोणी एक गेले नाहींत. भोजन होऊन विडे देऊन व पोषाखांतील पागोटें व दुपेटा आपासाहेबांस देऊन निरोपाचे विडे दिल्हे. तेथून अकरावे घटकेस रात्रीं आपल्या वाड्यांत येऊन बाराबीच्या अमलांत कौडीस निघून गेले. परस्परें इतर मजकुराचे बोलणें झालें नाहीं. सदरहूप्रमाणें मजकूर जाहला. वरकड कुंदिया.

---

नं. ६४२६ श्रीगणपतिर्जयति. ( भाद्र० व० १।१२ सप्टें० )

पौ॥ छ० १० जमादिलावल सन सल्लास मय्यातैन भाद्रपद.

अर्पत्यें चिंतामणीनें शिरसा॥ नमस्कार. विज्ञापना. तागायत छ० १४ जमादिलावल पर्यंत वर्तमान क्षेम असे. विशेष. होळकर यांजकडील फौज करवंबेकडे जाऊन गांवास वेढा दिला आहे. पेठ लुटली. ब्राह्मणमंडळी वगैरे धरून लष्करांत नेले. पागेचीं घोडीं तेथें होतीं तीं गेलीं व गावांतील घोडीं गुरेंही नेलीं म्हणोन चि॥ राजश्री विठ्ठलरावबापू याचीं पत्रें दोन खानग्याची परवां भृगुवारीं आलीं. क्षेत्रास येणार. तेथील सावकार वगैरे उठून गेले व जातात ऐसेंही चिरंजीवानीं लिहिलें आहे. काय घडतें पहावें. चिरंजीवाकडील पत्रांतील मजकूर श्रीमंतांचे श्रवणीं घातला आहे. सेवेसी विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६४२७ श्री. ( भाद्रपद-सप्टें. )

ता॥ छ० १५ जमादिलावल ( १३ सप्टेंबर ) सोमवार मु॥ नासिक

---

१ आपासाहेब = चिंता. सांगलीकर. २ गणपतराव कोन्हेरे कुरुंदवाडकर. ३ पत्र अपुरें सांपडलें. ४ चिंता. आपाचें पत्र पुण्याहून मिरजेस. ५ पंढरपुरास

येथील वर्तमान तरी येशवंतराव होळकर फौजसुद्धां येऊन क्षेत्रास वेढा घालून शहरची कुलनाकेबंदी करून लहान मोठे गृहस्थ व भटभिक्षुक व उदमी व जमीदार यांच्या घरोघर चौक्या बसवून प्राणिमात्रास गंगादर्शन नाहीं व जनावरास तृणपाणी नाहीं याप्रमाणें बंदी करून क्षेत्रास चाळीस लाख रुपये खंडणी मागतात. यावरून क्षेत्रांतील लहान मोठे गृहस्थ व भटभिक्षुक व जमीदार मिळोन पाचशें जमा होऊन येशवंतराव जकातीच्या वाड्यांत राहिले आहेत तेथें बरू जाऊन खंडाचे तोडजोडचें बोलणें बोलून चार लाख रुपये देतों म्हणोन सर्वांनीं सांगितलें. त्यावरून येशवंतराव यांणीं एकच उत्तर केलें जें, चाळीस लाख रुपये घेऊं नाहीं तर क्षेत्र लुटून अग्न देऊं. त्यावरून समस्त ग्रामकरांनीं उत्तर केलें जे, आम्ही आपले जवळ आहों, मूल मनुष्यें व घर व शहरसुद्धां आपले स्वाधीनच आहेत. चित्तास येईल तें करावें. त्यावरून समस्त ग्रामस्थांस होळकर यांनीं गोऱ्या रामचंद्र याच्या वाड्यांत कोंडून ठेवून त्रिंबकराव पेठे व पटवर्धन दीक्षित व राजे बहाद्दर व मोठे मोठे गृहस्थ यांच्या वाड्यांवर तोफा रोखिल्या आहेत. याप्रमाणें क्षेत्राचा विचार आहे. व नासिक प्रांतीच्या गांवांवर खंडणीचे रोखे करून तमाम गांवगन्नाचे जमीदार व गृहस्थ धरून आणून + + + करून पैका घेतात. शिंद्याच्या फौजेचे तोंडावर पठाण वगैरे सरदार मिळोन वीस पंचवीस हजार फौज होळकर याची आहे. शिंदेबहादर यांजकडील फौज व पलटणा पैठणनजीक चेडगांवावर मुक्काम करून औरंगाबाद व पैठण व बीड येथील खंडणी तीन लाख रुपये सर्जा रुद्र याजपासून सदाशिवराव बक्षी निा। शिंदे यांणीं घेऊन गंगा उतरून नगरास जात आहेत. होळकर येण्याच्या पूर्वीं राजेबहादर कुटुंबसुद्धां निघोन रामशेजेस गेले म्हणोन राजेबहादर व पेठे वगैरे मोठमोठे गृहस्थ यांच्या वाड्यात फुल्या (?) करून चौक्या बसविल्या आहेत. याप्रमाणें येथील विचार आहे. पुढें होईल मजकूर तो लिहूं. हे विज्ञापना.

ता।। छ० १९ जमादिलावल (१७सप्टे. शुक्रवार.) मु।। नगर येथील वर्तमान तरी शिंदे बहादूर याजकडील सदाशिवराव बक्षी फौज व पलटणेंसुद्धां डिरमवाडीच्या घाटानें येऊन नगरानजीक भातवाडीवर मुक्काम करून नगरच्या

किल्लेदाराच्या व बक्षीच्या भेटी गुरुवारीं होऊन नंतर शुक्रवारीं बक्षी व फौजपलटणेंमुद्धां कात्राबाद मांडवगणास कूच करून गेले. तेथून मान्याच्या पारिपत्यास जाणार. व श्री।। रा।। रावसाहेब जुनरास येऊन दाखल जाहले. होळकराकडील + + + चार हजार स्वार धांदरफळ नजीक संगमनेर येथें आले आहेत. येशवंतराव होळकर नासिकावर आहेत व त्याजकडील पठाण व आणखी एकदोन सरदार मिळोन सरासरी वीस हजार स्वारांनिशी राहोरी जवळ मूळ नदीवर आहेत. शिंद्याकडील फौज व पलटणा कात्राबाद येथें आल्या त्यावरून सरकारांतून कुंजर व पुरंदरे वगैरे तोफखाना व गोडबोले यांस ताकिदी जाल्या जे, जलदी कूच करून सदाशिवराव बक्षी व तुम्ही मिळोन फत्तेसिंग माने याचें पारिपत्य करणें व श्री।। रा।। रावसाहेब याचा पुण्यास येण्याचा मजकूर आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. दुसरा मजकूर तर पांडवगडास सरकारांतून आरब व केसोपंत कारकून पाठविला होता. त्यांणीं वांई क्षेत्रांत उपद्रव केला तो अमर्याद करून ब्राह्मण्याचा विषय ठेवला नाहीं. त्यावरून आरबांस बोलावून घेतलें ते जुनरास व सासवड येथें कारकून व आरब येऊन दोहीं ठिकाणीं अमर्याद वर्तणूक करून जेजुरीमध्यें वीस हजार रुपये आरबांनीं घेतले. त्यावरून केसोपंत कारकून व आरब यांस श्रीमंतांनीं जलद बोलावून आणलें. त्यास पांचशें अरबांपैकीं दोनशें सासवडांत राहून तीनशें पुण्यांत आले. भवानीपेठेच्या अघाडीस दिवाण्या हवेलींत उतरतांच श्रीमंतांनीं तोफा व स्वार व गारद पाठवून आरबांस तोफा लावून उडविलें. त्यास रात्रौ शें दोनशें आरब पळून गेला. तोफेच्या गोळ्यानें अठरा असामी उडाली. फजर पन्नास असामी आरब व कारकून धरून तोफखान्यांत कैद करून पन्नास असामी आरब यांचीं डोचकीं व० ५ मारलीं. दोन जमादार व केसोपंत कारकून यांस बेडया घालून तोफखान्यांत कैद आहेत. याप्रमाणें आरबांचें पारपत्य जालें. हे विज्ञापना.

---

नं. ६४२८ श्री. ( भाद्रपद व. ३—१४ सपटेंबर )
पौ।। छ. १० जमादिलाखर सलास मयातैन.

ता॥ छ. १६ जमादिलावल मु. उज्जनी येथील वर्तमान तरी रा॥ अलीजा बहादर मुक्काम मजकुरीं शिकार पतंगा तमशगुल ( ? ) आहेत. कारभारी पूर्ववत्प्रमाणेंच आहेत. होळकराकडील महाल रसदा चुकतात. मुखत्यार घाटगे यांणीं नवीन जागा बांधली सबब मेजवानीची तयारी छ. ११ मिनहूस होऊन वस्त्रें अलंकार दिल्हे. तेच दिवशीं बक्षीचेंही मुहूर्त होतें. मुख्य भोजन करून गेल्याबर बक्षी मजकूर दिलीखार येथें प्रस्थानास गेले. दुसरे दिवशीं पुन्हां मुक्काम मजकुरीं स्थलाप्रति आले. लोकांस ताकिदी होतात कीं, डेरेजवळ येऊन रहावें. समजुती वगैरे लोकांच्या होऊन विजयादशमीस बहादर मजकूरही डेरेदाखल होणार. दक्षिण दिशेस पुण्याकडे मुख करणार पाहावें किंवा धारेची स्वारी मागील जाहली तैशीच अश्वमेधाचा घोडा फिरवून पुन्हां स्थळाप्रती येतील. किंवा जैसें निदर्शनास येईल तैसें सेवेशीं लिहिण्यांत येईल, परंतु येथून कूच होणार. रा॥ गोपाळराव रघुनाथ याजला नवीन जायदाद ( जहागीर ) देशीं पांच लक्षांची व हिंदुस्थानप्रांतीं पांच लक्षांची एकूण दहा लक्षांची दिल्ही. वस्त्रेंही त्याजकडे पाठविलीं. रा॥ अंबाजी इंगळे नरवरेसच आहेत. बायासु॥ शक्तीसहित तेथें आहेत. पिरूसाहेब कौलेस आहेत. शेखावटींत कांहीं बैदा जाला आहे. कारण कीं, पिरूसाहेब यांणीं जयपूरचे वकिलास मामल्याचे जाबजाब ठरण्यांत आला नाहीं सबब वकिलास काढून दिल्हा. यास्तव वकील जयपुरीं दाखल जाला. जयपूरवाल्याचे व ताम्रमुख पिरूचे कौलकरार कीं, तुमचे प्रांतांत बखेडा उत्पन्न जाल्यास आम्ही तुम्हांस साह्य आहों. याचें प्रयोजन जे वेळेस वजीर अल्ली पळोन यांचे येथें येऊन बसला ते वेळेस ठराव जाला. अल्लीमजकुरास हस्तगत करून दिल्हे. जलचराच्या राजांनींही त्याजकडील पलटणें चाकरीस ठेवून जायदाद लावून दिल्ही. तेव्हां त्यास कोणी जबरदस्तीची गोष्ट सांगोन दबावा चालणार नाहींसें दिसतें. हिंदुस्थानप्रांतींही कांहीं एक दिवसांनीं बखेडा उत्पन्न होईलसें दिसतें. बहादर मजकूर याजकडून जलचर पिरू आहेत त्यांणींही मोठमोठे किल्ले येथें जंगी लढाऊ सरंजाम कौलेस व आग्रा व दिल्ही वगैरे ठिकाणीं सरंजाम तयार करून आहेत. जलचराची नियत फिरली असें दिसतें. दृष्टोत्पत्तीस

येईल तें खरें. परंतु या समयीं हिंदुस्थानांत मुखत्यार पिरू यासी याणीं बिघड-ल्यास सौरस्य राहणार नाहीं. आपसाचा फितूर मोडून एकचित्त जाहल्या-विना याचें पारपत्य होणार नाहीं. होईल तें लिहिण्यांत येईल. हे विनंती.

---

नं. ६४२९ श्री. (भाद्र. व. ६–१७ सप्टें.)

पैवस्ती छ. १९ ज० बल सलास मय्यातैन. भाद्रपद.

सा. नमस्कार विज्ञापना ऐसीजे. रा. यशवंतराव होळकर छ.९ रोजीं गंगाकांठीं मदनेश्वराच्या नांदुरास वीस हजार फौजसुद्धां दाखल होऊन आघाडीच्या फौजा पठाण वगैरे यांस राहोरीनजीक मूळ नदीवर जमाव केला आहे. शिंदे बहादर यांजकडील फौज व पलटणा राक्षसभवनास दाखल होऊन तेथेंच गंगा उतरून नगरास यावें हा बेत आहे. बहादूर यांच्या फौजेच्या तोंडावर होळकराची फौज मजबुतीनें आहे. पुढें निदर्शनास येईल तें लिहूं. खासा यशवंतराव पुण्यानजीक वाफगांव पुण्यापासून सोळा कोस आहे तेथें येणार असी वंदता आहे. होळकराकडील फत्तेसिंग मान्ये याणीं राहीन व भोसें व करकंब घेऊन खंडण्याविशीं कारकून धरून नेले आहेत. आणि कारकुनास मार देतात म्हणोन श्रीमंत राजश्री बापूसाहेब यांची मंगळवेढ्याहून लिहिलीं आलीं आहेत. फत्तेसिंग मान्ये पंढरपुरा-नजीक भिवरा उतरून पंढरपूर व मिरज व बागलकोट वगैरे या प्रांतांत येऊन दंगा करावा हा इरादा आहे. याजकरितां स्वामींनीं सर्वा गोष्टीनें मजबुतीनें असावें. श्रीमंत राजश्री चिंतामणरावआपा यांस सरकारांतून सांगणार जे, सडे दोनशें स्वारानिशीं तुम्ही राहून बाकी फौज झाडून फत्ते-सिंग मान्ये यांजवर पाठवून करकंब वगैरे आपल्या प्रांतींचा बंदोबस्त करावा असें सांगणार. परंतु आपासाहेब येथें दोनशें स्वारनिशीं राहिले असतां परिणाम शुद्ध नाहीं. येविशीं अपासाहेब यांस प्रत्यय भाद्रपद शु. ९ आला आहे. श्रीमंत राजश्री रामचंद्रपंतआपा यांनीं रास्त्याच्या मुलांस तासगांवा-हून हुंदीहाळास स्वार देऊन पोंचविलें; म्हणोन कोणी सरकारांत बातमी लिहिली आहे. त्यावरून श्रीमंतांची मर्जी रुष्ट होऊन अपासाहेब यांस सरकारचें व दिनकरपंत पटवर्धन यांचें पत्र सांडणीस्वाराबरोबर लिहिलें

आहे की, तुम्हांस ठाऊक असतां कसा पोंहोचवून दिला ? असा दोष ठेवून पत्रें गेलीं आहेत. फत्तेसिंग मान्ये व लाडकोवा वगैरे फौजसुद्धां आथणी व मिरज वगैरे या प्रांतीं दंगा करणार शिंदे होळकर यांचा समेटीचा मजकूर कांहींएक दिसत नाहीं. येथील मजकूर अधिकोत्तर ल्याहावा ऐसा नाहीं. होईल तें मागाहून सविस्तर लिहून पाठवूं. हे विज्ञापना.

श्रीमंत राजश्री रावसाहेब जुन्नरास लौकरच येणार आहेत.

---

नं. ६४३०. श्रीगणपतिर्जयति. (भाद्र.व.६-१७ सप्टें.)

सेवेसी छ. २४ जमादिलावल सन सल्लास मय्या तैन. भाद्रपद.

विज्ञापना तागायत छ. १९ जमादिलावलपर्यंत वर्तमान क्षेम असे. विशेष. पेशजी बाईस आरब होते ते जेजुरीस येऊन पंधरा वीस दिवस राहिले होते. तेथें दंगा केला. तेथून निघोन छ. १७ जमादिलावल बुधवारीं अस्तमानीं पुण्यास गेले. सरकारांतून ताकीद शहरापासून लांब तफावतीनें राहणेविशीं जाली असतां राजश्री माळोजी राजे घोरपडे यांचे वाड्यालगत पूर्वेस राहिले ताकिदीस आले त्यासी खटला करून मारामारी केली. तेव्हां सरकारांतून कांहीं पायदळ शहरचे चौकीस आलें त्याजवर आरबांनीं गोळ्या मारिल्या. पायदळास रेटून आरब शार्मारखान पठाण याचे वाड्यांत वेताळ पेठेंत शिरले. सरकारांतून वाड्यावर तोफा लाविल्या. फौज व पलटणें तयार होऊन चहूंकडून घेरलें. गोळीगोळा जाहली. गुरुवारीं प्रातःकाळीं पलटणच्या वगैरे लोकांनीं हल्ला करून आरब कापून काढिले. कांहीं आपले आपलेंत तोडून मेले. दोन तीन जमातदार व पांच चार आरब जिवंत सांपडले ते धरून चौकी मागविली. केसोपंत साठे म्हणोन कारकून आरबांबरोबर बाईस गेले होते ×

---

नं. ६४३१ श्रीगणपतिर्जयति. [भाद्र. व. ८-१९ सप्टें.]

सेवेसी छ० २६ जमादिलावल सल्लास मय्यातैन. भाद्रपदमास.

---

× पत्र अपुरें सांपडलें.

तां॥ राजश्री काकासाहेब वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें[1] चिंतामणीनें सा॥ नमस्कार विज्ञापना, तागायत छ० २१ जमादिलावलपर्यंत वर्तमान क्षेम असे विशेष. लाडको व्यंकटेश व येसाजी रामकृष्ण वगैरे हेणवी बारशी पानगांवाकडे गेले होते त्यास राजश्री शहाजी भोसले अकलकोटकर यांची व हेणव्यांची लढाई होऊन हेणवी दास लुटून फस्त केलें. हेणवी याजकडील एक सरदार चांगला पडला, व कांहीं भोसले यांजकडे सांपडले याप्रमाणें सरकारांत वर्तमान आलें. वडिलांस कळावें. पुणियांत इंग्रजांकडील हत्तीण व्याली. हत्ती जाहला. आज चार दिवस जाहले. वडिलांस कळावें. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६४३२. श्री. (भाद्र. व. ११-२२ सप्टें.)

पै॥ छ० २८ जमादिलावल भाद्रपद व॥ ३० रविवार सन सल्लास.

सेवेशीं[2] गिरमाजी जिवाजी कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता॥ छ. २४ जमादिलावल पावेतों स्वामींचे कृपेनें हा कालपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान, श्रीमंत रा॥ बापूसाहेब[3] यांणीं लिहिलें आहे त्यावरोन कळों येईल. महद अरिष्ट येऊन पडलें आहे! लष्कर पंढरीस येऊन उतरलें. करकंबची दुर्दशा केली! बाकी कांहीं ठेविली नाहीं. येथें शह दिलाच आहे. परंतु प्रस्तुत बापूसाहेबीं सरंजाम दोन हजार फौज व सातशें आठशें पायदळ जमा केलें, तूर्त दबाव दाखविला. लष्कर ( भीमा ) नदी ऐलीकडे उतरलें. तेथील खासा होळकराकडील फत्तेशिंग माने वगैरे सरदार आहेत. पायदळ आरब व कंपू ब्रान मोठ्या तोफाही वीसपर्यंत आहेत. जमाव भारी दिसतो. तेथें तों लोकामध्यें प्राण कांहीं राहिला नाहीं. वस्तीचे लोक दिक होऊन गेले. सरकारांतही ऐवजाची वोढच आहे. या प्रांतीं अरिष्ट आलें म्हणोन तमाम शिलेदार वगैरे पथावर लोक जमा जाहले आहेत. सांप्रतकाळीं मोठी गोष्ट संकटाची येऊन पडली! स्वामींचे पुण्यप्रतापें विघ्न निरसन

---

१ चिंता. सांगलीकरांचें पत्र पुण्याहून मिळालें. २ पत्र मंगळवेढ्याहून मिळालें. लेखक फारसी आहे. २ विठ्ठलराव पांडुरंग पटवर्धन.

होईल तें खरें. करकंबचें वर्तणूक ऐकोन लोकांचीं काळजें फुटलीं आहेत ! गांवांतील मुलें लेंकरें कोणिकडे घेऊन जावीं तरी कोठें सोय नाहीं. तिकडे घेऊन यावीं तर पल्ला लांब. गुजराण चालली पाहिजे. असा प्रसंग येऊन प्राप्त जाहला. नित्य स्वामीचें चरणांचें स्मरण करून दिवस ढकलीत आहों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६८३३ श्रीगणपतिर्जयति. ( भाद्र० व० १२—२३ सप्टें०.)

तीर्थरूप राजश्री काकासाहेब वडिलांचे सेवेसीं.

अपत्यें चिंतामणीनें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २५ जमादिलावलपर्यंत वडिलांचे आशीरवादें वर्तमान यथास्थित असे. विशेष. वाडेस्वीं छ० २० तारखेचीं पत्रें पाठविलीं तीं छ० २३ मिनहूस भौमवारीं आवशीचे पांच घटका रात्रीस पावलीं. करवीरकरांनीं शिराळयास मोर्चे-बंदी केल्याविशींचें व होळकराकडील माने वगैरे फौज कांहीं गुरसाळ्याजवळ भीमा उतरून क्षेत्रास आले म्हणून विस्तारें पत्रीं मजकूर लिहिला तो सवि-स्तर कळला. तीर्थरूप मातुश्री काकूकडून लखोटा आलेला पाठविला तो पावला. शिराळयाचें वर्तमान इंदुवारीं दोन प्रहरीं येथें वर्तमान कळलें. त्यावरून श्रीमंतांचे श्रवणीं मजकूर घातला. माने यांजकडील फौज क्षेत्रीं आल्याविशीं वडिलीं लिहिलें. याअन्वयेंच चि॥ राजश्री विठ्ठलरावबापू याज-कडूनही पत्रें भौमवारीं वरतमानींच आलीं. करकंबची अवस्था मंगळ-वेढेची करावी हा इरादा माने यांचा बहुत आहे. तालुक्यांत रोखे जाले असें चिरंजीवांनीं लिहिलें आहे. सरकारांतून पानशे पुरंदरे वगैरे फौजांची रवानगी जाली ते कवडीनजीक लोणीस मुक्काम करून होते तेथून पुरंदरे कूच करून थेऊरानजीक गेले. तेथूनही काल बुधवारीं घांट चढोन मोरे-श्वरचे मुक्कामास गेले. पानशे यांनीही तोफखान्यासुद्धां कूच केलें. तेही उदईक जाऊन मिळतील. आम्हांसही जाण्याविशीं आज्ञा जाली आहे. आज कूच करून जातों. मंगळवेढ्याकडे होळकराकडील उपद्रव व शिराळयाकडे करवीर दोन वेध आहेत. यांतून श्रीगजाननाचे कृपें व वडि-लांचे आशीर्वादें होईल तें खरें. चि॥ राजश्री बापूकडे व जमखिंडीस

बडिलांकडे पत्रें पाठविल्याविशींचे बडिलीं लिहिलें तें कळलें. येथूनही चिरंजीवास मंगळवेढ्यास सावधगिरीविशीं बरचेवर लिहित आहें. शिंदे याजकडील राजश्री सदाशिवराव बक्षी फौज पलटणेंसुद्धां शिरसवाडीच्या घाटानें येऊन नगरानजीक भालवडीवर मुक्काम करून नगरकर किल्लेदार यांच्या व बक्षीच्या भेटी पंचमी गुरुवारीं होऊन बक्षी भृगुवारीं कात्राबाद मांडवगणास आले. तेही माने याचे पारपत्यास दरमजल येणार. सरकारचींही पत्रें त्यास निकडीनें येण्याविशीं गेलीं आहेत. खासा होळकर नाशीकास आहेत. तेथील ब्राह्मण गृहस्थमंडळी वगैरे लहान थोर सर्वांस बसवून चाळीस लाख रुपयांचा तगादा लाविला आहे. याप्रमाणें वर्तमान आहे. शिराळ्याची कुमक करणेविशीं ती॥ राजश्री आपासाहेब यांसही लिहिलें आहे. व बडिलींही लिहून कुमक होय तें करावें. इकडील होईल तें सेवेसी लिहून पाठवितों. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६४३४　　श्री.　　(भाद्रपद व॥ १४–२५ सप्टें.)

पै॥ छ. २८ जमादिलावल सन्न सल्लास मय्यातैन व अलफ भाद्रपद व॥ ३० रविवार.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसी.

विनंती ×सेवक बाळाजी महादेव दामले कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ. २७ जमादिलावलपर्यंत स्वामीचे कृपेंकरून कसबें रहिमतपूरचें व सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. विठोजी माने पाटील नांगरे कसबें मजकुर यास दोघी बायका. त्यांचे पोटीं संतान नाहीं. सन्न आरबा समानिनांत पाटील यास दुखणें लागोन काल समीप आला तेसमई त्यांचे घरभाऊ मेघाजी माने पाटील याचा लेक ओटींत घेतला. पुढें पाटील याचा काल जाहला. तेव्हां लेक रामराव माने वडील-मातुश्रीजवळ दोन तीन वर्षे होते. पुढें तेथून निघून सरंजामाचे चाकरीबद्दल फतेसिंग भोसले अक्कलकोटकर याजपाशीं गेले. दुसरी मातोश्री ठाणें दिलीव येथें होती. तिजपाशीं राहिले तिकडेच पांच सात वर्षे राहिले होते. साल-

× पत्र रहिमतपुराहून निरजेस.

ऐ. ले. ९

गुदस्त मातुश्रीनुद्धां कसबे मजकुरास येऊन पाटीलकी करूं लागले. तेव्हां वडील-मातोश्री म्हणों लागलीं कीं, पाटीलकी मीच करीन. तेव्हां राजश्री फत्तेसिंग माने व बरकड घरभाऊ यांणीं सांगितलें कीं, लेक असतां बायकोस पाटीलकी करावयास ठीक नाहीं. तुमचा पोटापाण्याचा बंदोबस्त करून देतों याप्रमाणें बोलले. तेव्हां कजीया होऊन कमळजा पाटलीण पुण्यास गेली. तेथेंहि चौघांनीं लेकास पाटीलकी करूं देणें, तुमचें पोटापाण्याचा बंदोबस्त रामराव माने पाटील करून देतील, म्हणोन सांगितलें असतां कमळजाबाई माने याजकडील अंताजी हणमंत श्रीमंत राजश्री आपासाहेबाकडे जाऊन गैरवाका समजाऊन पत्र घेऊन मिरजेस गेले आहेत म्हणोन येथें वर्तमान आलें आहे. राजश्री फत्तेसिंग माने पाटील याचा मुक्काम श्रीपंढरपुरास आला. गांवास यावयाची बोलवा फार आहे. तिकडील माणसें बरच्याबर येथें येतात. घटस्थापना व दसरा-पूजन रामराव माने यांणीं करूं नये, कमळजाबाई करितील म्हणोन अंताजी हणमंत ताकीद पत्र मागतील त्यास ताकीदपत्र द्यावयाविसीं आज्ञा होऊं नये. ताकीदपत्र आलें असतां आम्हांस धन्याचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक करणें प्राप्त. राजश्री फत्तेसिंग माने पाटील फौजसुद्धां समीप आहेत. कजीया पडोन गांवचा बखेडा होईल याजकरितां विनंति लिहिली आहे. राजश्री रामराव माने पाटील अद्याप सरकारांत आले नाहींत. त्यास सालमज-कूरची पट्टी चालती जाहाल्यावर सरकारांत येणार आहेत. या प्रसंगीं मशारनिल्हे आले आहेत त्यास ताकीद पत्राविसीं आज्ञा होऊं नये शेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६४३५ श्री. (भाद्र. व.१४ –२५सप्टें.)

पै॥० छ० २८ जमादिलावल भाद्रपद. सल्लास मयातैन.

शेवेसी विनंति सेवक बाळाजी माहादेव दामले साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ २७ जमादिलावलपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. कसबे रहिमतपूर[1] येथें पेशजी सिबंदीची नेमणूक आहे. असामी—

---

१ पत्र रहिमतपुराहून मिरजेस.

२५ गाडदी दिमत फाजील महमद असामी.
१० रामोशी रखवालीदार.
१४ तासिलीस वगैरे कामगारांस प्यादे.

—

४९

एकूण येकूणपन्नास असामींची नेमणूक आहे. त्यापैकीं दहा असामी गाडदी दूर करणेविसीं राजश्री बापूजी जिवाजी यास येथून आज्ञापत्र आलें त्याजवरून मशारनिल्हेनीं दहा असामी दूर केले आहेत. बाकी पंधरा गाडदी राहिले त्यांत जमातदार हुदेदार निशाणदार पखाली मिळोन सात. बाकी आठ असामी शिपाई राहिले त्यांस वाड्यांत चौकी पाहारा व गांवांत येतेंत चौकी पाहारा जाहाला पाहिजे. दंग्याचे दिवस. दरवडे पडतात. पन्नास पाऊणशे सिबंदीशिवाय परिणाम लागत नाहीं. शिवाय मजेरे नहरेवाडी येथें पांच असामी ठेविले पाहिजे. याजकरितां विनंति लिहिली आहे. तर दाहा असामी दूर केले आहेत ते व आणखी दहा गाडदी ठेवणेविसीं आज्ञा जाहाली पाहिजे. सेवेसी विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६४३६ श्रीगजानन. ( २५ सप्टें. )

पै॥ छ० ३ जमादिलाखर आश्वीन मास सल्लास मय्यातैन.

अपत्यें[1] बापूजी त्रिंबक व हरी त्रिंबक परचुरे शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम ता॥ भाद्रपद वद्य १४ चतुर्दशीपावेतों वडीलांचे आशीर्वादेंकरून कुसेगल[2] येथें सुखरूप असों. विशेष. वडीलीं आशीर्वाद पत्र छ० १६ जमादिलावलचें पाठविलें तें छ० २४ जमादिलावलीं पावलें. वडीलीं वे. शा. सं. रा. रा. दीक्षितबावांस[3] पत्र व पुस्तकें पाठविलीं तीं प्रविष्ट केलीं.

---

१ सरकारी वसुलास. २ पत्र कुसेगलाहून मिरजेस. ३ चिदंबरदीक्षित. हे दीक्षित रावबाजी पेशव्यांच्या कारकीर्दीत कर्नाटकांत महान् साधु म्हणून प्रसिद्धि पावले होते. आम्ही गुदस्तां मिरजमळ्या संस्थानांतील स १८०२–०६ चार सालांची चिटणिशी दप्तरें चाळलीं; त्यांमधून मुलें होणें, हस्तस्पर्शानें

गौतम स्मृतीचें पुस्तक पाठविलें तें श्रीदीक्षितबावास प्रविष्ट करून रा॥ दिवाकरदीक्षितास प्रविष्ट करून पत्रही दिल्हें त्याचें उत्तर पाठविलें आहे. उर्वरित स्मृती लिहून पाठवाव्या. कात्यायेन सूत्राचे भाष्याचा शोध करून प्रती लिहून पाठवितों ऐसे लिहिलेवरोन परम संतोष पावले. सूत्र-भाष्य अगत्य लिहून पाठवावें. कलम १

श्रीदीक्षितबावांस पत्रें देऊन उत्तर घेऊन पाठविलीं आहेत. आप-णावर पूर्ण आशीर्वाद आहे. रा॥ देवराव देशपांडे आठचार दिवसांत निरोप देऊन पाठविणार आहेत त्याजबरोबर सविस्तर वृत लिहितील. राजकीय वर्तमानाची पुरवणी समग्र बाचून दाखविली. अलीकडे अधि-कोत्तर वृत्त होईल तें ल्याहावें. कित्तूरकर याणें दंगा आरंभिला आहे. दोन तीन हजार पाय लोक व हजार स्वार घेऊन तडकोडचें ठाणें धारवाड किल्ह्याखालील तोफा लाऊन घेतलें. हाल्लीं बेटगीरें येथें शिलशिला लाविला, पुढें काय होतें पाहावें. रा॥ बापू गोखले फौजसुद्धां नरगुंदा-नजीक आहेत. बागलकोट तालुक्याचे खंडणीचा जाबसाल पाऊण लक्ष रुपयेवर उरकला म्हणून वर्तमान आहे. रास्ते यांचा चिरंजीव रा॥ बळ-

---

रोग बरे करणें, पाचशें माणसांच्या शिध्यांत पांच हजार माणसांना भरपूर जेवावयास घालणें, एखादा जिन्नस नसल्यास तो एकाएकीं नवीन उत्पन्न करणें, दुसऱ्याच्या मनांतील ओळखणें वगैरे या बावांनीं केलेले अनेक दैवी चमत्कार आम्हांस वाचावयास सांपडले. पटवर्धन, रास्ते, गोखले व कर्नाटकांतील मोठमोठे जमीनदार हे सर्व त्यांचे निःसीम भक्त होते. प्रसिद्ध बंडखोर धोंडजी वाघ हामुद्धां स्वतःला त्यांचा शिष्य म्हणवीत असे! बावांचें साधुत्व आणि त्यांनीं केलेले चमत्कार हा केवळ श्रद्धेचा विषय आहे. बावा नेहमीं मोठमोठे यज्ञ करीत आणि त्यानिमित्य नेहमीं मोठमोठीं ब्राह्मणभोजनें घालीत—ते नेहमीं राजैश्वर्यानें रहात—त्यांना दोघी स्त्रिया होत्या आणि दोघींनाही मुलें होत नसत, त्यामुळें बावा नेहमीं कष्टी असत आणि बावांच्या साधुत्वावर त्यांच्या दोघां बंधूंची सहकुटुंब चंगळ चालत असे हीहि माहिती आम्हांस वाचावयास सांपडली आणि तिच्या सत्यत्वाविषयीं मात्र कोणास शंका वाटणार नाहीं!

बंतराव नागलकोट्यास आला आहे. म्हणून वर्तमान आहे. वडिलास कळावें.

श्रीदीक्षितबाबाची वडीलांवर पूर्ण कृपा आहे. त्यांचेच आशीर्वादें-करून सर्व यथास्थित होईल. वडीलीं दरचेवर असे पत्रें पाठविलीं पाहिजे. होळकराचा दंगा पंढरपुराकडे बहुत जाहला. होळकराचा जमाव आला आहे म्हणून येथें वर्तमान प्रांतांत रोखे जाले आहेत. ऐशियास सविस्तर ल्याहावयास आज्ञा जाली पाहिजे.

सदरहू कलमें लिहिलीं आहेत त्याजवरून कळेल. मीही श्रीस विनंती करीत आहें वडीलींही पत्रें पाठवीत असावीं. सेवेशीं विदित होय. कृपा करावी हे विज्ञापना.

---

नं. ६४३७ श्रीव्यंकटेश. (भाद्र. व. ३०–२६ सप्टें.)

पै॥ छ० २९ जमादिलावल सल्लास मय्यातैन.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधरराव स्वामीचे सेवेशीं.

पोष्य नारायणराव व्यंकटेश सा॥ नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ० २८ जमादिलावल रविवार जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेष. शिराळ्याकडील वर्तमान आपणांस कळलेंच असेल. शुक्रवारचे रातोरात कूच करून खासा स्वारी कातेवर आले. तेथून कूच करून आज रकडीकर मुक्कामास आले. कांहीं स्वार इचल-करंजीपर्यंत येऊन त्यांची आमची गोळागोळी जाहली. उदईक ते येथें येऊन निकड करणार. याकारितां आपणाकडील सामान लौकर देऊन सम-यास पोहोचें तें करावें. राजश्री हरीपंतबाबा तासगांवीं आहेत त्यास जमखिंडीहून पत्र आलें आहे. आपणही त्यास लेहून कुरुंदवाडास त्यांचें आगमन होईल तें करावें. तेथें सामानाचा जय पाडला म्हणजे सहजीं ते बरगळतात. याउपरी तरतुदीविशीं आलस्य होऊं नये. त्वरा करावी. अवध राहिली नाहीं. खासा महाराज करवीरास गेले आहेत. तेही उदईक इंदुवारीं लष्करांत रकडीचे मुक्कामास येणार आहेत. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. लोभ करावा हे विनंती.

नं. ६४३८ श्रीभार्गवराम. (आश्विन शु० ३-३० सप्टें.)

पै॥ छ० ६ जमादिलाखर इंदुवार नऊ तास आश्वीन मास सन सल्लास मयया तैन.

श्रीमंत राजश्री बाबासाहेब स्वामीचे सेवेसी विनंती. सेवक सखाराम धोंडदेव काळे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. विज्ञापना. ता॥ छ० २ माहे जमादिलाखर पावेतों स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामींनीं कृपा करून पत्र पाठविलें तें उत्तम समयीं पावोन परमानंद जाहाला. ऐसेंच सदैव पत्र पाठवून सांभाळ करीत जावें. यानंतर इकडील वर्तमान तर, आमचे यजमानास श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं, तूर्त तुम्ही जरीपटका पुरंधरे यांजबरोबर आहे त्याबरोबर तुम्ही जावें म्हणोन सांगितलें त्यावरून आलों. पुरंधरे याचा मुक्काम जळगांवनजीक बारामती तीन कोस येथें आहे. पानशे गणपतरावही चार पांच तोफा बरोबर घेऊन येथेंच आहेत. पांडोजी कुंजर आम्हांपासोन दोन कोस पुढें होते. माने यांची फौज पंढरपुराजवळ होती. त्यांतील दोन हजार फौज बाळा-पुरास आली हे बातमी कुंजर यांस समजतांच तेथून कूच करून समीप आले. त्यापैकीं प्रतिनिधींची फौज कराडास करवीरकरांचा उपद्रव जाला आहे म्हणोन तिकडून पत्रें आलीं त्याजवरून कूच करून काल गेले. बरकड शिलेदार वगैरे आहेत ते पोटास नाहीं म्हणोन उठोन जातात. आठा दिवसांत पांच सहा आणे आसामदार यांस पोहोचते. त्यांतही येकचंदी पावत नाहीं, याप्रमाणें तीनही पथकांत बोभाट आहे. खासा होळकर पंचवीस तीस हजार फौज व दहा बारा पलटणें पन्नास पावणशे तोफा ऐसे घेऊन नारायणगांवास आले. पुण्यापासोन बेवीस कोशावर आहे. पुण्यास यावयाची दाट आवई आहे. श्रीमंतांची स्वारी बाईस कृष्णास्नानास गेली म्हणोन येथें वर्तमान आहे. तसेंच तिकडील दाटी जाली म्हणजे पुरंधरास जाणार याप्रमाणें संकेत आहे. रा॥ धोंडोपंत गोडबोले यास सर-सुभा सांगून बरोबर सात आठ तोफा सरकारांतून देऊन रवानगी जाली होती. होळकराचें वर्तमान कळतांच लोक झाडून उठोन गेले. त्याचा मुक्काम पुलाजवळ होता तेथून बाईस यजमानाकडे गेले. मंगळवेढेंकडील व

करकंवची पत्रें परभारें स्वामींकडे येत असतील त्यावरून विदित होत असेल. शिंदे यांजकडील सखाराम घाटगे व चिटणीस पांच हजार फौज व दोन चार पलटण घेऊन मोंगलांच्या तालुक्यांतून बीडानजीक आले. तेथून त्यांच्या तालुक्यास उपद्रव करूं लागले. तें होळकरास समजलें नंतर येथून पंचवीस हजार फौज पंचवीस तोफा रवानगी करून दिल्ही. त्याचा येणें योग घडत नाहीं श्रीमंतांचीं पत्रें शिंदे यांस येणेंविशीं गेलीं. त्याजवरून फौज सखाराम घाटगे याजबरोबर पाठविली. परंतु ते येथें येऊन श्रीमंतांची त्यांची मिलाफ होऊन होळकराचें पारपत्य होणें कठीण आहे. यांत श्रीइच्छा प्रमाण! शिंद्याच्या फौजेस श्रीमंतांचीं पत्रें गेलीं होतीं कीं, सामानमुद्धां येणें म्हणजे सरकारचें सामान मिळेल. होळकराचें पारपत्य करावें. त्याजवरून त्याचें उत्तर आलें कीं, नगरचेपुढें आमचा निभाव होत नाहीं. होळकर जबरदस्त. याजमुळें साऱ्यांचे इलाज राहिले. फत्तेसिंग मान्याकडे दाहा हजार फौज होळकराची रवाना जाहली. ते या फौजेस मिळाले. दोनीकडून पुण्यास यावें हा मनसबा आहे. काय घडतें पहावें. सदैव पत्र पाठऊन सेवकाचा सांभाळ करावयास आज्ञा होत असावी. बहुत काय लिहिणें, सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६४३९ ( भाद्र–सप्टें. वु. पंधरवडा. )

बोलणें राजश्री दिनकरपंत पटवर्धन बोलतात. रास्ते यांचा मूल निघोन गेला आहे तो तुमच्या तालुक्यांत आढळल्यास बंदोबस्त करणें म्हणोन श्री. राजश्री रामचंद्रपंत आपा यांस सरकारचें पत्र गेलें होतें. त्यावरून आपासाहेब यांणीं विनंतिपत्र सरकारांत पाठविलें जे, आमच्या तालुक्यांत येऊन आम्हांस कळवून गेला असतां आम्हांकडे दोष. आम्हांस न कळतां दुसरेयाचे तालुकियांतून गेला असतां यास आमचा उपाय नाहीं. म्हणोन उत्तर आलें आहे. राजश्री बाबजीपंत यजमानस्वामीकडील कागदपत्र वगैरे जावसालाकरितां राजश्री दिनकरपंत पटवर्धन याकडेस जात असतात. राजश्री मोरोबादादा यांचे चिरंजीव नाना अद्याप. वाड्यांत आहेत. त्यांस भाद्र-

१ या पत्राचा हा शेवटचा वंद पत्र मिळाला.

पद ब० ४ रात्रौ कथेस श्रीमंत दादांचे वाड्यांत आले. चार घटकापर्यंत बसून गेले. नंतर ब० ७ नाना फडणीस यांस सरकारचें बोलावणें येऊन गणपतीचे समारंभाचे नाचास बोलावून नेलें व रात्रौ कथेसही बोलावून नेलें होतें. याप्रमाणें मजकूर जाहला. होळकराकडील समेटाचे कलमाची याद पूर्वी वकील घेऊन आले आहेत. त्याची तोडजोड होऊन एकही कलम ठरण्यांत आलें नाहीं. समेटाचा मजकूर दिसत नाहीं. शिंदे बहादर यांचे चित्तांत होळकरांचा समेट करावा हा विचार नाहीं. त्याच अन्वयें श्रीमंतांची मर्जी आहे, जसें श्रीमंतांचें मर्जीत व शिंदे यांचे मर्जीत आहे हे विचार यशवंतराव होळकर याचे ध्यानांत आले आहेत. त्याप्रमाणें होळकर वागत आहेत. सदाशिव माणकेश्वर भागानगराहून निघाले ते तुळजापुरानजीक आले आहेत. लौकरच येतील. सुरतप्रांतीं होळकर यांणीं फौज पाठवून बहुत दंगा मांडला आहे. खुद्द दौलतराव शिंदे याजपाशीं तीन चार हजार स्वार व चार पांच पलटणें येणेंप्रमाणें सरंजाम आहे. भोसल्यांकडील कारभारी येथें आहेत ते होळकराच्या समेटाचें बोलणें सरकारांत बोलत होते. त्यांस सरकारचा खंबीर पुर्तेपणें खातर जमेचा नाहीं म्हणोन बोलणें महकूब केलें. पूर्वेकडून शिंद्यांची फौज पलटणें आलीं आहेत व पश्चिमेकडून सरकारची फौज अशा दोन्ही फौजा एकत्र होऊन होळकराचें पारिपत्य करावें म्हणोन कुंजर याचा बेत आहे. पुढें काय नकशा ठरेल तो पहावा. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६४४०. श्री. नकल. ( २ आक्टो. )

पै।। छा।। ९ जमादिलाखर सलास मय्या तैन. गुरुवार.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी दोन्ही कर जोडून त्रिकाल चरणांवर मस्तक ठेवून शिरसा।। नमस्कार. विज्ञापना. ता।। आश्विन शु।। ५ पावेतों बालकाचें वर्तमान यथास्थित असो. विशेष. वडिलांकडून अलीकडे पत्र आलें नाहीं. इकडील मजकूर तर माने श्रीपंढरपुरीं आले. जरीपटका पांडोजी कुंजर व श्री।। रा।। आपासाहेब याजकडे तिकडे सरकारांतून पाठविलें. होळकर पंचवटीस आहेत. पठाण पिंपळवाडीस आला. त्यानें नारायणगड

घेतला. तेथें गुळें बहुत होतें. झाडून लुटलें. किल्ल्यावर रायोपंत गडबोले होते ते त्याचे हस्तगत जाहले. खेडें भीमातीरी आहे तेथें पठाणाचे लोक आले. त्याणें नाश बहुत करून ब्राह्मण एक व बायको एक मृत्यु पावली. निघोज येथील किरकोळी लुटलें, चाकण किल्ल्यानजीक आहे. दोन रोज किल्ल्यावरून मारगिरी होत होती. सामान आंतील सरलें. मग येथून गेलें तें पलीकडे गेलें. रा॥ धोंडोपंत पागे रावसाहेबाकडून पुण्यास येत होते. त्यास निघोज येथें लुटून मृत्यु पावले. शंभर घोडें गेलें. अन्याबा राहतेकर हुजूरपागे याजकडे किल्ला हडसर आहे त्याजवर चक्रदेव व शिराळेकर आहेत सबब किल्लेचे बंदोबस्तास येथून पंचवीस स्वार घेऊन जात होते ते जुनराअलीकडे लुटले गेले. ओळख याची पुरती न पडली. सबब राहतेकर एक वस्त्रांनिशीं बुधवारीं रात्रीस आले. घोडीं वगैरे गेलीं. खडकीचे पुलापर्यंत लोक लुटले गेले. सरकारचे जवाहीर जामदारखाना सिंहगडास गेला. शहरासभोंवत्या नाक्यानाक्यांनीं तोफा ठेविल्या. नाकेबंदीही जाहली. मग मोकळे रस्ते तीन रोज केले. पुणें फुटलें. ज्याला जिकडे मार्ग फुटतो तिकडे जातात. तट्टू व डोल्या मिळत नाहींत. कोसास रुपया १ भाडें मागतात परंतु मिळत नाहीं. चारी रस्ते पेठा बाहेर जात आहे. शहर अवघें गडबडलें. रा॥ धोंडोपंत गडबोले तिकडे जात होते. शिरोळ्यास गेले ते आजच माघारे आले. शिंदेकडील जमाव तीन पलटणें, दहा हजार जमाव शिकरापुरावर आला तोही पुण्यास आणविला आहे. येथील लहानमोठे बाहेर निघाले पण धीर कोणास नाहीं. कळावें, सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६४४१ श्रीगणपतिर्जयति. (आश्विन शु० ५—२ आक्टो.)

पै. छ. ६ जमादिलाखर. तीन प्रहर. सलास मयातैन.

विज्ञापना. ता. छ. ४ जमादिलाखर वर्तमान क्षेम असो. विशेष. इकडील वर्तमान तर श्रीमंताची स्वारी श्री भागिरथीचे स्नानास महाबळेश्वरास जाण्याचा बेत आहे. अलीबहादर छ. २३ र०खरीं हिंदुस्तानांत मृत्यु पावले. म्हणोन सरकारांत लिहिलें आलें. त्याजवरोन नगारखाना बंद जाहला

होता. रामचंद्र बल्लाळ बुंदेले सागरकर सुभेदार निवर्तले. दोनी वर्तमानें सरकारांत येक वेळेंच आलीं. अलीबहादर याचे संस्थानाच्या व फौजेच्या बंदोबस्तास सरकारांतून रा. रामचंद्र निळकंठ पागे यांस खर्चास देऊन रवानगी जाली ते शंभर स्वारांनिशीं निघोन बाघोलीस गेले. होळकरांकडील कांहीं पठाण वगैरे सिन्नरास आल्याची बातमी आहे. शिंदे यांजकडील वक्षी फौज व पलटणेंसुद्धां कालाबाद मांडवगणास आल्याची बातमी होती परंतु ते अद्याप पुढें आले नाहींत. त्यांजवर होळकर यांची फौज कांहीं आडवी जाहली अशी वदंता आहे. शमशेरबहादर याचीही रवानगी (बुंदेलखंडांत) होणार. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६४४२ श्रीगणपतिर्जयति. (आश्विन शु० ९–५ आक्टो.)

पै॥ छ. ९ जमादिलाखर. सन सल्लास मय्यातैन.

विज्ञापना. ता॥ छ० ७ जमादिलाखर वर्तमान क्षेमरूप असे. विशेष. इकडील वर्तमान तरी, मान्याकडील कांहीं फौज आकळूज म्हसवड इकडे गेली होती. खुद माने व पलटणें गोपाळपुरावर होतीं. तेथून कूच आकळूजेकडे जाऊन पहिली गेलेली फौज हे एकत्र होऊन बारामती फलटण येथें नीरातीरीं शिराटीच्या मुक्कामास गेल्याची बातमी आतांच आली. वडिलांस कळावें सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६४४३ श्रीगणेश. ( ८ आक्टो. )

विठलस्वामी

पै॥ छ० १५ जा॥. खर सन सलास मय्यातैन.

श्रीमंत महाराज राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसी.

आज्ञाधारक आनंदराव शामराव ताटे कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना ऐसीजे. ता. आश्विन शु॥. १२ पर्यंत स्वामीचे कृपाअवलोकनेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित. निरंतर स्वामीकडील आनंद

---

१ अलीबहादराचा मुलगा. २ पत्र चिंता. सांगलीकर यांचें पुण्याहून मिरजेस. ३ पत्र पंढरपुराहून मिरजेस.

वर्तमान आगमन इच्छा श्रीचे चरणारविंदीं प्रार्थना करून आसों. यानंतर येथें सैन्य यावयापूर्वी भीमा पैलतीरीं बहुत स्थळें नागवून देश उद्दस केल्यावरून क्षेत्रीं सर्वांस भय मोठें होतें. राजश्री फत्तेसिंग मान्यांसी पत्रें लिहिलीं. त्यानीं वारंवार अभय उत्तरें लिहिलीं. परंतु कोणास भरवसा न वाटे. आणि कितेकांनीं प्रयाण करून गेले. देवापाशीं वेदशास्त्रसंपन्न रा. बावा व विठल पाध्ये यांनीं देवळांत ब्राह्मण अनुष्ठानास आणि इतर जन भजनघोष रात्रंदिवस नामघोष, टाळघोळ, नानावाद्यें, दिंडी, पताका, क्षेत्रप्रदक्षणा उछाह करून होते. श्रीस्वामीभक्ताभिमानीचा भरवसा मात्र होता. लष्कर क्षेत्रप्रदेशीं आलें तेव्हां माने यांनीं ताकीद कोणास उपद्रव न व्हावा, मोठी कैद, मलेंछलोक बहुत होते. परंतु, मर्यादा उलंघन न करून होते. माने यांनीं श्रीस्वामीस एक गज व एक घोडा पूजा संतर्पण करून गेले. सारांश श्रीस्वामीचें कवतुक. क्षेत्रसंरक्षण जाहले. श्रुत होय. बहुत वर्तमान विस्तारांचें थोडें करून लिहिलें. सरकारचे वाड्यामधें राहिले होते. मर्यादा राखून वागले. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

---

नं. ६४४४ श्री. (८ आक्टो.)

पै॥ छ० १५ जमादिलाखर सन सलास मयातैन.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ आश्विन शु॥ १२ पावेतों बाळकाचें वर्तमान क्षेम असे. शिंद्याकडील फौज दहा हजार व एक कंपू म्हणजे पलटणें सात आठ चाळीस तोफा ऐशा आल्या. सरकार आज्ञेवरून नारायणगांवीं जाऊन उतरले. शामतखान पठाण दहा हजार जमाव होता. त्याणें तीन टोळ्या केल्या. एक रोज गोळागोळी जाहली. शिंद्याकडील जमावानें तीन कोश मागें सारिला. नंतर त्यानें मागें फिरोन दुसरी टोळी पठाणांची आली. असें मिळोन शिंदेकडील जमाव तीन कोश मागें आणिला. हातलढाई जाहली. शामतखानास गोळी हातास लागली. जखम हलकी आहे. नंतर शिंदेकडील पलटणें तळावर होतीं तीं मिळोन मागती उभयतां पठाणांस पळविलें. तीन कोसांवर वालेखिंड आहे त्यापलीकडे घातलें. अलीकडे

आपण राहिले. दोहींकडील मिळोन जमाव हजारपर्यंत जायां मृत्यु पावलें. आज बातमी रा॥ दिनकरपंत नानाकडे चिटणिसीचे पत्राकरितां गेलों तेथें बोलले कीं, तीन तोफा व एक निशाण बालेखिंडींत पठाणांचें होतें तें आणिलें. शिंदेकडील जमाव खिंड चढोन पलीकडे गेले. पठाण मार्गें मुळानदी म्हणजे बेतुरचा प्रवरेचा सुमार यासुमारें गेले. याजप्रमाणें रात्रीस डांकेची पत्रें आलीं असें बोलले. होळकर श्रीनासिकाहून पुढें सिन्नर अलीकडे आले. वीस हजार जमाव आहे. पठाणही त्यासुमारें जाणार. एकत्र होऊन मग शिंदेकडील जमावावर येणार. माने पंढरपुराअलीकडे आले. श्रीमंत राजश्री आपासाहेब मंगळवेढ्यास गेले. जरीपटका व पांडोजी कुंजर मोरेश्वरापलकिडे बारा चौदा कोश आहेत. त्यासुमारें माने येणार असे बोलतात. रा॥ धोंडोपंत गडबोले करनाटकांत रवाना जाहले. पांच तोफा, दोन पलटणें व हजार स्वार शिगोळपर्यंत गेले. मागती इकडील गलबलीमुळें माघारें आणविले. ते व कातेर व बिंचुरकर व पठाण सरकारांत ठेविला आहे त्याचेपैकीं पाचशें व चांफेकर बक्षी यास आज्ञा शिंद्याकडे लोकांत जाणें जाहली. ते कोणी खडकीवर, कोणी निघोन पांच सात आठ कोशांसुमारें आहेत. खर्चावांचून चाल पुढें घेत नाहींत. कोकणांत शामल दंगा करितो असें आहे. मोत्यांचे शिंपले पाठविणेविसीं दोन चार वेळां लिहिलें. त्यास दोन शिंपले घेऊन ठेविले. दंगा भारी जाहला. तो रा॥ दिनकरपंत नानाकडील सांडणीस्वार पत्रें घेऊन यजमानाकडील आला त्याजबरोबर शिंपले वडिलांस पत्रें लिहून देऊन त्यांजकडे पाठविले. वाडिलांकडे पाठवावयास आज्ञा करावी अशी यजमानास विनंती लिहून पाठविली आहे. शिंपले दोन दर १ प्रमाणें रुपये २ दोहोंचे पाठविले आहेत. कळावें बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६४४५ श्री. (८आवटे.)

पै॥ छ. १५ जमादिलाखर मुरु सन सलास मयातेन व आलफ.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी. त्रिकाल चरणांवर मस्तक ठेवून शिर-

साष्टांग नमस्कार. विज्ञापना ता॥ आश्विन शु॥ १२ पावेतों बालकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील मजकूर तर होळकर याजकडील पठाणाच्या दोन टोळ्या पुढें नारायणगांव ओतूरच्या सुमारें आल्या. प्रांतांत पठाणांनीं रोखे करून गांवच्या खंडण्या केल्या. खेडगांव भीमातीरीं आहे त्या गांवीं गांवकरांनीं आगळीक स्वारांशीं केली, त्याजवरून गांवची खराबी बहुत केली. ब्राह्मणांस मारामार बहुत केली. बायकांस मारलें एक स्त्री व एक ब्राह्मण मृत्य पावला. चाकण सुम्यानजीक आले. किल्ल्यावरील तोफा सुरू जाहल्या. दारूगोळा सामान सरलें. नंतर सरकारांतून सामान पाठविलें. नंतर किल्ल्याचा बचाव जाहला. निघोज झाडलें. मोसी, चिखलीपर्यंत स्वार आले. राजश्री अत्याबा राहतेकर हुजूरपागे याजकडे किल्ला इडरूर जुन्नरापलीकडे दहा कोशांवर आहे तो त्याजकडे आहे. त्याजवर बंदिवान चक्रदेव व शिराळेकर वगैरे आहेत त्याचे बंदोबस्तास राहतेकर पंचवीस स्वार घेऊन जात होते. मार्गीं लुटले गेले. घोडीं गेलीं, एका वस्त्रानिशीं मात्र ते किल्ल्यास गेले. रावसाहेबाकडून घोंडोपंत पागे वीस स्वारांनिशीं येत होते ते मार्गीं लुटून त्यास जिवें मारिलें. नारायणगड दोन रोज लढोन त्यांणीं घेतला. लहान किल्ला होता. पाऊणशें माणसें वरतीं होतीं. घेतला त्या किल्ल्यावर राघोपंत गडबोले होते ते तिकडे गेले. कोणी म्हणतात कीं, गर्दीमध्यें मृत्य पावले. परंतु किल्ल्यावरून मुक्त जाहले. पठाणाकडील लोकांनीं मोठी धूम केली. खडकीचे पुलापर्यंत लूट जाहली व गणेश खिंडपर्यंत लूट जाहली तेव्हां शहर गडबडलें. दोन रोज नाकेबंदी तोफा समेत बंदी केली. सरकारचा जवाहीरखाना व जामदारखाना ऐसा सिंहगडास गेला. सरकारच्या डाका महाडाकडे बसली व एक पुरंधराकडे बसली. नाकेबंदी जाहली. नंतर कुंजर वगैरे यांणीं विनंती करून बंदी मोकळी केली. चिट्ठी घेऊन जातात. पांच सहा रोज लोक मार्ग कल्याण, महाड, वांईकडे वाहतात. कावडीस रुपये एक मागतात, परंतु तट्टू मिळत नाहीं. डोलीस पंचेचाळीस रुपये. मिरजेचा जोड मागोन गडी समय पाहून आणितों म्हणतात. असे गडबड जाहली. तीन रस्ते हमरस्तां लोक जातात.

मातुश्री व मुलें येथें आहेत. तट्टू मिळत नाहीं. माझे पोटांतील निम्में बरें जाहलें. चिरंजीव राजश्री बिठोबा मजपाशीं होता. तो श्रावणमासीं घरीं त्याचे तीर्थरूपाचा काल जाहला सबब घरीं गेला. जवळ कोणी नाहीं. मोठे संकटांत पडलों आहों. पौर्णिमेसुमारें तट्टू मिळालें म्हणजे सगळीं माणसें घरीं लावणार. लोकांनीं धीर सोडला. याजप्रमाणें जाहलें. वडिलांस कळावें बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६४४६ श्री. (आश्विन शु.१२ – ८आक्टो.)

पै॥ छ० १० जमादिलाखर मुरु सन सलास मयातेन व आलफ.

सेवेशीं साष्टांग नमस्कार विज्ञापना. गंगातीरचे वर्तमान तरी रा॥ यशवंतराव होळकर नाशकांतच आहेत. पुण्याच्या रोखास सात आठ हजार पाठविले आहेत ते मांबड्याच्या घाटाखालीं मुक्काम करून जुन्नर प्रांतांत व खेडकडूस वगैरे जिल्ह्यांत रोखे केले आहेत. त्या दहशतीमुळें तमाम जुन्नर व खेड प्रांत पळोन पुण्यास येत आहे व होळकर खासा दसरा करून पुण्यास येणार म्हणोन श्रीमंतांनीं रायगडास जाण्यास स्वारी तयार करून स्वार व गारद यांची डांक बसवून शु॥ १ कुटुंबमु॥ येशवदाबाईस घेऊन जावें म्हणोन तयारी केली. ज्याहेरीत कीं, श्रीमहाबळेश्वरास स्वारी जाणार त्यांस शिंद्यांकडील वकील व कुंजर यांणीं विनंति केली जे, खासा स्वारी गेली असतां, चहूंकडे आखबारांत लिहिली जाईल जे, होळकराच्या दहशतीमुळें स्वारी किल्ल्यास गेली. याजमुळें बदलौकिक होईल व देशवदाबाईचें निघणें कठिण असे कित्येक अंदेश करोन स्वारी महकूब करोन डांक उठविली. नगरास शिंद्यांकडील फौज व पलटणा आल्या आहेत; यांस जलद पुण्यास येण्याविशीं सरकारांतून दाजीबा देशमुख व निंबाजी भास्कर याचे पुत्र असे शु॥ १ असे पाठविले आहेत. त्यांस शिंद्यांकडील फौजेस व पलटणांस खर्चास पंधरा लाख रुपये द्यावे लागतात. यांस ऐवज शहरावर पट्टी करोन ऐवज सरंजाम पट्टीचा वगैरे वसूल करून देणार. याज-करितां चार रोज शहरच्या नाकेबंद्या करून बंदी केली होती व येशवंतराव यांची फौज नजीक आली आहे. याजमुळें शहर गडबडून लहान मोठे गृहस्थ

वगैरे शहरांतील तमाम निघून जात आहे. सरकार चि॥ अलीबहादर हे श्रावण व॥ ११ हक्क जाहले. व बाळाजी गोविंद बुंदेले सुभा प्रांत सागर हे पूर्वीच मृत्य पावले आहेत. त्याचे पुत्र गोविंदराव होते ते भा॥ शु॥ १ मृत्य पावले. अलीबहादर याचे फौजेचे वगैरे प्रांतांचे बंदोबस्तास सरकारांतून रा॥ निळकंठराव रामचंद्र प्रभू फागे यांस रोख रुपये अठरा हजार खर्चास देऊन व लाख रुपयेची बरात बुंदेले यांजवर देऊन दोनशें स्वारांनिशीं सरकारांतून महारानिल्हेची रवानगी केली ते भाद्रपद व॥ १२ कूच करून बागुलीस गेले आहेत. बुंदेल्याच्या संस्थानच्या बंदोबस्ताविशीं येथें जे कोणी पाठवावयाची योजना होत आहे त्यांस प्राचीन गृहस्थांपैकीं कोणी राहिला नाहीं. नवीन मंडळीपैकीं गृहस्थ व हुजरे मंडळी आहे. त्यापैकीं कोणाची रवानगी होईल तें पहावें. फत्तेसिंग माने पंढरपुरास आहेत त्याचे पारपत्यास नाना पुरंधरे व कुंजर वगैरे लहानमोठे सरदार व तोफखाना, सरासरी दहा हजार फौज व राजश्री चिंतामणराव आपा यांची रवानगी केली आहे. त्यास कुल सरकारचे सरदार फौजमुद्दा बारामतीनजीक निरा उत्तरतीरास सोय पाहून मुक्काम करून आहेत. होळकराकडील पठाण घाटाखालीं आले आहेत. त्यांचे पारपत्यास रा॥ बाबा पुरंधरे व पुण्यांतील बाकीचे फौज व गारदही बरोबर देऊन तुळापूरचे रोखें पाठवावें म्हणोन बेत ठरून लोकांस ताकिदी जाहल्या आहेत. रा॥ धोंडो गोविंद गोडबोले हे सरंजाममुद्दां कर्नाटकच्या बंदोबस्तास गेले आहेत. श्री॥ रा॥ रामचंद्रपंत आपा यांस सरकारांतून बरोबर पत्रें जातात कीं, फौज जमाव करून रास्त्याचें पारपत्य करून रास्त्याच्या मुलखाचा बंदोबस्त करणें. शिंदे बहादर दसऱ्याच्या मुहूर्तें डेरेदाखल होऊन पुण्यास येणार अशी वदंता आहे. नबाब निजामअली यांचे कारभारी रा॥ रघोत्तमराव पांच हजार फौजेनिशीं हैदराबादेहून निघोन गंगातीरीं खेडास आले आहेत. याप्रों इकडील वर्तमान आहे. पुढें होईल तें सेवेशीं लिहूं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६४४७. श्री (आश्विन शु॥ १५–११ ऑक्टो.)

पै॥ छ॥ १३ ज. खर तास रात्र इंदुवार सलास मय्या तैन.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसीं.

विनंति× सेवक बाळाजी महादेव दामले चरणांवर मस्तक ठेवून शिरसा॥ नमस्कार विज्ञापना. ता॥ छा॥ १३ ज. खर. पर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. मौजे दहिगांव येथील निंबाळकर यांचे घरीं श्रीमंत माहाराज यांची कन्या दिली आहे. त्या गांवाबर फत्तेसिंग माने याचा रोखा होऊन दंगा जाल्यामुळें गांव परागंदा जाहाला, तेव्हां निंबाळकर याचा कारकून माने यांणीं धरून नेला. याजमुळें श्रीमंत बाईसाहेब सातान्यास येऊन महाराजाजवळ फार अनर्थ करून माने याचा गांव रहिमतपूर आहे तेथील बंद धरून आणावा याप्रों. अनर्थ केल्यामुळें स्वारी पाठवणेविशीं महाराजांची आज्ञा जाहाली. त्याजवरून रा. बाळाजी माणकेश्वर किल्ल्यावरील कारभारी यांणीं स्वारी, स्वार व पायदळ मिळोन चारशें पाठविलें. हें वर्तमान येथें समजलें नसतां काल अकस्मात् चार घटका दिवसास स्वारी आली; तेव्हां कोणाची स्वारी, काय, म्हणोन समस्त गांवकरी दोन चारशें मिळोन उभे राहिले. तेव्हां स्वारीवाले यांणीं सांगितलें कीं, आम्हीं कांहीं कामाबद्दल पुढें जाणार; घांसदाणा देणें. त्याजवरून सवाशें रुपये खंड करून तजविजस लागले तों पांच असामी गांवकरी धरून नेऊं लागले. तेव्हां सवाशें रुपये घेऊन बोली सोडणें म्हणांन बीस पंचवीस असामी मागें लागले. तेव्हां स्वारीचे लोकांनीं तरवारा बोढून गोळ्या मारूं लागले. तेव्हां लढाई जाहली. त्यांत हिकडील ग्रामस्तांपैकीं दोन असामी ठार व अकरा असामी जखमी जाहले. बोली सातारकर घेऊन गेले. याप्रमाणें दंगा पडल्यामुळें वाणी उदमीमुद्धां परागंदा जाहाले. पेरणीचे दिवस. पेरेही राहिले. गांव उजाड जाहाला. फत्तेसिंग माने यांणीं देशी दंगा केल्यामुळें रहिमतपूरचा बंद धरून नेतात, तेव्हां गांवची वस्ती कशी राहील? बस्ती राहात नाहीं. झाडून माने, फत्तेसिंग माने दांजपाशीं चाकरीस आहेत, या दहशतीनें मानेही परागंदा जाहाले, गांव पडला. पर्जन्यही अगदीं नाहीं. माने याचे कुसुरामुळें वस्ती राहात नाहीं. स्वारी आली ती आम्हांस धरून न्यावयाकरितां आली होती. याचें कारण, श्रीमंत

× पत्र रहिमतपुराहून मिरजेस.

राजश्री चिंतामणराव आपासाहेब यांचे कारकून यांस धरून आणावें या उद्देशें स्वारी आली; परंतु, स्वामीचे पुण्यप्रतापें बचाव जाहाला. येथें शिबंदी नाहीं; दंगे या प्रकारचे; तेव्हां बचाव कसा होतो? शें पन्नास लोक असल्यावांचून परिणाम लागत नाहीं. गांवचीं वस्ती राहून माझा परिणाम लागत नाहीं, फत्तेसिंग माने याचा मुक्काम श्रीशंभूमाहादेवानजीक मौजें कुरंवब येथें आहे. सरकारचें फौजेची व माने याची येक लढाई जाहाली. सरकारच्या फौजा बारामतीवर आहेत. श्रीमंतांची स्वारी श्रीकृष्णास्नानास आली नाहीं. पुण्यांतच आहेत. किल्ले सातारा येथें बाळाजी माणकेश्वर कारभारी आहेत. त्यास गांवास माने याजमुळें उपद्रव होऊं नये या विचाराचें पत्र दिल्हें पाहिजे. येथून पत्र पाठवितों याचें उत्तर लवकर येत नाहीं. याजकरितां पत्राचें उत्तर लवकर यावयाविशींची आज्ञा जाहाली पाहिजे. सेवेसी विदित होय हे विज्ञाप्ति. फत्तेसिंग माने याचे व जरी पटक्याचे लष्करांतून आतांच लढाईचें वर्तमान आलें. लढाई होऊन मालोजी राजे घोरपडे ठार जाहाले. मोड होऊन जरीपटक्याची फौज झाडून लुटली. पळ लष्करांतील आला. कळावें. हे विज्ञाप्ति.

---

नं० ६४४८ श्री. (आश्विन व १ – १२ आक्टो.)

पै॥ छ. १९ जमादिलाखर सलास मयातेन.

अपत्यें बाबजीनें शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता॥ छ. १४ जमादिलाखर मंगळवार अस्तमानपावेतों सुखरूप असो विशेष. वडिलीं छ० १० जमादिलाखरचें पत्र पाठविलें तें आजच दोनप्रहरीं पावलें. तुजकडून पत्र येऊन तिकडील वृत्त कळत नाहीं व येथून पत्र पाठविलें होतें तें पावलेंच असेल म्हणोन आज्ञा. ऐशास श्रावणमासीं वडिलांकडून पत्र आलें होतें तें पावलें. त्याउपरीकडे आशीर्वादपत्र आलें नव्हतें तें आज आलें. इकडील वर्तमान छ० १० जमादिलाखरीं रा॥ नाना पुरंधरे माने यांची लढाई दोनप्रहरीं जाहली. पुरंधर गोट सोडून चार कोस पुढें पळून गेले. माने यानीं सांगून पाठविलें, आम्ही जेजुरीस दर्शनास जातों.

इ. सं. ऐ. १०.

सरकारचे फौजेशीं अवज्ञा करावयाची नाहीं. तें इकडील सरदारांचें चित्तास न येतां तोफांची सुरुवात केली. पन्नास गोळे उडत तावत्कालपावेतों माने यांनी आगळीक केली नाहीं. नंतर चालून घेतलें. दोन घटका लढाई जाहली. झडून तोफा नेल्या. रा॥ गणपतराव पानसे यासी जखमा लागल्या. खासा पुरंधरे जरीपटका युक्तीनें घेऊन सासवडच्या मुमारें आले. पांडोजी कुंजर प्रथमच निघाले होते ते दोन दिसांनीं येऊन पुरंधरे यास मिळाले. मालोजी घोरपडे यास जखमा लागोन जेर आहेत. पाडाव गेले. बरकड कोणास जखमा लागल्या व कांहीं ठार जाहले. बुणगें कांहीं गेलें बाकी राहिलें. माने याचा मुक्काम बारामतीनजीक आहे. तेथील संस्थानांत बाकी ठेविली नाहीं. रा॥ यशवंतराव होळकर याचा मुक्काम पारनेरानजीक आहे. नगरच्या आश्रयास जावें असेंही आहे व सरकारचें बोलावणें पुण्यास यावें म्हणोन गेलें आहे. इकडे मान्ये यांत जसा डौल पडेल आणि निभावणीचा प्रकार दिसेल तसा करतील. सरकारचे डेरे गारपिरावर छ० ११ जमादिलाखरीं मंदवारीं सायंकाळीचे जाहले. डेऱ्यास मुख्यत्वें पेठे गेले आहेत व हल्लीं रा॥ चिंतोपंत देशमुख यास डेऱ्यास जाणें म्हणोन आज्ञा जाहली. त्याजवरून काल सोमवारीं दोनप्रहरीं निघोन गेले. त्याजकडे फडणिसी व बक्षीगिरीचें काम सांगितलें आहे. तमाम फौजा जमा होत आहेत व रा॥ यशवंतराव पानसी राजकमागमें तोफा देऊन त्याचीही तयारी होत आहे. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६४४९. श्रीगणपतिर्जयति. [आश्विन व॥ १–१२ आक्टो.]
छ. १६ जमादिलाखर सन्न सल्लास मय्या तैन. व॥ ४ गुरुवार.

अपत्यें चिंतामणीनें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ. १४ जमादिलाखरपर्यंत वर्तमान क्षेम असे. विशेष. कलढोणचे मुक्कामाहून पुरंधरे व पानसी यांस पत्रें देऊन जासूद पाठविले होते ते आज भौमवारीं दोनप्रहरीं आले. त्यांचें सांगणेंत पुरंधरे पानसे व कुंजर यांची व माने याची लढाई भृगुवारीं प्रातःकाळच्या प्रहर दिवसास बारामतीनजीक मेंडवेजवळ जाहाली. मान्याकडील फौज व पलटणांनीं चालोन घेतलें

तेव्हां पुरंधरे यांनीं जरीपटका आपल्याजवळ घेऊन उभे होते, त्यांचें ठिकाण नाहीं. राजश्री मालोजी राजे पुढें चालोन गेले त्यास दोन तीन जखमा लागोन सांपडले. बारामतीकर लष्करांत आले होते तेहि धरले गेले. सरकारची फौज चहूंकडे उधळून गेली. बुणगे माने याणीं लुटून तेथेंच मुक्काम केला. चार तोफा व हत्ती माने यांनीं नेलें. ज्याचे घोडें चांगलें ते निभावले. बरकंड सांपडले. पुरंधरे जरीपटका घेऊन माघारे गेले असें म्हणतात. याप्रमाणें आल्या जासुदांनीं जबानीं सांगितलें तें सेवेसीं लिहिलें आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६४५० श्री. ( १३ आक्टो. )

मो॥. छ० १९ जमादिलाखर रविवार सल्लासमयातैन.

सेवेसीं धोंडो बापूजी जोशी त्रिकाल चरणावरी मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत आश्विन वद्य २ पावेतों बाळकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. पुण्यांत गडबडीची बाकी राहिली नाहीं! मातबर झाडून गेले. गोरगरीबें धडक चाललीं आहेत. उदमी कापड-करी कोठें जातात? बैलतट्टूं माणसें मनश्वी पैका मागोन मिळत नाहीं असी गत आहे. श्रीहरी लाज राखणार आहे. श्रीमंत राजश्री चिंतामणराव आबासाहेब याजला तट्टाविसी माणसें खालीं पाठवणार, तट्टें पाठवावीं सेविसीं विस्तारें लिहून पाठविलें. त्याजवरून तट्ट एक लष्करांतून पाठविलें. समयास येऊन पावलें. तीन तट्टूं भाड्याचें केलें. उदईक माणसें खालीं पाठवणार. मातुश्री ताई व मी व विठलपंत असे मात्र राहिलों आहे. दरागी लहानसरशी मिळवून आणून ठेविली आहे. वाड्यांतील भांडीं भूमिगत केलीं. इकडे गडबड, देणेंकरी यांनीं इलाज ठेविला नाहीं असें वडिलांस लिहून पेशजीं पाठविलें होतें. परंतु येथें गडबड भारी जाणोन निरुपाय समजोन वे॥ राजश्री मोरभट वझे हरीपूरकर याजपासून शंभर रुपये घेऊन जबाबी हुंडी वडिलांवर केली होती. हल्लीं वडिलीं सांडणी स्वार याजबरोबर दोनशें रुपये पाठविले त्याची पावती आलाहिदा पत्रीं आहे. त्यास भटजीची हुंडी आजपर्यंत येऊन पावली असेल.

त्यास ऐवज देवावा. हुंडी परत आल्यास हल्लीं गडबडीमुळें रुपये येथें मिळणार नाहीं. यास्तव वाडिलांस विनंती लिहिली आहे. राजश्री जनार्दन शिवाजी म्हैसकर मोकळे जाले. चार रोज जाले. म्हैसकर पुण्यांत तुळसी बागांत * * आहेत त्याचे घरीं आहेत. कळावें. दोन वेळां भेटले होते. वडिलांस कळावें. बहुत काय लिहिणें. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं६४५१ श्री. (१४ आक्टो.)

पै।। छ० १९ जमादिलाखर सन सलास मयातेन.

सेवेशीं धोंडो बापू जोशी साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता।। आश्विन व।। ३ पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. रा।। गोपाळपंत करमरकर याकडे जेजोरीची जती व श्रीचे डवीचा कारभार आहे त्यास भेटले होते. त्यांणीं सांगितलें जे, श्रीचा भंडारा व खोबरें व प्रसाद असे घेऊन सर्वत्र सेवाधारी व गांवकरी मिळोन मान्याकडे आले होते. त्यांस प्रसाद देऊन सांगितलें जे, क्षेत्राकडे आपले लष्करचा उपद्रव लागों न द्यावा. त्यांणीं सांगितलें जे, गांवाकडे किमपि उपद्रव लागों देत नाहीं, तुम्ही बेफिकिर रहाणें. आम्ही मात्र कडे चारपांचशेहे स्वारांनिशी येऊन श्रीचें दर्शन घेऊन सवेंच माघारें जाऊं म्हणोन त्यास सांगितलें म्हणोन महाराजानिल्हेंनीं मजपाशीं बोलिले. पेशजीं वाडिलांचे पत्रीं मान्या श्रीस येऊन गेले असें बाजारीं ऐकोन लिहिलें होतें. परंतु तें मिथ्य. हल्लीं महाराजनिल्हेंनीं सांगितलेवरून मुद्दाम लिहिलें आहे. श्रीचें दर्शन एक दोन दिवशीं घेऊन होळकराकडे मिळावयास जाणार आहेत. सर्वत्र मिळोन शिंद्यांचे फौजेवर जातील कां बाईकडेच येतील काय करतील न कळे. श्रीमंतांनीं कोंकणांत महाडाकडे एक डांक ठेविली व एक पुरंधराकडे बसविली आहे. प्रसंग पाहून कोणता विचार घडतो पहावें. श्री।। रा।। चिंतामणराव आपासाहेब फौजमु।। भिरजेकडे गेले असे येथें काणे यांणीं बातमी समजाविली होती; परंतु हल्लीं यजमानांनीं मला खरसोंडीच्या मुक्कामचें पत्र छ० ८ जमादिलाखरचें पाठविलें होतें. त्यास तेंच पत्र रा।। दिनकरपंत यास दाख-

विलें आणि यजमान मिरजेकडे व मंगळवेढ्याकडेही गेले नाहीं म्हणून श्रीमंताची खातरजमा करणेविसीं मशारनिल्हेस सांगितलें. यांणींही विनंति केली, तेव्हां नानापाशीं आज्ञा केली कीं, त्यांस पत्र लिहून सासवडचे सुमारें जरीपटक्याचे आसपास दों चौकोसीं मुक्काम करून राहणें म्हणोन लिहिण्याविसीं सांगितलें. त्यावरून त्यांणीं व मींही लिहिलें आहे. पत्र पावलेवर यजमान तिकडे येतील. वेदमूर्ति रा॥ शांभटबाबा यांजला पत्र पावतें करून त्यांणीं पत्र लखोटा करून दिल्हा तो पाठविला आहे. रा॥ बाबाजीपंत पटवर्धन यांजला पत्र पावतें केलें. श्री॥ रा॥ त्रिंबकराव आपा याजला पत्र लिहून लाखोटा पाठवावा. व रा॥ बळवंतरावजीस पत्र लिहून लाखोटा करून पाठविला आहे. त्यास दोन्ही लाखोटे कुरुंदवाडास पावते करण्याची आज्ञा करावी. त्यांचा येथें वाड्यांत आटाळा आहे घेऊन जाण्याविसीं पत्रें लिहून त्यास पाठविलीं आहेत. मोत्यांचे शिंपले दोन श्री॥ रा॥ आपासाहेबांकडे पाठविल्याचा मजकूर पेशजीं पत्रीं लिहिला आहे. आजपर्यंत तिकडून शिंपलेही पावले असतील. होळकर व माने यांच्या भेटी गारदौंडिच्या सुमारें होणार असें बोलतात व नानाही बोलले. सरकारचीं पत्रें यजमानांस कवडीस येणेविसीं काल गेलीं व आज नानांचें पत्र दिल्हें तें आजुरा[1]केडून पाठविलें. वडिलांस कळावें बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६४५२. श्री. (आश्विन व॥ ४–१५ आक्टो.)

पै॥ छ. १८ जमादिलाखर सन सलास मय्या तैन व अलफ.

सेवेसीं बाबाजी विश्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ. १७ जमादिलाखर भृगुवार सायंकाळचा प्रहर दिवस पावेतों यथास्थित असे. विशेष. चि॥ राजश्री विठ्ठलपंत चापेकर याचा गडी पुण्याहून भौमवारीं प्रातःकाळचा प्रहर दिवसास निघाला तो आज दोनप्रहरीं आला. त्याचें तोंड जबानीचें वर्तमान येणेंप्रमाणें:—

श्रीमंत सौ॥ ताईसाहेब व सौ॥ सीताबाई व मातुश्री बाईसाहेब मंद-

---

१ आजूर, आजुरदार = हंगामी जामूद.

वारीं प्रातःकाळीं तोफेबरोबर निघोन सिंव्हगडास गेल्या. तेथें रविवारीं राहून इंदुवारीं निघोन महाडास गेल्या.

शिंदे याची फौज सिकरापुरानजीक आली होती त्याजवर खासा होळकर संगमनेरानजीक मुक्काम होता, तेथून दरकूच जाऊन गांठ घातली. शामतखान पठाण याणें चाकण लुटून तोहि होळकर यास मिळोन लढाई जाहली. शिंदे यांच्या फौजेचा मोड जाला. तोफा वगैरे होळकर याणीं आणल्या. हल्लीं होळकर याचा मुक्काम पारनेरनजीक जांबगांव येथें आहे.

श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब पुण्यासच आहेत. होळकर याचा कूच होऊन पुण्याचे रोखें एकदोन मजल आला म्हणजे खासा स्वारी निघोन महाडास जाणार याप्रमाणें बोलतात.

फत्तेसिंग माने याचा मुक्काम फौजसुद्धां बारामतीनजीक आहे.

पुरंधरे याची फौज शिकस्त जाली ती झाडून सासवडानजीक जमाव होत आहे. मालोजी घोरपडे ठार पडले असें वर्तमान होतें. परंतु जखमा लागोन जखमी पुण्यांत आणिले. जिवंत आहेत व गणपतराव पानसेहि जिवंत आहेत.

राजश्री धोंडोपंत गोडबोले याजबरोबर फौज व दोन पलटणें होतीं. त्यांचा मुक्काम शिरोळानजीक होता. ही लढाई जाहाल्यानंतर कूच करून पुण्यास गेला. हल्लीं कात्रजेवर मुक्काम आहे.

राजश्री बाळोजी कुंजर याचे चिरंजीव पांडुरंगराव कुंजर पुरंधरे याजबरोबर होते. त्याचा ठिकाण नाहीं. बाळोजीबावा श्रमी आहेत. शोधास लोक गेले आहेत. अद्यापपर्यंत शोध लागला नाहीं.

पुण्याचा घर तुटला यामुळें लोक गुळयास सातारा, वाई, निंमगांवें येथें बहुत जातात.

श्रीमंत राजश्री अमृतरावसाहेब अद्याप पुण्यास आले नाहींत. जुन्नराकडे आहेत.

लढाई जाली, त्यासमई जरीपटक्यासुद्धां हत्ती पाडाव नेला. तो मागाहून फत्तेसिंग माने याणीं जरीपटका चौदिवसीं पाठवून दिला. राजश्री पांडुरंग बापूराव बारामतीकर लढाईंत होते. त्यांचाहि ठिकाण नाहीं.

येणेप्रमाणें गड्यानें जबानीं वर्तमान सांगितलें तें शेवेसीं लिहिलें आहे. चि॥ राजश्री पांडोबानें वर्तमान कांहींच लिहिलें नव्हतें. मार्गी कागदपत्राची चौकशी होते, सबब लिहिलें नाहीं. करवीरकरांचा जमाव थोडासा नागठाणें येथें आहे. खराब लोक! पुढें कोणीकडेस जातात पाहावें. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६४५३ श्री. (आश्विन व० ४ –१५आक्टो.)

स्वामींनीं आज्ञापत्र छ० १९ रबिलाखरचें पाठविलें तें छ० २३ तार-खेस पावलें. रा. माधवराव अनंत रास्ते यांचे पुत्र रा. बळवंतराव माधव श्रावण बा. ६ बुधवारीं आवशींचे दाहा घटका रात्रीस येकटे निघोन पळून गेले. तुम्हांकडील तालुकियांत आले असल्यास हस्तगत करून हुजूर पाठ-वावें म्हणोन पत्रीं आज्ञा; ऐशियास आज्ञेप्रा॥ शोधांत होतों. त्यांस रास्ते छ० २७ र.खरीं होनवाडास आपले जमावांत जाऊन पोहोंचले म्हणोन ऐकिलें. स्वामीसही परभारें विदित जालेंच असेल. सुतर स्वार पत्र येथें देऊन रा. बापूजी गणेश गोखले यांजकडे गेला होता तो काल छ. १७ ज०खरीं येथें आला. हल्लीं सेवेसी आला आहे.

---

नं. ६४५४ श्री. (आश्विन व० ६ –१७आक्टो.)

पै॥ छ० १९ जमादिलाखर. सन सलास मयातेन.

विज्ञापना छ० ११ जमादिलाखरीं मंदवारीं श्रीमंत मातुश्री येशवदाबाई व श्री॥ सौ॥ ताईसाहेब व कैलासवासी नाना यांची स्त्री ऐशा चौघी बाय-कांची रवानगी महाडास जाहली. तेथून कोणीकडे रवानगी कसी होईल ती होऊं. समागमें रा॥ बाळाजी पंत पटवर्धन गेले आहेत. पोंचवावयास रा॥ गोविंदराव पराजपे व नारायणजी कुंजर, हजार स्वार व पायदळ याप्रा॥ गेलें आहे. पुण्यांतील झाडून लोकांचीं कुटुंबें जिकडे ज्याची सोय आहे तिकडे जात आहेत, बहुतकरून गेलीं याप्रा॥ वर्तमान आहे. वडिलांस जमाखिडीस पत्र लिहिलें आहे. तिकडे रवाना जाहलें पाहिजे. वडिलांकडून

---

१ राम. आपांनीं पेशव्यांस पत्र पाठविलें त्याचा हा मसुदा.

पत्र येईल तें लखोटा करून आलें असतां, माफजतीनें पावेल. सदैव आशीर्वादपत्र येऊन सांभाळ जाहला पाहिजे. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६४५५ श्री. ( आश्विन ब. ६।१७ आक्टो. )

पै॥ छ० १९ जमादिलाखर सन सलास मयातैन.

सेवेशीं साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे, येथील वर्तमान तरी आश्विन शु॥ १२ श्रीमंत मातुश्री यशोदाबाई व सौ॥ ताईसाहेब, आपासाहेब यांची स्त्री, व कैलासवासी नाना फडनवीस याची स्त्री याप्रमाणें रायगडास रात्रौ रवाना करून तेच दिवशीं डेरे बाहेर द्यावे हा बेत ठरून शु. १३ डेरे गारपिरावर देऊन रा॥ त्रिंबकराव पेठे डेऱ्यास दाखल जाहले. दुसरें वर्तमान शु॥ १२ माने यांचे फौजेची व पुरंधरे यांची लढाई बारामतीनजीक होऊन पुरंधरे व कुंजर वगैरे पानशे आदिकरून सरदार शिकस्त होऊन तोफ टाकून सासवडास आले. मान्यांच्या फौजेनें तोफ व बुनगे व तळावरील कुलसरंजाम नेऊन बारामतीनजीक मोरेश्वराजवळ मुक्काम करून आहेत. येविसींचा वृत्तांत मजकूर पेशजीं छ० १२ जमादिलाखरीं लिहून पाठविला आहे त्यावरून सविस्तर निवेदन जाहलेंच असेल रा॥ त्रिंबकराव पेठे यांस आश्विन व॥ १ जरीपटक्याचीं वस्त्रें होऊन कारभारी रा॥ चिंतोपंत देशमुख होऊन डेऱ्यास दाखल जाहले. राजश्री यशवंतराव होळकर माघारे घाटपार जाऊन पुन्हां दक्षिणेस जामगांवच्या रोखें पारनेरास दाखल होऊन तेथून कूच करून दक्षिणेस पिंपळगांवास येऊन पुढें जेजुरीस श्रींचे दर्शनास जाणार. होळकराचे पिच्छावर शिंद्याची फौज व पलटणें पांच कोशांचे तफावतीनें आहेत. बराणपुराहून पांच पलटणें व पांच हजार फौज दुसरी रवाना जाहली ती पैठणानजीक येऊन त्याजपैकीं तीन हजार फौज व दोन पलटणें नगरास येऊन दाखल जाहल्या. तेथून पुढील फौजेंत लौकरच येऊन दाखल होतील व पैठणावर आहेत तींही जलद येऊन सामील होणार. पूर्वी रा॥ सदाशिवपंत डगले होळकराकडे बोलण्यास रवाना केले होते त्यास होळकराचा रोख एक तऱ्हेचा पाहोन मशारनिल्हे लष्कराच्या रवेंतून होळकरास न पुसतां परभारा निघोन आले. नंतर येथें येऊन खलबत जाहलें जे,

होळकराकडील कलमें आहेत त्यांचा ठराव करून समेट करावा हा विचार ठरून राजश्री धाराजीपंत यांची रवानगी करावी हा बेत होऊन मशारनिल्हे लौकरच जाणार असें आहे. प्रत्ययास येईल तें खरें. कुंजर यांणीं आपलें कुटुंब वगैरे आसबाब दौलताबाद रवाना केलें. शहरांतील सावकार यास बोलावून ऐवज मागत आहेत. पुढें शहरावर पट्टी होईल असा मजकूर आहे. श्रीमंत रा॥ चिंतामणराव आपा माधर्णानजीक गेले आहेत म्हणोन मर्जी खफा होऊन देण्याविषीं जलद पत्रें गेलीं आहेत. त्यास आपासाहेब जरीपटक्या पासून निघोन गेले आणि मागें पुरंधरे जरीपटक्यासुद्धां शिकस्त होऊन परलोकिक जाला. त्यावरून मर्जी बहुत दिक होऊन आपासाहेब यांस हातचिठी लिहिली जे, तुम्ही लढाऊ मर्द मनुष्य म्हणोन तुम्हास जरीपटक्याबरोबर दिल्हे असतां तुम्ही निघोन गेलां आणि पाठीमागें अशी व्यवस्था जाहली. हें तुम्ही चांगलें केलें नाहीं म्हणोन हातचिठी गेली आहे. दिल्ली व उजनीकडील वर्तमान तूर्त आलें नाहीं. आल्यानंतर पाठवून देतों. पेशजीं छ० १२ जमादिलाखरचीं पत्रें श्रीमंत रा॥ चिंतामणराव आपा यांच्या जासुदाबरोबर पाठविलीं आहेत. तीं येऊन पोंचलींच असतील.

---

नं. ६४५६ श्रीगणपतिर्जयति. (आश्विन व० ६ –१७आक्टो.)

छ० १९ जमादिलाखर सन सल्लास मय्यातैन आश्विन.

विज्ञापना. माने यांनीं बारामतीस नाकेबंदी करून ब्राह्मण वगैरे सर्वांस कोंडले आहेत. चार लाख रुपये मागतात. सावकार वगैरे धरून मारामार करून जसा ऐवज निघेल तसा घेतात असें आहे. श्रीइच्छा प्रमाण ! प्रजेचा भोग बलवत्तर आहे ! सेवेसी विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६४५७ श्री. ( १८ आक्टो. )

पै॥ छ० २७ जमादिलाखर सन सल्लास.

सेवेसीं धोंडो बापूजी जोशी साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल

---

१ पत्र अपुरें सांपडलें. २ पत्र मंगळवेढ्याहून मिरजेस चिंता. सांगलीकर यांचें.

ता।। आश्विन वद्य ७ रोज इंदुवार पावेतों स्वामीचें कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. पेशजी हदार सारवान याबरोबर पत्र पाठविलें होतें तें पावोन सविस्तर विदित जालेंच असेल. त्यानंतर बाजारी वर्तमान ऐकीव–शिंद्याकडील सामान कोरेगांवावर आहे वगैरे. सरकारच्या फौजा कवडीपासून वानवडीपावेतों आहेत. होळकर खासा कुरकुंबावर आहे. व माने मोरेश्वरापाशीं आहेत म्हणोन वर्तमान ऐकतों. श्रीकृपेंकरून समेट होईल तेव्हां खरें. पुण्यांत घरें व ग्रहस्त पाहून पट्टी लाविली आहे. कोणांत त्राण द्यावयास राहिला नाहीं. कोणी कोणी तोंडें चुकाविलीं आहेत. काय होतें पहावें. पंचवीसपर्यंत गोरगरीब याजपासून घेणार अशी बोलवा आहे. तूर्त गृहस्थ घर पाहून व सावकारा पाहून पट्टी लागली आहे. पळणीची[1] बाकी राहिली नाहीं. माझी प्रकृत निमे पोटां-तील विकृत बरी आहे. कोठें जावें म्हणावें तरी वाडा व सर्व लटला टाकून कसें जावें ? त्यास वडिलांचे पुण्येंकरून कल्याण होईल. जासूद जोडी येक आल्यास सविस्तर लिहीन. खांबटकी व घरळीचा घाट रास्ते याणीं बद केला असे लोक बोलतात. पेंढार वरतें जाईल ऐसें ऐकतों. कळावें, बहुत काय लिहिणें सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

———

नं. ६४५८ श्री (आश्विन व० ७।१८ आक्टो.)

पै॰ छ० ३० जमादिलाखर तास रात्र रवानगी पुण्याहून छ० २० जमादिलाखर.

सेवेशीं साष्टांग नमस्कार. विज्ञापना. येथील वर्तमान तरी श्री।। रा।। चिंतामणराव आपा यांस श्रीमंतांनीं आज्ञा केली जे, तुम्ही हिमतीचे आहांत याजकरितां जरीपटक्याबरोबर फौजमुद्दां असावें म्हणोन आज्ञा केली. त्यास आपासाहेब जरीपटका टाकून बारामतीहून निघोन हरिपुरास गेले म्हणोन श्रीमंतांस वर्तमान कळलें. त्यावरून श्रीमंतांची मर्जी बहुत खप्प होऊन बोलले जे, शिंद्या–होळकराच्या फौजेची लढाई लागावी आणि राज्यास धक्का बसावा हा समय प्राप्त आणि जरीपटका टाकून चिंतामणराव गेले हें काय ? त्यास आम्ही कायम असलों तर करवीरकरांचे वगैरे

---

१ पळग = पळापळ.

सर्वांचे बंदोबस्त होतील अथवा राज्यासच धक्का बसल्यास मिरज वगैरे यास कोण पुसतो ? त्यास होळकरराचा बंदोबस्त थोडक्याच दिवसांत होऊन या समयास ज्यांणीं समदास घालविलें आहे त्यांचीं पारिपत्यें शिंद्याच्या पलटणांच्या हातून करावयास देतील. त्यास चिंतामणराव यांणीं पत्रदर्शनीं निघोन जरीपटक्याजवळ पुरंदरे यांजपाशीं येऊन दाखल व्हावें. याप्रमाणें दिनकरपंतास आज्ञा करून श्रीमंतांनीं हातचिठी देण्याविसीं पाठविली आहे. व दिनकरपंतांनींही बहुत बहुत प्रकारें श्रीमंतांच्या मर्जीचे व पुढील आंदेशे कितीक प्रकारचे आपासाहेबांस लिहून पाठविले आहेत. सारांश, आपासाहेबांनीं पत्रदर्शनीं निघून जरीपटक्याजवळ यावें म्हणोन आजच दोन पत्रें हातचिठ्यासुद्धां रवाना केलीं आहेत. त्यास सदरहू मजकुराचा दाखला स्वामीस आपासाहेबांकडून कळेल. दुसरें वर्तमान तरी, शिंदे होळकर यांच्या फौजेची लढाई आश्विन शु॥ ७ रविवारपासून रोज लढाई होत आहे. त्यास शिंद्याकडील नगराहून तीन हजार फौज व हजार आरब व हजार बैल रसद याप्रमाणें सरंजाम पलटणांत येऊन दाखल जाला. त्यावरून शिंद्याकडील फौजेस जोरा विशेष होऊन यशवंतरायाशीं लढाई देऊन यशवंतराव याचा बसल्या घोड्यास गोळा लागून ठार जाला. नंतर यशवंतराव पठाणसुद्धां शिंद्याच्या फौजेनें मागें हटवून गणपतीच्या ओझरापासून ब्राह्मणवड्याचा घाट पार करून देऊन घाटमाथा शिंद्याच्या फौजेचा व पलटणाचा मुक्काम होऊन यशवंतराव फौज व पठाणसुद्धां झोळांचेंदनपुरावर गेले. तेथून कोपरगांवास गंगातीरीं जाणार. याप्रमाणें वर्तमान सरकारांत लिहोन आलें. कळावें. तिसरें वर्तमान तरी फत्तेसिंग माने फौजासुद्धां पंढरपुराहून आले. ते बारामतीपलीकडे पूर्वेस पांच कोसांवर मुक्काम केला हें वर्तमान पुरंदरे वगैरे यांस समजलें. नंतर पुरंदरे व गणपतराव पानसे व कुंजर तोफखाना व फौजसुद्धां जरीपटका घेऊन मान्यावर चालून जाऊन तोफा मान्यावर सुरू केल्या. माने तयार होऊन यास सांगोन पाठविलें जे, आम्हास आमच्या खावंदाची आज्ञा आहे कीं, सरकार फौजेशीं लढूं नये. त्यास तुमचे चित्तांत काय तें सांगोन पाठवावें. त्यावरोन पुरंदरे यांणीं सांगोन पाठविलें कीं, आम्हास सरकार आज्ञा जे, तुमचें पारपत्य करावें

म्हणोन सांगून पाठवून तोफा सुरू केल्यानंतर माने यांणीं पुरंदरे याजवर चालून घेतलें. त्यास पुरंदरे व पानसे व कुंजर तोफा व हत्ती व जरी-पटका टाकून पळून पहिल्या तळावर गेले. तोफा व हत्ती वगैरे माने घेऊन गेले आणि जरीपटक्याच्या हत्तीवर माने यांणीं चाल केली त्यास जरी-पटक्याजवळ मालोजी घोरपडे पथकमुद्धां होतें त्यांणीं एक घटकापर्यंत लढाई देऊन जरीपटक्याचा हत्ती काढून देऊन लढाई थोपवून राखली. त्यास मालोजी घोरपडे यास भाल्याचा जखमा चार लागून घोड्यास जखम लागोन खालीं आले. हें वर्तमान मान्यास कळल्यानंतर मालोजी घोरपडे यास पालखींत घालून नेलें आणि पुरंदरे याचा तळ घेतला. पुरंदरे व पानसे व कुंजर प्राण घेऊन जरीपटका संभाळून सासवडास आले. त्यास ही लढाई आश्विन शु॥ १२ शुक्रवारीं दोनप्रहरां होऊन सदरहूप्रमाणें मजकूर जाला हें वर्तमान श्रीमंतास शु॥ १३ दोनप्रहरां कळलें. नंतर श्रीमंतांनीं पाच तोफा व रूपराम चवधरी याचें पलटण वगैरे सरंजाम पुरं-धरे याजकडे सासवडास रवाना केला. पुढें श्रीमंतांचे डेरे गारपिराबर होणार म्हणोन वदंता आहे. मालोजी घोरपड्याचा बंदोबस्त माने उत्तम प्रकारें करीत आहे. याप्रमाणें इकडील वर्तमान आहे. पुढें होईल तें सेवेशीं लिहूं. उज्जनीहून चार पलटणां व बऱ्हाणपुराहून तीन हजार पागा रवाना केल्या. त्या अजंट्याच्या घाटांत आहेत. पुढें या फौजेंत येऊन लौकरच दाखल होतील. हे विनंती.

---

नं. ६४५९ श्री. (आश्विन व० ७ – १८ आक्टो)

पै॥ छ० २१ ज०खर सन सलास मयातैन व अलफ.

सेवेसीं + विनंती सेवक बाळाजी माहादेव दामले चरणांवर मस्तक ठेवून शिरसा. नमस्कार विज्ञापना. ता. छ० २० ज० खर मु॥ कसबे रहिमतपूर वर्तमान यथास्थित असे. विशेष. लष्करांत नेहमीं बातमीस चार असामी ठेविले आहेत. वर्तमान तर जरीपटक्याचा मोड जाहाला ते समयीं रा. मालोजी राजे घोरपडे यांस जखमा लागोन बारामतीजवळ पडले.

---

+ पत्र रहिमतपुराहून मिरजेस.

जरीपटका निशाण संभाळोन दोन हजार फौज निघोन आली. त्याचा मुक्काम सासवडानजीक कुंभारवळणावर मुक्काम केला. वरकड पळाची फौजही कुंभारवळणावर मुक्कामास आली. आजपर्यंत चार पांच हजार फौज जमा जाहाली आहे. लढाईसमयीं जरीपटक्याकडील दाहा वीस बार तोफांचे जाहाले. नंतर माने यांणीं चालून घेतल्यावर कोणी हत्यार-धरिलें नाहीं. पळ सुटला, घोरपडे मात्र उभे राहिले. त्यास जखमा लागोन पाडाव माने यांणीं नेले आहेत; जिवंत आहेत. पानशे यांचा झाडून तोफखाना वीस तोफा वगैरे सरंजाममुद्धां माने यांणीं नेला. शिवाय बुणगें निमे सरकारच्या जामदारखान्यामुद्धां लुटलें गेलें. माने याचा मुक्काम बारामतीनजीक मेडदावर आहे. बारामती मेडदसुद्धां खंडणी लाविली आहे. शिंदे यांची वीस हजार फौज व आठ पलटणें यांचा मुक्काम जांबगांवाबाजीक आला. त्याचे दुमदारीवर* होळकर यांजकडील शामतखान पठाण चार पांच हजार फौजेनिशीं आहे. खासा होळकर याचा मुक्काम गारदौंडेवर आहे, तीस हजार फौज आहे. छ० १६ जंखरीं खासा यशवंतराव होळकर चार हजार फौजेनिशीं रा. फत्तेसिंग माने यांस बारामतीचे मुक्कामीं येऊन भेटले. माने याचे शरीरीं स्वस्थ नाहीं. याज-करितां चार मुक्काम बारामतीवर होणार. नंतर, होळकर मानेसुद्धां जेजु-रीस देवास येऊन देवदर्शन करून झाडून गारदौंडेवर जाऊन झाडून फौज सुद्धां शिंद्याचे फौजेवर जाणार. याप्रमाणें वर्तमान आहे. किल्ले सातारा येथील शहरसुद्धां बंदोबस्त होत आहे. पांच हजार फौज ठेवीत आहेत. श्रीमंत राजश्री पंतप्रतिनिधि याची फौज कराडास आली आहे. त्यास साल्प्याचा वगैरे घाट धरावयाविशीं सरकारचीं आज्ञापत्रें आलीं आहेत. सेवेसीं विदित होय हे विज्ञप्ति.

---

नं. ६४६० श्री. [नक्कल.] [आश्विन ब० ८ –१९आक्टो.]

दै॥ छ० २१ जमादिलाखर सन्न सलास मयातैन.

---

* दुमदारी = टेहळणी.

सेवेसी साष्टांग नमस्कार. विज्ञापना. येथील वर्तमान तर, श्रीमंत मातुश्री यशोदाबाई व सौ॥ ताईसाहेब व आपासाहेब यांची स्त्री व कैलासवासी नाना फडणीस यांची स्त्री याप्रमाणें आश्विन शु॥ द्वादशी रात्रौ रायगडास रवानगी जाहली. त्रयोदशीस डेरे गारपिरावर होऊन राजश्री त्रिंबकराव पेठे डेरादाखल जाहले. वद्य प्रतिपदेस पेठे यांस जरीपटक्याची वस्त्रें होऊन जरीपटका घेऊन डेन्यास गेले. पेठे यांजपासीं कारभारी राजश्री चितोपंत देशमुख जाहले. कुंजर यांनीं आपले कबिले[1] व असबाब[2] रायगडास रवाना केले. मान्यांची व पुरंदरे यांची लढाई बारामतीनजीक जाहली. पुरंधरे शिकस्त होऊन सासवडास आले. हें पेशजी लिहिलेंच आहे. होळकर खासा फौजसुद्धां घाटपार होऊन पुन्हां नगरच्या रोखास येऊन पारनेरास छ० १४ तारिखेस मुक्काम केला. तेथून कूच करून दक्षणेस रोख देऊन पिंपळगांवावर मुक्काम केला. पुढें जेजुरीस दर्शनास यावें हा बेत आहे. बारामतीची खंडणी पंचवीस हजारावर ठरली. पेशजी सरकारांतून राजश्री सदाशिवपंत बुगले होळकराकडे बोलणेस गेले होते. त्यास तेथील रोख गैरतरेचा पाहून न पुसतां लष्कराचे रवेंतून निघून शिंद्यांचे लष्करांत येऊन तेथून हुजूर आले. नंतर खलबत होऊन कांहीं एक समेटाचा मार्ग काढून होळकराकडील कलमबंदी ठरवावी म्हणोन राजश्री पाराजीपंत यास रवाना करावें असा बेत ठरला आहे. शिंदे यांजकडील फौज व पलटणें शिरुळावर पांच सहा कोसांचे तफावतीनें आहेत. शिंद्यांकडील बऱ्हाणपुराहून फौज व पलटणें आलीं त्यापैकीं दोन हजार फौज व दोन पलटणें नगरास दाखल जाहले. अघाडीचे फौजेंत लवकरच पोहचतील. बाकी तीन हजार फौज व तीन पलटणें पैठणास आलीं. तींहीं लवकरच येऊन सामील होतील. माने बारामतीसच आहेत. जेजोरीस येऊन दर्शन घेऊन संमाराधना करून माघारे गेले. पुरंधरे यांचा मुक्काम सासवडानजीक हिवरेवर आहे, बहुत काय लिहिणें. सेवेसी विदित होय. इंग्रजांकडील पांच पलटणें कल्याणास आलीं असी खबर आहे हे विज्ञापना.

---

१ कबिला = बायकामुलें. २ असबाब = सामान.

नं ६४६१ श्री (आश्विन व० १०—२१ आक्टो.)

पै. छ. २४ ज०खर सन सलास मयातैन आश्वीन.

[1]सेवेसी विनंती. सेवक बाळाजी माहादेव दामले सिरसा. नमस्कार विज्ञापना ता।. छ. २३ ज.खर वर्तमान यथास्थित असे विशेष. लष्करचें वर्तमान तर रा. यशवंतराव होळकर श्रीजेजुरीस येउन देवदर्शन करून माघारे गारदोंडवर गेले. मान्ये फौजसुद्धां चार कोस अलीकडे आहेत. फलटण प्रांतीं मान्ये याजकडील फौज खंडण्या घेत आहे. होळकर यांजकडील पेंढार येऊन शिरोळ वगैरे गांव निरथडीचे लुटून नेले. प्रांत वोस जाहला आहे. रा. मालोजी राजे घोरपडे पाडाव गेले होते ते मौजे भाडळें येथें आले. रा. चतरसिंग राजे भोसले हमर स्वारांनिशीं वांईस गेले आहेत. रा. बाळाजी माणकेश्वर यांस दोन पत्रें होतीं तीं पावतीं केलीं. त्याचें उत्तर आलें तें पाठविलें आहे. बोली सोडिल्या म्हणोन पत्रांत लिहिलें आहे. परंतु अद्याप बोली सोडिल्या नाहींत. + + +[2] सेवेसी विदित होय हे विज्ञप्ति.

———

नं. ६४६२ श्री. (नकल.) (आश्विन व० १०—२१आक्टो.)

पै॥ छ० २ रजब मंदवार साहा घटका दिवस

विज्ञापना,[3] येथील कुशल ता॥ छ० २३ जमादिलाखर पावेतों यथास्थित असे. विशेष. आपण कृपा करून पत्र पाठविलें तें पावलें. चिटनिसाकडील गांवचा मजकूर लिहिला तो समजला. गांवाविशींचा शोध लावतां हुजुरून सनदा जाहल्या नाहींत. मुतालकीच्या जाहल्या असल्यास शोध लाऊन मनाई घेऊन पाठवितों. रा॥ यशवंतराव होळकर फौजसुद्धां जेजुरीस आला आहे. मुक्काम घोडे उडणावर जेजुरीपासून दीड कोसावर आहे. सरकारच्या फौजा पुण्यालगत आहेत. तेवीस हजार फौज पागा व हुजरात शिवाय पंधरा हजार पलटणेंसुद्धां गाडद व शिवाय शिंदे याजकडील दोन

---

१ पत्र रहिमतपुराहून मिरजेस. २ या ठिकाणीं पर्किनाण्याचा मजकूर आहे तो गाळला आहे. ३ पत्र दिनकर रघुनाथ पटवर्धन यांचें जमखिंडीस राम. आपांस. त्याची ही नकल.

कंपू व दाहा हजार फौज याप्रमाणें जम आहे. दोनी सरदार सरकारचे पदरचे, आपसांत लढाई आहे, सरकारांतूनही उभयतांचा समेट करावा हाच विचार आहे. उभयतां सरदार आज्ञेशिवाय वागणार नाहींत असें आहे. तूर्त प्रजेस मात्र पीडा बहुत होत आहे ! रा॥ चिंतामणराव आपा येथून जरीपटक्याबरोबर गेले ते लष्कर सोडून मंगळवेढेस उपद्रव लागला म्हणोन पुरंधरे यांस पुसोन पुढें गेले. मागें माने व पुरंधरे यांचे लढाईचे वेळेस येऊन पोहोचावे तेंही न जाहलें. कदाचित मजल लांब असेल. हल्लीं पुण्यानजीक फौजा येऊन भिडल्या असतां जलदीनें येऊन श्रीमंताजवळ दाखल व्हावें हेंही न घडलें. या मजकुराचीं विनंतीपत्रें दोन तीन वेळां लिहिलीं परंतु उत्तरही आलें नाहीं ! आहेत कोठें हाही शोध नाहीं. येविशीं आपणांस लिहून पाठऊन फौजसुद्धां पुण्यास लौकर येऊन पोहोंचत तें करावें. हा चाकरीचा समय आहे. येसमयीं सर्वांनीं उपयोगी पडावें आणि मग आपापलें उर्जीत करून घ्यावें असें दिवस आहेत. आपले युक्तीस आल्यास रा॥ नारायणराव यांस हजार पांचशें लोक बरोबर देऊन रवानगी करावी. याचा उपयोग पुढें बहुत पडेल. मनामध्यें दिक्कत तिळप्राय आणूं नये. श्रीहरीचे कृपेंकरून दिवस संकटाचे निघोन जातील. परंतु समयास उपयोगी जे पडतील न पडतील त्यांचें मनांत राहील. मजकूर बहुत लिहिला आहे. अधीक आगळा उपयोगी नसेल तो जमेंत धरून मजवर रोष धरूं नये, उपयोगी असेल तो मात्र मनन करून पाहून उत्तर पाठवावयाजोगें असल्यास पाठवावें. नाहींतर हा मजकूर स्वामीशिवाय दुसऱ्यास समजूं नये हें बरें दिसतें. बहुत काय लिहिणें. हे विज्ञापना.

---

नं. ६४६३ श्री. ( आश्विन व. १२।२३ आक्टो.)

विज्ञापना. तागायत छ. २५ जमादिलाखर मंदवारपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष

× × × हल्लीं येथील वर्तमान तरी, शिंद्याकडील फौज व पलटणें छ० २४ मिनहूस बानवडीवर प्राचीन तळावर येऊन मुक्काम केला व नाना पुरं-

१ याठिकाणीं पत्रांतील बराचसा बिन महत्वाचा मजकूर गाळला आहे,

दरे जरीपटक्यासुद्धां व कुंजीर वगैरे लहानमोठे सरदार फौजसुद्धां गारपिरावर छ० मजकुरीं आले व शिंद्याच्या फौजेंत सरदार सदाशिवराव व ताम्रमुख छ० २२ रोजीं येऊन श्रीमंतांस भेटून श्रीमंतांस उभयतांनीं विनंती केली जे, स्वामिच्या प्रतापेंकरून लढाई देऊन छऱ्याचे व जंबुऱ्याचे व कुलपी गोळ्याचे मार देऊन पलटणाचे मार देऊन पलटणाचे कवाइतीनें होळकरास उडावून देतों. खावंदानीं लढाईचा तमाशा पहावा. म्हणोन विनंती करून खर्चाचा सरभरा व्हावी म्हणोन अर्ज केला. त्यावरून दारूगोळा व वीस तोफा लांब पल्याच्या देऊन तीन लाख रुपये बाळोजी कुंजर यांणीं खर्चास दिले. आणि रुकसत[१] केले. विंचूरकर वगैरे यांजकडील कारकुनास हुजूर बोलावून आज्ञा जाहली जे, लाख दोन लाख रुपये घेणें आणि लढाऊ फौज पंचवीस तीस रुपये शेऱ्याचा राऊत याप्रमाणें पांच हजार जमा करणें म्हणोन आज्ञा होत आहे. हें वर्तमान यशवंतराव होळकर यांस समजल्यानंतर खासा यशवंतराव सडे पांच हजार फौजेनिशीं जेजुरीस येऊन देवदर्शन घेऊन श्रीमंतांस विनंती लिहिली जे, आज्ञेप्रमाणें बारामतीवर मुक्काम करून आहें. फौजेसह पेंढारी यास ताकीद केली आहे. त्यास सरकारांतून समेटीच्या बोलणेंकरितां कोणी मजकडे येणार त्यांस जाणें विशीं आज्ञा व्हावी. आमचा व शिंद्याचा समेट जाहाल्यानें राज्याचा बंदोबस्त होऊन शत्रूवर दाब पडेल. शिंद्याच्या फौजेस जंगी सरंजामाची व खर्चाची वगैरे सरभरा होत आहे त्याप्रमाणें आम्हांकडील फौजची व्हावी व शिंद्याकडील फौजेचा जसा रोख दृष्टीस पडेल त्याप्रमाणें आम्ही चाकरीस हजर आहों. म्हणोन सरकारांत पत्र पाठवून जेजुरीहून कूच करून बारामतीस जाऊन येथून तोफखान्यांसुद्धा कूच करून येवतावर फौजसुद्धां आले. शिंद्याकडील पेंढारी यांणीं फकस्त पुणें ठेवून बाजत चार दिशा पश्चिमेस घाटमाथापर्यंत मुलूख बेचिराख केला ! आजपर्यंत समेटीच्या बोलण्याकरितां सरकारांतून कोणी गेलें नाहीं. शहरापासून बाराकोशांवर होळकर आहेत. पुढें लढाईचा व सलाईचा मजकूर समजत नाहीं. खासा स्वारी रात्रो वाड्यांत तयार राहती. कोणेसमयीं स्वारी

---

१ रुकसत करणें=निरोप देणें.

पे. ले. ११.

कोकणांत जाईल याचा भरंवसा नाहीं. दंग्यामुळें शहर परागंदा जाहलें आहे. त्यांत पट्टी सुरू करून लोकांस तगादे होऊन शहरच्या नाकेबंद्या करून कोणास शहराबाहेर जाऊं देत नाहींत. कारभारी यांणीं चिटकोपंत कारकून यांस करवीरास राजाकडे पाठवून राजाकडून फौज जमा करवून पटवर्धन यांचे सरंजामांत दंगा करून पटवर्धन शिकस्त करावें म्हणोन पाठविले आहेत व गोखले यांसही पत्रें सरकारचीं व कारभारी यांचीं गेलीं आहेत जे, पटवर्धन यांच्या तालुक्यांत दंगा करून कबज काबीज करावें. याप्रमाणें इशारा गेला आहे. आपली स्वारी गेली आणि पाठीमागें पुरंधरे जरीपटक्यासुद्धां शिकस्त मान्यांनीं केले तेव्हां मान्यावें व आपलें सूत्र आहे म्हणोन असा विचार जाहला अशी खातरजमा कारभारी यांची होऊन राजाकडे व गोखल्याकडे इशारे गेले आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६४६४ श्री. (आश्विन व. १२–२३ आक्टोबर.)

पै॥ छ० २९ जमादिलाखर सन सल्लास मयातैन. कार्तिक.

सेवेशी विनंती सेवक बाळाजी महादेव दामले चरणावर मस्तक ठेऊन शिरसा॥ नमस्कार विज्ञापना. ता॥ छ० २५ जमादिलाखरपर्यंत मुक्काम कसबे रहिमतपुर[1] वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री चतुरसिंग भोसले व रास्ते यांची एकलासी होऊन चतुरसिंग रास्ते याजकडे राहिले. मेणवली येथें राहून पांडवगडावरील लोक आरव चतुरसिंग याजपाशीं आले. खर्चास किल्यावरून देतात. आणि फौज ठेवीत आहेत. प्रांतांत खंडण्यांचे रोखे होत आहेत. शिंदे याजकडील फौज व पलटणें यांचा मुक्काम पुण्यानजीक कोरेगांवावर आहे. राजश्री यशवंतराव होळकर व फत्तेसिंग माने फौजसुद्धां काल बोरघाटाखालीं गेले. शिंद्याच्या फौजेची व होळकर याची लढाई व्हावयाची बोलवा आहे. पुण्याचा मार्ग दंग्यामुळें हेरलीच्या घाटापासून चालत नाहीं. होळकर याच्या लष्करांत महागाई फार, तीन शेर आटा, पांच सहा शेर जोरी हरमरे जाहले आहेत. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

१ पत्र रहिमतपुराहून मिरजेस. २ दिलजमाई.

नं. ६४६५ श्री. (आश्विन ब. ३० – २६ आक्टो.)

पै. छ० २ रजेब. मंदवार.

विज्ञापना. तागायत छ० २८ जमादिलाखर सोमवार अस्तमानपावेतों सुखरूप असो. विशेष. रा० यशवंतराव होळकर शहून फौज तोफखाना मुद्धां लोणी व कवडीवरून उतरले. नंतर सरकारची फौज जरीपटक्यामुद्धां व शिंदे यांजकडील फौज पलटणें बानवडीस आलीं. काल रविवारीं सरकारांतून बोलण्याकरितां रा० पाराजीपंतबाबा व नारायणराव वैद्य व राघोपंत भागवत ऐसे तिघे दोनप्रहरीं गेले. समागमें लोकही दिल्हे. परंतु लोकांस गोटांत घेतलें नाहीं. बोलणार तिघेजणास डेऱ्यास नेलें. एक प्रहर बोलणें जालें. त्यांत एकच बोलणें होळकराकडील पडलें कीं, तुम्ही बोलतां हें आम्हांस प्रमाण अगदीं नाहीं. कुंजर, निंबाजी भास्कर दाजी देशमुख व आंगरे या चौकानीं येऊन बोलावें. काय ठरणें तें ठरेल. तुम्ही निघोन जावें. असें स्पष्ट सांगितल्यावरून त्रिवर्ग निघाले ते पहांटेचे प्रहर रात्रीस सरकारवाड्यांत आले. बोलण्यांतील सर्व भाव समजाविले. इकडील वाड्याजवळ तीन दिवस अहोरात्र तयारी होती. वकील माघारे आले, तेव्हां होळकराचें सांगणें होतें कीं, उदईक सहा घटका वाट पाहीन. नंतर लढाई. तेव्हां आज वाड्यांत प्रातःकाळापासून अन्नापाण्याची गडबड भारी होती. बाळोजी कुंजर, निंबाजी भास्कर व दाजी देशमुख त्रिवर्ग श्रीमंतास विनंती करून लढाई द्यावयाचा निश्चय करून सहा घटका दिवसास निघोन फौज पलटणांत गेले. दोहींकडील तयारी होती. त्रिवर्ग पलटणांत जाऊन तोफाची सुरवात केली. प्रहर दिवसास होळकरांनीं आपले तोफखान्यास आज्ञा केली कीं, जरीपटका आमचा खावंद. त्याजकडून पंचवीस बार निघत तों तुम्ही स्वस्थ असावें. त्याजप्रमाणें घडलें. नंतर तिकडीलही सुरवात जाली. प्रहर दिवसास उभयतांकडील तोफांची मारगिरी होऊं लागली ते दोनप्रहरपर्यंत एकसारखा मार मारिला. तोफांचे बारांची गणती एकदोन असें केल्यास गणती सांपडावयाची नाहीं. सात आठ हजारपर्यंत गोळा उडाला इतका अदमास आहे. चार घटका दिवसपर्यंत श्रीमंत वाड्यांत होते. नंतर उभयतां

निघोन बानवडीस जरीपटक्याजवळ गेले. चार घटका तेथें होते. नंतर शिंदे याजकडील पलटणें कचकरलीं. होळकराकडील पलटणें व तोफखान्याकडील लोक मारीत मारीत आले. बहादुर याजकडील तोफेची नासाडी बहुत जाली. धीर निघत नाहीं हें पाहून सरकारचा जरीपटका निघाला. पलटणें तशी लढाई देत मागें सरतात तों फौज निघाली. मग पलटणांचा धर सुटला. फौज श्रीमंतसुद्धां शिंदे याजकडील निघाली ती पर्वतीकडे पश्चमेच्या अंगास आली. कांहीं संगमाकडून निघाली ती गणेशखेडीकडे जाऊन तिकडून श्रीमंतास येऊन मिळाली. दोन घटका श्रीमंत पर्वतीस होते. झाडून फौज जमा जाली. अजमास तीन चारपर्यंत. तों होळकराची फौज मागाहून पांच सहा हजार येत होती ते फौजेस काल इशारा जाऊन रातोरात पाषाणाकडून थाडबी आली होती. तीही कोठें कोठें टोळ्या दिसों लागल्या. तेव्हां पर्वतीवरून फौजेसह उभयतां बडगांवचे बागेंत गेले. पुढें सिंव्हगडचे आसन्यास गेले म्हणतात. शिंदे याजकडील दोन पलटणें शाबूत राहिलीं तों मागें सरकून कै० पाटीलबाबाचे छत्रींत आलीं. त्यांत कुंजीर, निबाजी भास्कर, दाजी देशमुख, आंगरे, सदाशिवराव बक्षी व मुख्य पलटणवाला इतके आंत सांपडले म्हणोन बातमी आहे. त्या पलटणांस चोहींकडून होळकराचा वेढा पडला आहे. सरकारच्या व शिंदे यांजकडील पलटणांसुद्धां तोफा पाडाव होळकराकडे गेल्या. बुणगेंही झाडून लुटलें. कांहीं पळ शिंदे याचा शहरांत आला तो शहरचे लोकांनीं गांवांत आल्यावर लुटला. शिंदे याजकडील मनुष्यास आजच्या दिवसास त्राता कोणी जाला नाहीं. असा समय त्यास प्राप्त जाला. जागाही कोणी देईना. आजच्या एवढ्या प्रसंगांत शहरास किमपि ही वेळपर्यंत धक्का लागला नाहीं. उदईक काय घडतें पहावें. पळाबरोबर होळकराचा पाठलाग येता तरी शहरची बाकी राहत नव्हती. होळकरांनीं आपल्या सैन्यांत ताकीद दिली होती कीं, शहरांत एक मनुष्य गेलें असतां जिवें मारीन. त्याप्रमाणें हुकूम चालला. कवडीच्या व वानवडीच्या मध्यें लढाई जाली. दीपवाळीचा सण बहुत आनंदाचा जाला ! अस्तमानपर्यंत कित्येकास अन्न देखील नाहीं. सरकारचे फौजेस लढाईचा

धक्का विशेष बसला नाहीं. तरवार चालती तरी नाश बहुत होता. तोफांचीच लढाई जाली. नाश शिंद्याचा जाला. त्यांत बाकी नाहीं. चार पांच दिवस शिंदे याजकडील पेंढारी यांणीं शहराभोंवतीं धुंदाई केली. मनुष्य फिरकूं बाहेर दिलें नाहीं. पाषाणाचे वर्णीचे ब्राह्मण लुटले. गांव लुटला. थेऊरचा गणपति शिंदे कडील पेंढारी यांणीं विच्छिन्न केला. कातरज, विठ्ठलवाडी, थोडीबहुत पर्वती, गणेशखेडें हे गांव सभोंवते झाडून लुटले. इतकें कृत्य शिंद्याकडील, त्याचें प्रायश्चित यथाविध मिळालें ! + + + विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६४६६ श्री. (आश्विन व. ३०–२६ आक्टो.)

पै॥ छ. ४ रज्जब सुरुसन सलास मयातेन व आलफ.

सेवेशीं साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ. २८ जमादिलाखर मंगळवार. दिल्लीकडील व उजनीकडील पत्रें आलीं नाहींत. येथील वर्तमान तर होळकर बा॥ १२ कवडीस फौजसुद्धां दाखल जाहले. नंतर समेटीच्या बोलण्याविसीं सरकारांतून बा॥ १३ राजश्री पारोजीपंत व नारायणराव वैद्य व राघोपंत भागवत व आबाजी शंकर व भिवाजी नाईक कोलते याप्रमामाणें होळकर याजकडे पाठविले त्यास होळकर याचें एकच बोलणें पडलें जे. कुंजर व निबाजी भास्कर व दाजी देशमुख व फौजेंतील सदाशिवराव बक्षी व बाबूराव आंग्रे पाठवून द्यावे. नंतर श्रीमंत जी आज्ञा करतील ती मान्य आहे. याप्रमाणें बोलणें एकच पडलें. त्यावरोन पारोजीपंत व नारायणराव वैद्यसुद्धां बा॥ १३ मध्यरात्रीं निघोन पहांटेच्या प्रहर रात्रीस श्रीमंतांच्या जवळ आले. येऊन होळकराच्या सदरहू बोलण्याची विनंती केली. त्यावरोन श्रीमंतानीं कुंजर व निंबाजी भास्कर वगैरे यास आज्ञा केली जे, तुम्ही जाऊन तह ठरावून येणें. त्यावरोन कुंजर व निंबाजी भास्कर वगैरे यांनीं विनंती केली जे, स्वामींच्या प्रतापेंकरून होळकराशी लढाई देऊन उडावून देतों! त्यावरोन श्रीमंतानीं आज्ञा केली जे, उत्तम. तुमचे चित्तास येईल तसें करावें. त्यावरोन कुंजर व निंबाजी भास्कर व दाजी देशमुख व बाबूराव आंग्रे हे शिंद्याकडील फौजेंत जाऊन

सदाशिवराव सुां मिळोन बा। १४ प्रथम प्रहर दिवसास होळकराचे फौजेवर कुंजर व निंबाजी भास्कर वगैरे याणीं गोळे सुरू केले. नंतर होळकर याणींही गोळे सुरू करोन शिंद्याचे फौजेवर व पलटणावर व जरीपटक्यावर वगैरे सरकारच्या फौजेवर गोळे चालू झाले. त्यास परस्परें गोळ्यांची लढाई प्रहर दिवसापासोन तीन प्रहर अखेरपर्यंत जाहली. परस्परें गोळ्याची मर्यादा राहिली नाहीं. नंतर होळकराकडील चार पांच हजार पठाण यांणीं शिंद्याच्या पलटणावर व सरकारच्या तोफखान्यावर चाल करोन समशेरची लढाई दोन घटकांपर्यंत शिंद्याकडील कंपूवर जाहली. त्यास शिंद्याकडील कंपू नाबूद करोन कंपूच्या व सरकारच्या तोफा घेऊन फत्तेसिंग माने व पठाण पुनः एक होऊन कुलतोफासुां वानवडीस शिंदे याचे हवेलींत येऊन सायंकाळीं मुक्काम केला. सदरहू लढाई हडपसरच्या वानवडीच्या मधील माळावर पटांगणावर जाहली. त्यास दुसरे वर्तमान इकडे लढाई सुरू जाहल्यावर श्रीमंत व आपासाहेब तयार होऊन व लहान मोठे मुत्सद्दीसुद्धां वाड्यांतून निघोन कोतवाल चावडीपाशीं दोन चार घटका उभे राहून लढाईची बातमी आणविली. बातमी आली जे, कंपू नाबूद होऊन तोफा जाऊन शिंद्याची फौज व जरीपटका व फौजसुद्धां पळोन गुलटेकडीजवळ आला. अशी बातमी आली. नंतर श्रीमंत निघोन तोफखान्याबरोन परवती उजवी घालोन परवतीच्या माळावर जाऊन उभे राहिले. त्यास दुसरें वर्तमान कुंजर व निंबाजी भास्कर यांस वर्तमान कळलें जे, कंपू नाबूद होऊन दोंहीकडील तोफा जाऊन जरीपटक्यासुद्धां फौज दोंहीकडे पळों लागली. नंतर जरीपटका व शिंद्याकडील फौज कुंजर व निंबाजी भास्कर वगैरे पळाले ते श्रीमंताजवळ आले. होळकराकडील हरजी होळकर आठ दहा हजार फौजेनिशीं देवांचें चिंचवड येथें होता तो फौजसुद्धां आउंधपाषाणमार्गें येऊन गणेशखिंडींतून जाऊन घाटाचे रस्ते व सिंहगडाचा मार्ग रोखून आहे. हे बातमी श्रीमंतांस समजल्यानंतर श्रीमंत व पुरंधरे वगैरे जरीपटक्यासुद्धां शिंद्याची फौज व बुनगें व कुंजर व निंबाजी भास्करसुद्धां विठलवाडी व वडगांवच्या दरम्यान मुक्काम जाहला आहे. हें वर्तमान मान्यांस व पठाणास समजल्यानंतर

त्याणीं पांच हजार फौज सडी पर्वतीच्या दक्षिणेस माळावर याच्या मोहऱ्यावर उभी करोन पठाण व माने वानवडीवर शिंद्याचे हवेलींत मुक्काम करून शहरास बालाग्र काडीमात्र उपद्रव लावला नाहीं. कुलफौजेस होळकराची ताकीद जे, शहरास काडीचा उपद्रव केला असतां पारपत्य करीन. शिंदे याजकडील बुनगे व बाजार शहरांत आला तो शहरच्या लोयांनीं लुटला. येशवंतराव होळकर लोणीवस्व मुक्काम करोन मुक्कामीच आहेत. पुढें लढावयास आलेच नाहींत. सदरहू लढाई माने व पठाण याणीं मारली. याप्रमाणें वर्तमान वा। १४ प्रहर रात्रपर्यंत जाहलें. अमबास्तेस होईल ते लिहूं. अशा समयास राजश्री चिंतामणराव आपासाहेब असते तर फार उत्तम गोष्ट जाहली असती. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं० ६४६७ श्री. (कार्तिक शु. १–२७ आक्टो.) (नकल)

राजश्री चिंतामणराव गोसावी यासी—

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य– श्री। यशवंतराव होळकर दंडवत विनंती. उपरी. कुशल जाणोन स्वकीय लिहीत जावें. विशेष. श्री जेजुरीचे मुक्कामीहून आपणाकडे प्रहस्त व पत्रें रवाना केलीं आणि आम्हीं कूच करून दरमजल श्री गणपतीचे थेऊरनजीक आलों. श्रीमंतांनीं रा। नारायणराव वैद्य व रघुनाथ धोंडदेव भागवत बोलावयास पाठविले त्यांतलि अर्थ पाहातां दिवस काढावे इतकाच दिसला. तेव्हां त्यासी बोलून मार्गस्त केलें आणि आश्विन वद्य १४ इंदुवारीं प्रातःकालपासून लढाई दोन प्रहरपर्यंत पलटणें व फौजेची दोहीकडील जितकी शर्त तितकी होऊन शेवटीं आम्ही जातीनिशीं फौजेसह हल्ला करून श्रीकृपेनें त्यांची फौज व पलटणें दरोबस्त गारद करून तोफा अगदीं सांडविल्या. फौजेपैकीं थडे मात्र कांहीं जीव घेऊन गेले. बरकड सर्व असबाबसह लुटिले. श्रीमंत सिंहगडाकडे गेले त्याजकडे खातरजमेचीं पत्रें पाठऊन घेऊन यावयास रा। नागो जिवाजी याजला पाठविलें आहे. आपण याउपरी दिवसगत न लावितां कोणेविशीं संशय मनांत न आणितां सत्वर यावयाचें करावें. आम्हास तीन जखमा

---

१ पत्र पुण्याहून होळकरांचें चिंता. आपा सांगलीकर यांस.

तरवारेच्या हातावर जाल्या. हलक्याच आहेत. सत्वर बऱ्या होतील. रवाना छ० २९ जमादिलाखर सुरूसन सल्लास मय्यातैन व अलफ बहुत काय लिहिणें. हे विनंती. मोर्तब.

---

नं० ६४६८ श्री. (कार्तिक शु० २ –२८आक्टोबर.)

पै॥ छ० ८ रज्जब भृगुवार सह्वावा तास कार्तिकमास सल्लास मयातेन.

सेवेशीं सा॥ नमस्कार विज्ञापना. ता॥ छ० ३० जमादिलाखर गुरुवार दोनप्रहर वर्तमान यथास्थित असे. विशेष. पेशजी छ० २८ मिनहूनचें पत्र पाठविलें आहे. त्यावरोन सविस्तर कळलेंच असेल. हल्लीं येथील वर्तमान तरी, लढाई सुरू जाली. नंतर खासा यशवंतराव आपल्या फौजेंत येऊन पठाणाच्या जमेतींत जाऊन कंपूवर खुद्द व पठाण मिळोन चालून घेतलें. चार घटका तलवार चालली. निदान शेवटीं यशवंतराव खुद्द पाय उतार होऊन दोन गोलंदाज ठार केले. यशवंतरायास उजव्या हाताच्या चवड्यावर जखम तलवारीची व बहावटा उजव्या हाताचा याजवर भाल्याची व उजवेकडील गालावर तलवारीची याप्रमाणें जखमा लागल्या आहेत. शिंद्याकडील कंपूत दहा पलटणें होतीं त्यापैकीं पांच साडे पांच हजार मनुष्य पठाणांच्या तलवारींच्या जखमेनें ठार, शिवाय घायाळ व जखमी तीनचार हजार, व राऊत दोन हजार, घोड्या मनुष्यांसुद्धां तोफेनें व तलवारीनें मिळोन व शिवाय घोडे राऊत जखमी याप्रमाणें इकडील लढाईत कामास आले. शिवाय होळकर याजकडील तीन हजार घोडे व स्वार मिळोन तोफेच्या गोळ्यांनीं ठार शिवाय त्याजकडील कंपूतील दोन तीन हजार ठार शिवाय जखमी तोफेच्या गोळ्यानें याप्रमाणें लढाई जाहाली. शिंद्याकडील कंपूतील ताम्रमुख दोनीं सरदार ठार जाहाले. होळकराकडील कंपूतील सरदार ताम्रमुख एक ठार जाहाला व शिंद्याकडील फौजेंतील सरदार सदाशिवराव बक्षी जखमी होऊन गर्दीतून पळोन गेले. याप्रमाणें लढाईचा विषय जाहाला. श्रीमंत व कारभारी व शिंद्याकडील निंबाजी भास्कर वगैरे मिळोन सिंहगडाखालीं वडगांवास होते. श्रीमंतानीं शहरांत यावें म्हणोन यशवंतरायाचें बोलणें लागलें होतें. नंतर कार्तिक शु॥ १ बुधवारीं मध्यरात्रीं श्रीमंत व

कारभारी वगैरे शिंद्याकडील मंडळ व लहान मोठे मुत्सद्दी निघोन कोंकणांत रायगडास गेले. पिच्छावर होळकराची फौज बारा पंधरा हजार पठाण वगैरे सडे गेले आहेत. कुल शहराची गीर्दनवानी ( चोहों बाजूनीं ) नाकेबंदी होळकरांनीं करोन शहरांतील कोणास बाहेर जाऊं देत नाहींत व शहरांत मुत्सद्दी वगैरे कारभारी मातबर गृहस्थ यांच्या घरीं पाहारे बसवून रुपये घ्यावे व शहराची खंडणी करावी हा बेत होळकराचा आहे. उज्जनीकडील व दिल्लीकडील तूर्त पत्रें आलीं नाहींत. सरकारवाड्याच्या बंदोबस्तास तोफा व पलटणें काल होळकराकडील आले. विंचूरकराच्या पथकांनीं समयास काम चांगलें केलें. पुढें होईल मजकूर तो लिहूं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६४६१ श्रीगणपति. (कार्तिक शु. २–२८ आक्टो.)

पै. छ. १ रजेब पहांटेची आठ तास रात.

अपत्यें महादेवानें[1] चरणावर मस्तक ठेवून सां. नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ. १ रजेब गुरुवार रात्र आवशीची सहा घटका वर्तमान यथास्थित असे. विशेष. पुण्याकडील वर्तमान प्रातःकाळीं लिहिलें आहे त्याजवर आणखीही माणसें मोडांतून निघून आलीं. इकडून माणसें बातमीस्तव गेलीं होतीं तीं हारोळीचे घांटांतून माघारीं आलीं. पुढें निभाव होईना म्हणोन त्याजला फौज पडून आली ती घाट चढून आली, ती दोन हजार पावेतों भेटली म्हणून सांगितलें. जोमतखानाचा लेक दादेखान सालगु। येथें चाकरीस होता तो आज तिसरे प्रहरीं सहा घोड्यानिशीं आला. लढाईचे समयीं होता. त्यांणीही शिकस्त जाल्याचें वर्तमान सांगितलें. श्रीमंत पर्वतीपावेतों सिंहगडाचे मार्गें दोन हजार फौजेनिशीं गेले. शहरांत पेंढार शिरुन लूट होत होती. दादेखानाचें घर शुक्रवारांत होतें तें याजदेखतांच लुटलें. शहराची लूट होऊं लागली. ईश्वर इच्छा प्रमाण. वाटसरु बहुत आले. सांगणें सर्वांचें एकच मिळतें. विदित होय हे विज्ञापना.

---

१ पत्र तासगांवाहून मिरजेस महादेव परशराम यांचें.

नं. ६४७० श्री (कार्तिक शु० ३-२९ आक्टो.)

विज्ञापना. तागायत छ० १ रजेब भानुवार अस्तमान प्रहररात्रपावेतों सुखरूप असों. विशेष. आश्विन ब॥ १४ सोमवारीं लढाई जाल्याचें वर्तमान लिहिलें आहे. तीं पत्रें आजपर्यंत पोचलींच असतील, श्रीमंत लढाई बिघडल्यावर बडगांवास गेले. दुसरे दिवशीं डोणजें सिंहगडचे पाईस आहे, पुण्यापासून सहा कोस तेथें जाऊन मुक्काम केला. मंगळवारीं सरकारवाड्यांनून मुदबकचा कारखाना दोनप्रहरीं जाऊन पोचला. तिसरे प्रहरीं भोजन जालें. ज्याची सोय होती ते जेवले. बरकडांनीं हुरड्यावरच कालक्षेप केला. बुधवारीं मुक्कामच होता. तेदिवशीं होळकराकडून राजश्री पाराजीपंत बाबा ब गोपाळराव गानू व नागोजी जिबाजी व राघोपंत भागवत व आणखी पांच चार मराठे येणेंप्रमाणें दोन प्रहरीं बोलणें होऊन पुण्यास आले तों पर्जन्य बहुत लागला म्हणोन शहरांतच बोलणार राहिले. गुरुवारीं चार घटका दिवसास भोजन करून बाहेर गेले. तों श्रीमंत राहिल्या मुक्कामाहून सडे कार्याकारण जे समागमें न्यावयाचे त्यासुद्धां गुरुवारीं प्रातःकाळीं कोंकणांत गेले. ही बातमी समजल्यावर बोलणार बडगांवपावेतों जाऊन तेथून राघोपंत भागवत यासमागमें एक कारकून व दहा स्वार व जासूद देऊन जेथें श्रीमंत असतील तेथें जाऊन मार्गे यावयाची विनंती करावी, काय आज्ञा होईल ती कारकुनाबरोबर सांगून पाठवावी याप्रमाणें सांगून पाराजीपंत वगैरे अस्तमानीं पुण्यास आले. श्रीमंत महेवाटच्या अन्नछत्रापर्यंत पोचल्याची बातमी आली. पुढें महाडास जातात किंवा किल्ल्यास जातात पहावें. बाळोजी कुंजर वगैरे छत्रींत पलटणासमागमें सांपडले म्हणोन आवईवरून लिहिलें होतें; परंतु श्रीमंतासमागमेंच माघारे फिरले. समागमेंच आहेत. निंबाजी भास्कर व दाजी देशमुख तेही बरोबर आहेत. राजश्री सदाशिवराव कांहीं फौजेसुद्धां कात्रजेच्या घाटानें निघोन नगराकडे गेले म्हणोन बातमी आहे. आंग्रे निघोन कोंकणचे मार्गे गेले. तळेगांवपर्यंत गेल्याची बातमी आली. दोन जखमा आहेत म्हणोन सांगतात. राजश्री नाना पुरंदरे जरीपटका घेऊन श्रीमंत खालीं गेलेवर पुरंदरास गेले. समागमें पागा वगैरे गेल्या. श्रीमंतांबरोबर विशेष

कोणी गेलें नाहीं. सर्वांस माघारें जाणें म्हणोन आज्ञा एकंदर जाहली. कृष्णसिंग व लक्ष्मणसिंग व हैबतसिंग वाड्यांत आले. पथकी लोक बहुतकरून शहरांत आले. सरकारवाड्यांत आबा काळे मुख्यत्वें आहेत. व बैजनाथभट मामा व चिंतोपंत देशमूख बुधवारीं वाड्यांत आले ते तसेच राहिले. शहरचे बाहेरील नाकेबंदी होळकराकडील आहे. गांवांतील बंदोबस्त ही वेळपर्यंत काळ्याकडे आहे. होळकराकडील अधिकउणें सांगणें काळ्याकडेसच येतें त्याप्रमाणें करितात. लढाई व्हावयाचे पूर्वीं दोन दिवस बाजार बंद होता. मंगळवारीं यशवंतराव याजकडील ताकीद फिरली कीं, मुलूख दुकानें उघडोन व्यवहार करावा. ते दिवशीं मध्यमातच होते. बुधवारापासून शहरांत व्यवहार चालूं लागला. शिंदे याजकडील पळ गावांत आला होता तो गावच्यांनीं लुटला त्याची चवकशी होत आहे. जेथें उमगतात तेथून घोडीं गुरें वगैरे लष्करांत नेतात. यशवंतराव यास चार जखमा तीन तरवारेच्या व एक भाल्याची आहे. खैर आहेत. होळकरांकडील व शिंदे यांजकडील व सरकारचे मिळोन दोन हजार पावेतों ठार व पांच हजार जखमी याप्रमाणें जाहले. श्री॥ राजश्री रावसाहेब यांस आणावयास राजश्री सदाशिवपंत उगवले सरकारांतून बुधवारीं गेले आहेत. व काल गुरुवारीं होळकराकडीलही पांचशें स्वार गेले आहेत. येतात किंवा कसें पहावें. श्रीमंत आजपर्यंत चार दिवस डोणज्यास होते तों सर्वांस धीर होता. कालपासून अगदीं सर्वांचीं अवसानें गेलीं! पुढें कोणती मसलत होती पहावें. मार्ग चालत नाहीं. पेंढार अनिवार. जिकडे तिकडे एकच अनर्थ करून दिला आहे! ईश्वरें कृपा शहरावर ते दिवशीं केली. वडिलाकडे संगत पाहून एक दोन दिवशीं राजश्री नरहर बिठ्ठल येतच आहेत. विनंती करतां ध्यानांत येईल. त्याअन्वयें घडावें हें चांगलें. याजउपरी सर्वांची मनोधारणा करून जमाव व्हावा म्हणजे यांत गुण बहुत आहेत. तूर्त पूर्ववत् अंमल बसावा. समय हाच आहे. शहरचे बंदोबस्तास राजश्री राघोपंत गोडबोले यांस पाठवीत होते. परंतु तेच अनमान करितात. उदईक राजश्री हरीपंत भावे येणार आहेत. आज राघोपंत नागो जिवाजी याजबरोबर राजश्री बाजीराव दवें यांजकडे पुण्यांत

आले होते. मुत्सद्दी यांचा मानस मागती जमाव करून होळकराचें पारिपत्य करावें हाच दम मुख्यास देत आहेत. जलचर आणावें, इकडून दौलतराव यास फौजसुद्धां बोलवावें आणि एकंदर जमाव हुजुरातसुद्धां करून शत्रूचीं पारिपत्यें करावीं हा मनसबा करून परशरामक्षेत्र पाहिलें! कुंजर व निंबाजी भास्कर खेरीजकरून लहानथोरांनीं पुण्यास यावें म्हणोन विनंती केली. परंतु इलाज चालत नाहीं. काय भवितव्य आहे ईश्वर जाणे. राजश्री गोपाळराव चिटणीस नगरास झाडून सरंजाम पांच पावेतों आले म्हणोन आवई आहे. श्रीमंत गेले याजमुळें होळकरासही मनसबा पडला आहे. सारा कारभार अव्यवस्थ दिसतो. जम पडोन मार्ग कसा चालो लागतो पहावें. इंगळे याजकडील महाळुंगे गांव निघोज्याजवळ आहे तेथें पायदळ व तोफा आज गेल्या आहेत. सरकारची नौबत जरी-पटका बरोबर हाती ती लढाईचे दिवशीं होळकराकडे गेली. जरीपटका घोड्यावर घालून आणिला. सारांश दोन घटका श्रीमंत जरीपटका घेऊन पलटणचे पाठीवरी उभे रहाते तरी यश संपादिलें असतें. ईश्वरइच्छा. चार दिवस पर्जन्य जाहल्यानें इकडे बहुत कृपा केली आहे. चांगला लागतो. महर्गता बहुत जाहली. दोन पावणेदोन पायली दाणा आज विकला. झाडून मारवाडी वाड्यांत काळ्यांनीं बोलावून अस्तमानीं नेले आहेत. विदित होय हे विज्ञापना.

---

नं० ६४७१ श्री. (कार्तिक शु० ६–२९ आक्टो.) नक्कल

सेवेसी साष्टांग नमस्कार विनंती. उपरी. छ १ रजबपावेतों मुखरूप असों. विशेष. श्रीजेजुरीचे मुक्कामाहून लष्करचें कूच जालें ते घाटाखालीं आलें. नंतर दुसरे दिवशीं कूच होऊन थेऊर कवडी येथें मुक्काम जाला. त्या दिवशीं श्रीमंतांकडील कुंजर निसबतीचें बोलणें जालें कीं, शिंद्याचा तुमचा खटला आहे. याचा उलगडा करून देतों आणि कूच करून माघारें जावें. याविशीं कुंजर, निंबाजी भास्कर, दाजी देशमूख बोलणें बोलावयाकारतां येणार आहेत. परंतु खातरजमा जाली पाहिजे म्हणोन. त्याजबरोन यश-वंतराव याणीं खात्रीचें पत्र सरकारांत कुंजर यांसी पत्रें लिहोन रवाना केलीं.

करार ठरला कीं, छ० २६ जमादिलाखरीं प्रातःकालीं त्रिवर्गांनीं यावें व न आल्यास आम्हांकडे शब्द नाहीं. बहादारीकरितां पाहिजे तर पुणेपासून आलेकर तीन कोशांवर शामतखान व मरिखान यांस पाठवून देतों, ते बहादारी करून घेऊन येतील. याजप्रमाणें ठरून गेले. प्रातःकालीं यावें ते न आले आणि भिवाजी कोलते आले. तेव्हां होळकर बोलिले कीं, करारप्रमाणें आमच्यांत न आले. असो. श्रीमंतांशीं आमचा वाकडपणा नाहीं. परंतु शिंदे यांची फौज पुणेचे आश्रास आहे. तेव्हां आम्हास लढाई देणें प्राप्त आहे असें भिवाजीशीं बोलून स्वडे स्वारी होऊन कवडीचे पुढें दीड कोस येऊन उभे राहिले. उपरांत भिवाजी बोलोन गेला कीं, मी श्रीमंताकडे जाऊन त्रिवर्गांस घेऊन येतों असें बोलोन गेले. नंतर सायंकाळीं धोंडोभट भागवत याचे पुत्र राघोपंत प्रथम संबंधाचे शालक व नारायणराव वैद्य पाराजपंत आले. तेव्हां यशवंतराव यांणीं साफच सांगितलें जे, हे पोरखेळ आम्हांस येत नाहींत. त्रिवर्गांनीं यावे ते येत नाहींत. तेपक्षीं आम्हांसीं कोणासी बोलावयाचें नाहीं. दाबाचीं बोलणीं चांगलींच पडलीं तेव्हां होळकर निघोन गेले. उपरांत छ० २७ जमादिलाखरीं यशवंतराव याणीं सर्व सरदार यांस येक जागा करून लढाईचा बेत करून लढाईस तयार जाले. नंतर लढाईस प्रारंभ हडपसरापाशीं जाला. चार घटकापर्यंत कंपूकंपूची लढाई मातबर जाली. नंतर खाशांनीं चालून घेतलें. उपरांत तरवारातरवारी चांगली जाली. त्या संधींत खासे होळकर घोडेखालीं उतरोन शिंदे यांजकडील कंपूवाले इंग्रज दोन तीन आंत तोफांजवळ होते त्यांची डोकीं कापलीं. त्या गलबलींत यशवंतराव यांस पांच जखमा लागल्या. त्यांत उजव्या हाताचे बोटावर मातबर जखम आहे. बाकीच्या सामान्य आहेत. इतका विचार होतांच शिंदेचे फौजेचा व सरकारचे जरीपटक्याचा पळ जाला. सरकारची व शिंदे यांची खराबी बहुत जाली. येक विंचूरकर यांजकडील तीनशे लोक ठार तीनशे जखमी याप्रमाणें येका पथकाची खराबी जाली. शिवाय मोठमोठीं माणसें जखमी जालीं. बाबूराव आंग्रे जखमा लागून कुलाब्याकडे पळून गेले. सदाशिवराव यांचें ठिकाण नाहीं. होळकर यांज-

१ संरक्षणाची खाली.

कडील बरडीज कंपूचा सरदार यांस गोळा लागून ठार जाला. विकट कंपूचे सरदारास छेऱ्याच्या जखमा लागल्या. शिवाय जखमी बहुत जाले आहेत. नंतर लूट जाली ती कोठवर ल्याहावी ? शिंदेकडील तोफा बावन आल्या. पेट्या छकडे यांस गणती नाहीं ! हत्ती सहा त्यांत नौबतीचा येक व अंबारीचा येक, गुळे चार असे आले. उंटें बैल वगैरे यांची संख्या नाहीं ! गोटच्या गोट लूटून फस्त जाला डेरे राहुट्या-सुद्धां! कांहीं शिंदे यांचा पळ पुण्यांत गेला तो पुणेकरांनीं लुटून घेतला. भवानी पेठेच्या शिऱ्यापासून आदीतवारचे शिऱ्यापर्यंत तीन हजार माणूस ठार जालें. अशी हकीगत लढाईची जाली. होळकर यांची फौज घाशीराम याचे तळ्यापावेतों गेली. उपरांत पुण्याकडील बातमी आणली. श्रीमंत उभयतां लढाईचे आरंभीं भवानी पेठेंत होते. मोड होतांच पर्वतीस गेले. तेथून होळकर याजकडे हुजऱ्या पाठविला कीं, शिंद्याचा जाबसाल उलगडला. आम्ही पर्वतीस आहों. पुढें कसें करावें ? होळकर याणी विचार करून सलतनसुद्धां माघारे येऊन हडपसरीं मुक्काम करून राहिले आणि श्रीमंतांकडे बाजी फडणीस यास पाठविलें. श्रीमंत पर्वतीहून निघोन सिंहगडाखालीं तलवटीं राहून येऊन राहिले. हें वर्तमान बाजी फडणीस यांस कळलेवर माघारे आले. पुण्याचे आंगेचा मात्र होळकर याणीं पक्केपणीं बंदोबस्त करून ठेवला. लष्करचा किमपि उपद्रव नाहीं. नंतर छ० २८ जमादिलाखरीं प्रातः-कालीं भिवाजी कोलते पुन्हां श्रीमंतांनीं लष्करांत पाठविले आणि बोलणीं समेटीचीं लावलीं. तेव्हां यशवंतराव याणीं सांगितले जे, श्रीमंतांनी वाकडे-पणा करावयाचा नाहीं. श्रीमंतांनी पुण्यांत येऊन गादीचा बंदोबस्त करून स्वस्थ राहावें. शिंदे यांचा मात्र पुस्तपन्हा करूं नये. धणी यांणीं उभ-यतांचा बंदोबस्त करून द्यावा, असा बोलण्याचा नाद छ० २९ जमा-दिलाखरीं मध्यरात्रपर्यंत चालला. श्रीमंत पुण्यास येतात असे ठरतही होतें. परंतु कुंजर, निंबाजी भास्कर यांजपुढें श्रीमंतांचेंही चाललें नाहीं. तेव्हां मानकरी यांचें बोलणें पडलें कीं श्रीमंत रा।। अमृतराव साहेब यांसी पुण्यांत आणून ठेवावें. आपण तर आहों येथेंच राहावें. होळकराचा जाबसाल रावसाहेब उलगडून देतील. होळकर कूच करून गेलेवर खाशांनीं

पुण्यास जावें. असें बोलणें पडलें. तेव्हां मानकरी यांचे खातरेबद्दल रावसाहेब यांजकडे सदाशिवपंत उगले यास रवाना करून देऊन पाहाटेचे चार घटका रात्र राहतां आपासाहेबसुद्धां निघोन गेले रायगडचे रोखें. बरोबर श्रीमंतांचे कडील सर्व गेले. बरोबर फौज दोन हजार पर्यंत आहे. याजप्रमाणें विचार जाला. हें लष्करांत कळल्यावर विचार करून रावसाहेबांकडे कारकून हजार स्वार विठ्ठलपंत रावसाहेबाकडून आले होते. समागमें देऊन छ० ३० जमादिलाखरीं रवाना केले. पुण्यांत शिंदे यांची चीजवस्त आणावयास पाठविलें आहे. रायगडाकडे फौजा काल पाठोपाठ रवाना जाल्या आहेत. विठ्ठलवाडीवर आज आहेत. उदेक कूच करून जातील. कळावें. यशवंतराव यांचे शिपाईगिरीची व खंबिरीची शर्त आहे. बहुत काय लिहिणें हे विनंती.

---

नं० ६४७२ (कार्तिक शु. ४–३० आक्टो.)

उतारा–पत्र धोंडो बापूजी जोशी याचें पुण्याहून मिरजेस. (तारीख पैवस्तीची आहे.)

"मालोजी घोरपडे होळकरापासून निरोप घेऊन आपले गांवास बाई देशांत कुमठ्यास गेले. राघोपंत गोडबोले व जनोबा म्हैसकर व बजाबा शिराळेकर याचे बंधु व पेंडसे, कापसे व निजमुरे असे होळकराजवळ आहेत. पुढें घाट कसा होईल तो ईश्वराचे स्वाधीन आहे!"

---

नं० ६४७३ श्री. (कार्तिक शु. ५–३१ आक्टो.)

विज्ञापना. तागायत छ० ३ रजेब सोमवार अस्तमान प्रहररात्रपावेतों सुखरूप असो. विशेष. बाडिलीं छ० २३ मजकूरचीं पत्रें पाठविलीं तीं काल रविवारीं पावलीं. लिहिला मजकूर समजला. इकडील मजकूर तरी श्रीमंत महाडास जाऊन पोहचले. तेथेंच मुक्काम आहे. समागमें विशेष मंडळी नाहीं. कार्यांकारण आज्ञेवरून गेलीं. बरकड मागाहून पागा व पथके गेले. त्यांस घाटाखालीं उतरावयास आज्ञा नाहीं. ते कांहीं अन्नछत्रास व कांहीं तोरण्याचे देशेस आहेत. हजारपर्यंत लोक राहिले. बाकी

जरीपटक्याबरोबर पुरंधरास गेले. श्री॥ राजश्री रावसाहेब यांजकडे ओगले गेले आहेत. त्यांचें म्हणणें कोंकणांत श्रीमंत गेले आहेत. तिकडे यावें. परंतु होळकराकडील दोन हजार स्वार आणावयासी गेले आहेत. तिकडील मानस पुण्यास यावयाचा आहे. एक दोन दिवसांत पुण्यास यावें असा आहे. मग पहावें. बहुतकरून पुण्यासच येतील. रावसाहेब आल्यावर मसलतीचा डौल समजेल. राजश्री चिंतोपंत देशमूख व वैजनाथभट मामा व आबा काळे याजकडील दादा काळे या त्रिवर्गास लष्करास बानवडीस दोनप्रहरीं नेले आहेत. अस्तमानपर्यंत माघारे आले नव्हते. कशाकारितां नेलें याचें कारण समजल्यावर लिहितों. राजश्री जिवाजीपंत नेने धोंडोपंत नेने यांचे बंधु यांस शोध करून बानवडीस धरून नेलें. तीन दिवस बसवून ठेविलें. त्यांजकडे घनगडचा किल्ला आहे त्या किल्यावर राजश्री मोरोबादादा व बाबा फडके दोघे आहेत त्यांस आणोन स्वाधीन करावें म्हणोन निकड बसविली होती. मशारनिल्हे यांणें चिठी लिहून देऊन जामीन दिला आणि आज घरास आले आहेत. घनगडास उभयतांस आणावयासी सरंजाम जाणार आहे. आल्यावर लिहितों. कैलासवासी नाना यांची स्त्री श्री॥ मातुश्री बाईसाहेब गेली तेव्हां समागमें गेली म्हणोन लिहिलें परंतु निघावयाचें संधीत असवर्श जाहली. ती तशीच राहिली. श्रीमंत खालीं गेले तेव्हां न पाठवितां गडबड जाहली. संधि साधली नाहीं याजमुळें हल्लीं पुण्यांतच आहेत. वाड्यांतील व शहरांतील कामकाज आबा काळेच पाहातात. होळकराचे प्रसंगी शहर जगलें, परंतु पुढें परिणाम विपरीत दिसतो ! सैन्यार्थीयास आस्ता पैक्याची बहुत दिसत आहे. पुण्यांत शिंदे यांजकडील पळ आला तो घरोघर लुटला. त्याचा पत्ता काढून नेतात. त्यांत कमजास्ती जाहल्यास घरच्यानें आपलें भरीस घालावें असें चाललें आहे. कांहीं फौज नगराकडेही जाणार. हेंईल मजकूर वरचेवर लिहीतच आहे. विदित होय हे विज्ञापना. मजपाशीं घोडी व तट्टू अशीं दोन घोडीं होतीं तीं नरहर विठल याजबरोबर पाठविलीं आहेत हे विज्ञापना.

---

नं० ६४७४ श्री. (कार्तिक शु. ६ —१नोव्हें.)

पै।। छ० १४ रजब सलास मयातैन. गुरुवार. आठ तास रात्र.

सेवेशीं साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता।। छ० ४ रजब पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. अलीकडे दिल्ली व उज्जनीकडील पत्रें आलीं नाहींत. येथील वर्तमान तर पेशजी छ० २८ व छ० ३० जमादिलाखरचीं लढाईचीं वगैरे मजकुराचीं पत्रें पाठविलीं आहेत. पावोन सविस्तर मजकूर ध्यानारूढ जाहलाच असेल. हालीं येथील वर्तमान तरी, रा।। यशवंतराव होळकर कवडीहून फौजेसुद्धां कूच करून वानवडीस शिंद्याच्या वाड्यांत खासे कार्तिक शु।। ३ शुक्रवारीं राहिले. पुण्याचे चहूं दिशेस कुल फौज गीर्दीन उतरली आहे. श्रीमंत रा।। रावसाहेबांस आणावयास हजार स्वार व आनंदराव होळकर व दोन कारकून याप्रमाणें कार्तिक शु।। ४ शनिवारीं तृतीय प्रहरीं जुन्नरास होळकरानीं रवाना केले. शिंद्याकडील लहान मोठे गृहस्त व सरदार व पागे पथके यांचीं घरें व गांव या देशीं आहेत त्यांचा शोध करून लुटून आणतात. व शहरांतही शिंदे निसबतीचा शोध करितात. शहराच्या नाकेबंद्या करोन शहरांतून बाहेर कोणास निघूं देत नाहींत. सरकारवाड्यांत आबा काळे लोकसुद्धां आहेत व चिंतोपंत देशमुख व वैजनाथभट व अन्याबा अभ्यंकर वगैरे लहान मोठे गृहस्थ आहेत त्यास होळकर यांनीं आबा काळे यांस सांगोन पाठविलें जे, सरकारवाड्याचा बंदोवस्त चीजवस्तसुद्धां चौकी पाहरा आदिकरून राखावें व सदरहू गृहस्थ यांचाही बंदोबस्त राखावा, जिमेस तुमच्या आहेत. व कोतवाल यास बोलावून नेऊन होळकर यांणीं ताकीद केली जे शहरची चौकी रात्रीचा बंदोबस्त पूर्ववत्प्रमाणें तुम्ही करितां कीं आम्ही करावा म्हणोन सांगितलें. त्यावरून कोतवालानीं उत्तर केलें जे, आम्हीच पूर्ववत्प्रमाणें करितों. नंतर कोतवालास शेला पागोटें देऊन लावून दिल्हें व होळकरांनीं आपल्या तर्फेचे दोन कारकून व शंभर पन्नास प्यादे बुधवार पेठेंत मिड्याचे दुकानांत ठेविले आहेत. शहरांत लष्करांच्या लोकांनीं वगैरे पेंढारी यांणीं लूट लढाई जबरदस्ती केली तर बेमुरवत पारपत्य करतात. याप्रमाणें नूर्त आहे. पुढें होईल मजकूर तो लिहूं. होळकराकडील सरदार माने व घोरपडे व

धनगडास उभयतांस आणावयास सरंजाम जाणार आहे. कै० नाना यांची स्त्री श्री० मातुश्री बाईसाहेब गेली तेव्हां समागमें गेली म्हणोन लिहिलें. परंतु निघण्याचे संधीत अस्पर्श जाली ती तशीच राहिली. श्रीमंत खालीं गेले तेव्हां त्याबी तों गडबड जाली. संधि साधली नाहीं. याजमुळें हल्लीं पुण्यांतच आहेत. वाड्यांतील व शहरांतील कामकाज आबा काळेच पहातात. होळकराकडील शेखजी म्हणोन भिड्यांचे वाड्यांत राहिले आहेत तेही पाहातात. एक दोघा पठाणांनीं शहरांत धुंदाई केली याजमुळें एकाचा हात तोडला व एकाचे नाक कापिलें आणि उंटावर बसवून पुण्यांतून फिरविलें. होळकर शिंदे यांचे वाड्यांत वानवडीस येऊन राहिले. जखमा खैर आहेत. फत्तेसिंग माने कवडीवर आहेत. त्यास किंचित् समाधान नाहीं म्हणोन तेथेंच मुक्काम करून आहेत. नागो जिवाजी दोन हजार फौज घेऊन पर्वतीस घोडीं फेरावयाचे रमण्यांत येऊन राहिले आहेत. समागमें रा. राघोपंत गडबोले आहेत. त्याजपाशीं जनार्दनपंत म्हैसकर यांणीं जाऊन प्रेश केला. सर्वांचा सोळावा संस्कार करावा या विचारांत आहेत! एक दोन कुंपण्या पुलाकडे येऊन उतरल्या. शहराबाहेर चिठीशिवाय कोणास जाऊं देत नाहींत. त्यांत ब्राह्मणांस तों जाऊं द्यावयाचेंच नाहीं! × × × शहरांत महर्गता बहुत पडली. पुण्यांतील माणूस लहानथोर दिक आहे. दोनप्रहरीं कोणी मारल्यास त्राता श्रीहरीशिवाय राहिला नाहीं. लढाईचे प्रसंगीं शहर जगलें परंतु पुढें परिणाम कठिण दिसतो. सैन्याधीशास पैक्याची आस्था बहुत दिसत आहे. पुण्यांत शिंदे यांजकडील पळ आला तो घरोघर लुटला त्याचा पत्ता लावून नेतात. त्यांत कमजाजती जाल्यास घरच्यानें आपलें भरीस घालावें असें चाललें आहे. इकडून कांहीं फौज नगराकडे रवाना होणार. × × × विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६४७६ ( कार्तिक शु० ५ भानुवार १ नोव्हें. )

उतारा–पत्र महादेव परशराम यांचें मिरजेस कार्तिक शु० ५ भानुवाराचें

" शिंदे यांचीं पलटणें छत्रींत सांपडलीं होतीं तीं भौमवारीं कौल

मागत होती. तों कौल न देतां हल्ला करून मारून टाकलीं × × × होळकर यांणीं भौमवारीं पंचवीस तीस उंट भरून भोजनाचें वगैरे साहित्य यजमानाकडे ( सिंव्हगडास ) लाऊन दिलें ”

---

नं. ६४७७ ( कार्तिक शु० ७–२ नोव्हें )

उतारा–पत्र राम. आपांचें जमखिंडींतून मिरजेस.

“ सोमवारीं संध्याकाळीं श्रीमंत सिंव्हगडाजवळ गेले तेव्हां रात्र काढली. पाठलाग होता तेव्हां तरकोन वर गेले असतील असें लिहिलें तें खरें. होळकर यांणीं शहराचें रक्षण करून श्रीमंतांस भोजनाचें साहित्य केलें. मोठीच गोष्ट केली ! × × × दोन तीन हजार पेंढार आणविलें होतें तें जवळ आलें. कोणीकडे जावयास सांगावें ते आज्ञा करावी. ”

---

नं. ६४७८ श्रीगणपति. ( कार्तिक शु.७ –२ नोव्हें )

पै॥ छ० ५ रजब. सल्लास मय्यातैन.

विज्ञापना. होळकराचे लष्करांतून येक गृहस्त वाटसरू आज दोन प्रहरां येथें आला. श्रीमंत बुधवारीं रात्रींस सिंहगडचे माचींतून निघोन रायरीकडे गेले म्हणोन सांगतात. वर्तमान तथ्य आहे. लबाड नव्हे. विदित होय. संजीवनीस आणावयास्तव छ० ३ जिल्हेजीं गेले आहेत. लौकरच येतील म्हणोन सांगितलें. विदित होय. रवाना भौमवार तृतीय प्रहर हे विज्ञापना.

---

नं. ६४७९ श्री. ( कार्तिक शु. ७–२ नोव्हें. )

सेवेशीं साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० ५ रवजपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. पेशजी छ० २८ व छ० ३० जमादिलाखरचीं पत्रें व छ० ४ मिनहूचें पत्र ऐसीं सेवेसीं पाठविलीं आहेत. पावोन सविस्तर ध्यानारूढ जाहालेंच असेल. हल्लीं येथील वर्तमान तर, राघोपंत

---

१ महादेव परशराम यांची चिठी तासगांवाहून मिरजेस. २ अमृतरावास.

गोडबोले व जनोबा म्हैसकर होळकरापाशीं आहेत त्यास आलीकडील मंडळांतील लहान थोर गृहस्त व कुंजराकडील व शिंदे यांजकडील लहान थोर गृहस्त वगैरे शहरांतिल लहानमोठे गृहस्त आहेत. इतक्यांची पारपत्यें करावीं हा उद्योग म्हसकरांचा आहे. सध्यां चतुरसिंग दोन चारशानिशीं बाहेर आहेत. त्याचा शिलशिला होळकराकडे आहे. त्यास होळकरांनीं दोन तीन हजार फौज व येक पलटण याप्रमाणें जेजुरीस पाठविलें आहे. तेथून सातान्यास जाऊन वरील खालील बंदोबस्त चतुरसिंगाच्या मार्गे करोन करावा. हा बेत होऊन येशवंतराव घोरपडे सदरहू फौज घेऊन गेले आहेत. फत्तेसिंग मान्यास समाधान नाहीं. मधुरा जाला आहे. रहिमतपूरकर रयतेस फत्तेसिंग माने यांणीं ताकीद केली जे, साल मजकूरचा ऐवज कमाबीसदारास न देणें. तो ऐवज होळकराकडे देणें आहे. राज्याच्या बंदोबस्ताविशीं जो मजकूर ठरणें तो आज अथवा उद्या ठरेल तो लिहून पाठऊं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६४८० श्री. ( कार्तिक शु० ११।६ नोव्हें )
पै० छ० १४ रजेब गुरुवार.

विज्ञापना. तागायत छ० ९ रजेब मंदवारपावेतों सुखरूप असों विशेष. रा० चिंतोपंत देशमुख व वैजनाथभटमामा यांस लष्करांतून बोलावणें येऊन उभयतां गेले. याजपाशीं बोलले कीं, तूर्त दहा लाख रु. देणें. याजवर याणीं उत्तर केलें कीं, श्रीमंतास लिहून पाठवितों. उत्तर येईल त्याप्रमाणें सांगूं. तेव्हां त्यांचें म्हणणें पडलें कीं, उत्तर सावकाशपणें आणावें, तूर्त खर्चास द्यावें म्हणोन माघारें लावून दिल्हे. आणि कोठें जातील येतील याजविशीं जामीन घेतले. उभयतां येऊन पूर्वी श्रीमंत असतां पट्टीचा प्रयोग चालला होता. तोच यांणीं चालविला हें वर्तमान त्यास समजतांच मागती उभयतांस बोलावून नेलें आणि सांगितलें कीं, शहरांत पट्टी करून हा पैका तुम्ही आम्हांस देणार कीं काय ! तेव्हां उभयतांनीं समजाविलें कीं, श्रीमंत असतां पट्टीचा ठराव बहुतेक जालाच आहे. वसूल मात्र व्हावयाचा तो करून देतों. याजप्रमाणें

घोडून अस्तमानीं माघारे वाड्यांत आले. नंतर दशमीस दुसरे दिवशीं झाडून दुकानास प्यादे बसविले व सदाशिवपेठेंतही घरोघर प्यादे बसविले. त्या दिवशीं बाजारांत विकरा जाला नाहीं. सायंकाळीं झाडून पेठकरी वाड्यांत सरकारच्या गेले. तेथें दाद लागली नाहीं. नंतर एकादशी भृगुवारीं प्रातःकाळीं झाडून दुकानदार लहानथोर लष्करांत गेलें. यशवंतराव याणीं सर्वांस आश्वासन देऊन सुखरूप सर्वांनीं व्यवहार करावा, पट्टीचा तगादा तुम्हास होऊं देत नाहीं, याजप्रमाणें सांगून निरोप दिल्हा आणि समागमें हरकारे दिल्हे त्याणीं झाडून चौकीचे प्यादे उठवून दिल्हे. एकादशीस पैशाची साखरदेखील मिळेना अशी गत जाली. आज सर्वत्रांनीं दुकानें उघडून विकरी करूं लागले. गुरुवारीं पंचवीस हजार रुपये देतों म्हणोन करार केला ते पावले नाहींत म्हणोन निकड रात्रीस बसविली तेव्हां उभयतांनीं वीस हजार रुपयांचीं जवाहीर वगैरे ताटें वाटया वगैरे सरकारच्याच भरती करून दिल्हीं. नंतर प्रातः-काळीं उभयतांस फडावर आणून आंगठे धरविले. दोन घटका तैसेच होते. नंतर वाडयांतून चालवीत मेहेंदळ्यांचे वाडयाजवळचे पागेंत नेले. तेथें चार घटका होते. तेथून भिडयांचे वाडयांत घेऊन गेले. तेथें होळकराकडील कारकून असतो. तेथें पैक्याची निशा करून देणें म्हणोन पुढें चाप आणून टाकिले. चिंतोपंत यास ओणवे करून पाठीवर वैजनाथभट यास बसविलें. असेंही दोघटका जाले. नंतर तिसरे प्रहरीं सरकारचे वाडयांत उभयतांसही आणून स्नान करविलें. सायंकाळीं दीड लाख रुपयाची निशा करून घेतली. आजही उपद्रव तसाच आहे उभयतां श्रीमंताबरोबर गेले असतां मागतीं वाडयांत घेऊन पेचांत पडले. शहरांतील माहीतगार बहुत त्यांजकडे ( होळकराकडे ). अंतोबा मूळ व बापू कुंटे यांस धरून नेलें, झाडून सर्वांचे दरवाजे लागले आहेत, बहुतरून अटकेंत आहेत, × × घोंडोपंत गडबोले याजकडील पल्टणी लोक दोन तीनशे लोक पर्वतीजवळ चार तोफा घेऊन राहिले होते ते आजच्या रात्रीस झाडून लुटून घेतले. विदित होय हे विज्ञापना.

———

नं. ६४८१ श्री. (कार्तिक शु. ११ –६नोव्हेंबर)

पै० छ० १४ रजब गुरुवार सन सल्लास.

विज्ञापना. तागायत छ० ९ रजेब मंदवार तिसरा प्रहरपावेतों सुखरूप असे. विशेष. इकडील मजकूर तर श्रीमंत विरवाडीस वे० रा० गोविंद जोशी याचे घरीं आहेत. पांचशें स्वार समागमें गेला आहे. विरवाडीचीं घरें झाडून गल्याकरितां लुटलीं. व रानांतील भातें झाडून कापिलीं. सुवर्णदुर्गास अथवा विजयदुर्गास जावें अशी योजना आहे. स्थळाचा निश्चय होऊन जाणें घडेल तेव्हां खरें. कोणास खर्चास पावत नाहीं. कांहीं लोक घाटावर आहेत. राजश्री जिवाजीपंत नेने यांजकडे धनगडचा किल्ला होता त्यास धरून नेऊन त्याजपासून उभयतां खालीं उतरून देणें म्हणोन चिठी लिहून घेऊन, ऐवजाचीं निकड आहेच, कर्णफुलेंही[१] लागतात व चिंतोपंत याजपासून सरकारची सनद किल्ल्यास लिहून घेतली आणि शिक्के खालीं केले तेव्हां मुतालकीचे शिक्के होते तेच त्याजकडून करवून सनद व चिठी व लोक किल्ल्यास पाठविले. किल्लेकरी यांणीं सनद व चिठी पाहतांच रा. मोरोबादादा फडणीस व बाबा फडके यांस किल्ल्याखालीं उतरून दिल्हें. तों श्रीमंतांकडून तीन चारशे लोक पाईचे घेऊन विठोजी नाईक जासूद आला. तो उभयतां गेलेनंतर निघोन खालीं गेला. किल्लेकरी यांस विचारलें तेव्हां त्यांणीं सनद दाखविली. उभयतां वांबवड्यास आले. दोन्ही घरचा सरंजाम भोजनाचा वगैरे गेला. दोनप्रहरीं आले. आज दिवस चांगला नाहीं. उदईक भेटी होतील. बहुतकरून लष्करांतच राहणें होईल असें आहे. श्री. राजश्री रावसाहेब यांस आणावयास पेशजी पांचशें स्वार गेले त्याजवर दोन दिवसांनीं हजार स्वार गेला. परंतु तेथील वेत निघण्याचा मतलबावर पाहून आणखी चार हजार फौज गेली. तेथून कूच होऊन मनचरास आल्याच्या बातम्या आहेत. उदईक यावें अथवा सोमवारीं यावें असें बोलतात. सारांश एक दोन दिवस जाजती लागल्यास चिंता नाहीं परंतु येतात. तेही लष्करांतच राहतील अशी लष्करची बोलवा आहे.

---

१ कर्णफुलें = कानास चाप !

इकडील काल सरकारचा उष्टरखाना गेला. बाड्यांतील चौकी पहाऱ्याचा बंदोबस्त आबा काळ्याकडेच आहे. + + + जमाव जाल्यावांचून स्वस्थ बसणें अवघड दिसतें. जमाव करून सर्व एकत्र करून तिकडे कार्यें बहुत आहेत तींच उरकण्यांत आलीं असावीं. तिकडील सावनूर तालुक्याचा वगैरे बंदोबस्त करावा. समय हाच आहे. रायगडास श्री० मातुश्री बाईसाहेब सुखरूप आहेत. स्वइच्छेंत आहेत असें लौकिकांत बहुत आहे. ईश्वरें कृपा केल्यास काय न घडे ? मी शोधांत आहें. + + + विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६४८२ श्री. ( ८ नोव्हेंबर )

पै॥ छ० १४ रजब सुरु सन सलास मयातेन व आलफ.

सेवेसीं धोंडो बापूजी शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ कार्तिक शु॥ १३ सोमवार पावतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. काल रविवारीं दोनप्रहरां श्रीमंत राजश्री अमृतराव साहेब भांबवडें येथें तोफखान्यांतील बंगल्यांत मुक्काम आहे. राजश्री मोरोबा दादा व बाबा फडके हे उभयतां शु॥ ११ शुक्रवारीं आले. श्रीमंतांच्या व होळकर व दादा व बाबा ऐशांच्या भेटी काल रविवारीं दोनप्रहरां खडकीचे पुलाजवळ जाहल्या. प्रथम भेट होळकर याची जाहली. दिपवाळीचे दिवशीं लढाई बिघडली तो मजकूर लिहून सेवेसीं पाठविला; परंतु मार्गानें निभाव न होई व अशा मनस्वी मार्गी लागले. येसू कागदा येथें आला होता. त्यासही विचारलें परंतु मार्गी निभावणेचें कठीण. येसू आपले मुलालेंकरांकडे गेला तोही अद्याप आला नाहीं. तिकडे काय गत जाहली असेल न कळे. श्रीमंत बाजीराव साहेब व आपासाहेब बिरवाडीस आहेत तेथें जमाव दीड हजार दोन हजारपर्यंत आहे म्हणोन बातमी आहे. बरकड फौज होती ती जिकडील तिकडे गेली होती. त्यास श्रीमंत अमृतराव साहेब यांची पत्रें गेलीं कीं, आपलाले जमावानिशीं येऊन आप आपले दिल्हेबार उतरावें, म्हणोन आजच गेलीं. श्रीमंतास आणावयास होळकर

---

१ उंटांचा लवाजमा. २ सवाई माधवराव यांची स्त्री.

याजकडील दोन तीन हजार फौज गेली होती ती श्रीमंत जातांच होळकर याचे लष्करांत गेली. चार पलटणें व कांहीं लोक सिंहगडाजवळ उतरले आहेत. रायगड व पुरंधर हडसर कुवारीवर गृहस्थ होते त्या किल्ल्याचीं बोलगीं होळकर याजकडे आलीं आहेत. श्रीमंत मातुश्री येशवदाबाई व माधवराव रायगडावर आहेत त्यांस तेथील कारभार माधवराव रास्ते यास सांगोन बंदोबस्त केला म्हणोन वर्तमान आहे. मुलें माणसें कोंकणांत दंग्यामुळें पाठविलीं होतीं; परंतु तिकडे राजश्री बाळकृष्ण गंगाधर खंडण्या करावयास गेला आहे म्हणोन ऐकण्यांत आहे. कोंकणांत तो प्रळय प्राप्त जाहला. मुलें माणसें तेथून आणखी कोणीकडे गेलीं असतील न कळे. जासूद जोडी एक पाठविणेंस आज्ञा करावी. इकडील अधिक उणें वर्तमान होईल तें वडिलांस लिहून पाठवीन. येसू कागदा• घरास गेला तो आला नाहीं. आल्यावर त्यासही पाठवीन. बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

---

नं. ६४८३ छ० ११ रजेब सोमवार. ( कार्तिक शु.१४ –८ नोव्हें )

उतारा—पत्र कारकुनाचें पुण्याहून मिरजेस.

" सिंव्हगडचें बोलणें आलें. तेथील अटकेंतील गृहस्थ लौकरच येतील. पुरंदरचेंही संधान आलें. रा. नारोपंत चक्रदेव यांजकडेही आणावयास स्वार गेले आहेत. तत्संबंधीं गृहस्थ वगैरे यांचे घरीं झाडून चौक्या बसवाव्या असें ठरलें होतें परंतु रावसाहेब आल्यामुळें तूर्त मंदी दिसत्ये. देशमुख व मामा यांचे विचार चाललेच आहेत. "

---

नं. ६४८४ ( कार्तिक शु० १४ –८ नोव्हें. )

उतारा—चिंतामणराव पांडुरंग यांचें पत्र मिरजेस बाळासाहेबांस.

" + महाराज व राजाज्ञा करवीरास आहेत. होळकरांकडे हत्ती वस्त्रें पाठविणार असें ऐकिलें म्हणोन लिहिलें तेंही कळलें. "

---

+ करवीरकर महाराज, कित्तूरकर देसाई व कर्नाटकी कारक यांच्या दंग्यासंबंधाचीं पुष्कळ पत्रें आम्ही स्थलाभावामुळें गाळलीं आहेत.

नं. ६४८५ श्री. [कार्तिक शु.१५ -९नोव्हें.]

सेवेशीं साष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता॥ छ० १२ रजबपावेतों वर्तमान यथ स्थित असे. विशेष. दिल्लीहून पत्र आलें तें अलाहिदा पाठविलें आहे. त्याजवरून सविस्तर विदित होईल. हल्लीं येथील वर्तमान तर, धोंडो केशव नेने यांचे बंधु जिवाजी केशव यांजकडे कुंजरानें घनगड सांगोन रा॥ मोरोबा दादा व बाबा फडके किल्ल्यावर ठेविले होते. त्यास जिवाजी केशव याची बातमी लावून धरून होळकराकडील कारभारी नागो जिवाजी शहरांत आहेत त्यांणीं जिवाजी केशव यास कोरड्याचा मार देऊन कानास चाप लावून उभयतांची सोडचिठी किल्ल्यास घेऊन पांचशें गारद व पांच तोफा व सोडचिठी अशी होळकरांनीं घनगडास पाठवून मोरोबादादांस व बाबा फडके यांस घेऊन आले व श्री॥ रा॥ रावसाहेब यांसही जुनराहून होळकरांनीं आणून कार्तिक शु॥ १३ रविवारीं खडकीनजीक रावसाहेब व मोरोबा फडणीस व बाबा फडके आले. यशवंतराव वीस हजार फौज व तोफखाना घेऊन सामोरे दोन कोस खडकीनजीक येऊन परस्पर भेटीचा समारंभ उत्तम प्रकारचा होऊन परस्परें मुदारतीचीं भाषणें होऊन खुषीच्या तोफा शंभर शंभर आवाज दोहींकडील होऊन यशवंतराव वानवडीस मुक्कामास गेले. रावसाहेब व मोरोबादादा व फडके भांबवड्यास मुक्काम आहे. बाकी चक्रदेव व शिराळकर वगैरे लहानथोर गृहस्थ पर्वतवासी आहेत यांस होळकर लौकरच घेऊन येणार. चिंतोपंत देशमुख व बैजनाथ भट यांणीं रयतेस पट्टीचा तगादा करून गारदी बसविले हें वर्तमान होळकरांस समजल्यानंतर रयतेचा तगादा दूर करून देशमुख व बैजनाथभट व अंतोबा सूळ यांची. अप्रतिष्ठा करून गैरअब्रू होळकराकडील कारभारी नागो जिवाजी यांणीं रामाजी नाईक भिडे यांचे वाड्यांत केली ती पत्रीं लिहितां येत नाहीं. बैजनाथभट व देशमुख याजपाशीं चार लाख रुपये होळकर मागतात. व अंतोबा सूळ यास लाख रुपये मागतात. व नवे मंडळपैकीं गृहस्थ आहेत त्यांचीं घरें लुटण्याचा प्रारंभ होऊन अन्याबा अभ्यंकर व अन्याबा राहातेकर यांची लुटली. घरें हा क्रम चालला आहे. नवी मुद्रा करणें हा बेत सर्वांचें मतें सिद्ध होईलसा

दिसतो. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. धोंडोपंत गोडबोले याजकडील गारदी पांचशें व स्वार पांचशें व तोफा पांच याप्रमाणें पुण्यांत होते त्यास छ० ९ रोजीं होळकरांनीं गैरअब्रू करोन लुटून घेतलें हे विज्ञापना.

---

नं. ६४८६ श्री. [ कार्तिक शु० १५-९ नोव्हें. )

पै॥ स० १३ रजब सुरू सलास मयातैन व आलफ.

सेवेशीं विनंती सेवक बाळाजी महादेव दामले चरणांवर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता॥ छ० १२ रजबपर्यंत स्वामींचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत रा॥ पंतप्रधान स्वामींची स्वारी कोंकणांत गेली. त्याचा मुक्काम निरवाडीस आहे. बरोबर दोन तीन हजार फौज आहे, श्रीमंतांच्या बायका किल्ले सुवर्णदुर्गास आहेत, श्रीमंत गंगाभागीरथी मातोश्री बाईसाहेब यांस किल्ले रायगडावर ठेविलें आहे. श्रीमंत रा॥ अमृतरावसाहेब यांस आणावयास होळकर याणीं चार हजार फौज पाठविली होती. परंतु रावसाहेब येत नाहींत, होळकर याचा मुक्काम वानवडीवर आहे. खासा होळकर शिंदे याच्या वाड्यांत राहिले आहेत. रा॥ फत्तेसिंग माने यांचा मुक्काम पर्वतीजवळ आहे, शहरा भोंवताल्या चौक्या होळकर याच्या आहेत. सरकारच्या वाड्यांत रा॥ चिंतोपंत देशमुख व आबा काळे व बैजनाथ भट भागवत आहेत, त्यांस दहा लक्ष रुपये खर्चास द्यावे म्हणून होळकर याणीं निकड लाविली आहे, वाड्याबाहेर चौक्या होळकर याच्या आहेत, दोन हजार फौज जरीपटका घेऊन छ० ९ रजबीं सातान्यास आली, धणी कोणी निशाणास नाहीं. याजकरितां किल्ल्यावर निशाणें ठेवणार, माने याजकडील नारायणराव माने दोन तीन हजार फौजेनिशीं देहूच्या मुक्कामास आले; राजश्री चतरसिंग भोसले हजार जमावानिशीं देहुगास होते त्यांच्या मान्याच्या भेटी जाहल्या, प्रांतांत खंडण्याचे रोखे करितात विकें चारितात. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

१ पत्र रहिमतपुराहून मिरजेस,

नं. ६४८७ [कार्तिक व० १–१०नोव्हें.]

उतारा—पत्र कारकुनाचें होळकराच्या लष्करांतून मिरजेस.

[१३ रजब.] "छ० १० रजेबीं राजश्री मोरोबादादा फडणीस व बाबा फडके हे सुटोन येऊन भांबवड्यास पेठ्यांचे वाड्यांत येऊन राहिले. दुसरे दिवशीं छ० ११ रजेबीं श्री. राजश्री रावसाहेब पुत्रसुद्धां भांबवड्यास आले. त्यादिवशीं यशवंतराव पुढें सामोरें खडकीच्या पुलापर्यंत गेले. पूर्वी फडणीस व फडके यांच्या भेटी होऊन उपरांत राव यांच्या भेटी होळकर याणीं घेतल्या. नंतर या उभयतांच्या भेटी राव यांच्या होऊन भांबवड्यास डेरे देऊन मुक्काम करून राहिले. + + + चिंतोपंत व मामा व आबा काळे व त्याचे पुतण्ये व अंतोबा सूळ हे कैदेंत ठेविले आहेत. × × × सिंव्हगडास पलटणें व तोफा गेल्या आहेत"

---

नं. ६४८८ (कार्तिक व० १–१० नोव्हें.)

उतारा—पत्र धोंडो बापूजी जोशी याचें पुण्याहून मिरजेस.

"सरकारच्या तोफखान्यांतील तोफा चांगल्या चांगल्या मोठ्या होळकर याणीं अठरा कोसपर्यंत नेल्या. शहरची बंदी दिवसेंदिवस अधिक होत आहे. जुने लोक धरीत आहेत. त्यांजपासून पैका घेत आहेत. + + + पागे पथके यांजला पत्रें रावसाहेबांची [अमृतरावांचीं] गेलीं व मंगळवेढ्याकडे (चिंता. आपा सांगलीकर यांस) गेलीं असें आइकतों. जरीपटका (नाना पुरंदरे) सातारे यांजकडे पळून गेला त्यांसही पत्रें गेलीं. कोट रुपये होळकर मागतो इतका पैका शहरांतून उत्पन्न करून द्यावयाचा विचार आहे."

---

नं. ६४८९ श्री. (कार्तिक व० ३–१२ नोव्हें.)

पै० छ० १५ रजेब सन सल्लास.

विज्ञापना. अंतोबा सूळ व बापू कुंटे या उभयतांस भिडे यांचे वाड्यांत नागो जिवाजीकडे नेले होते. त्यास कुंटे सुटोन आले. सूळ यास बेडी घातली. नंतर पंचवीस हजार रुपये देतों म्हणोन व कबूल जाले म्हणोन बेडी काढली.

दुसरे दिवशीं ऐवज मागों लागले. तेव्हां मजपाशीं पैसा नाहीं म्हणोन सांगितलें तेव्हां आज लष्करांत लावून दिल्हें. केसोपंत साठे यास सोडावें असें जालें. परंतु वांईकर ब्राह्मणांनीं होळकरास सांगितलें मशारनिल्हे याणें वांईत अनर्थ केला त्याचें पारिपत्य कांहींच जालें नाहीं. आपण यथाविधि पारिपत्य करावें अथवा आमचे स्वाधीन करावा. त्याजवरून सोडावयाची तहकुबी जाली. रा० जनार्दनपंत म्हसकर याणीं होळकरास अडीच कोट रुपयांची याद समजाविली त्यांत पटवर्धन तिन्ही घरचे पदरचे लहान मोठे आदिकरून याद लिहिली व येथील शहरांतील यादी दाखविल्या. परंतु होळकर याजकडील मुत्सद्दी यांचा रुकार पडला नाहीं व खाशाच्याही चित्तांत नाहीं त्याजवरोन मा।निल्हेचा लौकरच अस्त होईल. + + + लुटण्यास बहुत मिळतील परंतु आवर घालावयास कोणी येथें दिसत नाहीं. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६४९० श्री. १३ नोव्हें.

पै।। छ० २४ रजब सुरु सन सलास मयातेन व आलफ.

आपत्यें भास्कर रामचंद्र वैद्य दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता।। कार्तिक ब।। ४ पावेतों वडिलांचे आशीर्वादें मुक्काम पाडळी येथें सुखरूप असो. विशेष. वडिलीं छ० ९ रजबचें पत्र पाठविलें तें पावलें. तिकडील सविस्तर लिहिलें तें कळलें. इकडील राज्यप्रकर्णी वर्तमान लिहिणें म्हणोन आज्ञा. त्यास रा।। यशवंतराव होळकर याजकडील नारायणराव माने दोन तीन हजार फौज व दोन तोफा व कांहीं फलटणचे लोक जमावसु।। वाई देशांत आले आहेत. खंडण्या मनस्वी घेतात, मुलूख तमाम उजाड होत आहे. आजच मार्गे मुक्काम होता तो कूच करून साताऱ्यानजीक दोन कोसांवर मुक्काम जाहला आहे. मौजे पाडळी येथील खंडणी दोन हजार जाहली. वसूल होत नाहीं. उपद्रव बहुत आहे. रा।। चतुरसिंग भोसले दोन हजार फौजनिशीं होळकराची फौज व ते एकत्रच आहेत. चतरसिंग यांच्या खंडण्या निराळ्याच होतात. राजश्री नाना पुरंधरे सरकारची फौज व जरीपटकासु।। साताऱ्यांत शहरांत आहेत. सरकारच्या पागा व कांहीं लोक आज प्रातःकाळीं

तलाश करावा म्हणून आले ते चतरसिंग याजपाशीं येऊन मुक्काम करून राहिले. पुढें काय होईल तें पहावें. पुण्यास बातमीकरितां जासूद पाठविला होता. श्रीमंत रा॥ अमृतराव साहेब व मोरोबा दादा व बाबा फडके व राघोपंत गडबोले येऊन दाखल जाहले. नारोपंत चक्रदेव वगैरे मंडळीस आणावयास गेले आहेत. रायगड येथें रा॥ माधवराव रास्ते होते तेथेंच श्रीमंत येशवदाबाई व नाना फडणीस यांची स्त्री होती त्यास श्रीमंत बाई-साहेब यांस कोणी मारेकरी घातले तें समजोन हवलदार व रास्ते एकत्र होऊन बाळोजी कुंजर यांजकडील कारकून किल्ल्यावर होता त्यास कैद करून किल्ल्याचा बंदोबस्त माधवराव रास्ते यांणीं केला. येणेंप्रमाणें बातमी आहे. चिरंजीव दाजींचें पत्र आलें होतें त्याचें उत्तर पाठविलें आहे तें चिरंजीवांकडे रवाना करावयासी आज्ञा जाहली पाहिजे. आम्ही दंग्यामुळें पाडळी माहुली इतक्यांत आहों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६४९१ श्री. १३ नोव्हेंबर

पै० २२ रजेब सुरसन सल्लास.

विज्ञापना. तागायत कार्तिक व० ४ मंदवार प्रहररात्रपावेतों सुखरूप असे. विशेष. श्री० राजश्री रावसाहेब यांची स्वारी भांववडेयाच्या मुक्कामीं आल्यावर दुसरे दिवशीं रा० यशवंतराव होळकर भेटीस आले हा मजकूर पेशजीं लिहिला आहे. त्याच बैठकेंत श्रीमंतांनीं खालून यावें, कोणत्या गोष्टीचा संशय चित्तांत आणूं नये याप्रमाणें रावसाहेब यांची व होळकर यांचीं पत्रें रवाना जालीं. त्यांचीं उत्तरें अद्यापवत आलीं नाहींत. परवां गुरुवारीं राजश्री मोरोबादादा व बाबा फडके उभयतां होळकर याचे डेऱ्यास तिसरे प्रहरीं गेले. अस्तमानीं माघारे आले. काल भृगुवारीं सायंकाळचे चार घटका दिवसास रावसाहेब यांची स्वारी होळकराकडे गेली. समागमें श्री. राजश्री विनायकरावही गेले होते. अस्तमानीं माघारे आले. वस्त्रें व जवाहीर उभयतांस दिलें. त्या बैठकेंत पुढील कर्तव्यतेचीं बोलणीं जालीं. त्यांत रावसाहेब यांणीं सांगितलें आणखीं आज पत्रें महाडास रवाना पराकाष्ठेची करतों. त्याचीं उत्तरें चवथे

दिवशीं येतील. मानस पुण्यास यावयाचा अथवा न यावयाचा तें समजतें. नंतर मनसबा ठरण्यांत येईल. तोंपर्यंत बोलूं नये. याप्रमाणें ठरलें. होळकर सरकारचे डेऱ्यास आले होते ते दिवशीं कंठी व शिरपेंच व साडे-तीन सनगें याप्रमाणें दिल्हे. शहरांत होळकराकडील उपद्रव मनस्वी लागत होता त्याचा बंदोबस्त जाला. रावसाहेब यांचे आज्ञेशिवाय कोणती गोष्ट होऊं नये, शहरांतील काम झाडून रा० हरिपंत भावे याजकडे रावसाहेब यांणींच सांगितलें. कालपासून आपला अंमल मा।।निल्हे यांणीं बस-विला. पेशजी होळकराकडून नागो जिवाजी व शेखजी व हरनाथ कार-भार शहरांत करीत होते. त्यांच्याच नाकेबंद्या. ते उठोन गेले. नाके-बंदी बाहेरील व गावांतील भावे यांणीं केली. तूर्त पुण्यांत गडबड नाहीं. लडाई जालेवर धारण दोन पावणेदोन पायलीवर आली होती. अठ चार दिवस चाललेनंतर होळकर यांणीं बंद बांधोन दिला कीं, तीन पायली जोरी बाजरी, आणि अडीच पायली गहूं हरभरे याप्रमाणें विकावें. यांत कमी जाल्यास हात तोडूं अशी दवंडी फिरविली. त्याजपासून धाकामुळें बंध बांधोन दिल्याप्रमाणें पावशेर अच्छेर कमजास्त विकरा होत आहे. ( सरकार ) वाडयांतील बंदोबस्त जनार्दनपंत फाटक बाकनिशी-कडील रावसाहेब यांचे स्वारीबरोबर होते त्यास सांगितला. प्रथम रा० बापू साने याजकडे सांगत होते. त्यांनीं मान्य केलें नाहीं म्हणोन फाटक याजकडे सांगितलें. हशमापैकीं चारशे लोक सरकारवाडयांत असावे अशी पूर्वींची नेमणूक. त्याप्रमाणें रा० भास्कर महादेव फडणीस यास तुम्हांकडील लोक वाडयांत यावे म्हणोन आज्ञा जाली. त्यावरोन तेही लोक जमा करीत आहेत कांहीं चौक्या वाड्यांत गेल्या. गोविंदराव बर्वे यांचे काम वाडयांतील पूर्ववत् त्याजकडे सांगितलें. रा. नारो सिवराम खासगीवाले यासही आज्ञा जाली, तुमचे कारखाने पूर्वींचे आहेत त्यांचा बंदोवस्त करावा. त्याजप्रमाणें त्यांणीं मान्य केलें. हुजुरनागा ढेरे याजकडे त्याचा बंदोबस्त ढेरे यास सांगितला. घोडीं उंटें वगैरे चोहीकडे चारणीस गेलीं होतीं तीं मा।।निल्हे एकजागां करूं लागले. आबा काळे व रूपराम चौधरी याजकडील पलटणी लोक वाड्यासभोंवते होते त्यास झाडून तोफखानें व बंदुका लोक जवळ बसले असतां होळकरा-

कडील छकडे येऊन भरून गेले. लोक उठोन गेले. काळे यास वाड्यांत प्रतिबंध जाला. सरकारवाड्याजवळ तोफा नाक्यानीं ठेविल्या होत्या त्याव कांहीं तोफखान्यांतील नामी अशा आठ तोफा व कांहीं दारूगोळा जबरदस्तीनें घेऊन गेले. रावसाहेब यांजकडे सांगून पाठविलें, दारूगोळा व तोफाचें अगत्य मला याजकरितां घेऊन जातों म्हणोन तिकडे सांगून पाठविलें आणि इकडे हें काम केलें. कांहीं बैलही नेले त्यास आज चवथा दिवस. नंतर शहरचा बंदोबस्त जाला. जुने अंमलदार जितके आहेत त्यांस हुडकून त्यांचें त्यांजकडे काम सांगत आहेत. सिंव्हगडचे बंदीवान आणावयाकरितां फौज पायदळ गेलें तें खालीं पाईसच आहे. तेथील कोणी आले नाहींत. रा. नारोपंत चक्रदेव यांस आणावयास हजार स्वार गेले आहेत. झाडून किल्ल्यास हुशारांनें असावें म्हणोन सनदा रावसाहेब यांच्या नांवच्या जात आहेत. त्यावर तेरखा खासा फडणीसच करतात. श्रीमंत महाडास आहेत. रा. माधवराव पानशे खर्चास नाहीं म्हणोन निरोप घेऊन आले. बनल्यास सुरतेस जाऊन तिकडून उज्जनीस जावें असेही बेत आहेत. + + + पुण्यांत शिंदेप्रकरणीं गृहस्थ व कुंजराकडील वगैरे यांची चौकशी बहुत होत आहे. रा० बाळाजीपंत करंदीकर शिंद्या-कडील यांचें घर दरोबस्त लुटून नेलें. घरांत माणसें कोणी नव्हतीं. आपाजीपंत सदावर्दी आठ दिवस जाऊन फडणीस व फडके याजपाशीं राहिले आहेत. उभयतांनीं स्वस्थ असावें म्हणोन सांगितलें. घरांतील बायकामुलें व बंधु एकेका वाटेस गुप्त ठेविलीं. गोपाळराव गानू यांचे घरीं चौकी बसली आहे. कारण समजत नाहीं. दुल्लभदास नि॥ हरि-भक्ति यांस लष्करांत तीन दिवस नेऊन बसविला होता. आठ हजार रुपये रोजाचे पडले. रावसाहेब यांचे आज्ञेवरून सुटून आला. अशा रीती चालल्या आहेत. काय घडणें तें घडो. प्रसंग अवघड दिसतो. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६४९२ श्री. [कार्तिक व. ८–१५ नोव्हें.]

पे. छ० २३ रजेब मंदवार.

ऐ. ले. ६. १३.

विज्ञापना. तागायत छ० १८ रजेब सोमवार अस्तमान पावेतों सुखरूप असे. विशेष. काल रविवारीं दोन प्रहरीं रा॥ यशवंतराव होळकर याची स्वारी श्रीमंतांच्या डेऱ्यास आली. समागमें रा. फत्तेसिंग माने व पठाण शामीरखान व मीरखान याजप्रमाणें येऊन एक प्रहर बैठक जाली. सायंकाळचे साहा घटका दिवसास निघोन आपलाले डेऱ्यास गेले. फडणीस व फडके खलबतांत आले नव्हते. आज श्री० राजश्री रावसाहेब यांची स्वारी वडगांवास दोनप्रहरानंतर गेली. अस्तमानीं माघारे डेऱ्यास आले. आज सोमवारचा उपास आहे. कोंकणचा रंग येण्याचा दिसत नाहीं. पेशजी पत्रें उभयतांचीं गेलीं त्यांचीं उत्तरें आलीं कीं, तुम्ही बहुत खातरजमेनें लिहिलें परंतु आम्हांस खरें वाटत नाहीं. रा. चिंतोपंत व मामा उभयतां यांजपाशीं जीं बोलणीं असतील तीं बोलून त्यांणीं आमची येऊन खातरजमा केल्यास नंतर स्वारी येण्याचा विचार करावयास येईल. ते आले नसतां खातरजमा होत नाहीं. दुसरे बैठकेंतील पत्रें गेलीं आहेत त्यांचीं उत्तरें काय येतात पहावीं. तीं याजप्रमाणेंच आल्यास महाडाकडे फौज रवाना होणार. मग काय घडणें तें घडो. रा. नाना पुरंदरे सातारियांत जाऊन राहिले होते ते किल्ल्यावर जरीपटका गेले. समागमें बापू चाफेकर व दहा पांच ममतेचे नेले असतील. बरकड पागा पथकें होतीं त्यांस सांगितलें कीं, याजउपरीं तुमचे विचारास येईल तसें करणें. आमची वाट पाहून राहूं नये. याजउप्पर पागा निघोन पुण्यास येतात. परंतु पाठीवर इकडील होळकराची फौज गेली आहे त्याचे झपाट्यास सांपडल्या तर फडशा जाला ! + + + राजश्री हरीपंत भावे रा० नीळकंठराव खासगीवाले यांचे वाड्यांत जाऊन उतरले. तेथून शहरचा कारभार करीत आहेत. रा. देशमुख व मामा यांचे घरीं आज दोनप्रहरीं चौक्या बसल्या आहेत. देशमुखाचे घरीं एक कारकून सांपडला. बाजत पळाले. अण्णा देशमुख गुप्त आहेत. बांकडे यांचे घरीं चौकी बसोन त्याचे विपत्य बहुत करतात. आणखीही किरकोळ मोठ्याचे अंगभूतिक होते त्यांच्याही घरीं प्रतिबंध जाले. खालीं स्वारीबरोबर जे गृहस्थ गेले आहेत त्यांचे घरीं चौक्या बसविणार. अशा रीती चालल्या आहेत. रास्ते यांचे

घरीं चौकी पेशजी होती ती उठली. हल्लीं रावसाहेब याजकडील निमित्यास मात्र आहे. त्रिवर्ग आल्या दिवसापासून पुढील मसलतीच आहेत. नवे स्वार व पायदळ ठेवीत आहेत. राजश्री रामचंद्र नाईक परांजपे साठे याचे वाड्यांत होते त्याजपाशीं चौकी होती ती आपोआप उठून गेली. कै० नाना यांचे वाड्यांत चौक्या राघोपंत यांणीं आपल्याकडील बसाविल्या. चिंतोपंत व मामा यांस वाड्यांतून अन्यत्र स्थळीं नेऊन ठेवणार. आबा काळे मुद्दां आज अडीच लाख रुपये लौकर द्यावे म्हणोन निकड लागली आहे. निकड भावे याजकडीलच आहे. वाड्यांत चौक्या पूर्ववत् मराठी लोकांच्या बसल्या. विप्रांच्या होत्या त्या उठविल्या. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६४९३ (कार्तिक व० ७–१६ नोव्हें.)

उतारा–धोंडो बापूजी जोशी याचें पत्र पुण्याहून मिरजेस.

" होळकर याजकडील पुण्यासभोंवत्या चौक्या व गावांत चौक्या व सरकारवाड्यांत होत्या त्या उठल्या. रावसाहेबाकडून राजश्री हरीपंत भाव्ये पुण्यांत कारभारास ठेविले ते होळकर याजकडूनही तेच येखत्यार सबब राहिले. त्यांणीं दोन तीन हजार लोक ठेऊन गांवाचा बंदोबस्त चवक्या बसविल्या आहेत. याउपर गावांतून पैका काढणार. परमाणगीशिवाय बाहेर कोणी जात नाहीं. श्रीमंत महाडास आहेत. चार महागिऱ्या आगिल्या आहेत. मध्यें बोलण्यास रावसाहेब आहेत. बोलणें ठरोन येईल असी बोलवा आहे. चार रोजां श्रीमंताकडे रावसाहेब जाणार–बोलण्यास्तव आहेत दहा लक्ष रुपये दोन चार रोजांत होळकर याजला देणार. बाकी ऐवज एक मास त्यांणीं मागो नये असें ठरोन भाव्ये कारभार करूं लागले. रावसाहेबांकडून पत्रें सर्व मंडळीस जरीपटकासुद्धां गेलीं. श्री॥ राजश्री चिंतामणराव आपा व रामचंद्रपंत आपा व त्रिंबकराव आपा व रास्ते व गोखले यांजलाही पत्रें गेलीं. याजप्रमाणें मंगळवेढ्याहून राजश्री अंताजीपंत आले आहेत त्याजपाशीं रावसाहेब बोलले तूर्त पांच सात हजार फौज व दोन हजार पायदळ रावसाहेबांपाशीं जमलें पागे पथक्ये येऊन आप-

लाले मिसलीवर उतरत आहेत. होळकर चार बेळां डेऱ्यांस आले. हेही तिकडे गेले होते. राजश्री बाबा फडके व मोरोबादादा मिळोन हरयेक बोलणें होत असतें. प्रांतांत दीप नाहीं, मार्ग चालत नाहीं अशी गत आहे!"

---

नं. ६४९४ ( कार्तिक व. ७।१६ नोव्हेंबर )

उतारा-पत्र कारकुनाचें पुण्याहून मिरजेस.

" का.ऽ प्रहररात्रीस आबशीचे देशमुख व काळे व मामा या त्रिवर्गास बेलबागेजवळचे वाड्यांत आणिलें. तिथे तिहीकडे ठेविले. पंधरा लाख रुपये त्रिवर्गांनीं देऊन मुक्त व्हावें असें होळकराचें म्हणणें आहे. पुण्यांतच फडशा जाल्यास उत्तम नाहीं तरी सैन्यांत न्यावें असें ठरलें आहे. बाजीराव बर्वे व महादाजीपंत साठे व खंडेराव रास्ते यांच्या घरीं मध्यानरात्रीस चौक्या आल्या. "

---

नं. ६३९५ श्री. ( १६ नोव्हेंबर )

पै।। छ० २२ रजब सन सलास मयातेन.

सेवेशीं अंताजी रामचंद्र जोशी. दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता।। कार्तिक व० ७ मंगळवार स्वामीचे कृपेकरून यथास्थित असे. विशेष. श्री।। रा।। चिंतामणराव आपासाहेब याणीं मजला पुण्यास पाठविलें. मार्गी हरलीचे घाटाखालीं नारायणराव माने याचे लोकांनीं लुटलें. जीव घेऊन पुण्यास आलों. बा।। ६ सोमवारीं अस्तमानीं रा।। फत्तेसिंगराव माने याचे डेऱ्यास गेलों होतों. ते बोलले कीं, आम्हीं श्रीदेवदर्शनाकरितां पालीस येका दों दिसीं जाणार आहों. तेव्हां मी त्याजला बोलिलों कीं, वाई,सातारा, कऱ्हाड वगैरे प्रांतीं आपण गेल्यास वस्ती रहावयाची नाहीं. रयत खराब आहे. फौजेचे दंग्यामुळें नाश होईल. तेव्हां उत्तर जालें जे, सडे पांच सात हजार फौजेनिशीं जाऊं. त्यास रहिमतपुरास येतील असें दिसतें. यास्तव सूचनार्थ विनंती लिहिली आहे. श्री।। रा।। चिंतामणराव आपासाहेब यासीं पत्र पाठविलें आहे तें वडिलीं त्यांजकडे रवाना करावें. चिंतोपंत वगैरे डंवर्मीचे पैक्याविशीं हाल

बहुत आहेत. श्री|| रा|| रावसाहेब व बाबा व दादा यांची भेट घेऊन पत्रें जालीं. सर्वत्रांनीं एकरूप होऊन जमावसु|| इकडे येणेविसीं लिहून गेलें आहे. वडिलास कळावें. चिटणिसांचे गांवचा वसूल आपण घ्यावा. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६४९६ श्री. (कार्तिक व. ८--१७नोव्हें.)

पै|| छ० १२ साबान सन सलास मयातेन आलफ.

तागायत छ० २० रजब मुक्काम आवंतिका येथील वर्तमान तर पुण्याकडील लढाईचें वर्तमान चहूंकडून कचें पक्कें छ० ४ व छ० ५ मिनहूस येऊन दाखल जाहलें. त्यावरोन रा|| अलीजाबहादूर सचिंत होऊन यत्कारपूर्वक याजवर मर्जी बहुत क्रोधयुक्त होऊन भाषणें केलीं. नंतर त्यांचे बंधु रामचंद्र भास्कर बक्षी यांजबरोबर फौजा देऊन सत्वासचे घाटानें उतरोन बराणपुरास गेले व समरूची बेगमेची पलटणें पांच व आवल कंपूंतील पलटणें पांच एकूण दहा कंपू तोफा वगैरे सरंजामसुद्धां बराणपुरास रवाना केला तो सत्वासाचे घाटानें बराणपुरास जाईल. खासा कूच करोन इंदूरनजीक आले. पेरूकडे काल थैल्या तीन रवाना करून त्यास ताकीद लिहिली जे, तुम्हाजवळ दोन कंपू आहेत ते व लोईपाशीं हाशीपाशीं दोन कंपू आहेत ते, शीखांकडील फौज आली आहे ती याप्रमाणें घेऊन जलद येऊन दाखल होणें व आंबोजी इंगळे व तालभूपाळकर पठाण व धारकर पवार व कोटेहून राजेरजवाडे यांच्या फौजा बोलाविल्या आहेत व काशीराव होळकर याशीं पूर्वी तहाचें बोलणें होऊन त्याचा मुलूख त्याचे स्वाधीन करावा आणि त्याणीं दहा हजार फौजेनिशीं यावें येविसीं त्यासही पत्रें गेलीं आहेत. फौजेच्या जमातीविसीं ताकिदी होत आहेत. जयपूरकर व जोधपूरकर वगैरे राजेरजवाडे यांसही पत्रें येण्याविसीं पाठविलीं आहेत. उमरावगीर गोसावी यांसही पत्रें येण्याविसीं पाठविलीं आहेत. फौजेचा जमाव करोन दक्षिणेस अलीजाबहादर यांचा येण्याचा बेत बहुत जलदीचा आहे. सध्यां मुखत्यार कारभारी यादव भास्कर व विठल महादेव व रामचंद्र

१ आबाजी हरि किंवे यांचें बातमी पत्र. २ यादवराव भास्कर बक्षी.

भास्कर व घाटगे हे कामकाजांत आहेत. होळकराकडील मुलखाचा ऐवज व आपले सरंजामाचा ऐवज कमावीसदार याजपासोन जलदी घेण्याची ताकीद चालली आहे. गायकवाड याजकडे ऐवज येणें त्याचे वसुलास पूर्वी नागोपंत पाठविले आहेत त्यासही बरचेवर ताकीद ऐवजाविसीं आहे. याप्रमाणें येथील मजकूर आहे. पुढें होईल तो सेवेशीं लिहूं हे विज्ञापना.

बराणपुराचे बर्तमान तरी शिंद्याकडील रा॥ रामचंद्र भास्कर फौजा घेऊन सत्वासचे घाटानें बराणपुरानजीक व खासा अलीजाबहादर दोन मजली इंदूरनजीक येऊन कंपू बराणपुराकडे रवाना केला. पेरूकडे दोन चार काल थैल्या रवाना करोन तिकडील कंपू व फौजामु॥ त्यास बलाविलें आहे. खानदेश प्रांतीं गोपाळराव चिटणीस याचे फौजेनें धुळें सोनगिरीमुद्धां होळकर याचीं ठाणीं उठवून आपलीं कायम करितात. पेंढारी व फौज शिंद्याकडील पुण्याहून शिकस्त होऊन गेली ती गोपाळराव यांस सामील होऊन खानदेशांत उतरोन त्यांनींही पृथ्वीप्रळय आरंभिला आहे तो पत्रीं कोठवर ल्याहावा ? श्रीमंताच्या राज्यांत असे विषय श्रवणांत आले नाहींत असा अनर्थ आरंभिला आहे. उज्जनीहून चिरंजीवाकडून पत्रें आलीं तीं पाठविली आहेत यावरोन सविस्तर कळेल. बहुत काय लिहिणें हे विनंती.

---

न. ६४९७ छ० २० रजेब बुधवार. (कार्तिक व. ८–१७ नोव्हें.)

उतारा— पत्र कारकुनाचें पुण्याहून मिरजेस.

"बळवंतराव नागनाथ, आपाजीपंत सहस्रबुद्धे, नारायणराव वैद्य व ढमढेरे याच्या घरीं चौक्या बसल्या. प्रस्तुत शहरांत चौक्या बसविण्याचा हंगामा चालला आहे. पांच चार असामी भावे यांचे हाताखालीं आहेत ते घाटग्याचेच बंधु ! दुसरा अर्थ नाहीं."

---

१ या पत्रात इंग्रज व श्रीमंत व होळकर याच्या भेटी परतभेटीसंबंधें बराचसा पाल्हाळ आहे तो गाळला आहे.

नं. ६४९८ श्री. ( कार्तिक व. ९–१८ नोव्हें. )

पै॥ छ० २१ रजब दोन तास रात्र सल्लास मय्यातैन.

विज्ञापना. रा॥ यशवंतराव पाटणकर पुण्यास कुंजर याजवळ होता तेथून लढाई जाहल्यावर कुंजर व श्रीमंत माइ.डाकडे जाऊं लागल्यावर पाटणकर चाळीस पन्नास स्वार व उंटें वगैरे आपला सरंजाम घेऊन तेथून निघोन कराडावरून पळोन आला. तो कासेगांव नजीक शिराळे हा गांव याजकडे आहे, तेथें येऊन कांहीं जमाव फौजेचा करावा, हा मनसबा करून मुधोजी बेरड मचींद्रगडास आहे त्यास बोलाऊन जमाव करीत आहे. दोनशें स्वार काल सायंकाळपावेतों तेथें जमा जाले व आपण तेथून कोलापुरास महाराजांचे भेटीस गेला आहे. याप्रमाणें वर्तमान रा॥ रावजी आगाशे रेटरें येथें गेले होते तेव्हां मुधोजी नाईक नावेंतून चाळीस पनास लोक स्वार कासेगांवाहून आले त्यांतील गृहस्त रावजीचे वळखीचा होता त्याणें सांगितलें. हे विज्ञापना.

---

नं. ६४९९ श्री. ( कार्तिक व. १०–१९ नोव्हें. )

पै॥ छ. २४ रजब हुरू सन सलास मयातेन व आलफ.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामींचे सेवेशीं.

विनंती सेवक बाळाजी महादेव दामले. चरणांवर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ. २२ रजबपर्यंत मुक्काम कसबें रहिमतपूर[१] स्वामींचे कृपा करून वर्तमान यथास्थित असे. विशेष. रा॥ चतरसिंग भोसले दोन हजार फौज व नारायणराव माने दोन हजार फौज असे चार हजार फौजेनिशीं सातान्यानजीक मौजे हसवें येथें मुक्काम आहे. किल्याचे चार बाजूस चौक्या याणीं आपल्या बसविल्या आहेत. शहरांत किल्लेदार याच्या चौक्या होत्या त्या उठवून माने याणीं आपल्या बसविल्या. मोर्चेबंदी केली आहे. किल्यावर रा॥ नाना पुरंधरे व बाळाजी माणकेश्वर आहेत त्यांणीं चतरसिंग व माने यांसीं करार केला आहे कीं, आम्ही श्रीमंतांस पत्रें पाठवून उत्तर आणवून दहा रोजांनीं किल्ला तुमचे हवाली करतों

---

१ पत्र रहिमतपुराहून निघालेले.

याप्रमाणें करार केला आहे. याजमुळें मोर्चे देऊन बसले आहेत. आणखी होळकर याजकडील चार हजार फौज व दहा तोफा येत आहेत, येथेंही फौज ठेवीत आहेत. प्रांतांत खंडण्याचे रोखे निराळे निराळे होतात. दंगा भारी करून दिल्हा आहे. पिकें कही भरून नेल्ये. प्रांतांत कांहीं स्थित राहिली नाहीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५०० श्री. (कार्तिक ब. १०।२० नोव्हें.)

पै॥ छ. २२ रजेब.

विज्ञापना. फडके यांणीं मंदांत हजामत केली नव्हती ती गुरुवारीं केली. होळकराकडे खासा स्वारी गेली तेव्हां उभयतां समागमें गेले नाहींत. रा. नाना पुरंदरे साताऱ्यास शहरांत हजार लोकांनिशीं राहिले आहेत. चतरसिंग जमियतसुद्धां पाडळीनजीक कोसावर आहेत. होळकराकडील हजार स्वार देउरास पेशजो गेले होते तेथें आहेत व हालीं आणखी हजार दुसरे गेले आहेत. पुरंदरे यांचा पाठलाग होणार. माने यांची रवानगी नगराकडे व्हावयाची निकड आहे. चिटणीस फौज घेऊन शिंदे याजकडील येत होते. ते नगराच्या सुमारें आले तों इकडील फडशा जाला. नंतर माघारे गेले. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६५०१ पै॥ छ० २२ रजेब सन सल्लास. (कार्तिक ब. १० –२० नोव्हें.)

उतारा–बापूजी विठ्ठल चाफेकर यांचे पत्र राम आपांस जमखिंडीस

" आम्ही श्रीमंताकडून आलों आहों. रा. यशवंतराव पाटणकर व आम्ही मुक्काम मजकुरीच (मौजे बेलवडे) आहों. आपणाविशीं कितेक मजकूर यशवंतराव याणीं बोलोन निश्चयांत आणिलें आहे. राजश्री चिंतामणराव आपासाहेब यासीही कितेक बोलणचे भाव बोलावयास श्रीमंतांनीं आज्ञा केली आहे."

---

नं. ६५०२ श्री. (२१ नोव्हें.)

पै॥ छ० १ साबान सन सलास मयातेन.

सेवेशीं धोंडो बापूजी दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ कार्तिक व॥ १२ पावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों. विशेष. श्रीमंत महाडास आहेत. श्रीमंत रा॥ रावसाहेब येण्याविशीं बोलणें बोलतात. होळकर कूच करून गेल्याखेरीज यावयाचा रंग दिसत नाहीं. पर्वतारूढ गृहस्थ कोणी अद्यापि आले नाहींत. नगराकडे मीरखान पठाण व कंपूची रवानगी जाहली. एक दों दिवसीं कूच होणार असें म्हणतात. कोंकणांत पांच चार हजार फौज होळकराकडील आज उद्यां जाणार आहे. गांवांत घरोघर खंडण्या लागल्या. चिंतोपंत व बैजनाथ भट व आबा काळे सरकार वाड्यांतोन बेलबागेचे वाड्यांत नेलें. पेक्याची निकड जाहली आहे. कुंजिराकडील सदाशिवपंत फाटक मावळांत होते तेथून किल्ले पांडवगडास धरून नेले म्हणोन वर्तमान आहे. गोपाळराव चिटणीस शिंद्याकडील येत होते त्यांची व बावनपागे हरजी होळकर यांची लढाई होऊन ते बराणपुरीस गेल्याचें बोलतात. फत्तेसिंग माने पालीचे देवास येणार आहेत. दोन दिवस लोकांचे देण्याचे गवगव्यामुळें राहिले आहेत. पराजीपंत होळकराकडील यासी कार्तिक व॥८गुरुवारीं दोन-प्रहरां देवआज्ञा जाहली. दोन दिवस ज्वर मात्र आला. पुणें शहरचे सावकार व मातबरापैकीं परागंदा होऊन गेले. नावाचें माणूस राहिलें नाहीं. येसू कागडा आला नाहीं. कोंकणांत फौज जाणेमुळें माणसें खालीं आहेत. वडिलांचे पुण्येंकरून निभाव होईल. वडिलांस कळावें. बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५०३ श्री. (२३ नोव्हें.)

दे॥ छ. १ साबान सन सलास मयातेन.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी त्रिकाल चरणांवर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ कार्तिक व॥ १३ भौमवार प्रातःकाळपावेतों वालकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. उभयतां श्रीमंत महाडाहून किल्ले रायगडावर गेले. समागमें कुंजर व निबाजी भास्कर व पटवर्धन व दोन शिंदे याप्रमाणें बरते गेल्याची बातमी रा॥ हरिपंत भावे यांणीं

सांगितली. बरकड मंडळी महाडासच आहेत. तेथील बंदोबस्तास हरिपंत भावे याजकडील हजार गाडद व फौज गेली आहे. काल सोमवारीं सहा घटका रातीस प्रथम प्रहरीं गेली म्हणोन भावे यांणीं वर्तमान सांगितलें. आणखी सरंजाम मागाहून जात आहे. शहरांत चौक्या, पहारे, खंड, गुन्हेगाऱ्या बरचेवर घेत आहेत. चिठीखेरीज कोणी गृहस्थ जाऊं देत नाहींत. जरीपटक्याकडील फौज साताऱ्याहून झाडून आली. नाना पुरंधरे एकटे साताऱ्यास राहिले. येसू कागडा अद्याप आला नाहीं. कळावें बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

सेवेशीं अंताजी रामचंद्र जोशी शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. कोंकणांत अतिप्रलय होणार. पुढें कसा प्रसंग पडतो न कळे. दिवसेंदिवस वृद्धीचेच येतात. हे विज्ञापना.

---

नं. ६५०४ श्री. (कार्तिक व. १३ –२३ नोव्हें.)

पौ।। छ० ४ रमजान सह्यास मध्यात्रै पौष.

तागाईत छ० २६ रजब मुक्काम दिल्ली. हालीं इकडील वर्तमान तर पिरु फिरंगी कोलेंत छावणी करून आहे. नवे कंपूची भरती होते. बजीराकडील बेरोजगारी लोक अनेक उठोन आले. ठिकाण कोठेंही नाहीं. सबब हरयेक कोलेंत उमेदवारींत खराब फिरतात. फिरंगी महारानिल्हेनीं गुजर वगैरे मेवास यांचे बंदोबस्तास मेवात प्रांतीं कंपू पाठवून हरामखोर लोकांची तंबीह करोन चोर कजाकांचा[2] बंदोबस्त यथास्थित केला. पट्ट्याळेकर वगैरे खास दरोबस्त लोई फिरंगीपाशीं हरकाज्या प्रांतीं हरयेक गांवासी खंडणी घेऊन आहेत. सारांश इकडील बंदोबस्त ताम्रमुखांनीं पक्केपणें हजरतांचें रजावंदी[3] राखून केला. सांप्रत देशी रा।। यशवंतराव होळकर यांचा बखेडा जाल्यापासून दरोबस्त ( सर्व ) सचिंत आहेत. महागाई उज्जनीप्रांतीं अतिशय. यास्तव तिकडे जावयास कोणी रुख (रोख) करीत नाहीं. जैपूरकर व भर्तपूरकर राजे रजवाडे सर्व विलचे लगामीं

---

१ आबाजी हरि किंवे यांचे बातमीपत्र. २ कजाख = भांडखोर. ३ राजीखुशी.

आहेत. परंतु बेजप्रसंगीं प्रतिकूळ होतील ऐसे सर्व आंतस्थ इच्छा ठेऊन हवा पाहतात. महमुदशहा यांस समाधान नाहीं. नाकांत रोग फार. यास्तव तिकडेही आपसांत जमानशाहाचे पुत्रासीं बखेडा विशेष आहे. नवाब सादतआलीखान व लखनौकर मक्यास जावयाची तयारी करोन माल आसबाब घाडीं हत्ती वगैरे सरंजाम फरोक्त करोन नगदी जमा करोन चिरंजीवास जाहागीर देऊन स्वतः कलकत्याचे मार्गें जाणार. परंतु जलचर पुढें मार्गस्थ करतील किंवा हस्तगत करतील हे प्रत्यास आल्यावर सेवेसीं विनंती लिहूं. वजीराचा मुलुख खजाना तोफखाना वगैरे दरोबस्त इंग्रजांनीं कबजा केला. इलमासअलीशसल ( ! ) कित्येक कारभारी यांस अगोदर ममतेंत घरांत फूट घालून बंदोबस्त केल्यावर आतां हरयेकाशी पैका तलब करीत आहेत. गोरखपूरप्रांतीं व नैपाळ वगैरे पाहाडीं राजे यांचे कारभारी दिवाण यांस आपले लगामी लाऊन तेथेंही प्रवेश केला. गोरख्यास ( गुरख्यास ) काहाडून दिल्हें. स्वर्गपर्यंत उद्योग केला. आतां पठाण फुरुकाबादकर यांस कैद तरीक [!] ठेवून पन्नास हजार रुपये सालिना ठेराऊन तेथेंही बासलीसाहेब फिरंगी याणें दखल केला. सांप्रत देशांत आपसाचा कलह पाहोन चित्तांत प्रसन्न आहेत. व कोसलचे (कौंसिलचें) बोलणेंही याप्रमाणेंच कीं राहतां राहील त्यास समजोन घेऊं! आंबाजी इंगळे व पिरू फिरंगी यांस र॥ शिंदेबहादुरांनीं बोलाविलें आहे. इंगळे मजकूर-तमाशा दुरून पाहतात. जाहिरांत तिकडे येक दोन कूच करून आवाई जाण्याची केली. जातील तेव्हां खरें. पिरूनी येक कंपू व पिदरून फिरंगी यांस उज्जनीकडे पाठवावयाची तजवीज केली आहे. पुढें आमलांत येईल तें सेवेसीं विनंती लिहूं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५०५   श्री. (कार्तिक व. ३० –२५नोव्हें.)
पै० छ० २८ रजेब.

विज्ञापना. श्री० राजश्री रावसाहेब व श्री० राजश्री बापूसाहेब यांची स्वारी छ० २१ रजेबीं गुरुवारीं कर्णेल वकील कलकत्तेवाले यांजकडे सायं-

१ सामानसुमान. २ गादी (!). ३ अयोध्येचा नबाब. ४ नेपाळ!

काळचे पांच घटका दिवसास गेलो. समागमें रा० फडणीस व फडके व आपा बळवंत यांचे चिरंजीव व मानाजी फाकडेचे पुत्र व दरेकर व भापकर व आणखी सात आठ मराठे याजप्रमाणें गेले. नाच जाला. बहुमान दिले वितपशील—श्रीमंतास उभयतांस १ वस्त्रें चालीप्रमाणें. २ घोडे, २ कंठ्या, २ शिरपेंच, २ जेगे, २ बंदुकाच्या दाऱ्या, २ पिस्तुलाच्या जोड्या, घड्याळें, बरकड सर्वांस वस्त्रें दिल्हीं. येणेंप्रमाणें आराश होऊन अस्तमानीं डेऱ्यास स्वारी आली. + + + विदित होय हे विज्ञापना.

———

नं. ६५०६ श्री. (कार्तिक व. ३०–२५ नोव्हें )

पै. छ० २८ रजेब. सल्लास मयातैन. गुरुवार.

विज्ञापना. राजश्री फत्तेसिंग माने यांस छ० १९ रजेबी मंगळवारीं रा. यशवंतरायांनीं चौघडा दिल्हा. आवशीचे चार घटका रात्रीस खुशालीचे पन्नास बार तोफेचे केले. + + + + रा. चिंतोपंत देशमुख व माना उभयतांस गुरुवारीं श्रीमंताकडे दोन प्रहरीं चालत घेऊन गेले. चार घटका बोलणें जालें. नंतर पूर्वजागा घेऊन आले. अस्तमानीं जेवण जालें. नित्य एकेकास शंभर रुपये रोजाचे पडतात. विपत्यांत आहेत. रा. बळवंतराव बाकडे याचे घरीं होळकराची चौकी बसली आहे. आठ दिवस बहुत हाल केले. गुरुवारचे रात्रीस संध पाहून गेले. तूर्त प्राण बांचाविला. पुढें पहातच आहेत! रा० आत्या गुरुजी यास फडचें काम श्रीमंतांनीं कृपा करून दिलें. फडची वैवाट पाहूं लागले. पेशजी पट्टीचें प्रकरण जालें ते समयीं सदाशिवभट दिवाणजी निघोन गेले होते त्यास श्रीमंतांनीं अभयपत्र पाठवून आणिलें. × × × मनोहरगीर गोसावी महाडाहून सरकार आज्ञेवरून सिंव्हगडचे बंदोबस्तास आला. होळकराकडील पलटणचे मोर्चे बसले आहेत व फौजही खालीं आहे. किल्ल्यावरून मोर्चांवर गलबल केली होती. खालील एक ठार व दोन तीन जखमी जाली. पाराजीपंत होळकराकडील यास आठ दिवस किंचित् ज्वरांश

१ या ठिकाणचा पाल्हाळ गाळला आहे.

जाला होता. पुढें दोन दिवस श्वास लागला. गुरुवारीं सायंकाळीं देवाधीन जाले. खंडोपंत वर्तक नाशिकास होते त्यांचाही काल जाला. × × × मीरखान पठाण याची रवानगी घाटाखालीं व्हावयाचा बेत ठरत आहे. शामतखान यांस जामगांव नगरच्या सुमारें लावून देणार. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६५०७ श्री. (कार्तिक ब. ३०।२५ नोव्हें.)
पै॥ छ० २८ रजेब.

विज्ञापना. चिंचवडावर लाख रुपयाचा रोखा होळकराकडील जाला. पंचवीस स्वार जाऊन नाना प्रकार दुःख ब्राह्मणांस देऊं लागले. तेव्हां पंचवीस ब्राह्मण व मुख्य एक असे निघोन श्रीमंताकडे आले. सर्व दु.ख विदित केलें. तेच समयीं होळकराची स्वारी डेऱ्यास आली. तेव्हां श्रीमंतानीं सांगितलें कीं चिंचवाडास बहुत उपद्रव लागला आहे. तें मुख्यस्थान. आजपर्यंत त्या स्थळास कोणाचा उपद्रव लागला नाहीं. प्रस्तुत असें घडत आहे. ब्राह्मण वीष घेऊन मरतात. दर असामीस एक तोळा अफु पदरीं बांधोन आलेच होते. होळकरांनीं आज्ञा वंदन करोन तेच बैठकेस मनाचिठी देऊन हुजरे पाठविले × × इकडील गांव खेड्यात शय्याद्रीपर्यंत बाकी राहिलीं नाहीं. घरें देखील आणिलीं ! × × विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६५०८ श्री. (मार्ग. शु. १–२६ नोव्हें.)
छ. २९ रजेब.

विज्ञापना. कै॥ नाना महाडास गेले तेव्हां मशीर व शिंदे होळकर व सरकारी पागा पथके यांत प्रवेश करून कार्य साधिलें तद्वत खालून विठूरसैन्यांत[1] किंचित् प्रवेश चालला आहे. सिद्धीस जातां अवघड. परंतु खटपटींत कमी नाहीं. इकडून खालील सैन्यांत तसाच प्रकार घडविला आहे. तेंही काय होतें पहावें. इकडून चार टोळ्या चहूं घाटांनीं जावें असें

---

१ विठूर=होळकर.

कालच्या बैठकेंत ठरलें. लवकरच रवाना होणार आहेत. आबाजीपंत ति॥ आपा बळवंत याजबरोबर दोन हजार फौज देऊन रायगडास पाठविणार. मातुश्रीसें लवकर आणावयाची योजना आहे. मनकामना शु॥ पंचमीस सिद्धिस न्यावी असें आहे. यांत ईश्वर कसें कोणास यश देतो पहावें. येथील सर्वांचे चित्तीं दुसरा प्रकार नाहीं. घडेल तें प्रमाण. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६५०९ श्री. ( २८ नोव्हें. )

पै॥ छ० ६ साबान सुरु सन सलास मयातेन व आलफ. विनंती सेवक धोंडो बापूजी जोशी दोनीं कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ मार्गशीर्ष शु॥ ३ मंदवार पावेतों बाळकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत किल्ले रायगडास जाऊन रा॥ माधवराव रास्ते यासी घेऊन महाडास आले. वस्त्रे[1] दिलीं. बहुमान[2] केला. मातुश्री बाई[3] वरतीच आहेत. होळकराकडील फौजा चारी घाटांनीं कोंकणांत गेल्या. कावळ्याचे घाटास चौकी होती. होळकराकडील पांच सातशें पठाण व श्रीमंत रावसाहेबांकडील कांहीं लोक बळवंतराव सोनी निसबत विनीवाले यांजबरोबर देऊन रवाना केले होते. घाटांत लढाई जाहली. पठाण मोडले, बहुत खराबी जाहली. बळवंतराव सोनी पायउतारे पुण्यास आले. हें वर्तमान महाडास कळलें. श्रीमंतांची बातमी होती. चौघाटांनीं लोक उतरले. ऐसें ऐकल्यावर तेथून निघोन महागिरींत बसोन किल्ले सुवर्णदुर्गास गेले. श्रीमंतांसमागमें आठशें घोडी पागेचीं व विंचूरकर व पानशे व खासगीवाले वगैरे गेले आहेत. त्यांतून समागमें पुढें कोण गेले, राहिले कोण हें समजलें नाहीं. पठाणाचे सात हजार स्वार व गाडद गेले. अनिवार विचार आहे. महाडास जमाव राहिला असेल त्याची गत काय होती तें न कळे. होळकरांनीं जखमेचें पाणी घेतलें ते दिवशीं तोफाची सरवत्ती जाहली. त्यांजकडील लोकांनीं नजर

---

१ माजी पेशव्यांची स्त्री यशोदाबाई. २ विनायक अमृत यास पेशवेपदाचीं वस्त्रें देण्याची. ३ यशोदाबाई.

नजराणे केले व त्यांनींही आपले लोकास बहुमान करावयाचे ते केले. श्रीमंत रावसाहेब यांणीं होळकरास वस्त्रें दिल्हीं. हत्ती रुप्याचे अंबारीसुद्धां दिल्हा. कंठी, शिरपेंच व मोत्याचा तुरा दिल्हा. मसलत दिवसेंदिवस वाढत चाडली, प्रांत उध्वस्त जाहाला. कोंकण किंचित् स्वस्थ होतें त्या प्रांतींही दीप लागावयाचा विचार राहात नाहीं. वडिलांचे शरिरीं किंचित् स्वस्थ नाहीं म्हणून ऐकलें त्यावरून चिंता लागली आहे. त्यास आरोग्य जाहल्याचें लिहून पाठविण्यास आज्ञा करावी. रा॥ माधवराव रास्ते व पानशे व विंचूरकर व गोविंदराव खासगीवाले वगैरे जुने मंडळ पार घाटानें वाईस गेले. रायगडावर गोपाळपंत कुंजर व नारोबा आवटी चारशें लोकानिशी वर ठेविले. याप्रमाणें आज दोनप्रहरीं वर्तमान आलें आहे. वडिलांस कळावें. बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

रा॥ केसोपंत दादा व बाळाजीपंत हिपरगी व बाबाजी आपा व भाऊ व बापू पुणेंकर यांस शिरसाष्टांग नमस्कार. बापू, तुमचा भाऊ येथें भेटला. रावसाहेबांगाशीं लष्करांत आहे. हे विनंती.

---

नं. ६५१०　　श्री.　　(२९ नोव्हें)

पै॥ छ साबान सन सलास मयातेन.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी. त्रिकालचरणांवर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत मार्गशीर्ष शु. ४ रविवारपावेतों बालकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं रा॥ बाळाजीपंत पटवर्धन याजकडे पत्रें पाठविलीं तीं त्यानीं मजकडे पावतीं केलीं. लिहिला मजकूर कळला. वडिलांचे शरीरास समाधान नव्हतें; म्हणोन ऐकिलें होतें. त्यास हलीं वडिलीं पत्रीं दहा दिवस ज्वर येत होता तो राहिला असें लिहिलें तें कळलें. त्यावरून चित्त स्वस्थ जाहलें. आरोग्यस्नान केल्याचें लिहून पाठवावयास आज्ञा करावी. इकडील मजकूर होळकराकडील फौज चारी घाटानें कोंकणांत जाऊन श्रीमंत महाडाहून महागिरींत बसोन गेल्याचें वर्तमान काल मंदवारीं श्री॥ रा॥ चिंतामणराव आपासाो यांजकडील जामूद

याजबरोबर लिहून पाठविलें आहे. श्रीमंत महागिरींत बसोन जलमार्गें जावें ऐसा बेत होता. त्यास बाणकोटवाले यांचा विश्वास न ये यास्तव एक कोस जलमार्गें जाऊन तेथून पाईचे मार्गें किल्ले हरणईस गेले. होळकराकडील फौज पठाण गेले. त्यांनीं कोंकणांत दंगा मनस्वी करून अनुचित बर्तणूक केली ऐसी बदंता बोलतात. रा॥ माधवराव रास्ते वाईस आले ऐसी बातमी आली. ती॥ रा॥ अंताजीपंत काका जोशी व रा॥ आबा किबे यांस पत्र पावतें केलें. चि॥ रा॥ बाबजीपंत पटवर्धन याजकडून हमेशा माणसें येतात त्यास लिहिलें आहे, ऐसें पत्रीं लिहिलें. त्यास मशारनिल्हे याजपाशीं पत्रें लिहून देत जाईन. रा॥ जनार्दनपंत भाऊ म्हैसकर श्री॥ रा॥ अमृतरावसाो याजपाशीं सुखरूप आहेत. घोरपडीचा बाग येथें शिंद्याकडील लोक होते ते कोठीसुद्धां उठोन गेले. होळकराकडील लष्करचे लोकांनीं दहा बीस झाडें अंब्याचीं वगैरे झाडें तोडलीं हें वर्तमान कळल्याबर रा॥ हरिपंत भावे यासी सांगून जासूद हरकारा घेतला. नांव मशारनिल्हेचे हरकारे यास सांगून ठेविला. दररोज हरकारास पोटगी मिळोन पावणेदोन रुपये करार करोन ठेविला आहे. बागेचे रखवालीकरितां हरकारा ठेविला येविसीं श्री॥ रा॥ आपासाहेब यांस लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें. शिंदे उज्जनीहून निघोन डेरा दाखल जाहल्याचें लोक बोलतात. कोंकणांत पेंढार जाणार अशी बोलवा आहे. कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५११ श्री. ( कार्तिक-नोव्हेंबर. )

यादी. खालीं श्रीमंताबरोबर मंडळी आहे ती—१ कुंजर मंडळीसह. ३ पानशे यशवंतराव, गणपतराव व भिवराव एकूण. १ दिनकरपंत. (पटवर्धन.) १ आपाजीपंत सहस्त्रबुद्धे. १ गोविंदराव परांजपे सिंहगडास, १ निंबाजी भास्कर. १ घोंडोपंत गडबोले विनीवाले. १ विठलपंत बाकनीस. १ पेठये. १ गोविंदराव खासगीवाले. १ रूपराम चौधरी. १ मनोहरगीर गोसावी. १ खंडेराव रास्ते. १ बापू फडके मेहुणे. १ बापू कवडी. १ रामचंद्र गोसावी. १ राघोपंत भागवत. १ नारायणराव वैद्य. १ बळवंतराव

नागनाथ. १ शागीर्दपेशा मंडळी, बाढवलेले खिजमतगार जासूद वगैरे. येणेंप्रमाणें समागमें आहे. परदरबारी वकील कोणी गेले नाहींत. झाडून येथेंच आहेत.

---

नं. ६५१२ श्री. ( मार्ग. शु. ८-२ दिसें. )

पै॥ छ० ६ साबान सन सलास मयातेन.

सेवेशीं साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसी जे, येथील वर्तमान तरी, होळकराकडील मीरखान पठाण चार हजार फौजनिशीं व रावसाहेब यांजकडील आबाजी त्रिंबक व बळवंतराव सोहनी याजबरोबर हजार स्वार व हजार गारद देऊन पठाणासुद्धां रवाना रायगडास केले ते घाटमाथां पोंहचले. हें वर्तमान श्रीमंत रा॥ बाबासाहेब यांस समजल्यावर बाबासाहेब यांणीं शागिर्द पेशा व हुजुरातचे लोकांस व पानसे, विंचूरकर वगैरे गृहस्थांस आज्ञा केली जे, तुम्हास जिकडे समजेल तिकडे निघोन जावें. असें सांगोन खासा व कुंजर व निबाजी भास्कर व उभयतां पटवर्धन वगैरे खासगत मंडळीसुद्धां तारवांत बसोन वा॥ ३० निघोन सुवर्णदुर्गास गेले. तेथून विजयदुर्गास जाणार. माधवराव रास्ते यास बाबासाहेब यांणीं मोकळें करून रायगडाखालीं आणोन, हजामत करवोन बहुमानाचें शेलापागोटें देऊन त्यास बाबासाहेब यांणीं आज्ञा केली जे, तुमचे चिरंजीव फौजसुद्धां बागलकोटास आहेत त्यास जलद आणवावे अशी आज्ञा केली. त्यावरोन रास्ते यांणीं विनंती केली जे, मी सरकार कैदेंत आहें, मला कांहीं एक विषय ठाऊक नाहीं. त्यावरोन माधवराव रास्ते यास आज्ञा जाहली जे, तुम्ही वांईप्रांतीं जाऊन फौज जमा करणें असें सांगून बाबासाहेब सुवर्णदुर्गाकडे निघोन गेले. गोविंदकृष्ण काळे व माधवराव रास्ते हे माहाडासच आहेत किंवा स्वारीबरोबर गेले याचा पका शोध लागल्यावर लिहूं. बाजीरावसाहेब माहाडाहून निघोन सुवर्णदुर्गास जातात. हें वर्तमान पठाणांस व आबाजी त्रिंबक यास समजल्यावर तेही घाटाखालीं उतरोन फौजसुद्धां बाबासाहेब यांचे पिच्छावर गेले आहेत. सारांश, कोंकणची मसलत लांबली असें दिसतें. होळकरांच्या

---

१ दिनकरपंत व बाळाजीपंत.

ऐ. ले. पं. १४.

फौजेचा नेट बहुत जाहल्यास बाबासाहेब मंडळीसुां॥ इंग्रजांकडील बाण-कोटास जावें हा बेत आहे. तेथून निघोन शिंद्यांकडील मडोचेस जावें हाही बेत आहे. शिंद्यांकडील वारंवार पत्रें बाबासाहेबांस येतात जे, आपण दम धरून असावें, फौजसुां॥ सेवेशीं येऊन हजर होतों अशीं येतात. याप्रमाणें तिकडील मजकूर आहे. यशवंतराव यांणीं कार्तिक ब॥ १३ जखमेचें पाणी घेऊन रेरेच्या बावन तोफा केल्या व त्याच्या लोकांनीं त्यास नजराही केल्या. नंतर ब॥ १३ सायंकाळीं रावसाहेब व मोरोबादादा व बाबा फडके होळकर याचे डेऱ्यास जाऊन पोषाख व कंठी व शिरपेंच देऊन तिसरे घटके रात्रीं डेऱ्यास आले. प्रस्तुत सल्ला मसलत होळकर व राव-साहेब व मोरोबादादा व फडके यांचें परस्परें जाणें येणें होऊन हरएक विचार प्रसंग मसलतीचा होत आहे. होळकराचे सारांश म्हणणें जे, शिंद्यांचें पारपत्य करणें तें मीं केलें. पुढें दौलतीच्या बंदोबस्ताचा मजकूर दत्ताचा अगर जो करणें तो तुम्हीं लौकर करून नंतर तुम्ही आम्ही मिळोन हरएक प्रांतीं स्वारीस जाऊं. हें तुमच्यानें लौकर होत नसल्यास मला साफ सांगावें. मला कळेल तसा मी पेशवाईचा बंदोबस्त करितों असें जरबेचें बोलणें आहे. रावसाहेब याजपाशीं जमीयत दोन तीन हजार स्वार व हजार दोन हजार गारद आहे. होळकराकडील रा॥ पाराशर दादाजी यास वायु होऊन कार्तिक ब॥ ४ कैलासवासी जाहले. बळवंतराव वांकडे याची अप्रतिष्ठा होळकर याणीं केली ती पत्रीं लिहितां पुरवत नाहीं. नंतर एक लाख सात हजार रुपये दंड ठरून वांकडे आपले घरास आले. एक दीस घरीं होते. नंतर होळकराचे चौकीतून पळून गेले. होळकरांनीं घरदार चीज वस्तसुद्धां लुटून नेलें. जो कारकून वांकडे याचे चौकीस होळकराकडील होता त्या कारकुनास होळकर तोफेचे तोंडी देत होते. नंतर रदबदली करोन उजवा हात तोडिला. सारांश, होळकराचे जबरीचा गलेफ या मंडळी-वर आहे. होळकराची निकड ऐवजाविशीं यांस बहुत आहे. बराणपुरीं गोपाळराव चिटणीस यांणीं दहा हजार हजार फौज जमा करून आजंठ्याचे घाटापर्यंत येऊन होळकराकडील महालांत दंगा करोन ठाणीं घेत आहेत. शिंद्यांनीं हिंदुस्थानांतील कुल फौजा बलाऊन जमीयत करीत

आहेत. श्रीमंत रा॥ रावसाहेब यांणीं श्रीमंत रा॥ चिंतामणराव व रामचंद्रपंत यांस सरंजाममु॥ येण्याविसीं पत्रें पाठविलीं आहेत. व रास्त्यांचे चिरंजीव बागलकोटीं आहेत, त्यासही पत्रें व प्रतिनिधींच्या पतकासही येण्याविसीं पत्रें पाठविलीं आहेत. फौजेचा जमाव करावा असा बेत रावसाहेब यांचा आहे. चक्रदेव किल्यावरोन अद्यापपावेतों आले नाहींत. सारांश येथील सर्व विचार होळकराकडील व यांकडील पाहतां हरएक राज्याचा बंदोबस्त होऊन परस्परें परणाम शुद्ध राहील असा विषय दिसत नाहीं. भोसले आपले हद्देंत हुशारीनें आहेत. इंग्रजांकडील वकील येथें सरकारांत आहेत ते निरोप घेऊन कुल दौलतसुद्धां निघोन ममईस जाणार. पुढें त्याची मसलत काय आहे हें पक्कें समजल्यावर सेवेशीं लिहूं. सेवेशीं श्रुत होय ही विज्ञापना. सातान्यास चत्रसिंग भोसले व होळकराकडील फौज यांणीं चहूंतर्फा मोर्चे बसवून किल्ला हस्तगत करावा म्हणोन गोळागोळी रोज चालविली आहे. हे विज्ञापना.

---

नं. ६५१३.          श्री.          ( मार्ग. शु॥ ९–३ दिसें. )

पै॥ छ. ४ रमजान सल्लास मय्या तैन पौ.प.

तागायत छ. ७ साबान मुकाम अवंतिका. येथील वर्तमान तर, रा॥ आलिजाबहादर यांणीं कुल सरदार पिरू वगैरे राजेरजवाडे यांस सरंजाममुां त्वरेनें येण्याविशीं पत्रें पाठविलीं आहेत. त्यास पिरूनें एक कंपू व फौज रवाना करोन दोन चार मजली अलीकडे आली. आणिक येक कंपू व राजेरजवाडे यांस ताकीद केली आहे. लौकरच रवाना करतों व इकडील सड्ड राखून मी येतों म्हणोन पत्रें आलीं आहेत व येथें भेलमजारी होऊन फौजा ठेवतात. प्राचीन सरदार वगैरे येकांडे यांच्या समजाविशा होऊन फडशाचे ठराव होतात व सरदारांसही फौजा ठेवावयाची ताकीद होऊन फौजा ठेवीत आहेत. पूर्वी कोट्यास घारपुडे पाठविले होते त्यांणीही कमकसर दहा हजार फौज ठेविली आहे. लौकरच येऊन दाखल होतील. बराणपुरास जलदीनें कुच करून जावें असा बेत आहे. दिल्लीवाले रहाजी येथें

---

१ आबाजी हरि किन्यांचे बातमीपत्र. २ सैन्यभरती. ३ यशवंतराव.

आले आहेत त्यांचा जाबसाल ठरल्यांत येईल त्याप्रमाणें सेवेसी लिहूं. बहादुर यांचे चित्तांत जे, दौलतींतील प्राचीन संकर्षण[1] यांची खातरजमा करोन दौलतीचा बंदोबस्त त्यांचे हातून करावा: म्हणोन रा॥ यशवंतराव शिवाजी[2] यांस बोलावणें गेलें आहे. प्राचीन बक्षीगिरीचें कामकाज सांगोन आजमीर व आवद वगैरे माहाल त्यांचे त्यास सांगोन हुजूरनें पैक्याची सरभरा करोन त्याजकडी फौज ठेवावी व दरख मागतील तो द्यावा आणि त्यांचे हातून सर्वांस बोलाऊन आणावें याप्रमाणें तऱ्हा ठरोन बोलावणें गेलें आहे. रा॥ कासीराव होळकर यांजकडे फागनीस गेले आहेत. त्यांणीं रा॥ गोपाळराव रघुनाथ यांजकडे बराणपुरास जावें असें ठरलें आहे. रा॥ गोपाळराव रघुनाथ फौज व कंपूसुद्धां बराणपुरास कूच करोन रा॥ यशवंतराव होळकर यांचे मोहरेयावर गेले. पुढें घाटाचे रोखे जातों म्हणोन पत्रें आलीं आहेत, सारांश येथें होळकराची मसलत भारी पडली आहे व श्रीमंतांस खातरजमेचीं पत्रें बरचेवर जात आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५१४ श्री. ( ४ दिसें. )

पौ॥ छ० १२ साबान. सुरू सन सलास मयातेन व आलफ.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी. त्रिकाल चरणावरी मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता॥ मार्गशीर्ष शु॥ १० पावेतों बालकाचें वर्तमान येथास्थित असे. विशेष. रा॥ माधवराव रास्ते याजला श्रीमंतांनीं वस्त्रें देऊन सोडिलें. पुरंधर व सिंहगड यांजवर रास्ते मंडळी व मुलें होतीं तीं सोडणेविशीं श्रीमंतांनीं पत्रें महाडास माधवराव याजपाशीं दिल्हीं तीं

---

१ संकर्षण=हें टोपणनाव जिऊबादादा बक्षी व बाळोबातात्या फागनीस यांस लावीत असत. २ जिऊबादादांचे थोरले चिरंजीव नारायणराव बक्षी यांचा घाटग्यानें 'बक्षीचा पक्षी' करून कसा निर्दयपणानें वध करविला हें इतिहासप्रसिद्ध आहे. जिऊबांचे दुसरे चिरंजीव यशवंतराव. जुन्या कागदांतून यांचें नांव यशवंतराव जिवाजी असें न लिहितां 'यशवंतराव शिवाजी' असेंच सर्वत्र लिहिलेलें आढळतें त्यावरून हे दत्तक गेले असावेत असें वाटतें.

पत्रें पुरंधरास येऊन रा॥ काशीराव व एक मूल लहान असे दोघे तेथें होते ते पुण्यास आले. सिंहगडचेहि एक दोन रोजीं येतील अशी बोलवा आहे. फडके राजश्री अन्या व माधवराव आल्या व परशरामभाऊ पुरंधरावर होते ते रावसाहेबांचे आज्ञेवरून सुटोन कालच पुण्यास आले. रा॥ मोरोबा दादा फडके व मंडळी विसापूर किल्लेवर आहेत त्यांजकडे पत्रें गेलीं आहेत. चक्रदेव याचे त्रिवर्ग बंधु व झाडून कुटुंब करनाळ किल्ल्यावर होतें. सुभेदार रा॥ धोंडोपंत भागवत सरकारचे पूर्वीचे प्रथम विवाहाचे सासरे ते हल्लीं दंग्यामुळें चीजवस्तसह किल्ल्यावर होते. त्यास परशराम चक्रदेव याणीं फितूर करून भागवत याजला कैद करून चीजवस्त समेत जप्ती केली. रायगडावर रा॥ गोपाळपंत कुंजर व नारोबा आवटी व निंबाजी भास्कर असे त्रिवर्ग आहेत. श्रीमंत सुवर्णदुर्गास गेले. पाठीमागें फौजा गेल्या आहेत. रा॥ बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे कालच पुण्यास आले. वाडदेकर याचे वाड्यांत दिवस चांगला नाहीं सबब राहिले आहेत. पेठे महाडाहून आजच पुण्यास आले. बागेचे रखवालीस हरकारा घेतला आहे. दीड रुपया रोज करून आणिला परंतु झाडें अलीकडे आंब्याचीं तोड राहिली. होळकर यांजकडील धरणें पैक्यास्तव रावसाहेबांकडे बसले होतें. एक रोज बसलें. नंतर फडके व मोरोबा दादा व हरिपंत मावे यांजकडे जाऊन बोलून उठविलें. इकडे प्रांतांत दंग्याची बाकी राहिली नाहीं. घरें आदिकरून मोडून आणितात. अलीबहादर याचा लेक[3] महाडाहून पुण्यास आला. शिंदे डेरेदाखल जाहले. गोपाळराव भाऊ चिटणीस बराणपुरास आहेत त्याजकडे एक कंपू शिंदे याणीं पाठविला व इकडून फौज उधळोन गेली ते असे मिळोन त्याणीं जमा करून बारा (?) नजीक असावें. बाजारांत बोलतात. वडिलास कळावें बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं.६५१५ श्रीगणपतिर्जयति. (मार्ग. शु. १२ –६ दिसें.)

दे॥ छ० १० साबान सन सल्लास मयातैन. मार्गशीर्ष.

---

१ अमृतरावाचें. २ त्र्यंबक अमृत पेठे. ३ समशेरबहादर.

विज्ञापना. श्री॥ पंतप्रधान याजबरोबर मंडळी पानशे विंचूरकर वगैरे गेले होते ते हरणईपर्यंत बरोबरच होते. नंतर श्रीमंतांनीं निरोप दिल्यावरून सारी मंडळी कुंभारल्याचे घाटानें वर येऊन पाटणखोरियानजीक मुक्काम करून होते. तेथे सातारियास चतुरसिंग व माने आहेत त्यांच्या फौजा येऊन याजवर पडल्या, तेव्हां त्यांची यांची बरीच लढाई जाली. हे मंडळीनें त्यास मागें सारून खराबी बरीच केली. नंतर तेथून निघोन कोळें नरसिंहपुरावरून आज प्रातःकाळीं प्रहर दिवसास कुपवड्यावर फौजेजवळ येऊन उभे राहिले आहेत. मीही लष्करास याबयाकरितां निघालों होतों. वाटेनें हा मजकूर समजल्यावरून त्यांची भेट घेतली. त्याणीं सर्व मजकूर सांगितले. कोळें नरसिंव्हपुरीं मुक्काम असतां त्याजकडील फौजा तयार होऊन येणार अशी आवई आल्यावरून हे रातोरात निघोन हल्लीं येथें आले आहेत. त्यांचे आमचे विचारें मुक्कामास वाडीवर जावें ऐसें ठरोन त्यांचें बुणगें चालतें जालें. मागाहून मंडळीही सर्व येईल. राजश्री गणपतराव व यशवंतराव पानशे व विंचूरकर व रघुनाथराव कायगावकर वगैरे मंडळी आहेत. कळावें. हल्लीं येथूनच समजला मजकूर लिहिला आहे. मागाहून सर्व मजकूर समजेल तसा कळवीन. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना. येथें पाणी नाहीं याजकरितां वाडीवर मुक्काम करण्याचें ठरलें. हे विज्ञापना.

---

नं. ६५१६ श्री. (७ दिसेंबर.)

पै॥ छ० १६ साबान सन सलास मयातेन व आलफ.

सेवेसीं धोंडो बापूजी जोशी त्रिकाल चरणांवर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता॥ मार्गशीर्ष शु॥ १३ पावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असो. विशेष. श्रीमंत उभयतां सुवर्णदुर्गाहून आरमारांत बसोन किल्ले वसईस जाऊन पावले. तेथून पुढें जाणार आहेत, कोणी गेले असेंही बोलतात. सुरतेकडे जाणार म्हणतात. श्रीमंत मातुश्री वेणुवदाबाई रायगडीं आहेत. कोंकणांत मीरखान पठाण गेला तोही पुण्यास आला. होळकर नित्य श्रीमंत रावसाहेबाकडे येतात. पैक्याची निकड फार आहे. येथील बंदोबस्त लौकर व्हावा असा सर्वांचा समुच्चय होत आहे. ठराव

अद्याप ठरला नाहीं. निश्चय झाला म्हणजे कळेल तें लिहितों. गृहस्थांस तगादे अनिवार होतात. राजश्री बाळाजी विष्णु आले ते वाडदेकराचे वाड्यांत राहिले आहेत. दरबारास जात असतात. राजश्री मोरोबा दादा फडके व राजश्री मोरोपंत दामले आपासाहेबाचे[१] सासरे बिसापूर येथें होते ते खालीं उतरून आले. सत्वरच पुण्यास येणार. रावसाहेब व फडके व मोरोबा दादा (व) होळकर मिळोन विचार करून नबाब व भोसले यांचे वकिलांस पुसोन नवी मुद्रा[५] करावयाचा निश्चय करोन होळकर व अन्याबा फडके व मोरोबा दादाचा पुत्र असे वस्त्रें आणावयास साताऱ्यास आज उदईक कूच करून जाणार. वस्त्रें आणवून बिनायकराव रावसाहेबाचे पुत्र याजला देऊन विनायक माधव असें नांव ठेवणार. याप्रो॥ दाट बोलवा बोलतात. शिंदे यांजकडील पलटणें एक कंपू राजश्री गोपाळराव चिटणीस याजकडे बराणपुरास आला. इकडील फौज उधळून गेली ते खानदेशांत दंगा करितात. शिंदेही डेरादाखल जाहले, याजमुळें तेथें श्रीमंतांस वस्त्रें देऊन होळकर सत्वर बराणपुरास जाणार. याजप्रो॥ बोलतात. दोन पत्रें राजश्री बाबाजीपंत याजपाशीं लिहून दिल्हीं आहेत. पावलीं असतील. कळावें. बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हें विज्ञापना.

---

नं. ६५१७ श्री. (मार्ग. शु. १४–८दिसें.)

पै॥ छ० १२ साबान सन सलास मयातेन.

सेवेशीं साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तर, उज्जनीकडील वर्तमान आलें आहे तें अलाहिदा पत्र पाठविलें आहे त्यावरोन विदित होईल. राजश्री बाळाजीपंत सहस्रबुद्धे छ० ४ रोजीं पुण्यास दाखल होऊन छ० ४ रोजीं बुधवारीं श्रीमंत रा॥ रावसो॥ व दादा व बाबा यांच्या भेटी सरकारच्या डेऱ्यांत होऊन बरकड मंडळीच्या भेटी जाहल्यानंतर रा॥ येशवंतराव होळकर रावसाहेब यांच्या डेऱ्यास आले. त्यास होळकराची व

---

१ चिमाजी आपा पेशव्यांचे हे सासरे. ५ नवी मुद्रा=अमृतरावाचा मुलगा विनायकराव यास 'विनायकराव माधवराव' बनवून त्याच्या नावें पेशवेपद चालविण्याची मसलत.

बाळाजीपंताची भेट सरकारच्या डेऱ्यांतच जाहली. नंतर भोसले यांजकडील उभयतां कारभारी व नबाबाकडील वकील आनंदराव यांच्या भेटी सरकारच्या डेऱ्यांतच जाहल्या. नंतर रावसाो व दादा व होळकर व बाबा व भोसल्याकडील कारभारी व नबाबाकडील व बाळाजीपंत याप्रमाणें सर्वांचें खलबत राज्यास अधिकारी करोन शिक्का नांवाचा चालू करोन कैलासवासी नाना(फडनवीस) यांस पुत्र द्यावा आणि राज्याचा बंदोबस्त करोन राज्यक्रम चालवावा म्हणोन इत्यर्थ ठरवावा येविसीं परस्परें सर्वांचीं बोलणीं चाललीं होतीं. त्यास नबाब याचें म्हणणें जे, पूर्वी कैलासवासी परशुरामभाऊ याणीं चिमणाजी माधवराव याचें नांवें शिक्का सुरू केला आहे तो सुरू करावा. भोसल्याचे म्हणणें जे, नबाब करतील त्यास आमचा रुकार आहे. होळकर याचें म्हणणें जे, चिमणाजी माधवराव याचा शिक्का सुरू करावा आणि चिमणाजी माधवराव यास प्रयत्न करोन आणावें. ते नच येत असें सिद्ध जाहल्यास दुसरा विचार करावयास येईल. त्यास रावसाहेब यांचे चित्तांतील लोभ निराळाच आहे. बाळाजीपंतास येशवंतराव याणीं पुसलें. त्याणीं उत्तर केलें जे, नबाब, भोसले, व तुम्ही व रावसाहेब यांचे विचारें पक्कें समजल्यानंतर आम्हांकडीलही विचार सांगूं याप्रो उत्तर केलें. त्यास येशवंतराव नेट धरोन प्रहर रात्रपर्यंत बसले होते जे शिक्का सुरू करावयाचा निश्चय करून मग जावें. त्यास सर्वांचे विचारें निश्चय ठरला जे, पुन्हां एक दोन बैठका होऊन निश्चय होईल. म्हणोन रावसाहेब यांचा निरोप घेऊन होळकर व भोसल्याकडील कारभारी व नबाबाकडील वकील गेले. नानास पुत्र द्यावा त्यास उत्तम पक्ष तर दुसरीकडील घेऊन द्यावा. नाहीं तरी रा॥ दादा यांचा नातू द्यावा याप्रमाणें बेत आहे. त्यास सदरहू मजकूरचा निश्चय एका दों बैठकीमधें होऊन ठरेल तो सेवेशीं लिहिण्यांत येईल. या खलबतांत राजश्री बाळाजीपंत होते त्याणीं कचा मजकूर जसा जसा बोलण्याचा परस्परें जाहला तो सेवेशीं कचा मजकूर तपशीलवार लिहिला आहे त्यावरोन सविस्तर कळेल. दुसरा मजकूर छ० ४ रोजीं होळकराकडील गणपतराव नारायण व नागो जिवाजी व हरिपंत भावे याप्रमाणें येऊन ऐवजाविसीं रावसाहेब यांस तगादा करोन सायंकाळपर्यंत धरणें

देऊन उपोषित होते. नंतर सहा घटका रात्रौ राजश्री दादा व बाबा व होळकराकडील त्रिवर्ग मिळोन येशवंतराव याजकडे जावोन ऐवजाचे तोडीचा मजकूर बोलोन बारावे घटके रात्रीस माघारे आले. शिंद्याकडील फौज बराणपुरास आली त्याच्या रोखावर होळकर यांणीं नागो जिवाजी व शहामतखान यांस वीस हजार फौजसुद्धां रवाना केलें ते संगमपार खडकीवर गेले. फत्तेसिंग माने कंपू व तोफखान्यासुद्धां तूर्त फलटणास जाऊन तेथून सडे पालीस देवदर्शन घेऊन पुढें कोणीकडे जातील तें पहावें. राजश्री काशीराव रास्ते पुत्रसुद्धां व अन्याबा व माधवराव फडके व कारकून परशरामपंत याप्रों पुरंधराहून येऊन छ० ४ रोजीं रावसाहेब यांच्या सर्वांच्या भेटी जाहल्या. नारोपंत चक्रदेव व बजाबा शिराळकर हे मात्र यावयाचे आहेत. रास्त्याकडील बाबा साठे व शामराव व रावजी याप्रों सिंहगडावर होते ते छ० ७ रोजीं शुक्रवारीं उतरोन बाईकडे गेले. छ० ६ रोजीं गुरुवारीं पुन्हां येशवंतराव होळकर रावसाहेब यांचे डेऱ्यास पुन्हां रोज गुदस्तचा मजकूर रावसाहेब व दादा व बाबा व भोसल्याचे कारभारी व बंदेगान अली याजकडील वकील याजपाशीं सुरू करोन उमेदीचीं भाषणें करोन सारांश होळकराचें बोलणें पडलें जे, शिक्का सुरू करावा अथवा मला कराराप्रों ऐवज द्यावा. दोन्ही होत नसल्यास मला निरोप द्यावा मी कूच करोन शिंद्याकडे जातों. असें बोलणें पडलें. नंतर निरोप घेऊन डेऱ्यास तीन घटका रात्रीं गेले. नंतर सर्व मंडळींनीं विचार करोन होळकरास कांहीं एक तोडजोडीच्या व विचाराच्या मसलतीच्या दोन गोष्टी सांगोन शांत करावें म्हणोन मोरोबादादा यांस होळकराकडे पाठविलें. त्यांणीं होळकरास विचाराचें व मसलतीचें बोलणें बोलोन होळकरांनीं रावसाहेब यांजकडे यावें असें ठरावून बारावे घटके रात्रीस माघारे आले. नंतर छ० ७ रोजीं शुक्रवारीं पुन्हां होळकर रावसाहेब यांचे डेऱ्यास येऊन राज्याचे बंदोबस्ताचे व ऐवजाचे तोडजोडीचा मजकूर व कितेक राजकारणी मजकूर परस्परें मर्जीनुरूप बोलणें होऊन सायंकाळीं माघारे गेले. य प्रमाणें येथील मजकूर आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ६५१८ श्री. ( मार्ग० शु. १४-८ दिसें. )

छ० १८ साबान सन सल्लास मय्यातैन मार्गशीर्षमास.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री गंगाधर रावजी स्वामीचे शेवेसी.

पोष्य रामचंद्र हरि[१] कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असावें. विशेष. आपणाकडून राजश्री बाळाजीपंत आले त्यांणीं तिकडील मजकूर सांगितल्यावरून सविस्तर कळलां. यानंतर चिरंजीव राजश्री चिंतामणराव आपा व राजश्री रामचंद्रराव आपा व राजश्री त्रिंबकराव आपास चिरंजीव राजश्री नारायणराव यांची फौजमुद्दां रवानगी करून सातारेयास राजश्री येशवंतराव होळकर यांची भेट घेऊन पुण्यास सत्वर येऊन पावत असें करावें. आपण सर्वांस वडील. त्याअर्थी सर्वांसीं बोलून रवानगी फौजमुद्दां लौकर व्हावी. रवाना छ० १२ साबान बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनंती.

---

नं. ६५१९ श्रीशंकरप्रसन्न. (कार्तिक ब. ११ –२१नोव्हें.)

पै॥ छ० १७ साबान सन्न सल्लास मय्यातैन मार्गशीर्ष.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री गंगाधर रावजी स्वामीचे शेवेसी.

पोष्य माधवराव अनंत साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन करावें. विशेष. आम्हीं रायगडीं होतों तेथें श्रीमंतांची स्वारी येऊन हातीं धरून स्वारीबरोबर घेऊन आले. प्रस्तुत महाडाचे मुक्कामीं आहों. ईश्वरइच्छेंकडून भेटहि होईल तो सुदीन. याप्रसंगीं श्रीमंतांजवळ असावें असा पहिलेपासून सांप्रदाय. परंतु आम्हीं येथें आल्यावर आपले कोणी नाहीं असें ऐकोन विस्मय वाटला. तथापि कूच[२] दरकूच येणें होतच असेल. कोणत्या सुमारें येणार हें ल्याहावें. आम्हीं व राजश्री बळवंतराव नागनाथ एकत्र एकविचारें आहों. तिकडूनहि[३] आपलेविसीं आम्हाविसीचा दुसरा अर्थ नाहीं. रवाना छ० २४ रजब. बहुत काय लिहिणें कृपालोभ करावा हे विनंती.

---

१ बाबा फडके. पत्र पुण्याहून मिरजेस. २ रास्ते. ३ पटवर्धनांकडून.

नं. ६५२० श्रीगणपतिर्जयति. (मार्ग० शु० १४—८डिसें.)

पै॥ छ. १२ शाबान सन सल्लास मय्यातैन मार्गशीर्ष.

अपत्यें चिंतामणीनें सा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ० १२ पर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री लक्ष्मणराव अन्या व माधवराव आत्या फडके व राजश्री काशीराव व शामराव रास्ते व त्रिंबकराव पेठे व समशेरबहाद्दर येणेंप्रमाणें मंडळी पुण्यास आली. राजश्री माधवरावजी रास्ते मेणवलीस आहेत, श्री. राजश्री रावसाहेब यांचें लग्न शुद्ध पक्षींच होणार. रावसाहेब यांणीं राजश्री यशवंतराव होळकर यास रुप्याची अंबारीसुद्धां हत्ती दिला. याप्रमाणें ( पुण्याहून ) लिहिलें आलें म्हणोन लिहिलें तें कळलें. पुण्याहून आजच लाखोटे आले ते सांडणीस्वार याजबरोबर सेवेसीं पाठविले आहेत. पोचले असतील. नवल विशेष वर्तमान असल्यास ल्याहावयास आज्ञा द्यावी. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६५२१ ( मार्ग. शु. १४-८ डिसें. )

उतारा—पत्र बाळाजीपंत दामले यांचें रहिमतपुराहून मिरजेस.

" चतुरसिंग व ( नारायणराव ) माने यांचा मुक्काम पालीवर आहे. रा. फत्तेसिंग माने यांजकडील पागा हजार दोन हजार स्वार पुण्याहून आले त्यांचा मुक्काम निंबावर आहे. मागाहून मानेही सरंजामसुद्धां यावयाची बोलवा आहे. पालीस देवास येणार. माने यांजकडील रा. रामचंद्रराव घोरपडे दोन हजार फौजेनिशीं खंडण्या करीत मायणीवर आले आहेत. साताऱ्यास माने याजकडील फौज बसली आहे. शहरांत लोक माने याजकडील गेले. किल्ला झुजत आहे. लष्करच्या दंग्यामुळें रहिमतपुराभोंवतालीं खेडीं उजाड जालीं ! "

---

नं. ६५२२ श्री. ( १० दिसेंबर. )

पै॥ छ० १८ शाबान सन सलास मयातैन व अलफ.

सेवेशीं धोंडो दामूजी जोशी त्रिकाल चरणांवर मस्तक ठेवून शिरसाष्टांग

---

१ पत्र चिंता. आबा सांगलीकर यांचें मंगळवेढ्याहून मिरजेस.

नमस्कार विज्ञापना. ता।। मार्गशीर्ष बद्य १ पावेतों बालकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. होळकर खासा श्रीमंत राजश्री विनायकराव याजला वस्त्रें आणावयास्तव सातान्यास निघोन जाण्यास्तव कोंडव्यास जाऊन मुक्काम केला. चार पांच रोज अभ्र आलें आहे. परज्यन्यही बारीक लागतो. थंडीमुळें जखमा तिडकों लागल्या. याजमुळें होळकर माघारे गोटास काल पोर्णिमेस आले. पुढें मान्यास रवाना आज करणार. फडके व राजश्री मोरोबा दादाचे पुत्रही उदईक जाणार असें बोलतात. राजश्री मोरोबा दादा फडके किल्ले विसापूर येथून आले. काल सर्वत्रांच्या भेटी जाहल्या. राघोपंत गड्बोले, नानाकडील याजला नवज्वर होऊन देवाज्ञा जाहले. चार रोज झाले. श्रीगबाजी देव चिंचवडकर मोरयाभक्त देवाज्ञा जाहले. श्रीमंत उभयतां सुवर्णदुर्गाहून जलमार्गे वसईस गेल; कोणी म्हणतात कीं जंबुसरास गेले असें म्हणत होते, परंतु कालपासून आपासाहेबांस समुद्र लागला, वारा नीट न लागे, यास्तव मागती उभयतां जमेतसुद्धां सुवर्णदुर्गास आले असें बोलतात. तथ्य समजल्यावरून मागाहून लिहितों. रायगडाचा बंदोबस्त पक्का आहे. तूर्त मातुश्री यशोदाबाई खालीं येत नाहीं. कोंकणप्रांत सुवर्णदुर्गापासून श्रीपरशुरामसमेत गांव उध्वस्त जाहले! राखणमात्र घरीं आहेत. घाटापर्यंत कह्या जाऊं लागल्या. राजश्री बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे सातारेकडे जाऊन मिरजेस जाणार होते, परंतु होळकर राहिले याजमुळें जाऊं न जाऊं असें त्यांच्या बोलण्यांत आहे. गेल्यास एक दोन रोजीं निघतील. वडिलांस कळावें. येसू कानडा आजपर्यंत आला नाहीं. कोठे आहे, गत काय कळत नाहीं. बाळाजी विष्णु ( हे ) वाडदेकर यांच्या वाड्यांत आहेत. वडिलांस कळावें. बहुत काय लिहिणें. शिंदे याजकडील कंपू गोपाळराव भाऊ याजकडे आला. शिंदे डेन्यास निघाले याजप्रमाणें बोलतात. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५२३ श्री. ( मार्ग. व. १ –१० दिसें. )

पै।। छ० १८ साबान सन सलास मयातेन.

× सेवेशीं बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ० १४ साबान पावेतों यथास्थित असे विशेष. स्वामींनीं राजश्री आबाजी हरि किबे यांचा लखोटा पाठविला तो त्यास पावता केला. मी आल्यावर बोलणीं होऊन पत्राच्या तीन रवानग्या जाहल्या. त्यांतील भाव सर्व समजण्यांत येतील. श्रीमंत राजश्री आपासाहेब जमखिंडीस रविवारीं गेले म्हणोन ऐकलें. पत्रें आतांच आलीं त्यांत जाण्याचा मजकूर कांहींच नाहीं. ऐशास हे दिवस जमखिंडीस जावयाचें कीं काय? मला इतल्ला+ जाण्याचा कांहींच दिल्हा नाहीं. मनसब्यांत कसें येऊन जाणें जाहलें असेल तें असो. स्वामींनीं पत्रें लौकर पाठवून मिरजेस येण्याविसीं लिहिलें पाहिजे. येथें बोलणीं होतात तीं बरोबर लिहितों. त्यांत अधिक उणें काय बोलावयाचें असेल तें सुचविलें पाहिजे. रा॥ येशवंतराव होळकर यांची स्वारी सातारियास जाणार होती ती राहिली. रा॥ फत्तेसिंग माने जाणार. सरकारच्या तोफखान्यांतील तोफा होळकरांनीं काढून नेल्या होत्या त्यापैकीं दहा तोफा परवांचे दिवशीं कारखान्यांत लावून दिल्या. कालपासून सरकारचे डेन्यास होळकराकडील पठाणांचें पैक्याकरितां धरणें बसलें आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६१२४. श्री. (मार्ग. व॥१–१० दिसें.)

पै॥ छ. २७ साबान सन सलास मया तैन. मार्गशीर्ष.

सेवेसी सां॥ नमस्कार विज्ञापना. ता॥ छ. १४ साबानपावेतों वर्तमान यथास्थित असे विशेष. पेशजी छ. ११ मिनहूचीं पत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत. त्यावरोन सविस्तर निवेदन जाहालेंच असेल. स्वामींनीं छ. ८ मिनहूचें पत्र व स(ह)स्रबुद्धे यांची चिठी पाठविली ती पावोन आनंद जाला. हल्लीं इकडील वर्तमान तर, राजश्री यशवंतराव होळकर सातान्यास वस्त्रें आणावयाकरितां मार्ग. शु. १३ मंगळवारीं दोनप्रहरानंतर कूच करून एका कोसावर कोंडव्यावर मु॥ केला. तेथें सायंकाळीं होळ-

× सहस्रबुद्धे हा पटवर्धनांनीं होळकराकडे पाठविलेला वकील. + इतल्ला = माहिती.

कर यांस वमन होऊन ज्वरांश जाला; व रा. मोरोबा फडणीस याचे पुत्र नाना व अन्याबा फडके हे उभयतां होळकराबरोबर साताऱ्यास जाणार; त्यास या उभयतांचें जाणें होळकरांबरोबर होत नाहीं, हें होळकरांस समजलें; व होळकरासही बुधवारीं ज्वर विशेष जाहाला. त्यास होळकरांनीं आपल्या तर्फेचे मान्ये यांची रवानगीची सिद्धता केली. आणि सरकारतर्फेचे रा. त्रिंबकराव पेठे यांची नेमणूक जाली. नंतर, होळकर बुधवारीं दोनप्रहरीं पुन: माघारे डेऱ्यास आले. डेऱ्यास एक रात्र राहून शनवारीं प्रातःकाळीं सडे रास्ते यांचे वाड्यांत राहाण्याकरितां आले. मान्ये शुक्रवारीं कूच करून वीस तोफा वगैरे पलटणें व फौजसुद्धा साताऱ्यास गेले. पेठे आज शनिवारीं जाणार. मान्ये व पेठे जाऊन महाराजांचीं वस्त्रें आणावीं. असा बेत जाहाला आहे. बुधवारीं अस्तमानीं होळकराकडील पठाण व रा. गणपतराव नारायण व नागो जिवाजी याप्रों येऊन श्रीमंत राजश्री रावसाहेब यांजकडे धरण्यास बसले. ते गुरुवारीं दाहा घटका रात्रीं तोडजोड करून उठविले. दोन दिवस रा. बाबा फडके रावसाो यांच्या डेऱ्यांतच होते. होळकरास समाधान नाहीं म्हणोन रास्त्याचे वाड्यांत आले आहेत. श्रीमंत रावसाो शुक्रवारीं होळकर यांचे समाचारास रास्त्यांचे वाड्यांत गेले होते. श्रीमंत राजश्री बाबासाहेब तारवांत बसून वसईकडे गेले होते. त्यास आपासाहेब यांचा वाखा तारवांत बसल्यामुळे जाला. व वाऱ्यानें तारूं हाटलें म्हणोन पुन्हां माघारे रेवदंड्यास उभयतां श्रीमंत मंडळीसुद्धां आले. सुवर्णदुर्ग व रायगड यांचीं संधानें लागलीं आहेत. हस्तगत होतील असें आहे. श्रीमंतांकडून विंचूरकर व पानशे व विनीवाले वगैरे ग्रहस्त मिळोन फौजसुद्धां दोन हजार कुंभारल्याचे घाटानें पाटणास येऊन तेथून चरेगांवास आले. हें वर्तमान चत्रसिंग यास समजलें. नंतर दीड हजार स्वारांनिशीं साताऱ्याहून विंचूरकर वगैरे मंडळी याच्या मोहरेयावर गेले. त्यास विंचूरकर पानशे व विनीवाले यांची फौज दीड हजारपर्यंत मजबूत होती. उभयतांची लढाई चरेगांवावर मार्ग. शु॥ १२ सोमवारीं सायंकाळीं जाहाली. चत्रसिंग शिकस्त होऊन सडे दोनशें रावतांनिशीं साताऱ्यास आले. बाजत फौज विंचूरकर वगैरे यांणीं लुटली. याप्रों बातमी येथें आली.

येथील वर्तमान कूच (केलेचे) कचें अक्षरशाहा रा. बाळाजीपंतदादा यांणीं स्वामीस लिहिलें आहे. त्यावरोन विदित होईल. येथें राज्यक्रमाचा नित्य नवा नक्षा येक होत आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५२५ श्री. (मार्ग. व. ३-१२ दिसें.)

छ० १६ साबान सन सल्लास मयातेन व आलफ.

सेवेशीं साष्टांग नमस्कार विज्ञापना. दिल्ली व उज्जनीकडील पत्रें आलीं नाहींत. आल्यानंतर सेवेशीं पाठवितों. सेवेशीं छ० २ व छ० ४ व छ० ८ साबानचीं पत्रें पाठविलीं आहेत त्यावरून सविस्तर निवेदन जाहलेंच असेल. हल्लीं येथील वर्तमान तरी शु. १० व ११ व १२ तीन दिवसपर्यंत नबाबाकडील राजश्री आनंदराव, भोसल्याकडील उभयतां कारभारी व राजश्री येशवंतराव होळकर व श्रीमंत राजश्री रावसाहेब व रा॥ मोरोबा दादा व बाबा फडके व आपणांकडील रा॥ बाळाजीपंत यांस सर्वतांचीं परस्परें बोलणीं होऊन सर्वांच्या विचारें राज्याधिकारी करून शिका चालू करावा हा निश्चय ठरला. नंतर श्रीमंत रा॥ रावसाहेब यांचे पुत्र विनायक माधवराव करोन त्याच्या नावें शिका सुरू करावा म्हणोन नबाब व भोसले व येशवंतराव होळकर व आपल्याकडील बाळाजीपंत व लहान मोठे मुत्सद्दी सर्वांचे रुकार पडोन निश्चय शु॥ १२ सोमवारीं रात्रौ ठरोन रा॥ येशवंतराव होळकर यांणीं सातान्यास जाऊन राज्याचीं वस्त्रें विनायक माधवराव यांचे नांवें आणावीं. बरोबर रा॥ मोरोबा दादा यांचे पुत्र नाना व रा॥ आन्या फडके होळकराबरोबर सातान्यास जाणार. हा निश्चय ठरोन शु॥ १३ मंगळवारीं दोनप्रहरानंतर येशवंतरावांनीं कूच करोन जावें. व॥ ४ अथवा व॥ ७ पेशवाईचीं वस्त्रें विनायक माधवराव याचे नावें व्हावीं असा मुहूर्त सिद्ध केला आहे. सरकारचीं पत्रें श्रीमंत रा॥ चिंतामणराव आपा यांस व रामचंद्रपंत आपा यांस व त्रिंबकराव यांस फौजमु॥ सातान्यास येऊन येथें होळकराच्या भेटी होऊन होळकर व पटवर्धन मंडळी वस्त्रें घेवोन समारंभ करोन पुण्यास येण्याविशीं पत्रें गेलीं आहेत. व रा॥ बाळाजीपंत दादा यांणींही येथील वचा विचार जाहला तो अक्षरशाहा चार बंद लिहिला आहे त्यावरोन सवि-

स्तर विदित होईल. व फौजसु॥ सर्वांनीं निघोन सातान्यास यावें म्हणोन सविस्तर लिहिलें आहे त्यावरोन कळेल. होळकर यांस ऐवज देणें त्यापैकीं पंधरा वीस लक्षांचा भरणा होळकराकडे जाहला आहे. याप्रमाणें येथील वर्तमान आहे. पुढें होईल तें सेवेशीं लिहूं. श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब सुवर्णदुर्गाहून निघोन वसईकडे गेले. पुढें भडोचकडे जाणार असा बेत आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५२६ ( मार्ग. व. ४।१३ दिसें. )

उतारा—पत्र धोंडो बापूजीचें पुण्याहून मिरजेस.

" पेठे बस्त्रें आणावयास सातान्यास गेले. आज तीन दिवस जाले. दशमीस महूर्त पाहिला आहे. × × ×श्रीमंत उभयतां रेवदंड्यास गेले. पुढें वसईकडे जाणार. सुवर्णदुर्गास सौ० मातुश्री ताईसाहेब, काकूसाहेब रहातात. बाळाजीपंत पटवर्धन व कुंजर याचा भाचा धुमाळ यांस ( रायगड ) किल्लेकरी यांणीं कैद केलें. शिंदेकडील कंपू वगैरे फौज रामचंद्र भास्कर यास पांच सात हजार देऊन ते बराणपुरास दाखल जाले. रा. गोपाळराव ते मिळोन होळकर यांचे प्रांतांत ठाणीं बसवित आहेत. खासा शिंदे यांचाही बेत इकडे येण्याचा आहे. तयारीची जारी आहे. "

---

नं. ६५२७ श्री. ( मार्ग. व ६-१५ दिसें. )

पै॥ छ० २० साबान सन मयातेन.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं

विनंती सेवक बाळाजी महादेव दामले. चरणांवर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ० १९ साबानपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. रा॥ फत्तेसिंग माने दहा हजार फौजेनिशीं काल सायंकाळीं किल्ले सातान्यानजीक मौजे कोडोली येथें मुक्कामास आले. तोफा मागाहून येत आहेत. पुढील मसलत. येथील कामकाज जाहल्यावर मौजे

---

१ पत्र रहिमतपुराहून मिरजेस.

पालीस श्रीखंडोबास जाऊन श्रीजोतिबास जाणार. कराडास खंडणीचे वसुलास पांचशें स्वारांनिशी रा॥ पाटलोजी माने गेले आहेत. वांईप्रांतांत कराड प्रांतात बहुत दंगा जाहला आहे. आज मी लष्करांत माने यांच्या भेटीस जातों. तेथून आल्यावर आणखी समजेल मजकूर तो विनंती लिहून पाठवितों. पांडववाडीस व पाडळीस पत्रें पावतीं करून उत्तरें आणोन पाठविलीं आहेत. कवठें अद्याप पिकों लागलीं नाहींत. कोवळीं आहेत यांत पिकावयाजोगीं पाठवून देतों. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६५२८ श्री. ( मार्ग व. ९-१८ दिसें. )

पै॥ छ० २४ साबान सुरू सन सलास मयातेन व अल्फ.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं—विनंती सेवक बाळाजी महादेव दामले चरणांवर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता. छ० २२ साबान मंदवारपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री फत्तेसिंगराव माने याच्या लष्करांत सातारच्या मुक्कामीं दोन रोज होतों. काल सायंकाळीं आलों. श्रीमंत राजश्री विनायकराव साहेब यांस वस्त्रें द्यावयाचा बेत पुणियांत ठरोन वस्त्रें न्यावयाकरितां राजश्री त्रिंबकराव व नारोबा काका शिराळेकर माने याजबरोबर आले आहेत. वस्त्रें द्यावयाचा ठराव होऊन किल्ल्याचे मोर्चे उठले. वस्त्रे आणावयास किल्ल्यावर नारोबा काका व नारायणराव माने गेले. आज वस्त्रें घेऊन येतांच पुणियास रवाना व्हावयाचीं. दशमीस अथवा त्रयोदशीस वस्त्रें होऊन श्रीमंत राजश्री 'विनायकराव माधवराव' होणार. श्रीमंत ठरल्यावर शिंदेही दत्तक करावयाचा बेत आहे. श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब व चिमणाजी आपा व बाळोजी कुंजर व दिनकरपंत पटवर्धन व आपाजीपंत सहस्रबुद्धे असे जलमार्गें भडोजेस गेल्याचें वर्तमान आहे. सातारा येथील कामकाज जाहल्यावर माने करवीराकडे जाणार. पांच लक्ष खंडणी कराडकर यांस लाविली आहे. बोलण्यास कारकून आले आहेत. त्यांणीं पांच हजारांचा गांव माने यास द्यावयास करून बोलणें लाविलें आहे. माने

१ पत्र रहिमतपुराहून मिरजेस.

याजबरोबर फौज दहा हजार चाळीस तोफा एक कंपू इतका सरंजाम आहे. होळकर यांणीं चौघडा दिल्हा आहे. कचेरीच्या डेन्यांत गादीवर बसावयाचे. मोरचेलाची चौरी आहे. श्रीमंतांची नौबत, खासे हत्ती व घोडीं बराबर आहेत. बत्तीसशिराळ्यास ठाणें माने यांणीं घातलें आहे. त्याचे सोडचिठीविशीं श्रीमंत राजश्री आपासाहेब यांजकडून राजश्री अन्याबा जोशी माने याजपाशीं आले होते. तेथें मीही गेलों होतों. तेव्हां अन्याबांनीं शिराळ्याचे जावसालाकारितां आलों म्हणून सांगितल्यावरून माने याचे कानांवर घालून सोडचिठी देविली. ठाणें हवालीं करणेविसीं घेऊन दिल्ही. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६५२९ (मार्ग. व. ११-१९ दिसें.)

उतारा-धोंडो बापूजीचें पत्र पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस.

"तालुके अंजनवेल येथील सुभा राजश्री हरीपंत भावे यांणीं पंधरा हजार रुपये देऊन केला त्यास कारभारास राजश्री जनार्दनपंत भागवत त्यांणीं पाठविले. रावसाहेबांनीं आपलें लग्न करावयास कोंकणांतून दोन मुली आणिल्या. वडगांवचे बागांत सामानमुद्रां गेले. नंतर त्यांणीं रुबरू डेन्यास आणून पाहिल्या. मर्जीस न आल्या यास्तव माघाऱ्या कोंकणांत पाठविल्या. सामान परत आणिलें. बागांतील नवाबाकडून बडेखान पाहिला इंग्रजांकडील वकील येथें आहेत त्याजकडून बोलत होता. सरकारचे गैरमर्जीनें दादा गद्रे याचे बोलण्यावरून त्याजला ताकीद केली त्यावरून तो मागें नवाबाकडे गेला. तो परांडे यास होता. तो मागती नवाबाकडून हजार जमाव बरोबर घेऊन बोलण्यास आला. रावसाहेबांच्या भेटी जाल्या. तीन रोज जाले. काल होळकर याचे डेन्यास तो गेला. नंतर होळकर ते मिळोन रावसाहेबांकडे आले. त्यांतील भाव समजण्यांत आला नाहीं. शामीरखान पठाण याजला शिंदे यांणीं मागें लुटला. तो नवाबाकडे होता तोही आला. रावसाहेब यांची भेट होऊन बाजूस उतरला. श्रीमंत उभयतां रेवदंडे किल्यांहून वसईस गेले असें दोन रोज बोलतात. मुंबईस जाऊन मेजवानी घेऊन वसईस आले असेंही बोलतात. परंतु वसईस

आले असें बोलतात. श्री|| राजश्री विनायकराव याजला वस्त्रें दशमीस होणार होतीं, परंतु सातारेयाहून आलीं नाहींत. याजमुळें दशमीचा मुहूर्त राहिला."

---

नं. ६५३० श्री. (२० दिसेंबर.)

छ. २९ साबान सन सलास मयातेन. पौष.

सेवेशीं घोंडो बापूजी जोशी त्रिकाल चरणांवर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत मार्गशीर्ष व|| ११ सोमवार प्रातःकाळ-पावेतों बालकाचें वर्तमान यथास्थित असो. विशेष. इकडील मजकूर पत्र लिहून व वे|| रा|| शामभट बाबाचें पत्र व वे|| रा|| वासुदेव जोशी चिप-ळोणकर याचें पत्र व रा|| केसोपंत दादा व दाजीबा परचुरे व भऊ दीक्षित अशीं पत्रें एकत्र ललोटा करून रा|| बाबाजीपंत पटवर्धन याजपाशीं आजच दिल्हा आहे. त्या पत्रांवरून कळोन येईल. श्री|| रा|| विनायकराव याजला वस्त्रें आणावयास सातान्यास माने व पेठे गेले. त्यास महाराज यांणीं आपलीं तेथील खर्चाचीं बोलणीं घातलीं. व किल्ल्याचें सिबंदीचें बोलणें वगैरे घातलें. त्याजवरून पूर्वी चाल आहे त्याजप्रमाणें महाराजांनीं घ्यावें. किल्ल्याचे सिबंदीचा फडशा ज्याजकडे कारभार आहे त्याजकडून होईल. याजप्रमाणें बोलणें उरकून घेऊन वस्त्रें आणावीं अशीं पत्रें रावसाहेबांचीं गेलीं. परंतु दशमीचा मुहूर्त पाहिला होता त्या बेतास वस्त्रें आलीं नाहींत. त्रयोदशीस मुहूर्त आहे. पौष मास पुढें आहे जेव्हां वस्त्रें येतील तेव मुहूर्त असें बोलणें होळकर यांचें आहे. पुढें विचार कसा होईल मागाहून लिहून पाठवितों. शिंदे डेन्यास निघाले. उज्जनीहून बाराचव्दा कोश आले. दहा-बारा पलटणें व दहा हजार फौज आहे. पुढें रामचंद्र बक्षी याजबरोबर चार पलटणें व पांच हजार फौज देऊन रा|| गोपाळराव चिटणीस याजकडे पुढें आले. येथून फौज मोड होऊन गेली ते खानदेशांत होळकर यांचे प्रांतीं दंगा करीत आहे. बाकी मुलुखाची ठेवीत नाहीं. याजप्रमाणें आहे. होळकर याजकडून एक कंपू सहा पलटणें व दहा हजार फौज दोन

---

१ पायदळ फौज. या ठिकाणीं फौजेचें देणें.

चार रोजांनीं नगरच्या सुमारें पाठवणार याजप्रमाणें बोलतात. पुण्यामध्यें पट्टी करणार अशी बोलवा आहे. घाटमाथांपर्यंत कह्या गेल्या. पुढें तेथें वैरण बहुत महाग होईल. आज कुणबी याची शेतची पेंढी बांधीव कडबा पुण्यांत साडेतीन चार रुपये मिळती. तो हजार पांचशें नाहीं. किरकोळ मिळती. कळावें बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५३१. श्री. ( २५ दिसेंबर. )

पै॥ छ. ३ रमजान सल्लास मय्या तैन पौष. सोमवार.

श्रेवेशी धोंडो बापूजी जोशी त्रिकाल चरणावरी मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना.

तागायत पौष शु॥ १ पावेतों बालकाचें बर्तमान यथास्थित असे. विशेष. सातारे याजवरून वस्त्रें पेठे याजपाशीं आलीं, कोणी म्हणतात न आलीं, असें बोलतात. मुहूर्त पौष शु॥ १३ त्रयोदशीस पाहून ठेविला आहे. कैलासवासी नानासाहेब याजला वस्त्रें व नारायणराव याजला वस्त्रें पौष मासीं जालीं यास्तव यांसहि देणार. श्रीमंत राजश्री उभयता वसईहून जंबुसरास गेले. शिंदे याजकडील फौजेनें दंगा चांदवड प्रांतीं होळकर यांचे मुलकांत आहे. येथें वस्त्रें देऊन होळकर खासा जाणार. पठाण वगैरे एक कंपू एक दोन रोजीं नगरास रवाना करणार. पैका इकडून पावला म्हणजे पाठवणार. पुण्यांत पट्टी तूर्त पंचवीस लक्षांची केली. कारभारी राजश्री परशराम भाऊ फडकेकडील आपाजीपंत आठवले, बारामतीकराकडील सदाशिवभट दाते, दिवाणजी व गणेशपंत मठंगे खासगीवाले याजकडील असे चवघेजण आहेत. पंचवीस रुपयेपासून हजारपर्यंत आंख घालून रुपये घेतात. रविवार पेठेंत कालपासून वसूल चालू केला. आपल्या वाड्याचा मजकूर कसा हे राजश्री बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे यास पुसिलें. शोध घेऊन सांगूं असें बोलले आहेत. कळल्यावर मागाहून लिहून पाठवितों. श्रीमंत राजश्री विठलराव बापू व बाबासाहेब पुण्यास येणार त्याजसमागमें श्रीमंत राजश्री माधवरावसाहेब देणार असें ऐकितों

---

१ कही = फौजेची दाणावैरण मिळविणारी टोळी.

त्यास लिहून पाठविण्यास आज्ञा करावी. यावें हें चांगलें. माझें मत वडिलांस कळावें. वैरण कडबा साडेतीन रुपये शेंकडा आज मिळतो. तो पांच हजार मिळत नाहीं. हजार पांचशें आणून कावडी देतील. पुण्यांत घरचे घोडी गुरांचे बेगमीचा कोणी कडबा घेतला आहे तो होळकराकडील हत्ती व स्वार व तट्टे असे गांवांत फिरोन घरांत शिरोन घेऊन जातात. व गांवांतील पिंपळ झाडून हाणोन नेलें. बंद होत नाहीं. याजप्रमाणें आहे. याउपर काय आहे कांहीं समजत नाहीं असें बोलतात. कळावें, बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५३२  श्री.  ( पौष शु० ३-२७ दिसें. )

पै॥ छ० ३ रमजान पौषमास सल्लास मय्यातैन.

× सेवेशीं विनंती सेवक बाळाजी महादेव दामले शिरसाष्टांग विज्ञापना. ता॥ छ. १ रमाजन वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंतांस वस्त्रें कोणा मुहूर्तावर जाहलीं हें वर्तमान लिहिणें व कराडास खंडणीविशीं निकड लागली होती त्याचें काय ठरलें व माने पुढें कोणत्या रोखें जाणार हें ल्याहावें म्हणोन आज्ञा. त्यास कराडकर याणीं चार लक्ष रुपये खंडणी कबूल करून पांच हजाराचा येक गांव द्यावयाचा करार केला आहे. आतां खंडणीचा ऐवज करार केल्याप्रमाणें फडशा करून देणें म्हणोन स्वार पांचशे कराडानजीक बसविले आहेत. कराडीं दोन चार हजार फौज पायदळ मिळोन जमा केले आहेत. यास्तव काल दहा तोफा कराडास रवाना जहाल्या. ऐवजाची निकड भारी बसविली आहे. श्रीमंत मातुश्री काशीबाई* कराडाहून निघोन किले वसंतगडास गेली. रा॥ मोरोपंत पेंडरकर कारभारी मात्र कराडास राहिले आहेत. वस्त्रें सातान्याहून पुण्यास गेलीं. वस्त्र त्रयोदशीस होणार होतीं परंतु जाहलीं नाहींत. पौष शु॥ अष्टमीस व्हावयाची बोलवा आहे, माने याचा मुक्काम सातान्याहून कूच होऊन मौजे आगापुरावर आला. आज उद्यां कसबें रहिमतपुरास मुक्काम देणार. पुढील रोख तर करवीरकर याजकडील वकील

---

× पत्र रहिमतपुरास मिरजेस.. * ही भवानराव प्रतिनिधींची स्त्री.

आले आहेत. तिकडीलही खंडणी घ्यावयाची व मिरज प्रांतांतील बगैरे मुलखांतिल खंडण्या घ्यावयाची बोलण्यांत धमक आहे. तिकडे येणार. मिरजेकडे फौज किती आहे. दरबारांत कारभार कसा होतो वगैरे याच्या बातम्या नेहेमीं माने याणीं राखिल्या आहेत. दररोजचें बर्तमान येत असतें. माने यांचे दृष्टींत कांहीं राहिलें नाहीं. घाटगे याचे विचारासारिखा कारभार आहे. रा॥ बज्याबा शिराळेकर याचे भाऊ नारोपंत काका माने याजपाशीं कारभार करीत होते. त्याजवर उगाच आरोप आणून पन्नास हजार रुपये द्या म्हणून बेआबरू करून पाहाऱ्यांत बसविले आहेत. चाप लावितात. बंदुका खांद्यावर देतात. या प्रकारचे त्यांचे हाल मांडिले आहेत. लहान थोर मनुष्य याचा विचार कांहीं येक नाहीं. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६५३३ श्रीगणपति. (पौष शु० ४– २८डिसें.)

छ० २ रमजान सन सलास मय्या तैन पौष.

अपत्यें रामचंद्रानें शिरसा० नमस्कार विज्ञापना. ता. छ० २ रमजानपर्यंत यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. रा. बाबूराव नरसिंह निपाणकरांकडून आल्याचें व पेंढारी यांस निक्षून ताकीद करण्याचें लिहिलें. त्यास मा॥ निल्हे व निपाणकरांकडील रा. बाळाजी हणमाजी येथें हरीपूरचे मुक्कामीं काल आले. आज त्यासी बोलणें होऊन निपाणकरांस[२] येथें आणावयाकरितां उगयतांस पाठविलें. आज्ञेप्रों. पेंढारी यांसही ताकीद करितों. रा. बाळाजी दामोदर पागा घेऊन आले. जवळच उतरावयास जागा दिल्ही आहे. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६५३४ श्री. ( २९ डिसें. )

पे॥ छ० ९ रमजान सन सल्लास मय्यातैन व अलफ.

सेवेसी धोंडो बापूजी जोशी शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. पौष

---

१ राम. आपांचे पत्र मिरजेस. २ आपा देसाई.

शु० ५ पावेतों बालकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत उभयतां बसईस आहेत. वस्त्रें सातारेचीं येत आहेत. त्रयोदशीस देणार ऐसी बोलवा आहे. येथें वाडा व जागे मिळोन येकंदर याद हरीपुरास लिहून पाठविली. तपशील—

| | |
|---|---|
| १ वाडा | १ श्रीवंकारेश्वराजवळील बावांचे समादीची जागा. |
| १ पागा नगारखाना. | १ जुनी पागा. |
| १ कुणबिनीचीं घरें व भाई माल. | १ सदाशीव पेठेंतील जागा. |
| १ दुकान बुधवारांतील हालवाई यांचें. | १ गंजपेठेंतील दुकान तुमचें. |
| ४ | ४ |

येकूण आठ जागा लिहून पाठविल्या आहेत. पट्टीमुळें सूव उडाली आहे. श्रीमंताकडून बसईहून हजार जमाव कल्याणप्रांतीं आला आहे. गावगनी रोखे करून ऐवज घेत आहेत. श्रीमंत बसईस आहेत. काशीबा होळकर पांच हजार फौज व चार हजार पेंढार असे श्रीनाशिकास येऊन गाव बेचिराख नाशीक लुटिलें असें बोलतात. काल होळकर खासा रावसाहेबांचे डेऱ्यास दीड प्रहरपर्यंत ऐवजास्तव बसले होते. फडके व दादा यांस उपोषण जालें. दरबार काल नव्हता. नंतर बोलणें होऊन गांवांत पठाण पट्टीचा कारभार करितात त्यास आडऊन अबरू घेतल्या. कारभारी तोंड चुकाऊन होते त्याजकडील उठविले. रावसाहेबाकडील लोक दिल्हे. पांच सात आठ रोजा वसूल करून रुपये वीस लाख द्यावे असें बोलतात. आज बोहरी व कापडकरी व पसारी वाणी वगैरे दुकानदार यांणीं दुकानें झाडून गावांत लाविलीं. हर्ताळ पडली आज आहे. भाजी मात्र मिळत्ये. परवां काल मिळोन जोहरी व सवदागीर गोसावी पट्टीचे भयानें हजारपर्यंत हैदराबादेस गेले. बाकीचे सोय पाहून जाणार. कांहीं बाकी येथें राहिले नाहीं. बहुत काय लिहिणें, सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ६५३५ श्री. (२९ दिसें.)

पै॥ छ० ९ रमजान सन सल्लास मय्यातैन पौष.

सेवेसी धोंडो बापूजी जोशी त्रिकाल चरणावरीं मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ पौष शु॥ ५ पावेतों बालकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वृत्त दोन वेळां लिहून वे॥ रा॥ शामभट बाबा व जोशी बाबाकडील पत्रें घेऊन रा॥ बाबाजीपंत याजपाशीं दिल्हीं आहेत त्याजवरोन कळों येईल. पुण्यांत पट्टी लागली. कारभारी रा॥ परशराम भाऊ फडकेकडील व आपाजीपंत आठवले बारामतकिराकडील व गणेशपंत मठंगे खासगीवालेकडील व दिवाणजी (व) सदाशीवभट दात्ये यांजकडे. त्यास परवा व काल पठाणांनीं परशरामभाऊस उपोषण घालून आबरू घेतली. गणेशपंत खासगीवाले यांजकडे चार पेठा बेताळ व भवानी व शुक्रवार व गंज पेठ आहे. त्याचें काल धरणें बसोन पंचवीस हजार रुपये सायंकाळपर्यंत घेतले. आठवले यांची आबरू घेतली. आबा ठोसर यांजकडे प्राचीन पेठ सदाशीव होती ती त्याजकडे हालीं सांगितली आहे. त्याणें पेठेंत लोकाकडे यादी लिहून प्यादे बसविले. इतक्यांत आज अडीच हजार रुपये त्याणीं द्यावे यास्तव पठाणांनीं आबरु घेऊन हाणमार केली व चाप लाविले व येक दोन गृहस्तास चाप लाविले. मोठा प्रलय आज दोन रोज जाला ! पंचवीस लक्ष रुपये पट्टीचा आकार आहे. सोईनें पंधरा रोजीं देतों म्हणतात. परंतु पठाणांनीं सूद बेचिराख करून दिल्ही ! होळकर तोंडावर चांगलें बोलतात. तगादा पठाणांचा कमी होत नाहीं. कारभारी मुख्य यांचीं अवसानें घाबरीं करून दिल्हीं ! आपला वाडा दुकान व पागा वगैरे सात आठ जागा त्याची याद लिहून रा॥ बाळाजी विष्णूजवळ दिल्ही. आज ते रावसाहेबांकडे घेऊन गेले. आपल्या वाड्याची व त्याणीं आपले वाड्याची व दादाचे घराची येकत्र करून घेऊन गेले. परंतु होळकर तेथें होते. पठाण बसले होते. ते पुण्यांतील कारभारी भाऊ वगैरे यांजकडे जावें तरी ते पठाणांनीं बसविले ! कोणासी बोलावें ! उठोन आलों. पैका सुटणार नाहीं. आपण अबरू कां गमवावी ! आठ रोज वायदा दिल्यास यजमानास लिहून फडशा करूं.

बायदा न देत तरी आपला उपाय नाहीं. त्याजकडे वाडे त्यांणीं आपली सोय पाहावी असे मला व विनायकपंत गडबोले व भास्करभट वाडदेकर यांजला सांगितलें. त्यास सर्व जागा मिळोन तीन हजारापासून चार हजारपर्यंत रुपये पडतील. गांवांत येकच हाक जाली! कोणी तांब्या ठेऊन पैसा देत नाहीं. पैका न मिळाल्यास पठाणांचे हवालीं करतात! पैका चार हजार मिळणें दिसत नाहीं. प्राणासी गांठ आहे! हाणमार चापाशीं गांठ आहे! प्राण जगणें कठीण! बाहेर जाऊं म्हटल्यास जाऊं देत नाहींत. कुलपें तोडून घरांतही शिरतील. याजप्रमाणें हाहाःकार आहे! येविशींही श्रीमंत रा॥ चिंतामणराव आपा यासही पत्रें लिहून जासूद येसूबरोबर रवाना केला आहे. दुकान बुधवार पेठेंतील व सदा-शीव पेठेंतील जागा यावर दोनहि मिळोन हजार रुपये पडतील. सहस्रबुद्धे यांसी बोललों. त्यांणीं एकच पर्याय सांगितला. हुंडी कोणी करीत नाहीं. बाळाजीपंतांचें उदईक उत्तर काय होऊन येतें समजोन हुंडी करून मिळाली तर हुंडी करितों नाहीं तरी गडी पाठवितों. रा॥ जिवाजीपंत नेने यांज-पाशीं चवदा हजार रुपये मागतात. पठाणांनीं बहुत मारिला. कठीण आहे! बांचेल असें कोणी म्हणत नाहीं. कागास त्याकडे जाऊं देत नाहीं. बोटीवर पडला आहे. ब्राह्मण म्हणजे तुच्छवत्‌: श्रीहरीचा कोप प्रजेवर जाला! त्यांत ब्राह्मणावर बहुत जाला! वडीलांचे पुण्येंकरून पार पडेल तो सुदीन. कळावें बहुत काय लिहिणें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५२६ श्री. (पौष शु. ५ – २९ दिसें.)

पै. छ० २१ सवाल सलास मयातैन. माघ.

× तागायत छ० ३ रमजान मु॥ दिल्ली. हल्लीं इकडील वर्तमान तर जनरल पिरू फिरंगी चौकसु (?) नजीक दाखल जाहले. जैपुरकरासीं साजी करावयाची तजवीज करोन पुढें जावें असा बेत आहे. जैपुरकर राजे प्रतापसिंग याचे शरिरास केवळ समाधान नाहीं. राज्यावर पुत्रास स्थापित केलें. आतां बाहरींत आराम जाल्याचें वृत्त श्रवणांत येत आहे;

× आबाजी हरी किल्याचें बातमीपत्र.

परंतु शरीर कृश जाहलें असे. आंबाजी इंगळे बायांसहित श्री शिंदे बहादुर याजपाशीं पावल्यापासोन तेथें फौजेचा जमाव होत आहे. हजरेताचे बंदेगींत तुरज फिरंगी ताबेदारी करोन असत. समरूची बेगम यांणीं दोन फलटणा उज्जनीस रवाना करावी म्हणोन तयारी केली आहे. लौकरच रवाना होणार. पिरू तिकडें गेल्यापासोन या प्रांतीं जमीदारांनीं धुंदी सुरू केली आहे. जनरल मजकूर याचे शरीरासहि समाधान नाहीं. परंतु शिंदे बहादूर यांची ताकीद येण्याविषयीं विशेष. सबब त्वरेनें जाणार आहे. जैपुरकरांनीं आंबाजीचे विद्यमानें आंतस्थ मामलयाचें बोलणें करोन बहोराजी नामें कारभारी यास उज्जनीस पाठविणार. पिरूशीं चित्तशुद्धता नाहीं. पूर्वेकर इंग्रजानीं प्रसंग पाहोन सासनीची गढी त्याचे आमलांत कौलेनजीक आहे तेथें मोर्चे कायम करोन हातरसवाल्याकडील अंमलदारांस काढून तेथें दखल करावें. नंतर किल्ल्याची तयारी करोन मजबुतीनें करून आपल्या हद्दीवर एक कंपू तेथें ठेवणार. राजापूर व फरुकाबादकर रोहिले पठाण यांसही खातरीज करोन बंदोबस्त कंपनीचा करावा असा विचार करून फौज तिकडेही पाठविली असे. सादतअली खान यासी चाळीस हजार रुपये शहाचे गडबडीमुळें सरंजाम जंगी केला होता त्याबद्दल नगद मागतात. सारांश युक्तीनें दरोबस्त पैसा व बाकीचा मुलूख घेऊन मशारनिल्हेस मक्केचे यात्रेस रवाना करावें ऐसा बेत आहे. लौकरच प्रत्ययास येणार. कलज फिरंगी पूर्वेकराकडून शिंदे बहादूर यांकडे उज्जनीस त्वरेनें जाणार. आगऱ्यास दाखल जाला. गवरनर साहेब कलकत्तेकर याची ताकीद विशेष आहे. लोर्ड फिरंगी हासीहून निघाल्यापासून पत्याळेकर वगैरे शीख बहुत प्रसन्न आहेत. महमुदशा जमानशहाचे पुत्राशीं लढाईचा प्रसंग राहतो. बखेडा मिटला नाहीं. पुढें निदर्शनास येईल तें सेवेशीं विनंती लिहूं हे विज्ञापना.

---

१ दिल्लीचा बादशाहा. २ बंदगी = ताबेदारी. ३ काबूलचा झमानशहा पंजाबांत आला त्यामुळें इंग्रजांना नवीन फौज ठेवावी लागली; या तिच्या खर्चाबद्दलचा इंग्रजांचा हा तगादा.

नं. ६६३७. श्री (पौष शु॥ ६ – ३० दिसें.)

पै॥ छ. ४ रमजान सन सल्लास मय्या तैन.

सेवेशीं सां नमस्कार विज्ञापना ऐसीजे, येथील वर्तमान तर साताऱ्यास राजश्री फत्तेसिंग माने व पेठे वस्त्रें आणावयाकरितां पाठविले. बा॥ १० वस्त्रें येऊन दाखल व्हावीं म्हणोन वाड्यांत समारंभाचें साहित्य केलें. त्यास राजश्रींनीं नगदीचे व डौलेच्या खर्चाचे मुद्दे लिहून कारभारी यांणीं याद लिहून साताऱ्याहून पाठविली. मुहूर्तास वस्त्रें राजश्रीकडून येऊन पावलीं नाहींत त्यावरून नगदी व जवाहीर व पोषाख मिळोन लाख रुपयांचा ऐवज साताऱ्यास रवाना केला आहे व डौलाच्या खर्चाची याद पाठविली आहे. राजश्रींची मर्जी संपादून वस्त्रें येऊन दाखल होतील तोच मुहूर्त प्रसिद्ध असा निश्चय जाहला आहे. परंड्यांहून बडे खान येऊन दाखल होऊस सर्वांच्या भेटी जाहल्या. श्रीमंत रा॥ रावसाहेब व दादा व होळकर यांचें मानस जे, श्रीमंत राजश्री रामचंद्रपंत आपा यांणीं खाशांनीं फौजसुद्धां यावें म्हणोन रा॥ बाळाजीपंत दादा यांस बोलावून सांगितलें. त्यांनीं उत्तर केलें जे, खासे आपासाहेब पुण्यास यावयाचे नाहींत म्हणोन पूर्वींच्या बोलण्यांत आलेंच आहे. त्यावरून सरकारचें पत्र गेलें जे, रा॥ हरिपंतबाबा व विठ्ठलरावबापू व त्रिंबकराव आपा व नारायणराव यांस पाठवून द्यावें. त्यावरून मंडळी कूच करोन दहा कोश अलीकडे आली. त्यास मंडळी माघारी जाऊन आपासाहेब यावयाचे नाहींत. चवघे आहेत हे आपासो॥ याचे बंधु, यांत कमी काय आहे? त्यास सरकारचा नित्य नवा विचार एक होतो त्यास सरदार व मुत्सद्दी व सरकार मिळोन एक विचार ठरेल त्याप्रमाणें आम्हांस सांगावें. त्याप्रमाणें आम्ही करूं, म्हणोन बाळाजीपंतांनीं उत्तर केलें. त्यास येथें परस्परें कोणाचींही चित्तें शुद्ध नाहींत. त्यास होळकराचे कबजांत सर्व आहेत. कोणते समईं काय घडेल याचा भरंवसा नाहीं. सर्वांचे दोहीं डगरींवर हात आहेत. कृष्णसिंग व हैबतसिंग सरकारचे लेकावळे यांस सरकारवाड्यांतून होळकर यांणीं बेअब्रू करून धरून नेलें. त्यावरून रावसाहेब यांची

१ डौल = सातारकर छत्रपतींची खासगी जहागीर.

मर्जी बहुत खपा आहे. होळकर याची नियत शाबूत नाहीं. कांहीं एक दिवसांनीं पटवर्धन यांचा पिच्छा करावा असें मानस होळकरांचें आहे. येविसींचे येथील दिनचर्य बर्तमान रा॥ बाळाजीपंत सेवेशीं कच्चा मजकूर लिहितच आहेत त्यावरून विदित होत असेल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५३८ श्री. (मार्ग. – दिसें.)

विज्ञापना. पुण्याहून होळकराचे लष्करांतून काल रविवारीं चौथे रोजीं माणूस आला, त्याचे जबानीचें वर्तमान श्रीमंत उभयतां महाडास आहेत. त्यांचा हुकूम रायगडावर चालेना. चौकशी कारितां फितूर रायगडास जाहला हें समजोन श्रीमंताबरोबर कुंजीर, दाजीबा देशमूख वगैरे आहेत त्यांणीं मसलत केली जे, येथून श्रीमंतास घेऊन इंग्रजाकडे मुंबईस जावें. याप्रमाणें ठरऊन कुंजर यांणीं ही मसलत श्रीमंतांस विदित केली. अगोदर उभयतां श्रीमंतांस श्रीमंत रा॥ अमृतरावसाहेब यांचें पत्र पुण्यास आपण आलों, तुम्ही येथें आम्हाजवळ यावें असें गेलें. तेव्हां श्रीमंत रा॥ आपासाहेब यांणीं मुंबईस जाऊं नये. इंग्रजांचे कैदेत पडावें ते पक्षीं पुण्यास वडील रावसाहेब आले आहेत तेथेंच जावें. आजपावेतों कुंजराचे मसलतीनें चाललों त्याचा परिणाम ठीक नाहीं असें आपासाहेब यांणीं श्रीमंत बाजीरावसाहेब यास समजाऊन कुंजराची मसलत मोडली. आणि कुंजर वगैरे यास कैद करून किल्ल्यास पाठविलें आणि उभयतां पुण्यास येणार म्हणोन बर्तमान ऐकिलें. पांडोजी कुंजर सातारेस जरीपटका घेऊन आला तो किल्यावर जाऊन निशाणाबरोबर फौज आली त्यास सांगोन पाठविले जे, तुम्हास वाट फुटेल तिकडे जावें. त्यांत चिरंजीव रा॥ विठलपंत यांची घोडी बाळापाबरोबर होती ती सातारेहून आली हे विज्ञापना.

---

नं. ६५३९ श्री. ( सन १७८१।८२ )

यादी करारनामा श्रीमंत राजश्री माधवराव पंतप्रधान व पातशहा फराशिस यांचा करण्यांत—कालोनेन मुसा तुस्सा दुंतिनी फराशिस वकील नि॥ पातशहा फराशिस सु॥ इसन्ने समानीन मया व अलफ—

१ फराशिसांची फौज संतू ( ? ) प्रांतांतील व खुष्कीची या प्रांतीं आली म्हणजे त्यांणीं सरकारचे फौजेस सामील व्हावें आणि इंग्रजांस तंबी करावी. त्याचे अगोधर सरकारची फराशिसांनीं खातरजमा करावी कीं, इंग्रज सलूख करूं लागल्यास करणार नाहीं. याप्रमाणें सरकारची निशा[2] पडली म्हणजे त्याजप्रमाणें सरकारांतून फराशिसांची खातरजमा होईल अगर इंग्रजांशीं दोस्ती करणें जाहल्यास तर्फेनेंचे[3] सल्ला होऊन करावी.

२ फराशिसांचें आरमार या प्रांतीं आलें म्हणजे त्याजला मुंबईजवळ उतरावयास बंदर पाहिजे. त्यांस सरकारांतून रेवदंडाचें बंदर फराशिसास उतरावयास द्यावें. तेथें त्यांणीं उतरावें. किल्ल्यांत सरकारचे अंमलदार आहेत त्यांचे हुकमांत वर्तावें. इंग्रजांचें मकाण फराशिसांनीं घेतलें म्हणजे सरंजामसुद्धां तेथें जावें. मग रेवदंड्याचे बंदरीं राहूं नये.

---

१ या ठिकाणीं कालानुक्रमानें बसईचा तह छापावयाचा परंतु आम्हीं तो तह मुद्दाम गाळला आहे. कारण तो आगाऊच पुष्कळ ठिकाणीं छापला गेला आहे. बसईच्या तहाऐवजीं पेशवे व फ्रेंच यांमध्यें स. १७८१।८२ सालीं झालेला एक अप्रसिद्ध करार आम्हीं येथें छापला आहे. या कराराचा अंमल पुढें कोणताच झाला नाहीं, त्यामुळें त्याला ऐतिहासिक महत्व विशेषसें नाहीं. शत्रूविरुद्धसुद्धां परक्यांची मदत घेतांना नाना फडनवीस किती दक्षता बाळगीत आणि आपल्या राष्ट्राचा श्रेष्ठ दर्जा कायम राखण्याची कशी खबरदारी घेत हें दर्शविण्याकरितांच आम्हीं हा करारनामा छापला आहे. स्वकीय होळकराच्या नाशाकरितां रावबाजींनीं इंग्रजांशीं केलेला बसईचा तह आणि परकीय इंग्रजांच्या नाशाकरितां नानांनीं फ्रेंचाशीं केलेला करारनामा हे दोन्ही कागद शेजारीं शेजारीं छापले असते तर ' कुत्रें आणि इंद्र ' यांना एका सूत्रांत गोंवणाऱ्या महामुनि पाणिनीची वाचकांना आठवण झाली असती ! २ निशा = जामीनगत. खात्री. ३ दोघांच्या विचारानें.

३ फराशिसांची फौज येथें पावली म्हणजे तिजला बंदरांत उतरावयास लहान गलबतें व कामाठी लागतील ते व खुष्कीस सरकारकामाकरितां फराशिसांचा सरंजाम न्यावा लागल्यास त्याजला बारदारीस सरंजाम घोडीं व उंटे व बैल व गाडे व हत्ती वगैरे लागतील ते सरकारांतून द्यावे. व फराशिसांनींही करवावा. मुंबईचे मोर्चेबंदीस इतर कामाठी व चारशें पावेतों बैल तोफास वगैरे सरकारांतून द्यावे.

४ फराशिसांची फौज या प्रांतीं आली म्हणजे तिजला खावयास सरंजाम गल्ला वजनी व बकरीं व कोंबडीं व शाखभाजी वगैरे पाहिजे तो द्यावयाकारितां सरकारांतून सावकार करून द्यावा. फराशिसांचे दहा हजार मनुष्य येईल त्याजला दोन लाखपावेतों दरमहा खावयास पाहिजे. त्यांस या अदमासें जसें माणूस येईल त्यास त्याचा आकार होईल त्याजविशीं सावकाराची खातरजमा होईल त्या महिनेपर्यंत सदरहूप्रमाणें सावकारांकडून खर्च देविला जाईल. तुम्ही सावकाराचा पैका होईल तो द्यावा.

५ सुरत शहर व किल्ला फराशिसांकडे द्यावा. तेथें सरकारचें ठाणें व अंमल चौथाई म्हणतात. परंतु जो आकार होतो त्याचा तिसरा हिस्सा सरकारांत घेतात. त्यास जे जे शहरांमध्यें पुरा पुरेजात ( ? ) वगैरे महाल व नामी आहेत तेथें सरकारचे कारकुनांनीं व फराशिसांचे कारकुनांनीं बसावें. दोघांचे रुजुवातीनें ठराव करून ऐवज घ्यावा. त्याजपैकीं एक हिस्सा सरकारांत व दोन हिस्से फराशिसांनीं घ्यावे. सरकारचे कारकुनाचे इतल्याखेरीज फराशिसांनीं कामकाज करूं नये. सुरतेबाहेर तमाम मुलुख सरकारचा त्यास जमीदार व पाटील व रयत व हरामखोर वगैरे पळून सुरतेंत व मुंबईस जातील त्यांजला फराशिसांनीं ताकीद करून सरकारचे कमावीसदार यांचें पत्र आलें म्हणजे पाठवून द्यावें. त्याजला आश्रय देऊं नये.

६ फराशिसांची फौज या प्रांतीं आलियावर सरकारचे फौजेस सामील व्हावी. इंग्रजाकडील किल्लेकोट वगैरे जे घ्यावे त्याजमध्यें जंगी सामान जखीरा व नख्त व कापड व गल्ला वजनी व मुमारी व हत्ती व घोडीं व

---

१ इतल्ला देणें = वर्दी देणें, परवानगी सांगणें.

उंटें वगैरे व गुरें जें सांपडेल त्याजपैकीं निम्में सरकारांत घ्यावें व निम्मे फराशिसांनीं घ्यावें. येविशीं परस्परें शफतपूर्वक खातरजमा करावी. कलम.

७ सरकारची व फराशिसांची फौज एक जालियावर इंग्रजाकडील किल्लेकोट, मुलूख, मकाणें सुटतील त्याजपैकीं मुंबई बेटसुद्धां फराशिसांनीं घ्यावें. बरकड किल्लेकोट व मुलूख वगैरे घ्यावे ते त्याच क्षणीं सरकारांत ठेवावे. येविशीं परस्परें शफतपूर्वक खातरजमा करावी. कलम.

८ फराशिसांनीं भडोच व खंबायत या दोहों बंदरीं बखार घालून सबदागिरी करावी. हत्यारबंद माणूस ठेवूं नये. बखार पाहून माणसें ठेवावीं. कलम

९ सरकारचे व फराशिसांचे फौजेने मिळोन जंजिरे राजपुरीचा किल्ला हबशाकडे आहे तो घेऊन किल्ला व मुलूख सरकारांत देवावा. किल्यामध्यें जकीरा व नख्त व कापड व गल्ला वगैरे निघेल तो निम्मे सरकारांत घ्यावा. व निम्में फराशिसानीं येणेंप्रमाणें करार. कलम.

१० लढाईस सरंजाम दारुगोळा वगैरे लागेल तो सरकारचा सरकारकडे व फराशिसांचा फराशिसांकडे.

११ खुष्कींतील हिंदुस्थान व दक्षिण वगैरे येथील पगडीवाले सरदार यांसी व सरकाराशीं बिघाड आलियास फराशिसांनीं सरकारची कुमक जमीयत सरंजाम असेल त्याअन्वयें करावी. जाजती सरंजाम लागल्यास सांगूं त्याप्रमाणें + मोरबीस लिहोन पाठवून आणवावा. सरकारचे दोस्ताखेरीज दुसरेयाची कुमक करूं नये. कलम.

१२ दर्यांत फराशिसांचे बंदरचे फराशिसांचें जहाज कापितान व सावकारी फराशिस असेल तें सरकारांत दस्त करूं नये. सरकारकोळी व सरकारी फराशिसांनीं धरूं नये. कलम.

१३ बादव्यानें शिकस्त जहाज खारियाटी होऊन ज्याच्या मुलखांत लागेल त्याणीं घ्यावें. फराशिसांचें जातीचे असल्यास सरकारांत घेऊं नये. सरकारचें जहाज फराशिसांचे बंदरीं लागल्यास फराशिसांनीं घेऊं नये. कलम.

१४ फराशिसांची फौज या प्रांतीं येणार त्याजला खावदास वगैरे सरं-

---

× मोरबी = मॉरिशस.

जाम लागेल त्याची तरतूद जाली पाहिजे. यास्तव फौज येणार त्याचे अगोधर दोन महिने सरकारांत खबर करावी. सरंजाम काय लागेल त्याची याद लिहोन द्यावी. कलम.

१५ फराशिसांचे पातशहांनीं वकिलास सरकारांत सलूख करावयास पाठविले आहेत. त्यास सरकारांत करार ठरला आहे. यास्तव विलायतेस पातशहानीं इंग्रजाशीं सलूख सरकारचे सल्याखेरीज करूं नये. त्यात वकिलाचें म्हणणें कीं, सरकारचा व फराशिसांचा करार जाहला हा पातशहाजवळ पावला नाहीं. त्याचे अगोधर इंग्रजाशीं त्यांणीं तह केल्यास फराशिस दरम्यान पडोन सरकारचे मनोदयानुरूप इंग्रजांचा तह करून देतील. जर कारितां सरकारचे मनोदयानुरूप तह न जाहल्यास फराशिसांचे पातशहांनीं बिघाड करावा.

१६ सरकारचा व फराशिसांचा सलूख जाहला याप्रमाणें पुस्त दरपुस्त चालावा. येविशीं आपले दिल इमानानिशीं सरकारची खातरजमा करावी. कलम.

१७ मराठे यांजकडे मुलूख आहे व होईल व फराशिसांकडे होईल त्याजमध्यें हिंदूंचा धर्म असेल त्याप्रमाणें चालावें. त्यांत फराशिसानीं व त्यांचे चाकरांनीं वगैरे कोणी खलेल केल्यास जनराल याजजवळ सांगून पाठवावें. त्याचक्षणीं त्यांणीं त्याचें पारिपत्य खूबतऱ्हेनें करावें.

१८ इंग्रजांकडील किल्ले कोट मुलूख सुटला पाहिजे यास्तव निराळाच भारी सरंजामानिशीं आश्विनमासीं फराशिसांनीं इकडील मसलतीवर यावें. येणेंप्रमाणें करार.

१९ बंगाल्याची मसलत सरकारांतून करूं. त्याची कुमक फराशिसानीं करावी. बंगाला सरकारांत सर जाहल्यावर फराशिसांचे सरंजामाअन्वयें त्याप्रांतीं जहागीर द्यावी. कलम.

२० विलायतेस फराशिसांचे बादशहानीं इंग्रजाशीं तह करणें जाल्यास सरकारचे सल्याखेरीज करूं नये. परंतु जावशाल जाण्यायेण्यास बहुत दिवस लागतील याजकरितां सरकारचे वकील पातशहाकडे विलायतेस जातच आहेत त्याजजवळ सरकारचे मुदे तह करावयाचे लिहून द्यावे. त्याप्रमाणें

जाहलियास फराशिसांचे पातशहांनीं इंग्रजांशीं सल्ख करावा. परंतु सरकारचे मुद्याप्रमाणें अंमलांत आलें पाहिजे. याजकरितां इंग्रजांपासून फराशिसांचे पातशहांनीं पक्की निशा करून घेऊन अंमलांत आणवावें. न आल्यास फराशिसांचे पातशहांनीं इंग्रजांशीं बिघाड करावा.

२१ सरकारचा व फराशिसांचा व इंग्रजांचा तह जालियावर इंग्रजानें कोठी घालावयाकारितां जागा मागितल्यास देऊं नये. कदाचित् देणें जाल्यास खंबाईत व भडोच खेरीजकरून एखाद्या मकाणास सरकार व फराशिस यांचे विचारास आलियास द्यावी.

२२ सरकारचे घरांतील रघुनायराव दादा आदिकरून अगर हरकोणी फराशिसांकडे गेल्यास फराशिसांनीं आसरा देऊं नये. त्याच क्षणीं सरकारांत पाठवून द्यावा. कलम.

२३ सदरहू कलमें ठरून सरकारचा व फराशिसांचा तहनामा जाला. याजप्रमाणें बिलायतेस सरकारचा वकील नेऊन पातशहाचे मोहरेनिशीं तहनामा फराशिसांचा सरकारांत येथून वकील रवाना ज्या तारखेस होतील त्याजपासोन अठरा महिन्यांनीं आणून द्यावा. येणेंप्रमाणें करार. कलम.

---

# ऐतिहासिक लेखसंग्रह

## भाग १४ वा.

## होळकरांची दक्षिणेवरील स्वारी–उत्तरार्ध.

### ( इ. स. १८०३ जाने. – जुलैअखेर. )

मराठी राज्यकारभाराची घडी विस्काळित झाली होती ती पुनः दुरुस्त करावी आणि शिंद्याच्या वर्चस्वाच्या मगरमिठींतून पुणें दरबाराची कायमची सुटका करावी या उद्देशानें होळकर दक्षिणेंत आला होता. या स्वारीच्या पायीं क्रोडों रुपये कर्जाचा बोजा शिरावर घेऊन त्यानें फौज उभी केली आणि अविश्रांत मेहनत करून मोठ्या मर्दुमकीनें हडपसरची लढाई जिंकली आणि दक्षिणपुरता शिंद्यांच्या वर्चस्वाचा ग्रंथ समाप्तीस नेला. याप्रमाणें होळकरानें आपला एक हेतु तडीला नेला. परंतु या त्याच्या पराक्रमाचा मराठी राज्याला फायदा असा कांहींच झाला नाहीं. उलट त्याच्या स्वारीच्या दपटशामुळें पेशवे भयभीत होऊन वसईच्या तहानें इंग्रजांच्या कारस्थानाच्या जाळ्यांत पुरतेपणें गुरफटले गेले आणि त्यामुळें आतां मराठी राज्यावर प्राणसंकट ओढवूं पहात होतें. या दृष्टीनें विचार केला तर होळकराचें शौर्य, पराक्रम, धाडस, मर्दुमकी, सेनापत्य, मुत्सद्देगिरी हे सर्व सद्गुण केवळ अनाठायींच खर्च झाले असें म्हणावें लागतें. कारण त्याच्या या स्वारीनें मराठी राज्याचें मरण चार दिवस आधींच ओढवून आणलें असा दाखला आतां मराठी इतिहासांत कायमचाच लिहिला जाणार. त्याची स्वारी ही एक जालीम मात्रा होती परंतु मराठी राज्याचा रोगी आधींच आधिव्याधींनीं इतका जर्जर झाला होता कीं, या मात्रेनें रोग

निवारण होण्याचें बाजूस राहून उलट तिच्या जालीमपणाच्या धक्क्यानें रोगी मात्र ठार मरणार असा संभव उत्पन्न झाला होता. रोगाचें निदान आणि त्यावरची उपाययोजना यांत कांहींच चूक नव्हती. परंतु रोग्याच्या प्रकृतीनें दुर्दैवानें आयत्या वेळीं उलट खाल्ली आणि त्यामुळें त्याचें मरण ओढवलें तर तो केवळ कालमहिमा होय. असो. वसईच्या तहाच्या या नवीन संकटाला तोंड देण्याकरितां होळकरानें आणि पुणें दरबारनें काय काय तजविजी चालविल्या होत्या इकडे आतां लक्ष दिलें पाहिजे.

वसईच्या तहानंतर मराठी राज्यकारभाराविषयीं मराठे आणि इंग्रज यांमध्यें खलबतें आणि पत्रव्यवहार झाला, त्यांतून पेशवे इंग्रजांच्या आश्रयास गेले आहेत, त्याअर्थीं त्यांनीं राज्यत्याग करून वनवास पतकरला आहे असे होळकर आणि इतर मराठी मुत्सद्दी यांचे उद्गार वाचावयास सांपडतात. वनवासाला जाणें म्हणजे मनुष्यांची संगत सोडून हिंस्र पशूंची संगत पतकरणें असा अर्थ होतो. इंग्रजांची संगत धरणें म्हणजे वनवासाला जाणें असा मेळ मराठ्यांनीं आपल्या ठिकाणीं कां घातला होता हें त्यावेळीं इंग्रजांच्या नीटसें ध्यानांत आलें नाहीं. मराठ्यांच्या या उद्गारांवर इंग्रजांचें असें उत्तर पडे कीं, पेशवे आमच्या आश्रयास आले आहेत एवढ्यावरून त्यांनीं राज्यत्याग केला आहे असा अर्थ होत नाहीं. त्यांनीं कांहीं आम्हांला राज्य लिहून दिलेलें नाहीं. केवळ राज्याच्या कल्याणावर नजर देऊन त्यांनीं आम्हाला थोडासा मुलूख देऊन आमची मैत्री पतकरली आहे. यांत परिणामीं मराठी राज्याचें हितच आहे. आपल्या अधिकाराचा वाटेल तसा उपयोग करण्यास पेशवे मुखत्यार आहेत. पेशवे येथें वनवासांत नसून चांगले मनुष्यवस्तींत आणि ऐषआरामांत आहेत. आमच्या मैत्रीपासून मराठी राज्याचा नाश होणार असें मराठ्यांनीं कां मानावें? उलट आमच्या संबंधीं मैत्रीमुळें सर्वांचे हक्कसंबंध सुरक्षित राहतील—चोहोंकडे शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित होईल—वित्त, जीवित आणि अब्रू यांची सुरक्षितता वाढून व्यापाराची भरभराट होईल आणि त्यायोगें मराठी राज्याचें कोटकल्याण होईल. या तहामुळें मराठ्यांच्या राजकीय स्वातंत्र्यास थोडासा बाध येणार हें खरें आहे. परंतु तिकडे दुर्लक्ष करून मराठ्यांनीं आपल्या

ऐहिक कल्याणाकडे लक्ष द्यावें आणि आम्ही केलेल्या व्यवस्थेस मान्यता द्यावी. इंग्रजांच्या या युक्तिवादांत बरेंच तथ्य होतें आणि सामान्य अकलेच्या मनुष्याचें त्यानें सहज समाधान होण्याजोगें होतें. परंतु शिवशाही राजकारणांत मुरलेल्या मराठ्यांची या भाषेनें कसची फसवणूक होते! स्वराज्य म्हणजे राजकीय स्वातंत्र्य हें त्यांना पूर्णपणें समजत होतें. शिवाय दुसऱ्याचें राज्य घेतांना काय काय सोंगें आणि ढोंगें करावीं लागतात याचाही त्यांना पूर्णपणें अनुभव होताच. कारण मोंगल बादशहाची नोकरी करतां करतां त्यांनीं आतांपर्यंत त्याचें सारें राज्य हिसकून घेतलें होतें. मोंगल बादशहावर आपण पूर्वीं नोकरीचें खोगीर लादलें होतें त्यांत आणि इंग्रजांच्या या पगारी मैत्रींत कांहींच फरक नाहीं-जो प्रयोग आपण पूर्वीं दुसऱ्यावर केला होता, तोच हल्लीं इंग्रज आम्हांवर करूं पहात आहेत हें मराठ्यांस स्पष्टपणें दिसत होतें. त्यामुळें या पगारी मैत्रीचें उंटाचें पिल्लू मराठी राज्यांत शिरूं देऊं नये असेंच सर्वांचें मत होतें. मात्र आपल्या राज्याचें चोहोंकडे विखुरलेलें सामर्थ्य पुनः एकसूत्रांत कसें आणावें याचा उलगडा मात्र कोणासच नीटसा होत नव्हता.

असो. बाजीराव पेशवे महाडाहून निघाल्याबरोबर होळकरानें नव्या मुद्रेच्या मसलतीबद्दल म्हणजे अमृतरावाचा मुलगा विनायकराव याला बाळाजी माधवराव बनवून त्याच्या नांवानें राज्यकारभार सुरू करण्याबद्दल अमृतरावाच्या दाराशीं तगादा बसविला. दिसेंबरच्या चार, पांच, सहा या

दिसें.१८०२ } तीन तारखा होळकर शनवारवाड्यांत सारखा बसून होता. त्या अवधींत भोसल्यांचे उभयतां कारभारी, निजामअल्लीचा वकील आनंदराव, अमृतराव, मोरोबादादा फडनवीस, बाबा फडके, होळकर, पटवर्धनांचा वकील बाळाजीपंत सहस्रबुद्धे या सर्वांचीं पुढील कर्तव्यतेविषयीं सारखीं खलबतें सुरू होतीं आणि शेवटीं सहाव्या तारखेस रात्रीं विनायकरावाच्या नांवें सातारकर छत्रपतींकडून पेशवे पदाचीं वस्त्रें मिळवावीं, आणि नंतर विनायकराव हा कै. सवाई रावसाहेब यांचा दत्तक मुलगा आहे असें समजून 'बाळाजी माधवराव' हा शिक्का सुरू करावा आणि त्या नांवानें राज्य चालवावें अशी मसलत सर्वानुमतें मुकरर करण्यांत आली. मुख्य काम

होतें साताऱ्याहून वस्त्रें मिळविण्याचें. त्या कामासाठीं होळकर, अन्याबा फडके आणि मोरोबादादांचे चिरंजीव धाकटे नाना या त्रिवर्गांनीं मुद्दाम साताऱ्यास जावें आणि छत्रपतींची समजूत करून त्यांजकडून वस्त्रें मिळवावीत असेंही याच बैठकींत ठरविण्यांत आलें. या बेताप्रमाणें होळकर साताऱ्याकडे निघावयाचा परंतु आयत्या वेळीं त्याची तब्येत बिघडल्यामुळें त्याचें जाणें राहिलें. यानंतर फत्तेसिंग माने आणि त्रिंबकराव पेठे या उभयतांना वस्त्रासाठीं साताऱ्यास पाठवावें अशी योजना करण्यांत आली.

बाळोजी कुंजराचा हस्तक बाळाजी माणकेश्वर याजकडे सातारा किल्ला आणि सातारच्या संस्थानची वहिवाट होती. शिवाय त्या किल्ल्यावर नाना पुरंदरे हाही आश्रयासाठीं जाऊन बसला होता. त्या दोघांच्या चिथावणीवरून सातारा छत्रपति बिथरून सुधेपणानें वस्त्रें देणार नाहींत असा पुणेंदरबारनें आगाऊच तर्क बांधला होता. सबब फत्तेसिंग माने साताऱ्याकडे निघाले ते जबरदस्त होऊनच निघाले. त्यांनीं आपल्याबरोबर दहा हजार स्वार, चाळीस तोफा एक फलटण असा लढाऊ सरंजाम घेतला होता. या दक्षिणेवरील मोहिमेंत अघाडीचा मान नेहमीं मान्याकडे असे आणि तें काम त्यांनीं मोठ्या मर्दुमकीनें पार पाडलें होतें. सबब ता. १६ दिसेंबर रोजीं होळकरानें चौघडा देऊन त्यांचा गौरव केला आणि या प्रसंगानिमित्त खुशालीचे पन्नास बार तोफांचे केले. शिवाय या सातारच्या स्वारीच्या निमित्तानें अमृतरावाकडून मान्यास कचेरीच्या डेऱ्यांत गादीवर बसावयाचा मान, मोर्चेलाची चवरी, साहेबनौबत, खासे हत्ती व घोडे वगैरे बहुमान मिळाले. याप्रमाणें मान्याच्या स्वारीची पुण्यांत जुळवाजुळव चालू असतां तीन हजार फौज आणि एक फलटण असा सरंजाम बरोबर घेऊन रामचंद्रराव घोरपडे नांवाचा होळकराचा सरदार यापूर्वीच साताऱ्याकडे निघाला होता. वाटेंत चतुरसिंग भोसले हाही घोरपड्यास मिळाला. नंतर या दोघांनीं साताऱ्यास जाऊन छत्रपतीजवळ वस्त्रांची मागणी केली. या त्यांच्या मागणीवर छत्रपतींनीं वस्त्रें देण्याबाबद आपल्या पुढील अटी कळविल्या—
(१) पूर्वी बाळाजी बाजीराव यांचे कारकीर्दीत छत्रपतींच्या खासगी खर्चाकरितां स्वतंत्र मुलूख तोडून देण्यांत आला आहे आणि त्या

ऐहिक कल्याणाकडे लक्ष द्यावें आणि आम्ही केलेल्या व्यवस्थेस मान्यता द्यावी. इंग्रजांच्या या युक्तिवादांत बरेंच तथ्य होतें आणि सामान्य अक्लेच्या मनुष्याचें त्यानें सहज समाधान होण्याजोगें होतें. परंतु शिवशाही राजकारणांत मुरलेल्या मराठ्यांची या भाषेनें कसची फसवणूक होते? स्वराज्य म्हणजे राजकीय स्वातंत्र्य हें त्यांना पूर्णपणें समजत होतें. शिवाय दुसऱ्याचें राज्य घेतांना काय काय सोंगें आणि ढोंगें करावी लागतात याचाही त्यांना पूर्णपणें अनुभव होताच. कारण मोंगल बादशहाची नोकरी करतां करतां त्यांनीं आतांपर्यंत त्याचें सारें राज्य हिसकून घेतलें होतें. मोंगल बादशहावर आपण पूर्वी नोकरीचें खोगीर लादलें होतें त्यात आणि इंग्रजांच्या या पगारी मैत्रींत कांहींच फरक नाहीं-जो प्रयोग आपण पूर्वी दुसऱ्यावर केला होता, तोच हल्लीं इंग्रज आम्हांवर करूं पहात आहेत हें मराठ्यांस स्पष्टपणें दिसत होतें. त्यामुळें या पगारी मैत्रीचें उंटावें पिल्लू मराठी राज्यात शिरूं देऊ नये असेंच सर्वांचें मत होतें. मात्र आपल्या राज्याचें चोहोंकडे विखुरलेलें सामर्थ्य पुनः एकसूत्रांत कसें आणावें याचा उलगडा मात्र कोणासच नीटसा होत नव्हता.

असो. बाजीराव पेशवे महाडाहून निघाल्याबरोबर होळकरानें नव्या मुद्रेच्या मसलतीबद्दल म्हणजे अमृतरावाचा मुलगा विनायकराव याला बाळाजी माधवराव बनवून त्याच्या नांवानें राज्यकारभार सुरू करण्याबद्दल अमृतरावाच्या दाराशीं तगादा बसविला. दिसेंबरच्या चार, पांच, सहा या

दिसें.१८०२ तीन तारखा होळकर शनवारवाड्यांत सारखा बसून होता. त्या अवधींत भोसल्यांचे उभयतां कारभारी, निजामअल्लीचा वकील आनंदराव, अमृतराव, मोरोबादादा फडनवीस, बाबा फडके, होळकर, पटवर्धनांचा वकील बाळाजीपंत सहस्रबुद्धे या सर्वांचीं पुढील कर्तव्यतेविषयीं सारखीं खलबतें सुरू होतीं आणि शेवटीं सहाव्या तारखेस रात्रीं विनायकरावाच्या नांवें सातारकर छत्रपतींकडून पेशवे पदाचीं वस्त्रें मिळवावीं, आणि नंतर विनायकराव हा कै. सवाई रावसाहेब यांचा दत्तक मुलगा आहे असें समजून 'बाळाजी माधवराव' हा शिक्का सुरू करावा आणि त्या नांवानें राज्य चालवावें अशी मसलत सर्वानुमतें मुकरर करण्यांत आली. मुख्य काम

होतें साताऱ्याहून वस्त्रें मिळविण्याचें. त्या कामासाठीं होळकर, अन्याबा फडके आणि मोरोबादादांचे चिरंजीव धाकटे नाना या त्रिवर्गांनीं मुद्दाम साताऱ्यास जावें आणि छत्रपतींची समजूत करुन त्यांजकडून वस्त्रें मिळवावींत असेंही याच बैठकींत ठरविण्यांत आलें. या बेताप्रमाणें होळकर साताऱ्याकडे निघावयाचा परंतु आयत्या वेळीं त्याची तब्येत बिघडल्यामुळें त्याचें जाणें राहिलें. यानंतर फत्तेसिंग माने आणि त्रिंबकराव पेठे या उभयतांना वस्त्रासाठीं साताऱ्यास पाठवावें अशी योजना करण्यांत आली.

बाळोजी कुंजराचा हस्तक बाळाजी माणकेश्वर याजकडे सातारा किल्ला आणि सातारच्या संस्थानची वहिवाट होती. शिवाय त्या किल्ल्यावर नाना पुरंदरे हाही आश्रयासठीं जाऊन बसला होता. त्या दोघांच्या चिथावणीवरुन साता. छत्रपति बिथरुन सुधेपणानें वस्त्रें देणार नाहींत असा पुर्णेदरबारनें आगाऊच तर्क बांधला होता. सबब फत्तेसिंग माने साताऱ्याकडे निघाले ते जबरदस्त होऊनच निघाले. त्यांनीं आपल्याबरोबर दहा हजार स्वार, चाळीस तोफा एक फलटण असा लढाऊ सरंजाम घेतला होता. या दक्षिणेवरील मोहिमेंत अघाडीचा मान नेहमीं मान्याकडे असे आणि तें काम त्यांनीं मोठ्या मर्दुमकीनें पार पाडलें होतें. सबब ता. १६ दिसेंबर रोजीं होळकरानें चौघडा देऊन त्यांचा गौरव केला आणि या प्रसंगानिमित्त खुशालीचे पन्नास बार तोफांचे केले. शिवाय या सातारच्या स्वारीच्या निमित्तानें अमृतरावाकडून मान्यास कचेरीच्या डेऱ्यांत गादीवर बसावयाचा मान, मोर्चेलाची चवरी, साहेबनौबत, खासे हत्ती व घोडे वगैरे बहुमान मिळाले. याप्रमाणें मान्याच्या स्वारीची पुण्यांत जुळवाजुळव चालू असतां तीन हजार फौज आणि एक फलटण असा सरंजाम बरोबर घेऊन रामचंद्रराव घोरपडे नांवाचा होळकराचा सरदार यापूर्वीच साताऱ्याकडे निघाला होता. वाटेंत चतुरसिंग भोसले हाही घोरपड्यास मिळाला. नंतर या दोघांनीं साताऱ्यास जाऊन छत्रपतींजवळ वस्त्रांची मागणी केली. या त्यांच्या मागणीवर छत्रपतींनीं वस्त्रें देण्याबाबद आपल्या पुढील अटी कळविल्या—
(१) पूर्वी बाळाजी बाजीराव यांचे कारकीर्दींत छत्रपतींच्या खासगी खर्चाकरितां स्वतंत्र मुलूख तोडून देण्यांत आला आहे आणि त्या

मुलखावर सर्वस्वीं छत्रपतींची सत्ता चालावी असेंही ठरलें आहे. पुढें मागच्या पेशव्यांनीं ही व्यवस्था मोडून हें संस्थान आपल्या बहिवाटींत घेतलें आहे आणि आम्हाला नजरबंदींत ठेविलें आहे. या प्रसंगीं आमचें संस्थान आमच्या ताब्यांत देण्यांत यावें. (२) बाजीराव पेशव्यांशीं आमचे आतांपर्यंत वेळोवेळ तंटे झाले त्याप्रीत्यर्थ आम्हाला वेळोवेळ फौज ठेवावी लागली तिचें देणें अजून द्यावयाचें आहे. पुणें दरबारनें आतां हें देणें देऊन टाकून आम्हाला कर्जमुक्त करावें. (३) वस्त्रें देण्याबाबद आमचे मानपान पेशव्यांकडून यावयाचे असतात ते शिरस्त्याप्रमाणें देण्यांत यावेत. छत्रपतींच्या या मागण्यावर होळकर व अमृतराव यांनीं उत्तरें दिलीं तीं अशीं:- (१) आतांपर्यंत सातारा संस्थानाची बहिवाट पेशव्यांकडे आहे ती तशीच त्यापुढेंही कायम राहील. त्या व्यवस्थेंत कोणताही फेरबदल केला जाणार नाहीं. (२) महाराजांच्या शिबंदीच्या देण्याशीं आमचा अर्थाअर्थीं संबंध नाहीं. ज्याच्याकडे आतांपर्यंत संस्थानची बहिवाट होती त्याच्याकडून म्हणजे बाजीरावसाहेबांकडून हें देणें छत्रपतींनीं करें तें वसूल करून घ्यावें आणि कर्जमुक्त व्हावें. (३) छत्रपति आाण मा. राणीसाहेब यांचे मानपान आम्ही यथाशक्ति पाठविले आहेतच. छत्रपतींनीं कृपाळु होऊन यांवर संतोष मानावा आणि आम्हांकडे वस्त्रें पाठवून द्यावींत. याप्रमाणें उत्तरें देऊन अमृतरावानें कापड जवाहीर व नक्त मिळून सुमारें लाख रुपयांचा ऐवज मानपानाबाबत छत्रपतींकडे पोचता केला. परंतु एवढ्यानें त्यांचें समाधान झालें नाहीं. बाळाजी माणकेश्वर आणि पुरंदरे यांच्या चिथावणीवरून त्यांनीं किल्ल्यावरून होळकराच्या फौजेवर तोफा सुरू केल्या आणि करवीरकर छत्रपतींकडे कुमक करण्याविषयीं वकील पाठविले. याप्रमाणें छत्रपतींची स्वारी बिथरलेली पाहतांच रामचंद्रराव घोरपडे आणि चतुरसिंग भोसले यांनीं तावडतोब किल्ल्याला वेढा दिला. दिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यांत फत्तेसिंग माने आपली जंगी फौज घेऊन साताऱ्यास आले आणि त्यांनीं जलदी करून साताराशहराभोंवती नाकेबंदी केली . आणि किल्ल्यावर पल्लेदार तोफांचा भडिमार सुरू केला. आपण राज्याचे धांवद-सातारा किल्ला ही सिंहासनाची जागा

सबब आपणाशीं कोणी बर्दळीवर येणार नाहींत असा छत्रपतींचा समज होता आणि तो एका दृष्टीनें खराच होता. मागें छत्रपतीनीं असेंच बंड केलें होतें आणि त्यावेळीं परशुरामभाऊ पटवर्धनांनीं असाच साताऱ्याच्या किल्ल्यास वेढा दिला होता. परंतु त्यावेळीं भाऊंनीं मालकाची आदब न मोडतां आणि स्वतःची सेवकपणाची मर्यादा न सोडतां छत्रपतींना आंजारून गोंजारून आपला हेतु तडीला नेला होता. भाऊ हे मराठी परंपरेंतील खानदानीचे सरदार, त्यामुळें छत्रपतींची अब्रू त्यावेळीं बचावली. परंतु आतां फत्तेसिंगासारख्या उपटसुंभाशीं गांठ पडतांच त्यांचें मालकीपणाचें आणि वीरश्रीचें अवसान तावडतोब थंडावलें! चार आठ दिवस तोफांचा मार बसतांच ते शुद्धीवर आले आणि त्यांनीं मान्याशीं समेटाचें बोलणें लाविलें. मान्यांनीं छत्रपतींच्या निरोपाला मान देऊन लढाई तहकूब केली आणि नारायणजी माने आणि त्रिंबकराव पेठे यांना वस्त्रें घेण्यासाठीं किल्ल्यावर पाठविलें. वस्त्रें हातीं येतांच दिसेंबरच्या अखेरीस मान्यांनीं सातारचा वेढा उठवून रहिमतपुराकडे मोर्चा वळविला आणि पेठे वस्त्रें घेऊन घाईघाईनें पुण्याकडे निघाले.

नाना फडनवीस मरण पावण्यापूर्वी चार सहा महिने ' अंगठीवरील हिरा काढून नवा बसवावयाचा आहे ' अशी सांकेतिक भाषा पुणें दरबारांतील किरकोळ मुत्सद्दी बोलूं लागले होते, त्यामुळें पुणें शहरांत यासंबंधीं दररोज नवीन नवीन बातम्या उठत असत. बाजीरावसाहेबांना पदच्युत करावें आणि अमृतरावाचा मुलगा विनायकराव याला यशोदाबाईच्या मांडीवर दत्तक देऊन त्याच्या नांवें पेशवेपद चालवावें असें या ' नवा हिरा ' बसविण्याच्या मसलतीचें स्वरूप होतें. त्यावेळीं बाळोबातात्यांचें शिंद्यांच्या दरबारांत वर्चस्व होतें आणि नाना तर खुद्द पेशव्यांचे कारभारीच होते. नाना--तात्यांनीं मनावर घेतलें असतें तर ही गोष्ट त्यावेळीं घडून आली असती. परंतु या मसलतीनें अंतःक्षोभ माजेल आणि त्या निमित्तानें मराठी दौलतींत इंग्रजाचा पाय शिरेल या भयानें त्या दोघांनीं ही मसलत त्यावेळीं अंगावेगळी टाकली होती. नानांच्या वेळची ही मसलत आतां हेळकर अंतस्थ आणूं पहात होता. परंतु अनेक

संकटें उद्भवून या मसलतीला रंग असा कधींच भरला नाहीं. विनायकरावाला वस्त्रें देण्यासाठीं मार्ग. व. दशमी आणि त्रयोदशी (ता. १९–२२ दिसेंबर) हे दोन मुहूर्त निश्चित ठरवून पुणें दरबारानें अगदीं कडेकोट तयारी केली, परंतु त्यावेळीं वस्त्रें हातीं आलीं नाहींत त्यामुळें समारंभाचा मोठा विरस झाला. पुढें दिसेंबर अखेरीस पेठे वस्त्रें घेऊन पुण्यास दाखल झाले आणि पौष शु. १३ (ता. ५ जाने.) हा मुहूर्त कायम करण्यांत आला. परंतु आयत्यावेळीं आधीं दत्तविधान की आधीं वस्त्रांचा समारंभ हा वाद निर्माण होऊन या मुहूर्तावरही समारंभ होऊं शकला नाहीं. अमृतराव, दादा फडनवीस आणि बाबा फडके यांचें म्हणणें पडलें कीं, यशोदाबाईच्या मांडीवर बसवून विनायकरावाचें सशास्त्र दत्तविधान केल्याशिवाय 'बाळाजी माधवराव' हा शिक्का कसा सुरू करतां येईल ? शास्त्ररीत्या परंपरा अखंड ठेवावयाची तर आधीं दत्तविधान करून नंतरच वस्त्रें देण्यांत यावीत. यावर होळकराचें म्हणणें पडलें कीं, हें दत्तविधान राजकीय स्वरूपाचें आहे. येथें शास्त्राचा काय संबंध ? बाळाजी माधवराव हा शिक्का चालू करण्यांत सवाई रावसाहेब यांच्या कारकीर्दींतल्या सर्व बहिवाटी आणि जबाबदाऱ्या पेशव्यांना बंधनकारक रहाव्यात एवढाच आमचा उद्देश आहे. राजकारणांत शास्त्रार्थ आणून उगीच घोटाळा माजवूं नये. होळकराचें हें म्हणणें कोणास विशेषसें रुचलें नाहीं आणि आधीं दत्तविधान की आधीं वस्त्रांचा समारंभ हा वाद तसाच कायम राहिला.

जिच्या मांडीवर विनायकरावबापूस दत्तक द्यावयाचें होतें ती माजी पेशव्यांची स्त्री यशोदाबाई हल्लीं रायगडास होती. पेशवे व चिमाजी आपा महाडाहून पळाले तेव्हां त्यांनीं आपापल्या स्त्रियांस रायगडाहून काढून आपल्याबरोबर घेतल्या आणि यशोदाबाईला तेथेंच नीट चौकीपहाऱ्याच्या बंदोबस्तांत ठेविलें होतें. पुढें होळकराच्या फौजांनीं पाठलागाची फारच दाटी केली तेव्हां पेशवे व चिमाजीआपा यांच्या स्त्रिया सुवर्णदुर्गास मागें राहिल्या आणि पेशवे चिमाजीआपासह सुवर्णदुर्गाहून धाईधाईनें इंग्रजी तारवांत बसून वसईस गेले. पेशव्यांच्या पाठलागांवर होळकराची फौज होती

तिनें सुवर्णदुर्गास जाऊन पेशव्यांच्या स्त्रियांना आणि त्यांच्या दिमतीस असलेल्या बाळाजीपंत पटवर्धन आणि धुळोजी कुंजर या पेशव्यांच्या मुत्सद्यांना ताब्यांत घेतलें आणि महाडास परत आणलें. तेथें आल्यावर होळकराच्या फौजेनें रायगडाला शह देऊन यशोदाबाईला स्वाधीन करण्याविषयीं किल्लेकऱ्यांशीं बोलणें लाविलें. परंतु किल्लेकऱ्यांनीं अमृतराव व होळकर यांचा हुकूम मानण्याचें साफ नाकारलें आणि यशोदाबाईवरची कैद जास्त सक्तीची करण्यांत येऊन तिला आतां धड अन्नपाणीसुद्धां वेळेवर मिळेनासें झालें. इंग्रजांच्या आश्रयामुळेंच रायगडकरी इतके शेफारले आहेत हें होळकरास माहीत होतें. आणि त्यानें मनांत आणिलें असतें तर तें स्थळ काबीज करणें त्याला मोठेंसें अगाध नव्हतें. परंतु तसें करतांना रायगडच्या कुमकेस बाणकोटच्या खाडींत इंग्रजी लढाऊ जहाजें आलीं होतीं, त्यांच्याशीं लढण्याचा प्रसंग होळकरी फौजेला आला असता आणि ती गोष्ट करण्याची अजून पुणें दरबारची तयारी नव्हती; त्यामुळें होळकराचा सरदार आबाजी त्रिंबक यानें रायगडचा वेढा उठविला आणि पेशव्यांच्या स्त्रिया आणि बाळाजीपंत पटवर्धन आणि धुळोजी कुंजर यांना बरोबर घेऊन तो ता २० जानेवारी रोजीं पुण्यास परत आला. विनायकरावबापू हे लवाजमा बरोबर घेऊन पेशव्यांच्या स्त्रियांना सामोरे गेले आणि त्यांनीं त्यांना बहुत सन्मानानें भांबवड्यास अमृतरावांकडे आणलें. बाळाजीपंत पटवर्धन हा अमृतरावांच्या परवानगीनें पूर्वीप्रमाणें पेशव्यांच्या स्त्रियांच्या दिमतीस राहिला आणि धुळोजी कुंजरास मात्र अटक करण्यांत आली. पेशव्यांच्या स्त्रिया आठ दहा दिवस अमृतरावाजवळच होत्या. नंतर त्या विनायकराव बापूबरोबर शनवारवाड्यांत रहावयास आल्या. अमृतराव व होळकर हे तेथें जाऊन त्यांचा दरचेवर समाचार घेत असत. असो. यशोदाबाईशिवाय शास्त्र दत्तविधान करतां येईना आणि दत्तविधानाशिवाय वस्त्रांचा समारंभ आणि 'बाळाजी माधवराव' हा शिक्का चालू करण्याचें कोणाच्या मनास येईना. त्यामुळें ही नव्या मुद्रेची मसलत जानेवारी अखेर कायमचीच थंडावली आणि सातान्याहून आणलेलीं पेशवेपदाचीं वस्त्रें विनायकराव पेशव्यांच्या घरांत तशींच पडून राहिलीं.

या नव्या मुद्रेची वाटाघाट चालू असतांनाच एका प्रकरणामुळें पुणें दरबारांत अतिशय गोंधळ माजला होता आणि त्या कामीं अमृतराव, बाबा फडके आणि दादा फडनवीस आणि होळकर हे एकमेकांशीं दररोज बर्दळीवर येत. तें प्रकरण म्हणजे "देणें प्रकरण" हें होय. दक्षिणेंत येण्याबद्दल अमृतरावानें होळकरास एक कोट रु. देऊं केले होते हें मागल्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. अमृतराव पुण्यास आल्यावर आठ पंधरा दिवस वाट पाहून होळकरानें पुणें दरबारास खडसून अर्ज केला कीं,

जाने.-फेब्रु. १८०३. } 'मी कबूल केल्याप्रमाणें शिंद्याचें दक्षिणेंतील बर्चस्व पार नाहींसें केलें आहे. आतां तुम्ही राज्याचा वाटेल तसा बंदोबस्त करा. मुख्य गोष्ट, करारात ठरल्याप्रमाणें एक कोट रु. मला तावडतोब द्या. नवी फौज ठेवण्याबद्दल मला कोट्यावधि रु. चें कर्ज उभारावें लागलें आहे आणि माझ्या फौजेचा नुसता नित्यखर्चच दरमहा दहा लक्ष रु. आहे हें तुम्हांस माहीतच आहे.' या अर्जाचा विशेषसा उपयोग होत नाहीं असें पाहून नागो जिवाजी, मीरखान व शामतखान पठाण हे होळकराचे सरदार अमृतरावाकडे दररोज धरणें देऊन बसूं लागले. आणि अमृतराव, फडके व फडनवीस यांना उपास पडूं लागले आणि कै० रघुनाथरावदादांचे दासीपुत्र कृष्णसिंग आणि हैबतसिंग यांना तर कोरड्यांच्या माराखालीं अमृतरावासमक्षच बडविण्यांत आलें! होळकराचें हें रुद्ररूप पाहतांच पुण्यांत पट्टी करून द्रव्य उत्पन्न करण्याचा बूट निघाला. परंतु द्रव्य वेळेवर वसूल होईना त्यामुळें द्रव्यवसुलीचा सर्वाधिकार होळकरानें लवकरच स्वतःकडे घेतला आणि या कामावर अमृतरावातर्फे हरीपंत भावे आणि होळकरातर्फे विठ्ठलपंत, नागो जिवाजी आणि हरनाथसिंग या चौघांची नेमणूक झाली. त्यांच्या मदतीस होळकराची कांहीं पठाणी फौजही देण्यांत आली होती. या यमदूतांनीं द्रव्यासाठीं पुण्याच्या गरीब रयतेवर कसे अनन्वित जुलूम केले यासंबंधीं कांहीं उतारे:—

(पौष-जाने.) "भाऊबर गृहस्थांच्या घरीं चौक्या बसल्या. कर्ज मागतात, सदाशिवभट दिवाणजीपासोन दहा हजार रु. घेतले, पुरुषोत्तम मुरलीपासोनं पंधरा हजार रु. घेतले. बापू चिपळोळकर याजपासोन दहा

हजार याप्रमाणें चाललें आहे. ×× बापू गुपचूप यास रस्त्यांत भावे यांणीं उभा केला आहे. पन्नास हजार रु. मागतात. ×× बाजार झाडून बंद आहे. ×× वासुदेव जोशी, बहिरव जोशी यांचे पुत्र यास काल उन्हांत उभे केलें होतें. पंचवीस हजार रु. मागतात."

(१ जाने.) वैजनाथभट मामा यास जामीन घेऊन त्याचेच घरीं ठेविलें. जाग्यावरोन उठत नाहींत अशी अवस्था झाली आहे. ×× छ. १० साबान रविवारीं दिवसास स्वार गाडदी येऊन आदितवारांत कलावंतिणीचें एक घर चीजवस्तसुद्धां नेलें. रात्रीस सुभानशाचे बंगल्याजवळ निरा बोहरी यांचें घर लुटून दहा हजार रु. चा विषय नेला. झाडून शहरांतील दुकानें लागलीं अशी धुंदाई चालली आहे! ×× जिवाजीपंत नेने यास पैका वीस हजार मागतात. त्यास मिळत नाहींत पांचपावेतों कदाचित देईल. नित्य मारतात. पठाणांशीं गांठ! तो ब्राह्मण जगतां दिसत नाहीं." "गांवांत पट्टीचा तगादा प्रळय जाला आहे! होळकर यांनीं नाकेबंदी केली आहे. दुकानें हरकोणाचीं व घरें बहुतेक उघडीं नाहींत. जिवाजीपंत नेने, रामराव पुरंदरे यांजकडील कारकून, हमल शिंपी तिघेजण तसदी अनेक प्रकारचीं होऊन मृत्यु पावले. आज दोन चार रोज होळकर खासा पट्टीस्तव गांवांत फडके यांचे वाड्यांत कारभार होतो तेथें येत असतात. धक्का उदीमपट्टी व घरपट्टी चालली आहे! कालपासोन बुधवार व शनवारांत मोठा दंगा आहे. कारभारी लपत फिरतात. जो सांपडेल तो नेतात, पठाणांचे हवालीं करतात, हाल करतात ते पत्रीं काय लिहूं! लोक हरतऱ्हेनें बातमी बंदी असतां सडे रात्र पिरात करून जीव मात्र घेऊन जातात. ×× शहर मरूं घातलें आहे."

(७ जाने.) "येथें पैक्याची होळकराकडील निकड भारी. नित्य धरणी! तेव्हां जसा दिवस ढकलेल तसा दिवस ढकलतात. पापपुण्याची जात राहिली नाहीं."

"शु. ५ बुधवारीं (ता. २९ दिसें.) खासा होळकर पठाणसुद्धां येऊन मोरराजमी रावसाहेब यांजराचीं घरें दडून मध्यरात्रपर्यंत बसोन तीन

लाख रु. द्यावे ऐसें ठरावून गेले. नंतर गुरुवारीं दोन (११ जाने.) प्रहरां पठाणसुद्धां येऊन रावसाहेब दादा व बाबा यांस घेऊन चांदणींत पठाणसुद्धा बसले होते. रा. चितोपंत देशमुख यांजकडून ऐवज पटला नाहीं म्हणोन चितोपंतास रुबरू पठाणांनीं ओढून नेलें. त्यास समस्त मंडळीसुद्धां चांदणींत अहोरात्र बसले. नंतर प्रातःकाळीं होळकर निघोन आपल्या डेऱ्यास गेले. पठाण व नागो जिवाजी धरणें बसलेंच होते. त्यास रावसाहेब, दादा व बाबा त्रिवर्ग शुक्रवारीं दहा घटका दिवस आल्यानंतर होळकराचे डेऱ्यास जाऊन ठराविलें जे, तीन लाख रु. तूर्त द्यावे. त्यास दररोज पन्नास हजार देत जाऊ हें ठरावून दोनप्रहरां माघारे आले. यास शुक्रवारचा हप्ता प्रथमचा देणें. त्यास बाबा फडके यास पठाणांनीं घेरून चांदणींत शुक्रवारीं दहा घटका रात्रपर्यंत अस्नात बसवून ५०००० रु. घेऊन नंतर भोजनाची परवानगी दिली."

( ११ जाने. ) "ऐवजाविशीं होळकर याचा बहुत तगादा होऊन मर्यादा राहिली नाहीं! शहरावर पट्टी सुरू करोन दर पेठेचे अंमलदार यांजवर पेठेच्या आकाराप्रमाणें होळकर यास बराता देऊन होळकर यांणीं लहान मोठे गृहस्थ यांस बेहुर्मत करोन चाप[1] व कोरडे मारोन बरातांप्रमाणें ऐवज घेतात. शहरच्या रयतेवर ईश्वरी क्षोभ जाला आहे. रा. जिवाजीपंत नेने[2] यास नित्य कोरड्याचा मार देतात!"

( १३ जाने. ) "रा. वासुदेव जोशी चिपळोणकर यास १०००० रु. व किरकोळ २००० एकूण १२००० पडोन चौकी उठली. ××× कोणी कोणास भेटत नाहीं. घर सोडून कुलपें घालून जीव जगवितात असा प्रकार आहे. रा. बापू साने याचीं मुलेंमाणसें होळकर यांणीं पुरंदरे यांचे खटल्यानिमित्त बायको बाळंतीण वीस रोजांची समेत धरून नेली. सोडण्याची परवानगी सरकारची जाली परंतु सुटली नाहीं. रा. विठलराव

---

१ लहान राहुटी. २ हे घनगडचे किल्लेदार, त्या किल्ल्यावर पूर्वी दादा फडनवीस आणि बाबा फडके यांना कैदेंत ठेविलें होतें. हा आकस मनांत धरून त्याचे असे हालहाल चालू होते.

गोळे पितापुत्र धरून नेले. गद्रे यांची ठेव सव्वा लाख रु. आहे ती मागतात. शहरांत मोठी पट्टीची धुमाळी लागली! कोणास दुसरा विचार सुचत नाहीं. तूर्त दिवस जातो तो सुदिन! श्रीहरि पार लावणार!"

(२२ जानेवारी) "शहरावर तीन पट्ट्या होऊन बेमुरवत पठाणांनीं ऐवज वसूल करून घेतला. पुन: शहरांत पठाण येऊन घरें व वाडे उघडून जो सांपडेल त्याजपासोन मार देऊन ऐवज घेतात! तूर्त येथें राज्याचा बंदोबस्ताचा व राजकारणी विचार कांहीं एक नाहीं. होळकरास ऐवजाचा भरणा करण्याचे गिरफदारींत आहेत. ऐवजाचा भरणा जाहल्यास उत्तम. नाहीं तर परिणाम कठिण आहे.!"

(२२ जानेवारी) "गावांत दंगा अनिवार! लिहितां येत नाहीं. ब्राह्मण शिष्ट आदिकरोन एकसारखा विचार घडत आहे. बहुतेक गृहस्थ-परागंदा जाले! अबरूचा विधि राहिला नाहीं. प्राण जगणें हेच विचार पडले! × × × प्रांत उध्वस्त जाला! रयत बुडाली!"

(३१ जाने.) "लोक पळून गेले त्यांची घरें खणतात, दुकानें उघडून कापड नेतात, व घरें वाडे रोज पाडतात! + + + शहर गाईसारखें हळहळतें!"

(५ फेब्रु.) "पुण्यांतील अवस्था पत्रीं कोठवर लिहून कळवावी! पट्टी द्यावयाची ती शक्त्यनुरूप घेतली. आतां घरें खणतात, मारतात, पायकापुडें तवे तापवून डोकीवर दगड देतात! अशी रीत चालली आहे. + + + सारांश भालेराई जाली! ईश्वरें नेत्र झांकिले!"

(६ फेब्रु.) 'शहरांत तीन पट्ट्या होऊन ऐवज वसूल केला. होळकराच्या भरण्यास आणखी ऐवज पाहिजे म्हणोन शहरांतील मातबर वगैरे ऐवजदार गृहस्थ पाहोन घरांतून धरून नेऊन जो ऐवज निघेल तो घेऊन मग घरें खणून जो पैका हातास लागेल तो घेतात! शिवाय लष्करवाले पठाण दररोज दहा पांच घरांवर दरवडे घालून लुटून नेतात!''

(८ फेब्रु.) "मातबर गृहस्थ सोडून वेश बंद ठेवून निघोन सडे गेले. बायका दुसरे जागीं ठेविल्या. चार पांच ब्राह्मण मारतां मारतां मृत्यु

पावले. रस्त्यांतून देखील ब्राह्मण धरून नेतात, मारतात, चाप लावितात, तवे तापवून पुढें टाकितात. याजप्रमाणें अवस्था चार रोज भारी जाली. दुकानें झाडून लागलीं. त्यावरोन मग दुकानें फोडून कापड, नक्त व दाणा, भांडीं, जवाहीर नेतात. चहाड (चोर) बहुत जाले आहेत. दरसदे (दरशेकडा) दहा रुपये चहाडास देऊं केले आहेत. ते घरें दाखवितात. रात्रीस कारकून प्यादे येऊन घरांत शिरोन चीजवस्त भरतात. नंतर घरांत सांपडतात त्यास मारहाण करून चाप लावून अष्टादिक जिन्नस मग घरधणी दाखवितो. घेऊन जातात. अशीं घरें नित्य दहा वीस नेतात! दिवसास दुकानें फोडून नेतात आणि होळकराचा भरणा करतात. + + + स्थित पुण्याची राहिली नाहीं. कोणी कोणास भेटत नाहीं. पुसलें असतां सांगत नाहीं अशी गत आहे. दिवस जातो तो सुदिन!"

(१४ फेब्रुवारी) "येथील वर्तमान तर, शहरांत महाप्रळय होऊन प्राणिमात्रास पट्टीमुळें उपद्रव जाला आहे तो पत्रीं बयान लिहितां येत नाहीं. आजपर्यंत लहानमोठे गृहस्थ व सावकार व वाणी उदमी, कापडकरी व मुत्सद्दी यांजपासोन तीन पट्ट्या घेतल्या. नंतर घरें, दुकानें व वाडे फोडून वित्तविषय व कापड वगैरे भांडेंकुंडें घेऊन गेले! नंतर घरांत व दुकानांत व वाड्यांत व रस्त्यांत हिंडतां फिरतां दशग्रंथी व पंडित आदिकरोन वाणी उदमी व ब्राह्मण जो सांपडेल तो धरोन नेऊन लष्करांत मार देऊन तसेही रुपये घेतले! नंतर शहरांत लहान मोठ्या गृहस्थांच्या व वाणी उदमी सावकार यांच्या घरास खणत्या लावून जें सांपडेल तें नेतात! सरासरी हजार आठशें घर खणलें! माराने वगैरे तसदीनें ब्राह्मण वगैरे पंचमेळ जातीचें माणूस सरासरी शंभर दीडशें मेलें! सरकारचे उपाध्ये वीरेश्वर दीक्षित करवे हे मरतां मरतां मेले! दोन रोज मुडदा पडला होता. नंतर तेलंगानीं नेऊन अग्न दिली. स्त्री बरोबर जात होती तिला पठाणांनीं जाऊं दिलें नाहीं. लाख रुपयांचा फडशा करोन घेऊं, नाहीं तर बायकोस बरोबर घेऊन जाऊं म्हणोन पठाण अडोन बसले आहेत!',

होळकराच्या या 'देणें' प्रकरणामुळें पुणें शहरावर आणि पुणें प्रांतावर कसा अनर्थ गुदरला होता हें दर्शविण्यास वर उतारे दिले आहेत ते पुरे

आहेत. दिसेंबर-फेब्रुआरी हे तीन महिने अशी ही धराधर, मारझोड लुटालूट आणि जाळपोळ सतत चालू होती. आणि या अवधांत माराखालीं शेंकडों मेले--हजारों नाहले गेले आणि परागंदा झाले आणि सर्व प्रांतचा प्रांत उध्वस्त होऊन कोट्यावधि किंमतीच्या मालमत्तेचें वाटोळें करण्यांत आलें! बाजीराव साहेबांनीं आपल्याला विरोध करणाऱ्या जुन्या परंपरेचा नाश करण्याकरितां शिंद्यांना दक्षिणेंत ठेवून घेतलें त्यामुळें मराठी राज्याचें आतांपर्यंत अर्धेमुर्धे वाटोळें झालेंच होतें. आतां त्या जुन्या परंपरेचा पुनरुद्धार करण्याकरितां अमृतरावांच्या बोलावण्यावरून होळकराची स्वारी दक्षिणेंत आली. तिच्या सपाट्यांत पेशव्यांच्या तावडींतून शिल्लक राहिलेलें कार्य याप्रमाणें पुरें करण्यांत आलें! इतका हा अनर्थ करून होळकरानें तीन महिन्यांत सुमारें पन्नास लक्ष रुपये वसूल केले. परंतु तेवढ्यानें त्याची गरज भागण्याजोगी नव्हती. पुणें प्रांतांत आतां कांहीं बाकी राहिली नाहीं असें पाहून त्याची नजर आतां कर्नाटकाकडे वळली. त्यानें मागणी केल्यावरून पुणें दरबारानें कर्नाटकांतील सावनूर, गदग, नवलगुंद, डंबळ वगैरे महालांवर पंधरा लक्ष रुपयांच्या बराता लिहून होळकराच्या स्वाधीन केल्या आणि या बरातांप्रमाणें एवज वसूल करण्याचें काम होळकरानें फत्तेसिंग मान्याकडे सोंपविलें.

होळकराच्या इशाऱ्यावरून फत्तेसिंग माने सातारचें प्रकरण उरकल्यावर रहिमतपुरास आले आणि तेथून त्यांनीं पंतप्रतिनिधींकडे दहा लक्ष रुपये खंडणी देण्याविषयीं तगादा बसविला. या बाबतींत आठ पंधरा दिवस बरीच वाटाघाट होऊन पंतांचे कारभारी मोरोपंत देंडरकर यांनीं मान्यास पांच हजारांचा गांव इनाम देऊं करून खंडणीची रक्कम
जाने. १८०३ चार लक्ष रु. ठरवून घेतली. या करारप्रमाणें रक्कम
किंवा इनामगांवच्या सनदा यापैकीं कांहींच वेळेवर हातीं देईना; सबब पाटलोजी माने पांच सात हजार फौजेनिशीं कऱ्हाडास गेले आणि त्यांनी तें ठाणें काबीज करून वसंतगडास वेढा दिला. त्या किल्ल्यावर पंतांची आई काशीबाई होती तिनें चार आठ दिवस मान्याच्या फौजेशीं नेटानें लढाई दिली परंतु शेवटीं तिचें कांहीं चालेनासें होऊन तिजवर

शत्रूच्या स्वाधीन होण्याचा प्रसंग प्राप्त झाला. अशा स्थितींत
जाने. १८०३ एका अंधाऱ्या रात्रीं मोरोपंत पेंढरकरानें पाटलोजी मान्यावर छापा घातला आणि त्याची फौज उधळून लावून त्याच्या तीन तोफा आणि दीड दोनशे घोडे हिसकून घेतले. त्या गर्दींत काशीबाई वेढ्यांतून निसटून वासोट्याच्या किल्ल्यावर पळाली आणि पेंढरकर मिळालेल्या लुटीवर संतुष्ट होऊन खानापुराकडे वळला. पाटलोजी बाबांनीं शत्रूचा थोडासा पाठलाग केला; परंतु शत्रू जबरदस्त असल्यामुळें त्यांचा कांहींच इलाज चालला नाहीं. ही बातमी फत्तेसिंग मान्यास समजतांच ते ता. १५ जाने. रोजीं कऱ्हाडास आले आणि वसंतगड काबीज करून त्यांनीं कऱ्हाड क्षेत्रांत धराधर आणि मारामार करून हजारों रुपये उकळले. याप्रमाणें मान्यांची पंतांच्या जहागिरींत धामधूम सुरू असतां रामचंद्रराव घोरपडे, कोठारी, आबा बक्षी, मार्तंड विठ्ठल परभू, सुभानजी माने वगैरे त्यांचे सरदार पंढरपूर-विजापूर या प्रांताकडे वळले आणि त्यांनीं तेथें लुटीचा अगदीं कहर उडवून दिला. जाने.–फेब्रुवारी हे दोन महिने फत्तेसिंगाचा मुक्काम कऱ्हाड रहिमतपूरच्या आसपासच होता. फत्तेसिंग हे रहिमतपूरचे पाटील. त्यामुळें त्यांची भाऊबंद माने मंडळी आणि रहिमतपूरचे शेटसावकार, वाणी-उदमी, शेतकरी आणि त्या गांवचा पटवर्धनांचा कमावीसदार बाळाजी गणेश दामले या सर्वांची चार दिवस मोठी चंगळ उडाली. त्या सर्वांनीं फत्तेसिंगाच्या आश्रयानें भोंवतालच्या प्रांतांत आणि पंतांच्या जहागिरींत स्वाऱ्या घालवालून अमूप लूट मिळविली आणि ती रहिमतपुरांत आणून सांठविली. मान्यांस यापुढें कर्नाटकांत जावयाचें होतें. व त्या प्रांतांत जावयाचे त्यावेळीं दोन राजमार्ग होते. पहिला मार्ग मिरज प्रांतांतून पुढें सरकून मनोळीच्या वाटेनें हुबळी धारवाडकडे जाण्याचा आणि दुसरा मार्ग विजापुरावरून बदामी बागलकोटकडे जाण्याचा. पहिला मार्ग सर्वस्वी पटवर्धनांच्या ताब्यांत होता. मान्यांचा मुक्काम रहिमतपुरास येतांच पटवर्धनांनीं त्याजकडे वकील पाठवून बोलणें लाविलें कीं, तुम्हांस खर्चासाठीं दोन लाख रुपये देतों. तुम्ही आम्ही मिळून करवीरकरांचें पारिपत्य करूं या. याच वेळीं करवी-

रकरांचे वकीलही मान्याकडे आले आणि त्यांनीं बोलणें लाविलें कीं, तुम्हांस खर्चासाठीं दहा लक्ष रु. रोख देतों. तुम्ही आम्ही मिळून पटवर्धनांचा फडशा पाडूं या! पटवर्धन—करवीरकर या तंट्यांत मान्यांचा कल पटवर्धनाकडे विशेष होता. पटवर्धनांच्या साहाय्यानें करवीरराज्यांत धामधूम करून लूट मिळवावी आणि नंतर त्यांच्याच साहाय्यानें कर्नाटकांत जाऊन बरातांप्रमाणें ऐवज वसूल करावा असा फत्तेसिंगांचा विचार होता.

खुद्द पंतप्रतिनिधींचा मुक्काम याचेळीं पुण्यांत होता. हरीपंत भाव्यांनीं पंतांवर सव्वा लाख रु. खंड आणि पंचवीस हजार रु. उंबरेपट्टी अशी जबरदस्त खंडणी बसविली. पंत रकम देण्याची टाळाटाळ करूं लागले तेव्हां भाव्यांनीं तावोडतोब पंतांच्या वाड्याची नाकेबंदी करविली आणि त्यावर तोफा रोखल्या. त्या आणीबाणीच्या प्रसंगीं पंत अमृतराव आणि दादा फडनवीस यांच्या दाराशीं पांच चार वेळां तडजोडीच्या बोलण्यासाठीं गेले. परंतु त्या उभयतांनीं त्यांची धड विचारपूससुद्धां केली नाहीं, शेवटीं निरुपाय होऊन पंतांनीं रकमेच्या भरण्यासाठीं भाव्यांकडे चिटकोपंत एकांडे, नाना बोकील आणि पेंढारकराचा पुत्र असे तिघेजण ओलीस पाठविले आणि पौष व० ३० ता. २१ जाने. रोजीं रात्रीं ते दोनशें स्वारांनिशीं पुण्याहून निसटून किन्हईकडे पळाले. त्यांच्या पलायनाची बातमी बाहेर फुटतांच भाव्यांनीं पंताबद्दल ओलीस राहिलेल्या गृहस्थांना तापलेल्या तव्यावर उभे करून त्यांचे हालहाल केले आणि पंतांच्या वाड्यांतील सर्व चीजवस्त जप्त केली. पंत आपल्या जहागिरींत दाखल होतांच कर्नाटकांतील राजकारणाला निराळेंच वळण लागलें. मान्यांचा त्या प्रांतांत फैलावा होऊं देऊं नये म्हणून पटवर्धन, रास्ते, गोखले, बापू शिंदे धारवाडकर, कर. छत्रपति आणि पंतप्रतिनिधि या सर्वांनीं एकविचारानें मान्याविरुध्द हत्यार उपसलें. करकंब तालुक्यांत रामचंद्रराव घोरपडे होता त्यावर पंतांनीं एके दिवशीं छापा घातला आणि त्याच्या फौजेची दाणादाण केली.

घोरपड्याची ही दुर्दशा ऐकतांच मार्तंड विठ्ठल परभू हा

फेब्रु. १८०१ हजार जमावानिशीं गुरसाळ्याजवळ होता तो घाईघाईनें मान्याकडे परत आला आणि सुभानजी माने तीन हजार

ऐ. ले. सं. १७.

जमावानिशीं माचनुराकडे होता तोही मागें हटून कासेगांवालगत आला. मान्यांच्या फौजेच्या लहानसहान टोळ्या प्रांतभर पसरल्या होत्या, त्यांवरही घोरपड्यांच्या पराजयामुळें बचक बसून त्यांची पळापळ सुरू झाली. याप्रमाणें मान्यांची बाजू पडलेली पाहतांच साताऱ्याच्या किल्ल्यावर नाना पुरंदरे होता त्यानें पांच सहा हजार रामोशी चाकरीस ठेवून साताऱ्याच्या बंदोबस्ताकरितां चतुरसिंग राहिला होता, त्यावर छापा घालून त्याला हुसकून लाविलें आणि मान्यांच्या लष्कराभोंवतीं घिरट्या घालण्यास सुरवात केली. मनोहरगीर गोसावी पुरंदरावर होता त्यानें तर पांच चार हजार बेरड जमवून खुद्द पुण्याभोंवतीं वाटा मारण्यास सुरवात केली. याप्रमाणें दक्षिणेकडे वादळ उठलेलें पाहतांच होळकरानें नागो जिवाजीबरोबर पांच सात हजार फौज देऊन त्याची मान्याकडे रवानगी करून दिली. फेब्रु. अखेर माने आणि नागो जिवाजी यांच्या फौजा एकत्र झाल्या. नंतर या दोघांनीं पुढें कर्नाटकांत जावयाचा उद्योग करावयाचा. परंतु तुंगभद्रेपलीकडे इंग्रजी फौजांच्या याच वेळीं हालचाली सुरू झाल्या त्यामुळें त्यांना तो उद्योग बंद ठेवावा लागला.

वसईच्या तहानंतर मराठी राज्य आपल्या कावूंत आणण्यासाठीं इंग्रजांनीं काय काय लटपटी केल्या आणि मराठ्यांशीं वागतांना त्यांचें सामान्यतः राजकीय धोरण काय होतें याचें मर्म नीट समजण्यासाठीं मराठी राज्याच्या घटनेसंबंधीं कांहीं थोडासा मजकूर येथें नमूद केला पाहिजे. शाहू महाराजांच्या कारकीर्दीच्या अखेरपर्यंत सर्व मराठी राज्य हें एकसूत्री आणि एकजिनसी होतें. पुढें महाराजाच्या सनदेवरून पेशव्यांकडे राज्याचा सर्वाधिकार आला आणि छत्रपति हे राज्याचे नामधारी मालक होऊन बसले. ही अधिकारक्रांति होतांना मराठी राज्याच्या घटनेंत कांहीं भानगडी पुढें कायमच्याच राहून गेल्या. पहिली भानगड छत्रपतींच्या अधिकारासंबंधाची. पेशव्यांकडे आलेल्या सर्वाधिकाराचा उपयोग राज्याचें संरक्षण आणि वृद्धि करण्याकडेच व्हावा अशी सनदेंत एक शर्त होती. या शर्तीप्रमाणें पाहिलें तर राज्य राखण्यापुरती पेशव्यांची सत्ता अमर्यादित होती; परंतु राज्याचें नुकसान करण्याची सत्ता मात्र त्यांच्या हातीं तिळमात्र नव्हती. पेशवे इंग्र-

जांच्या आश्रयाला गेल्याबरोबर ते राज्यत्याग करून बनवासाला गेले आहेत असें मराठे लोक म्हणूं लागले तें याच अर्थानें होय. राजकीय स्वातंत्र्य गमावून मर्यादित क्षेत्रांत मर्यादित अधिकारानें राज्य करण्याची कला त्यावेळीं मराठ्यांना समजत नव्हती. स्वातंत्र्य किंवा पारतंत्र्य हीं दोन टोकेंच फक्त त्यांना दिसत होतीं. या दोन टोकांमधील कांहीं बाबतींत स्वातंत्र्य आणि कांहीं बाबतींत पारतंत्र्य असणारी अर्धवाडगी राज्यपद्धति जी इंग्रजी पेशवे स्वीकारूं पहात होते, ती मराठ्यांच्या स्वतंत्र बाण्यास मानवण्याजोगी नव्हती. असो. राज्याचें नुकसान होण्याजोगी कोणतीही गोष्ट करण्याची सत्ता पेशव्यांच्या हातीं नसल्यामुळें तशी एखादी गोष्ट कारणपरत्वें करावयाची झाल्यास त्यांना त्या बाबतींत आधीं छत्रपतींची मंजुरी मिळविणें प्राप्त होतें.

दुसरी भानगड होती राजपथकी सरदार आणि सरंजामदार यांची. पेशव्यांच्या हातीं सत्ता येण्यापूर्वीच हे लोक मराठी राज्यांत बद्धमूल झाले होते. पेशवे छत्रपतींच्या सनदेवरून सर्वाधिकार गाजवीत होते, त्याप्रमाणेंच हे लोक छत्रपतींच्या सनदांवरूनच आपआपल्या सरंजामांचा उपभोग घेत होते. पेशव्यांना सनद मिळाली तींत ' सर्वांचें यथापूर्व चालवावें' असें एक कलम होतें. या कलमाप्रमाणें या लोकांकडून फक्त लष्करी नोकरी घेण्याचा हक्क मात्र पेशव्यांस प्राप्त होत होता. पेशव्यांनीं सांगितलेली नोकरी कशी बशी बजावली म्हणजे हे राजपथकी पेशव्यांचें कांहींच लागत नसत. असे हे लोक मराठी राज्यांत चोहोंकडे विखुरलेले होते. राजपथक्यांमध्यें नागपूरकर भोसले, गायकवाड, अक्कलकोटकर भोसले, पंतप्रतिनिधि, पंतसचिव वगैरे लहानमोठीं बरींच प्रस्थें होतीं. कांहीं राजपथकी तर केवळ पांच दहा स्वारांचे सरदार आणि एक दोन खेड्यांचे मालक होते. परंतु राजपथकी लहान असो किंवा मोठा असो, त्याचा मान पेशव्यांच्या बरोबरीचा होता. तो दरबारांत पेशव्यांच्या मांडीला मांडी लावून बसत असे आणि पेशव्यांनीं एखादे प्रसंगीं 'अरे' म्हटलें तर तो 'कां रे' म्हणून उत्तर देत असे ! राजपथकी आणि पेशवे यांमध्यें असें हें एक प्रकारचें बरोबरीचें नातें होतें, त्यामुळें राज्याचें नुकसान होण्याजोगी कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी

बरोबरीचे सरदार या नात्यानें या राजपथकी लोकांचा सल्ला घेणें पेशव्यांस जरूर होतें.

या दोन भानगडी संभाळून आणि छत्रपतींचें संस्थान आणि राजपथक्यांचे सरंजाम वगळून बाकी मराठी राज्य राहिलें त्यावर मात्र पेशव्यांची सत्ता होती. हें पेशवाई राज्यही अनेक लहान मोठ्या सरंजामदारांत वाटलें गेलें होतें. खुद्द पेशव्यांच्या ताब्यांत फारच थोडा मुलूख होता. बाकी सर्व राज्य सरंजामदारांनींच व्यापलें होतें. दक्षिणेकडील पटवर्धन व रास्ते आणि उत्तरेकडील शिंदे व होळकर हीं तर मोठमोठीं प्रस्थेंच होतीं. यांपैकीं शिंदे व होळकर हे तर मुलूख आणि लष्करी सामर्थ्य या दृष्टीनें पेशव्यांच्या बरोबरीचे किंबहुना थोडेसे वरचढच होते. असे हे लहानमोठे सरदार तत्वतः पेशव्यांचे नोकर होते, परंतु त्या नोकरीचें स्वरूप जवळ जवळ भागीदारीप्रमाणेंच होतें. सरदारांनीं एखादा मुलूख प्रथम स्वप्रयत्नानें जिंकावा आणि नंतर तो त्यांना पेशव्यांकडून सरंजाम म्हणून मिळावा असेंच पुष्कळ वेळां घडत होतें. शिंदे होळकरांच्या बाबतींत तर या भागीदारीचें स्वरूप कागदोपत्रीं अगदीं स्पष्ट होतें. कारण नर्मदेपलीकडील मराठी राज्याच्या पेशवे, शिंदे व होळकर अशा तीन वांटण्या व्हाव्या असा स्पष्ट करारच होता. पेशव्यांच्या कारकीर्दींत अवघ्या पन्नास पाऊणशे वर्षांत मराठी राज्याची तुंगभद्रेपासून दिल्लीपर्यंत आणि भडोच पासून बंगालच्या उपसागरापर्यंत जी अकल्पित भरभराट झाली ती कांहीं एकट्या पेशव्यांच्या प्रयत्नांनेच झाली नव्हती. त्या कामीं अनेक सरदारांच्या प्राणाहुति पडल्या होत्या आणि अनेक राष्ट्रपुरुषांचे देशाभिमान, शौर्य, स्वार्थत्याग वगैरे सद्गुण त्या भरभराटीला कारणीभूत झाले होते. त्यामुळेंच या सरदारांना आपल्या धन्याच्या–पेशव्यांच्या वैभवांत एक प्रकारचा भागीदारीचा मान मिळाला होता. पेशवाई राज्य हें एकसंध आहे. पेशवे हे सर्वसत्ताधीश खावंद–त्यांच्या मर्जीप्रमाणें आणि धोरणाप्रमाणें सर्व सरदार त्यांच्या ताबेदारींत वागत आहेत असा बाह्यतः देखावा दिसत होता. तथापि त्यांत आंतल्या आंत असे हे लहान मोठे तुकडे होते. सारांश पेशवाई भव्य राज्यमंदिराचा मुख्य दिवाणखाना मात्र पेशव्यांच्या

ताब्यांत होता आणि भोवतालचीं लहान मोठीं दालनें हीं सर्व सरदारांच्या भागीदार या नात्यानें ताब्यांत होतीं. मंदिराची रचना आणि मांडणी यामुळें दिवाणखाना आणि दालनें आपापसांत विभागलीं गेलीं होतीं आणि मंदिराच्या अभेद्यपणावरच सर्वांचें अस्तित्व अवलंबून होतें. सरंजामदारांच्या या भागीदारीची जाणीव पेशव्यांस पूर्णपणें होती त्यामुळें कोणतीही महत्वाची गोष्ट करण्यापूर्वी त्यांचा सल्ला घेण्याचा वहिवाट पेशव्यांनीं प्रथमपासूनच ठेविली होती. ता. १ जाने. १८९७ रोजीं नाना फडनवीस आणि बाजीराव पेशवे यांमध्यें एक कराराची यादी ठरली तींत एक कलम असें आहे—

स्वराज्य आणि परराज्य यांशीं करार व तहनामे आहेत त्याप्रमाणें चाल असावी. मोठी मसलत पडेल त्यास बरोबरीचे सरदार शिंदे होळकर वगैरे यांचे सल्ल्यानें चांगलें तें हित असावें.

( पेशव्यांची मखलाशी ) येणेंप्रमाणें करार.

नानांच्या या कलमांत पेशव्यांच्या राजकीय धोरणाचें सारसर्वस्व सांठविलेलें आहे. परराज्याशीं वागतांना तहनामे पाळावे—स्वराज्यांत छत्रपति आणि राजपथकी यांच्याशीं वागतांना ठरलेले करार पाळावे आणि महत्वाच्या प्रसंगीं बरोबरीचे सरदार यांच्या सल्ल्याप्रमाणें चांगलें तें करावें असा पेशवाई राजनीतीचा दंडक होता.

सारांश, स्वराज्यांत छत्रपतींच्या बाबतींत नोकरी, राजपथक्यांच्या बाबतींत बरोबरीची सरदारी आणि स्वतःच्या सरंजामदारांच्या बाबतींत भागीदारीच्या स्वरूपाची मालकी अशीं तीन निरनिराळीं नातीं पेशवेपदांत समाविष्ट झालीं होतीं. मराठी स्वराज्य हें एकसूत्री आणि एकछत्री राज्य नसून तो एक लहान मोठ्या मराठी राज्यांचा संघ होता. त्या संघांत अव्वल दर्जाचा मान आणि अव्वल दर्जाचें लष्करी सामर्थ्य पेशव्यांचें होतें. परराज्याशीं वागतांना पेशव्यांचे असेच आणखी निरनिराळ्या स्वरूपाचे पुष्कळ हक्कसंबंध होते. परंतु या ठिकाणीं ती चर्चा अप्रस्तुत असल्यामुळें तिचा प्रपंच आम्ही येथेंच करीत नाहीं. स्वराज्यांत पेशव्यांचे जे हक्कसंबंध होते त्यांना वडीलकी असें पूर्ण अन्वर्थक नांव होतें. पेशव्यांचें वैभव, सामर्थ्य

आणि बंधनें या सर्व गोष्टी वडीलकी या शब्दांत पूर्णपणें प्रतिबिंबित झाल्या आहेत. कुटुंबांत सर्व मानपान वडील माणसांचे-लहान मोठ्या गोष्टींत त्यांचा शब्द हाच प्रमाण-घरांतील कर्ता मनुष्य हा कुटुंबशरीराचा आत्मा आणि कुटुंबांतील इतर हक्कदार हे त्या शरीराचे अवयव होत अशी हिंदूंची प्राचीन समाजरचना आहे, तरी इष्टेटीची कोणत्याही स्वरूपाची विल्हेवाट करावयाची तर त्या बाबतींत कर्त्या मनुष्यास इतर हक्कदारांची सल्लामसलत घ्यावीच लागते. मराठी साम्राज्यकुटुंबांत पेशव्यांची स्थिति अशीच होती.

पेशव्यांच्या 'वडीलकीचें' वर विवेचन केलें आहे त्यावरून पेशव्यांशीं बसईचा तह केल्यानंतर असेच पगारी मैत्रीचे स्वतंत्र तह शिंदे, होळकर, भोसले व गायकवाड वगैरे मराठे सरदारांशीं करण्याचा अट्टाहास इंग्रजांनीं कां चालविला होता याचा उलगडा आतां वाचकांस आपोआपच होईल. बसईच्या तहाच्या तत्त्वाला मराठी राज्यांतील इतर प्रमुख घटकांची मान्यता मिळावी—पेशव्यांशीं तह करण्यांत आपण कारस्थानीचा अर्धा अधिक डाव जिंकलाच आहे—बाकीचा शिल्लकी डावही जिंकावा यासाठींच त्यांची ही घडपड चालू होती. परंतु ही गोष्ट मात्र त्यांना तितकीशी सोपी गेली नाहीं. कारण हा तह ठरवितांना पेशव्यांनीं छत्रपति, राज-पथकी किंवा स्वतःचे सरदार यापैकीं कोणाचीच सल्लामसलत घेतली नव्हती. शिवाय असला हा लाजिरवाणा तह केला जावा असें कोणतेंही संकट मराठी राज्यावर गुदरलें नव्हतें. होळकर आपला जीव घेईल या काल्पनिक भयानें पेशव्यांनीं मराठी राज्यावर ही घोरपड आणली होती. अशा स्थितींत सर्वच मराठ्यांनीं या तहाबद्दल नापसंती दर्शविली यांत काय आश्चर्य ! परंतु मराठ्यांनीं कितीहि घडपड केली तरी त्यांच्यावर आपल्या पगारी मैत्रीचें खोगीर लादावयाचेंच असा इंग्रजांनीं आपल्याशीं ठाम संकल्प ठरविला होता आणि त्यासाठींच त्यांनीं लष्कराची तयारीही जय्यत केली होती. तुंगभद्रेच्या दक्षिणतीरावर म्हैसूर राजाचे पांच-सात हजार घोडेस्वार आणि इंग्रजांचे आठ दहा हजार कवाइती शिपाई अशी मोठी फौज कर्नल वेलस्ली याच्या हाताखालीं जमली होती. मराठ्यांशीं युद्ध

होणार त्यांत सरसेनापतीचा हुद्दा या क. वेलस्लीकडेच असावा असें ठरविण्यात आलें होतें. शिवाय परांड्याजवळ निजामाची पंधरा हजार फौज आणि इंग्रजांची दहा हजार कवाइती फौज असा मोठा जमाव क. स्टीव्हन्सन् याच्या सेनापत्याखालीं जमला होता. निजामाच्या फौजेवर सखो रुद्र हा सेनापति होता आणि त्यानें क. स्टीव्हन्सन् याच्या हुकमतींत वागावें असें निजामसाहेबांचें फर्मान सुटलें होतें. त्याशिवाय लखनौ, अलाहाबाद, कलकत्ता, मद्रास, श्रीरंगपट्टण वगैरे ठिकाणीं इंग्रजांचीं पलटणें जमलीं होतीं आणि प्रत्यही नवीन सैन्यभरती चालू होती ती निराळीच. त्याशिवाय दारुगोळा, द्रव्य, तोफखाना, धान्यसामुग्री वगैरे रसद हत्याचा साठा मराठी राज्याच्या सरहद्दीवर इंग्रजांनीं जागोजाग भरपूर केला होता. शिवाय याच वेळीं इंग्रजी आरमारही लढाईसाठीं सज्ज करून ठेवण्यांत आलें होतें. सारांश सर्व मराठ्यांनीं एकजूट करून इंग्रजांविरुद्ध हत्यार उपसलें असतें तरीसुद्धा त्यांना टोणपे हाणून वठणीवर आणण्याइतकी लष्करी तयारी इंग्रजांनीं केली होती.

याप्रमाणें इंग्रजांची लष्कराची तयारी जय्यत होती. तथापि त्यांच्या तरवारीपेक्षां त्यांच्या कारस्थानीपणालाच विशेष यश यावें अशीच तूर्त मराठी राज्याची स्थिति होती. प्रत्येक सरदार आपल्या भोवतालच्या लहानमोठ्या सरदाराशीं लढण्यांत इतका गर्क होऊन गेला होता कीं, मराठी राज्याचें पुढें काय होणार इकडे लक्ष देण्यास त्याला फुरसत नव्हती. प्रत्येकजण दुसऱ्याला लुबाडून आपलें ऐश्वर्य वाढविण्याच्या उद्योगांत होता आणि तो प्रयत्न करतां करतां शेवटीं आपलें स्वतःचेंच कसें शाबूद राहील या फिकिरींत पडला होता! घटप्रभा आणि कृष्णा या नद्यांमध्यें चालू असलेला पटवर्धन आणि करवीरकर यांचा तंटा पुरातनचाच होता. तुंगभद्रा–वर्धा–मलप्रभा या नद्यांच्या कांठीं बापू गोखले हा एकीकडे पटवर्धनाशीं आणि दुसरीकडे रास्त्यांशीं एकाच वेळीं लढत होता. धारवाड प्रांतांत तर धारवाडचा किल्लेदार बापूजी शिंदे विरुद्ध गोखले, गोखले विरुद्ध कित्तूरकर देसाई, कित्तूरकर देसाई विरुद्ध बापूजी शिंदे असें तिहेरी युद्ध चालू होतें. कित्तूरकर, सावनूरकर वगैरे सरदारांचा आपसांतील भांडणामुळें यापूर्वीच नष्ट-

प्राय झाल्या होत्या. पानशे, पुरंदरे वगैरे सरदारांचें दिवाळें वाजल्यामुळें त्यांनीं आपापल्या फौजांना रजा देऊन बेरड, रामोशी पदरीं बाळगले होते आणि त्यांच्या साह्यानें रस्तेलूट करून द्रव्योपार्जन करण्याचा त्यांचा उद्योग राजरोस सुरू होता. बुंदेलखंडांत स्थानिक बंडखोर बळावून त्यांनीं अली-बहादर आणि सागरचा सुभेदार या पेशव्यांच्या सरदारांची सत्ता झुगारून दिली होती. शिंदे होळकरांच्या तंट्यानें औचित्याची तर राहोच, पण माणुसकीची मर्यादासुद्धां यापूर्वींच ओलांडली होती. मराठी राज्यांत निग्रहानुग्रहाची सत्ता कोणाच्याच हातीं फारशी राहिली नव्हती आणि सर्व राज्य बेरड, रामोशी, भिल्ल, कोळी, पेंढारी आणि बेकार शिलेदार यांच्या दंग्यामुळें उध्वस्त झालें होतें त्यामुळें कोणीतरी जबरदस्त शत्रु किंवा मित्र निर्माण होऊन चहूंकडे शांतता प्रस्थापित करील तर बरें होईल असें प्रत्ये-कास वाटूं लागलें होतें—सारांश, या अंदाधुंदीमुळें मराठ्यांची आपणा-विरुद्ध एकजूट होणार नाहीं. यदाकदाचित् झालीच तर ती फार वेळ टिकणार नाहीं—आणि रक्ताचा एकही थेंब न सांडतां आपले हेतु सह-जासहजीं तडीला जातील असा इंग्रजांनीं आपणाशीं ठाम सिद्धांत ठरविला होता.

असो. पेशव्यांशीं तह झाल्यानंतर अशाच प्रकारच्या तहाची वाटा-घाट करण्यासाठीं इंग्रजानीं शिंदे आणि नागपूरकर भोसले यांकडे वकील रवाना केले आणि त्या गोष्टीला पेशव्यांनीं कोणतीही हरकत घेतली नाहीं. परंतु होळकराशीं समेट करण्याचे बाबतींत मात्र इंग्रज आणि पेशवे यांचें काहीं केल्या ऐकमत्य होईना. पेशवे इंग्रजाकडे गेल्यावर आपले सर्व उपाय थकले असें पाहून होळकरानें इंग्रजांच्या मध्यस्थीनें श्रीमंताशीं समेट घडवून आणण्याचा शेवटचा प्रयत्न करून पाहिला. परंतु त्या कामीं त्याला यश आलें नाहीं, श्रीमंतांनीं होळकराशीं भलाबुरा कसा तरी समेट करावा—निदान खरें खोटें कसलें तरी समेटाचें बोलणें तरी चालू ठेवावें—निदान समेट करण्याची पोकळ हुलकावणी तरी दाखवावी याबद्दल क. पालमर यानें बहुत खटपट केली. परंतु पेशवे या बाबतींत इंग्रजांचें कांहीं मुद्दां ऐकेनात ! त्यांना होळकराबद्दल पराकाष्ठेची चीड वाटत होती,

त्यामुळें होळकराचें कोणी नांव उच्चारतांच ते पिसाळल्यासारखीं उत्तरें देत! पेशव्यांच्या या दीर्घद्वेषापुढें आपलें कांहीं चालत नाहीं असें पाहून क. पालमर यानें आपल्याच जबाबदारीवर होळकरास सूचना पाठविली तिचें तात्पर्य असें-नाना फडनवीस आणि होळकर घराणें यांशीं इंग्रजांचा पुरातनचा घरोबा आहे. पेशव्याविरुद्ध आणि शिंद्याविरुद्ध तुमच्या काय तक्रारी आहेत त्या आम्हांला माहीत आहेत आणि तुम्हाला योग्य तो न्याय मिळवून देण्याची आम्ही शक्य ती खटपट करूं. मात्र तुम्हांस यापुढें मराठी राज्यात नांदावयाचें असेल तर तुम्ही आमचें शत्रु किंवा मित्र यापैकीं कोणते तरी एक नातें स्वीकारलें पाहिजे. आमचें शत्रुत्व स्वीकारावयाचें असेल तर तुमचें बेमुर्वत पारिपत्य केलें जाईल. त्यासाठीं आम्ही जय्यत तयारी केली आहे. आमची मैत्री पाहिजे असेल तर आमची मुख्य अट अशी आहे कीं, तुम्ही आपल्या सैन्यासह पुण्याहून निघून तावडतोब माळव्यांत परत गेलें पाहिजे. पेशव्यांस घेऊन आम्ही पुण्यास येत आहों. पेशव्यांना तुम्हाबद्दल पराकाष्ठेचा अविश्वास वाटतो सबब तुम्ही यापुढें दक्षिणेंत राहूं नये. तुम्ही आपल्या जहागिरींत परत गेल्यावर तुम्हांस न्याय मिळवून देण्याची आम्ही शक्य ती खटपट करूं ही खात्री बाळगावी. फेब्रु. महिन्यांत इंग्रजांचा हा सर्व मनोदय होळकरास कळून चुकला आणि त्यानंतर लागलीच क. वेलस्ली हा आपल्या फौजेसह तुंगभद्रा ओलांडून मराठी राज्यांत शिरला आणि क. स्टीव्हिन्सन् हाही आपल्या फौजेचा तळ परांड्याहून हालवून पुण्याच्या रोखानें येऊं लागला. इंग्रजांच्या या लष्करी हालचालींना लढाई एवढें एकच उत्तर होळकराकडून मिळण्यासारखें होतें. परंतु आपण इंग्रजाशीं जंग सुरू केला तर शिंदे पुढें काय करतील हें कोडें अजून त्यास सुटत नव्हतें. होळकरास पडलेल्या या कोड्याचा जास्त स्पष्ट खुलासा करण्याकरितां शिंद्याकडील हालहवाल येथें नमूद केली पाहिजे.

हडपसरच्या पराजयाचें वर्तमान समजल्याबरोबर शिंद्यांनीं होळकराच्या पारिपत्याकरितां स्वतः दक्षिणेंत येण्याचा बेत कायम ठरविला आणि त्यांनीं आपली चहूंकडे पांगलेली फौज एकत्र करून नवीन सैन्यभरतीचें काम

नेटानें सुरू ठेविलें आणि शिंद्याच्या दरबारांत यादवराव भास्कर बक्षी दिवाण यांचें वजन कमी होऊन सर्जेराव घाटगे हा शिंद्याचा पुनः मुख्य सल्लागार बनला वगैरे सर्व मजकूर मागच्या प्रकरणांत सांगण्यांत आलाच आहे. महिना पंधरा दिवसांतच यशवंतराव घोरपडे, फकीरजी गाढवे, अंबोजी इंगळे, नागो राम, लोई फिरंगी वगैरे शिंद्याचे सर्व सरदार उज्जनीस एकत्र झाले आणि शिंद्याच्या सैन्याची संख्या लवकरच तीस चाळीस हजारांपर्यंत फुगली. या सर्व सैन्यासह शिंद्यांनीं घाईघाईनें उज्जनीहून निघून बऱ्हाणपुराकडे आपला मोर्चा वळविला. जाने. अखेर त्यांचा मुक्काम नर्मदा उत्तरतीरीं आला. ता. २८ जाने. रोजीं नर्मदा उतरण्याचें काम सुरू होऊन चौदा दिवसांत शिंदे सर्व सैन्यांसह नर्मदा दक्षिणतीरीं आले, आणि तेथून त्यांनीं थेट बऱ्हाणपुरास येऊन तेथें आपला तळ कायम केला. पांच सहा महिने शिंद्यांचा मुक्काम बऱ्हाणपुरासच पडला. त्या अवधींत पुढील कर्तव्यतेविषयीं त्यांच्या दरबारांत नानाप्रकारचीं कारस्थानें घाटत राहिलीं. शिंद्याचा मुक्काम नर्मदेवर येतांच बाळोजी कुंजर हा पेशव्यांचें पत्र घेऊन त्यांच्या लष्करांत दाखल झाला. पेशव्यांनीं शिंद्यास पत्र पाठविलें त्यांत असा मजकूर होता कीं, 'होळकर उरावर येऊन उभा राहिला आणि तुम्ही लांब राहिला त्यामुळें निरुपाय होऊन आम्ही इंग्रजांशीं तह केला आहे. वस्तुतः आम्हाला इंग्रजांबद्दल अतिशय तिटकारा वाटतो. केवळ होळकराचा नाश करण्याकरितां आम्ही तात्पुरती इंग्रजांची दोस्ती स्वीकारली आहे. हें काम होतांच त्यांच्या मैत्रीचें जोखड झुगारून देऊन त्यांना हांकून द्यावें असें आमच्या मनांत आहे. सबब तुम्ही पुण्याकडे येऊन इंग्रजांच्या साह्यानें आधीं होळकराचा नाश करावा आणि नंतर इंग्रजांचेंही पारिपत्य करावें. मात्र तुम्ही यापुढें आम्हापासून दूर न राहतां तावडतोब पुण्याकडे निघून यावें.' पेशव्यांच्या म्हणण्याचा हा सर्व इत्यर्थ बाळोजी कुंजरनें शिंद्यास नीटपणें समजून सांगितला. शिंद्याच्या दरबारांत यावेळीं तीन पक्ष आपापलें म्हणणें जोरानें प्रतिपादन करीत होते. बाळोजी कुंजर, सर्जेराव घाटगे, फकीरजी गाढवे, यशवंतराव घोरपडे हा एक पक्ष. या पक्षाला खुद्द पेशव्यांचा पाठिंबा होता. या पक्षाचें

म्हणणें, 'शिंद्यांनीं आपलें पुर्ण दरबारांतील वर्चस्व केव्हांही कमी होऊं देऊं नये आणि होळकराशीं कदापि समेट करूं नये. शिंद्यांचें सामर्थ्य अफाट आहे. त्यांनीं स्वतःच्याच दमावर इंग्रजाचें पारिपत्य करावें आणि नंतर होळकरासही समूळ बुडवावा.' दुसरा पक्ष इंग्रजांचा. पेशव्याशीं तह होतांच इंग्रजी वकील क. कॉलिन्स हा शिंद्याकडे आला आणि बोलूं लागला कीं, 'पेशव्यांनीं आम्हाशीं मैत्रीचा तह केला आहे. पेशवे हे तुमचे खावंद, जें धन्यानें केलें तें अर्थात् नोकरांनाही बंधनकारक आहेच. सबब तुमचा आमचाही पगारी मैत्रीचा तह व्हावा. तुम्ही आमची मैत्री पतकरली तर आम्ही अनेक बाजूंनीं तुमचा फायदा करून देऊं. उदाहरणार्थ, पेशव्यांचें निजामाकडे पुष्कळ येणें निघत आहे आणि या येणेंबाकींत पेशव्यांबरोबर शिंद्यांचाही मोठा हिस्सा आहे. बसईच्या तहानें या येणेंबाकीचा निकाल करण्याचें काम आमच्या हातीं आलें आहे. या येणेंबाकीचा हिशेब करतांना तुमच्या मैत्रीखातर पेशवे व निजाम यांचें नुकसान करून आम्हाला तुमचा फायदा सहज करून देतां येईल. सारांश, नवीन मुलुख मिळविणें आणि द्रव्योपार्जन या दोनी दृष्टीनें आमची मैत्री तुम्हाला फायदेशीर होणार आहे. आमचा हा सल्ला तुम्हास मानवत नसेल तर तुमचें आम्हाशीं आणि आमचे दोस्त पेशवेसाहेब यांशीं शत्रुत्व निर्माण होईल आणि ती गोष्ट तुम्हांस जड जाईल.' शिंदे दरबारांतील तिसरा पक्ष अंबोजी इंगळे आणि यादवराव बक्षी यांचा. या तिसऱ्या पक्षाला नाग. भोंसल्यांचा मोठा पाठिंबा होता. या पक्षाचें म्हणणें, 'मराठी दौलतींत इंग्रज शिरले आहेत हा मोठाच अनर्थ गुदरला आहे. सर्वांआधीं या गोष्टीचा विचार प्रथम केला पाहिजे. सर्वांची या प्रसंगीं एकजूट झाली पाहिजे. विशेषतः शिंदे होळकरांचा समेट तावडतोब घडवून आणला पाहिजे. शिंदे व होळकर दोघेहि सारखेच सामर्थ्यवान आहेत. ते एकेकटे इंग्रजांशीं लढूं लागले तर त्यांचा शत्रूंपुढें निभाव लागावयाचा नाहीं. शिंदे होळकरांचें सामर्थ्य एकवटलें तर इंग्रजांना सहज उडवून देतां येईल. सबब शिंद्यांनीं या प्रसंगीं लोभ किंवा इर्षा या विकारांना मनांत थारा न देतां होळकरांशीं बंधुभावानें समेट करावा.' होळकरांशीं समेट करण्याची सर्वांत जास्त आस्था इंगळ्याला वाटत होती.

इंगळे हा पाटीलबाबांच्या तालमींत तयार झालेला नामांकित सेनापति होता आणि त्यावर दौलतरावांचाही मोठा विश्वास होता. शिंदे बऱ्हाणपुरास आल्यावर इंगळे मुख्य फौजेंतून फुटून खरगुणबात्तिशीस आला आणि तेथून त्यानें होळकरास पत्र पाठविलें कीं, 'मी तुमचा आणि शिंदे बहादुर यांचा समेट घडवून आणतों. तुमच्यातर्फे कोणी तरी विश्वासू वकील मजकडे पाठवावा. त्याचें माझें बोलणें होऊन समेटाच्या अटी ठरवितां येतील. या अटी उभयपक्षीं पाळल्या जातील याबद्दल उभयपक्षातर्फे मी जामीनगत पतकरावयास तयार आहे.' होळकरालाही हा समेट करण्याची उत्सुकता वाटत होतीच. त्यामुळें इंगळ्याशीं बोलण्याकरितां नागो जिवाजी व गोपाळराव गानू या दोघांना पाठविण्याची त्यानें तयारी चालविली. परंतु ती गोष्ट करण्याचें विशेषसें प्रयोजनच पडलें नाहीं. कारण या समेटाच्या बाबतींत शिंद्यांचा स्वतःचाच निश्चय अजून ठरला नव्हता. इंग्रजांशीं युद्ध करावयाचें हा निश्चय मात्र त्यांचा पक्का ठरला होता. आणि त्या दृष्टीनें शिंद्यांनीं इंग्रज वकिलाला तावडतोब उत्तर दिलें कीं, 'तुम्हाशीं श्रीमंतांनीं काय तह केला त्याच्या अटी आम्हांला अजून श्रीमंतांकडून कळलेल्या नाहींत. पूर्वी पेशवे व इंग्रज यामध्यें सालबाईचा तह झाला त्यावेळीं त्या तहाच्या अटी उभयपक्षीं पाळल्या जातील याबद्दल के. पाटीलबाबा उभयपक्षांना जामीन राहिले होते. शिवाय इंग्रजांनीं पेशव्यांशीं बोलावयाचें तर तें बोलणें त्यांनीं शिंद्यांच्या मार्फतच बोलावें असेंही त्यावेळीं ठरलें होतें. असें असतां तुम्ही आम्हास न विचारतां परमारें पेशव्यांशीं तह ठरविला तो कां म्हणून? असो. नागपुराहून भोसले आमच्या भेटीसाठीं येत आहेत. त्यांची आमची भेट झाल्यावर तुम्हास काय तें निश्चित उत्तर सांगूं.' याप्रमाणें इंग्रजांच्या बोलण्याचा शिंद्यांनीं तत्काळ निकाल लाविला. परंतु होळकराच्या बाबतींत कोणतें धोरण स्वीकारावयाचें याबद्दल मात्र त्यांचा निश्चय कांहीं केल्या होईना. कुंजर, घाटगे हे होळकराचा नाशच केला पाहिजे, कसाही प्रसंग पडला तरी त्यांशीं कदापि सख्य करूं नये असें प्रतिपादन करूं लागले म्हणजे त्या गोष्टीला शिंदे आनंदानें मान्यता देत. कारण होळ-

करानें केलेल्या पराजयांच्या जखमा त्यांच्या अंतःकरणांत शल्यासारख्या बोचत होत्या. उलटपक्षीं इंगळे होळकरांशीं समेट करण्याविषयीं आग्रह करूं लागला म्हणजे त्या गोष्टीलाही शिंदे कष्टानें हूं हूं म्हणत! कारण इंग्रजांशीं लढावयाचें तर त्या कामीं होळकराचें साह्य घेतलें पाहिजे ही गोष्ट त्यांना स्पष्टपणें दिसत होती. सारांश, होळकराच्या बाबतींत शिंद्यांचें धोरण याप्रमाणें दुटप्पी होतें.

शिंद्याच्या या दुटप्पी धोरणानुळें होळकरापुढें मात्र मोठाच पेंच येऊन पडला. आपल्या एकट्याच्याच बळावर इंग्रजाशीं आपल्याला यश-स्वीपणानें टक्कर देतां येईल असा त्यास आत्मविश्वास वाटत होता. परंतु कुंजर, घाटगे असल्या पोरकट आणि स्वार्थसाधु लोकांच्या नादीं लागून शिंदे इंग्रजांना मिळाले तर इंग्रज व शिंदे असा दुरोख शह आप-णास झेंपणार नाहीं असें त्यास भय वाटत होतें. वस्तुतः यावेळीं इंग्रज आणि शिंदे हे दोघेही होळकराच्या नाशाकरितां त्यावर चालून येत होते. दोघेही आपापल्या मतलबाकरितां त्याशीं समेटाचें बोलणें बोलत होते. परंतु दोघांनीही त्याच्या पारिपत्याची आंतून जय्यत तयारी केली होती. होळ-कर बाजूला राहिला तर शिंदे व इंग्रज यांचें युद्ध जुंपणार—परंतु होळ-करानें दोघांपैकीं एकाशीं युद्ध सुरू केलें तर मात्र दोघेही एक होणार असें हें चमत्कारिक कोडें पुणेंदरबारापुढें उभें राहिलें. या कोड्याचा साधकबाधक विचार करून अमृतराव, दादा फडनवीस, बाबा फडके आणि होळकर यांनीं पुढील मसलतीची रूपरेषा निश्चित केली ती अशी—पुण्या-हून निघून जाण्याविषयीं इंग्रजांचा सक्त तगादा बसला आहे, तसें न करावें तर आपलें इंग्रजांशीं युद्ध जुंपणार हें निश्चित दिसतें. शिंद्यांच्या अनि-श्चित धोरणामुळें आपणाला तूर्त ती गोष्ट करतां येत नाहीं. त्याअर्थी आपणाला आतां येथून हाललेंच पाहिजे. इंग्रजांचा पाय मराठी दौल-तींत शिरूं नये या दृष्टीनें तूर्त इतक्या गोष्टी कराव्या. १ बाबा फड-क्यांनीं मोंगलाईंत प्रवेश करावा आणि बेदरास जाऊन रघूत्तमरावाशीं सलख करावें आणि नंतर त्याच्या साहाय्यानें निजामाची गांठ घेऊन त्यास अनुकूल करून घ्यावें. २ दादा फडनवीसांनीं दक्षिणेकडे जाऊन पटवर्धन

रास्ते, प्रतिनिधि, गोखले वगैरे सरदारांना भेटावें आणि त्यांना अनुकूळ करून घेऊन आणि त्यांना बरोबर घेऊन जेजुरीच्या सुमारें यावें. ३ अमृतराव व होळकर यांनीही पुण्याहून तळ हालवून जेजुरीस जावें आणि साताराचा किल्लेदार बाळाजी माणकेश्वर यास तंबी देऊन सातारकर छत्रपतींस हस्तगत करावें. ४ नाग. भोसले आपणाला पूर्णपणें अनुकूल आहेतच. त्यांच्यामार्फत आणि अंबोजी इंगळ्यामार्फत शिंदे होळकरामध्यें समेटाचें बोलणें चालू आहे. हा समेट घडून येईल तर शिंदे, होळकर, नाग. भोसले, निजाम आणि दक्षिणेकडील पटवर्धन वगैरे सरदार या सर्वांनीं एकजूट करून इंग्रजाचें पारिपत्य करावें. शिंदे होळकरांत समेट घडून न येईल तर आपण छत्रपतींस घेऊन मोगलाईंत जावें. निजामाला अनुकूळ करून घेण्याकरितां बाबा फडके तेथें जातच आहेत. निजाम अनुकूळ झाला तर ठीकच आहे. तसें न जुळेल तरीसुद्धां आपण जबरदस्तीनें मोगलाईंत शिरावें आणि तिकडेच वर्ष सहा महिने दिवस कंठावेत. तोपर्यंत इंग्रज आणि शिंदे काय करतात हा मजकूर स्पष्ट होईल आणि त्याप्रमाणें आपणासही पुढील धोरण ठरविणें सोईचें पडेल.

होळकराच्या या मसलतीचें पुढें काय झालें तें आम्ही कलमवारीनें येथें नमूद करतों.

१ बाबा फडके हे ता. १९ जाने. रोजीं पुण्याहून कूच करून हैदराबादेकडे निघाले. पांच सात हजार हुजरात, सरकारचे कारखाने, जरीपटका, अंबारी, साहेबनौबत, चवघडा वगैरे सरकारी लवाजमा त्यांजबरोबर देण्यांत आला होता. फडके प्रथम औरंगाबादेस जाऊन नंतर बेदरास गेले, आणि तेथें त्यांनी रघूत्तमरावाची गांठ घेतली. रघूत्तमराव हा इंग्रजांचा द्वेष्टा होता. आणि त्यावर निजामाचा चांगला लोभ होता. पुढें रघूत्तमराव आणि फडके यांनीं हैद्राबादेस जाऊन निजामाची भेट घेतली. निजाम व फडके यांच्या दोनतीन बैठकाहि झाल्या परंतु ज्या कामासाठीं फडके मोगलाईंत आले होते त्या कामाला विशेषसा रंग भरण्याचें चिन्ह दिसना. स्वतः निजामअल्ली हा वार्धक्यानें जर्जर होऊन आपल्या आयुष्याचे दिवस मोजीत अंथरुणावर पडून होता आणि त्याचें राज्य इंग्रजांनीं व्यापलें होतें.

निजामाचा दिवाण मशीरउल्मुल्क ऊर्फ मीर आलम आणि सेनापति राजा मोहिपतराम आणि निजामाच्या दरबारांतील बहुतेक मुत्सद्दी हे सर्व इंग्रजांच्या अन्नानें मिंधे झालेले आणि इंग्रजांच्या आधारावर स्वतःचा टेंभा पाजळणारे लटपटे लोक होते. निजामाच्या दरबारांत दोन पक्ष होते. एक मीर आलम याचा आणि दुसरा रघूत्तमरावाचा. पहिला पक्ष पूर्णपणें इंग्रजांच्या आहारीं सांपडला होता त्यामुळें मोंगलाई राज्यांत इंग्रज म्हणतील ती पूर्वदिशा अशी तूर्त स्थिति होती. रघूत्तमरावाला आणि मोंगलाईंतील जुन्या सरदारांना इंग्रजांचें हें वर्चस्व पहावत नव्हतें. या असंतुष्ट लोकांना निजामाची आवडती राणी बक्षी बेगम हिचा पूर्ण पाठिंबा होता. निजामाच्या पश्चात् गादी कोणास मिळावी याबद्दलही त्या दरबारांत नाना प्रकारचीं कारस्थानें घाटत होतीं. निजामाचा थोरला मुलगा मीर पोलादजंग यास गादीवर बसवून पूर्वीप्रमाणें सर्व राज्यकारभार आपल्याच हातीं रहावा असा मशीराचा हेतु होता. पोलादजंगाचें आणि बक्षी बेगमेचें अतिशय वांकडे होतें त्यामुळें निजामाचा नातू अलिजहांबहादर यांस गादीवर स्थापून सर्व राज्यकारभार आपल्या हातीं ठेवावा अशी बेगमेची खटपट चालू होती स. १८०३ जून जुलै महिन्यांत इंग्रजांचें शिंदे–भोसल्यांशीं युद्ध जुंपणार असा रंग दिसूं लागला त्यामुळें बाबा फडक्यांनीं मोंगली दरबाराच्या या भानगडींतून आपलें अंग काढून घेतलें आणि ते मोंगलाईंतून तळ हालवून भोसल्यांच्या लष्करांत सामील झाले. मागें ता. ६ आगष्ट रोजीं निजाम मरण पावला आणि मशीरानें रघूत्तमराव, बक्षी बेगम, नातू दाराजहां आणि आपले इतर प्रतिस्पर्धी यांना कैदेंत ठेवून मीर पोलादजंगाच्या नांवें द्वाही फिरविली. इंग्रजांच्या दपटशाच्या जोरावरच मशीरानें या सर्व गोष्टी घडवून आणल्या. तथापि मशीर व इंग्रज यांसंबंधीं असंतोषाच्या ज्वाळा मोंगली दरबारांत तशाच गुप्तपणें धुमसत राहिल्या. या बाबतींत नं. ६७३१ च्या पत्रांत पुढील उल्लेख आहे. “ मशीर यांनीं रघूत्तमराव यास कैद केलें म्हणोन बरकड सरदार यांणीं निकड करोन मशीर मारला म्हणोन वार्ता काल आली आहे. लेख कोणाचा नाहीं. सात दिवसांचें म्हणोन वर्तमान बोलतात. ” सारांश मोंगली दरबारांत कारस्थानें केट-

बिण्याची मराठ्यांना यावेळीं नामी संधि आली होती. परंतु मराठ्यांचें या वेळीं इंग्रजांशीं युद्ध सुरू होतें आणि त्यांत त्यांना सारखें अपयश येत होतें त्यामुळें त्यांना या गोष्टीकडे लक्ष देण्यास फुरसतच सांपडली नाहीं आणि बाबा फडक्यांची ही मोंगलाईतील खेप सर्वस्वीं फुकट गेली.

२ दादा फडनवीस हेही फेब्रु. अखेर पुण्याहून निघून मिरजेस आले. वाटेंत त्यानीं बाईस माधवराव रास्त्यांची आणि कऱ्हाडास पंतप्रतिनिधींची भेट घेतली. मिरजेस आल्यावर दादांनीं रामचंद्रपंत आपा आणि चिंतामणराव आपा या पटवर्धन सरदारांच्या भेटी घेतल्या आणि पुण्यास ठरलेलें सर्व कारस्थान त्यांना नीट समजून सांगितलें. दादांच्या या उद्योगाला कोणीही मनापासून पाठिंबा दिला नाहीं. कारण या कारस्थानाचा शिंदे होळकरांचा समेट करावयाचा–नंतर भोसले व निजाम यांचें सख्य जोडावयाचें--नंतर उत्तरेकडील आणि दक्षिणेकडील सर्व मराठे सरदारांनीं एकजूट करून इंग्रजांचा फडशा पाडावयाचा असला हा अगडबंब तपशील दक्षिणेकडील कोणाही सरदारास विशेषसा शक्य वाटला नाहीं. त्यामुळें दादाची ही खेप फुकट गेली आणि ते मिरजेसच स्वस्थ बसून राहिले. पुढें जन. वेलस्ली हा मिरज मार्गानें पुण्याकडे निघाला तेव्हां पेशवे हे पुनः गादीनशीन होणार आणि आपण त्यांच्या तावडींत सांपडलों तर आपली धडगत दिसत नाहीं असें भय वाटून फडनवीस पटवर्धनांच्या विद्यमानें वेलस्लीला भेटले आणि निरुपायानें इंग्रजी लष्करांतच आश्रयार्थ राहिले.

३ अमृतराव आणि होळकर यानीं जेजुरीस यावें असा बेत ठरला होता. परंतु आयत्या वेळीं अमृतराव निघण्याची टाळाटाळ करून पुण्यासच राहिले. होळकरानें मात्र फेब्रु. अखेर पुण्याहून आपला तळ हालविला आणि पुण्याभोंवतालच्या आपल्या नाकेबंद्या उठविल्या. शामतखान हा दहा पंधरा हजार फौज, एक कंपू आणि थोरला जिन्नसी तोफखाना बरोबर घेऊन शिंद्यांच्या तोंडावर चांदवडास जाऊन राहिला. मरिखान पठाण, अचीबलिंग, येसाजी रामकृष्ण वगैरे सरदार पुण्याहून निघून पंढरपुराकडे वळले. या सरदारांनीं अक्कलकोट आणि मुरापूर येथील खंडण्या वसूल करून गारदोंडेवरून नगराकडे जावें आणि त्या बाजूनें शिंद्याला शह द्यावा असा

संकेत ठरला होता. हे सर्व सरदार गेल्यावर होळकराजवळ पुण्यास तीन कंपू, दहा हजार फौज आणि तुनगें एवढा सरंजाम शिल्लक राहिला. या फौजेपैकीं एक कंपू आणि हरनाथसिंग हे होळकराच्या हुकमावरून पुण्याच्या रक्षणार्थ मागें राहिले आणि बाकीची फौज मात्र हळू हळू जेजुरीच्या मार्गानें वाट चालू लागली. ता ११ मार्च रोजीं होळकर मेजवानीनिमित्त शनवारवाड्यांत आला. भोजनोत्तर होळकरानें पेशव्यांची स्त्री ताईसाहेब यांच्या पायावर डोकें ठेविलें आणि पांच हत्ती, जवाहीर व वस्त्रें वगैरे नजराणा त्यांना सादर केला. ताईसाहेबांनींही बाळाजीपंत पटवर्धनाकडून होळकरास ढाल तलवार देवविली आणि त्यास गौरवपूर्वक निरोप दिला. याप्रमाणें निरोपाचा समारंभ झाल्यावर होळकर पुण्याहून निघून जेजुरीस आला. छत्रपतींना ताब्यांत घेण्याकरितां तो जेजुरीकडे आला होता. इंग्रजांनीं पेशव्यांना ताब्यांत घेऊन मराठी राज्यांत शिरकाव करून घेतला आहे तर आपण छत्रपतींस ताब्यांत घ्यावें आणि त्यांच्या नांवावर इंग्रजांविरुद्ध एखादी मोठी मसलत उभी करावी असा होळकराचा डाव होता. परंतु हा त्याचा डाव सिद्धीस गेला नाहीं. होळकर पुण्याहून निघाल्याबरोबर बाळाजी माणकेश्वरानें त्याचें पुढील धोरण ओळखून छत्रपतींस तावडतोब कैदेंत टाकलें आणि होळकराशीं लढण्याची जय्यत तयारी केली. सातारा किल्ल्याला महिना दोन महिने वेढा घालून बाळाजी माणकेश्वराला वळणीवर आणावें आणि नंतर छत्रपतींना ताब्यांत घ्यावें हा मार्ग होळकरापुढें मोकळा होता. परंतु तसें करूं जावें तर क. वेलस्ली हा यावेळीं मनोळीची वारी ओलांडून झपाट्यानें पुण्याच्या रोखें चालून येत होता, त्याच्याशीं आपला युद्धप्रसंग घडेल या भयानें त्याला तो मार्ग सोडून द्यावा लागला. कारण शिंद्याचें पुढील धोरण समजल्याशिवाय इंग्रजांशीं हातघाईवर यावयाचें नाहीं असा होळकराचा ठाम संकल्प ठरला होता. त्यामुळें छत्रपतींस ताब्यांत घेण्याचा नाद सोडून देऊन तो जेजुरीहून सिद्धटेकाकडे वळला आणि तेथून त्यानें मोगलाई राज्यांत धामधूम सुरू केली. मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत होळकरानें एकाएकीं औरंगाबादेवर हल्ला केला आणि त्या शहरापासून त्यानें बाप लक्ष रुपये खंडणी

ऐ. ले. ८. १८.

वसूल केलो. नंतर त्याच स्वारींत त्यानें बीड, पैठण, जालनापूर हे मोंगलाई तालुकेही दरोबस्त लुटले. त्याच्या पारिपत्याकरितां क. स्टीव्हन्सन् आणि सखो रुद्र हे त्यावर चालून आले. परंतु त्यांना झुकांडी देऊन होळकर सुरक्षितपणें चांदवडास आला. जून महिन्यांत होळकराची स्वारी खानदेशांत शिरली आणि तेथेंच महिना दोन महिने तळ देऊन राहिली.

याप्रमाणें होळकराचो दक्षिणेकडे पाठ वळतांच त्याच्या फौजेंतील शिपायांमध्यें पळापळ सुरू झाली. होळकराच्या फौजेंत हजारों मराठे शिलेदार होते आणि त्यांचीं घरेंदारें अर्थात् महाराष्ट्रांत होतीं. होळकर आतां माळव्यांत परत जाणार आणि तिकडेच कायमचें वास्तव्य करणार असें पाहून हे मराठे शिलेदार त्याच्या लष्करांतून फुटून आपापल्या घरीं परत येऊं लागले. शिवाय पेशवे व इंग्रज हे या वेळीं होळकराच्या लष्करांत फितुराचीं कारस्थानें खेळवीत होते आणि या त्यांच्या उद्योगाला चांगलें यश येत होतें. होळकराचा फत्तेसिंग मान्यावर अतिशय विश्वास होता. परंतु या विश्वासाच्या कुळानेंच प्रथम होळकरास दगा दिला! नाना पुरंदऱ्यांच्या मध्यस्थीनें पेशव्यांनीं मान्यास पत्र पाठविलें कीं, 'होळकराच्या नाशाकरितां इंग्रज व शिंदे यांनीं कंबरा बांधल्या आहेत. त्यांच्या तावडींतून तो आतां कसचा जिवंत राहतो? त्याच्या नादीं लागून तुम्ही उगीच भटक्या कां मारतां? त्याची संगत सोडून तुम्हीं आम्हाकडे यावें. आमची चाकरी पतकराल तर तुम्हांस दहा हजार स्वारांची सरदारी आणि मोठी जहागीर मिळेल.' मान्यास होळकराच्या कटांतून फोडून त्याचा नाश करावा या उद्देशानें पेशव्यांनीं हें कारस्थान चालविलें होतें. परंतु मान्यास हें सर्व बोलणें खरें वाटलें. यानंतरची हकीगत—

( २४ एप्रिल. ) " रा. फत्तेसिंग माने यांनीं रा. नाना पुरंदरे यांशीं सल्लूख करून फौजसुद्धां आदरकीचे मुक्कामाहून मानाप्यास यावयाचा बेत करून रा. नागो जिवाजी व पठाण यांस सांगितलें कीं, तुम्ही होळकर याजकडे जावें. आम्हांस वाईदेशीं जावयाचें आहे. याप्रमाणें सांगितल्यावरून माने यांचे लष्करांत फडणीस व होळकर याजकडील पठाण दोन

तीनशे होते, त्यांस आंतील मजकूर समजल्यावरून पलटणवाले व पठाण व फडणीस एक होऊन लष्करचें कूच होऊन इकडे येऊं लागलें तेव्हां पठाण दोन तीनशे मिळाले. रस्तेंत चालतां माने पालखींत बसले होते तेथें पातळाई पाहून गांठ घालून पालखींतच हातास धरून आमचे तलबेचा ( पगार बाकीचा ) फडशा करोन देणें, बाईदेसांत यावयास बनत नाहीं म्हणोन कटारा लाविला. तेव्हां गलबल जाली. लोक मिळाले त्यांस पठाणांनीं सांगितलें कीं, तुम्ही जास्ती कराल तर कटारा लाविल्या आहेत. यास आगोदर मारूं नंतर काय होणें तें होऊं. याप्रमाणें उत्तर केल्यावर लोक मागें सरले. माने यास तट्टावर बसवून पठाण माघारे घेऊन गेले."

याप्रमाणें फत्तेसिंग पठाणांच्या कैदेंत सांपडल्यावर पठाण आणि पलटणवाले यांनीं एकच हुल्लड करून मराठे शिलेदारांची दाणादाण केली आणि मानाचा सर्व गोट लुटून फस्त केला. नारायणराव माने आणि संभाजी माने हे हजार स्वारांनिशीं फत्तेसिंगाची आई व बायको यांस बरोबर घेऊन कसेबसे जीव बचावून पुरंदऱ्यांच्या आश्रयाखालीं माहुलीस येऊन राहिले. तेथें पुरंदऱ्यांनीं फत्तेसिंगाची आई व बायको यांना ताब्यांत घेऊन कैदेंत टाकलें आणि इतर लोकांस हांकून दिलें. फत्तेसिंगाच्या या दुर्दशेची बातमी रहिमतपुरास समजतांच तेथें एकच गोंधळ माजला. फत्तेसिंगाच्या आधारावर रहिमतपूरकरांनीं आजपर्यंत भोंवतालच्या प्रांतांत लुटालूट करून भरपूर द्रव्य मिळविलें होतें. परंतु तें पार त्यांना आतां सव्याज फेडावें लागलें! पंत प्रतिनिधि आणि नाना पुरंदरे यांनीं स्वाऱ्या घालघालून त्या गांवाची अगदीं दुर्दशा उडवून दिली आणि माने पाटलांचीं घरेंदारें आणि इनामें जप्त करून ते जिवाच्या भयानें रानोमाळ भटकूं लागले. पठाणांनीं फत्तेसिंगास कैद करून मीरखानाकडे नेलें. पुढें मीरखान हाही इंग्रजांच्या कारस्थानाला बळी पडला आणि तो पंधरा हजार फौजेसह होळकराला दगा देऊन निजामाच्या नोकरींत शिरला त्यामुळें फत्तेसिंगाची पुढें लवकरच हत्या झाली. याप्रमाणें फत्तेसिंग आणि मीरखान हे नामांकित सरदार शत्रूकडे फितूर झाले त्यामुळें होळकराचें मनस्वी नुकसान झालें.

याप्रमाणें होळकरावर संकटपरंपरा कोसळत असतां त्याचे प्रतिस्पर्धी जे

इंग्रज त्यांचे उद्योगाचे ग्रह जोरांत चालू होते. दुसऱ्याच्या घरांत शिरण्यापूर्वी न्याय, भूतदया असलें एखादें लेकटें बगलेंत मारून नंतरच त्या उद्योगांत पडावें असा इंग्रजांचा शिरस्ता होता हें पूर्वी सांगितलेंच आहे. वसईच्या तहानें असली ही सोन्यासारखी संधि इंग्रजांस आपोआपच लाभली. कारण पेशव्यांना पुनः गादीवर स्थापण्यांत आणि बंडखोर सरदारांना वठणीवर आणण्यांत त्यांची न्यायप्रियता सर्वांच्या प्रत्ययास येणार होती आणि मराठ्यांचीं आपसांतील भांडणें मिटविण्यांत त्यांना शांततासंरक्षणाचें पुण्य लाभणार होतें. असल्या या अमूल्य संधीचा इंग्रजांनीं पुरेपूर फायदा घेतला. उच्च दर्जाचा लढाऊपणा आणि व्यापक आणि पाताळयंत्री मुत्सद्देगिरी हे दोन्ही गुण त्यांच्याठायीं उत्कृष्टपणानें वास करीत होते. रणांगणावरील त्यांची शिस्त, धडाडी आणि चिकाटी विलक्षण होती, त्या-प्रमाणेंच मुत्सद्दीपणांतही त्यांचीं धोरणें अतिशय व्यापक, सूक्ष्मदर्शी आणि चिरपरिणामी असत. गव्ह. जनरल लॉर्ड वेलस्ली, पेशव्यांकडे वकिलीस असलेला कर्नल क्लोज, शिंदे व भोसले यांच्या दरबारीं असलेले क. कॉलिन्स आणि मि. वेब, हैदराबादेचा मेजर कर्क पॅट्रिक आणि श्रीरंगपट्टणचा मेजर माल्कम या इंग्रज मुत्सद्यांचा या वेळच्या मराठी राजकारणाशीं अत्यंत निकटचा संबंध येतो. हे सर्व लोक अत्यंत व्यवहारकुशल यंडे मुत्सद्दी होते आणि त्यांनीं मराठी राजकारणाचा सूक्ष्म अभ्यास केला होता. मराठे लोक हे आपसांतील भांडणामुळें हैराण झाले आहेत—अशा वेळीं त्रयस्थ-मध्यस्थ या नात्यानें आपण त्यांचीं भांडणें मिटवावींत—आणि या कामगिरीच्या मोबदल्यांत प्रत्येकाच्या नाकांत आपल्या पगारी मैत्रीची वेसण घालावी असा त्यांचा डाव होता आणि या धोरणास अनुसरूनच त्यांच्या सर्व हालचाली चालू होत्या. मेजर जनरल वेलस्ली हा तुंगभद्रा ओलांडून मराठी राज्यांत शिरल्याचें पूर्वी सांगितलेंच आहे. वेलस्लीनें मराठी हद्दींत पाय ठेवतांच सर्व महाराष्ट्रभर जाहीरनामा फिरविला कीं 'आम्ही पेशवे सरकारचे दोस्त या नात्यानें पेशव्यांच्या आमंत्रणावरून पुण्या-कडे येत आहों. आम्हाला कोणाचेंही शत्रुत्व करावयाचें नाहीं किंवा कोणा-चेंही नुकसान करावयाचें नाहीं. आमच्या लष्कराला दाणावैरण लागेल ती

आम्ही विकत घेऊं आणि त्याची किंमत रोखीनें देऊं. आम्हाला सर्वांची मैत्री पाहिजे. कोणालाही आम्हांकडून इजा पोचणार नाहीं. सर्वांनीं आपापल्या घरीं स्वस्थ आनंदानें रहावें.' दक्षिणेंतील सर्व सरंजामदारांनीं आपापल्या फौजांसह वसलीसाहेबांस सामील व्हावें अशा अर्थाचीं पेशव्यांचीं आज्ञापत्रें सर्व सरदारांस आगाऊच गेलीं होतीं. त्याप्रमाणें तो पुण्याकडे निघाला तेव्हां वाटेंत पटवर्धन, रास्ते, बापू शिंदे धारवाडकर, बापू गोखले, कित्तूरकर सर देसाई, सावनूरकर नबाब, पानशे, पाटणकर, बिंचूरकर, वगैरे कर्नाटकांतील सरदार आणि जमीदार आपापल्या फौजांसह त्याला सामील झाले. हे सर्व लोक केवळ पेशव्यांच्या आज्ञापत्रावरूनच इंग्रजांना सामील झाले होते असें नाही. त्यांच्या डोळ्यापुढें इंग्रजांनी दुसरें एक आमिष धरलें होतें आणि त्याला बळी पडूनच हे सर्व एकामागून एक इंग्रजी निशाणाभोंवतीं गोळा होत होते. पेशवे आणि त्यांचे सरदार यामध्यें भयंकर वितुष्ट वाढलें होतें. आपल्या पदरचे हे डोईजड सरदार आपणास पदच्युत करून आपला प्राण घेतील असें पेशव्यास सदैव भय वाटत होतें. उलटपक्षीं आपण पेशव्यांच्या ताब्यांत सांपडलों तर आपला सरंजाम जप्त केला जाऊन आपला समूळ उच्छेद होईल, असें प्रत्येक सरदारला भय वाटत असे. पेशवे आणि त्यांचे सरदार यांमधील हें वितुष्ट असेंच कायमचें नांदावें आणि आपल्या मदतीची जरूरी यापुढें मराठ्यांस कायमची लागत रहावी अशी इंग्रजांची इच्छा होती आणि या दृष्टीनें वसईच्या तहांत भरपूर तजवीज केली होती. प्रजेपैकीं कोणी धटाई करून पेशव्यांची अमर्यादा करील तर इंग्रजांनीं त्याचें पारिपत्य करावें आणि इंग्रजांच्या सल्ल्याप्रमाणेंच पेशव्यांनीं आपल्या सरदाराशीं वागणूक ठेवावी असा स्पष्ट करार त्या तहांत नमूद केला होता. हा करार तहामध्यें समाविष्ट करण्यांत इंग्रजांनीं अतिशय धूर्तपणा दाखविला होता. कारण तहानंतर इंग्रजांनीं मराठी राज्यांत स्वस्थता केल्यावर आपल्या धनीपणाचें साधारस्तंभ म्हणून पेशव्यांना—आपले सरंजाम आणि हक्कसंबंध यांचे संरक्षक या नात्यानें सरदारांना—आणि शांतता आणि सुव्यवस्था यांचे प्रस्थापक या नात्यानें सामान्य प्रजेला इंग्रजांची कायमची जरूरी लागत रहावी

अशी त्या करारांत मोठी सोय होती. असो. या कराराच्या आधारावर वेलस्लीनें या मराठे सरदारांस आश्वासन दिलें कीं, ' यापुढें तुम्हांस पेशव्याचें भय बाळगण्याचें बिलकुल कारण नाहीं. तुमचे सरंजाम आणि तुमचे हक्कसंबंध यांत पेशवे बिलकुल घालमेल करणार नाहींत ही खात्री बाळगा. आम्ही सांगू त्याप्रमाणें पेशवे सरकारची चाकरी करा म्हणजे तुमचें सर्व यथापूर्व चालविलें जाईल. ' इंग्रजांच्या आधारावर पेशव्यांची सत्ता जबरदस्त झाली आहे, आतां आपली धडगत दिसत नाहीं असें मानून सर्व सरदार आपआपल्या ठिकाणीं भयभीत झाले होते. अशा स्थितींत इंग्रजांकडून हें आश्वासन मिळतांच ते हुरळून जाऊन इंग्रजी फौजेला आनंदानें सामील झाले यांत काय आश्चर्य ? तात्पर्य, शूर असून नम्र, सामर्थ्यवान् असून शांत, ऐश्वर्यवान् असून निगर्वी, धनवान् असून निर्लोभी, असेंच इंग्रजांचें स्वरूप तूर्त मराठ्यांस दिसत होतें. त्यामुळें त्यांच्या हेतूंचा विपरीतपणा पूर्णपणें झांकला गेला आणि त्यांच्या लष्करी हालचालींना कोठेंही अडथळा न येतां उलट सर्वांकडून त्यांना सहानुभूतीच मिळत गेली.

तिकडे शिंद्यांनीं इंग्रजांविरुद्ध एक मोठें कारस्थान उभारलें होतें, त्यालाही यावेळीं बराच जोर चढला होता. होळकराशीं समेट कसा करावा आणि इंग्रजांचें पारिपत्य कसें करावें याबद्दल शिंद्याच्या दरबारांत दररोज खलबतें चालू होतीं आणि सर्व मराठे सरदारांना या मसलतींत सामील होण्याविषयीं शिंद्यांनीं पत्रें पाठविलीं होतीं. या कारस्थानाचें स्वरूप आणि उद्देश याविषयीं औरंगाबादेहून बाबा फडके मिरजेस गंगाधरराव पटवर्धनांस लिहितात—

( २८ मार्च ) " येथून रा. दौलतराव शिंदे व भोसले व होळकर यांस लौकर समेट करून पुढील मसलतीची पैरवी करावी येविशीं पत्रें गेलीं त्यास शिंदे यांचा इशारा पक्केपणें आपण इंग्रजांचा दखल स्वराज्यांत न होऊं देणेविशीं सर्व प्रकारें अनुकूळ आहों. होळकराचा समेटही लौकर करून घेऊन पोंचतों असा सूचित आला. याचप्रमाणें भोसल्यांचाही इरादा आहे. होळकर तों येविशीं नमोदच ( सिद्धच ) आहेत. या-

प्रमाणें इंग्रजांचा कदम दौलतींत पोंचला असतां कोणाचेंच माहात्म्य राहत नाहीं. याजकरितां सर्व सरदारांनीं एकत्र होऊन बंदोबस्त केला असतां अवघड नाहीं. × × कर्नाटकांतील सरंजाम इंग्रजांचा धारवाडास येणार. श्रीमंतांस घेऊन इंग्रज पुण्यास येणार असें खचित आहे. त्यास तुम्ही सर्व मंडळी व रास्ते विंचूरकर एकत्र होऊन धारवाडाकडे सरंजाम येत आहे याचा बंदोबस्त राखावा. शिंदे या गोष्टीस अनुकूळ पक्केपणें यांत गुंता नाहीं. * * * शिंदे, होळकर, भोसले हे एक नौकरच होतात. आपलें सारें मंडळ एक जालें म्हणजे नबाबही अनुकूळ आहेत. आपली सर्वांची याप्रमाणें कमीरी ( खंबिरी ) पाहिजे. इंग्रजांचा कदम दौलतींत शिरूं न पावे असें व्हावें ”

शिंद्यांच्या या कारस्थानाचा निष्कर्ष सामान्य लोकांनीं काय काढला होता हें पुढील उताऱ्यावरून समजून येईल. चिंतामणराव आपा सांगलीकर लिहितात—

“ (पंत प्रतिनिधिकडील ) कारभारी काल अस्तमानचे दोन घटका दिवसास आले. दोन घटका रात्रीस माघारे गेले. त्यांचे बोलण्यांतील भाव —शिंद्याकडील कारकून व पत्रें आम्हांस आलीं. त्याजबरोबर आपणासही पत्रें आहेत. बोलण्यांतील अर्थ व पत्रांतील ( अर्थ ) पूर्वीं पत्रें आलीं त्याजप्रमाणेंच आहे. मीं त्यास विचारलें कीं, शिंदे तिकडे बोलावतात. सरकार आज्ञा इंग्रजांस जाऊन सामील होण्याची. तेव्हां याचा विचार कसा करावा ? तेव्हां त्यांणीं उत्तर केलें—सरकारचे पदरीं सरदार बहुत आहेत. सर्वांचा एकविचार व्हावा आणि दौलतीचा बंदोबस्त करावा. मी उत्तर केलें कीं—इंग्रज जवळ आले याचा विचार अलिजाहांनीं ( शिंद्यांनीं ) काय केला आहे ? त्यांणीं उत्तर केलें कीं—इंग्रजांस दौलतींत शिरूं देऊं नये. मी उत्तर केलें—शिंदे बऱ्हाणपुरास व भोसले आपले ठिकाणींच आहेत नबाब सदरहूप्रमाणें. लहान किरकोळ सरदारांस कोणी पुसेलसें नाहीं अशी अवस्था. ते पक्षीं याचा विचार काय ! ते तर लहान आहेत. इकडील चार लहानमोठे मिळून इंग्रजांचें तोंड संभाळणें कठीण. तथापि तुम्ही ( शिंदे ) व भोसलेही लांब. ते पक्षीं विचार

कळतच आहे. यांत सरकारचे पदरचे होळकर. यांत व शिंद्यांत द्वंद्व. ते पक्षीं होणें कळतच आहे असें उत्तर केलें. ज्याचे चाकर म्हणवितों त्यांची आज्ञा उल्लंघन करून राज्यकारभार कसा चालतो? त्यांनीं उत्तर केलें कीं–धण्यांनीं जें करणें तें पदरच्यांचे हातून न होईल तर इंग्रजांस बोलावयाचें होतें. त्याणीं विचार न केला आणि दौलत दुसऱ्याचें घरीं घातली. ते पक्षीं सर्वांनीं एकविचारें होऊन पूर्वीं कै॰ नानांनीं कारभार चालविला त्याप्रमाणें चालवावें. परंतु दुसऱ्यास दौलतींत येऊं देऊं नये. असें बोलणें त्यांचे (शिंद्याचें) पडतें. मी त्यास सांगितलें कीं, तुम्ही विचार मोठे बोलतां! ते (इंग्रज) येऊन दाखल जाले याची काय वाट?"

शिंदे होळकरांचें आपसांत वितुष्ट—शिंदे, होळकर, भोसले, निजाम हे फुकटच्या गोष्टी मात्र सांगतात आणि आपापल्या जागीं स्वस्थ बसतात—हे लोक स्वतः मात्र कांहींच करीत नाहींत आणि आम्हास मात्र नुसता शास्त्रार्थ सांगून इंग्रजांच्या तोंडीं देणार–असा आपासाहेब सांगलीकरांनीं काढलेला या कारस्थानाचा निष्कर्ष दक्षिणेंतील सर्व सरदारांस तंतोतंत पटला होता आणि त्यामुळेंच मराठी राज्यांत प्रवेश करण्याचें काम इंग्रजांना इतकें सोपें गेलें हें उघडच आहे.

असो. फेब्रु. अखेर वेलस्लीसाहेब हरिहराजवळ तुंगभद्रा ओलांडून मराठी राज्यांत शिरला आणि पूर्वीं सांगितलेल्या मराठे सरदारांना ठिकठिकाणीं सामील करून घेत घेत तो गुडगेरी–हुबळी–धारवाड–संगोली या मार्गानें मनोळीची वारी ओलांडून गोकाकेवरून मिरजेस आला आणि तेथून तसाच उत्तरेकडे मोर्चा वळवून त्याची स्वारी ता. १२ एप्रिल रोजीं नीरा नदीच्या कांठीं अकलूज येथें आली. या ठिकाणीं क. स्टीव्हन्सन् आणि सखो रुद्र हे आपापल्या फौजांसह वेलस्लीला सामील झाले. पुढील मसलतीची रूपरेखा ठरविण्याकरितां वेलस्लीनें अकलुजेस पांच चार मुक्काम केले. नंतर क. स्टीव्हन्सन आणि सखो रुद्र हे भीमेच्या पाण्यानें पुढें सरकून गारदोंड येथें गेले आणि वेलस्ली आणि त्याच्या सोबतीचे मराठे सरदार हे नीरेच्या पाण्यानें पुढें सरकून ता. २० एप्रिल रोजीं पुण्यास

मुक्कामास आले. क. वेलस्लीची फौज जवळ आल्याची वर्दी येतांच पुण्याच्या रक्षणार्थ राहिलेली होळकराची फौज आणि हरिनाथसिंग हे पुण्याहून निघून लांब मजली करीत होळकराकडे परत गेले. इंग्रजांचा मुक्काम पुण्यास येतांच पुणें शहरांत पेशव्यांच्या नांवाची द्वाही फिरविण्यांत आली आणि त्या शहराचा कारभार पुनः पेशव्यांच्या नांवें चालूं लागला. पेशव्यांच्या पक्षाचे लोक आतांपर्यंत जिवाच्या भयानें ठिकठिकाणीं दडून राहिले होते ते आतां निर्धास्त होऊन पुण्यास परत आले. सिंहगडावर लपलेला पेशव्यांचा माऊसभाऊ गोविंदराव परांजपे आणि पुरंदरावर दडलेला मनोहरगीर गोसावी हे इंग्रजाबरोबरच पुण्यास दाखल झाले. पुण्याच्या कारभाराचें काम पेशव्यांनीं परांजप्याकडेच दिलें. हा अधिकार हातीं येतांच परांजप्यानें होळकराच्या पक्षांतील त्रिंबकपंत गोखले, बापू कुंटे, गोविंदपंत देवधर, महादेव टोकेकर वगैरे पंचवीस तीस असामींना पकडून तोफखान्यांत नेऊन कैदेंत ठेविलें आणि पुण्यांत आणि पुणें प्रांतांत होळकराच्या पक्षाची मंडळी शिल्लक राहिली होती त्यांचाही माग लावलावून त्यांचीं घरेंदारें लुटून फस्त केलीं. होळकराचा वाडा वाफगांवास होता त्यावरही फौज पाठवून तो अग्निसात करण्यांत आला.

एप्रिल-मे १८०३

यापुढील मराठी राजकारणाशीं अमृतरावांचा कांहींच संबंध येत नाहीं. सबब त्यांची पुढील सर्व हकीगत येथें एकदमच सांगून टाकलेली बरी. इंग्रज जवळ आल्याची वर्दी येतांच अमृतरावांनीं पेशवे आणि चिमाजीआपा यांच्या स्त्रियांना सिंहगडावर पोचाविलें आणि ता. १९ एप्रिल रोजीं विनायकराव बापू आणि हरीपंत भावे यांना बरोबर घेऊन ते पुण्याहून निघून चाकणेस जाऊन राहिले. दुसरे दिवशीं इंग्रज पुण्यास दाखल झाल्याची बातमी समजतांच अमृतराव संध्याकाळीं घाईघाईनें चाकणेहून निघून रात्रंदिवस मजला मारीत जोरव्याबरून नाशिकप्रांतीं गेले. तेथें गेल्यावर त्यांनीं धोडप वगैरे पांच सहा किल्ले घेतले आणि आवढा पट्टा या किल्ल्याला घेरा दिला. नाशिक प्रांतीं अमृतरावांची धामधूम दोन तीन महिने सुरु होती. विशेषतः नाशीक शहरावर त्यांची फारच अवकृपा

होऊन त्यांनीं त्या शहरांत लुटालूट आणि जाळपोळ यांचा अगदीं कहर उडवून दिला. पुढें इंग्रजांचें शिंदे–भोसल्यांशीं युद्ध सुरू झाल्यावर वेलस्लीनें बाजीरावसाहेब आणि अमृतराव यांमध्यें समेट घडवून आणला आणि अमृतरावास पेशवेसरकारांतून दरसाल आठ लक्ष रुपये पेनशन मिळावें असा ठराव झाला. इंग्रजांच्या शिंदे–भोसल्यांशीं लढाया झाल्या त्यांतून अमृतराव पांच चार हजार फौजेसह वेलस्लीच्या लष्करांत हजर होता. पुढें यु. संपल्यावर अमृतराव व मुलगा विनायकराव आणि त्या उभयतांच्या स्त्रिया आणि बहीण मैनाताई ही सर्व मंडळी नगरजवळ भिंगारगांव येथें इंग्रजांच्या आश्रयाखालीं रहावयास आली. पुढें स. १८०६।०७ सालीं अमृतराव काशीयात्रेस निघाले. नागपुराहून प्रयागास जातांना वाटेंत गोंड लोकांनीं अमृतरावावर छापा घातला. या छाप्याच्या गर्दीत त्यांची सर्व सलतनत लुटली गेली आणि ते जीव बचावून नागपुरास परत आले. तेथें भोसल्यांनीं त्यांचा उत्तमप्रकारें परामर्ष घेतला. नागपुरास कांहीं दिवस मुक्काम करून अमृतराव पुढें इंग्रजांच्या साह्यानें प्रयागास पोंचले आणि तेथेंच त्यांनीं आमरण वास केला. ऐ. ले. संग्रहांतून आतांपर्यंत अमृतरावांची पुष्कळ हकीगत छापली गेली आहे. तीवरून त्यांच्या ठायीं सदिच्छेशिवाय दुसरें कोणतेंही अकलेचें भांडवल नव्हतें असें दिसून येतें.

इंग्रज पुण्यास आल्याची वर्दी येतांच बाजीरावसाहेब हे वसईहून पुण्याकडे निघाले. त्यांजबरोबर दोन तीन हजार इंग्रजी फौज त्यांच्या रक्षणार्थ हजर होती. याबेळीं सर्व इंग्रज अंमलदार पेशव्यांची खुपमर्जी कशी राहील या चिंतेंत चूर झालेले दिसत आणि ते पेशव्यांस अत्यंत आदबीनें मुजरा करीत. अशा इंग्रज अंमलदारांचे मुजरे घेत घेत पेशव्यांची स्वारी बोरघांट चढून पुण्यालगत आली. त्यांना आणण्याकरितां वेलस्ली हा आपल्या पलटणीसह सामोरा गेला आणि त्यानें बहुत सन्मानानें पेशव्यांस पुण्यास आणलें. ता० १३ मे रोजीं जाहीर दरबार भरविण्यांत येऊन त्यांत ‘ हिज हायनेस बाजीराव पंडितप्रधान बहादुर ’ यांनीं पेशवाईचीं अधिकारसूत्रें पुनः हातीं घेतल्याचें जाहीर करण्यांत आलें. या

प्रसंगानिमित्त शनवार वाड्यांत आणि वेलस्लीच्या लष्करांत तोफांची सरबत्ती झाली. याशिवाय मुंबई, सुरत, कलकत्ता, मद्रास, श्रीरंगपट्टण, वगैरे ठिकाणींहि इंग्रजांनीं या समारंभानिमित्त असेच तोफांचे खुशालीचे बार केले. तात्पर्य, पेशवे गादीनशीन झाल्याचा गाजावजा करण्यांत आणि त्याविषयीं भपकेबाज थाटमाट करण्यांत इंग्रजांनीं कोणतीहि कसूर केली नाहीं.

याप्रमाणें पेशव्यांना गादीनशीन करण्याची मसलत सर्व मराठ्यांच्या विरोधास न जुमानतां इंग्रजांनीं अशी सहजासहजीं पार पाडली. पेशव्यांचे वडील रघुनाथरावदादा यांना पेशवाईच्या गादीवर बसविण्यासाठीं इंग्रजांनीं पूर्वी असेच प्रयत्न केले होते. परंतु त्यावेळीं मराठ्यांच्या एकजुटीच्या प्रयत्नांमुळें त्यांना प्रत्येक मोहिमेंत अपयश येत गेलें. आणि हजारों शिपाई आणि कोट्यावधि रुपये यांचा नाश सोसून त्यांना तो नाद शेवटीं सोडून द्यावा लागला होता. आतां मात्र अशाच प्रकारचा प्रयत्न करतांना इंग्रजांना कोणीहि अडथळा केला नाहीं इतकेंच नव्हे, तर ठिकठिकाणीं त्यांचें स्वागतच करण्यांत आलें ! इंग्रजांच्या या मसलतीला मराठी रियासतींतील प्रत्येक मनुष्य मनांतून विरोध करीत होता, परंतु प्रत्यक्ष दंड थोपटून लढावयास कोणीहि तयार झाला नाहीं. शिंदे, होळकर, भोसले यापैकीं प्रत्येकाला आपण एकट्याच्याच बळावर इंग्रजांशीं लढाई मारूं अशी धमक वाटत होती. या तिघांची मिळून लाख दीड लाख फौज लढाईच्या तयारीनें सज्ज होऊन राहिली होती. परंतु प्रत्यक्ष रणांगणावर पाऊल ठेवण्याचें एकाही सरदारानें धाडस केलें नाहीं ! मराठमंडळांत कलिसंचार झाला होता, त्यामुळेंच हा सर्व चमत्कार घडून आला. मराठ्यांमध्यें बुद्धीचा जिवंतपणा असता तर त्यांनीं स्वतःचें सामर्थ्य ओळखलें असतें आणि त्यांना शत्रूचीं मर्मस्थानेंहि सांपडलीं असतीं. परंतु बुद्धि कलिव्याप्त झाल्यामुळें प्रत्येकाला यावेळीं सर्व गोष्टी उलट सुलट दिसत होत्या ! व्यवहारांत एरवीं शहाणीसुर्ती कर्तृत्ववान् माणसें-परंतु त्यांच्यामध्यें कलिप्रवेशाच्या भुताचा संचार झाला म्हणजे त्यांची सर्व इस्टेट भांडतां भांडतां सावकाराच्या घरीं जात असते. असा नाश होतांना अल्पबुद्धपणा, अदूरदृष्टि, कज्जेदलाली, आप-

मतलबीपणा, मनाचा क्षुद्रपणा. नादानपणा वगैरे दुर्गणांचा या भांडखोरांच्या ठायीं प्रादुर्भाव झालेला दिसतो आणि उलटपक्षीं दुसऱ्याच्या इष्टेटी गिळंकृत करणारा सावकार मात्र समंजस, नेमस्त, उदार, प्रामाणिक आणि न्यायप्रिय दिसत असतो ! सामान्य व्यवहारांत दिसणाऱ्या या देखाव्याचे नमुने राजकारणांतहि वारंवार पहावयास सांपडतात. भांडखोर मराठे आणि इंग्रज सावकार यांची स्थिति यावेळीं तंतोतंत अशीच होती. मरणाऱ्याच्या वांटणीला सर्व दुर्गुण यावेत आणि मारणाऱ्याच्या वांटणीला मात्र सर्व सद्‌गुण दिसावेत असा हा कलीचा महिमा विपरीत आहे !

असो. पेशव्यांना पुण्यास नेऊन त्यांची पेशवेपदावर पुनः स्थापना करण्यांत इंग्रजांनीं कारस्थानीचा फार मोठा डाव जिंकला हें खरें. परंतु तेवढ्यानेंच त्यांचे सर्व हेतु पूर्ण होणार होते असें मात्र नाहीं. सर्व मराठे त्यांचा मनांतून द्वेष करीत आणि या द्वेषाचा केव्हां भडका उडेल याचें त्यांना भय वाटत असे. इंग्रजांचा कोठें नाश झाला तर त्या बातम्यांचा तिखटमीठ लावून चोहोंकडे प्रसार केला जात असे आणि सर्व लोक तीं वर्णनें वाचून संतोष मानीत असत. या गोष्टीचे नमुन्यादाखल कांहीं उतारे येथें देतों. (२५ फेब्रु.) " मुंबईस अग्न लागोन मांडवीचे बंदरावर आग लागली ती आग किल्ल्यांत देखील गेली. इंग्रजासारखे मुद्दाम लावून विझविणार, परंतु वारा तीन रोज बहुत सुटला त्यामुळें त्यांचा यत्न चालला नाहीं. किल्ल्यांतील इंग्रजांचा वाडा मात्र राहिला. बाकी झाडून जळाले. सात आठशें माणूस मेलें. गुरें बहुत मेलीं. तीन हजारपर्यंत मनुष्य आगीनें डिगाळलीं आहेत. पुण्यांतील दंग्यामुळें सावकार तेथें गेले ते सर्व हुत झाले ! नाश दहा कोटीवर तेथें जाला असें बोलतात."

(१ मार्च.) " मुमईच्या किल्ल्यांत माघ व. १० (१७ फेब्रु.) अग्न लागोन अडीच तीन हजार घर जळालें. चार पांच हजार मनुष्य जळून मेलें. दोन तीन हजार मनुष्य जायां झालें. खासा इंग्रजवाडा मात्र राहोन बाजत शहरांतील बागी उदमी वगैरे इंग्रजांचा नाश दहा पांच कोटींचा जाला."

(२४ मार्च.) " छ० २४ सवालीं (१७ फेब्रु.) मुंबईत पारसी

याच्या घरास आग लागली. वायु सुटला. इंग्रजांनीं आग विझवावी म्हणोन बंब लाविले. परंतु इलाज चालला नाहीं. इंग्रजांचा राहता वाडा मात्र राहिला. बाकी किल्ल्यांतील झाडून घरें फडशा! करोडो रुपयांचा माल जळाला गेला. हजार पांचशें माणूस जळालें. चार पांच हजार मनुष्य जायां जालें. खेरीज जनावरें. याप्रमाणें सावकाराचें लिहिलें आलें होतें. बातमी खरी. नाश बहुत जाला."

या बातम्यांत किती सत्यांश आहे हें समजण्यास आम्हाजवळ कोणतेंही साधन नाहीं. वस्तुतः इंग्रजांचें नुकसान झालें तर त्याचें सुखदुःख पटवर्धनांस वाटण्याचें कांहींच कारण नव्हतें. परंतु तूर्त इंग्रजांचा कोणीकडून नाश झाला तर ती गोष्ट प्रत्येकास इष्ट अशीच वाटत होती. त्यामुळेंच ही बातमी पटवर्धनांच्या कारकुनानें पुनःपुन. घोळवून मिरजेस आपल्या यजमानांस लिहून कळविली हें उघडच आहे. एका उताऱ्यांत 'इंग्रजासारखे मुद्दाम (आग) लावून विझविणार' अशी लेखकानें इंग्रजांची बहादुरी वर्णिली आहे. लेखकानें इंग्रजांची केलेली ही स्तुति बहुतांशीं निंदागर्भ आहे असा आम्हांस बळकट संशय येतो!

चोहोंकडे शांतता प्रस्थापित झाली तर मराठ्यांची ही द्वेषबुद्धि पुढें आपोआपच कमी होत जाईल असें इंग्रजांस वाटत होतें आणि त्या दृष्टीनें त्यांचे प्रयत्न चालू होते. शिंदे, होळकर व भोसले हे तिघेही यावेळीं इंग्रजांविरुद्ध लढाईच्या तयारीनें सज्ज होऊन राहिले होते. या तिघांना कांहीं तरी आमिष दाखवून त्यांना आपल्या पगारी मैत्रीच्या जाळ्यांत अडकवावें असे इंग्रजांचे प्रयत्न चालू होते. परंतु या त्यांच्या प्रयत्नाला विशषसें यश येण्याचा संभव दिसत नव्हता. उलट शिंदे होळकरांचा समेट घडवून आणून त्यांची इंग्रजांविरुद्ध उठावणी करण्याची खटपट शिंद्यांच्या दरबारांत अंबोजी इंगळे आणि नाग. भोसले हे करीत होते. हा समेट घडून येता तर ती गोष्ट इंग्रजांस जड गेली असती. परंतु त्यांच्या सुदैवानें या समेट प्रकरणांत देवळे आयत्या वेळीं आडवे पडले! त्यांचीं शिंद्यास सारखीं पत्रावर पत्रें जात होतीं कीं, 'तुम्ही होळकराशीं केव्हांही समेट करूं नये. त्याचें पारिपत्यच केलें पाहिजे. तुम्ही स्वतः पुण्यास येऊन

आधीं इंग्रजांना हांकून द्यावें आणि नंतर होळकरालाही समूळ बुडवावा! पेशव्यांना होळकराबद्दल पराकाष्ठेचा द्वेष वाटत होता आणि ती गोष्ट इंग्रजांच्या आयतीच पथ्यावर पडली आणि समेटाचें हें सर्व कारस्थान बिसकटून त्यांच्याबरचें हें संकट परभारेंच निवारण झालें. जुलैअखेर होळकर माळव्यांत परत गेला आणि इंग्रजांना फक्त शिंदे व भोसले यांशीं युद्ध करावें लागणार असा रंग दिसूं लागला. या भावी युद्धांसाठीं इंग्रजांनीं झपाट्यानें तयारी चालविली आणि पेशव्याच्या दाराशींही सैन्याची सिद्धता करण्याविषयीं त्यांचा तगादा बसला.

जून–जुलै १८०३

श्रीमंत पुण्यास येऊन पुनः गादीनशीन झाल्याबर त्यांनीं कोणते उद्योग सुरू केले होते आणि त्यांच्या राज्यकारभाराचें सामान्य धोरण काय होतें याविषयीं माहिती—

( २० जून ) " शहरचा कारभार बिठोजी नाईक करतात. सदाशिब माणकेश्वर श्रीमंतांची मर्जी पाहून थोडेंबहुत खलबत व कारभारही जुजवी पाहून करतात. रा. खंडेराव रास्ते श्रीमंतांच्या खासगीचा खर्चवेंच संभाळून प्रसंगानुरूप लोकांचें बोलणेंही बोलतात. रा. रामचंद्र गोसावी व व्यंकट नरसी पैठणास आहेत त्यांस हुजुरचें बोलावणें गेलें आहे. अलीकडे स्वारी पुण्यांत आल्यापासून दरबार वगैरे राजकारणी राज्याचा बंदोबस्त याचा बहुतसा विचार नाहीं. उदासीन वृत्तीनें दौलतप्रकरणीं अपशब्द बहुत बोलतात! × × हुजुर पागेपैकीं वीस पंचवीस खाशास बसायापुरतीं घोडीं आहेत. बाजत पागा तर बहुतकरून बरोबर जाल्या! "

(१ जुलै.) " बरकड श्रीमंत पुण्यांत 'नित्यश्रीर्नित्यमंगलं' या अन्वर्थे सुखरूप आहेत. कोणती काळजी नाहीं. बसईहून अग्निहोत्री आणिले त्यांजकडून चातुर्मास्यें करविलीं. आपण अध्वर्युत्व केलें. प्रायश्चित्त न पडतां अनुष्ठान सिद्धीस नेलें. वे. रामचंद्र दीक्षित ओक यांसही आणिलें होतें. त्यांणीं सांगितलें, आपण क्षत्रियधर्म करतां आपणास अध्वर्युत्व

---

१ व्यंकट नरसी ही पेशव्यांची आवडती गाणारी व नाचणारीण नायकीण व रामचंद्र गोसावी हा तिचा साजिंदा.

करणें योग्य नाहीं. आपण यज्ञ करवावे असें सांगितलें. भोजनसमयीं रांगोळ्या बाजंत्री याप्रमाणें नित्योत्साह आहे.”

हे सर्व रंगढंग संभाळून पेशव्यांना शिंद्यांविरुद्ध इंग्रजांना कुमक द्यावयाची होती. कोणतीही गोष्ट करावयाची तर त्या बाबतींत श्रीमंतांचें धोरण नेहमी दुटप्पी असे. स्वतःस कोणतीही तोशीस न पोंचतां परभारें आपले सर्व हेतु तडीला जावेत,—सर्वांच्या तोंडाला पानें पुसून आपला कावा मात्र सिद्धीस जावा असा एखादा खुबीदार मार्ग ते आपल्या मनानें शोधून काढीत आणि अशा या पोरकट प्रयत्नांत शेवटीं ते स्वतःच फसून खड्ड्यांत पडत असत! इंग्रजांच्या बाबतींतही श्रीमंतांनीं असेंच दुटप्पी धोरण स्वीकारलें होतें. एकीकडे तहाच्या कलमांस बाध न आणतां शिंद्यांना गुप्तपणानें साह्य करावयाचें--दुसरीकडे तहाच्या कलमांस अनुसरून इंग्रजांना साह्य केल्याचा देखावा दाखवावयाचा, परंतु त्याचवेळीं आपल्या मदतीचा इंग्रजांस कोणताही उपयोग न होईल अशीही व्यवस्था ठेवावयाची—शिंद्याचा जय झाला तर परभारें इंग्रजांचें उच्चाटण होतेंच आहे—दुर्दैवानें इंग्रजांचा जय झाला तर तहाचीं कलमें पाळल्यामुळें आपली घडीपगडी शाबूद राहील—शिंद्याचा जय झाला तर फायदा, आणि इंग्रजांचा जय झाला तर नुकसान नाहीं असा पेशव्यांनीं आपल्या धोरणाचा नकाशा ठरविला होता. या धोरणास अनुसरून वेलस्लीबरोबर पटवर्धन, रास्ते, विंचूरकर, वगैरे सरदार पुण्यास आले होते त्यांना फौजांची उभारणी करण्याविषयीं पेशव्यांचा कोरडा तगादा बसला. या सरदारांच्या काय अडचणी आहेत किंवा त्यांच्या काय गरजा आहेत याची पेशव्यांनीं वास्तपुस्तही केली नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्यांनीं त्यांची धड भेटसुद्धां घेतली नाहीं! अशा स्थितींत पेशव्यांचा हा तगादा बसतांच विंचूरकरांनीं रोखठोक जबाब दिला कीं,

**जून–जुलै १८०३**

‘आमचा गुजराथेंतील सरंजाम तुम्ही इंग्रजास दिला आहे आणि हिंदुस्थानांतील सरंजाम शिंद्यांनीं उपटला आहे. आमचा देशीं सरंजाम होता तो शिंदे होळकरांच्या तावडींत सांपडून लुटला गेला आहे. आम्ही फौज कोणत्या बळावर ठेवावी? सावकार आम्हांला कर्ज कोणत्या तारणावर

देणार ! आम्हाला निरोपाचें पान द्या. आम्ही पोट भरेल तिकडे निघून जातों !' पटवर्धनांनीं उत्तर दिलें कीं, ' कर्नाटकांतील आमचा कांहीं मुलुख पेशवे सरकारांत घेतला आहे. आणि बाकीचा बापू गोखल्यास देऊं केला आहे. पेशवे सरकारच्या चाकरीवर आम्हांस आगाऊच चाळीस लाख रुपये कर्ज झालें आहे. आतां आम्हांला नवीन कर्ज कोणकोणत्या बळा-वर देणार ? आधीं आमच्या तकरारींची दाद घ्या म्हणजे आम्ही फौजेची सिद्धता करूं. ' रास्त्यांनीं उत्तर दिलें कीं, ' पटवर्धन व आम्हीं भाऊ भाऊ. जी त्यांची स्थिति तीच आमची. पटवर्धन सिद्ध झाले म्हणजे आम्हीही त्यांच्या पाठोपाठ हजर आहों ! '

आपल्या सरदारांचीं हीं उत्तरें ऐकून पेशव्यांना राग न येतां उलट मोठें समाधान वाटलें. या सरदारांची मदत न मिळाल्यामुळें इंग्रजांचें पारडें तितकेंच हलकें होईल आणि त्यांचें पारिपत्य करण्याचें काम शिंद्यांना तेवढेंच सोपें जाईल असें त्यांस वाटत होतें. शिवाय असें समाधान वाट-ण्यांत दुसरा एक दुष्ट हेतू होता. तो असा कीं, पेशव्यांना या जुन्या सरदा-रांचा नाश करावयाचा होता. परंतु ती गोष्ट वसईच्या तहाप्रमाणें त्यांना आतां इंग्रजांच्या संमतीशिवाय करतां येण्यासारखी नव्हती. युद्धांत इंग्र-जांचा जय झाला तर हे सरदार आमचें कांहींच न ऐकतां आमची अमर्यादा करतात—आमच्या हुकमाप्रमाणें ते तुमच्या कुमकेस गेले नाहींत असें इंग्र-जांस भासवून त्यांचे सरंजाम जप्त करावेत असा श्रीमंतांच्या डोळ्यापुढें फार दूरचा डाव दिसत होता. हे दोन्ही हेतु मनांत बाळगून श्रीमंत आपल्या जुन्या सरदारांची समजूत करण्याच्या भानगडींत पडले नाहींत आणि त्यांनीं नवीन सरदारांची उभारणी करण्याचा क्रम सुरू ठेवला. त्यांच्या या उद्यो-गाची माहिती—

" आपा देसाई निपाणकर यांस श्रीमंतांनीं सरलष्करचा जरीपटका व साहिबनौबत देऊन वस्त्रें देऊन फलटण देश जानराव नाईक निंबाळकर यांजकडील दूर करून निपाणकर यांस सरंजामांत देऊन सनदा दिल्या. बापू गोखल्यास श्रीमंतांनीं कंठी शिरपेंच पोषाख देऊन श्री० राजश्री राम-चंद्रपंत आपाकडील दो महालांच्या सनदा गोखले यांस दिल्या आहेत.

रा० बापू चाफेकर यांस सरदारकीचीं वस्त्रें देऊन अनुबाई घोरपडी यांजकडील इचलकरंजी वगैरे सरंजाम आहे तो चाफेकर यास सरंजाम नेमून देऊन सनदा दिल्या आहेत. रा. अन्याबा रहातेकर यास वस्त्रें देऊन कुल फौजेचें कामकाज बक्षीगिरीचें सांगोन मालोजी घोरपडे यांजकडील इंडी, तांबें, आलमेलें, यांच्या सनदा रहातेकरास दिल्या. याप्रमाणें सरदारांची उभारणी करून फौजा ठेवून लौकरच वसलीसाहेबाकडे जाणार."

दक्षिणेंतील सर्व मराठे सरदारांत रामचंद्रपंत आपा पटवर्धन यांचा शिपाईगिरीविषयीं मोठा लौकिक होता. पटवर्धनांपैकीं रामचंद्रपंत आपा चिंतामणराव आपा आणि गणपतराव कोन्हेर हे तिघे वेलस्लीबरोबर पुण्यास आले होते. परशुरामभाऊमुळें श्रीमंतांचें सर्व पटवर्धनांशीं पराकाष्ठेचें वितुष्ट वाढलें होतें, त्यामुळें त्यांनीं पटवर्धनांची शेवटपर्यंत धड भेटसुद्धां घेतली नाही. पेशवे आणि पटवर्धन यांमध्यें समेट करून द्यावा या इच्छेनें वेलस्लीनें राम. आपांना जरीपटका व साहेबनौबत देऊन आम्हांबरोबर पाठवावें असा श्रीमंताजवळ नेट धरला. याप्रमाणें इंग्रजांनीं पटवर्धनांची बाजू उचलून धरलेली पाहतांच श्रीमंत थोडेसे नरम पडले आणि पटवर्धनांनीं दोन लाख रुपये नजराणा भरावा आणि राजनिष्ठेची शपथ घेऊन आमच्या भेटीस यावें म्हणजे त्यांस जरीपटका मिळेल असें त्यांनीं इंग्रजांस उत्तर दिलें. श्रीमंतांची नजराणा भरण्याची अट राम. आपांनीं साफ नाकबूल केली आणि शपथ घेण्याच्या बाबतींतही पटवर्धनांचें म्हणणें पडलें कीं, 'आम्ही पेशव्यांचे परंपरागत राजनिष्ठ सेवक आहों. आमच्या राजनिष्ठेबद्दल श्रीमंतास संशय वाटतो कीं काय? तसें असेल तर पोकळ शपथेनें त्यांचें समाधान कसें होणार? संशय वाटत नसेल तर ही शपथेची भानगड पाहिजे कशाला? आतांच राजनिष्ठेची शपथ घ्यायला आम्ही पूर्वी राजनिष्ठ नव्हतों कीं काय? असली ही अपमानकारक शपथ आम्ही साफ घेणार नाहीं.' पटवर्धन आणि पेशवे यांमध्यें या प्रकरणीं बोलणें चालणें करण्यांत बळवंतराव नागनाथ हा प्रमुख होता. महिनाभर या बाबतींत बरीच घासाघीस होऊन शेवटीं नजराण्याची अट पेशव्यांनीं सोडावी आणि शपथ न घेण्याची अट पटवर्धनांनीं सोडावी असा ठराव झाला. ता. २ जून

रोजीं पटवर्धन सरदार बळवंतराव नागनाथाच्या मध्यस्थीनें पेशव्यांच्या भेटीस गेले आणि तेथें राजनिष्ठेच्या शपथा घेऊन त्यांनीं श्रीमंतांस मुजरा केला. या भेटीनंतर पेशव्यांचें पटवर्धनांशीं गुप्त खलबत झालें त्यांत त्यांनीं राम. आपांस स्पष्ट सांगितलें कीं, ' तुम्ही राज्यांतील थोर सरदार, तुम्ही जरी-पटका घेऊन इंग्रजाबरोबर जावें अशी आमची अगदीं इच्छा नाहीं. आम्ही इंग्रजांशीं तह केला आहे तो पोकळ आहे. इंग्रजांच्या भिडेमुळें आम्ही तुम्हांस हुकूम करूं ते तुम्ही मानूं नयेत. शिंद्यांना आणून इंग्रजांचें पारि-पत्य करावें असा आमचा विचार आहे.' पेशव्यांच्या या उद्गारामुळें पटव-र्धन गोंधळांत पडले. जरीपटक्याचा स्वीकार करावा तर श्रीमंत व शिंदे यांचा राग होणार—न करावा तर इंग्रजांचा राग होणार असा दुहेरी पेंच त्यांजपुढें उभा राहिला. या पेंचातून सुटण्याकरितां राम. आपांनीं वेलस्ली-ला उत्तर दिलें कीं, आम्हांस न विचारतां तुम्ही जरीपटक्याबद्दल पेशव्यांकडे नेट कां धरलांत ? पेशव्यांचें आमचें बनत नाहीं. आमच्या तक्रारींची पशवेसरकारांत दाद लागली तर आम्ही जरीपटका घेऊन तुम्हाबरोबर येऊं. तसें न जुळेल तर आम्हांस जरीपटक्याचा पोकळ मान नको आणि आमचें तुम्हांबरोबर येणेंही होणार नाहीं.' असें उत्तर देऊन पटवर्धन सरदार संधि साधून पुण्याहून निसटले आणि मिरजेकडे परत आले.

जूनच्या तिसऱ्या तारखेस वेलस्ली पुण्याहून कूच करून नगराकडे निघाला. निघतेसमयीं श्रीमंतांनीं " वसली साहेब वगैरे लहान थोर इंग्रज असामी सोळा यांस हिराबागेंत मेजवानी देऊन वसलीस कंठी शिर-पेंच, बाजत ( इतर ) सरदार यांस सहा असामींस शिरपेंच, नंतर सर्वांस साडेतीन सनगें याप्रों निरोपाचीं दिलीं. " वेलस्ली पुण्याहून निघाला तो जूनअखेर नगराजवळ निंबगांव पानवडी येथें पोचला. इंग्रजांचा तळ पुण्याहून हालतांच आपा देसाई, बापू गोखले वगैरे पेशव्यांचे नवीन सर-दारही फौज जमवून वेलस्लीकडे जाण्याची तयारी करूं लागले. यासंबंधीं ज्यास्त तपशीलवार हकीगत पुढील प्रकरणीं सांगण्यांत येईल.

जून-जुलै हे दोन महिने होळकराचा मुक्काम खानदेशांत नंदुरबार सुल-तानपुरावर होता. त्या अवधींत शिंदे-होळकरांचा समेट करण्याविषयीं

अंबोजी इंगळे आणि नाग. भोंसले यांनीं शिकस्तीचे प्रयत्न केले आणि शिंद्यांनींही काळवेळ ओळखून होळकराशीं या प्रसंगीं बरेंच नमतें घेतलें. हिंदुस्थानांतील होळकरांचा सरंजाम त्यांनीं यशवंतरावास परत दिला आणि खंडेराव होळकरास बंधमुक्त करून भोसल्यांच्या हवालीं केलें. भोसल्यांनीं खंडेरावास मोठ्या सन्मानानें होळकराकडे पाठवून दिलें. होळकराच्या इतर मागण्याही शिंद्यांनीं यावेळीं बिनशर्त मान्य केल्या, त्यामुळें आतां हा समेट होणार असें सर्वांना वाटूं लागलें. त्यामुळें, शिंदे होळकरांचा समेट झाला किंवा होणार—उभयतांच्या भेटी अमक्या मुक्कामीं झाल्या किंवा होणार—शिंदे, होळकर, भोसले हे एक होऊन आतां इंग्रजांचा रेंच मोडणार—अशा अर्थाच्या भुमका महाराष्ट्रांत प्रत्यहीं उठत होत्या. परंतु इतका गाजावाजा होऊन शेवटीं या समेटप्रकरण चा बोजवाराच उडाला! शिंद्यांनीं होळकराच्या सर्व अटी मान्य केल्या खऱ्या; परंतु ती गोष्ट फार उशीरा घडून आल्यामुळें होळकरांस शिंद्याबद्दल कोणताही विश्वास वाटेनासा झाला. खरी गोष्ट अशी होती कीं, इंग्रजांचें पारिपत्य करण्यापुरतेंच शिंद्यांनीं हें समेटाचें तात्पुरतें नाटक चालविलें होतें. इंग्रजांचें प्रकरण आटपतांच होळकराचा नाश करावा आणि होळकरांचा सरंजाम पुनः हाताखालीं घालावा असाच त्याचा मनोदय होता. खुद्द पेशव्यांचाही याच अर्थाचा सल्ला त्यांस बारंवार मिळत होता. शिवाय शिंद्यांच्या दरबारांतील सर्जेराव घाटगे, बाळोजी कुंजर, यशवंतराव घोरपडे, फकीरजी गाढवे, यादवराव भास्कर वगैरे त्रिवर्ग यशीवंधु हे सर्व होळकराचे पक्के द्वेष्टे होते. शिंद्यांच्या दरबारांत अंबोजी इंगळ्याशिवाय होळकराचा मित्र असा कोणीच नव्हता. अशा स्थितींत शिंद्यांच्या दिखाऊ नम्रपणावर आणि प्रेमळपणावर होळकराचा विश्वास कसा बसावा? पेशवे व शिंदे हे आपले शत्रु आहेत—अजूनही त्यांच्या मनःस्थितींत कोणताही फरक पडला नाहीं—केवळ गरजेपुरते ते आपणाशीं सख्य जोडणार—आणि गरज सरली म्हणजे उरावर बसणार तसाच शेवटीं होळकरानें या समेटप्रकरणाचा निष्कर्ष काढला आणि त्यानें शिंद्यांच्या मायावी बोलण्याला तशींच अघळपघळ मायावी उत्तरें देऊन या प्रकरणांतून अंग काढून घेतलें.

झालें. होळकराच्या दक्षिणेवरील स्वारीचा ग्रंथ येथेंच समाप्त झाला. पुणें दरबाराची सुव्यवस्था आणि शिंद्याचें पारिपत्य हे दोन हेतु मनांत धरून त्यानें या स्वारीस प्रारंभ केला आणि दक्षिणेंत येऊन एकाच लढाईत त्यानें पेशवे व शिंदे यांच्या फौजांची दाणादाण करून सर्व राज्यकारभार आपल्या हातीं घेतला. परंतु त्याच्या पुढील मार्गांत इंग्रज आडवे पडले, त्यामुळें त्याचे सर्व श्रम व्यर्थ गेले. इंग्रजांच्या आगमनामुळें सर्व मराठी राजकारण उलटें सुलटें झालें आणि कोट्यावधि रुपये आणि हजारों शिपाई यांचा नाहक नाश सोसून त्यावर माळव्याकडे हात हालवीत परत जाण्याचा प्रसंग प्राप्त झाला. होळकरानें एवढा पराक्रम केला, परंतु दक्षिणेकडील किंवा उत्तरेकडील कोणीही मराठा सरदार त्याला सामील झाला नाहीं. त्याच्या सहकाऱ्यांपैकीं अमृतराव आणि दादा फडनवीस हे इंग्रजांच्या आश्रयास गेले—बाबा फडके शिंद्यांना मिळाले—फत्तेसिंग माने पेशव्याकडे आणि मीरखान पठाण इंग्रजाकडे फितूर झाले—आणि शेवटीं तळाशीं होळकर एकटाच शिल्लक राहिला! होळकरानें मर्दपणा करून एवढें प्रचंड कारस्थान उभारलें त्यांत शेवटीं अनास्था, फितूर आणि विश्वासघात एवढेंच बक्षिस त्याला मिळालें! याप्रमाणें चहूंकडून निराशा झाली—सर्वांनीं शेवटीं दगा दिला तरीही होळकराची हिंमत तिलमात्र खचली नव्हती. अजूनही शिंदे किंवा इंग्रज यांशीं टक्कर देण्याची त्याची तयारी होती. मात्र शिंदे आणि इंग्रज यांमध्यें होणाऱ्या भावी युद्धांत आपण तटस्थ राहावें असा त्याचा ठाम संकल्प ठरला होता. शिंदे व इंग्रज हे दोघेही आपल्याला शत्रुस्थानींच आहेत—त्यांपैकीं कोणाचाही जय झाला तरी त्याशीं आपणाला कांहींच कर्तव्य नाहीं—शिंद्याचा जय झाला तर आपला सरंजाम आणि आपला जीव यांच्या अस्तित्वासाठीं आपणास शिंद्याशीं लढावें लागणार—आणि इंग्रजांचा जय झाला तर मराठी राज्याच्या अब्रूसाठीं आपणाला इंग्रजाशीं लढावें लागणार असाच होळकरानें आपल्या पुढील धोरणाचा नकाशा ठरविला आणि तुळेअखेर दक्षिणेला कायमचा रामराम ठोकून तो खंडेरावाला बरोबर घेऊन माळव्यांत गेला आणि तिकडेच शिंदे व इंग्रज यांच्या लढायांचा तमाशा पहात आपल्या जागीं स्वस्थ बसला.

याप्रमाणें होळकर परत गेला तरी शिंदे व भोसले यांची इंग्रजाशीं लढाई मारण्याची हिंमत अजून कायमच होती. शिंद्याची पन्नास हजार फौज बऱ्हाणपुरास तळ देऊन राहिली होती आणि शिंद्यांचा नवीन लष्करभरतीचा उद्योगही नेटानें चालू होता. नाग. भोसल्यांनींही आपली सर्व फौज एकत्र केली आणि ता. ३ जून रोजीं शिंदे व भोसले यांच्या भेटी मलकापुरास झाल्या. उलटपक्षीं मेजर जनरल वलस्ली हा पुण्याहून निघून नगराजवळ आला आणि तेथें त्याला क० स्टीव्हन्सन् आणि सखो रुद्र हे आपापल्या फौजासह सामील झाले. पेशव्यांच्या हुकमावरून थोडी थोडी मराठी फौजही वेलस्लीला दररोज सामील होत होती. याशिवाय लखनौ, अलाहाबाद, कानपूर, मुंबई, सुरत वगैरे ठिकाणीं इंग्रजी फौजा शिंद्याविरुद्ध लढाईच्या तयारीनें सज्ज होऊन राहिल्या. स. १८०३ जुलै अखेरपर्यंत शिंदे व इंग्रज यांचीं कोणतीं कारस्थानें चालू होतीं आणि त्यांच्या लष्करी हालचाली कशा होत गेल्या यांची हकीगत आतांपर्यंत या ठिकाणीं नमूद करण्यांत आली आहे. यासंबंधाचा पुढील वृत्तांत पुढील ' इंग्रजांचें शिंदे भोसल्याशीं युद्ध ' या प्रकरणीं सांगण्यांत यावयाचा आहे.

---

नं. ६५४०. श्री. ( पौष – जाने. )

विज्ञापना इकडील मजकूर—

सातारियास मोर्चे लागले. गोळागोळी चालली म्हणोन बातमी. कलम.

राजश्री लिंबकराव पेठे वस्त्रें घेऊन आले ते हिराबागेंत येऊन राहिले. त्रयोदशीचा बेत दिसत नाहीं. कलम.

मातबर गृहस्तांच्या घरीं चौक्या बसल्या. कर्ज मागतात. सदाशीवभट दिवाणजीपासून दहा हजार रुपये घेतले. पुरषोत्तम मुरलीपासून पंधरा हजार रुपये घेतले. बापू चिपळोणकर याजपासून दहा हजार याप्रमाणें चाललें आहे. कलम.

श्रीमंत सौ॥ मातुश्री उभयतां बाईसाहेब सुवर्णदुर्गाहून निघोन कटवणच्या अलछत्रास आल्याची बातमी आली. कलम.

शहरचा कारभार हरीपंत भावे यांजकडे पेशजी होता तो मधें त्याजकडून दूर जाहला होता. हालीं त्याचा त्याजकडे सरकारांतून सांगितला. छ. ७ रमजानीं सनदा जाल्या. ते समयीं नाकेबंदी जाली. कालपासून पट्टीचा उपद्रव चालला आहे. कलम.

बापू गपचूप यास रस्त्यांत भावे यांणीं उभा केला आहे. पन्नास हजार रुपये मागतात. कलम.

गोसावी सावकार रातबिरात संघ पाहून शेंदोनशें निघोन गेले. कलम.

छ. ५ रमजानपासून छ. ७ रमजान पावेतों धरणें पैक्याचें बिकट होतें. खासा होळकर येऊन बसले होते. दररोज पन्नास हजार द्यावे याप्रमाणें ठरलें आहे. कालपासून धरणें बंद आहे. कलम.

बाजार झाडून बंद आहे. दोनः दिवस दुकानें उघडोन व्यवहार चालवावा म्हणोन ताकीद केली परंतु दुकानें उघडत नाहींत. कलम.

वासुदेव जोशी बहिरव जोशी याचे पुत्र यास काल उन्हांत उभें केलें होतें. पंचवीस हजार रुपये मागतात. काय ठरतें पहावें. कलम.

नऊ कलमांवरून विदित होईल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५४१ श्री. (पौष शु० ८–१ जाने.)

छ. ९ रमजान. पौष मास. सन सल्लास मयातैन.

सेवेसी[१] विनंति. सेवक बाळाजी महादेव दामले चरणांवर मस्तक ठेवून शिरसा. नमस्कार विज्ञापना. ता. छ. ६ रमजानपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. रा. विठल बावाजी जोशी याजकडे किले सातारा येथील कारभार सांगोन मा। निल्हेस सरकारांतून पाठविले आहेत. सातान्यास येऊन पोहोंचले. सनदा किल्लेदार यांस लाविल्या. परंतु रा. बाळाजी माणकेश्वर मानीत नाहीं. याजमुळें किल्ला घेऊन देणेविशीं रा. फत्तेसिंगराव माने यांस पुण्याहून पत्रें आलीं. त्याजबरोन बसि तोफा व येक कंपू सातान्यास जाऊन करंज्याजवळ मु॥ केला आहे. मोर्चेबंदी होत आहे. रा. चतरसिंगराजे हजार फौजेनिशीं कंपूजवळ आहेत. माने याचा काल मुक्काम

१ पत्र रहिमतपुराहून मिरजेस.

रहिमतपुरास आला. आणखी आठ रोज मुक्काम येथेंच आहे. रा. नारोबा काका शिराळेकर याचा पन्नास हजार ठराव जाहाला. कराडकर याची चार लक्ष खंडणी जाहाली. अद्याप रुपया येत नाहीं. याजमुळें फौज तोफा कराडास नाकेबंदी करून बसले आहेत. या प्रांतीं मुलकाची बाकी राहिली नाहीं. रा. नरहरपंत[१] येथेंच राहिले आहेत. लष्करांत माने यांजकडे जातात. अद्याप बोलण्याचा भाव माने यांजकडून निघाला नाहीं. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६५४२          श्री.          (पौष शु. ९–२ जाने.)

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री रामचंद्र परशराम स्वामी गोसावी यांसी.

पोष्य अमृतराव रघुनाथ नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. किल्ले सातारा येथें बयदा जाहाला आहे. त्यास तेथील बंदोबस्त जाला पाहिजे. याजकरितां तुम्हीं व राजश्री माधवराव अनंत फौजसुद्धां एकत्र होऊन करवीरकरांचा सिलसिला सातारियाकडे न लागे असा बंदोबस्त राखणें. येविशीं मशारानिल्हेस (रास्ते यांस) अलाहिदा पत्र लिहिलें असे. जाणीजे. छ. ७ रमजान सु॥ सल्लास मय्यातैन व अल्लफ. बहुत काय लिहिणें. हे विनंती.

---

नं. ६५४३          श्री.          (पौष शु. १०–३ जाने.)

पै॥ छ० ८ रमजान. इंदुवासर.

विज्ञापना. इकडील मजकूर बितपशील.

छ० २१[२] साबानीं मंदवारीं मध्यान रात्रीस आदितवारचे दिवाळ्यास सोमेश्वराचे देवळाजवळ स्वार व गाडदी उंटें मशालासुद्धां येऊन पांच घरें मारवाडी यांचीं लुटून नेलीं. कापड फार गेलें. वर्कड वस्त भाव गल्ला वगैरे. कलम १.

---

१ नरहर विठ्ठल हा पटवर्धनांनीं मान्याकडे पाठविलेला वकील.
२ पेशवे. पत्र पुण्याहून निघालेलें.

बैजनाथ भट मामा यांस जामीन घेऊन त्याचेच घरीं ठेविलें. सवा-लाख खंड ठरला. त्याचे हप्ते बांधून दिले आहेत. ऐवज पोंचे तों चौकी आहे. जाग्यावरून उठत नाहींत अशी अवस्था जाली आहे. मी दोन वेळां गेलों होतों. घरीं येऊन चार दिवस जाहले. कलम १.

छ० ३० सावान रविवारीं दिवसास स्वार गाडदी येऊन आदितवारांत कलावंतिणीचें एक घर चीजवस्तसुद्धां नेलें. रात्रीस सुभानशाचे बंगल्याजवळ मिरा बोहरी याचें घर लुटून दहा हजार रुपयेचा विषय गेला. झाडून शहरांतील दुकानें लागलीं अशी धुंदाई चालली आहे! कलम १.

शहरांत पट्टीचें प्रकर्ण चाललें. मातबर वाड्यांस आंख अद्यापवत् पडला नाहीं. मध्यमापासोन कनिष्ठ पावेतों उत्तम पांचशें, कनिष्ठ पन्नास याचे आंत शक्त पाहून असें ठरत आहे. पट्टी करण्यांत मुखत्यार परशरामपंत वैद्य व सदाशिव भट दिवाणजी व आपाजीपंत आठवले व हरिपंत भावे व गणेशपंत मळगे येणेप्रमाणें पाच असामी मिळोन करणें तें करावें. छ ३० सावानीं वैद्यास अस्तमानपावेतों ऐवजाविशीं पठाणांचें धरणें उभें केलें होतें. पट्टीचा परिणाम कसा लागतो तो वरचेवर लिहीन. कलम १.

चिंतोपंत यास जामिन घेऊन त्याचे घरीं ठेविलें. त्याचा खंड दीड लाख रुपये ठरला. कलम १.

छ. १ रमजानीं इंदुवारीं होळकराकडून नागो जिवाजी व हरनाथ व पठाण धरण्यास आले होते. अस्तमानपावेतों होते. नंतर निघोन गेले. कलम १.

पट्टीचा उपद्रव गांवांत बहुत जाहला आहे. ठोसर याजकडे सदाशिव देउ. त्याची शोभा जाहली! कालपासून चुकावून आहेत. या अन्वयें चाललें आहे. कलम १.

छ. ३ रमजानीं नागोजी व गणपतराव दिवाण व हरनाथ व मीरखान व शामतखान व दोनशें पठाण प्रातःकाळचे प्रहर दिवसापासून बारा घटका रात्र पावेतों डेऱ्यांत (पेशव्यांचे) बसले होते. कालचें धरणें मजबूत. बिचोब्याजवळ[१] खालील पठाण बसले होते. श्रीमंत प्रातःकाळीं जेवले

१ बिचोबा = लहान राहुटी. सरकार बसावयाची जागा.

होते. दादा बाबा यांस उपोषण पडलें. सावकार + + वगैरे गुप्त जाले. कांहीं बोलणें होऊन उठोन गेले. सायंकाळचे सहा घटका दिवसास होळकरही खासा आले होते. अकरा घटका रात्रीस गेले. कलम १

आबा काळे मुक्त होऊन शहरांत फिरतात. कलम १.

जिवाजीपंत नेने यास पैका वीस हजार मागतात. त्यास मिळत नाहींत. पांच पावेतों कदाचित् देईल. नित्य मारतात. पठाणांची गांठ. तो ब्राह्मण जगतां दिसत नाहीं. कलम १.

अकरा कलमांवरून कळेल, श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५४४ श्री. (नक्कल) (पौष शु. १०-३ जाने.)

छ० ८ रमजान इंदुवासर.

विज्ञापना. शिंदे उज्जनीहून कूच करून नर्मदेपासून बारा कोसांवर आले. सरंजाम फौज दहा हजार व एक कंपू जवळ आहे. इंगळ्यास पत्रें गेलींच आहेत. इंगळे येऊन मिळाल्याची बाजार अफवा आहे. सरकारची बातमी नाहीं. कलमजारी आहे. पिरूस येण्याविशीं पत्रें बरचेवर जात आहेत. पोक्त सरंजाम जमल्यानंतर नर्मदा दक्षिणतीरास बराणपूरच्या रोखें येणार. दरम्यान भोसले आहेत त्यांजकडे बोलणें शिंद्याचें लागलें आहे. दहा लक्षांचा मुलूख बीस लक्ष रुपये रोख तुम्हांस देतों. तुम्ही आम्ही एक व्हावें. भोसल्याचे कारभारी येथें आहेत त्यांस श्रीमंताचा निरोप घेऊन तुम्ही यावें म्हणोन भोसले यांची पत्रें आलीं. हा मजकूर कारभारी यांचे मुखें समजल्यानंतर होळकर व श्रीमंत राजश्री रावसाहेब उभयतांनीं कारभारी याजबळ बोलिले जे, शिंदे बोलतात त्या अन्वयें आम्हीच देतों. शिवाय जाजती पांच लाख रुपये देतों. तुम्ही जाऊं नये. पत्रें लिहून पाठवावीं आणि शिंदे याजकडील शिलशिला तोडावा. या अन्वयें बोलणीं चाललीं आहेत. ठरेल ते मागाहून लिहीन. उभयतां श्रीमंत बसईसच आहेत. तेथून शिंदे याचे खर्चाची सर्फराजी होत आहे. होळकराकडील बोलणें उभयतांकडे चाललेंच आहे. टोपीकराचे घरीं श्रीमंतांनीं जाऊं नये या अन्वयें याचें बोलणें लावून तूर्त बसईस राहाविले

आहेत. तिकडूनही बोलणार येऊन बोलून जातात. मी होळकराजवळ बोलिलों, तुमचीं राजकारणें दोहींकडे सारखीं चाललीं यांत परिणाम कसा लागेल? त्यांणीं उत्तर केलें जे, आपले हातीं राजकारणानें तरी लागावें हाच नाद आहे. ते म्हणतील तें कबूल करतों. हस्तगत जाहले असतां याच्या पोटांत मनोदयानुरूप दौलतीचा बंदोबस्त होईल अशीं बोलणीं स्पष्टतेचीं बोलतात. कोण्या रंगास जाईल पहावें. येथें तूर्तकालीं दिनचर्येची हवा निराळी निराळी दृष्टीस पडते अद्यापि खातरजमा होत नाहीं. होळकर जबरदस्त. करतील तें खरें. बराणपुरी रा॥ गोपाळराव चिटणीस जमाव करीत आहेत. * शिकस्त जाहाली फौज नगरापासून गंगातीरपर्यंत फिरत आहे. त्या तोंडावर मीरखान, शामतखान व कंपू एक व नागो जिवाजी यांची रवानगी होत आहे. दोनचार रोजांत चालते होतील असें वाटतें. चोहींकडे हवा एकसारखी चालली आहे. नाशकास शिंदे याजकडील पेंढार येऊन पोहोंचले. मुलूख मारतात. याप्रमाणें बातमी आली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५४५ श्री. ( ३ जानेवारी. )

पै॥ छ० १८ रमजान सुरूसन सलास.

सेवेशी धोंडो बापूजी जोशी. त्रिकाल चरणावर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता॥ पौष शु० १० सोमवार सायंकाळपावेतों बालकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. रा॥ बाबा फडके नबाबाकडे जाण्यास मुहूर्तेंकरून डेन्यास रावसाहेबांचा निरोप घेऊन निघाले. त्यास काल कूच करून संगमानजीक अर्ध कोसावर मुक्काम केला. जरलगी व अंबारी व तीन हजार फौज व दोन हजार पायदळ असा सरंजाम, शिवाय होळकर याचा जमाव दोन हजारपर्यंत आहे. गांवांत पट्टीचा तगादा प्रळय जाहला आहे! होळकर यांणीं नाकेबंदी केली आहे. दुकानें हर कोणाचीं व घरें बहुतेक उघडीं नाहींत. त्रिंबकजीपंत नेने व रामराव पुरंधरे यांजकडील कारकून व दमल शिपी तिवेजग तस्ती अनेक प्रकारची

---

* शिकस्त होणें = पराभव पावणें. पत्र बाळाजी विष्णूचें मिरजेस.

करून मृत्य पावले. आज चार रोज होळकर खासा पट्टीस्तव गांवास फडके याचे कारभार वाड्यांत होतो तेथें येत असतात. घर्को घरपट्टी व उदीमपट्टी चालली आहे. कालपासून बुधवार शनवारांत मोठा दंगा आहे. कारभारी लपत फिरतात. जो सांपडेल तो नेतात, पठाणाचे हवाली करितात, हाल करितात ते पत्रीं काय लिहूं ! [2]× × × लोक इरतऱ्हेनें बातमी बंदी असतां सड राव [1]गीरात करून जीव मात्र घेऊन जातात. याजप्रमाणें प्रकार आहे. वसईस श्रीमंतांनीं इंग्रज याजला आठ आणे देऊं करून चाकरीस आणिलें. त्याजला मुलुख गुजराथ, सुरत अठ्ठाविसी शाहून व श्रीकृष्णातीर दो प्रांत देण्याचा करार करून चार पलटणें आणलीं. आणखी येणार हें वर्तमान बोलतात. आंबोजी इंगळे शिंद्यांकडील जमावानिशीं उज्जनीस येऊन पुढें इकडे एक मजल आले. बोलण्यास तहाचें येत आहेत. होळकर याचा मूल समागमें घेऊन येणार अशी बोलवा आहे. मीरखान याजला दोन लाख रुपये देऊन रवानगी करणार. ते पंढरपूर व करकंब मंगळवेढे या प्रांतीं येणार अशी बोलवा आहे. वेदशास्त्र रा॥ वासुदेवशास्त्री याचा ठराव साडेबारा हजार रुपयेवर झाल्याचें पेशजीं लिहिलें आहे. सौ॥ मातुश्री उभयतां महाडास आणिल्या. मढा व सेवता घाट व वरघातीरें घाटांस रायगड प्रतापगडकरीं यांणीं शिलसिला केला. घांटांतून निभावणी न होय सबब खालींच आहेत. बीरवाडी गांव रायगडकर यांणीं जाळिलें. याजवरून होळकर यांजकडील पांच पलटणें खालीं गेलीं. घाटांतून चवक्या बसवीत जात आहेत. घांटमाथ्यावर गेले असें बोलतात. ते खालीं गेल्यावर मातुश्रीस घेऊन येणार. मातुश्री येशवदाबाई रायगडावर आहेत. तेथें कोणी वेळेस काय होईल न कळे. शहर मरूं घातलें आहे ! वाड्यावर आख पडल्यास मग जीव बचावण्यास कठीण आहेत. वडिलांचे पुण्येंकरून पार पडेल तें खरें. श्रीहरि पार करवील. बहुत काय लिहिणे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

रा॥ दाजीबा परचुरे व बाळकृष्णपंत भाऊ दीक्षित व बापू जोशी पुणेंकर दाजीस सां॥ नमस्कार. सदैव पत्रीं परामर्ष करीत जावें. लक्ष्मण

---

१ वेषांतर. २ येथें पत्र फाटलें आहे. ३ उपनाम चिपळोणकर.

गडी याजबरोबर पत्रें पाठविलीं आहेत. भाऊ, तुमचे घरचीं सुखरूप आहेत. बापू, तुमची वहीण भेटली. बंधु पंधरा दिवस भेटले नाहींत. कळावें, पत्रें घेऊन पाठवितों तरी बंदी आहे. कळावें हे विनंती.

---

नं. ६५४६. श्री. ( पौष शु. १५ – ७ जाने. )

पौ॥ छ. १४ रमजान सन सलास मय्या तैन पौष.

सेवेसी विनंती सेवक बाळाजी महादेव दामले चरणांवर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ. १२ रमजानपर्यंत वर्तमान यथास्थित असे विशेष. रा॥ फत्तेसिंगराव माने यांचा मुक्काम कसबें रहिमतपुरास छ. ५ रमजानीं फौजसुद्धां तोफखाना चौवडासुद्धां आला. तो आजपर्यंत मुक्कामच आहे. काल स्वारी श्रीदेव मार्तंड मौजे पाल येथें दर्शनास गेली आहे. उदईक माघारे येणार. कराडचे खंडणीचे वसुलास दोन हजार फौज दहा तोफा गेल्या आहेत. किल्ले सातारयास मोर्चेबंदी जाली आहे. श्रीमंतांच्या वाड्याजवळ तोफा लावल्या आहेत. दोन तीन रोज खालील वरील मारगिरी चालत आहे. श्रीमंत रा॥ अमृतराव साहेब यांणीं मसलतीबद्दल होळकर यांस ऐवज देऊं केला आहे. त्याची निकड लागल्यामुळें पुण्यांत नाकेबंदी करून पट्टी लाविली आहे. रा॥ दौलतराव शिंदे सरंजामसुद्धां इंदुरावर मुक्काम आल्याचें वर्तमान आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६५४७. श्री. (नकल.) (पौष शु॥ १५ – ७ जाने.)

पौ॥ छ. १६ रमजान सलास मय्यातैन.

सेवेशीं बाळाजी विष्णु कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ. १२ रमजान भृगुवार प्रातःकाळपावेतों वर्तमान यथास्थित असे विशेष. रा॥ माने याजकडील होळकरास पत्र आलें म्हणोन त्रिवर्गांनीं सांगितलें. त्यांतील भाव मान्याची आणि तुमची कांहीं कटकट जाली कीं काय म्हणोन विचारिलें. मी उत्तर केलें मान्याची आमची कटकट व्हावयाचें कारण

१ सहस्रबुद्धे. हा पटवर्धनांचा पुण्याचा वकील.

कोणतें हें समजलें नाहीं, आणि कटकटही जाहली नाहीं. तेव्हां रा॥ बाबा फडके बोललें जे, तुम्हाकडून जाली नसल्याबर त्याच्या मनांत तुम्हाबरो-बर कटकट करावी असा त्यांचा रंग दिसतो. तुम्ही सूचना करावी म्हणोन सांगितलें. तुम्ही सांगतां त्यापेक्षां सूचना करितों. येथें पैक्याची होळकरांकडील निकड. नित्य धरणीं. तेव्हां यास जसा दिवस ढकलेल तसा दिवस ढकलितात. पापपुण्याची जात राहिली नाहीं. यांचे इशा-र्‍यानें किंवा बुद्धिपुरस्सर होळकर यांणीं मनसबा ठरवून कर्नाटकच्या माहला-बर बराता मागितल्या त्याजवरून सरकारांतून पंधरा लाख रुपयेच्या बराता दिल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १०००००० | तालुके सावनूर. | ३००००० | तालुके गदग. |
| १५०००० | नवलगुंद. | ५०००० | देशगत डंबळ. |
| ११५०००० | | ३५०००० | |

१५०००००

येणेंप्रमाणें चार बराता. काल सायंकाळच्या दोन घटका दिवसास होळकर डेर्‍यास आले होते. बाबा फडके व होळकर बोलत बसले. मी जवळ होतों तेथून जवळ बोलावून घेतलें. माझ्या समक्ष फडके यांणीं बराता होळकराच्या हवालीं केल्या. नंतर मी उठोन श्री॥ रा॥ रावसाहेब व मोरोबा दादा बिचोब्यांत बसले होते तेथें गेलों. विनंति केली, मान्याचा मजकूर काल मजजवळ आपण बोलला आणि बराता लिहून दिल्या ऐशास आम्हाकडे सावनूर तालुक्यापैकीं अडीच लक्षांचे महाल व आपणाकडे आणीगिरें, उरगोळ मिळोन सव्वा लक्ष रुपयांचा तालुका आपणाकडे असतां मोघम बरात सावनूर तालुक्याबर मला न पुसतां आपण दिल्ही तेव्हां मान्याची व आमची कटकट वाढवावी हा मानस दिसतो. याजबर बहुत बोलणीं जाहलीं. आपला लोभ आमच्याठायीं किती आहे हें समजलें. होळकराकडून आमचें पारपत्य करवावें हाच मानस दिसतो. तेव्हां उत्तर जालें जे, आमच्या प्राणावर आली तेव्हां होळकर म्हणतात तें

कबूल करणें प्राप्त. मी विनंती केली, सकाळ होळकरांनीं आमच्या तालुक्यावर बराता मागितल्यास आपण देतील. तेव्हां आपला आप्तपणा यांत काय समजावें ? अज्ञो. आजपर्यंत आज्ञेप्रमाणें सरदार समारंभास येतील असें म्हणत गेलों तो अर्थ राहिला. या अन्वयें स्पष्टच विनंती केली त्याजवर उत्तर जालें नाहीं. सारांश पाहतां येथें कोणताही अर्थ खंबीरपणाचा नाहीं. कोणाचा हुकूम कोणी मानीत नाहीं. फडके यांणीं तर तूर्त निकाल काढून हैदराबादेस जाण्याकरितां डेरेदाखल जाले. रविवारीं चालते होणार असें म्हणतात. चालते जालेवर मागाहून लिहोन. गोखल्याकडील रा॥ बाबूराव दादाजी येथें आले आहेत त्यांणीं हजार बाराशें रुपयांचीं सनगें होळकराकडे खर्च करून भेट घेतली. आपलेकडील गिल्ले समजावितो, गोखलेची तारीफ करितो असे प्रकार चालले आहेत. होळकरास बराता दिल्या. त्यापेक्षां तिकडे जाण्यास सनदी कारभार जाला. मार्गीं जातां आमचे तालुके सहजच लुटले जातील. तेव्हां कटकटीस मूळ जालें ! श्री॥ रा॥ चिंतामणराव याजवर मान्याचा रोष आहे असेंही येथील कारभारी यांच्या बोलण्यांत आलें. मी बिनंति केली, मी येथें असतां मजला न कळवितां होळकरास बराता देऊन खटल्यास प्रारंभ करविला. त्याचे हातीं बराता देतां आणि मान्यांचें तुमचें वाकडें आहे हें सांगतां. सूचना करावी म्हणून बोलतां. तेव्हां माझें येथें रहावयाचें प्रयोजन तें काय ? निरोप द्यावा.×

---

नं. ६५४८ श्री. ( ७ जानेवारी. )

पै॥ छ० १७ रमजान सुरु सन सलास मयातेन व अल्फ.

सेवेशीं घोंडो बापूजी जोशी त्रिकाल चरणांवर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता॥ पौष शु॥ १५ पावेतों बालकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील मजकूर पुण्यातील कारभार रा॥ बाळाजी कृष्ण नातू यांजकडे भाव याचे मार्फतीनें होता. परंतु त्याच्यानें नीट बहिवाट न होय. सबब रावसाहेबांनीं भावे यांजला मुभा पुण्यांतील सांगून पाठविल. चार रोज जाहले. रा॥ परशरामपंत भाऊ व आपाजीपंत आठवले व

---

× पत्र अपुरें सांपडलें.

गणेशपंत खासगीवाले व सदाशिवभट दिवाणजी यांजकडे पट्टीचा व्यवहार होता त्यांणीं पट्टीचा आंख घालून कांहीं पैका घेतला. परंतु कोणी चुगली केली कीं, आंख ठीक पडत नाहीं. त्याजवरून व होळकर यांचें धरणें नित्यानीं बसों लागलें याजवरून मग रा॥ हरिपंत भावे यांजला सांगोन फिरविल्या. नव्या पट्या लिहिविल्या. पावती जाहली ते वजा घालून बाकी पन्नासापासून हजारपर्यंत मागतात. अशी पट्टी चालविली आहे. याशिवाय गृहस्थ व सावकार वगैरे मातबर यांजपाशीं पैका निराळा दोन हजारपासून वीस हजार पर्यंत घेतात. नाकेबंदी जाहली आहे. चिठीशिवाय जाऊं देत नाहीं. रा॥ जयराम बाबाजी जोशी, चिंतोपंत कुंटे यांचे शालक तेही भावे याजकडे बसों लागले. कारभार करूं लागले. खासगीवाले व त्यांचे कारभारी लपोन आहेत. दोन रोज आपले वाड्यांत होते. आजच दुसरीकडे गेले. बायका येऊन जाऊन आहेत. पैका घेतला असामीः—

रा॥ सदाशिवभट दिवाणजी यांजपासून दहा हजार घेतले. पंधरा मागतात. चौकी आहे. कलम १.

बापू चिपळोणकर याजपासून दहा घेतले. पंधरा मागतात. कलम १.

पुरुषोत्तम मुरली याजपासून दहा घेतले. कलम १.

बापू गपचूप फडचा त्याला पंचवीस मागतात तो पैसा देत नाहीं, सबब पठाणांचे हवालीं केला. कलम १.

माधवराव महागे (?) व बापू परचुरे रावसाहेबाकडे होते ते त्यांणीं बसविले. दर असामीस वीस वीस हजार मागतात. कलम.

वेदशास्त्र रा॥ वासुदेवशास्त्री चिपळोणकर, मातुश्री साकू हिंच्याचे पुतणे याजला पंचवीस मागत होते परंतु हल्लीं ते पंधरा मागतात. हे पांचपर्यंत देणार. ठरलें नाहीं. चौकी आहे. रोज पडतो. भावेकडे त्यांची माझी गांठ पडली. मी आपल्या जाग्यास्तव गेलों. उत्तर जाहलें नाहीं. आलों तेव्हां भेटले. कलम. १.

बाजार बंद होता. जो दुकान न उघडी त्याचें दुकान भरून नेऊं, पारिपत्य करूं, तुमचीं दुकानें नव्हत, ज्याचें घर तो देईल अशी दवंडी

पिटली. नंतर काल दुकानें उघडलीं. परंतु इतर पट्टी जाहल्यावर दुकान यांजवर पट्टी होणार. कलम १.

होळकर यांची निकड भारी. दहा लाखपर्यंत रुपये तूर्त द्यावे म्हणजे दोन पठाण व दोन कंपू खानदेशांत रवाना करणार. कलम १.

सातार पेठेंत मान्यानीं पट्टी लाविली. किल्लयावर मारगिरी होणार. कलम. १.

रा। बाबा फडके नबाबाकडे बोलण्यास जाणार. बोलवा आहे. कलम १

आपले वाडे जागा व श्री। रा। आपासाहेबाचे व कुरुंदवाडकर यांचे मिळोन याद केली आहे. रा। बाळाजी विष्णु यांणीं बोलणें फडके याजपाशीं घातलें आहे. आजपर्यंत तगादा नाहीं काय ठरतें हाही निश्चय सहस्त्रबुद्धे यांचे बोलण्यांत आहे. कलम. १.

बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५४१ श्रीगणपति. [ पौष व० १-८ जाने. ]

पौ। छ० १३ रमजान सल्लास मय्यातैन व अल्लफ. पौष.

[१]श्रवर्ते रामचंद्रानें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ० १३ रमजानपर्यंत यथास्थित असे. विशेष. वडीलीं पत्र पाठविलें तें पावलें परभारें माने निसबत होळकर यांजकडोन करवीर [२]प्रकर्णीं खटपट करण्याविशीं लिहिलें. त्यास माने यासी बोलणें चाललेंच आहे. त्याचें म्हणणें कीं, आपणास दारूगोळा द्यावा. त्यास दारूगोळा समयास मिळावयाचा नाहीं व श्रमसायासें जो मिळेल तो मेळविला असतां त्याचे पसंतीस न पडतां हा आमचे उपयोगी नाहीं असें तो म्हणणार. याजकरितां नकीचेंच बोलणें लाविलें आहे. ईश्वरइच्छेनरूप घडोन येईल तें खरें. परभारें खटपट करण्याचा प्रकार तरी मी अगर चिरंजीव बाबा तेथें येतों. आज्ञेप्रमाणें करीन. पुण्याहुन पत्रें आलीं तीं सेवेसीं पाहावयाकरितां पाठविलीं

---

१ राम. आपांचें पत्र जमखिंडीहून मिरजेस. २ फत्तेसिंग मान्याकडून करवीरकराचें पारिपत्य करविण्याचा यावेळीं पटवर्धनांचा उद्योग चालू होता.

आहेत. पाहून पाठवावीं. हरिपुरास चिरंजीवाकडे पाठवावीं. बोलणार आले होते ते गेले असें लिहिलें. त्यास काय बोलून गेले तें समजण्यांत आलें नाहीं. याकरितां ल्याहावयास आज्ञा जाली पाहिजे. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६५५० श्री. (पौष व. ३--११ जाने.)

छ. १६ रमजान पौष मास सन सलास मयातैन.

सेवेशीं साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसी जे, येथील वर्तमान तर शु॥ ५ बुधवारीं खासा होळकर पठाणसुद्धां येऊन श्रीमंत रा॥ रावसाहेब याजपाशीं धरणें देऊन मध्यरात्रपर्यंत बसून तीन लाख रुपये द्यावे ऐसें ठरावून गेले. नंतर गुरुवारीं दोनप्रहरां पठाणसुद्धां येऊन रावसाहेब व दादा व बाबा यांस घेऊन चांदणींत पठाणसुद्धां बसले होते. रा॥ चिंतोपंत देशमुख याजकडून ऐवज पटला नाहीं म्हणोन चिंतोपंतास रुबरू पठाणांनीं ओढून नेलें. त्यास समस्त मंडळीसुद्धां चांदणींत अहोरात्र बसले. नंतर प्रातःकाळीं शुक्रवारीं होळकर निघून आपल्या डेऱ्यास गेले. पठाण व नागो जिवाजी धरणें बसलेच होते. त्यास रावसाहेब व दादा व बाबा त्रिवर्ग शुक्रवारीं दहा घटका दिवस आल्यानंतर होळकराचे डेऱ्यास जाऊन ठराविलें जे, तीन लाख रुपये तूर्त द्यावयाचे. त्यास दररोज पन्नास हजार देत जाऊं. हें ठरावून दोनप्रहरीं माघारे आले. त्यास शुक्रवारचा हता प्रथमचा देणें. त्यास बाबा फडके यांस पठाणांनीं घेऊन चांदणींत शुक्रवारीं दहा घटका रात्रपर्यंत अस्नात बसवून पन्नास हजार रुपये घेऊन नंतर भोजनाची परवानगी दिली. याप्रमाणें नित्यानित्य धरण्याचा विचार चालला आहे. सातान्यावर राजश्रींनीं पुरंधरे व बाळाजी माणकेश्वर यांचा बंदोबस्त करून किल्ल्याचा बंदोबस्त करून महाराजांनीं फिरोन गोष्ट सांगितली याप्रमाणें जालें. करवीरकर व सातारकर महाराज यांचा एक दोरा आहे. श्रीमंत रा॥ बाजीराव साो वसईहून रेवदंड्यास आले म्हणोन वदंता आहे. पक्केपणें समजल्यानंतर सेवेशीं लिहूं. येथें नित्य नवीन मसलत होऊन रोज

---

१ चांदणी—लहान राहुटी.

ऐ. ले. सं. १०.

नवा नवा घाट होतो म्हणून भोसले याजकडील उभयता कारभारी निरोप मागत आहेत. ममईकर इंग्रज यांणीं जंगी सरंजामाची तयारी करून पलटणें व तोफा वगैरे जंगी सरंजाम साष्टीस पोंचवीत आहेत. पुढें त्यांची नियत कोण तऱ्हेची आहे ही कळत नाहीं. फत्तेसिंग माने फौजसुद्धां कराडप्रांतीं गेले आहेत. तिकडून मिरज तालुक्यांत खंडणीचा वगैरे दंगा करावा हें मानस पूर्वीपासोन आहे. त्यास स्वामींनीं फौजसुद्धां मजबूत राहून हुषार असावें. करवीरकर यांनीं खटला उत्पन्न करोन लढाईचा मोबदला करावा हें मानस आहे. त्यास तिकडील गोष्ट राखावा. येथें बखेडा फार आहे. याजकरितां तिकडेच मजबुतीनें बंदोबस्त राखून असावें हें उत्तम. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५५१ ( पौष व० ३--११ जाने. )

उतारा—पत्र बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे यांचें पुण्याहून मिरजेस.

" सातान्याहून पेठे वस्त्रें घेऊन श्रीपर्वतीस येऊन छ० ४ रमजानीं दाखल जाले. पौष शु० १३ बुधवारीं वस्त्रें घ्यावयाचा मुहूर्त सिद्ध केला आहे. त्यास होळकर व मुत्सद्दी यांचे विचारें रा. विनायकराव यांचें दत्त-विधान करोन वस्त्रें द्यावीं हें उत्तम आहे. रावसाहेब यांचे चित्तांत जे, दत्तविधान करूं नये. वस्त्रें देऊन बाळाजी माधवराव या नांवें शिक्का सुरू करावा. ऐवजाविशीं होळकर यांचा बहुत तगादा होऊन मर्यादा राहिली नाहीं ! शहरावर पट्टी सुरू करोन दर पेठेचे अंमलदार यांजवर पेठेच्या-आकाराप्रमाणें होळकर यास बराता देऊन होळकर यांणीं लहान मोठे गृहस्थ यांस बेहुर्मत करोन चाप व कोरडे मारून बराताप्रमाणें ऐवज घेतात. शहरचे रयतेवर ईश्वरी क्षोभ जाला आहे ! शिंदे याजकडील फौज पेंढार चांदवड नाशीक इकडे येऊन प्रांत बेचिराख केला ! रा. जिवाजीपंत नेने यास होळकरांनीं ऐवजाकरितां नित्य कोरड्याचा मार देतात ! "

---

नं. ६५५२ श्री. ( १३ जानेवारी. )

पै॥ छ० २४ रमजान सुरु सन सलास मयातेन व आलफ.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी. त्रिकाल चरणांवर मस्तक ठेवून शिर-साष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता॥ पौष बा॥ ६ गुरुवार सायंकाळ दोन घटका दिवसपावेतों बालकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. वेदशास्त्र संपन्न रा॥ श्यामभट बावांस पत्र पाठविलें. त्यांस पावतें केलें. उत्तर मागाहून घेऊन पाठवितों. वेद-शास्त्र रा॥ वासुदेव जोशी चिपळोणकर यांजला पत्र तो॥ मातुश्री साळू अक्कानीं पाठविलें तें त्यांस देऊन त्याचें उत्तर घेऊन पाठविलें आहे. जोशी बावांस पट्टीबद्दल दहा हजार रुपये व किरकोळ दोन हजार एकूण बारा हजार पडोन चौकी उठली. वडिलांस कळावें. पट्टी लागली यास्तव लोक जाऊं लागले. यास्तव होळकर यांणीं शहरासभोंवतीं नाकेबंदी केली. रावसाहेब याचे लष्करांत देखील कोणी जाऊं देत नाहीं. कारकून बसला आहे. परवानगी ओळखीनें जाऊं येऊं देतात. पट्टीचा अंमल घालून बे-मुर्वत पैका घेतात ! होळकराकडील हरनाथ व रा॥ गणपतराव दोघे नेहमीं येऊन फडके याचे वाड्यांत बसोन कारभार पट्टीचा चालत आहे. झाडून दुकानें व घरें दरवाजास कुलपें आहेत. कांहीं जिन्नस मिळत नाहीं. आपल्या वाड्याविशीं रा॥ बाळाजी विष्णु सहस्त्रबुद्धे याजला सांगितलें त्यास थोर त्रिवर्ग येजमानाचे त्यांजला मात्र पट्टी नाही. बाकी दुकानास पट्टी द्यावी लागेल असें भावे यांणीं आपणास सांगितलें असें सहस्त्रबुद्धे यांणीं सांगितलें. त्यास दुकानास काय पट्टी लागेल ती देणें प्राप्त आहे. कळावें. कोणी कोणास भेटत नाहीं. घर सोडून कुलपें घालून जीव जगवितात असा प्रकार आहे. रा॥ आबाजी हरि किवे आपल्या वाड्यांत आले आहेत. ज्वर येत आहे. उतार आहे. श्रीमंत वसईस उभयतां आहेत. रा॥ बापू साने याची मुलें माणसें होळकर यांणीं पुरंधरे यांचे खटल्यानिमित्त बायको बाळंतीण वीसा रोजांची समेत (बरोबर) धरून नेली. (सोडण्याची) परमानगी सरकारची जाहली, परंतु सुटली नाहीं. रा॥ जिवाजीपंत नेने याजला मार फार दिल्हा तेणेंकरून देवाज्ञा जाहले बा॥ २. रा॥ विठ्ठलराव गोळे पितापुत्र धरून नेले. रा॥ गणपतराव गद्रे यांची ठेव आहे ती मागतात सवा लाख रुपये. शिंदे याजकडील अधिक

मजकूर नाहीं. शहरांत मोठी पट्टीची धुमाळी लागली! कोणास दुसरा विचार सुचत नाहीं. मार्ग मोकळा नाहीं. कोण वेळेस काय होईल न कळे. याजप्रमाणें आहे. पासोडया उंच नारायणगांवीं मिळत नाहीं. हलक्या मिळतील परंतु दुकानें बंद. तसेंच किराणा बंद. पेशजी दर लिहून पाठविले आहेत. तूर्त कांहीं जिन्नस मिळत नाहीं. कळावें बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय. तूर्त दिवस जातो.तो सुदिन! उदयीक कसा दिवस जाईल अशी सर्वत्रास चिंता आहे. श्री हरि पार लावणार! हे विज्ञापना.

---

नं ६५५३ ( पौष व० ५–१३ जाने. )

उतारा—पत्र हरि परशराम यांचें तासगांवाहून मिरजेस.

" फत्तेसिंग माने यांचें म्हणणें, करवीरकरांचें पारिपत्य करावयाचें. त्यास दारू व तोफेचे गोळे पंचवीस हजार तयार असावे व दोन थोर तोफा तयार असाव्या. तेव्हां नरहर विठ्ठल यांणीं सांगितलें कीं, दारू-गोळा तयार नाहीं. करवीरकरांचें पारिपत्यच करितां असें आहे तरी थोडा बहुत दारूगोळ्याचा पैका देऊं. थोर तोफा तर तयारच नाहींत, तेव्हां त्यांणीं सांगितलें कीं, पैका नको. दारूगोळाच द्यावा व तोफाही तयार कराव्या. करवीरचे कारकून ( मान्याकडे ) आले आहेत. दोन लाखपर्यंत बोलत आहेत. सातान्यास अभयपत्रें दोन तीन पाठविलीं. काल चतुरसिंग यास पत्र पाठविलें कीं, ब्राह्मण शिवायकरून पैका निघेल तसा काढावा!"

---

नं. ६५५४ श्रीगणपति. (पौष व० ७-१५जाने.)

पौ छ० २० रमजान सन सल्लास मय्यातैन. पौष.

अंतर्वे हरीचे शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ता।। छ० २० रमजान पर्यंत वडीलांचे आशीर्वादें सुखरूप असो. विशेष. वडीलीं पत्र पाठविलें तेथें आज्ञा जे रा।। मोरोपंत पेंडरेकर खानापुराकडे गेले. पाठीमागें पाटलोजी माने

---

१ पत्र हरी परशराम यांचें तासगावाहून मिरजेस. २ हे प्रतिनिधींचे कारभारी.

लागले असें वर्तमान आहे. तरी सविस्तर लिहिणें. त्यास फत्तेसिंग माने यांनीं कराडचें ठाणें घेऊन बसंतगडास चौकी दिली. तेव्हां मोरोपंत कासेगांवावर होते. त्यानी कांहीं बेरड व रामोशी मेळऊन बसंतगडास फौज होती त्याजवर छापा घातला. दीडशे आदमासें घोडें व तीन तोफा पाडाव केल्या. तोफा किल्यावर लावून दिल्या व वरत्या प्रतिनिधींच्या बायां[1] होत्या त्या बासोटा किल्ला आहे त्यास लाऊन देऊन मोरोपंत खानापुरास आले. पाटलोजी माने यांणीं पेंढरकरांचा पाठलाग करून वांगींपर्यंत आले. प्रतिनिधींचें सामान भारी पाहून तेही कराडास गेले. कांहीं फौजा कराडावर आहेत. फत्तेसिंग माने रहिमतपूरनजीक आहेत. दोनचार दिवसांत तेही कराडास येणार याप्रमाणें वर्तमान आहे सातान्यास मान्याकडील कंपूचे मोर्चे बसले होते आणि निकडही बरीच होती त्यास श्रीमंत अमृतरावसाहेब यांचा कारकून सातान्याची मामलत करून माने याजपाशीं आला. त्या दिवसापासून किल्यावर तोफाची निकड मारागिरीची होती ती कमी जाली. कारण कारकुनापाशीं दारूगोळा मागतात. याजप्रमाणें वर्तमान आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५५५ (नकल) श्री. (पौष व. ७—१५ जाने.)

पौ॥ छ० २० रमजान मंदवार सन सल्लास.

विज्ञापना[2]. स्वामींनी छ० १० रमजानचीं पत्रें पाठविलीं तीं छ० १४ रमजानीं अस्तमानीं पावलीं. सविस्तर वृत्त कळलें. त्याचीं उत्तरें मागाहून लिहितों. येक पुरवणीमध्यें करवीरकराकडील मजकूर लिहिला. व आपण कूच करून भिलवडीस येऊन तासगांवास आला. पुढें बावांच्या[3] दर्शनास जाणार म्हणोन लिहिलें. ऐशास करवीरकरांचा तह करावयाचा मुखत्यार केवळ मातुश्रीकडे[4] आहे असा अर्थ नाहीं. आपला बचाव करून घ्यावयाची चालच आहे. मग त्या विशादावरून सर्व सोडून बावांच्या

१ प्रतिनिधींची आई काशीबाई व दोन बायका. २ बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे यांचें पत्र पुण्याहून राम. आपास जमखिंडीस. ३ चिदंबर दीक्षितांच्या. ४ गोपाळराव गोविंद यांची स्त्री सरस्वतीबाई.

दर्शनाचा उद्योग मनांत आणिला हें आमच्या कर्तृत्वास प्रशस्त नाहीं. दुसऱ्याच्या रोपावर वडिलार्जित लौकिक मेळविला तो आपण सोडणार यापेक्षां निंद्य प्रकार तो कोणता ? आपण लिहिले अर्थ सर्व सेवकांचे चित्तांत वागतात असें असोन श्रीमंत रा।। बाळासाहेब यांच्या समक्ष मी विनंति करावयाची ती केली. उत्तरही समर्पक जालें. वडीलांचें बोलणें गंभीरपणाचें पडलें. तेव्हां मी पुण्यास यावयाचें कबूल केलें. आज्ञेप्रमाणें येथें येऊन यथामति सुचेल तें बोलतों. कैलासवासीचा सूड घ्यावा हें चित्तापासून खटपट करीत आहें. असें असतां स्वामींनीं उदासवृत्ति धरून पत्र लिहिलें परंतु हवालदील जालों. उत्तर समर्पक लौकर वडीलांस विचारून यावें. त्या अन्वयें करीन. वडीलांचें समक्ष बोलणें जालें तेव्हां अकत्यार आम्हांत नाहींच असें समजूनच ठरलें आहे. असें असतां येकाच्या रोपावर दौलत गिरीफदारींत आणावी हें लौकिकांत चांगलें दिसणार नाहीं. स्वामी म्हणतील घरचे साहित्यास व पैक्यास तुम्ही माहीत असतां असें कसें लिहितां ? तें खरें. परंतु अशी. अनुकूलता घडावयाची नाहीं. सर्व अर्थ स्वामींच्या ध्यानांत आहेत. अधीकउणें बहुत लिहिलें याचा विषाद येईल खरा. परंतु मला रोजगाराची इच्छा नाहीं. कैलासवासी वडीलांचा सूड घ्यावा आणि स्वामींचा नक्ष[2] राहावा इतकाच हेतु. हें पत्र वडीलांजवळ बसोन सर्व लहानथोर मिळून वाचून मनसबा पोक्त देणें. दूर अंदेशी मनांत आणोन उत्तर लौकर पाठवावें. आतां उत्तराची मार्गप्रतिक्षा करीत आहें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५५६. (पौष व. ८ – १६ जाने.)

उतारा—पत्र रहिमतपुराहून मिरजेस बाळाजी महादेव दामले यांचें.

" कराडकर (पंत प्रतिनिधि) यांची खंडणी चार लक्ष जाली होती. परंतु ऐवजाची पुरवणी न होय यास्तव रा. फत्तेसिंगराव माने फौज व तोफखाना कंपूसुद्धां छ. २० रमजानीं कूच करून कराडास गेले. कराडास ठाणें माने यांचें बसोन क्षेत्रास नाकेबंदी केली आहे. माणूस जाऊं

---

१ परशुरामभाऊंचा. २ अदब, वरचढपणा.

येऊं देत नाहींत. क्षेत्रांत धराधर होते परिणाम ठीक दिसत नाहीं. बरकड ठाण्यांनीं माने यांणीं आपलींच ठाणीं बसवून वसूल करतात. सातारा येथें रा. चतुरसिंग राजे भोसले दोन हजार जमावानिशीं मोर्चेदाखल बसले आहेत तेही रोखे करून खंडण्या घेतात."

---

नं. ६५५७　　श्री.　　( पौष ब० ९-१७ जाने, )

पै॥ छ० २२ रमजान.

विज्ञापना. कैलासवासी धोंडोबा आपा पुरंधरे यांची नातसून पुण्याहून निघोन सासवडास गेली. तेथून जेजुरीस जातांना मार्गी पठाणाची गांठ पडली. त्यांणीं पुढें घालून होळकराच्या सैन्यांत आणली. तेथून त्यांच्या वाड्यांत आणोन ठेविली. सभोंवते पाहरे आहेत. त्यांचें बोलणें राजश्री सखोपंत बापू साने बोलत होते, तितके निमित्य ठेवून हे त्यांचे पदरचे म्हणोन साने यांचे घरीं चौकी आली ! ते समयीं रा॥ बाबा व बापू युक्तीनें निघोन बाहेर पडले. रा॥ चिमणाजीपंत व गोंदाबा आपा व बाळकृष्णपंत असे त्रिवर्ग धरून पुरंधरे यांचे वाड्यांत नेले. आज चार दिवस जाहले. त्रिवर्गास काल मारही दिल्हा. बरकड मूल निघोन जिकडे तिकडे गेले. घरीं चौकीदार आहेत. त्यांणीं बापूचे स्त्रीस उभी करून हातांतील पाटल्या काढून घेतल्या. घरांत बायका व लहान मुलें मात्र आहेत. अशी अवस्था त्या कुटुंबाची जाहली आहे. श्री॥ रा॥ रावसाहेब यांच्या कानांवर घालून चिठ्या घेतल्या व रा॥ बाबा फडके यांणीं खटपट बहुत केली; परंतु ही वेळ पावेतों होळकराची गांठ पडून यत्न चालला नाहीं. त्या बाईजवळ वीस हजार रुपये मागतात. याप्रमाणें जाहलें वर्तमान लिहिलें आहे. मागाहून होईल तें लिहितों. काल बुधवारीं सायंकाळ प्रहर दिवसास साने याच्या घरच्या बाइका व मुलें धरून पुरंधरे यांचे वाड्यांत नेल्या. त्याजविसीं खटपट करीत आहें. सुटून आपले घरीं येतील तेव्हां खरें. ईश्वराचे इच्छेस आले इतकें खरें ! अन्यथा पाहतां कांहीं नाहीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५५८ श्री. (नक्कल) (पौष व० ९–१७ जाने.)

छ० २२ रमजान. इंदुवासर. सलास मयातेन.

विज्ञापना. इंग्रजाचे विद्यमानें तह ठरत आहे याजकरितां बडेखान* मुंबईस गेले. इंग्रजी पलटणें घेऊन उभयतां श्रीमंत येणार. दक्षिणेकडील पलटणें इकडील इशाऱ्यानें चालती होणार असा रंग दिसतो. सारांश, या दौलतेंत टोपीकरांचा पाय शिरकला. पत्रांत मजकूर लिहितां येत नाहीं. रा॥ नागो भवानी यास बडे खानाकडे जावें लागेल. यास्तव डंकीनसाहेब जनराल मुंबईकर यास दोस्तीचें पत्र पाठवावें. त्यांत नागो भवानी सांगतां कळेल इतका मजकूर असावा. याप्रमाणें बडेखान यांणीं सांगितलें आहे. पत्र मजकडे पाठवावें. तिकडील इशारा आल्यानंतर नागोपंताची रवानगी करावी लागेल. यास्तव पत्र जरूर पाठवावें आणि बडेखान यासही पत्र असावें. कोणी शहाणा कारकून पाठवावा. त्याणें भांबवड्यास येऊन रहावें. शहरांत येऊं नये म्हणजे त्याजबरोबर सविस्तर सांगून पाठवीन. रवानगी लौकर व्हावी. येथें खर्चाची निकड. त्यास मानवंदाकडून पांचशें रुपये देवावे म्हणजे ठीक पडेल. येथें पैसा मिळत नाहीं. दुकानें बंद आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५५९ श्री. ( पौष व० १०-१८ जाने. )

पौ॥ छ० २८ रमजान पौष मास सन सलास.

सेवेशीं बाळाजी विष्णु × सहस्रबुद्धे कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ० २३ रमजान पावेतों वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामींकडून अलीकडे पत्र येऊन वृत्त कळत नाहीं. सदैव पत्र येऊन सांभाळ जाहला पाहिजे. स्वामींचें पेशजी पत्र आलें त्याजवर इकडून चार रवानग्या जाहल्या आहेत त्यांजवरून सर्व विदित जाहलेंच असेल. उभयतां श्रीमंतांनीं इंग्रजास आठ आणे लिहोन देऊन जंबूसर खेरीज करून गुजराथ व कोंकणपट्टी व कर्नाटक मिळोन साठ लक्षांची जहागीर दिल्ही

* हा निजामाकडून पेशव्यांकडे वकिलीस होता. × पत्र पुण्याहून मिरजेस.

म्हणोन सरकारांत बातमी आल्याबरोन लिहिलें आहे. पांच पलटणें घोडे बंदरास येऊन दाखल जाहलीं, बाकीं मागाहून येत आहेत पट्टणाकडील सरंजाम तुंगभद्रेच्या तीरीं जमत आहेत. बंगाल्याकडील दाहा पलटणांची तयारी जाहली आहे. सारांश, टोपीकराजवळ दस्ताऐवजीं गुंतले असें वाटतें. बरकड सविस्तर पुरवणी पत्रावरून विदित होईल. प्रस्तुत पट्टीचा गहजब चालला आहे ! याचा बयान (तपशील) पत्रीं लिहितां येत नाहीं. शिंदे आद्याप नर्मदातीरासच आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

———

नं. ६५६०  श्री.  (पौष व० १४ –२२ जाने )

पै।। छ० २७ रमजान सुरू सन सलास मयातेन व अलफ.

सेवेशीं साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसी जे, येथील वर्तमान तर श्रीमंत राजश्री रावसाहेब यांणीं सत्तावन लाख रुपयांची पट्टी शहरावर करोन राजश्री हारिपंत भावे यास वसूल करण्यास आज्ञा केली आहे. त्यावरून भावे यांणीं लहान मोठे गृहस्थांची अबरू शहरांत ठेविली नाहीं. प्राणांशीं संबंध आहेत ! राजश्री बाबा फडके हैदराबादेस जाणार त्यास स्वारीची तयारी करोन व।। २ निघोन जातील. राजवस्त्रें घेऊन मोतीबागांत पेठे मुक्काम करोन आहेत. पौष शु।। १३ चा मुहूर्त होता तो राहिला. पुढें व।। २ व व।। ७ असे मुहूर्त आहेत. रावसाहेबांचा गांव कोंकणांत भिवंडी म्हणोन होता त्यास तो गांव श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब यांणीं जाऊन लुटून घर खणून टाकून घरांतील वित्त विषय लाख दोन लाख होता तो घेऊन गेले. होळकर यांच्या ऐवजाकरितां रावसो।। याजकडे धरणें नित्य आहे. येथें नित्य नवा मनसबा होतो ! एक मनसबा ठरोन कांहींएक सिद्धीस जात नाहीं. पुढें परिणामहि शुद्ध दिसत नाहीं. पुढें होईल मजकूर तो सेवेशीं लिहूं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

———

नं. ६५६१.  श्री.  (नक्कल) ( पौष व. १४–२२ जाने. )

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री रामचंद्रपंत परशराम स्वामी गोसावी यांस.

पोष्य बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. इंग्रजांकडील पलटणें बंडवाले यांचें पारपत्य करावयास सरकारांतून आणविलीं आहेत. तरी तुम्ही आपले नेमणुकी सरंजामानसीं त्यास सामील होऊन बंडवाले यांचें पारपत्य करणें. जाणीजे. छ० २७ रमजान सु॥ सल्लास मय्या तैन व अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

---

नं. ६५६२. श्री. ( पौष व॥ १४–२२ जाने. )

पै॥ छ. ३ सवाल सन सलास मय्या तैन.

सेवेशीं साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे. दिल्लीकडील व उज्जनीकडील आखबर आल्यानंतर सेवेशीं पाठवितों. येथील वर्तमान तर रा॥ बाबा फडके पौष व॥ ११ कूच करून हैदराबादच्या मार्गें गेले. बरोबर हुजरातीचे लोक व झाडून पागा व पीलखानें बगैरे सरकारचे कारखाने व साहेबनौबद व चवघडा व इतर लहानमोठे गृहस्थ याप्रमाणें घेऊन गेले. पुढें सिद्धटेंकपार मुक्काम करोन तेथें नवीन फौजा ठेवून व रास्ते व पटवर्धन व विंचूरकर बगैरे मालोजी घोरपडे आदिकरून लहानमोठे सरदार यांस फौजसुद्धां बोलावून फौजेचा जमाव करवावा व नबाबाकडीलही फौज बोलवावी याप्रमाणें बेत कुपिका (गुप्त?) आहे. सारांश सरकारची फौज चाळीस पन्नास हजार जमा करावी आणि पुढें सर्वांचे बंदोबस्त करावे हा बेत आहे. श्री॥ सौ॥ ताईसाो व काकूसाो उभयतां महाडाहून निघोन तोरण्याच्या पेठेस येऊन तेथून भोरास येऊन तेथून बनेश्वरास येऊन तेथून व॥ ११ पुण्यास दाखल होऊन श्री॥ रा॥ रावसाहेब यांचे डेन्यास आहेत. बरोबर रा॥ बाळाजीपंत पटवर्धन आहेत. व धुळोजी कुंजर आहेत ते नजरबंद आहेत. येथून रा॥ आबाजी त्रिंबक पूर्वी महाडास गेले होते ते उभयतांस घेऊन आले. मम्मईस इंग्रजाकडे बडेखान व होळकराकडील कारकून बोलण्या-

---

१ हें पेशव्याचें आज्ञापत्र बसईहून राम. आपांस जमखिंडीस. इतर सरदारांना याच नमुन्याचीं पेशव्यांचीं पत्रें आलीं तीं आम्ही गाळलीं आहेत. २ होळकर. ३ हत्ती.

करितां पेशजीं गेले आहेत. त्यास तेथील परस्परें बोलणीं होऊन जाबसाल ठरण्यांत कोणे तऱ्हेचा आला हा पक्केपणें समजल्यास नंतर सेवेशीं लिहूं. शहराबर तीन पट्या होऊन बेमुर्वत पठाणांनीं ऐवज वसूल करून घेतला. पुन्हां शहरांत पठाण येऊन घरें व वाडे उघडून जो सांपडेल त्याजपासोन मार देऊन ऐवज घेतात! असा विचार चालो आहे. रावसाहेब याचे पदरचे गृहस्थ विठ्ठलपंत घाटे व चिटणीस वगैरे यांचे घरीं होळकराच्या चौक्या येऊन गैरअब्रू केली. त्यावरून रावसाहेबांची मर्जी खपा होऊन उपोषण केलें. रावसाहेब याजपाशीं जमीयत कुल हजार स्वारांची भरती आहे. प्रतिनिधीकडील वसंतगड वगैरे कराड इकडे मान्याच्या फौजेचा उपद्रव होऊन बेचिराख जाहले! येथें प्रतिनिधीच्या वाड्यास पलटणें तोफा गिर्द बसोन सवालाख रुपयेची बरात सरकारांतून दिली आहे. त्याप्रमाणें फडशा करून मागतात. त्यावरून प्रतिनिधीकडील असामी कारकून होळकर यांणीं बोलीस नेले आहेत. खासा प्रतिनिधी तोड करावयास रावसाहेब यांचे डेऱ्यास दोन वेळां गेले होते व रा॥ मोरोबादादा याजकडेही एक वेळ गेले होते. तूर्त येथें राज्याच्या बंदोबस्ताचा व राज्यकारणी विचार कांहीं एक नाहीं. होळकरास ऐवजाचा भरणा करण्याचे गिरफदारींत आहेत. ऐवजाचा भरणा झाल्यास उत्तम. नाहीं तर परिणाम कठिण आहे. याप्रमाणें येथील वर्तमान आहे. पुढें होईल तें सेवेशीं लिहूं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. ता. छ० २७ रमजान हे विज्ञापना.

---

नं. ६५६३ श्री. (पौष व. १४-२२ जाने.)

पो॥ छ० ३ सवाल सन सलास मयातेन.

सेवेशीं धंताजी रामचंद्र जोशी दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता॥ छ. २७ रमजान पावेतों साहेबांचे कृपेंकरून क्षेम असे. विशेष. श्रीमंत सौ॥ ताईसो॥ व सौ॥ काकूबाई पुण्यास येऊन पावली. समागमें राजश्री बाळाजी रघुनाथ पटवर्धन आहेत. वा॥ ११ स पर्वतीजवळ आल्याचें वर्तमान आलें. नंतर राजश्री विनायकराव बापूसाहेब सामोरे जाऊन घेऊन आले. बापूसाहेबाचे डेऱ्याचेजारीं बाईसाहेबांस

राहुटी देऊन तेथें राहिली. रावसाहेब दोन तीन वेळ दिवसांतून जातात. बापूसाहेब तेथेंच असतात. प्रतिनिधींचे वाड्यावर होळकराचीं पलटणें व तोफा गेल्या होत्या. लक्ष रुपये खंडणी व पंचवीस हजार उंबर पट्टी याप्रमाणें ठराव जाहला. कारकून तीन असामी बोली धरून नेल्या. गांवांत दंगा अनिवार! लिहितां पुरवत नाहीं. ब्राह्मण शिष्ट आदिकरून एक सारखा विचार घडत आहे. बहुतेक गृहस्थ परागंदा जाहले. आबरूचा विधि राहिला नाहीं! प्राण जगणें हेच विचार पडले! बाबा फडके बुधवारीं कूच करून सासवडास गेले. वाणी उदमी मातबर गृहस्थ एकसारखा विचार आहे. शहरची नाकेबंदी. बाहेर निघोन जाणें कठीण. होळकरांकडील गृहस्थ वसईस बोलण्यास गेले व तिकडूनही येत असतात. समेटाचें संधान आहे. व बडेखान गेले ते इंग्रजांकडे मुंबईस जाऊन वसईस आले. पुढें कसा विचार घडून येतो न कळे. चक्रदेव व गद्रे हस्तगत जाहले नाहींत. फडके मंडळी मात्र आली. रास्तेकडील सर्व मुक्त जाहले. शहरचा दंगा अनिवार आहे, परस्परें श्रवण होत असेल. प्रांत उध्वस्त जाहला! पेंढारीचा व लष्करचा उपद्रव आहे. रयत बुडाली! माने त्या प्रांतीं येणार आहेत येविशीं लिहिलें कळबावें असें नाहीं. येथें सकट सारिखे जाहले. स्थीत रीत नाहीं! पट्टीचा तगादा आपले वाड्यांत येतो. चिरंजीव तोंड चुकावून बाहेर गेले. चिरंजीव भिऊबा व मी आहें. चि॥ सौ॥ मथी प्रसूत जाहली. मोठें संकट प्राप्त जाहलें! आज तागायत पट्टीची टाळाटाळ केली. पुढें काय गुदरेल भरंसा येत नाहीं. वडिलांचे पुण्येंकरून काय निर्वाहेल तेव्हां खरें! बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५६४ (पौष व. ३०–२३ जाने.)

उतारा–पत्र बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे यांचें पुण्याहून मिरजेस.

" अंबोजी इंगळे फौज व पलटणेंमुद्धां उज्जनीस दाखल जाले. शिंदे बहादूर यांचा निरोप घेऊन बऱ्हाणपुरास यावें, तेथें खंडेराव होळकर यास (बरोबर) घेऊन रा. यशवंतराव होळकर यांचे समेटीस येणार अशी बोलवा

आहे. रा. बाबा फडके यांस सरकारांतून नवाब बंदेगानअली याजकडे रवाना करणार. फडके डेरेदाखल जाहले. पुढें हैदराबादेस जाऊन नवाबाशीं बोलोन कुमकेस फौज घेऊन यावी हा बेत आहे. भोसलेकडील कारभारी उभयतां सरकारांत निरोप मागतात त्यावरोन परस्परें मेजवान्या जाहल्या. आठ चौ रोजांत निरोप होऊन जातील. भोसले फौजेसुद्धां तयार आहेत. समयास येतील. * * * होळकराकडील पठाण शहरांत ऐवज वसूल करतात त्यामुळें दोन ब्रह्महत्या जाहल्या. जिवाजी केशव नेने व पुरंदरे यांजकडील कारकून माराखालीं मेले!"

---

नं. ६५६५ श्री. (३१ जानेवारी.)

पै॥ छ० १४ सवाल सुरु सन सलास मयातेन व आलफ.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी. त्रिकाल चरणांवर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता॥ माघ शु॥ ९ सोमवार पावेतों बालकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. आपल्या जाग्यावर पट्टीचा तगादा जाहला. बुधवार पेठेंतील दुकानांतील हलवाई याजला उदीमपटीचे खर्च सालांत दोंडशें रुपये पडोन तो दुकानाचा फडशा करून सहकुटुंब पळून गेला. नगारखान्याजवळ फडताळांत सोनार होते त्यांजला उदीमपटी तीस चाळीस दरसाल असामीस घेतले. नंतर मागती दुसऱ्यानें पटी लाविली त्याजमुळें रातविरात करून पळून गेले. तसेंच सदाशिव पेठेंतील जुनीं बागांतील कुळें व छपरें निम्में गेलीं; दहा एक राहिलीं तींही जाणार. जाग्याचे पट्याकरितां तगादे मजकडे येतात त्यास रा॥ हरिपंत भावे यांचे लक्ष श्री॥ रा॥ * आपासाहेबांकडे आहे. दोन चार पत्रें हरिपुराहून त्यास आलीं. त्यांजवरून आजपर्यंत नेऊन आमची अब्रू घेतली नाहीं. परंतु त्याचा विश्वास नाहीं. मी तोंड चुकावून आहे. ज्या पेठेंत जागा त्या पेठेंत प्यादे येतात तेव्हां + रोज घेतात. भावे यांजला सांगून उठवीत गेलों परंतु त्यांणीं सांगितलें कीं, माझ्यानें राखवेल तोंपर्यंत राखीन, नाहींतर पैसा द्यावा लागेल. सदाशिव पेठेंतील जाग्यावर पांचशें आरब

---

* चिंता. आपा सांगलीकर. + रोजमुरा.

आहे. दुकानावर पांचशें आहे. वाड्यावर दहा हजारांचा घातला आहे. येविसीं श्री॥ रा॥ आपसाहेबांस चार पांच वेळ लिहिलें. परंतु अमुक प्रकारें उत्तर येत नाहीं. आमचा भोग आहे! जावें तरी नाकेबंदी आहे. चि॥ सौ॥ मथूबाई कन्या प्रसूत जाहली. पंधरा दिवस जाहले. मातुश्री व कन्या व मी आहें. काय करावें? संकटांत पडलों आहें. लोक पळोन गेले त्यांचीं घरें खणतात, दुकानें उघडून कापडें आणतात व घरें वाडे रोज पाडतात! पठाण गांवांत दंगा करणार होते याजवरून मग भावे याजकडून दोन सनदी आणून चौकीवर बसविले आहेत. रोज देतों. रा॥ बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे दोन रोज येथें होते. त्यांनीं तीन सनदी आपले वाड्यांत आणून बसविले नंतर ते वाड्यांत गेले. गल्लींतून पठाण ब्राह्मणांस धरून नेतात. फिरतां विचारें फिरलें पाहिजे! रा॥ काशीराव रास्ते पट्टीमुळें लष्करांत जाऊन राहिले. फडके सहकुटुंब लष्करांत जाऊन राहिले. होळकराकडील शामतखान पठाण कूच करून लोणीवर गेला. मीरखान याचा पेवज देणें तो दंगा करीत आहे. होळकराकडील गांवचे बंदोबस्तास पलटणें सात आलीं आहेत. परंतु कांहीं होत नाहीं. उभयतां पठाण व नागो जिवाजी यांजला वस्त्रें रावसाहेबांनीं दिल्हीं. पठाणशी पोषाख दिल्हे. तिघांस कंठ्या शिरपेंच दिल्हे परंतु ते कूच करून गेले नाहींत. एक मात्र गेला. शहर गाईसारखें हळहळतें! * * * दुकान व पेठ सदाशिव या जाग्यांचा प्रकार कसा करावा आज्ञा ल्याहावी. व वडिलांचें पत्रही रा॥ हरि गोपाळ भावे याजला मर्जीस आल्यास यावें. तेणेंकरून मजला बोलणेस ठीक. भावे याजकडे कारभार हल्लीं सर्व आहे. वडिलांस कळावें. बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५६६ श्री जगदंब प्रसन्न (५ फेब्रु.)

वै॥ छ० १५ सवाल सात तास इंदुवार. सन सल्लास

अपत्यें अमृतानें दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता॥ माघ शु॥ १४ मंदवारपर्यंत मुक्काम मंगळवेढें वर्तमान

यथास्थित असे. विशेष. वडीलांकडून अलीकडे आशीर्वादपत्र येऊन बालकाचा सांभाळ होत नाहीं. तेणेंकडोन चित्त सापेक्षित नाहीं. तर आशीर्वादपत्र पाठवून सांभाळ केला पाहिजे. यानंतर इकडील वर्तमान तर, रा॥ रामचंद्रराव घोरपडे नि॥ रा॥ यशवंराव होळकर दोन हजार फौजेनिशी मौजे बगेले पा॥ करकंब येथें होते. पंताकडील नाझरेबर जमाव होता तेथून दौड करून छापा घालून बुणगें लुटलें. सडे रामचंद्रराव चार पांचशें जमावानिशीं पळोन गेले. चार दिवस जाले. होळकर यांजकडील रा॥ मार्तंड विठ्ठल परभू हजार जमावानिशीं गुरसालेच्या सुमारें होते. घोरपडे यांचें वर्तमान ऐकोन तेही पळून गेले. कोणीकडे गेले याचा पत्ता नाहीं. पंताकडील फौज माघारी गेली. दुसरा जमाव पंताकडील माचनुराजवळ सुभानराव मान्ये होते ते कासेगांवच्या लगत आले. यांजकडील फौज चार हजार व तीन तोफा कांहीं पायदळसुद्धां नागठाणेच्या सुमारें आहेत. पुण्याहून पठाण कांहीं निघाले ते नरसीपुराजवळ जिती म्हणोन आहे तेथें आले आहेत. सोलापूर अक्कलकोटाकडे जाणार म्हणोन आवई आहे. पठाणांचे भयामुळें पंढरपूर अगदी ओस जालें! सडे बातमी राखोन आहेत. पुढें काय घडतें पहावें. वडीलांस कळावें, करितां विनंती लिहिली आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५६७  श्री.  ( माघ शु. १४—५ फेब्रु )

छ० २० सवाल सन सल्लास मय्यातैन. माघ.

*सेवेसीं बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ० १२ सवाल मंदवार प्रातःकाल पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीकडून अलीकडे बहुत दिवस पत्र येऊन वृत्त कळत नाहीं. तरी सदैव पत्र येऊन सांभाळ जाला पाहिजे. अलीकडे स्वामीची प्रकृत कशी आहे ती ल्याहावयाची आज्ञा जाली पाहिजे. पुण्यांतील अवस्था पत्रीं कोठवर लिहून कळवावी! पट्टी घ्यावयाची ती शाकिनरूप घेतल्या. आतां घरें खणतात, मारतात, बायकापुढें तवे तापवून डोकीवर दगड

* पत्र पुण्याहून निरजेस.

देतात अशी रीत चालली आहे. विनायकपंत गडबोले याचे घरीं आठ दिवस चौकी बसोन अनर्थ केला! तेव्हां तीन हजारांवर तोड करून घरांतील माणसें मोकळीं केलीं! शामतखान व नागो जिवाजी यास सरकारचे निरोप होऊन शिंदे यांचे तोंडावर गेले. मरिखान पंढरपुराकडे जावयाकरितां निघोन कवडीवर जाऊन राहिले आहेत, वरकड मजकूर पुरवणी पत्रावरून विदित होईल सारांश भालेराई जाली! ईश्वरें नेत्र झांकिले! सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५६८ श्री. (माघशु. १५ -६फेब्रु.)

पै॥ छ. १३ सवाल सन सलास मय्यातेन

पु॥ सेवेशीं विज्ञापना ऐसीजे. रा॥ मोरोबादादा फडनीस व मोरोबा फडके व त्रिंबकराव पेठे व काशीराव रास्ते सर्व मंडळीसुद्धां शहरांत पठाणांचा दंगा अमर्याद जाणोन आपलेले मंडळीसुद्धां शहरांतून निघोन रावसाहेब यांच्या डेन्यानजीक राहिले आहेत. वरकड कुलमजकूर रा॥ धोंडोबा जोशी यांणीं नित्यकृत्याचें वर्तमान लिहिलें आहे, त्यावरोन विदित होईल सेवेशीं श्रुत होय. रा॥ येसाजी रामकृष्ण यास बत्तीसाशिराळ्याच्या ठाण्याच्या सनदा रावसाहेब यांणीं दिल्या आहेत. तिकडे येऊन बत्तीस शिराळ्यास ठाणें घालणार. स्वामींस कळावें म्हणोन लिहिलें आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५६९ श्री. (माघ शु० १५--६ फेब्रु)

पै॥ छ० १३ सवाल सन सलास मयातेन.

सेवेसीं साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे. येथील वर्तमान तर, प्रतिनिधी यांस ऐवजाविसीं होळकराकडून सक्त तगादा जाहला. त्यावरून प्रतिनिधी यांणीं आपल्याकडील कारकून चिटकोपंत एकांडे व नाना बोकील व आबाजी कृष्ण देंडरकर याचे पुत्र ऐसे बोलीस होळकर यास देऊन श्रीमंत राजश्री रावसाहेब याजकडे ऐवजाचे तोडजोडीचें बोलण्याकरितां प्रतिनिधी एक दोन वेळां गेले. परंतु येथील अनादर पाहोन प्रतिनिधि पौष

वा॥ ३० उभयतां कुटुंबें व दोनशें स्वार घेऊन रात्रीं निघोन गेले ते किन्ह-ईस पोंहोंचल्याचें वर्तमान आलें. प्रतिनिधींकडील कारकून यास होळकर यांणीं तव्यावर उभे करीन आंगास सांडस लावून सवा लाख रुपयेची चिठी लिहून घेतली आहे. पुढें प्रतिनिधींच्या चीजवस्तीची वगैरे मोजदाद करीन जो ऐवज होईल तो सवा लक्षांत घ्यावा याप्रमाणें आहे. शहरांत तीन पट्टया होऊन वसूल केला व आणखी होळकराच्या भरण्यास आणखी ऐवज पाहिजे म्हणोन शहरांतील मातबर वगैरे ऐवजदार गृहस्थ पाहोन घरांतून धरोन नेऊन जो ऐवज निघेल तो घेऊन मग घरें खणून जो पैका हातास लागेल तो घेतात ! शिवाय लष्करवाले पठाण दररोज दहा पांच घरांवर दरोडे घालून लुटून नेतात ! त्यास सदरहू शहरचा मजकूर लिहिला आहे तो रावसाहेब यांच्या रुकारानेंच होत आहे. रास्ते व मिरजकर यांच्या वाड्यांस पट्टयाविसीं तगादे जाहले होते परंतु राजश्री बाळोजीपंत सहस्रबुद्धे यांणीं रावसाहेब याजपासून उभयतांस पट्टी माफ म्हणोन चिठी घेतली आहे, परंतु भरंवसा नाहीं. पंढरपुरावर वरात होऊन होळकरांकडील आंचबासिंग दोन हजार स्वार घेऊन गेले आहेत. पंढरपूर, मंगळवेढें वगैरे इकडे खंडणीविशीं दंगा करावा या विचारावर गेले आहेत. राजश्री येसाजी रामकृष्ण यास प्रतिनिधींकडील व मिरजप्रांत व रास्त्याकडील तालुक्यांत वराता दिल्ह्या आहेत. मशारनिल्हे ऐवजाच्या वसुलास फौजसुद्धां जाणार, त्यास तिकडे येऊन दंगा करणार. याजकरितां स्वामींनी सर्व गोष्टीनें हुशार असावें, राजश्री बाळकृष्ण गंगाधर तेथें आहेत त्याचा व येसाजी रामकृष्ण याचा पूर्वीपासून सिलसिला एकच आहे हें स्वामींच्या ध्यानांत असावें. करवीरकर यांणीं खटला उत्पन्न करीन त्याजकडील फौज दुधगंगेवर आली आहे. येविसीं श्रीमंत राजश्री रामचंद्रपंत आपा यांस रावसाहेब यांचें पत्र गेलें जें करवीरकर यांणीं सरकार तालुक्यांत उपद्रव केला आहे त्यास त्यांच्या पारिपत्यावर तुम्ही फौजसुद्धां जावें व हुजुरातीची पथकें, विंचूरकर व पानसे वगैरे पागे तुम्हांजवळ आहेत त्यांस पत्रें अलाहिदा पाठविलीं आहेत जे, तुम्हांस सामील होणें. त्यास याप्रमाणें पत्रें आपासाहेब यांस गेलीं आहेत. आजपर्यंत होळकर यांस ऐवज चाळीस लाख

ऐ. ले. सं. ११.

पर्यंत पावला. बाकी साठ लाख देणें आहे त्याच्या बराता प्रतिनिधीकडील व पटवर्धन रास्ते वगैरे यांच्या सरंजामावर द्याव्या याप्रमाणें ठरलें आहे. होळकर याजकडील पठाण शहामतखान कूच करोन गंगातीर प्रांतीं शिंदे याच्या फौजेच्या मोहऱ्यावर जावें म्हणोन मीरखान व शहामतखान व नागो-जिबाजी यांस सरकारांतून निरोपाचीं वस्त्रें व जवाहीर देऊन निरोप जाहले. त्यास शहामतखान कूच करोन थेवराबर गेले. मीरखान व नागो जिबाजी तेही दों चार रोजां जाणार. साताऱ्याहून वस्त्रें आणलीं आहेत. तीं राजश्री त्रिंबकराव पेठ्यांच्या घरींच आहेत. पुढें वस्त्राचा मजकूर आज-पर्यंत उपस्थित जाहला नाहीं. श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब वसईनजीक इंग्रजांच्या पलटणांसुद्धां स्वस्थ आहेत. इकडून बडे खान व होळकरा-कडील गृहस्थ ममईस गेले आहेत. तेथें बोलण्याचा मजकूर ठरोन अद्याप पर्यंत बडेखान माघारे आले नाहींत. शहरांत चौगीर्द चौक्या बसोन शह-रांतील मनुष्य बाहेर जाऊं देत नाहींत. तूर्त येथें राज्याच्या बंदोबस्ताचा व राजकारणी मजकूर कांहीं एक नाहीं. होळकराच्या ऐवजाच्या भरण्याचे गिरफदारींत रात्रंदिवस आहेत. दुसरा कांहीं एक मजकूर नाहीं. कळावें, सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५७०　　　　　श्री.　　　　　( फेब्रुवारी. )

पौ॥ छ० २१ सवाल सुरु सन सलास मयातेन व अलफ.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी. त्रिकाल चरणांवर मस्तक ठेवून शिरसा-ष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता॥ माघ व॥ २ पावेतों बालकाचें वर्त-मान यथास्थित असे विशेष. इकडील मजकूर तरी पट्टी एकदां घेतली. दुसऱ्यानें घेऊं लागले. मातबर गृहस्थ झाडून वेश बंद ठेवून निघोन सडे गेले. बायका दुसरे जागीं ठेविल्या. चार पांच ब्राह्मण मारतां मारतां मृत्य पावले. रस्त्यांतून देखील ब्राह्मण धरून नेतात, मारितात, चाप लाबितात, तवे तापवून पुढें टाकितात, याप्रमाणें अवस्था चार रोज भारी जाहली ! आज दोन रोज कांहीं रस्त्यांतून ब्राह्मण धरून धरून न्यावयाची कमती आहे. दुकानें झाडून लागलीं. त्यावरून मग दुकानें फोडून,

कापड, नक्त, दाणा, भांडीं, जवाहीर नेतात. चाहाड ( खोर ) बहुत जाहाले आहेत ! दरसदे ( दर शेकडा ) दहा रुपये चाहाडास देऊं केलें आहेत. ते घरें दाखवितात. रात्रीस कारकून प्यादे येऊन घरांत शिरोन चीजवस्त भरितात. नंतर घरांत सांपडतात त्यांस मारहाण करून, चाप लावून, अष्टादिक जिन्नस मग घरधणी दाखवितो, घेऊन जातात. असे घरें नित्य दहा वीस नेतात ! दिवसास दुकानें फोडून नेतात आणि होळकराचा भरणा करितात. होळकराकडील येथें मुख्यत्वें हरनाथ व नागो जिवाजी व विठ्ठलपंत कंपूचे व सरकारचे हरिपंत भावे आहेत ते याजप्रों बेव्हार करितात. गांवांत नाक्यानाक्यांनीं चौक्या होळकराकडील आणून बसविल्या. गांवा समवतीं नाकेबंदी भारी ! दोन मार्ग येक श्रीवेंकटेश्वराजवळ लष्करांत जाण्यास, व येक कुंभारवेस. या मार्गीं झाडाझडती चौकशीस कारकून आहेत. ते करून मग जाऊं येऊं देतात. आपले वाड्याचे व जाग्याचे पट्टीविसीं ज्या ज्या पेठेंतील जागे तेथील तगादे वाड्यांत आले. तीस रुपयेपर्यंत रोज भरले. मी एक्या भिंतिवरोन मागील वाटेनें पळोन लष्करांत रावसाहेबांचे लष्करांत वोळखीचे जागां गलों. तीन रोज घरीं आलों नव्हतों प्यादे कारकून वाड्यांत बसले. मग तीा राा अंताजीपंत व राा बाळाजी विष्णु यांणीं भावे यास बोलोन प्यादे उठवून मग मी घरीं आलों. बाहेर फिरत नाहीं. भावे याजकडून दोन सिद्दी रोज देऊन दररोज आठ आणेप्रमाणें आगिले. शिवाय तीन प्यादे दरवाजावर आणखी ठेविले आहेत. दरवाजे यांस कुलूप दिंडीही लावलेली. वाड्यांतील माणसें पाहून मग घेतात. नाहीं तरी अकस्मात् प्यादे येऊन दगा करतील. मग निघावयास बनणार नाहीं. खासगीवाले यांणीं कुलपें घालून वाडा वोस टाकून पळाले. असे वाडे बहुत वोस आहेत. बुधवारांतील दुकानाचा हलवाई पट्टी, उदीमपट्टी आपले जातीची देऊन पळाला. दुकान वोस. याजप्रमाणें दोन चार जागांचेहि तसें. मी जावें तर वाडा कसा टाकून जावें आणि मार्ग चालत नाहीं. मातुश्री येथें आहे व कन्या बाळंत जाहली आहे. तिचे सासेरची तूर्त टाकोन गेले. छडे लष्कर गांवांत आहेत. यास्तव मी कोठें जावें ! भावे

याजला पत्रें श्री॥ रा॥ चिंतामणराव आपासाहेबांचीं दोन आणून लाविलीं. त्याची ओळख करकंब माने यांणीं लुटिली तेव्हां भावे माने याजपाशीं होते. मंगळवेढ्याचें बोलणें त्याणीं केलें त्याजवरून पारिचय. याजवरून मग यजमानाचीं पत्रें आणून लाविलीं. ते बोलले कीं, ' माझ्यानें रक्षवेल तसें सांभाळीन. नाहीं तर पट्टी द्यावी लागेल असें ते बोलतात. रावसाहेबांसही पत्रें व राजश्री मोरोबा दादांस आणलीं. रावसाहेब मलाही सांगतात. परंतु आंतून सांगणें ठीक नाहीं असें भावे याणीं सांगितलें असा प्रकार आहे. स्थित पुण्याची राहिली नाहीं! कोणी कोणास भेटत नाहीं. पुसलें असतां सांगत नाहीं अशी गत आहे. दिवस जातो तो सुदिन! वडिलांचे पुण्येंकरून कल्याण होईल. हरनाथ व गणपतराव कंपूचे यांजला भाव्याकडून तीन पोषाख देऊन मनाई पट्टीची करावी असें योजिलें आहे. हा मजकूर ती॥ रा॥ अंताजीपंत जोशी व रा॥ बाळाजी विष्णु सहस्त्रबुद्धे यांजपाशीं बोललों. त्यांचे विचारें आश्रा सहस्त्रबुद्धेही आपले बाड्याचे असें करूं असें बोलले. त्यास उभयतांस घेऊन जाऊन भावे यास बोलतों. भावे पोशाख घेणार नाहीं. त्यास यजमानाचीं पत्रें देतात यास्तव. परंतु त्रिवर्गांस घेतल्यास पांचशें रुपये लागतील. कसें करून काम चालवितों आणि वडिलांस लिहून पाठवितों. न आणला तरी उपाय नाहीं. तूर्त आजपर्यंत भावे याणीं बांचाविलें आहे. कळावें. श्री॥ रा॥ त्रिंबकराव आपा याजला पत्र लिहून वडिलांचे पत्रांत घालून मोकळें पाठविलें आहे. त्या पत्राचा लाखोटा करून नांव वर लिहून कुरुंदवाडास पावतें करावयाविसीं आज्ञा करावी. त्यांचे वाडे मजकडे दोन आहेत त्याजलाही येविसीं लिहिलें आहे. उत्तर आणवून पाठवावें आज्ञा करावी. त्यांजला पांच सात पत्रें लिहिलीं, एकाही पत्राचें उत्तर नाहीं यास्तव वडिलांस लिहिलें आहे. उत्तर आणवून पाठवावयास आज्ञा करावी. आमदखान पठाण चांदवडाकडे गेले. मीरखान गारदोंडवर गेले. श्रीपंढरपूर व मंगळवेढें व सोलापूर प्रांतांत जातात. आसवेसिंग चार हजारनिशी निघोन वानवडीस गेले. नागो जिवाजी ( यास ) माने याणीं आपल्याकडे बोलाविलें तिकडे निघोन गेले. होळकर खासा व तीन कंपू मिळोन तीन हजार

जमाव येथें आहे. तोफखाना बडगांवानजीक भीमातीर येथें गेला. याजप्रों आहे. शिंद्याकडील आंबोजी इंगळे व गोपाळराव भाऊ वगैरे मंडळी पंचवीस हजार फौज व पंधरा वीस पलटणें बराणपुरास आली. खासा शिंदे नर्मदा उतरले नाहींत. पिरू आठ पलटणें शिंदे याचे मागें आठ मजलींवर आहे. इकडे येतात याजप्रमाणें बोलतात. उभयतां श्रीमंत बसईस आहेत. दोन पलटणें चाकरीस ठेविलीं आहेत. माने व नागो जिवाजी सर्वत्रांचे डोळ्यांत कर्नाटक प्रांत दिसत आहे. इकडे बाकी नाहीं, तिकडे मिळेल या समजुतीवर येतात. रा॥ आबाजी हरि किबे यांणीं पत्रें लिहिलीं आहेत त्यावरून सर्व कळेल. किबे वाड्यांत आहेत, बीस रोज झाले. तिकडे वडिलांजवळ व हरिपुरीं कुरुंदवाड तासगांव मिळोन फौज भरणा असावा. तीन महिन्यांची ओढ[1] आहे. कळावें बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५७१ श्री. (माघ व० २–८ फेब्रु.)

पौ॥ छ. २४ सवाल सु॥ सल्लास मयातैन.

विज्ञापना. श्री. राजश्री बाजीरावसाहेब यांचें पत्र छ. ११ सवालचें श्री. राजश्री रावसाहेबांस आलें त्यांतील मजकूर, आजपर्यंत जाहला कारभार तो बराच जाहला. इतःपर होळकराची संगत धरूं नये. तुम्ही व चि० राजश्री बिनायकराव उभयतां निघोन सत्वर आम्हांजवळ यावें. येविशीं छ० १७ रमजानीं पत्र पाठविलें आहे तें पावलें किंवा न पावलें यास्तव हें पत्र पाठविलें आहे. व याच तारखेस दुसरें पत्र पाठविलें आहे. दोहींतून कोणतें तरी पत्र पोचतांच निघोन यावें इतका मजकूर आहे. होळकर यांजकडे हुजरे यांची जोडी आली. त्याजबरोबर निरोप आला जे, रावसाहेबांस प्रतिबंध न करणें हें बर्तमान रावसाहेबांस समजलें व पत्र आलें तें होळकरास समजलें. रावसाहेबांनीं होळकराची + +[2] + रावसाहेब इशाऱ्यानें

---

१ तीन महिन्यानंतर पावसाळा सुरू होतो त्यामुळें लष्कराचे दंगे आपोआपच थांबतील असा भावार्थ. २ येथील मजकूर फाटला आहे. पटवर्धनांचा वकील बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे याचें हें पत्र पुण्याहून मिरजेस.

बोलले, याची शपथ तुम्ही करणें. म्हणोन सांगितलें. त्यावरोन त्यांची आमची बैठक छ. ३ सवाली बागेंत जाहली. तेव्हां ही गोष्ट काढली तेव्हां होळकरांनीं रुकार दिल्हा आणि हुजूर यांस जरबेनें बोललों म्हणोन सांगितलें आतां रावसाहेब यांणीं चमक खादली आहे. त्यास उदईक तुम्ही आम्ही जाऊन त्यांची खातरजमा तुमचे गुजारतीनें करतों म्हणोन बोलले. बरें आहे म्हणोन मी सांगितलें आणि निरोप घेऊन घरास आलों. रावसाहेबांस कागद आला हें होळकराचे बोलणेंत आलें नाहीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

किता पुरवणी.

विज्ञापना. छ. १५ सवालीं होळकरांच्या इशाऱ्याप्रमाणें मी श्री. राजश्री रावसाहेबाकडे गेलों. तृतीय प्रहरीं होळकरांची स्वारी डेऱ्यास आली. रावसाहेब, होळकर व मोरोबादादा व अन्याबा फडके व मी मिळोन बसलों. होळकरांनीं बोलणें काढलें जे, आपणांस संशय हुजूर यांचे बोलणेचा आला. त्यास येविशींचें बोलणें मी हुजूर यांस बोललों तें सर्वांनीं ऐकिलें. पटवर्धनाकडील बाळाजीपंत यांस सांगितलें, मजकडून आपणाविशीं वगैरे मंडळीविशीं वालाग्र वांकडें व्हावयाचें नाहीं. याजवर रावसाहेब यांणीं इशारा करून बिचोब्याचे पाठीमागें गेले. होळकरांनीं माझा हात धरून मलाही बरोबर नेलें. त्रिवर्ग बसलों. नंतर रावसाहेब यांणीं मला इशारा केला. नंतर मी उठोन दादांजवळ येऊन बसलों. रावसाहेब यांणीं श्रीमंतांचें पत्र आलें होतें तें होळकरास दाखविलें. पत्र वाचून मागती पहिले बैठकेस आले. नंतर सफाईचीं बोलणीं परस्परें जालीं. आम्हीं येथून कूच करून चार मजली जावें असा इंग्रजांचा नेट आहे. त्यापेक्षां शहराजवळ राहणें ठीक नाहीं. यांजवरच कारभार टाकून कूच करावें. बरोबर रावसाहेब यांस घेऊन जावें याप्रमाणें ठरलें. येथून कूच दिनशुद्ध पाहून करावयाचें त्यास आठ पंधरा दिवस लागतील असें वाटतें. इतकें बोलणें होऊन चार घटका रात्रीस होळकराची स्वारी डेऱ्यास गेली. नंतर मी निरोप घेऊन आलों. सविस्तर स्वामीस कळावें म्हणोन लिहिलें आहे. मागाहून निदर्शनास येईल तें लिहीन. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ६५७२      श्री.      ( माघ ब० ३–९ फेब्रु. )

पै॥ छ० १७ सवाल सल्लास मय्यातेन माघमास.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री गंगाधरराव स्वामी गोसावी यांसी.

सेवक परशराम श्रीनिवास प्रतिनिधि नमस्कार विनंती. उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये लिहित जावें. विशेष. तुम्ही पत्र पाठविलें तें पावलें. बाईहून कन्येस आणावयाचें त्याचे रहदारीचे दस्तकाविशीं[1] लिहिलें. त्यावरून दस्तक व जासूद रवाना केले आहेत. रवाना छ० १६ सवाल मुरू सन सल्लास मय्यातेन व आलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

———

नं. ६५७३      श्री. ( तालीक[2] ) ( माघ ब० ७–१४ फेब्रु )

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति[3] स्वामीचे सेवेशीं.

विनंती सेवक दौलतराव शिंदे कृतानेक विज्ञापना, तागायत छ० २१ सवाल स्वामीचे कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. सांप्रत श्रीमंतांचे दौलतींत बैदा होऊन नवीन प्रकरणें उपस्थित जाहलेयाचें स्वामींच्या श्रवणांत आलेंच असेल. ऐसीयासी सेवकास संकट पडलें असतां स्वामीनीं दूर करावें व स्वामीस पडलें असतां सेवकांनीं उद्योगपुरस्सर होऊन संकट निवारण करावें हें विहित व याप्रमाणें पूर्वीपासोन घडत आलें. तेव्हां स्वामीनीं येविशीची योजना केली असेल. सूचनार्थ विनंती लिहिली आहे. त्यास पोक्त जमावनिशीं हरएक सरदारांस रवानगी करून बऱ्हाणपूरचे सुमारें पोहचतें केलें पाहिजे. आम्हीही पोक्त जमावनिशीं बराणपुरानजीक येऊन पोहचलों. एक दोन रोजीं शहरास[4] जाणें होईल. स्वामीकडीलही फौज सत्वर येऊन पोहचे तें घडावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.[5]

---

१ दस्तक = जकातीच्या कराची माफी देणारी चिठी. २ तालीक= नक्कल. ३ करवीरकर. ४ शहर – औरंगाबाद व बऱ्हाणपूर यांनाच फक्त पूर्वी शहरें म्हणत असत. ५ दक्षिणेंतील पुष्कळ सरदारांस बाव अर्थाचीं पत्रें शिंद्यांनीं पाठविलीं तीं आम्ही गाळलीं आहेत

नं. ६५७४. श्री. (माघ व. ७ – १४ फेब्रु.)

पै॥ छ. २१ सवाल सुरु सन सलास मय्यातैन व आलफ.

सेवेशीं साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे, दिल्लीहून आखबर आली तिची नक्कल करोन अलाहिदा पाठविली आहे. त्यावरोन तिकडील सविस्तर सर्व ध्यानांत येईल. येथील वर्तमान तर, शहरांत महाप्रळय होऊन प्राणिमात्रास पट्टीमुळें उपद्रव जाहला आहे तो पत्रीं बयान लिहितां येत नाहीं. आजपर्यंत लहान मोठे गृहस्थ व सावकार व वाणी उदमी कापडकरी व मुत्सद्दी याजपासोन तीन पट्टया घेतल्या. नंतर घरें व दुकानें व वाडे फोडून वित्तविषय व कापड वगैरे भांडें कुंडें घेऊन गेले. नंतर घरांत व दुकानांत व वाड्यांत व रस्त्यांत हिंडतां फिरतां दशग्रंथी व पंडित आदिकरोन वाणी उदमी व ब्राह्मण जो सांपडेल तो धरून नेऊन लष्करांत मार देऊन तसेही रुपये घेतले! नंतर शहरांत लहान मोठ्या गृहस्थांच्या व वाणी उदमी सावकार यांच्या घरास खणत्या लावून जें सांपडेल तें नेतात! सरासरी हजार आठशें घर खणिलें. मारानें वगैरे तसदीनें ब्राह्मण वगैरे पंचमेळ जातींचें मनुष्य सरासरी शंभर दीडशें मेलें! सरकारचे उपाध्ये वीरेश्वर दीक्षित करवे हे मरतां मरतां मेले! दोन रोज मुडदा पडला होता. नंतर तेलंगांनीं नेऊन अग्न दिली. स्त्री बरोबर जात होती तिला पठाणांनीं जाऊं दिलें नाहीं. लाख रुपयांचा फडशा करोन घेऊं, नाहींतर बायकोस घेऊन जाऊं म्हणोन पठाण आडोन बसले आहेत! शिंद्याकडील सरदार गोपाळराव रघुनाथ व आंबोजी इंगळे फौज व कंपूसुद्धां थालनेरपर्यंत फौजा आल्या आहेत. शिंदे बहादूर व पीरन फौज व कंपुसुद्धां हंड्याच्या घाटावर आहेत. तेही लौकरच बराणपुरास येऊन दाखल होणार. दिल्ली व हांसी प्रांतांहून लोई फिरंगी कंपू व फौज घेऊन निघाले आहेत तेही लौकरच शिंदे बहादूर याजपाशीं दाखल होतील. शिंदे बहादूर यांची कुल जमीयत फौज व कंपूसुद्धां पाऊण लक्षाचा आजमास आहे. खानदेश अथवा गंगातीर प्रांतीं लौकरच येतील. शिंदे बहादूर यांची हुशारी जलदी पाहोन होळकर यांणीं थोरला जिनसी तोफखाना व महम्मदखान व मीरखान यांजबरोबर वीस हजार फौज व कंपू देऊन बहादुर याचे फौजेचे

मोहऱ्याबर रवाना केले ते नगरानजीक पोहोचले. होळकरास कर्नाटक प्रांतीं झाडून सरंजामाबर सरकारांतून बराती दिल्या आहेत त्यांच्या वसुलास होळकरांकडील माने व घोरपडे व पठाण गेले आहेत. पुढें मिरज प्रांतींहि उपद्रव करणार याजकरितां स्वामींनीं फौजेची मजबुती करोन घरांत सर्वांनीं एक चित्तें होऊन दहा बारा हजार फौज एकदील ठेवून होळकराच्या फौजेचा मोहरा राखावा. होळकरांनीं सरकारचे सरदार विंचूरकर व राजेबहादुर वगैरे झाडून बुडवून सरकारची दौलत गारद करोन दिल्हें हें ध्यानांतच आहे. याजकरितां सर्वांनीं एकचित्त होऊन दहा बारा हजार फौज मजबूत ठेवून होळकराच्या फौजेचा मोहरा राखला तर उत्तम आहे. फौजेबद्दल खर्च पडेल तो महालाबर उगवावयास येईल परंतु फौजेची कमती असो नये. नाहीं तर होळकराच्या फौजेच्या चित्तांत जे मिरज प्रांत बेचिराख करोन पुढें रास्त्याकडील बागलकोट, अथणी व बदामी वगैरे गारद करावी, हें लक्ष येथून खासे होळकरसुद्धां आहे. त्यास सर्व विषय स्वामींच्या ध्यानांतच आहेत. आम्हास कृपिया समजलें तें लिहिलें आहे. श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब वसईस इंग्रजी चार पलटणांसुद्धां आहेत. तुंगभद्रेकडील एक कंपू बोलाविला आहे त्याच्या सामलातीस पटवर्धन मंडळी फौजसुद्धां असावें म्हणोन बाजीराव सो यांची सूचना गेली आहे. तिकडून कंपू आला म्हणजे बाजीरावसाहेब व कंपू एक होऊन व शिंदे अशी सर्व फौज एकत्र होऊन होळकरांचें पारपत्य करावें हा बेत त्यांचा आहे. भोसल्याचा व शिंद्याचा पेटा एक होऊन भोसल्याची फौज पंचवीस हजार चार मजला अलीकडे आली. येथें भोसल्याकडील कारभारी उभयतां होते ते सरकारचा व होळकराचा निरोप घेऊन गेले. बडेखान ममईहून अद्याप आले नाहींत व तिकडील बोलण्याचा मजकूरही कांहीं समजत नाहीं. होळकरांकडील पठाण रात्रौ शहरांतील घरें लुटून नेत होते त्याचें पारपत्य होळकरांनीं उत्तम प्रकारचें केलें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

———

नं. ६५७५ श्री. ( माघ ब० ७-१४ फेब्रु. )

पै॥ छ० २१ सबाल सुरु सन सलास मयातेन व आलफ.

सेवेशीं साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे, बडे खान यांस येथून ममईस इंग्रजांकडे बोलण्याकरितां पाठविलें होतें. त्यास येथील बोलण्याचा विषय सोडून इंग्रजांकडे प्राचीन चाकरीवर बडेखान राहिले, हें वर्तमान सरकारांत आलें. भोंसले यांचे कारभारी निरोप घेऊन शहराबाहेर दोहों कोशांवर राहिले होते तेव्हां होळकरास कोणी समजाविलें जे, शहरांतील गृहस्थ यांजबरोबर निघून जातात. त्यावरोन त्यांच्या गोटाचा झाडा घेऊन मग कूच करोन गेले. फत्तेसिंग माने यांणीं होळकरास लिहिलें जे. या प्रांतीं प्रतिनिधी व रास्ते व पटवर्धन वगैरे मिळोन जमाव भारी आहे याजकरितां कुमकेस फौज पाठवून द्यावी. त्यावरोन होळकर यांणीं राजश्री नागो जिवाजी यांस दहा हजार फौजेनिशीं मान्याचे मदतीस पाठविलें. ते बा॥ २ जेजुरीहून कूच करोन सालप्याचे घाटानें मान्याकडे जाणार व अक्कलकोटकर भोसले व मुरापूरकर बेरड यांजवर सरकारांतून बराता होळकरास दिल्ह्या आहेत त्याच्या वसुलास मीरखान पठाण दहा हजार फौजेनिशीं गारपिरावर गेले. पुढें त्या प्रांतीं जाऊन दंगा करावा म्हणोन निघोन गेले. सारांश, प्रतिनिधींचा तालुका व मिरजप्रांत व रास्त्याकडील तालुका या प्रांतें दंगा होळकराचा बहुत होणार. त्यास जेणेंकरून तालुक्याचा बचाव होऊन नक्षा राही तो अर्थ करावा. हें सर्व स्वामींच्या ध्यानांतच आहे. येथील वर्तमान कर्चेपर्कें दरबारचें नित्य कृत्याचें राजश्री बाळाजीपंत सहस्रबुद्धे यांणीं सेवेशीं लिहिलें आहे त्यावरोन विदित होईल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. श्रीमंत मातुश्री यशोदाबाई रायगडासच आहेत. त्यांची भोजनाविशीं वगैरे साहित्याविसीं विनंत्य बहुत केली आहे. कळावें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५७६ श्री. (माघ व. ८-१५ फेब्रु)

पै॥ छ० २८ सवाल. सलास मयातैन. माघ.

सेवेशीं सा॥ नमस्कार विज्ञापना. ता॥ छ० २२ शौवलपावेतों स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. येथील वर्तमान तर, उज्जनीकडील खबर आली नाहीं. आल्यानंतर सेवेशीं पाठवितों. दक्षिणे-

कडील इंग्रजी पलटणें तुंगभद्रेतीरीं येऊन बसली सो॥ यांणीं कारकून राजश्री रामचंद्रपंत आपा याजकडे पाठविला आणि म्हणतात जे, तुम्ही होळकराकडील कीं प्रधानाकडील हें सांगावें म्हणोन पुसतात. याप्रमाणें पत्र सदरहू मजकुराचें रा॥ बाळाजीपंत सहस्रबुद्धे यास आलें. त्यावरून श्रीमंत राजश्री रावसाहेब व होळकर व राजश्री मोरोबा दादा यांचे बिचार प्रथम दिवशीं सरकारच्या डेऱ्यांत होऊन दुसरे दिवशीं होळकराच्या डेऱ्यास रा॥ मोरोबा दादा व बाळाजीपंत वगैरे मंडळ जाऊन विचार होत होता. होळकरांनीं एक दो दिवसांनीं विचार करोन सांगतों म्हणोन उत्तर केलें. नंतर सायंकाळीं माघारे सरकारच्या डेऱ्यास येऊन श्रीमंत रावसाहेब व मोरोबा दादा व बाळाजीपंत व चिटणीस व मुजुमदार वगैरे रावसाहेब याजकडील एक दोघे गृहस्थ बसले होते. तेव्हां बाळाजीपंत यांणीं रावसाहेब यांस विचारलें जे, आम्हास काय तें सांगावें. त्यावरोन रावसाहेब यांणीं सर्व मंडळीच्या रुबरु (समक्ष) सांगितलें, बसली साहेबास तुम्ही सांगणें जे, आम्ही पंतप्रधानाच्या गादीचे चाकर आहोंत म्हणोन सांगणें. याप्रमाणें रावसाहेब यांणीं आज्ञा केली. येविशींचा कचा मजकूर बाळाजीपंतांनीं सेवेशीं लिहिला आहे याबरोन विदित होईल. होळकराची पटवर्धन मंडळीवर बद नजर होऊन फौजमुद्धां सरदार या प्रांतीं रवाना केले आहेत, त्यास प्रतिनिधी व रास्ते व गोखले वगैरे सर्व एकत्र होऊन बसलीसाहेब व आपण एक होऊन होळकराच्या फौजेचा मोहरा राखावा आणि प्रांताचा बचाव करावा. शिंदे बहादर व पिरू फौज व कंपूमुद्धां ×× जांबच्या घाटानें नर्मदा उतरोन आले. पुढें बराणपुरास लौकरच येणार. आघाडीस रा॥ गोपाळराव व आंबाजी इंगळे वगैरे सरदार आले आहेत. त्यांच्या फौजा व पेंढार चांदवड प्रांतीं येऊन दंगा विशेष मांडला आहे. दक्षिणेकडून इंग्रजी पलटण व उत्तरेकडून शिंदे बहादर येत आहेत. म्हणोन होळकर यास विचार पडला आहे. श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब इंग्रजी पलटणेंसुद्धां बसईहून निघून महाडास येणार. आबा काळे व मनोहरगिर गोसावी शिरगडी आहेत. पुण्यापर्यंत घाट बंद करून रस्ते बंद केले आहेत. होळकर यांची दरबारावर बदनजर आहे. कोणे समयीं काय घडेल याचा

भरंवसा नाहीं व येथिल खाशासुद्धां परिणाम शुद्ध दिसत नाहीं! सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५७७ श्री. (१६ फेब्रु.)

पै॥ छ० २८ सवाल सल्लास मय्यातैन माघ मास.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी त्रिकाल चरणावर मस्तक ठेऊन शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ माघ वद्य ९ पावेतों बालकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडीलीं पत्र मला व ती॥ रा॥ अंताजीपंत काका याजला पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. रास्तेचे पेठेंत होळकराकडील लाला गोसावी आहेत पैकेयारस्तव त्याचेकडील कारभारी रा॥ आनंदराव कोतवाल आहेत. लालाकडून पंचवीस प्यादे व कारकून घेऊन प्रातःकालीं तीन घटका दिवसास आपल्या वाड्यांत आले. दरवाज्यावर तीन प्यादे व शिद्दी दोन होते. त्यांचें त्यांचें बोलणें होऊं लागलें. आंत येऊं देत ना. गड्यानें मला सूचना केली व अन्याबास केली. त्यावरून आम्ही व रा॥ भ.ऊ जोशी सौ॥ चिमा आकाचे भ्रतार असे मागील वाटेनें गेलों. प्यादे भिंतीवरून आंत आले. चिरंजीव रा॥ विठलपंत डोय करीत होते ते सांपडले व ब्राह्मण आकाचा तेही ऐसे दोघेजण धरून नेले. भावे याजकडे मी व अन्याबा व रा॥ बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे त्यांजकडे गेलों. बोलणें जाहलें. किरकोळ जाग्याची पट्टी उरकावी. चाहाड भारी. किती सांभाळावें? असें (बोलले.) मग आम्ही बहुत बोललों. नंतर त्यांणीं पंचवीस सिद्दी देऊन वाड्यांतील प्यादे उठवून लाविले. कारकून मात्र धरून नेला. हें लाला गोसावी यांस कळलें नंतर विठोबास मारहाण केली. बाजल्यांत पाय घालून उलटें बाजलें केलें! दोन घटिका तसे होते. नंतर चौघांनीं तेथील सांगून सोडिलें पाहाऱ्यांत बसविलें. भावे यांणीं दोन तीन वेळां परमानगी पाठविली. सोडलें नाहीं. सायंकाळीं मागती विठोबास तम्मी करावी हें समजलें. बातमीस गडी होते. नंतर भाव्यासीं बोललों. परिणाम ठीक नाहीं हें समजोन तीस रुपये कारकुनीं देऊन मग त्यांणीं

बिठोबास भावेकडे पाठविलें. त्याचा कारकून त्याणीं सोडिला. त्याचा कारकून सांपडला नसता तर हजार रुपयेपर्यंत पडोन अपेष्टा जाली याहीपेक्षां जाजती होती! श्रीमंत रा॥ त्रिंबकराव आपासाहेब यांजकडील वाडा व पागा मजकडे आहे. त्याजविशीं दंगा. त्यास श्रीमंत रा॥ त्रिंबकराव आपास पत्र लिहून वडिलांचे पत्रांत मोकळें घातलें आहे. हें लाखोटा करऊन त्याजकडे कुरुंदवाडास पावतें करावें यासी आज्ञा करावी. हलवाई यांचें दुकान व सदाशिव पेठेंतील जाग्याचे पट्टीचें उराकितों. काल नूर्त पांचशें रुपये भावे याजला दिले आहेत. त्यांचें लक्ष आपल्याकडे आवघ्याकडे आहे. पांच शिद्दी चौकीस बसविले आहेत. रोज सव्वा रुपये देत आहें. कळावें. श्रीमंत उभयतां बसईस आहेत. तीन पलटणें आहेत. मान्ये व पठाण व नागो जिवाजी वगैरे त्या प्रांतीं जात आहेत. सर्वांच्या दृष्टी त्या प्रांतीं आहेत. शहरांतील वर्तमान प्रलयकाळ आहे! श्रीहरि कृपा करील तेव्हां चुकेल. पट्ट्या घेतात. घरें लुटितात. (बाहेर) जाऊं देत नाहींत. हाणमार चाप बायकाही धरून नेतात! रस्तेनें फिरण्यास भय अनेक उपद्रव आहेत! वडीलांस कळावें. दोनशेंपर्यंत रुपये मिळाल्यास हुंडी करीन आणि प्राण जगवूं! कळावें बहुत काय लिहिणें. सेवेसीं श्रुत होय. हे विज्ञापना.

---

नं. ६५७८ श्री. (नकल) (माघ व. १०–१७ फेब्रु.)

पौ. छ० २४ सवाल.

पुण्याचे पुरवण्यांतील हासील.

जयरामपंत जोशी याची घोडी थोर दोन तट्टू एक रजू[2] तीन एकूण पांच होळकरांनीं नेलीं.

होळकरांचा तोफखाना बेळगांवचे मार्गे गेला. दोन पठाणांचे हात होळकरांनीं तोडिले. शंभर घोडीं पागेस लाविलीं. कंपूकडील लोकांनीं उपद्रव

---

१ लाला गोसावी याचा कारकून भावे यांनीं अटकेंत ठेविला होता तो.
२ अक्षर न लागतां पुढें रजू असें लिहून तें दुरस्त करण्याची पूर्वी वहिवाट होती.

शहरांत केला सबब दोघांचे कान कापले. लोकांचीं घरें खणोन मारहाण चाललीच आहे

राजश्री मोरोबादादाचे भाचे राजश्री बळवंतराव पिंपळखरे व माहादाजीपंत कारकून यास दादांनीं सांगितलेवरून होळकराकडे जाऊन सोडवून आणिलें.

बडेखान मुंबईस गेले तेथेंच राहिले. रघुत्तमराव यांची नजर बाकडी सबब त्याचें पथक होळकरांनीं चाकरीस ठेविलें.

राजश्री बाबा फडके गेले ते होळकराचे इशारेनें गेले. चौकडे चार बंडें उभीं असावीं.

भोसलेकडील कारभारी होळकराचा निरोप होऊन चालते जाहाले. छ० १६ सवालीं जेजूरास गेले. शिंदे अद्याप नर्मदा उतरले नाहींत. कारभारी तूर्त आंबोजी इंगळे. पिरू अद्यापि शिंदेजवळ आला नाहीं. शामतखान पठाण नाशिकचे रोखें जात आहे. गुजरात प्रांतें जाणार असी बोलवा आहे. मीरखान पंढरपुराकडे वगैरे दिनचर्येस गेले. इडसरचे किल्लेस चक्रदेव यास आणावयास फौज पलटणें होळकरांचीं गेलीं. कर्नाटकप्रांतें पोट भरावयाची जागा सर्वांचे मनांत वागते. यास्तव स्वामींनीं एकदील सर्वांनीं असावें.[2]

---

नं. ६५७९ श्री. [ माघ व० १०-१७ फेब्रु. ]

पौ॥ छ० २४ सवाल सुरु सन सलास मयातेन व आलफ.

विज्ञापना.[3] छ० १३ सवालीं होळकराची स्वारी गोविंदराव निळकंठ यांचे बागेंतील बंगल्यांत आली. नंतर मला बोलावणें आलें. मीही तेथेंच गेलों. एक प्रहर बैठक जाहली. बोलण्यांतील भाव, गादी चालती करावी असें ठरलें. नंतर राजश्रीकडून वस्त्रेंही आणविलीं. पुढें समयास येणें तुमचें न जाहलें. बंदेगानअल्ली[4] याचे घरांत दुफळी,

---

१ हा निजामाचा सरदार हा इंग्रजांचा द्वेष करीत असे. २ पत्र अपुरें सांपडलें. ३ बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे याचें पत्र पुण्याहून मिरजेस. ४ निजाम.

भोसले मोंगलाचे पट्टयांत. उभयतां श्रीमंत यांणीं इंग्रजांचा आश्रा केला. शिंदे याची आमची जुरूस लढाई मारून चार महिने होत आले. कोणास कोणी मिळत नाहीं तेव्हां याचा विचार कसा ? मीं उत्तर केलें, हे अंदेशे प्रथम तुमची आमची भेट होऊन दोन तीन बैठका जाहल्या त्या समयींच उत्तरें निरुत्तरें मी केलीं परंतु आपण दूरंदेशीं मनांत नं आणितां विनायक माधवराव याचे नांवें शिक्का चालवावा असा सर्वांचा आग्रह पडून मला बलावून रुकार घेतला. हल्लीं दूरंदेश मनांत आणून बोलतां. नबाबाकडील येथें रा॥ आनंदराव आखबारनीस आहेत. केवळ मुखत्यारी मजकडे नाहीं असें तो बोलतो. असें असतां रुकार सर्वांचे घेतले तें राजकारण थिजलें. आपले हातीं राजकारण राहिलें नाहीं. आपला शिलशिला उभयतां श्रीमंताकडे चाललाच आहे. आपण थोर सरदार गादीजवळ आले असतां बंदोबस्त न झाला. भोसले नबाब यांचीं राजकारणें दुलग. तेव्हां तुम्ही आपला बचाव करून जाणार. इंग्रजांच्या दरम्यान गतीनें तुम्ही आपला समेट करून घेणार. तेव्हां आम्ही तुम्हांस मनसबा सांगावा तो कोणता ? अशा खुणेच्या गोष्टी बोललों. तेव्हां इंग्रजांचा वकील कर्णेल कलुष हल्लीं बसईस आहे त्याजकडील कायस्थ येथें होळकराजवळ आहे त्यास बोलावून आणिलें व विकट फिरंगी टोपीकर होळकराकडील कंपूचा सरदार त्यासही बलाविलें आणि उभयतांस माझ्या समक्ष विचारलें,, आमचे तहाचें बोलणें लागलें आहे त्यांत पटवर्धन रास्ते यांचें कलम आहे की नाहीं ? तेव्हा त्यांणीं रुकार दिल्हा. कलमबंदीची याद करणेल कलुष याजकडे गेली आहे. त्या यादीवर श्रीमंत रा॥ बाजीरावसाहेब यांचा करार व इंग्रजाची साक्ष होऊन आली म्हणजे यादीची नक्कल तुम्हास देतों. एक वेळ जेजुरीच्या मुक्कामीं तुमच्या कारकुनास जबानीं अक्षरें बोललों आहे त्यांत मजकडून अंतर पडावयाचें नाहीं ही खातरजमा असावी. इंग्रज दरम्यान गतीस आहेत त्यापेक्षां तहाप्रमाणेंच श्रीमंतांचाही तह न करावा तर येथें बसोन फळ नाहीं, गादीचा बंदोबस्त होत नाहीं. इंग्रजाचें घरीं दौलत जाते असे अर्थ आहेत. शिंदे यांचें राजकारण भोसले याजकडे चाललेंच आहे.

---

१ जुरस. २ घर्ष. ३ तोंडी वचन.

त्यांच्या कारभाऱ्यांस निरोप जाहला. त्याजपासून बेलभंडार घेतला. आपण त्यांस दिल्हा जे, तुम्ही शिंदे यास मिळूं नये. (तें) त्यांणीं कबूल केलें. आम्ही एवढी फौज घेऊन आलों, लढाई मारली असें असतां आम्हांस कोणीच सामील झाले नाहींत. यास्तव तह करणें प्राप्त. तुम्ही जुवामर्द आहां. दौलतीचें शरीक. तुमचें श्रीमंत पूर्ववत्प्रमाणें इंग्रजांची दरम्यानगत आहे त्यापेक्षां चालवितील असें वाटतें. तुमची खातरजमा नसल्यास आम्ही श्रीमंत रा॥ रावसाहेब वगैरे मंडळी आमच्या भरंशावर आहे त्यांस घेऊन हिंदुस्थानांत जाऊं. राजश्रींनीं वस्त्रें दिल्हीं तीं बरोबर आहेत व श्रीमंत रा॥ विनायकरावही बरोबरच आहेत. तुम्हीं यावें. मी उत्तर केलें, आपण म्हणतात त्या गोष्टीप्रमाणें आम्ही श्रीमंतांच्या पदरचे. गादीचे चाकर. महाल, मुल्ूक, किल्ले, कोट, गांव, खेडीं, स्वदेशीं कुटुंब थोर, केवळ आपणासारिखे फकस्त[1] नाहीं. तेव्हां आपली जागा सोडून हिंदुस्थानांत आपणाबरोबर गादीचा अनादर करून कोणाचे म्हणून तुम्हांबरोबर यावें ? तेव्हां या गोष्टीस त्यांणींहि रुकार दिल्हा. बरें आहे, श्रीमंत गादीस येतात, त्यांचीही चाल समजते. कांहीं विपर्यास दृष्टीं पडल्यास आम्ही सर्व प्रकारें रा॥ रामचंद्रराव आपा यांस बडील बंधु म्हणविले आहेत त्यापेक्षां तसाच प्रसंग दृष्टीस पडल्यास मजजवळ यावें. श्रीमंत रावसाहेब यांच्या मनांत खतरा[3] आहे त्यांस उदैक आम्ही तुम्हास बोलावणें पाठवितों, तुम्ही आमचे सोबती. त्यापेक्षां उभयतां मिळोन रावसाहेब यांची खातरजमा करूं. या अन्वयेंच बोलणीं घरोब्याचींच जाहलीं. सविस्तर आपणांस लिहून कळवावें म्हणोन सांगितलें. त्यावरून स्वामींस विस्तारेंकडून विनंति लिहिली आहे. उत्तर समर्पक यावें. इंग्रजांकडे तहाची याद गेली आहे त्याचा इशारा कलकत्यास कलपाकडून गेला आहे. आज पंचवीस रोज जाहले. आठां रोजीं उत्तर येईल असें इंग्रजांकडील वकील बोलतात. कलम त्यांत लिहिलें गेलें आहे याचें उत्तर काय देतें हाही आंदेशा आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

———

१ सोबती, आधार. २ सडे, ३ संशय, मळमळ.

नं. ६५८०　　　　श्री.　　　　( माघ व० ११-१८ फेब्रु. )

पै॥ छ० २५ सवाल सल्लास मय्यातैन.

सेवेसीं बाळाजी बाजी सां॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ. २५ सवालपर्यंत वर्तमान क्षेम असे. विशेष. विशाळगडकर प्रतिनिधि फौजसुद्धां कराडकर प्रतिनिधि यांचे कुमकेस आले. त्यांच्या भेटी खानापुराजवळ होऊन विशाळगडकरी माघारे लष्करांत आले. बळवंतराव फडणीस यास खानापुरांत कैद केला हें वर्तमान विशाळगडकर प्रतिनिधि यांस समजलेवर कूच करून बुधवारीं सायंकाळीं विट्याचे मुक्कामास आले. बळवंतराव फडर्णीस यांणीं आपणाकडील कारकून राजश्री फत्तेसिंग माने याजकडे पाठविला. माने यांणीं तह बिघडला म्हणोन कराडकर यांस सांगोन पाठविल्याचें वर्तमान बाजारीं बोलतात. घडेल तें खरें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५८१　　　　श्री.　　　　( माघ व० ११-१८ फेब्रु. )

सेवेसीं विनंती सेवक बाळाजी महादेव दामले. चरणावर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ० २५ सवाल पावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. तेथें आज्ञा जे, होळकराकडील फौज व पेंढारी कोणते ठिकाणीं आहेत, कोणिकडे जाणार, याची बातमी सविस्तर लिहून पाठविणें म्हणोन आज्ञा. ऐसियास मीरखान व शामतखान पठाण व पेंढारी हे मुलुक लुटीत मान देशांत ठाणें दिलीव म्हसवड येथपर्यंत आले आहेत व नागो जिवाजी शेणवी पेंढारी व फौज दहा हजारसुद्धां नीरेच्या पुलानजीक देऊर माणकीवर मुक्काम आहे. पुढें कोणत्या मार्गें इकडे येतात न कळे. श्रीमंत रा॥ पंत सचीव यांजवर दोन लक्षांचा रोखा होता. पंत भोरहून पळोन गेले. नागोजी यांणीं भोर लुटून आणिलें. पांच लक्षांचा रोखा वाईवर आला आहे. याजमुळें वाई ओस होते आहे. श्रीमंत रा॥ राव रास्तेही निघोन जाणार. रा॥ चतुरसिंग राजे भोसले दोन हजार जमावानिशीं मातान्यास

---

१ हें अठराव्या कमाविसदाराचें मिरजेस पत्र.　　२ पत्र रहिमतपुराहून मिरजेस.　　३ द्रव्य मागणाऱ्या लष्करी हुकूम.

ऐ. ले. सं. ११.

शह देऊन शहरांत बसले आहेत. त्यांचा उपद्रव या प्रांतांत भारी आहे. दोन आसामी येथें ठेऊन घेतली आहे. मागाहून कळेल तें सेवेशीं लिहीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५८२. श्री. (फाल्गु. शु॥ १ – २२ फेब्रु.)

वै॥ छ. १ जिल्काद फाल्गुन मास सन सलास मयातेन.

* सेवेशीं बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ. २९ सवाल मंगळवार प्रातःकालपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींकडून छ. १२ सवालीं पत्रें रवाना जालीं त्या अलीकडे पत्र येऊन तिकडील वृत्त कळत नाहीं. त्यास वरचेवर पत्रें रवाना व्हावीं. इकडील वर्तमान राजश्री दौलतराव शिंदे रेवा तीरीं मर्दानीच्या घाटास आल्याचें पेशजीं लिहिलेंच आहे. छ. ४ सवालीं नर्मदा उतरावयास प्रारंभ केला. चौदा दिवसांत नर्मदा दक्षिणतीरीं फौजसुद्धां आले. दरमजल खरगुणपत्तिदीच्या मुक्कामास येऊन तेथून छ. १२ सवालीं आंबाजी इंगळे यांणीं रा॥ यशवंतराव होळकर यांस पत्रें पाठविलीं. त्यांतील मजकूर राज्यांत बेदा जाला. तुम्हांकडील दोन गृहस्थ मातबर मुखत्यार व तुमच्या बोलण्याची याद लिहून पाठवून द्यावी. बोलणार येतील त्यांनीं मागतीं तुमचा उजूर धरूं नये असे पाठवावे. आम्ही आपल्या यजमानाकडून दहा हजार फौजेनिशीं पुढें येतों. तुमचे बोलणार येतील. त्यांचीं आमचीं बोलणीं होऊन समेट होऊन राज्यांतील बेदा मोडावा हेच अर्थ आहेन. त्याजवरून होळकर यांणीं रा॥ नागो जिवाजी यांस बोलवावयाचें पत्र पाठविलें आहे. ते आल्यानंतर महाराजनिल्हेचीं व रा॥ गोपाळराव गोविंद गाडू या उभयतांची रवानगी इंगळ्याकडे करावी असें ठरत आहे. शिंदे बगगपुरास येणार. पुढें येत नाहींत. आजपर्यंत शिंदे पिरूची वाट पहात होते परंतु जयपूरवाल्यांनीं हिंदुस्थानांत बेदा केला सबब पिरू तिकडे राहिला. त्याजकडील पलटणें मात्र आलीं. लोई फिरंगी चार पल-

---

* पत्र पुण्याहून मिरजेस. बाळाजीपंत हा पटवर्धनांकडून होळकराकडे गेलेला वकील.

टणांनिशीं शिंद्याबरोबर आहे. पायदळ फौज मिळोन चाळीस हजारांचा अजमास आहे. शिंदे यांजकडील पेंढारी यांणीं संगमनेर जोरवें वगैरे महालीं जाळपोळ मांडली आहे. सारांश, रयतेस त्राता प्रस्तुत कोणी नाहीं! सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५८३  श्री.  (२५ फेब्रुवारी.)

छ. ७ जिल्काद. सन सल्लास मय्यातैन.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी त्रिकाल चरणांवर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता॥ फाल्गुन शु॥ ४ पावेतों बालकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील पट्टीचा उपद्रव वगैरे चिरंजीव रा॥ विठ्ठलपंत मराठे याजला धरून नेऊन बाजूयामध्यें पाय घालून अबल केलें. दरबार खर्च करून मग सायंकाळीं सुटून आल्याचें पेशजीं लिहिलें आहे. त्यास श्रीमंत रा॥ चिंतामणराव आपासो॥ यांणीं रावसाहेबांस व होळकरास व भावे याजला (पत्रें) पाठविलीं. रावसाहेबांचीं पत्रें दिल्हीं. तीन वेळां आलीं तितकीं दिलीं. प्रथम पत्रीं भावे याजला पट्टी न मागाविसीं सांगितलें परंतु तगादा न चुके. मग दुसरे पत्र आल्यावर दिल्हें. मग भावे ऐकत नाहीं, तुम्ही होळकराशीं बोलणें असें उत्तर रावसाहेबांनीं केलें. भावे बोलले कीं, शिंदेमुळें परवानगी देतात परंतु कोणास पट्टी सुटली नाहीं, तुम्ही कशास पत्रें देतां? ते हरीपुराहून मला पत्रें येतात तीच मान्य त्यास बाड्यास पट्टी घेत नाहीं, दुकान व किरकोळ इमारती यांचे तंटे उलगडून टाकणें अथवा हरनाथ व विठ्ठलपंत यांस पोषाख द्यावे म्हणजे चांगलें. नाहीं तरी ठीक नाहीं, असें भावे बोललेवरून मगपावता विचार ठीक नाहीं. भावे याजला पांचशें रुपये शिक्का दिल्हे. ऐवज समयास न मिळे. मग रा॥ आबाजी हरि किवे याजपासून घेऊन दिल्हे. पैका न द्यावा तरी भावे मुख्त्यार. ते मस्तीवरून सांगतात, न ऐकावें तरी पैकाही देऊन अंगाचा नाश करून घ्यावा हें समजोन मग पांचशें दिल्हे! येविशीं सविस्तरें मजकूर श्रीमंत रा॥ चिंतामणराव आपासाहेबांस लिहून पाठविलें आहे. सावकाराचा ऐवज देणें, त्यास कांहीं हुंडी मागाहून करतों व हरिपुराहही

करतों. मुंबईत अग्न लागोन मांडवीचे बंदरावर आग लागली ती किल्ल्यांत देखील अग्न गेली. इंग्रजासारखे मुद्दाम लावून विझविणार परंतु बारा तीन रोज बहुत सुटला (त्यामुळें) त्यांचा यत्न चालला नाहीं. किल्ल्यांतील इंग्रजांचा मात्र वाडा राहिला. बाकी झाडून जळाले. सात आठशें माणूस मेलें. गुरें बहुत तीन हजारपर्यंत मनुष्य आगीनें ठिगाळलीं आहेत. पुण्यांतील दंग्यामुळें सावकार वगैरे गेले ते तेथें सर्व हुत जाहले! प्राणांनीं वाचलें. याप्रमाणें सावकारी व सरकारांत सर्वांचीं लिहिलीं आलीं. नाश दहा कोटीवर तेथें जाहला असें बोलतात. वडिलांस कळावें. बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५८४ श्री. (नकल.) (फाल्गु. शु. ४ – २५ फेब्रु.)

छ० ७ जिल्काद सन सलास मयातेन. शास्तमान.

सेवेशीं बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता।। छ० २ जिल्काद भृगुवार प्रातःकालपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींकडून छ० १२ सवालीं पत्रें रवाना जालीं. तीं छ० ८ मिनहूस पावलीं. त्या अलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं त्यास बरचेवर पत्र रवाना होऊन वृत्त कळविलें पाहिजे. रा।। दौलतराव शिंदे छ० १९ सवालीं बऱ्हाणपुरास येऊन दाखल जाले. दिनचर्येची ओढच आहे. रा।। यशवंतराव होळकर यांणीं काल गुरुवारीं शहराजवळून कूच करून देरवडेचे मुक्कामास गेले. जेजोरीस जाणार. शहरच्या बंदोबस्तास कंपू एक, हजार स्वार, हरनाथ व सरकार निसवतीनें हरिपंत भावे. पुण्यांतील क्रम पूर्ववत्प्रमाणें चाललाच आहे. वे।। रा।। वैजनाथभट भागवत यांणीं आपल्या खंडाचा फडशा करून छ० २७ सवालीं न पुसतां निघून गेले. रा।। चिंतोपंत देशमुख मीरखान याजपाशीं आहेत. रा।। परशुरामपंत वैद्य यांणीं दोन लक्षांचा पठाणांचा हवाला पेठेबद्दल घेतला होता. त्याजपैकीं लाख रुपये पटले. बाकी लाख राहिले. त्याजबद्दल मशारनिल्हे दास पठाण बरोबर घेऊन गेले. शिकारपूरचे मुमारें आहेत. सिंहगडकर

---

१ पत्र पुण्याहून मिरजेस.

यांणीं दीड हजारपर्यंत बेरड ठेविले आहेत. बाटा मारतात. शहरांत दरवडे घालतात. मनोहरगीर गोसावी दोनशें लोकांनिशी शिवापूरच्या सुमारें आले होते. तेथें आरबांची गांठ पडली. लढाई जहाली. त्यांत मनोहरगीर गोसावी गोळी लागून ठार जाहले असें बोलतात. श्रीमंत रा।। मोरोबादादा मंगळबारीं आपणांकडे यावयाकरितां चालते होणार. वाईस जाऊन श्रीमंत रा।। माधवराव रास्ते यांची भेट घेऊन पुढें येणार असें ठरलें आहे. समागमें मी येतों. सेवेशीं श्रुत हे होय विज्ञापना.

———

नं. ६५८९ श्री. ( फाल्गुन शु० ४-२५ फेब्रु. )

छ० १० जिलकाद सन्न सल्लास मय्यातैन. फाल्गुन.

शेवेसीं साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २ जिलकाद पावेतों यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं पत्र पाठविलें तें छ० १ मिनहूस पाऊन लिहिला मजकूर सविस्तर कळला. येथील वर्तमान तरी, दिल्ली कडील आखबार आल्यानंतर शेवेसीं प्रविष्ट होईल. बराणपुराकडील वर्तमान तरी, शिंदे बाहादूर बराणपुरीं दाखल जाहाले. राजश्री आंबोजी इंगळे व गोपाळराव चिटणीस फौज व कंपूसुद्धां चांगदेवास दाखल जाहले. रामचंद्रराव व सदाशिबराव[1] हे आघाडीस येऊन चांदवडच्या किल्यास बेढा घातला आहे व त्याकडील पेंढार गंगातिरास येऊन सिं-र वगैरे प्रांत लुटून जाळून टाकला! राजश्री येशवंतराव होळकर छ० १ मिनहूस प्राचीन तळावरोन कूच करोन संगमावर पुण्यानजीक मुक्काम केला आहे. तेथून जेजुरीस जाणार. होळकराकडील शहरचे रखवालीस हजार स्वार व एक कंपू व हरनाथसिंग आहेत. वैजनाथभट यांणीं खंडाच्या ऐवजाचा फडशा करोन युक्तीनें सिंव्हगडास गेले व चिंतोपंत देशमुख व परशराम नारायण वैद्य याजकडील खंडाच्या ऐवजाचा फडशा जाला नाहीं म्हणोन पठाणांनीं लष्करांत बराबर नेले आहेत. माघ ब।। १० ममईचे किल्यांत आग्न लागून हजार बाराशें घर जळून लाखो रुपयांचा माल जळून चारपांच हजार मनुष्य जळालें! शिवाय दोन तीन हजार मनुष्य जाया जालें. फकस्त इंग्र-

१ रामचंद्र भास्कर व सदाशिव भास्कर हे बंधु.

जाचा वाडा मात्र राहिला. पुरंदरकर व सिंहगडकर यांणीं घेरड ठेऊन घाट व रस्ते बंद करोन पुण्यापर्यंत दंगा मांडिला आहे. सरकार तर्फेनें पुण्याचा कारभार रा॥ हरिपंत भावे याजकडे आहे. त्याचा मार्ग घरें खाणावयाचा व बेआबरू करोन रुपये घ्यावयाचा चाललाच आहे! श्रीमंत राजश्री मोरोबादादा यांची तयारी होत आहे. लौकरच आठ सौ राजांनीं निघून तिकडे येतील. राजश्री बाळाजीपंत दादा सहस्रबुद्धे व मी त्यांच्या बरोबर स्वामींच्या दर्शनास येतों. गुजराथ प्रांतीं गायकवाड यांचें कडीचें ठाणें सुरतकर इंग्रज यांणीं घेतलें होतें. त्यास कान्होजी गायकवाड याणीं पुन्हां कडीचें ठाणें घेऊन हजार पांचशें लोक इंग्रजाकडील कापून काढले! बरकड वर्तमान येथील अविकोत्तर त्याहावें असें नाहीं. पुढें होईल तें सेवेसी लिहूं. शहरांत पट्टीचा दंगा जाहला याजमुळें येथील मातबर गोसावी निघोन स्वामींच्या आश्रयास मिरजेस आले आहेत त्यास स्वामींनीं अभय देऊन संरक्षण करावें. येविसी चि॥ बाळाजी काशी किबे. विनंती करतील. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५८६ ( फाल्गुन शु. ७-२८ फेब्रु.)

उतारा—धोंडो बापूजी जोशी याचें पत्र पुण्याहून मिरजेस

" ममई जळालियाचें पेशजी लिहिलें होतें त्यास साबकारी लिहिलीं आलीं कीं साडे पांच हजार घरें लहान थोर जळालीं. माल बहुत जळाला. कोस्त्यावघीचा नाश झाला! ईश्वरी क्षोभ जाहला. श्री॥ सौ॥ ताईसाहेब व काकूसाहेब लष्करांत श्री॥ राजश्री रावसाहेबाजवळ होत्या. ते शु॥ ७ सोमवारीं प्रहर दिवसास सरकारवाड्यांत येणार, अशी बोलवा आहे. ... ... ... पुण्यांत बाकी कांहीं राहिली नाहीं. घरें बोसाड पडलीं आहेत. कुलुपें मात्र आहेत तीं उघडून दाणावैरण पागास होळकर याचे व रावसाहेब याजकडे नेतात. शिवाय कद्या करून सेवन्नास घरीं कोणाचे गवत गाई घोड्याचें असल्यास घेऊन जातात. कालदर्शकरून श्रीहरीचे कृपेनें पट्टी मना होऊन गांवांतील बैदा मोडला तर दाण्या-

---

१ बाबाजी हरि किबे याचें पत्र पुण्याहून मिरजेस.

वैरणीची महर्गता बहुत होईल. दोन पायली धान्य मिळणार नाहीं. कडबा गवत रुपयेस दोन पुले मिळेल न मिळे अशी भ्रांत वाटत्ये. श्रीमंत उभयतां वसईसच आहेत. कोठें कोणांत तूर्त जीव नाहीं. दैत्य माजले आहेत! श्रीहरि पारिपत्य करील तो सुदिन!"

---

नं. ६५८७ श्रीगणपति. (फाल्गुन शु. ७ –२८ फेब्रु.)

पै।। छ० ५ जिल्काद सन सलास मयातैन व अलफ फाल्गुन.

+ अपत्यें रामचंद्रानें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम ता।। छ० ५ जिल्कादपावेतों यथास्थित असे. विशेष. रा. फत्तेसिंग भोसले यांचें पत्र अक्कलकोटाहून आलेलें काल पाठविलें आहे. त्यास त्याणकी पत्र पाठवावयाचें आपले विचारें आल्यास आपलें पत्र पा।. येथूनही पत्र देऊन रवाना करूं म्हणोन आज्ञा. ऐशियास भोसले यांची माझी वोळख नाहीं. वडिलीं लिहिलें म्हणजे झालें. आपले पोटांत आम्ही आहोंच. विदित होय हे विज्ञापना. हल्लीं माने यांचा मुकाम कोठें आहे? पेंढार पठाण यांचा नागजेपर्यंत उपसर्ग लागल्याची वार्ता इकडे आली आहे. हे विज्ञापना.

---

नं. ६५८८. श्रीगणपति. (फाल्गु. शु।। ४ – २५ फेब्रु.)

छ. ५ जिल्काद सन सलास मयातैन. फाल्गुन.

* अपत्यें रामचंद्राचे शिरसा।। नमस्कार विज्ञापना ता।। छ. २ जिल्काद पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. रा. सखाराम थोरात बाळेवकर यांणीं सरंजामाची चाकरी सरकारांत करावी ते करत नाहींत. व त्याजकडे दरबार खर्चाचा ऐवज देणें त्याचा निकाल होत नाहीं. याजकरितां त्याचे तालुक्याची जप्ती करावी म्हणोन सरकारचीं पत्रें आलीं आहेत. त्याजवरून तालुक्याची जप्ती करून जप्तीचें काम रा. हरी विष्णु याजकडे सांगितलें आहे. तरी मिरज प्रांतांत थोरात यांचे नेमणुकेचा ऐवज आहे त्याचा

---

+ रा.म. आपाचे पत्र जमखिंडीहून मिरजेस. * राम. आपांचें पत्र जमखिंडीहून मिरजेस.

बसूल हरी विष्णु यांजकडे देणें. येविशीं गांवगना ताकीद जाहाली पाहिजे. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६५८९ श्रीगणपतिर्जयति. (फाल्गुन शु. ८–१ मार्च.)

छ० ६ जिल्काद सन सलास मय्यातैन व आलफ. फाल्गुन.

अपत्यें चिंतामणीनें शिरसा. नमस्कार विज्ञापना. ता। छ० ६ जिल्काद बर्तमान क्षेम असे. विशेष. मंगळवेढ्याहून काल अस्तमानीं पत्र आलें त्यांत पठाणांचा मु॥ मांजरीवर आहे. सुभानराव माने सांगोल्यास आहेत. पठाण दोन वेळां चालोन आले. परस्पर लढाई जाली. पठाणांनीं हल्ला केली होती ती माने यांणीं मारून काढली. पठाण माघारे मुक्कामास गेले. मंगळवेढ्याचे रानांत कंई[1] आली होती. किल्ल्यांतील लोक बाहेर जाऊन उंट सात व दोन तटें व सहा बैल येणेप्रमाणें बळून आणिलें म्हणोन लिहिलें आहे. आणखी येईल वर्तमान तें सेवेसी लेहून पाठवीन. माने रेटेंं यावरच आहेत. सेवेशीं विदित होय. हे विज्ञापना.

---

नं. ६५९० श्री. (फाल्गुन शु. ८ –१मार्च.)

पै॥ छ० १० जिलकाद सन्न सल्लास मय्यातैन. फाल्गुन.

सेवेसीं साष्टांग नमस्कार विज्ञापना. छ० ६ जिलकादपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान तर, दिल्ली व उज्जनीकडील पत्रें आल्यावर सेवेसीं पाठवितों. राजश्री येशवंतराव होळकर कूच करोन फाल्गुन शु॥ ४ संगमपार सडे गेले. तेथून शु॥ ५ कूच करोन खास रिसाला व बाजारसुद्धां कवडीस मुक्काम केला. तेथून जेजूरीस जाणार. नंतर शिद्धटेकच्या मुमारें जावें असा बेत आहे. श्रीमंत राजश्री रावसाहेब शु॥ १५ करोन वाईस गंगास्नानास जाणार. स्वारीची तयारी होत आहे. श्रीमंत सौ॥ उभयतां बाया यांणीं सरकार वाड्यांत राहावें म्हणोन उभयेतांचे विचारें बेत जाहला आहे. दो चो रोजां वाड्यांत येऊन राहणार. शहरच्या रखवालीस होळकराकडील हजार स्वार व एक कंपू व

१ कंई=दाणावैरण गोळा करणारी लष्करी टोळी.

हरनाथसिंग आहेत. सरकारतर्फेनें राजश्री हरिपंत भावे शहरचे रखवाली करोन दिवसा रात्रौ घरें खाणून नेतात ! शिंदे बाहादूर यांची आघाडीची फौज जालने पैठणच्या सुमारास येऊन दाखल जाली. श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब वसईनजीक स्वस्थ आहेत. राजश्री बाबा फडके बेदरास दाखल होऊन तेथें नबाबाकडील राजश्री रघोत्तमराव येऊन परस्परें बोलणीं होणार. त्यास तेथीलहि विचार बोलण्याचा मागाहून सविस्तर विनंति लिहीन. ममईच्या किल्ल्यांस माघ ब॥ १० आग्न लागून आडीच तीन हजार घर जळालें. चार पांच हजार मनुष्यें जळून मेलें. दोन तीन हजार मनुष्य जाया जाहालें. खासा इंग्रज वाडा मात्र राहोन बाजत ( इतर ) शहरांतील वाणी उदमी वगैरे इंग्रजांचा नाश दाहा पांच कोटींचा जाहाला. राजश्री मोरोबादादा आज डेऱ्यादाखल जाहाले. वाईस जाऊन मिरजेकडे येणार. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५९१ श्री. ( फाल्गुन शु. ९–२ मार्च. )

पै॥ छ. ७ जिल्काद. फाल्गुन.

विज्ञापना* छ० १९ सवालचीं पत्रें नासिकाहून बातमीचीं आलीं. त्यांतील मजकूर आघाडीस शिंदे याजकडील दहा हजार पेंढार आलें, त्यांणीं चांदवडापासून संगमनेर × × × खोऱ्यासुद्धां गारद केलें. भिल्ल व कोळी जमाव येऊन रस्ता नासिकापासून सिन्नर पावेतों निभावत नाहीं. व शिंद्या-कडील फौज व पलटणें पारोळ्याहून खंडण्या घेऊन कासारबारीनजीक चांद-वडच्या किल्ल्यास शह देऊन पेठसुं॥ घेरा घातला आहे. शिंद्यांकडील फौजेचा जोर भारी होत चालला आहे. होळकराकडील फौज चांदवडास होती ती व आणखी दोन तीन हजार जमा करून पांच सात हजार फौजि-निशीं रामचंद्रपंत कमावीसदार त्या प्रांतीं सरसुभे केले. तव चिमणाजीपंत व धोंडो माणकेश्वर असे चांदवडाहून कूच करून शिंद्याकडील ठाणीं थोडीं बहुत बसवीत गेले. त्याजवर शिंद्याकडील लोकांवर चालोन गेले. ते माले-गावपासून चार कोस वाढोन गेले. तेथें शिंद्याकडील पेंढारी यांणीं दौड

* आबाजी हरि लिम्याचें बातमीपत्र.

करून होळकराकडील फौजेवर येऊन पडले. दोन तीन हजार घोडे लुटून धोंडो माणकेश्वरास माल्याच्या तीन जखमा भारी लागोन झोळींतून मालेगावास आणिलें. तेथून चांदवडास येऊन फौज बरकड पळोन चांदवडास गेली. मागाहून रा॥ गोपाळराव रघुनाथ चिटणीस याजकडील फौज व पलटणें व सदाशिवराव बक्षी यांजकडील फौज व पलटणें मालेगांवनजीक चांदवडच्या सुमारें आली. खासा शिंदे व इंगळे दर मजल येत आहेत. रा॥ काशीराव होळकर यांणी दरोबस्त रेवा दक्षिणतीरीं आपल्या माहलांत अंमल दखलगिरी करून तापीतीरास आहेत म्हणोन पत्रांत मजकूर आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५९२ श्री. नक्कल. (फाल्गु. शु. ९-२मार्च.)
पै॥ छ० ७ जिल्काद.

विज्ञापना. शिंदे नर्मदातीरास आले. कोणांस कोणी मिळत नाहीं. गादीचा बंदोबस्त नाहीं. तेव्हां याचा विचार कसा म्हणोन होळकरानीं विचारलें. शिंदे येतात त्यापेक्षां आम्हास त्याच्या मोहल्यावर जाणें जरूर. जे कोणी आम्हाबरोबर येतील त्यास बरोबर घेऊन जाऊं. पटवर्धनास आम्ही वचन दिलें आहे त्यापेक्षां तुमचा मनसबा कसा म्हणोन मला विचारलें. मीं उत्तर केलें, तुम्ही गादीचा बंदोबस्त व शिंद्याचा समेट करून राज्यांतील बेदा मोडीत असल्यास आम्ही हमराहा आहों. इतकेंच बोलणें होऊन होळकर निरोप घेऊन आपल्या डेन्यास गेले. उपरांत श्रीमंत रा॥ रावसाहेब व मोरोबा दादा व रा॥ हरिपंत भावे व मी दोन घटका बसलों होतों. तेव्हां सर्वांच्या मतें विचार ठरला जे, कांहीं आपल्या हातीं तोरा असावा यास्तव दादा व तुम्ही व हरिपंत भावे व मोरोपंत दातार उदेक होळकराकडे जाऊन याचा ठराव करून यावें. याजवरून आम्ही चौघेजण छ० २३ सवारीं होळकराकडे × × × गेलों. चार घटका बोलणें जालें त्यांत ठरलें जे, रावसाहेब व होळकर यांणीं कूच करून बाईंच्या सुमारें जावें. तिकडून

१ बाळाजी विष्णु सहस्त्रबुद्धे यांचें पत्र पुण्याहून मिरजेस.

पटवर्धन वगैरे सरदार व पंतप्रतिनिधी व गोखले आदिकरून फौजसुद्धां सातान्याच्या सुमारें यावें. इकडून आम्ही येतों. सर्वांच्या भेटी होऊन ठरेल तसें करावयाचें. याच दावाचे पोटीं राजश्री[1] हस्तगत जाल्यास आपल्या हातीं तोराही आला. + + + आहे असें ठरोन श्रीमंत रा॥ मोरोबा दादा यांणीं तिकडे जाऊन सर्वांस घेऊन यावें इतकेंच बोलणें होऊन आम्ही निरोप घेऊन रावसाहेब याजकडे आलों. पाठीमागून अस्तमानीं होळकराची स्वारी श्रीमंतांच्या डेन्यास दादास निरोप द्यावयाकरितां आली. मुहूर्त पाहून लवकर निघावें. याप्रमाणें ठरोन होळकर[2] माघारें गेले. नंतर दादांनीं मूळ नक्षत्रावर प्रस्थान ठेविलें. मंदवारीं मुहूर्त करून राहुटी भांबवड्याजवळ दिल्ही. तयारीस दोन चार दिवस लागतील. चालते जाहले म्हणजे मी बरोबर येतों. भेटीअंतीं सविस्तर श्रुत करीन. हें पत्र मनन करून होऊन स्वामी जवळच असावें. पटकणीं होऊं नये. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५९३　　　श्री.　　　( फाल्गुन शु. १०-३ मार्च. )

पै॥ छ० ८ जिलकाद सन सलास मयातैन फाल्गुन.

विज्ञापना[2]. रा॥ फत्तेसिंगराव माने यांणीं स्वामीस विनंती ल्याहावयाकरितां सांगितलें. कर्नाटक सर होऊन [3] तुकोजी होळकर देशीं येते समई दारू मिरजेचे किल्ल्यांत ठेव ठेविली आहे. त्याचा दस्त ऐवजही होळकर याजपाशीं आहे. त्यास दारूचें प्रयोजन आहे. दारू मागून घेणेविशीं रा॥ यशवंतराव होळकर यांणीं सांगितलें आहे. त्यास काय असेल ती देवावी अगर काय तो मजकूर लिहोन आपला पत्राचें उत्तर सत्वर यावें. येथून सरंजाम छकडे वगैरे दारू आणावयाकरितां पाठवावे. परंतु उत्तर आलेवर पाठवितों असें सांगितलेवरोन लिहिलें आहे. आज्ञा यावा. रा॥

---

१ सातारकर छत्रपति. २ नरहर विठ्ठल याचें पत्र मिरजेस. ३ स. १७८७ च्या एप्रिल मेमध्यें टिपूवरची दुसरी मोहीम संपल्यावर तुकोजी होळकर मिरज वाटेनें पुण्यास परत आले.: त्यावेळीं त्यांणीं मिरजेच्या किल्ल्यांत ठेवलेली दारू स. १८०१ साली यशवंतराव होळकर पटवर्धनांकडे परत मागत आहे।

बाळाजीपंत दामले रहिमतपूरकर यांस येक पत्र पेशर्जी पाटीलकीचें मान पान कानू काय शेतभात चालत आलीं असतील त्याप्रमाणें कोणे विशीं दिक्कत न घेतां चालवणें असें पाठवावें म्हणोन लिहोन पत्रें आणावीं म्हणोन सांगितलेंवरून विनंती लिहिली आहे. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६५९४ श्रीजगदंबाप्रसन्न. (फाल्गुन शु० १३-६ मार्च)

पै. छ. १८ जिल्काद सन सलास मयातैन फाल्गुन मास.

सेवेसी. अमृतराव* त्रिंबक कृतानेक सा. नमस्कार विज्ञापना. ता. छ. ११ माहे जिल्काद यथास्थित असे. विशेष. रास्ते यांचें लष्कर अक्कलकोटचे सरदेस आहे. अक्कलकोटकरांची यांची लढाई जाली. अक्कलकोटकरांचा मोड जाहला. दोन हत्ती पाडाव रास्त्यांकडे आले. व दोन चारशें घोडे लुटीचे लष्करांत आले. येणेप्रों वर्तमान आलें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६५९५ श्री. (७ मार्च)

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके १२९ दुंदुभी नामसंवत्सरे फाल्गुन शुद्ध चतुर्दशी इंदुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री ×राजा शिवछत्रपती यांणीं राजमान्य राजश्री गंगाधरराव गोविंद यांस आज्ञा केली ऐसी जे. राजश्री बाजीराव पंडितप्रधान व राजश्री दौलतराव शिंदे यांचीं विनंतीपत्रें हुजूर आलीं त्याजवरून खासा स्वारी त्यांचे पुरावेस होत आहे. तरी तुम्ही फौजमुद्रां निघोन हुजूर येणें. जाणीजे बहुत काय लिहिणें.

बार. सुरु. सुद. बार. संमत. सुद. बार. बार. मर्यादेयं विराजते.

पै॥ छ० १६ जिल्काद सन सल्लास मयातैन व अल्फ. फाल्गुन.

---

नं. ६५९६ श्रीगणपति. (फाल्गुन शु० १५-८ मार्च)

पै॥ छ० १३ जिलकाद सन सल्लास मयातैन व अल्फ.

---

* पेठे. हे त्रिंबकराव मामांचे चिरंजीव. पत्र पुण्याहून मिरजेस.
× करवीरकर.

× आपलें रामचंद्रानें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ० १३ जिलकादपर्यंत यथास्थित असे. विशेष. येडूरावर मुक्काम कधीं येणार म्हणोन आज्ञा. त्यास येकदिवशीं जागा पाहावयास म्हणोन रामपूर पावेतों गेलों होतों. दुसरे दिवशीं तेथें जावें असें होतें, परंतु निपाणकर यांचे मुळीकास गोखले यांणीं उपसर्ग बहुत केला असें वर्तमान आलेंवरून शिदोजी देसाई टाकोटाक ते प्रांतीं सडे गेले. बाजारबुणगें तोफा आंकलीजवळ ठेविल्या आहेत. आठ चार दिवशीं येतों म्हणाले आहेत. मग पर्वा रविवारीं सडे गेलों होतो. तों काडापूर चौबुर्जी आहे. ते गोळ्या मारूं लागले. तेव्हां पायउतारा लोक करून गांवास अग्र दिली. चार घटका परस्परें गोळी बाजली. नंतर कौलास आले. पार करून दिल्हेवर केदरावर गेलों. तों तेथें मजबुती बरीच होती. अस्त-मान जाल्यामुळें येक कोसावर मागें येऊन पाण्यावर राहिलों. दुसरे दिवशीं तयार होऊन गेलों. तों बहिरजी शितोळे यांचे गुजारतीनें कौल देऊन ठाणें स्वाधीन केलें. येकसंबेचे माळावर जाऊन अडीच प्रहर दिवसास गोटास आलों. कळावें. रा॥ धोंडोपंत बापू हुपरीकर यास फारच समाधान नाहीं म्हणोन चिरंजीव रा॥ बाबांनीं लिहिलें आहे. ईश्व-राची इच्छा काय आहे कळेना! तीर्थस्वरूप मातुश्री बयाबाई मंगळ-बेढ्यास येऊन मला लिहिलें होतें. आणावयाचा विचार केला तों तीर्थ-स्वरूप मातुश्री लक्ष्मीबाई काकूचें पत्र आलें जे, सोलापुरास पाठवून दिली. तें स्थळ चांगलें आहे आणि रा॥ पांडुरंगराव बाबा तेथें आहेत. सुवत्ता पाहून आणावयास पाठवितों. पठाणांचे फौजेचें अलीकडे वर्त-मान आलें असेल. आज्ञा करावी. माने कोठे आहेत? बहुत काय लिहिणें विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६५९७ श्रीगणपति. (फाल्गुन व० ३-११ मार्च.)

छ० १६ जिलकाद सन्न सल्लास मयातेन. फाल्गुन.

---

× राम. आपांचें पत्र मिरजेस.

*अपत्यें रामचंद्राचे शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० १६ जिलकादपावेतो यथास्थित असे. विशेष. वाडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. ऐसियास त्याचीं उत्तरें बीतपशील कलमें—

१ गोखले कोण्या मुकामीं आहेत ते ल्याहावें. त्यास गोखले यांचा मुक्काम मुलर्कटें कसबें येकोर्डा येथें आहे. शिमगा तेथें करणार. कित्तुराकडे बाकी आहे ती घेऊन पुढें आजेरें चांदगड याकडे जाणार. म्हणोन गोकाकचें पत्र छ १४ जिलकादचें आलें. आणीक पत्र आल्यावर लिहितों कलम १.

१ राजश्री बाळकृष्णपंत लागू आपला निरोप घेऊन गेले ते सिरटीस जाऊन पत्र आलें कीं कळवावें. ऐसियास मशारनिल्हे निरोप घेऊन गेल्या तागायत पत्र आलें नाहीं. आल्यावर लिहितों. कलम,

इंग्रजांचीं पलटणें हरीहरास आलीं म्हणोन ऐकितों. त्यास बातमी आली असल्यास ल्याहावें. ऐसियास राजश्री अंताजी गोपाळ फडके यांचें पत्र मेढलराहून आलें. त्यास मशारनिल्हे मिरजेस आहेत त्याजला आणून विचारावें म्हणजे सांगतील त्याजवरून विदित होईल. कलम १.

१ बळवंत काळे यांनीं वर्तमान विपरीत ऐकितों. निधान पावले म्हणून. त्यास तपशीलवार लिहावें. त्यास अद्याप पक्कें समजण्यांत आलें नाहीं. समजल्यावर लिहितों. आज कोणी कोणी आले त्यांणीं तपशील सांगितला. ईश्वर इच्छा प्रमाण ! कलम १.

पठाणांचा मुक्काम सिगनळीवर आलेचे वर्तमान आलें. म्हणोन हरीपुराहून वर्तमान आलें म्हणोन लिहिलें तें कळलें. आणीक बातमी आल्यावर लिहून कळवावी मिरज प्रांतांत शिरणार याची पैरवी चिरंजीवांनींX काय केली आहे तें समजलें नाहीं. कलम १.

——— पांच कलमावरून विदित होईल. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

---

* राम. आपांचें पत्र मिरजेस. X चिंतामणराव आपा सांगलीकर यांनीं.

नं. ६५९८ श्री. (फाल्गुन शु. १३–१३ मार्च.)

पौ॥ छ. १४ जिल्काद. सन मयातेन आलफ.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामींचे सेवेसीं.

विनंति× सेवक बाळाजी महादेव दामले. चरणांवर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता॥ छ. ११ जिल्कादपर्यंत स्वामींचे कृपेंकरून कसबें रहिमतपूरचें व सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. रा॥ नागो जिवाजी याचा पांच हजार फौजेनिशीं मौजे कटापुरास मुक्काम जाहला आहे. बरोबर पेंढार आहेत ते गांव लुटतात. शिवाय रोखे होऊन खंडण्या घेत आहेत. शाळीचे पिकें कापून नेतात याप्रमाणें लष्कराचा उपद्रव जाहला आहे. रा॥ चतुरसिंग भोसले याच्या खंडण्या व मुधोजी नाईक रामोशी याच्या खंडण्या असा बहुत उपद्रव आहे. कसबें मजकूरचे रखवालीस रा॥ नारायण मान पाटील शंभर स्वारांनिशीं लष्करांतून आले आहेत व रा॥ फत्तेसिंगराव माने याचीं पत्रें दरच्यादर येतात. स्वार दररोज शिवारांत उभे राहतात याजमुळें आजपर्यंत बचाव आहे. स्वार रखवालीस आल्यामुळें खर्च फार पडतो. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६५९९ श्रीगणपति. ( फाल्गुन ब० ५–१३ मार्च.)

पै० छ० १८ जिल्काद सन सलास मयातैन.

विज्ञापना. आज प्रातःकाळींच वर्तमान आलें जें, हुपरीवरील कांहीं स्वार वेडेहाळास आले. चार सहा घटकांनीं वर्तमान आलें जें, केरूरास गोळागोळी होती. त्याजवरून रामजी जाधव याजब॥ शंभर स्वार व दोनशें पेंढार देऊन समाचारास पाठविलें ते कापशीपुढें गेले. तिकडून त्याची फौज चालून आली. तें सामान फार; हे थोडे. निघोन नसलापुराजवळ दम खाऊन सायंकाळीं त्याची फौज माघारी येकसंबेवर मुक्कामास गेलेवर हे आले. येथूनही वर्तमान कळतांच काही तुकडेव व पेंढार पाठविले तें कापशीकर घोरपडे यांचे वाडीस जाऊन चंद्रोदयीं आले. त्याचा मानस गांठ घालावी असा आहे. वडिलांचे आशीर्वादें होईल तें लिहीन.

---

× पत्र रहिमतपुराहून शिरजेस.

मुतर स्वारांबरोबर पठाणांकडील मजकूर लिहिला तो कळला. थैली वगैरे पाठविलें प्रो पावली. आज दौलतराव शिंदे यांजकडून पत्र माझे नांवें आलें आहे. चिरंजीवाच्या मजकूर पत्रांतील आणि हा येकच आहे म्हणोन पाठविलें नाहीं. +

---

नं. ६६०० (फाल्गुन व. ७ – १५ मार्च.)

उतारा—धोंडो बापूजी जोशी याचें पत्र पुण्याहून मिरजेस.

" श्री॥ राजश्री अमृतरावसाहेब कूच करून लकडी पुलाकडे मुक्काम पाव कोशावर केला. होळकर सडे वाड्यांत आले. श्री॥ सौ॥ मातुश्री ताई-साहेब व काकूसाहेब या उभयतांचे पायावर डोकें ठेऊन वस्त्रें घेऊन निघोन गेले. रावसाहेब वाड्यांत आले नाहीं. राजश्री बाळाजीपंत पटवर्धन व सदाशिवपंत उगले याजकडून वस्त्रें देविलीं. होळकर जेजुरीस जाऊन मोरेश्वरास गेले. पुढें सिद्धटेकास जाणार. तेथें सर्व जमाव करून मग पुढें शिंद्याचे रोखें जाणार अशी वार्ता आहे. रावसाहेब आठ चार रोजीं कूच करून वाईस जाणार. पुण्यांतील सभोंवत्या व गांवामधून चवक्या होत्या त्या आजच झाडून उठोन गेल्या. सरकारच्या बसल्या. दोन कंपू व हरनाथ येथें आहे तो चार रोजीं जाणार. कळावें. शिंद्याकडून नागोजी गुंड होळकर याजकडे आला आहे. उभयतां श्रीमंत वसईस आहेत. "

---

नं. ६६०१ ( नकल ) [ फाल्गुन व० ८–१६ मार्च ]

छ० २५ जिल्काद सन्यातेन व अलफ.

साहेब मुरफक मेहेरबान करम फर्माय दोस्तां तवजउपतर

मोखालिसां रामचंद्रपंत आपासाहेब सल्मुल्लाहुताला. अज तर्फ जनरेल *वसलीबहादुर सलाम वाजत सलाम. मोहबत मलमूद आंकी. येथील खैरखुशी तागायत छ० २१ जिल्काद जाणोन आपसाहेबीं आपली शादमानी कलमी करून दिल ताजा करित असावें. दरी पेयाम. साहेब मुशा

---

+ पत्र अपुरें सांपडलें, पत्र राम. आपांचें मिरजेस. * ड्यूक आफ् वेलिंग्टन्.

बग्लन्देर ( ? ) आज बाळकिसनपंत भाऊ व मशारूल गोविंदराव याजबरोबर आसाहेबांनीं पत्र थैली पाठविलें तें पोहचून बहुत खुषी हसील जाहली. आतां साहेबांचे विषयीं कर्णेल कुलीस साहेबांनीं इंग्रजी पत्रें लेहून आंसाहेबांकडे पाठविली असे. त्याजकडे पाठवीतसें करावें. आणि साहेबाकडे कितेक सरदारासी पावते करण्याकारितां पांच थैल्या पाठविल्या असेत. याचा तपशील—

१ परशरामपंत प्रतिनिधि थैली
१ बापूजी विठ्ठल यासी थैली.
१ पांडुरंग बाबूराव यासी थैली.
—
३

१ माधवराव रास्तेस थैली.
१ जानराव निंबाळकरासी थैली.
—
२
३ तेरीज
—
५

ऐसे पाठविले असे. त्या त्यास सरदार कोणते जागीं आहेत कीं सदरहू थैली त्या त्यासी पावते करून जबाब आणोन पाठवीतसे मेहेरबानगी करावें. ज्यादा काय लिहिणें असे. प्यार मोहबत असो दीजे. हे कितावत.

---

नं ६६०२　　श्री.　(नकल) (फाल्गुन व ९--१७ मार्च.)
पै॥ छ० २४ जिलकाद सायंकाळ.

राजश्री रामचंद्रपंतआपा गोसावी यांस—

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य—स्नेहांकित सिदोजीराव नाईक निंबाळकर दंडवत विनंति. येथील कुशल तागायत छ० २२ जिलकाद जाणोन स्वकीय लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. इंग्रजांकडील वर्तमान तर, आम्हांकडील जासूद जोडी त्याचे लष्करांत ठेविली होती. गुरुवारीं संध्याकाळीं मनोळीस आला. त्याचें जबानींचें वर्तमान सोमवारीं देवगिरीचे मोकामास आले. मंगळवारीं कारगीडचे मोकामास आले. बुधवारीं तडसाचे मोकामास आले. दहा बारा पलटणें व दोन हजार तुरक स्वार आहेत. मजल दरमजल धारवाडास येणार असी वदंता लष्करांत आहे.

---

१ बाळकृष्ण हरी भेसकर. २ चाफेकर. ३ बारामतीकर. ४ आपा देसाई निपाणकर.

ऐ. ले. सं. ११.

बरोबर राजश्री विष्टोपंत× बदामीकर आहेत. राजश्री बाळकृष्णपंतभाऊ देवगिरीचे मुक्कामास पोंहोचले. गोखलेकडील लिंगो भगवंतहि आहेत. सावनूरकर खैरू+ मिया बरोबर आहेत. राजश्री हरीपंत बाबासाहेब पूर्णिमा होतांच तिकडे जातात असें सांगितलें होतें. परंतु आद्याप आले नाहींत. त्यास सत्वर पाठवून द्यावे. समय हाच आहे. तेथें कितीएक गृहस्थ आपले आपले कामाविसीं संधानें करतात. यास्तव सत्वर येऊन पोंहचावें हें उत्तम आहे. गोखले येणगीवरून कूच करून इंचनाळानजीक करकुंभीवर येऊन मोकाम केला. मुरगोड तालुकेंत उपद्रव करणेची बाकी कांहीं ठेविली नाहीं. कित्तूरकरांचे त्यांचे अद्याप तह ठरला नाहीं. समागमें राजश्री वेंकटरावहि आहेत. लोक व पेंढारी पाठवून देणेविसीं राजश्री सखोपंत बापू याजबरोबर सांगून पाठविले होतें. अद्याप पाठविलें नाहीं. पाठवून द्यावे. एक दोन स्वारी करून निभाऊन देऊं. राजश्री बाळकृष्णपंत भाऊकडे कारकून पाठविला आहे. बातमी येईल ती बरचेवर लिहून पाठवितों. बहुत काय लिहिणें लोभ करावा ही विनंति. *

---

नं. ६६०३. श्री. ( फाल्गुन व. १० – १८ मार्च. )

पै॥ छ० २६ जिलकाद. सुरु सन सलास मय्यातैन व अलफ.

÷ सेवेसीं विनंती सेवक बाळाजी महादेव दामले चरणांवर मस्तक ठेवून शिरसा नमस्कार विज्ञापना. ता॥ छ० २३ जिल्कादपर्यंत वर्तमान यथास्थित असे विशेष. लष्करच्या दंग्यामुळें पन्नास स्वार रहिमतपूर येथें मान्याकडील रखवालीस आहेत. होळकर यांजकडील नागो जिवाजी

---

× विष्टापा हे सावनूर प्रांतांत अतिशय मोठे सावकार होते. यांच्या स्त्रीनें स. १८०५ सालीं काशीयात्रा केली तेव्हां तेथें तिनें लाख रुपये धर्मादाय केला असा उल्लेख आम्हाला मिरजमळा दप्तरांत वाचावयास सांपडला. + हा सावनूरचा नबाब. * इंग्रजांचे मुक्काम कोठें व कसकसे होत गेले यासंबंधींचीं बरीचशीं बातमीपत्रें आम्हीं गाळलीं आहेत. हा तपशील इंग्रजी ग्रंथांतून छापलेला आतां पुष्कळ उपलब्ध आहे. ÷ पत्र रहिमतपुराहून मिरजेस.

याचा मुक्काम तारगांवावर होता. तेथून फड़ी रहिमतपुरच्या शिवारांत आली. तेव्हां रा॥ नारायणराव माने तयार होऊन फड़ी माघारी फिरविली ते समयीं कटकट जाहली. त्यांत इकडील दोन स्वार जखमी जाहले. तिकडील पाच सात जखमी जाहले. फड़वाले यांणीं शाळूचीं बुचाडें भरून नेलीं व शिवारांतील घोंगड्या पांघरुणें फार गेलीं. बुचाडें नेल्या जमिनीचा आकार अजमास पाहतां पांच सहाशें रुपये होतो. स्वारांस पेटगी द्यावी लागते. छ० २१ जिल्कादीं रा॥ नागो जिवाजी याचें कूच होऊन पुढें सावळीवर गेले. तेथून काल कूच होऊन कडेगांवाकडे गेल्याचें वर्तमान आहे. मल्हारजिल्हेचे लष्करांत वैद नियमित नाहीं. बेबंद कारभार. पिकेंसुद्धां गांव लुटितात. इकडील गांव खेड्यांची दशा राहिली नाहीं. रा॥ चतरसिंग राजे भोसले सातान्यास मोर्चे देऊन शहरांत होते. त्याजवर मुधोजी नाईक रामोशी याणीं छापा घातला. पंनास माणूस जखमी ठार होऊन चतुरसिंग भोसले शहरांतून फौजसुद्धां पळोन गेले. त्यांचा मुक्काम तांदुळवाडीवर आहे. त्यांचे रोखे होऊन तेहि लुटतात. सातारा शहरांत साठे यांचे वाड्यांत मुधोजी नाईक राहून शहरचा कारभार करून प्रांतांत रोखे करून खंडण्या घेत आहेत. माने यांचे स्वार गांवांत आहेत म्हणोन हा कालपर्यंत गांवाचा बचाव जाहला आहे. श्री॥ राजश्री मोरोबादादा व काशीराव रास्ते पुण्याहून मेणवलीस आले. बराबर आणखी गृहस्थ मंडळी फार आहे. रास्तेहि तेथेंच आहेत. श्री॥ रा॥ अमृतरावसाहेब यांची स्वारी दावयाची बोलवा आहे. होळकर जेजुरीस दर्शनास आले होते ते माघारे गेले. त्याजकडील हरकाजीपंत म्हणोन सरदार आहेत ते पांच हजारांनिशीं इकडे यावयाची बाजारबातमी आहे. सेवेशी विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६६०४		श्री.		( फाल्गुन ब. १०-१८ मार्च.)

सै॥ छ० २७ जिल्काद. सुरु सन सलास मयातेन व आलफ.

सेवेशी साष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता॥ छ० २३ जिल्काद पावेतों स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. पुण्यांत राहिल्यानें

प्राणाशीं संबंध, आबरूशीं गांठ म्हणोन निघणें प्राप्त पडलें. त्यास श्रीमंत रा॥ मोरोबादादा व रा॥ बाळाजीपंत सहस्रबुद्धे पुण्याहून निघोन मिरजेकडे जाऊं लागले. त्यांजबरोबर निघोन फाल्गुन शु॥ १४ शहराबाहेर आलों. तेथून त्यांच्या स्वारीबरोबर वांईस फाल्गुन ब॥ ३ आलों. वांईहून निघून स्वामींच्या दर्शनास येतों. दिल्ली व उज्जनीकडील डांक दों चौ रोजांत येणार आहे. आल्यानंतर पत्रें सेवेशीं रवाना करतों. श्री॥ रा॥ दादांची व माधवराव रास्ते यांची भेट फाल्गुन ब॥ ४ होऊन एक दोन बैठका जाहल्या. परस्परें सरकार आज्ञेप्रमाणें बोलणीं होऊन रास्ते सरकार आज्ञेस हजर आहेत. वर्षप्रतिपदेच्या सुमारास निघोन रा॥ दादा व रास्ते मिरजेकडे येणार. रास्ते यांजकडे शिबंदीचा गवगवा आहे म्हणोन दोन चार दिवस निघावयास आवकाश आहे. येतांना श्रीमंत रा॥ पंतप्रतिनिधि यांची भेट घेऊन त्यांशीं सरकार आज्ञेचा मजकूर बालोन पुढें मिरजेस येतील. आल्यानंतर परस्परें सविस्तर मजकूर समजेल. रा॥ यशवंतराव होळकर फाल्गु॥ ब॥ २ निघून पुण्यास गेले. श्री॥ सौ॥ उभयतां बाया फाल्गुन ब॥ ३ शुक्रवारीं वाड्यांत दाखल होऊन ब॥ ४ रविवार यशवंतराव होळकर यांस मेजवानी होऊन निरोपाचीं वस्त्रें देऊन ढाल तरवार दिल्ही. निरोपसमयीं सरकारवाड्यांत श्री॥ रा॥ रावसाहेबही आले होते होळकर यांनीं उभयतां बायांस पांच हत्ती व जवाहीर व पोषाख याप्रमाणें दोन लक्षी ( ? ) पोषाख दिला. नंतर निरोप घेऊन होळकर कोंडीस गेले. तेथून सिद्धटेकास जाऊन पुढें गंगातीरास जाणार. होळकराकडील राजश्री आनंदराव होळकर हजार स्वारानिशीं शहरच्या रखवालीस आहेत. सरकारच्या तर्फेनें रा॥ आबाजी त्रिंबक रखवालीस आहेत. हरनाथसिंग व शहरच्या नाकेबंद्याचे लोक होळकर यांनीं उठवून नेऊन शहरची बंदी मोकळी केली. श्रीमंत रा॥ रावसाहेब भांबवड्याहून कूच करून पर्वतीच्या पिछाडीस विठलवाडीस मुक्काम केला आहे. खासगत लग्नाची तजवीज होऊन सासवडास अथवा पुण्यास लग्न करावें हा बेत झाला आहे होळकर गंगातीरास गेल्यानंतर उभयतां श्रीमंत इंग्रजी पलटणें बरोबर घेऊन त्यांच्या जोरानें पुण्यास येऊन गादीवर बसावें हा बेत आहे. सारांश बाह्मणी राज्यांत

इंग्रजांची पैरवी ( देखरेख ) जाहली. रा॥ शिंदे बहादर चांगदेवाच्या सुमारें आले. आंबोजी इंगळे व गोपाळराव हे फौजसुद्धां चांदवडानजीक आले. अघाडीच्या फौजा गंगातीरास दाखल जाहल्या. आंबोजी इंगळे हे होळकराशीं सलुखाचें बोलणें करीत आहेत. परंतु सल्ला होणें दिसत नाहीं. रा॥ बाबा फडके यांच्या व नबाबाच्या भेटी होऊन एक दोन बैठका होऊन परस्परें बोलणीं होऊन पत्रें आलीं. त्यांतील विषय. नबाब, भोसले, व पटवर्धन रास्ते वगैरे सर्वांनीं इंग्रजास येऊं देऊं नये हा विचार नबाबाचा आहे म्हणोन दहा पलटणें व तीस तोफा नबाबाकडील परंड्यास येऊन दाखल जाहल्या. पुढें शिंदे होळकर यांचा विचार इंग्रजास दौलतींत येऊं देऊं नये असाच आहे. त्यास रा॥ बाबा फडके यांजकडून पत्रें बरचेवर येतात. त्यास श्रीमंत रा॥ मोरोबा दादा व बाळाजी विष्णु मिरजेस येत आहेत. आल्यानंतर सर्व विषय स्वामीस समजतील. स्वामींच्या दर्शनाचा हेत बहुत म्हणोन मी उभयतांबरोबर दर्शनास येतों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६६०५ श्री. (फाल्गुन व० ११–१ मार्च.)

पै॥ छ. २४ जिलकाद सन सल्लास मय्यातैन फाल्गुन मास.

विज्ञापना* रा॥ यशवंतराव होळकर व श्रीमंत रा॥ अमृतरावसाहेबसुद्धां श्रीपंढरीचे रोखें होणार. हालीं खासे पुण्यावर आहेत. फौज कवडीस आहे. परंतु पुढें मसलत मोंगल पूर्वी आपले संमतांत असतां हालीं इंग्रज प्रकर्णीं दौलतींत दौल दिसतो. त्यापेक्षां त्या रोखें होऊन तिकडील फौज जमाव परांडे याचे सुमारें आहे. त्याजवर जाऊन पडावें. ती उधळून मोंगलाईत खेड्यापाड्यांनी जाळपोळ लुटणें करून भागानगर पाहावें. × × या मसलतीस वर्ष सहा महिने पाहिजेत व इंग्रज व शिंदे इकडे येतात किंवा कोणता विचार करतात हाही समजेल. मोंगलाई तों बुडवावी. पुढें प्रसंग पडेल तसें करावें, हा बेत केला आहे. असें आज पुण्याकडील गृहस्त येथें मान्ये याजकडे आला त्याणें त्यास सांगितलें. घडतां घडेल तें खरें. दुसरें वर्तमान सातान्यास बाळाजी माणकेश्वर आहेत त्याणें राजश्रीस वैद केलें.

---

* नरहर विठ्ठल याचें पत्र मिरजेस.

दोन माणसें मात्र पहिले माणसांतले ठेवून बरकड बेगळीं केलीं. दुसरीं आपले तर्फेचीं माणसें चाकरीचीं दिल्हीं. शहरांत कांहीं घरें होळकराकडील यांचे लक्षींचीं होतीं तीं कैद करून जरबेनें किल्लेवर नेलीं. याप्रमाणें वर्तमान आहे सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६६०६ श्री. (फाल्गुन व० १३–२१ मार्च.)

पै॥ छ० २६ जिल्काद सन सलास मयातेन व आलफ.

विज्ञापना ऐसी जे. रा॥ फत्तेसिंगराव माने याचे कालच लष्कराहून पत्र आलें आहे कीं, दारूचें प्रयोजन आहे. तरी चार खंडी दारू तयार करून पाठवावी म्हणोन पत्र मुजरद आलें आहे. दारू न करावी तर आजपर्यंत गांव बचावला असतां एक काम सांगितलें तें केलें नाहीं. पैकाही दिल्हा असता. परंतु समयास काम न केलें असे खिलाफ येईल यास्तव विनंती लिहिली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६६०७ श्री. (फाल्गुन ब. १३–२१ मार्च)

पै. छ. २६ जिल्काद सन सलास मयातैन.

विज्ञापना. श्रीमंत सौ. ताईसाहेब व सौ. काकूबाई[१] छ. १६ जिल्कादीं संध्याकाळचे चार घटका दिवसास सरकारचे वाड्यांत राहावयासी आली. रा॥ बाळाजीपंत पटवर्धन व सदाशिवपंत बोगले समागमें आले आहेत. वाड्यापुढें होळकराकडील पाहरा होता तो उठवून नेला. शहराची नाकेबंदी आहे त्यांपैकीं कांहीं नाके गांवामधील होते. त्याच्या चौक्या उठविल्या. शहरचा कारभार रा॥ लक्ष्मणराव आन्या फडके यांसीं सांगून त्याचे हाताखालीं आबाजी त्रिंबक नि॥ आपा बळवंत यासी ठेवून होळकराकडील पांच हजार फौज व येक कंपू राहाणार याप्रों निश्चय जाला आहे. पुढें काय ठरेल तें लिहून पाठवीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ चिठी बाळाजी गणेश दामले याची रहिमतपुराहून मिरजेस. २ संदग्ध.

नं. ६६०८. श्री. (नक्कल). (फाल्गुन व. १३ – २१ मार्च)

पै॥ छ० २९ जिल्काद सन सलास मय्यातैन.

सेवेशीं बाळाजी विष्णु (सहस्रबुद्धे) कृतानेक सां॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २६ जिल्काद सोमवारपावेतों मु॥ वांई वर्तमान यथास्थित असे. विशेष. पेशजीं वांईस आल्याचा मजकूर लिहिलाच आहे. येथून श्री॥ राजश्री दादांनीं कूच करून स्वामीकडे यावयाचें त्यास सातारा नांदगिरी येथील बेरड व चत्रसिंग यांचा उपद्रव बहुत. रस्ते याजवळ सरंजाम आहे तो थोडा. वाटस निभावणी होणार नाहीं धास्तव दादांनीं स्वामीस पत्र फौज रहिमतपुरास आपलेकडील यावी म्हणोन लिहिलें आहे. त्याप्रमाणें पत्र पावतांच फौज रहिमतपुरास जलद यावी. म्हणजे दुतोंडी शह बसोन मार्गाची सुगमता होईल. पत्र पावतांच फौज रवाना व्हावी. आपली फौज रहिमतपुरास दाखल होयपर्यंत येथें मुक्काम करणें प्राप्त म्हणोन लिहिलें आहे. येविशीं श्री॥ राजश्री दादांनीं श्री॥ राजश्री चिंतामणराव आपा यांसही पत्र लिहिलें आहे. उभयतां मिळोन फौजेची रवानगी लौकर व्हावी. अनमान होऊं नये. भेटी अंतीं निवेदन करीन. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६६०९ श्री. (फाल्गुन व. १३ –२१मार्च).

पै॥ छ० २६ जिल्काद सन सल्लास मय्यातैन. फाल्गुनमास.

सेवेसीं +बाळाजी बाजी सा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २६ जिल्कादपर्यंत वर्तमान क्षेम असे. विशेष. स्वामींनीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. फत्तेसिंग माने यांचे लष्करचें कूच कोठारी व आबा बक्षी असे मिळोन वांगीच्या मुक्कामास गेले. हजार दीडहजारानिशीं सडे माने रेटरेच्या मुक्कामास आहेत. एक दोन दिवशीं त्यांचेही कूच होऊन जाणार. राजश्री नागो जिवाजी× यांचे लष्करचे मुक्काम कडे-

+ आप्पाच्या कमाविसदाराचें पत्र मिरजेस. × नागो जिवाजी हे जिऊबादादा बक्षी यांचे तृतीय चिरंजीव.

पूरच्या बोळ्यावर आहे. त्याजकडील रोख आम्हांकडील मौजे कुंडलेस आला आहे. त्याजविशीं येथून पत्रें लिहून कारकून पाठविला आहे. मग कसें होतें पहावें. नित्यानें वर्तमान कळवावें म्हणोन आज्ञा. त्यास आज्ञे-प्रमाणें निऱ्याचें वर्तमान येईल तें कळवितों. इंग्रजी पलटणें देवगिरीस आल्याचें येथेंही बोलतात. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं ६६१० श्री. (नक्कल.) (माघ शु० १–२४ फेब्रु.)
पै॥ छ २९ जिलकाद.

विज्ञापना. छ० १४ सवालीं मुंबईत पारशी याच्या घरास आग लागली. वायु सुटला. इंग्रजांनीं आग विझवावी म्हणोन बंद लाविले. परंतु इलाज चालला नाहीं. इंग्रजांचा रहाता वाडा मात्र राहिला. बाकी किल्ल्यांतील घरें झाडून फडशा! करोडो रुपयांचा माल जळाला गेला. पांचशें माणूस जळालें. चार पांच हजार माणूस जायां जालें. खेरीज जनावेंर. याप्रो सावकारांचें लिहिलें आलें होतें. बातमी खरी नाश बहुत जाहला. श्रुत होय हे विज्ञापना. पु॥ रा॥ बळवंतराव परांजपे इकडून कल्याणास अंमल बसविला. त्याजवर वसईहून रा॥ माधव बक्षे व हरि गणेश कर-मरकर याजबरोबर दीड हजारपर्यंत पाईचें माणूस व दोन गुराबा व पंधरा गलबतें सरंजाममुद्दां कल्याणचे खाडेंत गेलीं. तेथें परांजपे याणीं लढाई करून चार गलबतें शिकस्त केलीं. दीं दीडशें माणूस कापून काढिलें. दोनशें पर्यंत खाडेंत बुडोन बक्षे व करमरकर यांस धरोन कैद केलें. गुराबा व बाकीचीं गलबतें राहिलीं. तीं शिकस्त करून मागाहून सविस्तर लिहितों. म्हणून छ० २७ सवालचें प्रातकाळीं रवाना जालें तें छ: २८ मिनहूम काल अस्तमानीं आलें. त्यांत याप्रमाणें मजकूर आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६६११. श्री. ( फाल्गुन व. १४ –२२ मार्च. )
पै॥ छ० २७ जिलकाद सन सल्लास मयातैन. फाल्गुन भौमवार.

× सेवेशीं बाळाजी बाजी सा।। नमस्कार विज्ञापना. तागायत छ. २७ जिल्कादपावेतों वर्तमान क्षेम असे. विशेष. फत्तेसिंग माने याजकडील कोठारी व तोफखान्याचा मुक्काम वांगीनजीक जाला आहे. तेथून काल सारे मिळून इत्क्यास येऊन गुळें बाहार जात होतें तें व गांव व करळी अशीं खेडीं लुटलीं. राजश्री नागो जिवाजी यांचा रोखा मौजे कुंडलेस आला होता त्याचे मनाईविशीं येथून पत्रें पाठविलीं होतीं त्याजवरून मनाई दिली आहे. ही वेळपर्यंत बरेंच आहे. पुढें कसें निभावतें पहावें. नागो जिवाजी कडेपूरचे मुक्कामाहून सडे काल मान्याचे भेटीस रेटरेवर आले आहेत. भेट घेऊन जाणार. मान्ये तेथें सडेच राहिले आहेत. अद्यापि कूच नाहीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६६१२ श्री. (चैत्र शु० २–२५ मार्च.)

पै।। छ० २ जिल्हेज सन सल्लास मय्यातैन व अल्लफ चैत्र.

सेवेसीं बाळाजी बाजी साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता।। छ० १ जिल्हेज पावेतों वर्तमान क्षेम असे. विशेष. इकडील वर्तमान, श्रीमंत मातुश्री रौजसबाईताई खानापुरास गुळ्यास जाऊन राहिली आहेत. तेथेंही निभावणी न होई असा प्रसंग दिसोन आल्यास तासगांवीं येणार, असाही बेत आहे. नागो जिवाजी याचा मुक्काम तेथेंच कटापुरचे ओढ्यावर आहे. मान्ये तेथेंच आहेत. अद्याप कूच नाहीं. रा।। मोरोपंत भाऊ पेंढारकर कराडचे कारभारी करवीरास गेले होते. ते काल गुरुवारीं तिसरे प्रहरीं तासगावीं आले. आज निघोन खानापुराकडे गेले. स्वामीस कळावें. पठाणाचा मुक्काम कोठें आहे? मंगळवेढ्याचें कसें ठरलें? याचें वर्तमान स्वामीपासीं आलें असेल. लिहून कळवावयास आज्ञा व्हावी. इंग्रजांचीं पलटणें जवळ आलीं म्हणतात तें लिहून कळवावयास आज्ञा असावी. होळकराचा मुक्काम गारदवंडेवर गेला म्हणोन मान्याचे लष्करांत पत्रें आलीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

× थप्याच्या कमावीसदाराचें पत्र निरजेस. १ थप्याच्या कमावीसदाराचें पत्र निरजेस. २ ही पंतांची स्त्री.

नं. ६६१३ श्रीगणपतिर्जयति. ( चैत्र शु० ५ –२७मार्च )

पै॥ छ० ३ जिल्हेज सन सल्लास मयातैन चैत्रमास.

अपत्यें चिंतामणीनें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ० ३ जिल्हेजपर्यंत वर्तमान क्षेम असे. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. बदाम चें तेल काढऊन कुपींत घालून पाठविलें तें पावलें. पुण्यास माणसें जावयाचीं असल्यास ल्याहावें म्हणोन आज्ञा. ऐशियास माणसें जाऊन चार दिवस जाले. आणखी चार दिवसांनीं जातील. कोठारी, नागो जिवाजी वगैरे फौजा खानापुराकडे गेल्या त्याजमुळें श्रीमंत रा॥ पंतप्रतिनिधि यांजकडील रा॥ बळवंतराव फडणीस व मोरोपंत फौजमुद्दां तेथून काल निघोन पुणदीचे सुमारें येऊन पुढें कारकून पाठविला. तो आज सूर्योदयास येथें आला. त्याचे बोलणेंतील भाव तिकडील फौजेची निकड जाणोन निघालो. उतरावयास जागा दाखवावी; त्याजवरून सांगलीजवळ मुक्कामास जागा सांगितली. वडीलांस कळावें म्हणोन विनंति लिहिली आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६६१४ श्री ( चैत्र शु. ६-२८ मार्च. )

पौ. छ० २० जिल्हेज बुधवार सल्लास मयातैन.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधररावजी स्वामीचे शेवेसीं

पोष्य रामचंद्र हरि साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेष. आम्ही हैदराबादेस येऊन नबाब बंदेगान अल्ली याची भेट होऊन बोलणीं जालीं. त्यांतील भाव इंग्रजांनीं श्रीमंतांपासून दस्ताऐवज करून घेतला. पुण्यास श्रीमंतास आणून आपला मतलब साधावा, दौलतींत त्यांचा पाय शिरावा असा सिद्धांत समजला. तेव्हां येथून राजश्री दौलतराव शिंदे व भोसले व होळकर यांस लौकर समेट करून पुढील मसलतीची पैरवी करावी येविसीं पत्रें गेलीं. त्यांस शिंदे यांचा इशारा पक्केपणें आपण इंग्रजांचा दखल स्वराज्यांत होऊं न देणेंविसीं सर्व प्रकारें अनकूल आहों. होळकराचा समेटही

---

१ बाया फडके.

लौकर करून येऊन पोंचतों असा खचीत आला. याचप्रमाणें भोसल्याचीहि इरादा आहे. होळकर तों येविसीं नमोदेच आहेत. त्याप्रमाणें इंग्रजांचा कदम दौलतींत पोंचला असतां कोणाचेंच महात्म्य रहात नाहीं. याजकरितां सर्वत्र सरदारांनीं एकत्र होऊन बंदोबस्त केला असतां अवघड नाहीं. त्यास येविसीचे पर्याय सारे श्रीमंत राजश्री दादा[१] बोलिलेच असतील. हल्लींहि येथून त्यास लिहिलें आहे. कर्नाटकांतील सरंजाम इंग्रजांचा धारवाडास येणार. श्रीमंतास घेऊन इंग्रज पुण्यास येणार असें खचीत आहे. त्यास तुम्हीं सर्वत्र मंडळी व रास्ते विंचूरकर एकत्र होऊन धारवाडाकडे सरंजाम येत आहे याचा बंदोबस्त राखावा. शिंदे या गोष्टीस अनकूल पकेपणें. यांत गुंता नाहीं. या प्रमाणें आपली मंडळी सर्वत्र अनकूल असावी. आतां पूर्वसांप्रदायास माहीत आपणच आहेत. वडीलपणें सर्वांस सांगोन याचा उद्योग व्हावा. शिंदे होळकर भोसले हे एक लौकरच होतात. आपले सारे मंडळ एक जालें म्हणजे नव वहि अनकूल आहेत. आपली सर्वांची याप्रमाणें खंमीरी[३] पाहिजे. इंग्रजांचा कदम दौलतींत शिरूं न पावे असें व्हावें. रवाना छ० ४ जिल्हेज. बहुत काय लिहिणें. लोभ असो दीजे हे विनंती.

---

नं. ६६१५. श्रीगणपतिर्जयति. ( चैत्र शु. ६ – २८ मार्च. )

पै।। छ० ५ जिल्हेज सन सल्लास मय्यातैन व अलफ. चैत्र मास भौमवासर.

विज्ञापना. ता।। छ० ४ जिल्हेजपर्यंत वडीलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असें. विशेष. पर्वाचे दिवशीं पंताकडील कारभारी[२] यांचे डेऱ्यास गेलों होतों. ते दिवशीं त्यांचें बोलणें जालें नाहीं. बोलण्यांतील भाव समजल्यावर सेवेशीं विनंती लिहितों म्हणून लिहिलें होतें. त्यास त्याजकडील कारभारी काल अस्तमानचे दोन घटका दिवसास आले. ते दोन घटका रात्रीस माघारे गेले. त्यांचे बोलण्यांतील भाव शिंद्याकडील कारकून व पत्रें आम्हांस आलीं. त्याजबरोबर आपणांसही आहेत असें

---

१ तात्या. २ फडनवीस. ३ खंबिरी. ४ चिंता आपांचें पत्र सांगलीहून निरजेस.

बोलले व बोलण्यांतील अर्थ व पत्रांतील पूर्वी पत्र आलें त्याजप्रमाणेंच आहे. मी त्यास विचारलें कीं, शिंदे तिकडे बोलावतात. सरकार आज्ञा इंग्रजांस जाऊन सामील होण्याची. तेपक्षीं याचा विचार कसा करावा? तेव्हां त्यांणीं उत्तर केलें: सरकारचे पदरीं सरदार बहुत आहेत. सर्वांचा एक विचार व्हावा आणि सरकार दौलतीचा बंदोबस्त करावा. मी उत्तर केलें कीं, इंग्रज जवळ आले याचा विचार अलिजहांनीं × काय केला आहे? त्यांणीं उत्तर केलें कीं, इंग्रजांस दौलतींत शिरूं देऊं नये. मी उत्तर केलें, शिंदे बराणपुरास व भोसले आपले ठिकाणासच आहेत. नबाब सदरहूप्रमाणें. लहान किरकोळ सरदारांत त्राणदेखील नाहीं अशी व्यवस्ता. ते पक्षीं याचा विचार काय? ते तर लगत आले. इकडील चार लहान मोठे मिळून इंग्रजांचें तोंड संभाळणें कठिण. तत्रापि शिंदे व भोसलेही लांब. ते पक्षीं विचार कळतच आहे. त्यांत सरकारचे पदरचे होळकर यांत व शिंद्यांत द्वंद्व. ते पक्षीं होणें कळतच आहे! असेंही उत्तर केलें. ज्याचे चाकर म्हणवतों त्याची आज्ञा उल्लंघन करून राज्यकारभार कसा चालतो? त्यांणीं उत्तर केलें कीं, धण्यानीं जें करणें तें पदरच्यांचे हातून न होईल तर इंग्रजांस बोलावयाचें होतें. त्यांणीं विचार न केला आणि दौलत दुसऱ्याचे घरीं घातली. ते पक्षीं सर्वांनीं येक विचारें होऊन पूर्वी कैलासवासी नानांनीं कारभार चालविला त्याप्रमाणें चालवावें. परंतु दुसऱ्यास दौलतींत येऊं देऊं नये. असें बोलणें त्यांचें पडतें. मी त्यांस सांगितलें कीं, तुम्ही विचार मोठे बोलतां. ते (इंग्रज) येऊन दाखल जाले. इतकें बोलणें जालें. वडिलांस समजावयाकरितां सविस्तर विनंती लिहिली आहे. त्याजवरून विदित होईल. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६६१६ श्री. (चैत्र शु० ८–३० मार्च.)

पै॥ छ० ७ जिल्हेज सन सल्लास मय्यातैन चैत्र मास.

सेवेसीं विठल बाजी चाफेकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० ६ जिल्हेज पावेतों मुकाम + + निसबत फत्तेसिंग माने वर्तमान

---

× शिंद्यांनीं.

यथास्थित असे. विशेष. रा॥ पांडुरंगपंत बक्षी नि॥ माने मशारनिल्हे रेठरे येथून चार हजार फौजेनिशीं वांगांवे मुक्कामीं आल्याचें विदित जालेंच असेल. आज दहा दिवस मिरज प्रांतानजीक मुक्काम असतां आजपर्यंत कांहीं उपद्रव नवता. हल्लीं खुद्द मशारनिल्हेचें कूच होऊन येथील मुक्कामास आले आणि माघारे येण्याविशीं बक्षीस पत्रें गेलीं. त्यामुळें फौजसुद्धां काल भौमवारीं कुंडलेस मुक्कामास आले. येतेसमयीं गांवास तिलप्राय उपद्रव लागला नाहीं. आज सोमवारीं प्रातःकालीं घासदाण्याचा रोखा होऊन उपद्रव होत आहे. थोड्या बहुतानें चार रुपये देऊन दचावाला अर्थ मनास आणतां वीस पंचवीस हजार रुपये घेऊं याप्रमाणें अफवा श्रवणीं पडल्या! तेव्हां परिणाम गांवचा लागण्याचा सुमार नाहीं. बांगी लुटली तसा प्रकार दिसतो. येविशीं सविस्तर रा॥ त्रिंबकपंत निसबत श्रीमंत रा॥ चिंतामणराव आपासाहेब यांणीं लिहिलें आहे त्यावरून ध्यानांत येईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.*

---

नं. ६६१७ श्री गणपति. (चैत्र शु० ८--३० मार्च)

पै॥ छ० ६ जिल्हेज सह्लास मयातेन चैत्र मास.

अर्भकें रामचंद्रानें शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ० ६ जिल्हेज पर्यंत यथास्थित असे. विशेष. काल इंग्रजांचे लष्करांतून रा॥ नारायणराव लिमये आले. ते सेवेसी पाठविले आहेत. बोलणे अंतीं विदित होईल. पुढें त्यांचे भेटीचा मजकूर कसा करावयाचा तो लिहोन कळवायाची आज्ञा व्हावी. भेटीस चिरंजीव रा॥ नारायणराव आदिकरून पाठवावे व चिरंजीव रा॥ चिंतराव आपासही इकडे इंग्रजांचे भेटीस देणेची आज्ञा व्हावी. विदित होय. भेटीस वस्त्रें पाहिजेत. पांच शालजोड्या व तिवटें किनखाबे व दोले हत्तीचे पाहिजे. त्यास तेथें कारकुनी असतील त्यांस आज्ञा होऊन संजाईत सनगें वरतमानवर्तेत आले पाहिजेत. विदित होय हे विज्ञापना.

---

* अष्ट्याच्या कमाविसदाराचें पत्र मिरजेस. १ राम. आपांचें पत्र मिरजेस.

नं. ६६१८ श्री. ( नक्कल. )

जनरल वसली बहादर यानें—*इश्तियारनामा बे इसम मामलेदारां× व चौकीदारां व पातदारां व जाहगीरदारां व फौजदारां व ठाणेदारां व पाटील कुलकर्णी व देशमुख देशपांडे व नाडगौडा व रयतां शेटे महाजन वगैरे हर-मुलक मराठे यांसी मरकूम मेसाबाद दरीबिला. श्रीमंत बाजीराव पेशवे बहादूर यांनीं आपले दोस्त इंग्रज कुंपणीबहादूर यांसी आपले कुमकेस्तव बोलावूं पाठविले आहेत. याबर ते जनरल वसली बहादूर यांनीं कुंपणीचे फौजमुद्धां मराठेचे मुलकावर दाखल होत असे. आणि कोणासही दुष्म-नीस या मुलुखागिरीस येत नाहीं. दोस्तसारखे येत असों. या कारणें तमाम लोकांनीं आपले आपले मकानेवर आपआपले घरांत बेफिकीर कायम राहणें. मामलेदारां व पाटील कुलकर्णी व देशमुख व देशपांडे वगैरे लोकांनीं जनरल वसलीसाहेबांचे जवळ येऊन रुजू व्हावें. व जनरल साहेबानीं करावें. करीत आहेत. कुंपनीचें लष्कर कोणत्या गांवाजवळ व खेडेजवळ उतरलीयाही खेडेंसी गांवांशीं रखवालीस आदमी देत असों. साबक तीन वर्षांचे अवल जनरलसाहेबांचे लष्करांत कैसा बंदोबस्त ताकीद होती कीं, मराठेचे मुलखाचे लोकांनीं याद करीत असतील. आतांही तैसेच ताकिदी बंदोबस्त होईल. लेकिन जरूर आहे कुंपनीचे लष्करास आनाज(?) व घासदाणा लकडी वगैरे जिन्नस दाखल व्हावे. मुलुखचे लोकांनीं आनाज वगैरे जिन्नस किंमतीस देणें जरूर आहे. कुंपनीचे दस्तुर माफक दरएक अदमीस आपले मालास पुरा किंमत मिळेल. हर कोणासही इजा न होईल. जाणिजे. मरकूम. छ० ९ माहे मार्च सन १८०३ ईसवी. फाल्गुन. बहुल १ दुंदुभीनाम संवत्सरे.

———

नं. ६६१९ श्री. ( ७ एप्रिल. )

पौ. छ० १९ जिल्हेज भौमवार. सल्लास मय्यातैन.

सेवेसीं घोंडो बापूजी जोशी त्रिकाळ चरणावरी मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत चैत्र शु॥ १५ पावेतों बाळकाचें वर्तमान

* जाहीरनामा. × मामलेदार, अनेकवचन मामलेदारां.

यथास्थित असे विशेष. इकडील मजकूर, श्रीमंत राजश्री अमृतरावसाहेबांनीं आपलें लग्न फाल्गुन वद्य दशमीस केलें. हिराबागांत रमण्याजवळ मुक्काम आहे. पुण्यांतील कारभार भोपे याजकडे होता तो काढून राजश्री आबाजी त्रिंबक नि॥ आपा बळवंत याजकडे सांगितला. दोन रोज जाले. परंतु गावांत कांही लष्करची येऊन माहार पोरें घरांत शिरोन वैरण नेतात व दाणा भरून नेतात याचा बंद जाला नाहीं. दोड लाख रुपये भोपेयांचे राहिले. त्याचा हवाला आबाजी त्रिंबक याणीं घेतला. व शहरचे रखवालीस लोक ठेविले आहेत त्यास रोजमरा पाहिजे. तो गांवांत पट्टी करणार ऐसी वदंता आहे. दरवडेहि घालतील ! निमें शहर वोस आहे. निमें गुजरी वस्ती आहे तीहि जाऊं शके. पांच सातशें खर्च किरकोळ जाण्यास पडले. परंतु भोपे यांची माझी कोंकणची ओळख याजकरितां आबरू न घेतली व वाड्याकडे हरएकविषी तगादा न लागला व प्यादेहि अद्यावतपर्यंत आहेत. रखवालीस ठेविले आहेत. आबाजी त्रिंबक कसा बंदोबस्त करितात न कळे. शिंदे बऱ्हाणपुरापुढें आले नाहींत. आबोजी इंगळे व गोपाळराव भाऊ मात्र पुढें आले आहेत. होळकर खासा येशवंतराव सिन्नरास गेले. श्रीनाशिकास जाणार (असें) वर्तमान आहे. उभयतांचे तहाच्या बोलण्यास भोसले पंचवीस हजार जमावानिसीं येत आहेत. शिंदेकडील वकील त्याजकडे गेले आहेत. सत्वर येतील. राजश्री बाबा फडके यांचें नबाबाचें बोलणें जाहालें. तेहि जमावानिसीं लवकर येणार. वडिलांस कळावें. पुण्यांतील बाकी दगाहावी असा अर्थ कोणताही राहिला नाहीं. श्रीमंत उभयतां वसईस आहेत. वकील रावसाहेबांकडे व होळकर यांजकडे येत जात आहेत, परंतु कोणता प्रकार ठरत नाहीं. कळावें कापड माहाग मजपासीं होतें तें राजश्री आबाजी हरी किबे याजबरोबर वडिलांकडे पाठविलें तें पावल्याचें उत्तर ल्याहावयास आज्ञा करावी. राजश्री नारोपंत चक्रदेव शिंदे इडसर येथ होते ते हलीं [खालीं] उतरले. इकडून पांचशें लोक गेले. त्यांचे स्वाधीन जाले. दोनचार रोजीं येतील. कळावें बहुत काय लिहिणें. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

———

नं. ६६२० श्री. (चैत्र व० २-९ एप्रिल)

पै॥ छ० २७ जिल्हेज सन आर्बा मयातैन.

विज्ञापना.* राजश्री येसो जिवाजी मंगळवेढेकर सांगलीहून बाकिलीस वडगांवास गेले होते ते काल सायंकाळीं वडगांवाहून कवठेस बस्तीस आले. त्यांणीं साविस्तर मजकूर सांगितले जे, महाराज करवीरास गेले. सखाराम घाटगे वडगांवास आहेत. लष्कर हजार पंधरांशें होईल. जोर दिसत नाहीं. रत्नाकरपंत सावंताचे वाडीस गेला आहे. मसलतदार कोणी तूर्त नाहीं. तासगाव प्रांतीं दंगा तूर्त होत नाहीं म्हणून सांगितलें. घाटगेकडे शिराळें आहे त्याखालीं सन सीतांत भोसलेची जती जाली आहे. तो मजकूर घाटगेनीं येसाजीपंतास विचारलें कीं, भोसलेची नेमणूक कवठेस आहे तो ऐवज शिराळेखालीं आहे त्याप्रमाणें आम्हांकडे देवावा म्हणून रावसाहेबांस सांगावें. मुरळीत ऐवज पोहचल्यास उत्तम. नाहीं तर रोखा करावा लागेल म्हणून घाटगे येसाजीपंत याजजवळ बोलले. तेव्हां कवठेस रोखाबंद करतात कीं कळेना. वडगांवचे पश्चिमेस फौज होती ती काल तेथून कूच करून करवीराकडे कोसभर जाऊन उतरली. चार तोफा आहेत. खर्चाचा गळाठा आहे. फौजही चौकडे फाकली. तूर्त कांहीं दंग्याचा सुमार दिसत नाहीं म्हणून सविस्तर सांगितलेवरून विनंति लिहिली आहे. विदित होय हे विज्ञापना.

---

नं, ६६२१ श्री. (चैत्र व. ५-१४ एप्रिल.)

पै॥ छ० २३ जिल्हेज. सुरू सन सलास मयातैन व अलफ.

सेवेशीं विनंती सेवक बाळाजी महादेव दामले. चरणांवर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० २१ जिल्हेजपर्यंत वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तर रा॥ फत्तेसिंगराव माने यांणीं रा॥ नाना पुरंधरे याजकडे सलुक करून फौजसुद्धां आदरकीचे मुक्कामाहून सातान्यास यावयाचा बेत करून रा॥ नागो जिवाजी व पठाण यांस सांगितलें कीं, तुम्ही होळकर याजकडे जाणें. आम्हांस वांई देशी जावयाचें

---

* अष्ट्याच्या कमावीसदाराचें पत्र मिरजेस.

आहे. याप्रमाणें सांगितल्यावरून माने याचे लष्करांत फडणीस व होळकर यांजकडील पठाण दोनतीनशें होते. त्यांस आंतील मजकूर समजल्यावरून पलटणवाले व पठाण व फडणीस एक होऊन लष्कराचें कूच होऊन इकडे येऊं लागले तेव्हां पठाण दोनशें मिळाले. रवेंत चालतां माने पालखींत बसले होते. तेथें पातळाई पाहून गांठ घालून पालखींत व हातास धरून आमचे तलबेचा फडशा करून देणें. बांई देशीं यावयास आम्हांस बनत नाहीं. म्हणोन कटारा लाविल्या. तेव्हां गलबल जाहली. लोक मिळाले त्यांस पठाणांनीं सांगितलें कीं, तुम्ही जास्ती कराल तर कटारा लाविल्या आहेत. यास अगोदर मारूं नंतर काय होणें तें होऊं. याप्रमाणें उत्तर केल्यावर लोक माघारे सरले. माने यांस तट्टावर बसवून पठाण माघारे घेऊन गेले. ते समयीं शिलेदार झाडून पळाले. माने यांणीं हजार दीड हजार पागा घरची केली होती. त्यापैकीं चारपांचशें घोडे बारगीर घेऊन पळोन गेले. रा॥ नारायणराव माने हजार घोडीं, हत्ती, उंटें वगैरे सरंजाम बायकांसुद्धां घेऊन देहूचे मुक्कामास छ० १८ जिल्हेज आले. श्री॥ रा॥ पंत प्रतिनिधी यांची स्वारी रहिमतपुरावर यावयाची बोलवा होती. त्यांचा मुक्काम छ० १९ जिल्हेज तारगांवावर आला. त्याची आवाई गांवांत पडोन गांव गडबडला. तों माने याचे लष्करांतून स्वार आले त्यांणीं हें वर्तमान सांगितल्यावरून फारच गडबड होऊन माने मंडळी पळों लागल्यावरून बहुत गडबड होऊन एक वेळ दंगा गर्दी जाहल्यासारखें होऊन गांवास पळ सुटला. हें वर्तमान मांग रामोशी यांस कळतांच शिवेवरून लुटूं लागले. तीन कोशांवर पंताचा मुक्काम होता तेथें समजल्यावर तेथील स्वार येऊन त्यांणीं गुळें मार्गीं लुटलें. तेव्हां आणखी स्वारी मार्गीं आली म्हणोन गांवांत अधिकच गडबड होऊन गांव बेचिराख जाहला. लुटले फार गेले. गांवांत घर न निवे अशी आवाई पडली. ती वेळ कठिण जाहली. तेव्हां श्रीमंतांकडे बोलावयास पाठविलें. तेव्हां उत्तरें मनस्वी जाहलीं. दरम्यान नुभोजी नाईक रामोशी पडोन घासदाणाबद्दल हजार रुपये कबूल करून स्वारी पुढें येऊं नये असे ठरावांत आणलें. काल श्रीमंतांचे कूच होऊन देवाचे पालीवर मुक्काम गेला.

ऐ. ले. सं. १४.

माने याचा मुक्काम काल कोरेगांवावर येऊन साताऱ्यास कारकून जाऊन पाहिलें बोलणें जाहलेंच होतें. त्याजवरून श्रीतीरीं मुक्कामास येणेंविसीं नाना पुरंधरे यांणीं सांगितल्यावरून नारायणराव माने फौजसुद्धां माहुलीचे मुक्कामास गेले. मार्गें फत्तेसिंगराव माने याची काय गत जाहली हें खचित वर्तमान येत नाहीं. माने याजबद्दल घडिघडि दंगा गांवावर पडों लागला. वस्तीं राहून येथें माझी निभावणी पडावयाचें कठिण पडलें आहे. चोराचा दंगा भारी, मार्ग चालत नाही. तरी नारायणराव माने यांचीही गलबल होणार असें वर्तमान आहे. रा।। त्रिंबक रंगो कारकून माने याचे लष्करांत होते त्याजकडील लखोटे दोन आले ते पाठविले आहेत. मशारनिल्हे माने भाडळें येथें येऊन राहिले आहेत. मार्ग पाहून येथें येतील. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६६२२ श्रीगणपतिर्जयति. (चैत्र व० ११–१८एप्रि.)

पै।। छ० ३ मोहरम सन सल्लास मय्यातैन वैशाख इंदुवार.

तीर्थस्वरूप राजश्री काकासाहेब वडिलांचे सेवेसी.

अपत्यें चिंतामणीनें शिरसा. नमस्कार विज्ञापना. ता।। छ० २५ जिल्हेजपर्यंत वडिलांचे आशीर्वादें वर्तमान यथास्थित असे विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. चि. रा. दाजी व त्रिंबकराव आपा तासगांवास येऊन आपा मिरजेस आल्याचें लिहिलें तें कळलें. तुम्ही कोठें आहां? इंग्रजांचा मु।। कोणे ठिकाणीं आहे? तें ल्याहावें. म्हणोन आज्ञा. ऐशियास मी आज कुरवलीचे मुक्कामास आलों. इंग्रज आज बारामतीस गेले. येथून सात कोशांची तफावत आहे. उदयीक पुढें जातों. नबाबाकडील फौज व पलटणें आलीं. त्यांचा मुक्काम नरसिं(ग) पुरानजीक आहे. पलटणांतील सरदार कर्नल इष्टविसनसाहेब यांच्या व जनरेलसाहेब यांच्या भेटी आकलुजचे मुक्कामीं जाल्या. याउपरीं इंग्रज दर कूच पुण्यास जाणार. पठाण घोडनदी पार होऊन गंगेच्या सुमारें गेले. पठाणांनीं माने यांस कैद करून नेलें. मराठे लोक कांहीं लुटले गेले याप्रों वर्तमान आहे.

१ चिंता. आपांचें पत्र मिरजेस.

लष्करांत धारण दोन पाइलींची आहे. वैरण तों अगदीं मिळतच नाहीं. पठाण लांब लांब मजला करून गेल्यामुळें बुणगें, तोफा, छकडे, गुरें वगैरे जागजागां राहात गेलें. तोफा मागें पडल्याचें इंग्रजांनीं ऐकून तुरुक स्वार रवाना केले आहेत. आणखी बरचेवर समजेल तें लेहून पाठवीन. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६६२३ श्रीगणराज. (चैत्र व० १३–१९ एप्रिल.)

पै॥ छ० २६ जिल्हेज सन सल्लास मय्यातैन. चैत्र मास.

अपत्यें आपानें* साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २६ जिल्हेज पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडीलीं आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. इष्टविसन इंग्रज भागानगराहून चार पलटणें व दोन हजार तुरुकस्वार व नबाबाकडील पंधरा हजार फौज सखो रुद्र याजबरोबर याप्रमाणें सरंजाम आला. उभय जलचरांच्या भेटी आकलूजवर होणार यास्तव मुक्काम जाला आहे. भेटी होऊन वसली नीरेच्या पाण्यानें जाणार व इष्टविसन भीमेच्या पाण्यानें जाणार म्हणोन लिहिलें तें कळलें. आणखी वर्तमान आलिया ल्याहावया आज्ञा जाहली पाहिजे. पुण्याकडील निवनाधिरय वर्तमान ल्याहावया आज्ञा केली पाहिजे. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६६२४ श्री. ( वैशाख शु० १–२१ एप्रिल )

पै॥ छ० २ मोहरम. सलास मयातेन व आलफ.

सेवेशीं विनंती सेवक बाळाजी महादेव दामले. चरणांवर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता॥ छ० २९ जिल्हेजपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. रा॥ फत्तेसिंगराव माने यास पठाणांनीं धरून तट्टावर बसवून रा॥ यशवंतराव होळकर याजकडे घेऊन गेले. बाजारबुणगें लुटलें गेलें. फौज पळाली. त्यांचीं घोडीं जिकडे गेले तिकडे ज्यास सांपडलीं त्यांनीं पाडून घेतलीं. रा॥ नाना पुरंधरे याचा आश्रा होता त्याजवर रा॥ नारायणराव माने घरसामान घेऊन सातान्यास आले आहेत.

---

* त्रिंबकराव आपाचें पत्र कुरुंदवाडाहून मिरजेस.

घोड्यास, हत्तीस वगैरे वैरण मिळत नाहीं. फौजेंत खर्चास नाहीं अशा हालानें राहिले आहेत. माने याची बायको नारायणराव माने याचे- पाशींच आहे. रात्रंदिवस घोड्यावर खोगीर घालून असतात. पुढें कसें होतें पहावें. दक्षणचीं पलटणें गारदौंडचे सुमारास गेलीं. श्री।। रा।। बाजीरावसाहेब यांची खासा स्वारी वाईस यावयाची बाजार बोलवा आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञप्ति.÷

---

नं. ६६२५ श्री. ( वैशाख शु० १-२२ एप्रिल.)

पै।। छ० ५ मोहरम सन सलास मयातेन.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधरराव स्वामी गोसावी यांसीं सेवक परशराम श्रीनिवास प्रतिनिधि नमस्कार विनंती. उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. तुम्हीं विनंतिपत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. रहिमतपुरास स्वारी जाण्याचा बेत ऐकतों. त्यास गांव इकडील सरजामाचा तेथें उपद्रव होऊं नये म्हणून लिहिलें तें कळलें. अशास फत्तेसिंग माने रहिमतपूर आपलें म्हणवितात. कऱ्हाडास खणत्या घालून लूट नेऊन तेथें ठेविली आहे. तेव्हां स्वारी करणें प्राप्त परंतु तुमचें लिहिलें आलें त्याजवरून स्वारी तिकडे जाण्याची तहकूब करून हें पत्र लिहिलें असे. तरी माने यांचे अगर रहिमतपूरकर कोणी येऊन कगडची चजिबस्त तेथें आहे त्याचा विचार व्हावा. यांत तुम्हास नीट दिसेल तें करावें. रवाना छ० ३० जिल्हेज सुरु सन सलास मयातेन व आलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

---

नं. ६६२६. श्री. ( वैशाख शु. १ –२२ एप्रिल. )

पै।। छ० ६ सफर सन सलास मय्यातैन व आलफ.

तागायत २९ माहे जिल्हेज मुक्काम दिल्ही. इकडील वर्तमान तर पिरू फिरंगी उज्जनीस दाखल जाहल्यापासून शीख वगैरयाच्या वकिलांनीं तेथून सुम्तीचा प्रकार या प्रांतीं लिहिल्यापासोन कांहीं कबंद (?) आमली

---

÷ पत्र रहिमतपुराहून मिरजेस. १ आबाजी हरि कियाचें बातमीपत्र.

मुख्यांत व महालांत प्रारंभ जाहली असे. लोर्ड फिरंगी पट्याळ्यानजीक दाखल होऊन तिकडील खंडण्या हरयकासी घेऊन नगदी ऐवज बरचेबर येथें इरसाल करितात. राजे साहेब शीख पट्याळेकर छ० १७ तारखेस फिरंगीपासीं आला. परस्परें भेटी जाहल्या. महारानिल्हेनीं डेन्यास नेऊन लोर्डस सातपारचे खिलत जेगा, शिरपेंच, मोत्याची माळ, हत्ती, घोडा देऊन बरकड लहानथोर सरदार, कुमेदान, जमादार, चोपदार आदिकरून सर्वास दोनशे खिलत योग्यतेप्रमाणें दिल्हें. दुसऱ्या रोजीं फिरंगी मजकुरांनीं मेजवानी केली. त्यांस राजे मजकूर यास सातपारचे खिलत, जेगा, शिरपेंच, मोत्याची माळ, हत्ती, घोडा, येणेप्रमाणें देऊन बरकड हमराही लोकांस दोडशें खिलत मरातबाप्रमाणें देऊन बहुत खुषीनें परस्परें बोलणें होऊन डेन्यास रुखसत केलें व मागिल बाकी जहानाचे वेळची होती त्यापैकीं चाळीस हजारांची निशा सावकारी करून दिली. सांप्रत तिकडील नक्षा ठीक आहे, परंतु शीख अनेक आवई उज्जनी जाणाराची करोन सर्वांस बहकाव (!) करितात. काबूल प्रांतचे वृत्त बदस्तुर असे. हजरताची प्रकृत महिन्यांत एक दोन वेळां गैरआरामी राहते. ताम्रमुख याचे सोबतीमुळें केवळ बेदिल परंतु काबू चालत नाहीं. शानबाजखान याजवर हजरताची मर्जी प्रसन्न. तेच प्रस्तुत हुजुरी कारभारी आहेत. सबब टोपीवाले त्याजवरही तुफान कायम करून बदखेळ करावे असा विचार करितात. शहरांत व मुलखांत बरकत एक रुपया राहिली नाहीं. परंतु विरूचे देवानें बजुद्रक (!) जाजतीनें लाखों रुपये चोहूंकडून तहशील होऊन कोलचे गडात पन्नास लक्षांची नगदी पेट्यांत जमा जाहली आहे. लखनौंत बासलीसाहेब बरेली वगैरे प्रांतचे बंदोबस्तांत तत्पर आहेत. सरकारापासून काय नक्षा ठरेल तें प्रत्ययास आल्याप्रमाणें सेवेसीं विनती लिहूं. नबाब सादत अलीखान बहिरा याच प्रांतीं शिकारीस गेले आहेत. शेर शिकारखेरीज आणीक उद्योग राहिला नाही. नबाब अलीबहादर यांस पूर्वी आराम जाहला होता. बादपरहेजी विशेष तेणेंकरून प्रकृत ठीक नाहीं. येसाजी इंगळे यांसही शिंदे बहादर यांणीं बोलाविलें आहे. परंतु महारानिल्हे एक महलत दरपेश टाळाटाळ करून असत. निकडीस

जातील. राजश्री बामन खंडेराव बापू शिंदे तूर्त फिरंगीचे लगामीं लागून का..क्षेप करितात. राव मल्हारनिल्हे सहकुटुंब श्रीहरिद्वार यात्रेस या मार्गे जाणार असत. शहाजी बदस्तुर नजरबंद आहेत. पुढें निदर्शनास येईल तें सेवेशीं विनंती लिहूं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६६२७ श्रीगणपतिर्जयति. [वैशाख शु०२ -२३एप्रिल.]

छ० ९ मोहरम सन सलास मय्यातैन. वैशाख.

तीर्थस्वरूप राजश्री . काकासाहेब. वडिलांचे सेवेसीं.

अपत्यें चिंतामणीनें शिरसा. नमस्कार विज्ञापना ता।. छ० १ मोहरम-पर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. कुरवाबीचे मुक्कामाहून विनंती-पत्र पाठविलें होतें तें पावलेंच असेल. मी काल भृगुवारीं पुण्यास आलों. जनरेल वासलीसाहेब मोरगांवचे मुकामाहून सडे होऊन छ० २७ जिल्हेजीं बुधवारीं पुण्यास दाखल जाले. ती. रा. आपासाहेब व गोखले व विंचूर-कर व चाफेकर व निपाणीकर हेही सडेच वासलीसमागमें आले. मी येक मजल मागें होतों. काल येथें आलों. श्रीमंत रावसाहेब व दादा व भावे छ० २५ जिल्हेजीं इंदुवारीं निघोन गेले. बुधवारीं चाकणेस मुकाम होता. इंग्रज पुण्यास दाखल जाले हें कळोन, बुणगे तेथें टाकून सडे होऊन पुढें गेले. होळकर चांदवडास, शिंदे बराणपुरास आहेत. इंगळे पुढें येऊन समेटीचीं बोलणीं होऊन मुलास स्वाधीन केलें. भोंसले यांजकडे रा. याद वराव भास्कर गेले. याप्रमाणें वर्तमान आहे. इंग्रजांनीं संगमाजवळ आपल्या जाग्यावर मु॥ केला आहे. गुरुवारीं शहरांत श्रीमंतांची द्वाही दौंडी फिरली. श्रीमंत कल्याणास आल्याचें वर्तमान आहे. शिंदे, होळकर भोंसले मसलत करतीलसा सुमार दिसतो. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.×

---

नं ६६२८ श्री. ( वैशाख शु० ९–३० एप्रिल. )

पै॥ छ० १३ मोहरम सुरु सन सलास मयातैन व आलफ.

---

× चिंता. आपा सांगलीकर यांचें पत्र पुण्याहून मिरजेस.

विज्ञापना. छ० ८ मोहरम मंदवार प्रातःकालपावेतों सुखरूप असे. विशेष. बाडिलीं छ० २६ जिल्हेजचें पत्र पाठविलें तें छ० ७ मोहरमीं पावलें. सविस्तर लिहिणें म्हणोन पत्रीं आज्ञा. ऐशास.श्रीमंत उभयतां वसईहून निघोन वज्रजोगिणीस आले. आजपर्यंत कल्याणास स्वारी आली असेल. तेथें कांहीं मुकाम व्हावे असें आहे. इकडील इंग्रज यांणीं बेटांत संगमीं दारुगोळा वगैरे जिन्नसांचें दास्तान केलें. तेथें रखवालीस दोन पलटणें घेऊन झाडून समुदाय घेऊन तळेगांवास जावें म्हणोन छ० ५ मोहरमीं कूच करून चिंचवडनजीक चिंचवड येथें मुक्कामास गेले. समागमें गोखले व चाफेकर उभयतां फौजसुद्धां गेले होते. त्या मुक्कामीं श्रीमंतांची आज्ञा आली कीं, मराठी फौज झाडून पुण्यास जावी. टोपीकरांनीं तेथेंच रहावें. विष्टपा यांणीं फौज आपली घेऊन घाटमाथां यावें. कुटुंब सिंहगडास गेलें त्यांणीं पुण्यास यावें याप्रमाणें लिहिलें आलें. त्यावरून गोखले व चाफेकर उभयतां पुण्यास आले. श्रीमंत सौ॥ मातुश्री उभयतां बाईसाहेब छ० ६ मोहरमीं गुरुवारीं अस्तमानीं सिंहगडाहून पुण्यास आली. इंग्रज पवनातीरासच आहेत. राजश्री सखो रुद्र नबाबाकडील फौज पलटणें घेऊन गारदौडच्या सुमारें आले. ती॥ राजश्री आपासो॥ यांचा मुक्काम गराड्यास आहे. चिरंजीव राजश्री चिंतामणराव आपासो॥ कात्रजेस तळ्याजवळ सरकारचे आंबराईत उतरले आहेत. वैरणही बरीच त्यांस मिळते. निपाणकर हिराबागेचे दक्षिणेस फौजसुद्धां आहेत. गोखले पर्वतीचे पश्चिमेस उतरले. विंचूरकर फौज बाहेर ठेवून खासे आपले घरीं जयंतीचे उत्साहाकरितां आले आहेत. शहरचा बंदोबस्त प्रस्तुत राजश्री गोविंदराव परांजपे यांजकडे आहे. हरिपंत भावे याचे कारकीर्दीतील मंडळी त्रिंबकपंत गोखले व बापू चुंटे, गोविंदपंत देवधर, महादेव टोकेकर वगैरे २५।३० धरिली त्यांस तोफखान्यांत नऊन ठेविलें. बंदिवानाची चौकशी छपनातिवारी (!) परांजपे याजकडील त्याजकडे आहे. धरली मंडळी यांची माहितगारी सर्व राजश्री बाळाजीपंत यांस आहे. विनंति करितां ध्यानांत येईल. शहरांतील दुकानें झाडून उघडलीं नाहींत. अद्याप कोणास भरंसा येत नाहीं. चिंतामणराव आपा छ. १ मोहरमीं इंग्रजांचे भेटीस गेले. दुसरे दिवशीं जनरल वसली-

साहेब अस्तमानीं आमच्या डेऱ्यास आले. बहुत आरास चांगली केली होती. सात शालजोड्या व मुख्यास शिरपेंच याप्रमाणें दिल्हे. छ. २ मोहर्रमीं खासा जनरल व आणखी पांच खासे बरोबर बेचाळीस तुरुक स्वार व पायींचे मिळोन सरकारवाड्यांत सायंकाळचे आले. दिवाणखान्यांत बैठक जाहली. दिवाणखान्याचें काम पाहून बहुत खुष जाहले. हें काम कोणी केलें ? इकडील मुत्सद्दी यांणीं ( उत्तर केलें ) माधवरावबसो॥ यांणीं करविलें. याचा कारागीर कोठें आहे म्हणून त्यांनीं विचारलें. येथें आहे म्हणोन सांगितलें. नंतर हारतुरे, गजरे, विडे, मिठाईचीं तबकें पुढें ठेविलीं. निरोप घेऊन डेऱ्यास गेले. काल छ. ७ मोहरम.*

---

नं. ६६२९ ( वैशाख शु० १३–४ मे. )

उतारा—चिंता आपा सांगलीकर यांचे पत्र पुण्याहून मिरजेस.

" श्रीमंत बोरघांट चढोन दोन मजली आले. × × × अवरंगाबादेस होळकरांनीं तोफा लाविल्या होत्या. तेथील खंडणीचा जाबसाल एकवीस लक्षांवर ठरून वोली घेऊन गेले. नबाबाचे तालुकियांत दंग्यास प्रारंभ जाला. श्री. रावसाहेब जोरव्यास आहेत. नाशकास उपद्रव लागला आहे. श्री. रा० बापूसाहेबांचें ( विनायकराव अमृतराव पेशवे यांचें ) लग्न संगमेनरास जालें. "

---

नं. ६६३० श्री. ( वैशाख शु० १४ –५ मे. )

पै॥ छ० १३ मोहरम सन सलास वैशाखमास.

विज्ञापना छ० २६ जिल्हेजीं संजीवनी बोपखळेच्या मुक्कामाहून कूच करून चाकणेस गेले. तेथें दुसरे दिवशीं मुक्काम जाला होता. पुण्यानजीक आहेत हीं बातमी ऐकून गोखले चाफेकर वगैरे मंडळी टोपिकरास घेऊन मोरेश्वराचे मुक्कामीहून अस्तमानीं चालते जाले ते छ० ७ जिल्हेजीं दोनप्रहरीं फौज शहरांत आली. खासा जनराल व तुरुकस्वार मात्र पुढें

---

* पत्र अपुरें सांपडलें. १ पत्र कारकुनाचें पुण्याहून मिरजेस. २ अमृतराव.

आले. पलटणें तिसरे दिवशीं आलीं. ज्या कार्यास आले तें काम साधलें नाहीं. दग्यास येतील हें समजलें म्हणोन इशारा पाठविला. त्याजवरून ( अमृतराव ) छ० ७ जिल्हेजीं अस्तमानचे दोन घटका दिवसास कूच करून मजल दर मजल जोरव्यास सलतनामुद्धां जाऊन पोहोचले. पुण्यास फौज घेऊन मंडळी आली यांस हास्य पर्वतासारिखें जालें! पाठलाग करावा हें भानच नाहीं! घराधरींत निमग्न जाले याजमुळें तिकडे फुरसत जावयास सांपडली. पाठी जाते तरी सडे कदाचित जाते. सलतनत झाडून सांपडती. ईश्वर रक्षिता. लेखक. समागमें सडे गेले. कुटुंब पुत्रासह दुर्गानजीक आहे. शिंदे बाराणपुरास आहेत. होळकर पुणतांब्यास आहेत. पठाण व नागो जिवाजी आलीकडे आहेत. उभयतांचे तहाचें बोलणें लागलें आहे. दरम्यान भोंसले बोलतात. तह लौकरच होईल, सेनाधुरंधर चैत्र वद्य दशमीस डेरेदाखल जाले म्हणोन बातमी आली आहे. औरंगाबादेस होळकरांनीं वेढा दिल्हा म्हणून बातमी आली आहे. लेखपत्र नाहीं. उभयतांचा तह होतो यास्तव टोपीकरास विचार पडला आहे. टोपीकर बहुत जमले हाही विचार सरकारांत पडला. पुढें काय घडतें, कोणत्या सेवटास जातें पाहावें. दरचेवर माणसें यावीं म्हणजे मजकूर समजेल. हे विज्ञापना.

———

नं ६६३१                श्री.                ( वैशाख शु. १४–५ मे. )

पौ॥ छ० १३ मोहरम सुरु सन सलास मयातेन व आलफ.

रा॥ चिंतामणराव आपा सरकारच्या वाड्यांत बाईसाहेब याजकडे आले होते. अस्तमानीं डेऱ्यास गेले. रा॥ नारोपंत चक्रदेव पुण्यास आले होते ते कुसुर घाटा खालीं त्यांचा देव कुलस्वामी आहे त्याच्या दर्शनास गेले ते तिकडेच आहेत. समागमें जमीयत दोन हजारपावेतों आहे. अद्याप श्रीमंतांकडे गेले नाहींत. रा॥ माधवराव रास्ते यांस समाधान नव्हतें. मध्यें कांहीं आरोग्य जाहलें होतें, अलीकडे थाणखी ज्वर येऊं लागला. ईश्वरकृपेंकरून निखालस आरोग्य होईल तेव्हां खरें. प्रकृत

१ पत्राचा पहिला बंद गहाळ झाला आहे.

केवळ क्षीण जाहली आहे. टोपीकर छ० २७ जिल्हेजीं संगमीं आले. आपासो॥ शिंद्यांच्या बागेजवळ उतरले होते. नंतर टोपीकरांचा निरोप येऊन पांच चार कोशीं वैरण पाहून राहतों म्हणोन गेले. सासवडास दोन तीन मुक्काम जाहले, वैरण नाहीं यास्तव गराड्याकडे आले. शिवापुराकडे यावें असा बेत आहे. भावे याचे दहशतीमुळें गृहस्त लोहगडाकडे गेले होते तिकडेही उपद्रव गेला. याजकरितां बाईस जाऊं लागले. मार्ग बराच चालों लागला. सारांश, कोणीकडेही गेलें तत्राप सुख नाहीं अशी गत जाहली आहे. आपासाहेब निगेर घेऊन मुलीच्या लग्नाकरितां घरीं जावें म्हणोन बहुत खटपट करितात परंतु यत्न चालत नाहीं. वडिलांचे पुण्यप्रतापेंकरून घडेल तें खरें, वडिलांची प्रकृत अलीकडे कशी आहे ती कळविली पाहिजे. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६६३२ श्री. (वैशाख शु० १४-५ मे)

सेवेशीं बाळाजी महादेव दामले चरणावर मस्तक ठेवून शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० १२ मोहरमपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री नारायणराव माने व संभाजी माने यांस कैद करून माने याचें लष्कर लुटावें असा विचार केला. तेव्हां पांच सातशें स्वार माने यांचा तयार होउन झुजावयास उभे राहिले. तेव्हां एक रोज वेढा देऊन उभे केले होते. नंतर राजश्री फत्तेसिंगराव माने याची आई व बायको स्वाधीन करावी म्हणोन अडकाविलें. माने यांस सोडून द्यावें, फौज लुटूं नये, आज्ञेप्रमाणें चाकरी करून असावें याप्रमाणें ठराव होऊन दोघी बायका यांचे स्वाधीन करून-आपली मोकळीक करून घेऊन पांच सहाशें स्वार.निशीं चाकरी करीत आहेत. दोघी बायका साठे यांच्या वाड्यांत येऊन सरकारची चौकी बसली आहे. माने याचे आकसामुळें रहिमतपूरची बस्ती राहतां दिसत नाहीं श्री. राजश्री नाना पुरंदरे यांणीं घासदाण्याचा रोखा केला तेव्हां येथुन दोन गृहस्थ पाठवून बहुत रदबदली केली तेव्हां अडीच हजार दरबार खर्चमुद्दां ठराव जाला. स्वार ऐवजाकारितां गांवांत बसले आहेत. शिवाय मुधोजी नाईक व हैबती नाईक रामोशी यांस सरकारांतून

पागा दिल्या आहेत त्यांचे रोखे निराळे जाले आहेत. त्यांचेही बोलण्यास गेले आहेत. लष्करचे कहीचा उपद्रव भारी. श्री० राजश्री पंत प्रतिनिधि यांची स्वारी किन्हईस गेली आहे. त्याचाही रोख गांवावर आहे. सेवेशीं विदित होय हे विज्ञाप्ति.

---

नं. ६६३३ श्री. (वैशाख व० ४ —१०मे).

पै।। छ० २० मोहरम. सलास मयातेन.

* सेवेशीं बाळाजी महादेव दामले. चरणांवर मस्तक ठेवून शिरसानमस्कार. विज्ञापना ता।। छ०१८ मोहरमपर्यंत वर्तमान यथास्थित असे विशेष. श्री।। रा।। बाजीरावसाहेबांची स्वारी तळेगावांस येऊन दाखल जाहली. सुमुहूर्त पाहून पुण्यास येणार. सातान्यास खुशालीच्या तोफा जाहल्या. शिंदे होळकर यांचा तह ठरोन भेटी जाहल्या. मोंगलाचीं फौज फिरंग्याचे कुमकेस आली याजमुळें त्याच्या मुलखांत दंगा करावा याप्रमाणें शिंदे होळकर यांचा ठराव होऊन औरंगाबादेजवळ दहा लक्ष खंडणी घेतली. याप्रों बाजारी वर्तमान आहे. सेवेशी विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६६३४ ( वैशाख व० ६ —१२ मे. )

उतारा—पत्र धोंडो बापूजी जोशी याचें पुण्याहून मिरजेस.

" औरंगाबादची होळकर यांणीं खंडणी अकरा लक्ष घेतली. पैठण व जालनापूर सांपडलें. बाकी पळाले. नबाबाचे प्रांतांत दगा, घासदाणा, खंडणी करीत आहेत. कारण कीं, इंग्रजांस कुमक पाठविली यास्तव असें बोलतात. होळकर याचा मूल (मल्हाररावाचा मुलगा खंडेराव) शिंदे यांणीं भोसले यांचे हवालीं केला. भोसले उभयतांचे तहाचे बोलण्यांत आहेत. तह सर्व बनोन आला. भेटी मात्र व्हावयाच्या आहेत. शिंदे, होळकर व भोसले कट एक जाहला असें बोलतात. पुण्यांतील लोक अद्यापवर् बाहेर जातात. श्री० रावसाहेब जोरव्यास आहेत. विनायकराव यांचें लग्न वैशाख शु० २ केलें. "

---

* पत्र रहिमतपुराहून मिरजेस.

नं. ६६३५ ( वैशाख व० ७ –१३ मे. )

उतारा—पत्र धोंडो बापूजींचें पुण्याहून मिरजेस.

" पुण्यांत तूप मध्यें पाऊणशेर जालें होतें. आज दोन रोज सव्वाशेर-प्रमाणें जालें. जोंरी बाजरी सव्वा दोन अडीच पायलीप्रमाणें भाव आहे. शिका चांदवड दरसदे ( दरशेंकडा ) आज भाव एक रुपयाप्रमाणें आहे. सावकारा कोणी नाहीं. सवदागर व जोहरी व कापडकर व उदमी मातबर गृहस्थ वगैरे बाहेर गेले ते कोणीएक आला नाहीं. दरवाजे लागलेले. आळ्याच्या आळ्या ओस आहेत ! श्रीमंत पुण्यांत आल्यावर काय बंदोबस्त होतो पहावा. "

---

नं. ६६३६ श्री. ( वैशाख व० ९–१५ मे. )

पै॥ छ० २३ मोहरम. सन सलास मयातेन.

+ विज्ञापना ऐसी जे. श्री॥ रा॥ पंतप्रतिनिधी यांचे स्वारीबरोबर मुधाजी नाईक रामोशी होता त्याचा उपद्रव बहुत होऊं लागला. याजमुळें प्रतिनिधी यांणीं किनईचे मुक्कामीं छ० १९ मोहरमीं मुधोजी व त्याचा भाऊ मुरारी आणखी त्याचे सोबती असे अकरा रामोशी ठार मारिले. तिसरा त्याचा भाऊ ईवत नाईक कराडाकडे गेला आहे त्याजबरही किनाईहून स्वारी गेली आहे. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६६३७. श्री. ( २३ मे. )

पै॥ छ० ९ सफर मुरू सन सलास मयातेन व आलफ.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी त्रिकाल चरणांवर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ ज्येष्ठ शु. ३ पावेतों वर्तमान सेवकाचें यथास्थित असे विशेष. मुंबईहून आणखी तीन पलटणें आलीं. गोखले, विंचूरकर, आपा निपाणकर, व यजमान याजला इंग्रजांबरोबर होळकराचे पारिपत्यास जावें अशी आज्ञा जाहली. त्यास गोखले याजला खर्चास नव्हतें त्यांस पन्नास हजार रुपये सरकारांतून दिल्हे. ते पुण्यापाशीं त्याचा मुक्काम होता तेथून

---

+ बाळाजी महादेव दामले यांचें पत्र रहिमतपुराहून मिरजेस.

ते इंग्रजांनजीक खडकीचे पुलाजवळ उतरले. निपाणीकर जाणार. विंचूरकर यांचा सरंजाम शिंदे यांणीं घेतला. कांहीं सुरतेकडे दोन लाख रुपयेचा इंग्रजांनीं मागितला त्यास दिल्हा. विंचूरकरास सरकारांतून ऐवज देऊं अशी आज्ञा जाहली आहे तेही जाणार. श्रीमंत रा॥ रामचंद्रपंत आपांच्या भेटीच अद्याप नाहींत. त्यांस व यजमानांस जा म्हणणार असें आहे. दोन तीन रोजांनीं इंग्रज दोन तीन पलटणें येथें श्रीमंतांजवळ ठेवून बाकी कूच करणार. पागा वगैरे लोक मिळोन अवघी भरती बारा हजार सरकारची होणार. अवघे मिळोन पैठणासुमारें जाणार. तेथून मग पुढें विचार असें आहे. होळकर अवरंगाबादेची खंडणी बारा लाख रुपये करून चांदवडास गेले. बीड व पैठण प्रांतीं फौज पठाण आहेत. नबाबाकडील यांजकडे बोलणीं तहाचीं लागलीं आहेत. कळावें. रावसाहेब जोरवेयाहून कूच करून नाशिकापलीकडे आवढा पट्टा किल्ल्याच्या सुमारें गेले. किल्ल्यास वेढा दिल्हा आहे. घोडपेचा किल्ला होळकराकडील असवेसिंग यांणीं घेतला. त्या किल्ल्याखालील सहा किल्ले घेतले. इतर किल्ल्यांस जाणार. असवेसिंग व रावसाहेब एक विचारें आहेत. कावनईप्रांतीं पंचवीस किल्ले आहेत ते घ्यावे हा मानस आहे. याजप्रमाणें बोलतात. शिंदे व भोसले यांच्या भेटी जाहल्याचें बोलतात. होळकर यांचा तह बहुतकरून होत आला, भेटी मात्र शिंद्याच्या व्हावयाच्या आहेत असें बोलतात. दिल्लीकडील पत्रें रा॥ आबाजी हरि किबे यांजला आलीं तीं त्यांजकडे पाठविलीं आहेत त्यांजवरून तिकडील वृत्त कळों येईल. पुण्यांतील सावकार कोणी आला नाहीं. कापडाचीं दुकानें अवघीं बंद आहेत. गृहस्थ कोणी गेलेला आला नाहीं. आहेत त्यांतून जातात याजप्रमाणें आहे. श्रीमंत श्रीकृष्णास्नानास जाणार अशी बोलवा आहे. हरभरे, जोरी, बाजरी रुव्वा दोन अडीच पायली भाव आहे. वैरण कडबा मिळत नाहीं. डोंगरचे × × गवत आणितात याप्रमाणें आहे. वडिलांस कळावें, बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ६६३८ श्री. [ २६ मे. ]

पै॥ छ. ६ सफर ज्येष्ठ सल्लास मय्यातेन.

शेवेसीं धोंडो बापूजी जोशी शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. जेष्ठ शु॥ ५ विशेष. श्रीमंत राजश्री अमृतरावसाहेब यांची स्त्री बाईस मातुश्रीचे घरीं + कोर्णी निघावयास गेली ती बाळंत होऊन देवाज्ञा जाली. काल पत्रें सरकारांत आलीं. रात्रीस चौघडा बाजला नाहीं व आजहि प्रातःकाळीं बाजला नाहीं. बेंर्ध यांचाहि बाजला नाहीं. बहुत काय लिहिणें. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६६३९ श्री. ( ज्येष्ठ शु० ६-२७ मे. )

पै॥ छ० ९ सफर अखेर साल. सल्लास मय्यातेन.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधरराव स्वामी गोसावी यांसी—

सेवक परशराम श्रीनिवास प्रतिनिधि नमस्कार विनंती. उपरी. येथलि कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. रा॥ रामचंद्रपंत याणीं पुण्याहून रा॥ माधवराव वासुदेव यांची रवानगी कुटुंबमुद्धां मिरजेस करून दिल्ही. समागमें पोहोंचवावयास रा॥ श्रीपतराव मोरेश्वर यांची पागा दिल्ही होती. त्यास बाह्याबोरगांव नजीक बेरडांनीं लुटिलें. वस्तवानी झाडून व पागेचीं घोडीं गेलीं. जवळ कांहीं राहिलें नाहीं म्हणोन विस्तारेंकरून लिहिलें तें कळलें. ऐशास मुष्या रामोशी नांदागिरीकर हरामखोर त्याणें जिल्हेंत दंगा करून वाटा पाडल्या. त्याचे पारपत्य करावें हा बेत बहुत दिवस होता. परंतु त्यास साताऱ्याकडील आश्रय त्यायोगेंकरून मांगा बेरडाचा त्याणें जमाव फार केला याजमुळें संध बनोन येण्यास चार दिवस लागले. तेव्हां येके दिवशीं अकस्मात् मुष्या व त्याचा भाऊ मुन्या हरदोजण व आणखी त्याचे साथी सांपडले. त्यांचा शिरच्छेद तेच समयीं केला. हें वर्तमान त्याचा भाऊ हैवती बेरड यास साताऱ्याहून रा॥ त्रिंबकराव महिपत पुरंधरे याणीं लगी देऊन पागा

+ कोर्नी निघणें=बाळंत होणें.

सांगितली. त्या आधारानें तो जमावमुद्धां दिराळ्यास जात होता. त्यास समजल्यावरून माघारा फिरोन कसबें मसूर हा गांव सरकारचा तो जाळला. येक दोन गांव लुटले. त्या दंग्यांत मशारनिल्हेही लुटले गेले असतील. त्यास सरकारांतून मांगवेरड्याचे चौकशीस कारकून व लोक रवाना जाले आहेत. त्यास तुम्हाकडीलही चीजवस्त व घोडीं जेथें असतील त्याचे ठिकाण पाहून त्याहावें म्हणजे त्याचे पारपत्यास येथून उशीर नाहीं. आढळेल तें देवावधास येईल. रवाना छ० ६ सफर. मुहसन सल्लास मयातेन व अल्लफ बहुत काय लिहिणें. हे विनंती.

---

नं. ६६४० श्री. (नकल) (ज्येष्ठ शु. १–२१ मे.)

चि॥ राजश्री* बाबा व दाजी यासी आशीर्वाद उपरी. इकडील मजकूर सविस्तर मागाहून लिहितों. तुम्हांकडील पत्रें पावलीं. आम्हांस जरीपटका घेणेंविशीं इंग्रजाकडून आग्रह फार पडला आहे. सरकारांतून त्यांचें सांगण्याप्रमाणें देणार. आम्ही पुसलें जे आम्ही तुम्हांजवळ मागितला नाहीं. तुम्ही कशावरून सरकारांत पुसून करार घेतला ! आम्हांस घेणें नाहीं. त्याजमुळें त्यांची मर्जी रुष्ट जाली. जरीपटकेयास साहित्य कांहीं द्यावयाचें नाहीं. जरीपटका जाहली आहे. फौज यांतच घेऊन जावें. खर्चवेंच कांहीं नाहीं. इंग्रजांचें म्हणणें आम्हीच चाकरीस हजीर आहों. मग आणखी काय पाहिजे ? हरीपंततात्यासारखे आम्ही थोर. खर्चावांचून करणार. आम्हीं स्पष्टच सांगितलें, सरकारांतून रुफत घ्यावयाचा मोठा आग्रह आहे. अशीं संकटें प्राप्त जालीं. काय करूं ! इंग्रज कूच करून अमदाबाद घोडनदीवर गेले. त्याची सरकारासी जरीपटक्यामुद्धां आमची रवानगी करणेंविशीं निकड भारी आहे. असा प्रसंग प्राप्त जाला. कसें करावें ! आम्ही तर इकडे येऊन अशी अवस्था. तेव्हां आमची आशा करणें पाहिजे ! दीक्षितबावांचे आज्ञेवरून पत्र लिहिलेलें पावलें. बाईस खासगीकडील रुमाल आहेत ते वगैरे जिन्नस लौकर घेऊन जाणें. इंग्रज पैठणाकडे जाणार. होळ-

* राम. आपाचें पत्र पुण्याहून तासगांवास हरीपंतबाबास त्याची ही नकल गंगाधरराव गोविंद यांचे हातची.

कर त्रिंबकाजवळ आहे. उदईक सविस्तर लिहितों. निपाणकर यांस सरलष्करी दिल्ही. सरंजाम सनदापत्रें जालीं. वस्त्रें जालीं नाहींत. परंतु शेवटास जाणें कठीण. कारकून पाठवावयाचें लिहिलें. उत्तम आहे. लौकर गुतरूवें जावे परंतु होळकर बधणार नाहीं. रवाना छ. १७ सफर. इंदुवार. बहुत काय लिहिणें. लोभ कीजे हे आशीर्वाद. हें पत्र वडिलांस दाखवावें हे आशीर्वाद. हरजी मदने याजबरोबर घोडीं बाराशे रुपयेस घेऊन पाठविली आहे. वसावयास घेणें हे आशीर्वाद.

राजश्री चिंतोपंतदादा स्वामींस साष्टांग नमस्कार. असा समय प्राप्त आहे. लोभ कीजे हे विनंती. पे॥ छ. २१ सफर.

---

नं. ६६४१ श्रीगणपतिर्जयति. [ ज्येष्ठ शु. ९--२९मे. ]

छ. ७ सफर सन्न सलास मयातैन. जेष्ठ.

विज्ञापना. बंडवाले यांचे पारपत्यास सरकारची फौज जरीपटका व पटवर्धन व रास्ते व गोखले, निपाणीकर, चाफेकर वगैरे लाहान मोठे सरदार व इंग्रजांकडील पलटणें यांची रवानगी करावी याप्रमाणें ठरण्यांत येऊन इंग्रजांजवळ जाऊन उतरण्याविसीं सर्वांस सरकारांतून ताकीदी होत आहेत. एक दोन दिवसांत कूच करण्याचा बेत इंग्रजांचा दिसतो. पन्नास लक्षांचा सरंजाम लाऊन द्यावयाचे करारापैकीं तूर्त सुरत अठाविसी चौदा माहाल व धारवाड तालुका व सावनूर तालुका व किनूर तालुका इतके मिळोन छतीस लक्षांच्या सनदा तयार होऊन इंग्रजांस दिल्या. अष्टमी मंदवारीं जनरल वसर्लीसाहेब व आणखी सात आठ आसामी गोरे सरकार वाड्यांत आले होते. चार घटका बैठक होऊन अस्तमानीं माघारे गेले. फिरोन परवां येऊन बोलणें होऊन बंडवाले यांचे मोहल्यावर जाण्याचा बेत ठरून सनदा घेऊन गोटाला गेले. इंदुवारीं श्रीमंताची स्वारी राजश्री नीळकंठराव शिंदे मनोळीकर व निपाणीकर यांच्या राहुटीस आली होती. भेटी होऊन अस्तमानीं माघारीं गेली. निपाणकरांनीं उभयतां श्रीमंतांस वस्त्रें व शिरपेंच व घोडीं दोन येणेंप्रमाणें दिलें. तोफेचे बारही चाळीस

पत्रासपर्यंत केले. जाला मजकूर निवेदन व्हावा म्हणोन विनंती लिहिली आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६६४२ श्री आई आदिप्रमाण. ( ज्येष्ठ शु० ९-२९ मे. )
पै॥ छ० १७ सफर. ज्येष्ठ. सन सल्लास मय्यातैन.

राजश्रियाविराजित राजमान्य रा॥ गंगाधरराव स्वामी गोसावी यांसी—

सेवक आनंदराऊ आबाजी प्रतिनिधि नमस्कार. विनंती. उपरी. येथिल कुशल जाणोन स्वकीये लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनार्थ सविस्तर कळों आला. सालवादोर फिरंगी वैद्य येथें पदरीं आहे. त्यास औषधें आणावयाकारितां गोव्यास पाठविला. तो मार्गी वस्तीस माहागांव येथें राहून दुसरे दिवशीं पुढें आजऱ्यास निघाला. तों वाटेस माहागांवकडून दहा पंधरा असामी चोर येऊन वैद्य यांस लुटलें. घोडीं व बैल वगैरे चीजवस्त झाडून नेली. नंतर फिरंगी माघर्ता माहागांवास येऊन रा॥ कोनेरराव तेथें होते त्यांस वर्तमान सांगितलें त्याणीं चौकशी करावी ते न करितां टाळाटाळ केली. म्हणोन वैद्य याचें पत्र आलें. त्यावरून लिहिलें आहे. तरी माहागांवकर यास ताकीद होऊन वैद्य याचे घोडीं व बैल वगैरे चीजवस्त गेली आहे, ते देविली पाहिजे, म्हणोन लिहिलें तें सर्व कळलें. त्यास आपल्या लिहिल्यावरून माहागांवास येविशींचें वृत्त लिहोन पाठविलें आहे आणि येविशींची चौकशी करविली आहे. तेथून उत्तर आल्यानंतर आपल्यास लिहोन कळवूं. चौकशी पुरी होऊन बाजवी असेल तैसेंच होईल. कळावें. आपल्या लिहिण्यापेक्षां अधिकोत्तर नाहीं. चौकशीअंतीं महागांवकर याकडे चोरी लागू जाह-ल्यास देवावयास येईल. रवाना छ० ७ सफर बहुत काय लिहिणें. लोभ असों द्यावा. हे विनंती.

---

नं. ६६४३. श्री. ( ज्येष्ठ शु. १० – ३१ मे. )

सेवेसीं सखो त्रिंबक दोनी कर जोडून[1] शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना.

---

१ विशाळगडकर. पत्र मिरजेस.

ऐ. ले. सं. १५.

ता।। छ. ९ सफर पावेतों मु।। सातारा बर्तमान यथास्थित असे. विशेष. हैबती रामोशी मु।। मा।रीं रा।। त्रिंबकराव पुरंधरे याजपाशीं आहे. आपली घोडीं त्याजपाशीं आहेत तीं बी।।वार:—

१ मतवाली, १ गुण सागर, १ मनरुपी, १ पाटल्या तटू येणेंप्रमाणें चार येथें उमगलीं. त्यावरून आम्ही पुरंधरे यांचे कानावर घातलें. त्यास मसारनिल्हे यांणीं उत्तर केलें कीं, तुम्ही पत्र आणिलें कीं काय ? त्यास आम्हापाशीं पत्र नाहीं. तर रा. पुरंधरे यांस पत्र श्रीमंत राजश्री बाळासो यांचें व आपलें कीं, सखो त्रिंब (क) आम्हाकडील आहेत. तरी बेरडास ताकीद करून नागोबा देवावा. नागाव्याची याद जरूर करून पाठवावी व आणीक दोन गडी पाठवावे. त्यांची पोटाची बेगमी करून पाठवावे. पत्र जें लिहिणें तें खणखणीत लेहून पाठवावें. नागावा बेरडाकडून देवावा. नाहीं तर बेरड आमचे स्वाधीन करावा. न दिल्हेस आपणांस जातीवर द्यावा लागेल. म्हणून साफ ल्याहावें. पत्र व गडी रातोरात मंगळवार: पेठेंत रा. बाळाजी रामचंद्र माहाजन याचे वाड्यांत पावेत तें करावें. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

रुद्राजी गडी याचा जोडा दरबारांत हारवला. त्यास जोड्यास रुपया देवावयाची आज्ञा व्हावी हे विज्ञापना.

---

नं. ६६४४ श्री. (ज्येष्ठ शु० १० – ३१ मे.)

वै।। छ० १० सफर. सल्लास मयातैन व अल्लफ.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक बाळाजी महादेव दामले चरणावर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता।। छ० ९ सफरपर्यंत सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. रा।। नारायणराव माने व संभाजी माने सातारियाहून फौजमुद्रां पळोन गेले. याजमुळें माने मंडळीच्या घराच्या जप्तीस तीनशें स्वार व शेंभर गाडदी पुरंधरे यांणीं पाठविले आहेत. माने यांच्या घरांतून कांहीं येक नाहीं. रा।। फत्तेसिंगराव

---

१ नागावा = लुटले गेलेले जिन्नस. २ पत्र रहिमतपुराहून मिरजेस.

माने धरले तेव्हांपासून मुसमाणसामुद्धां गावांत नाहींत. जतीवाले आले आहेत. यांणीं गावांतच दंगा भारी केला आहे; खर्च मनस्वी घेतात. वैरण कडबा गावांतून झाडून नेत आहेत. मान्याचे जतीस आला त्याची जमी करावी. वरकड रयतेस उपद्रव करूं नये म्हणोन सांगत असतां ऐकत नाहींत. पुरंधरे यासही एकदोन पत्रें गांवास उपद्रव होऊं नये म्हणोन पाठविलीं. परंतु त्याजकडूनही निक्षून ताकीद होत नाहीं. बागी यांचीं दुकानें उघडून लागेल तो जिन्नस नेतात. कोणीकडूनही त्यांणीं खराबी मांडिली आहे. रातंदिवस गांवची नाकेबंदी केली आहे. रयेत तजावजा[1] होत चालली आहे. मजरे नेहरवाडी दोन वेळां पुरंधरे यांची कही येऊन लूटून नेली. गांव आजपर्यंत राखला होता त्याचाही विध्वंस मांडिला आहे. सालमजकूरचा थोडाबहुत वसूल राहिला आहे. व पुरंधरे याणीं घासदाण्याबद्दल चार हजार रुपये घेतले त्याची पट्टी केली होती. तो वसूल यावयाचा तोही राहिला. गावांत लुटालूट फार करतात. श्रीमंत रा॥ पंतप्रतिनिधि यांचीही स्वारी याजानिमित्य यावयाची आवाई आहे. याजकरितां स्वामीस विनंती लिहिली आहे. तरी गांवचा बंदोबस्त होऊन वस्ती राही तो अर्थ केला पाहिजे. माने यांच्या खटल्यामुळें वस्ती राहतां दिसत नाहीं. माने सरकार लाजमेदार[2] असतील त्यांच्या जप्तीमुळें गांवावरी खर्च पडून रयतेस उपद्रव होतो हा होऊं नये म्हणोन पुरंधरे यास पत्र द्यावयासी आज्ञा जाहली पाहिजे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६६४५. श्रीगणपति. ( ज्येष्ठ—मे. )

[3] आशिर्वाद उपरी-बुधवारीं. रात्रौ वाड्यांत भोजनास गेलों. श्रीमंतास नर्क्ते श्रावण मासाचीं आहेत. भोजनापूर्वी दफतेचा कारभार उलघडला. त्याचा उच्चार करण्याची रीत तुम्हास ठाऊक आहे. भेटीनंतर साकल्य सांगेन. ईश्वरइच्छा प्रमाण ! मर्जी प्रसन्न होऊन भोजनानंतर दोन

१ तजावजा — भयभीत. २ वतनदार. ३ पत्र राम. आपांचें पुण्याहून तासगांवास हरिपंतबावास.

घटका रात्रीस विडे होऊन वस्त्रें आणिलीं. मी विनंती केली हें काय आहे? तेव्हां उगेच देतों म्हणाले. मी विनंती केली हे चाल नाहीं. आम्हां दोघांनीच घेतली तर आमची भाई मंडळी रुसेल. जलमेचीं वस्त्रें घेतलीं म्हणतील. मर्जी असे तरी खिजमतगारासमागमें पाठवावीं. नंतर चिरंजीव राजश्री बापूस वस्त्रें दिलीं. गुलाब अत्तर चालते होऊन कात्र-जेस सोळा घटका रात्रीस आलों. नागनाथही होते. तुमचे मर्जी-प्रमाणें जालें. पुढें कामकाजाची वाट काय? त्यांनीं उत्तर केलें करून देतों. होणें जाणें समजलेंच आहे. हे आशीर्वाद.

---

नं. ६६४६ श्री. (३ जून)

पै॥ छ० १८ सफर सुरू सन सलास मय्यातैन व आलफ.

सेवेसीं धोंडो बापूजी जोशी त्रिकाल चरणांवर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत ज्येष्ठ शु. १३ पावेतों बालकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. होळकर यांणीं कबिलासमेत* आटाळा चांद-वडास ठेवून सडे होऊन श्रीत्रिंबकेश्वराचे रोखें आले. श्रीमंत राजश्री अमृ-तरावसाहेब श्रीनासिकास गेले. शिंदे व भोसले यांच्या भेटी शु॥ पंचमीस सतमीस जाहल्या. राजश्री बाबा फडके हैदराबादेहून निघून होळकर यांजकडे आले. त्यांची भेट घेऊन भोसले यांजकडे जाणार याप्रमाणें बोलतात. शिंदे बराणपुराहून निघोन चार मजली इकडे आले. आंबोजी इंगळे, व भोसले यांजकडील विठलपंत असे उभयतां कांहीं जमाव घेऊन नगरास येणार अशी बोलवा आहे. इंग्रजांचीं पलटणें आजपर्यंत सातआठ-पर्यंत आलीं. दारुगोळा दाणा वगैरे इमरस्ता मुंबईहून येत आहे. कार-खाना नेहमीं त्याणें येथें बांधवन्यास लाविला आहे. छपरबंदी करीत आहे. सरकारचा वाडा पलीकडे होता तो त्यांस दिला. त्याजमध्यें ते काम नवें करीत आहेत. एक बेळां बसली व आणखी मंडळी मिळोन वीस जणांसहित बागांत भोजनाची मेजवानी केली. सर्वांस शालजोडी व किन-खाप निम्मे व महमुद्या दिल्ह्या. बसली यास जास्ती कंठी, शिरपेंच, व

* कबिला = बायकामुलें, आटाळा = जड सामान.

जेगा दिल्हा. मेजवानीस ब्राह्मण मंडळी फारशी गेली नव्हती. आठ रोज जाहले. वाफगांवास वाडा होळकराचा आहे. त्या गांवचे जमीस विंचूरकर पाठविले. एक दोन रोज गोळागोळी जाहली. दुसरे दिवशीं वाडा टाकोन लोक गेले. गांव लुटिला. भांडीं वगैरे पुण्यास आणिलें. कळावें. इकडे धारणही महाग. डोंगरचें गवत मिळतें, कडबा मिळत नाहीं. कळावें. बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

---

नं. ६६४७ श्री. ( ३ जून. )

पै॥ छ० १८ रुफर. सलास मयातेन.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी त्रिकाल चरणांवर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ज्येष्ठ शु॥ १३ पावेतों बालकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. रामचंद्रपंत आपासाहेब यांच्या भेटी काल शु॥ १२ गुरुवारीं सायंकाळचे दोन घटका दिवसास स्वारी श्री॥ रा॥ चिंतामणराव आपासाहेब समेत सरकारवाडा उजवा घालून वाड्यांत गेले. आधीं श्री॥ रा॥ चिंतामणराव आपांनीं नमस्कार केला. मग श्री॥ रा॥ रामचंद्रपंत आपासाहेब यांणीं पायांवर डोय ठेविली. अर्ध घटका बसोन नंतर उठोन वात्रजेस गेले. आपल्या वाड्यांत आले नाहींत. सायंकाळ जाहला, प्रदोषाचा समय यास्तव सत्वर गोटास गेले. वाडलांस कळावें. श्रीमंतांचे बैठकीचीं बोलणीं येजमान वडिलांस लिहितील त्यावरून कळों येईल. बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६६४८ ( ज्येष्ठ व. ४ – ९ जून. )

उतारा— पत्र पुण्याहून मिरजेस धोंडो बापूजी जोशी याचें.

" श्री. राजश्री चिंतामणराव आपासाहेब श्रीमंतांकडे आले होते. श्रीमंतांनीं धोतरजोडा जरीकांठी पाऊणशें ऐशीं रुपये किंमतीचा दिल्हा. चार रोज जाले. "

---

नं. ६६४९ श्री. ( ज्येष्ठ ब. ४ – ९ जून. )

पै॥ छ० २५ सफर सु॥ आर्बा मय्यातैन व अलफ.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी त्रिकाल चरणावर मस्तक ठेवून शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत ज्येष्ठ ब. ४ पावेतों वर्तमान क्षेम असे. विशेष. इंग्रज पलटणें घेऊन पवाराचे अमदाबाजेसुमारें गेले. पुण्याहून चवदा कोशांवर पुढें गेले. पुढें पैठणास जाणार अशी बोलवा आहे. पुण्यास तीन पलटणें संगमावर आहेत. बाकीचे गेले. भांबवड्यास छप्परबंदी प्रजन्यकाळची करीत आहेत. गोखले, विंचूरकर, निपाणीकर यांजला इंग्रज पुढें गेले, तुम्ही सत्वर जाणें अशी ताकीद होत आहे. यजमानांस तिकडे जावयास अलीकडे ताकीद नाहीं असें ऐकण्यांत आहे. श्री. राजश्री आपासाहेब केळवडेस होते. ते श्रीमंतांचे भेटीस आले ते माघारें कातरजेस श्री० राजश्री आपासाहेबांचे गोटाजवळच उतरले ते अद्याप कातरजेसच आहेत. होळकर चांदवड्यास आहेत. रावसाहेब नाशिकास आहेत. शिंदे होळकर यांच्या भेटी जाल्या. गंगेच्या सुमारें येणार अशी बोलवा आहे. मुंबईहून रसद हरजिनशी लागली आहे. तोफा पंचवीस पनवेलीस त्याणें उतरल्या आहेत याजप्रमाणें बोलतात. कळावें. बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६६५०. श्री. ( २० जून. )

पै॥ छ० २४ रबिलावल आर्बा मय्यातैन आषाढ मास.

साां नमस्कार विनंती उपरी. तागायत आषाढ शु. १ मुक्काम पुणें वर्तमान यथास्थित असे. विशेष. तुम्ही मिरजेहून येतों म्हणोन पत्रीं तपशीलवार लिहिलेंत त्यावरून हें पत्र तुम्हांस वांईस पाठविलें आहे. तरी येथील वर्तमान तरी बसलीसाहेब वगैरे लहानथोर इंग्रज असामी सोळा यांस हिराबागेंत मेजवानी होऊन बक्षीस कंठी, शिरपेंच, वाजत सरदार यास सहा असामीस शिरपेंच, नंतर सर्वांस साडेतीन सनगें याप्रमाणें निरोपाची होऊन बसलीसाहेब पलटण व तुरुकस्वार व सरंजाममुां कूच करून नगरानजीक निंबगांव पानवडी येथें मुक्काम करून आहेत. नंतर एके दिवशीं

फलटणांतील बसलीकडील सरदार पधरा वीस असामी गोरे व शंभर सवाशें कवायती याप्रमाणें मिळोन नगरच्या किल्यांत जाऊन पाहून यावें म्हणोन किल्यानजीक गेले. किल्ल्यांतील लोकांनीं सांगून पाठविलें जे, तुमचें किल्ल्यानजीक येण्याचें कारण नाहीं. तेव्हां जबरदस्तीनें किल्ल्यांत जावें म्हणोन किल्ल्याचे जिमीजवळ गेले. नंतर किल्ल्यांतील आरबांनीं गोळ्या घालून गोऱ्यांपैकीं आठ दहा असामी ठार केले. बाकी राहिले ते गोटास माघारे आले. त्यावरून बसलीसाहेब यांचा राग नगरच्या किल्ल्यावर बहुत आहे. बसली कूच करून गेल्यावर श्रीमंतांस सांगून पाठविलें जे सरकारचे सरदार फौजसुद्धां लौकर पाठवून द्यावे. त्यास त्यावरून आपा निपाणकर यास श्रीमंतांनीं सरलष्करचा जरीपटका व साहेबनौबत देऊन वस्त्रें देऊन फलटण व फलटणदेश जानराव नाईक निंबाळकर यांजकडील दूर करून निपाणकर यास सरंजामांत देऊन सनदा दिल्या. बापू गोखल्यास श्रीमंतांनीं कंठी शिरपेंच पोशाख देऊन श्री॥ राजश्री रामचंद्रपंत आपाकडील दो माहालाच्या सनदा गोखले यास दिल्या आहेत. राजश्री बापू चाफेकर यास सरदारकीचीं वस्त्रें देऊन अनुबाई घोरपडी याजकडील इचलकरंजी वगैरे सरंजाम आहे तो चाफेकर यास सरंजाम नेमून देऊन सनदा दिल्या आहेत. राजश्री अन्याबा रहातेकर यांस वस्त्रें देऊन कुल फौजेचें कामकाज बक्षीगिरीचें सांगोन मालोजी घोरपडे यांजकडील सरंजाम इंडी, तांवें, अलमेलें यांच्या सनदा रहातेकरांस दिल्या आहेत. याप्रमाणें सरदारांची उभारणी करून फौजा ठेवून लौकरच बसलीसाहेबाकडे जाणार. विंचूरकर याचा सरंजाम हिंदुस्थानांत आहे तो शिंदेबहादर यांणीं जप्त केलाच आहे. स्वदेशाचा सरंजाम लुटला गेला. गुजरायेंत उत्पन्न चौ लक्षांचें राहिले होतें तें इंग्रजांस दिल्हें असें असोन विंचूरकर यांच्या दारीं सरकारांतून कारकून व हुजरे बसले आहेत कीं, नेमणुकीप्रमाणें फौजसुद्धां बसलीसाहेब याजकडे निघोन जावें. विंचूरकर यांचें म्हणणें जे आम्हास पानाची पट्टी द्यावी म्हणजे आम्हास पोट भरेल तिकडे आम्ही निघोन जातों. राजश्री रामचंद्रपंत आपा व चिंतामणराव आपा यांणीं फौजसुद्धां

१ किल्ल्याच्या दरवाजावरची भिंत.

बसलीसाहेब याजबरोबर निघोन जावें म्हणोन सरकारतर्फे उभयतांकडे राजश्री बळवंतराव नागनाथ मध्यस्तींत कात्रजेंत जात असतात. त्यास उभयतां आपासाहेब याचें म्हणणें जे आमचे सरंजामाचे महाल पूर्वी सरकारांत घेऊन गोखले यास दिल्हे आहेत व हल्लीं एक दोन महालच्या सनदा गोखल्यास करून दिल्या आहेत म्हणोन ऐकतों. तेव्हां फौज कशावरून ठेवून चाकरी कशी करावी ? अशीं परस्परें बोलणीं चालली आहेत. पुढें कसें ठरेल तें पहावें. रास्ते यास येण्याविशीं वाईस पत्रें वरचेवर जात आहेत. त्यास समाधान नाहीं म्हणोन उत्तरें येतात. राजश्री शामराव रास्ते चारशांचशें स्वारानिशीं येथें आहेत त्यांच्या दारीं हुजरे सरकारांतून बसले आहेत जे लौकर निघोन बसलीकडे जावें. त्यांचे म्हणणें जे उभयतां पटवर्धन निघाले म्हणजे आम्ही निघतों. गोखले वगैरे लहान थोर सरदार मिळोन सरासरी पांच हजारपर्यंत फौज भरेल. परंतु वैरणीमुळें जनावरें बहुत मरतात. इतकें दिवस साडेआठ शेरांची धारण होती. आतां साडेमहा शेरांची जाली आहे. शहरचा कारभार विठोजी नाईक करतात. सदाशिव माणकेश्वर श्रीमंतांची मर्जी पाहून थोडेंबहुत खलबत व कारभारही जुजबी पाहून करतात. राजश्री खंडेराव रास्ते श्रीमंतांच्या खासगीचा खर्च बेंच संभाळून प्रसंगानुरूप लोकांचें बोलणेंही बोलतात. राजश्री रामचंद्र गोसावी व व्यंकट नरसी पैठणास आहेत त्यास हुजूरचें बोलावणें गेलें आहे. आलीकडे स्वारी पुण्यांत आल्यापासून दरबार वगैरे राजकारणी राज्याचा बंदोबस्त याचा विचार बहुतसा नाहीं. उदासीन वृत्तीनें दौलतप्रकरणीं अपशब्द बहुत बोलतात. चित्तांत काय आहे हें बोलून दाखवीत नाहींत. बसली साहेब याची उमेद भारी आहे. दक्षिणेकडून व मुंबईकडून सरंजामाच्या पेट्या वरचेवर येत आहेत. मंबईची चार पलटणें येथें श्रीमंतापाशीं रखवालीस आहेत त्यास मंबईकडून आणखीं चार पलटणें येणार तीं परभारें बसलीकडे जाणार. बसलीची उमेद जे, होळकर धरून देतों याप्रमाणें म्हणणें आहे. मशीरच्या तर्फेची फौज व पलटणें जालनापुरानजीक आली आहेत. सरकारच्या तोफखान्यांत दोन जंबुरे दीड शेरी गोळ्याचे आहेत. शिवाय होळकरानें तोफा नेल्या त्यांपैकीं थोरली तोफ बारा शेर गोळ्याची तुळजा-

भवानी कोरेगांवावर टाकली होती ती आणली आहे. हुजुर पागेपैकीं वीस पंचवीस खाशास बसायापुतीं घोडीं आहेत. बाजत पागा तर बहुत-करून बरोबर जाल्या ! निसबतवार घोडीं आहेत त्यास दाणा वैरण जे वस-तात त्याणीं द्यावी याप्रमाणें ताकीद जाली आहे. राजश्री रावसाहेब यांणीं धोडपचा किल्ला घेऊन त्रिंबक व कावनाई तालुका व नाशीक वगैरे लुटून टाकल्या. यशवंतराव होळकर चांदवडाहून उत्तरेकडेस दहा पंधरा कोश नंदुरबार मुलतानपुरावर गेले आहेत. तेथून पंचवीस तीस हजार फौज गाई-कवाड यांच्या कुमकेस पठाण व हरिनाथसुद्धां रवाना केले. सुरतेकडे गुज-राथप्रांतीं जाणार. शिंदे बहादुर यांच्या व भोसले यांच्या भेटी बोदवाडच्या मुक्कामीं छ० १३ सफरीं होऊन खंडेराव होळकर भोसले यांच्या स्वाधीन केले. शिंदे यांजकडील अंबोजी इंगळे व भोसल्याकडील श्रीधरपंत बापू होळकराकडेस येऊन परस्परें भेटी लौकरच होणार म्हणोन याप्रमाणें तिकडून पत्र आलें आहे. पुरंदरचा किल्ला साने याजकडे आहे तो बदलला. शिरवीच्या व सासवडच्या रस्त्यांत दंगा करतात याप्रमाणें इकडील वर्तमान आहे. तुम्ही लौकर यावें. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ कीजे हे विनंती. दादा गद्रे याजपासून लाख रुपये घेऊन लिव्हगडाहून पुण्यास आणलें. हे विनंती.

---

नं. ६६५१ श्रीगणपति. ( आषाढ शु. ६ –२५ जून.)
पै॥ छ० १२ रबिलावल सन आर्बा.

+अपत्यें रामचंद्रानें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ॥ ५ रबिलावल यथास्थित असो. विशेष. इकडील मजकूर अलाहिदा पत्रावरून विदित होईल. रा॥ दादा गद्रे सरकारांत दोन लक्ष रुपये द्यावयाचा करार करून मोकळे जाहले. तूर्त एक लक्ष द्यावे. पुढें हप्तेबंदीनें एक लक्ष द्यावे याप्रमाणें करार. त्याप्रमाणें निभावणी झाल्यास उत्तम. नाहीं तर पूर्वप्रकार. रा० चिंतोपंत देशमुख होळकराकडोन सुटले. पुण्यास आले.

+ राम. आपांचें पत्र पुण्याहून निरजेस.

जरीपटका घेऊन पुरंदरे पुण्यास आले. सरकारची मर्जी रुष्ट आहे. कारण समजलें नाहीं. बहुत काय लिहिणें. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६६५२ श्री. ( जुलै. )

पुण्यग्रामीं× कोणी एकानें भाकीत सांगितलें—

शके १७२५ श्रावण शु॥ १५ अथवा कृष्ण ५ किंचित् लोकानामभयम्. भाद्रपद शु॥ ६ अथवा शु॥ १४ अथवा व॥ ९ पासून सात दिवसपर्यंत महान् प्रळयः. आश्विन शु॥ २ द्वितीयेपासून दशमीपर्यंत युद्धादि. आश्विन कृष्ण ११ पासून कार्तिक शु॥ पंचमीपावेतों राज्यचलत्वं. कार्तिक शु॥ पौर्णिमानंतर ३ दिवसांमध्यें महापुरुषनाशः. तदनंतरं कार्तिक कृष्ण द्वादशीस शूद्रमृत्यु. मार्गशीर्ष मासीं प्रजेस सुख. मार्गशीर्ष शु॥ एकादशीपासून साता दिवसांमध्यें नूतन मुद्रा. पौषे धान्यसुभिक्षं. माघे जननाशः. फाल्गुनमासे रोगपीडा. पुढें क्षेमः.

आगमन प्रश्नोत्तरं शके १७२५ आश्विन कृष्ण त्रयोदशीपासून पांच दिवसांत आगमन अथवा मार्गशीर्ष शु॥ एकादशी अथवा माघमासे आगमनं. अतःपर ईश्वर जाणे !

---

नं. ६६५३. श्री. ( आषाढ – जुलै. )

जबानी. बाबाजी माणूस नि॥ जिऊबा नाईक सराफ.

१ बसलीसाहेब याचा मुक्काम आंबेडापासून घनशामी पूर्वेस सहा कोस येथें आहे. आंबेड राक्षसभुवनाच्या पूर्वेस सात कोश.

१ सखो रुद्र व पलटणें जळगांव औरंगाबादेच्या पूर्वेस सहा कोश येथें आहे.

---

× फलज्योतिषाच्या लफंडावाचा हा एक सामान्य नमुना मुद्दाम छापला आहे. यापैकीं सर्व भविष्यें खोटीं ठरलेलीं आहेत ! सामान्य लोकांत पूर्वी या भाकडशास्त्राचें मोठेंच प्रस्थ होतें त्यामुळें असले हे भविष्याचे कागद जुन्या दप्तरांतून पुष्कळ आढळतात.

१ भोसले व शिंदे यांचा मुक्काम देऊळगांवचे पूर्वेस सहा कोशांवर आहे. देऊळगांव जालनापुराच्या पूर्वेस सात कोस

१ शिंदे यांचे पेंढार बसलीसाहेब यांचे लष्करासभोंवते फिरतात. दररोज तट्टे उंटे पाडून नेतात.

१ धारण इंग्रजांचे लष्करांत चार शेरांची व शिंदे भोसले यांच्या लष्करांत दोन शेरांची.

१ सखो रुद्र यांणीं फितूर केला सबब इंग्रजांचा पहारा आहे.

१ कोंबड्याची लढाई बसलीच्या लष्करांत जाली.

शिंदे यांचे फौजेस व बसली याचे लष्करास दहा कोसांचें अंतर आहे.

---

नं. ६६५४ श्री. ( पुरवणी ) ( नकल ) ( जुलै )

×राजश्री बाळोजी कुंजर येथें खटपट करून श्रीमंतांचे चाकरीस लक्ष ठेवून आहेत. अंमलांत येऊन निदर्शनास येईल तें खरें कलम १

तापी उतरोन चोपड्याचे मैदानांत शिंदे होळकर भोसले एकत्र होणार. लाखनगांवचे घाटावर.

गोपाळराव चिटणीस आजंठ्याचे घाटापासोन उडगांवचे सुमारें लष्कर आहे. मलकापूरचे सुमारें.

दूधडेरा.

फर्दापूर व तोंडापूर बऱ्हाणपूरचे ———————— पूर्वेचे आंगें.

उंबरखेडनजीक आले जे आंजन ( ? )

---

नं. ६६५५ श्रीगणपति. [ नकल. ] ( जुलै. )

पै॥ छ० २३ रबिलावल. बुधवार.

आशीर्वाद उपरी. सारे पगडबिंद एक जाले. पुढें आम्ही कळेल तसें करावें कीं काय म्हणोन कुलीससाहेब सरकारांत पुसावयास आले. नंतर आज्ञा केली जे तुम्हास यादी जुदी करोन दिल्या. त्या तुम्ही जलदी

× ही पुरवणी अपुरी सांपडली. दूधडेरा हें गांव बऱ्हाड व मोंगलाई याचे हद्दीवर आहे.

करून शिंदे भोसले यास दाखविल्या सबब होळकरमुद्धां एक होणार. त्यांस असो. जलदी जाली ती जाली. आतां स्वस्थ असा. मजकडून तुम्हांस अंतर नाहीं. शिंद्यांकडील वकील येथें आहेत त्यास व सरकारचे कारकून त्याजकडे पाठवून त्यास गंगातीरास आणून आम्हीं भेटीस जाऊन तुमची यादी सई करून देतों म्हणोन करार करून खातरजमेचें बोलणें बोलून खुशी होऊन निरोप दिल्हा. ते दिवशींच बाईस जावयाचें ठराविलें. शिंदे याजकडील दाजी देशमूख व सरकारचे कृष्णाजी भवानी म्हणोन सदाशिव माणकेश्वर यांचे कारकून यांची रवानगी करून स्वारी गेली. देशमुखास बोलावून आणलें होतें. बोलणें होऊन निरोप दिल्हा. त्याचें सांगण्यांत लौकर गंगातीरास येतों. श्रीमंत आम्हांत मिळून घेऊन मग टोपीकरांशीं फेर सांगावयाचा इतकी आज्ञा आहे. होळकराची भेट जाली असतां इंग्रज वुजतील. त्यांणीं अंतऱ्यानें असावें. भेट होऊं नये. सरकारची भेट जालियावर मग होळकर पायावर घालून गौरमुखास बदल सांगावे असा मजकूर आम्हांस सांगून गेले. आम्हांकडील कारकून द्या म्हणत होते. परंतु नरहर विठल आले नाहींत. मागाहून पाठवून देतों म्हणोन सांगून पाठविलें. कळावें. वडिलांस हें पत्र दाखवावें. हे ❀ आशीर्वाद.

---

नं. ६६५६. श्रीगणराज. (आषाढ शु॥ १२-१ जुलई.)

पै॥ छ॥ १५ रविलावल, आषाढमास. सन आर्बा.

* अपत्यें आपानें सां नमस्कार विज्ञापना. ता॥ छ॥ ११ रविलावल भृगुवार वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं गलगल्याचे मुक्कामचें आज्ञापत्र पाठविलें, तें पावलें. पुण्याहून ती॥ राजश्री रामचंद्रपंत आप्पा व सदाशिव रामचंद्र जोशी यांचें पत्र छ॥ ५ मिनहूचें आलें. त्यांतील मजकूर—तीन वेळां श्रीमंतांची भेट जाहली. कामकाजाची याद लिहून दिली, परंतु अद्यापि प्रथम दिवस आहे. कोणतेंही काम नाहीं. इंग्रज घोडनदी उतरोन पूर्णा नदीच्या तीरास जांबगांवच्या सुमारें आहेत.

---

❀ रामचंद्र परशराम यांचें पत्र हरि परशराम यांस. * त्रिंबकराव आपा कुरंदवाडकर यांचें पत्र मिरजेस.

पशु जात बहुत मेली व मरती. तीन शेराची धारण जाहली आहे. परंतु इंग्रज खजानपूर [?] यास्तव दम धरून आहेत. शिंदे भोसले यांची भेट होऊन होळकरांचा पुत्र भोसल्याचे हवाली केला. इतःपर होळकर, शिंदे यांच्या भेटी लवकरच होणार असें लिहिलें आहे. निपाणकर व गोखले पुण्यांतच आहेत. सरकारांतून गोखल्यांच्या खर्चाची बेजमी जाहल्यानंतर चालते होणार. वरकड पुण्यांत 'श्रीमंत नित्य श्रीनित्यमंगलं' या अन्वयें सुखरूप आहेत. कोणती काळजी नाहीं. वसईहून अग्नीहोत्री आणिले. चातुर्मास्यें करविलीं, आपण अध्वर्युत्व केलें. प्रायश्चित्त न घेतां अनुष्ठान सिद्धीस नेलें. वो। रामचंद्र दीक्षित ओक यासही आणिलें होतें. त्यांणीं सांगितलें, आपण क्षत्रिय धर्म करितां. आपणांस अध्वर्युत्व करणें योग्य नाहीं. आपण यज्ञ करवावे असें सांगितलें. भोजनसमई रांगोळ्या वाजंत्री याप्रमाणें नित्योत्साह आहे. स्वारी माघारी कधीं येणार? सविस्तर लिहिण्यास आज्ञा जाहली पाहिजे. विदित होय, हे विज्ञापना.

---

नं. ६६५७ श्री. (आषाढ शु० १३-२ जुलै.)

तागायत छ० १२ रबिलावल मु॥ दिल्ली. इकडील वर्तमान तरी पिरु फिरंगी यांणीं दरोबस्त पलटणा व स्वार जमा करून कोलेंत छावणीची तयारी केली व लोई फिरंगी सतलूज प्रांतीं शिखांचे मुलखांत होता त्यास जलदीनें बोलाविलें. सबब म॥ निव्हे दरकूच हांशीस येऊन कंपूची छावणी हिसार नजीक हरयानाप्रांतीं केली व खुद्द जरीरी संस्थानीं आला. भाई लालसिंग शिख पटेल्याकरांचा मुखत्यार यास बोलाविलें आहे. मशारनिल्हे आल्याबर बरोबर घेऊन कोलेस जाणार आहे. तुरत संस्थानचे किल्लेयांत व आगरा रामगडचे किल्लेयांत जकीरा वगैरे जंगी सरंजामाची तयारी होत्ये. पूर्वेकर जॅळचर यांचीं चार पलटणें हरदुवागंज कोलेहून आठ कोस आहे तेथें दाखल जाल्या. छावणी यांच्या मुकाबल्यास करणार. गवरनेरसाहेब कलकत्तेकर या प्रांतीं येणार होते. इत-

---

१ आबाजी हरी किंग्याचें बातमीपत्र. २ सडा. एकटा. ३ इंग्रज.

क्यांत महारानिल्हेचीं तगिरीपत्रें[1] आल्यानें सध्यां येणें मोकुफ जालें. मुंब-ईस साहेब आला आहे तो कलकत्त्यास पावल्यावर काय अमलांत येईल तें लिहूं. नवाब वजीर[3] यांणीं सहकुटुंब मक्कास जाण्याविशीं गवरनरसाहेबास लिहिलें होतें. तेथून[2] उत्तर आलें कीं, मर्जी असल्यास दोन बर्षांत यात्रा करोन यावें. कांहीं आग्रहाचें उत्तर नाहीं. इंग्रजांची इच्छा हेच आहे. परंतु बादबरसात[4] घडणें तें घडेल. इंग्रजांनीं फराशिसाशीं दारमदार करून आपसाचा कलह दूर केला. चौथाई हिस्सा नवे मुलखांत दखल केल्यावर त्यास द्यावा व त्याची फौज समागमें आल्यास खर्चास देत जावें. कदीम मुलखापैकीं काहीक जागा देणें ठरलीं ऐसें श्रवणांत आलें आहे. रूमेचा[5] पादशहानीं इंग्रेजांची लढाई शिकस्त[6] केली याची वदंता हुजुरांत आहे. महमुदशहानीं जमानशहाचे[7] पुत्रांशीं दारमदार करून कंदार प्रांत त्यास दिल्हा अशी आवई आहे. पक्कें वर्तमान आल्यावर लिहूं. लॉलिन[8] फिरंगी फुरक्काबादेस दाखल होऊन कलकत्त्यास उज्जैनचा जाबसाल लिहिला आहे. उत्तर आल्याप्रमाणें करतील. बासलीसाहेब नामें लहान गवरनर बरेली वगैरे प्रांतचा मुखत्यार यांनीं हरकारे व मुत्सद्दी व डाक संस्थानीं पाठविली होती हें वृत्त दुर्जन[9] फिरंगी येथील सुभा यास कळल्यावर तें काल पिरूस लिहून पाठविलें. तेथून खानगी पत्रांत लिहिलें आलें कीं, डाकवाले व मुत्सद्दी यांस शहरांतून काढून देऊन दरोबस्त अंतर्वेदेचे महालांत हरएकास ताकीद करणें कीं, इंग्रजाकडील नवी डाक अथवा हरकारा आल्यास उठोन द्यावे. त्यावरोन येथील सुभे यांनीं तत्समयींच पूर्वकरा-कडील नवी डाकवाले व मुत्सद्दी यास काढून दिले व बरदी दरोबस्त पारचे मुलखांत सांगोन पाठविलें कीं इंग्रजाकडील हरकारा मुत्सद्दी ठेविल्यास तंबी होईल. याप्रमाणें येथील वृत्त असे. पुढें निदर्शनास येईल तें लिहूं. हे विनंति.

---

१ तगिरी = कामावरून काढणें. २ तहकूब. ३ अयोध्येकर. ४ पावसाळ्या नंतर. ५ रशियाच्या. ६ शिकस्त = पराजय. ७ हा काबूलचा अमीर. ८ कर्नल कॉलिन्स. ९ दुजेन्स ?

नं. ६६५८ श्री. ( आषाढ शु॥ १३-२ जुलै.)

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री गंगाधररावजी स्वामीचे सेवेसीं पोष्य रामचंद्र हरि सा॥ नमस्कार विनंती. उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेष. आम्ही भागानगराहून कूच करून गंगातिरास आलों. तेथून कसबें उमरखेड येथें आलों. कांहीं कारणपरत्वें एक मास मुक्काम जाला. राजश्री दौलतराव बाबा शिंदे व राजश्री रघोजी भोसले सेनासाहेब सुभा यांच्या भेटी ज्येष्ठ शु॥ त्रयोदशीस कसबें मलकापूर येथील मुक्कामीं भेटी होऊन पुढील मसलतप्रकरणीं बोलणीं होऊन निश्चयांत आलें. उभयतांचीं पत्रें आम्हास यावयाविशीं आलीं त्यांतच आपणास पत्रें पाठवून सूचना करावी असें लिहिलें आहे. त्यास आपण सर्वत्रांची एक वाक्यता करून सिद्धता करावी. आम्ही मजल दर मजल उभयतांकडे जात आहों. राजश्री यशवंतरावबाबाही येऊन पोचतात. गुंता नाहीं. आमची भेट होऊन सर्वत्र मिळोन गंगातीरास येऊन पोंचतों आणि आपणाकडे कारकून पाठवितों. आपण सर्वत्रांची एकवाक्यता करून सिद्धतेनें आपले पुत्र राजश्री नारायणराव यास समागमें देऊन गंगातीरास येऊन पोंचेत असे व्हावें. येथून पत्रें सर्वत्रांस पाठविलीं आहेत त्याची यादही अलाहिदा आहे. जिकडील तिकडे पावती होऊन उत्तरें लौकर येऊन पोंचत असें व्हावें. * त्रिवर्ग एक होण्यांत तथा नाहीं. आगाऊ सूचना लिहिली आहे. रवाना छ० १२ रबिलावल. बहुत काय लिहिणें. लोभ असो दीजे हे विनंती.

पै॥ छ० २८ रबिलावल आषाढ. सन आर्बा मयातैन.

---

नं. ६६५९ श्रीगणपति. ( २ जुलै )

पै॥ छ० १२ रबिलावल सन आर्बा मयातैन.

अपत्यें +रामचंद्रानें शिरसा॥ नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ० ५ रबिलावल मंदवारपर्यंत यथास्थित असे. विशेष. काढिलीं पत्रें

१ फडके दप्तर. पत्र निरजेस. * येथून खासदस्तुर. + राम. आपापें पत्र पुण्याहून निरजेस.

पाठविलीं तीं पावलीं. चि॥ सौ॥ दुर्गाबाईचे लग्नाकरितां वडिलांची स्वारी मिरजेहून तासगांवीं आल्याचें व वडिलांचे आशीर्वादें यथास्थित समारंभें निर्विघ्नपणें कार्य जाल्याचें व रास्ते समुदायेसुद्धां अथणीस गेल्याचें लिहिलें तें कळोन संतोष जाहला. घाटगे करवीरास आल्याचें व करवीकरांनीं माने यास लुटल्याचें लिहिलें तें कळेलें. इकडील वर्तमान लिहिण्याविशीं आज्ञा. त्यास इंग्रजी पलटणें बंडवाल्याचे पारिपत्यास घोडनदी उत्तरतीरास नगरचे रोखे जांबगावाजवळ मुक्काम करून आहेत. त्याजकडे जाण्याविशीं बरचे-वर आम्हांस सरकारांतून आज्ञा होते व लौकर येण्याविशीं जनराल यांची पत्रें येतात. त्यास सरकारांत मध्यस्तमुखें विनंती करविली कीं, दोन चार बैठका हाऊन आम्ही विनंती करतों हे ऐकोन आज्ञा होणें ते व्हावी म्हणोन. या बेतानें पुण्यास प्रथम भेटीनंतर दोन वेळ गेलों. एक वेळ शुक्रवारांतील नव्या वाड्यांत स्वारी आली होती तेथें दर्शन जालें. दुस-ऱ्यानें सरकारवाड्यांत गेलों होतों. चि॥ राजश्री चिंतामणराव आपाही आले होते. परंतु बोलणें जालें नाहीं. यामुळें पुढें जावयाचा जावसाल मोघमच आहे. गोखले निपाणीकर वगैरे अद्यापि पुण्यांतच आहेत. पुरंदरे साताऱ्याकडे होते तेही पुण्यास येऊन दाखल जाले. शिंदे व भोसले यांच्या भेटी होऊन होळकराचा मूल शिंद्यानीं भोसल्यांचे स्वाधीन केल्याचें पेशजी लिहि-लेंच आहे. होळकराची व शिंदे भोसल्यांच्या भेटी जाल्याची वार्ता आहे. तथ्य समजण्यांत आलें म्हणजे लिहितों. चि॥ राजश्री चिंतामणराव आपा यांणीं लोकास निरोप देऊन पागा व सरंजामी व येकांडे मिळोन तीनशे साडेतीनशेपर्यंत लोक ठेविले आहेत. इंग्रजांचे लस्करांत तीन शेरांची धारण आहे. वैरण अगदीं मिळत नाहीं. बैल वगैरे जनावरें बहुत मेलीं. राहिलीं तींही मरतात. पोक्त सरंजाम. खर्चाची ओढ नाहीं. यामुळें दम धरून आहेत. पुण्याचेही मुक्कामीं वैरणीचा तोटा. पावणे दोन पायली दोन पायली जोरी याप्रमाणें धारण आहे. रात्रंदिवस पर्जन्यही पडतो. आंब्याचा पाला घोड्यांचे दैवास आला आहे! ईश्वरइच्छेनुरूप भोग सरेल तेव्हां या फेऱ्यांतून पार पडावयाचें! मलकन म्हणोन सरदार इंग्र-जाचा फौज घेऊन जाण्यासाठीं राहिला होता. परंतु कोणी निवेनात

म्हणोन काल निघोन वसलीकडे गेला. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६६६०  ( ५ जुलै. )

उतारा—धोंडो बापूजीचें पत्र पुण्याहून मिरजेस.

" इंग्रज वसली जनराल जमावानिशीं किले नगरनजीक जाऊन मुक्काम केला आहे. मुंबईहून नावा तांब्याचे पत्रे मारून ऐशी रवाना जाल्या आहेत. पैकीं घांटावर पंचवीसपर्यंत आल्या. बाकीच्या येत आहेत. नावांतून तीस चाळीस पन्नासपर्यंत मनुष्यें उतरतील याजप्रमाणें आहे. शिंदे, भोसले, होळकर एक जाले असें बोलतात. "

---

नं. ६६६१.  श्री.  (नकलेची नकल.)  (९ जुलै.)

पौ। छ० २३ रबिलावल आखेर मन्हातैन.

विनंति विशेष. छ० १९ रबिलावलपर्यंत लष्करचें वर्तमान तर कलमें वितपशीलवार--

अलिजाबहादर व येशवंतराव होळकर यांचा समेट सेनासाहेब भोसले यांचे विद्यमानें करार भेटी होण्याचा ठरला कीं, तापी उतरोन चोपड्याचे मैदानांत येशवंतराव होळकर यांणीं यावें. इकडून सेनासाहेब भोसले व यादवराव भास्कर व अंबोजी इंगळे ऐसे दोन मजली जाऊन भेटी परस्परें भेटी होऊन नंतर अलिजाबहादर शिंदे व येशवंतराव होळकर यांच्या भेटी व्हाव्या ऐसा बेत जाहला आहे. छ० १८ रोज शुक्रवारीं सेनासाहेब भोसले व खंडेराव होळकर अलिजाबहादर यांचे लष्करांत खाशा डेन्यास येऊन बैठक बेताप्रमाणें जाहली. खंडेराव होळकर व मल्हार शामजी वगैरे यांस येथून रुकसत होऊन येशवंतराव होळकर यांजकडे जाण्याची निरोपाचीं वस्त्रें व जवाहीर व शिरपेंच व कंठी मोत्याची ऐसे देऊन *रुकसत केलें. उदईक सेनासाहेब यांचे लष्करांतून कूच करून खंडेराव होळकर बमय× असबाबमुद्धां कूच करून दरमजल जातील.  कलम १.

---

* रुकसत करणें = निरोप देणें. × बमय असबाब = सरंजाममुद्धां.

ऐ. ले. सं. २६.

राजश्री गोपाळराव चिटणीस हे अजंठ्याचे घांटापासून उडगावचे हुमारें लष्करमुद्दां आहेत. कलम १.

राजश्री सदाशिव महादेव नि॥ बक्षी याजकडील फौजमुद्दां अजंठ्याचे घाटाखालीं आहेत. कलम १.

काशीराव होळकर कांहीं एक दिवस बऱ्हाणपुरावर मुक्काम होता. हल्लीं आनुखाना (?) यांत मुक्काम आहे. त्याजवळ तैनातीस इकडील पलटणें चाकरीस आहेत. कलम १.

काल्लन फिरंगी वकील इंग्रजाकडील अलिजाबहादर याजपाशीं निरोप मागावयाची निकड बोलणें लाविलें आहे. कलम १

नवाबाकडील फौज व पलटणें दूंबडेरा शेवगांवनजीक येऊन पोचलीं. शिंद्याकडील अवाडाची फौज व गोपाळराव चिटणीस यांचे व सखो रुद्र व पलटणें यासी वीस कोसांचा छटा आहे. कलम १

अलिजाबहादर व सेनासाहेब भोसले यांच्या फौजा अजंठ्याचे घाटाखालीं फर्दापूर व तोडापूरावर मुक्काम करणार. येशवंतराव होळकर याची भेट भोसले शिं॰ यासी जाली. याजवर त्रिवर्गांचे विचारें मसलत ठरेल त्याप्रमाणें येत होईल. कलम १

रामचंद्र हरि फडके उंबरखेडावर मुक्काम करून फौजमुद्दां होते. त्यास सेनासाहेब भोसले व अलिजाबहादर याजकडील खातरजमेचीं पत्रें मशारनिल्हेकडील कारकून घेऊन गेले. फडकेही फौजमुद्दां इकडे येणार. कलम १

मीरजुमला औरंगाबादकर येथें येऊन लष्करांत दाखल जाले. अलिजाबहादर यांचे डेऱ्यास गेले होते. मीर जुमला याचा इरादा मोठ्या राजकारणांत पैठ करावा हा इरादा ठेऊन आहेत. कलम १

पुण्यांहून अकबरनीस श्रीमंताकडून रा॥ गोविंद विश्वनाथ रानडे व सखारामपंत वैजनाथभट मामाचे शालक उभयतां छ० ९ रविलाखरीं दाखल होऊन अलिजाबहादर यांची भेट घेऊन आपले कामाची अकबारेची शिलशिला ज्यारी ती करून आहेत. कलम १

नं. ६६६२. श्री. ( १० जुलै. )

पै॥ छ० २३ रबिलावल. आषाढमास. सन आर्बा मय्यातैन.

सेवेशीं सा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० २० रबिलावल पावेतों स्वामींचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. वाईहून आषाढ शु॥ ५ निघोन पुण्यास जावें म्हणोन शिरोळास गेलों. पुढें पुरंदरकर याच्या दंग्यामुळें वाट बंद. पुलावरून जेजुरीचीही वाट बंद म्हणोन पुन्हा वाईस आषाढ शु॥ ११ माघारे आलों. नंतर श्रीमंतांची स्वारी वाईस येती म्हणोन राजश्री रामराव लक्ष्मण रास्ते यांणीं वर्तमान लिहून आपल्या कारभाऱ्यांस पाठविलें. त्यास श्रीमंतांची स्वारी पुण्याहून वाईस जावें लागतें म्हणोन बसलीसाहेबांकडील वकील पुण्यांत आहे त्यासी राजश्री रघुनाथराव याजबरोबर श्रीमंतांनीं सांगोन पाठविलें. त्यावरोन बसलीसाहेबाकडील वकील दुसरे रोजीं श्रीमंतांकडे येऊन बोलणें जालें जे, सरकार आज्ञाप्रमाणें बसलीसाहेब यास लिहून पाठवितों. तेथील लिहिलें येईल त्याप्रमाणें स्वारी जावी. अथवा दोन पलटणें स्वारीबरोबर घेऊन वाईस जावें. अथवा उभयतां फौ॥ वाईसाहेब यास ठेवून सडी स्वारी जावी. त्यावरोन श्रीमंतांनीं रुकार दिला जे, सडेच जाऊन येऊं. त्याप्रमाणें श्रीमंतांनीं स्वारीची तयारी करून आषाढ व॥ २ बुधवारीं निघावयाचा मुहूर्त पाहून खंडेराव नरसी विंचूरकर यास श्रीमंतांनीं आज्ञा केली जे, तुम्ही पथकसुद्धां बाबदेवचे घाटें चढून हिवरें व सासवड येथें पुरंदरकर कोळी यांचें पारिपत्य करून जेजुरीस येणें. त्यावरून आज्ञेप्रमाणें विंचूरकर बाबदेवच्या मार्गें येऊन शेंपन्नास कोळी व बेरड जखमी व ठार करून जेजुरीस आले. खासा स्वारी बुधवारीं दोनप्रहरां सडी निघोन दिव्याच्या घाटें चढून जेजुरीस येऊन श्रींचें दर्शन करून सरकारवाड्यांत मुक्काम केला. तेथून कूच करून अहेरें, मोरवें, नीरा दक्षिण तीरीं हरबा धायगुडे याच्या वाड्यांत येऊन मुक्काम केला. तेथून कूच करून सडी स्वारी खांबटकीच्या घाटें चढून वाईस चतुर्थी शुक्रवारीं दहावे घटकेस वाईस अकस्मात् श्रीविष्णूचे देवळास आले. बरोबर आपासाहेब व बाळाजीपंत पटवर्धन व बाबूराव गणेश कात्रे व विंचूरकराकडील वीस बावीस स्वार नगारे निशाणसुद्धां कुल खाशासुद्धां सत्तावीस घोड्यानिशीं येऊन

बाईस दाखल जाले. बरोबर श्री॥ राजश्री चिंतामणरावआपा व लिंबकराव पेठे व बापू फडके व बापू पानशे व आबा काळे व दिनकरपंत व बाळाजी-पंत पटवर्धन व बळवंतराव नागनाथ व नीळकंठराव गोविंद खासगीवाले व वैजनाथभट व शामराव लक्ष्मण रास्ते व शिंदेबहादूर याजकडील बाळा-भाऊ वकील व हारजी नाईक व खैरातीण कळवंतीण व खंडेराव रास्ते या-प्रमाणें स्वारीबरोबर आहेत. खासा स्वारी गंगापूरच्या वाड्यांत राहिली आहे. त्यास गंगाविधि शनवारीं पंचमीस जाला. षष्ठीस गंगासमाराधना होऊन सप्तमीस कूच करून पुण्यास दक्षणा द्यावयास स्वारी जलद जाणार असा बेत आहे. श्री॥ राजश्री रामचंद्रपंतआपा यास स्वारीबरोबर येण्याची सूचना सरकारची जाली नाहीं म्हणोन आले नाहींत. आपा निपाणकर यास आज्ञा जाली जे, तुम्ही पुण्यांत वाड्याच्या रखवालीस असावें त्याब-रोन ते पुण्यांतच राहिले. राजश्री चिंतोपंत देशमुख होळकराच्या लष्करांत होते त्यास श्रीमंतांनीं वीस हजार रुपये देऊन सोडवून आणोन तेरीज घालावयास आज्ञा जाली. त्यावरोन देशमुख तेरीज घालावयास लागले. व देशमुखावर मर्जी प्रसन्न होऊन आठशे रुपये पोशाख दिल्हा. त्यावरून देशमुखांनीं वीस लक्षांची पट्टी पुण्यावर करून तगादे चालले आहेत. देशमुख यास सामील बापू कुंठे व केसोपंत हे उभयतां सामील आहेत. हे त्रिवर्ग मिळोन शहरांत जुने मुत्सद्दी व कारकून व मामलेदार यांच्या घरीं तमाम पहारे बसविले आहेत. याजमुळें राहिले गृहस्थ लहान थोर तेही निघोन जात आहेत. सरकारचा थोरला जुना तोफखान्याचा वाडा इमारतमुद्दां बसलीसाहेब इंग्रज यास रहा-वयास बाबासाहेब यांणीं दिल्हा. पुण्यांतील शुक्रवार पेठेंतील खासगत बाबासाहेब यांचें घर अर्धे तयार जालें आहे. बाकी अर्धे तयार करीत आहेत. तयार जालें म्हणजे खासा स्वारी त्या वाड्यांत रहाणार. इंग्र-जांचे वकील संगमास नेहमीं रहातात. त्यांचीं घरें पहिलीं लहान बगले होते. हल्लीं श्रीमंतांनीं त्यास आज्ञा केली जे, माड्या इमारती तुम्हास पाहिजे तशा बांधणें. त्यावरून इंग्रजाकडील वकील यांणी इमारतीस कामें सुरू करून शहरांतील इमारतीशिवाय सायवळ व रायवळ लाकूड इमा-

रती-उपयोगी जेथें सांपडेल तेथून जबरदस्ती करोन नेतात याप्रमाणें चाललें आहे. गोपाळराव मुनशी चिरंजीवमुद्धां बसईत कैदेंत होते त्यास उभयतां स्वर्गवासी जाले. कल्याणानजीक कर्णाल्याचा किल्ला व आपटें हे बळवंतराव नागनाथ यास बाबासाहेब यांणीं सांगितलें. खंडेराव रास्ते हे तूर्त श्रीमंतांचे खासगीचा खर्च वगैरे चालवीत आहेत. राजश्री रघुनाथराव बारामतीकर चेनापट्टणचे वकील हे सध्यां बसलीसाहेब वगैरे इंग्रज यांच्या बोलण्यांत सरकारांतून आहेत. त्यास साठ हजार रुपये सरंजाम दिल्हा. भोईजकर जाधव यांजकडील सरंजाम दूर करोन येशवंतराव पाटणकर यास दिल्हा. याप्रमाणें प्राचीन सरदारांचे सरंजाम दूर करोन नवीन सरदारांची बहाली जाली आहे त्यास देतात. बसली-साहेब पलटणासुद्धां टोकयाच्या सुमारास गेले. मशीराकडून सव्वो रुद्र फौज व पलटणासुद्धां टोकयाच्या सुमारें बसलीसाहेब यास सामील होऊन उभयतां गंगा उतरणार. बसलीसाहेब यांणीं होळकरास पत्रें लिहिलीं जे, सरकार आज्ञेप्रमाणें सरकार चाकरीवर आम्ही आलों आहों. त्यास तुम्ही मुलूख खराब करूं नये. तुमच्या आमच्या भेटी व्हाव्या याप्रमाणें पत्र पाठविलें. त्यावरून होळकरांनीं उत्तर दिल्हे जे तुम्ही गंगा उतरून सरकारचाकरीवर येतच आहां. त्यास जशा भेटी व्हावयाच्या असतील त्याप्रमाणें घडतील म्हणोन उत्तर दिल्हें. भोसले व शिंदे मिळोन आजंठ्याच्या घाटावर आले. होळकरही जाऊन आजंठ्याच्या घाटानजीक मलकापुरावर मुक्काम करून भोसल्याच्या भेटी जाल्या. पुढें शिंदे बहादुर यांच्या भेटी लौकरच होतील. होळकर यांणीं मीरखान व हरनाथ यांवरोबर पंचवीस तीस हजार पठाण देऊन सुरत प्रांतीं पाठविलें. त्यांणीं सुरतेची खराबी मोठी करून दोन तीन हजार इंग्रजांचे लोक कापून काढून सुरतेच्या किल्ल्यास लागले आहेत. सुरतेच्या किल्ल्यांतील इंग्रज यांणें मामलयाचें बोलणें घातलें आहे. होळ-कर, शिंदे, भोसले व खुद्द नबाब हे एकत्र जाले. तथा नाहीं. चौघांचें विचारें इंग्रज श्रीमंतांनीं घरांत आणले हें ठीक नाहीं. त्यास इंग्रजांचें पारपत्य करून पुढें सर्वांचे विचाराप्रमाणें राज्याचा बंदोबस्त करूं याप्रमाणें चौघांचा विचार आहे. श्रीमंतांची मर्जी जे, शिंदे भोसले हे आपलेच

आहेत परंतु बंडांचें पारिपत्य करायचें. याबद्दल राज्य इंग्रजांनीं घेतल्यास चिंता नाहीं. याप्रमाणें श्रीमंतांचा निश्चय आहे. श्री॥ राजश्री रावसाहेब व मोरोबादादा हे गंगापार चांदवडच्या सुमारें पांच सात हजार फौजेनिशीं आहेत. याप्रमाणें इकडील वर्तमान आहे. पुढें होईल तें सेवेशीं लिहूं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६६६३ श्रीगणपतिर्जयति. (आषाढ व० ६–१० जुलै.)

पै॥ छ॥ २५ रबिलावल सन आर्बा.

चिरंजीव राजश्री माधवराव यासी उपरी. तुम्ही पत्र पाठविलें. तें पावलें. तीर्थस्वरूप सीताबाहिनी[3] यांस पौर्णिमा इंदुवारीं देवाज्ञा जाहल्याचें लिहिलें, तें रविवारीं तिसरे प्रहरीं कळलें. श्रीइच्छेस इलाज नाहीं. इकडील वर्तमान तर, श्रीमंतांची स्वारी श्रीकृष्णास्नानास यावयास पुण्याहून छ॥ १६ रबिलावल, बुधवारीं मुहूर्तें निघोन सासवडास मुक्काम जाला. गुरुवारीं खंडाळया बावड्या नजिक अहेर मोरवें येथें मुक्काम होऊन भृगुवारीं स्वारी वाईस दाखल जाहली. मंदवारीं तीर्थविधि होऊन रविवारीं गंगाराधना जाहली. दशमी गुरुवारीं संक्रमण आहे. यास्तव दोन दिवस मुक्काम जाहला. गुरुवारीं भोजनोत्तर कूच होण्याचा बेत आहे. आम्हींही स्वारी-समागमें आलों आहों. इंग्रज पैठणच्या सुमारें आहेत. टोकें कायगांव-जवळ गंगापार होणार. तेथें किस्ती जमा करविल्या आहेत. भोसले व शिंदे आजिंठ्याचा घाट चढून देऊळगांवानजीक आले. होळकर मागें वीस कोसांचे तफावतीनें आहेत. होळकराच्या व शिंद्यांच्या भेटी स्वल्प दिवसांत होणार. याप्रमाणें वर्तमान आहे. बहुत काय लिहिणें. रवाना छ॥ २० रबिलावल हे आशीर्वाद.

---

नं. ६६६४ श्रीगणपति. (आषाढ व० ८–१२ जुलै.)

पै. छ० ३० रबिलावल. श्रावण शु. २ बुधवार. सन आर्बा मयातैन.

---

१ होळकरांचे. २ चिंता. आमाचें पत्र मिरजेस, सुतक होतें त्यामुळें मायना लिहिला नाहीं. ३ रघु. कुरुंदवाडकर यांची स्त्री. ४ नावा.

अपत्यें रामचंद्रानें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २२ रबिलावलपर्यंत वडिलांचे आशीर्वादें मुक्काम पेठशिवापुर यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्रें पाठविलीं तीं पोचलीं. इकडील मजकूर तरी पेशजी सविस्तर लिहिला गेलाच आहे. आलीकडील वर्तमान श्रीमंताची स्वारी श्रीकृष्णानदीस स्नानास वाईस आली आहे. बरोबर चिरंजीव राजश्री चिंतामणराव आपा व रास्ते व विंचूरकर सरदारांपैकीं आहेत. आम्हास कांहीं बरोबर येण्यास पूर्वील सांप्रदायाप्रमाणें चिठी अगर चोपदार येऊन ताकीद न झाल्यामुळें गेलों नाहीं. कात्रजेचे मुक्कामींच होतों तेथें वैरणीची अडचण बहुत, स्वारीही गेली, उगेच काय म्हणोन राहावें याकरितां निघोन केळवडें नजीक येथें आलों. बुणगेंही तेथें होतें. दोन दिवस मुक्काम केला. जागा चांगली निवाऱ्याची नाहीं. यास्तव तेथून निघोन मुक्काम मजकुरीं आलों आहों. श्रीमंतासी निसालसतेचें बोलणें व्हावयाचा बेत ठरला होता तें स्वारी गेल्यामुळें जालें नाहीं. व वद्य एकादशी जाल्यानंतर येण्याचा स्वारीचा बेत आहे. पुढें घडेल तें लिहीन. इंग्रजी पलटणें नगरचे रोखें आहेत. शिंदे भोसले व होळकर यांचा मुक्काम पेशजीं लिहिला तेथेंच आहे. त्रिवर्ग मिळोन लौकरच गंगातीरास येण्याची वदंता आहे. होळकराकडील कांहीं पेंढार सुरतेकडे येऊन शिलशिला लाविला आहे. कळावें. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६६६५ श्री. (आषाढ व० १२ – १५ जुलै.)

पै॥ छ० ३० रबिलावल आर्बा मयातैन.

सेवेशीं सा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २५ रबिलावलपावेतों स्वामींचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. मशीराकडून फौज व पलटणें वसलीस सामील व्हावयास पैठणाकडून येत होतीं. त्यास शिंद्याकडून गोपाळराव रघुनाथ दहा हजार फौजसुद्धां टोक्याच्या सुमारास येऊन गंगा उतरावयास लागले हें वर्तमान ऐकोन मशीराकडील फौज व पलटणेंसुद्धां मागें हटून दक्षिणेकडेस रोख दिल्हा व वसलीसाहेब याचा रोख टोक्यापाशीं गंगा उतरून पार जावें हा बेत होता त्यास शिंद्याची फौज गंगा

उतरती हें ऐकोन माघारें फिरोन चांभारगोंद्याच्या सुमारास येणार म्हणोन सरकारांत लिहिलें आलें. त्यावरून श्रीमंतांची मर्जी बहुत बेदिल होऊन प्रतिनिधि यांस सांगितलें जे, तांदूळवाडीनजीक श्रीकोळेश्वर याचें दर्शन घेऊन दक्षिणेस कऱ्हाड क्षेत्रींचा संगम पहावा असें आहे. त्यास तुम्हीही स्वारीबरोबर फौजसुद्धां असावें म्हणोन प्रतिनिधींच्या वकिलांस आज्ञा जाली. त्यास तिकडून सरदारांच्या फौजेचा नेट होऊन बसलीसाहेब चांभारगोंदें अथवा गारदोंड या रोखें आल्यास पुढें श्रीमंतांची स्वारी करवीरास देवीच्या दर्शनास जाईल असा बेत दिसतो. निदर्शनास येईल तें खरें. सातारा किल्याची घालमेल करून राजश्री खंडेराव रास्ते यांस सनदा दिल्या. अमदाबाजचा सुभा व मामलत सरकारांतून बळवंतराव नागनाथ यांस सांगितली. त्यास नागनाथ याजकडून कारकून सनदा घेऊन राजश्री रावजी आपाजी याजकडेस गेला आहे. अद्याप रावजी आपाजी यांणीं अमदाबादचें ठाणें स्वाधीन केलें नाहीं. नगरचा किल्ला बसलीस दिल्हा व जामगांवचे जमीदार बसलीनें फाशी दिल्हे हें वर्तमान शिंदे बहादुर यांस समजल्यावर बहादर यांजकडून गोपाळराव दहा पंधरा हजार फौजेनिशीं व भोंसल्याकडील फौज व होळकराकडील फौज गंगा उतरून नगरच्या सुमारास आली. बसली पलटणेंसुद्धां सिद्धटेकच्या सुमारास गेले. याप्रमाणें हुजूरच्या डाकेंत लिहिलें आलें. रहिमतपूरची खंडणी प्रतिनिधींनीं घेऊन दंगा केला त्यावरून रहिमतपूरकर पाटील व बाळाजी महादेव वाईत आपासाहेब याजवळ आले आहेत याप्रमाणें इकडील वर्तमान आहे. सेवेशीं श्रुत होय. प्रत्योत्तर द्यावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. हे विज्ञापना.

---

नं. ६६६६ श्री. (आषाढ ब० १२-१५ जुलै.)

पै॥ छ० ३० रबिलावल श्रावणमास आर्वी मय्यातैन.

सेवेशीं सा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २५ रबिलावलपावेतों स्वामींचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान तरी श्री॥ राजश्री रामचंद्रपंत आपा यांची व श्रीमंतांची प्रथम भेट जाल्यानंतर

आणखी दुसऱ्यानें खासगीवाले यांच्या वाड्यांत श्री॥ राजश्री बाबासाहेब व आपासाहेब व रामचंद्रपंत आपा व चिंतामणराव यांची बैठक जाली. तेसमयीं दरम्यान बोलण्यांत राजश्री बळवंतराव नागनाथ व दिनकरपंत पटवर्धन हे उभयतां मिळोन उभयतां आपासाहेब यासी सरकारतर्फेचें बोलणें बोलूं लागले जे, जरीपटका व शिक्केकटार घेऊन फौजा सरदारमुद्धां घेऊन वसलीकडेस जावें. हेंच बोलणें होऊन श्रीमंत उठून गेले. परंतु रामचंद्रपंत आपा यासी व श्रीमंतासी परस्परें मसलत प्रकर्णी अगर खैरखुवींचें बोलणें परस्परें कांहीं एक जालें नाहीं. नंतर पुन्हां श्री॥ राजश्री चिंतामणरावआपा यांस श्रीमंतांनीं बोलावून नेऊन आज्ञा केली जे, तुम्ही उभयतांनीं जरीपटका फौजमुद्धां वसलीकडे जावें. त्यास आपासाहेब यांणीं विनंती केली जे, आजपर्यंत वडिलांनीं जरीपटका घेऊन मोठ्या योग्यतेस चढून सेवा केली नाहीं. आम्ही सरकारचे बारगीर. जिकडे जरीपटका जाईल तिकडे आम्ही चाकरीस हाजीर आहों. त्यास पूर्वी कै॥ भाऊ यांस जरीपटका देऊन चाकरी घेतली आहे त्याप्रमाणें रामचंद्रपंत आपा यासी आज्ञा व्हावी. ते जरीपटका घेऊन जिकडे जातील तिकडे आम्ही जाऊं. परंतु वसलीबरोबर चाकरी करणार नाहीं. खासा स्वारी जिकडे जाईल तिकडे आम्ही सेवेंत हाजीर आहों याप्रमाणें विनंती केली. नंतर मर्जी खुष होऊन कंठी व तुरा व अंगावरील शालजोडीसुद्धां पोषाख आपासाहेब यांस दिल्हा. त्यास रामचंद्रपंत आपांचें व श्रीमंतांचें खुलाशाचीं भाषणें होऊन परस्परें चित्ताची साफी जाली नाहीं. इतके दिवसांत दोन वेळ मात्र भेटी जाल्या. सरकार चिरंजीव अलीबहादर याचे पुत्र समशेरबहादर हे पुण्याहून निघोन हिंदुस्थानांत गेले. गंगेचे मुक्कामाहून श्रीमंतांनीं हुजरे पाठवून माघारें बोलाविलें परंतु तसेच निघोन गेले म्हणून अलीबहादर यांचा सरंजाम जप्त करून राजश्री सदाशिव माणकेश्वर यांस दिल्हा. वाईस स्वारी आल्यावर क्षेत्रींचा सर्व विधि उरकोन रामराव लक्ष्मण रास्ते यांजकडेस आषाढ व॥ ७ रात्रौ भोजनाची मेजवानी जाली. पोषाख व जवाहीर रास्ते देत होते परंतु श्रीमंतांनीं आज्ञा केली जे, एव्हां घेत नाहीं. राजश्री माधवराव आल्यानंतर घेऊं म्हणोन आज्ञा केली. राजश्री सदाशिव माणकेश्वर राज-

कारणी मसलतींत व मशीराकडील बोलण्यांत आहेत. इंग्रजांकडील कुल कारभार या बोलण्यांत राजश्री रघुनाथराव पंडित बारामतीकर आहेत. आहेत. उभयतां आपासाहेब व विंचूरकर व रास्ते व गोखले व निपाण-कर व पानशे व खासगीवाले वगैरेयांच्या मध्यस्तींत व बोलण्यांत राजश्री बळवंतराव नागनाथ आहेत. महाली, मुलकी व दानप्रसंग या कामांत बैजनाथभट मामा आहेत. खासगी खर्च वगैरे जावसालांत खंडेराव रास्ते आहेत. खंडेराव रास्ते यांस पांचशे स्वारांचा सरंजाम देऊन सनदा दिल्या. त्यांत खंडेराव जाधव भोईजकर याजकडील भोईज व वांई देशांतील प्राचीन फुट सरंजामी गांव महाराजांनीं पूर्वी लोकांस दिले आहेत त्यामुद्धां जत करून खंडेराव यांस सरंजामांत दिल्हे. स्वारी वाईस येण्याकारतां निघाली ते समयीं श्रावणमासची दक्षिणा चौथाई देण्याचा प्रारंभ करून पांच ब्राम्ह-णांस देऊन स्वारी निघाली. दक्षिणेचा ऐवज व दक्षिणा देण्याचा कारभार चितोपंत देशमुख यांस सांगोन स्वारी निघोन वाईस आली. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६६६७. श्री. (श्रावण शु॥ ३ – २१ जुलै.)

पै॥ छ० ९ रविलाखर सन आर्बा मय्यातैन.

शेवेशीं साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ० १ रविलाखर. मुक्काम वाई येथें स्वामींचे कृपेंकरून सुखरूप असों. विशेष. पेशजीं छ॥ २५ जमादिलावलचीं पत्रें शेवेशीं पाठविलीं आहेत. त्यावरून इकडील मजकूर सविस्तर निवेदन जाहलाच असेल. हालीं उत्तरेकडून सरदारांचे लष्करां-तून छ० १९ रविलावलचें पत्र आजच आलें. त्याची नक्कल शेवेशीं पाठ-विलीं त्यावरून इकडील मजकूर सविस्तर ध्यानांत येईल. आज श्रीमंतांचें लष्करचें कूच होऊन खंडागल्यास मुक्काम गेला. खासा स्वारी मात्र निघोन गेली नाहीं, दोनप्रहरां अगर सायंकाळीं अगर रात्रौ जाईल. लष्कर बरोबर जात आहे. राजश्री गोविंदराव कृष्ण काळे यांणीं काम-काजांत यावें म्हणून राजश्री बळवंतराव नागनाथ मध्यस्थींत आहेत. व काळे यांजकडे प्राचीन सरंजाम वगैरे गांव वगैरे होते त्यांची याद लिहून

काळे यांणीं दिली आहे. त्याप्रमाणें सरंजामाचे गांव वगैरे दिल्यास काळे कामाकाजांत येतील असें आहे. रहीमतपूरप्रकर्णीं प्रतिनिधी याचें बोलणें पडलें जे, रहिमतपूरकर माने व कमाविसदार व कुलकर्णी यांजकडे आमचे कराड प्रकर्णीं मुद्दे आहेत. त्यास तीनी आसाम्या आमचे स्वाधीन करा. नाहीं तरी मान्या आमचा हरामखोर आहे व मान्याचा कारभार व ऐवज व खंडण्यांचा ऐवज झाडून कमाविसदार याजकडे आहे. कराड प्रांतीचा खंडण्यांचा ऐवज रहिमतपूरकर कमाविसदार याजकडे मान्ये यांणीं देविला ता जमा आहे. त्यापैकीं लाख दोन लाख रुपये कमाविसदार याजकडे शिल्लक आहे. तेव्हां मान्ये यांचा कारभार कमाविसदार यांणीं केला आहे. याजकरितां कमावीसदार यांस स्वाधीन करावा म्हणोन बोलणें वकील बोलतात. श्रीमंत बापासाहेब यांचें बोलणें जे, आम्हांही मोबदला करूं. पुढें होईल तें सेवेशीं लिहूं. हे विज्ञापना.

---

नं ६६६८ श्री. (नकल) (श्रावण शु० ९--२८ जुलै.)

छ० १६ रबिलाखर सन आर्बा. श्रावण.

विज्ञापना. तागायत छ० ८ रबिलाखर गुरुवार प्रातःकाळ प्रहर दिवस यथास्थित असे. विशेष. काल प्रातःकालचे प्रहर दिवसास श्रीमंतांनीं रा रामाजीपंत घाटगे यास बोलावून आज्ञा केली कीं, कालजेस जाऊन रामचंद्रराव आपा व बापू या उभयतांस रात्रीस भोजनाचें आमंत्रण करून यावें व मशारनिल्हे नांवें विसरतील म्हणोन आपलें हातें नावें लिहून घाटगे याजपाशीं दिल्हीं. नंतर रामाजीपंत मजकडे आले. आप्पासाहेब यांचा मुक्काम कोठें आहे ? मी त्यास पत्ता सांगितला. नंतर निघोन खंडेराव रास्ते याजकडे जाऊन रास्ते यांचे कारभारी रा. भाऊ केतकर यांस सांगितलें कीं तुम्ही जाऊन यादीप्रमाणें आमंत्रण करून यावें. इतकें सांगून घाटगे आपले घरास गेले. केतकर यांणीं जावें तों त्यास दाळ होऊन ताप आला. ते विसरले. नंतर खंडेराव सायंकाळच्या चार घटका दिवसास वाड्यांत गेले. तेव्हां घाटगे यांणीं विचारलें का कालजेस आमंत्रणास केतकर गेले कीं नाहीं. त्यांणीं सांगितलें कीं आम्हांस तो मजकूर कांहीं समजला नाहीं. केतकर यास ताप

आला आहे. त्यास जाऊन पुसावें. त्याजवर घाटगे केतकर याजकडे गेले. तों त्यांणीं सांगितलें मला ताप आला, मी विसरलों. त्याजवर रामाजीपंत निघोन वडिलांकडे आले. तों रात्र जाहाली. इकडे घाटगे श्रीमंतांनीं सांगितल्यापासून भेटले नव्हते. श्रीमंतांनीं राजश्री सदाशीवपंत भाऊ यास सांगितलें कीं, रामचंद्रराव भोजनास येतात. तुम्ही एथेंच राहावें. तरतूद जाहली पाहिजे. त्याजवरून भाऊ भोजनास राहिले. श्रीमंत व भाऊ आरसेमहालांत बसून स्वारी अद्याप कां येत नाहीं. म्हणोन विचार करीत बसले. तों रात्र प्रहर जाहली, घाटगे कोठें आहेत, शोध केला, ते भेटले नाहींत. इतक्यांत घाटगे प्रहर रात्रीस वाड्यांत आले. श्रीमंताकडे जाऊन जाहला मजकूर सांगवेना. तेव्हां खंडेरावास सांगितलें कीं जाऊन बोलावें. तेही जात ना. तेव्हां नाइलाज. श्रीमंत वाट पाहात बसले, रात्र मोठी जाहली, हें जाणून खंडेराव श्रीमंताकडे जाऊन विनंती केली, घाटगे यास आज्ञा आमंत्रणाची जाहाली. परंतु त्यांणीं तेव्हांच जाऊन सांगावें, न सांगतां अस्तमानीं गेले. तो रामचंद्रराव आपण स्नानास बसले. तेथील उत्तर जाहालें कीं, मी आज्ञेप्रमाणें येतों. परंतु एथून याजउपर जाऊन स्नानसंध्या आटपून भोजनास बारा घटका रात्र होईल. तेव्हां श्रीमंत उपाशी, मर्जी कैशी राहील ! याजकरतां तुम्ही सांगाल तसें करतों. याअन्वयें रास्ते यांणीं सांगितल्यावरून घाटगे यास बोलाविलें आणि पुसिलें, तुम्हास मी नांवें लिहून दिल्हीं आणि ताकीद केली कीं, तुम्ही जाऊन सांगून येणें. तुम्हास इतका खेळ करावयास कोणी सांगितलें ? आज्ञेप्रमाणें जावें. बहुत रागास आले. पुढें शोभा व्हावी तों रास्ते व सदाशीवपंत भाऊ यांणीं सांगून रामाजीपंत यास बाहेर काढून बैठकींतून दिल्हें. खजील होऊन खालीं आले. नंतर खंडेराव यास आज्ञा जाहाली, तुम्हाकडील चांगला शहाणा प्रातःकाळीं पाठवून सायंकाळच्या भोजनाचें आमंत्रण करून यावें. आजच्यासारखें होऊं नये. याप्रमाणें आज्ञा जाहाली. रास्ते यांणीं तेचसमयीं राजश्री सखोपंत पानसे यास सांगितलें. आज मशारनिल्हे गेले असतील. सदाशीवपंतभाऊ यास आज्ञा जाहाली तुम्ही आपले घरास भोजनास जावें. रास्ते यांस सांगितलें, खालीं जाऊन पंगतीचे समुदायास

भोजन करावें म्हणोन सांगावें. तेव्हां खंडेराव व भाऊ यांणीं विनंती केली आपण खालीं भोजनास यावें. तेव्हां साफ उत्तर जाहालें आम्हास आज भोजन करावयाचें नाहीं. उभयतांनीं पराकाष्ठा केली. नंतर मर्जी रुष्ट पाहून उभयतां आपलेले घरास गेले. या प्रकरणास अकरा घटका रात्र झाली. जाहला मजकूर तपशीलवार विदित व्हावें म्हणोन लिहिला आहे. कालचा भोजनास बोलावणेचा बेत श्रीमंतांचा. बळवंतराव यांणीं सांगितल्यामुळें बोलाविलें असा प्रकार नाहीं. श्रीमंतांची मर्जी बहुत खिन्न झाली. कारण मध्यस्थास सांगितलें. दोनप्रहरीं फराळ करून रात्रीस यावें. याअन्वयें चिठ्या जाऊन आप्पा उपाशी राहिले. आणि आपणाकडून बोलावणेची घालमेल जाहाली. याजमुळें आज काय घडतें पहावें. काल चार घटका दिवसापासून पर्जन्यानें लागावयास*—

---

नं. ६६६९ श्रीगणपति. (नकल.) (श्रावण शु. ११-३० जुलै.)

चिा राजश्री बाबा व दाजी यासी आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ० १० रबिलाखर मंदवारपर्यंत कुशल असों. विशेष. आम्ही दक्षिणेचे समारंभास सरकारचिठी आलेवरून मंगळवारीं आलों. दोन घटका रात्रीस ब्राह्मण सोडोन दक्षिणेची याद फडणिसाचे कारकुनाकडून आलेली पाठविली आहे. भोजनास बुधवारीं मला वाड्यांत बोलावणार होते त्याचा मजकूर चिा राजश्री बाबजीपंताची चिठी मला दोन बंद आलेली पाठविली आहे त्यावरून वर्तमान कळेल. खंडेराव होळकर यशवंतराव याजवळ जाऊन पावले. तिघे एक जाहले. होळकर थालनेरास आहेत. लौकरच भेटी होणार. इंग्रज मिरजगांवावर आहेत. गोखले यांणीं हवऊपुरीचा फार करून फडशा केला. तेथून कूच करून पुढें इंग्रजाकडे जाणार होते. शिंदे, होळकर, भासले लौकरच गंगातीरास येणार आहेत. इंग्रजावर मोठा दांत सर्वांचा आहे. हेही तालामाला पाहणार म्हणोन वार्ता आहे. चिा राजश्री चिंतामणराव आपा श्रीमंतांची आज्ञा न घेतां

---

* पत्र अपुरें सांपडलें. १ राम. आपांचें पत्र पुण्याहून मिरजेस.

बावदेवच्या घाटमाथावरून देशाकडे गेले. कोठें मुक्काम आहे तो लिहावा. निरोप न घेतां×

---

नं ६६७० (आषाढ शु. ११ –३० जून.)

उतारा—चिंता. सांगलीकर यांचें पत्र मिरजेस.

" नारायणराव माने व संभाजी माने पुरंदरे याजजवळून निघून वडगांवास गेले. तेथें करवीरकरांनीं लुटून उभयतांस कैद केल्याचें लिहिलें तें कळलें. × × × रा. चिंतोपंत देशमुख यांचे सुटकेबद्दल सरकारांतून सोळा सहस्र रुपये ( होळकराकडे ) लावून आणविले ते छ० १ रबिलावलीं भौमवारीं पुण्यास आले. पुरंदरे छ० २९ सफर इंदुवारीं पुण्यास येऊन श्रीमंतास भेटले. जरीपटका वाड्यांत दाखल केला. माने याजकडील हत्ती, उंटें, वगैरे सरंजाम पाडून घेतला तो सरकारांत रुजू केला. हत्ती पांच सात, उंटें चाळीस पन्नास व घोडीं वीस पंचवीस इतकें सरकारांत आले. "

---

नं. ६६७१. श्री. ( ज्येष्ठ शु. १ – २१ मे. )

पौ॥ छ० २९ मोहरम सल्लास मय्यातैन. वैशाख.

( नकलेची नक्कल. )

* रावसाहेब मुषफक मेहेरबां कर्मफर्माय मुखालिसान सलामत.

अजि सखावत जनराल वसलीसाहेब बहादूर सलाम वैरियत अज्याम बखेर. आसाहेबांचे बाबे श्री० राव पंडित प्रधान बहादुराशीं शिफारस बहुत केली. त्यास श्रीमंतांनीं इंजानेबास फर्माविलें कीं, हरएकविशीं त्यांची गोष्ट केली जाईल. व वायदाही केला आहे कीं, प्रस्तुत मुनगें परदेशीं आहे. तरी या कामापासून फारग जाल्यानंतर कोल्हापूरवाल्याचा मोकदमा फैसला केला जाईल. × × × × × समय हाच आहे. त्यास श्रीमंतांनीं फर्माविलें व आम्हीही सांगितलें तरी उत्तम हेंच आहे कीं, चित्तांतील अंदेशा दूर करावे. किरकोळ कामें करावयाचीं आहेत. तर जे

---

× पत्र अपुरें सांपडलें. * जन. वेलस्लीचें पत्र राम आपास पुण्यास.

बेळेस दरबारचा शिलाशिला येणें जाणेचा दुरस्त होईल तेव्हां किरकोळ कामें सहजांत फैसल्यांत येतील. व शिलाशिला आमदर्याफतीचा दरबारांत ठीक राहिला म्हणजे दोस्तदारही[1] उपयोगी पडतील. मेहेरबान मेजददार आहे व आपणासही फायदा जे, आपण श्रीमंतांची मुलाकत लौकर करावी. बाद सर्व कामें घडोन येतील. इंजानेबास[2] या मुकदम्यांत आपले खानदानाविशीं शिफारस केली जाईल. अगर आपली व श्रीमंतांची मुलाकत न जाली तर इंजानेबास शिफारस करणें मुष्कील आहे. ऐसीया सुरतेमध्यें माफीक मसलते दोस्तदारांचें काम करावें. व खातरजमा ठेवावी कीं, इंजानीब व सरकार इंग्रजनेबाचा दोस्त आसाहेबांचा खानदाजीचा आहे. ज्यादा काय लिहिणें. प्यार मोहोबत असों द्यावी हे कितायत.

१ समजदार. २ इंजानेब = स्वतः, आम्ही.

# ऐतिहासिकलेखसंग्रह भा. १४

## इंग्रजांचें शिंदे-भोंसल्यांशीं [1]युद्ध.

( इ० स० १८०३ आगस्ट – इ० स० १८०४ जुलैअखेर. )

इ. स. १८०३ च्या जून-जुलै अखेर शिंदे व भोसले हे बऱ्हाणपूरच्या आसपास आणि इंग्रज अहमदनगरच्या आसपास तळ देऊन राहिले होते हें मागच्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. वसईचा तह होतांच त्या तहाला मान्यता देण्याविषयीं इंग्रजांनीं शिंदे व भोसले यांच्या दरबारांत तडजोडीचें बोलणें चालू ठेविलें होतें आणि तें अजूनही तसेंच नेटानें चालू होतें. इंग्रजांनीं सुरू ठेविलेल्या या बाटाघाटींत या तहासंबंधीं मराठे सरदारांनीं कोणते आक्षेप घेतले आणि मराठे सरदार आणि इंग्रज यांमधील बेबनावाचें वास्तविक स्वरूप काय होतें हें आतां या ठिकाणीं स्पष्ट करून दाखविलें पाहिजे.

वसईच्या तहासंबंधें मराठे सरदारांनीं आक्षेप घेतले त्यांचें तात्पर्य असें –(१) श्रीमंतांनीं इंग्रजांशीं तह केला त्याच्या नकला आम्हाला पेशवे सरकारांतून मिळाल्या नाहींत. अशा नकला आमच्या हातीं येईपर्यंत या तहाला पेशव्यांची मान्यता आहे असें आम्हांस मानतां येत नाहीं, (२) पेशवे

---

१ या युद्धास Second Mahratta War असें इंग्रज इतिहासकारांनीं नांव दिलें आहे आणि हें नांव त्यांनीं आपल्या इतिहासाच्या सोईच्या दृष्टीनें ठेविलें आहे. मराठी इतिहासाच्या दृष्टीनें आम्ही दिलेलें नांवच अन्वर्थक आहे. वस्तुतः या युद्धांत इंग्रजांना सर्व मराठ्यांशीं कधींही लढावें लागलें नाहीं, उलट मराठी राज्याचे सर्वाधिकारी जे पेशवे ते शेवटपर्यंत इंग्रजांच्या बाजूनेंच लढत होते. वसईच्या तहाविरुद्ध खवळलेले शिंदे, भोसले यांशींच फक्त इंग्रजांना हें युद्ध खेळावें लागलें.

व इंग्रज यांमध्यें पूर्वी सालबाईचा तह झाला होता त्यावेळीं त्या बोलण्यांत शिंदे मध्यस्थ होते आणि पेशवे व इंग्रज यांनीं परस्परांशीं बोलावयाचें तर तें त्यांनीं यापुढें शिंद्यांच्या मार्फतच बोलावें असेंही त्यावेळीं ठरलें होतें. शिवाय तहाच्या अटी उभयपक्षीं पाळल्या जातील याबद्दल उभयपक्षाकडे शिंद्यांची जामीनगत गुंतली आहे. नवा तह ठरवितांना जुन्या तहाच्या जामीनदाराची त्या तहाला प्रथम मान्यता घेतली पाहिजे. हा तह ठरवितांना शिंद्यांची मध्यस्थी आणि जामीनदारी यांकडे इंग्रजांनीं दुर्लक्ष केलें आहे. ( ३ ) मराठी राज्यांत पेशव्यांकडे वडीलकी आहे आणि सामान्य व्यवहारांत हा त्यांचा अधिकार सर्वांनाच मान्य आहे. परंतु असामान्य व्यवहाराला ती गोष्ट लागू नाहीं. कोणत्याही महत्वाच्या प्रसंगीं शिंदे, भोसले, होळकर अशासारख्या बरोबरीच्या सरदारांचा त्या कामीं सल्ला घ्यावा अशी पेशव्यांची पूर्वापार वहिवाट आहे. या तहानें मराठी राज्याच्या अस्तित्वावरच गदा येत आहे. बरोबरीच्या सरदारांच्या संमतीशिवाय असला तह ठरविण्याचा पेशव्यांना अधिकारच नाहीं. ( ४ ) वरील सर्व गोष्टींचा विचार करतां या तहाची कलमवार चर्चा इंग्रजांनीं आम्हांशीं स्वतंत्रपणें करावी. नंतर आम्ही संमति देण्याचा विचार ठरवूं. तह सर्व बाजूंनीं कायदेशीर ठरेपर्यंत इंग्रजांनीं मराठी राज्यांत शिरूं नये. आम्हाला इंग्रजांशीं शत्रुत्व करण्याचें कांहींच कारण नाहीं. सबब त्यांनीं खुशा दिलानें आम्हांशीं चर्चा करावी.

मराठ्यांच्या या आक्षेपांवर इंग्रजांचीं उत्तरें पडत गेलीं त्यांचा सारांश—( १ ) मराठे सरदारांना नकला देण्याची व्यवस्था इंग्रजांनीं ताबडतोब केली. ( २ ) सालबाईच्या तहानंतर पुढें चार वर्षांनीं महादजी शिंद्यांच्या संमतीनें पुणें दरबारीं आम्ही आमचा स्वतंत्र वकील ठेवला आहे आणि या आमच्या वकिलामार्फतच पुणें दरबाराशीं आतांपर्यंत आमचा स्वतंत्रपणें व्यवहार चालू आहे. ज्या तारखेस पुणें दरबारीं आमचा वकील राहूं देण्याला शिंद्यांनीं संमति दिली त्या तारखेपासून शिंद्यांची मध्यस्थी आणि जामीनगत हीं दोन्ही रद्द समजलीं पाहिजेत. (३) महत्वाच्या प्रसंगीं प्रमुख सरदारांची सल्लामसलत घेण्याची पेशव्यांची वहिवाट आहे एवढ्यावरूनच ती

वहिवाट मोडून त्यांनीं एखादी गोष्ट केली तर ती बेकायदेशीर ठरत नाहीं. पेशवे हे सर्वाधिकारी आहेत. आपल्या सोईसाठीं नवी वहिवाट पाडण्याचा किंवा जुनी वहिवाट मोडण्याचा त्यांना पूर्ण अधिकार आहे. शिवाय आपल्या अधिकाराचा वाटेल तसा उपयोग करण्याचाही त्यांना पूर्ण अधिकार आहे. आमच्या मैत्रीपासून मराठी राज्याचा नाश होणार असें मराठे मानतात परंतु ती त्यांची चूक आहे. आमचा कोणताही शत्रुत्वाचा हेतु नाहीं. या राज्यांत अव्यवस्था व बंडाळी माजली आहे ती मोडून त्यांत शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करावी एवढाच आमचा उद्देश आहे. आम्ही मराठी राज्याचे खरेखुरे मित्र आहों. (४) मराठ्यांचा चौथा मुद्दा होता, तहाच्या कलमांची पुनः चर्चा करण्याचा. हा मुद्दा उपस्थित करण्यांत मराठे सरदारांनीं आपल्या मतानें कारस्थानीपणाचा मोठा पेंच टाकिला होता. परंतु सातासमुद्रांचें वारें प्यालेला जनरल वेल्स्ली असल्या कोटिक्रमाला कसची दाद देतो ? त्यानें या बाबतींत मराठ्यांना उलट सवाई पेंच घातला. तो असा कीं, मराठे सरदारांना आमचें शत्रुत्व करावयाचें नाहीं ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. आम्हाला तरी लढण्याची कुठें हौस आहे ? त्याप्रमाणेंच तहाच्या कलमांची पुनः चर्चा करण्याचीही आमची तयारी आहे. असली ही चर्चा हा एक दरबारी वाटाघाटीचा स्वस्थपणाचा विषय आहे. परंतु या वाटाघाटीसाठीं मराठे सरदारांनीं फौजेची जय्यत तयारी कां चालविली आहे ? तसें करण्यांत त्यांचा आम्हाशीं लढण्याचा हेतु स्पष्ट दिसतो. हा वाद सामानें मिटवून घेण्याची मराठ्यांची खरोखरीच इच्छा असेल तर शिंद्यांनीं उज्जनीस आणि भोसल्यांनीं नागपुरास परत जावें आणि आम्हीही आपल्या हद्दींत परत जातों. नंतर मराठे सरदारांनीं आपापल्या दरबारीं असलेल्या इंग्रजी वकिलांमार्फत कलकत्याच्या लॉटसाहेबांशीं या गोष्टीची खुशाल चर्चा करावी. मराठे सरदार परत जाणार नाहींत तर त्यांचा हेतु शत्रुत्वाचा आहे असें समजून आम्ही तावडतोब युद्धास सुरवात करूं. इंग्रजांच्या या कोटिक्रमावर मराठ्यांना समर्पक असें कांहींच दरबारी उत्तर देतां आलें नाहीं.

इंग्रजांशीं बोलण्याची ही वाटाघाट मराठे सरदारांनीं बाह्यतः चालू ठेविली

होती. परंतु आंतून मात्र इंग्रजांशीं लढाईच द्यावी असा त्यांचा ठाम निश्चय ठरला होता. या बेतासंबंधानें रघोजी भोसले पटवर्धनांस लिहितात—

( १४ आक्टो. ) " आंग्रेजांनीं स्वराज्यांत प्रसार करून दौलत आक्रमण केली. त्यास हिंदुधर्म रक्षावा, स्वराज्य रहावें हें चित्तांत धरून रा. दौलतराव शिंदे यांमुद्धां या मसलतीस प्रवर्तक जाहलों. तुम्हांस तों स्वराज्याचें कल्याण पाहणें व अनुकूळ मसलतीस होणें जरूर आहे. यांतच सारें चांगुलपण आहे व तुमचेंही चित्तांत हेच भाव असत व तुम्हाविशीं खातरजमा आहे. त्यास तुम्ही कोणती एक कल्पना मनांत न आणतां अशा प्रसंगीं मसलतीस येऊन शरीक व्हावें. दिवसगत लागों नयेत. हे समय आहेत."

मराठे इंग्रजांशीं राजकीय स्वातंत्र्याकरितां लढत होते,—इंग्रजांच्या आगमनामुळें स्वराज्याचा नाश होणार या मराठ्यांच्या कल्पनेची चर्चा आतांपर्यंत जागोजाग बहुत वेळां केली गेली आहे. वरील उताऱ्यांत 'हिंदुधर्म रक्षावा' असे भोसल्यांचे उद्गार नमूद आहेत ते चिंतनीय आहेत. इंग्रजांशीं लढतांना स्वधर्मरक्षणाची जरूरी मराठ्यांस कां वाटावी ? पुढें होळकरानें इंग्रजांशीं युद्ध सुरू केलें त्यावेळीं त्यानें पंत प्रतिनिधीस पत्र पाठविलें त्यांतही या कल्पनेचा विस्तार जास्तच स्पष्ट दिसतो. तो असा—

"आजपर्यंत हिंदुराज्य सर्वत्रांनीं एकदिल राहून चालविलें. अलीकडे ज्याचे त्याचे दौलतींत घरकलह होऊन राज्यविपर्यास पडोन हिंदुधर्म नाहींसा होण्यास मूळ जाहलें. त्याचें छेदन करण्यास सर्वत्र एकदिल जालें पाहिजे. तरच मुळाचें छेदन होऊन स्वधर्माचार पूर्ववत् चालोन हिंदूंची कायमी राहील. इकडील क्रम ( इंग्रजांशीं लढण्याचा ) जो आरंभिला आहे हाच यावद्देह चालवावा असें मनांत आहे. यांत परमेश्वर अनुकूल होऊन जें घडेल तें खरें. परंतु एकानेंच असा प्रकार करून सर्वत्रांनीं तमाशे पाहून आपापली दौलत संभाळून असावें यांतील परिणाम काय हें चित्तीं विचारून ज्यांत हिंदुधर्माची कायमी व परिणामास नीट तें करावें. याचा विचार तुम्हासारख्यांनीं न केला तरी दुसरे कोण करील ? "

१ अस्सल पत्र पुढील १५ व्या भागांत छापलें जाणार आहे.

वरील दोन्ही उताऱ्यांतून इंग्रजांशीं लढतांना ही हिंदुधर्मरक्षणाची कल्पना स्पष्टपणें नमूद केलेली आहे. आतांपर्यंत मराठ्यांनीं मोंगल बादशहा, अयोध्येचा नबाब, निजाम, हैदर व टिपू अशासारख्या परधर्मीयांशीं शेकडों वेळां युद्धप्रसंग केले आणि त्यासंबंधीं ऐ. ले. संग्रहांत आणि इतरत्र छापलेलीं हजारों पत्रें उपलब्ध आहेत. परंतु स्वधर्मरक्षणाच्या जरूरीचा उल्लेख कोणत्याही पत्रांत आढळत नाहीं. परधर्मीयांचा छळ केल्याचा दुर्लौकिक इंग्रजांनीं कधींही संपादन केला नव्हता. अशा स्थितींत याचवेळीं ही जरूरी मराठ्यांस भासूं लागावी यांचें कारण त्यांच्या स्वराज्याच्या कल्पनेंतच शोधलें पाहिजे. थोरल्या महाराजांनीं स्वराज्यसंस्थापना केली त्या वेळीं स्वधर्मरक्षण आणि राजकीय स्वातंत्र्य हे दोन हेतु त्यांच्या दृष्टीसमोर होते. तेव्हांपासून स्वधर्मरक्षण आणि राजकीय स्वातंत्र्य हीं स्वराज्याचीं दोन प्रधान अंगें आहेत अशी कल्पना मराठ्यांमध्यें बद्धमूल झाली होती. आतांपर्यंत मराठ्यांनीं परधर्मीयांशीं शेकडों युद्धप्रसंग केले. परंतु त्या त्या प्रसंगीं आपल्या राजकीय स्वातंत्र्यास त्यामुळें धक्का बसत आहे असा भास आतांपर्यंत मराठ्यांना कधींही झाला नव्हता, त्यामुळें स्वधर्मरक्षणाची जरूरीही त्यांना कधीं भासली नाहीं. आतां इंग्रजांच्या आगमनामुळें आपलें राजकीय स्वातंत्र्य नष्ट होणार आणि स्वराज्य बुडणार असें पाहतांच स्वराज्याबरोबर आपला हिंदुधर्मही बुडणार असें मराठ्यांना वाटूं लागावें यांत काय आश्चर्य ?

असो. इंग्रजांनीं सांगितल्याप्रमाणें मराठे सरदारांनीं आपापल्या ठिकाणीं परत जावयाचें साफ नाकारलें. ता॥ ३ आगष्ट रोजीं इंग्रजी वकील क. कॉलिन्स हा शिंद्यांच्या लष्करांतून कूच करून परत चालला आणि इंग्रजांचें शिंदे भोसल्यांशीं जाहीरपणें युद्ध सुरू झालें.

या युद्धासाठीं इंग्रजांनीं लष्कराची अगदीं जय्यत तयारी केली होती. दक्षिणेंत इंग्रजांची एकंदर ३६००० फौज होती. त्यापैकीं साडेतीन हजार फौज पुणें व हैदराबाद या राजधान्यांच्या संरक्षणार्थ राहिली. जन. स्टुअर्ट याच्या हाताखालीं आठ हजार फौज कृष्णा व तुंगभद्रा यांमधील प्रदेशांत तळ देऊन राहिली. स्थानिक बंडखोरांना दाबांत ठेवणें आणि आवश्यक जन. वेलस्ली होता त्याचा पाठपुरावा करणें हीं दोन कामें जन. स्टुअर्ट

यांकडे होतीं. जन. वेलस्ली याची नऊ हजार आणि क. स्टीव्हन्सन याची आठ हजार अशी एकंदर सतरा हजार इंग्रजी फौज अहमदनगरच्या आसपास तळ देऊन राहिली होती. या मोठ्या इंग्रजी फौजेच्या कुमकेस निजामाची पंधरा हजार फौज सलो रुद्र याच्या हाताखालीं हजर होती. त्याशिवाय पेशव्यांच्या हुकमावरून आपा देसाई निपाणकर, बापू गोखले, बापू चाफेकर वगैरे मराठे सरदारही सात आठ हजार फौजेसह ज. वेलस्लीला सामील झाले होते. बाकीची सात आठ हजार फौज कॅ. मरे याच्या हाताखालीं गुजराथेंत सुरतेजवळ एकत्र झाली होती. दक्षिणेंतील या सर्व फौजेवर जन. वेलस्ली हा सरसेनापति होता.

उत्तरहिंदुस्थानांतही दिल्ली प्रांतावर चढाई करण्याकरितां लखनौ व कानपूर येथें धावरा हजार फौज जन. लेक याच्या हाताखालीं जमली होती. त्याशिवाय बुंदेलखंड व रोहिलखंड यांवर स्वारी करण्याकरितां साडेतीन हजार फौज अलाहाबादेस तळ देऊन राहिली होती. त्याशिवाय भोसल्यांच्या कटक प्रांतावर स्वारी करण्याकरितां बंगाल्यांत साडे पांच हजार फौज एकत्र झाली होती. उत्तर हिंदुस्थानांतील सर्व इंग्रज सैन्यावरील सरसेनापतीचा हुद्दा जन. लेक याजकडे होता.

उलटपक्षीं मराठे सरदारांचीहि लष्करी तयारी अशाच मोठ्या प्रमाणावर होती. बंगाल्यांतील इंग्रजांचें तोंड संभाळण्याकरितां भोसल्याचे बापू घाटगे व महाडीक हे दोन सरदार कटक प्रांतीं राहिले. बुंदेलखंडांत अलीबहादर आणि हिंमतबहादर गोसावी यांनीं बारा हजार फौज जमविली होती. दिल्ली प्रांतांत मुसा पेरन् याजवळ शिंद्यांचे सतरा हजार पलटणी पायदळ आणि वीस हजार घोडेस्वार अशी फौज होती. त्याशिवाय पांच हजार कवायती पायदळ दबुनेक याच्या हाताखालीं शिंद्यांनीं दक्षिणेंतून दिल्लीप्रांताकडे नवीन पाठविलें. याप्रमाणें चहूंकडे संरक्षणाची नीट तरतूद करून बऱ्हाणपूरच्या आसपास शिंदे, भोसले आणि बाबा फडके हे साठ हजार फौजेसह ज. वेलस्लीच्या तोंडावर तळ देऊन राहिले.

इंग्रजांनीं या युद्धासाठीं लष्कराची प्रचंड तयारी केली होतीच. शिवाय त्यांनीं आधून गुप्तपणें दुसऱ्या एका गोष्टीची तयारी अशाच प्रचंड प्रमाणा-

वर केली होती ती मात्र योग्य वेळ येईपर्यंत कोणाच्याच विशेषशी दृष्टो-त्पत्तीस आली नाहीं. युद्धाच्या प्रारंभींच इंग्रजांनीं सर्वत्र जाहीरनामा फिरवला कीं, ' शिंद्यांच्या पलटणांतील गोरे अंमलदार आम्हाला सामील होतील त्यांची संपत्ति सुरक्षित ठेवण्यांत येईल आणि त्यांना स्वदेशीं परत जावयाचें असेल तर त्यांची तशी सोय लावून देण्यांत येईल. आपली सर्व संपत्ति घेऊन त्यांनीं खाल स्वदेशीं परत जावें. किंवा अशा गोऱ्या आफिसरांना कंपनीच्या नोकरींत शिरावयाचें असेल तर शिंद्यांच्या नोकरींत त्यांना जो पगार आणि हुद्दा असेल तोच कंपनीहि कायम ठेवील. शिंद्यांच्या पलटणांपैकीं काळे शिपाई आम्हाला सामील होतील त्यांचाही पूर्वीच्या नोकरींतील हुद्दा व पगार कायम ठेवण्यांत येईल. ' शिंद्यांच्या लष्करांत इंग्रज, फ्रेंच, डच्, पोर्च्युगीज वगैरे जातींचे गोरे अंमलदार होते त्यांशीं हें युद्ध सुरू होण्यापूर्वी बरेच दिवस इंग्रजांनीं फितुराचीं कारस्थानें चालविलीं होतीं आणि त्यांना उत्तेजन येण्याकरितांच हा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यांत आला होता. या पुस्तकांत पत्रव्यवहार छापला आहे त्यांत 'मुसा पिरुचा इंग्रजांशीं गुप्त पत्रव्यवहार चालू आहे' 'जलचरांची नियत फिरलेली दिसते' 'गोरे सारे आंतून एकच आहेत' अशा अर्थाचे उल्लेख आढळतात. या उल्लेखांवरून इंग्रजांच्या या फितुरी कारस्थानांचा सुगावा त्यावेळीं सामान्य लोकांनाही लागला होता असें दिसतें. परंतु ज्यांच्या लष्करांत असलीं हीं दुष्ट कारस्थानें खेळवलीं जात होतीं ते दौलतराव शिंदे मात्र शेवटपर्यंत सावध झाले नाहींत ! युद्ध सुरू होण्याचा समय जवळ येत चालला तसतशीं इंग्रजांचीं हीं कारस्थानें ऐन रंगास येत चाललीं आणि शिंद्यांच्या लष्करांत इंग्रजांनीं फितुराचें जाळें पसरून ठेविलें. शिंद्यांनीं बाह्यतः युद्धाची तयारी जोरजोरानें चालविली होती. परंतु आंतून त्यांच्या फौजेंतील हराम-खोर गोऱ्या अंमलदारांनीं त्यांना आयत्यावेळीं खड्ड्यांत पाडण्याची सर्व तजवीज आगाऊच करून ठेविली होती !

अहंमदनगरची फत्ते—शिंद्यांच्या लष्करांत इंग्रजांनीं फितुराचें विषारी द्रव्य चहूंकडे पेरून ठेविलें होतें त्याचा पहिला धक्का पहिल्याच प्रसंगीं शिंद्यांना जाणवला. शिंद्यांच्या लष्करांतून इंग्रजी वकील हाऊसबाची बातमी

जन. वेलस्लीला ता. ६ आग. रोजीं समजली आणि त्यानें लागलीच युद्धास सुरवात करून अहंमदनगरकडे मोर्चा वळविला. नगरचा किल्ला बळकटपणाबद्दल महाराष्ट्रांत नामांकित होता. त्या किल्ल्यावर शिबंदी आणि रणसाहित्य यांचा भरपूर साठा करण्यांत आला होता. शिवाय किल्ल्याबाहेर शिंद्याचें एक पलटणही संरक्षणार्थ हजर होतें. इंग्रज जवळ येतांच शिंद्याच्या पलटणांतले गोरे अंमलदार इंग्रजांकडे फितूर होऊन मिळाले आणि जातांना त्यांनीं बरेचसे शिपाईही फितवून नेले. ता ८ आगष्ट रोजीं इंग्रजांनीं पेठेवर हल्ला केला. त्यापूर्वीं धुराचे गोळे सोडून आपला हल्ला शत्रूला न दिसावा अशी तरतूद इंग्रजांनीं केली होती. पेठेंत शिंद्यांकडील आरब होते त्यांनीं बराच वेळ शत्रूशीं शौर्यानें लढाई दिली. परंतु धुरामुळें त्यांचा शेवटीं निरुपाय झाला आणि पांच चारशें आरब मारले जाऊन पेठ इंग्रजांच्या हातीं पडली. नंतर इंग्रजांनीं पेठेंतून किल्ल्यावर तोफांचा मारा चालू केला. उलटपक्षीं किल्ल्यावरूनही इंग्रजावर तोफा लागू करण्यांत आल्या. परंतु त्यांचा मारा विशेषसा लागू झाला नाहीं.

**ता. १२ आगष्ट**

कारण गोलंदाज आंतून शत्रूकडे फितूर झाले होते. पेठ गेली—पलटणवाले व गोलंदाज हे फितूर असें पाहून किल्लेदार मल्हारराव कुलकर्णी चांभारगोंदेकर यानें कौलानें तें स्थळ शत्रूच्या हवालीं केलें. किल्लेदार आपली खासगी मालमत्ता आणि हत्यारें आणि १५०० शिबंदी पायदळ यांसह किल्ल्याखालीं उतरला आणि नंतर इंग्रजांनीं पेशवे सरकारचें निशाण किल्ल्यावर चढविलें. या किल्ल्याच्या किल्लेदारीवर पेशव्यांनीं खंडेराव रास्ते यांचा पुतण्या विनायकराव याची नेमणूक केली. नगरास इंग्रजांनीं लष्करी इस्पितळ आणि रणसाहित्याचें मोठें कोठार उघडलें.

असईची लढाई—याप्रमाणें इंग्रजांकडून आगळिकीस प्रथम सुरवात होतांच शिंदे व भोसले आजंठ्याचा घांट चढून जालन्यास आले आणि तेथून त्यांनीं मोंगलाईकडे मोर्चा वळविला. मराठ्यांचा हा बेत ओळखून जन. वेलस्ली हा तावडतोब गोदावरी उतरून ता. २८ आग. रोजीं औरंगाबादेस आला आणि तेथून त्यानें थेट शत्रूवर चालून घेतलें. मराठे

इंग्रजांपुढें पीछेहाट करूं लागले. ता. ९ सप्टें. रोजीं इंग्रजांनीं शत्रूच्या देखदेखत जालना घेतलें आणि नंतर ता. २१ सप्टें. रोजीं जन. वेलस्ली आणि क. स्टीव्हनसन् हे दोन टोळ्या करून शत्रूवर चालून निघाले. अघाडीस जन. वेलस्ली होता. याप्रसंगीं शिंद्यांना फितुराचा दुसरा धक्का बसला. इंग्रज जवळ येतांच शिंद्यांच्या पलटणांतील गोऱ्या अंमलदारांमध्यें चलबिचल दिसूं लागली. कांहीं निसटून इंग्रजांकडे पळाले आणि बाकीचे शिंद्यांनीं धरून कैदेंत ठेविलें. आफिसरांच्या या दगलबाजीमुळें पलटणें हवालदील झालीं. कवाइती पलटणें म्हणजे बोलून चालून चालतीं बोलतीं यंत्रें. ऑफिसर पाठीवर हजर असला तर तीं काळाच्या जबड्यांतसुद्धां उडी टाकावयाचीं—आणि कोणी मार्गदर्शक नसला तर मात्र तीं जागच्या जागींच निर्बुद्ध होऊन ठार मरावयाचीं किंवा भीतिग्रस्त होऊन पळून जावयाचीं. कारण असल्या या पलटणी शिपायांना हुकूम पाळण्याचेंच मुख्यत्वें शिक्षण दिलेलें असतें. हुकूम देणारा हजर नसला तर आंधळ्या हत्तीप्रमाणें या पलटणांची स्थिति होते. असलीं हीं पलटणें शिंद्यांनीं आज कित्येक वर्षें पदरीं बाळगलीं होतीं. परंतु त्यांनीं किंवा त्यांच्या सरदारांपैकीं कोणी अजून पाश्चात्य युद्धशास्त्राची विद्या अवगत करून घेतली नव्हती. त्यामुळें आयत्या वेळीं गोरे ऑफिसर फितूर होतांच त्यांच्या जागा भरून काढण्याचें काम कठिण होऊन बसलें. त्यांतच फौजेंतील शिपायांनीं आपल्या पगारबाकीबद्दल याच वेळीं शिंद्यांच्या दाराशीं धरणें दिलें होतें. शिंद्यांच्या अंगीं सामान्य धैर्य आणि सामान्य अक्कल असती तरीसुद्धां या प्रसंगीं मराठ्यांचा बराच बचाव झाला असता. परंतु रावबाजी पेशव्यांचे एकनिष्ठ सेवक दौलतराव शिंदे हे आपल्या धन्याप्रमाणेंच कर्तृत्वशून्य होते. त्यांनीं ईर्षेनें इंग्रजांशीं युद्ध सुरू केलें आणि युद्धास प्रत्यक्ष सुरवात होऊन इंग्रज चालून आले तरीसुद्धां शत्रूशीं कोणत्या पद्धतीनें लढावें या बाबतींत मराठे सरदारांत अजून ऐकमत्य होत नव्हतें! शत्रूशीं गनिमी काव्याच्या जुन्या पद्धतीनें लढावें असें भोसले आणि शिंद्यांच्या पदरचे मराठे सरदार यांचें म्हणणें होतें. उलटपक्षीं पलटणें व तोफखाना पुढें घालून शत्रूशीं समोरासमोर लढण्याची नवी पद्धतच चांगली असें शिंद्यांचें म्हणणें होतें. सारांश, पद्धत

नवी का जुनी हा वादच अजून मराठ्यांमध्यें आपापसांत चालला होता. मराठी फौजेंतील या सर्व चित्तबातम्या इंग्रजांस दररोज समजत असत. शत्रूच्या फौजेंतील या बजबजपुरीचा इंग्रजांनीं तावडतोब फायदा घेतला. मराठ्यांचा तळ या वेळीं जाफराबाद व असई यामध्यें पडला होता. त्या मुक्कामीं ता. २३ सप्टें. रोजीं इंग्रजांनीं लढाईचें तोंड लावलें. प्रातःकाळ पासूनच उभयपक्षीं किरकोळ चकमकी सुरू झाल्या.

ता. २३ सपटेंबर दुपारच्या सुमारास जन. वेलस्लीनें निवडक साडेचार हजार लोक बरोबर घेतले आणि नंतर त्यानें शत्रूचीं पलटणें व तोफखाना यांवर बेजरब चालून घेतलें. याप्रमाणें इंग्रजांचा हल्ला होतांच शिंद्याचे दिवाण यादवराव बक्षी यांनींही शत्रूवर घोडीं घातलीं. त्याप्रसंगीं बरीच हातघाई होऊन यादवराव बक्षी आणि आनंदराव निंबाळकर ठार पडले आणि नंतर मराठी फौजेंत पळापळ सुरू होऊन लढाईचा सर्व मारा पलटणांवर पडला. सैन्यांतील सरदार हा त्याचा प्राण होय. मराठी फौजेंतील मुख्य सरदार रघोजी भोसले आणि दौलतराव शिंदे हे दोघेही बडे बापके बेटे अगदीं भ्याड आणि नादान होते. लढाईच्या प्रारंभींच भोसल्यांनीं पलायनास प्रारंभ केला. बक्षी ठार पडतांच शिंद्यांनींही तोच कित्ता गिरविला. शिंद्यांचीं पलटणें मात्र चांगलीं लढलीं. इतर मराठी फौजेंत पळापळ सुरू झाली—ज्यांच्या जिवावर लढावयाचें ते ऑफिसर शत्रूकडे आगाऊच फितूर झालेले-फौजेचे खावंद तर बोलून चालून पळपुटे-त्यामुळें या पलटणांची ना धनी ना त्राता आणि ना मार्गदर्शक अशी स्थिति झाली होती. अशाही विपन्न स्थितींत या पलटणांनीं स्वतःच्या अक्कलेनेंच लढाई चालू ठेवून बराच वेळ जागा सोडली नाहीं आणि पुष्कळ शिपायांनीं तर मरेपर्यंत हत्यारें खालीं ठेवलीं नाहींत. असल्या रणशूर शिपायांना कुशल सेनापति मिळाला असता तर लढाईचा परिणाम खास निराळा झाला असता. शेवटीं इंग्रजांनीं आपलें सर्व दळ एकवटून या पलटणांवर हल्ल्यावर हल्ले चढविले त्यामुळें आघाडीचीं पलटणें मोडून तीं पिछाडीच्या पलटणांत मिसळलीं. इंग्रजांनीं तसाच नेट धरून पुढें चाल केली आणि पलटणांच्या या दुसऱ्या रांगेवर हल्ला केला. तीं एक नवीनच लचांड उद्भवून इंग्र-

जांची धांदल उडाली अघाडीच्या पलटणापैकीं कांहीं गोलंदाज आणि शिपाई मेल्याचें सोंग घेऊन रणभूमीवर अस्ताव्यस्त पडले होते. हे लोक खरोखरीच ठार झाले आहेत असें समजून इंग्रजांनीं त्यांकडे दुर्लक्ष केलें आणि ते तसेंच पुढें सरकून पलटणांच्या दुसऱ्या रांगेवर जाऊन पडले. याप्रमाणें इंग्रज पुढें जातात तोंच मेलेले हे लोक भुतासारखे उभे राहिले आणि त्यांनीं इंग्रजांच्या पिछाडीवर तोफांच्या आणि बंदुकांच्या गोळ्यांचा भडिमार सुरू केला. अघाडीस दुसऱ्या रांगेतील पलटणांचा मारा आणि पिछाडीस हा मारा असा दुहेरी मारा इंग्रजी लष्करावर एकाच वेळीं पडला. अशा या संकटांशीं तोंड देऊन इंग्रजांनीं शेवटीं हल्ले करकरून पलटणांची ही दुसरी रांग मोडून काढली आणि नंतर मराठी पलटणें शिस्तीनें व्यवस्थित मागें हटलीं आणि सर्व रणक्षेत्र इंग्रजांच्या हातीं आलें. इतका प्रकार झाला तरी मेल्याचें सोंग घेणारे शिंद्याकडील हे बहाद्दर गोलंदाज आणि शिपाई अजूनही इंग्रजांवर दारूगोळ्यांचा वर्षाव करीतच होते. शेवटीं इंग्रजांनीं हल्ला करून हे सर्व गोलंदाज आणि शिपाई कापून काढले तेव्हांच या तोफा आणि बंदुका थंड पडल्या ! या लढाईंत इंग्रजांना पुष्कळ लूट मिळाली आणि शत्रूच्या शंभर तोफाही त्यांच्या हातीं सांपडल्या. या पराजयानंतर शिंदे व भोसले हे आपली फौज कशीबशी संभाळीत मागें हटूं लागले आणि क. स्टीव्हन्सन् यानें त्यांचा नर्मदेपर्यंत पाठलाग केला. ता. २१ आक्टो. पर्यंत इंग्रजांनीं बऱ्हाणपूर आणि असीरगड हीं दोन्हीं स्थळें घेतलीं. तिकडे गुजराथेंत क. मरे यानें ता. २९ आग. रोजीं भडोच आणि ता. १७ सप्टें. रोजीं पावनगड हल्ल्यानें घेऊन पावनगडाशेजारचें चंपानेर शहर हस्तगत केलें. याप्रमाणें दक्षिणेंतील शिंद्याचा सर्व मुलूख इंग्रजांच्या हातीं आला.

पिरूची पिछेहाट—तिकडे उत्तर हिंदुस्थानांतही इंग्रजांना असेच मोठमोठे विजय मिळाले. दक्षिणेंत युद्ध सुरू झाल्याची वार्ता कळतांच जन. लेक हाही कानपुराहून तळ हालवून तावडतोब शिंद्याच्या मुलखांत शिरला. उत्तर हिंदुस्थानांतील शिंद्यांच्या सर्व फौजेवर मुसा पिरू हा सरसेनापति होता. दिल्लीची जहागीर आणि दिल्लीचा बादशहा यांचा बंदोबस्त ठेवणें,

शिंद्यांच्या अफाट सरंजामाचा सर्व वसूल वेळेवर करून त्याचा मालकाला वेळेवर पुरवठा करणें, स्थानिक बंडखोरांना जरबेंत वागवून इंग्रजांशीं तोंड देणें वगैरे बाबतींतली सर्व अखत्यारी या पिरूकडे होती. सारांश, शिंदे यांच्या दौलतींत शिंद्यांच्या खालोखाल पिरू हाच सर्वश्रेष्ठ होता. शिंद्यांच्या विश्वासास पात्र झालेल्या या पिरू फिरंग्यानें दगलबाजी करण्यांत अघाडीचा मान साधला! ता. २९ आग. रोजीं जन. लेक आणि फिरंगी पिरू यांच्या फौजांची प्रथम कौलेजवळ नजरानजर झाली. परंतु पिरू लढण्याच्या भानगडींत न पडतां मागें हटूं लागला. इंग्रजांनी मराठी फौजेच्या देखदेखत कौलें हल्ला करून घेतलें तरीही पिरूनें कांहींहि हालचाल केली नाहीं. नंतर हा फिरंगी मुकाट्यानें दिल्लीकडे परत गेला आणि तेथें गेल्यावर पिरू आणि त्याचे साथीदार हे आपापली मालमत्ता गुंडाळून उघडपणानें इंग्रजांना मिळाले.

**अलीगडावर हल्ला**—पिरू फिरंगी यानें पिच्छेहाट केल्यावर जन. लेक हा अलीगडाकडे वळला. अलीगडचा किल्ला बळकटीबद्दल दिल्ली प्रांतांत नामांकित होता. या किल्याला एकामागें एक अशा चार तटबंद्या होत्या आणि किल्याभोंवतीं ३२ फूट खोल आणि दोनशे फूट रुंद असा प्रचंड खंदक होता. पिदरून फिरंगी हा किल्लेदार होता. फौज, पायदळ, तोफा, दारूगोळा आणि इतर रणसाहित्य या बाबतींत या किल्ल्याची तयारी अगदीं अव्वल दर्जाची होती. असें हें स्थळ वर्ष सहा महिने वेढा घातल्याशिवाय इंग्रजांच्या हातीं सांपडलें नसतें. परंतु येथेंही फितुरानें इंग्रजांना आयत्यावेळीं चांगलाच हात दिला. इंग्रज जवळ येतांच किल्ल्यावरील गोरे अंमलदार त्यांना मिळाले त्यामुळें किल्लेकऱ्यांमध्यें अंदाधुंदी आणि नाउमेद माजली. किल्लेदार पिदरून हा अजून उघडपणें शत्रूला मिळाला नव्हता, परंतु त्यानें किल्ल्याचा बचाव करण्यांत मुळींच लक्ष घातलें नाहीं. किल्ल्यांत जाण्यायेण्याचा मार्ग पक्का फरसबंदीचा बांधून काढलेला होता. किल्ल्याला वेढा पडणार असा संभव दिसतांच हा मार्ग उखडून टाकून त्या ऐवजीं खंदकावर काढतां घालतां येणारा तात्पुरता लांकडी पूल ठेवावयाचा आणि शत्रु जवळ येतांच हा लांकडी पूल आंत ओढून घ्याव-

याचा अशी पूर्वी बाहेवाट असे. या लांकडी पुलास पूर्वी साकू असें म्हणत असत. फरसबंदी मार्ग उखडून टाकून त्याऐवजीं साकू घालण्याची गोष्ट किल्लेदार नजरचुकीनें विसरला असें इंग्रज इतिहासलेखकांनीं लिहून ठेविलें आहे. परंतु ती गोष्ट खरी दिसत नाहीं. फितुरामुळेंच ही गोष्ट घडली असली पाहिजे. असो. इंग्रजांनीं या गोष्टीचा तावडतोब फायदा घेतला आणि हल्ला करून त्या मार्गानें थेट किल्ल्याच्या दरवाजापर्यंत प्रवेश केला. किल्ल्यावरील गोरे अधिकारी इंग्रजांकडे मिळाले होते त्यांपैकीं मि. ल्यूकन नांवाचा हरामखोर इंग्रजांना मार्ग दाखविण्याकरितां हल्ल्याच्या अग्राडीस चालत होता. याप्रमाणें दरवाजापर्यंत प्रवेश झाल्यावर इंग्रजांनीं तोफेच्या गोळ्यांनीं तो फोडला आणि पहिली तटबंदी इंग्रजांच्या हातीं पडली. याप्रमाणेंच इंग्रजांनीं चारी तटबंद्या पांच चार तासांत

४ सपटेंबर काबीज केल्या. अमलदारांच्या फितुरामुळें कोठेंही त्यांना सशस्त्र विरोध झाला नाहीं. किल्लेकऱ्यांपैकीं बेइमान होते ते अंमलदारांचें अनुकरण करून स्वस्थ बसले आणि इमानी होते त्यांनीं आपल्याच अकलेनें शत्रूची जागोजाग अडवणूक केली आणि ते मारले गेले आणि अर्वचट होते त्यांची मात्र पळतां पळतांच कत्तल करण्यांत आली. किल्ल्याची फत्ते झाल्यावर पिदरून फिरंगी इंग्रजांच्या कैदेंत सांपडला.

दिल्लीची लढाई–इंग्रज अल्लीगडाकडे गुंतलेले पाहून शिंद्यांच्या फौजेनें ता. २ सप्टें. रोजीं एकाएकीं शिकोआबाद येथील इंग्रजी ठाण्यावर हल्ला केला. तेथील इंग्रजी फौजेनें हा पहिला हल्ला कसाबसा परतवला. परंतु तिसरे दिवशीं पुनः हल्ला होतांच इंग्रजी फौज शरण आली आणि ठाणें मराठ्यांच्या हातीं गेलें. या विजयाचा मराठ्यांना विशेषसा फायदा मिळाला नाहीं. जन. लेक यानें तावडतोब नवीन फौज त्या प्रांतीं पाठविली आणि नंतर त्यानें दिल्लीकडे मोर्चा वळविला. दिल्लींत लोई फिरंगी हा शिंद्याचा सरदार होता. त्याच्या फौजेंतील गोरे अंमलदार यापूर्वींच शत्रूकडे मिळाले होते. लोई मात्र अजून उघडपणें मिळाला नव्हता. इंग्रज जवळ येतांच लोईनें नऊ हजार कवाइती पायदळ, पांच हजार घोडेस्वार आणि सत्तर तोफा यांसह यमुना ओलां-

हली आणि तो शत्रूवर चालून आला. याप्रमाणें लोईनें शत्रूवर चालून जाण्यांत मोठी धडाडी दाखविली परंतु पुढें मात्र त्याचें युद्धकौशल्य एकाएकीं अगदींच थंडावलें असें दिसतें.

ता. ११ सपटेंबर

मराठी फौज चालून येतांच इंग्रजांनीं पीछेहाटीचें सोंग केलें. शत्रूचा खरोखरीच पराजय झाला असें समजून मराठी फौज हुरळून जाऊन पाठीस लागली. अघाडीची फौज हटत हटत पिच्छाडीच्या फौजेंत मिसळली आणि नंतर इंग्रजी फौजेनें एकदम शत्रूवर तोफांचा भडिमार करून हल्ला केला. असा अचानक हल्ला होतांच मराठी फौजेचा मोड होऊन तिची दाणादाण झाली आणि पळतां पळतां शेकडों शिपायांची कत्तल झाली व यमुना ओलांडतांना शेकडों बुडून मेले. लोई व त्याचे साथीदार हे सर्व लढाईचा हा तमाशा पहात स्वस्थ होते आणि लढाईनंतर ते सर्व उघडपणें इंग्रजांना मिळाले. यानंतर इंग्रजांनीं दिल्ली घेतली आणि आंधळा दुर्दैवी शहाआलम बादशहा हाही त्यांच्या हातीं सांपडला.

आग्र्याची फत्ते—दिल्लीच्या लढाईनंतर जन. लेक हा आग्र्याच्या किल्ल्याकडे वळला. हाही किल्ला बळकटपणाबद्दल अतिशय नामांकित होता. किल्ल्यावर शिबंदी, तोफा, दारूगोळा वगैरे रणसाहित्याचा भरपूर साठा करण्यांत आला होता. आणि किल्ल्याबाहेर शिंद्यांच्या सात पलटणेंही संरक्षणार्थ हजर होतीं. किल्ल्यावरील सर्व अंमलदार इंग्रज जातीचे होते. या इंग्रज अंमलदारांच्या विश्वासावर शिंद्यांनीं आपला सर्व खजिना या किल्ल्यावर ठेविला होता. याप्रमाणें शिंद्यांनीं आपलें सर्व गाठोडें आपण होऊन चोरांच्या हवालीं केलें आणि त्याचें प्रायश्चित्त त्यांना तावडतोब मिळालें. इंग्रज जवळ येतांच आग्र्याच्या या मराठी फौजेंत फितुरीच्या भुतानें नंगा नाचच घातला! किल्ल्यांतील आणि किल्ल्याबाहेरील सर्व गोऱ्या अंमलदारांनीं शिंद्यांचा खजिना उपटून शत्रूकडे पळून जाण्याचा बेत गुप्तपणें ठरविला. या दगलबाजीचा सुगावा किल्ल्यावरील सैनिकांना लागतांच त्यांनीं आपल्या गोऱ्या अंमलदारांना कैदेंत टाकलें. किल्लेकऱ्यांनीं ही गोष्ट करतांच बाहेरच्या पलटणांतील गोरे अंमलदार गरम झाले आणि त्यांनीं आपल्या शिपायांना फूस देऊन किल्ल्यांत जबरदस्तीनें घुसण्याचा

घाट घातला. उलटपक्षीं किल्लेकऱ्यांनींही त्यांचा प्रतिकार चालविला. मराठी फौजेंत अशी ही बेबंदशाही चालू असतांना इंग्रजी फौज आग्र्या-जवळ दाखल झाली आणि तिनें लागलीच बाहेरच्या पलटणांशीं कलागत सुरू केली. एक दोन दिवस किरकोळ चकमकी होऊन किल्ल्याबाहेरचीं सर्व पलटणें शिंद्यांना दगा देऊन तोफा, दारूगोळा आणि बंदुका यांसह इंग्रजांना मिळालीं. आग्र्यास शिंद्याचा तोफा व दारूगोळे तयार करण्याचा प्रचंड कारखाना होता तोही या दगलबाज लोकांनीं इंग्रजांच्या स्वाधीन केला. याप्रमाणें चहूंकडून नाउमेद झाल्यामुळें किल्लेकरी कौल घेऊन खालीं उतरले आणि किल्ला आणि त्यावरचा शिंद्याचा सर्व खजिना इंग्रजांच्या आयताच हातीं सांपडला.

ता. ८ आक्टोबर

लासवारीची लढाई—शिंद्यांनीं दद्रुनेक याच्या हाताखालीं सात पलटणें देऊन त्याची दिल्लीप्रांताकडे रवानगी करून दिली होती हें पूर्वी सांगितलेंच आहे. या मराठी फौजेकडे जन. लेक यानें आतां लक्ष वळविलें. दद्रुनेक फिरंगी हा एक त्या काळचा नामांकित हरामखोर होता. पूर्वी हा शिंद्यांना दगा देऊन होळकराला मिळाला होता आणि नंतर होळकराला दगा देऊन हा पुन: शिंद्याकडे परत आला होता. असल्या या पाजी मनुष्यावर शिंद्यांनीं विश्वास ठेवला आणि त्यानें त्याचें चीज आपल्या स्वभावाप्रमाणें करून दाखविलें. दिल्लीप्रांताजवळ येतांच दद्रुनेक फिरंगी आणि त्याच्या हाताखालचे गोरे अंमलदार हे सर्व उघडपणें इंग्रजांना मिळाले. नंतर अंबोजी इंगळे हा या मराठी फौजेला बरोबर घेऊन दिल्लीकडे निघाला. वाटेनें दिल्ली व आग्रा येथून पळालेले शिंद्यांचे बरेचसे सैनिक या फौजेला सामील झाले आणि त्यांचीं निराळीं पांच पलटणें करण्यांत आलीं. पूर्वीची सात आणि हीं नवीन पांच अशा या बारा पलटणा मिळून नऊ हजार सैनिक इंगळ्याच्या हाताखालीं एकत्र झाले. इंग्रज आग्र्यास गुंतले असतांना इंगळे त्या स्थळाजवळ सव्वीस मैलांपर्यंत चालून गेला. आग्र्याची फत्ते झाल्यावर जन. लेक यानें आपली दहा बारा हजार फौज एकत्र केली आणि तो मराठी फौजेवर चाल करून निघाला. मराठी फौज मेवाताकडे मागें हटूं लागली. परंतु इंग्रजांनीं लांब मजली करीत या फौजेला

गांठलें आणि त्याला लढाई देण्यास भाग पाडलें. मराठी फौजेंतील गोरे अंमलदार पूर्वी इंग्रजांना मिळाले होतेच आणि नवीन सेनापति अंबोजी इंगळे हाही त्यांचेंच अनुकरण करण्याचा विचार करीत होता. इंगळे वाहतः शत्रूसमोर लढत लढत मागें हटत होता. परंतु आंतून इंग्रजांकडून जहागीर मिळवून शिंद्यांशीं बेइमानी करण्याचा त्याचा प्रयत्न चालू होता. लढाईच्या ऐन वेळीं सर्व तोफा हवालीं करतो, लढाई बंद ठेवा असें इंगळ्यानें जन. लेक यांशीं बोलणें लाविलें. लढाई बंद ठेवण्याविषयीं इंग्रजांनीही आपल्या तर्फेच्या अटी कळविल्या. परंतु इंगळ्याला त्या अटी मानवल्या नाहींत आणि त्यानें शेवटीं लढाई देण्याचाच निश्चय ठरविला. उतार नसलेला एक ओढा पाठीशीं घालून आणि अघाडीस आपला तोफखाना घालून मराठी फौज महालपूर आणि लासवारी यांमध्यें दोन रांगा करून लढाईच्या तयारीनें उभी राहिली. इंगळे हा महादजी शिंद्याच्या तालमींत तयार झालेला अनुभवी सेनापति होता त्यामुळें इंग्रज संख्याबळानें ज्यास्त होते तरीसुद्धां त्यांना ही मराठी फौज मोडून काढण्यास अतिशय कष्ट पडले. इंग्रजांनीं घोडदळ आणि पायदळ यांचे हल्ले करवरून शेवटीं या फौजेची दाणादाण केली. मराठी फौजेपैकीं बहुतेक शिपायांना मरेपर्यंत हत्यारें खालीं ठेविलीं नाहींत. कांहीं जण पळाले आणि सुमारें दोन हजार इंग्रजांच्या स्वाधीन झाले. या लढाईत इंग्रजांचेही एक हजार लोक ठार व जखमी झाले. लढाईनंतर अंबोजी इंगळे हा शिंद्यास दगा देऊन इंग्रजांस मिळाला आणि त्याला इंग्रजांकडून गोहदप्रांती जहागीर मिळाली.

ता. १ नोव्हेंबर

बुंदेलखंड—वसईच्या तहांत कर्नाटकांतील सावनूर व बंकापूर आणि गुजराथेंतील उरपाड हे महाल पेशव्यांनीं इंग्रजांस दिले होते. पुढें इंग्रजांनीं हे महाल पेशव्यांस परत दिले आणि त्यांच्या मोबदल्यांत बुंदेलखंड मिळविलें. अयोध्याप्रांताला बुंदेलखंड जवळ असल्यामुळें इंग्रजांना हा मुलूख अतिशय सोईचा होता. त्या प्रांतांत हिंमतबहादूर गोसावी आणि अली-बहादूर हे दोघे सरदार शिंद्याच्या बतीनें इंग्रजांशीं लढण्यास सिद्ध झाले होते. त्यांपैकीं अलीबहादूर हा अगदींच अननुभवी होता आणि शिवाय

तो त्या प्रांतीं नुकताच गेला होता त्यामुळें त्याजवळ फौजेची तयारी कांहींच नव्हती. अर्थात् इंग्रजांशीं युद्ध चालविण्याचा सर्व भार गोसाव्यावर होता. गोसावी हा महादजी शिंद्यांच्या तालमींत तयार झालेला अनुभवी फौजबंद सरदार होता आणि त्यानें मनांत आणलें असतें तर बुंदेलखंडांत युद्धाचें चांगलें तोंड लागलें असतें. परंतु तो आयत्या वेळीं शिंद्यांना दगा देऊन आपल्या फौजेसह इंग्रजांकडे मिळाला त्यामुळें इंग्रजांचें काम अतिशय सोपें झालें. जन. लेक हा कानपुराहून तळ हालवून शिंद्यांच्या मुलखांत शिरतांच अलाहाबादेस जमलेल्या इंग्रजी फौजेनेंही तावडतोब बुंदेलखंड व रोहिलखंड यांवर स्वारी केली. कोठेंही त्यांना विशेषसा विरोध झाला नाहीं.

ता १३ आक्टोबर

ता. १३ आक्टोबर रोजीं इंग्रज व अल्लीबहाद्दर[1] यांमध्यें थोडीशी झटपट होऊन तींत इंग्रजांचा जय झाला आणि अल्ली जीव घेऊन बेटवा नदीपार पळाला. नंतर गोसाव्याच्या सहाय्यानें इंग्रजांनीं सर्व प्रांत स्वाधीन करून घेतला.

कटक—बुंदेलखंडांत इंग्रजांना थोडेंसें लढावें तरी लागलें. कटक प्रांत इंग्रजांनीं न लढतांच काबीज केला. सप्टें. महिन्यांत ले. जन. हारकोर्ट यानें त्या प्रांतांवर स्वारी केली. इंग्रजांनीं ता. १४ सप्टें. रोजीं माणिकपट्टण आणि ता. २१ सप्टें. रोजीं बालासोर न लढतांच घेतलें. मुरंग आणि कटक हीं दोन्हीं स्थळेंही आक्टो.च्या तिसऱ्या आणि दहाव्या तारखेस अशींच इंग्रजांकडे आपण होऊन स्वाधीन झालीं. ता. १४

---

१ समशेरबहाद्दर ता. २३ आग. १८०२ रोजीं मृत्यु पावला, हें या पुस्तकाच्या ७४१२ पृष्ठावर सांगितलेंच आहे. अल्लीबहाद्दर त्यावेळीं पुण्यास होता. समशेरच्या पश्चात् पेशव्यांनीं त्याची जहागीर जप्त केली. आपल्या बापाची जहागीर परत मिळावी म्हणून अल्लीनें पुणें दरबारीं बहुत खटपट केली. परंतु त्याची दाद लागली नाहीं. हडपसरच्या लढाईंत अल्ली हजर होता. पुढें पेशवे कोंकणात पळाल्यावर अल्लीनें त्यांचा पक्ष सोडला आणि तो पुण्यास अमृतरावाकडे आला हा मजकूर पृ. ७४३९ वर आला आहे. अल्ली पुढें पुण्याहून निघून बुंदेलखंडाकडे गेला. आणि तेथें आपली जहागीर जबरदस्तीनें ताब्यांत घेऊन त्यानें शिंद्याच्या वतीनें इंग्रजाशीं युद्ध पुकारलें.

आक्टो. रोजीं इंग्रजांनीं बाराबत्तीचा किल्ला हल्ल्यानें घेतला. याप्रमाणें कटक प्रांतांत इंग्रजांची न लढतांच फत्ते झाली.

पुनः दक्षिण—इंग्रजांनीं इतर प्रांतांत केवढेही मोठमोठे विजय मिळविले तरी जयापजयाचा खरा निर्णय अर्थात् दक्षिणेंतच लागावयाचा होता. असईच्या लढाईनंतर क. स्टीव्हन्सन् यानें बऱ्हाणपुरावर चाल केली. आणि त्याच्या अघाडी पिच्छाडीवर मराठ्यांची फौज छापे घालून त्रास देऊं लागली. सबब जन. वेलस्ली हा आजंठ्याचा घांट उतरून क. स्टीव्हन्सनला सामील झाला. याप्रमाणें इंग्रजी फौज एक जागीं झालेली पाहतांच शिंदे इंग्रजांच्या तोंडावर बऱ्हाणपूरच्या आसपास राहिले आणि रघोजी भोसले इंग्रजांना बगल देऊन दक्षिणेकडे वळले आणि मोंगलाईकडे चालले. हें पाहतांच ज. वेलस्ली हा पुनः: आजंठ्याचा घांट चढून भोसल्यांच्या पिच्छावर निघाला. ता. ३१ आक्टो. रोजीं भोसल्यांची पांच सात हजार फौज इंग्रजांच्या रसदेवर एकाएकीं

३१ आक्टोबर.

तुटून पडली आणि तिनें इंग्रजांचे शेकडो बैल लांबविले. अंबरजवळ थोडीशी लढाई होऊन भोसल्यांचीही फौज मागें हटली आणि इंग्रजांनीं आपली बाकीची रसद सुरक्षितपणें लष्करांत आणली. यानंतर भोसल्यांनीं लढाईचा नाद सोडून दिला आणि ते नागपुराकडे परत चालले. सबब जन. वेलस्ली हा पुनः आजंठ्याचा घांट उतरला आणि नंतर इंग्रजांनीं गाविलगडास वेढा देण्याचा रोख दाखविला.

आरगांवची लढाई—असईच्या लढाईनंतर शिंद्यातर्फे यशवंतराव घोरपडे आणि नारोपंत हे दोन वकील इंग्रजांकडे तहाच्या वाटाघाटीसाठीं आले. या वाटाघाटींत आपा देसाई निपाणकर हा मध्यस्थ होता. आठ पंधरा दिवस वाटाघाट होऊन शिंद्यांनी आपला तळ हालवून इलिचपूरच्या पूर्वेस वीस मैलांवर मुक्काम करून रहावें आणि नंतर उभयपक्षीं तात्पुरतें युद्ध बंद ठेवावें असा करार ठरला. हा करार शिंद्यांनीं पाळला नाहीं आणि त्यांनीं आपला तळ हालविला नाहीं. मन्याबापू भोसले हे तीस हजार फौजेसह आरगांवावर होते त्यांच्या मदतीस शिंद्यांनीं आपली

फौज पलटणें पाठविलीं आणि स्वतःही युद्धाची तयारी चालविली. हें पाहतांच जन. वेलस्ली आणि क. स्टीव्हन्सन् हे एकत्र झाले आणि त्यांनीं आरगांवकडे चाल केली. ता. १९ नोव्हेंबर रोजीं आरगांव येथें उभयपक्षांची लढाई झाली. या लढाईंत दौलतराव शिंदे आणि रघोजी भोसले हे खासे सरदार हजर नव्हते.

ता. १९ नोव्हेंबर

भोसल्यातर्फे विठ्ठलपंत बक्षी आणि शिंद्यातर्फे गोपाळराव चिटणीस यांनींच या लढाईत प्रामुख्यानें भाग घेतला होता. मराठ्यांच्या बाजूनें लढाईची तयारीही कांहींच नव्हती. उलट शिंद्याशीं तहाची बाटाघाट चालू झाली आहे त्याअर्थी तुम्ही या मराठी फौजेच्या वाटेला जाऊं नका अशी शिंद्याचा वकील यशवंतराव घोरपडे हा जन. वेलस्लीला भीड घालीत होता. परंतु त्यानें ती भीड न मानतां लढाईस सुरवात केली. इंग्रजी फौज जवळ येतांच भोसल्यांची फौज मागें हटूं लागली. शिंद्याची फौज मात्र युद्धास उभी राहिली. पायदळापैकीं हजारपांचशें आरबांनीं बेधडक इंग्रजी फौजेवर चालून घेतलें परंतु इंग्रजांच्या आगीच्या मारामुळें हा हल्ला परतला. नंतर गोपाळराव चिटणीसांनीं शत्रूवर बेजरब घोडीं घातलीं. त्याप्रसंगीं मोठी हातघाई होऊन चिटणीस जखमी झाले आणि नंतर मराठी फौजेचा पुरा मोड होऊन शेकडों शिपायांची कत्तल झाली. या लढाईनंतर ता. ५ दिसें. रोजीं इंग्रजांनीं गाविलगडास वेढा घातला. ता. १४ दिसें. रोजीं इंग्रजांनीं बाहेरच्या तटाला सुरंग लावून तो काबीज केला. नंतर दुसरे दिवशीं इंग्रजांनीं बालेकिल्ल्याला शिड्या लाविल्या आणि तो लढून घेतला. इंग्रज व मराठे यांमध्यें चालू असलेल्या या युद्धांतील आरगांवची लढाई ही शेवटची लढाई होय.

इंग्रजी इतिहासांतून या युद्धाचा जो वृत्तांत दिला आहे तो लक्षपूर्वक वाचून आणि त्यांतील कार्यकारणभाव नीट समजून घेऊन आम्हीं या युद्धाच्या हकीगतीचा त्रोटक सारांश मात्र वर दिला आहे. असा हा सारांश तयार करतांना या प्रकरणीं आम्ही पुढें पत्रें छापलीं आहेत त्यांचाही योग्य तो परामर्ष आम्ही जागोजाग घेतला आहे. पानिपतोत्तर मराठी इतिहास होतां होईतों तत्कालीन मुत्सद्दी व सरदार यांच्या शब्दांनींच

वर्णन करावयाचा असा ऐतिहासिक-लेख-संग्रहाचा आतांपर्यंत बाणा चालत आला आहे. ज्यांनीं कारस्थानें उभारलीं आणि लढाया खेळल्या त्यांच्याच कडून त्यांच्या हालचालींचें खरें इद्गत समजून घेऊन तें व्यवस्थितपणें नमूद करणें हाच खराखुरा इतिहास होय. आम्हीं वर सारांश दिला आहे. त्यांत या दृष्टीनें मोठेंच व्यंग राहिलें आहे. कारण या युद्धांत ज्या मराठ्यांनीं प्रत्यक्ष भाग घेतला होता त्यांचीं अस्सल पत्रें आमच्या संग्रहीं फारशीं नाहींत आणि तशीं पत्रें इतरत्रही कोठें छापलेलीं आमच्या पाहाण्यांत नाहीत. त्यामुळें या युद्धाची वास्तविक आणि तपशीलवार हकीगत आम्हाला मुळींच देतां आली नाहीं आणि आम्हाला एकतर्फी इंग्रजी इतिहासांचाच बहुतांशीं आधार घ्यावा लागला आहे. असो. ज्यांच्या पराक्रमामुळें या महाराष्ट्राला पूर्वी शिपायांची विलायत असें अभिधान प्राप्त झालें होतें त्या मराठ्यांचे या युद्धांत एकामागून एक—एकाच वेळीं सर्वत्र ठिकाणीं सारखे पराजय कां होत गेले त्याचीं कारणें येथें संक्षेपानें नमूद करतों.

१ फौजेंतील निरुत्साह आणि फितूर—युद्धविद्येमध्यें शिपायांचा उत्साह (Morale) ही एक अजिंक्य शक्ति समजली जाते. हा उत्साह वाढविण्याकरितां—निदान आहे तो कायम ठेवण्याकरितां शक्य त्या उपायांचा अवलंब केला जातो. हा उत्साह कायम राहिला तरच संकटांचे पर्वत पायांखालीं तुडवून सेनापतीला जयश्री आपणाकडे खेंचून आणतां येते. दहाजण उत्साहानें लढूं लागले म्हणजे अकरावा भ्याड असला तरीसुद्धां त्याला लढाईचें स्फुरण येतें आणि शंभरांपैकीं पांचजण शत्रूकडे फितूर होऊन आणि आपल्या बाकीच्या सोबत्यांचा बुद्धिभेद करून पळूं लागले म्हणजे बाकीच्या पंच्याण्णवांचे हातपाय निरुत्साहानें लटपटूं लागतात असें हें चमत्कारिक शास्त्र आहे. यासाठींच युद्धनीतिशास्त्रांत फितूर हा सर्वांत मोठा गुन्हा समजला जातो आणि फितुरी मनुष्याला तावडतोब देहांत प्रायश्चित्त देण्यांत येतें. ज्यांनीं शिपायांचा उत्साह वाढवावयाचा किंवा कायम ठेवावयाचा ते शिंद्यांचे गोरे ऑफिसर आगाऊच शत्रूकडे फितूर झाले होते त्यामुळें युद्धाच्या सुरवातीपासूनच निरुत्साहामुळें मराठी फौजेचा गळाठा झाला

होता. या युद्धांत मराठ्यांच्या बाजूनें लढाईचें खरें खुरें तोंड कोठेंहि लावण्यांत आलें नाहीं. इंग्रजांनीं चालून जाऊन लढाईस सुरवात करावी— फितुरी लोकांनीं पळूं लागावें किंवा उघडपणें शत्रूला मिळावें-कांहीं जणांनीं निर्बुद्ध होऊन जागच्या जागींच थंड पडावें-कांहीं जणांनीं आपल्याच अकलेनें शत्रूशीं लढाई द्यावी आणि त्या प्रयत्नांत ठार मरावें—आणि शिल्लक राहिलेल्यांची मात्र पळतां पळतां कत्तल व्हावी असाच प्रकार सर्व ठिकाणीं घडून आलेला दिसतो. पुढें पुढें तर मराठी फौजेनें इंग्रजाविषयीं इतकी धास्त घेतली कीं, इंग्रज दिसला कीं, प्रत्येकाला जीव घेऊन पळण्याचाच मोह उत्पन्न होऊं लागला! अहंमदनगर, अल्लीगड, आग्रा ही केवढीलीं आजिंक्य स्थळें! परंतु तीं इंग्रजांनीं केवळ डोळे वटारूनच सहजासहजीं काबीज केलीं! असई, दिल्ली, आरगांव या लढायांची जवळ जवळ तीच हकीकत आहे. बुंदेलखंड, गुजराथ, कटक हे प्रांत तर इंग्रजांनीं जवळ जवळ न लढतांच हस्तगत केले. इतका हा सारा अनर्थ शिंद्यांच्या पलटणांतील गोऱ्या अंमलदारांच्या फितुरामुळें घडून आला. पिरू, लोई, दद्रुनेक असले शेकडो हरामजादे शिंद्याच्या नोकरींत शिरले—तेथें वाढले आणि मान्यता पावले—प्रत्येकानें नबाबाप्रमाणें ऐश्वर्य संपादलें आणि ऐषआराम भोगले—आणि शेवटीं सर्वजण ऐनवेळीं मालकाचा विश्वासघात करून आणि आपापली संपत्ति गुंडाळून इंग्रजाकडे फितूर होऊन मिळाले—आणि नंतर इंग्रजांच्या साह्यानें स्वदेशीं निघून गेले! इंग्रज आणि मराठे सरदार यामध्यें चालू असलेल्या या युद्धाला शिंद्यांच्या फौजेंतील गोऱ्या अंमलदारांनीं आशियाटिक विरुद्ध युरोपियन्—गोरे विरुद्ध काळे—टोपीवाले विरुद्ध पगडीवाले असेंच कांहींतरी स्वरूप दिलें होतें असें दिसतें. आयत्या वेळीं गोरे गोरे सारे एक झाले आणि गोऱ्या लोकांवर विश्वास ठेवणारे दौलतराव शिंदे मात्र उताणे पडले!

२ हिंदुस्थानी राजेरजवाडे यांचें साह्य—दिल्ली दरबारांतील सर्व कारभार आज कित्येक वर्षें शिंद्यांच्या हातीं होता त्यामुळें रजपूत व जाठ राजे आणि बादशाही अमीर उमराव हे सर्व आंतून त्यांच्या नांवानें सारखे जळफळत होते. इंग्रजांनीं बहुत कारस्थानें करून या सर्व लोकांना

शिंद्यांच्या कूटांतून फोडलें. शिंदे आणि इंग्रज यांचें युद्ध सुरू होतांच हे सर्व शिंद्याविरुद्ध बंड करून इंग्रजांस सामील झाले. या लोकांपैकीं जयपूर, जोधपूर, गोहद आणि भरतपूर येथील राजांनीं शिंद्याविरुद्ध विशेष पुढाकार घेतला आणि त्यांनीं इंग्रजांस फौज व धान्यसामुग्री यांचा वेळोवेळ पुष्कळ पुरवठा केला. असे हे हिंदुस्थानी राजेरजवाडे आणि अमीर उमराव इंग्रजांस सामील झाले त्यामुळें शिंद्यांचें पारडें पुष्कळच हलकें झालें, आणि उत्तरहिंदुस्थानांत इंग्रजांना शिंद्याशिवाय कोणीहि शत्रु उरला नाहीं.

३ **शिंदे व भोसले यांचा नादानपणा**—शिंद्यांनीं इंग्रजांशीं युद्ध सुरूं केलें त्यावेळीं त्यांचें वय पंचविशीच्या आंतबाहेर होतें. एवढें मोठें युद्ध झालें परंतु त्यांत खुद्द शिंद्यांचें कर्तृत्व कोठेंहि चमकलें नाहीं. धोंडजी वाघासारख्या सामान्य बंडखोर मराठ्यानें चार उडाणटप्पू पोटभरू शिलेदार हातीं धरून इंग्रजांशीं लढतांना जी करामत दाखविली तिचा शतांशही लक्षावधि फौज आणि नवीन धर्तीची भरपूर शस्त्रसामुग्री जवळ बाळगणाऱ्या शिंद्यांना करून दाखवितां आला नाहीं. याचें कारण शिंद्यांच्या अंगीं तसेच भयंकर दोष होते हेंच होय. त्यांना युद्धविद्येचा गंधसुद्धां नव्हता. सामान्य धैर्य आणि सामान्य अक्कल यांचाही त्यांच्याठायीं जवळ जवळ अभावच होता. त्यांची बुद्धीहि सर्वस्वी परावलंबी होती. एखाद्या बलिष्ठानें हातीं धरून नाचवावें तेव्हां ते नाचूं लागत आणि असें करतांना आपण घालतो हा साधा नाच आहे किंवा नंगा नाच आहे यांचाही त्यांना धड उलगडा होत नसे! आतांपर्यंत रावबाजी पेशवे आणि सर्जेराव घाटगे यांच्या नादीं लागून शिंद्यांनीं मराठी राज्यांतील जुनी परंपरा धुळीस मिळविली होती आणि त्या प्रयत्नांत त्यांनीं आपल्या पदरच्या जुन्या, अनुभवी आणि कर्तृत्ववान माणसांचेंही वाटोळें केलें होतें. महादजी शिंद्यांनीं अविश्रांत मेहनत घेऊन एवढी प्रचंड दौलत उभारली होती परंतु ती दौलत कशी संभाळावी हेंच दौलतरावांना धड समजत नव्हतें. त्यांचा सर्वकाळ ख्यालीखुशालींत जात असे. खुबसुरत स्त्रियांच्या जनानखान्यांत सर्वकाळ ऐषआराम भोगावे आणि त्यांतून थोडासा वेळ फावेल तो शिकारींत खर्च करावा हा त्यांचा नित्यक्रम असे. शिंद्यांनीं स्वतःच्या जबाबदारीवर फक्त

एकाच लढाईत भाग घेतला. ती लढाई म्हणजे असईची लढाई होय. असईची लढाई हीच अलिजहांबहादूर शिंद्यांची पहिली व शेवटची लढाई! असल्या या रंगेल पोरकट माणसाचें आपल्या सैनिकांवर कितीसें वजन पडणार आणि असला हा सेनापति इंग्रजांशीं लढतांना पराक्रम तरी कोणता गाजविणार! लष्करी ज्ञान व अनुभव या बाबतींत जी स्थिति शिंद्यांची तीच भोसल्यांचीही होती. शिंदे व भोसले या दोघांच्या ठायीं स्वाभिमानाचा संस्कार चांगला जागृत होता त्यामुळें ते दोघे स्वधर्म आणि स्वराज्य यांच्या लांब लांब बढाया मारीत परंतु दोघांमध्येंहि कर्तृत्वाचा लेशमुद्धां नव्हता. महादजी शिंद्यांच्या अपूर्व कर्तबगारीमुळें शिंद्यांची फौज व पलटणें यांचा एवढा दरारा प्रस्थापित झाला होता कीं, शिंद्यांचें नांव घेतांच निजाम, टिपू, इंग्रज अशासारख्या मराठी राज्याच्या शत्रूंचे पाय भीतीनें लटपटूं लागत. महादजीबावांच्या मरणानंतर त्यांच्या दौलतीचे दिवटे दौलतराव खावंद झाले आणि इंग्रजांशीं गांठ पडतांच शिंद्यांच्या नादानपणामुळें त्यांची फौज, पायदळ, जय्यत तोफखाना, आजिंक्य किल्ले, नामांकित पलटणें वगैरे सर्व दौलत अवघ्या चार दोन महिन्यांतच सपाट झाली!!

असो. फितुराच्या दुष्ट प्रयोगामुळें शिंद्यांनीं या युद्धांत सर्वस्व कसें गमावलें याचें विवेचन आतापर्यंत करण्यांत आलें आहे. युद्धाची वास्तविक हकीगत अशा स्वरूपाची असतां इंग्रज इतिहासलेखकांनीं या युद्धाचा जो वृत्तांत दिला आहे त्यांत निराळाच रंग दृष्टीस पडतो. इंग्रज लेखकांनीं मराठ्यांचे इतिहास लिहून ठेविले आहेत ते त्यांनीं केवळ स्वतःच्या जातीच्या लोकांच्या उपयोगासाठीं आणि सोईसाठीं लिहिलेले आहेत. ज्या ठिकाणीं मराठी राजकारणाशीं आपल्या जातीच्या लोकांचा संबंध येतो त्या ठिकाणीं इंग्रजांची बाजू सजवून आणि फुगवून लिहिणें मराठ्यांच्या बाजूला शक्य त्या प्रकारांनीं लघुत्व आणणें असले दोष त्यांच्या हातून हटकून घडतात. शिवाय ते इंग्रजांच्या बाजूनें घडलेल्या गोष्टींचें अवास्तव स्तोम माजवून त्यांना नसतें महत्व आणतात त्यामुळें त्यांच्या लेखनांतील प्रमाणबद्धता बिघडते आणि खरा प्रकार पूर्णपणें झाकला जाऊन सर्व मजकूर इतका उलटामुलटा आणि विकृत होऊन जातो कीं, त्यांनीं

असले इतिहास केवळ राजकीय हेतूंनीं प्रेरित होऊनच लिहिलेले आहेत असा संशय वाटूं लागतो !

उदाहरणार्थ—ग्रांट डफच्या इतिहासांतील पुढील मजकूर पहा:—

" सर्वच घोडेस्वारांना विशेषतः १९ व्या घोडेस्वारांच्या पलटणीला अतिशय युद्धोत्साह वाटत होता. प्रत्येकाला वाटे कीं, जणु काय आपल्याच पराक्रमावर यशापयश अवलंबून आहे. यासंबंधीं उदाहरणें– ले. नॅथन वुइल्सन याचा हात गोळी लागून जायबंदी होऊन बाहुट्यापासून लोंबकळत होता. परंतु तो तशा स्थितींतच घोड्यावर बसून हल्ल्याच्या अग्रभागीं गेला. ले. अलेक्झांडर ग्रांट यानें आपल्या पलटणीवर शत्रूची तोफ डागलेली पाहिली. बत्तीचा तोडा पेटवून अगदीं तोफेच्या कानाशीं ठेवलेला होता. परंतु या ग्रांटसाहेबाला एकाएकीं वीरश्रीचें स्फुरण येऊन त्यानें जो घोडा उडविला तो उडी जवळ जवळ तोफेच्या तोंडावर जाऊन पडली. घोड्याचे पाय तोफ आणि गाड्याचीं चाकें यांत अडकले आणि तशा स्थितींत ती तोफ उडाली. कॅ. जॉर्ज सेल यानें एका गोलंदाजावर हल्ला केला. गोलंदाज व सेल हे तरवारीनें लढूं लागले. तों तोफेवर बसलेल्या एका खलाशानें सेलवर तरवारीचा वार टाकला. परंतु तो वार बरगड्याच्या हाडांनीं बाजूस सरकला आणि तो छातीवर आरपार चाटीत गेला. सेलजवळ स्ट्रेंज उभा होता त्यानें त्या खलाशाला ठार मारलें. परंतु त्याच वेळीं तोफेखालीं दुसरा खलाशी होता त्यानें आपली तरवार स्ट्रेंजच्या छातींत आरपार खुपसली ! सेल पुढें चालून गेला आणि त्यानें स्ट्रेंजला परत फिरण्यास सांगितलें. परंतु स्ट्रेंजनें ती गोष्ट ऐकली नाहीं आणि सर्व दिवसभर तो सेलबरोबरच हिंडत होता. पुढें इस्पितळांत सेल हा स्ट्रेंजला भेटावयास गेला त्यावेळीं स्ट्रेंजनें छातींत ही भयंकर जखम असूनही दूर अंतरावर पेटलेली मेणबत्ती ठेवून ती फुंकरानें विझवून दाखविली ! "

" ले. एम्. कोल हा अतिशय बळकट आणि चपल होता. तो दुसऱ्या खंदकांत उतरला असतां त्यानें पाहिलें तों एका पठाणानें आपणावर बंदूक रोखलेली ! नशीबानें जवळच एक तोफेचा गोळा पडलेला

१ ग्रँट डफ. खं. तिसरी पृ. ५७३. १ ग्रांट डफ. खं. तिसरी पृ. ५६२.

होता तो त्यानें उचलला आणि पठाणावर इतक्या जोरानें फेंकला कीं, तो पठाण तावडतोब ठार झाला. "

या युद्धांतील छापे, वेढे, लूट, लढाया, हल्ले, प्रतिहल्ले आणि इंग्रज सेनापतींनीं लढविलेले लष्करी डावपेच यांचीं भपकेदार वर्णनें देऊन डफसाहेबांनीं असल्या हकीकती अधूनमधून दिलेल्या आहेत. हा सर्व मजकूर वाचून इंग्रजांनीं अचाट शौर्य आणि अपूर्व धडाडी आणि विलक्षण रणकौशल्य प्रगट करून हें युद्ध जिंकलें असा सामान्य वाचकांचा ठाम ग्रह होतो. हल्लीं शाळांतून विद्यार्थ्यांच्या हातीं मराठ्यांच्या इतिहासाचीं पुस्तकें देण्यांत येतात त्यांतूनही या युद्धाचा वृत्तांत देतांना इंग्रजांच्या पराक्रमांच्या वर्णनावरच सर्व भर दिलेला आढळतो. असले हे इतिहास लिहिणें हा केवळ सत्यविपर्यास होय. इंग्रज शूर आणि धाडसी होते ही गोष्ट खरी आहे. परंतु या युद्धांत त्यांना या सद्‌गुणांचा उपयोग करण्याचें विशेषसें कारणच पडलें नाहीं. इंग्रजांनीं केलेल्या फितुराच्या दुष्ट प्रयोगामुळेंच त्यांना या युद्धांत अपूर्व यश आलें हीच गोष्ट वास्तविक खरी आहे.

याहीपेक्षां मोठा दोष म्हणजे इंग्रज लेखकांच्या लेखांतून मराठ्यांच्या मर्दुमकीविषयीं वारंवार प्रगट होणारी तुच्छताबुद्धि हा होय. असल्या या पूर्वग्रहदूषित दृष्टीमुळें निर्विकार मनानें सांगितलेल्या हकीगतींत दिसून येणारा सरळपणा त्यांच्या लिहिण्यांत कधींही आढळत नाहीं. उलट असंभाव्य आणि असंबद्ध गोष्टी ते दडपून खऱ्या म्हणून लिहून टाकतात. उदाहरणार्थ डफसाहेबांच्या इतिहासांतील पुढील मजकूर पहा—

" मेजर जन. सर जॉर्ज होम्स के. सी. बी. हे मोठे धिप्पाड आणि सशक्त होते. त्यांना वारंवार द्वंद्वयुद्ध खेळण्याची हौस येत असे असें म्हणतात. अशा द्वंद्व युद्धांतून त्यांना नेहमीं जय येत असे. शत्रूशीं लढतांना ते हातांत सोटा घेऊनच रणांगणावर जात आणि आपला उच्च दर्जाचा लढाऊपणा क्षणभर बाजूस ठेवून शत्रूवर मेहेरबानी करण्याच्या उद्देशानें त्यांना तरवार उपसण्याची लहर देत असे तेव्हां ते आपल्या सोट्याचा ढाली सारखा उपयोग करीत ! "

---

१ ग्रांट डफ आ. तिसरी पृ. ५६४.

असल्या या पोरकट असंभाव्य गोष्टी कादंबऱ्यामध्येंसुद्धां क्वचित्च वाचा-वयास सांपडतात. तोफा, बंदुका, तरवारी असलीं हत्यारें घेऊन लढणारे हे मराठे जणुं काय कोल्ह्याकुत्र्याप्रमाणें क्षुद्र प्राणी–सामान्य सोट्यानेंच त्यांचीं पेकाटें मोडावयाचीं–त्यांच्यांशीं लढतांना तरवारीचा उपयोग करण्यांत आपल्या शिपाईबाण्याला कमीपणा येतो असें या होम्स साहेबाला वाटत होतें असाच डफसाहेबांच्या लिहिण्याचा एकंदर रोख दिसतो! इंग्रजांशीं संबंध आला म्हणजे इंग्रज इतिहास-लेखकांचें लिहिणें किती विकृत असतें हें दर्शविण्याकरितांच आम्ही हा विस्तार लिहिला आहे.

असो. इंग्रजांच्या बाजूनें घडलेल्या थोड्याशा पराक्रमाचें अवास्तव स्तोम माजवून त्याचा गाजा वाजा करण्याची करामत इंग्रज लेखकांनीं कशी करून दाखविली आहे त्याचें विवेचन आतांपर्यंत करण्यांत आलें आहे. या बाबतींत मराठी लेखकांची करामत मात्र इंग्रजी लेखकांपेक्षां ज्यास्त अर्थ-विशेष आहे. कारण या युद्धांत मराठ्यांच्या बाजूनें कोणताही पराक्रम घडला नसतां मराठी लेखकांनीं मराठ्यांच्या काल्पनिक पराक्रमाचीं भरमसाट वर्णनें लिहिण्याची अजब करामत करून दाखविली आहे! पुणें हें त्या काळीं राजकीय केंद्र असल्यामुळें तेथील सावकारांना आणि मुत्सद्यांना हिंदुस्थानच्या सर्व भागांतून नेहमीं बातमीपत्रें येत. अशा सर्व पत्रांतून आग लागून इंग्रजांनें करोडों रुपयांचें नुकसान झालें–वादळामुळें इंग्रजांचीं शेकडों जहाजें बुडालीं आणि इंग्रज व्यापाऱ्यांचे दिवाळें वाजलें–फ्रेंचांनीं इंग्रजांचे प्रांत सर केले–भूकंपानें शेकडों इंग्रज नापत्ता झाले–मराठे सरदारांनीं पराक्रम करून हजारों इंग्रज ठार मारले आणि इंग्रज आपल्या जागीं पस्ताव्यांत पडले आहेत अशाच जातीच्या खमंग बातम्या लिहिलेल्या असत! एखाद्या बातमीदाराला मराठ्यांचा पराजय नमूद करावासा वाटल्यास तो आधीं लढाईंत शेकडों इंग्रज जखमी होऊन हजारों ठार झाले अशी बातमी भपके-बाज भाषेंत लिहून नंतरच पराजयाचें वर्तमान हळूच लिहीत असे! असलीं हीं बातमीपत्रें निरनिराळ्या ठिकाणांहून प्रथम पुण्यास येत आणि नंतर पुण्यामार्फत सर्व महाराष्ट्रभर पसरत. शेवटीं या खोडसाळ पत्रांचा इतका सुळसुळाट झाला कीं, असल्या पत्रांतील मजकूर बाहेर फोडूं नये अशी

पेशव्यांना पुण्यांत जाहीर ताकीद फिरवावी लागली ! आमच्या संग्रहीं असलेल्या असल्या शेकडों बातमी पत्रांपैकीं आम्ही थोडीशीं पुढें छापलीं आहेत आणि त्यापैकीं थोडेसे उतारे येथें देतों.

४ सप्टें— " इंग्रज भांभोड्याच्या मुक्कामीं क. कलुप आहे त्याणें चार कोंबडे लढवे तयार करून मराठे सरदारांचीं नांवें ठेवून चिठ्या गळयांत बांधल्या. व आपले नांवच्या चिठ्या कोंबड्याच्या गळयांत बांधोन एकेक सरदाराशीं निरनिराळया लढाया लाविल्या. त्यांत होळकर याचे नांवचा कोंबडा होता त्याणें इंग्रजांचे नांवचे कोंबड्यास जेर करून कोंबड्याचे पायीं सुऱ्या बांधल्या होत्या ती सुरी लागोन इंग्रज कोंबडा जेर जाला. त्याचें शिर तुटलें. वरकड दोनी कोंबडे समान राहिले. याप्रों त्यांणीं शकुन पाहून सर्द जाहले. जनेंल वसली मराठेकडील जमाव भारी म्हणोन सर्द होऊन विचारांत पडले आहेत."

१४ सप्टें– " मुंबईचे बाऱ्यावर फराशिसांचे दोन तीन मनवर आले आहेत याजमुळें मुंबईचे किल्ल्यांत रात्रंदिवस सावधगिरी आहे."

१ नोव्हें—" सखो रुद्र हे जमावानिशीं ब्ऱ्हाणपुरानजीक पंचवीस कोसांवर होते. शिंदे एकटे पुढें होते. भोसले, फडके कासारबारीनें इकडे आले होते. ब्ऱ्हाणपूर घेतो असा समय आला. मग शिंदे याणीं कस्त करून इष्टबोसन यास बुडाविलें. लढाई शु. चतुर्थीस जाली. सखो रुद्र व खासा चीसन पळोन गेले. वसली घाटाखालीं गेला. वसलीचे पीछाडीवर भोसले व फडके टोक्याहून पैठणाकडे घाटाचे सुमारें दरमजल गेले. शिंदेही तिकडून येत आहेत. बातमी सांगूं नये अशी सरकारची आज्ञा त्यामुळें बोलत नाहीं. परंतु वर्तमान खरें. शूद्रयश आलें तरच उत्तम."

२ नोव्हें—" फिरंगी शिकस्त जाले. वसलीसाहेब ठार जाहले. लंगडा फिरंगी धरला गेला. मोंगलाकडील फिरंगी मात्र कायम आहे, पळाला म्हणून वाचला."

२४ नोव्हें.—"रा. यशवंतराव होळकर याणीं जाट व शिख व राठोड व कुलहिंदुस्थानचे राजेरजवाडे, कोटे, जयपूरकर वगैरे मारवाडकर व समशेर बहादुरसुद्धां सर्वत्र एकत्र होऊन सर्वांनीं मिळोन दिल्लीस जाऊन मंस्थान

हस्तगत करून इंग्रजांचें पारपत्य करावें व पुढें लखनऊस जाऊन गव्हर्नराचें पारिपत्य करावें हा बेत ठरोन सरकारचे सरदार समशेर बहादर व इंगळे याच्या इतल्यानें सर्वांनीं चालावें आणि इंग्रजांचें पारिपत्य करावें याप्रमाणें शिंदे व भोसले व होळकर यांचे विचारें ठरलें. + + + सर्वांनीं एक होऊन यावत् आजंठ्याच्या घाटापासून भागानगरसुद्धां तहात श्रीरंगपट्टण-पावेतों मुलूख जाळून लुटून फस्त करावा ही मसलत ठरली आहे. + + + फरांशिसांनीं चेनापट्टण व बंदर व मदराज व कोड्याळ वगैरे दक्षिण समुद्राचीं बंदरें इंग्रजांचीं मारून बिलायतेचा रस्ता पूर्वेकडील समुद्रांतील बंद केला आहे."

५ दिसें.—"आदेरीकर किल्लेदार यांणीं इंग्रजांचे दोन पहारे होते त्यांस तोफेच्या तोंडीं देऊन किल्लेदार व कोळी मिळोन बऱ्हाणपुरास रात्रौ येऊन इंग्रजांचें पाचसातशें माणूस कापून काढलें. त्यावरोन इंग्रजांनें बऱ्हाणपुरापासोन दहा लाख रुपये मनुष्यें फांशीं देऊन घेतले आणि शहर सोडून सहा कोशावर येऊन राहिले आहेत. मार्गेश्वर शु. १० हिंदुस्थानांत आग्र्याचे किल्ल्यानजीक अंबोजी इंगळे व समशेरबहादर व जाठ व राजे-रजवाडे व हिंमत बहादूर गोसावीसुद्धां इंग्रजांशीं लढाई मांडी होऊन इंग्रजांकडील बंगाल्याचा व लखनौचा व फरुकाबादेचा याप्रमाणें तिनी सरदार लढाईत पडोन शिवाय पंधरा सतरा हजार मनुष्य इंग्रजांचें कापून काढून कुल इंग्रजांचें लष्कर बुडवून आले होते किंवा नाहीं असें करोन अंबोजी इंगळे व सर्वांनीं मागें सरोन सात कोसावर येऊन मुक्काम केला."

२७ मार्च—"यश. होळकर याजकडील मीरखान पठाण वगैरे सरदार मिळोन पन्नास हजार फौज आग्र्यापासोन बीसा कोशावर होती. त्यास त्या फौजेची व इंग्रजांच्या पलटणांची लढाई फा. शु. ७ (१७ फेब्र.) होऊन तेरा चौदा पलटणें गारद जालीं. बाकी पळालीं. गोरे सरदार दहा वीस असाम्या होत्या त्या पळोन आग्र्याचे किल्ल्यांत गेले. किल्ल्यास घेरा चहूंकडोन मीरखान पठाण याचे फौजेचा आहे."

२९ मार्च—"चीनच्या बंदरांतून अठरा झाजें माल भरोन मुंबईस येत होता. त्यास फरासिसांनीं बातमी राखोन स्वारी करोन मालसुद्धां

झाजें नेलीं. त्यांत एक क्रोड रुपयांची नुकसानी इंग्रजांची जाली. फराशिसांनीं २५ झाजें लढाऊ सरंजामसुद्धां ममईवर रवाना केलीं. त्याबरोन ममईंत किल्लयांतील मोठमोठ्या हवेल्या पाडोन किल्लयाबाहेर वाडींतील पंचावनशें घर लहानमोठें पाडोन बरोबर केलें."

४ एप्रिल—"मुंबईचे किल्लयांभोंवतीं अर्ध कोश इंग्रजांनीं घरें मोडलीं. पंचावनशें घरें लहानथोर मातवर मोडलीं. नारळ माड चाळीस हजारपर्यंत मोडिलें असें आहे. कारण फराशिस येणार, किल्लयाभोंवतीं दाटी यास्तव जागा रिकामी केली. इंग्रजांची पांच तरांडीं दहा बारा सावकारी त्याजबरोबर दोन मुंबईवाल्या इंग्रजांचीं रखवालीस ऐसे चिनईहून माल भरोन ममईस येत होतें. फराशिसांचे मुबा पंधरा येत होते. त्यांची यांची गांठ मुंबईचे येण्यानें मार्गास पडली. सतरा तरांडीं व दोन मुबा इंग्रजांचे त्यांणीं धरोन नेले. ××× फराशिसांचे सामान फार बहुत दोनशेंपर्यंत ठिकाणाहून निघोन बिलायत, कलकत्ते, मुंबई, सुरत, गोंवें इकडे येणार याप्रमाणें बोलवा आहे.

एप्रिल—"रा. समशेरबहाद्दर व अंबोजी इंगळे नरवरास आहेत. होळकर पागहातास आहेत. मारवाडी वगैरे राजेरजवाडे जमाव तीन लक्ष घोडा आहे. फराशिस पलटणें वीस हजार नवीं ठेविलीं. त्यास पोटास मात्र गल्ला रसद पुरवावी असा करार केला. तेथें इंग्रज पन्नास हजार व तीस पसतीस हजार तुरुक स्वार याप्रमाणें जमाव आला. त्यास आटपून पुढें लखनौस जाऊन तेथें अंमल बसवून सुजाउद्दौल्याचे लेकास तेथें संस्थानीं ठेवून पुढें कलकत्त्यास जावें. खुष्कीनें होळकर व पाण्यांतून फराशिस याप्रमाणें बंदोबस्त करोन मुलखांत हात घातला आहे. * * * ममईंत फराशिस येणार यामुळें वाणी वकाल निघोन पनवेलीस आले. घरें पांच हजार पाडलीं. माडाचीं झाडें दहा हजार तोडलीं. पंचवीस करोडीची तरांडीं चिनांत थोर दर्यांत इंग्रजांचीं फराशिस यांणीं नेलीं."

१ जून—" रा. यशवंतराव होळकर सांबरच्या किल्यानजीक व जेपूरनजीक मुक्काम करोन होते. त्यास जेपूरचा प्रांत बेचिराख करोन जेपूरापासोन पंचवीस लाख खंडणी घेऊन तेथून कूच करोन सडी फौज करोन

घोडा राऊत निवडक लाख सव्वालाखपावेतो बरोबर घेऊन कोस्यास दाखल जाहले. पुढें पूर्वेस बंगाला वगैरे हा प्रांत आबाद आहे. तिकडस जाऊन प्रांतांत खंडण्या घ्याव्या हा बेत आहे. इंग्रजांनीं पिच्छा केला असतां बंगाल्यांतून भोसले व नबाब यांच्या मुलखांतून आर्काट, मसलीबंदर, चेनापट्टण व श्रीरंगपट्टण इकडे यावें हाही बेत होळकराचा आहे."

गेल्या महायुद्धांत इंग्रजांच्या अचाट पराक्रमांच्या आणि जर्मनांच्या दाणादाणीच्या सपशेल खोट्या बातम्या सर्व जगभर इंग्रजांमार्फत बुद्धिपुरःसर पसरविल्या जात असत त्याच नमुन्याच्या वर सर्व बातम्या दिलेल्या आहेत. या सर्व बातम्यांतून फ्रेंचांच्या स्वारीचे आणि इंग्रज व फ्रेंच यांमधील आरमारी लढाईचे उल्लेख आले आहेत त्यांत किती सत्यांश आहे हें समजण्यास आम्हांजवळ कोणतेंही साधन नाहीं. असल्या बातम्या लेखक पुनः पुन. घोळवून लिहित आणि महाराष्ट्रभर लोक त्या उत्सुकतेनें आणि प्रेमळपणानें वाचून संतोष पावत. यावरून त्यावेळीं इंग्रजांचा कुणीकडून तरी नाश व्हावा अशीच सर्वांच्या मनांत प्रबळ इच्छा होती एवढाच तात्पर्यार्थ काढावयाचा आहे.

असो. बऱ्यावाईट उपायांनीं इंग्रजांनीं या युद्धांत जय मिळविला आणि त्याचा फायदाही शेवटीं त्यांच्या पदरांत पुरेपूर पडला. ता. १७ दिसेंबर रोजीं भोसल्याशीं पगारी मैत्रीचा तह झाला त्याला देऊळगांवचा तह असें म्हणतात. त्या तहामुळें कटक व बालासोर हे परगणे आणि वर्धा नदीच्या दक्षिणेकडील आणि नरनाळा आणि गाविलगड यांच्या दक्षिणेकडील सर्व मुलूख इंग्रजांस मिळाला. मोगलाईत असलेले हक्कसंबंधही भोसल्यांनीं सोडून दिले. मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन याची नागपूर दरबारीं रेसिडेंट म्हणून नेमणूक झाली. ता. ३० दिसें. रोजीं शिंद्याशीं तह झाला त्याला सुर्जीअंजनगांवचा तह असें म्हणतात. त्यांतील महत्त्वाची कलमें-(१) गंगा आणि यमुना यांमधील मुलूख आणि जयपूर. जोधपूर, गोहद या या रजपूत संस्थानच्या उत्तरेकडील मुलूख आणि अहमदनगर किल्ला आणि गुजरायेंतील भडोच आणि आजंठ्याचा घाट आणि गोदावरी यांमधील मुलूख शिंद्यांनीं सोडावा. (२) मोंगल बादशहा, इंग्रज व त्याचे दोस्त, पेशवे, निजाम, गायकवाड या सर्वांवरील

हक्कसंबंध शिंद्यांनीं सोडावे. (३) शिंद्याकडून मिळालेल्या मुलखांत शिंद्याचीं आणि त्यांच्या पदरच्यांचीं इनामें असतील तीं सर्व इंग्रजांनीं चालवावीं. (४) जयपूर, जोधपूर, बुंदी, माचोडी, भरतपूर, गोहद येथील राजे आणि अंबोजी इंगळे यांकडे शिंद्यांनीं खंडणी मागूं नये किंवा त्यांना दुसरा कोणताही उपसर्ग देऊं नये. शिंद्यांच्या दरबारीं जॉन मालकम याची रेसिडेंट म्हणून नेमणूक झाली. शिंद्यांनीं यावेळीं पगारी मैत्रीच्या सर्वच अटी कबूल केल्या नाहींत. पुढें ता. २७ फेब्रु. १८०४ रोजीं शिंदे व इंग्रज यामध्यें पगारी मैत्रीचा तह घडून आला.

नवीन मिळालेल्या मुलखाची पुढें इंग्रज, निजाम आणि पेशवे यांमध्यें वाटणी करण्यांत आली. वसईच्या तहांत ठरल्याप्रमाणें पेशव्यांनीं पुरेशी फौजेची कुमक केली नाहीं. सबब त्यांच्या वाटणीला नगरचा किल्ला व भोंवतालचा थोडासा मुलूख देण्यांत आला. वर्धा नदीच्या पश्चिमेकडील आणि गाविलगड आणि नरनाळा यांच्या दक्षिणेकडील सर्व मुलूख निजामाला मिळाला. इंग्रजांनीं या युद्धांत विशेष मेहनत घेतली सबब बाकीचा सर्व प्रांत त्यांनीं आपल्या वाटणींत घेतला.

याप्रमाणें थोडेसें बाहुबळ आणि बरेंचसें बुद्धिबळ यांच्या जोरावर इंग्रजांनीं शिंदे-भोसल्यांचा पाडाव केला त्यामुळें त्यांच्या अक्कलेचें भांडवल पुष्कळच वाढलें आणि मराठी राज्यांत इंग्रज ही एक सर्वश्रेष्ठ सत्ता होऊन बसली. इंग्रजांना ही जी नवीन सत्ता प्राप्त झाली तिचा त्यांनीं शहाणपणानें सदुपयोगच केला. मराठी राज्यांत यावेळीं चहूंकडे बंडखोर मातले होते त्यांचा बीमोड करण्यांत आणि राज्यांतील असंतुष्टांना संतुष्ट करण्यांत इंग्रजांनींच विशेष पुढाकार घेतलेला दृष्टीस पडतो. यासंबंधीं माहिती—

१ कान्होजी गायकवाडाचा दंगा—गोविंदराव गायकवाडांच्या पश्चात् त्यांचा दिवाण रावजी आपाजी यानें इंग्रजांशीं पगारी मैत्रीचा तह करून आणि कान्होजी व मल्हारराव यांचा पाडाव करून वेडसर आनंदरावाच्या नांवें राज्यकारभार हातीं घेतला आणि मेजर वॉकर हा बडोद्याचा पहिला रेसिडेंट झाला वगैरे सर्व मजकूर तेराव्या भागाच्या पृ. ६९३८ यावर सांगण्यांत आला आहे. पुढें मल्हाररावाला नडियादेस आणि कान्होजीला

बडोद्यास कैदेंत ठेवण्यांत आलें. याप्रमाणें रावजीच्या द्वारें इंग्रजांनीं गायकवाडींत प्रवेश करून घेतला परंतु त्यांच्या पुढील मार्गांत वारंवार अडचणी येऊं लागल्या. गोविंदरावाचा दासीपुत्र मुरारराव आणि सनखेड्याचा मामलेदार गणपतराव यांनीं रावजीविरुद्ध पहिलें बंड केलें. इंग्रजांनीं ताबडतोब फौज पाठवून हें बंड मोडलें आणि मुरारराव आणि गणपतराव मामलेदार हे पळून धारकर पवारांच्या आश्रयास गेले. हा दंगा शमतो न शमतो तोंच आरब जमादारांनीं आपल्या पगारबाकीबद्दल खुद्द बडोद्यासच बंडाचें निशाण उभारलें. त्यांनीं आनंदरावाला कैदेंत घालून सर्व राजधानी ताब्यांत घेतली आणि कान्होजीची कैदेंतून सुटका केली. कैदेंतून सुटका होतांच कान्होजीनें नवीन फौज उभी करून दंग्यास प्रारंभ केला. याच सुमारास मल्हारराव हाही नडियादेहून पळाला आणि कान्होजीला सामील झाला. मे. वॉकर यानें आरबांची समजूत घालण्याचा पुष्कळ यत्न केला. परंतु तो सर्व फुकट जाऊन इंग्रजी फौजेला शेवटीं बडोद्यास वेढा घालावा लागला. असा हा वेढा पडतांच आरब शहरच्या तटबंदीवरून इंग्रजावर गोळ्या मारूं लागले आणि कान्होजी भोंवतीं घिरट्या घालून इंग्रजी लष्कराला त्रास देऊं लागला. शेवटीं इंग्रजांनीं शहरच्या तटबंदीला तोफांच्या भडिमारानें मोठें खिंडार पाडलें तेव्हां आरब तहाला कबूल झाले. इंग्रजांनीं आरबांना पगारबाकीबद्दल साडे सतरा लक्ष रु. द्यावे आणि आरबांनीं गुजराथेंतून निघून जावें असा उभयपक्षीं करार ठरला. या कराराप्रमाणें इंग्रजांनीं ताबडतोब आरबांकडे रकमेची भरपाई केली. नंतर कांहीं आरब इमानीपणानें गुजराथ सोडून गेले आणि कांहीं इंग्रजाकडून मिळालेली रकम खिशांत टाकून बेइमानी करून कान्होजीला मिळाले. बडोदें हातीं आल्यावर इंग्रजांनीं कान्होजीचा पाठलाग सुरू केला. इंग्रजी फौजेला हुकांड्या देत देत कान्होजी महिनाभर हिंडत होता. शेवटीं त्यानें शत्रूशीं लढाई देण्याचा निश्चय ठरविला आणि तो सावडीजवळ एका ओढ्यांत लष्करासह दबा धरून बसला. इंग्रजी फौज आटोक्यांत येतांच आरबांनीं त्यावर एकाएकी गोळ्यांचा भडिमार केला. त्यामुळें इंग्रजांची आघाडी उधळली आणि त्यांतच

ता. ६ फेब्रु. १८०३

आरबांनीं हल्ला करून कत्तलीस प्रारंभ केला त्यामुळें शेकडों इंग्रज मारले गेले. नंतर इंग्रजांच्या पिछाडीच्या फौजेनें सावर लाऊन आरबांचा हा हल्ला परतवला आणि नंतर मराठी फौजेचा मोड झाला. या पराजयानंतर कान्होजी महिनाभर गुजराथेंतच होता. नंतर तो उज्जनीस शिंद्यांच्या आश्रयाखालीं जाऊन राहिला. या बंडाचा उपशम झाल्यावर गायकवाडींत इंग्रजांच्या वर्चस्वाला यापुढें कोणीही विरोध केला नाहीं.

२ बाबा फडके वगैरे सरदारांचें बंड — शिंद्यांनी इंग्रजाशीं तह केला ही गोष्ट पुष्कळ मराठे सरदारांना आवडली नाहीं आणि ते शिंद्यापासून फुटून स्वतंत्रपणें बंडावा करूं लागले. बाबा फडके, नगरचा पूर्वींचा किल्लेदार मल्हारराव कुळकर्णी, अमृतरावांचा दिवाण हरीपंत भावे, लोखंडे, विश्वासराव घाटगे वगैरे शिंदेपक्षिय सरदार सोलापूर प्रांतीं आले आणि तेथें त्यांनीं आठ दहा हजार फौज उभी करून लुटालुटीस सुरवात केली. स. १८०३ नोव्हेंबरपासून पुढील फेब्रुवारीपर्यंत हा बंडावा असाच चालू होता. शिंद्याशीं तह झाल्यावर इंग्रजी पलटणें या बंडवाल्यांच्या पाठीस लागलीं. एक दोन महिने सख्त पाठलाग करून आणि बारंबार छापे घालून इंग्रजांनीं या बंडवाल्यांची दाणादाण केली. मल्बा कुळकर्णी, हरीपंत भावे, लोखंडे हे सरदार मोंगलाईंत पळाले. बाबा फडके मिरजेकडे येऊन पटवर्धनांच्या पाठीशीं पडले. विश्वासराव घाटगे करवीराकडे पळून जात असतां वाटेंत प्रतिनिधि व पटवर्धन यांनीं छापा घालून त्याचें सर्वस्व लुटून घेतलें. एकटा घाटगे मात्र कसा बसा जीव बचावून करवीर हद्दींत सुरक्षित जाऊन पोचला.

३ फत्तेसिंग मान्याचें बंड— मान्याची पठाणांच्या कैदेतून सुटका झाल्याचें मागच्या प्रकरणीं लिहिलेंच आहे. कैदेतून मुक्त होताच मान्यानें तीन चार हजार फौज गोळा केली आणि यशवंतराव, संभाजी, नारायणराव वगैरे माने कुटुंबाचा गोतावळा त्याच्या भोंवतीं पुनः गोळा झाला. बाबा फडके वगैरे सरदारांच्या बंडाव्यांत माने प्रथम सामील झाला. पुढें या बंडवाल्यांची पांगापांग झाल्यावर फत्तेसिंग साताराप्रांतीं आला आणि तेथें

त्याच्या आणि प्रतिनिधींच्या लढाया सुरू झाल्या. पूर्वी नाना पुरंदऱ्यानें विश्वास दाखवून मान्याचा कसा घात केला होता हें मागच्या प्रकरणीं सांगितलेंच आहे. फत्तेसिंग सातारा प्रांतीं आल्यावर त्यानें खंडेराव रास्त्यांच्या मध्यस्थीनें पेशव्यांजवळ दोन मागण्या मागितल्या. त्या अशा— ( १ ) पूर्वी कबूल केल्याप्रमाणें मला पांच हजार स्वारांचा सरंजाम द्यावा आणि मजकडून पांच हजार स्वारांसह चाकरी घ्यावी. ( २ ) नाना पुरंदऱ्यानें विश्वासघात करून माझी आई, बायको व मुलें अटकेंत ठेविलीं आहेत त्यांची तावडतोब मुटका व्हावी. आपल्या मागण्यांना

स. १८०४ एप्रिल—मे दुजोरा यावा या हेतूनें माने पुण्याच्या बाजूस शिरवळापर्यंत चालून गेला. तेथें त्यास पेशव्यांकडून उत्तर मिळालें कीं, आधीं तुम्ही सड्या स्वारीनें बिनशर्त आमच्या भेटीस यावें. नंतरच तुमच्या मागण्यांचा योग्य तो विचार होईल. तुम्ही निःशंकपणें प्रथम आमच्या भेटीस यावें. मागच्या खेपेप्रमाणें याही खेपेस पेशव्यांच्या मनांत विश्वासघात करावयाचा आहे हें ओळखून माने शिरवळाहून परत फिरला आणि रहिमतपुराकडे आला. या दंग्याचा या पुढील वृत्तांत पुढील प्रकरणीं सविस्तर देण्यांत येईल.

४ करवीरकरांचा दंगा—या दंग्याच्या पर्वणींत करवीरकरांनींही आपले हात धुवून घेण्याची संधि साधून घेतली. कर. छत्रपति हे पांच सात हजार फौजेसह प्रथम मिरजप्रांतीं आले आणि तेथें लुटालूट आणि दंगा करून त्यांनीं पटवर्धनांचें अष्ट्याचें ठाणें काबीज केलें. त्या ठाण्यांत शहाजी पांढरे सरनौबत याला दीड दोन हजार फौजेसह ठेवून नंतर छत्रपतींची स्वारी कापशीकर घोरपडे सेनापति यांच्या मुलखांत शिरली आणि तेथेंही त्यांनीं अतिशय आबाडाब केली. नंतर करवीरकर गोकाकप्रांतांतून पुढें सरकून कर्नाटकांत शिरले आणि तेथें त्यांना तल्लूरकर,

स. १८०४ जाने–जून वंटमुरीकर आणि पाच्छापूरकर मिरा देसाई हे जमीदार सामील झाले. नंतर या सर्वांनीं मिळून मनोळीस वेढा घातला. महादजी शितोळे आणि पटवर्धन यांच्या फौजा तावडतोब मनोळीच्या कुमकेस धांवल्या. तिकडून इंग्रजी पलटणेंही धार-

बाडाहून मनोळीस दाखल झालीं. इंग्रजी पलटणें जवळ येतांच करबीरकर व त्यांचे दोस्त यांची पांगापांग झाली. इंग्रजानीं तल्लूरकर व बंटमुरीकर या बंडखोर देसायांना वठणीवर आणलें. ता. २ मे रोजीं बेळगांवचे किल्लेदार सिद्धेश्वरराव बिनीवाले यांनीं मिरा देसाई पाच्छापूरकर यांशीं लढाई देऊन त्याला ठार मारलें. इकडे मिरजप्रांतीं ता. २४ मार्च रोजीं भिलवडीजवळ हरि परशराम पटवर्धन आणि शहाजी पांढरे यामध्यें मोठी लढाई झाली आणि तींत पांढरे जखमी होऊन पटवर्धनांकडे पाडाव सांपडला आणि हत्ती, घोडे, साहेबनौबत वगैरे त्याचा सर्व गोट वा गोट पटवर्धनांनीं लुटून घेतला. नंतर अष्ट्याचें ठाणेंही पुन: पटवर्धनांच्या हातीं आलें. याप्रमाणें आपल्या सर्व सोबत्यांची दुर्दशा झालेली पाहतांच करवीरकर आपल्या हद्दींत परत आले आणि स्वस्थ बसले.

५ तोतया वाघाचा दंगा:—बाघाच्या बंडाचा सविस्तर वृत्तांत आणि इंग्रजाशीं झालेल्या लढाईंत बाघ मेल्याचा मजकूर ऐ ले. संग्रहाच्या बाराव्या भागाच्या पृ. ६५४०–६७५२ यांवर सांगण्यांत आला आहे. वाघाचे जोती घोरपडे छप्परबंद आणि झोटिंग काकर हे दोन सरदार होते. त्यापैकीं घोरपडे हा पुढें करवीरकरांच्या आश्रयास गेला. झोटिंग मात्र कर्नाटकांतच गुप्तरूपें हिंडत होता. स. १८०३च्या अखेरीस एका लुच्चयानें कर्नाटकांत आपण बाघ आहों असा चहूंकडे पुकारा करून पांच सहा हजार फौज जमा केली आणि त्याला लवकरच झोटिंगही सामील झाला. सावनूर, नवलगुंद, धारवाड या प्रांतीं तोतयाचा हा दंगा चार पांच महिने चालू होता. तल्लूरकर व बंटमुरीकर यांचें पारिपत्य केल्यावर इंग्रज तोतयाच्या पाठलागावर निघाले. ता. २९ दिसेंबर रोजीं तोतयाचा मुक्काम हणमसागरास आणि इंग्रजांचा मुक्काम तल्लूरास होता. तोतयाच्या लष्कराची नक्की बातमी आणवून इंग्रज तल्लूराहून उडलिपीचे मुक्कामास गेले आणि तेथून मध्यरात्रीं कूच करून हणमसागरास जाऊन इंग्रजांनीं सकाळीं एकाएकीं तोतयाच्या लष्करावर छापा घातला. या छाप्यांत तोतयाचें सर्वच लष्कर गारद झालें. तोतया आणि झोटिंग हे मात्र बेतांतरानें जीव बचावून कुठें देशांतराला निघून गेले.

ता. ३० दिसें. १८०३

६ सुरापूरकरांचा दंगा—स. १८०३ च्या शेवटीस हा दंगा विजापूर बागलकोट प्रांतीं आणि विशेषतः रास्त्यांच्या सरंजामांत तीन चार महिने चालू होता. रास्त्यांचें निडगुंद्याचें ठाणें सुरापूरकरानें काबीज केलें आणि त्यापासून सव्वा लक्ष रुपये खंडणी वसूल केली. त्या प्रांतीं बळवंतराव रास्ते होते त्यांच्या शत्रूंशीं बरेच दिवस झटापटी चालू होत्या. शेवटीं रास्ते आणि सुरापूरकर यांमध्ये दिसेंबरांत मोठी लढाई होऊन तींत सुरापूरकरांची दाणादाण झाली आणि नंतर या बंडाचा उपशम झाला.

७ प्रतिनिधींचा दंगा—होळकरांच्या खंडणीच्या तगाद्यामुळें प्रतिनिधि पुण्याहून कऱ्हाडाकडे पळाल्याचें गेल्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. पंत हे बदफैली वर्तनाचे होते त्यामुळें त्यांच्या मातोश्री काशीताई आणि कारभारी बळवंतराव फडणीस यांनींच त्यांच्या जहागिरीचा बंदोबस्त ठेविला होता. पंतांना त्यांच्या दौलतींत कोणी विशेषसें विचारीत नव्हतें. पंतांनीं आपल्या मातोश्रींचें हें वर्चस्व झुगारून देण्याचा निश्चय ठरविला आणि दोन तीन हजार फौज जमवून दंग्यास प्रारंभ केला. पंतांची ताई तेलीण नांवाची एक राख होती हें प्रसिद्धच आहे. पंतांना सुंदर स्त्रियांचा संग्रह करण्याचा मोठाच शोक होता. होळकरांच्या दंग्यामुळें जिवी कानी नांवाची नायकीण पुण्याहून निघून वाईस येऊन राहिली होती. तिच्या ताब्यांत एक सुंदर पोरगी आहे अशी पंतांना बातमी लागली. सबब त्यांनीं स. १८०३ च्या आगष्टांत एकाएकीं वाईवर धाड घातली आणि क्षेत्रस्थ ब्राह्मणांस मारझोड करून हजारों रुपये उकळले आणि नंतर जिवी कानीला दहा हजार रुपये देऊन पंतांनीं तिजपासून ती पोरगी विकत घेतली. असा हा पराक्रम केल्यावर पंत मसूरास आले आणि तेथें त्यांनीं आणखी फौज पायदळ जमा करण्याचा क्रम धरला. या दंग्याचा पुढील वृत्तांत पुढील पंचराव्या भागांत क्रमशः देण्यांत येईल.

८ करवीरकर व वाडीकर सावंत यांचा तंटा— वाडीकर खेम सावंत यांची स्त्री लक्ष्मीबाई ही महादजी शिंद्याची भाची होती. तिनें शिंद्यांच्या वशिल्यानें दिल्लीच्या बादशहापासून मोर्चेल वगैरे राजचिन्हें बाळगण्याचा मान

आपल्या नवऱ्याकरितां मिळविला. वाडीकर सावंत ही राजचिन्हें वापरूं लागलेले पाहून करवीरकर छत्रपतींचें पित्त खवळलें आणि त्यांच्या दरवर्षी वाडीवर स्वाऱ्या होऊं लागल्या. स. १७८५ पासून पुढें तीस वर्षें हा तंटा असाच चालू होता. मध्यंतरीं खेम सावंत मृत्यु पावला आणि त्यांच्या पश्चात् त्यांचा एकुलता एक मुलगा सोमसावंत --तिसरी राणी देवीबाई इज-पासून झालेला-- हा गादीवर बसला. तथापि सर्व राज्यकारभार वडील राणी लक्ष्मीबाई इच्याच तंत्रानें चालू होता. पुढें राण्याराण्यांत चुरस वाढून लक्ष्मीबाईनें सोमसावंताचा खून करविला. यासंबंधीं पुण्याच्या बातमीपत्रांत पुढील उल्लेख आहे. ( १५ मे. ) " सावंताचे वाडींत खेमसावंत याच्या स्त्रीनें सोमसावंत दगा करून मारल्याचें लिहिलें तें कळलें. सोमसावंत याचा कुटुंबघात झाल्याचें येथें कळोन श्रीमंतास व मुत्सद्दी व सर्वत्रास वाईट वाटलें. पुढें त्या संस्थानची काय गत होणें ती होऊं ! " या तंट्यासंबंधीं पुढील मजकूर पुढें यथाप्रसंगीं सांगण्यांत येईल.

९ किरकोळ दंगे—कृष्णराव व गोपाळराव देशपांडे कारडगीर यांचें बापू गोखल्याशीं बिघुट वाढून ते दोन हजार फौजेसह सावनूरप्रांतांत दंगा करूं लागले. ता. ६ जाने. १८०४ रोजीं इंग्रजांनीं हावनूर मुक्कामीं देशपांड्याच्या लष्करावर छापा घातला आणि सर्व लष्कराची दाणादाण करून देशपांडे बंधूंना कैदेंत घातलें. कोन्हेरगौडा पाटील कमतनूरकर आणि येलबर्ग्याचा मोंगलांचा मामलेदार यांमध्यें असाच तंटा वाढला होता आणि मामलेदारानें पाटलाची बायकामुलें पकडून अटकेंत ठेविलीं होतीं आणि पाटील फौज जमवून मोंगलाईत दंगा करीत फिरत होता. ता. ५ जाने. १८०४ रोजीं इंग्रजांनीं जालेहाळांत पाटलाच्या लष्करावर छापा घातला आणि त्याला पकडून फांसावर चढविलें.

१० पुरंदरकरांचा दंगा—पुरंदरचा किल्लेदार बापू साने यानें अमृत-राव व होळकर यांच्या वतीनें मोठें बंड केलें आणि हजार दोन हजार बेरड रामोशी जमवून पुण्याभोंवतीं लुटालूट सुरू केली आणि पुण्याहून दक्षिणेकडे आणि पश्चिमेकडे जाण्याचे सर्व मार्ग बंद करून टाकले. स. १८०३

आगष्टपासून पुढें आठ महिने हा दंगा असाच चालू होता. शिप्यांशीं तह झाल्यावर जन. वेलस्ली पुण्यास परत आला आणि त्याच्या मध्यस्थीवरून सान्यानें किल्ला बिनशर्त पेशव्यांच्या हवालीं केला आणि बापू साने कुटुंबसुद्धां आश्रयासाठीं पुण्यास इंग्रजी लष्करांत येऊन राहिला.

११ लोहोगडकरी यांचा दंगा—लोहोगडचा किल्लेदार धोंडोपंत नित्पुरे हा नाना फडनवीसांचा कट्टा अनुयायी होता आणि त्यानें हा किल्ला बळावून स. १८०० सालापासून पेशव्यांविरुद्ध बंड उभारलें होतें. नानांची अल्पवयी स्त्री बयाबाई हिला रायगडावर पाठविण्याचा पेशव्यांचा प्रयत्न कसा साधला नाहीं हा मजकूर या पुस्तकाच्या ७४२५ पृष्ठावर आला आहे. हडपसरच्या लढाईनंतर पेशवे घाईघाईनें कोंकणांत पळाले त्यामुळें त्यांना नानांच्या स्त्रीला बरोबर नेण्याचें भानच राहिलें नाहीं. पुढें होळकर पुण्यांत आल्यावर त्यानें नानांच्या स्त्रीला बहुत सन्मानानें वागविलें आणि धोंडोपंत लोहोगडाहून येऊन उघडपणें होळकराच्या मसलतींत मिळाला. होळकराचा तळ पुण्याहून हालतांच धोंडोपंत नानांच्या स्त्रीला बरोबर घेऊन पुनः लोहोगडावर गेला आणि धामधूम करूं लागला. पुढें जन. वेलस्लीनें मध्यस्थी करून पेशव्यांनीं नानांच्या स्त्रीला दरसाल बारा हजार रुपये पेनशन द्यावें असा ठराव केला. नंतर ता. ५ एप्रिल १८०४ रोजीं धोंडोपंतानें इंग्रजांच्या मध्यस्थीनें किल्ला पेशव्यांच्या हवालीं केला आणि नानांची स्त्री आणि नित्पुरे वगैरे मंडळी पेशवाई बुडेपर्यंत पनवेलीस इंग्रजांच्या आश्रयाखालीं राहिलीं.

१२ दादा फडनवीस—मोरोबादादा मिरज मुक्कामीं इंग्रजांच्या आश्रयास गेल्याचें मागच्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. जन. वेलस्लीबरोबर दादा पुण्यास आले आणि तेथें ता. २९ आगष्ट रोजीं त्यांचें देहावसान झालें. पुढें आठवे दिवशीं त्यांचे चिरंजीव धाकटे नाना हेही आंबेगांव येथें मृत्यु पावले. होळकराच्या बंडांत सामील झाल्यामुळें पेशव्यांचा दादा फडनवीसांवर मनस्वी राग होता आणि त्यांनीं त्यांची मालमत्ता जप्तींत टाकली होती. पुढें जन. वेलस्लीच्या मध्यस्थीवरून पेशव्यांनीं दादा फडनवीसांचा गुन्हा माफ केला आणि त्यांच्या इस्टेटीवरील जप्ती खुली केली. पुढें दादांची

स्त्री आल्या एकुलत्या एक नातवाला बरोबर घेऊन इंग्रजांच्या आश्रयाखालीं आंबेगांवाहून पुण्यास येऊन राहिली. नाना फडनवीस आणि होळकर प्रकरण यामुळें पेशव्यांची जुने मुत्सद्दी व सावकार यांवर भयंकर वक्रदृष्टि झाली होती. परंतु त्या सर्वांना याच सुमारास इंग्रजांच्या मध्यस्थीनें पेशव्यांकडून जाहीरपणें माफी देण्यांत आली.

असो. आतांपर्यंत बंडें व दंगे यांचा त्रोटक वृत्तांत वर दिला आहे त्यावरून मराठी राज्यांत शांतता आणि सुव्यवस्था स्थापून आणि असंतुष्टांना संतुष्ट करून लोकमत आपल्याला अनुकूल करून घेण्याची इंग्रजानीं एकही संधि फुकट दवडली नाहीं असें वाचकांस दिसून येईल. याप्रमाणें लूट आणि लढाया यामुळें आपल्या राज्याचा विध्वंस चालू असतां पेशव्यांचा राज्यकारभार मात्र पुण्यांत बाह्यतः आबादी आबाद आणि दिलखूष चालला होता. यासंबंधीं थोडे उतारे येथें देतों—

( १७ सपटें. ) "वसईहून ब्राह्मणाच्या पोरी दोघी बहुत खूबसुर्त्या व लावण्या बहुत चांगल्या गातात त्या आणविल्या आहेत. बहुत परतपोशीनें ठेवून नित्य दिवसा रात्रीं आपण व बळवंतराव नागनाथ व देवीदास सारंगीवाला याप्रमाणें बसोन लावण्या ऐकत असतात."

( १७ सपटें ) "मुधा बेरड याचा भाऊ हैबती सातान्यास रा. नाना पुरंदरे याजपाशीं होता त्यास पुरंदरे यांणीं हैबतीस पुण्यास आणोन श्रीमंतांची भेट करोन लाख रु. नजर देवबून सरकारांतून पागेचीं वस्त्रें हैबतीस देवबून पुरंदरे यांणीं आपणाजवळ ठेविला आहे."

हैबती हा एक त्यावेळीं सातारा प्रांतीं नामांकित दरवडेखोर होता. पेशवे सरकारांतून एका दरवडेखोरास सरदारचीं वस्त्रें दिल्याचें हें पहिलेंच उदाहरण होय!

( २६ सपटेंबर ) "श्रीमंतांस गुदस्तांपासोन बदाचा उपद्रव जाला त्यामुळें हल्लीं प्रकृत ठीक नाहीं. प्रतिनिधींची स्वारी वांईत येऊन देशमुख देशपांडे व सनदे इनामदार यांजपासोन आठ हजार रुपये घेऊन किन्हईस गेले."

( १३ आक्टोबर ) "रा. नारोपंत चक्रदेव व आबाजी त्रिंबक व

लक्ष्मणपंत चक्रदेव यांजवर कांहीं एक फितुराचा आरोप ठेवून कैद करोन सरकारवाड्यांत ठेविले आहेत. आबाजी लिंबक यांस कमच्याचा मार दिला आणि आळंकार घालून ठेविले आहेत. दरबार व मसलत तूर्त नदीपार इंग्रजांचे घरीं आहे. !"

( ११ नोव्हेंबर ) " मोरोबा मेन्या शागीर्द यास पालखीचीं वस्त्रें दिलीं. वसईस स्वारी गेली तेव्हां वाटेंत स्वयंपाक करून भोजनास घातलें सबब चौकीदार होता तो शागीर्दीस ठेवला. हल्लीं पालखी दिली. त्यावर मर्जी सुप्रसन्न आहे. ( श्रीमंतांचे ) सांप्रत जवाहिरी दागिने अंगावर असतात. सदाशिव माणकेश्वर गुदस्तां हैदराबादेस गेले तेव्हां तसलमातीस जवाहीर दिलें तें महारानिल्हेस बक्षीस दिलें "

( ११ नोव्हेंबर ) " छ० २० रबिलावलीं मंगळवारीं ( १२ जुलै. ) आतषबाजी पर्वतीस जाली. अस्तमानीं श्रीमंतांची स्वारी पर्वतीस गेली. तेथें संध्या करोन भोजन केलें. उभयतां सौ० बायाही गेल्या होत्या. दहा घटका रात्रीं दारू उडावयास प्रारंभ जाला. सारे मुत्सद्दी गेले होते. नवीन पदार्थ सालमजकुरीं दृष्टीस दारूचा डेरा राहुटीसारखा दृष्टीस पडला. मागेंही दारू लोकांनीं पाहिली होती. डेरा करोन दग्ध जाहला नव्हता तो यंदा पाहिला असें म्हणतात. "

( २० नोव्हेंबर ) " येथील वर्तमान तर नवीन मुत्सद्दीमंडळी यांजकडेस श्रीमंतांस मेजवानी होत आहे. श्रीमंतांची मर्जी अलिकडेत बहुत प्रसन्न व खुषीमध्यें आहे. वरकड सरकारांत वाड्यांत दरबार अथवा मसलत कांहीं एक नाहीं. नित्य स्वारी कोथरूड व पाषाण वगैरे बागांत जात असती. "

( १ दिसेंबर ) " जळवासी ( इंग्रज ) सर्वव्यात जाले. येथील स्थळ मजबूत गेलें. पुढें ईश्वर सत्ता प्रमाण ! एकाचा ( होळकराचा ) भ्रम राहिला आहे. काय घडेल न कळे. "

( ३१ जानेवारी ) " सातारियाचा बंदोबस्त बैजनाथभट मामा याजकडे सांगितला. सरकार वाड्यांतील झाडझूड व चित्रें नवीं याप्रमाणें चाललें आहे. श्रीमंत आपलें लग्न करणार हाही बेत दिसतो."

( २२ फेब्रु. ) " सातारियाचा बंदोबस्त बैजनाथभट मामा यास सांगोन किल्ल्यावर महाराज व उभयतां धनीण व महाराजांचे पुत्र व कन्या याप्रमाणें किल्ल्यावर ठेवून बाकी कुल राजमंडळ झाडून हुजरेसुद्धां व चाकरीच्या बायकासुद्धां किल्ल्याखालीं उतरून सर्वांस सांगितलें जे, तुमचे चित्तास येईल तिकडे पोट भरावयास जाणें. आणि राजमंडळाच्या लोकांस जमिनी व गांव व रोजमरे व अडीअडचणी होत्या त्या कुल चाकरीच्या बायकासुद्धां जप्त करविल्या. याजमुळें महाराज तीन चार दिवस महालांतून बाहेर निघाले नाहींत व तख्तासुद्धां झाडून कचेरी आदिकरून तीन चार दिवस दिवा लागला नाहीं. श्रीमंतांनीं बाईहून आपणाजवळील खिजमतगार पांच असामी महाराजांचे चाकरीस पाठविले आहेत. याप्रमाणें संस्थानचा बंदोबस्त जाला. "

अमृतरावाचा मुलगा विनायकराव यास पेशवे पदाचीं वस्त्रें दिल्याबद्दल सातारकर छत्रपतींवर पेशव्यांनीं हा गहजब चालाविला होता.

( २३ मे. ) " श्रीमंतांनीं अलीकडे कल्ले राखले आहेत. शहरांत पेशजीं चोऱ्या जाल्या ते चोर सांपडले. त्यांची चवकशी होतां सरकारचे खिजमतगार यांत आहेत त्यांस धरलें. त्यांत मुरारजी येवल्याचा एक भाऊ आहे व विठोजी नाईक याजकडीलही सांपडले."

पेशव्यांच्या या राज्यकारभाराच्या उतान्यांबरोबरच या अवधींत ( सन १८०३ जुलै. ते १८०४ जून. ) ईश्वरी क्षोभ घडून आले त्यासंबंधीं थोडेसे उतारे येथें देतों—

( २५ नोव्हें. ) " श्रीकाशीमध्यें आश्विन शु. चतुर्दशीस (३० सप्टें.) दोन तारे थोर पडले. चार घटका उजेड पडला. पडल्येसमयीं वीज कडाडल्ये तैसा शब्द मोठा जाला. भूमिकंप मोठा जाला. तेणेंकरूण दोन तीनशें घरें पडलीं. श्रीभागीरथीस खळखळ बहुत चार घटका सुटली. पर्जन्य बहुत दीड दिवस लागला. परंतु गंगेस पाणी नाहीं. बिंदुमाधवाजवळील मोहल्यांतील दोनशेपर्यंत घरें जळालीं."

( ६ दिसें. ) श्रीकाशीमध्यें भाद्र. शु. १० (२७ आगष्ट) भूमिकंप होऊन श्रीबिंदुमाधवाच्या घाटच्या मोहल्यास आग लागोन सारा महल्ला

जळोन श्रीगंगेचें उदक पात्रामध्यें मोठ्यानें खळखळोन दोन दोन माले उंची श्रीगंगेचें उदक तीन घटकापर्यंत उडत होतें आणि पाण्यांतून आवाज मोठमोठे होऊन रात्रौ सहस्रावधि नक्षत्रें पतन जालीं. याप्रमाणें वर्तमान कार्तिकमासीं आलें."

( ७ दिसें. ) " श्री काशीमध्यें भाद्र. शु. १४ ( ३१ आगष्ट ) भरमध्यानीं धरणीकंप जाला, एक घटका घरें माडया दणाण जाला. माणसें निजले जाग्यास कुशीस होतीं तीं उपडीं कोणी उताणीं. ही गत माणसांची. गुरें दाव्यास बांधलीं तीं खालवर जालीं. कवलें घरावरील पडलीं. कांहीं घरें माड्या मोडून पडलीं. हें होत आहे तों दाण्याचा गंज म्हणोन पेठ आहे त्यास आग लागोन जळाली. दोन तारे त्याच समयीं पडले. त्याचा उजेड भरचांदण्यासारखा पाव घटका पडला. गंगेच्या पाण्यास खळखळाट जाला. याप्रमाणें श्रीकाशी, प्रयाग व गया मिळोन तीन जागीं एक वेळींच याअन्वयें जालें. "

( १६ दिसें. ) " दोन तारे ( ३१ आगष्ट ) सहा घटका रात्रीसुमारें दहा दहा पळाचे अवकाशें दोन मोठे पडले. दोहींचाही उजेड क्षेत्राबर अवघ्या अर्ध घटकापर्यंत चांदण्यासारखा पडला. भूमि कंपित जाली तेणेंकरून घरें कांहीं पडलीं व कांहीं जळालीं. मनुष्यें निजलीं बिछान्यावर होतीं तीं गडबडत बाहेर गेलीं. उतरंडी पडल्या. गुरें गोठ्यांत बांधलीं तीं दावीं वरतीं होऊन कांहीं सुटोन चौकांत आलीं, कांहींस गळ्यास फास लागला. मनुष्यांचीं अवसानें गेलीं. घरें सोडून अंगणात बाहेर आलीं. तेव्हांच दाण्याचे गंजास आग लागोन दोनचारशें घरें बाजारांतील जळालीं. ते समयीं गंगा खळबळली. सर्वांच्या मतें आजच कल्पांत कीं काय असें भासलें. याप्रों श्रीकाशीपासून प्रयाग गया तीनही क्षेत्रीं सवाशे दीडशे कोसपर्यंत भूमिकंप जाला. तिरस्थळी कंपित जाली."

( १७ दिसें. ) मार्ग. शु. १३ ( २७ नोव्हें. ) शामलाकडील जंजिऱ्याचे किल्ल्यांत अकस्मात् आग लागोन जंगी सरंजाम व कुल ( सर्व ) इमारत आदिकरोन शेदोनशें मनुष्य जळालें. त्यामध्यें शामलाचे प्रांतांतील

ब्राम्हण कुटुंबसुद्धां धरून खंडाकरितां ठेविले होते तेही कुटुंबसुद्धां जळून मेले."

( २४ एप्रिल. ) " श्रीनगर श्रीविष्णूचें स्थान श्रीबद्रीकेदाराचे संनिध चार पांच कोसांवर आहे. त्या शहरामध्यें व आसपास धरणीकंप जाहला. भूमि दुभांगली. हजार पांचशें हात घरें कोसळलीं व पर्वतही कांहीं कंपामुळें कोसळले. कांहीं शहरामध्यें घरें भूमि दबली त्यामध्यें घरें बसलीं गेलीं.

असो. वसईचा तह उलथून पाडण्याकरितां शिंदे-भोसल्यानीं कंबरा बांधल्या होत्या त्याचें पर्यवसान काय झालें याचें आतांपर्यंत विवेचन करण्यांत आलें आहे. या युद्धांत इंग्रजांनीं शिंदे भोसल्यांचा पाडाव केला. तथापि त्यांचा एक शत्रू अजून शिल्लक होताच. तो शत्रू म्हणजे यशवंतराव होळकर हा होय. या युद्धांत शिंद्याचा जय झाला तर आपल्या जीविताकरितां आपणास शिंद्यांशीं लढावें लागणार-इंग्रजांचा जय झाला तर मराठी राज्याच्या अब्रूसाठीं आपणास इंग्रजाशीं लढावें लागणार-दोघेही आपणास शत्रुस्थानींच आहेत सबब आपण या युद्धांत अगदीं तटस्थ रहावयाचें असा होळकरानें निश्चय केल्याचें गेल्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. शिंद्याचा पराजय होऊं लागल्याबरोबर होळकरानें इंग्रजाशीं लढण्याची तयारी चालविली. पेशवे होळकराला सामान्य बंडखोर समजत होते हें आतांपर्यंत सांगण्यांत आलेंच आहे. आपल्या उद्योगाला राजमान्यता दिसावी या उद्देशानें होळकरानें आतां दिल्लीच्या बादशहाकडे संधान बांधलें आणि त्याजकडून ' महाराजाधिराज राजेश्वर अलिजहांबहादर ' असा शिंद्यापेक्षां जास्त भपकेबाज किताब मिळविला. इंग्रजांशीं होणाऱ्या युद्धाची आगाऊ सूचना म्हणून होळकरानें या सुमारास पेशवे व दक्षिणेंतील मोठमोठे सरदार यांस पत्रें पाठविलीं त्यांवर ' श्री लक्ष्मीकांत शहानशहा महंमदशहा गाजी फिदवी खासूल खास महाराजाधिराजराजेश्वर यशवंतराव होळकर अलिजहांबहादर ' असा शिक्का आढळतो. होळकराच्या यापुढील उद्योगाची माहिती पुढील ' इंग्रजांचें होळकराशीं युद्ध ' या प्रकरणीं सविस्तर देण्यांत येईल.

---

नं. ६६७२ श्री. (श्रावण आगष्ट.)

विज्ञापना. इंग्रजानीं मांबवडें येथें तीन चार बातेऱ्या बांधिल्या. पुढें पुण्यासमोबतें बांधाव्या हा मनसबा होता परंतु तूर्त बांधो नये म्हणोन सरकारची आज्ञा जाली त्याजवरून बंदी आहे. लोहगडनजीक तोफा व गरनाळा व दोनशे लोक येऊन मुक्काम केला आहे. म्हणोन पेशजीं लिहिलें होतें त्यास ते लोक पुण्यास आले. कर्नाकटांतून कांहीं खजिना काटकी लोक घेऊन आले तेही परवाचे दिवशीं येऊन पोंचले. लोक सात आठशे होते. फिरोन माघारे जाणार. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६६७३ श्रीशंकर प्रसन्न. (श्रावण शु॥ १३–१ आगष्ट.)

छ० १२ रबिलाखर. श्रावण. सन्न अर्बा मय्यातैन.

राजश्री गंगाधरराबजी स्वामीचे सेवेशीं विनंती उपरी. करवीरास सर्जेराव घाटगे आले आहेत. ते कांहीं जमेत करितात म्हणोन वर्तमान बाजारीं ऐकिलें. त्यास प्रस्तुत कोठें आहेत, पुढें काय करणार येविशीं आपल्याकडे बातमी आली असल्यास लिहावें. त्यांची हल्लीं जमेत करावयाचें कारण निपाणीकर यांस सरलष्करचीं वस्त्रें होऊन सरंजाम लाऊन दिल्हा आहे. तो अंमल बसावयाकरितां येणार अशी बंदता आली आहे. रवाना छ १२ रबिलाखर कृपा लोभ करावा हे विनंति.

---

नं. ६६७४ (श्रावण व. ५ – ७ आग.)

उतारा—पत्र धोंडो बापूजी जोशी यांचें पुण्याहून मिरजेस.

"कागद गड्या जुन्नरी व दौलताबदी मिळतात कशा याचा शोध लिहिणेविशीं आज्ञा. त्यास जुन्नरी दर तनिपासून पावणेचारपर्यंत गड्या मिळतात. दौलताबादीचा भरणा विशेष नाहीं. परंतु मिळतात. हल्लीं लुगडीं हिरवी दोन व खण हिरवे मुगे जरीकाठी दोन एकूण ६.

---

१ चिठी माधवराव रास्त्यांची वाईहून मिरजेस.

२०५ लुगडीं हिरवी मुगी जरीकाठी २
१०० प्रत १ एकूण रुपये.
१०५ प्रत १ एकूण रुपये.

२०५
९॥ खण पुणेरीपैकीं २ दर ४॥। प्रमाणें.
।। मेणकापड रुमाल १.

२१४॥।.
एकूण दोनशे पावणेपंधरा रुपयांचीं सनगें."

नं. ६६७५ (७ आगष्ट.)

पै॥ छ० २४ रबिलाखर सन आर्बा.

उतारा—पत्र घोंडो बापूजी जोशी याचें पुण्याहून मिरजेस श्रावण व० ५ चें.

"शिंदे अलिजाबहादर भोंसले सेनासाहेब सुभा उभयतां आजिंठ्याचे घाटाखालींच आहेत. होळकर पलीकडे वीस कोशांवर आहेत. राजश्री खंडेराव मल्हार होळकर शिंदे यांजकडून भोसले यांचे विद्यमानें यशवंतराव होळकर यांजकडे गेले याजप्रो बर्तमान आहे. राजश्री बापू गोखले नगरापलीकडे चार कोशांवर आहेत. तिकडे कोळी व भिल्ल यांचा उपद्रव भारी याजकरितां त्यांचे पारिपत्यास गोखले जाणार म्हणोन बर्तमान आहे. इंग्रजांचीं पलटणें नगराजवळ आहेत.

नं. ६६७६ श्री. (८ आगष्ट)

छ० २४ रबिलाखर श्रावणमास सन आर्बा मय्यातैन.

सेवेशीं घोंडो बापूजी जोशी त्रिकाळ चरणावरी मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत श्रावण वद्य ६ दोन प्रहरपावेतों बाळकाचें बर्तमान क्षेम असे. विशेष. इंग्रजांचीं पलटणें नगर किल्ल्यानजीक आहेत

म्हणोन अलाहिदा पत्रीं लिहिलें. त्यास आज प्रातःकाळपासून दोन प्रहरपर्यंत वर्तमान कीं इंग्रज पलटणसुद्धां किल्ल्यानजीक फऱ्याबाग आहे त्या बागांत जाऊन उतरला. जमावानिशीं किल्ल्यास मोर्चे लावणार याजप्रमाणें दाट बोलवा आहे. औरंगाबादेस पलटणें नबाबाकडील समागमें सख्त रुद्र आहेत. त्या पलटणांची व गोपाळराव भाऊ शिंदे याजकडील कही कहीची कटकट होऊन शेपन्नास घोडे पलटणाकडील त्यांणीं नेले याजप्रमाणें बोलतात. वडिलांस कळावें. पक्के समजल्यावर मागाहून लिहितों. बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६६७७ [श्रावण व. ७-९ आग.]

उतारा—पत्र धोंडो बापूजी जोशी यांचें पुण्याहून मिरजेस.

“ भोसले याजपाशीं चाळीस हजार स्वार व तीन कंपू व शिंदेबहादुर याजपाशीं तीस पसतीस हजार स्वार व तीन कंपू व होळकर याजपाशीं पाऊण लाख स्वार व सहा कंपू व फडके याजपाशीं पांच सात हजार स्वार आहेत. नबाब बंदेगानअली यांची तबियत बहुत होशार आहे. इकडील सर्वांचा विचार एक आहे.”

---

नं. ६६७८ श्रीगणपति. (श्रावण व० ७–९ आगष्ट)

छ० २४ रबिलाखर सन आर्बा मय्यातैन. श्रावण व॥ शनिवार.

अपत्यें रामचंद्राचे दोनीं कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ २० रबिलाखरपर्यंत वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असे. विशेष. इंग्रजांचा मुक्काम नगराजवळ वाळकीवर आहे. काही फरा बाग किल्ल्याजवळ आहे तेथें आले. आंतील लोकांची व त्यांची झटपट जाहाली. मागें सरून राहिले. मोर्चे यांचे सामानाची तयारी जाहाली आहे. मोर्चे लावणार. कालपासून शहरांत मोर्चे लावले असें बोलतात. म्हणास श्रीमंत वाईस जाणार अशी कालपासून बोलवा निघाली आहे. वाईस प्रतिनिधींनीं कांहीं उपद्रव केला आहे, मग जातात किंवा नाहीं पहावें. भोसले याचा मुक्काम राहुरीवर आहे. आप्पा देसाई इंग्रजाजवळ आहे.

श्रीमंत राजश्री अमृतरावसाहेब यांजकडील कांहीं सरंजाम नाशीक प्रांतीं लुटालूट करीत आहेत. त्यांचे पारिपत्यास गोखले व देसाई यांस पत्रें गेलीं आहेत. इंग्रज उभयतांस निरोप देत नाहींत. इंग्रजाजवळ अमृतराव साहेब कडील प्रभाकरपंत म्हणोन कारकून आहेत. शिंदे याजकडील कांहीं फौज राजश्री गोपाळराव चिटणीस घेऊन गंगेपलीकडे आले आहेत. मोंगलाची फौज व इंग्रजांचीं पलटणें इष्टवीसन सरदार असे आपले सरदेस आहेत. चिटणीसास व त्यास अंतर थोडेंच आहे. उभयतांची कहींवर खटपट एक दोन वेळां जाहली, व इंग्रजाचीं पलटणेंही एके दिवशीं छापा घालावयास गेलीं. तों वाट चुकलीं. सूर्योदय जाहाला त्यास ही बातमी कळून ते आले. उभयतांची लढाई कांहीं जाहाली, म्हणोन आवाई आहे. शिंदे व भोसले आजिंठ्याचे घाटाखालीं आहेत. होळकराचा मूल येशवंतराव होळकर याचे हवालीं जाहाला. शिंदे होळकर व भोसले एक जाहाले. इंग्रजांस राज्यांतून बाहेर काढावें हा इरादा आहे. इंग्रजाचें व तिघांचें लागलें. याउपरी कोणत्या थरास जाईल पाहावें. आम्हांस इंग्रजाकडे जाणेविषयीं ताकीद होती. आम्ही जात नाहीं म्हणोन स्पष्ट सांगितलें आहे. पोतनिशीचा दरक पोतनिसांकडून काढून सरकारांतून राजश्री फडके याजकडे सांगितला आहे. श्रीमंतास दोन दिवस ज्वरांश झाला आहे. पडसें खोकला इतक्यांतच आहे. श्रीमंत सौ॥ काकूसाहेब ... ... यांस फार समाधान नाहीं. क्षयाची भावना म्हणतात. राजश्री बाळकृष्णपंत लागू याजकडे सावनूर तालुका शिवायकरून बाकी सरकारी महाल कर्नाटक प्रांतीं आहेत, त्यांचा सुभा सांगितला. सनदा जाहल्या आहेत. त्याचीं ठाणीं बसवून देणेंविषयीं इंग्रजांस ताकीद जाली आहे. व सावनूर तालुका इंग्रजांस दिल्हा, त्याच्याही सनदांची परवानगी जाहली आहे. नानाप्रकारें वर्तमानें आहेत. आम्हास निरोप होत नाहीं असें दिवस आले यांत तसेंच येतां नये. अशा फेऱ्यांत पडलों आहें! ईश्वरकृपा वडिलांचा आशीर्वाद आहे, कांहीं चिंता नाहीं. बहुत काय लिहिणें. विदित होय हे विज्ञापना.

नं. ६६७९ ( श्रावण व. ११ –१३ आगष्ट. )

उतारा—पत्र धोंडो बापूजींचें पुण्याहून मिरजेस.

" श्रीमंत राजश्री रामचंद्रपंतआपा यांस सरकारांत मेजवानी होऊन एक रात्र सरकारवाड्यांत बोलण्याकरितां राहून प्रातःकाळीं निरोप घेऊन कात्रजेस आले. "

---

नं. ६६८० श्री. (श्रावण व. ११–१३ आगष्ट)

पै॥ छ० २८ रबिलाखर. बुधवार. श्रावणमास. आर्बा मय्यातैन.

सेवेशीं सा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २४ रबि॰ाखरपावेतों स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंतांची स्वारी वाईहून पुण्यास गेल्यानंतर श्री॥ राजश्री पंतप्रतिनिधींची स्वारी सातशें आरब व पाचशें गारद व चार पांचशें स्वार याप्रमाणें श्रावण शु॥ ९ वाईंत येऊन शिबाराची खरादी करून देशमुख व देशपांडे व इनामदार व सरंजामी याजपासून आठ हजार रुपये घेऊन रास्ते यांच्या वाड्यांत व श्री॥ राजश्री पंतराजाज्ञा व खंड दीक्षित यांच्या घरीं मेजवानी घेऊन व॥ ६ कूच करून किनईस गेले. तेथें एक रात्र राहून पुन्हां व॥ ७ कूच करून पंचवीस स्वारांनिशीं वाईस चार घटका रात्रीस स्वारी आली. याचें कारण तरी पुण्यांतील जिवी कानी कसबीण दंग्यामुळें आपला ताफा दोन चार पोरी घेऊन वाईस आली आहे. त्यास तिच्या ताफ्यांतील एक पोरगी बमुरती व गाणार आहे ऐं पंतास समजलें त्याजवरून खासा स्वारी येऊन हजार रुपये जिवीस देऊन पोरगी घेऊन आजच कूच करून किनईस माघारें गेले. लौकिकांत आणले जे, कमलगड लढतो आहे याचे बंदोबस्तास स्वारी आली ऐसी वदंता करून दोन तीनशें लोक कमलगडास जास्ती पाठविले. याप्रमाणें करून स्वारी माघारी गेली. प्रतिनिधीकडील कारभारीमंडळ स्वारीबरोबर वाईंत आलें होतें त्यासी रहिमतपूरप्रकरणीं आम्ही बोललों त्यास त्यांचें म्हणणें जे, फत्तेसिंग माने हे आमचे हरामखोर, त्यांचा कारभार रहिमतपूरकर कमाविसदार यांणीं करून वांई देश व सातारसुभा व कऱ्हाडप्रांत याचा खंडणीचा ऐवज बाळाजी महादेव याजकडेस जमा आहे

व कै॥ आबा चिटणीस व कै॥ भाऊसाहेब व माधवराव पिंगळे वगैरे यांज-कडेस इनाम व सरंजाम गांव होते ते माने यांणीं जप्त करून त्याची कमा-विशी बाळाजी महादेव यास माने यांणीं सांगितली होती व माने यांचें खासगीचें कामकाज बागा व वाडा व विहीर व देवालय वगैरे कामकाजें सांगितलीं होतीं व आमचा कराडचा वाडा माने यांणीं लुटला तेव्हां बाळाजी महादेव यास माने यांणीं बोलावून नेऊन चीजवस्त वगैरे कराडांतील स्वाधीन केली आहे. त्यास आम्ही करणें तें मार्गानेंच केलें आहे. पुढें रहिमतपूरचे माने व कुळकर्णी व कमावीसदार यांचे व मान्याकडे चाकरीस गेले असतील त्यांचें पारिपत्य करूं याप्रमाणें बोलणें आहे. व मिरजेंत आमचा ऐवज अटकावून घेतला याचें कारण काय? आमच्या हातचा दस्तऐवज कोणता आहे तो काढावा अथवा आम्हास कळवावें हें न करतां आमचा ऐवज अटकावून घेतला. त्यास आम्हाकडून गैरमार्गाचें होणार नाहीं. राजश्री सदाशिवपंत मनोळीकर आल्यानंतर परस्परें जाबसाल ठर-ण्यांत येतील म्हणून बोलले. आम्हीं उत्तर केलें जें, तुमचे व मिरजकरांचे प्राचीन घरोबे त्यांत ऐसें असो नये. त्यांचे व तुमचे महाल शेजारीं आहेत, तेही मोबदला करतील याजकारितां परस्परें समेटून घ्यावें हें चांगलें. त्यांचें म्हणणें जे, मिरजकराकडील कारकून मान्याच्या कामकाजांत आला तेव्हां मिरजकरांस समजून आला असेल व माने यांची शिल्लक लाख रुपयेपर्यंत नक्त व चीजवस्त वगैरे रहिमतपूरकर कमावीसदार याजपाशीं आहे ते आम्ही घेऊं म्हणोन बोलतात. याप्रमाणें त्याकडील मजकूर बोलण्यांत येत आहे. आढळलें वर्तमान तें सेवेशीं लिहिलें आहे. व श्री॥ राजश्री चिंतामणराव-आपा यांणीं सेवेशीं रहिमतपूरप्रकरणीं विनंती केलीच असेल. सारांश कमावीसदार याजकडेस मान्याकडील मुद्दे आहेत म्हणोन बोलण्यांत येतें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६६८१ श्री. (श्रावण व. ११–१३ आगष्ट.)

पै॥ छ. २८ रविलाखर आवा मय्यातेन.

सेवेशीं सा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २४ रविलाखरपावेतों

स्वामींचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री सिद्धेश्वरराव विनीवाले याजकडील खासगत जातीचा व पागेचा व पथकाचा सरंजाम व बेळगांवचा किल्ला काढून राजश्री सदाशिव माणकेश्वर यास बेळगांवच्या किल्ल्याची सनद दिल्ही. बाकी फूट सरंजामाच्या गांवच्या सनदा राजश्री खंडेराव रास्ते व बापू चाफेकर यास व कृष्णराव गंगाधर यास दिल्या. किल्ल्याचे जतीस सदाशिव माणकेश्वर याजकडून कारकून व पागा लौकरच जाणार आहेत. श्रीमंतांची स्वारीची हुशारी आहे. पुढें भाद्रपद अथवा आश्विन अखेर या सुमारें वसईकडे जाणार हा बेत आहे. पुरंदर बदलला आहे. याजमुळें सासवड वगैरे पूर्वपश्चिम व उत्तरदक्षिण तमाम प्रांत सरकारांतून ताकीद करून उजाड केला. खामगांवापासून तहत मोरेश्वरपर्यंत रस्ता बंद आहे. दंगा बहुत आहे. राजश्री येशवंतराव होळकर आजंठ्याचे घाटाखालीं आहेत. शिंदेबहादुर यांच्या व होळकराच्या भेटी होऊन शिंदे घांट चढून ओशागडावर आहेत. भोसले अघाडीस चांदवडानजीक आहेत. शिंद्यांकडील गोपाळराव चिटणीस व भोसल्याची फौज याप्रमाणें छावणीस वेरुळावर आहेत. श्री॥ राजश्री रावसाहेब व बाबा फडके नाशीकापासून आठ कोशांवर आहेत. वसली साहेब व सरकारचे सरदार मिळोन नगरापासोन पूर्वेस आठ दहा कोशांवर आहेत. बरसातेमुळें जिकडील तिकडे तूर्त स्वस्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६६८२          ( श्रावण व. १३–१५ आगष्ट. )

उतारा—पत्र धोंडो बापूजींचें पुण्याहून मिरजेस.

" नगरकिल्ल्याची पेठ इंग्रजांनीं घेतली. एका प्रहरांत हल्ला करून घेतली. मारगिरी भारी. आरब शंभरपर्यंत मृत्यु पावले. त्यांचेही शंभरपर्यंत जाया जाले. आरब ऐकतना. तेव्हां त्याणें [ इंग्रजानें ] दुरचे गोळे टाकिले. आरबांस इकडील माणूस दिसों नये आणखी घुरांडा ! इंग्रजांस इकडून दिसावे. त्याजवरोन त्यांणीं मार केला. आरब मेले आणि पेठ सोडून किल्ल्यावर गेले. पेठेंतून किल्यावर मारगिरी होत आहे.

ऐ. ले. सं. १०.

हल्ला करणार त्यादिवशीं तटावर व किल्ल्यांत धुराचे गोळे टाकून त्यास इकडील मनुष्य दिसों नये हल्ला चढल्येही दिसों नये असें करोन किल्ला इंग्रज दोन चार रोजांत घेणार याजप्रों बोलतात."

---

नं ६६८३ श्री. (श्रावण व० ३०-१७आगष्ट.)

विनंती उपरी. तागायत छ० २८ रबिलाखरपावेतों मुक्काम पुणें वर्तमान यथास्थित असे. विशेष तुम्हीं दोन तीन पत्रें पाठविलीं तीं पावलीं. राजश्री रावजींचें पत्र पावतें केलें. तुम्ही लौकर येणें म्हणोन रावजींनीं तुम्हांस चिठी लिहिली आहे ती पाठविली आहे. त्यास लौकर यावें. लष्करांतून गंगातीरचें पत्र आलें तें पाठविलें आहे त्यावरून तिकडील सविस्तर कळेल. येथील वर्तमान तरी नबाब हक्क जालेयाचें वर्तमान सरकारांत आलें. त्यावरून चौघडा एक दिवस बंद जाला. नंतर तिसरे रोजीं पोलादजंग यास मशीरांनीं गादीवर स्थापून खुशीचीं पत्रें मशीराचीं सरकारांत आलीं त्यावरून सरकारांतून खुषीच्या तोफा केल्या. नंतर दुसरे रोजीं बसलीसाहेब यांचीं पत्रें सरकारांत आलीं जे, नगरचा किल्ला घेऊन सरकारचें निशाण किल्ल्यावर चढविलें आहे. त्यावरून किल्ला घेतला याच्या खुशीच्या तोफा सरकारांतून केल्या. त्यास बसलीसाहेब यांणीं किल्ला घेऊन राजश्री खंडेराव रास्ते यांचे पुतणे विनायकराव यांच्या स्वाधीन करून आपण पलटणेंमुद्धां कूच करून गंगा उतरावी म्हणोन मोठ्या इराद्यानें निघोन वाभोरीवर जाऊन तेथून कूच करून पुढें गेले. सरकारांतून किल्ल्याच्या सनदा विनायकराव रास्ते यांच्या नांवें खंडेराव रास्ते यांणीं घेऊन पाठविल्या. सध्यां कुंजराप्रमाणें कुल कारभार खंडेराव रास्ते करतात मशीर यांजकडील फौज व पलटणें औरंगाबादेस आहेत त्यास सामील व्हावें म्हणोन बसलीचा बेत आहे. राजश्री रामचंद्र परशराम यांची व श्रीमंतांची मर्जी मिळोन परस्परें संतोषानें निरोप घेऊन गेले नाहींत. श्रीमंतांनीं यावर सरकारचे पदरचे सरदार यांजवर दोष ठेवून भाषण रुक्ष केलें त्यावरून आपांनीं उत्तर केलें जे, जशी सरकारची मर्जी त्याप्रमाणेंच सरदारांची चाल असें उत्तर करून गोटास गेले. नंतर परस्परेंच निघून तासगांवास

गेले. त्यास परस्परें खुपीचा अर्थ दिसण्यांत आला नाहीं. विसापूरचा किल्ला पूर्वीच बसलीस दिला आहे. सरंजाम किल्ल्यावर चढवीत आहेत. लोहोगड व कैंजला हे दोन्ही किल्ले कै॥ नाना यांजकडील आहेत ते बसलीस सांगोन घेणार. येविशीची परवानगी बसलीकडे गेली. नगरचा किल्ला हाही सरकारच्या परवानगीनेंच घेतला. पुढें मिरज व सोलापूर वगैरे जबरदस्त ठाणीं आहेत तीं बसलीच्या हातून घेणार असे येथील बेत आहेत. राजश्री रामचंद्रपंत आपा याजकडील बाळकृष्णपंत लागू यांस कर्नाटकप्रांतीचा सरसुभा सांगितला त्यांचे कुमकेस मिरजकर मंडळ फौजसुद्धां कुमकेस बरोबर असावें म्हणून करार आहे. त्यास दरबारांत बोलतात जे, पुढें नांव मात्र लागूचें आहे. जें करणें तें रामचंद्रपंत आपाच करणार. नगरच्या किल्ल्यांत शिंद्याकडील पलटणांतील इंग्रज होते त्यांणीं फितूर करून बसलीस किल्ला दिल्हा. किल्लेदार ब्राम्हण होता त्यास बसलीनें तुरुकस्वार बरोबर देऊन ममईस पोंचविला. श्रीमंतांस ज्वरांश जाला त्यावरून दुष्टदानें नित्य देत आहेत व शांतही चालली आहे. कळावें बहुत काय लिहिणें हे विनंती.

---

नं. ६६८४ (भाद्र. शु. २–१९ आगष्ट).

उतारा—पत्र धोंडो बापूजीचें पुण्याहून मिरजेस.

"(पुरंदरकरी यांनीं) दंगा मारी मांडला आहे. तीन चार घांट चालत नाहींत. याउपर सरकारांतून दोन पलटणें पुरंदरास रवाना करणार. · बोलवा आहे. बाबा फडके भोसले यास भेटले."

---

नं. ६६८५ श्री. (भाद्र० शु० ४–२१ आगष्ट.)

यादी. पुण्याहून पत्रें चि० राजश्री रामचंद्रपंत आपा यांस चि० राजश्री बाबाजीपंत पटवर्धन याचीं आलीं त्यांतील मजकूर. छ० ३ जमादिलाबल.

१ छ० १७ रबिलाखर नबाब निजामअल्लीखान याचा डोला थंड जाला. छ० १८ रोजीं पोलादजंग गादीवर बसले.

१ नगरचा किल्ला छ० २३ रबिलाखर रोजीं बसली साहेबांनीं घेतला. मलबा कुळकर्णी चांभारगोंदेकर किल्ल्यांत होता. दोन पलटणें होतीं तीं बदललीं. त्यांनीं गोलंदाज फोडिले याजमुळें दगा जाला. मलबा बचाव करून निघून गेले.

---

नं ६६८६ श्रीशंकरप्रसन्न. (भाद्र. शु. ५-२२आगष्ट.)

पै० छ० १५ जमादिलावल सन आर्बा.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री गंगाधररावजी

स्वामींचे सेवेशीं.

पोष्य माधवराव अनंत सां. नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागायत छ. ४ जमादिलावल यथास्थित जाणून स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष. पुण्याहून पत्रें आलीं त्यांतील वर्तमान छ० १७ रबिलाखरीं नबाब निजाम अलीखान यांचा काल जाहला. पोलादजंग दौलतीवर बसले. सबब पुण्याचे मुक्कामीं इंग्रेज जर्नेल कलुप आहे त्यांनीं सरबत्ती केली व सरकारचा चौघडा तीन रोज मना जाला होता. दुसरे रविवारीं सरबत्ती केली. त्याचें कारण नगरावर बसली बहादूर गेले त्यांनीं मंगळवारीं शहर घेऊन शनवारीं आवशीचे नऊ घटका रात्रीस निशाण भगवें सरकारचें लावून बंदोबस्त केला. शिंदे व भोसले अद्याप आजंठ्याचे घाटापलीकडेच आहेत. पुढें गोपाळराव चिटणीस अद्याप गंगेपलीकडेच आहेत. नगरचें वर्तमान गेल्यानंतर काय घडेल तें पहावें. होळकर मुलास घेऊन तूर्त महेश्वराकडे गेले आहेत. तिकडे मुलास ठेवून येणार. + + राजश्री रामचंद्रपंत आपा श्रीमंतांचे दर्शनास गेले होते. तेथें समक्ष बोलण्यांत कांहीं रंग पडला नाहीं म्हणोन नमस्कार करून निघाले. तवेंच निरोप रा. बळवंतराव नागनाथ यांजकडे सांगून पाठविले कीं, आम्ही तासगांवास उत्साहाकरितां जातों. म्हणोन निघोन आले. पुढें मसलत काय आहे तें कळत नाहीं. प्रस्तुत इकडे बेरडानें दंगा बहुत केला आहे. चिरंजीव फौजसुद्धां तालेकोट प्रांतीं मुधेहाळास बुनगे ठेवून त्याचे प्रांतांत स्वाऱ्या करून तिकडे पायबंद दिल्हा आहे. येथेंही कांहीं ठाण्या ठाण्यास

प्यादे व स्वार ठेवून बंदोबस्त करविला आहे. व कांहीं हजार पांचशें स्वार पुढेंही पाठवावयाची तरतूद आहे. पुण्याकडे तूर्त इंग्रेजी जाहलीशी आहे. शिंद्याशीं यजमानाचें सख्य काय राहिलें हें स्पष्ट नगर घेण्यामुळें जाहलें. ईश्वर इच्छा प्रमाण ! ×× बहुत काय लिहिणें. लोभ असो द्यावा हे विनंती.

---

नं. ६६८७ (भाद्रपद शु. ५ –२२ आगष्ट.)

उतारा—पत्र धोंडो बापूजीचें पुण्याहून मिरजेस.

" श्रीमंतास समाधान एक मास नव्हतें. त्यास अलीकडे आरोग्य जालें. शुक्रवार पेठेंतील वाड्यांत कोथरूडचे बागांत स्वारी जाऊं येऊं लागली. "

---

नं. ६६८८ श्रीशंकर प्रसन्न. (भाद्र.शु.७ –२४आगष्ट.)

पै॥ छ०६ जमादिलाखर. बुधवार. मंद्रें. मास. सन आर्बा.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधर रावजी स्वामीचे सेवेशी.

पोष्य माधवराव +अनंत सां० नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल ता० छ० ६ जमादिलाखर जाणून स्वकीय कुशल लिहीत असिले पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. चि० राजश्री रामचंद्रपंतआपा यांची स्वारी भाद्रपद शु० द्वितीयेस तासगांवास आली व नगरचा किल्ला इंग्रेजांनी घेतल्याचें व श्रीमंतांचे शरीरीं शैत्यांश होऊन ज्वरांश जाहला आहे व नगरचे किल्ल्यांत शिंदे यांजकडील मलबा कुळकर्णी होते ते आपला दबाव करून निघून गेले व पलटणें दोन आंत होतीं त्यांनीं फितूर केला याजमुळें किल्ला हस्तगत जाहला व भागानगरकर संपल्याचें वर्तमान पुणियास आल्यानंतर इंग्रेजांनीं तोफा केल्याचें व पोलादजंग छ० १८ रविलाखरीं गादीवर बसले म्हणून लिहिलें तें सविस्तर कळों आलें. मुख्य गोष्ट नबाबाची दोस्तीप्रमाणें पुढें परस्पर चालणें कठीण. त्याचे राज्यांतहि टोपीवाल्याचें प्राधान्य. येथें आपलेकडे नव्हतें तेंही जाहलें आहे. बाकी

---

+ रास्ते. पत्र वाईहून मिरजेस.

राहिलीशी वाटत नाहीं. मग ईश्वर सत्ता न कळे. दीप जातिसमयीं मोठा होतो, त्याप्रमाणें सर्वत्र यांचा व्याप जाला आहे. अंदेशे मनांत बहुत येतात. याचा विचार आपण निश्चित केला असेल तो कळवावा. सुरापुरकरांची फौज आहेरजंगबिर प्रस्तुत विजापूर सोडून गेली आहे. चि० राजश्री बळवंतराव सडे फौजसुद्धां मनगोळीस आले आहेत. मागती त्याचे रोखासारिखे जातील. मसलतीनेंच करावें म्हणोन लिहिलें जातच आहे. बहुत काय लिहिणें. कृपालोभ असों द्यावा हे विनंती.

---

नं. ६६८९ श्री. ( भाद्र. शु. ८-२५ आगष्ट. )

पौ॥ छ० १५ जमादिलावल शुक्रवार. भाद्रपद्मास. सन आर्बा.

सेवेशीं सा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ० ७ जमादिलावलपावेतों स्वामींचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. गंगातीराकडील व पुण्याकडील वर्तमानाचीं पत्रें आलीं तीं अलाहिदा सेवेशीं पाठविलीं आहेत. त्यावरून सविस्तर ध्यानांत येईल. सरकारांतून वसलीस आज्ञा जाली त्यावरून नगरचा किल्ला वसलीनें चौ रोजांत घेऊन सरकारचें निशाण चढविलें. पुढें लोहगड व कैंजळा व सोलापूर व मिरज वगैरे जबरदस्त किल्ले आहेत. हे वसलीच्या हातून घ्यावे ही मर्जी सरकारची आहे. स्वामीस कळावें म्हणून विनंती लिहिली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. राजश्री गोविंदराव कृष्ण काळे बाईत होते त्यास श्रीमंतांनीं खर्चास आठ हजार रुपये गांव लावून दिल्हे व नक्त हजार रुपये दिले आणि आज्ञा केली जे बाईत राहूं नये. सातान्यास जाऊन रहावें त्यावरून काळे कुटुंबसुद्धां श्रावण व॥ १३ निघोन सातान्यास गेले. त्यांचा बंदोबस्त चौकी पहारा वगैरे सातारकर किल्लेदार यांणीं करावा म्हणून सनद गेली आणि काळे यांणीं सातान्यांत स्वस्थ असावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६६९० ( भाद्र. शु. १०-२७ आगष्ट. )

उतारा—पत्र आपा देसाई निपाणकर यांचें बाळकृष्णपंत लागूस.

" आमचा मुक्काम गंगातीरीं आंवडा परगणेंत आहे. खर्चाची बहुत

तंगचाई आहे. येथील अविंधी कारभार ऐसें घडलें आहे. बरें घडेल तें प्रमाण!"

---

नं. ६६९१ श्री. (भाद्र. शु. ११–२८ आगष्ट.)

पौ॥ छ० १६ जमादिलावल. सन आर्बा मय्यातैन. भाद्रपदमास.

सेवेशीं सा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ० १० जमादिलावल पावेतों स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित. विशेष. राजश्री दौलतराव शिंदेबहादुर याणीं व अंबोजी इंगळे याणीं राजश्री सखाराम घाटगे यास कारभारांतून काढले. नंतर घाटगे जेष्ठमासीं करवीरास आले. नंतर घाटगे याणीं श्रीमंताकडेस पैगाम लावून दौलतीच्या बंदोबस्ताच्या कामकाजांत यावें हा विचार. ठरावून सिद्ध केलें. जाहेरींत सरकारचें बोलावणें आलें हें जालें पाहिजे त्यावरून श्रीमंतानीं राजश्री येशवंतराव पाटणकर यास घाटगे यास आणावयाकरितां छ० ६ जमादिलावलीं निघोन पुलाच्या रस्त्यानें छ० ९ रोजीं कोरेगांवास आले. आज निघोन पुढें कोल्हापुरास गेले. बरोबर लहान मोठे दोनशेपर्यंत स्वार आहेत. बरोबर राजश्री बापू जनार्दन जांबगांवकर, बाळाजी जनार्दन यांचे बंधु आहेत. शिंद्याचें व घाटग्याचे वैमनस्य जाणोन घाटगे यास दौलतीच्या कामकाजांत आणून पुढें बंडाचीं वगैरे पारिपत्यें करून राज्याचा बंदोबस्त करावा हा बेत आहे. सेवेशीं छ० ७ व ८ मिनहूचीं पत्रें पाठविलीं आहेत. तीं पावोन सविस्तर निवेदन जालेंच असेल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६६९२ श्री. (भाद्र. शु. ९ १४–३१ आगष्ट).

छ. १३ जमादिलावल आर्बा मय्यातैन.

पुण्याचीं पत्रें बाबजीपंत पटवर्धन यांचीं आलीं त्यांतील मजकूर--

१ किता पुरवणी कलमजारी होऊन सरकार नक्ष व्हावा म्हणोन तपशीलवार बंद दोन.

१ किता पुरवणी श्रीमंताचे शरीरीं ज्वरांश जाला व बातमीची हवा ऐकून मर्जी सर्द झाली. पूर्वस्थळास (वसईस) जावयाचा योग दिसोन येतो.

१ कित्ता पुरवणी विठ्ठल बाबजींनीं श्रीमंत रावसाहेब यास गोपाळराव चिटणीस यांनीं नजरबंद केलें म्हणोन बाजारी बर्तमान व *संजीवनी यांनीं टोपीकरासीं सुलाहाचें संधान लाविलें. सबब अटकाव व्हावा असा बेत दिसतो म्हणोन.

१ नबाबाकडील फौज व पलटणें अवरंगाबादेवर होतीं, तेथून फुलबारीवर गेलीं होतीं. तेथें शिंदे व भोसले याजकडील सदाशीवराव पंचवीस हजार पेंढार व फौज घेऊन कहीस उपद्रव करीतच होते. हजार पांचशें घोडे आणले. नंतर एक दिवस वीस हजार फौज घेऊन जाऊन लढाई दिल्ही त्यांत एक पलटण मारलें गेलें. संभाळून शहरास आले. नंतर वीस हजार फौज पुढें रवाना केली. मागाहून खासा आले. तों दोन पलटणें पुढील फौजेवर आलीं. लढाई झाली. एक पलटण मारलें गेलें. एका पलटणचे लोक बंदुका टाकून गेले.

१ पेंढारी याचे शिलशिल्यामुळें बसली नगराहून निघोन दरमजल टोक्यावर गेले. तोंच तिकडील ही बातमी लढाईची आली. त्यापूर्वी बसलीनें दोन हजार तुरुक स्वार व एक पलटण पाठविलें. तें छापा घालावयाचें बेतानें गेलें. तों ते गोपाळराव चिटणीस सावध होते. दुसरे दिवशीं लढाई छाप्यास पलटणें चालोन गेलीं. लढाई जाली. दोन तीनशें तुरुक स्वार जाया झाले. दोनतीनशें माणूस ठार जालें. यामुळें बसली खपा आहेत. कलम.

१ नबाब वारल्यानंतर स्त्री व नातू सरदार कांहीं घेऊन गोवळकोंड्यास गेले. म्हणोन मशीर व रवोत्तमराव पोलादजंग यास घेऊन परांड्यास येणार. त्यांचीं पत्रें बसलीस आलीं. विवीनीं शिंदे व भोसले याजकडे बोलणें केलें. पैका दोन कोड देतों. दौलतीचा बंदोबस्त करावा म्हणतात.

वर्तमान अखबारी.

१ मलकमसाहेब धारवाडाकडे जाणार, रस्ते याजकडे शंभर स्वार बरोबर दिल्हे. कारण काय असेल तें असो. ऐवज आणावयास जातों म्हणतात.

---

* अमृतराव.

१ विंचूरकर यास पाऊण लाख रुपये व बाळकृष्ण गंगाधर यास वीस हजार रुपये व नारोबा धायगुडे यावें. आतां यांणीं फौज ठेवावी व रास्ते यांणीं सरंजामी फौज घेऊन सर्वांनीं गंगातीरास जाऊन बंडवाले यांणीं वसविलेलीं ठाणीं उठवून सरकार अंमल बसवावा अशी आज्ञा जाली आहे.

---

नं. ६६९३   श्री.   (नक्कल)   (सप्टेंबर)

विज्ञापना. छ० २३ जमादिलावलचीं पत्रें उभयतां सरदार यांचे सैन्यांतून मुक्काम डोंगरगांवनजीक जालनापूर तीन कोस येथील आलीं. त्यांत वर्तमान उभयतां एक जागीं आहेत. तोफखाना व पलटणें अलिजाबहादर याजकडील आलीं. त्यांचा मुक्काम सैन्यापासून आठ कोसांवर आहे. इंग्रजांचे सैन्यास व इकडील चवदा कोसांचें अंतर आहे. नेहमीं गोळागोळी चालली आहे. परवां विशेष जाली ते दिवशीं पंचवीस तीस गोरे ठार जाले व इकडीलही लोक तितकेच सरकारकामास आले. राजश्री मल्हार रामजी यास सडे छ० २३ जमादिलावलीं रवाना होळकराकडे केले. फौज येथेंच आहे. होळकराकडील कांहीं फौज पेशजी येऊन दाखल जालीच आहे. अलीकडे दुसरी तापी दक्षिणतीरास आली. महाराजनिल्हे इकडून गेले आहेत. हे पोहचल्यानंतर दरमजल खासा होळकर येऊन पोंचतील. इकडील फौजांची जरबी दिसत आहे. सलोहद्र याजकडील दोन तीन सरदार फौजसुद्धां येऊन दाखल जाले. महाराजनिल्हेही दाबयाच्या देतांत आहेत. आठ चार दिवसांत तेही येतील. याप्रमाणें मजकूर तिकडील आहे. विदित होय. रवाना बुधवार दोनप्रहर हे विज्ञापना.

---

नं. ६६९४   श्री. [नक्कल.]   (सप्टेंबर.)

विज्ञापना. विंचूरकर आजपावेतों येथें राहून खराब जाले. महाल सुटून गेला. सरकारांतून देऊं घेऊं असें होतें त्यासही कोठें ठिकाण नाहीं. आजपावेतों मार्ग पाहिला. पुढें परिणाम नाहीं. चार लोक आहेत ते उठोन जातात हें पाहून व अमावास्येचे दिवशीं स्वारी कोथरुडास गेली ते समयीं यांचें पथक समागमें गेलें होतें. खासा अन्या गेले नव्हते. तेथें

याजकडील बारगिरांची सरकारचे हुजऱ्याची कटकट जाली. तेव्हांच पथक माघारे जाऊंद्या म्हणोन आज्ञा जाली व राहुंद्या म्हणोन सांगितलें. ज्या बारगिरानें खटला केला त्यास स्वाधीन करावा म्हणोन आज्ञा होत्ये. त्यास बारगीर स्वाधीन कसा करतील ? स्वाधीन बारगीर न जाल्यास मर्जी प्रसन्न राहत नाहीं. हटीं तट पडला. अन्याय पाहतां शेतांतून गेला. कांहीं बोलाचाली जाली. विशेष अन्याय नाहीं. वेळेचा गुण. याजकरतां आज वीस घटका रात्रीस झाडून सरंजामानिशीं कूच करून अन्नोदकाचा ऋणानुबंध असेल तिकडे जाणार. राजश्री सदाशिवपंतभाऊ व बळवंतराव बोलत आहेत कीं जाऊं नये. काय घडतें पहावें. बहुतकरून राहत नाहीं असें आहे. गेल्यास अथवा राहिल्यास होईल मजकूर तो मागाहून लिहितों. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६६९५ श्री. ( ४ सप्टेंबर. )

पुण्याहून पत्रें भाद्रपद वद्य तृतीया रविवारचीं आलीं तीं येथें छ० २४ जमादिलावलीं रविवारीं पोहचलीं, त्यांतील सारांश मजकूर.

शिंदे व भोसले गंगातीरास पैठणजवळ बदनापुरास आले. लौकरच गंगा उतरून दसऱ्याचे सुमारें पुण्यास जावें असा बेत आहे. कलम १.

उभयतां गंगेवर आल्यानंतर राजश्री नारायणराव वैद्य याजकडील कारकून खंडोपंत पुण्यास बोलण्याकरितां उभयतांचे विचारें रवाना केले. ते अनंतचतुर्दशीस पुण्यास दाखल जाले. कलम १.

खंडोपंत यांचे बोलण्यांतील भाव इंग्रजास निरोप द्यावा म्हणजे सारे सरदारांचा समेट होईल. नाहीं तर मऱ्हाटे हातीं लागत नाहींत. याजमुळें यजमानांस बहुत विचार पडला आहे. कलम १.

होळकराकडील मल्हार शामजी व मीरखान फौजमुद्धां भोसले व शिंदे यांस गंगेवर येऊन भेटले. खासे होळकरही मागाहून येऊन चतुर्दशीस भेटी होणार याप्रमाणें पत्रें सरकारचे बातमीचीं आलीं. कलम १.

उभयतां सरदारांकडील व भोसले यांजकडील पेंढारी व फौज यांनीं जनरेल वसली पुढें गेले होते त्याची आघाडी पिछाडी मारून उपद्रव बहुत

केला. व निपाणकर यांची फौजेची गांठ पडली त्यास लुटून घेतलें. निपाणकराचे फौजेतील पळाचे लोक कांहीं पुण्यास आले. मराठे याजकडील फौज भारी म्हणून बसली बहादर मागें सरून औरंगाबादेस गेले.

कलम १.

इंग्रज भांमोड्याचे मुक्कामीं करनेल कलुष आहे त्यांणीं चार कोंबडे लढवे तयार करून मराठे सरदारांचीं नांवें ठेवून चिठ्या गळ्यांत बांधिल्या व इंग्रजांनीं आपलें नांवच्या चिठ्या कोंबड्याच्या गळां बांधून येक येक सरदारांशीं निरनिराळ्या लढाया लाविल्या. त्यांत होळकर याचे नांवचा कोंबडा होता त्याणें इंग्रजांचे नांवचे कोंबड्यास जेर करून कोंबड्याचे पायीं सुऱ्या बांधिल्या होत्या ती सुरी लागोन कोंबडा जेर जाहला. त्याचें शीर तुटलें. बरकड दोन्ही कोंबडे समान राहिले. याप्रमाणें त्यांनीं शकुन पाहून सर्द जाहले.

कलम १.

नगर हस्तगत जाहल्यापासोन इंग्रज गर्वानें चढोन मजल दरमजल छ० ११ जमादिलावलीं औरंगाबादेस गोखलेसुद्धां दाखल जाले. पुढें दोन पलटणें आजंठ्याच्या घाटाचे सुमारें गेलीं होतीं. तीं तिकडून शिंदे घांट चढोन फौज व पेंढार व कंपूसुद्धां सडे पुढें जाले व सेनासाहेब सुभा आपले जमेतीसुद्धां बाबनापुरचा घांट चढोन छ० ११ मिनहूस उभयतां सरदार औरंगाबादेपासून सहा कोशांवर मुक्काम केला. दोन पलटणें पुढें होतीं तीं माघारीं सरून शहरास आलीं. उभयतां सरदारांनीं शहराचे शहावर कंपू व पेंढार ठेवून छ० १३ मिनहूस शिंदे व भोसले उभयतां खासा सडे पन्नास हजार फौजेनिशीं पैठणास दाखल जाले.

कलम. १

उभयतां सरदार व भोसले फौजासुद्धां पुण्यास येणार म्हणून पुण्यांतील लोक तजावजा होत आहेत. व भामोड्यावर इंग्रजी पलटणेंसुद्धां कर्नेल कलुश मुक्काम करून होता तेही तेथून निघून बोरघाटाचे सुमारें जाणार.

कलम १.

नबाबाची स्त्री नातवास घेऊन गोवळकोंड्यास गेली. त्याजबरोबर सारे उमराव जमाव होऊन मशरुलमुलुख यास हैदराबादेहून धुडावून लाविले

आणि मऱ्हाटे यांसी संधान करून आपले दौलतीचा बंदोबस्त करून घ्यावा याप्रमाणें अंमलांत आणिलें आहे. बिबीकडील जमाव झाडून मऱ्हाटे यास सामील आहे. कलम १.

जनेल वसली मऱ्हाठेकडील जमाव भारी म्हणून सर्द होऊन विचारांत पडले आहेत. कलम १.

एकूण कलमें सुमारीं दहा.

---

नं. ६६९६ श्रीगणराज. ( भाद्र. व. ६–७ सप्टें. )

पै॥ छ॥ २० जमादिलावल.

अपत्यें आपानें सांष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ॥ २० जमादिलावल पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. भोसले यांची फौज दीदरीवर आहे. मागावून उभयतां खासा सरदार फौजेंत आले. भोसल्यांचे चिरंजिवाची प्रकृति स्वस्थ नाहीं. चतुर्थीचे उत्सावामुळें मुक्काम आहे. उभयतां दरकूच पुण्यास येणार. गंगा पैठणाजवळ उतरणार. होळकर ही समीप आले. बीबी यांनीं गर्दी करून मशीर मारला. आणि हैदराबादचे बंदोबस्तास बाबा फडके यांस लाऊन देणार. वसली कायगांववर आहेत. पुढील पलटणांत रसद जात होती. ती दोन तीनशे बैल पेंढाऱ्यांनीं लूटून नेले. फराशीस गोव्यास आले म्हणून वर्तमान आहे. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६६९७ ( भाद्रपद व. ८ –८ सप्टें. )

उतारा पत्र अथणीहून मिरजेस माधवराव अनंत रास्ते यांचें.

" बागलकोटाहून बातमीचें पत्र आलें त्यांत इंग्रजांकडील पांचसात हजार जमाव नंदवडगांनजीक जखीहाळ येथें आला आहे. पुण्याकडे जावयाची आवई आहे. आगखीहि मागाहून टोळयाटोळयांनीं सरंजाम मातबर जाणार म्हणोन लिहिलें आहे. "

---

१ त्रिंबकपंतआपांचें पत्र कुरुंदवाडाहून मिरजेस.

नं. ६६९८ श्री. (नक्कल.) ( भाद्र.व.९–९सप.)

पै॥ छ० २२ जमादिलावल आर्बा मयातैन.

विज्ञापना. वडीलीं छ० १२ जमादिलावलचें पत्र पा. त्यांत सालमजकूरचे मसलतीविशी आंग सुटका केली अशी दिसत्ये. दुसरीयाचे गळ्यांत माळ घालून आपण स्वस्थ बसावें. घरीं बसलें अथवा देवासही गेले तत्राप चिंता नाहीं. परंतु जें करणें तें एक जागा उभयतांनीं बसोन करावें असें व्हावें. ह्यांत चांगुलपणा मोठा आहे. तें घडावयाचें नाहीं. त्रिवर्ग सरदारांच्या नजरा वडीलांकडे. ह्याप्रसंगीं लक्ष इकडे असतें तरी मोठाच नक्ष व्हावयाचें दिवस. असो. वडीलीं मनसबा केला आहे. तत्राप तनाव हातीं राखून ठेविल्याच असतील. वडीलीं कैलासवासी वडीलांची चाल कशी होती ती पाहिलीच आहे. तशा बेतानें घडणें तें घडावें. मुद्रा हातीं राखोन कोणीहि करूं चिंता नाहीं. या समयाचे ओझ्यांत मोठमोठे पर्याय होते. ईश्वर इच्छा ! या पत्राचें उत्तर मला निराळे बाटेनें यावें. व मींही आणखी पर्यायें मागाहून लिहिन. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६६९९ श्रीगणपति. (भाद्र० व० ९–९ सप्टें)

पै० छ २२ जमादिलावल भृगुवार आर्बा मयातैन.

विज्ञापना. जमखिंडीस गेले असतां लौकिक कसा होईल ! ध्यानीं आणावा. सरकारचें राज्यांत इंग्रजांचा व्याप जाला. पुढें त्रिवर्ग सरदार येणार. पुढें चैन पडों देणार नाहींत. भेटी जरूर व्हावी म्हणोन व गोव्यांचें वर्तमानासाठीं शहापुरास माणसें जाणेविशीं सांगितलें आहे. असें लिहिलें तें कळलें. त्यास तूर्त तुळजापुरास जावयास चालण्यास सामर्थ्य शरीरीं नाहीं. आठ पंधरा दिवस जमखिंडीस राहून मग देवास जावें असें योजिलें आहे. सबब जातों. इंग्रजांचा व्याप बुध्याच केला. उपाय कोणाचा ! त्रिवर्ग सरदार येणार, झगडा रगडा आहे. चिरंजिवांनीं जमाव करावा. आमचे सरकारी नेमणुकीप्रमाणें हल्लीचे ऐवजा-

---

१ राम. आपाचे पत्र जमखिंडीहून मिरजेस.

बरहुकूम आम्हांकडील जमाव आहेच. चिरंजीव चालू लागोन घांस लकडी चालती झालेवर इकडील फौज जाऊन पावेल. बरकड काय आज्ञा होणे ती बाळाजीपंताजवळ व्हावी. मजकडीलही मजकूर विनंति करतील. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६७०० श्री. ( भाद्र. व. ९-९ सप्टें. )
छा। २२ जमादिलावल.

पुरवणी कलमबंदी—

नबाब बंदेगान अली ह्यांचे नातु अलिजा बाहदूर यांचे पुत्र यास गादी वर बसविल्याचीं पत्रें सरकारांत छा। १७ जमादिलावलीं आलीं. खुशालीच्या पंचवीस तोफा जाल्या. चौघडाही चार घटका वाजला. योंत बातम्या दोन आहेत. लिहिली एक व पोलादजंग यासच बसविलें. परंतु वास्तविक नाहीं. कलम १

नाशिकचा अंमल श्रीमंत राजश्री रावसाहेब यांनीं बसविला. क्षेत्रांत कारभार भावे करितात. घरें खणतात. कांहीं जाळलीं. ब्राह्मण व ब्राम्हणी स्त्रियांचे अंत जाहले. अनर्थांत बाकी राहिली नाहीं. ईश्वरें नेत्र झांकिले तेव्हां यत्न कोणाचाच दिसत नाहीं! कलम १

पुण्यांत अनेक प्रकारचीं दुखणीं लागून ब्राम्हण शूद्र आदिकरून मरतात. हवा मोठी कठीण आली आहे! कलम १

शहरांत महर्गता हरभरे ८८१॥। बाजरी ८८१॥। जोरी ८८२। तांदूळ चारशेर तूप पाऊणशेर याप्रमाणें. गरीबाचा शेवट कसा लागतो? कलम १

विंचूरकर वगैरे मंडळीस फौजा ठेवणेंविषयीं आज्ञा सरकारची जाली होती. परंतु सरकारांतून पैका पावोन कलम चालतें कोणाचेंच जाहलें नाहीं. स्वस्थ विचार करीत बसले आहेत! उत्तरेकडील पेंढारी यांची दौड वामोरीपावेतों येऊं लागली. कलम १

मोरोबादादा फडणीस यांचा काल छा। १२ जाला. ईश्वरें मोठें वाईट केलें! पुत्र आंबेगांवीं मुखरूप आहेत. त्यांची प्रकृति ठीक नाहीं. कलम १

अन्याबा काका खासगीवाले यास ज्वरांश होऊन वद्य २ मंदवारीं प्रातःकालीं देवाज्ञा झाली. आज मंगळवारीं चौथा दिवस. बहुत दिवशीचें मनुष्य गेलें! वाईट झालें. होणारास उपाय नाहीं. कलम १

पटवर्धन मंडळीस जलद नेमणूकीपैकीं फौज घेऊन पुण्यास येणें म्हणून बळवंतराव यांनीं सांगितलें. तूं जाऊन रामचंद्रराव आप्पा यास घेऊन येणें याप्रमाणें सरकारची आज्ञा जाहली आहे व रुबरु बोलवितों. त्याजवर त्यांचें माझें बोलणें बहुत जाहलें. परंतु भवति न भवतीचा निश्चय जाहला नाहीं. जाहल्यावर सविस्तर लिहितों. मला जा म्हणोन आग्रह पडला. तत्राप झाडून कामकाजें मनोदयानुरूप करून दिली तरच येईन. कलम १

---

नं. ६७०१ श्री. (नकल) (भाद्र. व० ९-१सप्टें)
पै० छ० २२ जमादिलावल आर्बा मयातैन.

विज्ञापना. इकडील मजकूर कलमें—

उत्तरेकडील छ० १३ जमादिलावलचीं पत्रें आलीं त्यांत मुक्काम गंगा उत्तरतीरींच आहे. होळकरांची भेट शु॥ त्रयोदशीस व्हावी, असा बेत होता, परंतु येऊन पोहोंचले नाहींत. येऊन भेट जाहली म्हणजे पुण्यास येणार. भेटही लौकरच होईल. कलम १

बाळोजी कुंजर लौकरच बोलणेयास येणार आहेत. त्यांतील भाव, श्रीमंतांनीं पुण्यास स्वस्थ असावें या बेतानें येत आहेत. कलम १

भडोचचा किल्ला इंग्रजांनीं घेतला तें वर्तमान काल छ० १८ जमादिलावलीं कर्णेल याजकडे आलें. खुशालीचे एकवीस बार तोफांचे केले. कलम १

कर्णेल याजपाशीं पुण्याचे मुक्कामीं दोन पलटणें आहेत त्यांची रवानगी बोरघाटाच्या सुमारें करणार. कारण, फौजांची दौड घाटाकडे जाऊन तिकडील रस्त मना करावी, ही आवाई ऐकोन, घाटावर जाण्याची तरतूद करितात. चालते जाहल्यावर लिहितों. कलम १

पुण्यापासून गंगेपावेतों डांक बसवावी म्हणोन खंडेराव यास आज्ञा जाली. कलम १

प्रकृति श्रीमंतांची आहे तैसीच आहे. अद्याप आरोग्य नाहीं. ताप येत असतो. त्यांत मसलत यामुळें आयास होतात. कलम १

गोविंदराव परांजपे, वैजनाथभट यांचीं कुटुंबें स्थळास गेलीं. बरकडांची तरतूद चालली आहे. कलम १

वडिलीं प्रस्तुत, देवास जाण्याचा प्रसंग घालूं नये. दिवस बहुत अवघड आले आहेत. यांत सावधगिरी मोठी पाहिजे. मी लिहितों याचा समय पाहून अनादर न व्हावा. कलम १

इंग्रज झाडून बसलीसुद्धां अवरंगाबादेजवळ आहेत. इकडून रसद पोहोंचण्यास अवघड पडलें आहे. पुढें कसें घडतें पाहावें. इकडून जातेसमयीं जो रंग होता तो इरादा प्रस्तुत दिसत नाहीं. कलम १

राजेश्री नारायणाराव वैद्य याजकडून खंडोपंत आले. त्यांचीही विनंती सरकारांत आहे कीं, स्वामींनी त्रिवर्ग जलद येतात म्हणोन चित्तांत दुसरा विचार आणून स्थळ सोडूं नये. हेंच बोलणें बोलत आहेत. आल्यावर मी जाऊन भेटलों. मुळाची वळख नाहीं. कार्याकारण बोलणें जाहालें. आणखी जाऊन सर्व भाव समजोन घेऊन लिहितों. कलम १

कुलाब्यास इशाऱ्यामुळें गलबल चालली आहे. टोपीकरांची तरांडी जवळ आल्याची बातमी आली आहे. खचित शोध घेऊन लिहितों.

कलम १

लोहोगडाकडे प्रस्तुत दाद देत नाहींत. कर्णेल छ० १७ जमादिला वलीं बाड्यांत आले होते. रोपांचीं उत्तरें करून गेला. कोणतीही गोष्ट म्हटली होत नाहीं तेव्हां दोस्ती चालली आहे, ही राहाणें कठीण, याप्रमाणें स्पष्ट उत्तर करून गेला. कलम १

श्रीमंत सौ॥ मातोश्री बाईसाहेब यांची स्वारी वांईस लवकरच जावयाचा बेत दिसतो. कलम १

नं. ६७०२ श्री. (भाद्र. व. १२–१२ सप्टें)

विज्ञापना. तागायत छ. ३० जमादिलावल. विंचूरकर याजकडील कारकुनाचें पत्र छ. २५ जमादिलावल मुक्काम दहिगांव पिंपळगांव नजीक आंबेड दोन कोस त्यांतील मजकूर बितपशील.

१ जनराल वसली बहादूर काल छ० २४ जमादिलावलीं खंडक्याहून कूच करून येथें मुक्कामास आले. बरोबर राजश्री गोखले व बिष्टपा व निपाणकर वगैरे सर्व आहेत. एकासीं एक लगत जाऊन उतरतात. पहिलेप्रमाणें नाहीं. कलम १.

१ इष्टवीसनसाहेब याचे लष्करांत महर्गता बहुत. रसद बंद जाली. त्याचे मागें सडी फौज लागली आहे. खासे उभयतां मागेंच आहेत. जालनापूर मागती शिंदे यांणीं घेतलें. सारांश पेंढारी यांची गर्दी आसपास बहुत. शिंदे आपलीं पलटणें घाटाखालीं टाकून आले. शिंदे व भोसले उभयतां सडे एकविचारें आहेत. दिवस आतांचे नगरच्या मुक्कामाप्रमाणें नाहींत. बहुत घोरांत आहेत. कलम.

१ काल बिष्टपाची व गोखले यांची कही गेली होती ती पेंढारी यांणीं कांहीं घोडीं व उंटें नेलीं. कोसभर माणूस बाहेर जाऊन येणें अवघड. तमाम पेंढारी फिरतात. महर्गता. तीन शेरांची धारण. रसद बंद झाली. आज रसद आणावयास दोन तोफा व एक पलटण राक्षसभुवनास गेलें आहे. रसद आली म्हणजे पुढें कूच करून इष्टवीसनसाहेब सखो रुद्र याचे फौजेस मिळावयास जाणार. त्याचा मुक्काम बदनापूरचे नजीक पांच कोसांवर आहे. महर्गता पत्रीं लिहितां पुरवत नाहीं. आतां त्यांच्या यांच्या गांठी पडल्यास दिवसगत लागत नाहीं. तें दोन चार दिवसांत काय होणें तें होतें होळकर अद्याप आले नाहींत. येणार असें म्हणतात. परंतु हे उभयतां एकविचारें आहेत. तट्टू धरणें म्हणोन आज्ञा. त्यास आतां ज्याप्रमाणें स्वामीची आज्ञा घेऊन आलों त्याचप्रमाणें मागतीं चरणाचें दर्शन होईल तो सुदिन. याजउप्पर आमचे प्राण जगणें कठिण. कलम १.

एकूण तीन कलमावरून विदित होईल. विदित होय हे विज्ञापना.

---

ऐ. ले. सं. ३१.

नं. ६७०३ श्रीगणराज. (भाद्रपद बा॥ १३–१३ सप्टें.)

पौ छ. २६ जमादिलावल. सन्न आर्बा मयातैन.

आपत्यें ×गणपतीनें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे. ता। छ. २६ जमादिलावल पावेतों यथास्थित असे. विशेष. वडीलांचा निरोप घेऊन आलों तो दोन घटका रात्रीस पोहोंचलों. सावनुराहून राजश्री पूर्णोपंत याच्या लष्कराहून एक गृहस्थ आले त्यांणीं वर्तमान सांगितलें. हरिहरावर हजार पांचशें सामान आहे. चेनापट्टणाहून इंग्रज सरदार यांचीं पलटणें व तुरुक स्वार दोन हजार याप्रमाणें घेऊन इकडे कुमकेस येत होते. बेंगरुळेचे सरदेस आले तों चेनापट्टणाकडे फरासीस दहा हजार चालून गेले होते. सुमारें आले म्हणोन बातमी येतांच माघारे गेले. वसलीसाहेबांकडून पांच सहा सरदार पट्टणाच्या बंदोबस्ताकारितां गेले व मीरमीरा श्रीनिवासराव यांजबरोबर दोनशें स्वार व चटेकरी चार पांचशें देऊन खजीना वसलीकडे केला, कोणे मार्गें जातात न कळे. तिकडे मराठे फौजेचा दरद बहुत खात आहेत. होळकरी वगैरे यांच्या फौजा येतात म्हणोन फार हवालदिल जाहले आहेत. याप्रमाणें वर्तमान आहे. ऐकिलें तें वडीलांस कळवावें म्हणोन विनंती लिहिली आहे. गोमांतकासही फराशीस आले असें सांगत आहेत. सत्य मिथ्या न कळे. तिकडील कांहीं वर्तमान आलें असलेस ल्याहावयास आज्ञा करावी. श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६७०४ (भाद्र० व० १४–१४ सप्टें.)

उतारा—पत्र अथणीहून मिरजेस माधवराव रास्ते यांचें.

" शिंदे व भोसले जालनापूरचे उत्तरेस बदनापुराजवळ आहेत. होळकर तापीतीराहून पुढें आले. त्याच्या फौजा पुढें रवाना जाल्या. त्या उभयतां सरदारांच्या फौजा एकत्र जाल्या. त्रिवर्ग एक होऊन वसली कायगांव टोकेहून औरंगाबादेस जाऊन पोहचले. त्याचे रोखें फौजा येऊन पुणियास येणार. इंग्रजांचा कारखाना सौदागिरी वगैरे घाटाखालीं नेला व नेतात व दोन पलटणें बोरघांटाकडे जाणार. उभयतां सरदारांची दौड

× गणपतराव कोन्हेर पटवर्धन यांचें पत्र जमखिंडीहून मिरजेस.

बामोरीपर्यंत आली. + + + मोरोपंतदादा फडणीस व आनंदराव जिवाजी लिमये यांस देवाज्ञा जाली."

---

नं. ६७०५ श्री. (नक्कल.)(भाद्र.व.१४–१४सप्टें.)

राजश्री रामचंद्र परशराम स्वामी गोसावी यासी.

+विनंती उपरी. तुम्ही छ० ५ जमादिलावलचें पत्र पाठविलें तें पावलें. भाद्रपद शु॥ द्वितीयेस तासगांवीं पोहचलों. श्री. गणपतीचा उत्साह जाला म्हणजे तुळजापुरास श्रीदेवीचे दर्शनास जातों. मजकडून स्वामीचे चरणाशीं दुसरी गोष्ट घडावयाची नाहीं ही खातरजमा आहेच व आणखी असली पाहिजे म्हणून लिहिलें. त्यास सरकारची व कुंपणीचे सरकारची दोस्ती. हरदो सरकारचे विचारें तुम्हास वसलीसमागमें जावयाचें ठरलें. तुम्ही त्याजबरोबर न जातां माघारें देवदर्शनास गेला. त्यास नेमणुकी फौजेची सरंजामाची रवानगी हुजुर करून तुम्ही देवदर्शनाचा गुंता उरकोन सरकार चाकरीवर लौकर येऊन पोचणें. जाणीजे छ. २७ जमादिलावल हे विनंति.

---

नं. ६७०६ श्री. (१४ सप्टें.)

विज्ञापना. मुंबईचे बाऱ्यावर फराशिसाचे दोन तीन मनवर आले आहेत याजमुळें मुंबईत दिवसरात्र सावधगिरी आहे. म्हणोन बाजारी वर्तमान आलें आहे. वास्तविक असल्यास मागाहून शोध करून लिहीन. आंगरे यास अलिजाबहादर यांचें बोलावणें आलें आहे. कधीं जातात पहावें. गोव्यास कांहीं जमाव आला आहे म्हणोन वार्ता आहे त्यास तेथें शोध करून लिहिणें. ऐशास येथें शोध केला परंतु कोणास कांहीं ठाऊक नाहीं. तिकडून ते जवळ. आजपावेतों वाडिलीं बातमी आणविली असेल. आले हें खरें असल्यास पत्रीं लिहिलें पाहिजे. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६७०७ श्री. (तालीक) (१५ सप्टेंबर.)

दे॥ छ० २८ जमादिलावल. सन आर्बा मय्यातैन.

---

+ पत्र श्री० बाजीराव साहेबांचें.

विज्ञापना. हैदराबादेकडील वर्तमान तरी मशीर यांणीं मीर पोलादजंग यास गादीवर बसविलें. साहेबजादे होते त्यास व बाइकास नबाबाच्या स्त्रियांस अटकेंत ठेविलें. पागे व पथके यास धरून कैद करून बंदोबस्त करून संस्थानचा वगैरे पक्का बंदोबस्त जाला. रघूत्तमराव व आणखी कोणी जे ममतेचे होते त्यांचे हातून कारभार घेत आहेत. उभयतां सरदार कोणत्या मसलतीवर जाणार काय रंग आहे, तो न कळे. मशीराचें लक्ष दोहीकडे जें साध्य होईल, त्या विचारें वर्तणार. केवळ सरकार लक्ष सोडलें नाहीं. प्राबल्यता जाली त्याकरतां अंग दिल्हे ऐसी वदंता आहे. पुढें ईश्वरी इच्छा प्रमाण. मशीराचें मानस आहे कीं, परभारें उपमर्दन जाल्यास चांगलें आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

विज्ञापना. संगमावर वाळूच्या गोण्या भरून हमामा बुरूज चार बाजूस तयार करीत आहेत. शहराच्या वाण्याजवळील गोणपाट व जुने भोत गोणताटकें खरीदी करून वाळू नदीची भरून सभोंवतीं बंदस्ती करतात. याप्रमाणें होत आहे. श्रुत होय हे विज्ञापना.

गोविंद भावे शागीर्द श्रीमंताजवळ होता त्यास पेशजी बापू फडके याचीं कडीं सोन्याचीं तीन वसईचे मुक्कामीं शागीर्दाचे धोकटींतून चोरून घेतलीं होतीं त्यास हल्लीं ठिकाण लागलें. त्याजवरून श्रीमंतांनीं खंडेराव रास्ते यांचे हवालीं केला. चौकशी करणें त्यास चौकशी करतां गोविंद भावे याणें कडीं घेऊन मोडलीं हे खरें जालें. त्याजवरून घरीं जप्ती पाठविली व भावे यासी अटकेंत ठेविला. मार देऊं नका ऐसी आज्ञा केली. मार दिल्हा नाहीं. जप्ती करून चीजवस्त आणली हे विज्ञापना.

---

नं. ६७०८ श्री. (नक्कल) [भाद्र. व. ३०-१५ सप्टें.]

पै॥ छ० २८ जमादिलावल.

विज्ञापना. अलीकडील वर्तमान छ० १८ जमादिलावल छ० १९ जमादिलावल रोज मंगळवार.

१ टोपीकर संगमावरील सरकारचे तोफखान्यांत जाऊन तोफा वगैरे सामानाची चौकशी केली. तोफा पाहून बोलले कीं, या तोफा गैरउप-

योगाच्या. किल्ले नगर येथें तोफा चांगल्या आहेत, त्यापैकीं चाळीस तोफा आणवितों असें बोलून गेले. कलम १.

१ शहरासभोंवती शेतें आहेत त्यांस ताकीद केली कीं, ज्याचें शेत त्यानें कापून न्यावें. नेत असल्यास उत्तम. नाहींतर आपण विकत घेऊन पैका देतों असें जालें.

१ बळवंतराव नागनाथ व कर्णेल कलुप रघुनाथराव चेनापट्टणकर यांजकडे गेले. तेथें सहा घटका बसले होते. श्रीमंतांनीं फौज द्यावी असा करार असतां फौज दिली नाहीं. होळकराचें पारपत्य करावें, शिंदे व भोसले वगैरे मानकरी झाडून सरदार मिळणेंत आहेत त्यास सरकार कामावर कोणी उपयोगी पडावें असें दिसत नाहीं. पलटणें मोहल्ल्यावर गेलीं. झाडून फौज एकवटली. त्याअर्थें मुख्यांनीं आमचे पाठीवर चालावें म्हणजे आम्ही कोणास डरत नाहीं. मोंगलाकडील फौज आमचे पाठीवर आहे व खासा स्वारी येथून गेली असतां मग कोणेविशीं खत्रां नाहीं. असें बोलणें होत होतें म्हणोन वर्तमान आहे.

छ० २० रोज बुधवार.

१ रघुनाथराव चनापट्टणकर यासी समाधान दहा पंधरा दिवस नव्हतें. बुधवारीं अर्धरात्रीं वारले. कलम.

१ मोरोबादादा यांचे पुत्र लाहोगडीं होते. बहुत प्रकृत क्षीण जाली होती. दादांचें वर्तमान तेथें आलें परंतु त्यास कळूं न दिल्हें. समजों न दिल्हें. दादांचे आठवे दिवशीं नानास देवाज्ञा जाली म्हणोन सरकारांत लिहिलें आलें. कलम.

१ बंडसंबंधीं केसोपंत साठे व बापू कुंटे व त्रिंबकपंत गोखले गोविंदपंत देवधर वगैरे मंडळी येथें कैदेंत होती त्यास जागोजाग किल्ल्यास रवाना केलें. शृंखला घालून पाठविलें. कलम.

१ श्री॥ कै॥ नानासाहेबांचा पक्ष आपासाहेबांनीं केला. श्रीमंत आले नव्हते. कलम.

१ संगमावरील स्थान आहे तेथें सभोंवते तट्टे लावून नदीची वाळू भरून ठेवितात. कलम.

१ गोपाळराव चिटणीस व पेंढारी ऐसें पुढें आले. जळबासी यांची कही जात होती त्याजवर पेंढारी यांणीं चाल करून कही लुटली. मागाहून तुरूकस्वार जाऊन धुडावून लाविलें. कलम.

१ शहरांत गोणपाट जुने भोत तरट्या जुन्या होत्या त्या झाडून दुकानदार गुजर वाणी याजपासून खरेदी करून नेऊन संगमाजवळ गोण्या वाळू नदीची भरून जागोजाग ठेवितात. कलम.

छ० २१ रोज गुरुवार.

१ मौजे भांबवडेचे आंगें वाकडे व पेठे वगैरे बाग आहेत त्यास इंग्रजांनीं ताकीद केली कीं, आपलीं झाडें तोडून त्यांची व सभोंवत्या भिंती आहेत त्या पाडून टाकणें याप्रमाणें ताकीद केली. कलम.

१ मौजे घोरपडी, बानवडी, कोंडवे या बाजूस जागोजाग बुरूज बांधणार. कोणी ठिकाणीं कशीं आहे ही पाहून चौकशी करून गेले कलम.

१ पैठणानजीक उभयतां होते त्यास जळबासी याणीं जाऊन छापा घालावा हें वर्तमान कळलें. त्याजवरून उभयतां निघोन बिडाकडे गेले. शेळूबर मुक्काम आहे. वीस कोसांचें अंतर पडलें ऐसें बोलतात.

१ कुंजर तूर्तच येतलिसें दिसत नाहीं.

१ भागानगरप्रांतीं उभयतां जावयाची वदंता आहे. त्यांचे पाठीवर इंग्रजही जाणार याप्रमाणें बोलतात. कलम

१ नाकेबंदीही करणार ऐसी वदंता आहे.

१ झाडून गाडदी व पावलोक यांची रमण्यांत खडी हजेरी होत आहे. कलम.

छ० २२ रोज भृगुवार.

१ गोपाळराव चिटणीस व पेंढारी व पलटणें तोंडावर ठेऊन गेले होते त्यास घाटानजीक इंग्रजांची व त्यांची लढाई जाली. दोनप्रहर गोळा चालला परंतु कोणी हटले नाहींत याप्रमाणें वदंता आहे. कलम.

१ जालनापूर येथें ठाणें इंग्रजांचें बसलें. एक दिवस लढाई दिल्ही. कलम.

१ शामतखान मीरखान पठाण येऊन सामील जाले. कलम.

१ शुक्रवारपेठेंतील वाड्यांत स्थळ पालटावयाकरितां जाऊन रहावयाचा बेत आहे. गेले म्हणजे लिहितों. कलम.

१ विंचूरकर डेऱ्यास दाखल होणार. गारपिराजवळ रहावें. पागे व पथकें यांणीं त्यांजवळ जाऊन उतरावें. फौजेचा जम पडावा ऐसें ठरलें आहे.

१ होळकर येऊन दाखल जाले नाहींत. पेशजी आले ऐशी वदंता ऐकली. परंतु आले नाहींत. येणार म्हणून बोलतात. कलम.

१ हैदराबादेचा रोख जाला. शेळूवर फौज गेली म्हणोन बातमी आली. मागाहून पायदळही गेलें. कलम.

१ राघोपंत गुरुजी ठोसर औषध देतात. प्रस्तुत किंचित स्वस्थ आहे. कलम.

१ रघुनाथराव निवर्तले याजमुळें बळवंतराव नागनाथ बहुत श्रमी आहेत. पत्रें दिलीं त्याचें उत्तर मागाहून पाठवितों. चक्रदेव स्वस्थ आहेत. कलम.

---

२७
कलमें सत्तावीस.

---

नं. ६७०९ (आश्विन शु० १–१६ सप्टें).

उतारा—पत्र माधवराव अनंत रास्ते यांचें अथणीहून मिरजेस.

तारीख छ० २९ जमादिलावल सन आर्बा.

“ (सुरापूरकर) बेरडाची फौज विजापुरावर आहे. इकडील पेंढारी जाऊन त्याकडील गांवगन्नाचीं गुरें वळून तोरव्यास येऊन राहिले. तेथें त्यांजकडील हजार पाचशें जमाव पेंढारी यांचीं गुरें व घोडीं नेलीं. पेंढारी पायउतारा पळोन आले. हें वर्तमान इकडील सडी फौज तिकोट्यावर होती. त्यास समजल्यावरोन तयार होऊन विजापूरचे सुमारें गेले. तों ते निघोन गेले. मागें त्यांजकडील गदग्याप्पा पाटील म्हणोन हजार पांचशें लोकांचा बेडवाला होता तो सांपडला. जखमी आहे. पांच सात

घोडींही पाडाव आलीं. पुढें बेरडाच्या फौजेचा होनवाड अथणीपर्यंत यावें हा मनोदय आहे. चि० राजश्री बळवंतराव फौजसुद्धां मुधेहाळास गेले आहेत. तेथें बुणगें ठेवून सडे होऊन त्याचे पिच्छावर येणार. येथेंही कांहीं जमाव करावयाची तरतूद केली आहे."

---

नं. ६७१० (आश्विन शु. १–१८ सप्टें.)

उतारा—पत्र धोंडो बापूजीचे पुण्याहून मिरजेस.

"श्रीमंतांची स्वारी वांईस आल्यानंतर खंडेराव रास्ते यांच्या हातून सचीवपंताकडेस बोलणें लाविलें जे, राजगड व तोरणा हे दोनी किल्ले यांची गरज सरकारांस आहे. त्यास द्यावे. मोबदला प्रतापगड व आणखी एक किल्ला तुम्हास देऊं. याप्रों जाबसाल लाविला आहे. + + + वसईहून ब्राह्मणाच्या पोरी दोघी बहुत खुबसुर्त्या व लावण्या बहुत चांगल्या गातात त्या आणविल्या आहेत. बहुत परत पोशीनें ठेवून नित्य दिवसारात्रीं आपण व बळवंतराव नागनाथ व देवीदास सारंगीवाला याप्रमाणें बसोन लावण्या ऐकत असतात. श्री. रा. रावसाहेब यांजकडील व होळकराकडील लहान मोठा गृहस्थ व शिलेदार वगैरे कोणी सांपडतील त्यास धरून पारिपत्यें करतात. श्री. रा. भवानीशंकर पंतराजाज्ञा यांस आषाढ शु. १३ देवआज्ञा वाईंतच जाली. + + + पुरंदरकर बेरड व कोळी यांणीं दिव्याच्या घाटापासून पुलापर्यंत व पश्चमेस सिंहगडपर्यंत दंगा बहुत करोन वाटा बंद केल्या आहेत. मुख्या बेरड याचा भाऊ हैबती साताऱ्यास रा. नाना पुरंदरे याजपाशीं होता त्यास पुरंदरे यांणीं हैबतीस पुण्यास आणोन श्रीमंतांची भेट करोन लाख रु. नजर देवून सरकारांतून पागेचीं वस्त्रें हैबतीस देवून पुरंदरे यांणीं आपणाजवळ ठेविला आहे."

---

नं. ६७११. श्री. (आश्विन शु॥ ३ – १९ सप्टें.)

पै॥ छ॥ ११ जमादिलाखर सन आर्बा.

सेवेशीं. सा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २ जमादिलाखरपावेतों स्वामींचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. माहे गु॥ सात

आठ पत्रें सेवेशीं पाठविलीं आहेत. पाहोन सविस्तर मजकूर ध्यानांत आला असेल. प्रत्योत्तरें द्यावयास आज्ञा जाली पाहिजे. हलीं येथील वर्तमान तरी, श्रीमंतांचे शरीरास ज्वरांशामुळें एक मास प्रकृत ठीक नव्हती. त्यास छ० २८ जमादिलावलीं स्वारी कोथरूडच्या बागांत जाऊन इंग्रजांकडील व भोसले याजकडील राजश्री खंडोपंत व राजश्री सदाशिव माणकेश्वर यांस बोलावून कोशल अर्ध रात्रपर्यंत जालें. त्यांत शिंदे होळकर भोसले वगैरे यांचा जमाव भारी होऊन पैठणानजीक आले. पुढें युद्धाची प्रसंग. पुढें कसें घडेल? येविशीचे अंदेशे श्रीमंतांनीं त्रिवर्गास पुसले व खासा स्वारी येथें असावी किंवा पूर्वस्थळास जावें. त्यास खंडोपंतांनीं विनंती केली जे, सरदारांनीं इंग्रजांस मोडले असतां स्वामींस सरदारांच्या इतलखांत चालणें प्राप्त आहे. व इंग्रजांनीं सरदारांस मोडिलें असतां सरदार चौ दिशांत जाऊन जमाव करून मुलूख बेचिराख करतील आणि इंग्रज स्वामीचा बंदोबस्त करून ठेवून मुलखांत अंमल दखल करतील. त्यास स्वामींस दोनीही पक्ष सारखे. त्यांस स्वामींनीं कायम मिजाज करून फौजेचा जमाव करून येथेंच रहावें. फौजेचा जमाव केला असतां उभयतांवरही दाब अशी विनंती केली. नंतर इंग्रजांचें वकिलांनीं व सदाशिव माणकेश्वर यांणीं मिळोन विनंती केली जे, आम्ही स्वामींशीं भाईचारा करून चाकरीस हजर जालों आहों. त्यास स्वामींचे शत्रूसी आम्ही लढून बारबाद करून देऊं व सरंजामास व फौजेस पैका पाहिजेसा असल्यास देऊं. साहेबीं खातरजमेनें पुण्यांत असावे म्हणोन श्रीमंताचे खातरजमेचें बोलून अर्धरात्रीस स्वारी माघारी आली. नंतर छ० ३० जमादिलावलीं स्वारी नव्या वाड्यांत जाऊन तेथें राजश्री बळवंतराव नागनाथ व सदाशिव माणकेश्वर यास बोलावून तेथें प्रहरभर खलबत होऊन किल्ल्याकोटाचा सरंजाम व बंदोबस्त व बंडाच्या पारिपत्याचे विचार येविशींचें खलबत होऊन स्वारी वाड्यांत येऊन महिनाभरपर्यंत स्नान नव्हतें. त्यास छ० ३० रोजीं स्नान केलें. अलीकडेस प्रकृत हुशार आहे. छ० १ रोजीं चाफेखणावर दिवाणखान्यांत गोखेंत येऊन बसले होते. पेशजी इंग्रजांचे विचारें ठरलें जे, फौज जमा करावी, त्यावरून कुल सरदार व पागे पथके व मानकरी व

एकांडे व इतलाख यांस सरंजामसुद्धां येण्याविशीं.पत्रें गेलीं आहेत. वसली पलटणेंसुद्धां आंवडास दाखल होऊन: बीड जालनापूर वगैरे येथें अंमल कायम करून सरदारांच्या मोहोऱ्यावर पलटणें पाठविलीं होतीं. त्यास सरदाराकडील फौजा येऊन जालनापूर येथें लढाई होऊन हजार बाराशें मनुष्य इंग्रजांकडील कापून जालनापुरीं ठाणें बसाविलें. त्यावरून वसली आंबेडाहून बिडावरून हटून पैठणास येऊं लागले. तेव्हां सरदाराकडील फौजांनीं येऊन बसलीशीं गांठ घातली. तेथेंही लढाई बरीच होऊन बसली निघोन पैठणास आले. बसलीच्या पिच्छावर शिंद्याकडील व होळकराकडील पेंढार वीस हजारपर्यंत बिलगून मनुष्य गोटाबाहेर येऊं देत नाहींत. मीठ वगैरे धारण बसलीचे लष्करांत दीड दोन शेरपर्यंत जाली आहे. खासा शिंदे व भोसले व फडके हे परस्परें सहा कोसांचे तफावतीनें बसलीपासून वीस कोसांवर आहेत. मशीराकडील फौज राजश्री सखो रुद्र बसलीबरोबर आहेत. औरंगाबादेस मशीराकडील पलटणें आहेत. त्यांच्या पीच्छावर होळकराकडील शामतखान व मीरखान व शिंदे बहादुर याजकडील राजश्री गोपाळराव व भोसल्याकडील राजश्री विठलराव ऐसे मिळोन पंचवीस हजार फौजेनिशीं आहेत तेथेंही एक लढाई चांगली जाली म्हणोन वर्तमान आलें आहे. राजश्री येशवंतराव होळकर महेश्वरनें निघोन आले. घाट चढून आल्याचें वर्तमान आलें आहे. ते येऊन त्रिवर्गाची मसलत होऊन पुढें दक्षिणेस जावयाचा विचार किंवा बसलीचें पारिपत्य करून नगरास दाखल व्हावें ऐसे कित्येक विचार ते आल्यावर ठरण्यांत येतील. परंतु शिंद्याचे विचारें बसलीचें पारिपत्य करून नगरास जावें हा बेत आहे. शिंदे बहादुर याजबरोबर पेरूकडील दहा पलटणें व समरूचे बेगमेकडील दहा पलटणें व हुजूरचे अव्वल कंपूपैकीं दहा पलटणें ऐसीं तीस पलटणें आहेत. त्यास पलटणांतील गोरे इंग्रज सरदार आहेत त्यांचा भरंवसा नाहीं. म्हणोन ते सारे एकत्र करून शिंदे बहादर यांणीं आपणापासून अलाहिदा सहा कोसांवर सरदार मात्र राखून बंदोबस्तांत आहेत. भोसले यांणीं नागपूरचा बंदोबस्त उत्तम प्रकारें करून बंगाला व कलकत्ता या रोखें फौजा ठेवून मग खासा पन्नास

हजार फौज व दोन कंपूनिशीं आले आहेत. त्यांस बंगाले प्रांतीं बापू घाटगे फौजसुद्धां आहेत. व. कलकत्याचे रोखें इरे प्रांतीं महाडिक फौजसुद्धां आहेत. याप्रमाणें तिकडील मजकूर आहे. सुरतकर इंग्रज यांणीं भडोच व पायागड वगैरे नर्मदा व तापीतीर व महीतीर व गुजराथेंतील झाडून ठाणीं बसवून अंमल दाखल केला. हुजूर चार कारभारी होते त्यापैकीं रघुनाथराव कैलासवासी जाले. सदाशिव माणकेश्वर कुल एखत्यारी मसलतीच्या कामकाजांत आहेत व खंडेराव रास्ते हे महाली मुलकी व खर्चावेचाचे तजवीजींत असतात. बळवंतराव नागनाथ हे लोकांच्या बोलण्या चालण्याच्या मध्यस्थींत आहेत. त्यास तेथील विचार पाहतां ' सर्वबायुर्धूपासूर्यज्योति ' याप्रमाणें विचार आहे. त्यास स्वामीकडील मंडळाच्या बोलण्यांत तेच होते व हल्लीं आपल्याकडील सर्व बोलण्यांत तेच आहेत. श्री॥ राजश्री आपासाहेब यांणीं श्रीमंतास खातरजमेचें पत्र पाठविलें त्याचें उत्तर आलें तें व राजश्री बळवंतराव यांणीं आपणाकडून आपासाहेबांस पत्र लिहिलें आहे तें राजश्री बाबजीपंत यांचे स्वाधीन छ० १ रोजीं बळवंतरावजींनीं केलीं तीं सेवेशीं बाबजीपंत यांणीं पाठविली असतील त्यावरून सविस्तर मजकूर ध्यानांत येईल. औरंगाबादेवर लढाई होऊन मीरखान पठाण याजकडील लोक गोवर्धनदास व जिवाजी यशवंत पडले व गोपाळराव यास छऱ्याचा गोळा लागोन जखमी जाले व मशीरच्या पलटणापैकीं हजार बाराशेपर्यंत मनुष्य कापलें म्हणोन वर्तमान शहरांत आलें आहे. एका दो रोजीं आमच्या डाकेचीं पत्रें येतील ह्यावरून पक्केपणें समजेल त्याप्रमाणें सेवेशीं लिहूं. पैठणच्या पलीकडल्या बाजूस शहरानजीक बसली व सखो रुद्र यांचा मुक्काम होऊन पेंढार यांणीं गिर्दनवानी करून बहुत बेजार केलें आहे म्हणोन सरकारांत पत्रेंच आलीं. हरीपंत भावे यांच्या हाताखालीं सरकारांतून जप्तीच्या कामास रावसाहेब यांणीं त्रिंबकपंत गोखले व बापू कुंडे वगैरे दिल्हे होते ते हल्लीं कैदेंत आहेत त्यास व आणखी दहा पांच असामी जप्तीच्या कामांत होते त्यास छ० २७ रोजीं श्रीमंतांनीं त्रिंबकपंत गोखले व कुंडे वगैरे नऊ असामी यांस बुधवारच्या चौकांत बाळोजी नाईक भिडे यांच्या दुकानासमोर उभे करून चारी रस्ते बंद करून एक एकास पांच

पांच असामी जेरबंदानें मारीत होते. याप्रमाणें नवांचे पारिपत्य करून पुन्हां बंदांत नेऊन ठेवलें. मोरोबा दादा फडणीस यांची स्त्री व सून व नातू लोहोगडीं आहेत त्यास पुण्यास आणोन खर्चाचा बंदोबस्त करून देऊन स्वस्थ वाड्यांत असावें याप्रमाणें दादाकडील हरिपंत केतकर यांस बोलावून सदरहूप्रमाणें आज्ञा जाली आहे. पुण्याबाहेर इंग्रजानें गणेशखिंड व येलवडें व संगम व बानवडी या रोखें बातीऱ्या बांधोन तयार केल्या. पुढें शहरचें नाकें पाहून समोवतें बांधीत चालला आहे. आम्ही शिंदे बहादुर यांच्या लष्करची डाक सुरू केली. दोन तीन पत्रें रवाना जालीं. उत्तरेंही बरचेबर येतील तीं सेवेशीं पाठवीत जाऊं. अलीकडे दिल्लीहून पत्रें आलीं नाहींत. आल्यावर सेवेशीं पाठवितों. लष्करांतून पत्रें येतील त्यांत शिंदे होळकर भोसले फडके व नबाब व रावसाहेब इतक्यांकडील सविस्तर वर्तमान येत जाईल. तेंच सेवेशीं पाठवीत जाईन. श्री॥ राजश्री बाबासाहेब तासगांवाहून भोसल्याकडेस जातात म्हणोन भोसल्यांचें वकील खंडोपंत यांणीं श्रीमंतांस सांगितलें. श्रीमंतानीं बळवंतराव नागनाथ यांसही विचारलें. त्यास जावयाचा बोभाट बहुत जाला आहे. येथील दरबाराप्रमाणें व कारभाराप्रमाणें राजश्री बाबजीपंत पटवर्धन आहेत ते ठीक आहेत. पुढें होईल मजकूर तो सेवेशीं लिहूं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

———

नं. ६७१२ श्री. (नक्कल.) (आश्विन शु० ३–१९ सप्टें.)

पै॥ छ० २ जमादिलाखर.

विज्ञापना. राजश्री खंडोपंत नि॥ वैद्य याजपाशीं श्रीमंतांनीं पुसलें कीं पटवर्धन भोसल्याकडे जाणार म्हणोन ऐकतों हें काय ? तेव्हां महाराजेनल्हे यांणीं विनंती केली जावयाचे भाव आहेत परंतु निश्चयांत नाहीं. तेव्हां श्रीमंत बोलले जावें असें ठरलें आणि गेले तरी हरि परशराम जातील. रामचंद्र परशराम यांणीं मजपाशीं खातरजमा केली आहे. ते आम्हाशीं कोणत्याहीं प्रकारें बांकडे जाणार नाहींत ही आमची खातरजमा आहे. तुम्ही त्याविशीं काळजी करूं नये. जे वेळेस प्रसंग पडेल तेव्हां आमची सूचना केली असतां आम्हापाशीं आहेत असें समजावें याप्रमाणें बोलणें झालें व

आणखी एक दोघाजवळ याच गोष्टी निघाल्या त्याजपाशींही हीच खातर-जमा बाडिलाविशीं करीत आहेत. जाहला मजकूर बाडिलांस समजावा म्हणोन लिहिलें आहे व आणखी मशारनिल्हेजवळ बोलले कीं, इंग्रजाची व रामचंद्रराव यांची एकवाक्यता आहे, असें पहिले म्हणत होतों परंतु त्याज-विशींही खातरदास्त जाली. आमचे आज्ञेशिवाय त्यास दुसरा अर्थ ठाऊक नाहीं याच अन्वयें बोलणीं पडत आहेत. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६७१३ श्री. (नकल) (आश्विन शु. ३ – १९ सप.)

छ० जमादिलाखर.

विज्ञापना. राजश्री खंडोपंत वैद्याकडून सरकारांत यावयाचें कारण श्रीमंतांशीं फौजेचा भरणा नाहीं. त्रिवर्ग सरदार येतात परंतु त्यांच्याही नदरा ठीक नाहींत यास्तव मशारनिल्हे यांणीं येऊन विनंती केली, आपण स्वस्थ बसला, जमाव कांहींच नाहीं. तेव्हां दौलतीचा परिणाम कोणता योजिला? आपण म्हणतील इंग्रज आमचे, आम्हांस कोणेविशीं भय नाहीं. तर तें चित्तांत आणूं नये. इंग्रजांची प्राबल्यता जाली असतांही आपणांस वाईट. मराठे येतात हेही बळावले असतां वाईट. याजकरितां पन्नास हजार जमा फौज हुजूर करावी. पंचवीस हजार फौज पटवर्धन यांजकडून जमा करवावी व हुजूर पंचवीस हजार लहान मोठे सरदार आहेत त्याजकडून जमा व्हावी. पन्नास हजार फौजेची जमीयेत स्वामींजवळ असतां कोणीहि आले तत्राप चिंता नाहीं. हें होत नाहीं तरी स्वामींचा परिणाम यथास्थित दिसत नाहीं. याअन्वयें आल्यापासून चार पांच वेळां स्पष्ट बोलले व मुत्सद्दी याजपाशींही बहुतप्रकारें सांगितलें. तत्राप तें कोणाच्या चित्तांत येईना. रामचंद्रराव येथें आले होते त्यास जाऊं कसें दिलें? नांवाचे माणूस या प्रसंगीं जवळ असावें म्हणोन मशारनिल्हे श्रीमंताजवळ बोलले. त्याजवरून बारंवार दर बैठकेस बाडिलाविशीं खातरजमा करतात अशी धुंदी. मशारनिल्हे जमावाविशीं विनंती करतात हे खातरजमा करतात इतकाच प्रकार. खंडोपंत थकले. आल्या मार्गे जावें म्हणतात. जाला मजकूर लिहिला आहे हे विज्ञापना.

नं. ६७१४ ( आश्विन शु० ३-१९ सप्टें. )

उतारा—पत्र माधवराव अनंत रास्ते यांचें बागलकोटाहून मिरजेस.

ता. छ० २ जमादिलाखर सन अर्बा.

" प्रस्तुत इंग्रजांचा जमाव कोठें आहे ? बातमी आली असेल ती कळवावी म्हणोन लिहिलें. त्यास इंग्रजांचा जमाव आहे तेथेंच आहे. त्याजबरोबर सरंजाम गोरा फिरंगी दोन हजार, व तुरुकस्वार दोन हजार, व चटेकरी चार हजार व बुणगे सहा सात हजार व हत्ती वीस पंचवीस व तोफा सोळा येणेंप्रमाणें व खलक गुरें ढोरें वगैरे बहुत आहेत. अद्यापि कोणीकडे जाणार याची बातमी फुटत नाहीं. रा० चिमणाजी त्रिंबक जोग पागे येथें आहेत. त्यांची मुलें मनुष्यें नगरासंनिध खेडेगावीं आहेत. तेथून वर्तमान आलें कीं, भोसले व शिंदे पैठणास येऊन भागानगरास गेले. रा० बाबा फडकेही समागमें आहेत. वसलीची पलटणें राक्षसभुवनावर आहेत. त्याच्या तोंडावर शिंदे यांजकडील रा० गोपाळराव व भोसले यांजकडील विठ्ठलराव व पेंढार मिळोन पन्नास आठ हजाराचा जमाव ठेविला आहे. तेथील स्थापना करून मग पुणियाकडे यावें. होळकर अद्याप दाखल जाले नाहींत. त्याजकडील फौज मात्र कांहीं समागमें आहे. तेही दरमजल येत आहेत. इंग्रज आपले जागां सर्द आहेत ! त्रिवर्गांची जमेत भारी आहे. काय घडेल तें पहावें. पुणियांतील लोक झाडून सावधगिरीनें सडे जरार जाले आहेत. कोणी निघोनही जात आहेत. परम कठिण काळ आहे ! ईश्वर इच्छा ! "

---

नं. ६७१५. ( आश्विन शु. ५ – २१ सप्टें. )

उतारा–पत्र मिरजेस कृष्णराव यशवंत यांचें.

" इंग्रजांचा मुक्काम सात आठ रोज लकीहाळावर होते. फौजेची आवई मलप्रभा उतरोन गजेंद्रगडावरोन व बदामीवरोन जाणार म्हणोन एक आवई. एक आवई कृष्णा उतरोन पुण्यास जाणार. दोन्हीं संधानें चुकावोन नंदवडगांचे पूर्वेस नवली चितापूर कृष्णातीरीं मुक्काम जाला. दोन तीन रोज जाले. बरोबर सरंजाम गोरा सुमार २०००

चटेकरी सुमार ५००० तोफा सुमार १६ येणेंप्रमाणें आहे. पुढें कोणी-कडे जाणार याची बातमी पक्की आली नाहीं."

---

नं. ६७१६. श्रीगणपति. (आश्विन शु० ६-२२ सप्टें.)

पै० छ० २० जमादिलाखर. मंदवार. दहावा तास. आर्बा मय्यातैन.

विज्ञापना. तागायत छ० ५ जमादिलाखरपर्यंत कुशल असों. विशेष. पुण्याहून पत्रें आलेलीं पाठविलीं आहेत. पाहून पाठवावीं. पत्रें सुमार ९ नऊ आहेत. तवूरकर देसाई, व पाच्छापूरकर व करवीरकराकडील खंडोजी भोसले मिळोन मुरगोडचें ठाणें घेतलें. मनोळीस येणार. पुढें यादवाड गोकाकप्रांतें दंगा करणार म्हणोन महालकरी याणीं लिहिलें होतें. कळावें विदित होय हे विज्ञप्ति.

---

नं. ६७१७ श्री. (आश्विन शु० ७-२३ सप्टें.)

पै॥ छ० ६ जमादिलाखर सन आर्बा मय्यातैन

विज्ञापना. जालने पैठणाहून ब्राम्हण आले त्यास जालने सोडून आज बारा दिवस जाले. त्यांचे सांगण्यांत जालन्यास इंग्रजांनीं ठाणें बसविलें होतें. तेथें शिंदे व भोसले यांची फौज येऊन जालनें घेतलें. तेथें फिरंगी गोरे कांहीं मारले. इंग्रजांचा मुक्काम बदनापूर रोशनगांव येथें आहे. भोंवते पेंढारी त्रिवर्गाकडील फिरतात. इंग्रजांकडील रसद बंद केली आहे. नेहमीं वही पेंढारी मारतात. फिरंगी औरंगाबादेच्या आसन्यास जाणार. मोंगलाकडील फिरंगी व वसली एक होणार होते. गाढिले वगैरे बरोबर आहेत. बाबा फडके शेळूचे सुमारें आहेत. मोगलांचे व यवनांचे व शिंदे भोसले यांचे बोलणेचे मध्यस्थीत आहेत. शिंदे भोसले यांस घेऊन हैदराबादेस जाणार आणि मोंगलांचा नातू आहे त्यास गादीवर बसवून पोलादजंग व मशीर याचा बंदोबस्त करावा असा बेत आहे. सखो रुद्र आंबड प्रांतांत आहे. त्याची फौज फितुरी असें इंग्रजांस कळलें आहे. मोंगलाकडील इंग्रज सखो रुद्र यास धरावें या मनसब्यांत आहेत. याप्रमाणें वर्तमान सांगितलें. ब्राम्हण जालन्यांत लुटले गेले सबब इकडे पंढरपुरावरून आले. शांतो-

त्याजवळ इंग्रजांकडील दोनशे लोक खजिना घेऊन जात होते त्यास सांगोलकर यांणीं लुटलें म्हणोन यांणींच सांगितलें. कळावें हे विज्ञापना. रवाना गुरुवार. खासा होळकर मागें वीस कोसांवर आहे तो सडा येणार. तूर्त दंगा मोंगलांचे तालुकेंत आहे. हे विज्ञापना.

---

नं. ६७१८ श्रीगणराज. ( आश्विन शु० ७-२३ सप्टें. )

पै. छ० ७ जमादिलाखर अर्बा मयातैन.

अपत्यें अप्पानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाइत छ० ६ जमादिलाखरपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. फरासीसांचीं दोन पलटणें गोमांतकास आलीं आहेत राहावयास जागा मागतात याप्रमाणें वर्तमान आनगोळाहून आजच आलें त्यावरून विनंती लिहिली आहे. पट्टणाहून गडी आला त्याचे जबानीचे सांगण्यांत पट्टण फराशीसानें घेतलें. या प्रमाणें लिहिलें होतें. त्यावरून विनंती ली॥. परंतु हे वर्तमान तहकीक दिसत नाहीं. विदित होय ही विज्ञापना.

---

नं. ६७१९ श्री. (नक्कल) (आश्विन शु० ८--२४ सप्टें.)

विज्ञापना. तागायत छ. ७ जमादिलाखर मंदबासरपावेतों यथास्थित असे. विशेष. घाटगे काल पर्वतीस दोनप्रहरीं येऊन दाखल जाले. चारशे लोक समागमें आहेत. सरकारचें दर्शन कधीं घेतात पहावें. छ. ३० जमादिलावलीं गोखले याजकडून पत्र आलें. त्यांत दहीगांव पिंपळगांव नजीक आंबेड येथें बसलोंचा मुक्काम आहे. काल इंग्रजांकडील चार पांच हत्ती व उंटें व तट्टें व स्वारांचीं घोडीं पेंढारी यांणीं पाडून नेलीं दिवस रात्र चैन पडो देत नाहींत. दोन शेराची धारण आहे. याप्रमाणें पत्रीं मजकूर होता. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६७२०. श्री. [ नक्कल ] [ २६ सप्टेंबर. ]

पै॥ छ॥ ३० जमादिलाखर अर्बा मय्यातैन.

विनंती सेवक पांडुरंगें चिमणाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत आश्विन शु. १० पावेतों मुक्काम लष्कर आजिंठा येथें सेवकाचें वृत्त यथास्थित असे. विशेष. लष्करांत येऊन पोहचल्याचें विनंतीपत्र पेशजी डाकेवरून पाठविलें तें पावलेंच असेल. त्यानंतर अष्टमी शुक्रवारीं दोनप्रहरीं बसलींचें कूच होऊन त्यास व यास पांच कोस अंतर होतें. बसलीकडील तुर्कस्वार व कांहीं दोन तीन पलटणें तलाव्यास आलीं. त्यावर इकडील पलटणांच्या तोफा लागू केल्या. सहा घटका पावेतों इकडील तोफा चालत होत्या. लढाई मातबर जाली. बसलीकडील बारा तेराशें गोरे व तेलंग पांच सातशें तोफांच्या मारगिरीनें ठार पडले. नंतर दौलतराव शिंदे यांणीं जलदी करून तिकडील मोड जाला असें पाहून घोडीं घातलीं. पूर्वी लढाईचा बेत अगदीं नव्हता. जमेयत थोडी पडली आणि दौलतराव त्याजवर उठले तेव्हां इकडील तोफाही बंद जाल्या. इतक्यांत इंग्रजांकडील तुर्कस्वार यांणीं संध पाहून एकंदर बाजूनें उलटले. तेव्हां शिंद्याकडील यादवराव भास्कर पडले. आणखीही दोपन्नास माणूस जाग्यावर ठार झालें. नंतर लढाई बिघडली. शिंदे तेथून माघारे निघाले. त्यामुळें शिंद्याकडील पंचवीस तोफा जिनसी थोर व पलटणी मिळोन गेल्या. इकडील तीन पलटणें मारलीं गेलीं. बाकीच्या तोफा शंभर, पंधरा सोळा पलटणें व झाडून उभयताकडील फौजा बचाऊन माघाऱ्या निघाल्या. बुणगें अगोदरच निघोन आजिंठ्याचे घाटाखालीं आलें होतें. तेथेंच सारी फौज तोफा पलटणेंसुद्धां नवमीचे दिवशीं रात्रीं आली दसरेचा समारंभ येथेंच जाहला. उद्यां येथून कूच करून गोदातीरास जाणार. बसलीही मराठे फौजेची दरद खात आहे. परंतु लढाई बिघडल्यापासोन चार टोळ्या चहूंकडे नेहमीं छबीने करितो. आतां दोन चार रोजांत फिरोन गांठ घालावी हा इरादा होत आहे. सडे होऊन गंगातीरास नबाबाचे मुलखांत जाणार. आज सिद्धता जाहली. उद्यां कूच होणार. लढाई शिंद्यांकडील पलटणांनीं चांगली केली. परंतु फौजेच्या हातून धीर

---

१ पांडुरंग चिमणाजीला पटवर्धनांनीं नाग. भोसल्यांकडे मुद्दाम वकिलीस पाठविला होता.

पे. ले. सं. १२.

निघाला नाहीं. या फौजा मोठ्या म्हणून इतकें तरी सामान बचावून निघालें आणि बसलीकडील फौजांनीं पाठलाग अगदीं केला नाहीं. होळकरांकडे पत्रें जलद रवाना जालीं. मलाही लवकर येण्याविषयीं पुसत होतें. परंतु आमचे जाबसाल व्हावयाचे आहेत ते उरकून घेतल्याविना लवकर येतों असें कसें म्हणावें? हें मनांत आणोन मी त्यास उत्तर केलें जे, दोन रोज लढाईचे गडबडीमुळें बोलणें कोणतेंच जाहलें नाहीं. आम्हांकडील बोलणीं सारीं मी बोलून ठेविलीं आहेत. त्याचीं उत्तरें समर्पक आलीं म्हणजे जलद यावयाविषयीं विनंतिपत्रें लिहितों. याप्रमाणें उत्तर केलें, श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६७२१ ( आश्विन शु. १०—२६ सप्टें.)

उतारा—पत्र धोंडो बापूजींचें पुण्याहून मिरजेस.

" श्रीमंतांस गुदस्तापासून नदाचा उपद्रव जाला त्यामुळें हल्लीं प्रकृत ठीक नाहीं. पंतप्रतिनिधींची स्वारी बांईत येऊन देशमुख देशपांडे व सनदे इनामदार यांजपासोन आठ हजार रुपये घेऊन किनईस गेले."

---

नं. ६७२२ श्री. ( आश्विन शु० १२-२८ सप्टें )

पुण्याहून बाबजीपंत पटवर्धन यांचीं पत्रें आलीं छ० ११ जमादिलाखरचीं. मिरजेस छ० १६ जमादिलाखरीं आलीं. त्यांतील हांशील—

खंडोपंत वाड्यांत गेले तेथें श्रीमंतांची गांठ पडली. ते समयीं श्रीमंत बोलले कीं रामचंद्रराव निघोन गेले ते जाऊन स्वस्थ बसले. पुढें योजिलें काय? इंग्रजांचे व त्याचें वैमनस्य अतिशय आलें. त्यांत दिक्कत नाहीं. तेव्हां घरींच बसून परिणाम काय? तेव्हां खंडोपंत यांनीं विनंती केली, ते स्वामींच्या आज्ञेची मार्गप्रतिक्षा करतात. आज्ञा गेली असतां स्वस्थ बसणार नाहींत. त्याजवर उत्तर जाहलें जे, याप्रसंगीं मी खूण देणार नाहीं. त्याणीं जमाव केला असतां मला संतोष व त्यांत त्यांचें कल्याण. आणि चहूंकडे दाव. आम्हांस प्रसंगोपात्त तिकडील भरंवसा. तेव्हां मशारनिल्हे बोलले खूण देत नाहीं स्वामी म्हणतात परंतु कांहीं इशारा असावा. तेव्हां

आज्ञा जाली जे, तुमचेसमक्ष बळवंतराव यांस इशारा करतों. त्यांणीं मुच-बावें याप्रमाणें बोलणें जालें. रामचंद्रराव याजाविशीं दुसरा अर्थ नाहीं. ते जितकी जुवामर्दी करून दाखवितील तितका हर्षच आहे. हें बोलणें खंडोपंतांनीं सांगितलें. इशाराही होईल. कलम १

इंग्रजांकडील समेटाचें बोलणें सरदारांकडे लागलें. इकडील उत्तरें जर-बेचीं गेलीं त्यांतील हांशील, तुमचा फैलाव कृष्णेवर असूं नये. जसा प्रसंग पडेल तैसें आटपून घेतील. नाजूक वार्ता आहे. लेख नाहीं. कलम १

विंचूरकराबरोबर बाळकृष्ण गंगाधर याणीं जावें व नारो नरसिंह घायगुडे यांणीं जावें. त्याचीं कामकाजें बाबांनीं करून द्यावीं, पांचशे स्वार द्यावे, विंचूरकरांच्या पेस्यांत चाकरी करावी. कलम १

पर्जन्य नाहीं. धारण चांदवडी. ८८२ हरभरे २॥ जोरी ८॥ तांदूळ. तूप पाऊणशेर. कलम १

सर्जेराव घाटगे छ० ९ जमादिलाखरीं इंदुबारीं भेट जाली. चार घटका बैठक जाली. भेटी जाहल्यावर लाख रुपये द्यावे ऐसा करार आहे. काय घडतें पहावें. कलम १

विंचूरकराकडील इंग्रजानीं उरपाड व सावनूर तालुका सोडला. मोब-दला अंतर्वेदीचा मुलूख टोपीकरांस दिला. सावनुराविशीं बाळकृष्णपंत खटपट करीत आहेत. कलम १

भिल्लांचा दंगा चाळेपावेतों आला. पुरंदरकर बेरडानीं अनर्थ मांडि-ला आहे. कलम १

पुण्यांस दसरा रविवारीं सरकारांतून जाहला. गावांत कोणी कोणी सोमवारीं सीमाउल्लंघन केलें. सर्व शिष्टांनीं इंदुवारीं दसरा केला. कलम १

उभयतां सरदारांचे सैन्यांतून छ१॥ पंचमीचीं पत्रें आलीं. फौजा झाडून एकत्र जाहल्या. शिंदेकडील पलटणें तोफखाना, भोसले यांजकडील पलटणें बाणांचे उंट पांचशें आले ते झाडून फौजेस मिळाले. फौजेंत धारण बारा शेरांची. नित्य तलावे. रातीस छबिना. पेंढारी यांणीं तों शर्त केली. फौज सारी एक दिल. टोपीकर झाडून बदनापुरावर आहेत. त्यास फौजेस आठ कोसाचा फांसला आहे. नित्य गोळागोळी चालली. फौजेंतील लोक पुढें

गेले तेथें कटकट जाली. पांच गोरे धरून नेले. एक हत्ती शेसवाशें माणूस जाया जखमी. टोपीकरांचे सैन्यांत शेराची धारण. टोपीकर जुमामर्द परंतु यापुढें हवालदील जाले आहेत. कलम २

इंग्रजांकडील दोन पलटणें रसद भरावयास आलीं आहेत. कशी निभावतील न कळे. कलम १.

शिंद्याकडील पायगड इंग्रजांनीं घेतला. छ. रोजीं बातमी आली. एकवीस तोफा कर्णेल याणीं केल्या. कलम १.

सदाशिवपंतास हत्ती दिला. सीमाउल्लंघनास अंबारी प्रत्येक दिली. नबाबाकडे गुदरतां गेले तेव्हां पंचवीस हजारांचें जवाहीर बरोबर दिलें तें बक्षीस दिल्हें. दिवाणगिरीचा डौल दिसतो. कलम १.

दिनकरपंत पटवर्धन यास आज्ञा जाली जे, हुजूर फौज नाहीं तर तीन पथकें मिळोन हजार स्वार आणवावे. प्रसंगास विश्वासू जवळ असावे. पटवर्धन यांस आज्ञा जे तुम्ही सूचना अगोधर करावी. स्वार येतात असें जाल्यास सरकारचें पत्र जाईल. त्याजवरून पटवर्धन याणीं मला व अन्याबा जोशी चि॥ चिंतामणराव आपाकडील यांस नेऊन विनादिक्कत फौज यावी ऐसें सांगून आपलें पत्र दिल्हें. आम्हीही पुरवणी लिहून जोशी याजवळ दिल्ही. दुसरे दिवशीं पटवर्धन याणीं अन्याबास बोलावून नेऊन लाखोटे माघारे घेतले. आमचीं पत्रें आम्ही घेतलीं. तेव्हां आम्ही पुसलें कीं लाखोटे माघारे घेतले कारण काय? त्यास बोललें कीं, माधव आत्या हुबळीस आहेत. घरीं बसोन परिणाम काय? इशारा गला. कृष्णा दक्षिण तीरानें जावें. तिकडील कामगारी व्हावी ऐसा रंग बोलण्यांतील दृष्टीस पडला. कलम १.

पुण्यांतील पलटणी लोक छ. १० रोजीं गणेशखेडजिवळ बुरूज बांधोन जलदबाराची कवाईत केली. कलम १.

श्री॥ सौ॥ मातुश्री उभयतां बाईस श्रीचे स्नानास जाणार. बरोबर सदाशिवपंत भाऊही जाणार. कलम १.

---

नं. ६७२३ श्री. (२९ सपटेंबर.)

दे॥ छ० १२ जमादिलाखर सन आर्बा मय्यातेन.

विज्ञापना. तागायत आश्विन शु॥ १३ गुरुवार क्षेम असे. विशेष. मुरापूरकर पंधरा वीस हजार फौजेनिशीं निडगुंदीस आले. तेथें ठाणें घालून गांवास दंड दीड लक्ष रुपये ठरविला. वसूल होत आहे. पुढें श्रीकृष्णा उतरावयाचा मनसबा. नदीस पाणी उराइतकें आहे. राजश्री बळवंतरावजी रास्ते याजवर छापा घालणेचा मनसबा होता. तें वर्तमान समजोन ते अथणीस गेले म्हणोन वदंता आहे. अद्याप पत्र आलें नाहीं. श्रीकृष्णेचे घाटास येथून कांहीं लोक चौकीस पाठविले आहेत. तालीकोटचीं गांवखेडीं झाडून उज्याड. अकलकोटकर यांचीही फौज मुरापूरकराबरोबर आहे म्हणतात. वर्तमान बाजारी आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. इंग्रज नंदवडगीहून कूच करून गेले म्हणोन बाजारी वर्तमान सेवेशीं लिहिलेंच आहे. परंतु नंदवडगीहून कमावीसदाराचें पत्र आलें नाहीं. अद्याप आसपास आहेत म्हणतात. फरासीस यांची तरांडीं दोन गोवेस आलीं. गोवेकर यांचे धण्याची ताकीद फराशिसास जागा देणें म्हणून आणून लाविली. तेथें इंग्रजाकडील पांच पलटणें पेशजी जागा घेऊन राहिले आहेत ते फराशिसास जागा देऊं नका म्हणतात. गोवेकर फिरंगी म्हणतात आमचे धण्याचें पत्र आलें असतां अमान्य करणेचें नाहीं. फरासीस पंचवीस हजार फौजेनिशीं गोवेस यणार म्हणोन. येणेंप्रमाणें सावकारीं गोवेहून पत्रें आलीं. कळलें वर्तमान सेवेशीं लिहिलें आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं० ६७२४ श्री. (अश्विन शु. १३–२९ सप्टें.)

पै. छ. १९ जमादिलाखर सन अर्बा. आश्विन मास.

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री गंगाधररावजी गोसावी यांसी स्नेहांकित सोमसावंत भोसले सरदेसाई प्रांत कुडाळ व महालानिहाय विनंती. उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष. चिरंजीव बापू यांचे शरीरीं त्रिदोषाचा प्रकोप होऊन आश्विन शु॥ नवमी रविवारीं प्रहांटेस देवाज्ञा जाहले. ईश्वरें अनुचित गोष्ट

केली. होणार भवितव्य ईश्वर सूत्र प्रमाण. रवाना छ. १२ जमादिलाखर बहुत काय लिहिणें. लोभ कीजे हे विनंती.

---

नं. ६७२५ श्री. (नक्कल) (आश्विन शु.१४–३० सप्टें.)

पै॥ छ० १३ जमादिलाखर. भृगुवार. अस्तमान.

सा० नमस्कार विनंती विज्ञापना ऐसी जे. मनोळीकडील वर्तमान तर पेठ काल घेतली. किल्लेस मोर्चे देऊन बसले आहेत. काय होतें पहावें. बाहेरील जमाव पायदळ दोन हजार घोडीं दोनशे सुमारें आहेत. म्हणोन वर्तमान आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६७२६ (आश्विन शु. १४–३० सप्टें.)

उतारा—पत्र धोंडो बापूजींचें पुण्याहून मिरजेस.

"श्रीमंतांची स्वारी विजयादशमीस सालाबादीप्रमाणें पेठे यांचे वाड्याजवळून गेली. वर्षास श्री. रा. चिमाजीआपा निराळे अंबारींत बसत होते. यंदा बाबासाहेबांचे खवाशीमध्यें बसून चवरी वारीत होते जातां येतांना येविशीं मात्र चाल यंदा नवी पाहिली असें सर्वत्र बोलतात."

---

नं. ६७२७ श्री. ( नक्कल. ) ( आश्विन—सप्टेंबर. )

यादी बोली राजश्री हरिहरराव परशराम मिरजकर स० १२१३ उर्फ सु॥ आर्बा मय्यातैन व अलफ. वितपशील—

| | |
|---|---|
| ३०००० | मशारनिल्हेस बमय शागीर्दपेशा वगैरे. |
| ६००००० | खासे व करोल व स्वार बमय मानकरी असामदार वगैरे २००० यासी दरा दर असामीस ३०० रु० प्रमाणें. |
| ६३०००० | २००१ |

---

१ हा तैनातजाबता नाग. भोसल्याकडून हरि परशराम यास मिळालेला आहे. पुढें हरीपंत करारप्रमाणें भोसल्याकडे गेले नाहींत त्यामुळें हा जाबता कागदांतच राहिला.

एकूण असामी दोन हजार एक यासी तैनात बारमाही रु० सहा लक्ष तीस हजार. यासी सरंजाम बितपशील—

३३०००० हुजूर पोंचल्यानंतर सन १२१३चे सालीं स्वार एक हजार बमय सरंजाम बमुली लावून देण्यांत येईल.

३०००००शिवाय स्वार हजार राहिले त्यासी नगदी रोजमुरा हजिरी घेऊन देण्यांत येईल. यासी बजाई दरशेकडा रु. २ प्रमाणें होईल. सन १२१४चे सालांत याचाही सरंजाम लावून देण्यांत येईल. असामी १००० यासी डेरा घोडा शिर बरहुकूम दरशेकडां रु. ३०००० प्रमाणें बारमाही.

———

६३००००

एकूण रुपये सहा लक्ष तीस हजार. घोडा सदरबरहुकूम करार असे. पैकीं हजेरी घेऊन गैरहजेरी बजा होईल. सालमजकुरीं जो संरजाम लावून देण्यांत येईल तो हाल बसुली लाऊन देऊं. याजवर आबादीचे पोटीं महालावर चढ होईल तो सरकारचे कारकुनाचे रुजूनें चौकशी होऊन मजरा[१] देण्यांत यावा. फडणिसाचा कारकून महालीं या कामास रुजवातीस राहील. सदरहूप्रमाणें करार असे. याशिवाय पोषाख जातीस दरसाल पांच देण्यांत येतील.

———

नं. ६७२८ श्री. (आश्विन-सप्टें.)

विज्ञापना. चिठी पाठविली ती पावली. मनोळीवर हला केल्याचें वर्तमान सांगितलें परंतु मनोळी कोणती तें लिहिणेंविशीं आज्ञा. त्यास वेशी मनोळी नेरलीपासून दीड कोसावर आहे तेथें हला केली. महात पडला. आंतून लोक बाहेर निघोन त्यांणीं मोर्चे धुडावून दिले. याप्रों नेरलीकर याचें पत्र आलें. + + + सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ६७२९ (आश्विन-सप्टें.)

+ + + + गेले आहेत. परंतु लष्करांत कांहीं माघारे लोकर जावेनी

[१] मजरा देणें = बजा घालणें.

गलबल नाहीं. लष्करांत बोलतात कीं, तळूरकरास आसरा न दिल्यास आम्हावर शब्द नाहीं. त्यापेक्षां आम्हास काय चिंता आहे बोलतात. परंतु मनोळीस वेढा दिला आहे. तेथें करवीरकराकडील, व बंटमूरीकराकडील, व तळूरकराकडील जमाव आहे. याजप्रमाणें पत्रांत मजकूर आहे. तीं पत्रें नेरलीकराचे कारकुनानें नेऊन मुख्यास समजावलीं. तेव्हां उत्तर आलें कीं लौकरच बंदोबस्त होईल. नागो शामजिनीं रा॥ बाळाजी हणमाजी व महादाजी शितोळे यास लिहिलें होतें कीं, आपण आपलें जमावानिशीं लौकर यावें. म्हणजे तुम्हीं आम्हीं मिळोन करवीरकरासी उठऊन देऊं. पुढें त्यांच्या प्रांतांत ठाणीं घालून खंडणी वगैरे जें मिळेल तें निमे निमें घेऊं. त्यास उत्तर त्यांनीं लिहिलें कीं तें कांहीं नको. दर रावतीं तीस रुपये प्रमाणें द्याल तरी येथें थोडें बहुत खर्चास द्यावें म्हणजे येतों. याप्रमाणें उत्तर दिलें. आज प्रातःकालीं शेवेसीं पत्रें पाठविलीं आहेत. पावलीं असतील. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६७३० श्री. (आक्टोबर).

विज्ञापना. राजश्री कृष्णाजी भवानी याचें पत्र छ० २४ जमादिलाखरचें सरकारांत आलें. त्यांत लिहिलें आहे जे त्रिवर्ग सरदार एक जाले. झाडून सरकारचे पदरचें माणूस इकडे येऊं लागलें. बाकीचेंही येणार तेव्हां पुढें आपली गत काय? याजउप्पर विवेक व्हावा आणि समेटाचा विचार करावा तरच परिणाम. नाहीं तर स्थीत ठीक दिसत नाहीं. याप्रमाणें बहुत सरदाराकडील वर्चस्व ठेऊन लिहिलें. तें पत्र आलेवर दोन दिवस मर्जी ठीक नाहीं. तेही लौकरच येणार आहेत. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६७३१ श्री. (नक्कल.) (आक्टोबर).

विज्ञापना. पुण्याहून इंग्रजांची बिगारी तीन चार हजारपावेतों भरून रसद पैठणास जात होती ती नगरच्यापुढें दोन मजलीवर तीन चार हजार पेंढार येऊन झाडून वळून नेली. सकाळचे प्रहर दिवसास गांठ पडली तेव्हांपासून मार्ग सोडून आडवे अस्तमानपावेतों बिगारीसहवर्तमान

गेले. तिथें झाडून ओझीं सोडलीं. रोट वगैरे शिजले अन्न होतें तितकें झाडून पाण्यांत टाकिलें. दाणामाल भरून नेला. साखरेची पेटी फोडून बिगारी यांस पावशेरप्रमाणें दिली. माणसास कोणास दुखावलें नाहीं. ते गाडी काल पुण्यास आले. त्यांनीं सविस्तर मजकूर सांगितला. वास्तविक आहे. पैठणाहून पुढें रस्त जात होती ती लुटली म्हणोन बाजारी वर्तमान आहे. मशीर यांणीं रघोत्तमराव यांस कैद केलें म्हणोन दरकड सरदार यांणीं निकड करोन मशीर मारला म्हणोन वार्ता काल आली आहे. लेख कोणाचा नाहीं. सात दिवसांचें म्हणोन वर्तमान बोलतात. टोपीकराकडील बातमी तहकीक कागदपत्र आल्यावर लिहितों. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६७३२ श्री. ( आश्विन व. १—१ आक्टोबर )

वै॥ छ. १५ जमादिलाखर सन आर्बा मय्यातैन.

अपत्यें गणूनें दोनी कर जोडून शिरसा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ. १४ माहे जमादिलाखरपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. कोपेहून बातमीपत्र आलें तें बजिन्नस वडिलांकडे पाठविलें आहे. त्यावरून सविस्तर विदित होईल. तल्लूरकर व मिरा देसाई व खंडेराव भोसले व करवीरकर हे तिघे मिळून लोक जमा करून मनोळीस वेढा घातला आहे. आंतले व बाहेरले गोळागोळी होऊन बृहस्पतिवारीं पेठ घेतली आणि किल्लेस मोर्चे दिल्हे आहेत. बरखेदर लोक जमा करतात. सध्यां जमाव त्याजवळ आहेत दोन हजार पायदळ दोनशे राऊत आहेत. इतकेनिशीं किल्लेस मोर्चे दिल्हे आहेत. येथें पेरणीचा हंगाम. गडबड जाल्यास पेरणी होण्याची नाहीं यास्तव त्याचा बंदोबस्त केला पाहिजे. बहुत लबाड आहेत. एखादे दगा करतील म्हणोन वडिलांस विनंती लिहिली आहे. प्यादे तल्लूरकर आणखी ठेवितात. आज बातमीस माणसें पाठविलीं आहेत. येतांच वर्तमान लिहितों. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६७३३ श्रीगणपति. (आश्विन व० १–१आक्टोबर.)

पै० छ० १७ जमादिलाखर. भौमवार प्रातःकाळ. सन आर्बा.

अपत्यें रामचंद्रानें शिर सां. नमस्कार विज्ञापना. तागायत छ० १४ जमादिलाखरपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. आज मनोळीकडील बातमीचीं पत्रें यादवाडाहून आलीं. मनोळीची पेठ घेऊन किल्ल्यास तल्लूरकर यांणीं मोर्चे बसविले आहेत. काल गोकाकेहूनही पत्रें आलीं. त्यांतही लिहिलें आहे. ठाणे काटकानीं घेतलें तर करवीरकरांचे घरास गेलें. ईश्वरइच्छा प्रमाण. आज कांहीं पेंढार मनोळीस पाठविलें. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६७३४ श्री. (आश्विन व. ४–४आक्टो.)

विज्ञापना. तागायत छ० १७ जमादिलाखर भोमवासरे प्रातःकालपावेतों यथास्थित असे विशेष. राजश्री बाळाजीपंत बाबा याजकडील कारकुनाचीं पत्रें छ० १२ जमादिलाखर गुरुवारचीं आलीं तीं काल छ. १६ रोजीं पावलीं. त्यांतील मजकूर छ. ८ जमादिलाखर रविवारीं आलीज्याबहादूर यांच्या डेन्यांत प्रातःकाळापासून लोकांचें धरणें बसलें. झाडून लोक एक जागां जमा जाहले. रुजूजवळ तोड निघाली पाहिजे म्हणोन राजश्री दौलतराव बाबा राजश्री सेनासाहेब सुभा यांचे डेन्यास गेले. उभयतांचे डेन्यास तीन कोसांची तफावत होती. दवूस व शिंद्याचे डेन्यास सहा सात कोसांची तफावत व राजश्री गोपाळराव भाऊ व तीन पलटणें कंपूपैकीं पुढे टोपीकरांचे मोहिल्यावर होतीं. त्यांस व बहादूर यांच्या डेन्यास तीन साडेतीन कोसांची तफावत होती. शिंदे यांजकडे धरणें बसलें ही बातमी पक्की आगवून प्रहर दिवसास खासा बसली चार पलटणें घेऊन पुढें पलटणें उतरलीं होतीं याजवर चालून घेतलें व इटकीसन व तुरुक स्वार मिळोन एक टोळी मागें उभी होती. बसलीची व शिंद्यांकडील पलटणाची लढाई सुरू जाहली. दीड प्रहरपर्यंत मारगीर बहुत जाहली. शिंद्यांकडील पलटणवाल्यानीं फिरंगी याचा काट चालों दिला नाहीं.

१ चिठी राम. आपाची जमखिंडीहून मिरजेस.

शिंद्याकडील पलटणवाले यांणीं गोपाळराव भाऊ यांस सांगोन पाठविलें कीं, लढाई सुरू जाहली. जलद तयार होऊन येणें. तेही फौजसुद्धां तयार होऊन आले. लढाईमध्यें टोपीकरांचें माणूस काळें गोरें मिळोन हजार-बाराशेंवर ठार व शिवाय जखमी. इतक्यांत टोपीकराकडील दुसरी टोळी मागें उभी होती तिणें गोपाळराव तयार होऊन इकडे आले हें पाहून त्याज-पाशीं सरकारी दहावीस तोफा होत्या त्याजवर चालोन गेले. तोफखाने-वाल्यानें जलदी करून तोफा मागें ओढाव्या तर झाडून बैल रानांत चरा-वयास गेले. नाइलाज तोफा टाकून माघारे सरले. चिटणिसाकडील दहावीस तोफा होत्या तितक्या फिरंगी यांणीं नेल्या. तोफा सांपडल्या याची फत्ते मानिली व माणूस पार पडलें हें पाहून माघारे सरले व फौज पलटणेंही माघारीं गेलीं. हिंदूंकडील पंन्नास माणूस जायां व जखमी जाहलें. पत्रांत सरकारच्या व यांच्या शिंद्याकडील पलटणवाल्यांचें लढाईचें वर्णन बहुत केलें आहे. बसली यांणीं शिंद्याकडील पलटणची लढाई पाहून चित्तांत सर्द आहेत. शिंदे भोसले यांकडे धरणें बसलें म्हणोन गेले होते तेथें भोसले यांणीं लोकाची तोड पाडली, कांहीं पडावयाची होती. दुसरे दिवशीं फौज पलटणें सुद्धां कूच करून आठ दहा कोश अजंटा घाटा-जवळ गेले. एक दोन मुक्काम तेथें जाहले आहेत. आणखीही कूच करून वाटपार जावें असाही मनसबा ठरला आहे. मागाहून बसलीही एक दोन रोजीं कूच करून त्यांचे पाठीवर जाणार. प्रस्तुत टोपीकरास व हिंदूंचे सैन्यास वीस कोसांची तफावत आहे. शिंदे भोसले मागें सरले कांहीं खराबी जाहली व फिरंगी यांजपुढें टिकाव न निघे, याजकरितां मागें सरकले असा अर्थ नाहीं. फौजेंत कांहीं पैक्याचा गवगवा व कांहीं मस-लत याजमुळें व होळकर यांजकडील पत्रें जलद येऊन पोहोंचतों म्हणोन आलीं. त्याजवरून मागें गेले व टोपीकरांस प्रस्तुत नगरची रसद. दुसरीकडून पोहचत नाहीं याजमुळें आंगावर घेऊन रसद लांब पाडावी हाही मनसबा. याप्रमाणें मजकूर तिकडील आहे. इंग्रजांकडील जखमी नगरास फार आले. दिल्ली व आग्रा इंग्रजांनीं घेतला म्हणोन बाजारी वर्तमान आहे; परंतु शिंद्यांचीं लष्करचीं पत्रें आलीं त्यांत लिहिलें आहे जे, पीरनची व

टोपीकरांची लढाई छ० २० जमादिलावलीं जाहली त्यांत फिरंगी याचाच नाश बहुत जाहला. पीरनचीं पत्रें फौजा जलद पाठवाव्या म्हणोन आलीं, त्यांजबरोबर राजश्री आंबोजी इंगळे यास जलद जाऊन पलटणांस सामील होणेंविशीं पत्रें गेलीं व अलीबहादर याजकडील फौज पीरनकडे जाणार याजप्रमाणें त्या पत्रांतील मजकूर आहे. मागाहून होईल तो सविस्तर लिहीन. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६७३५ (आश्विन व. ५ -५ आक्टो.)

उतारा- पत्र राम. आपांचें. जमखिंडीहून मिरजेस.

" निडगुंद्यास ( सुरापूरकर ) बेरडासीं दीड लाख रु. दंड बांधोन लाख रु. वसूल केले. बाकीचा वसूल चालला आहे हें खरेंच. मल्हारा बागलकोटाहून पत्र आलें त्यांत याप्रो लिहिलें आहे. "

---

नं. ६७३६ श्रीगणपति. ( आश्विन व० ८-८ आक्टोबर. )

पै. छ. २३ जमादिलाखर आर्बा मयातैन

विज्ञापना. तागाइत छ. २१ जमादिलाखरपर्यंत कुशल असे. विशेष. तहूरकर मनोलीचे पेठेंत बसले होते. ते किल्लेकरी यांणीं घुडाऊन लावले ते पंचलिंग म्हणोन ईश्वरालय आहे तेथें गेले असें गोकाकचें लिहिलें होतें. यादवाडचे आलें नाहीं. आलेवर लिहितों. बागलकोटाहून पत्रें आलीं. इंग्रजी जमाव तुंगभद्रेपलीकडे गेला. प्रमाण म्हणोन लिहिलें आहे. कळावें. विदित होय हे विज्ञापना. अंकली मांजरीहून महादजी शितोळे दोनशें स्वार व कांहीं पायदळ घेऊन मनोलीचे कुमकेस आले. कळावें. हे विज्ञापना.

---

नं. ६७३७ श्री [आश्विन व. ९ -९ आक्टो.]

पै॥ छ० २७ जमादिलाखर भृगुवार आश्विनमास. सन आर्बा.

तीर्थस्वरूप राजश्री काकासाहेब वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें बाबाजीनें चरणावरी मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २२ जमादिलाखर रविवार प्रातःकाळपावेतों वडि-

---

१ चिठी राम. आपांची जमखिंडीहून मिरजेस.

त्यांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असें विशेष. वडिलांकडून आशीर्वादपत्र येऊन सांभाळ होत नाहीं. तर सदैव पत्रीं सांभाळ जाहला पाहिजे. ती॰ राजश्री आपासाहेब पुण्याहून निघून तासगांवास गेले. नंतर मागाहून एक दोन रवानग्या पत्रांच्या इकडील भाव सविस्तर लिहून पाठविल्या. त्यावरोन स्वारी मिरजेस गेली. सविस्तर भाव वडिलांनीं वडिलांस निवेदन केले. त्यावरून चि॰ राजश्री चिंतामणराव आपा यांस वडिलांनीं बोलावून आणिलें. सालमजकुरीं स्वारीस बाहेर निघावयाचें त्याजविशींची भवति न भवति होऊन रायासच वडिलांची आज्ञा जाहली कीं, मसलत तुम्ही करवी. सर्वही तुमचे आज्ञेंत चालतील. याप्रमाणें ठरोन आपा हरिपुरास गेले. वडिलांची स्वारी तासगांवीं आली. नंतर हा मजकूर सविस्तर तासगांवीहून वडिलीं मला लिहिला. त्यास आज दोन महिने जाले. ठरल्या मजकुराचा अर्थ कोठेंच दिसत नाहीं ! आपासाहेब किंचित् समाधान नहीं म्हणोन निघोन जमखिंडीस गेले. राव हरिपूर सांगली मिळोन आहेत. चि॰ राजश्री बाबासाहेब सुमुहूर्तेंकरून श्रीविठोबाचे देवालयीं येऊन राहिले. मनसबा पोक्त ठरला. चौघे चोहींकडे गेले यांत मनसब्याचें फल कोणतें जाहलें ? असो. वडील सरकार दौलतेचे शरीख. दौलतेंत शत्रु प्रबळ शिरला. दौलत रहात नाहीं. आजपर्यंत ज्या दौलतेंत स्वइच्छा भोक्तृत्व जालें. हिंदुधर्म सर्वांनीं एकदिल होऊन राखावा. शिंदे व भोसले उभयतां एक विचारें बागों लागले. आपल्याला जमेती झाडून जमा करून शत्रुसंनिध नमूद झाले. शिंद्यांचें व होळकरांचें बद्धकटाक्ष होते तें उभयपक्षीं सर्व सोडून होळकराचें मुद्दे होते तितकेही शिंद्यांनी फैसल करून आपलेसे केले. त्यांजकडील फौज उभयतां सरदारांजवळ येऊन मिळाली. खासा होळकर मात्र अद्यापवत् येऊन मिळाले नाहींत म्हणोन मात्र वडिलांस संशय. परंतु त्रिवर्गांत एकवाक्यता होण्यास दिक्कत राहिली नाहीं. होळकर लांब राहिले ते उभयतांचे मनसब्यानेंच राहिले आहेत. आपासाहेब व चिंतामणराव आपा पुण्यास आले. श्रीमंतांच्या भेटी जाहल्यानंतर सरकारची आज्ञा जाहली जे, बंडाच्या पारिपत्यास इंग्रजांची रवानगी जाहली, त्याबरोबर तुम्ही जावें. येविशीं सरकारचे

व इंग्रजांचें आग्रह बहुतच पडले होते. परंतु इंग्रजांबरोबर जावयाची चाल नाहीं. तोच इरादा धरून न गेले. पुढें चिंतामणराव आपा रहिमतपूरचें निमित्त करून निरोप निखालस न घेतां गेले. मागाहून आपासाहेब कांहीं एक शब्द अधिक दृष्टीस पडला तेवढेंच निमित्य ठेवून निघून गेले. यांत सरकारचा लोभ तो कोणता संपादिला ? पुढें मागें वैषम्यच राहिलें. इंग्रजांबरोबर उभयतां न गेले यामुळें त्यांची दोस्ती होती ती राहिली नाहीं. त्यांचें वर्चस्व जालें असतां आधीं उद्योग हाच करावा म्हणोन चित्तांत बागवितात व उल्लेखही वारंवार निघतात. त्रिवर्ग सरदार उत्तरेचे राजे. आपला हिंदुधर्म राखोन स्वामीचे दौलतेंत शत्रु शिरला. त्याचें पारिपत्य करून दौलत राखूं हा इरादा धरून सरंजामानिशीं येऊन उभे राहिले. वडील दक्षिणचे राजे म्हणोन उभयतां सरदारांनीं ज्या रीतीनें सांगोन पाठवावयाचें तितकेंही पाठाविलें. परंतु त्याजकडील उपयोग ही वेळपर्यंत कोणता जाहला ? जोपर्यंत दूर होते, नजरानजर जाहली नव्हती तोंपर्यंत अनेक प्रकारचे अंदेशे वडील चित्तांत आणीत होते तितकेही खरे. परंतु नजरानजर होऊन एक लढाई जाहली. वांकडें पडण्यांत दिक्कत ती कोणती राहिली ? याउपरीं अंदेशे चित्तांत आणून फल तें कोणतें ? शत्रुपोक्त आजच पारिपत्य होतें असें नाहीं. दिवसगत लागेल. परंतु सरदार या शत्रूचें पारिपत्य केल्याविना सोडीत नाहींत. सरकार व इंग्रज व त्रिवर्ग सरदार या तिहींतून एकही लक्ष राहिलें नाहीं. तेव्हां कोणाचेंही वर्चस्व जाहलें तत्राप खालीं पडणें प्राप्त अशी गत येऊन घडली. याहीपेक्षां आगखी मनसबा योजिला आहे तो कोणता ? आज सात वर्षें दौलती कोणे रीतीनें खराब जाहल्या ? लोकांचे देण्याचे पेंच मोठे याची मुक्तता कशी होईल ? दौलत पूर्ववत् कशी चालेल ? कें० वडिलांचा लौकिक कसा राहील हे चित्तांत आणून येथील भावगर्भ अवघे समजोन बहुत पर्यायें करून आपासाहेब यांस पत्रें लिहिलीं व चि. राजश्री बाबासाहेब यांसही पाठविलीं. परंतु तें कांहींच चित्तांत येत नाहीं ! आपासाहेब मला लिहितात, पैका पाठवावा, सरकार आज्ञा द्यावी म्हणजे सर्व घडेल. त्यास

सरकार आज्ञा होऊन पैका इकडून पावेल तेव्हांच मसलत होणार असें दिसतें. त्यास दोनी अर्थ इकडून घडावयाचे नाहींत तेव्हां जमीयत कोठून होईल ? माझा सेवकपणाचा धर्म आहे तितका पराकाष्ठेनें लिहितों. त्यांत अधिक उणें ल्याहावें लागतें तेंही क्षमा करणें तीं वडिलींच करावी. अन्यत्र कोण करणार ? पत्रें माझीं जातात तितकींही वडिलांस श्रुत होतच आहेत. परंतु एक वेळ वडिलांस विनंती लिहावी असें चित्तांत होतें त्यावरून तपशीलवार लिहिलें आहे. अतःपर कोणतेही गोष्टीचा अंदेशा चित्तांत आणतां जसें पूर्वीं सर्वांस एकत्र करून मनसबा ठरविला होता तसें हें पत्र पावतांच सर्वांस बोलावणीं जाऊन मिरजेस आणवावें. आणि सर्वांनीं डेरेदाखल होण्याची आज्ञा व्हावी. पैका नाहीं हा एक विचार खरा परंतु सरंजामी फौज घेऊन एके जागां मिळाले असतां जमाबंदी होऊं लागली ही इभ्रत पडत्ये. सर्वांच्या नजरा तिकडे लागतात. घरीं बसून तमाशे पाहूं म्हटल्यानें लौकिक वाईट व दाबही राहत नाहीं. तिकडेस काटकाई जाली. पुढें तीच मसलत जड पडेल. हा प्रसंग जमीयत पोख्त करून तुंगभद्रेपर्यंत एक अंमल करण्याचे दिवस. यांत कोणास वाईट वाटावयाचें नाहीं. आपल्या कामाचीं साधनें अनेक प्रकारचीं होतीं परंतु जमावच नाहीं तेव्हां कांहींच नाहीं असें समजावें. एक वडील स्वस्थ बसले याजमुळें येथील लहान मोठे बोलतात तें पत्रीं काय लिहूं ! सर्व अन्वय वडिलांचे ध्यानीं वागतच आहेत. आपण उद्योग करून जमीयत करावी कांहीं उपयोग घडला हें मुख्याच्या चित्तांत आहे. बोलण्यांतही निघालें ते पर्यायही आपासाहेबांस लिहिले. तीं पत्रें आपण पाहिलींच असतील. तात्पर्यार्थ मजकूर वडिलांस लिहिले आहेत याचें मनन होऊन मला उत्तर समर्पक यावें. आतां स्वस्थ राहणें यांत चांगुलपणाचे गुण किमपि नाहींत. उद्योग जाला असतां कांहीं साधेलसें वाटतें. + + विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६७३८ (आश्विन व. ९-९ आक्टो.)

उतारा — पत्र राम आपांचें जमखिंडीहून मिरजेस.

गोव्याकडील वर्तमान आणून फराशिस पुरतेपणें आले असल्यास दोस्ती व संधान करावें म्हणजे वर्तमानही समजेल व कार्यासारखे उपयोगी पडल्यास पडतील. परंतु दोस्तीचा नाद असावा.

---

नं. ६७३९ (आश्विन व. १३—१३ आक्टो.)

उतारा— पत्र धोंडो बापूजींचें पुण्याहून मिरजेस.

" सरदार बऱ्हाणपूरच्या लगत्यास गेले व इंग्रज घांट उतरोन मैदानांत यावा म्हणजे चोहोंकडून घेरावयास येईल या विचारेंकरून गेले. फिरंग्यांचे पीछावर तीस पसतीस हजार पेंढार रात्रंदिवस रसद मारून नेतात. XXX रा. नारोपंत चक्रदेव व आबाजी त्रिंबक व लक्षुमणपंत चक्रदेव यांजवर कांहीं एक फितुरीचा आरोप ठेवून कैद करोन सरकारवाड्यांत ठेविले आहेत. आबाजी त्रिंबक यास कमच्याचा मार दिला आणि आळंकार घालून ठेविले आहेत. दरबार व मसलत तूर्त नदीपार इंग्रजांचे घरीं आहे."

---

नं. ६७४० श्रीलक्ष्मीकांत. (आश्विन व. १४-१४ आक्टो.)

अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री *माधवराव गोसावी यांसी*

स्ने॥ रघोजी भोसले सेनासाहेब सुभा दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. आंग्रेजांनीं स्वराज्यांत प्रसार करून दौलत आकर्षण केली. त्यास हिंदुधर्म रक्षावा, स्वराज्य रहावें हें चित्तांत धरून राजश्री दौलतराव शिंदे यामुद्धां या मसलतीस प्रवर्तक जाहलों असों. नित्य आंग्रजांशीं मुकाबले चालले आहेत. तुम्हांस तो स्वराज्याचें कल्याण पाहणें व अनुकूल मसलतीस होणें जरूर आहे. यांतच सारे चांगुलपणा आहे, व तुमचे चित्तांत हेच भाव असत व तुम्हाविशीं खातरजमा आहे. त्यास तुम्ही कोणती एक कल्पना मनांत न आणतां अशा प्रसंगीं मसलतीस येऊन शरीक व्हावें. दिवसगत लागों नयेत. हे समय आहे, येविशींचा मजकूर राजश्री रामचंद्रपंत यांस लिहिला आहे. ते तुम्हांस लिहीतील त्या-

---

* नागपूरकर भोसल्याचें पत्र महादेव परशराम पटवर्धन यांस.

जवरून कळेल. त्या पत्राचें उत्तर समर्पक सत्वर यावें. रा॥ छ० २७ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें हे विनंती.

---

नं. ६७४१ श्री (१४ आक्टो.)

पै॥ छ. २ रजेब. सन आर्बा मय्यातैन. कार्तिक मास.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी त्रिकाल चरणावरी नमस्कार विज्ञापना. आश्विन ब॥ १४ पावेतों बालकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. शिंदे भोसले घांट उतरून तापीतीरानजीक गेले. पलटणामध्यें त्यांचे कांहीं फितूर असा त्याचे समजण्यांत आला. हें समजून तिकडे गेले असें बोलतात. इंग्रज घांटावर आहेत, याजप्रमाणें बोलतात. वडिलांस कळावें. बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६७४२ श्री. (१८ आक्टोबर)

पै. छ. १ रजेब. सन आर्बा.

ती. राजश्री धोंडोपंतदादा वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें अंताजी नारायण पटवर्धन कृतानेक सां. नमस्कार विज्ञापना. तागायत कार्तिक शु.१ भौमवार पावेतों तासगावीं क्षेम, असों विशेष. काल तेथून निरोप घेऊन आलों तों सायंकाळास येथें आलों. येथील धांदलीचें वर्तमान वाटेस थोडेसें समजलें. परंतु आजची इतकी गडबड काल नव्हती. आज तिन वाटे गांव अगदीं +भणाण झाला! येतेसमयीं तट्टू आणितों तर आज उपयोगीं पडता. येथील यजमानांचीं मुलेंमाणसें कालच मिरजेस गेलीं. आपणही पाय रिकिबींत ठेवून तयारच आहेत. केव्हां निघून जातील याचा भरंवसा नाहीं. कांहीं पाठाळें मागत होतों परंतु प्राप्त होतां दिसत नाहीं. याउप्पर येथें राहून परिणाम नाहीं. दोन भांडीं, दोन मुडकें आहेत तें गेलें म्हणजे फिरोन मिळतील हें कळतच आहे! मीच येणार होतों. परंतु वाळ्याचा ताण बसलेला याजमुळें सामर्थ्य नाहीं. येथें:अशी गडबड. याजमुळें पैका देऊनही पाठाळ अथवा मनुष्य मिळावयाचें नाहीं म्हणोन मुद्दाम

---

+ करवीरकरांची स्वारी होणार या भयानें ही गडबड.

पत्र लिहिलें आहे. तर तुमचें घरचें तट्टू एक आहे व दुसरीं एक दोन घोडीं भाड्यानें मिळवून उदईक बुधवारीं दोन प्रहरांचे आंत येथें येऊन पोचत अशीं पाठवून द्यावीं. अनमान करावयाची वेळ नव्हे. भरंवसा जाणोन लिहिलें आहे. वाट पहात आहें. बहुत काय लिहिणें. लोभ करावा हे विज्ञापना.

---

नं ६७४३ श्रीव्यंकटेश. (कार्तिक शु० ५-२० आक्टो)

पै० छ० ३ सन आर्बा. कार्तिक मास. रजेव

पु॥ * विनंती. विशेष. राजमंडळकरी अक्कलकोपेस गेले. नबसा-करितां फिरतों अशी आवई घालून अक्कलकोप व मिलवडीची खंडणी घेऊन अष्टयास येऊन ठाणें घातलें. गावगन्नाहून मातबर कुळांजवळ पैका घेणार. आणखी कोठें जातात समजेना. दिवसेंदिवस पुंड होत चालले. याचा विचार कसा काय आपण योजिला असेल कळेना. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

---

नं. ६७४४ श्री (नक्कल) (कार्तिक—नोव्हेंबर).

विज्ञापना. राजश्री अन्या विंचूरकर काल बुधवारीं वीस घटका रात्रीस सुमुहूर्तें निघोन भांबोड्यास गेले. दसऱ्यापावेतों मुक्काम आहे. मुत्सद्दी यांणीं सरकारांत विनंती केली. पन्नास हजार रुपयांच्या बराता दिल्या आणि आज्ञा जाली जे नरसिंगराव यांणीं दोन हजार फौज घेऊन गंगातीरा-कडे जावें व हजार स्वार येथें चांगले ठेवावे. त्यास दरमहाचा दरमहा देऊं. त्यांत राजश्री बाळाजीपंत यांणीं रहावें. याप्रमाणें विंचुरकर यांणीं मान्य केलें. बरातेचा ऐवज पटला ह्मणजे खासे कूच करून जातील. एवजही लवकरच हातास येईल. बाळाजीपंत बाबा मात्र येथें रहातात. बारगिरा-विशीं रोष होता त्यास बारगीर आणून भेटवावा इतकें ठरलें आहे. पुढें कसें घडतें पहावें. राजश्री नाना पुरंदरे यांस फौज ठेवणेविशीं आज्ञा जाली. दसऱ्यास डेरेदाखल होणार इंग्रजांकडील मोदी परवांचे दिवशीं

---

* १ चिठी व्यंकटराव घोरपडे यांची इचलकरंजीहून मिरजेस.

राजश्री सदाशिवपंतभाऊ याजकडे येऊन अभीकउर्णे: बोलोन रसून गेला म्हणोन मागाहून त्याच दिवशीं सायंकाळचे सदाशिवपंत दिवाणगिरीचे डौलानें स्वारीचा बेत अंबारीमुद्धां घेऊन समजुतेस गेले होते. अस्तमानीं माघारे आले. टोपीकरांनीं फौज करारप्रमाणें द्यावी म्हणोन निकड लाविली आहे. काय घडतें पहावें. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६७४५　　श्री.　　( १ नोव्हेंबर. )

पै॥ छ० २१ रजेब. आर्बा मयातैन कार्तिक ब॥ ९ इंदुवार.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी त्रिकाल चरणावर मस्तक ठेवून शिरसा॥ नमस्कार विज्ञापना. कार्तिक ब॥ २ वर्तमान क्षेम. राजश्री बाळकृष्णपंत भाऊ लघू याजला संततज्वर सात रोज आला. सातवे रोजीं निघाला. तेच दिवशीं किंचित् मात्र ज्वर होता. चार रोज तसाच होता. औषध काढा, मात्रा घेत होते. फिरोन दहावे दिवशीं ज्वर बहुतच आला. भ्रमही पडला. देवी, धर्मी, मानवी जो जो ज्याणें उपाय सांगितला तितका केला परंतु आयुष्याची सीमा सरली. उपाय न चालले. आश्विन शु॥ १५ रविवारीं चार घटका रात्रीस देवाज्ञा जाले. ईश्वरें मोठा घात केला. शहरामध्यें बहुत लोक कष्टी जाले. श्रीमंतही हळहळले. कळावें बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६७४६　　श्री.　　( १ नोव्हेंबर. )

पै॥ छ० २१ रजेब सन आर्बा मयातैन. मंदवार.

सेवेशीं शिर सा॥ नमस्कार विज्ञापना. कार्तिक ब॥ २. इष्टवीसन नबाबाकडील समागमें सखो रुद्र हे जमावानीं बऱ्हाणपुरानजीक पंचवीस कोसांवर गेले. शिंदे एकटे पुढें होते. भोसले व फडके कासारबारीनें इकडे आले होते. बऱ्हाणपूर घेतो असा सुमार आला. मग शिंदे यांणीं कस्त करून इष्टवीसन याजला बुडविलें. लढाई शु॥ चतुर्थीस जाली. सखो रुद्र व खासा वीसन पळोन गेले. दोन पलटणें व स्वार ऐसे पळाले. बसली घाटाखालीं गेला. शिंदेचें पत्र भोसले यास व फडके यास या मजकुराचें

आलें. पत्रदर्शनीं कूच करून बसलीचे पीच्छाडीवर येणें असें आलेंवरून हे दोघे कूच करून टोक्याहून पैठणाकडे घाटाचे सुमारें दरमजल गेले. शिंदेही तिकडून येत आहेत. याजप्रमाणें गांवांत लिहिलीं आलीं असें बोलतात. बातमी सांगूं नये अशी आज्ञा आहे त्याजवरून बोलत नाहीं. परंतु खरें असें बोलतात. कळावें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

* सेवेशीं सा॥ नमस्कार विज्ञापना. वर्तमान तों तथ्य म्हणतात. पुढें-ही दृष्टीस लौकरच काय मजकूर तो येईल, शूद्र यश जालें तरच उत्तम. सर्व यथास्थित सावधपणें जमेतीनें रहावयाचे दिवस हेच. श्रुत व्हावें हे विज्ञापना. वडिलीं सर्वांस बोध करावा हे विज्ञापना.

---

नं ६७४७ श्री. (कार्तिक ब० ३–२ नोव्हे.)

पै० छ०१६ रजेब सन आर्बा. कार्तिक.

विज्ञापना. वडिलांस विस्तारें पत्र पाठविलें होतें त्याचें उत्तर समर्पक आलें. समाधान जालें. नव्या उमेदीचे सरदार दौलतेंत बखेड्यांत जातीनिशीं जुमामर्दी करून दौलत राखोन आपलाले लौकिक राखावे हें चित्तांत आणीत नाहीं तेव्हां परिणाम कसा लागेल? काठीनें पाणी शिंपल्यास कै० वडिलांचे पाठीमागें लौकिक होत नाहीं. वडिलीं येविशीं पराकाष्ठेचें सांगणें सांगितलें तत्राप पूर्व दिवस! तेव्हां माझ्या लिहिण्यानें होणें तें काय? दिवसरात्र येथील रागरंग पाहातों, जीव न राही म्हणोन वारंवार लिहितों. अजूनही कळेल तसें लिहितच आहें. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६७४८ श्रीगणपति. (कार्तिक व. ३–२ नोव्हें.)

पै. छ. १६ रजब सन आर्बा मयातैन कार्तिक.

अपत्यें आपानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ. १६ रजब पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष• वडिलीं आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. राजश्री जगन्नाथराव मैंदरगी याजकडील आतांच पत्रें आलीं. फिरंगी शिकस्त जाले. बसलीसाहेब ठार झाले. लंगडा फिरंगी धरला

---

* येथून पुढचें लिहिणें अंताजी रामचंद्र जोशी याचें.

गेला. मोंगलाकडील फिरंगी मात्र कायम आहे. पळाला म्हणून वाचला. फुलवारीबर आहे. सखो रुद्र वगैरे फौज सर्व मिळोन दोन चार हजार आहे. विशेष नाहीं. याप्रमाणें वर्तमान लिहिलें आहे. वडिलांस कळावें करितां विनंती लिहिली. शिंदे यांची फौज दहा हजार मलबा शेणवी या सरदेस आले आहेत. माणकेश्वरावर मोकाम आहे. भैंदरगीहून नऊ गांव आजमास आहे. खेडाकडे नवें खूळ उपस्थित होऊन पांच सात हजार फौज जमली आहे. कोणते रोखें जातात न कळे. धारूरचा किल्ला राजेंद्र याजकडे होता तो मशीरन्मुल्ख यानीं फिरंगी याजकडे कोटी सरंजामाबद्दल दिला. राजेंद्र याचें व मशीरनमुलुख याचें आठ पंधरा दिवसांत चित्त शुद्ध नाहीं. कारण बक्षी बेगम यांचें संधान असें समजलें. नित्य दुवक्ता कचेरीस जात होते. आतां एकवार जातात. बंदोबस्ती फार झाली आहे. बखेडा दिसतो. बेरडाची फौज आलमेल्यावर आहे. राजश्री बळवंतराव रास्ते महमदापुरावर आहेत. उभयतांच्या भेटी शिंदगीच्या सुमारें होणार. याप्रमाणें राजश्रीनीं सविस्तर लिहिलें त्याजवरून विनंती लिहिली आहे. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६७४९ (कार्तिक व. ३—३ नोव्हें.)

उतारा:—पत्र अथणीहून मिरजेस माधवराव अनंत रास्ते यांचें.

"खानदेशांत जासूद जोडी मुजरद गेली होती. त्यांचे सांगण्यात जमादिलाखरची लढाई छाप्याची जाहली. शिंदे भोसले यांचे कुचाची बातमी राखोन इंग्रजांणी सोळा सतरा कोस दौड करून गांठ घालून लढाई भातबर जाहली. भोसले यांजबर सखो रुद्र व पलटणें गेलीं होतीं व वसलीचीं पलटणें शिंदे याजवर खासासुद्धां गेलीं. शिंदे यांची तयारी नव्हती. बेफाम होते. परंतु आघाडीस शिंद्याकडील पलटणें होतीं त्यांची त्यांची लढाई सुरू जाल्यामुळें मागें फौजेस तयारीस सावर पडला. तों इंग्रजांनीं चालून घेतलें. तोफेचे बैल चारणीस होते. ते आले नाहींत व पलटणांतही कांहीं फितूर तेव्हां ऐंशी नव्वद तोफ राहिली. पायदळ मात्र फौज घालून बचाव करून काढून घेऊन निघून मजल घाटाखालीं चांगदेव तापी

तीरीं गेले. तीन शेरांची धारण आहे. इंग्रजांचेंही दोन तीन हजार माणूस पडलें. शिंद्याकडील यादवराव जखमी होऊन दिवंगत जाले व आनंदराव निंबाळकरही पडले. आणखीही बहुत जाया जखमी जाले. याप्रमाणें जबानी वर्तमान सांगितलें. इंग्रजांची रसद बंद नाहीं. परंतु धारण सहा शेर आहे. घांटतोंडी इंग्रज गेले आहेत."

---

नं. ६६५० श्री. (कार्तिक ब. १२–११ नोव्हें.)

पै।। छ० २५ रजेब सन आर्बा मय्यातेन.

सेवेशीं दोनी कर जोडून शिर सा।। नमस्कार विज्ञापना. जिन्नस वगैरे यांचा तपशील चि।। राजश्री धोंडोपंत जोशी यांनीं लिहिला आहे त्यावरून श्रुत होईल. छ० २२ रोजीं श्रीमंतांची स्वारी उभयतां बायासुद्धां कोथरूडचे बागेंत गेली होती. उदईक एकादशीस श्रीज्ञानेश्वर देवाचे दर्शनास आळंदीस जाणार आहेत. मोरोबा मोन्या शागीर्द यास पालखीची बक्षीस दिली. वग्रईस स्वारी गेली तेव्हां वाटेस स्वयंपाक करून भोजनास घातलें सबब चौकीदार होता तो शागीर्दीस ठेविला. हल्लीं पालखी दिली. मर्जी सुप्रसन्न आहे. सांप्रत जवाहिरी दागिने अंगावर असतात. सदाशिव माणकेश्वर गुदस्तां हैदराबाजेस गेले तेव्हां तसलमातीस जवाहीर दिलें तें मशारानिल्हेस बक्षीस दिलें. लुगड्याविशींचा मजकूर काय जाला, मोरोपंत जाऊन सौ।। बायाबाईस विचारलें कीं नाहीं येविशीं लिहिणेस आज्ञा करावी. सरकारचें शागीर्दपेशास द्यावयाचा ऐवज पाठवावयासी आज्ञा जाली पाहिजे. हे विज्ञापना.

---

नं. ६७५१ श्री. (कार्तिक ब० १२–११ नोव्हें.)

पै।। छ० २५ रजेब सन आर्बा मय्यातेन व अल्लफ.

विज्ञापना. छ० २० रविलावल सोमवारीं रात्रौ राजश्री बापू फडके यांचे घरीं श्रीमंतांस मेजवानी जाली. उभयतां श्रीमंतास जवाहीर शिरपेंच दिल्हे. बरकड मंडळीस वस्त्रें दिल्हीं. सारे गृहस्थ जवळचे गेले होते. दिनकरपंत गेले नव्हते. छ० २१ रविलावलीं मंगळवारीं आतषबाजी

पर्वतीस जाली. अस्तमानीं श्रीमंतांची स्वारी पर्वतीस गेली. तेथें संध्या करून भोजन केलें. उभयतां सौ. बाईही गेल्या होत्या. दहा घटका रात्रीस दारू उडावयास प्रारंभ जाला. सारे मुत्सद्दी गेले होते. नवीन पदार्थ दृष्टीस साल-मजकुरीं दारूजा डेरा राहुटीसारखा दृष्टीस पडला. मागेंही दारू लोकांनीं पाहिली होती. डेरा करून दग्ध जाहला नव्हता तो यंदा पाहिला असें म्हणतात. इंग्रज आले नव्हते हे विज्ञापना.

---

नं ६७५२ श्रीगणराज. (कार्तिक ब० ३०–१४ नोव्हें.)
पै० छ० २९ रजब सन आर्बा. मार्गशीर्ष.

अपत्यें आपानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २८ रजेब पावेतों बर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं आज्ञापत्र पाठविलें तें पावलें, करवीरकराडील वर्तमान लिहावें म्हणून आज्ञा. त्यास काल बातमीचे गडी आले त्यांचें जबानीचें बर्तमान--खासा स्वारी बाहेर निघाली. राजश्री राजाज्ञा कापशीचे रोखें आहेत. त्यास आज उद्यां जाऊन मिळा-बयाचा बेत केला आहे. सर्व एकत्र होऊन कापशीकराकडील खेड्याची नासाडी करून नेरलीकरांवर जाणार. त्यांनीं आपले कुमकेस तळूरकर व पाच्छापूरकर वगैरे आणिले आहेत. नेरलीकराकडील गुंता उरकून इचलक-रंजी वगैरे इकडे यावें. असाही मानस केला आहे म्हणून सांगितलें. त्याजव-रून विनंती लिहिली आहे. आणखीही बर्तमानास गडी पाठविले आहेत. बर्तमान येतांच विनंती लिहितों. फौज दोन हजार सुमार आहे व तोफा लहान मोठ्या मिळोन चार आहेत. वडिलांस कळावें विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६७५३ श्री. (कार्तिक ब. ३०–१४ नोव्हेंबर)
पै॥ छ० १ साबान. मार्गशीर्ष. सन आर्बा.

सेवेसीं नारो रामराव साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम तागायत छ० २८ रजेबपर्यंत यथास्थित असे. आपण राजश्री चिंतामणराव आपा

१ चिंतामणराव आपाचे पत्र कुरुंदवाडाहून निरंजेस.

यांस आम्हांकडील उपराळेविशीं सांगितलेंवरून त्यांणीं शहापुरास रवानगी केलेला सरंजाम येथें पाठवून दिल्हा. या इभ्रतीनें बंटमुरीकर यांणीं देसक मंडळी मिळोन बस्तवाडास राजमंडळचे संधानानें मिळविले होते ते निघोन गेले. राजश्री रत्नाकरपंतआपांचा मुक्काम कापशीस आहे. खुद्द महाराजांची स्वारी निघाली. कापशीचे मुक्कामास येणार. आम्हाकडे यावें अगर जांभे प्रांतीं जाणार. नाहींपेक्षां चिकोडीचे सुमारें येऊन रायबाग मिरडी वगैरे अंमल बसवून पुढें तेरदाळ गोकाक प्रांतीं दंगा करावयाचा मानस आहे. कोणीकडे जातात लवकरच समजेल. देसक मंडळीही लवकरच लष्करास जाऊन मिळतात. सर्वाविशीं भरंवसा आपला आम्हांस आहे. प्रसंग पडलेस उपराळेविशीं अनमान होऊं नये. मनोळीचे ठाणेस उपद्रव जालेमुळें बसली यांणीं आपलेकडील सरदार कमलसाहेब यास लिहून पाठविलेवरून पलटणें घेऊन आले आहेत. तोरगलचे सुमारें येणार म्हणोन राजश्री महादजी शितोळे परसगडानजीक निपाणीकराकडील जमाव सुद्धां आहेत त्यांणीं लिहिले होतें. ते या मार्गानें येणार असें शितोळे यांणीं लिहिलें आहे. ते लवकरच आल्यास महाराजांची स्वारी माघार जाईलसें वाटतें. ते न आल्यास उमेद सावनूरपावेतों जाणेची मसलत दिसते. कदाचित् आम्हांस उपद्रव केल्यास राजश्री आपांस सांगोन उपराळा होय तो अर्थ करावा. आपणास अगत्य आहेच. त्याअर्थी लिहून सुचवावेसें अर्थ नाहीं.. यासमयीं आपण उपराळा केला हें प्रसिद्ध जालें. × × बहुत काय लिहिणें. लोभ करावा हे विनंती.

---

नं. ६७५४ श्री. (मार्ग० शु० ६–२० नोव्हें.)

पै॥ छ० २० साबान. मार्गशीर्ष. सन आर्बा मय्यातैन.

सेवेशी सा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ० साबानपावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. 'पेशजी सेवेशीं छ० १ मिनहूचीं पत्रें पाठविलीं आहेत त्यावरून इकडील मजकूर सर्व ध्यानांत आलाच असेल. हल्लीं येथील वर्तमान तरी नवीन मुत्सद्दी मंडळी याजकडेस श्रीमंतांस मेजवानी होत आहे. श्रीमंतांची मर्जी अली-

कडेस बहुत प्रसन्न व खुषीमध्यें आहे. बसलीकडील सरदार याणें नगरचा किल्ला घेतला म्हणून त्यास व वकील कर्नेल कलुष यास श्रीमंतांनीं वाड्यांत भोजनास बोलावून साडेतीन वस्त्रें व शिरपेंच याप्रमाणें देऊन रुखसत केलें. त्यास पुन्हां पलटणचा सरदार नगरास जाऊन बसलीकडेस गेला. राजश्री नाना पुरंदर यांचा प्राचीन सासवडांतील वाडा व बाग आहे तो श्रीमंतांस नजर पुरंधरे यांणीं करून श्रीमंतांस पत्रें लिहून दिल्हीं. आपले सरंजामाचे गांव प्राचीन भोकूम व कोंकणांत बारबाई व पुण्याचे पूर्वेस गांव आहे तो याप्रमाणें सरकारांतूत जप्त केले. येविशींचा मजकूर दिनकरपंत पटवर्धन यास वकिलांनीं पुसला. त्यांणीं उत्तर केले जे, पटवर्धनाकडील मजकूर श्रीमंतांपाशीं बोलला असतां उत्तर होत नाहीं म्हणून उत्तर केलें. श्री।। राजश्री रामचंद्रपंतआपा जमाखिंडीहून अथणीस रास्ते याजकडेस गेले आहेत म्हणून सरकारांत बातमी आली आहे. श्री।। राजश्री रावसाहेब यांची व बसलीची भेट होऊन परस्परें सफाईचे जाबसाल होऊन रावसाहेब निघोन औरंगाबादेस येऊन पुन्हां भोसल्याकडे गेले म्हणून येथें वर्तमान आलें आहे. त्यावरून बहुत अंदेशे चित्तांत येऊन बापू गोखले बसलीबरोबर फोजसुद्धां आहेत. त्यांचे चुलते बाळाजीपंत गोखले हुजूर वकिलीच्या कामावर होते त्यासी व श्रीमंतांशीं बहुत कुपिया खलबतें होऊन मशारनिल्हेस बसलीच्या लष्करांत बापू गोखले याजकडेस पाठविलें. ते निघून गेले. यांतील मजकूर शोध लावून सेवेशीं लिहीन. शिंदेबहादूर याजकडील प्राचीन शेणवीमंडळ पांच सात असामी ब्रह्मावर्तास होते त्यास शिंद्यांनीं व होळकरांनीं व इंगळे यांणीं खातरजमेचीं पत्रें पाठवून लखवा आंतरांवाले व जगोबाबापू व येशवंत शिवाजी हे होळकरापाशीं येऊन होळकर यांणीं सरफराजी करून पंचवीस तीस हजार फौज त्या प्रांतीची देऊन जैपूरनें रवाना केलें तें इंदुरास दाखल जाले. पुढें शिंदे बहादूर यांस सामील लौकरच होणार. येशवंतराव होळकर यांणीं हिंमतबहादर गोसावी व आणखी हिंदुस्थानी राजे यांची फौज घेऊन लवकरच येऊन सामील होतों म्हणून शिंदे भोसले यांस पत्रें आलीं आहेत. खासा शिंदेबहादुर यांणीं आपले लष्करांतील पलटणचे लोक व फिरंगी झाडून नर्मदापार

लावून देऊन मराठी फौज व पठाण याप्रमाणें घेऊन यालनेरास आले म्हणोन शहरांत वर्तमान बहुत आहे. भोसले व फडके नांदेडच्या सुमारास आहेत. याप्रमाणें इकडील मजकूर आहे. सध्यां प्रतिनिधि व पटवर्धन व रास्ते याजवर श्रीमंतांची कृपा बहुत आहे. सखाराम घाटगे यांची तारीफ श्रीमंत वारंवार बहुत करतात जे तोडजोडीचा मनुष्य याप्रमाणें कोणी नाहीं म्हणून करतात. चहूंकडील डाका व कागदपत्रें येणें जाण्याचा शिलशिला होता तो इंग्रजांनीं बंद केला आहे. इंग्रज याणें पुण्यांत मराठी फौज ठेवावयाची सुरू केलें आहे. वरकड सरकारांत वाड्यांत दरबार अथवा मसलत कांहीं एक नाहीं. नित्य स्वारी कोथरूड व पाषाण वगैरे बागांत जात असती. याप्रमाणें इकडील मजकूर आहे. पुढें सेवेशीं होईल तें लिहूं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६७५५ श्री. ( मार्ग. शु. १०–२४ नोव्हेंबर. )

पै।। छ० २० साबान. मार्गशीर्ष. सन आर्बा मय्यातैन.

सेवेशीं सा।। नमस्कार विज्ञापना. तागायत छ. ९ साबान पावेतों स्वामींचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान तरी शिंदे-बहादुर सडे पन्नास हजार फौजेनुद्धां यालनेरास येऊन आजंठ्याच्या घाटा-खालीं आले. पुढें घांट चढून लौकरच येणार. राजश्री चिमणा बापू भोसले यांणीं दहा हजार गोसावी व वीस हजार पठाण व विठ्ठलराव बक्षी याज-बरोबरील फौजसुद्धां पन्नास साठ हजार फौजसमेत लावून वाड्याच्या घाटा-खालीं आले. तेथून घाट चढून राजश्री रघूजी भोसले व फडके यांस जाऊन सामील होणार. रघोजी भोसले यांणीं मानवत व दस्मत नांदेड लुटून जाळून बेचिराख केलें. श्री।। राजश्री रावसा-हेब रघोजी भोसले याजकडेस बहुत जलदी करून निघोन गेले. होळकरा-कडील फौज व हिंदुस्थानची फौज व शिंद्याकडील शेणवीमंडळ यांची फौज मिळोन तीस पसतीस हजार इंदूरच्या रस्तें येऊन हांड्याच्या घाटें नर्मदा उतरून येत आहे. याजमुळें इंग्रजांचीं पलटणें बऱ्हाणपुरांत होतीं त्यांणीं बऱ्हाणपुर लुटून शहर सोडून बाहेर सहा कोसांवर येऊन राहिले आहेत.

राजश्री यशवंतराव होळकर यांणी जाट व शीख व राठोड व कुल हिंदुस्थानचे राजे रजवाडे, कोठे, जयपूरकर वगैरे मारवाडकर व समशेरबहादरसुद्धां सर्वत्र एकत्र होऊन सर्वांनीं मिळून दिल्लीस जाऊन संस्थान हस्तगत करून इंग्रजांचें पारिपत्य करून पुढें लखनौस जाऊन गव्हर्नराचें पारिपत्य करावें हा बेत करून सरकारचे सरदार समशेरबहादर व हिंगणे यांच्या इतल्ल्यानें सर्वांनीं चालावें आणि इंग्रजांचें पारिपत्य करावें. याप्रमाणें शिंदे व भोसले व होळकर यांच्या विचारें ठरलें. त्यास शीख व हिम्मतबहादर गोसावी व जाटाकडील फौज याप्रमाणें घेऊन होळकर यांणीं जैपूराहून कूच करून दक्षिणेस येतात. पुढें शिंदे होळकर येक होऊन यावत् आजंठ्याच्या घाटापासून भागानगरसुद्धां ताहात श्रीरंगपट्टणपावेतों मुलुख जाळून लुटून पस्त करावा ही मसलत ठरली आहे. त्यास वसली वगैरे इंग्रज यांसही सदरहूप्रमाणें बातमी सर्व समजून तेही आपल्या विचारांत आहेत. वसलीच्या चित्तांत हरतऱ्हा करून तिही सरदारांचा व श्रीमंतांचा तह करून आपला बचाव करून निघून जावें या तजविजींत आहेत. मध्यें श्रीमंतांचा व पुण्याचा व सरकारच्या दौलतीचा बंदोबस्त करून आपल्याशिवाय कांहीं होऊं नये हें मानस इंग्रजांनें होतें. त्यावरून श्रीमंतांची मर्जी इंग्रजावर नाखूष होऊन ताम्रमुख लबाड हें जाणून श्रीमंतांनीं भोसले व शिंदे याजकडेस कांहीं कुपिया मार्गें नागनाथ याचे विद्यमानें पैगाम लावला जें, ताम्रमुखांचें पारिपत्य करणें, सरकारचें लक्ष पूर्वीपासून तुम्हांकडे आहे त्याप्रमाणेंच आहे. याप्रमाणें उभयतांकडेस पैगाम केला. शिंदे, भोसले होळकर यांणीं हिंदुस्थानची व दक्षणची मसलत केली आहे ती सर्व येथें इंग्रजांस समजली. इंग्रज दरबारांत व मुत्सद्दी याजपाशीं स्पष्ट बोलतात. येथील मुत्सद्दी हेही आपले ठिकाणीं बहुत सर्द आहेत. वसली व करनेल कुलुप वकील यांणीं श्रीमंतांच्या भरंवशावर खुरकीची मसलत करून आजपर्यंत दहा बारा क्रोड रुपये खर्च होऊन कांहीं एक सिद्ध नाहीं व हल्लीं इंग्रजांस पैक्याची अडचण बहुत पडून ममई व तुंगभद्रापार टिपूच्या राज्यांत श्रीरंगपट्टणसुद्धां व चेनापट्टण वगैरे कुल संस्थानास इंग्रजांचें लिहिलें गेलें जे, रयतेकडील ऐवज वसूल करून व सावकारी

कर्ज घेऊन व मुलखांत पट्टी करून अथवा जसा कळेल तसा ऐवज जसा उत्पन्न होईल तसा करून निम्मे नक्त व निम्मेचा दारुगोळा याप्रमाणें जलद पाठविणें म्हणून याप्रमाणें लिहिलें गेलें आहे. वसलीच्या लष्करांत तीन शेर जोरी बाजरी व तांदूळ, गहूं डाळ दोन शेर याप्रमाणें धारण आहे. फराशि-सांनीं चेनापट्टण व बंदर व मदराज व कोड्याळ वगैरे दक्षिण समुद्राचीं बंदरें इंग्रजांचीं मारून विलायतेचा रस्ता पूर्वेकडील समुद्रांतील बंद केला आहे हेंही वर्तमान इंग्रजाकडेस बरचेबर येत आहे. सखाराम घाटगे यांणीं सरका-रथानिवरून कांहीं फौज व कांहीं पायाचे लोक मिळोन हजार दीड हजार पर्यंत सालपेच्या घाटाखालीं पाठवून तेथून प्रतिनिधींच्या मुलखांत उपद्रव केला आहे. त्यास प्रतिनिधींकडील हजार पांचशे स्वार सालपेच्या घाटावर येऊन पर-स्परें एक दोन वेळ गोळागोळी होऊन ईपन्नास मनुष्य जाया जखमी जालें. त्यावरून सरकारांतून गोविंदराव परांजपे व खुद्द सर्जेराव यांची रवानगी होणार. यांणीं जाऊन प्रतिनिधींचा मुलख जप्त करावा हा बेत आहे. नंतर पुढें रास्ते व पटवर्धन यांचेही मुलखाची जप्ती करावी असा बेत आहे. याप्रमाणें इक-डील वर्तमान आहे. पुढें निदर्शनास येईल तें पहावें.

---

नं. ६७५६ ( मार्ग. शु. ११–२५नोव्हें. )

उतारा—पत्र धोंडो बापूजीचें पुण्याहून मिरजेस.

" श्रीकाशीमध्यें आश्विन शु॥ चतुर्दशीस दोन तारे थोर पडले. चार घटका उजेड पडला. पडल्येसमयीं वीज जशी कडाडते तैसा शब्द मोठा जाला. भूमिकंप मोठा जाला. तेणेंकरून दोनतीनशें घरें पडलीं. श्रीभागी-रथीस खळबळ बहुत चार घटका सुटली. पर्जन्य बहुत दीड दिवस लागला. परंतु गंगेस पाणी नाहीं. बिंदुमाधवाजवळील मोहल्यांतील दोनशेंपर्यंत घरें जळालीं. याजप्रमाणें उल्कापात जाला. "

---

नं. ६७५७ श्रीगजानन. (मार्ग० व. २ – ३०नोव्हें.)

पै॥ छ० १५ साबान आर्बा मयातैन.

अनस्याचे चिर सां० नमस्कार विज्ञापना ऐसी जे, बाळकृष्णभाऊ लागू

पुण्यांत होते तेथें नवज्वर होऊन कार्तिक शु० १५ देवाज्ञा जाले. हें वर्तमान बहिलांस करून रा० नारायणराव लागू आस्थि घेऊन आले. मार्ग. शु. ५ मंगळवारीं गंगाबाईस वर्तमान कळविलें. नानांनीं दशाहांत कर्म केलें. सपिंडी तेथून चि० राजश्री केशवराव लागू आलेवर होणार किंवा हेंच करतील पहावें. याप्रमाणें श्रीचे स्वरूप नानांनीं करार केला आहे. भाऊसारिखा माणूस होणें दुर्घट! त्याचा सर्वोपरी घात झाला. ईश्वरइच्छा प्रमाण. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६७५८ श्री (नक्कल) (पौष दिसें.)

रमजान आर्बा मय्यातैन पौष.

*तोतया बाघाचें वर्तमान तर बाघ जमाबासुद्धां होनेगुंदे परगण्यांतून हणमसागरेवर जाऊन ननगिरीस मुक्काम करून होता. तेथून तुंगभद्रा पार जाणार असा बेत. ही बातमी इंग्रजांस समजली. त्याजवरून इंग्रजांनीं आपलें बुणगें मनोळीचे सुमारें ठेऊन सडे होऊन दोन मुक्कामांनीं बाघासी गांठ घातली. बाघाकडील पेंढारी कांहीं दुर्बीन्यांस होते. त्यांची व तुरुक स्वारांची झटपट होऊन दहावीस घोडीं इंग्रजांकडील पाडलीं. मागून इंग्रज झाडून येऊन पोहोचले. त्यांचे पेंढारी वगैरे स्वार व तोतया बाघ दहा पांच रावतानिशी निघोन गेले. पायदळ व बाजार बुणगें, झाडून लुटून पस्त केलें. याप्रमाणें येथें समजलें तें लिहिलें आहे. अधिकोत्तर बरचेवर लिहीत जावें. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

---

नं. ६७५९ श्री. (१ दिसेंबर)

पौ॥ छ० २४ साबान सन आर्बा मय्यातैन. मार्गशीर्ष.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी त्रिकाल चरणावरी मस्तक ठेऊन शिरसा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत मार्गशीर्ष व॥ ३ पावेतों बालकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. रामराव तेरदळकर याचे माणसाबरोबर पत्र

---

* ही चिठी बागलकोटाहून जमखिंडीस माधवराव रास्त्यांची राम. आपांस.

लिहून वडिलांस पाठविलें आहे. पावलें असेल. पेशजीं तीन हुंड्या केल्या त्याचे रुपये दिल्याचें ल्याहावयास आज्ञा करावी. नंदीचे गळ्यांतील पानड्या मीनगार यांजकडे दिल्या आहेत. वरचेवर त्यास स्मरणें देत आहे. आल्यावर विनंती लिहून पाठवितों. श्री।। राजश्री अमृतराव-साहेब वसईकडे जाऊन भेटी जाल्या. कुटुंब औरंगाबादेस होतें तों विनायकराव व त्याची स्त्री व रावसाहेबांची स्त्री व मैनाताई बहीण ऐशीं नगरचे किल्ल्यास आलीं. आंत जाऊन राहिलीं. येऊन चार रोज जाले. रावसाहेब लष्करांत वसईजवळ आहेत. नगरचा किल्ला रावसा-हेबांस राहवयास दिल्हा. सबब मनुष्यें तेथें आलीं असें बोलतात. काय भाव असेल न कळे. बऱ्हाणपूर गावांतील लोकास पट्टी लावून चाप लाविले. नाकास लाविले. बहुत हाल केले. घरें लुटलीं सात लाख रुपये तीन रोजांत घेतलें. दाणा बेगमीचा पाहून ठेविला. बाकीचा झाडून त्याणीं आणिला. शहरची दशा कांहीं ठेविली नाहीं. याजप्रमाणें इष्टवीसन नबाबाकडून गेला आहे त्याणें केली म्हणोन बोलतात. + + + + बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. जळवासी सर्वव्यात जाले. येथील स्थळ मजबूद केलें. पुढें ईश्वरसत्ता प्रमाण ! एकाचा (होळकराचा) भ्रम राहिला आहे. काय घडेल न कळे, हे विज्ञापना.

---

नं. ६७६० श्री. (मार्ग. व. ७-५ दिसेंबर)

पै।। छ० २७ साबान इंदुवार मार्गशीर्ष वद्य चतुर्दशी आर्बा मय्यातैन.

सेवेशीं सा।। नमस्कार विज्ञापना तागायत छ० २० साबान पावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. पेशजीं सेवेशीं छ० १४ मिनहूचीं पत्रें पाठविलीं आहेत त्यावरून सविस्तर निवेदन जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी भोसले व शिंदे व फडके बऱ्हाडांत उंब्रावतीच्या नजीक एकत्र जाले. श्री।। राजश्री रावसाहेब व वसली मिळोन भोसल्याचे पिच्छावर चालले होते. त्यास विडाच्या मुक्कामावरून रावसाहेब याणीं गोता वसलीस गोता देऊन आपण सडे निघोन भोसल्या-कडेस गेले म्हणोन वर्तमान येथें इंग्रजाकडेस पक्कें आलें आहे. वसली व

मशारिर्चीं पलटणें हे एकत्र जाले. पेशजी आशेरीचा किल्ला इंग्रजांनीं घेतला आणि खुशालीच्या तोफा केल्या. त्यास आशेरीकर किल्लेदार यांणीं कावा करून इंग्रजांकडील दोन पहारे व निशाण घेऊन शिबंदीचे सात लाख रुपये घेतले. याप्रमाणें केलें. अलीकडेस होळकराची फौज व शेणवी-मंडळ शिंद्याकडील मिळोन तीस हजार फौज नर्मदेच्या दक्षिणतीरास आली त्यावरून आशेरीकर किल्लेदार यांणीं इंग्रजांचे दोन पहारे होते त्यास तोफेच्या तोंडीं देऊन किल्लेदार व कोळी मिळोन बऱ्हाणपुरास रातौ येऊन इंग्रजांचे पांचसातशें माणूस कापून काढलें त्यावरून इंग्रजानें बऱ्हाणपुरापासून दहा लाख रुपये मनुष्यें फांशी देऊन घेतले आणि शहर सोडून सहा कोसांवर येऊन राहिले आहेत. मार्गेश्वर शु॥ १० स हिंदुस्थानांत आग्र्याचे किल्या-नजीक अंबोजी इंगळे व समशेरबहाद्दर व जाट व राजेरजवाडे व हिंमत-बहाद्दर गोसावीसुद्धां इंग्रजांशीं लढाई मोठी होऊन इंग्रजांकडील बंगाल्याचा व लखनौचा व फरुकाबादेचा याप्रमाणें तिन्ही सरदार लढाईत पडोन शिवाय पंधरा सतरा हजार मनुष्य इंग्रजांचें कापून काढून कुल इंग्रजांचें लष्कर बुड-वून, आलें होतें किंवा नाहीं असें करून अंबोजी इंगळे व सर्वांनीं मागें सरून सात कोसांवर येऊन मुक्काम केला. याप्रमाणें वर्तमान येथें व॥ ५ प्रातःकाळीं इंग्रजांकडेस आलें. त्याणीं जाहेरदारींत आपली फत्ते होऊन इंगळे पळोन गेले म्हणोन फत्तेच्या तोफा केल्या. परंतु इंग्रजांचा सांप्रदाय जे, मोठा मनुष्य मृत्यु पावला असतां त्याच्या तोफा करतात असा सांप्रदाय आहे. होळकर परभारें शिंदे भोसले याजकडेस गेले असें वर्त-मान आहे. वसलीच्या लष्करांतून गोखले यांचीं पत्रें सरकारांत व मुत्सद्दी यांस आलीं जे, रावसाहेब तर भोसले याजकडेस निघून गेले. हिंदुस्थानचे इंगळे याच्या लढाईचें वर्तमान ऐकून वसली गिरीबदारींत आहेत. वसली-चीही उमेद पहिल्याप्रमाणें नाहीं. पैका व पलटणें यांची तंगचाई होऊन धारण तीन शेराची वसलीचे लष्करांत आहे शिंदे भोसले यांच्या लष्करांत बावीस शेराची धारण आहे. श्रीमंतांनीं कर्नेल कलुप व वसली यांची बदनियत व करारप्रमाणें चाल नाहीं असे कितेक अंदेशे चित्तांत आणून तिन्ही सर-दाराकडेस वकील पाठविले आहेत. मलबा बापू नगरकर याच्या लोकांनीं

दौड करून शिखरापुरावर पुण्याचे इंग्रजांचे बैल चारणीस होते त्यांपैकीं दोन अडीचशें बैल घेऊन गेले. त्यांच्या पीच्छावर पांचशे लोक व दोन तोफा पाठविल्या आहेत. याप्रमाणें इकडील वर्तमान आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६७६१ ( मार्ग. व. ७-५ दिसें. )

उतारा—पत्र मिरजेस नारायणराव राम. यांचें.

" इकडील वर्तमान तरी, पट्टणाहून इंग्रजांचीं पलटणें पांच सहा व तुरुकस्वार हजारपर्यंत व तोफा ५ व सामानाचे बैल कोठी वगैरे मिळोन पंचवीस हजार येणेंप्रमाणें जालेहाळचे मुक्कामास आले. पुढें मनोळीकडे येणार. तकूरकर देसाई यांणीं काटकाई केली आहे त्याचा बंदोबस्त करणार म्हणोन वदंता आहे. पुढें मसलत कोणती आहे ती समजतच नाहीं. बुनगे भारी. ज्या मार्गानें जातात त्या रानांत काहीं बाकी रहात नाहीं. साल मजकुरीं पर्जन्य नाहीं. पिकें नाहींत, त्यामध्यें हें अरिष्ट आलें. यांत इश्वर परिणाम लावील तो खरा. "

---

नं. ६७६२ श्री. ( मार्ग. व. ८ - ६ डिसेंबर. )

पै॥ छ० २ रमजान. पौष सन आर्बा मय्यातैन.

सेवेशी सा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २१ साबानपावेतों स्वामिचे कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीकाशीक्षेत्रीं भाद्रपद शु॥ १० भूमिकंप होऊन श्रीबिंदुमाधवाच्या घाटाच्या मोहल्यास अग्न लागून सारा महल्ला जळोन श्रीगंगेचें उदक पात्रामध्यें मोठ्यानें खळबळोन दोन दोन भाले उंची श्रीगंगेचें उदक तीन घटकापर्यंत उडत होतें. आणि पाण्यांतून आवाज मोठमोठे आवाज होऊन रात्रौ सहस्रावधि नक्षत्रें पतन जालीं. याप्रमाणें वर्तमान कार्तिकमासीं येथें आलें. परंतु कोणाची खातरजमा होईना त्यास क्षेत्राहून सरकारांत व आणखी कितेक गृहस्थांस पत्रें आलीं त्यावरून सेवेशीं लिहिलें आहे. येथे महागाई बहुत जाली आहे. जोरी, बाजरी, गहू, डाळ, तांदूळ, हरभरे, मीठ

एकूण दर दीड पायलीप्रमाणें. तूप शेरभर, तेल आदपाव उणे दोन शेर, गूळ वजन पांच शेर याप्रमाणें धारण आहे. बऱ्हाणपुरापासून खानदेश व गंगातीर. औरंगाबाद व हैदराबादेपासून पुण्यापर्यंत धारण दर सहा शेराची आहे. बऱ्हाणपुरापासोन अलीकडेस खानदेश व गंगातीर वगैरे औरंगाबादसुद्धां यावत् मनुष्य अन्नाकारितां पुण्यास येत आहे. गुजराथप्रांतीं गायकवाडाच्या संस्थानांत कानूजी गायकवाड यांणीं पेशजीपासून दंगा करून कडीच्या ठाण्यांत होते. त्यास सुरतकर इंग्रज यांणीं कडीचें ठाणें घेऊन कानूजी गायकवाड कैद केले. आबा शेलूकर बंधुसुद्धां कैदेंत आहेत. त्याप्रमाणें आहेत. याप्रमाणें वर्तमान आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नगराहून इंग्रजांचे लोक नाशिकास जाऊन नाशिकांत ठाणें बसविलें म्हणून वर्तमान आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६७६३ श्री. ( नक्कल. ) ( मार्ग. व० ९–७ दिसें. )

छ० २२ साबानचीं पत्रें छ. २९ मिनहूस आलीं त्याची नक्कल. सन आर्बा मय्यातैन.

विज्ञापना. श्रीकाशीमध्यें दुश्चिन्हें जाहल्याचें वर्तमान महिना पंधरा दिवस आलें आहे. परंतु वास्तविक वाटेना म्हणोन आजपावेतों लिहिलें नव्हतें. हल्लीं कोणाकोणाचीं पत्रें व मुद्दाम माणसें आलीं. त्या पत्रीं लिहिलें आहे जे, भाद्रपद शु० १४ रात्रीं भर मध्यांनीं धरणीकंप जाहला. एक घटका घरें माड्या दणाण जाहला. माणसें निजल्या जाग्यास कुशीस होतीं तीं उपडीं, कोणी उताणीं. ही गत माणसांची. व गुरें दाव्यास बांधलीं तीं खालवर जालीं. कवलें घरावरील पडलीं. कांहीं घरें माड्या मोडून पडलीं. हें होत आहे तों दाण्याचा गंज म्हणोन पेठ आहे त्यास आग लागोन जळाली. दोन तारे त्याच समयीं पडले. त्याचा उजेड भर चांदण्यासारखा पाव घटका पडला. गंगेच्या पाण्यास खळखळाट जाला. याप्रमाणें श्रीकाशी, प्रयाग व गया मिळोन तीन जागीं एक वेळींच या अन्वयें जाहलें. गड्याचे सांगण्यांत भागीरथीस उतार जाला. याप्रमाणें वर्तमान जालें. वडिलांस विदित व्हावें म्हणोन लिहिलें आहे. विदित होय हे विज्ञापना.

ऐ. ले. सं. ३४.

नं. ६७६५ श्री. (मार्ग. व० १३-११ दिसेंबर.)

पै।। छ० २ रमजान. पौष. सन आर्बा मय्यातैन.

सेवेशी सा।। नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २६ साबानपावेतों स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. पेशजीं सेवेसीं छ० २१ मिनहूचीं पत्रें पाठविलीं आहेत त्यावरून साविस्तर निवेदन झालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी छ० १४ साबानीं भोसल्याकडील आघाडी विठ्ठलपंत बक्षी व होळकराकडील फौज मिळोन तीस पसतीस हजार जमाव होता त्यास अकोलें बाळापूरचे मुक्कामीं बसलीची व बक्षीची लढाई अडीच प्रहरपर्यंत होऊन बसलीकडील तीन चार पलटणें कापलीं व हजार दोन हजार मनुष्य विठ्ठलपंताकडीलही पडलें. लढाई मोठी जाली. खासे भोसले पंधरा कोश मागेंच होते. शिंदे बहादुर जळगांव जांबुदापासोन दहा कोश पूर्वेस होते. भोसल्यास व शिंदे बहादुर यास उत्तर दक्षिण दहा कोसांच्या तफावतीनें आहेत. बसली व मशीराकडील पलटणें एक होऊन बक्षीसी लढाई जाली. अडीच प्रहरपर्यंत लढाई झाल्यावर बक्षींनीं लढाईचा मोहरा सोडून आपल्या मुक्कामावर गेले. हें वर्तमान बसलीस समजल्यावर बसलीनें जलदी करून बक्षीच्या पिच्छावर गेले. बक्षीस वर्तमान समजलें जे, बसली पुन्हां आला असें कळल्यावर त्यांणीं तेथून कूच दहा कोसांवर बाजूस केलें. खासा भोसले व विठ्ठलपंत चौ कोसांच्या तफावतीनें आहेत. पुढें शिंदे व भोसले मिळोन लढाई बसलीशीं द्यावी हा बेत आहे. श्री।। राजश्री रावसाहेब बसलीबरोबरच आहेत. याप्रमाणें येथें वर्तमान व. ७ पत्रें आलीं व इंग्रजांनींही आपल्या फत्तेच्या तोफा केल्या. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६७६५ श्री. (१६ दिसेंबर.)

पै।। छ० ८ रमजान. पौष. सन आर्बा मय्यातैन व अल्फ.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी दोनी कर जोडून त्रिकाल चरणावरीं मस्तक ठेवून शिरसा।। नमस्कार विज्ञापना. तागायत पौष शु।। २ पावेतों वालकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीकाशीमध्यें भाद्रपद शु।। १४ दुश्चिन्ह जालें त्याचें वर्तमान साविस्तर श्रीमंतास पत्रें काशीहून राजश्री

गोपाळपंत विवलकर यांणीं लिहून पाठविलें व राजश्री बळवंतराव पोंक्षे नि॥ राजश्री गोविंदराव तात्या खासगीवाले यांचे घरींही पत्र आलें. पोंक्षे याजकडील पत्रांतील मजकूर कीं दोन तारे सहा घटका रात्रीं सुमारें दहा दहा पळाचे अवकाशें दोन मोठे पडले दोहोंचाही उजेड क्षेत्रावर अवघ्या अर्धघटकापर्यंत चांदण्यासारखा पडला. भूमि कांपिन्नली. तेणेंकरून घरें कांहीं पडलीं व कांहीं जळलीं. मनुष्यें निजलीं बिछान्यावर होतीं ती गडबडत बाहेर गेलीं. उतरंडी पडल्या. गुरें गोठ्यांत बांधलीं तीं दावीं वरतीं येऊन कांहीं सुटोन चौकांत खालीं आलीं. कांहींस गळफास लागला. मनुष्याचीं अवसानें गेलीं. घरें सोडून आंगणांत बाहेर आलीं तेव्हांच दाण्याचे गंजास आग लागून दोन चारशेंपर्यंत घरें बाजारांतील जळालीं. ते समयीं गंगा खळबळली. दोन घटकांपर्यंत पाणी खळबळत होतें. सर्वांच्या मतें आजच वर्तत कीं काय असें भासलें. याजप्रमाणें श्रीकाशीपासून प्रयाग, गया तीनही क्षेत्रीं सवाशें दीडशें कोशपर्यंत भूमिकंप जाला. तिरस्थळी कंपित जाली. वृद्ध वृद्ध पुरुष त्यांणीं सांगितलें कीं, आमचे वडील आम्हांस सांगत होते परंतु असा प्रकार सांगण्यांत नव्हता. व आम्हीं शंभर वर्षांत असें पाहिलें नव्हतें. याजप्रमाणें लिहून आलें. श्रीभागीरथीस उतार नव्हता तो उतार जाला. मांडीपासून गळ्यापर्यंत पाणी जालें. याजप्रमाणें गडी आला त्यानें मुखजबानी सांगितलें. बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६७६६ श्री. (पौष शु० ३–१७ दिसेंबर.)

पै॥ छ०२ रमाजान. पौष. सन आर्बा मयातैन.

सेवेशीं सा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० २६ साबानपावेतों स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. मार्गेश्वर शु॥ १३ शामलाकडील जंजिऱ्याच्या किल्ल्यांत अकस्मात् अग्न लागून जंगी सरंजाम व कुल इमारत आदिकरून शंदोनशें मनुष्य जळालें. त्यामध्यें शामलानें प्रांतांतील ब्राम्हण कुटुंबसुद्धां धरून खंडाकारितां किल्ल्यांत ठेविलें होतें

तेंही कुटुंबसुध्दां जळून मेलें. याप्रमाणें वर्तमान सरकारांत लिहिलें आलें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६७६७ श्री. (पौष शु. ५-१९ दिसेंबर.)

पै॥ छ० ७ साबान सु॥ आर्बा मयातैन. मार्गशीर्ष मास.

सेवेशीं नागो शामराव सा॥ नमस्कार विनंती. येथील क्षेम तागायत छ० ४ साबानपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. + + + राजमंडळचें लष्कर खुद्द महाराजसुद्धां काल शुक्रवारीं सेनापतीकडील लाटेच्या मुक्कामास आलें. फौज पायदळसुद्धां तीन हजारांचा अजमास आहे. आम्हाकडील गांव नाहींगलज शिरगांव लाटेहून एक कोशावर आहेत. येथील जमेत जमलेमुळें नाद लावून बोलतात. लाटेचा कार्यभाग जाहलेवर कशी उमेद होते पहावें. आम्हाकडील कारकूनही पाठविला आहे. गोकाक तेरदाळप्रांतीं रायबाग मिरडीस अंमल बसवून दंगा करावा अशी बोलवा आहे. राजश्री चिंतामणराव आपाकडील जमाव येथें आहेच. राजश्री आपासाहेब तेथें येणार म्हणोन ऐकतों. आलेस उत्तम. नाहींतरी उभयतांसही आपण लिहून पाठवून येथेंच जमेत जमवावी म्हणजे कोणीकडे रोख पडेल तिकडे उपयोगी येईल. राजश्री महादजी शितोळे निपाणीकरानिसबत जमावसुद्धां मनोळीचे लगत्यास आहेत. पलटणें वसली साहेबाचीं चकतीं गेलीं होतीं त्याजबरून कमलसाहेब चार पलटणें घेऊन मलप्रभातीरानें येतात. आठ रोजांत मनोळीचे सुमारे येतील असें वर्तमान आहे. तूर्त आम्हास दाह जवळ बसला आहे. आपले कृपेंकरून निवारण होईल तें प्रमाण. वरकड मजकूर होईल तो वरचेवर कळवितों. बहुत काय लिहिणें. कृपा करावी हे विनंती.

---

नं. ६७६८ श्री. (पौष शु. १३-२६ दिसेंबर)

पै॥ छ० १७ रमजान सन आर्बा मयातैन. पौषमास.

सेवेसीं सा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ० ११ रमजान सोम-

---

१ पत्र मनोळीहून मिरजेस.

बारपावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. सेवेसीं पेशजीं छ० २ मिनहूचें पत्र पाठविलें आहे त्यावरून सविस्तर निवेदन जालेंच असेल. मार्गेश्वर बा॥ ५ भोसले व बसली यांची लढाई जाली तिचा मजकूर पेशजी लिहिलाच आहे. त्यास लढाईंत बसली शिकस्त जाहला परंतु मागती हुशार होऊन कायम आहे. शिंदे व भोसले गायलगडाजवळ एकत्र आहेत. येशवंतराव होळकर व हिंदुस्थानी राजे रजवाडे इंग्रजे सुद्धां तीन लाख फौज जमा होऊन लखनौ प्रांतीं गेले. राजेश्री बाळाभाऊ शेणवी नि॥ शिंदे, नारायणराव बक्षी याचे चुलते यास सरकारांतून वस्त्रें देऊन फौज ठेवावयास सांगून तूर्त दहा हजार रुपये पोत्यांहून देऊन मशारनिल्हे शेषप्रास राऊतानिशीं सातारस्थानजीक तारगांवावर जाऊन सरकारआज्ञेप्रमाणें तारळेकर महाडीक व पाटणकर वगैरे इनामी गांव जत करून फौज ठेवीत आहेत. पुढें कऱ्हाडप्रांतीं फुट सरंजाम व इनामी गांव आहेत तेही जत करणार. तेथून बाळाभाऊ फौजसुद्धां विजापूरप्रांतीं जाऊन सरखवास व कानगो[1] व इनामी गांव झाडून जत करून फौज जमा करून पुढें सरकार आज्ञेप्रमाणें चाकरी करणार. तळेगांवकर दाभाडे यास हुजूर बोलावून आज्ञा केली जे, फौज ठेवणें, सरंजाम लावून देतों म्हणोन आज्ञा केली. त्याणीं विनंती केली जे, पोत्यांतून नक्त ऐवज देविल्यास फौज जमा होईल म्हणोन विनंती केली. श्रीमंतांची मर्जी जे, आणखी एक दोन नवे सरदार उभे करून त्याजकडून फौज ठेवावी. त्यास फौजेच्या खर्चास प्रतिनिधि व रास्ते व पटवर्धन यांचा सरंजाम जत करून लाऊन द्यावा. याप्रमाणें मुत्सद्दीसुद्धां एक विचार ठरून तिहींकडील सरंजामाच्या जप्तीच्या सनदांचीं डौलें[2] तयार जालीं आहेत. नांव व तेरीख मात्र होणें आहे. राजश्री माधवराव रास्ते यांणीं फौजसुद्धां हुजूर यावें म्हणोन रास्ते याजकडील कारभारी यासी मुत्सद्दी यांणीं खातरजमेचें बोलणें बोलून रास्ते याजकडील राजश्री मार्तंडपंत आज येथोन निघोन राजश्री माधवराव रास्ते याजकडेस गेले आहेत. इंग्रजांच्या भरंवशावर श्रीमंत स्वस्थ आहेत. राजश्री बाळकृष्ण गंगाधर कोळ्यांच्या पारिपत्यास जुन्नरप्रांतीं गेले होते ते

१ कानगो – कुलकर्णी. २ डौल – मसुदा, कच्चा खर्डा.

माघारें पुण्यास आले. शुक्रवारच्या नव्या वाड्याची वास्तु होऊन श्रीसांब व श्री॥ सौ॥ बायासुद्धां नव्या वाड्यांतच राहणें आहे. थोरल्या वाड्यांत एखादे वेळेस स्वारी जाऊन पुन्हां मागती माघारी येती याप्रमाणें वर्तमान आहे. आ॥ राजश्री रामचंद्रपंत आपा याजकडील सरंजामाचे महाल चिकोडी मनोळी वगैरे यांच्याही सनदा जप्तीच्या जाल्या आहेत. याप्रमाणें येथील मजकूर आहे. पुढें होईल तो सेवेशीं लिहूं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६७६९ (पौष शु० १४–२७ डिसें.)

उतारा- राम. आपांचें पत्र जमखिंडीहून मिरजेस.

" इंग्रजांचा मुक्काम वन्नुराहून चंद्रगीस गेल्याचें परवांचे पत्रीं लिहिलेंच आहे. तेथून सडे होऊन तवूरास गेले. आंतल्यांनीं गोळी वाजविली याजमुळें ( इंग्रजांनीं ) तोफा लाविल्या आहेत म्हणून काल गोकाकच्या पत्रीं लिहिलें आहे. "

---

नं. ६७७० श्री. (पौष व० ७–४ जाने.)

पै॥ छ० २७ रमजान मंदवार सन आर्बा मय्यातैन.

सेवेशीं सा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २० रमजान पावेतों स्वामींच्या कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. पेशजीं छ० ११ मिहूनचें पत्र सेवेशीं पाठविलें आहे तें पावोन सविस्तर ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी भोसले याजकडील गायलगड इंग्रज वसली यांणीं छ० १० मिनहूस घेतला. आणि सरकारांत व करनेल कलुप यास वसली यांणीं खुषीचीं पत्रें पाठविलीं तीं छ० १८ रोजीं दाखल होऊन खुषीच्या तोफा इंग्रजांनीं एकवीस केल्या. भोसले व शिंदे गायलगडापासून पूर्वेस दहा बारा कोसांच्या तफावतीनें आहेत. त्यांच्या पिच्छावर वसलीकडील दहा पलटणें लागून आहेत. हिंदुस्थानचें वर्तमान नूतन आलें नाहीं. मुंबईहून करनेल कलुप यांणीं इंग्रजी निशाण तीन हजार रुपयेचें तयार करून चौडसुद्धां आणविलें तें घाटाखालीं आलें आहे. पुढें

ुण्यास आलें म्हणजे शेख सल्ल्याचे दर्ग्यानजीक जुन्या कोटांत उभें करावें. हा बेत आहे. गायकवाडच्या संस्थानाची खासे व जनानखान्यांसुद्धां दरमहाची नेमणूक इंग्रजांनी करून देऊन बंदोबस्त केला. सारांश इंग्रजी जाली! शिंदे व भोसले व होळकर व गायकवाड व सरकारसुद्धां कुल हिंदूचे दौलतीवर इंग्रजांचा गलेफ जाहला. पुढें ईश्वरसत्ता प्रमाण! यात्रमाणें वर्तमान आहे. तें सेवेशीं लिहिलें आहे. पुढें होईल तें सेवेशीं लिहूं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६७७१　　श्री.　　( पौष व. ८ — ५ जाने. )

पै॥ छ० २५ रमजान सन आर्बा मयातैन. पौष वा॥ १२ इंदुवासर.

सेवेशीं बापूजी बाजी बाघ करद्वय जोडोन शिरसा॥ नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ० २१ रमजान मुक्काम परगणे निकेगल येथें स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वादंडीं आज्ञापत्र व राहा आसामी जासूद पाठविले ते छ० मजकुरीं येथें दाखल जाले. येथील वर्तमान पेशजी जर्नेल कमलसाहेब यांणीं तल्लूरचे ठाणें घाशेन पुढें मुरगोडचें बारीनें बंटमुरीचे सुमारें जावयाचा बेत होता तों तोतया वाघाची फौज गजेंद्रगडनजीक उत्तरेस तीन कोस हणमसागर व चेनगिरें या प्रांतांत आलियाचें वर्तमान ऐकून तल्लूराहून कूच होऊन मौजे उपलिर्डाचे मुक्कामास येऊन तेथून सडी स्वारी तुरुकस्वार हजार घोड्यांचे तोफासुद्धां रिसमिटें दोन व पलटण एक व बाजार स्वारीबरोबरचा व जिन्सी बैल दारुगोळा वगैरे जिन्नस स्वारीचा बेगमीचा घेऊन दोनप्रहर रात्रीस कूच करून दुसरे दिवशीं बग्र २ शुक्रवारीं हणमसागरचे मुक्कामावर प्रातःकाळीं वाघाचे फौजेची गांठ घालोन घोड्याच्या तोफांची मारगिरी करून गोटांत शिरून बुणगें झाडून लुटलें व बुणग्यांत सांपडलें माणूस बहुत मारिलें. कांहीं चांगले घोडे व राऊत खबरदार होता तो मात्र सहा हजार फौजेचा सुमार होता त्यांतून पांचचारशे स्वार निघोन गेले. त्याचे पाठलागावर तुरुकस्वार गेले आहेत. परंतु सांपडल्याचें वर्तमान नाहीं. हल्लीं मुक्काम चेनगिरीवर आहे. बुनगें अलीकडे निलोगलास सहा कोशावर

आहे. एक दो दिवशीं बुनगें त्यास मिळावयास जाईल. किंवा तेच माघारे आले तरी येतील. याउपरी माघारीं कोणते रोखें फिरतात किंवा कोणीकडे जातात काय मजकूर अधिकोत्तर समजेल तो सेवेशीं लिहिन. परंतु तूर्त चार महिने या प्रांतांतून जातां दिसत नाहींत. पेशजी मनोळीवर तल्लूरकरांनीं दंगा केला व तातेया बाघाची फौज जमा होती. या प्रांतांतील जमीदार पाळेगार वगैरेंनीं फौजा धरून दंगा होणार हें वर्तमान जर्नेल वसलीसाहेबांस कळोन त्यांनीं चेनापट्टणास लिहून अदवानी रायचुरास हा सरंजाम होता तो या प्रांतांतील बंदोबस्ताकारितां आणविला. वसलीसाहेबांस कुमक वगैरे सरंजाम होता जो लागेल तोही पुरवावा व तिकडील सल्ला होणार आहे तो होऊन तहाचीं पत्रें यास आल्याखेरीज या प्रांतांतोन जात नाहींत व हा प्रांत तुंगभद्रा कृष्णा मध्यदेश याजकडे जाला आहे त्याचे बंदोबस्तास आले आहेत. हेंही वर्तमान आहे. तथ्य वर्तमान अगदीं कांहीं कळत नाहीं. उगेच कांहीं बाजाऊ बदंता अथवा कांहीं कूच मुक्कामचे संधानावरून तर्कास येईल तें सेवेशीं लिहीन. एकूण बहुत मतलबावर आहेत. सडी स्वारी उदपुडीहून जालीहाळास आली तों तेथें कोन्हेरगौडा कुमनुरकर देसाई याचे व मोंगलाकडील मामलेदार यलबर्गे वगैरे तालुक्याचा दोघांचें वैमनस्य येऊन गौडामजकुर याचें वतन जप्त करून वायकामुलें अटकेंत ठेविलीं. त्याजवरून गौडा मजकूर याणें प्यादे वगैरे सरंजाम मिळवून गांव मारीत होता. प्रांतांत दंगा करीत होता तो जालीहाळांत गौडा मजकूर इंग्रजांस सांपडला तो धरून निलोगलचे ठाणेदाराचे स्वाधीन करून गळीं दिला. प्रात:काळीं निघोन मी हणमसागरावर सडी स्वारी तेथें आहे तेथें जाणार. तेथील अधिकोत्तर वर्तमान दिसेल तें सेवेशीं लिहीन. राजश्री नरहरपंत नि॥ राजश्री आपा देसाई हे समागमेंच आहेत. याचे कामाकरितां परसगड वगैरे ठाणीं घलोन देण्यास माघारे आले तरी येतील अथवा येथोनच बंदोबस्त करून देतील. त्यांस काय अशक्य आहे? कळलें तें वर्तमान सेवेशीं लिहिलें आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं ६७७२ श्रीशंकर प्रसन्न. (६ जाने.)

पै० छ० २६ रमजान. पौषमास. भौमवार. आर्बा मय्यातैन.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधर रावजी स्वामींचे सेवेशी. पोष्य माधवराव अनंत कृतानेक सां० नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागायत पौष ब० ९ भृगुवार मुक्काम बागलकोट यथास्थित जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. श्रीदीक्षितबावांचे दर्शनास जावयाकरितां अथर्णीहून पौष ब०२ भृगुवारीं निघोन सोमवारीं मुक्काम मजकुरीं दाखल जाहलों. बाघ म्हणून बागेवाडीवर जमला होता तेथून होनगुंदे तालुकियांत आला. त्याची बातमी मनोळीकडे इंग्रजी पलटणें आलीं होतीं त्यांणीं राखोन दोन मजलांची दौड करून छापा घालून लुटून घेतला. बाघ तोतया व झोटिंग काकर पेंढारी सडे निघोन कोणीकडे आहेत तो अद्याप बातमी आली नाहीं. पेंढारी यांणीं कांहीं तुरुकस्वार यांचीं घोडीं घालून नेलीं. याप्रमाणें वर्तमान कळलें तें लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ करावा हे विनंति.

---

नं. ६७७३ (पौष व. १०—७ जाने.)

उतारा—पत्र मिरजेस नारायणराव राम याचें.

"इंग्रजांची फौज तोरगल तालुकियांत होती इतक्यांत धोंडजी वाघ म्हणोन उत्पन्न जाहला होता तो गजेंद्रगडापलीकडे हणमसागरानजीक हळीगिरें म्हणोन गांव आहे तेथें होता. पुढें तुंगभद्रा उतरोन पलीकडे जाणार अशी बातमी इंग्रजांस लागतांच कूच दरकूच करून जाऊन त्या फौजेस गांठ घातली. तो बेसावध होता. ते समयीं रात्रीं छापा घातला. फौज लुटून फस्त केली. घोड्यावरील पांच चारशे राऊत मात्र जिवानिशीं पळोन गेले. बरकंड पावलोक वगैरे जखमी ठार फार जाले. धोंडजी वाघ म्हणोन फकीर वेष धरून होता त्यास दोन जखमा लागोन इंग्रजांस सांपडला असें बोलतात. इंग्रजांचा मुक्काम अद्याप तेथेंच आहे."

नं. ६७७४ (पौष व. १४–११ जाने.)

उतारा–धोंडो बापूजींचें पत्र पुण्याहून मिरजेस.

" (शिंदे व भोसले आणि इंग्रज यांमध्यें ) तह व्हावयाचें कारण जे, अंबोजी इंगळे वगैरे हिंदुस्थानी फौज व होळकराची फौजमुद्दां लखनौत जाऊन तेथून कलकत्ता प्रांतीं जाऊन इंग्रजांच्या अमलांत बहुत दंगा मांडिला आहे व लखनौकर गव्हरनर आग्र्याच्या लढाईत पडले याजमुळें इंग्रजांची निम्मी बाजू कमी पडली. याजकरितां विलायतेहून हुकूम आला जे, मराठ्यांच्या बखेड्यांत न येतां समेट करून श्रीरंगपट्टणास जाणें. त्यावरोन वसलीनें समेट केला."

---

नं. ६७७५ (माघ शु. ३–१५ जाने.)

उतारा–पत्र धोंडो बापूजींचें पुण्याहून मिरजेस.

"(सरकार आज्ञेप्रमाणें इंग्रजांबरोबर) ते समर्थी कोणी गेले, कोणी न गेले. ते आज शिरसावंद्य जाले. न गेले त्यांची पूर्णाहुति अर्थानिशीं, प्राणानिशीं, स्थलानिशीं होणार. याप्रमाणें उपश्रुत निघाली ती लिहिली आहे. उपश्रुत पक्की आहे. बाजारी नव्हे."

---

नं. ६७७६ श्री. नक्कल. (माघ शु० ७–१९ जाने.)

*विशेष आपण पत्र पाठविलें तें पावलें. पत्रीं लिहिलें जे, रा० जयराम गोविंद आपणाकडे पाठविले आहेत. सविस्तर बोलतील. त्याप्रमाणें सर्वांस घेऊन आपण लष्कर यावें म्हणोन लिहिलें तें कळलें. आपणाकडून महारनिल्हे आले ते तासगांवीं चि० राजश्री हरीपंत बाबासी भटले. तेथें चिरंजीवासी बोलणें जाहलें जे, सरकारचे आज्ञेवरून रा. बापू डेरेदाखल जाहले. समागमें रा. नारोपंत चक्रदेवमुद्दां पंढरपूरचे सुमारें येऊन सर्वांस एक जागां करून फौजमुद्दां यावें असें महारानिल्हेचें सांगणें. ऐसीयासी सरकारचें आज्ञापत्र आल्यावर सरंजामी फौज सिद्धच आहे. इकडे कर-

---

* पत्र राम-आपाचें जमखिंडीहून पुण्यास दिनकरपंत पटवर्धन यांस.

चीरकर यांणीं कसबें अष्टे घेऊन शिलशिला लाविला आहे. नित्य कटखट चालली आहे. तो बंदोबस्त होऊन अष्टे स्वाधीन जालें म्हणजे फौज रवाना करतां येईल. रवाना छ० ५ सवाल.

---

नं. ६७३७ श्री. ( २५ जानेवारी. )

पै॥ छ० १७ सवाल सन आर्बा मय्यातैन.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी त्रिकाल चरणावर मस्तक ठेवून शिरसा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत माघ शु॥ १४ पावेतों बालकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंतांची स्वारी चंद्रग्रहणास्तव श्रीकृष्णास्नानास बांईस निघोन गेली. मंगळवारीं येथून गेले. वद्य पंचमीस पुण्यास यावें अशा बेतानें गेले. उभयतां बाईसाहेब येथेंच आहेत. वसली गंगातीरास आल्याचीं पत्रें गांवांत आलीं. समागमें हिंदू मंडळी झाडून श्रीगंगेवर ग्रहणानिमित्य राहिलीं. वसली मात्र सडा पुढें नगरास आल्याचें बोलतात. रावसाहेबही गंगेस राहिले. पुढें कधीं येतात पाहावें. पंचमी सप्तमीस सुमारें श्रीमंतांच्या व वसलीच्या भेटी व्हाव्या अशी बोलवा आहे. शिंदे भोसले यांचे वकील बरोबर येतात. पुढें विचार कसा ठरतो पहावा. टुयाराव्याविशीं पेशजी पत्रें लिहिलें आहे. त्यास फकीर बोलला कीं मजपाशीं आणखी फकीर बसावयास येत असतात. त्यांजपाशीं आहेत. अथवा आणखी महिन्यामरानें घाटावरील मुन्यांतील विकावयास येतील. पाहून सांगेन असें तो फकीर बोलला आहे. आणखीही शोध करीत आहें. कळावें. इकडील सामान उंटावरोबर पाठविलें आहे. येऊन पावलें असेल. दोन हुंड्या दर पन्नास रुपये केल्या आहेत. येऊन पावल्या असतील. सामान पावल्याची पावती पाठवावयास आज्ञा करावी. बहुत काय लिहिणें. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६६७९ श्री. ( माघ व. २-२८ जाने. )

पै. छ. १४ सवाल सन आर्बा.

विज्ञापना ऐसी जे. ता. सावनूर येथें राजेश्री कृष्णराव देशपांडे कारटगीकर यांचा व राजश्री वासुदेवपंत मराठे नि. गोखले यांचा खटला लागला होता. तेव्हां वासुदेवपंत मराठे यांनीं गोखले यासी लिहून पाठविलें. त्यांणीं वसली साहेब यांचें पत्र पूर्णयास राजेश्री गोविंद केशव नरगुंदकर याजबरोबर घेऊन पाठविलें कीं, देशपांडे तालुक्यांत काटकाई करितात त्यांचे पारपत्य करणें. त्याजवरून वासुदेवपंत व गोविंदपंत हरीहरास दोन हजार स्वार व दोन हजार तुरुकस्वार याप्रमाणें रवाना केलें. ते मौजे कित्तुर परगणें कारटगी नजीक हावनूर दोन कोश तेथें कृष्णराव यांची गांठ पडली. बरावर हजार पंधराशें स्वार होते यांची त्यांची गोळा गोळी होऊन, देशपांडे यांचा मोड माघ शु० १० मीत होऊन पळून कुंदगोळा वरून पांच चारशें निशीं गावावाहेरून गेले. गोपाळराव अगोदर दोन दिवस हजार दीड हजार स्वारानिशीं येलमेळ पा। कुंदगोळ येथें मोकाम करून दोन दिवस आसपास चार दिवस राहून होते. इतक्यांत लढाइचें वर्तमान ऐकोन गोपाळराव याजबरोबर फौज होती ती फुटली. इतक्यांत कृष्णराव व देवाप्पा तिकडून मोड आल्यावर घेऊन येऊन सर्वत्र एक जागां दोन चारशेंनिशीं दारेहाळच्या रोखें गेले. मागें इंग्रजाकडील फौज पाठलागास आली ते मौजे नेलगुड पा।. कुंदगोळ तरगटें परगणे तडस येथें मोकाम करून सडे स्वारी करून पाठलागास गेले आहेत. पुढें कोणीकडे हें वर्तमान नाहीं. खाजेखान पूर्णयाकडील सरदार पारिपत्यास आला आहे. त्याणें आम्हास पत्र लिहिलें कीं कृष्णराव व गोपाळराव पळून कुंदगोळावरून गेले आहेत. त्याजकडील स्वार वगैरे पळोन तेथें येतील त्यांचा बंदोबस्त करून पाठवून देणें म्हणून पत्र व कारकून आला. त्यांची स्वारी वाहेरूनच गेली. कांहीं किरकोळ गांवांत लुगारीं वगैरे तट्टें आलीं होतीं. त्यास त्याजकडील कारकून याचे समक्षच आकरा घोडे गांवांत आम्हाकडील प्याद्यांनीं धरलीं होतीं, तीं त्याजकडील बारगीर पत्रें घेऊन आले त्यांचे हवालीं करून कबज घेतलें. इंग्रजांकडील लष्करचा मोकाम नेलगुड पा। कुंदगोळ येथें आहे. इंगळगी वगैरे गांवची वैरण लाकडें भरून

---

१ पत्र कारकुनाचें कुंदगोळाहून मिरजेस.

नेली. अर्धीकोत्तर उपद्रव नाहीं. सडेस्वारी पुढें देशपांडे यांचे पाठ-लागास हजार पंधराशेंनिशीं गेले आहेत. व नेलगुडास दोन हजार जमावानिशीं मोकाम आहे. पुढें कोणीकडे जाणार हें वर्तमान अद्याप नाहीं. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६७७९ श्रीगणपति. (माघ व. ३ २९ जाने.)

पै॥ छ॥ २७ सन आर्बा. माघमास.

अपत्यें रामचंद्रानें साष्टांग नमस्कार: विज्ञापना. ता॥ छ॥ १४ सवाल रविवार मु॥ मुतकवी येथें सुखरूप आहे. विशेष मी काल मुक्काम मजकुरीं आलों. आज नरंगुदास मुक्कामास जातों. पुढें श्री दीक्षित बाबाचा शोध घेऊन जाईन. सावनूर तालुकेंत कृष्णराव व गोपाळराव देशपांडे कांहीं फौज तालुक्यांत धांदल करीत होते. त्यास गोखले याजकडील कारकून पूर्णय्याकडे जाऊन त्याचे दोन हजार बार दोन हजार स्वार घेऊन त्याचें पारपत्य केलें. बहुतकरून स्वार पळाले. शें दोनशें स्वार बनुरास मुक्कामास देशपांडेसुद्धा आले तो मागून इंग्रजांचा लाग घेऊन, छापा घातला. पन्नास पाऊणशें घोडे गेले. याजउपरी जेथें स्वार पळत जातील तेथें पत्ता लाऊन धरणार. हें वर्तमान वडिलांस कळावें करितां लिहिलें आहे. आपले प्रांतीं कोणी त्यांतील पळे आले असतील त्यास ताकीद करून लाऊन द्यावे. नाहींतर व्यर्थ मागें लचांड येईल. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६७८० श्री. (पौष-जाने.)

पुरवणी विज्ञापना. इंग्रजांचे लष्कराचें वर्तमान आज नऊ दिवसांचे डाकेवरून रामदयाचें पत्र आलें. वसलीचा मुक्काम राक्षसभुवनावर झाला. मजल दर मजल पुणेस जाणार. तह जाल्याचा मजकूर पत्रांत लिहिला होता जे फरासिसांची दाटी फार झाली. या मसलतीस आणखी वरीस दोन वर्षें लागायाचा सुमार दिसूं लागला. श्रीमंत बाजीरावसाहेब यांसी स्थापावें ऐसें बोलणें इंग्रजांचें होतें. शिंदे व भोसले यांचा

---

१ पत्र राम. आपाचें मिरजेस.

आग्रह चिमाजीआप्पांस स्थापावें. अथवा अमृतराव याचे चिरंजीवास स्थापावें. असें जालेस तह करूं. नाहीं तर तह करीत नाहीं. याप्रमाणें बोलणें शिंदे भोसले यांचें पडलें. तेव्हां फरासीसांचा नेट तिकडे लागला. तेव्हा बोलणें मान्य करणें प्राप्त जालें. शिंदे भोसले वगैरे हुजरात यांणीं व सर्वत्र सरदार लहान मोठे पुण्यास यावें. चिमाजी आप्पास अगर अमृतरावाचे चिरंजीवास स्थापावें. बाजीराव यांणीं इंग्रजांस काय कबूल केलें तें सर्वांत्रांचे संमतें इंग्रजांस द्यावें. याप्रमाणें पत्रांतील मजकूर होता. शेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६७८१ (माघ व. ५–३१ जाने.)

उतारा– पत्र धोंडो बापूजीचें पुण्याहून मिरजेस.

"मलबा वगैरे मंडळ पंढरपूरच्या सुमारें मिळाले आहेत. त्यांचे बंदोबस्तास बसलीकडील दोन पलटणें गेलीं. त्या मिलाफांत विश्वासराव घाटगे होते ते निघोन शिंदे याजकडे गेले. +++ सातारियाचा बंदोबस्त बैजनाथ भट मामा याजकडे सांगितला. त्यांणीं तेथील झाडून किल्ला शहरमुद्धां बंदोबस्त केला. सरकार वाड्यांतील झाडझुड व चित्रें नवीं याप्रमाणें चाललें आहे. श्रीमंत आपलें लग्न करणार हाही बेत दिसतो."

---

नं. ६७८२ (माघ व. ५–३१ जाने.)

उतारा–पत्र धोंडो बापूजींचें पुण्याहून मिरजेस.

"(इंग्रजांनीं) पैठणच्या मुक्कामाहून दोन पलटणें व हजार तुरुकस्वार याप्रमाणें करमाळें व पंढरपूरप्रांतीं लोखंडे व घाटगे व मलबा नगरकर व आणखी एक दोन सरदार मिळोन फौजेचा जमाव करोन प्रांतांत दंगा मांडिला आहे त्याच्या पारिपत्यास रवाना केले. सरकारांतून सर्जेराव घाटगे यास मनोळी व येकुडी व आणखी तीन महाल मिळून साडेतीन लक्षांचा सरंजाम देऊन सनदा दिल्या."

---

नं. ६७८३ श्री (माघ व. ८–४ फेब्रु.)

पै॥ छ. २१ सवाल. माघमास. आर्बा मय्यातैन.

विज्ञापना. इंग्रजाबरोबर रावसाहेब येत आहेत. त्यांचा पक्ष टोपिकरांनीं धरिला. याजमुळें मुख्य स्थानीं अनेक प्रकारचे अंदेशे चित्तांत आले आहेत. टोपीकरांचे मतें मूळ करून ठेवावे हाच मनसबा आहे. दंघूंची एकवाक्यता करून द्यावी असें त्यांचें म्हणणें. यांचे तो दृष्टीस पडतां कामास नये. यांत परिणाम कसा होतो पाहावें. घोळ मिटत नाहीं. सूचनार्थ विनंती लिहिली आहे. मागाहून विस्तारें लिहीतच आहे. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६७८४ श्री. [नकल] (माघ व० १३-९फेब्रु)

पै० छ० २६ सवाल अर्बा मय्यातैन.

+ शेवेसीं विनंती सेवक काशी तुकदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ. २६ सवालपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. काल विश्वासराव घाटगे शिंद्याचें लष्करांतून छापा पडला ते पळून काल बोरगांवास आले. त्यांणीं चिटणीसाचे प्याद्याबरोबर हीरू चौधरी याचे नांवें पत्र पा॥. ते येथें कृष्णेवरील चौकीस सांपडलें. येथेंही चौकसी केली. पेंढारी याजकडे कांहीं आगोदरचें संधान दिसत नाहीं. सामोपचारानें पत्र आलेसें दिसतें. घाटगे याजवळ दोवे पेंढारी बहुत दिवस त्याजपासीं आहेत. बोरगांवकरांचे स्वार सांगतात कीं, सरडेवर फौज होती त्याजवर छापा इंग्रजांचा पडोन फौज लुटली गेली. घाटगे बोरगांवास आले. त्याजबरोबर जखमी पांच सात जण आहेत असें सांगतात. तरी शेवेसीं बोरगावचे प्यादे पा॥. आहेत. शेवेसीं श्रुत होय विज्ञापना.

---

नं. ६७८५ (माघ व. ११–७ फेब्रु.)

उतारा–पत्र थोंडो बापूजींचें पुण्याहून मिरजेस.

"दुधा राव्याविशीं तलाशांत आहे. वसई इंग्रज नगर किल्याअलीकडे पांच सात कोसांवर आला. रावसाहेब नगराजवळ आपले कुटुंबांत

---

+ आष्टयाच्या कमाविसदाराचें पत्र मिरजेस.

येऊन राहिले. दोनशे लोक बरोबर आहेत. बाकीची रजा दिली. येक पलटण चौकीस आहे. मलबादादा वगैरे बंडवाले यांचे पारिपत्यास पलटणें व स्वार, निपाणकर, गोखले वसईनें पाठविले आहेत. वसली सरकार आज्ञेखेरीज नाहीं. लोक मनस्वी बकवा करतात ती लटकी."

---

नं. ६७८६ (फाल्गुन शु. ९-१९फेब्रु.)

उतारा—पत्र घोंडो बापूजीचें पुण्याहून मिरजेस.

"श्रीमंत वाईहून आले. शुक्रवारचे वाड्यांत मुहूर्तकरून आले. तेथें भोजन करून मग सायंकाळीं थोरल्या वाड्यांत आले. रा. सदाशिव माणकेश्वर याजला समाधान नाहीं याजमुळें श्रीमंत त्याचे घरीं चार रोज नेहमीं जातात. वसली इंग्रज भाव्ये व मलबादाद यांचे पाठीस लागला आहे. तुळजापुरापुढें गेले. इंग्रजानें ढाल संगमावर उभी शिवरात्रीस केली. रावसाहेब नगरच्या किल्यापाशीं भिंगारगांव आहे अदकोसावर तेथें गांवीं आहेत."

---

नं. ६७८७ श्री. (फाल्गुन शु. १२-२२फेब्रु.)

पै॥ छ० २५ जिल्काद सन आर्बा मय्यातैन गुरुवार प्रातःकाळ सेवेशीं सा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ० १० जिल्कादपावेतों स्वामीच्या कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. पेशजी छ० २६ सवालचीं पत्रें सेवेसी पाठविलीं आहेत तीं पावोन सविस्तर ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी श्रीमंतांची स्वारी वाईस जाऊन साताऱ्याचा बंदोबस्त वैजनाथभट यांस सांगोन किल्ल्यावर महाराज व उभयतां धनीण व महाराजांचे पुत्र व कन्या याप्रमाणें किल्ल्यावर ठेवून बाकी कुल राजमंडळ झाडून हुजरेसुद्धां व चाकरीच्या बायकासुद्धां किल्याखालीं उतरून सर्वांस सांगितलें जे, तुमच्या चित्तांस येईल तिकडे पोट भरावयास जाणें आणि राजमंडळच्या लोकांस जमीनी व गांव व रोजमरे व अडीअिया होत्या त्या कुलचाकरीच्या बायकासुद्धां जप्त करविल्या. याजमुळें महाराज तीन चार दिवस महालांतून बाहेर निघाले नाहींत. व तख्ता-

मुद्दां झाडून कचेरी आदिकरून तीन चार दिवस दिवा लागला नाहीं. श्रीमंतांनीं वाईहून आपणाजवळील खिजमतगार पांच असामी महाराजांचे चाकरीस पाठविले आहेत. याप्रमाणें संस्थानचा बंदोबस्त जाला. करवीरकर महाराज यांचेकडेस कन्येचें लग्न आहे. त्याजकडून श्रीमंतांस लग्नपत्र वांईच्या मुक्कामास आलें त्याजवरून महाराजाकडेस आहेर पाठविणें तो महादजी चाबूकस्वार यास पालखी व अबदागीर देऊन चाळीस पन्नास माणूस शागीर्दपेशा वगैरे देऊन त्याजबरोबर आहेर देऊन करवीरास महाराजाकडे सर्जेराव घाटगे गेले त्यांच्याबरोबर यासही पाठविले आहेत. सरकारची स्वारी पुण्यास फाल्गुन शु॥ २ स दाखल जाली. त्याजवरून बसलीसाहेब इंग्रज यांचें बोलावणें मुंमईस करनेल कलुषास गेलें आहे. तेही लौकरच येणार व बसलीही त्या अदमासें पुण्यास लौकरच येणार आहेत. आल्यानंतर जो मजकूर होईल तो सेवेशीं लिहूं. श्री॥ राजश्री रावसाहेब भिंगारास नगरानजीक हजार लोकांनिशीं आहेत. भोसले नागपुरास फौजसुद्धां आहेत. व शिंदे बऱ्हाणपुरास साठ हजार फौजेनिशीं आहेत. उभयतांचे वकील बसलीबरोबर आहेत व बसलीकडील तीन तीन असाम्या उभयतां सरदाराजवळ गेरे बोलीस आहेत. यशवंतराव होळकर मथुरेहून निघून दिल्लीकडेस मेवाडांत दोन अडीच लाख फौजेनिशीं आहेत. व दिल्लीनजीक शिंद्याकडील बापूजी शिंदे व तात्या शेणवी तीस हजार फौजेनिशीं आहेत. दिल्लींत अंमल इंग्रजांचा होऊन प्रयागानजीक पुन्हां इंग्रज कंपूची जमाव करीत आहे. याप्रमाणें दिल्लीहून पत्रें आलीं त्यावरून लिहिलें आहे. चेनापट्टणाहून इंग्रज सरदार चालला तो आजच पुण्यास दोन तीनशे लोकांनिशीं फाल्गुन शु० ९ स दाखल जाला. सेवेशीं पांच सात पत्रें पेशजी पाठविलीं आहेत त्यास प्रत्योत्तरें आलीं नाहींत. तरी स्वामी कृपाळु होऊन प्रत्योत्तरें द्यावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६७८८ श्री. (माघ व० ११–७ फेब्रु.)

तागायत छ. २४ सवाल मुक्काम दिल्ली. इकडील वर्तमान तरी जनॆल लीकसाहेब छ० २४ माहे जमादिलाखरीं पादशहाचे हुजूर येऊन मुला-

जमत हाशील करून बारा दिवस येथें होते. तदनंतर आग्र्याचे रोखास कूच करून गेले. श्रीमथुरा वृंदावन वगैरे महालांत दखल करून आग्र्यास पावले. पंधरा दिवस महासरा (वेढा) किल्ल्यास केला. भदोरिये व मेवाती जान फिरंगीकडील शिबंदी होती त्यांनीं तलब तनखा घेऊन किल्ला यांच्या स्वाधीन केला. जोरस फिरंगी व पिरू व लोईसाहेब वगैरे या प्रांतीं होते ( ते ) सर्व जर्नेलांनीं कलकत्त्यास रवाना केले. किल्ल्यांत सत्तर लक्ष रुपये नगदी जमा होती ते यांच्या कबज्यांत आली. नंतर किरकोळी पलटणा हिंदुस्थानी लोकांनीं जमाव करून भरतपूरनजीक बारा कोसांवर गुलाबराय कदम वगैरे दोन हजार स्वार दक्षणी व फडणीस आदिकरून सर्व बरोबर होते. पंधरा पलटणांनिशीं ताम्राचा मुकाबला केला. चार प्रहर तोफखान्याची लढाई मातबर केली. इंग्रजांकडील दोन हजार गोरे व तीन हजार तेलंगे जखमी व ठार जाले. अखेर जर्नेलसाहेबांनीं स्वतः हल्ला केला तेसमयीं कदम वगैरे दक्षिणी स्वार पळोन गेले. सबब रावमाचेडीकर व भर्तपूर वगैरे जमीदारांनीं पलटणवाल्याची पिच्छाडी मारली. बुणगें गारद केल्यावर पलटणाचे लोक हजारों ठार जाले. शेवटीं फत्ते इंग्रजांनीं केली. परंतु ताकद राहिली नाहीं. पलटणांतील तोफखाना दरोबस्त यांच्या कबज्यांत आला. गमाजीराव शिंदे व राजश्री बामनराव खंडेराव कान्होडचे जिल्ह्यांत आठ दहा हजार लोकांनिशीं गुजराणी करून आहेत त्याजवर भडोच व जाटाकडील व रावमाचेडीकर याची व इंग्रजी पलटणें तैनाथ जाली असे. कृष्णगड मेवातप्रांतीं आहे त्यासी मोर्चे काईम केलेच आहेत. सारांश या प्रांतीं दिल्लीमुद्धां सर्व किल्ले वगैरे जागां यांची दखल हांसी हिसारपावेतों जाला. सांप्रत अंबोजी इंगळे याजकडील महादाजी अनंत जावसालास आले आहेत. तात्पर्य ग्वालेर वगैरे किल्ले खालीं करून द्यावे म्हणोन मशारनिल्हे यांणीं उत्तर केलें व गोहोदवाल्याचे भाऊबंद व भदोरिये यास ताम्रांनीं वस्त्रें देऊन त्यांस पूर्ववत्प्रमाणें जमीदारी राज्य देण्याची उमेदवारी करून ग्वालेरप्रांतीं रवाना केलें असे. तेथेंही खलेल प्रारंभ आहे. राजे हिंमत बहादुर गोसावी व गनीमबेग एकविचारें होते इतक्यांत समशेरबहादुर देशींहून आल्यानंतर आपसांत नाचाखी जाली.

याजमुळें गनीमबेगाचा फितूर पाहून समशेरबहादर यांणीं त्यास कैद केलें सबब गोसावीमजकूर बेदिल होऊन श्रीप्रयागीं मुंठीसाहेब नामें फिरंगी सुभेदार होता त्याजकडे सूत्र लावून तिकडील पलटणा आणोन समशेरबहादर यांसीं मुकाबला केला. अखेर बहादूर मजकूर शिकस्त खावून काल्पीनजीक आले. बुंदेलखंडप्रांतीं गोसावी व इंग्रजी लोकांनीं दखल केला. हल्लीं काल्पी उरईप्रांतीं येऊन तेथेंही बंदोबस्त केला. काल्पीकर व समशेरबहादर व झाशीकर याजकडील फौज कोठडकानजीक जमाव करून कजाखी लढाई करीत आहेत परंतु ताकत नाहीं. झाशीकडे बोलीसाहेब नामें रवाना होणार. जर्नेल लीकसाहेब फत्तेपूरनजीक ग्वालेरच्या रोखास कूच करून गेले. लवकरच चर्मंवतीपार जातील. समरूची बेगम व भडोचमंडळ व शीख व जाट वगैरे राजेरजवाडे सर्व यांजकडे सामील जाले. राजश्री येशवंतराव होळकर यांचीं पत्रें उदेपुराहून इकडील जमीदार राजेरजवाडे वगैरे सर्वांस खुफीया आलीं आहेत कीं लौकरच स्वारी त्या प्रांतीं येते. तुरुत कोणी ताम्राकडे सामील न होणें. दीड मास लोकांनीं उमेदवारी पाहून अखेर यासी दारमदार केला. रंजितसिंग भरतपूरकर यांणीं जर्नेलाची भेट घेऊन मामला देणें कबूल केला. येणेंप्रमाणेंच जयपूरकराशीं कौलकरार ठरला आहे. सर्व लोक कालमाहात्म्यापुळें केवळ त्रासांत आहेत. पादशाहास साठ हजार रुपये दरमहा नगदी करून दिल्हा. व सहा लक्ष रुपये नजरेबद्दल देणें म्हणोन जर्नेलास कलकत्याहून गवरनेर साहेबांची परवानगी आली आहे. लौकरच दाखल होणार. कृष्णगडचा किल्ला छ० १ रोजीं खालीं जाल्याचें वृत्त अखबारांत आलें. बामनराव खंडेराव कानोडच्या किल्ल्यांत आज तागायत इंगळे यांचे दुराशेत फसाबांत आले. लोकांस कोठेंही जावयास ठिकाण राहिलें नाहीं. चहूंकडून यांणीं प्रसलें आहे. दरोबस्त या प्रांतीं यांचा दखल जाला. पुढें होईल मजकूर तो सेवेशीं लिहूं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६७८९ ( फाल्गुन शु॰ १५ —२९ फेब्रु. )

उतारा—पत्र त्रिंबकराव कुरुंदवाडकर यांचें मिरजेस.

" लोखंड,- माने, नगरकर व फडके यांचें लष्कर बारशी, पानगांव व देवणगांव येथें मुक्काम जाहला आहे. त्यांचें पीछावर पंचवीस तीस हजार फौज व गोखले व निंबाळकर मिळोन माणकेश्वराहून दरकूच छ० ३ जिलकादेस नजीक सोलापूर येथें मुक्कामास आले. एक दोन दिवसांत त्यांस गांठून दगा करणार. "

---

नं० ६७९०                श्रीगणपति.        (फाल्गुन व० ७-३मार्च.)

पै. छ. २५ जिल्काद् आर्बा मयातैन फाल्गुन.

तीर्थरूप राजश्री बाळासाहेब वडिलांचे सेवेसीं.

अपत्यें रामचंद्रानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता। छ.२० जिल्कादपर्यंत वडिलांचें आशीर्वादें करून मुक्काम शिरटी येथें श्रीबाबांचें चरणासंनिध सुखरूप असे. विशेष. वडिलीं आशिर्वादपत्र पाठविलें तें पोंचलें. विश्वासराव घाटगे यांचे हत्ती व पाऊणशें उंट म्हैसाळावरून गेले व वंडवाले हवालदील होऊन बेकरांचे मुक्कामीं आले. त्यावर चिरंजीव राजश्री बाबांनीं तासगांवाहून स्वार पाठवून लुटले. बहुत नाश जाहला. फौजेंतील मुख्य पळाले. इंग्रजांकडील लोक ता।गांवचे मुक्कामीं आले, ते पुढें गेलेच असतील म्हणोन वडिलीं तपशीलवार लिहिलें तें कळलें. ऐसीयास वंडवाले यांणीं आज आठ महिने प्रजा मारून मुलूख बुडविला. शेवटीं इंग्रजांचे भक्षस्थानीं पडले. बहुतांचा नाश जहाला. ईश्वर इच्छा प्रमाण. याउपरी इंग्राजांचा लाग मागें घेऊन लुटीचा शोध करूं लागले तर सर्वांस अवघड पडेल. याउपरी वंडवाले समाप्त जाहालेसें भासतें. मला बाबांनीं निरोप दिल्हास निघोन जमखिंडीस येतो अद्यापि राजश्री माधवरावजीसही लिहिलें जाहला नाहीं. एथील महिमा सर्व कळलीच आहे. सांब शिवाचाच अवतार. जगाचा उद्धार करावयास निर्माण आहेत ! आम्ही यथास्थित आहे. आपण भेटीस रावरास्ते व मी आलों म्हणजे यावयाचा करार केला आहे. बहुत काय लिहिणें सेवेसी विदित होय हे विज्ञापना.

---

१ राम. आपांचें पत्र शिरहट्टीहून मिरजेस.

नं. ६७९१ ( फाल्गुन ब. ८– ४ मार्च. )

उतारा—पत्र धोंडो बापूजीचें पुण्याहून मिरजेस.

" बसलीसाहेब व गोखले व निपाणीकर पुण्यास फा. ब. ? आले. त्यांस सरकारांतून सामोरे रा. बापू फडके व खंडेराव रास्ते गेले होते. नंतर ब. ४ प्रातःकाळीं बसली व गोखले मिळोन सरकारवाड्यांत येऊन श्रीमंतांच्या भेटी घेऊन उभयतां आपल्या लष्करांत गेले. गोखले व निपाणकर पर्वतीच्या खालीं मुक्काम करून आहेत. बसली गारपिरावर आहे. × × × श्रीमंतांचें चित्त स्थिर नाहीं. गोखले व निपाणीकर यांच्या गोटास ब० ७ श्रीमंत गेले होते. त्यांस आज्ञा जाली जे, मनोहरगीर गोसावी व धोंडोपंत गोडबोले यांचे लोक हजार दोन हजारपर्यंत साताऱ्यानजीक आहेत. तुम्ही उभयतां फौजमुद्धां साताऱ्यानजीक जाणें म्हणून आज्ञा जाली आहे."

---

नं. ६७९२ (फाल्गुन ब० ९ – ६ मार्च.)

उतारा— पत्र धोंडो बापूजीचें पुण्याहून मिरजेस.

" मोरोबादादा फडणीस यांच्या वाड्यांत जतीचा कारखाना होता तो काढून वाड्याचा झाडलोट करीत आहेत. दादांचें कुटुंब येणार म्हणोन वर्तमान आहे."

---

नं. ६७९३ श्रीकृष्ण (फाल्गुन ब. १२ –९ मार्च.)

पौ॥ छ० २७ जिल्काद फाल्गुनमास सन आर्बा मय्यातैन.

सेवेशीं बाबाजी बापूजी अंकलीकर कृतानेक सा॥ नमस्कार विनंति विज्ञापना. तागायत छ० २६ जिल्कादपावेतों मु॥ करवीर येथें क्षेम असो. विशेष. लष्करांत इंग्रजांचा छापा पडिला त्यांत राजश्री विश्वासराव बापू सर्जेराव लढाई घेऊन परभारें आले. मी मागें होतों. त्यांचें दुसरे हत्ती, उंटमुद्धां पाठीमागून घेऊन मुक्काम मजकुरीं येऊन पावलियाचा मजकूर पेशजीं लिहिला होता. हल्लीं काल दिंडे मांजकडून पत्रें आलीं. त्यांतील मजकूर इंग्रजांचा तह बिघडला. सर्जेराव यांस बोलाविलें आहे.

पुन्हां जाण्याचा बेत घडला म्हणजे सेवेशीं लिहोन पाठवितों व मीही स्वामीस भेटोन जाईन. मौजे अंकली येथें सर्जेराव यांणीं हक्क रसुमाचे ऐवजीं धर्मादाय इनाम देविला आहे. त्याचें दुसरें पत्र घेऊन पाठवितों म्हणोन विनंती केली होती त्याप्रमाणें पत्र घेतलें आहे. सेवेशीं घेऊन येतों. श्रुत व्हावें हे विज्ञापना.

---

नं. ६७९४ श्री. (फाल्गुन व० १३–१० मार्च.)

पै॥ छ० २९ जिल्काद सन आर्बा मय्यातैन. अधिक चैत्र शु. १ इंदुवार.

श्री० राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं.

+ विनंती सेवक बाळाजी महादेव दामले चरणावर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २७ जिल्कादपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री हरीपंत भावे याचा मुक्काम कसबें रहिमतपुरावर होत होता. तो राजश्री फत्तेसिंगराव माने यांणीं होऊं न देतां दिघीवर घालविला. समयास माने होते त्यामुळें गांवची वस्ती राहिली. नाहीं तर वस्ती देखील राहिली नव्हती. भावे यांणीं रोखे करून गांवगन्ना फारच अरिष्ट केलें. तेव्हां श्री. राजश्री पंतप्रतिनिधी यांची फौज तयार होऊन आली. तेव्हां भावे कूच करून देऊरच्या मुक्कामास गेले. त्यांचे मागें पंताचीही फौज गेली. देऊराहून माने यांणीं कूच करून सालप्याच्या घाटानें जात असतां घाटांत पंताकडील फौजेनें गांठ घातली. तेथें लढाई होऊन पंताचे फौजचा मोड होऊन किनईस आली. भावे निघोन बारामतीकडे गेले. तिकडे पुण्याहून फौज येऊन भावे यास लुटल्याचें बाजारी वर्तमान आहे. राजश्री फत्तेसिंगराव माने यांचा मुक्काम कसबें कोरेगांवावर आहे. यांचे बोलणें पुण्यास श्रीमंतांकडे लागलें आहे. ठरावांत येऊन माने यांजवर कृपा व्हावी असें जनवार्तेत आहे. पंताकडेही बोलणें लाविलें आहे, परंतु जरबेचें बोलणें मान्याकडील आहे. याजवर जरब टाकावी म्हणोन पंताकडील फौज किनईस जमली होती. परंतु माने यांजवर जरब न बसे. याजमुळें फौज मसुरेस गेली. चारशें स्वार मात्र किनईस राहिले आहेत. माने

---

+ पत्र रहिमतपुराहून मिरजेस.

प्रांतांत रोखे करून खंडण्या घेत आहेत. मौजे बठारबर रोखा जाला आहे येथेंही बोलणें कांहीं खर्चास देणें म्हणोन लाविलें आहे. वाड्याचा कारखाना माने यांणीं चालता केला आहे त्यास तूर्त पांचशें रुपये देणें म्हणोन माने यांचें पत्र आलें आहे. माने प्रांतांतून लवकर जात नाहींत. तीन हजार फौज आहे. आणखी ठेवीत आहेत. पुढें काय घडतें पहावें. अक्कलकोटचे खंडणीबद्दल राजश्री काशीराव गाडगीळ फत्तेसिंग भोसले यांचे दिवाण यांस माने यांणीं धरून आणिलें आहे. त्यास रोज मारतात. कानास चाप लावितात. याप्रमाणें त्यांचे हाल चालले आहेत. कसबें खटाव येथील राजश्री लक्ष्मणराव काठेकरी यांसही आणिले आहेत. त्याचे ही हाल मांडिले आहेत. वीस हजार रुपये खंडणी लाविली आहे. सेवेशीं विदित होय हे विज्ञप्ति.

---

नं. ६७९५ श्री. ( १० मार्च. )

पै॥ छ० १ जिल्हेज आर्बा मय्यातैन.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत फाल्गुन व० १३. वसली येथें आला, श्रीमंतांच्या भेटी जाल्याचें पेशजी पत्रीं लिहोन पाठविलें आहे. वसलीस मेजवानी हिराबागेंत जाली. वाड्यांत एक दोनदां बैठक जाली. नंतर सदाशिव माणकेश्वर याजकडे मेजवानी वसलीस जाली. नंतर दुसरे दिवशीं व० १० बुधवारीं नवा वकील चेन्नापट्टणाहून आला तो व येथील पांच चार कारभारी असें पांच सहा जण तीन प्रहर रात्रीस निघोन मुमईस गेले. आठा रोजीं फिरोन माघारीं येणार याप्रमाणें बोलतात. बंडवाले यांचे वाडे सरकारांत जप्तीस होते ते अवघे रिकामे करावे, कोणी कोणी गृहस्थ लोहोगडास वगैरे आहेत त्यांजला अभयपत्रें सरकारचीं पाठवून त्यांजला आणावें, त्यांची चजिवस्त जप्तीस आहे ती माघारी द्यावी याजप्रमाणें वसलीनें बोलणें करून गेला. वाडे रिकामे व्हावे असें आहे. रावसाहेब यांजकडून कारकून नेहमीं वसली बरोबर प्रभाकरपंत आहेत तेही मुंबईस बरोबर गेले. मसलत करून वसली बरोबर हरएक विशीं बोलणीं व्हावीं तीं कांहीं जालीं नाहींत. तिकडून

आल्यावर व्हावीं असें बोलतात. जो काय ठराव ठरणें तो मुंबईहून आल्यावर होईल. पुरंधर किल्याचा तह केला. निशाण किल्ल्यावर जाणार. सान्ये यांणीं पुण्यांस यावें असें ठरलें. जी गोष्ट वसलीकडून बोलण्यांत येते ती सरकारांतून मान्य करून त्याजप्रमाणें होत जाईल याजप्रमाणेंही बोलवा आहे. बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६७९६ (अधिक चैत्र शु. ३-१४ मार्च)

उतारा—पत्र चिंता. सांगलीकर यांचें पुण्यास अंताजी रामचंद्र जोशी यांस.

" फडके व मोरे फौजमुद्दां तासगांवानजीक येऊन मुक्काम करोन दोन गांव मारले. त्याजवरोन फौज पाठवून त्यांचें लष्कर लुटलें व कांहीं पळालें. फडके व मोरे पळाले ते माने याचे लगत्यास किंवा दुसरेकडे गेले याचा शोध लागला नाहीं."

---

नं. ६७९७ (अधिक चैत्र ७-१८ मार्च)

उतारा--पत्र धोंडो बापूजीचें पुण्याहून मिरजेस.

" रावसाहेबांचे पत्रावरून पुरंदर बापू साने यांणीं इंग्रजांचे हवालीं केला इंग्रज वर चढलेनंतर त्यांणीं विठोजी नाईक याचे हवालीं केला. इंग्रजांनीं (बापू) साने चीजवस्तमुद्दां बरोबर आणिले. संगमावर त्याजपाशीं आहेत. कुटुंब येथें आहे."

---

नं. ६७९८ श्रीगणपति. (अधिक चैत्र शु. १२-२३ मार्च)

पै. छ. ११ जिल्हेज सन आर्बा मयातैन. फाल्गुन.

अपत्यें हरीनें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ. १० जिल्हेज. सायंकाळीं सहा घटिका दिवसपर्यंत यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. विश्वासराव घाटगे याजकडील बुणगें शिरोळास गेल्याचें व मलवा नगरकर व भोसले व फडके व मावे व फत्तेसिंग माने मिळोन पंचवीस हजार फौजेनिशीं माण नदीवर मुक्काम आहे. पिच्छावर इंग्रजाकडील जमाव आहे म्हणोन लिहिलें तें कळलें. बातमीस माणसें त्वरित पाठ-

वावी म्हणोन लिहिलें. त्यास बातमीस माणसें पाठवितों. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६७९९. श्रीगणपति. (अधिक चैत्र शु. १४ – २५ मार्च.)

अस्सल वैमोजीव नक्कल.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेशीं.

विनंती सेवक हरि परशराम कृतानेक सा. नमस्कार विज्ञापना. तागायत छ० १२ जिल्हैजपावेतों स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. पेशजीं करवीरकर महाराज देवदर्शनाचें निमित्यें कसबें भिलवडी येथें येऊन माघारें जातेसमयीं इकडील सरंजामांतलि· कसबें अष्टे येथें दग्यानें ठाणें घालून दोन हजार स्वांर व हजार पायदळ या सरंजामानिशीं शहाजी पांढरे यास आपले तर्फेनें तेथें ठेवून गेले. नंतर त्याचा तेथून शिलशिला सरदेच्या गांवगन्ना चाललाच होता. एक दोन वेळ दरम्यान त्याचे व आमचे फौजेची लढाईही जाली असतां ते काल छ० ११ जिल्हेजीं भिलवडीस इकडील कांहीं फौज पायदळ होतें तेथें लढाईचें तोंड लावून त्यास धुडावून ते ही जागा कायम करून पुढें तासगांवपर्यंत पल्ला करावा या इराद्यानें आपले जमावानिशीं चालोन भिलवडीनजीक कृष्णा दक्षिण तीरास आले. हे बातमी येतांच तासगांवींहून आम्ही तयार होऊन गेलों. दोनप्रहरपर्यंत त्यांची आमची लढाई होऊन अस्तमानचे दोन घटका दिवसास नदीपार जाऊन त्याजवर चालोन घेतलें. सरमिसळ होऊन लढाई चांगली जाली. स्वामींचे पुण्यप्रतापेंकरून त्याचा मोड होऊन पांढरे यांस तीन जखमा लागोन ते व त्यांजकडील दोन हत्ती-एक जरीपटक्याचे निशाणाचा व एक नौबतीचा व एक तोफ येणेंप्रमाणें सरकारांत पाडाव आलें. अस्तमान जाल्यानंतर फौज पायदळसुद्धां तसेंच अष्टयावर चालोन गेलों. तेथे त्याचा मोड होता तो तुटून ठाण्यास वेढा दिल्हा. दोन प्रहर रात्र पावेतों ठाण्यांतील व इकडील लोकांचा गोळा-

१ बरहुकूम. पत्र तासगांवाहून पुण्यास.

गोळी जाली. पहाटेच्या प्रहररात्रीस हल्ला करून'ठाणें घेतलें. ××× सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं ६८०० श्री. (अधिक चैत्र ब० १—२७ मार्च)
पै. छ० २० जिल्हेज. सन अर्बा मयातेन.

सेवेसीं सा॥ नमस्कार विज्ञापना. ता॥ छ० १४ जिल्हेज पा॥ स्वामींचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. इंग्रजांचीं दोन पलटणें अधिक चैत्र शु॥ १४ रविवारीं पुण्याहून निघोन लोहोगडास गेलीं. किल्ला चहूं रोजांत खालीं करून घेतों म्हणोन इंग्रजाचें बोलणें आहे. गोखले सरकारचा निरोप घेऊन सावनूर प्रांतीं जावें म्हणोन जेजुरीपर्यंत गेले. पुन्हां श्रीमंताची आज्ञा जाली जे, फौजसुद्धां माघारे येऊन भिल्लांवर जुन्नर प्रांतीं जाणें. त्यावरून गोखले माघारे फिरोन कोंडीवर आले. येथून भिल्लांवर जाणार. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६८०१ श्री. (अधिक चैत्र ब. १—२७मार्च.)
पै॥ छ० २० जिल्हेज सु॥ आर्बा मय्या तैन.

सेवेशीं साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ. १४ जिल्हेजपावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. पेशजी पत्रें पाठविलीं आहेत. तीं पावोन इकडील सविस्तर ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी दिल्लीकडून पत्रें आलीं त्याची नक्कल अलाहिदा पाठविली आहे. त्यावरून सविस्तर मजकूर. ध्यानारूढ होईल. शिंदेबहादुर यांच्या लष्करांतून पत्रें आलीं त्यांतील मजकूर लखनौ व मथुरा व दिल्लीकडून इंग्रजांचीं वीस बावीस पलटणें आग्र्यानजीक जमा जालीं आहेत. यशवंतराव होळकर यांजकडील मीरखान पठाण वगैरे सरदार मिळोन पन्नास हजार फौज आग्र्यापासून पश्चिमेस विसा कोसांवर होती. त्यास त्या फौजांची व इंग्रजांच्या पलटणांची लढाई आग्र्यानजीक फाल्गुन शु० ७ होऊन तेरा चौदा पलटणें गारद जाहलीं. बाकीं पळालीं. गोरे सरदार दहावीस असाम्या होत्या ते पळोन आग्र्याचे किल्ल्यांत गेले.

किल्ल्यास चोहोंकडून घेरा मीरखान पठाण याच्या फौजेचा आहे. यशवंतराव होळकर मेवाड प्रांतांतून आम्यास लौकरच येणार म्हणून वर्तमान आहे. त्याच्याबरोबर जमेत दोन अडीच लाख फौज आहे. आंबोजी इंगळे वगैरे राजेरजवाडे मिळोन पाऊण लाख फौज नरवरावर आहे. याप्रमाणें वर्तमान तिकडील लिहिलें आलें. सालमजकुरीं छावणी शिंदेबहादर यांची उज्जनीस होणार, तेथें वीस शेरांची धारण आहे. होळकर छावणीस माळव्यांत अगर महेश्वरास येणार. श्री० राजश्री रावसाहेबांकडील राजश्री प्रभाकरपंत व विठ्ठलपंत ममईस बसलीकडे गेले म्हणोन हुजुरून बयाजी नाईक जासूद यास पालखी देऊन बसलीकडेस रवाना केले आहेत. बसली-ममईस गेल्यानंतर डंकीनसाहेब व कर्नेल कलुस यांचीं कोशलें दोन तीन जालीं. त्यांत ससलत करून समेट केला या प्रकरणीं परस्परें आपसांत दोष ठेवीत आहेत. अद्याप सारांश ठरला नाहीं. सारांश ठरोन कर्नेल बसली व कलुस मिळोन पुण्यास येऊन राज्याचा बंदोबस्त करणार. त्यास उभयतां लौकरच येणार असें वर्तमान आहे. श्रीमतांची स्वारी सासवडास जाऊन पुरंधरास जाणार. त्यांस बसली व कर्नेल कलुस पुण्यास आले नाहींत त्याच्या पूर्वीच जाणार. बसली आले तर तेही पुरंधरास श्रीमंताकडेस सडे जातील असा बेत आहे. + + तूर्त येथील सर्वांचें लक्ष ममईकडेस लागलें आहे. तेथून काय घाट घडून येईल तो खरा. शिंदे बहादूर यांजकडील निंबाजी भास्कर नागपुराहून येथें आले आहेत. त्यांचा मजकूर काय आहे तो शोध करून मागाहून सेवेशीं लिहून पाठवितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६८०२ श्री [अधिक चैत्र व० ३-२९ मार्च.]

रवे॥ छ० २६ जिल्हेज सन आर्बा मय्यातैन.

सेवेशीं साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० १६ जिल्हेजपावेतों स्वामींचे कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. पेशजी सेवेशीं छ० १४ मिहूनचीं पत्रें पाठविलीं आहेत. त्यावरून सविस्तर मजकूर निवेदन होईल. हल्लीं इकडील वर्तमान तरी—ममईकर सावकार व डंकीनसाहेब यांचीं चीनच्या बंदरातून आठरा हाजें माल भरून ममईस येत

होता. त्यास फरासिसांनीं बातमी राखोन स्वारी करून मालमुद्दां झाजें नेलीं. त्यांत एक करोड रुपयेची नुकसानी ममईची जाली. व फरासिसांनीं पंचेचाळीस जाजें सरंजाममुद्दां लढाऊ ममईवर रवाना केलीं ह्मणोन ममईस पक्की बातमी आली. त्यावरून ममईंत किल्ल्यांतील मोठ्या मोठ्या हवेल्या पाडून किल्ल्यांबाहेर वाडींतील पंचावनशें घर लहान मोठें पाडून बरोबर केलें. पुढें आणखी अडीच हजार गज जागा साफ करावी त्यांत किती एक घरें पडतील हें पाहावें. ममईच्या टापूवरील गरीब व कंगाल खलक कुल तरीपार करून किल्ल्याच्या वगैरे सरंजामाची तयारी जलदीची जारी आहे, त्यास ममईंत गडबड आहे याजमुळें तूर्त वसली व करनेल पुण्यास येत नाहींत. याप्रमाणें येथें वर्तमानें बहुत लिहिलीं आलीं आहेत. X X X श्रीमंतांनीं फाल्गुन मासापासून कांहीं एक मसलत खुद्द जातीनिशीं आरंभिली आहे तिचा विस्तार मागाहून सविस्तर लिहूं हे विज्ञापना.

---

नं. ६८०३ (अधिक चैत्र व. ४-३० मार्च.)

उतारा-पत्र छ० १७ जिल्हेजचें माधवराव रास्ते यांचें मिरजेस.

"आम्ही पुण्यास यावें याविशीं बहुत उद्योग चालला आहे. सारीं कामें आम्हाकडील बंद केलीं आहेत. त्यास आपले विचारें जावयाचें कसें येतें तें ल्याहावें. अंदेशे जावयास बहुत मनांत येतात. परंतु गेल्यावांचून परिणाम नाहींसें दिसतें. याकरितां दूरदेशीनें बुद्धिवाद ल्याहावा."

---

नं. ६८०४ । (अधिक चैत्र व ७-२ एप्रिल.)

रावसाहेब मुषफक मेहेरबान कर्म फर्माव दोस्तां चिंतामणि रावसाहेब

सुमल मुस्या हुताल्ला.

* अजतर्फ जरनेल वेलजली बहादर सलाम आंकी. येथील खुशी जागोन आसाहेबीं आपली पादमानी कलमीं करीत असलें पाहिजे. दरी अयाम. बाबा फडकेनीं मिरजेंत आहेत त्यास साहेबांचे घराणेचे लोकांनीं आसरा

---

* पत्र जन. वेलस्लीचें चिंता. आपा सांगलीकर यांस.

दिल्हा म्हणोन श्रीमंत पेषवेसाहेब राव पंडत प्रधान बहादुर यांनीं आम्हांस कळविलें आहे. तर बाबा फडके यांजकडून श्री० पेषवासाहेबबहादर यांचें काम फार खराब जालें व बहुत दिवसांपासोन श्री० पेषवेसाहेबांचे सरकाराशीं फितुरेंत आहेत. गत लढाईत महाराज अलिजहां सिंदेबहादर व अजम सेनासाहेब सुभा यांजकडे मिळोन कुंपणीसरकारचे व कुंपणी सरकारचे दोस्तदार यांसी शत्रुपण ठेवीत होते. सरदार मवमुफ× यांसी सल्ला जाहल्यानंतर श्री० पेषवासाहेब यांचे मुलखांत व दख्खनवा सुभेदार नवाब सिकंदर जहांबहादूर यांचें मुलखांत सहित बंड होऊन मुलूख ताराज करीत होते. हा सर्व मजकूरहि साहेबांस बहुधा विदित जाहलेंच असेल. ऐसियासी फडके मजकुरांनीं ऐसे कामांत प्रवर्तले होते यास्तव आतां त्यांसीं मिरजेहून बाहेर सोडणेचें आम्हांस मंजूर नाहीं. आम्ही मशारानिल्हेस मिरजेहून बाहेर जाऊं देणार नाहीं. या बाबेत कितेक कलमांत तपशिलेंत लिहिलें आहे ते साहेबांसी विदित करणेस्तव साहेब मेहेरबां बाबासाहेबांकडील कारकून रा० बाळकृष्णपंत+ यांसी आपणांकडे पाठविलें असे. तरी पंत मशारानिल्हे आपणांस मनन करून देतील:—

१ अव्वल कलम—बाबा फडके यासी श्री० पेषवासाहेब यांचे स्वाधीन करावे. कलम.

१ दुसरें कलम— फडके मशारनिल्हेचे खाजगी खर्चाबद्दल योग्यतानुसार एक दरमहा त्यासी मुकरर होईल. कलम.

१ तिसरा कलम—मशारनिल्हेचे मान व प्राणांचें रक्षण होईल. कलम.

१ चौथा कलम—या करारेंत लिहिलें ते कलमांचीं अन्यतर होणार नाहीं याविषयीं इंग्रजबहादरचा सरकार जामीन आहे. कलम.

सदरहू लिहिलें तीं कलमें स्वीकारणेचें बाबेत साहेबीं कांहींही हिल्ला न सांगावा आणि हें काम करणेविशीं विलंब न करावा. बाबा फडके यांणीं बहुत बेज्या काम केलें आहे. यास्तव मशारनिल्हेस श्रीमंत पेषवासाहेब

× उपरिनिर्दिष्ट. + उपनाम म्हैसकर.

यांचे स्वाधीन शीघ्र न केल्यास अगर एखादेवेळीं साहेबांकडून मशारनिल्हे सुटून गेल्यास हे शब्द साहेबांवर आहे. अशा होय. जादा काय लिहिणें. रवाना छ० २० जिल्हेज मुताबिक २ माहे एप्रिल सन १८०४ इसवी. प्यार मोहबत असो. दीजे हे कितावत.

ताजा कलम—आपण मानीं कागदावर लिहिलें नाहीं. कबूल करावें हे कितावत.

---

नं. ६८०५ ( अधिक चैत्र व० ८-३ एप्रिल. )

उतारा—पत्र बाबजीपंत पटवर्धन यांचें पुण्याहून तासगांवास.

" करवीरकर खुद्द शिराळ्यावर आल्याची बातमी येथें आली. पांढरे यास किल्ल्यांत पोहोंचावून द्यावें. बंदोबस्त चांगला असावा. हत्तीं आयुधें सुद्धां मिरजेस जावें, दोन महिने तासगांवीं जरार ( सडे ) राहणें प्राप्त आहे. "

---

नं. ६८०६ श्री. ( अधिक चैत्र व. ८–३ एप्रिल. )

पे॥ छ० २६ जिल्हेज आर्बा. रविवार.

सेवेशीं विज्ञापना. तागायत छ० २१ जिल्हेज मंगळवारपावेतों स्वामींचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. वसलीचीं पलटणें दोन लोहगडास गेलीं. त्यास रा० धोंडोपंत नित्सुरे यांणीं ममईकर डंकीनसाहेब याचे विचारें कै० नाना फडणीस यांची स्त्री व धोंडोपंत यांणीं साष्टींत रहावें. ममईहून नानांचे स्त्रीस पंचवीस हजार रुपये दरमहा खर्चास कुंपणींतून द्यावे. धोंडोपंत यांस डंकीनसाहेब यांणीं सरकारांत बोलून पांच हजार रुपयेचा गांव इनाम करून देविला. याप्रमाणें बंदोबस्त ठरून वद्य ८ सोमवारीं किल्ल्यावरून सर्व जिन्नसमुद्धां उतरून प्राचीन जकीरा जावल्याप्रमाणें ठेवून सर्व तोफामुद्धां सरंजाम इंग्रजांस धोंडोपंतांनीं देऊन किल्ल्यावर निशाण इंग्रजांचें चढलें. इंग्रजांनीं पेशजी कुंपणीचा झेंडा उभा करावा हा बेत ठरून झेंड्याचा सरंजाम आणिला होता तो वद्य ७ रविवारीं झेंडा इंग्रजांनीं नदीपार करून खेर खेरात बहुत करून बहुत संतोषी

जाले. रा० यशवंतराव होळकर दिल्लीनजीक जाऊन पातशहापासोन मरातब घेऊन त्याचा शिक्का करून श्रीमंतांस पत्रें शिक्यासुद्धां उमेदवारीचीं पाठविलीं. त्यास शिक्यांत मरातब आहे त्याची नक्कल—' श्रीलक्ष्मीकांत शहानशहा महंमदशहा गाजी. फिदवी खासूल खास महाराजाधिराज राजेश्वर यशवंतराव होळकर अलिजाबहादर. ' सदरहूप्रमाणें शिक्यांत मरातब लिहिला आहे. करवीरकर महाराज यांजकडील मकाजी पांढरे व श्री. राजश्री बाबासाहेब यांची लढाई ब. ११ रोजीं होऊन पांढरे फौजेसुद्धां नाबूद करून जरीपटक्यासुद्धां हत्ती व तोफा व पांढरे मजकूर खुद्द पाडाव करोन आणोन अष्टयांत ठाणें कायम केलें याप्रमाणें सरकारांत विनंतीपत्रें पाठविलीं तीं प्रविष्ट जालीं. यशवंतराव होळकर यांजवर इंग्रज मसलत करतात हें ममईच्या कौशलांत ठरून लखनौस वगैरे इंग्रजांचीं पत्रें गेलीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६८०७ श्री. (४ एप्रिल.)

पै॥ छ. २६ जिल्हेज सन आर्बा मयातैन.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी त्रिकाळ चरणावर मस्तक ठेवून शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत अधिक चैत्र ब. ९ पावेतों बालकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. मुंबई किल्यासभोंवतीं बस्ती होती व बागायत बहुत होती ती किल्यापासोन अर्ध कोस इंग्रजांनीं घरें मोडलीं. पंचावनशें घरें लहान थोर मातबर मोडलीं. याप्रमाणें लिहोन सावकारांचें आलें. व नारळ माड चाळीस हजारपर्यंत मोडिले असें आहे. आणखींही घरें मोडणार. कारण फरासिस येणार, किल्यासभोंवतीं दाटी यास्तव जागा रिकामी केली. इंग्रजांचीं पाच तरांडीं दहा बारा सावकारी त्याजबरोबर दोन मुंबईवाल्या इंग्रजांचीं रखवालीस ऐसे चिनईहून माल भरून मुंबईस येत होते. फरासिसांचे मुवा (!) पंधरा येत होते. त्यांची यांची गांठ मुंबईचे येण्याचे मार्गास पडली. सतरा तरांडीं व दोन मुवा इंग्रजांचे (त्यांणीं) धरून नेले. मागें मुंबईमध्यें अग्न लागून घरें जळालीं तेव्हां नाश जाला तितका माल या तरांड्यांवर होता. मुंबई, कलकत्ते, व सुरत यांमध्यें किती सावकारांचा दि-

चाळों निघतील न कळे. कोटी दीड कोटींचा माल होता याप्रमाणें लिहिली आली. फराशिसांचें सामान मुद्दा बहुत दोनशेपर्यंत ठिकाणाहून निघोन विलायत, कलकत्ते, मुंबई, सुरत, गोवें इकडे येणार. याप्रमाणें बोलवा आहे. इंग्रजानें दाणा इकडे येण्यास बंद केला. येथें इंग्रजांचीं पलटणें आहेत ते दाणे पुण्याहून घेऊन जातात. + + + कंगाल बहुतच मुलखाचें आलें. अन्न मिळत नाहीं. बहुत मरतें. असाच जमाव राहिल्यास मग बाकी येथें राहणें कठिण आहे. कळावें. बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. लोहोगडावर सरकारचें निशाण उदईक चढणार. नानांची स्त्री व नित्सुरे साक्षीस राहणार हे विज्ञापना.

---

नं. ६८०८ श्रीसुब्रम्हण्य (अधिक चैत्र व० १४–९एप्रिल.)

पै० छ० ८ मोहरम सन आर्बा मयातैन. चैत्रमास.

राजश्री गंगाधरराव काका गोसावी यांसी

सकलगुणालंकरणअखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित यशवंतराव * घोरपडे अमीरुल. उमराव दंडवत विनंती उपरी. येथील कुशल तागायत छ० २७ जिल्हेज मुक्काम मुंबई जाणोन स्वकीय लेखन करीत असावें. विशेष. बहुत दिवस आपणाकडील पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सविस्तर लिहून पाठवावें. यानंतर पेशजी लष्करांत असतां रा० रामचंद्रपंत बाबा फडके यांजकडील कारकून जरनेलाकडे येऊन बोलले. एक दोन वेळ आम्हीही सूचना केली असतां उत्तर जालें जे, श्रीमंतांची कृपा नाहीं ते पक्षीं मला अभय देतां येत नाहीं. तथापि समयास सामील जाले असते तरी चिंता नाहीं. यायोगें रोपाचीं भापणें बहुत पडत गेलीं. असो. सांप्रत ते आपणाजवळ आले. श्रीमंतांसही विदित जालें. त्याची आज्ञा इंग्रजांस आली कीं, फडके यास आणवावें. ते अमुक स्थळीं आहेत. त्यावरून यांच्या मनांत बहुत वायुसंचार जाला तो विस्तार कोठवर लिहावा! राजश्री बाळकृष्णपंत आपणाकडील होते त्यांजला माहीतगारी आहेच. शेवटीं महाप्रयासेंकरून ठरविलें कीं, बाबांस पुण्यांत

---

* हा शिंद्याचा वकील इंग्रजी लष्करांतील.

आणावें. बाळकृष्णपंतांनीं घेऊन यावें. त्यास हे अनमान करूं लागले. पाहतांना यांची गोष्ट न ऐकिल्यास विलक्षण पडतें. सर्वत्रांनीं यांची खातरजमा करून पाठविले आहेत. जनरेल यासी बोलले आहेत. तपशीलें निवेदन करतील. आपण कांहीं एक कांक्षा न आणतां बाबांची रवानगी करून द्यावी. सध्यां समयानुरूप वर्तणूक करावी. काल खोटा. दुसरा प्रकार राहिला नाहीं. पंत मशारनिल्हे इत्थंभूत निवेदन करतील. आपण पत्र पाहतांच रवानगी करून द्यावी. जरनेलास येथें चार दिवस गुंता आहे. येऊन पावले म्हणजे यांसही समाधान पडून उपयोग होईल. बहुत काय लिहिणें. लोभ असावा हे विनंती.

---

नं. ६८०९. श्री. (चैत्र शु. ३–१३ एप्रिल.)

पै० छ० ९ मोहरम. दोनप्रहर शुक्रवार. चैत्र मास. सन आर्बा.

सेवेशीं सा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २ मोहरम पावेतों स्वामींचे कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं छ० २१ जिल्हेजचें पत्र पाठविलें तें पावोन बहुत संतोष जाला. इकडील वर्तमान तरी बसलीसाहेब मुंबईस जाऊन कर्नेल डंकीन सुद्धां कोशल जाली. त्यांत परस्परें ठरलें जे, सरकार दौलतींतील लहान मोठे सरदार व प्राचीन मुत्सद्दी यांच्या व नबाब व पातशहा या सर्वांच्या विचारें ठरलें जे, पेशवाई कायम राहिली असतां इंग्रजसुद्धां कायम राहिला. त्यास जें सर्वांच्या मतें तें व कुंपणीचा हुकूम होईल त्याप्रमाणें मी वर्तणुक करीन म्हणोन बसलीनें स्पष्ट सांगितलें. कर्णेल व डंकीन यांचे चित्तांत जे, श्रीमंतांचे मर्जीप्रमाणें चालून लहान मोठे सरदार गारद करून आपली काबू साधावी हा मानस उभयतांचा आहे. त्यास बसलीसाहेब ममईत राहून कर्णेल कलुष शु० १ पुण्यास येऊन दाखल जाले. कर्णेल पुण्यास येऊन कुल तोफखान्याची वगैरे सरंजामाची तयारी करीत आहेत. पांच सात पलटणें व पांच सात हजार फौज मिळोन श्रीरंगपट्टणाकडे रवाना करणार. तिकडे फरासिसांचा उपद्रव बहुत आहे. फडके प्रकरणीं मजकुराचें पत्र व पांढऱ्याचें लढाईचें पत्र अशीं दोन पत्रें सरकारांत आलीं त्याचीं उत्तरें द्यावीं म्हणोन रा. बळवंतराव नाग-

नाथ व दिनकरपंत पटवर्धन व खंडेराव रास्ते याजकडेस नित्य रा. बाबाजीपंत जातात. परंतु सरकारांतून दोही पत्रांचें उत्तर आलें नाहीं. सारांश दोही मजकुराविशीं श्रीमंतांचें चित्त प्रशस्त नाहीं. त्यांत रा. सदाशिव माणकेश्वर यांजकडूनही सर्वा गोष्टींचा हिसका आहे. रा. यशवंतराव होळकर जयपुराअलीकडे शेपन्नास कोसांवर आले. लखनौकडून बारा पलटणें व आठ दहा हजार फौज ऐशी जयपुरानजीक आली. त्यास जयपूरकर सामील जाले. पुढें आपला पिच्छा करतील हें होळकरास समजल्यावर होळकर यांणीं सड्या फौजा करून एक मुक्काम बाजूस केला. हें वर्तमान पलटणास समजल्यानंतर त्यांणीं यांचा रोख धरून चालून आले. नंतर जयपुरानजीक परस्परें लढाई अधिक चैत्र शु. ५ जाली. फौज व पलटणें इंग्रजांकडील गारद करून फौज व पलटणा बुडविल्या म्हणोन सरकारांत होळकर यांचीं पत्रें आलीं. व इंग्रजाकडेही आलीं. याप्रमाणें येथें वर्तमान आलें आहे. पुढें यशवंतराव होळकर महेश्वरच्या सुमारें येणार याप्रमाणें वर्तमान आहे. * * * सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६८१० श्री. (चैत्र शु. ५–१४ एप्रिल.)

वै० छ० ९ मोहरम सन आर्बा. चैत्रमास.

सेवेशीं सां. नमस्कार विज्ञापना. तागायत छ० ३ मोहरमपावेतों स्वामींचे कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. कै० मोरो बाबूराव फडणीस यांची स्त्री व नातू व सून लोहोगडास होतीं तीं पुण्यास चैत्र शु० १ येऊन आपल्या वाड्यांत राहून दुसरे दिवशीं श्रीमंतांचे दर्शनास नातवास घेऊन गेली. श्रीमंतांचें दर्शन घेऊन मागती आपल्या वाड्यांत आली. श्रीमंत अथवा श्रीमंताकडून समाचारास अथवा दुःखवटा घेऊन कोणी एक बाईकडे आलें नाहीं. नंतर बाईच नातवास घेऊन श्रीमंतांचे दर्शनास गेली होती. अधिक चैत्र व० १३ शनवारीं रा. नरसी खंडेराव विंचूरकर यांणीं आपल्या पयकापैकीं आडहत्यारी व भालेकरी व करोल मिळोन दोन अडीचशें स्वार घेऊन गणेशखिंडीकडे कवायतीस गेले.

तेथें निम्मेनिमे लोक परस्परें करून दोन टोळ्या करून आपण अलाहिदा उभे राहून लोकांस रुबरू ताकीद केली जे, परस्परें गोळी व तरवार चालविणें. त्यावरून दोही टोळ्यांची उठावणी होऊन परस्परें गोळी व तरवार चालली. दोही टोळीच्या मध्यें खाशांनीं चालून घेतलें. त्यास खाशास कपाळ व नाक व तोंड मिळोन तरवारेची जखम भारी व खाशा घोड्यास गोळी लागून ठार व शिवाय बारगीर व शिलेदार मिळोन दहा बारा असामी ठार व शिवाय जखमी व घोडीं जखमी दहा बारा व पांच सात ठार याप्रमाणें मजकूर होऊन घरास जखमी आले. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६८११ श्री. (१४ एप्रिल.)

पै० छ० ९ मोहरम सन आर्बा. चैत्र मास.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी त्रिकाल चरणावरी मस्तक ठेवून शिरसां० नमस्कार विज्ञापना. चैत्र शु० ५ पावेतों वर्तमान क्षेम. लोहोगड सरकारांत इंग्रजांचे विद्यमानें दिला. निजसुरे आंबेगांवानजीक आहेत. कर्नील कलुष मुंबईहून आला. चार रोज जाले. श्रीमंतांची भेट जाली नाहीं. घारण चार रोर आंत आहे. बसलीही पुण्यास येणार याजप्रमाणें बोलतात. इंग्रज कही करूं लागले. मावळांत बाकी ठेविली नाहीं ! सरकारांत बोभाट येतात. कांहीं उत्तर होत नाहीं. कळावें. बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६८१२ श्री. (चैत्र शु० ६-१५ एप्रिल.)

पै॥ छ० ४ मोहरम सन आर्बा मय्यातैन. चैत्रमास.

विनंती सेवक नरहर विठ्ठल कृ० साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताग-

---

१ लढाईची कवाईत करतां करतां इर्षा चढोन नंतर खरोखरीच्या लढाईस विंचूरकरानीं प्रारंभ केला असें दिसतें. २ हा पटवर्धनांचा वकील फत्तेसिंग माने याचे लष्करांतील. पत्र अपुरें आहे.

यत छ० ४ मोहरम मुक्काम इटें येथें क्षेम असे. विशेष. स्वामींनीं आज्ञा-पत्र पाठविलें तें पावलें. गोखल्याची फौज मिरज प्रांताच्या सरदेस आली. प्रांत मजकूरचे गांवखेड्यांस उपसर्ग होऊं नये. येविशीं गोखलेस पत्र लिहिलें आहे तें प्रविष्ट करून बंदोबस्त राखणें. मौजे भंडी येथें गोखले-कडील रोखा होऊन स्वार गेले आहेत त्यांस मनाई घेऊन पाठविणें म्हणोन आज्ञा. ऐसीयास गोखले यांचा उपसर्ग आपलेकडील गांवखेड्यास व्हाव-याचा नाहीं ऐसें खचित बोलणेंत आहे. आणि पत्रांतही लिहिलीं गेलीं आहेत. यांचा रोख झन्यावरून श्री कृष्णातीरास जाणार होते. तों दोन तोफा मातबर जरबा पाठीमागें हजरी बेगारीचे बैलावरून येत होत्या. बरो-बर दोन पहारे मात्र होते. त्या तोफा रा० फत्तेसिंगराव माने जेऊरचे सुमारें दोन तीन हजार जमावानिशीं आहे त्यांणीं अडथळून नेल्या. हें वर्तमान काल रात्रौ समजतांच आज कूच करून बुणगेंसुद्धा माघारे घांटतोंडीं गेले. लढाईचा योग दिसतो. यांजपाशींही एक हजार स्वार चांगला आहे. आणखी जमयेत करीत आहेत. पंताकडीलही कांहीं कुमक यावी असा बेत आहे. यांजपाशीं चार तोफा व पायदळ पांचशेंपर्यंत चांगलें आहे. ईश्वर यश दाता आहे. गोखले घाटा--

---

नं. ६८१३ (चैत्र शु० १०-१९ एप्रिल.)

उतारा- त्रप राहिमतपुराहून मिरजेस बाळाजी महादेव दामले यांचें.

" बापू गोखले याची फौज कूच करून रहिमतपुराहून पुढें एक कोस मुक्काम केला. तेव्हां मान्ये याणीं पाडळीचे तळावर तोफा सोडून कूच करून देऊरचे मुक्कामास गेले. तेव्हां तोफा माघाऱ्या गोखले यांजकडे आल्या. काल गोखले कूच करून आर्वीचे मुक्कामास गेले. आज घांट चढोन पुसेसावळीकडे जाणार. रहिमतपूरची खराबी बहुत केली. गावांत वस्ती व्हावी असा विचार राहिला नाहीं. माने मुलखांत लुटीत फिरतात. त्या अदावती गांवावर येणार तेव्हां वस्ती कशी होते ! "

---

नं. ६८१४ श्री. (नकल.) ( चैत्र शु. १२–२१ एप्रिल )
पै. छ० १० मोहरम सन आर्बा.

विज्ञापना. श्रीक्षेत्र काशीहून पत्रें आलीं त्यांतील मजकूर, श्रीनगरचा राजा शिकारीस अरण्यांत गेला होता. तेथें धरणीकंप जाहला तेणेंकरून बहुत हैराण मनुष्यें पशु आदिकरून जाहले. धरणीकंपानें पर्वताचे कडे कोसळून पडले. श्रीनगर श्रीबद्रीनारायणाचे जवळ अलीकडे तीन कोश आहे. बहुत झाडी आहे. तेथें कोणी बहुतसा संचार नाहीं. तेथील राजा त्यानागरी मात्र असतो. इकडील फौज अथवा इंग्रजाकडील कोणी जावयाचें नाहीं. श्रीबद्रीनारायणाचें संस्थान श्रीनगरच्या राजाकडेच आहे. गांवांतील घरें पडलीं म्हणोन काशीस लेख आला. तेथून पुण्यास पत्रें आलीं. सेवेशीं श्रुत व्हावें हे विनंती.

---

नं. ६८१५. ( २४ एप्रिल. )

उतारा–पत्र धोंडो बापूजी जोशी याचें पुण्याहून मिरजेस चैत्र शु. १५चें.

" श्रीनगर श्रीविष्णूचें स्थान श्रीबद्रीकेदाराचे संनिध चार पांच कोशावर आहे. त्या शहरामध्यें व आसपास धरणीकंप जाहला. भूमि दुभांगली. हजार पांचशें हात घरें कोसळलीं व पर्वतही कांहीं कंपामुळें कोसळले. व कांहीं शहरामध्यें घरें भूमि दबली त्यामध्यें घरें बसलीं गेलीं. व अनेक प्रकारचे उपप्लव जाहले याप्रमाणें सावकारीं लिहिलीं आलीं. याजप्रमाणें बोलवा बोलतात. कर्नेल कलुष यांजला मेजवानी जाली. वस्त्रें जवाहीर दिल्हें. येथें पलटणें आहेत त्यापैकीं हिंदुस्थानांत जातात."

---

नं. ६८१६ ( चैत्र ब० १–२५ एप्रिल. )

उतारा—पत्र बाबजीपंत पटवर्धनाचें पुण्याहून मिरजेस.

" खंडेरावतात्या रास्ते याजकडून भिल्लांचे पारिपत्यास गेले होते. त्यांची व भिल्लांची लढाई जाली. रास्ते यांजकडील लोकांचा नाश जाला. भिल्ल बहुत जमले. मोठा सरंजाम गेला तरच पारिपत्य होईल "

---

नं. ६८१७. श्रीगणपति. ( चैत्र व. ३ – २७ एप्रिल.)
पे० छ० २१ मोहरम. चैत्रमास. सन आर्बा.

अपत्यें रामचंद्रानें शिर सां. नमस्कार विज्ञापना. तागायत छ० १६ मोहरमपर्यंत मु० शिरहट्टी आपले आशीर्वादेंकरून सुखरूप असें. विशेष. वडिलीं छ० ६ मोहरमचीं पत्रें पाठविलीं तीं छ० १३ मोहरमीं पावलीं.

इंग्रजांकडील तरांडीं व मुबां चिनाहून माल भरून येत असतां वाटेंत फराशिसांनीं पाडून नेलें. त्याचे मुलखांतून शेंदोनशें मुबा रवाना जाले. मुंबई सुरत येथें येणार. सबब मुंबईस किल्ल्यानजीक घरें पाडून मैदान होऊन लढाऊ सामानाची तयारी होत आहे. म्हणोन वडिलीं लिहिलें तें कळलें. अलीकडे प्रमाण वृत्त समजलें असेल तर ल्याहावयास आज्ञा करावी. कलम १.

इंग्रजांचीं पलटणें संगमावर होतीं त्यांपैकीं तीन चार निघोन मुंबईस गेलीं म्हणोन वडिलीं लिहिलें तें कळलें. वर्तमान प्रमाणच असेल. कलम १.

मुंबईतील सावकारा व गोरगरीब तमाम निघोन जाणें म्हणोन ताकीद करून नावावर उतरून पार करोन दिलें म्हणोन वडिलीं लिहिलें तें कळलें. अलीकडे पक्कें वर्तमान आलें असेल तें ल्याहावें. कलम१.

लोहोगडचा किल्ला इंग्रजांच्या मध्यस्थीनें व. ७ सोमवारीं इंग्रजांचें निशाण चढलें. सरकारांतून खंडेराव रास्ते यांचे हवालीं किल्ला होणार अशी बोलवा आहे म्हणोन वडिलीं लिहिलें. त्यास सरकारांतून किल्ला स्वाधीन जाल्याचें लिहिलें पाहिजे. कलम १.

कै० नानांचे त्रीस सव्वीस हजारांची जहागीर व धोंडोपंत यांस पांच हजार रुपयेचा गांव द्यावा असा ठराव जाला. जराबाजारासुद्धां साष्टीस गेले म्हणोन लिहिलें. त्यांत तूर्त या कामांत इंग्रजांचे मध्यस्थीनें म्हणोन तरी इतका बचाव झाला. परंतु कैदेदाखल किंवा कसें तें कळलें नाहीं. कलम १.

पुण्याहून पत्रें आलीं त्याच्या नकला पाठविल्या त्या पावल्या. त्यांतील मजकूर समजला. दूरचें वर्तमान आहे. पक्कें खरें वर्तमान असेल तर

मोठाच गाहा जाला आहे ! कलम.

बसलीबरोबर जमाव होता तो पलटणें तोफासुद्धां पुण्यानजीक येऊन उतरला म्हणोन बाडिलीं लिहिलें तें कळलें. सरकारांत जदीद ठेविलेच आहेत. हुकमाप्रमाणें करीत असतील. कलम १.

पन्हाळेकर यांची फौज बडगांवावर होती ती गांवांत उतरली. फौज तोफा करवीरास गेल्या. कांहीं पागा बडगांवास आहेत म्हणोन लिहिलें तें कळलें. परत गेले त्याचें कारणही कळविलें पाहिजे. काबूयार आहेत. कलम १.

रा० आपा देसाई अनंतपुरास आले. संती, गलगलें वगैरे घेऊन निडगुद्याचे सुमारें गेले. तेंही घेणार म्हणोन बडिलीं लिहिलें त्यास येथेंही याप्रमाणेंच वर्तमान आहे. कलम १.

रत्नाकरपंत सावंताचे वाडीस त्यांचे घरी कलह लागला सबब चारपांचशें सामान घेऊन गेले. आठ दिवस जाले. घांटपर्यंत जाऊन पुन्हा भूदरगडाकडे आले. कारण समजलें नाहीं. घाटगे कागलास आले. म्हणोन बडिलीं लिहिलें तें कळलें. त्यास हल्लीं राजाज्ञा कोठें आहेत ? कोणते घाटगे कागलास आले ? कलम १.

रा० बापू गोखले यांणीं रहिमतपूरची खंडणी एक हजार रुपये घेतली. तेथून कानडवाडी येथें मुक्काम जाला. तेथें छ० ३ रोजीं वर्तमान आलें. त्यांच्या तोफा दोन मातबर बेगारीवरून येत होत्या त्या फत्तेसिंग माने यांणीं बदून नेल्या. हें वर्तमान समजून बुणगें सुद्धां कूच करून माने याजवर गेले, म्हणोन बडिलीं लिहिलें. त्यास पुढें त्यांची लढाई जाहली किंवा काय वर्तमान तें कळवावें. त्यांत माने यांस गुडघा पंतांचा आहे कीं काय हें सविस्तर आज्ञा करावी.

इकडील वर्तमान तर माझें आज दोन दिवस शीतमात्र येत नाहीं, ज्वर येतच आहे. श्रीदीक्षितबाबांचा आशीर्वाद आहे. परंतु त्यांचेही बोलण्यांत शरीरभोग भोगिला पाहिजे. शरीरीं सामर्थ्य नाहीं. दोन मास स्नान नाहीं. पथ्यासीं संबंध आहे. श्रीजवळ आज्ञा मागितली परंतु होत नाहीं. किती दिवस ठेवून घेतात कळेना. कलम १

कलमें लिहिलीं आहेत. मनन व्हावीं. चि० राजश्री दाजी येथेंच आहे. श्रीनें बेगळे जागा देऊन ठेविलें आहे. त्याची शरीर प्रकृत बरी आहे. सुरण गोडा भाजीचे उपयोगी असल्यास पाठवावा. दूर देश. दुसरा भाजीचा पदार्थ येणार नाहीं. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६८१८ (चैत्र व. ६–३० एप्रिल.)

उतारा––बाळाजी महादेव दामले यांचें पत्र रहिमतपुराहून मिरजेस.

"माने यांचा मुक्काम देहुरानजीक आहे. तेथून किन्हई वगैरे गांव-गन्नांनीं उपद्रव भारी मांडिला आहे. याजमुळें श्री. प्रतिनिधीकडील फौज मौजे कुमठें येथें मालोजी घोरपडे याजवर जाऊन गांवानजीक बसले आहेत. घोरपडे गांवांत आहेत. माने यांची फौज हजारभर घोरपडे यांचे कुमकेस आली आहे. × × × मालोजी घोरपडे वाड्यांत आहेत. पंता-कडील चारशे आरब कुमठ्यास गांव कुसवाचे आंत आहेत. मानेकडील स्वार व पायदळ यांनी कुमठ्यास वेढा दिला आहे. आंतील आरबांची व मानेकडील लोकांची गोळागोळी चालली आहे."

---

नं. ६८१९ श्री. (नक्कल.) (चैत्र–एप्रिल)

छ. २९ रोज बुधवार कर्णेल याचा मुक्काम चिंचबडास जाहला होता. एथील पलटणें सामोरीं गेलीं होतीं, व कृष्णाजी भवानी सामोरे गेले. सकाळचे सहा घटका दिवसास संगमावर आपले जागेवर कर्नेल आले. त्याच्या खुषीच्या तोफा जाहल्या. खंडेराव रास्तेही सामोरे पाठविले होते. प्रतिपदेस पालख्या दिल्ह्या.

१ जिवाजीपंत लघाटे नि॥ पलिखाना.

२ गोविंदपंत मराठे व कृष्णाजीपंत मराठे सरपागाचीं वस्त्रें दिल्हीं. मराठे श्रीमंतांचे प्रथम साडू.

१ बापाजी नाईक याचे पुत्रास.

१ सदाशीव माणकेश्वर यांचे पुतण्यास.

१ आनंदराव मल्हार यांचे चिरंजिवास.

२ खंडेराव रास्ते यांचे कारकुनास.

—

८

याप्रमाणें सर्वांस पालख्या दिल्या.

---

नं. ६८२० श्री. (नक्कल.) ( चैत्र–एप्रिल )

वडिलांचे सेवेशीं साष्टांग नमस्कार विज्ञापना. राजश्री यशवंतराव होळकर यांणीं रूमशामचे बादशाहा यांची वस्त्रें वजिरीचीं शिक्केमुद्रा आलीं. लक्ष फौज घोडा मदतीस त्यांणीं पाठविला. याप्रमाणें सरकारांत वकील यांणीं पत्रें दाखविलीं व श्रीमंतांस पत्रें आलीं कीं, इंग्रज सामील करून त्यास सहा आणे देऊन सरकार यांचे दौलतीचा नाश होतो हा विचार करावा. यासी तुम्हाकडे येखत्यार नाहीं, अशीं आलीं. [ श्रीमंत ] विचारांत पडले आहेत. राजश्री समशेर बहाद्दर व अंबोजी इंगळे नरवरास आहेत. होळकर पाणहातास आहेत. मारवाडी वगैरे राजेरजवाडे जमाव तीन लक्ष घोडा आहे. व फराशिस पलटणें वीस हजार नवीं ठेविलीं. त्यांस पोटास मात्र गल्ला रसद पुरवावी असा करार केला. तेथें इंग्रज पन्नास हजार व तीस पसतीस हजार तुरकस्वार याप्रमाणें जमाव आला. आठ चार दिवशीं लढाई होणार असें त्यांजकडील वकील यांचें बोलणें आहे. त्यास आटपून पुढें लखनऊस जाऊन तेथें अंमल बसवून सुजादौल्याचे लेकास तेथें संस्थानीं ठेऊन पुढें कलकत्यास जावें. खुष्कीनें होळकर व पाण्यांतून फराशीस याप्रमाणें बंदोबस्त करून मुळांत हात घातला आहे. राजश्री दौलतराव शिंदे बऱ्हाणपुरास होते ते माघारे उज्जनीस गेले. तेही तिकडे जातात. दिल्ली वगैरे संस्थानीं अंमल इंग्रज यांणीं बसविली होती. तेथें लढाई करून आपला अंमल बसविला. राजश्री रघोजी भोसले यासही पत्रें आलीं कीं, नागपुरास जाऊं नये. आम्हांकडे यावें. असा विचार आहे. कान्होजी गायकवाड यास होळकर यांणीं पंचवीस तीस हजार फौज देऊन माळव्यांतून माघारे गुजराथेंत पाठविलें. गुजराथेंत इंग्रज बडोद्यास वगैरे होता तो ममईस झाडून जातो. गाविलगडाकडे व औरंगाबादेकडे

इंग्रज आला होता तोही माघारा चालला. श्री. राजश्री रावसाहेब नगराजवळ आहेत. तीन हजार फौज बरोबर आहे. राजश्री विठ्ठलपंत घाटे रावसाहेबांकडील व यशवंतराव घोरपडे शिंदे यांजकडील व भोसले यांचे वकील प्रभाकरपंत जोशी याप्रमाणें मुंबईस बसली गेला सबब हेही गेले. चैत्रअखेर सर्व मंडळी पुण्यास येणार. लोकांचीं घरेदारें रावसाहेब प्रकरणीं जप्तीस होतीं तीं मोकळीं करावीं म्हणोन इंग्रजांचें बोलणें पडलें. त्यावरून कांहीं दिसणेंत येतें. बापू साने पुरंधरकर व आबा नि॥ आपासाहेब व बाबूराव अनंत वगैरे मंडळी भाववड्यास इंग्रजांकडे आपले खुषीनें राहिले. लोहोगड सरकारांत घेतला. कै॥ नानांचे स्त्रीस बीस हजार व पांच हजार निस्तुरे यांस सरंजाम साष्टीस इंग्रज यांणीं दिल्हा तेथें राहिले. ममईस फराशिस येणार यामुळें वाणी बकाल निघोन पनवेलीस आले. घरें पांच हजार पाडलीं. माडांचीं झाडें दहा हजार तोडलीं. पंचवीस करोडींचीं तरांडीं चिनांत थोर दर्यांत इंग्रजांचीं फराशिस यांणीं नेलीं. शिबंदीस खर्चास वाणी बकाल यांजकडेस चिठ्या ममईस देतात. त्यासही ऐवजाची ओढ बहुतच आहे याप्रमाणें वर्तमान आहे. मचिली बंदर व बंगाल्यांत फराशिस याणें अंमल बसविला. पुरंधर किल्ला रावसाहेब यांची चिठी आणून घेतला. एका दिवसाचें अन्न वर ठेविलें नाहीं. वर विठोजी नाईक याजकडील कारकून गेला त्यास एक उपोषण जालें. गल्ला पुण्याहून नेला असा विचार जाला. विस्तारें काय लिहावें ? मागाहून सविस्तर लिहितों हे विज्ञापना.

---

नं. ६८२१. (चैत्र व. ८ – २ मे.)

उतारा–पत्र छ. २१ मोहरम सन आर्बा चें हरि परशराम यांचें मिरजेस.

" मिरा देसाई पान्हाळपूरकर यांची व शहापूरकर व बेळगांवकर यांची लढाई होऊन मिरा देसाई ठार पडला. ( म्हणून लिहिलें तें कळलें. ) देसाई ठार पडला हें फार चांगलें जालें. मूळ मोडलें."

---

नं. ६८२२. श्री. ( चैत्र ब. १२ – ६ मे. )
पै॥ छ॥ २६ मोहरम सन आर्बा. चैत्रमास.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामींचे सेवेशीं.

विनंती सेवक बाळाजी महादेव दामले चरणांवर मस्तक ठेऊन शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ॥ २५ मोहरमपर्यंत वर्तमान यथास्थित असो. विशेष. मौजे कुमठें येथें श्रीमंत राजश्री पंत प्रतिनिधी याजकडील लोकांची व माने याजकडील लोकांची कटकट लागली होती. त्याजवरून राजश्री मालोजी राजे घोरपडे यांनीं आपला लेक ओलीस देऊन पंताकडील लोक मसुरेस लाऊन दिले. रा॥ फत्तेसिंग माने सडे हजार दीड हजार सरंजामानिशीं शिरवळचे मुक्कामास गेले आहेत. पुण्याहून रा. खंडेराव रास्ते बोलण्यासाठीं माने यांजकडे शिरवळास येणार असें आहे. माने यांजकडील यशवंतराव माने व नारायणजी माने व संभाजी माने वगैरे तीन चार हजारांनिशीं चार टोळ्या करून रहिमतपुरानजीक कोसी दोन कोसी मुक्काम करून जिल्हेदार यांचे प्रांतांत वगैरे गांवगन्नांनी रोखे करून दंगा मांडिला आहे. श्रीमंत राजश्री पंत प्रतिनिधि मसूर येथेंच स्वस्थ आहेत. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना. *

---

नं. ६८२३ ( चैत्र व. ३०–९ मे. )

उतारा—पत्र बाबजीपंत पटवर्धन यांचे पुण्याहून तासगांवास हरि परशराम यांस—

" उभयतां सरदार यांणीं इंग्रजांस निकड लाविली आहे कीं, तुम्ही तह करोन कलकत्त्यास व विलायतेस लिहून मान्यतेचीं पत्रें आणून दिलीं तरीं आमचे खावंदाचीं ( मान्यता ) पत्रें आणून द्यावीं. त्यावरोन येथें श्रीमंतास निकड पत्राविशीं लाविली आहे. "

---

नं. ६८२४ श्री. (चैत्र व० ३०–९ मे.)
पै० छ० १ सफर सन आर्बा मय्यातैन.

---

१ राजसनदी सरंजामदार. * पत्र रहिमतपुराहून मिरजेस.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामींचे सेवेशीं.

विनंती सेवक बाळाजी महादेव दामले चरणावर मस्तक ठेवून शिरसा० नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २८ मोहरमपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. माने याजकडील कृष्णाजी घोरपडे याची व श्री० राजश्री पंतप्रतिनिधि याजकडील फौजेची लढाई छ० २६ मोहर्मी होऊन घोरपडे याचा मोड होऊन घोरपडे यास जखमा लागोन पंतांकडे पाडाव गेले. हजार जमाव होता तो लुटला गेला. लोक जखमी व ठार इकडील तिकडील जाले. नंतर काल छ० २७ मोहर्मी यशवंतराव माने व संभाजी माने व नारायणराव माने हीं पथकें फुटोन होतीं तीं कसबे रहिमतपूर येथील नेहेरवाडी श्रीतीरीं आहे तेथें फौज सुद्धां जमा जाले. रा. फत्तेसिंगराव माने पुण्याचे संदर्भाबद्दल शिरवळचे मुक्कामास गेले होते ते छ. २७ मोहर्मी माघारे फिरोन सोळशी नायगांवावर मुक्काम करून होते. त्यास घोरपडे याचा मोड होऊन पाडाव गेले हें वर्तमान समजल्यावर तेथून निघाले ते आतांच नेहेरवाडीचे मुक्कामीं लष्करांत येऊन पोचले. श्री. राजश्री पंतप्रतिनिधि याजपाशीं तीन हजार फौज आहे. त्यांजकडील रा० सुभानराव माने तीन चार हजार फौजसुद्धां मसूरेस आज उद्यां येऊन पोचणार. प्रांतांत मोठें अरिष्ट मांडिलें आहे. वस्ती राहील याचा भरंवसा येत नाहीं. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६८२५ श्रीगणपति. (वैशाख शु. ३—१२ मे.)

पै॥ छ॥ ३ सफर. वैशाख मास. सन आर्बा.

विज्ञापना[1] ऐसीजे, काल भृगुवारीं उजाडतां मंदवार पहाटेच्या दोन घटका रात्रीस, तारा आग्नेय दिशेकडोन उत्तर दिशेस गेला. मोठा प्रकाश घटकाभर पर्यंत होता. याप्रमाणें बहुतांनीं पाहिलें म्हणून सांगितलें. वडीलांस कळावयाकरितां लिहिलें आहे. श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ चिठी हरि परशराम यांची तासगांवाहून मिरजेस.

नं. ६८२६ श्रीगणपति. (वैशाख शु. ५–१४मे.)

पै॥ छा॥ ६ सफर सनआर्बा. वैशाख मास.

विज्ञापना. वडिलीं पुण्याचें पत्र पाहून माघारें पाठविलें तें पावलें. पुण्याहून छा॥ २४ मोहरमीं रवाना जाहलें. तें छा॥ २८ मोहरमीं पावलें. कळावें. काल रविवारीं रात्रीं मौजे ढवळीस पाटलाची बायको बाळंत जाहली. तिला चार पोरें जाहलीं. तीन पोरी व एक पुत्र अशीं जाहलीं. एक घटका होतीं. नंतर मेलीं. कळावें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६८२७ श्री. (वैशाख शु. ६–१५ मे.)

पै॥ छ० ९ सफर चार घटका रात. गुरुवार. वैशाख. सन आर्बा.

ती० राजश्री काकासाहेब वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें बावजीनें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० ५ सफर मंगळवार प्रातःकाळपावेतों सुखरूप असे. विशेष. वडिलीं सांडणीस्वाराबरोबर छ०२४ मोहरमचीं पत्रें पाठविलीं तीं छ० २९ मिनहूस पावलीं. वाडीकडील सावंताचा मजकूर व शेख मिरा पाच्छापूरकर लढाईत ठार जाल्याचा व गोखले तेरदळच्या सुमारे गेले. मार्गी धामधूम करीत जात आहेत म्हणोन लिहिलें तें सविस्तर कळों आलें. व हलीं छ० १४ मोहरमचें पत्र रा० बाळकृष्णपंत म्हैसकर यांजबरोबर पाठविलें तें छ. २ सफरीं दोनप्रहरीं पावलें. त्यांतील मजकूर व मशारनिल्हे याणीं सर्व सांगितल्यावरून कळों आलें. सोम सावंत याचा कुटुंबघात जाल्याचें येथें कळोन श्रीमंतास व मुत्सद्दी व सर्वत्रास वाईट वाटलें. पुढें त्या संस्थानाची गत काय होणें ती होऊं. शेख मिरा मेला त्यामुळें तिकडील वेध तुटला. गोखले याचा स्वभाव जिकडे जातील तिकडे नाशच करावा. संव्हाररूपी आहेत. निरजप्रांतांतून गोखले जात आहेत त्यांणीं आगळिक केल्यास कटकट होईल असा येथें सर्वांस भरंवसा होता. परंतु ते निभावून पार गेले. ती० राजश्री आपासाहेब यांचे हींव राहिलें. ज्वर येतो म्हणोन पत्रीं आला. ऐशास दुखणें बहुत दिवस राहिलें. याजमुळें शरीर बहुत

---

१ चिठी तासगावाहून मिरजेस हरि परशराम याची.

तुटलें होतें. अलीकडे दुखणेंच मग प्रकृतीचा विचार कळतच आहे. त्यांत स्वभाव आग्रही मोठा. यांतून पार पाडणें बडिलांचे पाय! बाळकृष्णपंत मंदवारीं आले. रविवारीं राहून काल सोमवारीं प्रातःकाळीं निघोन मुंबईस गेले. बसली लोकर निघून जाणार असें आहे म्हणोन मालिन्हे जलद निघोन गेले. फडके प्रकरणीं सरकारांत पत्रें आलीं तीं रा० दिनकरपंताजवळ दिलीं. त्याचें उत्तर काय होतें तें मागाहून सविस्तर लिहितों. राजश्री बाबा फडके बडिलांपाशीं आवताबानें असावे ऐशी खटपट बहुत करीत आहे. येथील प्रकार पत्रीं लिहून कळवावा असा कोणताही राहिला नाहीं. ज्या काळीं जें घडणें तें घडो! विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६८२८ (वैशाख शु. ६-१५ मे.)

उतारा—पत्र धोंडो बापूजीचें पुण्याहून मिरजेस.

" पाच्छापुरांतील काटक रा. सिद्धेश्वरराव त्रिनीवाले यांनीं मारून ठाणें बसविलें तें व सावंतांचे वाडींत खेम सावंत याचे स्त्रीनें सोमसावंत दगा करून मारल्याचें वगैरे लिहिलें तें सविस्तर कळों आलें. इकडील वर्तमान तर + + + रा. फत्तेसिंग माने सरकारच्या भेटीकरितां शिरवळास येऊन श्रीमंतांस दोनचार मुद्दे लिहोन पाठविले जे, पांच हजार फौजेनिशीं चाकरीस ठेवावे आणि मातुश्री व कबिला द्यावा व जहागीर द्यावी व चाकरी घ्यावी याप्रमाणें जालें म्हणजे हुजूर येतों. त्यास श्रीमंतांनीं आज्ञा केली जे, भेटीस यावें. आल्यानंतर सर्व बंदोबस्त होईल. त्यास माने यांचे चित्तांत दिक्कत येऊन शिरवळाहून कूच करून बांई देशांत गेले."

---

नं. ६८२९ श्री. (वैशाख शु० ८–१७ मे.)

पै० छ० ११ सफर सन आर्बा. वैशाख.

सेवेशीं सां. नमस्कार विज्ञापना. छ० ७ सफरपावेतों स्वामींचे कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. छ० २९ मोहरमीं गुरुवारीं नवाबाकडील कारभारी मशरुल मुल्क भागानगरींत हक्क जाहले.

या-मार्णे बर्तमान सरकारांत व ताम्रमुखांकडे छ० ६ मिनहूस आलें+++ सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६८३० (वैशाख शु० १० – १९ मे)

उतारा– पत्र बाळाजीपंत दामले यांचे रहिमतपुराहून मिरजेस.

"रा. गोपाळराव भाऊ चिटणीस यांचीं मुलें मनुष्यें निगडीस होतीं त्यास श्री० रा. पंतप्रतिनिधि याणीं मूल नेले आहेत. घरीं बायका आहेत त्याजपाशीं आरबांची चौकी बसविली आहे. मूल नेले आहेत त्यांस बसवून त्यांचेपुढें त्यांचे कारकून यास कोरड्यांनीं मारतात. पन्नास हजार रुपये लाविले आहेत. रदबदल चालली आहे परंतु ऐकत नाहींत. रा. बाळाजीपंत व बापू जनार्दन कुलेंकर यांचींही मुलें माणसें धरलीं आहेत. पैका मागतात, इकडे माने याणीं प्रांतांत दंगा केला आहे. रामोशी चहूंकडून उठले आहेत. चोराबे भारी जाले आहेत. मार्ग अगदीं चालत नाहीं."

---

नं. ६८३१ (वैशाख शु० १४ –२३ मे.)

उतारा–– पत्र धोंडो बापूजींचें पुण्याहून मिरजेस.

" श्रीमंतांनीं अलीकडे कल्ले राखले आहेत. शहरांत पेशजीं चोऱ्या जाल्या ते चोर सांपडले. त्यांची चवकशी करतां त्यांणीं खिजमतगार सरकारचे यांत आहेत त्यांस धरलें. त्यांत मुरारजी येवल्याचा एक भाऊ आहे व कोणी बिठोजी नाईक यांजकडीलही सांपडले. त्यांस धरोन कैद केलें. आणखी चौकशी रा. खंडेराव रास्ते करीत आहेत."

---

नं. ६८३२ ( वैशाख– जून. )

उतारा— पत्र पुण्याहून मिरजेस धोंडो बापूजी जोशी यांचें.

" फरासिसांचें चाळीस मनवर मोरस म्हणून बंदर आहे चेन्नापट्टणाकडे त्या बंदरास येऊन लागलें. बारा हजार गोरा शिवाय इरसाल माणूस यात्रमाणें आलें म्हणोन बातमीचें पत्र आलें. गोव्याहून . वगैरे सरकारांत आलीं. + + + खंडोपंत नि॥ नारायणराव वैद्य, दाजीबा देशमुख नि॥

शिंदे, सखारामपंत नि॥ बैजनाथभट मामा असे त्रिवर्ग मिळोन आजच सैन्यांत जावयास निघोन गेले. कारण हिंदुधर्म व्हावा हीच इच्छा."

---

नं. ६८३३ (वैशाख-जून.)

उतारा––पत्र कारकुनाचें पुण्याहून मिरजेस.

"येथील प्रकार पाहतां जीव दिसत नाहीं. याजकरितां वाडिलीं इंग्रजांकडे संधान चांगलें राखावें. कोणी चांगला पाठवावा. आपलीं पत्रें ममतेचीं वरचेवर जावीं. या प्रसंगीं बाळकृष्णभाऊ लागू असते तरी बहुत उपयोगी पडते. जितकीं अरिष्टें तितकीं एक वेळ उभीं राहिलीं आहेत! यांत श्रींसांब संरक्षण करील तें खरें. रा. सदाशिव नाईक तात्या वानवळे यांजकडून रा. भिकाजीपंत गेले आहेत. * * * सारांश सर्वांनीं एकविचारें करून इंग्रजांचें संधान बळकट करावें तरच परिणाम (आहे.)"

---

नं. ६८३४ श्री. (वैशाख व० ८–९ जून.)

पै. छ. २९ सफर खमस मैयातैन

सेवेसीं साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाइत छ० २२ सफरपावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. पेशजीं सेवेसीं छ. ५ मिनहूचें पत्र पाठविलें आहे. त्यावरून सविस्तर निवेदन जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी होळकराकडील जिवकलसिंग वगैरे तीन सरदार मिळोन चांदवडनजीक दहाबारा हजार फौजेचा जमाव करून दंगा करितात. त्यास काशीराव होळकर थाळनेरानजीक दोन हजार फौजेनिशीं होते. त्यास जिवकलसिंग याणीं दौड करून चौकडून घेरून काशीराव यास धरून फौज लुटली. काशीराव होळकर जिवकलसिंग याजपाशीं कैदेंत आहेत. राजश्री यशवंतराव होळकर सांबरच्या किल्यानजीक व जेपूरच्या नजीक मुक्काम करून होते. त्यास जेपूरचा प्रांत बेचिराख करून जेपूरापासून पंचवीस लाख खंडणी घेऊन तेथून कूच करून सडी फौज करून घोडा राऊत निवडक लाख सव्वालाखपावेतों बरोबर घेऊन

कोठ्यास दाखल जाले. पुढें पूर्वेस बंगाला वगैरे हा मुलुख आबाद आहे. तिकडेस जाऊन प्रांतात खंडण्या घ्याव्या हा बेत आहे. इंग्रजांनीं पीछा केला असतां बंगाल्यांतून भोसले व नबाब ह्यांच्या मुलखांतून आर्काट मसलीबंदर चेन्नापट्टण व श्रीरंगपट्टण इकडे यावें हाही बेत होळकरांचा आहे. अथवा इंग्रजांनीं पिच्छा न केला तर लावणी कोठा अगर गढेमंडल या प्रांतीं करावी हा बेत आहे. काबिले तोफखाना वगैरे भारी असबाव मारवाडांत ठेऊन तेथें हरीनाथ व नागो जिवाजी पंचवीस तीस हजार फौजेनिशीं आहेत. शिवाय मीरखान पठाण वीस हजार फौजेनिशीं आजमेर प्रांतीं आहे. इंग्रजांकडील फलटणें दहा पंधरा व जैपूरवाले राजे दहा हजार फौजेनिशीं इंग्रजांस सामील होऊन होळकरांचा पिच्छा करणार, या प्रमाणें तिकडील वर्तमान आहे. बसलीसाहेब ममईस होते ते शिंदे भोसले गायकवाड यांचे वकिलासुद्धां चिंचवडास आले आहेत. आज अथवा उद्यां पुण्यास येणार आणि श्रीमंतास मेजवानी लागलीच करून राज्याच्या बंदोबस्ताचा मजकूर व तहाच्या यादी कलकत्याहून ठरून आल्या आहेत त्या श्रीमंतास समजाऊन त्याप्रमाणें बंदोबस्त करावा हा बेत बसलीचा आहे. बसलीस कलकत्याहून हुकूम आला जे, पेशव्यांच्या राज्याचा बंदोबस्त करण्याची येखत्यारी तुजकडे आहे. तूं करशील ते कुंपणीस मान्य याप्रमाणें पत्रें आलीं. त्यावरून बसली येथें आले आहेत. करनेल कलुप यांणीं बसलीच्या इतल्यानें वागावें याप्रमाणें त्यासही हुकूम आला आहे. त्यास इतक्या उपर पुढें नक्षा कोणते तऱ्हेचा ठरेल तो सेवेसी लिहूं. श्रीमंताची मर्जीत कारभारी व मुत्सद्दी वगैरे मंडळ यास बहुत अंदेशे उत्पन्न होऊन खलबतें व विचार बहुत होत आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६८३५. श्री. पुरवणी २. (ज्येष्ठ शु. १–८ जून.)

रै॥ छ॥ २९ सफर खमस मयातैन.

सेवेसीं साष्टांग नमस्कार विज्ञापना. श्रीमंतांची आज्ञा जे-बंडाची प्राबल्यता भारी जाहली आहे. त्याच्या पारपत्यास बसलींनीं पलटणें व

सरंजाम घेऊन जावें. त्यास वसलींचें म्हणणें कराराप्रमाणें पन्नास हजार फौज सरदारसुद्धां बरोबर द्यावे म्हणजे जातों. त्यावरून श्रीमंतांनीं लहान मोठे सरदार सरंजामी आहेत त्यास नेमणुकीप्रमाणें फौज घेऊन जलद येणें म्हणोन पत्रें पाठविलीं आहेत. त्यास सरंजामी फौज सरदारसुद्धां येण्याचा मजकूर सर्वप्रसिद्धच आहे! फत्तेसिंग माने यांणीं सरकारांत खंडेराव रास्ते यांचे विद्यमानें बोलणें केलें. त्यावरून सरकारांतून आज्ञा जाली जे, प्रतिनिधी यांचें पारपत्य करणें त्यावरून कारकून व हुजरे मान्याच्या बरोबर देऊन प्रतिनिधींच्या पारपत्यास पाठविले आहेत. त्यास प्रतिनिधींच्या व मान्याच्या लढाया परस्पर होत आहेत. प्रतिनिधींचें पारपत्य करून त्यांचा मुलूख मान्यास द्यावा हा विचार आहे. खासा स्वारी सासवडास जाऊन तेथें यज्ञ करावा हा बेत होता त्यास वसली आले म्हणून स्वारीची महकुबी होऊन फडके यांच्या वाड्यांत यज्ञमंडपाचें वगैरे साहित्य करून सात दिवसपर्यंत यज्ञ करून यज्ञाचे अध्वर्युपण खासांनीं करून यज्ञ सिद्धीस नेला. सातारकर महाराज यांणीं श्रीमंत राजश्री रावसाहेब यांचे चिरंजीव विनायकराव यास पेश्वाईचीं वस्त्रें पाठविलीं म्हणोन राजेश्रींचा बंदोबस्त उत्तम प्रकारचा करून भोजन खर्चाची नेमणूक वगैरे कुलवाब मिळोन दरमहा रुपये पांचशें ठरवून त्याप्रमाणें बारमाही रुपये साहा हजार राजश्री तात्या जोशी यास दिल्हे. त्यास तात्या जोशीही दो तीं दिवसांनीं निघोन सातान्यास जाणार. बाकी महाराजास पोशाख व धनीनीस पोशाख व आईसाहेब यांस वस्त्रें पाहिजेत तीं पूर्वींचीं शिलकेस सर्वांचीं आहेतच त्यांजवर गुजराणी करावी. याप्रमाणें राजमंडलाचा बंदोबस्त केला. प्रतीनिधि यांजवरही लोभ अंतःकरणापासून बहुत आहे! सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६८३६ श्रीगणपति. (ज्येष्ठ शु० १४- २२ जून.)

चि० राजश्री बाबजीपंत यांस प्रति रामचंद्र परशराम आशीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें. विशेष. तुम्ही पत्र पाठ-

१ पत्र जमखिंडीहून पुण्यास.

घिलें तें पावलें. विस्तारें लिहिल्यान्वयें समजणेंत आलें. साल गुदस्तां बोलणें जालें तो विचार अगदींच राहिला. सरकाराशीं बोलणीं जालीं व इंग्रजाबरोबर गेलों नाहीं तें सर्व माहित तुम्हांस आहेच. पुढें जावयाचा मजकूर लिहिला. जाणें जालें असतां सरंजामाचा बचाव होतो नाहीं तर जशी होती ऐसें संकट दर्शविलें. साल मजकुरीं जाणें हें सालगुदस्ताचे बोलणेस ठीक पडतें कीं काय? गुदस्तां इंग्रज आदरेंकरून बोलावीत होते तेव्हां सरकारचें लक्ष रहावें याजमुळें इंग्रजांबरोबर न गेलों. हल्लीं सरकारांतूनच आज्ञा होती त्यापेक्षां इंग्रजानीं आदरें बोलावून पुढील काम कार्जे होणें कळतच आहे. साल गुदस्तां अनेक प्रकारचीं दोहींकडे बोलणीं जालीं त्याचें महत्व राहिलें नाहीं. सरकारआज्ञेनुरूप जाणेचा प्रकार केला तर खर्चाची ओढ तुम्हास माहीतच आहे. त्यास गुदस्तां करवीरकरांची मसलत पडोन खर्चाखालीं आलों त्या फौजेच्या फडशास सालमजकूरचा निम्मे ऐवज गेला. पुढें परदेशांत जाऊन तेथील खर्चाची पुरवणी होऊन कशी निभावणी श्री करील न कळे. ऐसें संकट येऊन पडलें आहे. तुमचें पत्र आलेपासून याच विवंचनेंत आहों. लौकरच श्रीची आज्ञा घेऊन मिरजेस येऊन ती॰ राजश्री बाळासाहेब व चिरंजीव उभयतां आपा व बाबा सर्व मिळून ठरेल त्या अन्वयें तुम्हांस लिहितों. इंग्रज कधीं चालते होणार तयारी कशी होत्ये, होळकर व शिंदे व भोसले कोठें कोठें आहेत हें लिहिणें. रवाना छ० १३ रबिलाखल. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

---

नं० ६८३७ (जून)

उतारा— विष्णु दिक्षित पटवर्धन यांचें पत्र जमखिंडीहून मिरजेस.

" दिल्लीहून होळकर यास किताब आला आहे तो पेशजी दस्ताहावयास राहिला सबब हल्लीं लिहिला आहे. 'श्री लक्ष्मीकांत शहाआलम पातशाहा गाजी फर्जंद अर्जुबाद बहादर तमसुक उमदे उल उमराव राजाधिराज राजेश्वर यशवंतराव होळकर सुभेदार अलिजाबहादर नुसरतजंग' यानमार्गें शिका आहे. यानमार्गें रमाहूनही किताब आला आहे. तोही येथें लिहिला आला आहे. एक दोन रोजांत उतरून घेऊन लिहोन पाठवितों "

नं० ६८३८ श्रीगणपति. (आषाढ शु. ९ १६ जुलै)

पै० छ० १० रबिलाखर बुधवार. आषाढमास. सन आर्बा.

अर्पत्यें रामचंद्रानें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० ८ रबिलाखर पावेतों यथास्थित असे. विशेष. रा० बाबा फडके नबाबाकडील मुत्सद्दी यांस आपले मुलामाणसांचे सुटकेविशीं नांव न घालतां पत्र लिहिणार. त्यास आपले विचारें पत्र ल्याहावें असें आलें तर ल्याहावें म्हणजे सांगूं. उत्तर समर्पक यावें म्हणोन आज्ञा केली. त्यास आपले मनुष्याविशीं प्रेत करतात. नाहीं म्हणूं नये हें तर प्रमाणच. परंतु प्रस्तुत पुण्यास पत्रें कारकून सांपडले आहेत म्हणोन कळलें. त्यापेक्षां इकडून पत्र न जातां होईल तें करावें. दुसरें पुण्यांतही रा० मोरोपंतदादा आले आहेत. तिकडून पत्रें जावीं. इकडून कोणी विश्वासू जाऊन खटपट करावी. इतक्यांत कांहीं सरकारांतून कृपा दृष्टीस पडेल. मग कसें पाहिजे तसें करावें. तूर्त पत्राविशीं दम खावा असें माझें मत. मग तेथें आपण वडील आहेत. चिरंजीव उभयतां आहेत त्यांचे विचारें होईल तसें करावें. बहुत काय लिहिणें. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६८३९ श्री. (नक्कल.) (-१९ सपटेंबर)

पै॥ छ० २ जामादिलाखर.

विज्ञापना. उभयतां सरदार यांजकडून पत्रें छ० १४ व छ० १७ जमादिलावलचीं थांबे पडतुरचे मुक्कामचीं आलीं. मागाहून फौज व पलटणें येत आहेत याजकरितां चार मुक्काम होतील म्हणोन पत्रीं लिहिलें आहे. फौज पलटणें दाखल जाल्यावर दरकूच हैदराबादेस जाणार. अलिजाबहादुर याजकडील तोफखाना व समरूचीं पलटणें सहा व दोन कंपू याप्रमाणें आजंठ्याच्या घाटाखालीं आलीं हे वर्तमान हैदराबादेहून पलटणें आलीं आहेत तीं झाडून घांट धरावा म्हणोन घाटावर गेलीं. तों त्यांचा जमाव भारी पाहिला. भरतीस फौजही मागून आहे हें पाहून पलटणें इंग्रजाकडील जालनापुरास आलीं. जालनापुर शिंद्याकडील. तेथें ठाणें

---

१ पत्र राम आपाचें जमालिंडीहून मिरजेस.

घातलें. लुटून पस्त केलें. ब्राह्मण स्त्रिया आयकरून बाकी राहिली नाहीं. बहुतच कहर केला. मागील पीच्छावर शिंद्याकडील पलटणांची चाल पाहून ठाणें सोडून बसलीसुद्धां एकजागीं शहागडावर आहेत. तोफखाना व पलटणें याबरोबर शिंदे यांजकडील सदाशिवरावजी व गोपाळराव भाऊ चिटणीस व होळकराकडून मीरखान व शामत याप्रमाणें तीस हजार फौज व पंचवीस हजार पेंढार. पेंढार यांणीं पलटणासभोवते कहर करून दिला आहे. रसद चालों देत नाहीं व शेपन्नास तट्टू व बैल उंटें जें हातास लागेल तें आणीत आहेत. तूर्त दळवर नबाबाचे तालुकियांत पडला आहे. इकडील वेध तूर्त चुकला आहे. बाळोजी कुंजर याचे येण्याची आवई आहे. परंतु येतां दिसत नाहीं. होळकर कासारबारीनजीक आहेत. होळकराकडील मल्हार शामजी शिंदे भोसले याजपाशीं आहेत. त्याणीं भोसळे याजपाशीं बोलणें घातलें जे काशीराव आमचे स्वाधीन करावा. त्यावरून सेनासाहेब सुभा यांची मर्जी बहुत रुष्ट जाली. मल्हार शामजीवर बहुत रागे भरले. त्यावरून मशारनिल्हे याणीं होळकरास पत्रें पाठविलीं. नंतर मार्गे होते ते तीन मजली पुढें कासारबारीस आहे. याप्रमाणें तिकडील वर्तमान आहे. आणखी येईल तें बरचेवर लिहीत आहें. विदित होय हे विज्ञापना.

---

नं. ६८४० श्री. ( आश्विन शु० ५-२१ सप्टें.)

पै॥ छ० ११ जमादिलाखर सन आर्बा मय्यातैन.

सेवेशीं सा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० ४ जमादिलाखरपावेतों स्वामींच्या कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. सेवेसीं छ० २ मिनहूचीं पत्रें पाठविलीं आहेत त्यावरून सविस्तर निवेदन जालेंच असेल. इकडील वर्तमान तरी गंगातीराहून डोंगरगांवच्या मुक्कामानें लष्करांतून काल पत्र आलें. त्यांतील मजकूर जे, छ. २७ जमादिलावलीं औरंगाबादेनजीक मशीरच्या फौजेशीं व पलटणाशीं सरदाराकडील वघाडीच्या फौजेशीं लढाई होऊन एक पलटण व हजारपर्यंत स्वार कापून काढले व तीन पलटणें व चार हजार स्वार निघोन सरदारांच्या फौजेंत येऊन मिळाले. बाकी तीन पल-

टणें व तीन चार हजार स्वार होते ते पळोन: औरंगाबादेंत व बसलीच्या लष्करांत पैठणास पळोन गेले. सरदार यांचे फौजांनीं औरंगाबादेस वेढा घालून आहेत. याप्रमाणें मशीरच्या जमावाची खराबी जाली व शिंदे भोसले व फडके जालनापुरापासोन पश्चिमेस दहा कोसांवर डोंगरगांवावर आहेत. बसली व सखो रुद्र मिळोन पैठणानजीक गेले आहेत. बसली यास समजलें जें, मशीराकडील फौज व पलटणा सरदारांच्या फौजेंत उठोन गेलीं, तेव्हां सखो रुद्र याचा भरंवसा नाहीं म्हणोन खासे रुद्र व कारभारी आपल्या डेऱ्यानजीक डेरा देऊन ठेविले आहेत म्हणोन वर्तमान बसलीच्या लष्करांतील आलें आहे. शिंदे होळकर यांच्या पेंढारीयांनीं बसलीस बहुतेक बेजार करुन बसलीचे लष्करांत तीन शेराची धारण जाली आहे. शिंदे बहादर यांणीं अंबोजी इंगळे याची रवानगी हिंदुस्थानांत करोन मोठ्या मोठ्या तोफा व लढाऊ सरंजाम इंगळे याजबरोबर देऊन इंगळे बऱ्हाणपुरास गेले होते त्यास त्या तोफा व लढाऊ सरंजाम शिंदेबहादुर यांणीं माघारा आणविला तो घाटावर आला. पांच सात दिवसांत दाखल होऊन नंतर पल्ल्याच्या तोफा सुरु करुन हिंदुस्थानचीं पलटणें व शिंदे बहादुर व सेनासाहेबसुद्धां लढाई देऊन बसली बरबाद करावा हा बेत येथें ठरुन होळकर घाटाखालीं आले आहेत त्यास मल्हार शामजी यास बोलावयास पाठविले आहेत. त्यास होळकरही लवकरच दाखल होतील. त्यास सदरहुप्रमाणें मजकूर लिहिला आला तो सेवेशीं लिहिला आहे. पुढें लष्करांतून लिहिला येत जाईल तो सेवेशीं लिहीत जाऊं. सरकारांतून इंग्रजांस पुण्यानजीक संगमापासून दावन् गंगादक्षणतीरपर्यंत नगरच्या खर्चास झाडून मुलुख लावून देऊन सनदा दिल्या. त्यांत झाडून निसबतवार गांव आपल्याकडे व लोकांकडेस आहेस ते मोशी आदिकरुन झाडून सर्वांचे गांव इंग्रजांस दिल्हे. पुरंधरकर बेरड यांणीं पुण्यानजीक सरकारबागेचे वडगांव व आंबेगांव वगैरे व सरकारबागेचीं तट्टें कात्रजेच्या कुरणांत गवताकरितां गेलीं होतीं त्यासुद्धां लुटून नेलीं. सरकारच्या घोड्यास नित्य गवत बाजारचें विकत घेऊन चारतात. विंचूरकर अनवस्त्रामुळें बहुत हैराण जाले याज लाख रुपये खर्चास नूतं देविले ते पावत नाहींत याकरितां एका दो

रोजांनीं पथकसुद्धां उठोन जाणार असा त्यांचा बेत आहे. प्रत्योत्तर द्याव-यास आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

---

नं. ६८४१. ( आक्टोबर. )

विज्ञापना. आज दोन दिवस वर्तमान बहुत आलें आहे. इष्टवी-सन बदनापुरावर होते. लढाई होऊन तेथील बहुतेक टोपीकरांचा नाश जाला. एक पलटण राहिलें तें घेऊन बसलीस येऊन मिळाला म्हणोन बोलतात. प्रमाण वाटत नाहीं. सावकाऱ्यांत आज्ञा जाहली आहे जे, तुम्हाकडे सैन्यांतील वर्तमानें सैन्यांतील आलीं असतां जाहीरण्यांत आणूं नयेत. याजमुळें कोणी कोणाजवळ प्रसिद्ध बोलत नाहीं. हे विज्ञापना.

---

नं. ६८४२ ( आश्विन ब. ६ – ६ आक्टो. )

उतारा—पत्र हरि परशराम यांचे तासगांवाहून मिरजेस.

" पुण्याहून जासूदजोडी आली त्यांणीं मुखजबानी वर्तमान सांगितलें जे, विजयादशमीचे दिवशीं शिंदे व भोसले व बसली यांची लढाई जाली. दोन पलटणें फौजांनीं इंग्रजांची मारून दोन तोफा सर करून उभयतां कायम राहून आपले आपले ठिकाणीं गेले. नंतर तेच दिवशीं रात्रीस इष्टवीसन नबाबाकडील पलटणांत आहे त्याणें दीड प्रहर रात्रीस छापा फौजेवर घातला. नव्वद तोफा इंग्रजांनीं आणिल्या. उभयतां फौज-सुद्धां संभाळून अजंठ्याचे घाटाखालीं गेले याप्रमाणें सांगितलें. वडिलांस कळावें. चिरंजीवाकडे सांगलीस पत्र पाठवून समाचार आणवावा. लिहिलें वर्तमान खरें आहे किंवा तोंडसुख आहे हें समजेल "

---

नं. ६८४३ श्री. ( कार्तिक ब. ८–७ नोव्हें. )

पै॥ छा॥ २५ रजेब सन आर्बा मय्यातैन.

विज्ञापना. छा॥ २० रजेब सोमवार. मलकम इंग्रज मुंबईहून पुण्यास आला. शिंदे बऱ्हाणपूर सोडून उज्जैनचे रोखें गेले. पांढावर इष्टी ( वीसन ) आहे. तेथील बंदोबस्त इष्टी करतील. भोसले गंगा-

तीरास आले होते. त्याचे पाठलागावर बसली आले त्यांनीं छापा घालून बुनगें लुटलें. भोसले व फडके घांट चढून मोंगलाईत चालले आहेत. मजल दरमजल ते पुढें पाठीवर बसली आहेत. त्याची गांठ घालून सत्वर फडशा करतों. भोसले यांचे प्रांतीं पलटणें आलीं त्याणीं कटकचा किल्ला घेतला अशी बातमीचीं पत्रें आलीं त्यावरून अस्तमानचे सहा घटका दिवसास फत्ते जाली म्हणोन गारपिराबर घोरपडीचे माळावर पलटणें राहिलीं आहेत त्यांणीं एकवीस तोफा केल्या. हिंदुस्थानचा बंदोबस्त केला. इकडील बंदोबस्त महिन्या दोन महिन्यांत झाडून करतों, दिवसगत लागत नाहीं असें म्हणणें टोपीकरांचें आहे. पुढें ईशसत्ता न कळे. चोहोंकडून बंदोबस्त बोलले त्याप्रमाणें होत आहे. आणखी वर्तमान बाजारी आहे कीं, चेन्नापट्टणाहून कोणी कारभारी येथें येणार आहे. चेन्नापट्टणास येऊन दाखल जाला. येथें लवकरच येईल. आल्यावर सर्व बंदोबस्त करील याप्रमाणें बाजारी वर्तमान आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.+

+ शेवटचीं ६८३९–४३ हीं पांच पत्रें श. १७२५ स. १८०३ या सालचीं आहेत.

# आमचीं नवीन पुस्तकें.

ऐ. ले. संग्रहाच्या तेराव्या भागानंतर आम्ही नवीन पुस्तकें छापिलीं त्यांचा किमतीचा वगैरे तपशील—

१ ऐतिहासिक-लेख-संग्रह भाग चवदावा—स. १८०२ जुलै--स. १८०४ जुलैपर्यंत. यांतील विषय-होळकराच्या दक्षिणेवरील स्वारीचीं कारणें व हेतु-होळकरांच्या अकरा मागण्या-अमृतराव वगैरे नानापक्षीय मुत्सद्यांचें शिंद्याविरुद्ध कारस्थान-होळकरांचें दक्षिणेंत आगमन-खानदेश, नगर, नाशीकप्रांतीं दंगा-पेशव्यांची लष्करभरती आणि लटपटे सरदार आणि खुबसुरत तोफा-होळकरापाठोपाठ शिंद्याची फौज दक्षिणेंत येते-बारामतीची लढाई-हडपसरचा तुंबळ रणसंग्राम-पेशवे व शिंदे यांच्या फौजांची दाणादाण-पेशव्यांचें महाडास पलायन-इंग्रजाची कुटिल राजनीति-राज्यरक्षणाचे होळकराचे प्रयत्न-वसईचा तह आणि मराठी दौलतींत इंग्रजांचा प्रवेश-नव्या मुद्रेची मसलत--पुण्यांत पठाणांचा दंगा, शिंदे होळकरांच्या समेटाचा बोजवारा-होळकर माळव्याकडे परत जातो-इंग्रजांचें शिंदे भोसल्यांशीं युद्ध-कारणें व हेतु-शिंद्यांचे पराजय--शिंदे फौजेंतील युरोपियन अंमलदारांची निमकहरामी-इंग्रजांच्या पराक्रमाच्या पोकळ कल्पना-शिंदे भोसल्यांचा नादानपणा-शिंद्याच्या दौलतीचा नाश वगैरे अनेक विषय यांत वर्णिले आहेत. ड. क्रा. पृ. ६०० किंमत चार रुपये.

२ सांगलीकरांचा बाका—पेशवाईंतील प्रसिद्ध सरदार कै. चिंतामणराव आपासाहेब सांगलीकर यांनी लिहून ठेवलेलें आत्मचरित्र या पुस्तकांत छापिलें आहे. धोंडजी वाघाशीं झालेल्या लढायाचें यांत मनोवेधक आणि मार्मिक वर्णन करण्यांत आलें आहे. हें पुस्तक मुंबई सरकारच्या विद्याखात्यानें लायब्ररी व बक्षिसें यासाठीं मंजूर केलें आहे. ड. क्रा. पृ. ६० किंमत चार आणे.

३ मराठी राज्याचा उत्तरार्ध-खंड पहिला-- ऐ. ले. संग्रहाच्या दुर्मिळ झालेल्या पहिल्या चार भागांतील प्रस्तावना एकत्र करून छापिल्या असून

यांत थोरले माधवराव बल्लाळ आणि नारायणराव बल्लाळ या दोन पेश-व्यांच्या कारकीर्दींचा समावेश करण्यांत आला आहे. रोहिले, पठाण, निजाम, हैदर अशासारख्या शत्रूंना नामोहरम करून पानिपतानंतर मराठी राज्याचा दरारा पुनः प्रस्थापित करणाऱ्या पराक्रमी काळाचा साद्यंत इतिहास यांत वर्णिलेला असून सर्व मजकूर कै. वासुदेवशास्त्री खरे यांच्या लेखणींतून बाहेर पडलेला आहे. ड. क्रा. पृ. ३००. किंमत दीड रुपाया.

४ नाना फडनवीसांचें चरित्र--सुधारलेली तिसरी आवृत्ति--कै. तीर्थरूपांनीं हा ग्रंथ मूळ ग्रांट डफ आणि थोडीशीं ऐतिहासिक पत्रें यांच्या आधारानें तयार केला होता. हें पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर ऐ. ले संग्रहांतून आणि इतरत्र नानासंबंधीं पुष्कळ नवीन माहिती प्रसिद्ध झाली. या माहितीच्या आधारानें हा ग्रंथ नवीन तयार करून त्याची नवी आवृत्ति प्रसिद्ध करावी असा कै. तीर्थरूपांचा संकल्प होता. त्यांच्या पश्चात् आम्ही हें काम हातीं घेतलें आणि सर्व उपलब्ध माहिती जमेस धरून आणि बहुतेक सर्व ग्रंथ नवीन तयार करून आम्ही ही आवृत्ति प्रसिद्ध केली आहे. ड. क्रा. पृ. ३००. किंमत दीड रुपया.

५ गुणोत्कर्ष--आ सातवी--ड. क्रा. पृ. १००. किंमत आठ आणे.

६ संगीत देशकंटक नाटक--(सचित्र)--कै. राजाराम महाराज यांच्या कारकीर्दींतील परिस्थिति विशद करणाऱ्या एका काल्पनिक प्रसंगावर कै. तीर्थरूपांनीं हें नाटक रचलें आहे. त्यांच्या प्रतिभासंपन्न लेखणींतून बाहेर पडलेलें हें शेवटचें नाटक होय. यांत हास्यरसाचा भरपूर परिपोष होईल अशाच रीतीनें कथानकाची सर्व मांडणी करण्यांत आली आहे. इंग्रजी नाटक कादंबऱ्याप्रमाणें या नाटकाची अत्यंत स्वस्त किंमतीची ही आवृत्ति आम्ही मुद्दाम प्रसिद्ध केली आहे.

आठ चित्रें--ग्लेज कागद--ड. क्रा. पृ. १२५. किंमत फक्त पांच आणे.

यशवंत वासुदेवशास्त्री खरे, मिरज.

———

## फुल्या केलेली पुस्तकें आतां आम्हांजवळ विक्रीसाठीं शिल्लक नाहींत

# ऐतिहासिक-लेख-संग्रह.

या पुस्तकांत पटवर्धन वगैरे सरदारांच्या जुन्या दप्तरांतील ऐतिहासिक महत्वाचे निवडक अस्सल कागदपत्र सालवारी व प्रकरणवारी लावून तारीख, महिना व सन यांच्या अनुक्रमानें आम्ही छापीत आहों. प्रत्येक कागदावर तारीख महिना व सन घातलेला असतो आणि त्याखालीं अर्थाची फोड करणाऱ्या भरपूर टिपाही दिलेल्या असतात. शिवाय प्रत्येक प्रकरणास आंतील विषयाचें सुसंगत विवेचन करणारी एक एक प्रस्तावनाही जोडिलेली असते. पानिपतच्या युद्धापासून तों तहत बाजीरावीच्या अखेपर्यंताचा इतिहास या पुस्तकांत येत असून तो त्या त्या काळांतील पेशवे, प्रमुख मुत्सद्दी व सरदार यांच्याच शब्दांनीं वर्णिला जात आहे ! आजपर्यंत या पुस्तकाचे तेरा भाग प्रसिद्ध झाले आहेत. त्यापैकीं पहिले पांच भाग शिल्लक नाहींत. पुढचे आठ भाग विक्रीस आहेत. दहापासून पुढील सर्व भागांची किंमत चार रुपये असून बाकी सर्व भागांची किंमत प्रत्येकीं ३ रु० आहे. शिवाय पोस्टेज प्रत्येक भागास ८३ निराळे पडेल.

## ऐतिहासिक-लेख-संग्रहांतील विषयानुक्रम.

*भाग पहिला- सन १७६० जानेवारी ते १७६३ मेपर्यंत. नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीची अखेर-माधवरावास पेशवाईचीं वस्त्रें-मोंगलांची पुण्यावर स्वारी-लढाया व तह-माधवराव व दादासाहेब यांमध्यें विटुष्ट-घोडनदीची लढाई-समेट-राघोबाची पटवर्धन वगैरे सरदारांवर गैरमर्जी-मिरजेचा वेढा-मोंगलांची पुण्यावर दुसरी स्वारी-पुण्याचा विध्वंस-पेशव्यांची मोंगलाईवर स्वारी. डे. अ. पृ. ४८० किं० तीन रुपये.

* भाग दुसरा—सन १७६३ मे ते १७६४ डिसेंबरापर्यंत. राक्षसभुवनची लढाई—मोंगलांशीं तह—हैदरअल्लीचें मनोवेधक चरित्र—पेशव्यांची हैदरअल्लीवर पहिली स्वारी—रटेहळ्ळी, अनवटी, हावेरी येथील लढाया—सावनूरचें रक्षण—धारवाडचा वेढा. डे. अ. पृ. ४८०. किंमत तीन रुपये.

* भाग तिसरा—सन १७६४ डिसेंबर ते १७६९ ऑक्टोबरपर्यंत. अनंतपूर व बिदनूर येथील लढाया—हैदरअल्लीशीं तह—भोंसल्यावर पहिली स्वारी—तोतयाप्रकरणाचा उद्भव—राघोबाची गोहद वगैरे उत्तरप्रांतीं स्वारी—पेशव्यांची हैदरअल्लीवर दुसरी स्वारी—शिरें—मदगिरी, चेनरायदुर्ग येथील लढाया—तह—माधवराव व राघोबा यांची आनंदवल्लीस भेट—धोडपची स्वारी व राघोबास कैद—भोंसल्यावर दुसरी स्वारी. डे. अ. पृ. ४८०. किं. ३ रुपये.

* भाग चवथा—सन १७६९ ऑक्टोबर ते १७७३ ऑगस्टपर्यंत. भोंसल्याशीं तह- हैदरअल्लीवर तिसरी स्वारी—कोल्हार, बाळापूर, नंदिदुर्ग वगैरे ठिकाणीं लढाया—हैदराचा गोपाळरावावर छापा—निजगलचा वेढा—पेशवे देशीं येतात- गोपाळरावाचा मृत्यु--त्रिंबकराव मामाचे पराक्रम--मोतीतलावाची लढाई—श्रीरंगपट्टणाचा वेढा—तह-बिनीवाल्यांची फत्तरगडावर स्वारी जाटांशीं लढाई--बादशहाची स्थापना—दिल्लीची लढाई-रोहिल्यांवर सूड-पेशव्यांचा आजार व त्यांतील अनेक हृदयद्रावक प्रसंग—मृत्यु--रमाबाईचें सहगमन--नारायणरावाची पेशवाईवर स्थापना--छोटी कारकीर्द व खून. डे. अ. पृ. ६०० किंमत तीन रुपये.

* भाग पांचवा—स. १७७३ ऑगस्ट ते १७७५ जुलईपर्यंत. बारभाईचें कारस्थान--निजामअल्लीशीं लढाई व भेट—गंगाबाइची स्थापना—कासेगांवची लढाई—राघोबाचा पाठलाग--समेटाची खटपट व राघोबाचें पलायन--गुजराथची मोहीम—इंग्रजांशीं लढाया-पुरंदरचा तह--कोळ्यांचा दंगा--प्रतिनिधींचा दंगा--कोल्हापूरकराशीं लढाया--तोतयाच्या बंडाची सुरुवात डे. अ. पृ. ६०० किं. तीन रुपये.

भाग सहावा—१७७६ ऑगस्ट ते स. १७७८ एप्रिलपर्यंत. तोतयाच्या बंडाचा बीमोड--परशुरामभाऊंची कोल्हापुरावर मोहीम--पांडुरंग-

रावांची धारवाडप्रांतीं स्वारी--सावशीची लढाई व सैन्याची वाताहत--परशु-राममभाऊ कुमकेस जातात--त्यांच्या गनीमी हालचाली--पाळेगारांचें पारिपत्य--भाऊ व हरिपंत यांची धारवाडप्रांतीं छावणी--हैदरअल्लीवर पांचवी स्वारी-महादजी शिंद्यांची कोल्हापुरावर स्वारी--मोरोबादादांचें कारस्थान- उभारणी व चलती--कर्नाटकच्या फौजा देशीं येतात. डे. अ. पृ. ६०० किं. ३ रु.

भाग सातवा--सन १७७८ एप्रिल ते १७८४ एप्रिलपर्यंत. मोरोबादादांचें कारस्थान (उत्तरार्ध) व पारिपत्य--दरबारची डळमळ--परशुराम-भाऊ स्वारीस निघतात--बेरड बंडखोरांचा दंगा--भाऊंची सुरापुरावर स्वारी-इंग्रजांची पुण्यावर स्वारी--पराजय व वडगांवचा तह--करवीरकरांचा बंदोबस्त--कित्तूरकरांचें पारिपत्य--इंग्रजांशीं तिसरा विग्रह--इंग्रज गुजराथ व्यापितात--वसई व कल्याण घेतात--पुण्यावर चालून येतात--पटवर्धनांशीं निकरानें लढतात -रसदेची लूट व पछेहाट--सालबाईचा तह--स्वस्थतेचीं दोन वर्षें-कारीयाला-करवीरकरांचा पुन्हां बंदोबस्त व तह. डे. अ. पृ. ६१० किंमत तीन रुपये.

भाग आठवा—स. १७८४ मे पासून १७९१ फेब्रवारीपर्यंत--मराठे व मोंगल यांच्या यादगीर येथें भेटी--टिपूचा नरगुंदास वेढा--नरगुंदकरांची मर्दुमी--परशुरामभाऊ कुमकेस येतात—झटापटी—तह—टिपू दगा करून नरगुंद व कित्तुर घेतो–टिपूवर पहिली मोहिम–होळकर व रेहरे कित्तूर प्रांतीं येतात–मराठे व मोंगल यांच्या पुनः भेटी–बदामी–अद-वानी–टिपू मराठे व मोंगल यांस छापे घालून हैराण करितो--तह--स्वस्थतेची पुनः तीन वर्षें--पेशवे नाशिकास जातात--परभू ग्रामण्यप्रकरण पुन्हां उद्भवतें -सोनार व वेदोक्त--टिपूवर दुसरी मोहीम--मराठे, मोंगल व इंग्रज एकत्र होतात--परशुरामभाऊंचा धारवाडास वेढा--निकराच्या लढाया--इंग्रजांची मर्दुमी--चातेऱ्या, पेठ, रेवणी, व खंदक यांजवर हल्ले. डे. अ. पृ. ६००. किं. तीन रुपये.

भाग नववा—स. १७९१ मार्च ते १७९६ नोव्हेंबरपर्यंत. धारवाड काबीज होते–हैसूरच्या राज्यावर स्वारी–बांकी नबाबाचा पराजय–इंग्रजांची

श्रीरंगपट्टणावर स्वारी व पीछेहाट-इंग्रजी व मराठी लष्करांच्या भेटी-इंग्रजांचा पट्टणास वेढा--घाशीराम कोतवाल--पाटीलबावा देशीं येतात--श्रीमंतांची कृष्णास्नानार्थ स्वारी--सातान्यास महाराजांची भेट--टिपूशीं तह-पाटीलबावांचा पुण्यास मुक्काम--वकीलमुतलखी--नानाशीं वैमनस्य--सचिव-प्रकरण--गायकवाडाची सरदारी-पाटीलबावांचा मृत्यु-अळत्याची लढाई--करवीरकरांवर मोहीम--खर्ड्याची लढाई--सवाई रावसाहेबांचा मृत्यु--बाजीरावसाहेब पुण्यास येतात--शिंद्यांचें प्राबल्य--नाना सातान्यास जातात--शेणवी कारभारी व पटवर्धन सरदार यांचा मिलाफ-चिमाजीआप्पाची स्थापना व छोटी कारकीर्द--नाना वांईस जातात--महाडाकडे पळतात--महाडचें कारस्थान-शेणवी व पटवर्धन यांचा पाडाव--परशुरामभाऊंस कैद. डे. अ. पृष्ठें ६००, किं. तीन रुपये.

भाग दहावा—स. १७९६ डिसेंबर ते १७९८ डिसेंबर अखेर. बाजीरावसाहेबांची स्थापना --नवाब, भोसले, शिंदे, होळकर यांच्या लष्करांचा पुण्यास मुक्काम—पेशवे व शिंदे यांजविषयीं नानांचा बेभरंवसा —शिंद्याकडून नानांच्या द्रव्यहरणाची सुरुवात—नवाब, शिंदे व भोसले यांचे लढे व समजूत—काशीराव होळकरांस सरदारीचीं वस्त्रें-खुन्या मुरलीधर—मल्हारराव होळकरावर छापा व त्याचा मृत्यु—नाना व शिंदे यांत द्रव्यमूलक वितुष्ट—मुकीराची दगलबाजी—नानांचा कारागृहवास—घाटगेशाहीच्या राक्षसी लीला—अत्रूदार धनिकांचा अमानुष छळ—शेणवी सरदारांवर साडेसाती—शिंदे बायांचें बंड उद्भवतें--बंड जोरावतें--घाटग्याचा अमृतरावावर छापा-पेशवे व शिंदे यांत बेबनाव--सातारकर महाराजांचा दंगा- रास्त्यांची त्रेधा--परशुरामभाऊंची सुटका--नानांची सुटका--भाऊंच्या सातारकरांशीं लढाया—सातान्यावर हल्ला व लूट--महाराजांचा बंदोबस्त --पेशव्यांकडून नानांची पायधरणी—नाना पुन्हां कारभारी होतात--परशुरामभाऊंची शेवटची स्वारी—सुरापूरची खंडणी--कर्नाटकची मुलूखगिरी. डे.अ. पृष्ठें ६०० किंमत ४ रु.

भाग अकरावा —सन १८९८ सप्टेंबर ते सन १८०० फेब्रुवारी --मागच्या दोन प्रकरणांची अधिक तपशीलवार माहिती -चतुरसिंगाचा रास्त्यांच्या लष्करावर छापा--रास्ते चतुरसिंगाचें बंड मोडतात--विश्रामबाग राजवाडा- शितोळे व निपाणीकर -पंढरपुरीं डुकरांचें कौतुक--दक्षिणप्रांतीं बायांच्या फौजेचा दंगा--बाया व करवीरकर यांचा मिलाफ--पेशवाईतले नामांकित वैद्य--बाळोबातात्यांची सुटका व पुन्हां कारभारावर स्थापना --पेशव्यांकडून परशुरामभाऊस सरंजामाची मोकळीक, बहुमान व धारवाडचा किल्ला मिळतो--नाना, भाऊ व बाळोबा यांचा मिलाफ--बाळोबांच्या मध्यस्थीनें बायांची समजूत- भाऊ करवीरच्या बाजूस येतात--गोकाक, हुकेरी व चिकोडी वगैरे ठाणीं घेतात--भाऊंवर जारणमारणाचा प्रयोग व त्यामुळें शरीराची हैराणगत--सातारच्या संस्थानाकरितां चतुरसिंगाचा आणखी प्रयत्न--इंग्रज टिपूचें राज्य घेतात--वाघाच्या बंडाची सुरुवात--भाऊ व करवीरकर यांच्या हालचाली--पट्टणकुडीची लढाई--भाऊंचा मृत्यु व त्यांच्या सैन्याची वाताहत--पुणें दरबार कह्यांत आणण्याविषयीं इंग्रजांचा कावा--घाटग्याची सुटका--घाटग्या शिंदे बायांवर मारेकरी घालतो--रामचंद्र परशुराम करवीरराज्यावर स्वारी करितात--पुण्याहून फौज व पलटणें कुमकेस आणितात--शिराळें काबीज करितात--करवीरच्या फौजेवर छापा घालून नासधूस करितात--करवीरावर चालून जातात--करवीरची लढाई. डे. अ. पृ. ६०० किं. चार रुपये.

भाग बारावा—सन १८०० मार्च ते डिसेंबरपर्यंत—करवीरचा वेढा-हल्ले-प्रतिहल्ले-तोफांचा भडिमार-पलटणवाल्यांची दगाबाजी-वेढा उठतो मराठी फौजांची पांगापाग--नाना फडनवीस यांचा मृत्यु--बाळोबतात्यांस पुन्हां कैद--सर्जेरावी राक्षसी लीला--जुन्या मुत्सद्यांवर संक्रांत--पुण्यांत आरब रोहिल्यांचा सुळसुळाट--शिंदे बायांची मर्दुमकी--हिंदुस्थानांतील राजकारण --शिंदे कंपूची आबादाब--सातारकर छत्रपति, यशोदाबाई, पंतप्रतिनिधि यांवर गहजब--धोंडजी वाघाचें बंड--वाघाचें धाडस आणि गनिमीकावा -इंग्रजांची तारांबळ--डवनीवाल्याची लढाई-वाघाच्या बंडाचा शेवट--जुन्या

राजिकाचा नाश-शेणवी सरदार व मुत्सद्दी यांचा संहार--श्रीमंतांचें कारस्थान --लोचटपणाबद्दल इंग्रजांस प्रायश्चित्त--श्रीमंतांचें स्वभाववैचित्र्य--शिंद्याचें हिंदुस्थानांत प्रयाण. डे. अ. पृ. ६०० किंमत चार रुपये.

भाग तेरावा—जन १८०१ जाने. ते १८०२ जूनपर्यंत. शिंदे होळकरांची प्रचंड झुंजें--शिंदे पलटणांची दाणादाण—यशवंतराव होळकराचा झपाट्यानें अभ्युदय-रास्त्यांची कैद—पाटणकर, भोसले, कुंजर, पुरंदरे, पानशे, गोखले, पटवर्धन वगैरे सरदारांचे लष्करी डावपेंच--श्रीमंताचें स्वभाववैचित्र्य --बारभाईंची दाणादाण व विटोजी होळकराचा खून--बेकार शिलेदारांची दैना--सावनूर प्रकरण--गोखले व पटवर्धन यांच्या लढाया--पटवर्धनांचा पराजय --सर्जेराव घाटगे, आपा देसाई व करवीरकर यांची धामधूम--अमृतराव व इंग्रज यांच्या कारस्थानाचा पूर्वरंग--होळकराची दक्षिणेवर स्वारी. ड. क्रा. पृ० ५५० किंमत चार रुपये—

---

कै० तीर्थरूपांच्या ग्रंथांपैकीं ‘ नाना फडनवीसांचें चरित्र, समुद्रकाव्य यशवंतराव महाकाव्य, संगीत चित्रवंचना नाटक, इचलकरंजी संस्थानाचा इतिहास, हैदरअल्लीवर तिसरी स्वारी, मालोजी व शहाजी ’ हीं पुस्तकें आतां आम्हांजवळ विक्रीसाठीं शिल्लक नाहींत. इतर ग्रंथ विक्रीस तयार आहेत त्यांची माहिती.

अधिकार—योग अथवा नाना फडनवीस यांस राज्याधिकार मिळाल्याचा इतिहास—‘ खूब शर्तीनें राज्य राखणाऱ्या ’ नाना फडनविसांनीं राज्य बुडविणाऱ्या एकाहून एक बलिष्ठ अशा प्रतिस्पर्ध्यांवर मात करण्यासाठीं लढविलेलीं कारस्थानें, तीं लढवितांना त्यांवर आलेलीं दुर्धर संकटें, त्या संकटांतून पार पडतांना त्यांनीं प्रकट केलेली निस्सीम स्वामिभक्ति, उज्वल देशाभिमान व अलौकिक चातुर्य यांचें सप्रमाण वर्णन सरदार परशुरामभाऊ पटवर्धन वगैरेंच्या लेखांतून जागोजाग भरपूर उतारे देऊन या ग्रंथांत केलें आहे. किं. ८१० पोस्टेज ८१.

हरिवंशाची बखर अथवा पटवर्धन सरदारांच्या हकीगती--या पुस्तकांत पेशवाईतील पटवर्धन वगैरे प्रसिद्ध सरदार व थोर थोर मुत्सद्दी यांचे

अद्भुत पराक्रम, चातुर्य, धाडस, स्वाभिमान, गुरुजनांविषयीं आदर, औदार्य व निस्सीम स्वामिभक्ति वगैरे सद्गुणांचें उत्तम प्रकारें आविष्करण करणाऱ्या आणि वीर, करुण व हास्य या रसांनीं ओथंबलेल्या आख्यायिका असून लढाईतले, छावणींतलें, दरबारचे व नानाप्रकारचे घरगुती प्रसंग फार मनोरंजक प्रकारें वर्णिले आहेत. किं० ०१० ट. ख. ०१.

फुटकळ चुटकेः—यांत स्फुट विषयांवर कविता छापिल्या आहेत. यांतल्या कांहीं कविता सरकारी क्रमिक पुस्तकांत आल्या आहेत व शाळाखात्यानें हें बुक बक्षिसाकरितां पसंत केलें आहे. किं. ०४ ट. ख. ००६.

गुणोत्कर्षः— ( गद्य. आवृत्ति पांचवी. ) शककर्ते श्रीशिवाजीमहाराज यांच्या चरित्राच्या आधारावर एका स्वामिभक्ताचें वीरकरुणरसात्मक उज्वल चित्र या नाटकांत रेखाटलें आहे. किं. ०१२ ट. ख. ०१.

तारामंडळः— ( गद्य, सचित्र. आवृत्ति तिसरी. ) यांत एका देशभक्ताचा अपूर्व स्वार्थत्याग, देशभक्ति व पितृभक्ति यांत विरोध आला असतां दुसरीनें पहिलीचें साचिव्य पतकरिल्यामुळें झालेले सुपरिणाम, भगवद्भक्तीचें साफल्य, सत्यव्रताचा बाणा, श्रीमंतीचा तोरा, दुर्जनाचें गूढ निठुर दौर्जन्य इत्यादि गोष्टी मनोवेधक प्रकारानें दाखविल्या आहेत. नाटकांतील प्रसंग विविधरसात्मक कल्पिले असून ते जागोजाग उदात्त विचार व रमणीय कल्पना घालून सुशोभित केले आहेत. किं. १ रुपया ट. ख. ०१.

शिवसंभवः—(गद्य, सचित्र आ० दुसरी.) यांत शिवाजी महाराजांच्या जन्माची रमणीय अद्भुत कथा वर्णिली असून त्यांच्या धीरोदात्त मातापितरांनीं महाराष्ट्रांत स्वराज्याचा चैतन्यचंद्रोदय व्हावा म्हणून कोणतीं दुर्धर संकटें सोशिलीं, हें नानाविध हृदयस्पर्शी रोमहर्षण प्रसंगांनीं दाखविलें आहे. किं १ रुपया. ट. ख. ०१

कृष्णकांचनः— ( संगीत, सचित्र. ) यांत राष्ट्रधर्माच्या उदात्त भावना नवीन प्रकारें उद्दीपित करणारे विस्मयोन्मादक प्रसंग साधले असून

त्यांच्या द्वारें वीर, करुण, शांत व हास्य या रसांचा परिपोष केला आहे. पदांच्या चाली प्रसंगपरत्वें प्रेमळ, गोड व गंभीर असून त्यांची निवड रा. टेंबे यांनीं केली आहे. किं. १ रुपया. ट. ख. ८१.

उपमंगळः— ( संगीत. सचित्र. आ० दुसरी ) हें नाटक सुप्रसिद्ध ‘ बळवंत संगीत नाटक मंडळीकरितां लिहिलेलें असून यांतले प्रसंग फारच बहारीचे व विविध रसांनीं परिप्लुत असेच आहेत. हें नाटक म्हणजे ‘ शठंप्रति शाठ्यं ’ या लोकमान्यांच्या वचनाचाच दृष्टांतरूपानें अवतार होय. किं. १ रुपया. पो. ८१

हीं सर्व पुस्तकें आम्हाकडे विकत मिळतील.

यशवंत वासुदेव खरे, मिरज.



# आम्हांकडे मिळणारे ग्रंथः-

खालीं दिलेल्या यादींतील पुस्तकासंबंधीं सर्व खुलासेवार माहिती या पुस्तकाच्या शेवटीं दिली आहे ती वाचकांनीं पाहण्याची कृपा करावी.

| | | |
|---|---|---|
| | ऐतिहासिक लेख-संग्रहाचे भाग. प्रत्येकीं पृ.६०० | किं. रु. आ. |
| १-४ | भाग सहावा, सातवा, आठवा, नववा. किं. प्रत्येकीं | ३ |
| ५-८ | भाग दहावा, अकरावा, बारावा, तेरावा. किं. प्रत्येकीं | ४ |
| ९ | ऐ. ले. संग्रहाचा नवीन भाग चवदावा | ४ |
| १० | अधिकार योग अथवा नानांस राज्याधिकार मिळाल्याचा इ. | ०१० |
| ११ | मराठी राज्याचा उत्तरार्ध-खंड पहिला-या पुस्तकांत कै. खरेशास्त्री यांनीं लिहिलेला पानिपतानंतरचा तेरा वर्षांचा इतिहास छापिला आहे. पृ. ३०० | १०८ |
| १२ | नाना फडनवीसांचें चरित्र-सुधारलेली तिसरी आवृत्ति जवळ जवळ सर्वच ग्रंथ नवीन तयार करून ही आवृत्ति आम्ही प्रसिद्ध केली आहे. पृ. ३०० | १०८ |
| १३ | सांगलीकरांचा वाका-कै० आपासाहेब सांगलीकर यांचें आत्मवृत्त. | ०४ |
| | **नाटकें:-** | |
| १४ | गुणोत्कर्ष. ( आ. सातवी. ) | ०८ |
| १५ | तारामंडळ. ( सचित्र. आ. तिसरी. ) | १ |
| १६ | शिवसंभव. ( सचित्र आ. दुसरी. ) | १ |
| १७ | संगीत कृष्णकांचन. ( सचित्र ) | १ |
| १८ | संगीत उग्रमंगल. ( सचित्र. आ. दुसरी. ) | १ |
| १९ | संगीत देशकंटक. [ सचित्र ] | ०५ |

आमचे एजन्टस्-आर्यभूषण प्रेस. बुधवार चौक पुणें.
मेसर्स परचुरे पुराणिक कंपनी बुकसेलर्स माधवबाग मुंबई. नं. ४

यशवंत वासुदेवशास्त्री खरे. मिरज.

हें पुस्तक कोल्हापूर येथें वासुदेव नारायण ठकार यांनीं आपल्या 'श्रीसिद्धेश्वर प्रेस,' मध्यें छापिलें आणि यशवंत वासुदेव खरे यांनीं मिरज येथें प्रसिद्ध केलें.